मधुराद्वैताचार्य श्रीगुलाबरावमहाराजविरचित सूक्तिरत्नावलि

# तृतीय यष्टि

# प्रियलीलामहोत्सव : आमंत्रणविलास



सर्व अधिकार

॥ श्री ज्ञानेश्वर मधुराद्वैत सांप्रदायिक मंडळ ॥

दहिसाथ, अमरावती.

०

दूरभाष -०७२१-२६७६३०७

॥ श्री ज्ञानेश्वर माउली समर्थ ॥

यष्टि ३ प्रियलीलामहोत्सव या ग्रंथाच्या चतुर्थ आवृत्तीचे

# प्राक्कथन

*मधुराद्वैतदर्शनाचे संस्थापक आचार्य प्रज्ञाचक्षू श्रीगुलाबराव महाराज (मोहोड - माधान) यांचा कालखंड इ.स. १८८१ ते इ.स. १९१५ असा होता. साधारणपणे वयाचे १९ व्या वर्षी आपल्या भक्तिदर्शनाचे प्रबोधन करण्याच्या दृष्टीने ते अमरावतीला श्रीमती जमनाबाईचे उताऱ्यावर (हल्लीचा अमरावतीच्या प्रभात चौकाचे आसपासचा परिसर) पत्नी सौ.मनकरणिका आईसह आले. त्यावेळच्या राष्ट्रीय विद्यालयात (हल्लीचा जोग चौक घंटी घड्याळ येथील परिसर) असलेली श्री.वासुदेवराव मुळे, श्रीनिवासशास्त्री हरिदास, श्री.भालेराव, श्री.ल.रा. पांगारकर इत्यादि शिक्षक मंडळी व अध्यात्मरसिक श्री हरिभाऊ केवले आदि मंडळीचा परिचय होऊन प्रेम जुळला. तेथे श्री महाराजांची निरूपणे व चर्चा होऊ लागली. ह्याचा उल्लेख व माहिती श्री वासुदेवराव मुळे यांनी लिहिलेल्या **''पांडुरंग परिचय''** नामक लहान चरित्र पुस्तिकेत आला आहे. त्यानंतर काही वर्षातच श्री वासुदेवराव मुळे, श्रीनिवासशास्त्री हरिदास, श्री.भालेराव इ. मंडळी नागपूरला स्थानांतरित झाली त्यामुळे त्यांचेकडे नागपूरला श्री महाराजांचे जाणे येणे सुरु झाले. श्री महाराजांच्या भक्तिशास्त्रविषयक विचारांचे ग्रंथ लिपिबद्ध होऊ लागले. श्री महाराजांच्या निकटच्या प्रेमी मंडळींनी नागपूरला श्री ज्ञानेश्वर मुद्रणालयाची स्थापना करून व स्वतःच कार्यभार सांभाळून श्री महाराजांच्या वाङ्मयाला प्रकाशित करण्याला प्रारंभ केला. श्री महाराजांच्या ग्रंथावलीला **''सूक्तिरत्नावलि''** आणि प्रकाशित ग्रंथाच्या भागांना **''यष्टि''** अशी नांवे दिली गेली.*

*या ग्रंथ मालेतील प्रथम यष्टीची पहिली आवृत्ति शके १८२९ (इ.स.१९०७) साली प्रकाशक म्हणून श्रीनिवास रामचंद हरिदास यांनी प्रसिद्ध केली. यांत आठ प्रकरण ग्रंथांचा समावेश होता.*

*शके १८३२ (इ.स.१९१०) साली सूक्तिरत्नावली द्वितीय यष्टि (पूर्वार्ध) प्रकाशक श्री निवास हरिदास यांनी प्रसिद्ध केली. यात सोळा प्रकरण ग्रंथाचा समावेश होता. त्यांनीच श्रावण शके १८३२ (इ.स.१९१०) मध्ये द्वितीय यष्टि उत्तरार्ध प्रसिद्ध केला. या दोन यष्टि मध्ये लहान लहान अशा ३२ प्रकरण-ग्रंथाचा समावेश झाला होता. यांतून श्री महाराजांचे ज्ञानोत्तर भक्तिविषयक विचार विविध भूमिकेतून मांडण्यात आले होते.*

*यानंतर **तृतीय यष्टि प्रियलिला-महोत्सव : आमंत्रण विलास** या नांवाने श्रीमद्‌भागवताच्या प्रथम स्कंधावर मराठी ओवी, गद्य, हिंदी, संस्कृत असे संमिश्र भाष्य प्रसिद्ध करण्यात आले. **''मधुराद्वैत दर्शनाचे मंतव्य''** या दृष्टीने अपूर्व असे हे भाष्य होय. ह्या काळांत श्री महाराजांच्या विचारांचा नुकताच ग्रंथ रुपाने प्रसार होण्यास प्रारंभ झाला होता.म्हणून या तृतीय यष्टिला श्रीनिवासशास्त्री हरिदास व त्यांचे सहाय्यक श्री राजेश्वरराव त्रिपुरवार (हेच श्रीमहाराजांच्या मूळ विस्तृत अशा चरित्राचे लेखक) यांनी प्रदीर्घ असा **''परिचय''** जोडला आहे. (तो प्रस्तुत प्रकाशित ग्रंथात समाविष्ट आहेच.) त्यांत पूर्वीच्या दोन यष्टि संबंधाने व या ग्रंथासंबंधी सूक्ष्म विचार श्री शास्त्री महोदयांनी मांडले आहेत.*

**तृतीय-यष्टि या ग्रंथाची प्रथम आवृत्ति कार्तिक शके १८३२ / इ.स.१९१० मध्ये श्रीनिवास रामचंद्र हरिदास यांनी नागपूर येथें ''श्रीज्ञानेश्वर मुद्रणालयात'' प्रसिद्ध केली. *याच ग्रंथाची दुसरी आवृत्ति दोन भागामध्ये श्री शंकरराव सोमवंशी नाशिक व त्यांचे सहाय्यक श्री.ज्ञानेश्वर उद्धव मांढरे पुणे व संपूर्ण ग्रंथावलीचे संपादक म्हणून श्रीगुलाबरावमहाराजांचे उत्तराधिकारी असलेले वेदांतकेसरी श्री नारायण पैकाजी उर्फ श्रीबाबाजीमहाराज पंडित होते. ही दुसरी आवृत्ति इ.स.१९४० मध्ये दोन भागात प्रसिद्ध करून ग्रंथाचे नांव **भागवतरहस्य** ठेवण्यात आले होते. या आवृत्तीचे वैशिष्ट्य म्हणजे यात कठिण शब्दांचे अर्थ व विवरण स्वतः बाबाजी महाराजांनी लिहून समाविष्ट केले होते. ही गोष्ट श्री काशीनाथ जनार्दन आठवले (निवृत्त सत्र व जिल्हा न्यायाधीश नागपूर) यांनी श्री बाबाजी महाराजांचे जवळ श्रीगुलाबराव महाराजांच्या ग्रंथाचे अध्ययन करून त्याचे विस्तृत टिपण लिहून ठेवले त्यांत नमूद केले आहे. 'अभ्यासासाठी शब्दार्थ-टीपा श्रीबाबाजी महाराजांच्याच असल्याने आवृत्ति पहिली न घेता मुद्दाम दुसरी आवृत्ति अभ्यासासाठी वापरली' असे त्यांचे नोट्सचे वहीत लिहिले आहे.*याच ग्रंथाची तिसरी आवृत्ति इ.स.१९८१ साली नागपूरवरून प्रसिद्ध झाली. यात शब्दार्थाच्या टीपा समाविष्ट आहेतच व नांव मात्र पहिल्या आवृत्तीचेच 'प्रियलीलामहोत्सव' (आवृत्ती २ चे 'भागवतरहस्य' हे नांव वगळले ) हे कायम ठेवून त्यांत श्री महाराजांच्या भागवतावरील **द्वितीय स्कंधावरील अपूर्ण भाष्याचा समावेश** केला होता. यावर मात्र*

*शब्दार्थाच्या टीपा नाहीत व या अपूर्ण ग्रंथाचा यष्टि १४ मध्ये **(प्रियलीला महोत्सव : आगमन विलास)** इतर मराठी ओवीबद्ध ग्रंथ सांख्यसुरेंद्र व नारदीय भक्तिसूत्रभाष्य या सोबत करण्यात आला होता; म्हणून प्रस्तुत चतुर्थ आवृत्तीत त्याचा समावेश करण्यात आलेला नाही व तो प्रियलीलामहोत्सव-आगमन विलास यष्टि १४ मध्येच राहील. या ४ थ्या आवृत्तीत श्रीमहाराजांच्याा शिष्यपंचायतनाातील **पू. भाऊसाहेब खापरे** यांनी तयार केलेल्या विषयसूचिग्रंथाचे म्हणजे **''माधुर्य मधुकोशाचे''** संदर्भ पाहणे सोयीचे व्हावे म्हणून ग्रंथाचे मजकुरासोबत **पृष्ठक्रमांक (य३-२५)** असे टाकले आहेत, ते यष्टि ३ चे **प्रथम आवृत्तीचे पान-क्रमांक** आहेत कारण कोशात ते नोंदले आहेत तसेच **पहिल्या आवृत्तीच्या अनुक्रमणिकेंत** देखील प्रथम आवृत्तीचे पान-क्रमांक तसेच आहेत हे अभ्यासूंनी लक्षात घ्यावे. समन्वय महर्षी ज्ञानेश्वरकन्या श्री गुलाबरावमहाराजांच्या विचारांना ज्यांनी प्रथम लेखनिक होऊन अक्षररूप दिले व स्वतः खपून ग्रंथांना प्रकाशित केले त्या करुणावंत महाभागांचे पुढील पिढ्यांवर फार मोठे उपकार आहेत.*

***- प्रा. देवराव भुजाडे / प्रा. शरद पाटील***

*॥ श्रीज्ञानेश्वरमाउली ॥*

# परिचय

***॥ श्रीमद्भागवत श्लोक ॥***

***निवृत्ततर्षैरुपगीयमानाद् भवौषधाच्छ्रोत्रमनोभिरामात् ।***
***क उत्तमश्लोकगुणानुवादात् पुमान्विरज्येत विनापशुघ्नात् ॥***

***॥ अभंग ॥***

***हरिनाम वेली पावली विस्तार । फळीं पुष्पीं भार वोल्हावली ॥१॥***
***तेथें माझ्या मना होइ पक्षिराज । साधावया काज तृप्तीचें या ॥२॥***
***मुळींचिया बीजें दाखवीली गोडी । लवकरचि जोडी जाली याची ॥३॥***
***तुका म्हणे क्षणक्षणा जातो काळ । गोडी ते रसाळ अंतरेल ॥४॥***

*हरि, हरिभक्त व हरिनाम हीं भक्तीच्या नंदनवनांतील अत्यंत रसाळ फळें होत. यांचें त्रैविध्य केवळ नाममात्र असून वस्तुतः अत्यंत ऐक्य आहे. किंबहुना हीं फळें रसमयच असून यांची रसप्रवाह-माधुरी नित्य नूतन असल्यामुळें ती सेवन करणारास यांच्या त्रैविध्याचें भान न राहतां अखंडैकरसांत त्याची अहंकृति विरून जाते. त्याचा संपूर्ण जगदाभास मावळून त्याच्या दृष्टिकटाहांत भक्तीच्या निस्सीम नंदनवनाचा उदय होऊन तेथील अपूर्व रसप्रभावानें त्याचे संपूर्ण क्लेश नाश पावतात, कर्मांचा क्षय होतो, स्मृति-शास्त्र-पुराणांचा पदपांसुवत् त्याग होतो, परमेष्ठ्यादि पदें तृणवत् तुच्छ वाटूं लागतात, विषयांचा सुप्तिवत् विसर पडतो, कर्तव्य संपतें, त्याच्या सहज क्रिया पुण्यात्मक होतात, श्वासोच्छ्वास हरिनाममय होऊन त्याचे सहज बोल श्रुतिशिरोमय होतात, व तेच प्रेममय प्रणवबीजरूपानें सर्वत्र संचार करून आपल्या दिव्य प्रभावानें अनंत जड जीवांचा उद्धार करितात.(य३-१)*

*भक्तीच्या ह्या दिव्य उपवनांतील वनश्रीची बहार अनुपमेय आहे. तेथील प्रेमवृक्षांचे दाट निकुंज, त्यांवरील टवटवीत फलपुष्पयुक्त हरिनाम वेली, सुमनमधुकरांचा गुंजारव, शुद्धसत्त्वमय पुष्पवाटिका, मधून मधून वाहणारे अष्ट सात्त्विक भावांचे निर्झर, शुद्धांतःकरणरूपी सरोवरें, त्यांतील अत्यंत स्वादु हरि-गुरुभक्तीचें जीवन, त्यावरील शीतल विचार लहरी, शांतीचीं प्रफुल्ल सुवर्ण कमळें, शुद्ध भावनाजलप्रपूरित व नवविध भक्तीचे रत्नसोपानयुक्त पुष्करिणी, सद्बोधरूपी कारंजांतून उडणारे तुषार, तेथे मंदगतीनें चालणारे समाधिनिष्ठ तपोधन राजहंस, भक्ति तुळसींचीं रत्नखचित वृंदावनें, ठिकठिकाणीं उमललेलीं अवताररूपी मधुरपुष्पें, त्यांतील मधुर रसावर टपलेल्या मत्त भ्रमरांचे गुंजारव, सांख्य, योग, वेदांताचीं दूरवर लागून गेलेलीं महावनें, भगवृत्तिन, कथन, व अन्योन्यप्रबोधन करणारे चकोर व शिखी आदि करून नयनमनोहर देखाव्यांनीं भरलेलें हें नंदनवन सुप्रसन्न व अदृष्टपूर्व असें आहे. या स्थानीं मिळणारें सुखही नित्य असल्यामुळें अर्थातच स्वर्गादि सुखें म्हणजे मुलांचीं खेळणीं होत. कारण आब्रह्म भुवनें सगळीं सकाम लोकांचीं मिरासी होत. स्वर्गांत अमरत्वाचें सिंहासन असूनही एका दिवसांत १४ इंद्र होतात, तर भक्तीच्या ह्या स्थानांत स्वतः कालाचाच अंत होतो. स्वर्गांत*

ऐरावताचें वाहन आहे, तर येथें गमनागमनाच्या नांवानेंच पुज्य आहे. स्वर्गांत अमरावती राजधानी आहे, तर येथें येणारे स्वतःच सदेह सृदिानंद होतात. तेथें स्वर्गांत महासिद्धींची भांडारें आहेत, तर येथें सर्व सिद्धींची स्वामिनी जी लक्ष्मी ती संतचरणरजाची अपेक्षा करून असते. तेथें अमृताचीं कोठारें आहेत, तर येथें येणारे प्रभूचें अधरामृत पान करून स्वतःच अमृत होतात. स्वर्गांत कामधेनूंचीं खिल्लारें आहेत, तर येथें श्रुतिमातेच्या दुग्धाची पुष्टी असते. स्वर्गांत देव सेवक असतात, येथें स्वतः परमात्मा भक्तांच्या मागें पुढें असतो. स्वर्गांत चिंतामणीची भूमी आहे, येथें अखंडैकरस आत्मभूमी आहे. स्वर्गांत सुरतरूंच्या वनवाटिका आहेत, येथें प्रेमवृक्षांचीं कुंजवनें आहेत. स्वर्गांत रंभा उर्वशी आदिक अप्सरा उपभोगार्थ मिळून कल्प कल्प काम पुरा होत नाहीं, येथें सर्व (य३-२) जगत् अंबामय होऊन निष्कामतेशीं नित्य सुलग्न लागतें, स्वर्गांत मदन पलंगावर येऊन निजतो, येथें मदनतात भक्तांच्या हृदय पलंगावर अखंड जागत राहतो. स्वर्गांत बृहस्पतिप्रमुख स्वस्तिश्रियेचे ब्राह्मण आहेत, येथील स्त्रियांचे शब्द श्रुतीनें अभिनंदन करण्यासारखे असतात. स्वर्गांत गंधर्व गाणीं गातात, येथें भक्तांचे श्वासोच्छवास नवे प्रबंध होतात व कृष्ण वेणुगीताची धुमाळी चालू असते. स्वर्गांत सकामांचा सुकाळ असतो, येथें निष्कामप्रेमळांचा सुकाळ असतो.तात्पर्य स्वर्गादि सुखाला कुत्र्याच्या सडलेल्या मांसाची जी उपमा तातादिकांनीं दिलेली आहे, ती अगदीं यथार्थ आहे. असो.

हें उद्यान म्हणजे देवभक्तांचे एक अजब क्रीडाभुवनच होय. सृदिानंद परमात्मा ह्या ठिकाणीं केवळ 'भक्त्यर्थ अवयवी इव' होऊन शुद्धसत्त्वमय सुकुमारगात्र हरिहररूपानें भक्तांबरोबर नित्य क्रीडत असतो. व्रजवनितादि स्त्रिया व शुकसनकादिक संतमंडळ देवाचे खेळगडी असून ज्ञान व वैराग्य येथील व्यवस्थापक होत. येथील देवभक्तांच्या क्रीडा प्रेमरसपरिप्लुत असल्यामुळें ह्यांना रासक्रीडा हें अन्वर्थक नांव मिळालें असून त्या सर्व हरिनाममय असतात. म्हणून ह्या तिघांचें ऐक्य वर सांगितलें आहे. ह्यांतून एकाची जरी प्राप्ति झाली तरी ओघानें दुसऱ्या दोघांची सहज होते. कारण जेथें हरि आहे तेथें हरिभक्त व हरिनाम आहेत, जेथें हरिनाम आहे तेथें हरि व हरिभक्त आहेत, व जेथें हरिभक्त आहे तेथें हरि व हरिनाम आहेत. निर्दोष नामस्मरण केल्यावांचून भगवत्कृपा नाहीं, भगवत्कृपेवांचून सच्छास्त्र व सद्गुरु यांची प्राप्ति नाहीं व सद्गुरु कृपेवांचून प्रभूचें यथार्थ स्वरूप व नाममहिमा कळत नाही. ह्या प्रेमलीलात देवाला देवपणा स्फुरत नाहीं व भक्तांनां भक्तपणा स्फुरत नाहीं, परंतु हरिनाम मात्र सर्वांना इष्ट आहे. ह्या प्रमाणें भक्तीच्या नंदनवनांत हें प्रेमवर्धनाचें कार्य सतत चाललेलें असते. येथल्या रंगभूमीवर प्रभूचें भक्तवात्सल्य व भक्ताचें प्रभुविषयक निर्हेतुक प्रेम पाहण्या सारखें असतें.

भक्तसंतोषार्थ प्रभु कोठें सर्पशय्येवर निजतो, तर कोठें सर्पांचें भूषण मिरवितो. कोठें गरुडावर स्वार होऊन भक्तांसाठीं धांवतो, तर कोठें (य३-३) नंदीवर सवारी करून युद्धार्थ निघतो. कोठें मत्स्य होऊन वेदांचा उद्धार करितो, तर कोठें वराह होऊन पृथ्वी दाढेवर धरतो. कोठें सिंह होऊन दैत्यांचें पोट फाडतो, तर कोठें फारच लहानपणा दाखवून एखाद्या दानशूराला तोंडघशीं पाडतो. कोठें पुत्र पचवून खावयाला मागतो, तर कोठे व्याघ्र होऊन भक्ताची स्त्रीच हरण करितो, कोणाबरोबर कण्या खातो, तर कोणाचें उच्छिष्ट भक्षण करितो. कोणासाठीं सावकार होऊन हुंडी भरतो, तर कोणाचीं मेलेलीं ढोरें ओढतो. कोणाच्या घरीं पाणी वाहतो, तर कोणासाठीं माहार होऊन यवनाला ''जोहार मायबाप'' म्हणतो. कधीं स्त्री होऊन भक्तांचा काम पुरवितो, तर कधीं पति होऊन निष्काम करतो. जीवंतपणींच यानें भक्तांचे लळे पाळिले असें नाहीं, तर मृताकरितां श्मशानांत शोक केला. स्वहस्तानें भक्तांच्या शवाला दहन केलें, पूतनेचें रक्त प्याला व शंखासुराचें कलेवर अझून हातांत वागवीत आहे. तुकाराम म्हणतात :-

**॥ अभंग ॥**

**मांस चर्म हाडें । देवा अवघींच गोडें ॥१॥**
**जें जें हरिरंगी रंगले । कांहीं न वचे वायां गेले ॥२॥**
**वेद खाय शंखासुर । त्याचें वागवी कलेवर ॥३॥**
**तुका म्हणे ऐसा । बराडी हा भक्तरसा ॥४॥**

प्रभूच्या भक्तवात्सल्याविषयीं तात म्हणतात :-

**'म्हणोनि गा नमस्कारूं । तयातें आम्ही माथां मुकुट करूं । तयाची टांच धरूं । हृदयीं आह्मी ॥**
**तयाचिया गुणांचीं लेणीं । लेववूं आपुलिये वाणी । तयाची कीर्ती श्रवणीं । आम्ही लेऊं ॥**
**तो पाहावा हे डोहळे । म्हणोनि अचक्षूसी मज डोळे । हातींचेनि लीलाकमळें । पूजूं तयातें ॥**

**दोवरी दोनी । भुजा आलों घेउनि । आलिंगावया लागुनी । तयाचें आंग ॥ (ज्ञानेश्वरी १२/२२१ ते २२४)**

*एवढेंच नव्हें तर भक्तानें लाथ मारली असतांनाही देवाला त्याची केवढी आवडी वाटली पहा :-*

**प्रिया लक्ष्मी डावलोनि केली परौती । फेडोनि कौस्तुभ घेतला हातीं ।**
**मग वोढविली वक्षस्थळाची वांखती । चरणरजां ॥ (ज्ञाने० ९।४८०.)**

*इतके भक्तांचे लळे आवडीनें पुरविणारा प्रभू अन्य कोण आहे ? भक्तांवर इतका देवाचा प्रेम (य३-४) असण्याचें कारण देवांनीं स्वतःच सांगितलें आहे. भगवान म्हणतात 'भक्त हे माझे आत्मे आहेत.' मग स्वतःच्या आत्म्यावर कोण प्रेम करणार नाहीं? परंतु सर्व देवांचाही देव, योगियांचा राव व जीवांचा जीव असा हा परमात्मा असून सर्व देव, साधक, सिद्धांचे संघ व ब्रह्मनिष्ठ पुरुषही ज्याला नित्य नमस्कार करतात अशा प्रभूनें आपला आत्मा म्हणावयाला केवढें भाग्य पाहिजे? याविषयीं तुकाराम म्हणतातः-*

**'मस्तकीं सहावे टांकियासी जाण । तेव्हां देवपण भोगावें गा ॥१॥**
**आपुलिये स्तुती निंदा अथवा मान । टाकावा थुंकोन पैलीकडे ॥२॥**
**सद्गुरुसेवन तेंचि अमृतपान । करुनी प्राशन बैसावें गा ॥३॥**
**आपुल्या मस्तकीं पडोत डोंगर । सुखाचें माहेर टाकूं नये ॥४॥**
**तुका म्हणे आतां सांगूं तुला किती । जिण्याची फजिती करूं नये ॥५॥'**

*इतका जबरदस्त स्वार्थत्याग, व भगवंताविषयीं निस्सीम प्रेम ज्याच्या अंतःकरणांत असेल तोच भगवंताचा आत्मा होण्याला पात्र होईल. वस्तुतः ह्याच्या व्यतिरिक्त पदार्थांवर प्रेम तरी काय म्हणून करावा? सर्व विषयांनां रमणीयता ह्याच्याचमुळें आली आहे. ब्रह्मादिकांचे आनंद ह्याचा एक अंश आहेत असें श्रुति सांगते.*

**'मोरनकी चंद्रकला शीश मुकुट सोहै । केशर को तिलक भाल तीन लोक मोहै ॥**
**कुंडलकी झलकन कपोलपर छाई । मानो मीन सरवर तजि मकर मिलन आई ॥**
**ललित भृकुटिं तिलक भाल चितवन में टौना । खंजन अरु मधुप मीन भूले मृग छोना ।**
**सुंदर अति नासिका सुग्रीव तीन रेखा । नटवर प्रभु वेश धरे रूप अति विशेषा ।**
**हसन दशन दाडिम द्युति मंदमंद हांसी । दमकि दमकि दामिनि द्युति चमकी चपलासी' ॥**

*अशा प्रकारचें ह्यानें भक्त्यर्थ धारण केलेलें मदनमनोहर मोहकरूप पाहतांच भराभर डोळ्यांनीं त्याचा घोंट घेऊं, कां जिभेनें चाटून घेऊं, कां नाकानें हुंगत राहूं, कां चुंबनच घेत राहूं, का दोन्हीं हातांनीं कवटाळून सगळें हृदयांत साठवून ठेवूं ! असें होऊन जातें. मानवी प्राण्याला असें होत असेल ह्यांत आश्चर्य नाहीं पण पशूंनांही (य३-५) असेंच होतें. गोकुळांत ब्रह्मदेवानें वत्सहरण केलें असतां श्रीकृष्ण ज्यावेळेस सर्व वत्स व गोपाळ आपण स्वतः झाले होते तेव्हां त्या वत्सांवर गाईंचा तितक्याच कालांत असा कांहीं विलक्षण प्रेम दिसून येत असे कीं चारी खुरांवर उडत, पुच्छें वर करून हंबरत, त्यांनीं त्या आपल्या वत्साकडे पर्वतावरून धाव घ्यावी, व जवळ जाऊन त्यांनां चाटावें. इतक्या चित्तवृत्ति ओढून घेणारा दुसरा जर कोणीच नाहीं तर प्रियाची परम सीमा हाच ठरत नाहीं काय? मग व्रजस्त्रियांनीं आपलें जीवितसर्वस्व ह्याच्यावरून ओवाळून टाकले, शुकादिकांसारखे निर्ग्रंथ आत्मराम मुनी ह्याचे विषयच वर्णन करण्यांत भाट झालें, व मोठमोठे तपोधन मुनी ह्याच्या प्राप्त्यर्थ अरण्यवास पतकरून कंदमुळें भक्षण करूं लागले, यांत नवल काय ?*

*सारांश, प्रभूच्या ठायीं भक्त हे अनन्यगतिक असतात व त्या व्यापकाला त्यांचें चित्त गवसणी होते.त्यांच्या वृत्तिभ्रमरी भगवंताच्या पदकमळसौरभाला लुब्ध होऊन निमेषभरही माघार घेत नाहींत. त्या सुखापुढें स्वर्ग, पारमेष्ठ्य तर काय परंतु प्रत्यक्ष भगवंताचें षड्गुणैश्वर्यही त्यांना नको असते. मग इहलोकाच्या कनककांतादि बेड्या व नांवलौकिकांचा बडेजाव त्यांना काय होय ? म्हणजे भक्त जसे देवाचे आत्मे आहेत तसा देवही भक्तांचा आत्मा आहे. यामुळें दोघांचें शीळही सारखें जुळतें, व सनातनधर्माच्या उत्कर्षासाठीं दोघेही वेळोवेळीं अवतार घेऊन येतात. देवाचीं जन्मकर्मे जशीं दिव्य आहेत तशीं भक्तांचीही आहेत. तुकाराम म्हणतात :- 'देवासी अवतार भक्तासी संसार । दोहींचा विचार एकरूप ॥' देवाला भक्ताचा विरह सहन होत नाहीं व भक्ताला देवाचा विरह सहन होत नाही. देवाला भक्तांची चरित्रे आवडतात व भक्ताला देवाची चरित्रें आवडतात. देवाला भक्तद्वेषी नको असतो, तर भक्ताला हरिहरद्वेषी नको असतो प्रभू जसा भक्तांच्या हांकेसरसा उडी घालतो तसे संतही दीनाच्या हांकेसरसे उडी घालतात. कोणत्याही परिस्थितींत देवाची जशी समता असते तशी*

*भक्तांचीही असते. (य३-६)*

*सावतामाळी म्हणतात :-*

'विठोबा यावें । समयाला सादर व्हावें ।।धृ०।।
कोण्यादिसीं माडी उप्पर माडी । कोण्यादिसीं बसायाला घोडी ।
कोण्यादिसी गवताची झोंपडी । त्यात रहावे । समयाला० ।।१।।
कोण्यादिसीं बसले हत्तीवर । कोण्यादिसीं पालखि सुभेदार ।
कोण्यादिसीं पायाचे चाकर । पाईं चालावे । समयाला० ।।२।।
कोण्यादिसीं बसले चिंताक्रांत । कोण्यादिसीं धान्य नाहीं घरांत ।
कोण्यादिसीं द्रव्याची हे मात । कोठें ठेवावें ।।३।।
कोण्यादिसीं काळ येईल चालून । कोण्यादिसीं प्राण जाईल घेऊन ।
कोण्यादिसीं श्मशानवासी जाण । एकटें रहावें ।। समयाला० ।।४।।
कोण्यादिसी होईल गुरुची कृपा । कोण्यादिसीं चुकतील जन्मखेपा ।
कोण्यादिसीं सावतां माळ्याच्या बापा । लवकर यावें ।। समयाला सादर व्हावें० ।।५।।

तुकाराम म्हणतात :-

'कैं वाहावें जीवन । कैं पलंगीं शयन ।।१।।
जैसी जैसी वेळ पडे । तैसें तैसें होणें घडे ।।२।।
कैं भोज्य नानापरी । कैं कोरड्या भाकरी ।।३।।
कैं बसावें वहनीं । कैं पायीं अन्हवाणी ।।४।।
कैं उत्तम प्रावर्णे । कैं वसनें तीं जीर्णें ।।५।।
कैं सकळ संपत्ती। कैं भोगणें विपत्ती ।।६।।
कैं सज्जनाशीं संग । कैं दुर्जनाशीं योग ।।७।।
तुका म्हणे जाण । सुख दुःख तें समान ।।८।।'

*देवानें वेद आणि गीता निर्माण करून आपल्या प्राप्तीचे अनेक मार्ग लोकांनां दाखवून दिले. भक्तांनीं त्याच्याच अनुरोधानें वागून सुलभ साधनमार्ग प्रगट केला. तात म्हणतातः-*

*'ते पाहांटेवीण पाहावित । अमृतेंवीण जीववित । योगेंवीण दावित । कैवल्य डोळां ।।*
*परि राया रंका पाड धरूं । नेणती सानेयां थोरां कडसणी करूं । एकसरे आनंदाचें आवारू । होत जगा ।। ...*
*कृष्ण विष्णु हरि गोविंद । या नामांचे निखिल प्रबंध । माजीं आत्मचर्चा विशद । उदंड गाती ।।*
*मग वाड धाकूटे न म्हणती । सजीव निर्जीव नेणती । देखिलिये वस्तु उजू लुंठिती । मीचि म्हणोनि ।।*
*आपुलें उत्तमत्व नाठवें । पुढील योग्यायोग्य नेणवे । एकसरें व्यक्तिमात्राचेनि नांवें । नमूंचि आवडे ।।*
*अखंड अगर्वता होऊनि असती । तयांची विनय हेचि संपत्ति । जे जयजयमंत्रें अर्पिती । माझ्या ठायीं ।।*
*नमितां मानापमान गळाले । म्हणोनि अवचितां मीचि जाहाले । ऐसे निरंतर मिसळले । उपासिती ।।*
*(ज्ञानेश्वरी अ.९-२०१,२-२१०-२२२,२३-२२६,२७)*

*प्रभूनें भक्तांकरितां केलेल्या लीला जशा इतिहासांत प्रसिद्ध आहेत तसें भक्तांनींही प्रभुप्रेमा-करितां अनेक जन्म देहसमर्पण करून साधनांचे कष्ट सोसून देवाला ऋणी केल्याचें पुराणादिकांत वर्णन आहे. 'येथ प्रतिफळे भावना आपुलाली' ह्या तातवचनाप्रमाणें,किंवा 'सेवानुरूपफलदोऽसि यथा महीपः' ह्या कन्यापंचकांतील आद्य कन्योक्तिप्रमाणें परमात्मा जसा भावनानुसार फल देणारा आहे तसे संतही भावनेंप्रमाणें फळ देणारे आहेत. याविषयीं तुकारामवचन प्रसिद्धच आहेः-*

*'मऊ मेणाहुनी आम्ही विष्णुदास । कठिण वज्रास भेदूं ऐसे ।।१।।*
*मेले जित असों निजोनियां जागे । जो जो जें जें मागे तें तें देऊं ।।२।।*
*भले तरि देऊं गांडीची लंगोटी । नाठ्याळाचे काठी देऊं माथां ।।३।।*

मायबापाहुनि होऊं कृपावंत । करूं घातपात शत्रूहूनि ।।४।।
अमृत तें काय गोड आम्हांपुढें । विष तें बापुडें कडू किती ।।५।।
तुका म्हणे आम्ही अवघेचि गोड । जया पुरे कोड त्याचे परि' ।।६।।

देवाच्या लीला जशा 'विमोहाय कुधियां' म्हणजे मूढ लोकांनां व्यामोह उत्पन्न करणाऱ्या असतात तद्वत संतांच्या लीलाही असतात. एकंदर अभिप्राय हा कीं -

'एका अंगीं दोन्ही जाली हीं निर्माण । देवभक्तपण स्वामिसेवा ।।
तुका म्हणे येथें नाहीं भिन्न भाव । भक्त तोचि देव देव भक्त'।।

या संतवचनानुसार देवभक्त दोघेही समरस असून त्यांच्या ऐक्यानें प्रेमवर्धनाचें प्रयोजन सिद्ध होतें. ह्या देवभक्तांच्या अंतरंग वृत्तींचें दृष्ट स्वरूप म्हणजेच हरिनाम होय. ह्यांची प्रेमवर्धनाची उत्कट इच्छा व ह्यांचा सत्यसंकल्प ह्यामुळेंच हरिनामांत प्रबल मंत्रशक्ति व ओजस्विता आली आहे. ती इतकी कीं नामप्रभावापुढें पाप करण्याची पाप्यांत शक्तीच नाही. नामस्मरणांत चित्तवृत्ति (य३-८) रंगल्यामुळें कर्मलोप झाल्यास अन्यत् प्रायश्चित्तांचें शास्त्रांत वैय्यर्थ्य सांगितलें आहे. प्रायश्चित्ताचाच अर्थ मुळीं स्मृतींत असा केला आहे :-

'प्रायो नाम तपः प्रोक्तं चित्तंनिश्चय उच्यते । तयोर्निश्चयसंयुक्तं प्रायश्चित्तमिति स्मृतम् ।।'

वेदपुराणादि समस्त ग्रंथ व संतांचे ग्रंथ ह्या देवभक्तांच्या वाङ्मयी तनू होत. त्यांच्या चित्तवृत्तीच ह्या रूपानें प्रेमदानार्थ परिणाम पावल्या आहेत. हेंच संतबीज होय. जीवांच्या कल्याणार्थ ह्याचें अत्यंत महत्व आहे. हें बीज जीवांच्या वासनेंत जेव्हां संस्काररूपानें आरूढ होतें तेव्हां चित्तांतून विषय-चिंतनरूपी भवबीज नष्ट होतें, सद्वासनेचा अंकूर फुटून हरिनामीं आवडी उत्पन्न होते व नीतीचें आणि सदाचरणाचें खत व शुद्ध भावनेचें जीवन मिळून प्रेमवृक्ष वाढीला लागतो व प्रेमाचींच त्याला मधुर फळें येतात. असें ह्या बीजाचें फलीभवन झालें कीं सनातन धर्माचा प्रादुर्भवनकाल प्राप्त होऊन हरीचे व हरिभक्तांचे अवतार प्रगट होतात. याप्रमाणें कल्पाकल्पांत धर्मरक्षणाची व्यवस्था चालू असते.

'संतबीज पलटे नहीं, जावे जुग अनंत । उंच नीच घर आवे, अखिर संतका संत'

हें वचन याविषयीं प्रसिद्धच आहे. हरिप्रमाणें हरिनामही सगुण निर्गुण आहे असें तुकारामांनीं एके ठिकाणीं म्हटलें आहे. हरिनामप्रभावाविषयीं कलिसंतरण उपनिषद साक्ष देत असून महाभारतांत पुढील वचनें आहेत :-

'प्राणकांतारपाथेयं संसारच्छेदभेषजम् । दुःखशोकपरित्राणं हरिरित्यक्षरद्वयम् ।।
सर्वाश्रमाभिगमनं सर्वतीर्थावगाहनम् । न तथा फलदं सौते नारायणकथा यथा ।।'

हरिकीर्तनप्रभाव तात येणेंप्रमाणें वर्णन करतातः-

'तरी कीर्तनाचेनि नटनाचें । नाशिले व्यवसाय प्रायश्चित्तांचे । जें नामचि नाहीं पापाचें । ऐसें केलें ।।
यमदमा अवकळा आणिली । तीर्थे ठायावरूनि उठविलीं । यमलोकींची खुंटिली । राहाटी आघवीं ।।
यम म्हणे काय यमावें । दम म्हणे कवणातें दमावें । तीर्थे म्हणती काय खावें । दोष औषधासि (य३-९) नाहीं ।। ...
तो मी वैकुंठीं नसे । वेळ एक भानुबिंबींही न दिसे । वरी योगियांचींही मानसे । उमरडोनि जाय ।।
परी तयांपासी पांडवा । मी हारपला गिंवसावा । जेथ नामघोष बरवा ।। करिती माझा ।। ...
नाम जपयज्ञ तो परम । बाधूं न शके स्नानादि कर्म । नामें पावन धर्माधर्म । नाम परब्रह्म वेदार्थी ।।'

(ज्ञाने. अ.९। ९७ ते ९९, २०७,२०८ अ.१०।२३३.)

हरिकीर्तनप्रसंगीं संतांच्या अमृतमय वाणीनें सहज आधिकारिकत्व देणारे असे मंगल आशीर्वाद मिळत असतात :-

'वर्षत सकळमंगळीं । ईश्वर निष्ठांची मांदियाळी । अनवरत भूतळीं । भेटो तयां भूतां ।।
चला कल्पतरूचे अरव । चेतना चिंतामणीचे गांव । बोलते जे अर्णव । पीयूषाचे ।।
चंद्रमे जे अलांछन । मार्तंड जे तापहीन । ते सर्वांही सदा सज्जन । सोयरे होतु' ।।

(ज्ञाने. अ.१८।१७९७ ते ९९)

'तुम चिरंजीव कल्याण रहो हरिकथा सुरस पीयो ।
हरिकीर्तनके साथि सज्जन बहुत बरस जीयो ।।धृ०।।
सस्ता दाना पानी निर्मल गंगाजल गहेरा । राजरंग और बागबगीचे रुपय होन मोहरा ।।१।।
ऊंचा मंदिर महेल सुनेरी मुलुख खूब वस्ती । पुत्र पौत्रा सुंदर कांता सुगुणरूप मस्ती ।।२।।

***अमृतरायके अमृत बचनसे सदा सुखी रहियो । धष्ट पुष्ट आरोग्य काया आनंदमें रहियो ॥ तुम चिरं० ॥३॥'***

*हरि व हरिभक्त जसें भावनेप्रमाणें फळ देतात तसें हरिनामही भावनेप्रमाणें फळ देणारें आहे. रजस्तमयुक्त चित्तानें नामस्मरण करणारे जगाला भयंकर तापदायक झाले आहेत व शेवटीं आपल्याच कर्मानें नाश पावले आहेत. त्यांचीं उदाहरणें इतिहासांत प्रसिद्ध आहेत. अशुद्ध चित्तानें उपासना करणारांस आसुरलोकांची प्राप्ति होते असें श्रुति सांगते.*

*'नाम स्मरतां म्हणुनी आचराल दोष । तरी श्रवण मनन भक्ति पडली ओस' असें नाथ म्हणतात.*

*'इंद्रियांसी नेम नाहीं । मुखीं नाम करील काई' असे तुकारामांनीं म्हटलें आहे म्हणून नुसत्या नामस्मरणानें भवसागर तरून जाण्याची (य३-१०) इच्छा असेल तर 'सन्निंदादि' दशापराध* टाळून शुद्ध सात्विक भावनेनेंच नाम घेतलें पाहिजे.*

*(टीप)*

**** 'सन्निंदा[१]ऽसति नामवैभवकथा[२] श्रीशेशयोर्भेदधी[३]- रश्रद्धाश्रुतिशास्त्रदेशिकगिरां [४,५,६] नाम्न्यर्थवादभ्रमः[७]। नामास्तीति निषिद्धशास्त्र[८]विहित-त्यागोहि[९] धर्मान्तरैः साम्यं नाम्नि[१०]जपेत् शिवस्य च हरेर्नामापराधा दश ॥***

*अत्यंत दुराचरणी पुरुषही नामानें पावन होतो ही गोष्ट खरी; परंतु भगवन्नामारूढ होण्याबरोबर नियमबद्ध वागून -*

***'आणिक दुसरें मज नाहीं आतां । नेमिलीया चित्तापासुनीयां ॥***
***पांडुरंग ध्यानीं पांडुरंग मनीं । जागृतीं स्वप्नीं पांडुरंग ॥***
***पडले वळण इंद्रियां सकळां । भाव तो निराळा नाहीं दूजा ॥'***

*इतका दृढ निश्चय झाला पाहिजे, दुराचार सुटत गेला पाहिजे व भगवत्प्रेम उत्तरोत्तर वाढत गेला पाहिजे तरच तें नाम फलद्रूप होतें. राजमार्गानें जावयाचें असेल तर संतसंग हेंच आद्य साधन आहे. असे -*

***'तद्विज्ञानार्थं सद्गुरुमेवाभिगच्छेत् समित्पाणिः श्रोत्रियं ब्रह्मनिष्ठम्' ॥***
***'तद्विद्धि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया' ॥***
***'सतां संगतिरेवात्र साधनं प्रथमं स्मृतम् ॥'***
***'संतसंगें अंतरंगें नाम बोलावें' ॥***

*इत्यादि श्रुतिसंताभिप्रायबोधक वचनावरून स्पष्ट दिसतें. संपूर्ण चित्तवृत्ति सद्गुरूच्या स्वाधीन करून गुरुसेवाच सर्व कांहीं देईल अशा निश्चयानें शतशः जन्म त्यांचेच दास्य करण्याचा कृतसंकल्प झाला कीं त्या करुणावत्सल सद्गुरुकृपादृष्टिप्रभावानें समस्त प्रतिबंध जळून जातात, यमनियमादिक साधनें आपोआप प्राप्त होतात व हरि आणि हरिनाम हें फळ ओघानेंच हस्तगत होतें.*

*एवं हरि, हरिभक्त व हरिनाम यांचें ऐक्य व भक्तीच्या नंदनवनांतील त्यांच्या लीलांचा प्रभाव वर्णन केला. यांतील अभिप्राय हाच कीं जे 'निवृत्ततर्ष' झाले त्यांनांच एवढें भाग्य प्राप्त होतें. अथवा येथील सुखाचे आत्यंतिक अधिकारी तीव्र मुमुक्षु असतात. त्यांना संपूर्ण जगत् दुःखमय वाटत असल्यामुळें त्यांतून 'झडझडून' निराळे निघून, कनककांतादि जड बिड्या तटातट तोडून , मानापमानाचे गोवे गुंडाळून (य३-११) ठेवून त्या करुणाकर हरिगुरुमाउलीच्या नांवानें गाऱ्हाणीं देण्याकरितां ते आपल्या जीवितावर पाणी सोडून धांवत असतात. ती अनुपम भक्तवत्सल करुणाकर हरिगुरुमाउली केव्हां पान्हा पाजून आपलें शांतवन करील असें त्यांना होऊन जातें. त्या माउलीचें स्तनपान मिळेल तरच वांचूं नाहींतर मरूं इतके ते अत्यवस्थ होऊन जातात. त्यांना दुसरें कांहींच नको असतें.ह्या स्थितीचें तुकाराममहाराज वर्णन करतातः-*

***'कोणता उपाय करूं भेटावया । जाळावी हे काया ऐसें वाटे ॥१॥***
***सोडुनीयां गांव जाऊं वनांतरा । रुखमादेवीवरा पहावया ॥२॥***
***करूं गा उपास शोषूं हे शरीर । न धरवे धीर नारायणा ॥३॥***
***जाती आयुष्याचें दिवस हे चारी । मग केव्हां हरी भेटसी तूं ॥४॥***
***तुका म्हणे कांहीं सांगा विचारूनी । विठोबा तुमचे मनीं असेल तें ॥५॥***

*

***'काय देह घालुं कर्वतीं कर्मरीं । टाकूं या भीतरीं अग्निमाजीं ॥१॥***
***काय सेवूं वन शीत उष्ण तान । साहों कीं मोहन धरुनी बैसों ॥२॥***

**काय लावूं अंगीं भस्म उद्धळण । हिंडूं देश कोण खुंट चारी ॥३॥**
**काय त्यजूं अन्न करूनि उपास । काय करूं नास जीवित्वाचा ॥४॥**
**तुका म्हणे काय करावा उपाव । ऐसा देई भाव पांडुरंगा ॥५॥'**

इतकी उत्कंठा झाल्यावर मग त्या श्रीगुरु-माउलीला धीर कसा निघेल? ती आपल्या देहाचेंही भान विसरतें व मनपवनाहून चपल गतीने एकदम उडी घालून आपल्या बाळकाला दिव्य नंदनवनाच्या शीतल छायेंत आणून सोडते. मग तेथील मधुर रसाच्या यथेच्छ पानानें त्याचे समस्त श्रमपरिहार होऊन तुंद होत्साता मत्तभ्रमरवत् गुंजारव करीत भगवृारणाशीं नित्य संलग्न होऊन राहतो. याप्रमाणें निवृत्ततर्ष सत्पुरुषांच्या हातून जसें सनातन-धर्मस्थापनेचें कार्य निर्हेतुक घडत असतें तसें ह्या भवश्रांत पुरुषांच्या हातूनही घडूं लागते. आतां तिसरे 'श्रोत्रमनोभिराम' ह्यांचें भाग्य मात्र वरील दोघांपेक्षां हीन असतें. हे 'उत्तमश्लोकगुणानुवादाला' लुब्ध असतात, परंतु वैकुंठ कैलासादि लोकांतील वैभवाच्या लालचीनें लुब्ध असतात व आपल्याच कर्मरूपी (य३-१२) द्रव्यानें तयार केलेल्या मार्गानें यावयाला निघून येथें येऊन पोहचतात. परंतु त्यांच्या अभिलाषभावने-मुळेंच हें अपूर्व नंदनवन त्यांना त्या त्या लोकांसारखें प्रतीत होतें. तथापि येथपर्यंतही येऊन पोहचणारे थोडेच असतात. बहुतेक मंडळी दिशाभूल होऊन स्वर्ग संसार नरकावस्थेच्या खड्यांतच पडणारी असते. यद्यपि भगवत्कथेचा एवढा दुरुपयोग त्यांच्या हातून घडतो तथापि फार झालें तर सनातन धर्माचे स्वरूप मलीन करण्यापलीकडे त्यांच्या हातून कांही अपकार घडत नाहीं. परंतु सनातन धर्माला अजिबात बुडवूं पाहणारी मंडळी म्हटली म्हणजे 'पशुघ्न' वर्ग होय. 'असत्यमप्रतिष्ठं ते जगदाहुरनीश्वरम्' हें यांचें आद्य सूत्र होय. ह्या वर्गालाही ताळ्यावर आणण्याचा श्रुतिसंतांचा प्रयत्न दयार्द्र बुद्धीनें चालला असतो.

कणाद गौतमादि आचार्यांनीं अवतार घेऊन ह्यांच्या मताचें खंडन केलें आहे, व तात तुकारामादि संतांनीं ह्यांचे दोष स्पष्ट दाखविले आहेत. त्या सर्वांच्या म्हणण्यांतील मथितार्थ हाच कीं 'पशुघ्न' वर्ग हा समस्त पातकांची राशी आहे. 'पशुघ्न' म्हणजे आत्महत्यारी किंवा देहाला आत्मा मानणारा. देहालाच आत्मा मानणें हें सर्वांत मोठें पाप होय. ह्याच्या पलीकडे पापाची अवधी राहिली नाही. 'देहच मी' म्हणणाराला इहलोकही धड मिळत नाहीं तर परलोक कोठला? अशा अर्थाचें भगवद्वचन गीतेंत आहे.

'बळें देह मी म्हणतां । कोटी ब्रह्महत्या माथां' असें तुकारामांनी म्हटलें आहे. ह्याचें कारण उघडच आहे. इहलोक झाला तरी तेथील भोग भोगण्याला देहस्वास्थ्य पाहिजेच व त्याच्याचवर नास्तिकांची येवढी भिस्त आहे; परंतु ज्या देहाच्या सुखाकरितां नास्तिकाचा एवढा खटाटोप असतो तें शरीरस्वास्थ्यच मुळीं त्याला अतिपातकास्तव लाभत नाहीं असें स्वतः भगवान् अग्निवेशाचार्यच चरकसंहितेंत म्हणतात. तें वचन असें :-

**'नास्तिकस्यास्तिनैवात्मा यदृच्छोपहतात्मनः । पातकेभ्यः परं चैतत्पातकं नास्तिकग्रहः'॥**

(सूत्रस्थान,तिस्त्रैषणीयप्रकरण,अध्याय११,श्लोक१६)

ह्या वचनाचा संबंध शरीरस्वास्थ्याशींच असला पाहिजे. एऱ्हवीं नास्तिकवादाचा वैद्यकशास्त्राशीं दुसरा संबंध दिसत नाहीं. (य३-१३)

तात्पर्य, ज्यांना आत्महिताची चाड असेल त्यांनीं तडाक्यासरशी देहबुद्धि टाकून द्यावी. निदान अशा लोकांचा संसर्ग तरी न करता प्रयत्नपूर्वक त्यांचा परित्यागच करावा;व विशेषतः त्यांच्या दूरीकरणार्थच श्रुतिसंतांनीं त्यांच्या दोषांचें आविष्करण केलेलें दिसतें.

**'खलानां कण्टकानां च द्विविधैव प्रतिक्रिया । उपानन्मुखभङ्गो वा दूरतो वाऽपि वर्जनम् ॥'**

असे एक अपर वचनही त्याविषयीं प्रसिद्ध आहे. असो.

उपरि निर्दिष्ट केलेले पामर व विषयी पुरुष यद्यपि योग्य मार्गापासून भटकलेले आहेत तथापि दुःखनिवृत्तीची व नित्यसुखप्राप्तीची इच्छा त्यांना आहेच. म्हणून त्यांचे ठिकाणींही मुमुक्षुतापत्ति सिद्ध होत असल्यानें मुक्तिबोधक शास्त्रैकशरणता त्यांच्या गळीं येते. अखंडपरमानंदप्राप्ति म्हणजेच मोक्ष. 'ज्ञानादेव तु कैवल्यं' असें यद्यपि श्रुतिवचन आहे तथापि भक्तीच्या नंदनवनांतील नित्यनूतनरसप्रवाह-माधुरी सेवन केल्याशिवाय अखंडपरमानंदप्राप्तिरूप मोक्ष त्रिकालांतही मिळावयाचा नाहीं हा श्रुतीचा शुद्ध सिद्धांत आहे.

**'यस्य देवे पराभक्तिर्यथा देवे तथा गुरौ । तस्यैते कथिताह्यर्थाः प्रकाशन्ते महात्मनः ॥'**

*ही श्वेताश्वतर श्रुती ह्याच अर्थाचें प्रतिपादन करते. पुन्हा ज्ञानप्राप्त्यर्थही कर्म उपासनादि साधनांस भक्तीची अपेक्षा आहेच. स्वतंत्र भक्ति जननी मात्र*

***'क्रियासिद्धिः सत्त्वे भवति महतां नोपकरणे'***

*या कव्युक्तिप्रमाणें कोणाच्याही साह्याची अपेक्षा न करितां लीलेनेंच आपल्या बाळकास कडेवर घेऊन आपल्या नंदनवनांत क्रीडनार्थ घेऊन जाते. हेंच सनातन धर्माचें रहस्य होय; व हेंच (रहस्य) लुप्तप्राय झालें असतां जीवांच्या अंतःकरणांत भवभ्रांतीचा लीलाविलास चालू राहून पामर व विषयी पुरुषांचे संघ निर्माण होत असतात, व त्यांच्या भंजनार्थ व तीव्रमुमुक्षूंच्या प्रेमप्रदानार्थ वेळोवेळीं हरीचे व हरिभक्तांचे अवतार प्रगट होऊन सनातन धर्माचें पुनरुज्जीवन होत असतें.*

***'संसृतिरेषामभक्तिः स्यान्नाज्ञानात्कारणासिद्धेः'***

*हें शांडिल्यसूत्र व -*

***'जीवन्मुक्तिः पराभक्तिस्तदसिद्धिस्तु संसृतिः'***

*हा टीकाश्लोकही असेंच सांगतात. (य३-१४)*

*विदर्भदेशीय श्रीगुलाबरावमहाराज यांच्या सिद्धप्रज्ञवाणींतून प्रगट होत असलेले विचारही वरील तत्त्वाचेंच श्रुति, युक्ति व अनुभवपूर्वक प्रतिपादन करीत आहेत व तेच 'सूक्तिरत्नावली' या नावानें प्रसिद्ध करण्याचा प्रयत्न चालू आहे. ह्या सूक्तिरत्नावलीच्या प्रथम यष्टींतील 'श्रीमद्भगवद्गीतासंगति' नामक ग्रंथांत महाराज म्हणतात :-*

***असो ऐसें जरी कांहीं । तरी सुखता चेतनावीण नाहीं । आणि जगीं तंव सुख नाहीं । म्हणूनि प्रवृत्ति इकडे ॥***
***वृत्तिस्थ सुख पूर्वी वळिलें । म्हणूनि वृत्त्याश्रय सुख पाहिजे वहिलें । तें अनुभवा नाहीं आले । चेतनाविण ॥***
***तें नाहीं म्हणतां दुःख न सुटे । दुःखनिवृत्तिइच्छाही प्रकटे । शशश्रृंगादिइच्छा कोणा न घटे । म्हणोनि आहे चित्सौख्य॥***
***हें चित्सौख्य परम निधान । तेंचि शुद्धवृत्तित्वें श्रीकृष्णपण । अशुद्ध वृत्तित्वें जगपण । जाहलें कीं ॥***

*(पृष्ठ ६९ ओ.५५ ते ५८)*

*अशा प्रकारचें श्रीकृष्णाचें सृदिानंदस्वरूप सांगून तोच श्रीकृष्णपरमात्मा भक्त्यर्थ अवयवीइव कसा झाला हें सिद्ध करण्याकरितां 'अनध्यस्तविवर्त' ही नवीन परिभाषा महाराजांनीं तयार केली आहे. तें अनध्यस्तविवर्तलक्षण येणेप्रमाणें आहेः-*

## अनध्यस्तविवर्त : लक्षण

**'अभिन्नेसत्याऽपररूपत्वे सति**
**भेदाभानपूर्वकम् अधिष्टानज्ञानावरकत्वे सति च**
**प्रीतिमात्रत्वाद्**
**अधिष्ठानज्ञानाऽनिवर्त्यम्**
**अनध्यस्तविवर्तलक्षणम्'**

*(यष्टी १,पृ.१३९, निदिध्यासनप्रकाश)*

*याचा भावार्थ असा :- ज्ञानेकरून प्रीत्यनुसार वस्तूंचें विशेष याथार्थ्य तो 'अनध्यस्तविवर्त'.*

*याप्रमाणें वेदांत आणि भक्ति याचा समन्वय करण्याकरितां भगवच्छरीराची सिद्धि करून अद्वैत भक्तीचे प्रतिपादन सर्वत्र केलें आहे. हाच यांच्या सूक्तिरत्नावलींतील विशेष होय. इतर विषय याच्या अनुषंगानें वर्णन केले आहेत. ह्यांत आलेले अद्वैत भक्तीचें प्रतिपादन कोठें महावाक्याच्या रीतीनें, कोठें शास्त्रीय पद्धतीनें, कोठें अलंकारदृष्टीनें, कोठें वृत्तिदृष्टीनें, कोठें अन्य रीतीनें; असें अनेक प्रकारचें आहे. प्रथम यष्टींतील आद्यग्रंथ जो 'भक्तिपदतीर्थामृत' त्यांत महावाक्याच्या रीतीनें भक्तीचें वर्णन असून ग्रंथाचें प्रयोजन येणेंप्रमाणें सांगितलें आहे :-*

**तरी तुमचे कृपाबळें । परम प्रीतिच्या कल्लोळें । पतिपत्नीभक्तीचे डोहळे । कीं सोहळे स्वानंदसुखाचे ।**
**ते आपण एकीचि (य३-१५) न भोगावें । कांही दुजियासीही द्यावें । हें उदारपण स्वभावें । तुमचा प्रसादू ॥**

*(प्रथम तरंग ओ० ५।६)*

*पुढें त्याच तरंगांत नुसत्या ज्ञानानें उपाधीचें निरसन होत नाहीं असें सांगून श्रुतिप्रामाण्यानें भक्तीची आवश्यकता सिद्ध केली आहे; व नारद आणि शांडिल्य यांच्या सूत्रप्रामाण्यानें भक्त्युत्कर्ष निरूपण केला आहद्वितीय तरंगांत तत्पदार्थलक्षणद्वयनिरूपणानुरूप श्रीकृष्णसाक्षात्कारजन्य भक्त्युपदेश सांगून तृतीय तरंगांत त्वंपदनिरूपणपूर्वक ज्ञानगर्वनिषेधसहित हरिभक्त्युपदेशनिरूपण आहे. चतुर्थ तरंगांत संकेतदृष्टिमय असिपदविवरण करून ऐक्य भजनाची खूण, अकृत्रिम भक्तीचें स्वरूप, भक्ति सकळ रसांची जननी कशी? इत्यादि प्रकारें भक्त्युपदेशाचें निरूपण केले आहें. शेवटील पंचम तरंगांत प्रेमलक्षणा भक्तीचें स्वरूप, सर्व वर्णाश्रमधर्म, प्रत्याहार धारणाध्यानादि योगाचा तिच्यांत अन्वय, गोपिकांची माधुर्यभक्ति, स्वतःची तल्लीन वृत्ति, हरि-हरिभक्त व हरिनाम यांचें प्रेमरसांत ऐक्य व गुरुपरंपरा याविषयीं निरूपण केलें आहे. येणेप्रमाणे भक्तिपदतीर्थामृतांतील विषय असून 'चौसष्टींत' ज्ञान व वृत्तीचें भक्तींत ऐक्य कसें होतें याविषयीं निरूपण केलें आहे. (पृष्ठ २८ ते ३२) त्यापुढें सामान्य वाचकांकरितां 'पत्रांतील' कर्म उपासना व ज्ञानमार्गाचें कथन, मनोवृत्त्यनुसार निरनिराळ्या कक्षेंतील जीवांचें आधिकार व तदनुसार विक्षेपनिवृत्त्यर्थ भक्तीचे प्रकार, सद्गुरूपासनेचें महत्व, गुरुपुत्राचीं लक्षणें, साधनचतुष्टयनिरूपणपूर्वक ब्रह्मबोध इत्याद्यनेक विषय सुलभ रीतीनें वर्णन केले आहेत.(पृष्ट ३२ ते ६०)*

*नंतर **'श्रीमद्भगवद्गीतासंगती'** तील विषय विशेष महत्वाचे असल्यामुळें त्यांचें स्वरूप लक्षांत येण्याकरितां येथें त्यांचा अनुक्रम देतों :-*

*मंगलाचरण व वेदांतशास्त्राविषयीं प्रवृत्तिकथन (पृष्ट ६१) जगांतील समस्त लोक विषयी असल्यामुळें वेदांतश्रवणाकडे कोणाचीच प्रवृत्ति होत नाहीं अशी शंका व तिच्या निरसनार्थ सर्वांची मुमुक्षुतापत्तिसिद्धी (६२) श्रौतकैवल्याचें लक्षण व वेदांताचें मुख्य प्रयोजन (६३) श्रवण मननादि करून रचलेल्या ग्रंथांचा अधिकारानुसार उपयोग व ब्रह्मनिष्ठांच्या वाणीची श्रेष्ठता (६३) श्रवण-मननादि ज्ञानांतील (य३-१६) वैगुण्य, ब्रह्मसाक्षात्कृत कवीची पूर्णता, श्रवण मननादिकांचीं लक्षणें, असंभावनादिकांचीं लक्षणें, व श्रवणादिकांचें फल (६४) बद्ध, पामर, विषयी व साधक यांचीं लक्षणें, साधकाच्या अंतःकरणाची उत्क्रांत स्थिती, त्याला प्राप्त होणारी विवेकानुसार विरक्ति व निग्रहादि साधनसंपत्ति (६५) साधकाला मुमुक्षुदशा प्राप्त झाल्यावर सद्गुरूची प्राप्ति, महावाक्याच्या श्रवण मननादिकांनीं येणारी समाधिदशा व समाधिक्रम-निरूपण (६६) बह्मनिष्ठांची अखंड समाधि, त्याच्या वाणीची वेदरूपता व श्रवण मननादि करून रचित ग्रंथांचे जिव्हादिकांनीं होणारें कार्य.(६६) इंद्रियादिकांच्यां ज्ञानांतील तारतम्यकथन, आत्मज्ञानियाची योग्यता व त्याला वेदांतसिद्धांताचें निर्भ्रम ज्ञान (६७) श्रवण-मननादि करून रचित ग्रंथांतील विषयांचें तारतम्य, ब्रह्मसंपन्नरचित ग्रंथाचें सर्वतोपरी पूर्णत्व व श्रीकृष्णाच्या पूर्णब्रह्मत्वामुळें गीतेची सर्व प्रकारें पूर्णता (६७) न्याय वैशेषिकांदिकांचा जडवाद खंडन व चित्सौख्याची सिद्धि (६८।६९) चित्सौख्यालाच शुद्धवृत्तित्वामुळें श्रीकृष्णपण व अशुद्धवृत्तिमुळें जगपण. वृत्तीची अव्यक्त दशाच कारणाविद्या व ज्ञानानें तिची सकार्य-निवृत्ति हें गीताशास्त्राचें प्रयोजन. ज्ञानकाळाची बाधितानुवृत्ति-गम्यता, जीवन्मुक्ति आणि विदेहमुक्ति यांचा ब्रह्मांत अन्वय, ज्ञानालाच वस्तुत्व व प्रमाणांचें वैय्यर्थ्य (६९) अविद्यानिरसनार्थ वेदाचें प्रामाण्य व ब्रह्मदर्शनाला श्रवण, मनन, ध्यानाचें हेतुत्व. (७०) कोणत्याही परिस्थितींत सर्वांना साधनसहित परमात्मप्राप्ति करून देणारी गीतारूपी नवीन प्रक्रिया, तिचे महावाक्यबोधक काण्डत्रय व कोणत्याही काण्डानें ब्रह्मज्ञानाची प्राप्ति होण्याचा प्रकार. (७१) गीतेविषयीं ज्ञानेश्वरतातांचें व मधुसूदनसरस्वतींचें म्हणणें, व फलत्यागाचें लक्षण (७२) कर्ममार्गांतील व ज्ञानमार्गांतील विघ्नें व तन्निवारणार्थ दोहोंच्यामध्यें भक्तीची योजना. भगवद्भक्तांच्या मतानें त्रिविध भक्तिनिष्ठा व भाष्यकारांच्या मतानें गीतेच्या तीन षट्कांत महावाक्याचें स्पष्टीकरण, वैदिक धर्माहून भक्तीची श्रेष्टता (७३) हरिनामाची शक्ति व नामरूपांचें ऐक्य (७४) अनादिपुण्यसंचय कृष्णार्पण करण्यासंबंधीं तीन शंका व त्यांचें समाधानः- (य३-१७) श्रुती, युक्ति व अनुभवानें परमात्म्याचें सर्वज्ञत्वनिरूपण व प्रारब्धभिन्न संचितपुण्य भगवदर्पण केलें असतां चित्तशुद्धि (७५) नामाचे दशापराध-निरूपण (७६) आधुनिक जंतुवादादि अनेक नास्तिकवादखंडनपूर्वक पुनर्जन्माची सिद्धि (७६ ते ८०) संचित अदृष्ट पुण्यकर्म देवतास्मृतिगत असल्यामुळें तें कर्त्याच्या तंत्रांत नसतें म्हणून तें ईश्वरार्पण करिता येत नाहीं - या शंकेचें उत्तर (८०-८१) मन शुद्ध होऊन एकाग्र होण्या-करितां पश्चात्तापपूर्वक नामस्मरण करण्याची प्रक्रिया. एकाग्रता वाढूं लागली असतां चित्ताला येणारी विवेकयोग्यता. नित्यानित्यवस्तुविवेकविवेचन (८१) विदेहप्रकृतिलयादि वर्णनपूर्वक वशीकारादि वैराग्यनिरूपण (८१-८२) दृढ मोक्षेच्छा*

झाली असतां सद्गुरुसेवनप्रकार (८३) महावाक्यदृढीकरणार्थ श्रवण मननादिकांकरितां शारीरकसूत्राभ्यासनिरूपण. न्याय, सांख्य व योग यांतील श्रुतिविरुद्धांशत्यागपूर्वक वैदांतैक्य व मनननिदिध्यासनार्थ त्यांचे ग्रहण (८३) ब्राह्मीस्थिती व संचितक्रियमाणकर्मांचा ज्ञानानें नाश. (८३) योगियांच्या मतानें प्रारब्धभोगाची व्यवस्था व कायव्यूहाचें प्रयोजन. जीवन्मुक्तीला विरक्ति, उपरति व तत्त्वज्ञानाची आवश्यकता.(वसिष्ठमत) ज्ञानोत्तर-भक्तीनें दृष्टदुःखसहनशक्ति व दृष्टसुखप्राप्ति. निरनिराळ्या आचार्यांच्या मतांतील भक्तीचें स्वरूप. जीवन्मुक्तिस्थित भक्तीचें त्रैविध्य, जीवन्मुक्त ज्ञानी भक्ताची योग्यता व अद्वैतभक्तीचें लक्षण (८४) मनोनाश व वासनाक्षय होण्याकरितां संयमसिद्धीची अपेक्षा व ईश्वरप्रणिधानानें त्वरित संयमसिद्धि साधून त्रिभूमिक असंप्रज्ञात समाधीची प्राप्ति. भगवद्भक्ताची कृतकृत्यता व अभेदभक्तिकथन (८५) सर्वावस्थांत भगवद्भक्तीची आवश्यकतानिरूपण (८६) भक्तीवांचून जीवन्मुक्तीची दुर्लभता. भक्तांना ईश्वर बुद्धियोग देतो. पूर्वजन्मसंस्कारानें अथवा कांहीं अचिंत्य प्रकारानें ज्ञानसिद्धि मिळाली असतां अहैतुक भक्तिच करावी. भक्तिविरहित साधनांनीं भगवत्कृपा मिळत नाही. (८६) अकृत्रिम भक्तीविषयीं श्रुतिसंताभिप्राय- निरूपणपूर्वक गीतागततत्त्वकथन (८६-८७) उपसंहार (८७) (य३-१८)

ह्या एकाच ग्रंथांतील विषयप्रतिपादनावरून सर्वांनां सारख्या प्रमाणानें ज्ञानदान करण्याविषयीं महाराजांची उत्कंठा व सामर्थ्य दिसून येते. याच्या पुढें 'निदिध्यासनप्रकाश' हा ग्रंथ असून त्यांतील हरिनामप्रक्रियेनें बह्मभावनिरूपण, प्रणवोपासना- प्रक्रियाभेदनिरूपण, दृष्टिसृष्टिवादपूर्वक शुद्धानुभव-रहस्य व परमप्रेमलक्षणा भक्त्यैक वर्णन. भगवद्भक्तिपूर्वक गूढाभिसंधिसमाधियोगकथन. पंचकोशविवेकद्वारा ज्ञानोपरति विरक्ति भगवद्- भक्त्यादि निरूपण, ज्ञानकर्तृतंत्रवस्तुतंत्रतया सृदिानंदपदत्रयविवरण, सांख्य-योग-वेदांत- समन्वयपूर्वक योगवेदांतमेलनोपयोगी बहुविध योगप्रक्रिया व सांख्ययोगांतील वेदांतगत फलनिरूपण, भगवद्भक्तिनिष्ठापूर्तिनिरूपण. इत्याद्यनेक प्रक्रिया साधकांनां निदिध्यासनार्थ उपयोगी आहेत. व पुष्प ग्रंथांतील भक्तिसदनाचें वर्णन. स्वानंदप्राप्त्यर्थ भक्तीची श्रेष्ठता, ब्रह्माचें भक्त्यर्थ विष्णुरूपानें आविर्भवन, ज्ञानप्राप्तीकरितां शांकरपदार्थषट्कांचें निरूपण. अनादि भ्रमाची गुरुवाक्यानें निवृत्ति इत्यादि विषय मुमुक्षूच्या मननार्थ आहेत.

याप्रमाणें प्रथम यष्टींतील विषयांचें साधारण स्वरूप असून द्वितीय यष्टींतील पूर्वार्ध व उत्तरार्धांत आलेल्या विषयांचें स्वरूप त्यात्या ग्रंथाच्या विषयदिग्दर्शनावरून व परिचयावरून कळण्यासारखें आहे. त्यासंबंधानें विशेष एवढेंच सांगावयाचें कीं पंचपदी, सद्वैजयंती, बाराखडी, चित्तोपदेश, त्रिकांडसार, तुंबडी, चिरंजीवपदाभ्यास, मणिमंजूषा, अलौकिकप्रवास, स्त्रीगीत, अपराधक्षमापनस्तोत्र, पत्रें, मातृपितृभावनाष्टक, इत्यादि ग्रंथ सामान्य जनतेला फार उपयोगी असून सोपानसिद्धि, नित्यतीर्थ, प्रियपाहुणेर, ध्यानयोगदिवाकर हे ग्रंथ उत्तरभूमिकारस्थ साधकांच्या उपयोगी आहेत. भगवद्भक्तीचा सौरभ व 'प्रीतिनर्तन' ह्यांत भक्तीचा अगदीं कळस झालेला असून महाराजांनीं आपला केवळ स्वानुभवच त्यात व्यक्त केलेला असल्यामुळें 'सोहंभावपारंगत व प्रेमळ' सज्ञनच त्यांतील रस ग्रहण करण्याचे अधिकारी आहेत.

महाराजांच्या ग्रंथांचे यद्यपि वर सामान्यतः वर्गीकरण केलेलें आहे तथापि प्रत्येक ग्रंथांत कांहीं सर्वसामान्य भाग आहेच; व तो सर्वांच्या उपयोगी पडण्यासारखा असून विचारी (य३-१९) वाचकांस बराच बोधप्रद होण्यासारखा आहे. एकंदरींत महाराजांच्या वाणींतील बोधाची योग्यता फार मोठी असून ती त्यांच्याच शब्दांनीं सांगूं लागल्यास अशी आहे :-

**वेदांचें रहस्य शास्त्रांचें माहेर । पुराणांचें सार हेंचि एक ॥१॥**
**भक्तीचा शेवट योगाचें शिखर । ज्ञानाचा आधार हेंचि एक ॥२॥**
**कर्माचें सत्यत्व वेदाचा सिद्धांत । येथें होय अंत वासनेचा ॥३॥**
**जेथें जेथें मन जाऊनियां पाहे । तेथें तेथें आहे ज्ञानेश्वर ॥४॥**

(प्रथम यष्टि पृष्ठ ५७)

'तूं ह्या पूरुषाला सोडून अन्याकडे जाऊं नकोस' ही महाराजांची आज्ञा पावल्यामुळें 'हीरा' नामक वेश्येला जर अंतकाळीं श्रीज्ञानेश्वर महाराजांची स्मृती राहून ज्ञानेश्वरनामस्मरणांत तिनें सद्गति साधली तर त्यांच्या वाणींतील सद्बोध ग्रहण करणारांचें कोट कल्याण कां होऊं नये ? अवश्यमेव होईल यांत संशय नाहीं. असो.

आजपर्यंत निघालेल्या यष्टींतील विषय विशेषेंकरून शुद्धान्तःकरणाच्या मुमुक्षूंनांच उपयोगी पडण्यासारखे आहेत, परंतु आज प्रसिद्ध होत असलेला ''प्रियलीलामहोत्सव'' सर्वांचें सारखें मनोरंजन करून ज्ञानामृताचें पान करविणारा

आहे. किंबहुना–

**'अध्यात्मशास्त्रीं इये । अंतरंगचि अधिकारिये । परी लोक वाक्‌चातुर्ये । होईल सुखिया ॥'**

हे ज्ञानेश्वरतातांचे शब्द या प्रियलीलामहोत्सवाला उत्तम लागूं पडतील. श्रीमद्भागवताची पुण्यपावनता व सनातनधर्माचें पुनरुज्जीवन करणारा त्याचा अलौकिक प्रभाव सर्वविश्रुत आहे. **'स्वर्गे सत्येच कैलासे वैकुंठे नास्त्ययंरसः।'** अशी ज्याची दुर्लभता प्रत्यक्ष शुकाचार्यांनी सांगितली, ज्याच्या पुण्यप्रतापाविषयीं स्वतः व्यास भगवंतांची -

**'श्रीमद्भागवते महामुनिकृते किंवा परैरीश्वरः । सद्योहृद्यवरुद्ध्यतेऽत्र कृतिभिः शुश्रूषिभिस्तत्क्षणात्'**

अशी प्रतिज्ञा आहे, व जें श्रीहरीची प्रत्यक्ष वाङ्मय तनु आहे त्या भागवताची विशेष महती वर्णन करण्याला कोण समर्थ आहे? त्याचाच आधार घेऊन हा 'प्रियलीलामहोत्सव' ग्रंथ महाराजांनीं आरंभ केला. व प्रथमस्कंधाच्या आधारानें तयार केलेला हा त्याचा प्रथम भाग 'आमंत्रणविलास' या नांवानें आज प्रसिद्ध होत आहे. (य३-२०) येथें इतकें अवश्य लक्षांत ठेवावें कीं आधाराला मूळ ग्रंथांतील कथा मात्र घेतलेली असून निरूपणाचा भाग नवीनच फार आहे. ह्यांत स्वग्रंथाचा उपक्रम महाराजांनीं येणेंप्रमाणें केला आहे :-

**'विषयि मुमुक्षु मुक्त जन जे कीं । वासुदेव परायण शेखीं ।**
**त्या सकलांना शुकमुख वाणी । करि सुखि दाउनि भवभयवाणी ॥**
**तें श्रीमद्भागवत पुराणीं । कथित अधिष्ठुनि व्रजपतिराणी ।**
**सखि होउनि मी नित्य तियांची । मुनि वर्णिति प्रख्याति जयांची ॥**
**प्राकृत सुंदर मंद जनाला । वाटे करूं मंदिर मनाला ॥'** (पृष्ठ ११)

श्रीधरस्वामींनीं जे भाव विशेष स्पष्ट केले नाहींत त्यांचें स्पष्टीकरण करण्याचा ह्या ग्रंथांत यत्न केला असून भक्ति व वेदांत यांच्या समन्वयार्थ महाराजांनीं श्रीकृष्णशरीराचें अनध्यस्तविवर्तत्व जागजागीं सिद्ध केलें आहे व 'श्रीकृष्ण भक्त्युद्बोधनार्थच या ग्रंथाचा प्रादुर्भाव आहे.' असें तृतीय सखीप्रेषणाचें ठायीं सांगून ठेवलें आहें . (पृष्ठ ५१ खालून ३ री ओळ पहा ) हा यांचा यत्न सामान्य आहे असें कोणास वाटेल तर वाटो परंतु ''कथित अधिष्ठुनि व्रजपतिराणी । या त्यांच्या शब्दावरून त्यांचें अधिकारिक श्रीकृष्णपत्नित्व दिसून येतें. व ''प्राकृत सुंदर मंद जनाला । वाटे करूं मंदिर मनाला ।'' यावरून सर्वांच्याठायीं समान पुत्रवात्सल्य व्यक्त होतें. ह्या अलोट पुत्रप्रेमामुळे व भक्तीच्या नंदनवनाचें स्वामिनित्व स्वतःकडेच असल्यामुळें त्याना 'वृंदारक द्रुमाचें रसमय दिव्य फळ' महाराष्ट्रभूमीवर आणून मंद जनांला भक्तीचें मंदिर बांधून द्यावेसें वाटलें. दुसरें हा त्यांचा यत्न अनादि परंपरेला अनुसरूनच आहे कारण 'देहादिकाचे ठिकाणीं ज्यांचा अभिमान आहे अशांनां व विरक्तांनां पावन करणारें विमलभगवद्यश व त्याची लीला वर्णन करून सर्वांनां मार्ग दाखीव' असें नारदांनीं व्यासाला पंचमसखीप्रेषणांत म्हटलें आहे. (पृष्ठ ७१)

हें प्राकृत सुंदर मंदिर अझून संपूर्ण तयार झालें नसल्यामुळें त्याच्या भव्यतेची व सौंदर्याची योग्य कल्पना करतां येणें यद्यपि अशक्य आहे तथापि भक्तीच्या नंदनवनांतील संपूर्ण चमत्कार यांत दृष्टिगोचर होतील (य३-२१) असें अनुमान होतें.

ह्या आमंत्रणविलासाचे एकंदर सोळा अध्याय असून प्रत्येकाला 'सखीप्रेषण, असें नांव दिलेलें आहे. ह्या नांवाची

**'सखी परीक्षिती प्रश्नोक्ति । ती आजवरी प्रेषिली होती ।**
**आतां उत्तरें प्रगटतील यादवपती । तो पुढती आगमन विलासू ॥'**

अशी उपपत्ती सोळाव्या प्रेषणाचे शेवटीं (पृष्ठ ३२३ ओ.४६९) सांगून नंतर ह्या आमंत्रणविलासावर

**'हें षोडश खणांचें वृंदावन । येथ तुळसी सप्रेम अंतःकरण ।**
**तळीं बैसला मन मोहन । भाविक जन पूजक ॥** (पृष्ठ ३२४ ओ.४७६)

असें सुंदर रूपक केलें आहे.

ह्या षोडश खणांचीच शोभा व त्यांतील दिव्य पदार्थ अगदीं अपूर्व आहेत. अनेक हृदयंगम पद्यांचे पुष्पगुच्छ, विचित्र शब्दांचे सुमनहार, अनुप्रासमय चूर्णिकांचीं परिमळद्रव्यें, श्रुति युक्ति व अनुभवांचीं वायनें,नाना शंकासमाधानाच्या चित्रविचित्र रंगवल्ल्या, भक्तीच्या नाना प्रक्रियांचीं कुंकुमकेशरादि सौभाग्यद्रव्यें, प्रयत्नादि वाद निरूपणांचीं पंचामृतें, आख्यानोपाख्यानांचे वस्त्रालंकार, हरिनाम वर्णनाचे नैवेद्याकरितां मधुरपदार्थ आदिकरून पदार्थांची सुंदर रचना, श्रीकृष्ण स्वरूपाची व

*त्याच्या चारित्राची श्रृंगारयुक्त छबी, राधिकादि गोपबाळा व रुक्मिण्यादि स्त्रिया यांचा मधुर भाव, मधून मधून सत्संगमहिमा-वर्णनांचा सौरभ, कुंतीस्तुती, भीष्मस्तुती, गंगापंचरत्न इत्याद्यनेक मनोहर स्तोत्रें ह्यांची मोठ्या काळजीपूर्वक मांडणी करून ठेविली आहे. अभिप्राय हाच कीं भाविक पूजक जनांस कोणतीही अडचण न पडतां सुंदर शाममूर्तीच्या पूजनानेंच त्यांच्या संपूर्ण इच्छा तृप्त व्हाव्या. सोळाव्या प्रेषणांतील शुकसमागमवर्णनाची हातवटी मात्र सगळ्यांहून अजब आहे. स्वतः वाचूनच त्याचा आनंद घेतला पाहिजे. ह्या षोडशसखी-प्रेषणांतील समस्त पदार्थांचा (विषयांचा) व निवडक पद्यांचा अनुक्रम दुसरीकडे निराळा छापला आहे. त्यावरून त्यांचें स्वरूप लक्षांत येईल.*

*महाराजांच्या विषयप्रतिपादनाचा रोख मुख्यतः भगवत्प्रेमाकडे असून सर्व संतांच्या गुरुस्थानीं असणाऱ्या व्रजगोपिका त्याविषयीं (य३-२२) मुख्य प्रमाण होत. म्हणून यांच्यासंबंधीं वारंवार मार्मिक-रीतीचें प्रतिपादन यांत आढळतें गोपिकांच्या भगवद्विषयक प्रेमाचें लक्षण महाराजांनीं असें केलें आहे :-*

***संयोगेन सुखं यस्य वियोगेऽपि सुखं भवेत् । पुनः संयोगसंप्राप्तौ सुखं तस्मै नमाम्यहम् ॥** (प्रे.११.पृष्ठ१६३)*

*अशा प्रकारचें निरपेक्ष प्रेम संपादन करण्या-करितां वैराग्यपूर्वक प्रयत्नाचा उपदेशही यांत ठिकठिकाणीं मोठ्या कळकळीनें केलेला आहे. सोळाव्या सखीप्रेषणांत परीक्षितिचरित्र वर्णन करतानां महाराज म्हणतात :-*

***अपराधें देह प्रारब्ध झालें । तेणें बुद्धिस्वातंत्र्य नाहीं हरिलें ।***
***यालागीं मरणसमयींही रायें मांडिलें । वैराग्ययत्नें हरिभजन ॥** (पृष्ठ २७३)*

*तसेंच १४व्या प्रेषणांत :-*

***भगवत्सहायें प्रयत्नाधीन । कालही वश होय पूर्ण । यालागीं कलियुग आहे म्हणून । धर्म खंडन न कीजे ॥***
***'सामर्थ्य आहे चळवळीचें । जो जो करील तयाचें । परी तेथें भगवंतांचें । अधिष्ठान पाहिजे ॥***
***या श्रीसमर्थ वचनीं । विश्वास ठेवावा आवडी करूनी । बळेंचि मन इंद्रियें रोधुनी । आणावा धरणी जगत्पती ॥***
***युगाचें पाहोनि बळ । सज्जनीं यत्न करावा प्रबळ । तेणें अवश्य वैकुंठपाळ । प्रगटे हृदयीं ॥***
***मग जो व्यष्टि-हृदयीं प्रगटे । तोचि समष्टि-ब्रह्मांडीं थाटे । तेथ कालबल नेटें । कांहीं न करी ॥***
***म्हणोनि काल दैवादि वाद । स्वयें जाणोनि असिद्ध । भगवत्सहाय्यें प्रयत्न वाद । नित्य सिद्ध आश्रयिती ॥**(पृष्ठ २५९.)*

*याप्रमाणें प्रयत्नबल वर्णन केलें आहे. अशा प्रकारचा दृढ प्रयत्न ज्या निरपेक्ष प्रेमाकरितां करावयाचा त्या भगवत्प्रेमाला धर्मादिकांची अपेक्षा नाहीं हें सिद्ध करण्याकरितां पुन्हा गोपिकांचा दृष्टांतः-*

***क्षत्रधर्मयुक्त भक्ति । करोनी पावले भगवंतीं । येथ आश्चर्य नाहीं निश्चिती । परी धर्मरहित भक्तींही उद्धरिले ॥** (य३-२३)*

*मदन विगतनयनगोपि गोकुळीं किती ।*
*त्यजुनि पती भजती त्या दिधलि सद्गती ॥ध्रु०॥*
*ललित गमन हसितमंद वदन साजिरें । पाहुनियां शब्दवेत्रऽहंकृती जिरे ॥१॥*
*पाहुनियां अलकावति कांतकन्यका । पावल्याचि ब्रह्मचिति परम धन्यका ॥२॥*

***ओवी :- अति सुंदर गमन । तेंचि ज्यांचें मार्गदर्शन । मंदहास्यें रम्य वदन । प्रसाद चिन्ह तेंचि ज्यांचें ॥***
***प्रेमे करोनि पाहे गोविंद । तोचि ज्यांचा ब्रह्मानंद । घडी घडी ये गृहा मुकुंद । आदर तोची कल्पिती ॥***
***परम मदांध असूनी । भक्तिनिष्ठत्वें शाङ्‌र्गपाणी । सुंदर मंदहासादि करोनी । अत्यंत मानी जियातें ॥***
***एवं संयोगीं आनंद भरिता । वियोगीं लीलाविष्ट चित्ता । ज्ञानें 'ब्रह्माहमस्मि' प्रत्यय येतां । तरी कृष्णादि स्वतः पैं होती ॥ स्वतःकल्पित लीलाकरोन । करिती अहंग्रहोपासन ।***
***परी जयांचा उपकार गहन । ''न पारयेहम्'' आपण हरि म्हणे ॥***
***त्या पर्णित सकळ गोपनारी । हा तंव धर्मार्थ अवतारी । परी जारबुद्ध्या भजोनियां पूतनारी । ब्रह्म सुंदरी पावल्या ॥***
***एवं जीवब्रह्मैक्यपण । पावल्या निश्चयें करोन । आणि अंतःकरणादिकें पूर्ण । कृष्ण स्त्रीपण पावल्या ॥***
*(प्रे.९.पृष्ठ१३३)*

*सारांश, कामक्रोधादिविकारांनीं जरी त्या परमात्म्याकडे चित्त लागलें तरी निरपेक्ष भगवत्प्रेमच त्याला प्राप्त होतें.*

**'कामक्रोधाभिमानादिकं तस्मिन्नेव करणीयम् ।'**

असें याविषयीं भगवान् नारदाचार्य म्हणतात. तातही असेंच म्हणतात :-

**'अगा मी एक लाणीचे खागे । मज येवों ये भलतेनि मार्गे । भक्ति कां विषयविरागें । अथवा वैरें ॥' (ज्ञाने.)**

यांतील रहस्य स्वतः भगवंतांनींच आपल्या वाणीनें असें सांगितलें आहे :-

**'न मय्यावेशितधियां कामः कामाय कल्पते । भर्जिताः,, थिता धानाः प्रायो बीजाय नेष्यते ॥'**

**व**

**'धर्माविरुद्धो भूतेषु कामोऽस्मि भरतर्षभ ॥**

असें म्हणून धर्म-अविरुद्ध कामाला आपली विभूति म्हटलें आहे. इतक्या श्रेष्ठ वचनांकडे डोळेझांक करून गोपिकांचा काम 'आसुरी संपत्ति' म्हणणें हें फार मोठें धाडस होय. व ह्या सिद्धांताचें प्रतिपादन करून रासक्रीडेचें स्वरूप लोकांपुढे मांडूं पाहणारांनां तें स्वरूप मुळींच कळलें नाहीं असें आम्ही स्पष्ट म्हणतों. मग त्यांतलें बीज प्रत्यक्ष उमाकांतानीं (य३-२४) सांगितलें असलें तरी तें केवळ फोल होय यांत संशय नाहीं.

तात्पर्य परमात्म्याचे ठिकाणीं कोणत्याही प्रकारानें चित्त लावलें असतां त्याची प्राप्ति होते हें अगदी निर्विवाद आहे. मात्र तें चित्त अगदीं अनन्यगतिक असलें पाहिजे म्हणजे झालें. सुंदरदास म्हणतात-

**होईं अनन्य भजै भगवंतही और कछू उरमे नहीं राखे ।**
**देबिरु देव जहां लग है डरके तिनकूं वही दीन न भाखे ॥**
**जोग अरु जज्ञ क्रिया व्रतादिक तूं सपने में नहीं अभिलाखे ।**
**सुंदर अमृतपान कियो तब तौं कहुं कौन हलाहल चाखे ।**

असो.याप्रमाणें महाराजांच्या वाणींतील बोध सर्वांच्या अंतःकरणास पटून श्रीज्ञानेशचरणीं त्यांची अखंड रति वाढो अशी प्रार्थना करून ज्ञानेश्वरनामस्मरणांत ह्या परिचयाचा उपसंहार करतों. (य३-२५)

॥श्रीज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ॥

**- प्रकाशक,**

पहिली आवृत्ति,
कार्तिक, शके १८३२
श्रीज्ञानेश्वर प्रेस, नागपूर.

०००

वाचकांच्या सोयीकरितां ह्या ग्रंथास जोडलेला ''परिचय'' व ''विषयानुक्रमणिका'' तयार करण्यांत रा. राजेश्वरराव त्रिपुरवार यांनीं बरेच परिश्रम घेतले ह्याबद्दल आम्ही त्यांचे फार आभारी आहोंत.

**- प्रकाशक.**

(य३-५९)

०००

ज्ञानेश्वरकन्या गोपी पंचलतिका एवं श्रीगुलाबरावमहाराज यांनी रचलेली श्रीमद्भागवतातील प्रथमस्कंधावरील गद्यपद्यान्वित विस्तृत टीका : आमंत्रणविलास व आगमनविलास

**(पैकी आगमनविलास यष्टी १४ मध्ये समाविष्ट आहे)**

।। श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरमाउली समर्थ ।।

# प्रियलीलामहोत्सव[१]

# ।। आमंत्रणविलास[२] ।।

*(**तळटीपांसंबंधी** – कठिण शब्दांचे अर्थ व विवरण स्वतः श्रीबाबाजी महाराजांनी लिहून समाविष्ट केले होते. ही गोष्ट कै. काशीनाथ जनार्दन आठवले (निवृत्त सत्र व जिल्हा न्यायाधीश नागपूर) यांनी - श्री बाबाजी महाराजांचे जवळ श्रीगुलाबराव महाराजांच्या ग्रंथांचे अध्ययन करून त्याचे विस्तृत टिपण लिहून ठेवले हे त्यांत नमूद केले आहे. 'अभ्यासासाठी शब्दार्थ-टीपा श्रीबाबाजी महाराजांच्याच असल्याने आवृत्ति पहिली न घेता मुद्दाम दुसरी आवृत्ति अभ्यासासाठी वापरली' असे त्यांचे नोट्सचे वहीत लिहिले आहे)*

**विषयानुक्रम.- मंगलाचरण (पृष्ठ १-१०)**

*श्रीगुरुहरिहरवंदन पृष्ठ १. शिवपंचाक्षरी आर्या २. द्वादशाक्षरी आर्या २. गुरुसंत महिमावर्णन ३. हरिहर भक्ति महिमा वर्णन ६. हरिभजन महिमा ७. सज्जनवंदन ८. खलजन वंदन ९. हरिकथा कोणाला आवडत नाही? ९. श्रीकृष्णप्रार्थना .*

**(सूचना - विषयांसमोरील पानक्रमांक प्रथमावृत्तीतील आहेत)**

**।। श्रीज्ञानेश्वरमाउली समर्थ ।।**

## ।। मंगलाचरण ।।

**गुरुपादछंद[३]**

**जगदेतज्ज्ञातं यस्माद्येनाप्तं स्थितिमत्र विलयमेति । परमद्वैतं शांतमनन्तं ज्ञानं निगमगमृतमेकम् ।।**
**भजकप्रेम्णा भाति विवर्तं साकारं सकरुणमिष्टम् । गुरुमज्ञानध्वांतविनाशं श्रीज्ञानेश्वरपदमीडे ।।१।।** [४]

## *तळटीपा*

*(१) प्रिय जो भगवान् श्रीकृष्ण त्याच्या लीलाचरित्राचा सोहळा (हे संपूर्ण भागवताचे महाराजांनी दिललेले नांव) (२) प्रथम स्कंधाला प्रियलीला महोत्सवाच्या अपेक्षेने दिलेले नांव. आमंत्रण म्हणजे बोलावणे. विलास म्हणजे प्रेमव्यवहार. भगवंताला चित्तांत साठविण्याकरिता किंवा प्रगट करण्याकरिता जो प्रेमव्यवहार करावयाचा तो कसा करावयाचा, त्याची संक्षेपाने संपूर्ण मांडणी या स्कंधात केली असल्यामुळे, या प्रथम स्कंधाला श्रीमहाराजांनी हे नांव दिले (३) श्रीमहाराजांनी केलेले नवीन छंदाचे नामाभिधान*

***(४)** श्लोक १ चा अर्थ- ज्याच्यापासून जगत् उत्पन्न झाले, ज्याच्या सत्तेने जगत् सत्तावान् भासते, ज्याच्यात पुनः ते लय पावते, असे जे श्रेष्ठ, अद्वैतरूप, अनंत, वेदवेद्य, ज्ञानरूप, सत्य, व एक आहे व जे भक्तांच्या प्रेमामुळे करुणेने अनध्यस्त विवर्त असे आवडते, साकाररूप होतें, अज्ञानांधःकाराचा नाश करिते आणि जे माझे साक्षात् गुरुच आहे अशा त्या श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या चरणकमलांचे मी गुणवर्णन करितो. या श्लोकात श्रीज्ञानेश्वर महाराजांच्या चरणालाच गुरु म्हटले आहे. ''वास्तविक पाहता पद हे अवयव असून श्रीज्ञानेश्वरमहाराज अवयवी आहेत, म्हणून येथे पदाचा व त्यांचा एकदेशी संबंध असल्यामुळे, त्यांचा पदरूपाने निर्देश योग्य नाही'' अशी कोणी शंका करितील, पण **''पै जे वानी श्यातुका । तेची वेगळिये वाला एका । तैसा एकदेशिया व्यापका । सरिसा पाडु''** या श्रीज्ञानेश्वर महाराजांच्या वचनानुसार अनध्यस्त विवर्त अशा शुद्ध स्वरूपाचे ठिकाणी*

***जीवदेहाप्रमाणे अवयव-अवयवी भाव नाही;*** *उलट एकदेशातहि पूर्णत्वाचा अनुभव येतो म्हणून वरील ऐक्यरूप निर्देश योग्य आहे.*

**॥श्लोक ॥**

**बहु ज्ञानें केली सकल महि[१] आक्रान्त[२] मनुजा[३] । बहु श्रांता[४] कांता[५] करुनि रति[६] त्वल्लब्धतनुजा[७] ।**
**बहु स्वर्गामध्यें मिळविलिं सुधापूर्ण[८] नदिकें[९] । सख्या चित्तालंदीपतिपद[१०]-समानंद[११] वदकें[१२] ॥२॥**
**यस्य[१३] ध्यानात् स्थैर्यमामेति चित्तम् । यस्य ज्ञानान्मुक्ततां याति जीवः।**
**यद्धर्मेणावाप्यते चित्तशुद्धि- । स्तद्ब्रह्मैकं पार्वतीशं नमामि ॥३॥**

*(१) पृथ्वी (२) जिंकली (३) हे मानवा (४) श्रमली (५) स्त्री (६) संग (७) तुला प्राप्त झालेल्या देहापासून मिळालेली (रति=सुख) (८) अमृताने भरलेल्या (९) नद्या (१०) चित्तरूपी आळंदीचे राजे त्यांचे पाय (११) पूर्णानंदरूप (१२) स्मर की रे (१३)*

**श्लोक ३ चा अर्थ.** *ज्याच्या ध्यानाने चित्त स्थिर होते, ज्याचे स्वरूपज्ञान झाले असता जीव मुक्त होतो, ज्याच्या प्रीत्यर्थ केलेल्या धर्माचरणाने चित्त शुद्ध होते त्या ब्रह्मरूप पार्वतीपति शंकराला मी नमस्कार करितो.*

**(१) शशिशिररतिपात्रं शुद्धचैतन्यमात्रम् । विमलसुगुणगात्रं भक्तसंछिन्नरात्रम्* ।**
**निगमगतिविहारं संभृतांधांधभारम् । व्रजयुवतिविलासं व्रीडहासं प्रणौमि ॥४॥ (य३-१)**

*(*रात्र = तामस ज्ञान)*

*(१)* ***श्लोक ४ चा अर्थः-*** *मस्तकावर चंद्र धारण करणाऱ्या शंकराचे प्रेमपात्र, शुद्ध चैतन्यरूप, सुंदर व कोमलांग, भक्ताच्या अंतःकरणातील अज्ञानांधःकार नाहीसा करणारा, ब्रह्मस्वरूपाचे ठिकाणी लीला करणारा किंवा ज्याची लीला वेदोक्तगति म्हणजे मोक्ष देणारी आहे, भोळ्या भाविकांचा सांभाळ करणारा, व्रजगोपींना रमविणारा, ज्याचे हास्य लज्जा उत्पन्न करणारे आहे अशा भगवान् श्रीकृष्णाला मी प्रणाम करिते.*

**शिवपंचाक्षरी आर्या**

**न**गणी[२] श्रम करि सेवा मज्जनपदपंकजाचि[३] जो [४]भावें ।
तद्यश[५] तें कुंतिसुता[६] कृष्ण म्हणे सर्वदाचि म्यां गावें ॥५॥
**म**हि[७] सलिल[८] दहन[९] पवन[१०] ख[११] मिळुनी जी जाहली असे काया[१२] ।
ती कृष्णनामस्मरणें होउनि हरि सेवि सद्गुरुपायां ॥६॥
**सि**द्धानुवाद[१३] हा कीं श्रेष्ठ ज्ञानाहुनीहि हरिभक्ति ।
श्रीमन्महाभारती बहुशा[१४] ऐसीच वासुदेवोक्ति[१५] ॥७॥
**वा**गवि[१६] निजहृदयीं[१७] जो सद्गुरुचरणांबुजास[१८] भावानें[१९] ।
त्याचा जन्मोजन्मीं हरि होये दासचि स्वभावानें[२०] ॥८॥
**य**म दूतांप्रति सांगे विष्णुपुराणांत वैष्णवांलागीं[२१] ।
नाणावें कीं त्वां जे झाले क्षिराब्धिजापदविभागी[२२] ॥९॥

*(२) जुमानीत नाही (३) माझ्या भक्तांच्या चरणकमलाची (४) प्रेमादराने (५) त्याचे यश (६) अर्जुना (७) पृथ्वी (८) पाणी (९) अग्नि (१०) वायु (११) आकाश (१२) शरीर.* ***आर्या ६ चा अर्थ****-पृथ्व्यादि पंचभूतापासून बनलेले हे शरीर कृष्णनामस्मरणाने हरिरूप करून सद्‌गुरूच्या पायाचे सेवन कर (१३) जीवन्मुक्ताचे उद्‌गार (१४) पुष्कळशी (१५) भगवान श्रीकृष्णाची वचने (१६) साठवितो (१७) आपल्या हृदयात (१८) सद्‌गुरूच्या चरणकमलास (१९) प्रेमादराने (२०) आपोआप किंवा प्रेम करणाऱ्याचा दास होणे हा त्याचा स्वभाव असल्यामुळे (२१) विष्णुभक्तांना (२२) लक्ष्मी ज्या पायाचे सेवन करिते त्या पायाचे सेवन करणारे किंवा विष्णुसेवेने लक्ष्मीला जे पद प्राप्त झाले ते प्राप्त करून घेणारे.*

**द्वादशाक्षरी आर्या**

**ॐ**काररूप[१] विश्वा[२] जन्मवुनी[३] जो दशांगुली[४] राहे ।
तो नाथ[५] धेनुलोकीं[६] राधेचा कांत जाहला आहे ॥१०॥
**न**भसम[७] व्याप्त[८] असोनी नभमय[९] घेवोनियां शरीरा हो ।

राधासुखार्थ[१०] झाला साकारचि[११] मुक्दिानि[१२] धीरां[१३] हो ॥११॥
मोठा म्हणति जयातें निगमागम[१४] आणि सर्वही शास्त्रें ।
घेतां नाम तयाचें झाकी विश्वास प्रीतिमय[१५] वस्त्रें[१६] ॥१२॥
भवभय[१७] काय बापुडें[१८] स्मरतां यदुनाथपाउलां[१९] विमळा[२०] ।
त्यागुनि वैभवगर्वा[२१] ज्यासाठीं दासि जाहली कमळा[२२] ॥१३॥
गति[२३] नाहीं वाणीची[२४] ज्या रूपीं तोचि गोकुळीं आला ।
बाळ यशोदेचा परि माधुर्ये[२५] पाळि[२६] गोपिका बाला[२७] ॥१४॥
वमनासम[२८] सांडिति हे इंद्रिय विषयांस पाहतां ज्यातें ।
अपवर्गहि[२९] इच्छिति ना आलिंगुनि हृदयिं कुंजराजातें[३०] ॥१५॥

*(१) अउम या त्रिमात्रात्मक (२) जगतास (३) उत्पन्न करून (४) उर्वरित (५) स्वामी (६) गोलोकी (७) आकाशासारखा (८) सर्वात भरलेला (९) आकाशाच्या वर्णाचे किंवा व्यापक (१०) राधेची कामना पुरविण्याकरिता (११) शरीरधारी (१२) मुक्ति देणारा. (१३) विरक्त ज्ञानियास (१४) वेद पुराण (१५) प्रेमरूपी (१६) पांघरुणाने (१७) संसारभय (१८) बिचारे (१९) कृष्णचरणास (२०) शुद्ध (२१) संपत्तीच्या मदाला (२२) लक्ष्मी (२३) प्रवेश (२४) शब्दाची (२५) परमप्रेमाने (२६) रक्षितो (२७) कुमारिका (२८) ओकारीप्रमाणे (२९) मोक्ष (३०) कुंजांमध्यें विहार करणाऱ्याला*

ते तूंच अससि, ऐसें उद्दालक[१] बोलिले स्वपुत्रातें[२] ।
मोठें[३] सगुण वचन मनिं प्रेमळ[४] पाहती जया पवित्रातें ॥१६॥
वामा[५] त्यागुनि वामापति[६] हृदया[७] वाणि[८] करुनियाराधा[९] ।
न पडुनि वादामध्यें घ्या यद्वामांकि[१०] नांदते[११] राधा[१२] ॥१७॥ (य३-२)
सुत[१३] धन दारा[१४] मुनिजन[१५] सोडोनी राहती अरण्यांत[१६] ।
ज्यास्तव[१७] तो प्रभु खेळे होउनियां सान[१८] गोपकन्यांत[१९] ॥१८॥
देउनि यागफळां[२०] जो यागीं[२१] घेना कधींहि अवदान[२२] ।
तो नाथ[२३] गोपिकांतें निरिया[२४] सोडूनि मागतो दान[२५] ॥१९॥
वागेन ज्यारिती तूं सांगसि तैसाचि शिक्षका[२६] मातें[२७] ।
[२८]पदिं कर्महि अर्पुनियां ना इच्छू इंद्रस्वर्गकामातें[२९] ॥२०॥
यतिवर[३०] अथवा होकां सदनीं[३१] वर्णी[३२] तसाचि हीन[३३] परी ।
नाम तुझें गोविंदा पावन[३४] सर्वांस सारिखेंच करी ॥२१॥

*(१) ऋषीचे नांव (२) श्वेतकेतूस (३) अमर्याद (४) भक्त. (५) स्त्री (६) विष्णु, भगवान् (७) मनाला (८) वाणी, वाचा (९) आराधा (१०) ज्याच्या डाव्या मांडीवर (११) राहते (१२) राधा गौळण. **आर्या १७ चा अर्थ** – स्त्रीसुखाची इच्छा सोडून मनाने (ध्यान करून) व वाणीने (नामस्मरण करून) भगवंताची आराधना करा व कोणत्याही वादविवादांत न पडतां ज्याच्या वामांकावर राधा बसली आहे त्या श्रीकृष्णाला प्राप्त करून घ्या. अन्वय-वामा त्यागुनि हृदया वाणि करूनियां वामापति राधा । वादांमध्यें न पडूनि यद्वामांकि राधा नांदते (त्या) घ्या. किंवा 'हृदया वाणि करूनियां' या पदांचा अर्थ तुझ्या व परमेश्वरामध्यें जो हृदयरूपी पडदा आहे तो नाहीसा करून असा अर्थ करावा (१३) मुलगा (१४) स्त्री (१५) तपस्वी लोक (१६) जंगलांत (१७) ज्यासाठी (१८) लहान (१९) गोप कुमारिकाबरोबर (२०) यज्ञाची फळे (२१) यज्ञांत (२२) दिलेले हविर्भाग (२३) स्वामी, समर्थ (२४) चिन्या (२५) भोग (२६) शासन करणाऱ्या (२७) मला (२८) पायीं (२९) इंद्राच्या स्वर्गातील भोगांना (३०) संन्यासी (३१) गृहस्थाश्रमी (३२) दुसऱ्या वर्णाचा (३३) चांडाळ (३४) उद्धरते.*

॥ चौपाई ॥

जे पोळति[१] भवजनितप्रतापें[२] । ते जीवति[३] गुरुचरणप्रतापें[४] ।
यदुपतियजन[५] सुजनमनहारी[६]। स्वमनशुद्धि[७] पावति[८] अधिकारी[९]॥२२॥
यत्करुणा[१०] [११]दीनाऽभयदा[१२] कीं । कीर्ति ज्याचि श्रुति[१३] हाकि[१४] सदा कीं ।

*ज्ञानदेव वदनीं जपसारा[१५] । त्यजुनि करिति भवविभवपसारा[१६] ॥२३॥
(*पाठांतर :- अलकावतिपतिचरणसरोजा । स्मरणसात मिळती सुपरोजा ।)
*(सुपरोजा = उत्कृष्ट प्रकारचें जें ओज त्याला )*
तुमहि गनेस[१७] सकलमतिदाता[१८] । तुम सरसई[१९] मुदित जनमाता[२०] ।
मम शिर[२१] कर[२२] धरि[२३] कृपानिधाना[२४] । कृष्णभक्तिमय[२५] करब[२६] जहाना[२७] ॥२४॥
सद्गुरुचरण[२८] परम सुखदायी[२९] । जे अनुपम[३०] भुवनत्रयमांही[३१] ।
सुजनमुकुटमणि[३२] देशिकरावू[३३] । प्रभुपद[३४] मिलन[३५] न आन[३६]उपाऊ[३७] ॥२५॥

*(१) कष्टी होतात (२) संसारातील दुःखाने (३) दुःखरहित होतात (४) श्रीगुरूच्या चरणाच्या प्रभावाने (५) श्रीकृष्णाचे पूजन (६) सज्जनाच्या मनाला हरण करणारे (७) आपल्या चित्तशुद्धीस (८) प्राप्त होतात (९) मुमुक्षु (१०) ज्याची करुणा (११) दुःखितांना (१२) अभय देणारी (१३) वेद (१४) वाखाणते (१५) जपरूपी सार, (उत्कृष्ट प्रकाराचे ओज) (१६) संसारांतील ऐश्वर्य सुखाचा व्याप (१७) गणपति (१८) सर्व बुद्धि देणारे (१९) सरस्वती (२०) संतुष्ट चित्ताच्या लोकांची माता (२१) डोक्यावर (२२) हात. (२३) ठेवून. (२४) करुणासंपन्ना. (२५) कृष्णभक्तीनें युक्त (२६) करा (२७) सर्व जगत् (२८) श्रीगुरूचे चरण (२९) सुख देणारे (३०) ज्याला दुसरी उपमा नाहीं असे (३१) त्रिभुवनांत (३२) सज्जनश्रेष्ठ (३३) श्रीगुरु (३४) भगवंताचे पाय (३५) मिळण्यास (३६) दुसरा (३७) उपाय.*

ब्रह्मरूपतनु[१] रघुपति जोही । धरत वसिष्ठचरण[२] शिर[३] सोही[४] ।
सत्‌चित्‌सुख[५] केवल जदुरावू[६] । गुरुघर[७] बहत[८] बिटप समुदावू[९] ॥२६।
निगम अगम अति तर्क निहारा[१०] । बिन[११] गुरु कोउ[१२] न तारनहारा[१३] ।
सो सिस[१४] परम[१५] मोर[१६] मन भावा[१६] । जिन[१७] गुरुबिन[१८] सिर[१९] आन[२०] न नावा[२०] ॥२७॥
चरण चारु[२१] सद्गुरु कृति[२२] देवा । तनुमनबचन[२३] कर्म करि सेवा ॥
मग जगदघभयभंजन[२४] सहजें । मिळत ज्ञान[२५] [२६]मुनिरंजनरह[२७] जें ।२८
अति विचित्र गुरुवचन[२८] सुखाचें[२९] । श्रवण करुनि न पडे भवखाचे[३०] ।
श्रुतिस्मृति[३१] कथा[३२] भाव[३३] विधि[३४] नाना । सहज नेत निज मुक्ति प्रयाणा[३५] ॥२९॥ (य३-३)
गुरुसम[३६] जानि[३७] सकल गुरुनंदन[३८] । करउं सदा सज्जनपद वंदन[३९] ।
मंगल परम सुजन समुदायू[४०] । गमत[४१] सजीव[४२] तीर्थगणरायू[४३] ॥३०॥

*(१) ब्रह्मरूप ज्याचे शरीर आहे (२) वसिष्ठ गुरूचे पाय (३) डोक्यावर. (४) तेहि (५) सृदिानंदघन (६) श्रीकृष्ण (७) गुरूचे घरी (८) वाहतात (९) काष्ठभार (१०) वेद, पुराण व न्याय यांच्यात प्रवीण असलेला (११) गुरूवांचून (१२) कोणीही (१३) तारणारा (१४) शिष्य (१५) अति (१६) माझ्या मनाला आवडतो (१७) ज्याने (१८) गुरूवांचून (१९) मस्तक (२०) दुसऱ्यापुढे नमविले नाहीं (२१) कोमल चरण असलेले (२२) सद्‌गुरूची कृति करणारे म्हणजे सद्‌गुरु होऊन ज्ञानदान करणारे (२३) शरीर, मन, वाणी व क्रिया यांचे योगानें (२४) जगताच्या पापापासून मिळणाऱ्या संसारभयाला नाहींसे करणारे (२५) आत्मज्ञान (२६) विरक्तांना रमविणारे (२७) गुप्त, गूढ (२८) सद्‌गुरूचा शब्द (२९) आत्मसुख देणारे (३०) संसाररूपी खड्ड्यांत (३१) वेदस्मृति (३२) ईश्वरकथा (३३) प्रेमप्रकार. (३४) धर्म. (३५) मोक्षरूपी मार्गाला. (३६) गुरुतुल्य (३७) समजून (३८) गुरुपुत्र (३९) सज्जनांच्या चरणीं प्रणिपात (४०) सज्जनसमूह (४१) वाटतो (४२) जिवंत (४३) सर्व क्षेत्रांत श्रेष्ठ, तीर्थश्रेष्ठ प्रयाग.*

माधवभक्ति[१] हरिचरणकन्या[२] । ब्रह्मबुद्धि[३] विधिनंदिनि[४] मान्या[५] ।
श्रौर्तस्मार्त[६] नीतिकृतिसारी । पावन[७] वहनि[८] तमारिकुमारी[९] ॥३१॥
ते देखत[१०] देखत शिव जाहाले । जे या वेणिविमळजळिं[११] नाहाले[१२] ।
ज्यांपासुनि जनतें[१३] भय नाहीं । देति अभय जे थोर हिनांही[१४] ॥३२॥
जे मतिरोधक्लेश[१५] अति साहुनि । पावन[१६] सत्पदजीवनिं[१७] नाहुनि ।
चिंतिति हृदयिं सुयश हरि पाहुनि । राहि तेथ प्रभु दुष्कृत[१८] दाहुनि[१९]॥३३
वाहुनि[२०] कर्म सकल हरिपायीं । करिति भजन बहुविध सदुपायीं[२१] ।

**तत्पद[२२] वंदुनि नंदनंदना[२३] । बैसवुं आणुनि ह्रदयस्यंदना[२४] ॥३४॥**
**अजित[२५] चित्ति जिंकुनि जे धाले[२६] । निजकरुणे[२७] जन निववुं[२८] निघाले।**
**ते सज्ञन शिवप्रभृति[२९] कृपार्णव[३०]। जे वारिति[३१]मायाकृत[३२]पाटव[३३] ॥३५**

*(टीप :- नमित हरेर्मायाकृत पाटव (पाठांतरः- चौपाइ ३५ चतुर्थ चरण) (१) श्रीकृष्णभक्ति (२) भागीरथी (३) ब्रह्माकार वृत्ति (४) सरस्वती (५) पूज्य (६) श्रुतिस्मृतींनीं सांगितलेले सर्व आचार (७) पवित्र (८) वाहणारी (९) सूर्यकन्या यमुना (१०) पाहता पाहता (११) त्रिवेणीच्या निर्मळ जलामध्यें (१२) स्नान केले (१३) लोकांना (१४) गरिबांना 'यस्मान्नोद्विजते लोकः।' या गीतावचनाचे भाषांतर (१५) चित्तनिरोधाचे श्रम (१६) पवित्र (१७) संतचरणाचे तीर्थात (१८) पाप (१९) जाळून, नाहिसे करून (२०) अर्पून (२१) पुष्कळ प्रकारच्या शास्त्रोक्त मार्गाने (२२) त्याचे पाय (२३) श्रीकृष्णाला (२४) ह्रदयरूपी रथावर (२५) अजिंक्य असा भगवान् (२६) तृप्त झाले (२७) स्वाभाविक करुणेने (२८) संसारदुःखरहित करण्याकरिता (२९) शिवादिक (३०) कृपासिंधु (३१) निरसन करितात (३२) अविद्याजन्य (३३) फसवणूक*

**शिव विधि[१] नारद व्यास शुक पुंडरीक प्रह्राद । बिभीषण वसिष्ठादि सुजन[२] नमितां परमाल्हाद[३] ॥३६॥**
**विचरति[४] निर्भय[५] पाहुनि अक्षय[६]वट विश्वास[७] । रामकृष्णहरिनाममय ज्यांचा श्वासोच्छ्वास[८] ॥३७॥**

**॥चौपाई॥**

**जें हरिसुखमय[९] विषय विसरती । भवमोचनसूचनि[१०] अनुसरती ।**
**ते अति धन्य धन्य भगवंत । झाडिन तत्पद[११] कचि[१२] अनुसंत[१३] ॥३८॥**

**॥दोहा ॥**

**संत कृपा करितील तरी ना न म्हणे यदुराज । यास्तव तनुमनवाणि[१४] सदा सेविन सुजन समाज[१५] ॥३९॥**

**॥आर्या॥**

**उदधींत[१६] मधुर[१७] लहरी[१८] तेवीं हरिमूर्ति[१९] संत अवतरती ।**
**त्यांच्या सहजोक्तीनें[२०] कांतमतीजन[२१] अनंत भव[२२] तरती ॥४०॥ (य३.४)**

*(१) ब्रह्मदेव (२) सज्ञन (३) अत्यानंद (४) फिरतात (५) भयरहित (६) (ब्रह्मदृष्टीने) अक्षयवटाप्रमाणे अविनाशी (७) जगतास (८) श्वासागणिक ज्यांचे नामस्मरण चाललेले आहे (९) श्रीहरीच्या सुखाने सुखी होऊन (१०) संसारातून सुटण्याचा उपदेश करणारे संत त्यांचे ठिकाणी (११) त्यांचे पाय (१२) केसाने (१३) क्षणोक्षणी, खंड न पडूं देता (१४) कायावाचामनाने (१५) संतसमाज (१६) समुद्रात (१७) गोड (१८) तरंग (१९) हरिरूप (२०) सहज मुखांतून निघालेल्या शब्दांनीं (२१) कांत म्हणजे श्रीकृष्ण त्यांचे ठिकाणीं लक्ष ठेवणारे (२२) संसारसमुद्र.*

**श्रमला[१] दशशतफणि[२] ही चाळवुनी जीभ संतमहिमानीं[३] ।**
**यत्सुखमूर्ति[४] प्रकटतां[५] असुनि असुर करि सुसंत[६] महिमानी[७] ॥४१॥**
**संसृति पिंपळ[८] उडवी[९] झांकुनि जीवां अनंत[१०] पर्णरजें[११] ।**
**यास्तव असंगवस्तू[१२] घ्या जाणुनि नमुनि संतचरणरजें[१३] ॥ ४२॥**

**॥चौपाई॥**

**मति[१४]गति[१५]भूति[१६]वाणि[१७]श्रुति[१८]करिमा[१९] । सकलहि सज्ञनसंगतिगरिमा[२०] ।**
**नरतनु[२१] कनकसमान[२२] सुखाची[२३] । सत्संगतिवांचुनि[२४] यम[२५] जाची[२६] ॥४३॥**
**संतसंग तारक[२७] भवमोही[२८] । कृष्णकृपेविण[२९] मिळत न तोही ।**
**परम अमोघ[३०] भक्तिरसदानी[३१]। अशि विभुनाभिजलजजवाणी[३२]॥४४॥**

*(१) थकला (२) सहस्त्र फणांचा नाग, अनंतशेष (३) संत गुणवर्णन करण्यात (४) ज्याची सुखमय मूर्ति (५) आविर्भाव पावतां (६) सज्ञन श्रेष्ठ (७) जगमान्य (८) संसाररूपी पिंपळ (९) नाहीसा करतो (१०) भगवान् (११) तत्त्वमस्यादि वेद वाक्याने - 'छंदांसि यस्य पर्णानि' (१२) ब्रह्मवस्तु (१३) संतचरणाची धूळ (१४) बुद्धि (१५) उत्तम गति किंवा बुद्धीची सूक्ष्मता (१६) ऐश्वर्य (१७) मधुर वाणी किंवा वक्तृत्व (१८) बहुश्रुतता (१९) सामर्थ्य (२०) संताच्या संगतीचे महात्म्य आहे (२१) मनुष्यशरीर (२२) सोन्यासारखी (२३) सुख देणारी (२४) संतांच्या संगतीवांचून (२५) यमधर्म (२६) पीडा किंवा जाच करितो (२७) पार नेणारा (२८) संसारासक्तीतून (२९) कृष्णाच्या कृपेवांचून (३०) कधींही व्यर्थ न जाणारी (३१) भक्तिरस*

*देण्याच्या कामी (३२) प्रभूच्या नाभीकमलापासून उत्पन्न झालेल्या ब्रह्मदेवापासून ज्यांचा जन्म आहे अशा नारदांची वाणी*

॥दोहा ॥

मूर्तितीर्थसूरपूजनी[१] फळ याया बहुकाळ । सज्जन वंदनमात्रतः[२] भेटविती व्रजपाळ[३]॥४५॥

॥छंद॥

पळ एक तरि भविं[४] वेळ काढुनि साधुपाय[५] निहाळिती[६]। रजधूळि[७] अंगलगेंचि[८] ते जन पापपर्वत[९] जाळिती ।
त्यजुनी रमा[१०] गरुडादि तद्हृदिं[११] येउनी हरि राहतो ।
जणुं होउनी शिव नयनजान्हविजळ[१२] शिरस्थित[१३] नाहतो ॥४६॥

॥पद॥

सज्जन चरण शिरीं । पूजुनी मानस कीर्तनि धैर्य धरी ॥धृ.॥
येऱ्हविं ठावुक मज मम विद्या । लिहिली श्री[१४] न करीं ॥१॥
योग याग[१५] जप तप मी नेणें । जनन[१६] नीच उदरीं[१७] ॥२॥
ज्ञानेश्वरजननीकरलालन[१८] । काय सुलभ न करी ?॥३॥-४७॥

*(१) देवाची मूर्ति किंवा तीर्थादिस्थानें किंवा देवता त्यांच्या सेवनापासून (२) नमस्कार केल्याबरोबर (३) कृष्ण (४) संसारात (५) साधूंचे चरणाचे (६) दर्शन घेतात (७) चरणाची धूळ (८) आंगाला लागतांच (९) पापांचे पर्वत (१०) लक्ष्मी (११) त्याचे हृदयांत (१२) नयनांतून वाहणाऱ्या प्रेमाश्रुरूपी भागरिथीच्या जळाने (१३) मस्तकावर असलेल्या.*

***श्लोक ४६ च्या चतुर्थ चरणाचा अर्थ-*** *(भक्तांच्या हृदयांत राहणारा भगवान्) जणूं काय मस्तकावर धारण केलेल्या गंगाजळाने स्नान करणाऱ्या या शिवाप्रमाणे भक्तांच्या प्रेमाश्रुरूपी गंगाजळाने स्नान करणारा शिवच होतो. (१४) श्रीगणेशायनमः ही धुळाक्षरे (१५) यज्ञ (१६) जन्म (१७) शूद्र जातीच्या ठायी (१८) श्रीज्ञानेश्वर महाराजांच्या हाताने केलेले संगोपन.*

॥चौपाई॥

सुर[१] मुनि[२] नर[३] गो खर[४] जड नाना । सज्जनसंगति[५] वंद्य[६] जनांना ।
योग विवेक[७] आणि निजधर्म । सुजन विना[८] दाखविति न वर्म[९]॥४८॥ (य३-५)

॥छंद॥

निरुपाधिकें[१०] गिरिजा[११] पुरारि[१२] नमो तदीय[१३] पदांबुजें[१४] ।
जगरूप बालक उपजवुनि उदरीं न पावति भेद जे ।
निजनंदनार्थचि[१५] नयनगोचर[१६] विमलतरतनुधारकें[१७] ।
हिमनगसुतापुरहरदयेविण[१८] । हरिपदांबुज[१९] पारखें[२०] ॥४९॥

॥श्लोक ॥

अनलनयन[२१] शुद्ध त्वत्पदाब्जाभिलाषी[२२] ।
हिमगिरिवरि[२३] राहे भस्म सर्वांग साशी[२४] ।
मग मम मति देवा केंवि अन्यायि[२५] होते ।
चरण हृदयिं घेतांऽयोग्य तें काय होतें ? ॥५०॥

*(१) देव (२) ऋषि (३) मनुष्य (४) गाढव (५) सज्जनाच्या संगतीनें (६) पूज्य (७) आत्मानात्म विचार (८) सज्जनावांचून (९) मार्गरहस्य (१०) उपाधिरहित (११) पार्वती (१२) शंकर (१३) त्याची (१४) चरणकमले (१५) आपल्या भक्ताकरितां (१६) दृष्टिगोचर (१७) शुद्धसत्वात्मक शरीर धारण करणारे (१८) पार्वतीशंकराच्या कृपेवांचून (१९) श्री कृष्णाचे चरणकमल (२०) समोर न येणारे, दृष्टीस न पडणारें (२१) अग्नि हा ज्यांचा (तृतीय) नेत्र आहे असे शंकर. (२२) तुझ्या चरणाची इच्छा करणारा (२३) हिमालयावर (२४) फांसलेला (२५) दोषी*

॥चौपाई॥

शंभुचरणि[१] ज्याची रति[२] नाहीं । त्या न मिळे हरिभक्ति कदाही ।
सद्गुरु ज्यास नाथ[३] शशिमौळी[४] । त्या न कदा भव अकदव[५] कवळी[६] ॥५१॥

ज्यावरि कृपा करी त्रिपुरारी[७] । त्याच्या हृदयिंच वसत मुरारी[८] ।
तातमात[९] शुलपाणिभवानी[१०] । तत्पद वंदुं कायमनवाणी[११] ॥५२॥

॥दोहा॥

रुंडमाल[१२] गलधारकू[१३] शशिशेखर[१४] अविकार[१५] । गंगाजटा विहारि[१६] तो वारी[१७] दासविकार[१८] ॥५३॥
कृष्णदास[१९] शिवद्रोहि[२०] जे कृष्णद्रोहि शिवदास । ते जन करिती कल्पवरी[२१] रौरव नरकिं निवास ॥५४॥

॥श्लोक ॥

शिवपदकमलेंही[२२] कृष्णभक्तीस देती । हरिपदकमलेंही शंकरा भेटवीती ॥
शिवविमुख[२३] नरांना विष्णु दे दुःखबेडी[२४] । हरिविमुख जनांतें शंकरू तेंवि ताडी[२५] ॥५५॥ (य३-६)

*(१) शंकराचे पायी. (२) प्रेम (३) स्वामी (४) शंकर (५) संसारांतील दुःखरूपी दानावल (अरण्याग्नि) (६) कवटाळत नाहीं. (७) शंकर (८) विष्णु (९) बाप आई (१०) शंकर पार्वती (११) कायावाचामनाने (१२) मनुष्याच्या मुंडक्यांची माळ (१३) गळ्यांत धारण करणारा (१४) शंकर (१५) विकाररहित (१६) गंगेला जटेत ठेवून क्रीडा करणारा (१७) नाहीसा करितो (१८) भक्ताचे हृदयांतले विकार (१९) कृष्णाचे सेवक (२०) शिवाचा द्वेष करणारे (२१) कल्पपर्यंत (२२) शिवाची चरणकमलें (२३) शिवाचा द्वेष करणाऱ्यांना (२४) दुःखाची प्राप्ति (२५) शासन करितो,*

॥दोहा ॥

राम भजे तो शंकरू शिव स्मरे तो राम । जों शिवराम भजे तया दोन्हिहि आत्माराम ॥५६॥
गंगायमुनासंगमीं दोन्ही तीर्थ प्रयाग । तेवि विष्णुशिवभक्तिनदीसंगमि[१] ब्रह्म सुयाग[२] ॥५७॥
शंकरविन्मुख[३] वैष्णवां विघ्न सुषुप्तीभान[४]। विष्णु विमुख[५] शैवांस तसा अति संवित्यभिमान[६] ॥५८॥

॥पद॥

शंभु जरि देतिल उपदेशू[७] । तरिच मग कांतहि[८] कमलेषू[९] ॥धृ॥
पिता जैं काळजिनें पाळी । तरिच घे पतिसौख्यहि[१०] बाळी[११] ॥१॥
ठेवितिल जरि गुरु कर[१२] माथां[१३]। तरिच ये करुणा जगनाथा[१४] ॥२॥
ज्ञानेश्वरगुरुशिवकरुणा[१५] । वरिलें[१६] व्रजराजा[१७] तरुणा ॥३॥ ५९॥

॥श्लोक ॥

हरिपदभजनानें[१८] भाव[१९] जैं चित्ति वाढे । तुटति सकल तेव्हां संसृतीबंध[२०] गाढे[२१] ।

*(१) ज्या ठिकाणीं शिवभक्ति व विष्णुभक्ति या नद्यांचा संगम आहे तेथे (२) श्रेष्ठयज्ञ (३) शंकराची भक्ति न करणाऱ्या (४) निद्रेचा अनुभव, लयविघ्न, ध्यान करताना झोपेत मन जाणे (५) विष्णुभक्ति न करणाऱ्या (६) प्रबल ज्ञानाभिमान (७) अनुग्रह (८) पति (९) विष्णु (१०) संसारांतील पतीपासून मिळणारे सुख (११) मुलगी (१२) हस्त (१३) डोक्यावर (१४) जगताच्या स्वामीस (१५) श्रीगुरु ज्ञानेश्वर हेच शिवस्वरूप असून त्यांचे कृपेने (१६) मिळविले (१७) श्रीकृष्णास (१८) श्रीहरीच्या चरणाच्या चिंतनाने (१९) प्रेम (२०) संसाराचा मोह (२१) दृढ*

सुखघन[१] करुणाब्धी[२] भेटतो येउनीया । व्रजजनरमणीनां[३] खेळवी जो वनीं या ॥६०॥
नवघनवपु[४] साची[५] पूर्णसौंदर्यपुष्टी[६] । मुनिजन मन युक्ती[७] पाहती दिव्यदृष्टी[८] ।
निजकरिं[९] हरि येतां भीति कांहीं नसावी । जनि[१०] सगुणगुणेहि[११] श्याममूर्ती दिसावी ॥६१॥
निजगुरु[१२] तरि तोची कृष्णिं जो प्रीति लावी । भजन करुनि भावें श्रीहरी दृष्टि दावी ।
मन[१३] पवन परात्मा अर्पुनी विष्णुपायां । हरिगुणस्मरणानें[१४] शोभवी सर्व काया[१५] ॥६२॥
स्मरण तरि असो हें कृष्ण गोविंद वाणी । स्मरकुसुमशराचें[१६] शौर्य[१७] मा[१८] कोण वाणी[१९]।
स्मरहरगडि[२०] जो तो चित्तिं बांधोनि ठेवी । भवभय[२१] मग कांहीं साधिना देह गोवी[२२] ॥६३॥ (य३-७)

*(१) सुखस्वरूप (२) करुणासागर (३) व्रजस्त्रियांना (४) नवीन मेघाप्रमाणे ज्यांचे शरीर आहे. (५) अगदी (६) संपूर्ण सौंदर्यानें युक्त असे गोंडस (७) मनाने व युक्तीने. (८) ज्ञानदृष्टीनें. (९) आपल्या हाती. (१०) जगांत, (११) सगुणरूपाने (१२) तोच आपला गुरु समजावा (१३) मन, प्राण आणि आपले शुद्ध स्वरूपहि (१४) अखंड श्रीहरीचें गुणवर्णन करून. (१५) शरीर (१६) मदन बाणाचे (१७) पुरुषार्थ (१८) एरवी (१९) वर्णन करितो (२०) कामाचा नाश करणाऱ्या शंकराचा मित्र श्रीकृष्ण*

*(२१) संसाराची भीति (२२) देहाचा मोह, देहांत अटकून राहणे.*

न कळत मज कांही वेद शास्त्रादि युक्ती । न गणित(१) मम बुद्धी साधनें मोक्ष मुक्ती ।
हरिचरणसरोजीं(२) घेउं विश्रांति धावे । वदनिं मधुरिपूचीं(३) साजिरीं(४) गाय नांवें ॥६४॥
हरिचरणगुणांची आवडी चित्ति जेव्हां । जडल(५) भवभयातें(६) सोडुनी भाव(७) तेव्हां ।
हरि मुख निजहासा(८) भेटुनी तेंचि होतें । बहुविध(९) श्रुति सांगे कृष्ण(१०) जै कृष्ण होते ॥६५॥
अगणित(११) तव नामें बोलती वेदवाणी(१२)। परि मम मन तें कीं कृष्णनामासी मानी(१३) ।
निजसुख असुनीही दुःखत्रैविध्य(१४) भासे(१५) । परि तव गुण गातां कल्पनाविघ्न(१६) नाशे ॥६६॥
जंव जंव मति(१७) कल्पी पाय तूझे दयाला । तंव हि त्वरित सोडी संसृतीच्या(१८) भयाला ।
सुलभ(१९) मग हि वाटे मुक्ति सर्वत्र मातें । भजन करुनि पावे सोडुनी आक्रमातें(२०) ॥६७॥

*(१) महत्व देत नाहीं (२) हरिचरणकमली (३) मधु दैत्याचा वध करणाऱ्याची (४) सुंदर (५) उत्पन्न होईल, लागेल (६) संसाराच्या भीतिला (७) भगवत्प्रेम (८) श्रीहरीच्या मुखावरील स्वाभाविक हास्याशी (९) पुष्कळशा (१०) पाप, **धर्मोऽपीह मुमुक्षूणां पापमेवोच्यते’** या आचार्य भाष्यानुसार मोक्षाच्या दृष्टीने स्वर्गनरक देणारे सर्व धर्माधर्म पापस्वरूपच असल्यामुळें या ठिकाणी पाप या शब्दाने संपूर्ण धर्माधर्म घ्यावयाचे. म्हणजे संपूर्ण धर्माधर्म कृष्णमय जेव्हां होतात असा अर्थ (११) अनंत (१२) श्रुति (१३) आदर करिते (१४) तीन प्रकारचे दुःख (१५) जाणवते (१६) कल्पनारूपी प्रतिबंध (१७) चित्त (१८) संसाराच्या (१९) सोपी (२०) विजय, पराक्रमाला*

हृदयिं उदय होये प्रेमसंपर्क(१) जेव्हां । यशोमतिसुत(२) वारी(३) तापत्रैविध्य(४) तेव्हां ।
जळति पुढति पूर्वी जाहलीं सर्व पापें । मिळत सकळ शांती श्रीगुरूच्या प्रतापें(५) ॥६८॥
जडल जडल बुद्धी कृष्णपायीं झटूनी(६) । पडल पडल तेव्हां संसृती(७) ही तुटूनी(८) ।
मग गुरुकरुणेचा(९) बिंदु(१०) जीवीं(११) विलासे(१२) । परचितिसुखसिंधू(१३) विश्विं तैं पूर्ण लासे(१४) ॥६९॥

॥चौपाई॥

वंदु श्रोतृजनकमलपदांही(१५) । जे हरिसुयशनिमग्न(१६) सदाही(१७) ।
परम चतुर मतिविमल(१८) विचारी । निगमागम(१९) यदीय(२०) श्रुति चारी(२१) ॥७०॥ (य३-८)
वंदु(२२) खलहिं(२३) जे मम हित(२४) करिती । निंदुनि सकल पाप शिरिं(२५) धरिती ।
त्यागन(२६) कारन सुनहु(२७) बिरागी(२८) । कवन(२९) कवन नहि कथानुरागी(३०) ॥७१॥
जो निशिदिनि(३१) कामिनिपह(३२) जागे(३३) । ता(३४) उर(३५) चरित(३६) सूलसम(३७) लागे ।

*(१) प्रेमाचा स्पर्श (२) कृष्ण (३) निवारण करितो (४) तीन प्रकारचे दुःख (५) पराक्रमाने (६) चिकाटीचा प्रयत्न करून (७) संसार (८) मोडून (९) गुरुकृपेचा (१०) थेंब (११) हृदयांत (१२) प्रगटतो (१३) सृदिानंदसागर (१४) भासतो (१५) श्रोत्यांच्या कमलासारख्या चरणांस (१६) हरीच्या कीर्तिगाण्यांत गढलेले (१७) सर्वदा (१८) शुद्ध चित्त (१९) वेदपुराण (२०) ज्याच्या (२१) श्रवणाचे ठिकाणी राहतात म्हणजे वेदपुराणांचेच श्रवण ज्यांच्या कानाला माहित आहे. (२२) नमस्कार करू (२३) दुष्ट, निंदक (२४) कल्याण (२५) डोक्यावर (२६) त्यांना वगळण्याकरितां (२७) ऐक (२८) मुमुक्षो (२९) कोण कोण (३०) कथाप्रेमी (३१) रात्रंदिवस (३२) स्त्रियेकरितां (३३) जागतो (३४) त्याच्या (३५) चित्तांत (३६) भगवंताचे चरित्र (३७) शूळाप्रमाणे.*

नारी पराय(१) देखि मनमानी(२) । कामबिबश(३) सठ(४) अपनिहिं(५) जानी ॥७२॥
कोपबिबश(६) पर अनहितकारी(७) । लोभबिबश धनहेतु(८) बिकारी(९) ।
अनहित(१०) सठ अपनो(११) नहि बूझैं(१२) । मनसि(१३) जुगति(१४) पर(१५) हननकि(१६) सूझैं(१७) ॥७३॥
जाकि(१८) जुवतिमह(१९) कोउ(२०) न माता । अरिगण(२१) पुरुष कोउ(२२) नहि ताता(२३) ।
केतुउदयसम(२४) जनन(२५) जयाचें । पूजुनि देव अन्य मृति(२६) याचे(२७) ॥७४॥
जिन(२८) पुनि(२९) यहहिं(३०) साच(३१) करि माना(३२) । पिशितरुधिरमय(३३) आतम(३४) जाना(३५) ।
सुजननबिखे(३६) परम(३७) कटुताई(३८) । कामिनिमोहनपर(३९) पटुताई(४०) ॥७५॥
नारिथूक(४१) पीयूख(४२) उपावही(४३) । मूत्रसदनपथ(४४) अनुदिन(४५) धावही(४६) ।

**गुरुउपदेश[४७] अमीय[४८] नहि पागे[४९] । कुवदन[५०] मधुर[५१] नरकरस[५२] लागे ॥७६॥**

*(१) दुसऱ्याची (२) मनसोक्त (३) कामवश (४) मूर्ख, निर्लज्ज (५) आपली समजतो (६) क्रोधवश (७) दुसऱ्याचे नुकसान करणारा (८) धनाकरितां (९) विकारयुक्त किंवा अविचारी (१०) अकल्याण (११) आपले (१२) जाणत नाहीं. १३) मनांत (१४) युक्ति (१५) दुसऱ्याला (१६) मारण्याची (१७) शोधतो (१८) ज्याची (१९) स्त्रियांमध्यें (२०) कोणी (२१) शत्रुसमुदाय (२२) कोणी (२३) पिता (२४) केतूच्या उदयाप्रमाणें (२५) जन्म (२६) दुसऱ्याचे मरणाची (२७) याचना करतो (२८) ज्यानी (२९) पुनः (३०) हेच जग (३१) खरें सत्य (३२) समजला (३३) रक्तमासांचा देह (३४) आत्मा (३५) समजला (३६) सज्ञनाविषयी (३७) अति (३८) द्वेष (३९) स्त्रियांना वश करण्यांत (४०) अत्यंत कुशल (४१) स्त्रियेचा थुंका (४२) अमृत (४३) सावडतो (४४) मूत्रमार्गाचे ठिकाणी (४५) दररोज (४६) धांवतो (४७) गुरूचा उपदेश (४८) अमृत (४९) आवडत नाहीं. (५०) घाणेरडे मुख (५१) गोड (५२) केवळ नरकरूप. अर्थ- श्रीगुरूच्या उपदेशाचे ठिकाणी लक्ष लागत नाही व नरकाप्रमाणें घाणेरडें स्त्रीवदन मात्र गोड लागते.*

**कर्ता सबहिं[१] ईश[२] अस[३] भाखे[४] । करि अति जतन[५] बिखयरस[६] चाखे[७] ।**
**पल[८] पल बकत[९] दैवबिभुताई[१०] । सो नहि सुधरहिं[११] श्यामदुहाई[१२] ॥७७॥**
**(टीप :- [९]कहत (पाठांतर) [११]सुधरत (पाठांतर) [१२]कृष्ण, नाथ. (पाठांतर)**
**कोउक[१३] श्रोतृसभामह[१४] आवे[१५] । लोकलाज[१६] गणिका[१७] चित[१८] लावे[१९] ॥**
**पढि[२०] निगमांत[२१] गुरुहि अवमाना[२२] । देखि[२३] तदीय[२४] मुख सचिर[२५] न्हाना[२६] ॥७६॥**
**कहि[२७] हम ब्रह्म-परन[२८] धन मांगे[२९] । श्वानसमान[३०] जुवतिमुख[३१] सूंगे[३२] ।**
**कुंभिनि सुर[३३]श्रुति[३४] बदन[३५] न गाई[३६] । महिपति[३७] तदपि प्रजा बिलखाई[३८] ।**
**वैश्य कृपण अति धनअभिमानी । सूद जनम[३९] अरु[४०] द्विजअवमानी[४१] ॥७९॥**

**॥दोहा ॥**

**जुवति[४२] होइ नहि भजत पती करत रूपअभिमान[४३] ।**
**तनुज[४४] मातुपितु भजत नही लखि[४५] मनमह[४६] मदमान[४७] ॥८०॥**

*(१) सर्वच (२) ईश्वर (३) असे (४) बोलतो (५) जपणूक (६) विषयगोडी. (७) चाखतो (८) क्षणोक्षणीं (९) बकतो, (१०) दैववादाचे श्रेष्टत्व (११) सुधरत (१२) कृष्णाची शपथ, पाठांतर-कृष्ण दुहाई किंवा नाथ दुहाई (१३) कोणी (१४) श्रोत्यांच्या सभेमध्ये (१५) येतो (१६) लोकांची भीड, लाज (१७) वेश्या (१८) चित्तांत (१९) आणतो (२०) वाचून (२१) वेदान्त (२२) अपमानितो (२३) पाहून (२४) त्याचे (२५) सचैल, वस्त्रासह (२६) स्नान करावे (२७) म्हणून (२८) परमार्थी (२९) मागतो (३०) कुत्र्याप्रमाणे (३१) स्त्रियेचे वदन (३२) चुंबन घेतो, हुंगतो (३३) भूदेव, विप्र, ब्राह्मण (३४) वेद (३५) मुखाने (३६) म्हटले नाही (३७) राजा (३८) पीडा देतो (३९) शूद्रजन्म (४०) आणि (४१) ब्राह्मणाचा अपमान करितो (४२) स्त्री (४३) सौंदर्याचा गर्व (४४) मुलगा (४५) ठेवून (४६) मनामध्ये (४७) उन्मत्तपणा व मोठेपणा*

**॥चौपाई॥**

**यह जनगण[१] नहि कथा सहारा[२] । जिन सब जग धनहेतु[३] निहारा[४] ।**
**व्याघ्र[५] अनल फणि गरहि विकारी । होति कुसंग सम न हितहारी ॥८१॥**
**कृपा करुनि यदुवल्लभ देवा । कुधिपथिं[६] आड सुदर्शन ठेवा ।**
**धरसिल तूं करिं जरि व्रजराजू । काय करिल मग कुजनसमाजू[७] ॥८२॥ (य३-९)**

**॥ श्लोक ॥**

**निगमगणहिं[८] शब्दीं वर्णुनी नेति नेति । धरुनि सहज मौना लक्ष्यता[९] दाखवीती ।**
**शिवमतिगति[१०] मूर्ती आश्रयीली सये[११] ती । व्रजयुवति[१२] मिळाया धावुनी जीस येती ॥८३॥**
**सदयहृदय[१३] देवा तापला देह माझा । लवकर हरि आणी सिद्धसाधूसमाजा[१४] ॥८४॥**
**तंववरि परितापू[१५] त्वत्पदा[१६] जों न सेवी । म्हणवुनि करुणार्द्री[१७] मस्तकीं हस्त ठेवी ॥८५॥ (य३-१०)**

**॥ श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ॥**

*(१) मनुष्यसमुदाय (२) कथा ऐकण्यास अधिकारी (३) पैसा मिळवण्याचें साधन (४) समजतो (५) चौपाई ८१*

*उत्तरार्धाचा अर्थ :- वाघ, अग्नि, सर्प, विष हे सर्व पदार्थ विकार करणारे आहे, तरी दुष्टसंगाप्रमाणे सर्वस्वी अकल्याण करणारे नाहीत (६) दुष्ट बुद्धीच्या मार्गात (७) दुष्ट लोकांचा समाज (८) श्रुतिवाक्यें (९) लक्षणेनें ब्रह्माचें जाणणे (१०) शिवाच्या बुद्धीचा प्रवाह जेथें आहे (११) गडे (१२) व्रजस्त्रिया (१३) दयार्द्रहृदय आहे ज्याचे (१४) सिद्ध अशा सत्पुरुषाच्या समाजाला (१५) संसारदुःख (१६) तुझ्या चरणाला (१७) करुणेने, दयेने ज्याचे हृदय ओले आहे अशा. ॥ मंगलाचरण समाप्त ॥*

## सखीप्रेषण १ लें. विषयानुक्रम

***ऋषीप्रश्नवर्णन. (पृष्ट ११-१८)***

*गुरुदेववंदन ११. भागवतमहिमा कथनपूर्वक ग्रंथारंभवर्णन ११. 'जन्माद्यस्येति' प्रथमश्लोक व्याख्यानः- श्रीवेदव्यासांचें मंगलाचरण १२. भागवताची अद्वैतपरता १२. भागवतप्रतिपाद्य ईश्वराचें निर्गुणत्व व सगुणत्व कथन १२. भारतभागवतऐक्य व हरिहरसाम्यकथन पूर्वक भागवतशास्त्राचा आशय १३. मंगलाचरण प्रकार १३. 'धर्मः प्रोज्झितकैतवेति' द्वितीयश्लोकव्याख्यानः- भागवताची वेदवत्प्रमाणता १३. कर्मोपासनादिकांडांहून भागवताची श्रेष्ठता १४. भागवताला समाधिभाषा म्हणण्याचें कारण १४. भागवतात प्रभुसंवित्, सुहृत्संवित् व कांतासंवित् असा तिन्ही प्रकारचा उपदेश आहे १५. 'निगमकल्पतरो रिति' तृतीयश्लोकव्याख्यानः- भागवताला वृंदारकद्रुमाचें फळ म्हणण्याचें कारण १५. या फळाची रसरूपता व सकल शास्त्रांहून श्रेष्ठता १६ ऋषींनीं सूताला विचारलेले प्रश्न १६.*

०००

# सखीप्रेषण १ लें.

## ऋषींचे प्रश्न

**॥ श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरमाउली समर्थ॥**

**॥ दोहा ॥**

**नत्वा[१] श्रीगुरुचरणरज[२] आणिक व्रजपतिपाय[३] । भाषागत[४] भागवत घडो मध्यमसुजनउपाय[५] ॥१॥**
**सुरमुनि[६] तपकरि थकित[७] भये[८] तदपि[९] न मिलन हुलास[१०] ।**
**तिनके जसुमतिसदनमह[११] लीलाललितबिलास[१२] ॥२॥**

**॥चौपाई॥**

**विषयि[१३] मुमुक्षु मुक्त जन जे कीं । वासुदेवपारायण[१४] शेखीं[१५] ।**
**त्या सकलांनां शुकमुखवाणीं[१६] । करि सुखि दाउनि भवभयवाणी[१७] ॥३॥**
**ते श्रीमद्भागवत पुराणीं । कथित अधिष्ठुनि[१८] व्रजपतिराणी[१९]।**

*(१) वंदुन (२) श्रीगुरूच्या चरणधूलीस (३) कृष्णाचे चरणास (४) महाराष्ट्रभाषेत (५) मध्यम अधिकारी लोकांच्या परमार्थाचे साधन (६) देवऋषि (७) दमले (८) झाले (९) तरी (१०) आनंद,सुख (११) यशोदेच्या घरी (१२) ब्रह्मानंदवर्धक मधुर क्रीडा (१३) विषयासक्त (१४) श्रीकृष्णकथा श्रवण करण्यात तत्पर (१५) शेवटी (१६) शुकाचार्यांच्या मुखांतून निघालेले भागवत (१७) संसारभीति दूर करून (१८) प्रमाण धरून (१९) गोपिका.*

**सखि होउनि मी नित्य तियांची । मुनि वर्णिति प्रख्याति[१] जयांची ॥४॥**
**प्राकृत सुंदर मंद जनाला । वाटे करूं मंदीर मनाला ।**
**वेद जननि गायत्री[२] माता । करित तृप्त जे अखिल[३] अनाथा[४] ॥५॥**
**ती होउनि आरंभी पहिली । कृष्णकथा वर्णिताति वहिली[५] ।**
**सुजनचरित[६] प्रऱ्हाद[७] अधिष्ठी । यादव गोपति कृष्ण समष्टी[८] ॥६॥**

*(१) कीर्ति **(चौपाई ४ व ५ चा अर्थ):-** ते - म्हणजे शुकाचार्यांची वाणी- भागवत पुराणांत गोपिकांना म्हणजे गोपिकांच्या प्रेमाला*

*- प्रमाण करून गायिलेली आहे. ज्या गोपिकांची कीर्ति मोठमोठ्या ऋषींनी गायिली आहे, त्यांची मी नित्य सखी होऊन त्या शुकाचार्यांच्या वाणीचे मंदजनांच्या मनाला सुंदर मंदिर करावे असे वाटते; म्हणजे मंदाधिकाऱ्यांकरिता त्यांच्या मनाला प्रेमाचे सुंदर मंदिर होईल अशा रीतीने सुंदर प्राकृत भाषेत अनुवाद करावासा वाटतो (२) गायत्री मंत्र (३) संपूर्ण (४) दीनांना (५) श्रेष्ठ (६) संतचरित्र (७) प्रऱ्हादावर आधारलेले (८) व्यापक.* ***(चौपाई ६ उत्तरार्धाचा अर्थ)*** *संतांच्या चरित्रातील प्रेमाच्या ज्या भूमिका असतात - म्हणजे 'तस्यैवाहम्' ममैवासौ' 'स एवाहम्'- त्यांपैकी 'तस्यैवाहम्' ही दास्यभक्तीरूपी जी पहिली भूमिका तिची अधिष्ठात्री देवता म्हणजे प्रऱ्हाद होय. प्रऱ्हाद म्हणजे दास्यभक्तीचे मूर्तिमंत रूप व त्या भक्तीचे आलंबन नृसिंहमूर्ति; पुढे ही प्रेमभक्ति, यादवादिकांच्या सख्यभक्तीच्या भूमिकेवरून वाढत जाऊन, गोपिकांच्या आपल्याला कृष्णस्वरूप समजून केलेल्या लीला अहंग्रहभावनेने ज्या 'स एवाहम्' भूमिकेवरून झाल्या त्या भक्तीच्या समष्टि भूमिकेला जाते. या भूमिकेवरील भक्तीचे आलंबन श्रीकृष्णच राहूं शकते. सारांश प्रऱ्हादाने केलेली भक्ति व त्या भक्तीचे आलंबन नृसिंहमूर्ति ही पहिली पायरी असून त्याची व्यापक समष्टि भूमिका म्हणजे गोपिकांची भक्ति व त्या भक्तीचे आलंबन श्रीकृष्ण हे होत. याचे सविस्तर विवेचन श्रीमहाराजकृत 'उच्छिष्टपुष्टिलेश' नावाच्या ग्रंथात पहावे. भागवतांतील भक्तचरित्राला प्रारंभ प्रऱ्हादचरित्रापासून असून प्रऱ्हाद व प्रऱ्हादाची भक्ति, भक्ताचे व भक्तीचे व्यष्टिरूप आहे व द्वापरांतील यादवादिक व त्यांची भक्ति , ही त्यांची समष्टिरूपे आहेत.*

**यास्तव ब्राह्मणादि सकलांते । भागवतचि ने सुख(१) अकलाते(१) ।।**
**श्रवणमात्र करितां दृढ वृत्ती(२) । सहजचि दुःखत्रयविनिवृत्ति(३) ।।७।।**

**।।दोहा।।**

**यापरि येथिल महिमता(४) नेणे विधि(५) श्रुति शेष । ते शिवकरुणा किंचित प्राकृत वदूं विशेष ।।८।।**

।। भागवत श्लोक ।।

जन्माद्यस्य यतोऽन्वयादितरतश्चार्थेष्वभिज्ञः स्वराट् ।
तेने ब्रह्म हृदा य आदिकवये मुह्यन्ति यत्सूरयः ।।
तेजोवारिमृदां यथा विनिमयो यत्र त्रिसर्गोऽमृषा
धाम्ना स्वेन सदा निरस्तकुहकं सत्यं परं धीमहि ।। (य३-११)

**।। ओव्या ।।**

**जो सर्वज्ञ(६) सर्वशक्तिमान(७) । सामान्यचैतन्य(८) विश्वाधिष्ठान(९) । श्रुतिसमन्वय(१०) प्रमाण । जाणावया जयातें ।।९।।**
**जगदुत्पत्तिपालनलय(११) । तटस्थलक्षणें(१२) जेथोनि होय ।**
**जयाचें स्वरूपलक्षण(१२) संत स्वयें । व्यतिरेकान्वयें(१३) जाणती ।।१०।।**

*(१) परिपूर्ण अशा सुखाप्रत (२) अत्यंत एकाग्रतेने (३) आध्यात्मादि तीन दुःखांचा नाश (४) महात्म्य (५) ब्रह्मदेव. (६) सर्व जाणणारा (७) सर्व समर्थ (८) सत्तामात्र,*

*वेदान्तात, भ्रमाला साधक उपाधीच्या दृष्टीने चैतन्याचे दोन भाग केले आहेत, एक सामान्य व दुसरा विशेष. सदंशप्रधान असलेले चैतन्य* ***सामान्य*** *होय. हे जगताच्या भासाला कारण म्हणजे साहायक होते आणि चित् व आनंद हे अंश जेथे प्रधान आहेत त्याला* ***विशेष*** *चैतन्य म्हणतात. याच्या साक्षात्काराने जगताचा भ्रम नाहीसा होतो.*

*(९) जगताला आधार (१०) श्रुतींची एकवाक्यता हे ज्याला जाणण्याचे प्रमाण होय (११) जगताची उत्पत्ति, स्थिति, लय (१२) ब्रह्माची दोन लक्षणे शास्त्रांत दिली आहेत. एक* ***तटस्थ लक्षण*** *व दुसरे* ***स्वरुप लक्षण.*** *जे लक्षण ब्रह्माचेच ठिकाणी राहते पण नित्य राहत नाही ते तटस्थ लक्षण होय व जे ब्रह्मस्वरूपभूत असल्यामुळे ब्रह्माचे ठिकाणी नित्य राहते ते स्वरूप लक्षण होय (१३) व्यतिरेकाने व अन्वयाने.*

**व्यतिरेकाने ब्रह्माचे तटस्थ लक्षण कळते, *अन्वयाने स्वरूप लक्षण कळते*

**मृगजळासमान जगदसत्य(१) । तें यत्सत्ता(२) वाटे सत्य । जें आनंदघन चैतन्य नित्य । परब्रह्म ।।११।।**
**जें आधि(३) निर्मोनि(४) विधातिया(५) । उपदेशिलें वेदा तया । अधिष्ठोनि(६) तद्हृदया । विस्तरिले(७) श्रुतिजात(८) ।।१२।।**

तया परब्रह्माचें । मायापर[९] कूटस्थ[१०] सत्याचें ।
आम्ही साक्षित्वें[११] जाणोनि साचे । सगुणत्वें[१२] ध्यान करितसों ॥१३॥

॥अभंग ॥

जगाची उत्पत्ति स्थिति आणि लय । ज्यापासुनी होय सहजची ॥१॥
व्यतिरेकें जो कीं तटस्थलक्षण । अन्वयेंकरून स्वरूप जो ॥२॥
स्वराट्[१३] म्हणोनी श्रुति[१४] वर्णिताती । विधीय[१५] प्रतीति आद्य ज्याची ॥३॥
तिन्ही लोक जेथें भासती अन्यथा[१६] । मृगजळसत्ता जयापरी ॥४॥
निजतेजें[१७] जो कां मायाविरहीत । 'सत्य ज्ञानाऽनंत ' परब्रह्म ॥५॥
मिळोनिया आम्हीं करूं त्याचें ध्यान । ज्ञानेशवचन[१८] मानुनीया ॥६॥

॥ओव्या ॥

यापरी श्रीवेदव्यास । मंगल[१९] करिती ग्रंथास । आणि ब्रह्ममीमांसार्थही[२०] विशेष । जन्मादिसूत्रें[१] दर्शविला ॥१४॥

*(१) खोटे, मिथ्या (२) ज्याच्या सत्तेमुळे (३) अगोदर (४) उत्पन्न करून (५) ब्रह्मदेवास (६) ब्रह्मदेवाच्या हृदयाचा आश्रय करून (७) प्रगट केले (८) सर्व वेद (९) मायेच्या पलिकडे असलेल्या (१०) पर्वत शिखरासारखा अविकारी (११) साक्षीस्वरूपाने (१२) सगुणस्वरूपाने (१३) स्वयंप्रकाश, स्वसंवेद्य (ज्याचे ज्ञान स्वतःवाचून दुसऱ्या कशाने होत नाही) (१४) वेद (१५) ब्रह्मदेवाची. सृष्टीच्या उत्पत्तिकाली ब्रह्मदेवाला जो प्रथम साक्षात् होतो (१६) खोटे (१७) स्वतःज्ञानस्वरूप असल्यामुळे (१८) श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे वचन (१९) मंगलाचरण (२०) शारीरक ब्रह्म सूत्रांचा अर्थ*

जन्मादिसूत्रें[१] दर्शविला ॥१४॥

म्हणोनी धर्ममीमांसानंतर[२] । हें भागवत पहावें परिकर[३] । येथें चिदानंद[४] सविस्तर । भक्तिज्ञानें मिळतसे ॥१५॥
आणि या भागवतीं प्रतिपाद्य[५] देवो । तो निर्गुण सगुण इंदिरा[६]रावो ।
निर्गुण ज्ञान सगुण भक्तिभावों । बोलिला पहाहो रसिकजन[७] ॥१६॥
रुद्रादि गीतेंकरून[८] । प्रतिपादिला[९] उमारमण[१०] । दशमस्कंधादिकेंकरून[११] । रमारमण[१२] बोलिला[१३] ॥१७॥
जे ब्रह्मा विष्णु शंकर । ये शास्त्रीं तिघेही ईश्वर । परि विष्णूविषयीं वारिष्ठ्यनिर्धार[१४] । तो उपासनाप्रकार[१५] जाणावा ॥१८॥ एवं रुद्रादिगीतीं पाहतां । शिवोपासनाही बोलिली तत्वतां ।
आणि यें भागवतीं वार्ता । शिवविष्णुसाम्यता[१६] तेहि लाभे ॥१९॥ (य३-१२)
भारतीं उपमन्यूतें क्षीरसागर[१७] । देता झाला पिनाकधर[१८] । हे भारतकथा निर्धार । शिवोत्कर्ष[१९] द्योती[२०] ॥२०॥
येथ सुदामातें सोनियाची । नगरी दिधली साची । म्हणूनि भागवतीं साम्यता शिवाची । भारतप्रमाणें ॥२१॥
एवं भारतभागवतऐक्यता । जुनीचि आहे हरिहरसाम्यता[२१] । तेचि मुख्य मानोनि चित्ता । भक्तिपंथा लागावें ॥२२॥
हा या शास्त्राचा आशयो[२२] । वाद न करोत महाशयो[२३] । असो आतां प्राकृत भाव[२४] । मुमुक्षुमंदार्थ[२५] वर्णिला ॥२३॥

*(१) 'जन्माद्यस्य यतः' इत्यादि ब्रह्म सूत्राने (२) धर्माचा विचार करणाऱ्या पूर्वमीमांसा शास्त्रानंतर. (३) वास्तविक (४) व्यापक ब्रह्मानंद (५) ज्याचे प्रतिपदन - वर्णन केल आहे तो (६) श्रीकृष्ण (७) प्रेमळजन (८) प्राचेतसानी केलेल्या शंकराच्या स्तुतीच्या द्वारे (९) सेव्य म्हणून सांगितला (१०) शंकर (११) दहाव्या स्कंधाच्या द्वारे (१२) विष्णु (१३) सेवनीय म्हणून सांगितला (१४) श्रेष्ठपणाचे प्रतिपादन (१५) उपासनेकरिता (१६) शिव व विष्णु यांच्यात श्रेष्ठकनिष्ठभाव नाही असे (१७) दुधाचा समुद्र (१८) शंकर (१९) शिवाचे श्रेष्ठत्व (२०) सांगते (२१) शिवविष्णूची समानता (२२) सारांश (२३) विद्वान. (२४) महाराष्ट्र भाषेत (२५) मंदमुमुक्षूसाठी.*

*४ प्रकारची मंगलाचरणे*

यापरी 'जन्माद्यस्य यतो' या शब्देंकरून । निर्गुणवस्तुनिर्देशमंगलाचरण[१] ।
'तेने ब्रह्म हृदा य' इत्यादिकेंकरून । सगुणनिर्देश-मंगलाचरण[२] बोलिलें ॥२४॥
ब्रह्म हृदा य आदिकवये' इत्यादिशब्दीं[३] । मंगल आणिलें आशिर्वादीं[४] ।
'सत्यं परं धीमहि' इत्यादि शब्दीं । नमस्काररूप[५] मंगल ॥२५॥

'तेजोवारिमृदां यथा विनिमयो यत्र त्रिसर्गो' इत्यादि शब्देंकरून । जगन्मिथ्यात्व प्रबोधन[६] ।
'सत्यं' इत्यादिशब्देंकरून । ब्रह्मसत्यता[७] बोलिली ॥२६॥
विवेकविरागादि चारी । साधनेंही निघती निर्धारी । परी ग्रंथविस्तारभयें[८] सारी । न बोलिलीं ॥२७॥
पंडित जे कां होती । ते नाना अर्थ काढिती । मी असोनी मंदमती । उल्हास चित्तीं वर्णावया ॥२८॥
तरी ज्ञानेश्वर गुरु माता पिता । गणेश शारदा संत तत्वतां ।
कृपावंत होऊनि मृत्ति[९] । स्फूर्ति[१०] देऊनि ग्रंथा चालविजे ॥२९॥
एवं प्रथमश्लोकनिरूपण[११] । आतां कर्म उपासना आणि ज्ञान ।
सांगोनि भागवतवरिष्ठपण[१२] । निरुपण द्वितीय[१३] श्लोकीं ॥३०॥

॥ भागवत श्लोक २ ॥

धर्मः प्रोज्झितकैतवोऽत्र परमो निर्मत्सराणां सतां
वेद्यं वास्तवमत्र वस्तु शिवदं तापत्रयोन्मूलनम् ।
श्रीमद्भागवते महामुनिकृते किंवा परैरीश्वरः
सद्यो हृद्यवरुध्यतेऽत्र कृतिभिः शुश्रूभिस्तत्क्षणात्॥२॥

*(१) निर्गुण अशा ब्रह्माचा नुसता उल्लेख करणे हा जो मंगलाचरणाचा प्रकार तो (२) सगुण ब्रह्माचा उल्लेख करणे हे मंगलाचरण (३) इत्यादि शब्दांनी (४) आशीर्वादरूप मंगलाचरण (५) मंगलाचरणाचा तिसरा प्रकार (६) जगत् खोटे आहे हे सांगणे (७) ब्रह्म कधी नाश पावत नाही म्हणजे ब्रह्म हेच सत्य आहे. (८) ग्रंथ फार वाढेल या भीतीने (९) माझ्या मनाला (१०) कवित्वशक्ति (११) पहिल्या श्लोकाचा अर्थ सांगणे (१२) भागवताचे श्रेष्ठत्व (१३) दुसऱ्या श्लोकामध्ये*

॥ओव्या॥

त्रयी[१] त्रिकांड[२] वेद पिता । तद्रूप[३] भागवत तत्वतां । यालागीं वेदवत्प्रमाणता[४] । गमिली[५] याची ॥३१॥
तेवीं याचें श्रेष्ठपण । तेंही ऐका भगवज्जन[६] । तुह्मी बोलविला मी बोलेन । द्यावी शिकवण जननी परी[७] ॥३२॥
(य३-१३) येथ स्वर्गमोक्षादि[८]फळें । आविद्यकें[९] त्यागोनि सकळे । ईश्वराराधनें[१०] निखळें[११] । साधिजे[१२] धर्मू ॥३३॥
ऐसें कर्मकांडाहोनि[१३] वरिष्ठ । हें भागवत बोलिजे स्पष्ट ।
आतां ज्ञानकांडाहोनि[१४] वरिष्ठ । बोलिजे तें ऐकिजे श्रोतीं ॥३४॥
तरी जगन्माया[१५] जीवपण । हें सकळ अध्यस्त[१६]म्हणोन । जयासी सर्वदाऽ भिन्न[१७] । ते वस्तुज्ञान[१८]बोलिलें ॥३५॥
एऱ्हवीं द्रव्यगुणक्रियादिकें[१९] । ही ज्ञानें किडाळें[२०] अनेकें । बहु असती परी निकें[२१] । न होती सुखदें[२२] ॥३६॥
येथ बोलियलें ज्ञान । तें परमानन्दप्राप्तिकर[२३] पूर्ण । आणि त्रिविधदुःखनिरसन[२४] । येणेंचि होय ॥३७॥
सकारणदुःखनिवृत्ति[२५] । आणि परमानन्दप्राप्ति । ययालागीं[२६] वेदान्ती । म्हणती मोक्ष ॥३८॥
तो निजरूपचि[२७] म्हणून । येथ[२८] मिळवाया अवकाश[२९] गहन । मागां[३०]

*(१) ऋग्वेद, यजुर्वेद व सामवेद (२) कर्म, उपासना, ज्ञान. चरणाचा अर्थ- वेद हा बाप असून त्याने ऋग्वेदादि तीन वेदातून कर्म, ज्ञान व उपासना सांगितली आहे (३) वेदाप्रमाणेच (कर्म, ज्ञान, उपासना ह्यांचे प्रतिपादन करिते ) (४) वेदांप्रमाणेच मान्यता (५) सिद्ध झाली, कळून आली (६) संतजन (७) मातेप्रमाणे. (८) धर्माने व ज्ञानाने प्राप्त होणारे साध्य (९) अज्ञानमूलक (१०) परमेश्वरभक्तीने (११) सर्व (१२) धर्माचेही फळ मिळवावे (१३) धर्म सांगणाऱ्या वेद भागापेक्षा (१४) मोक्षसाधन प्रतिपादन करणाऱ्या वेदभागाहून (१५) जगत्, माया आणि जीवदशा (१६) ब्रह्मावर भ्रमाने कल्पिलेले (१७) अनन्य, एकरूप (१८) ब्रह्माचे ज्ञान (१९) वैशेषिक शास्त्रातील द्रव्याचे, गुणाचे व क्रियेचे लक्षण इत्यादि ज्ञान (२०) निरर्थक, बद्धक (२१) खरोखर (२२) सुख देणारी (२३) परिपूर्ण सुख देणारे (२४) अध्यात्मिकादि तिन्ही दुःखाचा नाश (२५) दुःख व दुःखाचे कारण अज्ञान याचा नाश (२६) याला (२७) आत्मरूप (२८) भागवतात (२९) पुष्कळ सवलत किंवा साधने (३०) पूर्वी.*

केलें जें उपेक्षण[१] । तें ब्रह्मलोकमोक्षाचें[२] ॥३९॥
आणि चतुर्वेदसार[३] । ब्रह्मया[४] श्लोक चार । जे बोलिले सर्वेश्वर[५] । कल्पादिसमयीं[६] ॥४०॥
तयाचाचि यथार्थार्थ[७] । बोलिले सत्यवतीसुत[८] ।
परी होवोनि समाधिगत[९] । म्हणोनि समाधिभाषा[१०] नाम यातें ॥४१॥
म्हणोनी जो कांहीं विस्तर[११] । तोही परमेश्वरोक्त[१२] समग्र[१३] । यावांचोनि शार्ङ्गधर । अन्यसाधनें[१४] न सांपडे ॥४२॥

॥पद॥

गारे श्रीव्रजपतिपद[१५] उमगा[१६]रे । नातरि[१७] शिमगा[१८]रे ॥धृ०॥
सेवितसां[१९] कां विभवविषाला[२०] । घेउनि कामफणीच[२१] उशाला[२२] ।
ऐकित ना कां सहज अशाला । करुनी श्रवण उगारे[२३] ॥ गारे० ॥१॥
येथचि यदुपति सहज सांपडी[२४] । व्हावें याचे वाटकापडी[२५] ।
इतर शास्त्र तीं काय बापुडीं । शिणचि[२६] वाउगा[२७]रे ॥ गारे० ॥२॥
इतर साधनीं श्रीहरी हृदयीं । येतो झडकरि सांगा कायी? ॥
येथें तव उशिर किमपी[२८] नाहीं । सिद्धचि[२९] कनकनगा[३०] रे ॥गारे०॥३

*(१) उपेक्षा, तुच्छ लेखले (२) ब्रह्मलोकाच्या प्राप्तिरूप मोक्षाचे (३) चारहि वेदांचे सार (४) ब्रह्मदेवाला (५) भगवान् (६) सृष्टीच्या आरंभी (७) सत्य अर्थ (८) व्यास (९) समाधिस्थ (१०) समाधिस्थ मनाला कळण्याजोगी (११) चार श्लोकांचा विस्तार (१२) परमेश्वरानेच सांगितलेला (१३) सर्व (१४) दुसऱ्या साधनाने (१५) श्रीकृष्णाचे चरण (१६) समजारे, जाणारे (१७) नाहीतर (१८) फजिती किंवा त्यावाचून सर्व बाष्कळपणाच आहे. (१९) सेवन करता, (२०) संसाररूपी विषास (२१) भोगवासनारूपी सर्प (२२) डोक्याखाली (२३) स्तब्ध, दुसरे शब्द कानात न शिरू देता (२४) मिळतो (२५) मार्गाचे यात्रेकरू (२६) श्रम (२७) व्यर्थ (२८) मुळीच (२९) उत्पन्न करावा न लागणारा (३०) सोन्याच्या ठिकाणी अलंकाराप्रमाणे.*

अलकावतीपति-चरणसरोजा[१] । वंदुनि निज शरिरीं घ्या ओजा[२] ।
सांडुनि धनकामिनिसुतवोझा[३] । करा देव सगा[४]रे ॥ गारे० ॥४॥४३॥

॥ओव्या ॥

एवं उपासनाकांडाहुनी । याची श्रेष्ठता वर्णिती मुनी[५] ।
ऐकण्याची इच्छाही पुण्यावांचुनी । नव्हें म्हणूनी सुदुर्लभ[६]॥४४॥
(य३-१४)
यास्तव सांडोनि सकळ व्यापारू । येथ श्रवणीं असावा आदरू[७] । सप्ताह करूनी तरी साचारू । ऐकावा प्रेमें ॥४५॥
एवं उक्त हें भागवत । वेद पुराण शास्त्र समन्वित[८] । आणिक काव्यगुणही[९] येथ । लखलखीत[१०] डोळ्यापुढें ॥४६॥
वेदोपदेश[११] प्रभुसंमित[१२] । पुराणोक्त[१३] सुहृत्संमित[१४] । कांतासंमित[१५] काव्योक्त । श्रीभागवत संमितत्रयमय[१६] ॥४७॥

## ॥ भागवत श्लोक ॥

निगमकल्पतरोर्गलितं फलं शुकमुखाद्-अमृतद्रव-संयुतम् ।
पिबत भागवतं रसमालयं मुहुरहो रसिका भुवि भावुकाः॥

॥ओव्या॥

तरी सकळ प्रमाणामाजी वरिष्ठ । जो प्रभूचा निश्वास[१७] स्पष्ट । तो महाराज वेदनिर्दिष्ट । वृन्दारकद्रुम[१८] ॥४८॥
कर्मकांडांतील क्रियाश्रवण[१९] । उपासनाकांडांतील सगुणध्यान ।
उपनिषदांमधून अद्वैतज्ञान[२०] । आणि आनंदरूप जाण प्र॒ भक्ती ॥४९॥

*(१) ज्ञानेश्वरमहाराजांच्या चरणकमलास (२) कान्ति, तेज, प्रकाश (३) धन, स्त्री, सुत यांचे ओझे (४) सखा, सोयरा (५) व्यास. (६) अतिकठिण (७) प्रेम श्रद्धा (८) वेदपुराणशास्त्रास अनुसरून (९) उत्तम काव्यास लागणारी लक्षणे (१०) स्पष्ट*

*(११) वेदाचा उपदेश (१२) स्वामीच्या आज्ञेप्रमाणे (१३) पुराणातून केलेला उपदेश (१४) मित्राप्रमाणे (१५) पत्निप्रमाणे गोड व विनयसंपन्न भाषेत केलेला उपदेश (१६) तिन्ही प्रकारचे उपदेशाने युक्त (१७) श्वासरूप (१८) सुरतरू कल्पतरु (१९) धर्म ऐकावयाला मिळतो (२०) जीवब्रह्माचे ऐक्य करणारे ज्ञान*

ऐसें या सुरद्रुमाचें[१] । सर्वपुरुषार्थरूप[२] साचें । फळ बोलिजे सुखाचें । श्रीभागवत हें ॥५०॥
तेंचि वैकुंठाहुनी । श्री महाराज नारदमुनी । मज देता झाला आणोनी । व्यासवाणी[३] इतिविध[४] ॥५१॥
आणि माझिये करीं[५] । फळ गेलें शुकवक्त्रीं[६] । तेथूनि पुढें परंपराकारीं[७] । पृथ्वीवरी विस्तारिलें ॥५२॥
जैसें मागूनि आलें । तैसें पुढें नित्यचि ठेविलें । पुढील आख्यानींही बोलिलें । ये शास्त्रीं म्हणूनी ॥५३॥
आणि जें अनागत[८] । आख्यान झालें समस्त । तें घेऊनि प्रवृत्त[९] । शास्त्र हें यतः[१०]॥५४॥
असो, ऐसें हें फळ । वैकुंठापासोनि आलें केवळ । परी फुटलें नाहीं हा प्रबळ । नित्यपणा ययाचा ॥५५॥
आणि वास्तवीक तरी पाहतां । आम्रादिफळा शुकमुख[११] स्पर्शतां । तरी तयाची मधुरता[१२] । विशेष वाढें ॥५६॥
तरी आधींच हें अमृत । वरी शुकमुनी वक्ताकृपावंत । आणि ऐकणार हरिरसभरीत[१३] । परिक्षित्नृपनाथ[१४] मुमुक्षु ॥५७॥
एवं मुमुक्षूसाठी प्रवृत्ति[१५] । आणि शुकाची न वर्णवे विरक्ती ।
वरी या निगमफळाची[१६] स्थिती । समस्त जाणती सुरमुनी ॥५८॥ (य३-१५)
एवढेंही असूनी । येथ वर्णिला कैवल्यदानी[१७] । जो भक्तवत्सल[१८] शार्ङ्गपाणी[१९] । पिनाकपाणी[२०] तैसाची ॥५९॥
यालागीं झालियाही मुक्ती । हें फळ[२१] न टाकिजे संतीं । वरी रसिकत्वाची[२२] स्थिती । जयाचिये अंगीं ॥६०॥
कां सुवर्णी जैसी हिरकणी । तैसें रसिक[२३] रतिभावज्ञमुनी[२४] । तयासांठी हें वाक्य प्रमाणीं[२५] । धिवसा[२६] होय ॥६१॥

*(१) कल्पतरूचे (२) धर्म, अर्थ, काम , मोक्ष, या चारही पुरुषार्थाची प्राप्ती (३) व्यास म्हणतात (४) याप्रमाणे (५) हातून (६) शुकाचार्याच्या मुखात (७) परंपरेने (८) भविष्यकाळी (९) प्रारंभ झाला (१०) ज्याअर्थी (११) पोपटाचे मुख (१२) गोडी (१३) भगवंताच्या प्रेमाने ओथंबलेला (१४) परिक्षिति राजा (१५) भागवताचा आरंभ (१६) (मोक्षाची) भागवताची (१७) मोक्षदाता भगवान् (१८) भक्तावर दया करणारा (१९) विष्णु (२०) शंकर (२१) भागवत (२२) प्रेमळपणाची (२३) प्रेमळ (२४) प्रेमभाव जाणणारे (२५) वाक्यावर विश्वास ठेवण्याकरिता (२६) हिंमत, धैर्य.*

जैसे बाळें मायबापा उपदेश करितां । तरी त्या शिव्याचि म्हणाव्या तत्वतां ।
तेवीं तुम्हां श्रोतया फळ सेवा म्हणतां । प्रमाद[१] होवो पाहातसे ॥६२॥
परी तान्हे बाळ कवतुकी । ग्रास घाली पितृमुखीं[२] । तेणें मातापिता सुखी । अधिकचि होती ॥६३॥
तेवीं तुम्हा संतांचा पढियावो[३] । वरी बाळपणाचा ठावो[४] ।
आणि बोबडा प्राकृत प्रवाहो[५] । मग कां न आवडेल तुम्हां ॥६४॥
आणि हें फळ सेवितां चांग । त्यागावा न लगे कठिण भाग[६] । हें रसरूपचि सैंघ[७]। जाणिजे फळ ॥६५॥
रसासी असतां पातळपण । तो हातांतूनि जाईल गळून ।
ऐसें नाहीं फळासमान । म्हणोनी फळ बोलिलें मूळ श्लोकीं ॥६६॥
आणि सोडावा नलगे कठिण भाग । यालागीं रसरूप हें फळ चांग ।
येणें हृदयीं गोपिकारंग[८] । सहज प्रकाशे लीलया[९] ॥६७॥
एवं सकळ शास्त्रवरिष्ठ[१०]। म्हणोनि श्रवण याचेंचि श्रेष्ठ ।
तरी रसिक रतिज्ञ[११] भक्तिनिष्ठ[१२]। मधुर पान करावें ॥६८॥
एवं ऐसें हें फळ । परी येथ माझी वाणी कठोर[१३] केवळ[१४]।
त्यांतील कठोरभाग गाळूनि सकळ । निज फळ सेवा आनंदें ॥६९॥
आतां कथानुसंधान[१५] । नैमिषारण्यीं[१६] मुनिजन । शौनकादि तपःसंपन्न[१७] । हरिप्राप्तिहेतु[१८] यज्ञ करिती ॥७०॥
एकदां ते मुनिजन । नित्य नैमित्तिक कर्म सारून । सूताचा सत्कार करून । पुसते झाले आदरें ॥७१॥

॥ अभंग ॥

ऋषी म्हणताती पुण्यवंत सूता । इतिहास कथा पुराणादी ॥१॥
तुजपासुनीया ऐकियेल्या आम्ही । आणि शास्त्रधर्मी[१९] प्रमाण[२०] जे ॥२॥

*(१) अपराध (२) पित्याच्या तोंडात (३) आवडता (४) स्थिति (५) प्राकृत भाषेचा ओघ (६) साल गुठळी इत्यादि (७) सर्वतोपरी, संपूर्ण (८) भगवान् कृष्ण (९) लीलेने (१०) सर्व शास्त्रांहून थोर (११) प्रेमाला जाणणारे (१२) भक्तिसंपन्न (१३) कठीण (१४) फक्त (१५) कथा संदर्भ (१६) नैमिष नांवाच्या अरण्यात (१७) तपादि सामर्थ्याने युक्त (१८) हरीची प्राप्ति व्हावी म्हणून (१९) धर्मशास्त्रात (२०) मनुष्याने केले पाहिजे असे (प्रमाणित केलेले)*

तेंहि आम्ही केलें सखया श्रवण । परी एक प्रश्न आहे आतां ॥३॥
कलीयुगीं लोक सारे अल्पायुषी[१] । अत्यंत आळशी मंदमती ॥४॥
हतभाग्य[२] मूढ तयासांठी आधीं । आम्ही लीला[३] संधी[४] ऐकावया ॥५॥
ऐसें कांहीं सार सोपें मोक्षदानी[५] । सांगाया वेंचूनीं[६] तूंचि योग्य ॥६॥
आणिकही एक पुसतों आवडी । प्रेमळांची उडी जयापायीं ॥७॥ (य३-११६)
तो हा नारायण देवकीचा बाळ । आश्चर्य केवळ वाटे आम्हां ॥८॥
जया जाणावया 'नेति[७]' म्हणे वेद । त्या यशोदा नंद माय बाप ॥९॥
समाधींत ज्याची सुकृतानें[८] भेटी । वसुदेवापोटीं तो हा कैसा?॥१०॥
जयाच्या अज्ञानें[९] भासती विषय । तो हा यदुराय गोपी भोगी ॥११॥
सहजही नाम ज्याचें मुखीं येतां । होतसे पतीता प्रायश्चित्त ॥१२॥
तो हा नारायण गोपिनिरिया[१०] फेडी[११] । सांडोनी उघडी जनलाज[१२]॥१३
विधि[१३] त्रिपुरारी[१४] जया मनीं ध्याती । तो हा विश्वपती गायी चारी ॥१४॥
नारदादिमुनी नित्य गाती ज्यास । निजे सावकाश मातृगीतीं[१५] ॥१५॥
विष्णुसत्रादिकीं[१६] न घे अवदान[१७] तो विश्वमोहन[१८] माति खाय ॥१६॥
निर्विषय[१९] मुनी यत्पदाश्रयान[२०] । जगास पावन करीताती ॥१७॥

*(१) थोडे दिवस वाचणारे (२) भाग्यहीन (३) भगवंताची चरित्रे (४) मध्यांतरांत, कर्माची वेळ नसते अशा काळी (५) मोक्ष देणारे (६) निवडून (७) जे दृश्य आहे ते त्याचे रूप नव्हे (८) पुण्याने (९) ज्याचे स्वरूप न कळल्यामुळे (१०) गोपींच्या चिन्या (११) सोडतो (१२) लोकांची मर्यादा (१३) ब्रह्मदेव (१४) शंकर (१५) आईने गाणे म्हटले असता (१६) विष्णु नांवाच्या यज्ञात (१७) आहुति (१८) जगाला मोहित करणारा (१९) विरक्त (२०) ज्याच्या पायाचा आश्रय करून*

जयाच्या अंगुष्टीं जाली मंदाकीनी[१] । पावन म्हणूनि करी जगा ॥१८॥
तोही प्रभु आहे वश सज्ञनांना । श्रेष्ठत्व तयांना म्हणूनीया ॥१९॥
सामवेद गाय होऊनिया भाट[२]। न जाय अचाट[३] शीघ्र झोंप ॥२०॥
थापटूनि तया जागवी यशोदा । गोपाळा गोविंदा आळवोनी ॥२१॥
ज्याची लीलाकृत्यें[४] नारदादि गाती । ब्रह्मादिविभूति[५] कला[६] ज्याच्या ।२२
बळिरामासह तो हा श्रीकेशव । नानालीलाभाव[७] दाखवीता ॥२३॥
आम्हासी विस्मय ब्रह्मरूप हरी । लीलाभाव[७] तरी दावी कैसा? ॥२४॥
तरी आम्हां येथ एक समाधान । सज्ञनोद्धरण[८] कारण कीं ॥२५॥
भक्तानुग्रहानें[९] लीलामयतनू[१०]। येर[११] तो निर्गुणू[१२] निर्विकारू[१३] ॥२६॥
तो हा नारायण जगन्मायबाप[१४] । चारित्रें साक्षेप[१५] सांगे त्याची ॥२७॥
कलीयुग आम्ही लागलें जाणोनी । राहिलों येऊनी नैमिषीं[१६] या ॥२८॥
धर्मासाठी आहे प्रभूचा अवतार । अवकाश[१७] फार आम्हांलाही ॥२९॥
हरितिरोधानीं[१८] स्वामी धर्मराया । कोणाचा आश्रय धर्मे केला ॥३०॥
पुण्यश्लोक[१९] देवो त्याची लीलाकीर्ति । ऐकतानां तृप्ति नाहीं मना ॥३१॥ (य३-१७)
वरी तुजसम तारक[२०] श्रीगुरु । यालागीं निर्धारू[२१] पुसिला हा ॥३२॥
एवं ऋषिप्रश्नीं[२२] सूता येती डोल[२३] । उत्तर देईल सुखें पुढें ॥३३॥
ज्ञानेश्वरकन्या[२४] सज्ञनां वंदोनी । मिळा अवधानीं[२५] विनवी ऐसें ॥३४॥

**हरिः ॐ तत्सत् श्रीप्रियलीलामहोत्सवे आमंत्रणविलासे**
**ऋषिप्रश्नं नाम प्रथम सखीप्रेषणम् ॥**

*(१) गंगा (२) स्तुतिपाठक (३) गाढ, (४) अवतारचरित्र (५) ब्रह्मदेवादिक विभूति (६) अंश (७) अनेक प्रकारचे चरित्र (८) साधूंचा उद्धार करणे (९) भक्तावर कृपा करण्याकरिता (१०) केवळ स्वेच्छेने शरीर धारण करणे (११) एरवी (१२) गुणरहित (१३) कामक्रोधादि विकार नसलेला, न बदलणारा (१४) जगताचा आईबाप (१५) प्रेमाने (१६) नैमिष नांवाच्या अरण्यात (१७) फुरसतीचा वेळ (१८) भगवान् निजधामास गेल्यावर (१९) अति पवित्र ज्याची कीर्ति आहे असा (२०) तारणारा (२१) निश्चय (२२) ऋषीच्या प्रश्नाने (२३) आनन्दाने होणारा शरीर, मान इत्यादि अवयवांचा अंगविक्षेप.(२४) श्रीमहाराजांनी स्वतःधारण केलेले नाव (२५) लक्षपूर्वक ऐकण्यात.*

**॥ श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ॥**

०००

## सखीप्रेषण २ रें. विषयानुक्रम

**ऋषींच्या १ल्या व २ऱ्या प्रश्नांचें उत्तर.(पृष्ठ १८-२७)**

*गुरुदेवतास्मरण १८.ग्रंथारंभीं मंगलाचरणाचें प्रयोजन १९.सूताचें गुरुदेवतावंदनरूप मंगलाचरण १९. ऋषींच्या प्रश्नाचें अभिनंदन (य३-१) करून सूतानें दिलेलें उत्तरः- ज्याच्या योगानें निष्कामभक्ति उत्पन्न होते तोच सर्वांचा परमधर्म होय. २० निष्काम भक्तीचें लक्षण २० द्विविध धर्मांचें लक्षण २०. परमधर्माचें लक्षण २०. धर्म भक्तीला उत्पादक कसा? या प्रश्नाचें उत्तर २०. भक्तीला योग म्हणण्याचें कारण २०. भक्तियोगाचें सगुण व निर्गुण स्वरूप २०. भक्तीनेंच ज्ञानविरक्ति उत्पन्न होते याविषयीं अन्वयव्यतिरेक- प्रतीतिपूर्वक निरूपण २०- २१. स्वर्गासाठीं धर्म करावा असें जल्पणारांची निंदा २१. भगवद्भक्तांच्या दृष्टीनें श्रौतधर्माचें यथार्थ स्वरूप २१. वांचण्याचें फळ व तत्त्वलक्षण २१. वेदांतश्रवणादिकानें ज्यांची भक्ति दृढ झाली अशा महात्म्यांनाच आत्मस्वरूप दृष्ट होतें. २२. श्रीकृष्णगुणांचें ठिकाणीं आवडी ठेवण्याविषयीं सूतांचा उपदेश २२. भक्तिसमाधान सहज मिळण्याचा उपाय २२.चित्ताला हरिकथा रुचत नसली तर काय करावें? या प्रश्नाचें उत्तर :- चित्तशुद्धीचा उपाय व भक्तिद्वारा भगवत्तत्वज्ञानप्राप्तीचा क्रमनिरूपण २३. तत्त्वज्ञानाचें व भगवद्भक्तीचें फळ २३-२४. सृष्टिकार्य व्यवस्थेकरितां प्रकृतीच्या आश्रयानें भासणारें परमात्म्याचें त्रैविध्य २४. ब्रह्मदर्शन होण्याकरितां सत्त्वगुणाचें श्रैष्ठ्य व महाभारतान्वयानें शिवनारायणांचें ऐक्यकथन २४. भागवतशास्त्रांत विशेषेकरून नारायणाचें प्रशंसन व वेदयज्ञादिकांचें नारायणपरत्व २५. ऋषींच्या द्वितीय प्रश्नाचें उत्तर :- नारायणाचें निमित्तोपादनकारणत्व निरूपण २५.(पृष्ठ १५० ओ० ५८/५९ पहा) परिणामी उपादान जी माया तिचें नित्यत्व, अनित्यत्व व सदसद्- वैलक्षण्यनिरूपण २५. परमेश्वराचें जगज्जन्मादिमत्व (अज्ञबोधार्थ) मायेनें आरोपित आहे २५. नारायणाचें अध्यस्तविवर्तत्त्वनिरूपण २५-२६. नारायणाचें हरिहररूपानें अनध्यस्तविवर्तत्व व वृक्षरूपकदृष्टांतानें पूर्वसिद्धांत कथनपूर्वक अनध्यस्त विवर्ताची फलोपमता-निरूपण २६. (आपेक्षिक बिंबोपम ईश्वराचें अनध्यस्त विवर्तरूप श्रीकृष्णमूर्ती आहे या विषयीं विशेष निरूपण पुढें कुंती स्तुतीत केलें आहे. पृष्ठ १०४ ते १०६). उपसंहार २६.(य३-२)*

०००

# सखीप्रेषण २ रे[३]

## सूताने दिलेले उत्तर

**॥ श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरमाउली समर्थ ॥**

**॥ पद ॥**

**चेतो[४] भज[५] राधाकांतम्[६] ॥धृ०॥**
**ज्ञानप्लवेन[७] भवमतिक्रम्य[८] सेवय[९] एकांतम्[१०] ॥ चेतो० ॥१॥**
**संयमवन्हाविन्द्रियहोमं[११] कृत्वा विषयांतम्[१२] ॥ चेतो० ॥२॥**

*(३) पहिल्या स्कंधाला आमंत्रणविलास हे नांव देऊन त्या स्कंधातील प्रत्येक अध्यायास सखीप्रेषण म्हणजे भगवंताला बोलावण्याकरीता 'सखीला पाठविणे' हे नांव दिले आहे (४) चित्ता (५) स्मर (६) राधावल्लभ श्रीकृष्णाला (७) ज्ञानरूपी नौकेने (८) संसार तरून जाऊन (९) सेवन कर (१०) एकान्ताचे (११) धारणा, ध्यान, समाधि या तिघांचा जो एकत्र अभ्यास त्याला संयम म्हणतात; त्या संयमरूपी अग्नीमध्ये इंद्रियाचा होम करून (१२) विषयाचा नाश.*

**व्रजजनप्रेमलरूपविशेषं[१] मनुते[२] वेदांतम्[३] ॥ चेतो०॥३॥**
**स्मर[४] तल्लाभायैव[५] मुमुक्षो अलकावतिकांतम्[६] ॥ चेतो० ॥४॥**

**॥चूर्णिका ॥**

**एवं[७] ऋषिजनप्रश्नातें[८] । परिसुनी सहर्षचित्तें[९] । चिंतोनी सत्यवतीसुतातें[१०]।**
**विद्या[११] दिधली जया तातें[१२] । विभवविभवसहजहतातें[१३] ।**
**हृदयीं दावी अखंड सतातें[१४] । मग चिंतोनी हृदयस्थातें[१५] ।**
**आणि पाहोनी सर्वगतातें[१६] । अधिष्ठोनी[१७] व्यासमतातें । मधुर गीतातें[१८] ऐकवितां झाला ॥२॥**

**॥ ओव्या ॥**

**जो श्रुतिकवळ[१९] कमलाकांत[२०] । जो सत्यवतीगर्भ[२१] कृपावंत ।**
**तो श्रीव्यास असें बोलत । येथ माझें किंचितही नोहे ॥३॥ (य३-१८)**
**व्यास वदती श्रोतियांतें । एवं पुसले सूतातें । तेणें हर्ष पावोनी मुनीतें । बोलतां झाला उग्रश्रवा ॥४॥**
**परी ज्ञान सांगावया आधीं । पाहिजे गुरुदेवतानमनसिद्धि[२२] ।**
**अन्यथा[२३] ग्रंथकर्तरीं[२४] प्रसिद्धी । नास्तिकभ्रांति[२५] होतसे ॥५॥**

*(१) व्रजवासी लोकांच्या प्रेमाने साकार झालेले (२) आदर करिते (३) वेदान्तशास्त्र (४) चिंतन कर (५) त्याच्याच प्राप्तीकरितां (६) श्री ज्ञानेश्वर महाराजांचे (७) याप्रमाणे (८) ऋषी लोकांच्या प्रश्नास (९) आनंदयुक्त मनाने (१०) व्यासांना (११) ज्ञान (१२) बापाने (१३) मोक्षसुखाच्या लाभाने विषयसुखाचा त्याग करणाऱ्याला (१४) सत्स्वरूपी ब्रह्माला (१५) हृदयांत राहणाऱ्या (१६) व्यापकास (१७) प्रमाण (आधार) मानून (१८) वचनास (१९) श्रुतींचा घास करणारा म्हणजे सर्वज्ञ किंवा कलियुगांतील मंद बुद्धीच्या लोकांकरितां ज्यांनी वेदाचे घास केले, विभाग केले ते व्यास (२०) विष्णु (२१) सत्यवतीच्या पोटी जन्म घेणारे (२२) श्रीगुरु व इष्ट देवता यांचे नमस्काररूपी मंगलाचरण (२३) नाहीं तर (२४) ग्रंथकर्त्याचे ठिकाणीं (२५) नास्तिक होता अशी कल्पना.*

**॥पद॥**

**तो दीनजनतरण[१] नमिला ॥धृ०॥**
**त्यजुनि सकल जो परब्रह्मणि[२] । अक्षय[३] चित्सुखीं[४] रमला[५]॥ तो० ॥१॥**
**जन्मतांचि जो जननिउदरिंहुनी[६] । नाहीं कदा भवीं[७] भ्रमला[८] ॥तो० ॥२॥**
**जाउनि जो गुरुजवळीं मुंज करी । म्हणुनी नाहीं श्रमला[९] ॥तो०॥३॥**
**कर्तव्य न ज्या कर्तृबुद्धिचें[१०] । कर्मविकर्महि[११] वमला[१२] ॥ तो० ॥४॥**
**तात[१३]भयें सुत म्हणुनी बाहतां[१४]। सकलतरूत्तरीं[१५] गमला[१६]॥ तो०॥५॥**

अलकावतिपतिबालावदनीं[१७]। पुण्य[१८]कीर्ति यद्विमला[१९] ॥ तो०॥६॥६॥

॥अभंग ॥

'ब्रह्मभूत[२०] काया होतसे कीर्तनीं[२१] । तुकारामवाणी[२२] प्रमाण[२३] ही ॥१॥
ज्ञानी तैसा जो कां अंतरीं निवाला[२४] । हरिभक्ति[२५] केला देह ब्रह्म ॥२॥
श्रुतीचेंही[२६] सार[२७] स्वानुभवगम्य[२८] । योगिया विश्राम्य[२९] सुखरूप ॥३॥
तेंचि देहाकारें[३०] मुसे आलें वाटे । हृदयीं प्रगटे ध्यातां ध्यातां ॥४॥
स्मृतिगामी[३१] आणि पुराणाचें गुह्य । बोलिला जो स्वयें सर्वहिता[३२] ॥५॥

*(१) दीनाला तारणारा (२) परब्रह्माचे ठिकाणी (३) अखंड (४) परब्रह्मसुखांत (५) गढला (६) आईच्या पोटांतून (७) संसारांत (८) फिरला, गुंतला (९) कष्टला (१०) मी कर्ता अशा अभिमानाने येणारे (११) धर्माधर्म (१२) त्याग केला (१३) व्यास (१४) बोलविता, हाक मारताना (१५) सर्व वृक्षांच्या द्वारा (वृक्षांतून ) उत्तर देतांना (१६) आढळला (१७) आळंदीच्या स्वामीच्या मुलीच्या मुखांत म्हणजे महाराज म्हणतात माझ्या मुखांत (१८) पवित्र (१९) ज्याची निष्कलंक (२०) ब्रह्मस्वरूप (२१) भगवंताच्या नामस्मरणाने (२२) तुकाराममहाराजांचे वचन (२३) यथार्थ (२४) वासनारहित झाला (२५) हरीच्या भक्तीने (२६) वेदाचे (२७) मथितार्थ (२८) केवळ अनुभवाने कळणारे (२९) विश्रांतिरूप (३०) देहाच्या आकाररूपी मुशींत (३१) स्मृतीला धरून (३२) सर्वांच्या कल्याणाकरितां*

तमोऽन्ध जनाला[१] अध्यात्मप्रदीप[२] । लावोनी[३] साक्षेप तिष्ठत जो ॥६॥
कृपेनें जो करी सच्छिष्यरक्षण । देतसे शिक्षण परीक्षूनी[४] ॥७॥
तो हा कृपावंतस्वामी शुकमुनी । प्रणाम चरणी सद्भावाने ॥८॥
ऐसें बोलोनीया उग्रश्रवासुत[५] । ऋषीतें सांगत गुह्यज्ञान[६] ॥९॥
ज्ञानेश्वरकन्या सुख कृपावशा[७] । महाराष्ट्रभाषा वाणी वदो ॥१०॥७॥
नारायण नर नमूं उभयतां । जनाचियां[८]हिता नृशरीरी[९] ॥१॥
आणि सरस्वती चहुंवाणीमाता[१०] । तिचें चरण माथां प्रेमें वंदू ॥२॥
सत्यवतीसुत[११] व्यासोनारायण । साष्टांग नमन त्नारणीं ॥३॥
सर्वांच्या स्मरणें संसारापासोनी । मुमुक्षु पावोनी जय[१२] निघे ॥४॥
म्हणोनियां आधीं यांचेंचि स्मरण । आपण करून करा म्हणे ॥५॥
ज्ञानेश्वरकन्या तयापरी जाली । बोलतां हे बोली यथामती ॥६॥८॥(य३.१९)

॥ ओवी ॥

मग तो सूत मुनीचे प्रश्न । प्रेमभावें[१३] करोनी श्रवण । बोलतां बोलतां अभिनंदन । आदरें करी ॥९॥

*(१) अज्ञानाने मोहित झालेल्यांना (२) आत्मज्ञान करून देणारे, आत्मप्रकाशक (३) उजळून (४) कसोटी पाहून (५) उग्रश्रवा हाच सूत (६) उत्तम शिष्यालाच अगदी एकान्तांत सांगितले जाणारे किंवा गुप्त अशा आत्म्याचे ज्ञान (७) आत्मसुखाच्या व लोककल्याणाच्या वृत्तीच्या स्वाधीन होऊन (८) लोकांच्या कल्याणाकरितां (९) मनुष्यासारखे शरीर धारण करणारे (१०) परादिक चहुवाणींची माता (११) सत्यवतीचा मुलगा (१२) यश (१३) आवडीने..*

॥दोहा ॥

उत्तम पुसलें तुम्ही आजी सकललोककल्याण[१] । कृष्णकथेचा प्रश्न असे ब्रह्मप्रतीतिप्रमाण[२] ॥ वृन्दपति० ॥१०॥

॥ चौपाई ॥

परम[३] धर्म तो सकल जनाला । जो उत्पादक[४] हरिभजनाला[५] ।
परि ती भक्ति परम अकामा[६] । अक्षयरूप[७] अकल[८] गुणधामा[९] ॥१॥

॥दोहा ॥

जिच्यामुळें निजरूप[१०] तें करतलसुफलसमान[११] । आणि परमानंद मिळे निवटुनि[१२] दृढ अभिमान ॥१२॥

॥ ओव्या ॥

येऱ्हवीं द्विविध[१३] धर्म जाण । प्रवृत्तिनिवृत्तिलक्षण[१४] ।

**स्वर्गफलावसायी[१५] प्रवृत्तिलक्षण । निवृत्तिलक्षण ज्ञानदाता[१६] ॥१३॥**

**त्यामाजींही परमधर्मू[१७]। जेणें भेटे पुरुषोत्तमू । श्रवणादिरूप[१८] भक्तिप्रेमू । उपजे जेणें ॥१४॥**

*(१) सर्व लोकांच्या कल्याणाचे (२) परब्रह्माच्या साक्षात्काराचा खरा मार्ग (३) श्रेष्ठ (४) उत्पन्न करणारा (५) परमेश्वराच्या सेवेची आवडी (६) अति निष्काम (७) अविनाशी (८) प्रयत्नाने आकलन न होणारी, अनिर्वचनीय (९) सद्‌गुणाचे निवासस्थान किंवा दोन्ही शब्द मिळून अवर्णनीय सद्‌गुणांचे स्थान असाहि अर्थ होतो (१०) आपले आत्मस्वरूप (११) तळहातावरील फळाप्रमाणे (१२) नाहींसा करून (१३) दोन प्रकारचा (१४) प्रवृत्ति म्हणजे पुनरावृत्ति किंवा पुनःपुनः जन्ममरणरूप संसारांत पाडणे हेच ज्याचे लक्षण आहे असा एक व निवृत्ति म्हणजे पुनःसंसारांत न पाडणे हे ज्याचें लक्षण आहे असा दुसरा (१५) स्वर्गरूपी फळ देणारा (१६) ज्ञान म्हणजे आत्मज्ञान करून देणारा (१७) श्रेष्ठधर्म (१८) भगवंताच्या कथा श्रवण करणे*

**येथ चतुर श्रोते आशंकिती । धर्म ज्ञानहेतु[१] बोलिला वेदान्ती ।**

**वेदयज्ञतपादिकीं[२] मुमुक्षायेती । ऐसी श्रुति बोलतसे ॥१५॥**

**तरी धर्म भक्तिकारण[३] । येथ काय आहे प्रमाण । तयाचें हेंचि समाधान । कीं भक्तिद्वारें[४] ज्ञान उपजवी धर्मू ॥१६॥**

**भक्तीनेंही चित्तवृत्तिरोध[५] । यालागीं भक्तियोग शब्द । किंवा जीवपरमात्मवियोग[६] अशुद्ध ।**

**तो भक्तीनें संयोग[७] शुद्ध म्हणोनि भक्तियोगू ॥१७॥**

**तो[८] आनंदरूप निर्गुणीं[९] । आणि परमप्रेमरूप सगुणीं[१०] ।**

**नियुक्त[११] करितां श्रीकृष्णीं । जनकजननी[१२] होय ज्ञाना ॥१८॥**

**एऱ्हवीं[१३] भक्तीचें तों भक्तीच फळ । परि ज्ञान जें उपजे केवळ । जो तंव परमात्मप्रकाश[१४] प्रबळ[१५]। म्हणोनियां ॥१९॥**

**आणि तेंही ज्ञान । मिळे शुष्कतर्कावीण[१६] । कीं आत्मप्रीतीनें[१७] सिद्ध म्हणोन । तर्कापेक्षा[१८] न लगे ॥२०॥**

**आणि तैसीच विरक्ती[१९] । सहज[२०] वाढो लागे चित्तीं । श्रीवासुदेवें[२१] भगवति । भक्तियोग योजलिया[२२] ॥२१॥**

**एवं भक्ति तेथें ज्ञानविरक्ति । ही झाली अन्वयप्रतीती[२३] । आतां व्यतिरेक-स्थिती[२४] बोलिजेते ॥२२॥ (य३-२०)**

*(१) ज्ञान उत्पन्न करण्याचे साधन (२) वेदयज्ञादिकाने मुमुक्षुता उत्पन्न होते (३) भक्तिप्रेम उत्पन्न करणारा (४) भक्तिप्रेम उत्पन्न करून त्याच्या द्वाराने (५) मनाच्या वृत्तीचे न उठणे (६) जीवाचा व ईश्वराचा अलगपणा (७) ऐक्य (८) संयोग (९) निर्गुण परब्रह्माशीं (१०) सगुण परमेश्वराशी (११) लावितां, जडवितां (१२) मातापिता (१३) वास्तविक पाहता (१४) परमेमश्वराचा सृदिानंदरूपानें आविर्भाव (१५) अतिशय घनदाट (१६) शुष्क निरर्थक तर्क करावे न लागता (१७) भक्ति आत्मरूप असल्यामुळे, भक्तीत साक्षात् आत्मानुभव येत असल्यामुळें (१८) तर्काची गरज (१९) वैराग्य (२०) आपोआप (२१) भगवान् वासुदेवाचे ठिकाणी (२२) केल्याने (२३) सहचाराचे दिसणें, जेथे जेथे भक्ति आहे तेथे तेथे ज्ञान व वैराग्य असतेच असा अनुभव (२४) भक्तिवांचून ज्ञान व वैराग्य राहूंच शकत नाही याला व्यतिरेक स्थिति म्हणतात.*

**धर्माचें उत्तम अनुष्ठान । जरी भगवंतीं न लावी मन । न करवी तत्कथाश्रवण[१] । तरी कष्ट जाण केवळ ते ॥२३॥**

**वांचोनिया कांतभक्ति[२] । कदापि नोहे ज्ञानविरक्ति । विना ज्ञानें घडेल मुक्ति । सहन ही उक्ति[३] श्रुति[४] न करी ॥२४॥**

**आणि हरिप्राप्तीवीण[५] स्वर्गगमन[६] । तें तंव अप्सरामूत्रपात्रावघ्राण[७] ।**

**जैसा कर्मलोक[८] हा होय क्षीण[९] । तैसा फळलोकही[१०] जाणिजे ॥२५॥**

**आणि वेदीं बोलिलें स्वर्गफळ । तें मुख्यत्वें[११] नोहें केवळ । जैसी जननी दाऊनि गूळ । औषध चाटवी बाळकां ॥२६॥**

**परि हें नेणोनि मूढमति[१२] । स्वर्गचि एक मुख्य म्हणती । आणि धर्म करावा बोलती । स्वर्गासाठीं ॥२७॥**

**धर्मानें मिळवावें धन । धनें होवावें भोगसंपन्न । भोगें इंद्रियांवरी प्रीति दारूण । पुनः तेणें धर्मादि वाढवावें ॥२८॥**

**एवं आश्रवुनी[१३] श्रुति । भोगार्थ अवघे जल्पती । परि जे भगवद्भक्त यती[१४] । ते न ऐकती गोष्टी या ॥२९॥**

**कर्में होय चित्तशुद्धि । उपासनया स्थिरबुद्धि[१५] । ज्ञानें साधे मोक्षसिद्धि । ऐसी प्रसिद्धी[१६] श्रौतधर्मी[१७] ॥३०॥**

**तया धर्माचें फळ । जड धन बोलती केवळ । ते मूढची गा प्रबळ । न होती वेत्ते[१८] ॥३१॥**

**म्हणोनी धर्माचे फळ । अर्थ[१९] तो नव्हे केवळ । आणि धर्मसहित अर्थाचें[१९] फळ । कामही न म्हणावा ॥३२॥**

**आणि कामाचें फळ इंद्रियप्रीति । ऐसें सत्पुरुष कदा न म्हणती ।**

**तरी शरीर वांचेल करावया ईश्वरभक्ति । इतुकाचि घ्यावा अर्थू ॥ ३३॥**

*(१) भगवंताच्या कथा ऐकावयास लावणार नाही (२) श्रीकृष्णाची भक्ति (३) बोलणे (४) वेद (५) श्रीहरीची प्राप्ती सोडून (६) स्वर्गास जाणे (७) अप्सरेच्या मूत्रस्थानांतील दुर्गंध घेणें (८) कर्माने मिळविलेला मृत्युलोक (९) नाश पावतो (१०) परलोक (११) खरोखरच जीवांनी स्वर्ग मिळवावा या उद्देशाने सांगितलें नाहीं (१२) मूर्ख (१३) वेदाच्या आधारानें (१४) संन्यासी (१५) एकाग्रता (१६) निर्णय (१७) वैदिक धर्मात (१८) जाणते (१९) धन.*

**आणि वांचलियाचेंही फळ । नव्हे काम्यजविषयजाळ[१] । किंतु[२] तत्वज्ञानेच्छा[३] प्रबळ । जीविताचें[४] फळ असे ॥३४॥**
**तत्त्व म्हणजे स्वर्गद[५] कर्म । ऐसें म्हणती त्या न कळे वर्म[६]। उपनिषदे जया म्हणती ब्रह्म । तत्त्ववेत्यांचें तत्त्व तें ॥३५॥**
**जयानें सकळ धर्मप्रकाशू[७] । जें भ्रमअधिष्ठान[८] अविशेषू[९] । जें कळलिया विशेषू । भ्रम निवर्ते[१०] ॥३६॥**
**तें चैतन्य तेंचि ज्ञान । तें सत्य तें अनंत पूर्ण । तें प्रेमास्पद[११] तें आनंदघन । सगुण निर्गुण तेंचि कीं ॥३७॥**
**उपासिती[१२] जे हिरण्यगर्भू । ते म्हणती हा परमात्मा स्वयंभू । आणि सात्वत भगवद्भक्त प्रभू । भगवंत म्हणती ॥३८॥**
**'शब्द्यते' हें वचन । वेदवत्प्रमात्वें[१३] उपपन्न[१४]। मूळीं आहे एकवचन । यास्तव श्रुतिसमान[१५] संतवाणी[१६]॥३९॥(य३-२१)**

**॥ दिंडी ॥**

**ज्ञान आहे परोक्ष[१७] जयांना कीं । दोष पाहती जे येथ[१८] आणि नाकीं[१९] ॥**
**असे ज्यांनां वैराग्य ज्ञान युक्ति । श्रवणमननाद्यैः[२०] करिति विष्णुभक्ति ॥४०॥**

*(१) कामनेने मिळविलेल्या विषयसुखाचा पाश (२) किंबहुना (३) आत्मज्ञानाची इच्छा (४) वांचण्याचे-जीवंत राहण्याचे (५) स्वर्गप्राप्ति करून देणारें (६) रहस्य (७) सर्व धर्मांचे यथार्थ ज्ञान होते (८) भ्रमाला आधार (९) सामान्य, विशेषभावरहित (१०) नामरूपात्मक सत्य आहे असा जो भ्रम होता तो नाहिंसा होतो (११) प्रेमरूप (१२) हिरण्यगर्भाची उपासना करणारे (१३) वेदाप्रमाणे ज्याचें ज्ञान यथार्थ आहे (१४) याअर्थी लागू आहे, या अर्थाचे द्योतक आहे (निष्पन्न) (१५) वेदतुल्य (१६) संतांचे वचन (१७) साक्षात्काररूप (१८) इहलोकांतील विषयांत (१९)स्वर्गातील विषयसुखांत (२०)श्रवणमननादिकाने (युक्ति = तर्क)*

**॥ ओवी ॥**

**ऐसें संत जे महामती[१] । ते आपण आपणयातें पाहती । वेदान्तश्रवणादिकीं भक्ति । जाहली दृढ जयांची ॥४१॥**

**॥ पद ॥**

**म्हणोनी तुम्हाला ठावें[२] असो ॥धृ० ॥**
**ब्राह्मणवर[३] हो सावध होउनि । शरीरीं कांहिच गर्व[४] नसो ॥१॥**
**निजवर्णाश्रमकर्म[५]विभागीं । करितां साधन हरिच दिसो ॥२॥**
**अलकावतिपतिनंदिनीप्रियकर[६] । सकल जना ह्रदयीं विलसो[७] ॥३॥४२॥**

**॥ पद ॥**

**रे मन भज यास्तव भगवान । मना भज प्रेम धरुनि भगवान ॥धृ०॥**
**श्रवणकीर्तनध्यानपूजनें । मूक्त होय अघवान[८] ॥१॥**
**यादवपतिप्रभु[९] गोकुळीं असतां । अभिषेकी मघवान[१०] ॥२॥**
**ज्ञानेश्वरपदकमलसुगंधा[११] । सेवुनि त्यज मदमान[१२] ॥३॥ ४३॥**

**॥ अभंग ॥**

**कोणा नावडतील श्रीहरीचे गूण । जाहला सगुण भक्तहिता[१३] ॥१॥**
**ज्याचें ध्यानखड्ग[१४] वारि[१५] रिपुदल[१६] । कर्म अमंगळ[१७] तेंही तूटे ॥२॥**

*(१) श्रेष्ठ बुद्धीचे (२) माहित (३) ब्राह्मणश्रेष्ठांनो (४) अभिमान (५) आपल्या वर्णाश्रमाप्रमाणें जे जे कर्म करावयाचे, आपल्या वांट्यास आले असेल ते (६) आळंदीश्वराच्या म्हणजे श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या कन्येचे प्रियकर पति श्रीकृष्ण (७) प्रगट होवो (८) पापी (९) यादवांचा स्वामी श्रीकृष्ण (१०) इंद्र (११) ज्ञानेश्वरमहाराजांच्या चरण कमलाच्या मकरंदाला (१२) गर्व व मानाची वृत्ति (१३) भक्तांच्या कल्याणाकरितां (१४) ध्यानरूपी तलवार (१५) नाहींसे करिते (१६) शत्रुसैन्य (१७) अशुद्ध, बंधनकारक.*

चिज्जडाची[१] ग्रंथी अहंमति[२] दृढ । तेही अवघड[३] तुटे ध्यानें ॥३॥
ज्ञानेश्वरकन्याकान्त नारायण । वाटे मोक्षाहून आवडीचा ॥४॥४४॥
॥ओव्या ॥
तरी विषयीं कठिण[४] मन । आणि हरिपदीं प्रेमसंपन्न । करितां भक्तिसमाधान । सांपडे सहज ॥४५॥
ऐसी कर्मनिर्मूळिनी[५] हरिकथा । समर्थ परि न रुचे चित्ता ।
ऐसी आशंका घेतील श्रोता । तरी समाधान आतां ऐकावें ॥४६॥ (य३-२२)
गंगा यमुना सरस्वती । गौतमी नर्मदा दृषद्वती । प्रयाग काशी मथुरा द्वारावती[६] । हरिद्वार हिमालयू ॥४७॥
इत्यादिकें पुण्य क्षेत्रें । जीं स्मरतांचि पापें जळतीं विचित्रें । तीं सेविलिया सत्पात्रें[७] । भेटतीं सहज ॥४८॥
मग आणिक जाहलिया सद्दर्शन[८]। न तरेल ऐसा आहे कोण । पुण्यतीर्थीचें घडतां सेवन । सज्जनभजन[९] आवडे ॥४९॥
॥ पद ॥
ज्याला सज्जनपदअभिलाष ॥ धृ० ॥
सत्सेवेनें आवडती मग गोपीरमणविलास[१०] ॥१॥
श्रवण जयाचें पुनित[११] करी मन कीर्तन वारि[१२] भवास[१३] ॥२॥
तो प्रभु स्वकथा[१४] ऐकत यांच्या हृदयीं करि रहिवास[१५] ॥३॥
निजप्रेमळ संतांच्या करितो दुष्कृतसुकृतविनाश[१६] ॥४॥
कृष्ण राहि हृदयीं जरी वळतां ज्ञानेश्वर अविनाश ॥५॥ ५०॥

*(१) जड (देहादिक) व चैतन्य (आत्मा) यांची गांठ (२) अहंकार (३) कठीण (४) आसक्तिरहित (५) कर्मबंधाचे निर्मूलन करणारी. (६) द्वारका (७) संत (८) संताचे दर्शन (९) संतांच्या चरणाची आवडी (१०) कृष्णचरित्र (११) पवित्र (१२) नाहींसे करिते (१३) संसारास (१४) आपलें चरित्र (१५) वस्ती (१६) पापपुण्याचा शेवट, नाश*

॥ ओव्या ॥
एवं आवडी कृष्णगुणीं[१] । तेणें मळविक्षेप[२] न राहती मनीं । यद्यपि ज्ञान होतांक्षणीं । अविद्या नाशी ॥५१॥
तदपि मरणोन्मुख[३] जैसें । अविद्येचें राहणें तैसें । ज्ञान जाहलिया आपैसें[४] । सकळ नासे अकल्याण[५] ॥५२॥
ऐसी झालिया शुद्धवृत्ती । भागवतशास्त्र सेवा निगुती ।
करितां उत्तमश्लोक[६] भगवंती । भक्तिनिष्ठा[७] वृद्धी पावे ॥५३॥
तेव्हां भक्तीचेनि बळें । कामलोभांचीं पाळेंमुळें[८] । मोडोनी पडती सकळें । क्षणामाजीं ॥५४॥
हें कामलोभादिक । रजस्तमोगुणात्मक[९] । चित्त यापासुनी सुटतां सम्यक । सत्त्वामाजि[१०] स्थिर होय ॥५५॥
एवं गेलिया रज तम । सत्त्व[११] प्रकाशे अतिउत्तम । तेणें चिंताखेदादि धर्म । जळती सकळ ॥५६॥
मग प्रसन्न होय चित्त । भगवद्भक्ति वृद्धि पावत । तिया भक्तीनें त्वरित । भगवत्तत्त्वज्ञान[१२] होय ॥५७॥
<u>जें जें दिसों लागे भूत । तो तो चैतन्य भगवंत । आत्मप्रीतीचि[१३] यथार्थ । प्रेमभक्त्यानंदू ॥५८॥</u>
या नांव भगवत्तत्त्वज्ञान । तें सहजची होय तयाकारण । जो या संसृतिसंगाहून[१४] । मोकळा झाला ॥५९॥
मग तया ज्ञानें निश्चिती । तुटें हृदयींची चिदचिद्ग्रंथी[१५] । मग संशयाची पाती[१६] । औषधाही[१७] मिळेना ॥६०॥
आणि कर्मे प्रारब्धभिन्न[१८] । जळती संचित क्रियमाण । (य३-२३) प्रारब्ध तंव भोगेंकरून । समाप्त होय ॥६१॥

*(१) श्रीकृष्णाचे गुणवर्णनाचे ठिकाणी (२) या नावांचे दोष; मल म्हणजे पापप्रवृत्ति व विक्षेप म्हणजे चित्ताचा चंचलपणा (३) आसन्नमरण (४) आपोआप (५) दुःख (६) त्रैलोक्यांत ज्याची उत्तम किर्ती आहे (७) प्रेमाची दृढता (८) जडासह (मूळासह) (९) रजोगुणतमोगुणापासून झालेले (१०) सत्वगुणांत (११) सत्त्वगुण (१२) भगवंताच्या स्वरूपाचे ज्ञान (१३) आत्मप्रीति हीच प्रेमभक्तीचा आनंद होते (१४) प्रपंचाच्या आसक्तीतून (१५) जड (देहादिक) व चेतन (आत्मा) यांची ऐक्यगांठ (१६) पान (१७) निःशेष नाहीशी होते(१८) प्रारब्ध कर्म सोडून बाकीची.*

तथापि भगवद्भक्तिभावो[१] । करी प्रारब्धाचा अभिभवो[२] । ब्रह्मसाक्षात्कार सावेवो[३] । सभक्तीक[४] झालिया ॥६२॥
याचिलागीं सकलजन । अतिआवडी मानसी धरून । भगवंतीं लावूनि मन । <u>आत्मप्रसादिनी</u>[५] करिती <u>भक्ती</u> ॥६३॥
एवं सकळ संता भज्य[६] । जया वैकुंठीचें राज्य । यद्भक्ता[७] गाजाबज्य[८] । प्रलयींही न घडे ॥६४॥

सत्त्वरजस्तमोगुण । हे प्रकृतीचे तीन । तयाचा आश्रय होऊन । त्रिविध[९] होय परमपुरुषु ॥६५॥
तेथ स्थित्युपाधि[१०] नारायणू । उत्पत्त्युपाधि[११] कमलासनू[१२] ।
लयोपाधि[१३] उमारमणू[१४] । परी सत्त्वतनू[१५] श्रेयस्करी[१६] ॥६६॥
काष्ठाचिया[१७] ठायीं । अग्नी न दिसे कांहीं । परी मंथन[१८] करितां लवलाही[१९] । धूममय[२०] उत्पन्न होय ॥६७॥
तेथ किंचितसा प्रकाश । आणि अग्नी जयीं उमटे विशेष । तयीं संपूर्ण होय प्रकाश । कर्माग्नीचा[२१] ॥६८॥
एवं गुप्त प्रकाश[२२]तमापासोन[२३]। किंचित्प्रकाश[२४]रज उत्पन्न । परी तेथ विक्षेप[२५]बहुत म्हणोन । ब्रह्मदर्शन[२६]घडेना ॥६९॥
आणि त्याहुनी सत्त्व अतिश्रेष्ठ । तेथ ब्रह्मदर्शन घडे स्पष्ट ।
म्हणोनी सत्त्वोपाधिविशिष्ठ[२७] । वासुदेव वरिष्ठ म्हणती मुनी ॥७०॥

*(१) भगवंताच्या प्रेमभक्तीचे अस्तित्व (२) दडपून टाकणे (३) (पूर्णपणे) निश्चयाने (४) भक्तिसहित (५) चित्तप्रसन्न करणारी किंवा आत्मसाक्षात्कार करून देणारी (६) भजन करण्यास योग्य (७) ज्याच्या भक्तास (८) गज बज-घाबरणे, भीति (९) तीन प्रकारचा (१०) जगताच्या पालनाची उपाधि असलेला (११) उत्पत्तीची उपाधि असलेला (१२) ब्रह्मदेव (१३) प्रलयाची उपाधी असलेला (१४) शंकर (१५) शुद्धसत्त्वोपाधीचे शरीर (१६) हितावह (१७) लाकडांत (१८) घुसळला असतां (१९) तात्काळ (२०) धुराच्या रूपाने (२१) श्रौतकर्मात उपयोगी पडणाऱ्या अग्नीचा (२२) प्रकाशाला गुप्त ठेवणाऱ्या, झाकून टाकणाऱ्या (२३) तमोगुणापासून (२४) प्रकाशाला अस्पष्टपणें दाखविणारा म्हणजे थोड्या प्रकाशाला भासविणारा (२५) चंचलपणा (२६) ब्रह्म साक्षात्कार (२७) शुद्ध सत्त्वाची ज्याला उपाधि आहे असा.*

परी हे सृष्टिकार्यव्यवस्था[१] । महाभारतान्वयें[२] पाहतां । उमाकांतरमाकांता । सात्त्विकता[३] दोघातें ॥७१॥

॥ श्लोक ॥

''रुद्रो[४] नारायणश्चैवेत्येकं सत्त्वं द्विधाकृतम् ॥ लोके चरति कौन्तेय व्यक्तिस्थं सर्वकर्मसु ॥१॥'' महाभारत.

॥ओव्या ॥

एकची सत्त्व दोन भाग । उमारंग रमारंग । म्हणूनी विचरती कृपांग[५] । सर्व कर्मीं लोकत्रयीं ॥७२॥
म्हणवुनी माधव महादेव । दोघे ही भजनीय स्वयमेव । भेद पाहती ते मूढभाव[६] । अंधतामिस्त्र[७] पावती ॥७३॥
परी ध्यानीं जे धरिली व्यक्ति । उमापती वा रमापती । हे सात्त्विक म्हणूनी भजती । मुमुक्षू ययाते ॥७४॥
एऱ्हवीं जैसी जयांची मती । ते तैसेचि देव कल्पिती । भूत पितृ प्रजापति । कामार्त[८] भजती सकाम ॥७५॥
तयांच्या पूर्ण होती कामना[९] । परी जे मुमुक्षू जननमरणा[१०] । (य३-२४)
विटले[११] ते कल्याणनिधाना[१२] । शिवनारायणा भजती ॥७६॥
एवं दोन्ही मिळून एक । शिव आणि वैकुंठनायक । परी ये शास्त्रीं[१३] विशेषें सम्यक[१४] । नारायण प्रशंसिला ॥७७॥

*(१) सृष्टीच्या उत्पत्त्यादि कार्यापुरती स्थिति (२) महाभाताप्रमाणे (३) दोघेही शुद्धसत्त्वोपाधिकच (४) एकच शुद्ध सत्त्व जे दोन प्रकारचे शरीरधारी होऊन सर्व लोकांत व सर्व कर्मात राहते, ते द्विधा झालेले शुद्ध सत्त्वच शंकर व नारायण या नावानी संबोधिले जाते (५) जीवांच्या कृपेसाठी शरीरधारी झालेले (६) अज्ञानी (७) नरक (८) वासना पूर्ण होण्याकरितां (९) इच्छा. (१०) जन्ममृत्यूस (११) कंटाळले (१२) सर्व सुखाचा सांठा (१३) भागवतात (१४) उत्तम रीतीने.*

वेद यज्ञ क्रिया योग । तप ज्ञान धर्म चांग । पुण्यफळ[१] लोकविभाग[२] । नारायणपर[३] सकळ ॥७८॥
जया आनंदाच्या लेशेंकरून[४] । ब्रह्मदेवादींचे आनंद पूर्ण[५] । वेदशास्त्रसमन्वयेंकरून[६] । जाणती जया ॥७९॥
म्हणोनी नारायणावीण । कांहींच नाहीं उपपन्न[७] । यालागीं प्रेमेंकरून । नारायण स्मरावा ॥८०॥
निमित्त[८] आणि उपादान[९] । जो जगा उभयकारण[१०] । श्रुतितात्पर्य[११] प्रमाण[१२] । जयाठायीं ॥८१॥
तो गुणातीत[१३] सर्वव्यापकू । तोचि जगातें स्थापकू[१४] । सकळ जगमयंकू[१५] । तेथूनी जाहला ॥८२॥
येथ विवर्तोपादान[१६] नारायण । आणि तयातेंचि निमित्तपण । परिणामी[१७] उपादान । बोलिजे माया ॥८३॥
ती माया त्रिगुणात्मिक[१८] । जी जाहली विश्व[१९] सकळिक । कारणत्वें[२०] नित्य देख । यावज्ज्ञान[२१] ॥८४॥
आणि कार्यदृष्ट्या[२२] अनित्यता । या मायेसी तत्वतां । दृष्टिसृष्टिवाद[२३] प्रतिपादतां । अद्वैतसिद्धींत[२४] बोलिले ॥८५॥
आणि हे अनादि[२५] अनंतू[२६] दिसे । परी ज्ञानें समूळ नाशें । यालागीं सदसद्विलक्षण[२७] ऐसें । नाम इयेचें ॥८६॥
हिच्या योगें जगत्कर्तृता । ती या सामान्यचैतन्यवंता[२८] । आरोपेंचि[२९] भगवंता । वरी आली ॥८७॥

**म्हणोनी तो परमेश्वरू । जगज्जन्मस्थितिसंहारू[३०] । करी हा डगरू[३१] । अज्ञबोधार्थ[३२] ॥८८॥**
**असो जगज्जन्मादिक । ते कार्याविषयींच[३३] देख । कारणाज्ञान[३४] तंव निष्टंक[३५] । यावृज्ज्ञान[३६] नित्य असे ॥८९॥**
**असो ऐसीया आरोपगुणी[३७] । आंत प्रविष्ट होउनी । परमात्मा कैवल्यदानी । गुणाभिमानी[३८] भासतो ॥९०॥**

*(१) सत्कर्माचे फल (२) नानाप्रकारचे स्वर्गादि लोक (३) त्या त्या नांवाने नारायणाचेच ते वर्णन आहे (४) अंशमात्रें करून (५) खरोखर (६) वेदशास्त्रांची एकवाक्यता करून (७) अस्तित्वांत (निष्पन्न) (८) कार्याला उत्पन्न करणारे पण कार्याहून निराळे राहणारे (९) कार्याला उत्पन्न करून कार्यात भरून राहणारे (१०) असे दोन्ही प्रकारचे कारण (११) श्रुतीची एकवाक्यता (१२) जाणण्याचे साधन (१३) त्रिगुणरहित (१४) उत्पन्न करणारा (१५) जगताचा डोल्हारा (१६) जगद्रूपी खोट्या भासाला आधार (१७) जगद्रूपाने परिणाम पावणारी (१८) तीन गुणांनी युक्त (१९) जगत् (२०) कारणरूपाने (२१) ज्ञान होईपर्यंत (२२) कार्यरूपाने जगताचे कारण जी माया ती ज्ञान होईपर्यंत नित्य आहे व तिचे कार्य जे जगत् त्या दृष्टीने (जगत् अनित्य असल्यामुळे) अनित्य आहे **(२३) दृष्टिसृष्टिवाद** सांगतांना;*

***दृष्टिसृष्टिवादाचा अर्थ** असा आहेः-*

*अज्ञानाने अंतःकरणाशी ऐक्य पावून जे चैतन्याचे स्फुरण होते त्याला दृष्टि म्हणतात. ह्यालाच जीव, प्रमाता इत्यादि नांवे आहेत. ह्यानेच सृष्टीची कल्पना केली. म्हणून या दृष्टिसृष्टिवादांत **अंतःकरणवृत्तीच्या योगाने मर्यादित झालेल्या या चैतन्याने जेव्हां व जोपर्यंत ज्या पदार्थाची कल्पना केली तेव्हां व तोपर्यंत तो पदार्थ भासतो.** किंवा **दृष्टिरूप चैतन्याला जेव्हां जो पदार्थ ज्ञात आहे तेव्हांच तो पदार्थ आहे** असा या दृष्टिसृष्टिवादाचा सिद्धांत आहे. एक ब्रह्म पारमार्थिक म्हणजे तिन्ही काळी सत्य असून त्यावांचून बाकी सर्व भासमात्र आहे. अशा पारमार्थिक व प्रातिभासिक दोनच सत्ता या वादात ग्राह्य असून सृष्टिदृष्टिवादाप्रमाणे व्यवहारिक सत्तेचा यांत अंगिकार केला नाही. **या वादांत मायोपाधिक ईश्वर ग्राह्य नसून शुद्ध ब्रह्मच जीवाच्या अपेक्षेने ईश्वरसंज्ञेस पात्र होते असे या वादियांचे मत आहे.** जीव हा अज्ञानोपहित म्हणजे अज्ञानाचा आश्रय आहे म्हणून याचे ठिकाणी बंध व मोक्ष कल्पित आहेत आणि या जीवाची अंतःकरणांत पडलेली प्रतिबिंबे ज्याला जीवाभास म्हणतात, त्यांचे ठिकाणी बंधमोक्ष सत्य भासतात. **जीव एकच आहे व जीवाभास नाना आहेत असे या वादांत मानिले असून नुसत्या जीवाभासाच्या उपाधीचा नाश केला म्हणजे या वादांत भागते;** ईश्वराच्या उपाधीचा नाश करण्याची जरूर नाही. (२४) मधुसूदनसरस्वतीने केलेला ग्रंथ (२५) उत्पत्तिरहित (२६) अमर्याद (२७) जिला सत्य म्हणतां येत नाही किंवा अत्यंत असत्यहि म्हणतां येत नाही अशी दोहोंहून निराळी (२८) सद्रूप ब्रह्मावर (२९) भ्रांतीनेच (३०) जगाची उत्पत्ति स्थिति नाश (३१) प्रसिद्धि (३२) अज्ञान्यांची समजूत घालण्याकरितां (३३) सृष्टीविषयी (३४) मूळ अज्ञान, आत्मविस्मृति (३५) पाहतां (३६) शुद्ध चैतन्याचे ज्ञान होईपर्यंत (३७) भ्रांतीनें केलेल्या आरोपामुळे (३८) सत्त्वादि गुणांनी युक्त*

एऱ्हवीं प्रकाशवंतू कहीं । तमा[१] आतुळला[२] कीर[३] नाहीं । परी बोलणें जें कांहीं । अज्ञान तें ॥९१॥
एवं जो शुद्ध, तो मायोपहित । आरोपेंचि[४] भासत । एकजीववादी[५] समस्त । जीव म्हणती जयाते ॥९२॥
अनेकजीववादी[६] परिकर[७] । जयातें म्हणती ईश्वर ।
तो अंतःकरणोपहित[८] निर्धार । होऊनि साचार[९] नानात्व पावे ॥९३॥
किंवा अनेकजीववादमतें । नानारूपाऽविद्योपहिते । नानात्व आलें जीवातें । मिथ्यादृष्टी[१०] ॥९४॥
एक असूनी हुताशन[११]। इंधनोपाधिना[१२] थोर लहान । तेवीं आश्रवोनी मायागुण[१३] । नारायण भासतो ॥९५॥(य३.२५)

*([१३]नानागुण - पाठांतर.)*

परी आघवी ही लीला । सूत्रें[१४] श्रीव्यास एवं बोलिला ।
'लोकवत्तु लीला कैवल्यम्[१५]' या वचनाला । प्रमाण म्हणती श्रुतिवेत्ते ॥९६॥
अंतःकरणेंद्रियादि समस्त । निके[१६] असती गुणविकृत[१७] । हा प्रभु लीलेनें होऊनि तदुपहित[१८] । विषय भोगी ॥९७॥
किंवा घेतां ईश्वर गुण[१९] । तरी हाचि करी पाळण । ऐसेंही एक प्रमाण । श्रीधरोक्त ॥९८॥
एवं शुद्ध ब्रह्म मायावशें[२०] । झांकोळलें[२१] ऐसें दिसे । तेंचि अविद्यया[२२] अंतःकरणवशें । जीव वा हिरण्यगर्भ ॥९९॥
तेंचि इंद्रियाद्युपहित[२३]। विराट अथवा भोक्तृस्थित[१] । भोक्तृस्थित[१] । एवं हा अध्यस्तविवर्त[२] । वाखाणिला[३] ॥१००॥

*(१) अंधःकाराला (२) स्पर्शला (३) निश्चयाने (खरोखर) (४) भ्रांतीनेच (५) अज्ञानाला आधार असणारे चैतन्य हाच एक जीव आहे असे म्हणणारे (६) अज्ञान पुष्कळ असून त्या अनेक अज्ञानांच्या उपाधीमुळे जीवहि अनेक आहेत असे मानणारे*

*(७) स्पष्टपणे (८) अंतःकरणाचे उपाधीने (९) सर्वथा (१०) खोटेच (११) अग्नि (१२) लाकडांचे उपाधीने (१३) नानागुण (पाठांतर) (१४) ब्रह्मसूत्रांत (१५) लोकांप्रमाणेच भगवंताची सृष्ट्यादि लीला प्रयोजनरहित आहे (१६) खरेच (१७) गुणाचे परिणाम (१८) त्यांना आधार होऊन (१९) ईश्वराचे गुण (२०) मायेच्या योगाने (२१) आच्छादित, सत्ताधर्म प्रधान राहून चैतन्य व आनंद हे धर्म गौण राहणे (२२) अविद्येने (२३) इंद्रियांच्या उपाधीमुळे*

**भोक्तृस्थित[१] । एवं हा अध्यस्तविवर्त[२] । वाखाणिला[३] ॥१००॥**
**आतां प्रेमळाची चौकडी[४] । जी सुंदर मूर्ति रोकडी[५] ।**
**विष्णुशिवत्वें एकेखडी[६] । उदया[७] आली ॥१॥**
**जें अनुग्रहार्थ[८] फळ[९] । सकलपालक केवळ ।**
**जयाचें अवतार सकळ । देवतिर्यङ्नरादिषु[१०] ॥२॥**
**हें अवतारा सामान्यकारण । परी येथूनि[११] कृष्णा जें विशेषपण ।**
**तें करिजेल निरूपण । कुंतीस्तुतौ ॥३॥**
**तरी पुन्हा एकवेळू । दृष्टांते हा सिद्धान्तगोळू[१२] । करावा निका मेळू[१३] । निजहृदयासी ॥४॥**
**येथ भूमिरूप[१४] शुद्धचेतन । बीजरूप[१५] मायोपहितपण ।**
**अंकुर अविद्या अंतःकरणावच्छिन्न[१६] । जीवू वा हिरण्यगर्भू ॥५॥**
**समष्टिविराड्[१७]वा व्यष्टि[१८] भोक्ता । तो तरुशाखादिरूप[१९] तत्वतां ।**
**विष्णुशिवत्वें जो अनुग्रहकर्ता । तो अनध्यस्तविवर्तता[२०] फलोपम[२१] ॥६॥**
**जयाची वाङ्मयी[२२] मूर्ति भागवत । तयाचें फलत्व[२३] पूर्व[२४] व्याख्यात[२५] ।**
**तैसें प्रत्यक्षमूर्तीसही येथ । फलत्व बोलिलें ॥७॥**
**चतुर श्रोतियांपुढें स्मरण[२६] । अर्थ तंव त्यांचेंचि अंतःकरण[२७] ।**
**म्हणोनी मी सायखडियाप्रमाण[२८]। निमित्त जाहलो ॥८॥**
**एऱ्हवीं सायखडियाचें सौंदर्य । तें प्रत्यक्षाचेंचि[२९] सौभाग्य[३०] होय ।**
**आणि नाचविता आळंदीराय । ज्ञानेश्वरप्रभु ॥९॥ य३-२६)**

*(१) भोक्ता (२) अज्ञानजन्य विपरीत भास (३) निरूपिला (४) प्रेमळ लोकांच्या जिच्यावर उड्या पडतात ती (५) केवल (६) अभिन्नपणे (७) प्रगटली (८) भक्तावर अनुग्रह करण्याकरिता (९) फलरूप, वृक्षाचे सर्वस्व जसे फळात साठवलेले सापडते त्याचप्रमाणे ब्रह्माचे परिपूर्णत्व या मूर्तीत साठलेले आहे (१०) देवपशुमनुष्य इत्यादि योनीत (११) याहून (१२) संपूर्ण सिद्धांत (१३) संयोग (१४) भूमीप्रमाणे (१५) बीजाप्रमाणे (१६) अविद्या व अंतःकरण यांनी मर्यादित झालेले (१७) सर्व ब्रह्मांडाचा अभिमानी (१८) प्रत्येक देहाचा अभिमानी (१९) झाड व त्याच्या खांद्याप्रमाणे (२०) भ्रमजन्य नाही असा भिन्न इव भास (२१) फलाप्रमाणे पूर्ण (२२) शब्दरूपी (२३) पूर्ण ब्रह्मत्व (२४) पूर्वी, मागे (२५) निरूपिले, सांगितले (२६) निरूपण (२७) जो अर्थ त्यांचे अंतःकरणात होता तोच मी प्रगट केला (२८) बाहुलीप्रमाणे (२९) डोळ्याने प्रत्यक्ष पाहून घेणाऱ्याचे (३०) सुदैव.*

**॥ दोहा ॥**

**श्रीज्ञानेश्वरचरणरजीं[१] वाहुनि अष्टहि[२] अंग ॥**
**प्रेमज्ञानें[३] भवूनि[४] लसू[५] चेतनसिंधुतरंग[६] ॥११०॥**

*(१) श्रीज्ञानेश्वर महाराजांच्या चरणांच्या धूळीवर (२) शरीराचे आठ भाग (३) प्रेमाने व ज्ञानाने (४) होऊनि (५) शोभूं (६) चैतन्यरूपी सागराचे ठिकाणी लहरीप्रमाणे*

**हरिःॐतत्सत् श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरकृपाप्रसादे प्रियलीलामहोत्सवे आमंत्रणविलासे**
**सूतदत्तोत्तरं नाम द्वितीयसखीप्रेषणम् ।**
**॥श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ॥**

**०००**

# सखीप्रेषण ३ रें. विषयानुक्रम

***अवतारचरित्रवर्णन. (पृष्ठ २७-६२.)***

*पूर्वकथानुसंधान. ऋषींच्या तृतीय प्रश्नाचें उत्तर २७. विराट्स्वरूपवर्णन. २७. अवतारशरीर अत्यंत भौतिक नसून त्याला विराट्धर्म उपासकार्थ सांगितले आहेत. २७. विराटाच्या शुद्धसत्त्वविग्रह स्वरूपाचें (आदिनारायणाचे) वर्णन २८. विराट पुरुषाच्या अव्यक्तस्वरूपाचें वर्णन. २८. आदिनारायणाचें अवतारबीजत्व निरूपण २८. सनत्कुमारादि अवतार कथन २९. नारदपंचरात्रांतील वेदबाह्य अंशाविषयीं शिष्याची शंका व पांचरात्राच्या प्रमाण्याप्रमाण्याविषयीं पूर्वाचार्यांच्या वादात्मक मतांचा साधारणसमन्वयपूर्वक श्रीगुरूंचें उत्तरः- पांचरात्रादि तंत्रांच्या मुख्य सिद्धांता-विषयीं चतुर्धराचार्यांचें मत २९ पांचरात्रप्रामाण्याविषयीं ब्रह्मविद्याभरणकार (स्वामी अद्वैतानंद) यांनीं केलेल्या दोन उत्थाप्य शंका ३०. प्रथम आक्षेपावर स्वामींनी दिलेल्या उत्तराची असंबद्धताकथनपूर्वक स्वमतानुसार पूर्वपक्षाचें सयुक्तिक खंडन ३०.'ईश्वराच्या निश्वासापासून वेद झालें' या म्हणण्याचा वास्तविक अर्थ ३१. 'ममैवांशो जीवलोके' हा गीतेंतील श्लोक श्रुतिविरुद्धासारखा आहे, या विद्यारण्यमताचें खंडन ३२. पूर्वपक्षकाराच्या दुसऱ्या आक्षेपाचें अद्वैतानंद-स्वामींनीं केलेलें समाधान व पाशुपततंत्राविषयीं स्वमतकथन ३२.पद्मपुराणांत अद्वैतवादाला पाखंडमतांत गणलें आहे या शिष्यशंकेंतील दोषाचा परिहार ३३. पांचरात्राच्या अप्रामाण्याविषयीं वादनिरूपणः- ब्रह्मसूत्रा- वरील शांकरभाष्याभिप्रायानुसार पांचरात्रांतील श्रुत्यनुसार अंशनिरूपण ३३. शांकरभाष्यांतील 'भागवत' शब्दाच्या अर्थाविषयीं दोन भिन्न मतें व त्यांतील आनंदगिरीच्या अर्थाची सप्रमाण ग्राह्यता ३३. भगवत्पादभाष्याभिप्रायानुसार पांचरात्रांतील श्रुति-विरुद्धांश व वल्लभमतासह त्याचें खंडन ३४. उपरिनिर्दिष्ट भगवत्पूज्यपादाचार्यमताचा बहुशः बाध करणारा रामानुजभाष्याचा आशय ३५/३७.रामानुजांनां अडविणारा ग्रंथकाराचा प्रश्न व श्रीभाष्यकारांचें समर्थन ३६. उपर्युक्त (य३-३) दोन्ही भाष्यांचें आलोचनपूर्वक स्वमतकथन, व शिष्यप्रश्नाचें उत्तर ३७. भगवंताचें नरनारायणादि अवतारवर्णन.३८/४२ आपापल्या उपासनेविषयीं निरनिराळ्या प्रकारानें वाद करणाऱ्या वादियांच्या मतांचें एकदेशीयत्व व विष्णुशिवात्मक शुद्धसत्त्वोपहित एकच ईश्वर उपास्य आहे या सिद्धांताचें श्रुति, युक्ती व अनुभवपूर्वक निरूपणः- एकाच परमात्म्याचें सृष्टिकार्यार्थ त्रिगुणोपहितत्व व स्वभक्तानुग्रहार्थ शुद्धसत्त्वगुणेंकरून त्रिमूर्त्युपहितत्व निरूपण ४२. किंचित् जीवधर्मप्रतीतिस्तव हिरण्यगर्भाचा ज्ञानकांडाचे ठायी ईश्वरत्वेकरून अंगीकार नाही या मताचे महाभारतप्रामाण्याने समर्थन ४२. शैववैष्णवामधील वादांचें एकदेशीयत्व, पंचेश्वरकल्पनेची उत्पत्ती व तिचें युक्तीनें, तुकाराममहाराजांच्या वचनानें व वेदांतमतसमन्वयानें खंडन ४३. श्रीमच्छंकराचार्यांनीं उपासनार्थ सांगितलेल्या पंचायतनपूजेचें एकेश्वरमूलकत्व व त्याविषयीं गणेशपुराणाचें प्रामाण्य ४४. आपापल्या उपास्य मूर्तीविषयीं शैववैष्णवांचें वादात्मक म्हणणें व त्याच्या प्रमाणभूत श्रुतिस्मृतींचें एकदेशीयत्व ४५. उपर्युक्त विवेचनाचें सारभूत तात्पर्य, ज्ञानाचा विचार, व उपासनेविषयीं निष्ठा ठेवल्यानें फलप्राप्ति, व येथें संक्षेपतः उपासनेची मीमांसा करण्याचें कारण. ४५. ह्या विष्णुशिवात्मक शुद्धसत्त्व कारणब्रह्मापासून सर्व अंशकलावतार होतात ह्याविषयीं गर्गसंहितेंतील प्रक्रिया (संक्षेपतः) कथन ४६. अंशकलावताराविषयीं प्रस्तुत ग्रंथांतील प्रक्रियाकथन ४७. श्रीकृष्णमूर्तींत सर्वावतारांच्या शक्ती समान दिसतात याविषयीं 'विवक्षितगुणोपपत्तेश्च' या ब्रह्मसूत्राचा अभिप्रायनिरूपण :- <u>ईश्वरी विभूती व देवता यांच्या ठिकाणीं आवडीच्या गुणांचा आरोप चालत नाहीं.</u> ४८. श्रीकृष्णलीलांचें सर्वमयत्वनिरूपण ४९/५१. श्रीकृष्णावताराच्या पूर्णत्वाची सिद्धि, त्याविषयीं तातवचनप्रामाण्य व 'अव्यक्त' शब्दाचें स्पष्टीकरण ५१. ग्रंथप्रादुर्भावकथन५१. सनातनाचार्यांचा अभिप्राय, श्रीमद्भगवद्गीता, नारदभक्तिसूत्रादि प्रामाण्यावरून श्रीकृष्णावताराचें मुख्यप्रयोजन निरूपण ५२. श्रीकृष्णस्वरूपाची विष्णुशिवात्मकता ५४. अवतारचरित-पठन-चिंतनाची फलश्रुती ५४. नारायणचरितानें शिवदर्शनाची फलश्रुती ५५. जीवाची (य३-४) स्वाभाविक बद्धस्थिती असल्यामुळें जीवब्रह्माचें ऐक्य संभवत नाहीं या मताचें युक्तिपूर्वक खंडन ५५. जीवाला बंधन कसें होतें याविषयीं जीवाच्या देहद्वयरूप उपाधीचें अध्यारोपापवादें[1] करून निरूपण (टीपः- अध्यारोपापवादाचें सविस्तर निरूपण पृष्ठ १४८ ओ० २४ पासून पहावें.), अविद्या भगवदाश्रित कशी? या शिष्यशंकेचें लिंगपुराणवचनसमन्वयपूर्वक समाधान ५५. जीवाच्या भेददृष्टीमुळें अविद्या ही त्याला परमेश्वराचे ठायीं प्रतीत होते याविषयीं सोदाहरण स्पष्टीकरण ५६. लिंगशरीराचें स्वरूप, त्याला अव्यक्त म्हणण्याचें कारण व लिंगशरीररूप उपाधीचें अर्थापत्तिप्रमाणानें अनुमेयत्व ५७. लिंगशरीराच्यापूर्वी जीवाची सिद्धि नसल्यामुळें तें परमेश्वरानें आरोपित केलें काय? या प्रश्नाचें अनादि-षट्पदार्थकथनपूर्वक उत्तर ५७. लिंगशरीर 'आरोपित' म्हणण्याचे कारण व ब्रह्माहून त्याची गौण सत्यता ५८. ज्ञानानें ब्रह्माचा बाध होतो किंवा नाहीं या प्रश्नाचें युक्ति, अनुभव व शास्त्रप्रतीतिपूर्वक उत्तर ५८. ब्रह्माचें ठायी*

*वृत्तिव्याप्तिस्वीकार आहे आणि वृत्ति अविद्याजन्य आहे मग ब्रह्मसाक्षात्कार कसा होतो? या शंकेचें समाधान व मुक्तिद्वयलक्षणकथनपूर्वक ब्रह्माची त्रिकालाबाध्यता ५९. जीवेश्वरांच्या जन्मकर्मांतील भेद व परमेश्वराच्या जन्मकर्मांची वर्णनयोग्यता ५९. जन्मकर्मादि लीलांच्या योगानें परमेश्वर संगी होतो किंवा नाहीं या प्रश्नाचें उत्तर व प्रभूला अमोघलील म्हणण्याचें कारण ६०. सृष्ट्यादिक जीवकल्पित आहेत तर अनध्यस्तविवर्त तरी कसा होतो या प्रश्नाचें उत्तर ६०. प्रभूच्या सृष्ट्यादि लीला तर्कानें कोणीच जाणूं शकत नाहीं तर भक्तांनां तरी त्या कशा समजतात या शंकेचें समाधान ६१.*

*उपसंहार :- रमारमणचरणमधुपान करणाऱ्या भगवद्भक्तांची धन्यता व आपल्याला भागवताचें श्रवण कोठें व कसें घडलें याविषयीं भागवतस्तवनपूर्वक सूताचें आत्मवृत्त ६१.(य३- ५)*

# सखीप्रेक्षण ३ रे

## अवतार चरित्र वर्णन

**॥ श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरमाउली समर्थ ॥**

**॥ ओव्या ॥**

**आतां तृतीय प्रकरणीं(७) । अवतार सांग या प्रश्नीं । उत्तर द्यावया वाणी । उदित(८) सूताची ॥१॥**

**पूर्व प्रकरणीं अनुसंधान(९) । शौनकादिकीं पुसिला प्रश्न । कीं श्रीहरीचे अवतारगुण ।सांगे सूता बुद्धिमंता ॥२॥**

**तेंचि उत्तर द्यावया सूत । पुरुषादि अवतार यथास्थित(१०)। आवडीकरोनी निरोपित(११)। सावध श्रवणार्थ व्हावें श्रोतीं ॥३॥**

*(१) श्रीज्ञानेश्वर महाराजांच्या चरणांच्या धूळीवर (२) शरीराचे आठ भाग (३) प्रेमाने व ज्ञानाने (४) होऊनि (५) शोभूं (६) चैतन्यरूपी सागराचे ठिकाणी लहरीप्रमाणे (७) अध्यायात (८) सज्ज (९) संदर्भ (१०) योग्य रीतीने (११) सांगतात.*

**बुद्धि अहंकार आणि शब्द । स्पर्श रूप रस आणि गंध ।**
**एवं सात प्रकृतिविकृति(१) प्रसिद्ध । आणि षोडश कलाही(२) ॥४॥**

**आणि अकरा इंद्रियें पांच भूतें । हे सोळा विकार अंश जेथें । ऐसिया विश्वरूप देहातें । परमात्मा आधारकू ॥५॥**

**यद्यपि भगवद्विग्रह(३) फलोपम(४) । तो नोहे भौतिक(५) शरीर परम । तथापि हा विराड्धर्म(६)। उपासकार्थ(७) बोलिला ॥६॥**

**विराडुपासना(८) जया । हा विराट् परमात्मा तया । समष्टि भौतिक शरीरा यया । घेवोनि राहतो ॥७॥**

**जो विराट् जीवांचिया अंतर्यामीं(९) । जो विराडुपासकांही ने अंतर्यामीं(१०) ।**
**तो शुद्धसत्त्वविग्रहें(११) अनूर्मी(१२) । एकार्णवीं(१३) राहतों ॥८॥ (य३-२७)**

**॥ अभंग ॥**

**तोचि नारायण जीवसिंधूंत(१४) । पापपुण्य धूत(१५) स्वभक्तांचें ॥१॥**
**सुषुप्तिरहित(१६) विषयअभावीं(१७) । जेथ सृष्टि व्हावी संकल्पाची(१८) ॥२॥**
**ऐसी योगनिद्रा करितां आवडी । निजसुखगोडी(१९) विसरेना ॥३॥**

*(१) प्रकृति म्हणजे कारण व विकृति म्हणजे कार्य. बुद्धि, अहंकार व शब्दादि पंचतन्मात्रा हे ७ पदार्थ मूळप्रकृतीचे विकृति म्हणजे कार्य आहेत व या सात पदार्थापासून जे पुढे सोळा कार्यरूप पदार्थ उत्पन्न होतात त्यांचे हे प्रकृति म्हणजे कारण आहेत म्हणून ह्या सात पदार्थांना प्रकृति विकृति म्हणतात (२) अंश (३) भगवंताचे शरीर (४) पूर्ण सृदिानंदरूप (५) पंचभूतापासून बनलेले (६) पंचभूतांचे बनलेले जे समष्टि स्थूल शरीर त्याची भावना (७) उपासकाला उपासना करण्यासाठी (८) स्थूल ब्रह्मांडाला परमेश्वराचे शरीर कल्पून उपासना करणारे (९) सर्वांच्या आंत राहणारा (१०) अंतर्यामी स्वरूपाशी ऐक्य करवितो (११) शुद्ध सात्विक देह घेऊन (१२) प्रशांत, ऊर्मीरहित (१३) प्रलयकाळच्या जलात. (१४) पाण्याच्या सागरात (१५) धुवून टाकतो (१६) ज्याच्या योगनिद्रेत सुषुप्तीचे अज्ञान नाही (१७) विषयहि नाहीत (१८) नुस्ती संकल्परूप (१९) आत्मसुखाची आवड.*

**नाभीपासूनियां(१) उपजला विधी(२) । जो कां वेदबुद्धि(३) अधिष्ठाता(४) ॥४॥**
**ज्ञानेश्वरकन्या नारायणनामीं(५) । जाहली निष्कामी विश्वासानें ॥५॥९॥**

अभंग

हातीं पायीं ज्याच्या ब्रह्मांडरचना[६] । निगमवचना[७] सत्यपण ॥१॥
सृष्ट्यर्थे[८] विराटू[९] उपासका सत्त्व[१०] । सर्वत्र हें तत्त्व वेदांताचें ॥२॥
पहाती तें रूप ज्ञानडोळां[११] योगी । नाहीं जयांलागीं विषयाशा[१२] ॥३॥
अनंत अपार अनंतलोचन । संसृतिमोचन[१३] बहुबाहू ॥४॥
सर्वत्रचि पूर्ण अनंत चरण । अनंत करण[१४] नाना मुखें ॥५॥
अनंत नासिकें अनंत भासक । अनंतवासक[१५] अनंतू हा ॥६॥
सहस्त्रशीर्षादि बोले ज्याला वेद । ब्रह्मांडाचा[१६] भेद रोमावळी ॥७॥
विश्वरूपलीला[१७] उपासकां सिद्ध । सर्वदा अबुद्ध[१८] नेणती जे ॥८॥
सकुंडल कान सतेज तीं मुखें । दिसती अनेकें जया रूपीं ॥९॥
ज्ञानेश्वरकन्या गुरुकरुणेनें । जाणुनी उगाणें[१९] चित्त केलें ॥१० ॥१०॥

॥ओव्या ॥

तरी विराटादिकां[२०] कारण[२१] । तो हा आदिनारायण । आविर्भाव तिरोभावादि[२२]निर्वाण[१] । नसती यया ॥११॥

*(१) बेंबीपासून (२) ब्रह्मदेव (३) ज्या बुद्धीत वेद स्फुरावयाचे त्या बुद्धीचा (४) आधार (५) नारायणाचे ठिकाणी (६) ब्रह्मांडोत्पत्ति (७) वेदाच्या वचनास (८) सृष्टीच्या दृष्टीने (९) स्थूलाभिमानी (१०) शुद्धसत्वाची उपाधि धारण करणारा (११) ज्ञानदृष्टीने (१२) विषयाची आशा (१३) संसाराचे बंधनापासून मुक्त करणारा (१४) इंद्रिये (१५) अनंत वस्तूत वास करणारा (१६) ज्याच्या प्रत्येक रोमात निरनिराळे ब्रह्मांड आहे असा (१७) स्थूल ब्रह्मांडाच्या रूपाने भासणे (१८) ज्यांना आत्मज्ञान नाही असे अज्ञानी (१९) ओवाळणी, निंबलोण (२०) स्थूल ब्रह्मांडाचा अभिमान धारण करणाऱ्या चैतन्याला (२१) मूळ (२२) उत्पत्ति नाश*

आविर्भाव तिरोभावादि निर्वाण[१] । नसती यया ॥११॥

हें नित्य विग्रहस्वरूप[२] । अनध्यस्तविवर्तरूप[३] । हें कूटस्थ[४] भुवनदीप[५] । अवतारबीज[६] ॥१२॥
येथूनि अवतार होती जाती । येथूनि धर्माची रक्षणीय स्थिती । फलोपम[७] भक्तानुग्रहमूर्ती[८] । शुद्धाची[९] ही ॥१३॥
हें बीज असोनि अव्यय[१०] । परिणामी[११] कदा न होय । विवर्तत्वें[१२] बीजत्व स्वयें । रूपा यया ॥१४॥
हें केवळ अवताराचेंचि बीज । ऐसें नाहीं हें प्राणियांचेंहि[१३] निज[१४] । जयापासोनि सहज । ब्रह्मा जाहला ॥१५॥
आणि ब्रह्मयापासोनि मरीच्यादिक । ते जगा उपजविती[१५] सकळिक । म्हणवोनि निष्कलंक[१६] । बीज तें हें ॥१६॥
एवं रूप सांगोनि सुंदर । आतां तयाचे जे जे अवतार । ते सांगावया परिकर[१७] । उत्साह सूता ॥१७॥ (य३-२८)

॥ अभंग ॥

ब्राह्मण तपस्वी प्रथम अवतार । श्रीसनत्कुमार ब्रह्मचारी ॥१॥
रसातळामाजीं[१८] भूमी गेली जेव्हां । वराह तो तेव्हां द्वितीय कीं ॥२॥
तृतीय अवतार नारद पवित्र । शुद्ध पंचरात्र[१९] केले जेणें ॥३॥
निगमानुकूल[२०] हें तंत्र[२१] जेवढें । शंसिलें[२२] तेवढें भारतादौ[२३] ॥४॥
निगमीं[२४] संक्षेप[२५] या तंत्रीं[२६] विस्तार । भक्तिचा प्रकार तोचि घ्यावा ॥५॥

*(१) केव्हांहि (२) साकार (३) भ्रमाने कल्पिलेले नाही असे, ज्ञानाने नाश न पावणारे सगुण (४) अविकृत (५) ब्रह्मांडाला प्रकाशित करणारे (६) सर्व अवतारांचे मूळ (७) फलाप्रमाणे पूर्ण (८) भक्तावर अनुग्रह करणारी मूर्ति (९) शुद्ध परब्रह्माची (१०) नाशरहित (११) विकारी, बदलणारे (१२) शुद्ध परब्रह्माचेच ठिकाणी भासत असल्यामुळे (१३) सर्व प्राणिमात्राचे (१४) मूळ स्वरूप (१५) उत्पन्न करितात (१६) अविद्यादोषरहित (१७) साद्यंत (१८) प्रळयात बुडू लागली तेव्हा (१९) वैष्णवाचा आगम (२०) वेदाशी जेवढे जुळते आहे. (२१) आगम (२२) मान्य केले, प्रशंसा केली (२३) महाभारतादिकांत (२४) वेदात (२५) संक्षिप्त, सूत्रप्राय (२६) आगमात.*

वेदबाह्य[१] अंश नाहींच प्रमाण[२] । न लगे सांगणे त्या विषयीं ॥६॥
आणि भक्तिसूत्रें निर्मिलीं सुंदर । विरोध साचार जेथ नाहीं ॥७॥

**ज्ञानासह भक्ति दाखविली साची । ज्ञानेशकन्येची जननी जे ॥८॥१८॥**

**॥ गद्य ॥**

शिष्य :- माझी शंका योग्य आहे किंवा नाहीं हा संशय असल्यामुळें मला विचारण्याचें धैर्य होत नाहीं, परंतु तिनें चित्ताला अगदीं व्यापून टाकलें असल्यामुळें निरास न करितां पुढील सिद्धांत देखील माझ्या ध्यानांत येणार नाहीं असें मला वाटतें. म्हणून मी शतशः प्रणाम करून विचारण्याचें धैर्य करितों. पंचरात्रागमाविषयीं आपण जी वरील अभंगांत व्यवस्था[३] सांगितली, तिची आवश्यकता आहेसें मला वाटत नाहीं, कारण पंचरात्रनिर्माते भगवान महतीपाणि[४] भगवदवतार[५] असल्यामुळें आणि स्वतः नारायणानेंच हें पंचरात्र निर्माण केलें आहे असें भारतांत सांगितलें असल्यामुळें यांत वेदविरुद्धांश[६] असण्याचा संभव नाहीं.

श्रीगुरु : - वेड्या ! तुला ही शंका विचारण्याविषयीं भय वाटण्याचें काहींच कारण नव्हतें. तूं म्हणतोस तसें सर्वशः[७] नसलें तरी पुष्कळ अंशीं माझें मत आहे, तथापि याविषयीं पूर्वाचार्यांनीं[८] जें म्हणून ठेविलें आहे, तें गुंतागुंतीचे

*(१) वेदविरुद्ध (२) ग्राह्य, मान्य (३) वेदानुकूल जेवढा भाग आहे तो प्रमाण असून वेदविरुद्ध भाग ग्राह्य नाही ही व्यवस्था (४) महती नांवाची विणा ज्याच्या हातात आहे (५) परमेश्वराचा अवतार (६) वेदाच्या विरोधी भाग (७) पूर्णपणे (८) पूर्वीच्या आचार्यांनी.*

व वादात्मक[१] असल्यामुळे माझ्या मत्यनुसार साधारण तुला त्याचा समन्वय सांगतों. हा समन्वय[२] सर्वच बरोबर म्हणतील असें मला जरी वाटत नाहीं, तथापि मी ज्या युक्तीनें समन्वय करील त्याहून प्रबल युक्तीनें खंडन केल्यावांचून उगींच मी आपलें मत मागें कशाला घेऊं ? चतुर्धराचार्यांनीं मोक्षधर्माच्या टीकेंत एकें ठिकाणीं असें म्हटलें आहे कीं, जरी पंचरात्रादि तंत्रांच्या प्रामाण्याविषयीं पुरुषप्रणितत्वादि[३] विवाद[४] आहेत, तरी विवादास्पद[५] स्थळें अवांतर[६] सिद्धांताविषयींचीं आहेत. (य३-२९) मुख्य सिद्धांतांत सर्वांचें तात्पर्य[७] एकच आहे. आणि हें चतुर्धरांचें म्हणणें मला सम्यक् वाटतें. आतां पांचरात्रप्रामाण्याविषयीं ब्रह्मविद्याभरणकार[८] अशी उत्थाप्य[९] शंका करितात कीं, वेद व पंचरात्र यद्यपि दोन्ही नारायणानेंच केलीं आहेत, तथापि वेद अबुद्धिपूर्वक[१०] अशा निश्वासापासून[११] उत्पन्न झाले असून पंचरात्र देवानें बुद्धिपूर्वक[१२] रचिलें आहे, म्हणून वेदापेक्षां त्याला अधिक प्रामाण्य आहे. आतां पाशुपततंत्रहि[१३] शिवरूपी ईश्वरानें केलें असल्यामुळें अधिक प्रमाण आहे, असें मात्र म्हणूं नका. कारण शिव ईश्वरच[१४] नाही; तो जीव[१५] आहे; असाही या पूर्वपक्ष करणाऱ्यांनां भ्रम आहे, अशी एक शिवी देऊन 'ब्रह्मविद्याभरणकार' या शंकेचें समाधान सांगतात. प्रथम ते पूर्वपक्षकाराला म्हणतात - वेदाच्यापेक्षा पंचरात्र अधिक प्रमाण असो, परंतु पंचरात्राचा कर्ता जो वासुदेव तो सर्वज्ञ आहे हें प्रथम सिद्ध झालें पाहिजें. त्याचें सर्वज्ञत्व सिद्ध करण्याकरतां अल्प[१६] असें प्रत्यक्ष[१७] व अनुमान[१८] समर्थ नसल्यामुळें -

*(१) मतभेद करणारे (२) अविरोध, एकवाक्यता (३) जीवाने रचलेले ग्रंथ (४) आक्षेप (५) आक्षिप्त (६) गौण. (७) पर्यवसान (८) ब्रह्मविद्याभरण नांवाची ब्रह्मसूत्रावरील भाष्यावर एक टीका आहे (९) आपण उत्पन्न केलेली (१०) लक्ष न देऊन, न जाणून (११) श्वासापासून (१२) लक्ष ठेऊन, जाणून (१३) शैवाचा आगम ग्रंथ (१४) सर्वज्ञ, सर्वशक्ति, शुद्ध, मुक्त (१५) बद्ध, अल्पशक्ति, अल्पज्ञानी (१६) मर्यादित, केवल इंद्रियांचा संयोग ज्याच्याशी होईल तेवढेच पदार्थ जाणण्याच्या उपयोगी पडणारे (१७) प्रत्यक्ष प्रमाण (१८) अनुमान प्रमाण.*

अर्थातच शब्दप्रमाणांची[१] आवश्यकता आहे. तें शब्दप्रमाण[२] काय पांचरात्र घ्यावयाचें? कीं वेद घ्यावयाचा? कारण पहिल्या पक्षीं अन्योन्याश्रय[३] दोष येतो. वासुदेवाच्या सर्वज्ञत्वास्तव[४] पांचरात्राला प्रमाणता, आणि पांचरात्राच्या प्रामाण्यास्तव वासुदेवाची सर्वज्ञता, हेंच त्या दोषाचें स्वरूप. * दुसऱ्यापक्षीं[५] वेदप्रमाणावरून[६] वासुदेव सर्वज्ञ सिद्ध झाला तर श्रुत्युपजीव्यत्व[७] पंचरात्राला प्राप्त झालें, म्हणून वेद बलवान आहे. याप्रमाणें शंकाकाराच्या प्रथमाक्षेपाचें[८] समाधान अद्वैतानंदस्वामींनीं[९] केलें आहे. तें माझ्यामतें 'तुला ना मला[१०] आणि घाल कुत्र्याला' म्हणीप्रमाणें आहे. कारण जो दोष स्वामींनीं पूर्वपक्षकारावर घातला आहे तोच दोष पायावर धोंडा पाडून घेतल्याप्रमाणें त्यांच्यावरही येतो. स्वामी आमच्या[११] मताचे आहेत. शांकरभाष्याचे टीकाकार आहेत. त्यांनां असंबद्ध[१२] म्हणणें म्हणजे गृहछिद्र[१३] बाहेर काढण्यासारखें आहे खरें; परंतु काकस्वभाव[१४] छिद्रान्वेषी[१५] असल्यामुळें, घरचें[१६] व बाहेरचें तो पाहत नाहीं. तशीच माझी स्थिति आहे. परंतु काकजन्मांतही[१७] भृशुंडमुनि[१८] श्रीज्ञानेश्वरनामानें मी होईन व आहेच असें मी आपल्याला समजतो. (य३-३०)

*(१) प्रमाण अशा आप्ताच्या वचनाची (२) प्रमाणभूत वचन (३) परस्परांचे प्रामाण्य परस्परावर अवलंबून असणे (४)*

*सर्वज्ञ आहे म्हणून (५) वेदाचे वचन प्रमाण मानावयाचे तर (६) प्रमाणभूत अशा वेदातील वचनावरून (७) वेदानुसारीत्व म्हणजे वेदानुकूल असलेले ग्राह्य व वेदानुकूल नसलेले अप्रमाण मानावयाचे (८) पहिल्या आक्षेपाचे (९) ब्रह्मविद्याभरणाचे कर्ते (१०) व्यर्थ (११) अद्वैतवादी (१२) भलतेच बोलणारे (१३) आपल्या माणसांचा दोष काढणें ह्मणजे आपण आपलाच दोष काढण्यासारखे होते (१४) कावळ्याचा स्वभाव (१५) छिद्र, दोष पाहणारा (१६) आपले व दुसऱ्याचे (१७) अशा या छिद्र पाहणाऱ्या कावळ्याच्या जन्मातहि (१८) भृशुंडमुनी शापाने कावळ्याच्या जन्मात गेले हा*

स्वामींनीं[१] जसें पूर्वपक्षकाराला विचारिलें आहे तसेंच स्वामी जरी या वेळीं नाहींत, तथापि त्यांची मूर्ति समोर घेऊन कदाचित् उत्तर देतील तर त्या मूर्तीलाच विचारून पाहतों. आपण जसें पंचरात्राचें प्रामाण्य खंडन केलें त्याच आपल्या युक्तीनें वेदप्रामाण्यही दूषीत होतें, कारण वेद प्रमाण आहेत काय म्हणून ? सर्वज्ञ ईश्वररचित[२] आहेत म्हणून. ईश्वर सर्वज्ञ कशावरून सिद्ध करावयाचें ? अर्थात् वेदाशिवाय दुसरा मार्ग नाहीं. आणि तो मार्ग स्वीकारला म्हणजे आलाच आपल्या पायावर धोंडा. ईश्वर सर्वज्ञ आहे म्हणून वेद प्रमाण व वेद प्रमाण आहेत म्हणून ईश्वराची सर्वज्ञता. तात्पर्य, हें समाधान[३] वर वर आहे. स्वामीच्या मूर्तीकडून उत्तर न मिळाल्यामुळें, माझ्यामतें या शंकेचें समाधान तुला सांगतों. त्याला स्वामीही मुलाचें वचन म्हणून आईप्रमाणें अनुमोदन देवोत. तें समाधान असें.

पूर्वपक्षकार प्रथम म्हणाला कीं, वेद हे परमेश्वरानें श्वासापासून अबुद्धिपूर्वक[५] निर्माण केले आणि पंचरात्र बुद्धिपूर्वक[६] निर्माण केलें या बोलण्यांतच पूर्वपक्षकार ठार झाला. कारण श्रुति, स्मृति, इतिहास, पुराण आणि इष्ट्युक्त्यनुभव[७] यावरून परमेश्वर सर्वदा सर्वज्ञ आहे असें सिद्ध होतें. त्याला एका कालीं अबुद्धिपूर्वकत्व व दुसऱ्या कालीं बुद्धिपूर्वकत्व मानलें तर जीवत्वप्राप्ति[८] होईल. निश्वास शब्दाचा अर्थ असा आहे कीं, निश्वासाला जसे श्रम लागत नाहींत तसे युक्तयोगी[९] अशा परमेश्वरानें अप्रयत्न[१०] वेद निर्माण केले.

*(१) ब्रह्मविद्याभरणकार अद्वैतानंद स्वामीनी (२) सर्वज्ञ अशा ईश्वराने रचलेले (३) स्वामींनी आपल्या पूर्वपक्षीला दिलेले उत्तर (५) न जाणता (६) जाणून (७) अनुकूल युक्ति आणि अनुभव (८) जीवाप्रमाणे केव्हा न जाणून करणारा अज्ञानी, बद्ध (९) नित्य समाधिस्थ (१०) प्रयत्नावांचून.*

**॥ ओवी ॥**

**''तरी जयाच्या निश्वासीं । जन्म झाला वेदराशी ॥ तो सत्यप्रतिज्ञ पैजेसी । बोलिला स्वमुखें ॥१॥ ज्ञा.१८.१४२८**

**॥ गद्य ॥**

असें तातांनीं[१] गीतेला वेदापेक्षां मोठपण देऊन म्हटलें आहे. आणि तातवाक्यप्रामाण्यावरूनच[२] मी तिला जाग्रच्छ्रुति[३] असें म्हटलें आहे. हें आमचें दोघांही बापलेकांचें म्हणणें पूर्वपक्षकाराच्या म्हणण्यासारखें तूं समजूं नको. कारण पूर्वपक्षकारानें परमेश्वराला वेद करितानां[४] जसें (य३-३१) अबुद्धिपूर्वक[५] केलें असें म्हटलें, तसें आम्ही दोघेही म्हणत नाहीं. पैकीं तातांच्या[६] म्हणण्याचा हा अर्थ आहे की, जो प्रभु अप्रयत्नपूर्वक[७] वेद निर्माण करितांना देखील सत्य सांगण्यांत चुकला नाहीं तो प्रभु प्रयत्न करून गीता सांगतानां सत्य प्रतिपादन करण्यांत कसा चुकेल? पुनः गीतेमध्यें वेदविरुद्धही कांहीं नाहीं. यद्यपि 'ममैवांशो जीवलोके' हा श्लोक श्रुतिविरुद्धासारखा[८] आहे असें विवरणप्रमेयसंग्रहांत[९] विद्यारण्यस्वामींनीं सांगितलें आहे,

*(१) ज्ञानेश्वर महाराजांनी (२) श्रीज्ञानेश्वर महाराजांच्या वचनाच्या बळावर (३) जागृतीतल्या बुद्धिपूर्वक उच्चारलेल्या वाक्याप्रमाणे स्पष्ट बोध करणारी भगवंताची वाणी (४) निर्माण करतांना (५) न जाणता, लक्ष नसता (६) श्रीज्ञानेश्वर महाराजांच्या (७) प्रयत्नावाचून, सहज (८) श्रुतीत सांगितलेल्या सिद्धांताच्या विरोधी (९) नांवाचा ग्रंथ, पंचपादिका नांवाची शांकर भाष्यावर जी टीका आहे, तीवर विवरण नांवाची टीका असून विवरणावर विवरणप्रमेय म्हणून टीका आहे व तीवर विद्यारण्यांनी विवरणप्रमेयसंग्रह म्हणून टीका केली.*

तथापि **'अंशो नानाव्यपदेशात्'**[१] असें भगवान बादरायणाचार्यांचें[२] सूत्र असून त्यावर भगवत्पूज्यपादाचार्यांचें[३] जें भाष्य आहे त्यांत जीवांशत्ववादाचें[४] खंडन नसून मंडन केलें आहे, आणि या श्लोकावरच जें आचार्यांचें भाष्य आहे त्यांतही अंशवादाचें खंडन केलें नाही. स्वामीं विद्यारण्यांचें म्हणणें भाष्यकारापेक्षां[५] अधिक प्रमाण नाहीं. दृष्टिसृष्टिवादानुसारें[६] स्वामींनीं म्हटलें असावें असें म्हणावें तर अंशवादांत अंशाविषयीं[७] प्रतीतिवाद स्वीकारला म्हणजे वरील श्लोकाचा समन्वय[८] होत असल्यामुळे गीता अंशतः देखील श्रुतिविरुद्ध आहे असें म्हणण्याला स्वामी विद्यारण्य अनधिकारी आहेत.

याप्रमाणें तातवाक्याची व्यवस्था झाली. आतां माझ्या म्हणण्याचा अर्थ असा आहे कीं, श्वास जसा अव्यक्त[९] ध्वनि[१०] असतो, तसा वेद हा अव्यक्तार्थबोधक[११] असून भगवद्गीता ही स्पष्टार्थबोधक आहे. म्हणून मी तिला जाग्रच्छ्रुति म्हणतो. तात्पर्य, पूर्वपक्षकाराचें जसे मी समाधान केलें तें समाधान माझ्या पायावर धोंड्या प्रमाणें येऊन पडत नाहीं. आतां पूर्वपक्षकाराच्या दुसऱ्या आक्षेपाचें समाधान स्वामी अद्वैतानंद असें करितात कीं, नारायण ईश्वर आहे तर मग शिव कां ईश्वर असूं नये? म्हणून पंचरात्र प्रमाण आहे तसें पाशुपतही प्रमाण आहे. हें समाधान म्हणजे निव्वळ चुकीचेंच आहे असें म्हणतां येणार नाहीं; तथापि यापासून कांहीं विशेष लाभ आहे हेंही सांगणें कठीण आहे. माझ्या मतें पांचरात्रांतील जितकी नारायणभक्ति प्रमाण आहे तितकीच पाशुपतांतील शिवभक्तिही प्रमाण आहे.

*१ ब्रह्मसूत्र अ.२ पाद३सू.४३ (२) व्यासांचे (३) शंकराचार्यांचे (४) जीव हा ब्रह्माचा अंश आहे या वादाचे (५) आचार्यापेक्षा (६) ज्या वादात ब्रह्मावाचून बाकीच्या जगताचे भासमात्र अस्तित्व मानिले आहे त्या वादाप्रमाणे (७) वस्तुतः जीव ब्रह्माचा अंश आहे असे न मानता अंशासारखा भासतो असे (८) अविरोध, एकवाक्यता (९) अस्पष्ट (१०) नाद (११) अस्पष्टार्थबोधक*

परंतु इतर अंशाविषयीं[१] विचार करितांनां असें दिसतें की शिवांनीं पाशुपत[२] निर्माण करूनही स्वतः आपणच त्या (य३-३२) पाशुपत शास्त्राची पाखंडमतामध्यें[३] गणना[४] केली आहे. हें पद्मपुराणांतील **'प्रथमं हि मयैवोक्तं शैवं पाशुपतादिकम्'** इत्यादि वाक्यावरून सिद्ध आहे, तशी पांचरात्राची पाखंडमतामध्यें स्वतः नारायणानें गणना केली आहे असें मला कोणत्याही पुराणांत आढळलें नाहीं. कोणत्या पुराणांत असलें तरी पांचरात्रांत श्रुत्यनुकूल अंश अधिक आहे म्हणून तें पाशुपतापेक्षां अधिक प्रमाण आहे, हें शांकरभाष्यावरून सिद्ध होते.

शिष्य :- महाराज, तेथें अद्वैतवादालाही पाखंडमतांत गणलें आहे.

श्रीगुरु :- खरें, पण कूर्मपुराणांत अद्वैतवादाची महति सांगितली असून तत्प्रतिपादक[५] आचार्यांना वरिष्ठत्व दिलें आहे, आणि भागवत, भारत, योगवासिष्ठ, यांमध्यें अद्वैतवादाचा जय दिसत असून युक्ती व अनुभवानें तों सिद्ध होत असल्यामुळें, पद्मपुराणांतील पाखंडमतात शांकर[६] अद्वैत गणलें नसून पाखंडमतांत महानिर्वाणादि[७] तांत्रिकांचें, प्रत्यभिज्ञावादियांचें[८], माया न स्वीकारून ब्रह्मविकार[९] जग मानणाऱ्यांचें अद्वैत त्यांत निवेशिलें[१०] आहे असें समज. भारतादिकांत जी पाशुपताची स्तुति आढळते तिची व्यवस्था वर सांगितलीच आहे. याप्रमाणें पांचरात्राच्या प्रामाण्याविषयीं वाद असून ते प्रमाण कां नाहीं याविषयींचें वाद आतां तुला सांगतो. ब्रह्मसूत्र अ० २ पाद २ सूत्र ४२ पासून सूत्र ४५ पर्यंत सूत्रावर भाष्य करितांनां आचार्य[११] म्हणतात, 'जगाला निमित्त व उपादान कारण परमेश्वरच आहे. हा भागवतांतील अंश श्रुत्यनुसार असल्यामुळें विसंवादी[१२] नाहीं,' या ठिकाणीं भागवताचा अर्थ आनंदगिरीनें 'पांचरात्र' केला असून

*(१) भक्ति वगळून बाकीच्या भागाविषयी (२) पाशुपत तंत्र (३) वेदबाह्यमतामध्ये (४) समावेश (५) त्याचा पुरस्कार करणाऱ्या (६) शंकराचार्यांनी ज्या अद्वैत वादाचा पुरस्कार केला आहे तो (७) वाममार्गी शाक्तांचे (८) या नावाचे एक मत आहे. सर्वदर्शनसंग्रहादि ग्रंथांतून त्यांचे वर्णन आले आहे (९) ब्रह्माचे कार्य (१०) समाविष्ट (११) शंकराचार्य (१२) वेदविरुद्ध*

ब्रह्मविद्याभरणकारांनी 'विष्णुभागवत' असा केला आहे. 'देवीभागवत' एक दुसरें असल्यामुळें यांनी 'विष्णुभागवत' पुराण येथें घेतलें आहे, असे धरलें तर भागवतांत पुढील खंडनयोग्य[१] विषयच नसल्यामुळें ब्रह्मविद्याभरणकारांचा अर्थ सम्यक्[२] आहे म्हणावेंसें वाटत नाहीं. म्हणून आनंदगिरींचा अर्थच घेऊन चालणें बरे. अधिकरणमालाकारांचेंही[३] म्हणणें आनंदगिरीसारखेंच आहे. असो. वरीलप्रमाणें[४] वासुदेवपरमात्मा एकच[५] अनेक रूपें धरितो, हेंही म्हणणें आम्हाला खोडण्याची आवश्यकता नाहीं. कारण,

**'स एकधा भवति त्रिधा भवति ॥' 'त्वं जातो भवसि विश्वतोमुखः ॥' 'संभवामि युगे युगे ॥'**

इत्यादि श्रुति भगवंताचें[६] अनेकरूपत्व सांगतात. तसेंच अनन्य[७] जें परमेश्वराचें आराधन[८] तंत्रांत[९] सांगितलें आहे, त्याचेंही आम्ही निराकरण[१०] करीत नाहीं. कारण, श्रुतिस्मृतीमध्यें देखील परमेश्वराचें प्रणिधान[११] पुष्कळ ठिकाणीं सांगितलें आहे. परंतु कांही अंश पांचरात्रामध्यें श्रुतिविरुद्ध आहे, तो खंडनीय वाटतो. तो अंश हा कीं, 'न जायते म्रियते वा विपश्चित्' 'जीवभूतः सनातनः' इत्यादि श्रुतीमध्यें जीव अनादि सांगितलेला असून पांचरात्रांत तो वासुदेवसंज्ञक[१२] परमेश्वरापासून संकर्षणसंज्ञक उत्पन्न होतो, असें सांगितलें आहे; व -

*(१) ब्र. सू. २/२/४२ वर आचार्यांनी. पुढे वेदविरोधी म्हणून ज्या सिद्धान्ताचे खंडन केले आहे तसा सिद्धान्त विषय*

*(२) योग्य (३) ब्रह्मसूत्रावरील अधिकरण (४) परमेश्वरच जगाचे उपादान, निमित्त असे दोन्ही प्रकारचे कारण आहे हा पांचरात्रांतील सिद्धान्त श्रुतिविरुद्ध नसल्यामुळे खंडन करण्यास योग्य नाही त्याप्रमाणे (५) एकच असून (६) एक भगवानच अनेक स्वरूपाचा झाला आहे असे (७) तदेक चित्ताने (८) भक्ति (९) पंचरात्रागमांत (१०) खंडन (११) भक्ति, जप, ध्यान (१२) पंचरात्रात परमेश्वराला वासुदेव संज्ञा असून जीवाला संकर्षण संज्ञा आहे व तो संकर्षण (जीव) वासुदेवापासून (परमेश्वरापासून) उत्पन्न होतो असे मानिले आहे.*

त्यापासून प्रद्युम्नसंज्ञक[१] मन व मनापासून अनिरुद्धसंज्ञक अहंकार उत्पन्न होतो असेंही म्हटलें आहे. हे म्हणणें बरोबर नाहीं. कारण, ज्याची उत्पत्ति होते त्याला नाश असतो. मग महावाक्यलक्ष्यरूप[२] ऐक्य किंवा भगवत्प्राप्तिरूप मोक्ष संभवणार नाहीं. — दुसरें कर्मावाचून[३] परमेश्वरानें जीव उत्पन्न केला म्हणावें तर नैर्घृण्य[४] वैषम्य[५] दोष येतात. हे दोष येऊं नयेत म्हणून, 'आपल्या सृष्टींत[६] त्याला निर्दयता व विषमता कशाची'? असें वल्लभाचार्य आपल्या निबंध ग्रंथांत प्रतिपादन करितात तें योग्य नाहीं. कारण आम्हाला जर दुःखप्रतीति[७] होते तर आमच्या दुःखानें तरी परमेश्वर सुख मानणारा आहे असें म्हटलें पाहिजे. पुनः, आम्ही जर परमेश्वराचें सत्य कार्य असूं, तर मग आम्हाला सुखदुःखेंही सत्यच झाली पाहिजेत. मग परमेश्वराला निर्दय व विषम नाहीं म्हणण्यांत काय अर्थ आहे? बरे, आम्ही मिथ्या[८] असलों तर मृत्पुत्तलिका[९] करण्यांत व मोडण्यांत जसा दोष नाहीं, तसा परमेश्वर निर्दोष राहूं शकेल. पण सत्य परमेश्वरापासून आम्ही मिथ्या कार्य उत्पन्न कसे झालों? मायेनें झालों म्हणावें तर माया परमेश्वरानें मिथ्या कशी उत्पन्न केली? अनादि[१०] आहे म्हणशील तर, तिच्यावर ज्याची स्थिति[११] अवलंबून आहे

*(१) त्याचप्रमाणे मनाला प्रद्युम्न ही संज्ञा असून ते मन (प्रद्युम्न) संकर्षणापासून (जीवापासून) उत्पन्न होते व अनिरुद्ध म्हणजे अहंकार प्रद्युम्नापासून (मनापासून) उत्पन्न होतो असे मानिले आहे (२) जीव उत्पन्न होतो असे मानल्यास त्याला नाश मानावा लागतो. जीव नाहिसा होतो असे मानल्यास तत्त्वमसि महावाक्याने तत्त्वं पदाचा शोध करून तत्पदलक्ष्य व त्वंपदलक्ष्य यांचे जे ऐक्य करावयाचे ते (३) पूर्वजन्मातील कर्म कारण न मानता (४) निष्ठुरपणा (५) विनाकारण कोणाला सुख तर कोणाला दुःख देणे (६) आपण निर्माण केलेल्या किंवा परमेश्वरच आपल्या ठिकाणचा आनंदांश झाकून टाकून जीवस्वरूपच झाला आहे तर (७) दुःखाचा अनुभव (८) भ्रमाने भासणारे (९) मातीची बाहुली (१०) तिला आरंभ नाही (११) अस्तित्व*

तो आभासरूपी जीव, तुला अनादि मानण्याला कोणता प्रत्यवाय[१] आहे? दुसऱ्यापक्षीं[२] कर्मानुसार परमेश्वर जीव उत्पन्न करितो, असें म्हणावें तर उत्पत्तीपूर्वी जीवाचा[३] अभाव असल्यामुळें कर्मकर्त्या[४] जीवाची स्थिति नाहीं; आणि ईश्वराचें कर्म[५] स्वीकारावें तर परमेश्वराला जीवपणा[६] येतो. तात्पर्य, पांचरात्रांतील जीवोत्पत्ति[७] श्रुतिविरुद्ध असल्यामुळें प्रमाण नाहीं. (य३-३४) तसेंच करणें जे मनादिक, तेही जीवापासून उत्पन्न होणें शक्य नाहीं. कारण कर्त्यापासून करण[८] उत्पन्न होतें, असा नियम दिसत नाहीं. आपणच उत्पन्न केलेल्या कार्यानें कर्ता बद्ध[९] होत नसल्यामुळें मनादिकांच्या वासनेनुसार जीव बद्ध न झाला पाहिजे. या युक्तीवरूनही मनादिक करण जीवापासून उत्पन्न होणें शक्य नाहीं. **'एतस्माज्जायते प्राणा मनस्सर्वेन्द्रियाणि च'** या श्रुतींत सर्व मनादिकरणांची उत्पत्ति ईश्वरापासून सांगितली आहे, म्हणूनही पांचरात्रांतील जीवापासून मनादिकांची उत्पत्ति सांगणें श्रुतिविरुद्ध आहे. आतां, संकर्षणादि शब्दांनीं आम्ही जीवादिक घेत नसून, वासुदेव, संकर्षण, प्रद्युम्न, अनिरुद्ध, हे चार तुल्यधर्मी[१०] ईश्वरच आहेत, असें पांचरात्री सिद्धांती म्हणेल तर तें सम्यक् नाहीं. कारण, एका ईश्वरानें सर्व कार्य[११] होत असल्यामुळें

*(१) हरकत (२) पूर्वकर्माप्रमाणे वर दोन पक्षस्पष्ट प्रथम दाखविले नसले तरी कर्मावाचून परमेश्वर जीवाला उत्पन्न करतो हा पक्ष घेऊन त्याचे खंडन केले म्हणून येथे आता दुसऱ्या पक्षी म्हणजे कर्माप्रमाणे असे स्पष्ट म्हणावे लागले (३) जीवाचे अस्तित्व नसल्यामुळे (४) कर्म करणाऱ्या (५) ईश्वराचे कर्माने जीव उत्पन्न होतो असे मानल्यास (६) ज्याचे ठिकाणी कर्म आहे तो जीव व कर्मरहित तो ईश्वर असा सिद्धांत असल्यामुळे ईश्वराचे ईश्वरत्व नाहिसे होऊन त्याला जीव मानल्यासारखे होईल (७) जीव उत्पन्न होतो असे म्हणणे (८) कर्म करणारा जो जीव तो ज्यांच्या साह्याने धर्म (कर्म) करतो ते कर्माचे साधन (९) आपल्यापासून उत्पन्न झालेल्या कार्याचे कर्म कर्ता आपले म्हणून मानणार नाही (१०) सारख्या धर्मानी युक्त असलेले (११) भागत असल्यामुळे*

अनेकेश्वर कल्पना[१] असंगत[२] आहे. पुनः, चारच परमेमश्वराचे व्यूह[३] आहेत असें कां? आब्रह्मस्तंभपर्यंत[४] जेवढे पदार्थ आहेत तेवढे परमेश्वराचे व्यूह आहेत. सारांश, हाही अंश पांचरात्रांतील अप्रमाण आहे. शांडिल्य ऋषि चाऱ्ही वेदांमध्यें

कल्याणप्रद[५] तत्त्व न जाणून[६] या तंत्रांचें अध्ययन करून कृतकृत्य[७] झाला; या कथेवरूनही वेदांमध्यें पुरुषार्थ[८] नाहीं, अशी निंदा[९] करणारें हें तंत्र अप्रमाण आहे.

याप्रमाणें भगवत्पाद भाष्याचा आशय असून याच चार सूत्रांवर जें रामानुजाचार्यांचें भाष्य आहे तेंही विचारणीय[१०] असल्यामुळें त्याचा आशय[११] तुला सांगतो. या चार सूत्रांपैकी दोन सूत्रें रामानुजांनी पूर्वपक्षकाराच्या म्हणण्यांत घेऊन, दोन सूत्रांनीं आपला सिद्धांत सांगितला आहे. त्या सिद्धांतांत भगवत्पूज्यपादाचार्यांचें म्हणणें सम्यक्[१३] नाहीं असें दाखविलें आहे. रामानुज म्हणतात, 'ज्या वचनावरून पांचरात्रावर अनेकेश्वरकल्पना लादली आहे, त्या वचनाचा अर्थ वास्तविक[१४] तसा नसून **'अजायमानो बहुधा विजायते'** या श्रुतींत सांगितल्या प्रमाणें, एकच परमात्मा चार रूपांनीं झालेला आहे', आणि भगवत्पूज्यपादाचार्यांनींही या अंशाचें निराकरण[१५] करण्याची आवश्यकता नाहीं म्हणून म्हटलें आहे. यद्यपि सर्व पदार्थ परमेश्वर व्यूहरूप[१६] आहेत, तथापि विभूतिनिर्णयाप्रमाणें[१७] उपासनार्थ[१८] एका परमेश्वराचे चार व्यूह मानणें निव्वळच[१९] वाईट नाहीं. (य३-३५)

*(१) अनेक ईश्वर मानणे (२) अयोग्य (३) विभूति, विग्रह (४) ब्रह्मदेवापासून खांबापर्यंत (५) ज्यामुळे परम कल्याण होईल असे (६) न सापडल्यामुळे (७) मुक्त (८) मोक्ष, वेदाच्या विचाराने मोक्ष होत नाही (९) वेदाची निंदा (१०) विचार करण्याजोगे (११) भावार्थ (१३) योग्य (१४) खरोखर (१५) खंडन (१६) परमेश्वराचे विग्रह, परमेश्वराचीच रूपे (१७) सर्व पदार्थांच्या रूपाने भगवानच भासतो, तथापि उपासनेकरिता ज्याप्रमाणे कांही पदार्थ भगवंताच्या विभूति आहेत म्हणून गीतेतील विभूति वर्णनाध्यायांत सांगितले आहे त्याप्रमाणे (१८) उपासनेसाठी (१९) अगदीच*

*(य ३-३५) (या वाक्यांतील 'आणि' पासून 'वाईट नाहीं' या शब्दापर्यंतच्या निरूपणांत चुका असल्यास त्या माझ्या आहेत; रामानुजांच्या नाहींत.)* उपासनेसाठीं जीवादिकांचें अधिष्ठान[१] परमात्माच जीवादिशब्दांनीं[२] बोलिला गेला आहे. जसा आकाश व प्राणादिकांचें अधिष्ठान परमात्मा, आकाश व प्राणादि शब्दांनीं बोलिला गेला आहे, तसा **प्रथम अहंकाराधिष्ठान[३] परमात्म्याचें चिंतन करून, नंतर त्यापेक्षां सूक्ष्म मनसोपहित[४] परमात्म्याचें चिंतन करावें; नंतर त्यापेक्षां सूक्ष्म जीवोपहित[५] परमात्म्याचें चिंतन करून, पुढें सूक्ष्म, शुद्ध, अशा परमेश्वराचें चिंतन करावें.** हा क्रम अधिकारानुसार[६] सांगितला आहे. 'पुष्करसंहिता' व 'सात्वतसंहिता' यांतही असेंच सांगितले आहे.

श्रीगुरु म्हणाले, येथें इतकें मात्र ध्यानांत ठेव कीं, चाऱ्ही व्यूह जर तुल्यधर्मी[७] असतील , तर एका व्यूहावरून दुसऱ्या व्यूहावर जाण्यांत काय लाभ आहे? या प्रश्नांचें उत्तर रामानुजांनां देतां येत नाहीं; व तुल्यधर्मी नसतील तर मग ते केवळ अधिकारानुसार उपासनार्थच मानल्यास, श्रीभाष्यकार[८] चुकले असें मला वाटत नाहीं.

आतां, जीवोत्पत्तीविषयीं[९] रामानुज म्हणतात, कीं, पांचरात्रागमांत मुळीं जीवोत्पत्ति सांगितलीच नाहीं; उलट खोडली आहे. परमसंहितेंत[१०] पहा.[११], प्रकृतीचें रूप सांगून, या श्लोकाचा अर्थ रामानुजांच्या अभिप्रायानुसार असा होतो - 'त्या प्रकृतीचा व पुरुषाचा संबंध आहे;

*(१) आधार (२) श्रुतीतील उपासना प्रकरणात जेथे प्राणादिकांची उपासना सांगितली आहे तेथे प्राणादिकांचा आधार असणाऱ्या परमेश्वराचीच उपासना करावयाची असल्यामुळे त्या परमेश्वराचा, जीवाचे वाचक जे प्राणादिशब्द त्या प्राणादिशब्दांनी उल्लेख केला आहे. (३) अहंकाराला आधार असणाऱ्या (४) मनाला आधार असणाऱ्या (५) जीवाला आधार (६) ज्यांच्या बुद्धीला अत्यंत सूक्ष्म, शुद्ध परब्रह्माचे ग्रहण होत नाही, त्यांना अहंकारादि स्थूल पदार्थांच्या द्वारा सूक्ष्म परमेश्वराचे ज्ञान करून देण्याकरिता ज्याच्या बुद्धीला जसे ग्रहण होऊ शकेल तसा अभ्यास करावा (७) एकसारख्या धर्माचे (८) रामानुजाचार्य (९) जीवाच्या उत्पत्तीविषयी (१०) रामानुजमताचा ग्रंथ (११) ईश्वराच्या शक्तीचे*

**व्याप्तिरूपेण संबंधस्तस्याश्च पुरुषस्य च । सह्यनादिरनंतश्च परमार्थेन निश्चितः॥**

तो पुरुष निश्चयेंकरून परमार्थतः[१] अनादि अनंत आहे' आणखीही पंचरात्रांतील सर्व संहितांमध्यें जीवाच्या उत्पत्तीचा निषेधच केला आहे. जो जीवोत्पत्त्याभासाचीं[२] पंचरात्रवाक्यें[३] आहेत तीं वास्तविक सिद्धांतबोधक[४] नसून , दृष्टजननमरणानुसार[५] पूर्वपक्षमात्र[६] आहेत. सिद्धांत तर पांचरात्राचाही जीवानादित्वबोधकच[७] आहे.

पुनः, वेदनिंदक[८] असल्यामुळें हें तंत्र प्रमाण नाहीं (य३-३६) असेंहीं म्हणणें चांगलें नव्हें. कारण, वेदाची निंदा वेदांतच कोठे कोठें आढळते; जसें :-

**प्रातःप्रातरनृतं ते वदन्ति ॥ पुरोदयाज्जुह्वति येऽग्निहोत्रम् ॥**

श्रुत्यर्थ :- 'जे सूर्योदयाच्यापूर्वी अग्नींत हवन करितात ते प्रतिदिवशीं प्रातःकालीं खोटें बोलण्याचें पाप करितात'. या श्रुतींत **'अनुदिते जुहुयात्'** या श्रुतीनें सूर्योदयापूर्वी सांगितलेल्या होमाची निंदा केली आहे.-

*(१) वस्तुतः (२) ज्या वाक्यात जीवाची उत्पत्ति मानल्याचा भास होतो (३) पांचरात्रागमातील वाक्ये (४) खरोखर जीव उत्पन्न होतो असे सांगणारी (५) आपण जे जीवाचे ठिकाणी जन्ममरण पाहतो त्या जन्ममरणाला अनुसरून (६) पूर्वपक्षस्थापक, केवळ पूर्वपक्ष मांडणारी (७) जीव अनादि, अनंत आहे असा (८) वेदाची निंदा करणारे.*

त्या निंदेचें निंदेत तात्पर्य[१] नसून सूर्योदयानंतर[२] होमाच्या स्तुतींत तात्पर्य आहे, किंवा छांदोग्य उपनिषदांतील भूमाविद्येंत[३] नारदांनीं सनत्कुमाराला म्हटलें कीं, 'मी चाऱ्ही वेद पढलों, नाना शास्त्रें पढलों, परंतु माझा शोक दूर झाला नाहीं. त्या वेदांतील आत्मज्ञान मला मिळालें नाहीं. मी त्या वेदांतील मंत्राला मात्र जाणणारा झालों'[४]. हा जो नारदाच्या मुखांतून निघालेला वेदाचा दुर्बळपणा[५] तो वेदनिंदार्थ[६] नसून भूमाविद्यास्तुत्यर्थ[७] आहे. त्याप्रमाणें कठीण[८] जो वेदाचा अर्थ तो कांहीं कारणामुळें शांडिल्याला समजला नसला, आणि पांचरात्रांतून तो सुलभ रीतीनें समजला म्हणून हें शास्त्र पढून त्याला ज्ञान झालें, असें पांचरात्राचें म्हणणें वेदनिंदक होत नाहीं. परमसंहितेंतही असें सांगितलें आहे. याप्रमाणें दोन्हीं भाष्यांचें आलोचन[९] केलें असतां स्वपक्षीय[१०] लोक नांवें[११] ठेवतील, हें जाणत असूनही, बुद्धिदौर्बल्यास्तव[१२] किंवा आणखी कोणत्या कारणास्तव कोण जाणे, एवढ्याच[१३] प्रसंगीं ग्रंथकर्ता रामानुजमती नसूनही त्याचें मत पुष्कळच अंशीं शांकर अभिप्रायापेक्षां रामानुज अभिप्रायाकडे धांव घेते. असो.

*(१) पर्यवसान (२) सूर्योदयानंतर होम करावा असे सांगण्यात त्याचे पर्यवसान आहे (३) सर्वामध्ये मोठी व्यापक वस्तु कोणती हे सांगणारी विद्या (४) शब्दमात्र मंत्राला (५) अंगासहवर्तमान पढलेला वेद नारदांना आत्मज्ञान करून देण्यास समर्थ झाला नाही. (६) वेदाची निंदा करण्याकरिता (७) सर्वात व्यापक श्रेष्ठ अशा ब्रह्म वस्तूचा बोध करून देणाऱ्या विद्येची स्तुति करणारा (८) समजण्यास कठीण (९) निरीक्षण (१०) शांकर मताचे (११) दोष देतील (१२) बुद्धीच्या दुर्बलतेमुळे. (१३) पांचरात्रातील वेदविरुद्ध अंश म्हणून ज्याचे आचार्यांनी खंडन केले तेवढ्या अंशाचा विचार करतांना*

या विवेचनावरून वर रामानुज जेथे अडतात[१] म्हणून सांगितलें तदादिकरून[२] जीं स्थानें[३] आहेत, तीं स्थानें शांकरमती[४] म्हणतात तशींच असली तर प्रमाण नाहींत; आणि नसली तर प्रमाण आहेत. शांकरमतार्थ[५] घेऊन अभंगांतील वाक्य आहे असें समज.

शिष्य :- भगवन्! माझी शंका निःशेष निवृत्त[६] झाली. आतां पुढील आवतारचरितामृतपिपासा[७] स्वामीवांचूनं[८] कोण शांतवील ? (य३-३७)

श्रीगुरु :- श्रवण कर.

**॥ अभंग ॥**

**धर्मवंशीं[९] झाला चवथा अवतार । नारायणनर ऋषिरूप[१०] ॥१॥**
**आत्मशांतीसाठीं[११] तप आचरीला । जनां[१२] दाखवीला मार्ग तोची ॥२॥**
**पांचवा अवतार कपिल सिद्धेश[१३] । जयाचा सच्छिष्य आसुरी कीं ॥३॥**
**आसुरीस सांख्य सांगितलें पूर्ण । तत्त्वांचा संपूर्ण निवाडा[१४] जें ॥४॥**
**नानाविध[१५] तत्त्व ब्रह्मप्राप्तिसाठीं । त्यागावें शेवटी मोक्षामाजीं ॥५॥**

*(१) रामानुजांना ज्याचे उत्तर देता येत नाही (२) त्याला प्रारंभ करून, त्यासहित आणखी (३) शंकास्थळे (४) शंकराचार्यानुयायी (५) शंकराचार्यांचे मताचा पुरस्कार करून (६) नाहिशी (७) भगवंताचे अवतार व त्यांचे चरित्र हेच कोणी अमृत ते पिण्याची झालेली इच्छा (८) गुरूमाउलीवाचून (९) धर्मऋषीपासून कलेच्या उदरी (१०) नर नारायण ऋषी (११) अंतःकरणाचा शम म्हणजे निरोध साधण्यासाठी (१२) लोकांना (१३) सर्वसिद्धामध्ये श्रेष्ठ (१४) विवेक, आत्मा कोणता व अनात्मा कोणता याची फोड (१५) नाना प्रकारचे*

**एकचि तें तत्त्व पुरुषसंज्ञक[१] । तेंचि ब्रह्म देख वेदांताचें ॥६॥**
**ऐसें शुद्ध सांख्य सांगितलें जेणें । कपिल प्रमाण पांचवा तो ॥७॥**
**सहावा सुंदर सर्व विश्वा[२] गुरु । अत्रीचा कुमरु दत्तात्रेय ॥८॥**
**अनुसूयातपें[३] जहाला जो प्राप्त । जीवां उद्धरीत एकसरां[४] ॥९॥**

न होय जयाचें मोघ(५) दरुशन । कृपावंत पूर्ण दीनानाथू ॥१०॥
अवघड(६) लीला जयाची व्यापक । नाहीं सुख दुःख जयारूपीं(७) ॥११॥
नाना अवतार होऊनियां गेले । दत्तत्व संचलें जैसें तैसें ॥१२॥
अनंत(८) काळाचा अनंत भावाचा(९) । अनंत जीवांचा कनवाळु ॥१३॥
अलर्कराजाला दिलें आत्मज्ञान । प्रल्हाद ही जाण शिष्य ज्याचा ॥१४॥
यदु हयहय मत्सेंद्र गोरक्ष । संप्रदाय(१०) साक्ष जेथुनीयां ॥१५॥
महाराज तोचि सहावा अवतार । कार्तवीर्या(११) वर ज्याचा होता ॥१६॥
जमदग्निपुत्रावरी(१२) ज्याचि कृपा । जो कां मायाबापांसम(१३) दीनां(१४) ॥१७॥
महाराज तोचि सहावा अवतार । आम्हा ज्ञानेश्वररूप दिसे ॥१८॥१९॥

॥ओव्या ॥

रुचीपासूनि(१५) आकुतीचे(१६) पोटीं । यज्ञावतार(१७) सातवा जगजेठी ।

*(१) पुरुष हे पंचविसावे तत्वच एक खरे (२) प्राणीमात्राचा गुरु (३) अनसूयेच्या तपामुळे (४) एकसारखा (५) व्यर्थ (६) बिकट, दुर्बोध (७) ज्याचे ठिकाणी (८) अनादि व अनंत, उत्पत्तिनाशरहित (९) अनंत स्वरूपे धारण करणारा (१०) संप्रदायाची उत्पत्ति (११) सहस्त्रार्जुनाला (१२) परशुरामावर (१३) मायबापाप्रमाणे (१४) दीनजनाला (१५) रुची नांवाचे ऋषी (१६) त्यांची पत्नी (१७) यज्ञ नांवाचा.*

तो यामादि देवांसह शेवटीं । पाळिता जाहला स्वयंभू(१) मनू ॥२०॥
आणि मेरुदेवीचें उदरीं । नाभीपासोनि(२) निर्धारीं । प्रभु आठविया अवतारीं । ऋषभदेव जाहला ॥२१॥
सकळ आश्रमां वंद्याश्रम(३)। तो पारमहंस्य आचरला(४)परम । जो ब्रह्मनिष्ठालागीं धर्म । शांतीलागीं(५) दाखविला ॥२२॥
आणि जहीं(६) पापी वन । ब्राह्मणशापें पावला मरण । तेव्हां प्रार्थिला नारायण । अराजकभयनिवृत्तये(७) ॥२३॥
तैं पृथु(८) जाहला गोविंद । (य३-३८) पृथ्वी दोहूनि काढिलें दुग्ध ।
तेंचि अन्न तेंचि औषध । ऐसा प्रसिद्ध हा अवतारू ॥२४॥
आणि चाक्षुष मन्वंतरीं । सकल व्यापिलें समुद्रीं(९) । तेव्हां पृथ्वीच्या(१०) नौकेवरी । सत्यव्रत(११) बैसविला ॥२५॥
वस्तुतः(१२) मन्वंतरांतीं(१३) । प्रलय न होय निश्चितीं । परी सत्यव्रताप्रति ।  दाविली(१४) माया ॥२६॥
तो हा मत्स्यावतारू । वैवस्वतमनु पालनकारू(१५) । दहावा जाहला शार्ङ्गधरू । भक्तानुग्रहा(१६) ॥२७॥
आणि दैवदैत्यीं(१७) मंथिला सागर । तेव्हां रवी(१८) जाहला मंदर(१९) ।
तया पाठीचा दिधला आधार । अकरावा अवतार कूर्म तो ॥२८॥
बारावा अवतार धन्वंतरी । जेणें सुधा दिधली सुरकरीं(२०) ।

*(१) स्वायंभुव मन्वंतराचे (२) नाभी राजापासून (३) सर्व आश्रमीयांना पूज्य जो आश्रम (४) परमहंसाने आचरावयाचा (५) वासनारहित होण्यासाठी (६) जेव्हां (७) अराजक स्थितीतील भयंकर दुःखद परिस्थितीतून राष्ट्राला सोडविण्याकरिता (८) भगवंताने पृथु अवतार घेतला. (९) सकल पृथ्वी जलमय झाली (१०) पृथ्वीरूपी नौकेवर (११) राजाचे नांव (१२) खरे पाहता (१३) मन्वंतराचे शेवटी (१४) दाखविली (१५) वैवस्वतमनूचे पालन करणारा (१६) भक्तावर कृपा करण्याकरिता (१७) देवदैत्यांनी मिळून (१८) मंथनदंड (१९) मंदरपर्वत (२०) देवाच्या हातात*

तेरावा अवतार मोहिनी नारी । जिणें असुरीं प्रेरिला(१) मोह ॥२९॥
जया प्रेमळाचें गुणें(२) । दैत्य असूनिही देवत्व(३) उणें । जयाचियासाठीं लेणें(४) । नृसिंहत्व ॥३०॥
तया प्रल्हादाचिया रक्षणा । आलें नृसिंहत्व होणें नारायणा ।
ब्रह्मवरें(५) अजिंक्य दैत्यराणा(६) । तो नखेंकरूनि विदारिला(७) ॥३१॥
तो अवतार चौदावा । जों(८) वारी स्वभक्तभवदावा(९)।
यालागीं प्रल्हादवरद(१०) वदावा । जय जय साम्राज(११) म्हणोनी ॥३२॥[११अग्नि]
असज्जनमदमर्दनू(१२) । पंधरावा अवतार वामनू । करोनि बलियज्ञमथनू(१३) । जेणें स्वर्ग दिधला अखंडला(१४) ॥३३॥
आणि सोळावा भार्गव(१५) कोदंडपाणी(१६)। जेणें विप्रद्रोही(१७) नृप(१८) पाहोनी ।

एकवीस वेळ धरणी[१९] । निःक्षत्रिय[२०] केली ॥३४॥
मनुष्य पाहोनि मतिहीन[२१] । सत्यवतीउदरीं[२२] पराशरापासून ।
सतरावा अवतार द्वैपायन[२३] होऊन केल्या वेदशाखा[२४] ॥३५॥
जो मनुष्यांमाजीं[२५] मुकुटमणी[२६] । जो सुरकार्या[२७] चापपाणी[२८] ।
जो साधुरक्षणा[२९] कैवल्यदानी[३०] । एकपत्नी[३१] रघुराणा ॥३६॥
जो जनकजाहृदयपद्मभृंग[३२] । जो जमदग्निकुमर गर्वभंग[३३] ।

*(१) शिरविला (२) योगाने (३) देवपणा देखील कमी दर्जाचा (४) भूषण (५) ब्रह्मदेवाच्या वराने (६) हिरण्यकशिपु (७) चिरला (८) निवारण करितो (९) आपल्या भक्तांचा संसाररूपी अग्नि (१०) प्रल्हादाला वर देणारा (११) ब्रह्मांडाधिपति (१२) दुष्टांच्या मदाचा नाश करणारा (१३) बलीच्या यज्ञाचा नाश करणारा (१४) इंद्राला (१५) भृगूचा पुत्र (१६) कोदंड धनुष्य धारण करणारा (१७) ब्राह्मणांचा द्वेष करणारे (१८) राजे (१९) पृथ्वी (२०) क्षत्रियरहित (२१) मंदबुद्धिचे (२२) सत्यवतीचे पोटी (२३) व्यास (२४) वेदाचे विभाग (२५) मनुष्यामध्ये (२६) श्रेष्ठ (२७) देवाच्या हितासाठी (२८) हातात धनुष्य धारण करणारा (२९) साधूंचे संरक्षण करण्याकरिता (३०) मोक्ष देणारा (३१) एकच आहे पत्नी ज्याला (३२) जनक राजाची मुलगी सीता, तिचे हृदय हेच कोणी कमल, त्यावर बसणारा भ्रमर (३३) जमदग्नीचा मुलगा परशुराम त्याचा गर्व हरण करणारा*

जयातें ध्यातो उमारंग[१] । एकांतस्थित[२] होउनी ॥३७॥
जो असुरगजमथनपंचाननू[३] । जो सत्यसाम्राज्य[४] करुणाघनू[५] ।
जो श्री कौसल्यादशरथनंदनू[६] । सेतुबंधनकारकू[७] ॥३८॥
जो सुग्रीवसखा[८] वालिदलन[९] । जो ताटिकांतक[१०] रावणमर्दन[११] ।
जो हनुमत्प्रिय[१२] जगज्जीवन[१३] । बिभीषण शरण जया ॥३९॥
जो वाल्मीकिहृदयआदिपीठ[१४]। जो निजनामग्राहकप्रद वैकुंठ[१५]। (य३-३९)
जो त्र्यंबकधनुभंग[१६] अचाट[१७]। राजधर्मी[१८] नीट वीर गाढा[१९] ॥४०॥
जो आजानुबाहु[२०] अपवर्गदानी[२१] । जो क्षत्रिय असूनि महामुनी ।
जो वासिष्ठाधिष्ठित[२२] ब्रह्मज्ञानी । निरभिमानी रघुराणा ॥४१॥
तो अठरावा महापुरुष । पूर्णावतार हृषीकेश । जयाचें नाम उमानिवास[२३] । घेतां निर्विष[२४] जाहला ॥४२॥
सकळ विश्व जयाधीन[२५] । तो एकोणवीस[२६] संकर्षण । वेद ब्रह्मसूत्र जेथें प्रमाण[२७] । तो श्रीकृष्ण विसावा ॥४३॥
जो संतांचा प्राणविसांवा[२८]। तोचि हा अवतार विसावा । जेथ पूर्णत्वाचा ठेवा । उपेगा[२९] आला ॥४४॥
जो ब्राह्मणासी रक्षकू[३०]। जो दुर्जनासी भक्षकू[३१]। जो शूर वीरपरिक्षकू[३२]। दीनबंधू[१] ॥४५॥

*(१) शंकर (२) एकांतात जाऊन (३) दैत्यरूपी हत्तीचा नाश करणारा सिंह (४) सत्याचा राजा (५) करुणासंपन्न (६) कौसल्यादशरथांचा पुत्र (७) सेतुबंधन करणारा (८) सुग्रीवाचा मित्र (९) वालीचा नाश करणारा (१०) ताटिकेचा नाश करणारा (११) रावणाचा वध करणारा (१२) हनुमंताचा प्रेमपात्र किंवा हनुमंत ज्याचा प्रेमपात्र आहे (१३) जगाचा प्राण (१४) वाल्मिकी ऋषीच्या हृदयात आधी प्रगट झालेला (१५) आपले नांव घेणाऱ्यांला वैकुंठ देणारा (१६) शंकराचे त्र्यंबक धनुष्य मोडणारा (१७) अगाध सामर्थ्यवान् (१८) राजधर्मात प्रवीण (१९) खंबीर (२०) गुडघ्यापर्यंत ज्याचे हात लांब आहेत (२१) मोक्ष देणारा (२२) वासिष्ठांत सांगितलेले (२३) शंकर (२४) विषबाधारहित (२५) ज्याच्या आज्ञेत (२६) बलराम (२७) ज्याचे जाणण्याचे साधन (२८) प्राणांचे विश्रांतिस्थान (२९) कामास (३०) रक्षण करणारा (३१) नाश करणारा (३२) शूरांचा व वीरांचा जाणता (१) दीनांचा कैवारी*

जो वैश्यशूद्रादिकां भक्तां । गोपत्वें[२] झाला संरक्षिता । रास खेळोनि समस्ता । तारिल्या स्त्रिया ॥४६॥
अनेक विरुद्ध[३]खेळोनि खेळ । ईश्वरपण दाविलें विमळ[४]। जो पाहोनियां निज प्रेमळ[५]। चाऱ्ही भुजां[६]आलिंगी ॥४७॥
जेणें पार्थाचें[७] करुनि व्याज[८] । ब्रह्मत्वें[९] विश्वचि रक्षिलें सहज ।
जयाचें निकें[१०] साम्राज्य । द्वारकें आणि भक्तहृदयीं ॥४८॥
रामावतारीचें एकपत्नीपण । तेंचि येथ विस्तरोन[११] । रासादिक हें खेळोन । ब्रह्मचारी राहिला ॥४९॥

जो प्रियप्रेमकलानिधी[१२]। जो प्रेमळजीवितसुधाब्धी[१३]। जो श्रौतसिद्धांत[१४]ब्रह्मबुद्धी[१५]। संधीसमाधीमाजी[१६]दिसे ॥५०॥
जो अनध्यस्तविवर्तू[१७] । जेथें नोहे भवावर्तू[१८]। जो भक्तहृदयसंवर्तू[१९] । प्रवृत्तु[२०] निवृत्तु नव्हे कदा ॥५१॥
जो कटीस[२१] बांधी आपुलें वस्त्र । प्रेमळ[२२] वस्त्र स्कंधावर[२३] ।
जो विवाहस्त्रिया[२४] सोडूनि समग्र[२५] । गोपिकार्थ[२६] व्रजीं आला ॥५२॥
जो वसुदेवदेवकीउदरीं[२७] आला । परी आधी मरण आले सहा बाळा ।
आणि कुमारीसाठीं[२८] व्रजी गेला । तो हृदयीं राहिला नित्यचि ॥५३॥
जड[२९] गुरुदक्षिणा देती इतर । जेणें दिधला चेतन गुरुपुत्र ।
जो अवाप्तविद्यापि[३०] विद्यामात्र[३१] । संदीपनशिष्य[३२] जाहला ॥५४॥

*(२) गवळी होऊन (३) वेदविरुद्ध (४) शुद्ध (५) प्रेमळ भक्त (६) हातांनी (७) अर्जुनाचे (८) निमित्त (९) ब्रह्मज्ञानाचा उपदेश करून (१०) सत्य (११) एका एका रूपाने एक एकच स्त्री भोगून (१२) भक्तावर प्रेम कसा करावा किंवा भक्ताचा प्रेम कसा वाढवावा याची पूर्ण कला ज्याला माहित आहे (१३) भक्तांच्या जीविताचा सुखसमुद्र (१४) ज्याचे वेदाने प्रतिपादन केले, वेदाने कळणारा (१५) ज्यांची ब्रह्मस्वरूप बुद्धि झाली आहे त्यांना (१६) दोन वृत्तींच्या मध्ये व समाधीत (१७) ज्ञानानंतर प्रेमानुसार विशेष रूपाने यथार्थ भासणारा (१८) संसाराचा फेरा (१९) भक्तांच्या हृदयांत राहणारा (२०) उत्पत्तिनाशरहित (२१) कमरेला (२२) भक्तांचे (२३) खांद्यावर (२४) लग्नाच्या (२५) सर्व (२६) गोपिकाकरिता (२७) वसुदेवदेवकीच्या पोटी (२८) गवळ्याच्या मुलीकरिता (२९) जडपदार्थांची (३०) सर्व विद्या येत असतांनाही (३१) विद्येकरिता (३२) सांदीपनीचा शिष्य*

जेणें गोपी तारिल्या कामें । कंसादिक भयसंभ्रमें[१] । शिशुपाळादी वैरधर्मे । तारिले जेणें ॥५५॥
जो पांडवपाळण[३] जगद्गुरु[४] । जो रुक्मिणीरंग[५] करुणाकरू । राधारमण[६] शार्ङ्गधरू । पार्थसारथी[७] श्रीकृष्ण ॥५६॥
जी शिवादींची ध्येय मूर्ती[८]। जे नारदादींची गेय कीर्ती[९]। जे यशोदादींची पुत्रवृत्ती[१०] । जी पतिप्रीति[११] गोपिकांची ॥५७॥
जो दुर्जनांचा यम[१२] । जो सज्जनां आराम[१३] । (य३-४०)जो निष्कामाचा[१४] काम । पूर्ण काम[१५] स्वानंदू[१६] ॥५८॥
जो निर्गुण[१७] निराकार[१८] । प्रेमवर्धनार्थ[१९] साकार[२०] । जो पूर्णब्रह्म परात्पर[२१] । पिनाकधर[२२] ध्यात जया ॥५९॥
जो उपनिषद्-धेनु-पयोमथिता[२३] । जो पांचाळी[२४] वस्त्रें पुरविता ।
जो दुर्योधनादिकां फिरविता[२५] । दुर्गर्व[२६] मुरविता[२७] रिपुदमन[२८] ॥६०॥
जो गोपीकृपें[२९] अस्मत्पती[३०] । श्रीज्ञानेश्वर जयाप्रती । मातें देऊन यथानिगुती । पावन केलें कृपाजळें[३१] ॥६१॥
जो अनाथाचा नाथू । जयाचा प्रेमळ शिरीं हातू । चारी वेद मातू[३२] । गाती ज्याची ॥६२॥
जयाचे वर्णितां गुण । तदाकार होय मन । तो अवतार[३३] न धरूनि अवतरण । विसावेंपण पावला ॥६३॥

*(१) भीतीने आपला ध्यास लावून (३) पांडवांचे पालन करणारा (४) जगताचा गुरू (५) रुक्मिणीचा पति (६) राधेचा स्वामी (७) अर्जुनाचा सारथी (८) ध्यान करण्याची (९) गायन करण्याला योग्य अशी मूर्तिमान कीर्ति (१०) मूर्तिमंत वात्सल्य प्रेम (११) मूर्तिमंत पतिप्रेम (१२) दुष्टांना यमाप्रमाणे (१३) सुखाचे स्थान, विश्रांति (१४) निष्कामाचा ओढा ज्याचे ठिकाणी असतो (१५) ज्याला कांही प्राप्त करावयाचे नाही. (१६) आनंदस्वरूप (१७) मायागुणरहित (१८) भौतिक आकाररहित (१९) भक्तांचा प्रेम वाढविण्याकरता (२०) सगुणदेहधारी (२१) प्रकृतिच्या पलिकडे (२२) शंकर (२३) उपनिषद्रूपी गायीचे दुधाचे मंथन करणारा (२४) द्रौपदीला (२५) भ्रम उत्पन्न करून वाईट ते चांगले भासविणारा (२६) दुष्टांचा गर्व (२७) नाहिसा करणारा (२८) शत्रूंचे दमन करणारा (२९) गोपींच्या कृपेने (३०) आमचे पति (३१) कृपारूपी जलाने (३२) कीर्ति (३३) पूर्ण परब्रह्मच, अवतार न घेता विसाव्या अवतारासारखे झाले म्हणजे श्रीकृष्णपरिपूर्ण ब्रह्म आहे असा भाव.*

जो न जन्मूनि जन्मता । जया धर्मरहिता धर्मता । परी नैष्कर्म्यरूप[१] वर्मता[२] । न मोडे ज्याची ॥६४॥
यद्गुण ऐकतां संसार कटू[३] । जो प्रेमळमोहनीं[४] अतितरपटू[५] । जो कांताभक्तिचटुलचाटू[६] । विशद[७] यशस्वी[८] ॥६५॥
जो संयोगीं[९] योग[१०] पुरविता । वियोगींही[११] योगक्षेम[१२] करिता । संयोगीं[१३] वियोगीं पाहतां । दुरी न जाय ॥६६॥
जया साहेना अभिमान । जो स्वयें निरभिमान । परी जयाच्या भक्तीचा अभिमान । मोक्षदायकू[१४] ॥६७॥
जयाची लवकणमात्र[१५] भक्ति । होतां कर जोडूनि ये मुक्ती ।
यत्पदीं[१६] जडलिया आसक्ती[१७] । तरी उपेक्ष्य[१८] मुक्ति होऊं पाहे ॥६८॥

अहो शुकादिक अतिविरक्त । परी यद्विषयवर्णनीं[१९] भक्त ।
जे आत्माराम[२०] जीवन्मुक्त[२१] । ते यत्प्रेम[२२] वर्णिती ॥६९॥
असो हा तात[२३] गुरु कांत[२४] । [२५]स्वामी सुहृदानंद अनंत ।
श्रीकृष्ण गोविंद मुकुंद भगवंत । गोपिकाकांत[२६] नंदसूनु[२७] ॥७०॥
पुढें प्रवृत्त[२८] झालिया कली[२९] । जो असुरांलागीं[३०] मोह[३१] घाली ।
तो बौद्धावतार वनमाळी । पाखंडापासोन[३२] रक्षो आम्हां ॥७१॥
हा अवतार जरी धरी[३३] एकविसावा । परी करुणेचा पूर्ण विसावा[३४]। अहिंसेचिया पूर्ण भावां[३५] । प्रकटविलें जेणें ॥७२॥

*(१) अक्रियरूप, क्रिया रहित (२) वस्तुस्थिति, रहस्य (३) कडु (४) प्रेमळांना मोह पाडण्यात म्हणजे प्रेमळांचे चित्त आपल्याकडे लावून घेण्यात (५) अतिप्रवीण (६) पतिपत्नीची स्तुति करणारा, ज्याला पतिपत्नी प्रेम अत्यंत आवडते (७) निष्कलंक (८) विजयी (९) दृष्टिसमोर असता (१०) ऐक्य करणारा (११) दृष्टीसमोर नसता (१२) ऐक्यरक्षण करणारा (१३) दृष्टीसमोर असो किंवा नसो (१४) मोक्ष देणारा (१५) क्षणभर व अंशमात्र (१६) ज्याच्या चरणी (१७) प्रेम (१८) नावडती (१९) ज्याचे गुणवर्णन करण्यांत आसक्त (२०) आत्म्याचें अनुसंधान करणारे. (२१) जीवंतपणीच मुक्त झालेले (२२) ज्याचा प्रेम (२३) बाप (२४) पति (२५) धनी, सेव्य (२६) गोपिकांचा पति (२७) नंदाचा मुलगा (२८) सुरू (२९) कलियुग (३०) दैत्यांना (३१) भ्रम उत्पन्न करिल (३२) वेदबाह्य धर्मापासून (३३) गणतीत, मोजणीत (३४) स्थान (३५) स्वरूपाला.*

क्षत्रियचि महा शूर । राजे परी अतिक्रूर । जैसे कां आपआपसांत तस्कर[१] । कलिकृतसंधींत[२] होतील कीं ॥७३॥
तदा[३] श्रीविष्णुयशप्रभावें[४] । कल्की अवतार हा संभवे[५]। मग मारोनि दुष्टां निजप्रभावें[६] । धर्म स्थापिता मागुती ॥७४॥
तो बावीसावा अवतारू । कल्की झाला शार्ङ्गधरू । जेथूनि पुनः उद्वारू[७] । कृतयुगाचा ॥७५॥
सूत म्हणे ऋषीप्रती । जी हरिहरमय[८] सत्त्वमूर्ती[९] । सकळ आगम[१०] कीर्ती । गाती जयाची ॥७६॥ (य३-४१)
ब्रह्मा विष्णु आणि रुद्र । याहुनि जो पर[११] । तो एक कर्पूरगौर[१२] । म्हणती शैव ॥७७॥
किंवा ब्रह्माविष्णुरुद्रापरौता[१३] । वैष्णव मानिती जिया रमाकांता । सकळ श्रुति जिया भगवंता । ईश्वर म्हणती ॥७८॥

॥दोहा ॥

परि या स्थलीं बोलती ठेवुनि मतअभिमान[१४] । शैव शिव वैष्णवहि हरी ते तंव चिन्त्य[१५] प्रमाण ॥७९॥

गद्य :- समस्त श्रुतिसमन्वयेंकरून[१६] श्री शुद्धसत्त्वोपहित[१७] परमात्मा उपास्य[१८] आहे. ज्याप्रमाणें एकच पुरुष स्त्रीचेठायीं[१९] निर्लज्ज होतो, वडिलाचेठायीं सलज्ज[२०] होतो, आणि पुत्रादिकांचेठायीं कृपानिष्ठ[२१] होतो, त्याप्रमाणें एकच परमात्मा सृष्टिकार्यार्थ[२२] यद्यपि[२३] - - -

*(१) लुटारू (२) कलि व कृतयुग यांच्या संधिकालांत (३) तेव्हा (४) विष्णुयश नांवाच्या ब्राह्मणाच्या पुण्यप्रभावाने (५) होईल (६) आपल्या सामर्थ्याने (७) सुरवात, आरंभ (८) शिवविष्णुरूप (९) शुद्धसत्वाची (१०) वेदशास्त्रे (११) पलिकडे (१२) शंकर (१३) पलिकडे (१४) मताचा आग्रह (१५) शंकास्पद (१६) सर्व श्रुतींची एकवाक्यता केली असता (१७) शुद्धसत्वाला आधार असलेला (१८) उपासना करण्यास योग्य (१९) स्वस्त्रीपाशी (२०) लज्जायुक्त (२१) कृपाळु (२२) जगताचे उत्पत्त्यादिक कार्य करण्याकरिता (२३) जरी*

त्रिगुणोपहित[१] होतो, तथापि स्वभक्तानुग्रहार्थ[२] ब्रह्मा, विष्णु, रुद्र या तीन्ही देवांचीं रूपें सत्त्वगुणानेंच धरितो. तो परमात्मा दंडकमंडलुविशिष्टमूर्त्युपहित[३] होत्साता ब्रह्मा होतो.*

*(टीप :- *हिरण्यगर्भ ब्रह्मा नाहीं हें सिद्धांतबिंदूंतील मधुसूदन स्वामीचें म्हणणें याच अभिप्रायाचें असावें.)*

श्रीवत्सलांछनादिविशिष्टमूर्त्युपहित[४] होत्साता विष्णु होतो आणि गंगामृगाङ्क[५] मस्तकादिविशिष्टमूर्त्युपहित होत्साता शिव होतो. म्हणून ह्या तिघांतून कोणाचेहीं भजन केलें असतां फल समान[६] होतें. परंतु हिरण्यगर्भाला जीवत्वधर्म[७] श्रुतींत[८] सांगितला असल्यामुळें, आणि अधर्मप्रादुर्भवनकालीं[९] ब्रह्मदेव शिवविष्णूला शरण गेला, हें पुराणांत सांगितलें असल्यामुळें, ब्रह्मदेवाचा यद्यपि कर्मकाण्डाचें[१०] ठायीं ईश्वरत्वेंकरून[११] स्वीकार[१२] आहे, तथापि किंचिज्जीवधर्मप्रतीतिरस्तव[१३] ज्ञानकाण्डाचें ठायीं उपासनार्थ[१४] स्वीकार नाहीं असें कोणी मानतात, तेंही योग्य असूं शकतें. कारण, महाभारतांत-

*(१) सत्त्व, रज, तम या तीन गुणांचा आश्रय करितो (२) आपल्या भक्तांवर अनुग्रह करण्याकरिता. म्हणजे सृष्टिकार्याकरिता घेतलेली ब्रह्माविष्णूशिव ही रूपे त्रिगुणाच्या आधाराने असली तरी भक्ताकरिता घेतलेली रूपे (ब्रह्मा विष्णु*

*शिव ) सात्त्विकच असतात (३) दंडकमंडलु धारण करणाऱ्या मूर्तीला आधार झाला असता. हिरण्यगर्भ ब्रह्मा नाही हे सिद्धान्तबिंदूतील मधुसूदनस्वामीचे म्हणणे याच अभिप्रायाचे असावे (४) श्रीवत्सलांछनादिचिन्हे ज्यामूर्तीचे ठिकाणी आहेत त्या मूर्तीला आधार होऊन (५) गंगा, चंद्र इत्यादि मस्तकावर धारण करणे हे ज्या मूर्तीचे चिन्ह आहे, त्या मूर्तीला आधार होऊन (६) सारखे (७) जीवाचे ठिकाणी राहणारे धर्म; भिणे इत्यादि धर्म (८) वेदामध्ये (९) अधर्म वाढला असता (१०) कर्मकांड (११) ईश्वरस्वरूपाने (१२) ग्रहण (१३) त्याचे ठिकाणी भय, चिंता, श्रम इत्यादि जीवाचे धर्म उपनिषदावरून दिसत असल्यामुळे (१४) उपासनेकरिता.*

**॥ श्लोक ॥**

**''रुद्रो नारायणश्चैवेत्येकं[१] सत्त्वं द्विधा कृतम् । लोके चरति कौन्तेय व्यक्तिस्थं सर्वकर्मसु ''॥**

असें दोनच भक्त्यंग[२] देवोपासनार्थ सांगितले आहेत. म्हणून (य३-४२) त्यांची ईश्वरत्वेंकरूनच उपासना होते. ह्या ठिकाणीं वादी निरनिराळ्या प्रकारें वाद करितात. ते सर्व एकदेशीय[३] आहेत. कारण विष्णुद्वेष करणाऱ्या शिवभक्तांला आणि शिवद्वेष करणाऱ्या विष्णुभक्तांना कूर्मपुराणादिकांत पतन[४] सांगितलें आहे. तें[५] पाहूनच कांहीं वादी गणेश, विष्णु, शक्ति[६], सूर्य आणि शिव असे पांच ईश्वर कल्पितात; तेंही सम्यक्[७] नाहीं. कारण, पांच ईश्वर कल्पिले[८] असतां परस्परेश्वरनिष्ठ[९] अन्योन्याभावास्तव भेदसिद्धि[१०] होत असल्यामुळें प्रत्येक ईश्वर अव्यापक[११] होईल. आणि पांचही व्यापक मानिले असतांनां सांकर्य[१२] होईल. तसेंच पांचांनाही सृष्टि करण्याची सारखीच सत्ता[१३] मानिली, तर त्या पांचही ईश्वरांची इच्छा आपापल्यापरी[१४] स्वतंत्र[१५] आहे, किंवा परस्परापेक्षी[१६] आहे?

*(१) श्लोकार्थ :- एक शुद्ध सत्वच शंकर व नारायण या दोन रूपांनी प्रगट होऊन, या सर्व लोकांमध्ये, सर्व प्रकारच्या उपासनेत, उपास्य म्हणून मूर्तिरूपाने स्थित आहे (२) भक्तीचे आलंबन (३) सर्व वेदात्यांना मान्य न होणारे (४) नरकप्राप्ति (५) शिवविष्णुभक्तांचा वाद पाहून (६) देवी (७) योग्य (८) मानिले (९) प्रत्येक परमेश्वराचे ठिकाणी दुसरा परमेश्वर व्यापक नसल्यामुळे (१०) प्रत्येकाचे स्वतंत्र निरनिराळे अस्तित्व होऊन (११) मर्यादित (१२) मिश्रण (१३) सामर्थ्य (१४) आपआपल्या पुरती (१५) दुसऱ्याच्या सामर्थ्याचे साह्य घेण्याची आवश्यकता नसलेली (१६) परस्परांना परस्परांच्या शक्तीचे साह्य लागणारी.*

पहिल्या पक्षीं[१] गणेशेश्वरानें[२] लय करण्याचें मनांत आणलें, तर शिवेश्वरानें[३] उत्पत्ति करण्याचें मनांत आणलें असतां, तितक्यांत शक्तीश्वरानें[४] स्थिति करण्याचें मनांत आणावें, हे पाहून विष्णु ईश्वरानें सर्व देव करण्याचें मनांत आणावें, व सूर्येश्वरानें सर्व असुर करण्याचें मनांत आणावें, आणि सर्वांच्याही इच्छा सफल व्हाव्या. असा स्वीकार[५] केला असतां सर्वत्र[६] सर्वोत्पत्ति[७], सर्वस्थिति, सर्वलय, सर्वदेव, सर्वासुरत्वादि सृष्टि एकसमयावच्छेदेंकरून[८] झाली पाहिजे. ती जर स्वस्कंधारोहणन्यायवत्[९] मनांत देखील कल्पितां[१०] येत नाहीं तर दृष्ट[११] होणार कोठलीं? आणि दुसऱ्यापक्षीं[१२] सर्वही ईश्वर जीवरूप होतील. म्हणून पंचेश्वरकल्पना[१३] व्यर्थ आहे. आणि तुकाराम महाराजांनांही हा पंचेश्वरवाद संमत नाहीं. ते म्हणतातः- ''शिव शक्ति आणि सूर्य गणपति । एकचि[१४] म्हणती विष्णूसही'' या वचनांत परपक्षोपन्यास[१५] करून - 'राजस भजनें[१६] वायां जाती' । असें पुढील वचनांत म्हटलें आहे. ह्या अभंगांत जो 'एक' शब्द आहे तो एकेश्वरमूलक[१७] पंचायतनवाचक[१८] नसून, पांचा व्यक्तींचें ठिकाणीं एकच ईश्वरत्व जाति[१९] आहे, या पंचेश्वरकल्पनेचा दर्शक आहे. म्हणूनच तुकाराम महाराजांनीं

*(१) विकल्पांत (२) गणेशरूपी ईश्वराने (३) शिवरूपी ईश्वराने (४) देवीरूपी ईश्वराने (५) मानले असता (६) सर्व ठिकाणी (७) सर्वांची उत्पत्ति, सर्वांचा प्रलय, सर्वत्र देव, सर्वत्र असुर अशी (८) एकदम एका वेळेस (९) आपल्या खांद्यावर आपण बसणे जसे अशक्य त्याप्रमाणे (१०) आणता (११) प्रत्यक्ष डोळ्याला दिसणार (१२) दुसऱ्या विकल्पांत (१३) स्वतंत्र पांच ईश्वर मानणे (१४) ईश्वरच (१५) पूर्व पक्षाचा उल्लेख करून (१६) भेद पूर्वक (१७) एकच ईश्वर आहे या कल्पनेला धरून (१८) त्यांत मग शिवाला ईश्वर मानल्यास बाकीचे विष्णु, गणपति, सूर्य, देवी यांना त्याच्या शक्तिरूपाने पाहणे, याप्रमाणे ज्याला जी मूर्ति प्रिय असेल, तिचे ठिकाणी मुख्य ईश्वरत्व मानून बाकीच्या ठिकाणी मुख्य ईश्वराच्या शक्तीच्या आविर्भावाची कल्पना करणे (१९) सामान्य साधारण ईश्वरत्व*

अभंगांतील 'एक' शब्दाला पूर्वपक्षाच्या हातीं दिलें आहे. त्यांनीं एकेश्वरमूलक पंचायतन खंडन केलें असा 'एक' शब्दावरून कोणी अर्थ काढील तर -

**॥ अभंग ॥**

**'हरिहरां नाही भेद । नाहीं करूं नये वाद ॥१॥**
**एक एकांचें हृदयीं । गोडी साखरेच्या ठायीं ॥२॥ (य३-४३)**
**भेदकासी[१] नाड[२] । एक वेलांटीच आड[३] ॥३॥**
**उजवें वाम[४] भाग । तुका म्हणे एक अंग' ॥४॥**

इत्यादि हरिहरांचें[५] ऐक्य सांगणाऱ्या तुकाराम महाराजांच्या अभंगाशींच येणाऱ्या विरोधाचा त्याच्याकडून परिहार[६] होणार नाहीं. कांहीं वेदांतमतांत प्रत्येक जीवाची सृष्टि व ईश्वर निरनिराळे मानले आहेत खरें; पण त्या मतांत देखील एका सृष्टीला एकापेक्षां अधिक ईश्वर मानिले नाहींत. वेदान्तांत जीवाच्या एकत्वनानात्वाविषयीं जरी वाद[७] आहे, तरी ईश्वर सर्व एकच मानितात; आणि ईश्वरामध्यें आवरण[८] कोणी स्वीकारित नाहींत. अतः, गौरवदोषास्तवही[९] पांच ईश्वर कल्पिणें व्यर्थ आहे. यद्यपि श्रीमच्छंकराचार्यांनीं उपासनार्थ पंचायतनपूजा उपदेशिली आहे, तथापि ती एकेश्वरमूलक[१०] आहे. पृथक् पांच ईश्वर मानिले नाहींत. अशाविषयीं गणेशपुराणांत व्यासोक्तिही[११] आहे.

**॥ श्लोक ॥**

**'शिवे विष्णौ च शक्तौ च सूर्ये मयि नराधिप ।**
**याऽभेदबुद्धिर्योगः स सम्यग्योगो मतो मम' ॥**

*(१) भेद करणारास (२) तोटा (३) मध्ये (४) डावे (५) शिवविष्णूंचे (६) समर्थन (७) मतभेद (८) अज्ञान, आत्मविस्मृति (९) सुलभ व थोडक्यात योग्य असणारी कल्पना सोडून अवघड कल्पना करणे (१०) एकच ईश्वर मानून (११) व्यासांचे वचन*

गणेश म्हणतात :- हे वरेण्य राजा, शिव, विष्णु, शक्ति, सूर्य आणि मी, या पांचांचेहीं ठिकाणीं एकेश्वर बुद्धीनें[१], म्हणजे हे शुद्धसत्त्वरूप[२] कारणब्रह्म[३] आहेत, अशा अभेद भावनेनें चित्त स्थिर होण्यालाच मी उत्तम प्रकारचा योग म्हणतों. म्हणून एकच ईश्वर पांच रूपांनीं भक्तानुग्रहार्थ झाला हें सिद्ध आहे. त्यांतही शिवविष्णूपासना सत्त्वनिष्ठ[४] पुरुषांचें ठायीं बहुतेक दिसतात. पुन्हा येथेंही वाद आहेच. शैव म्हणतात, 'ब्रह्मा, विष्णु, रुद्र, यांहून वेगळी एक शिवमूर्ति आहे;' आणि वैष्णव म्हणतात, 'ब्रह्मा, विष्णु, रुद्रांच्या पलीकडे एक वासुदेव आहे. तोच मुख्य उपास्य आहे.' हे वैष्णव आणि शैव आपल्या इष्ट मूर्तीला कारणरूप समजत नाहींत, असें त्यांच्या दुसऱ्या मताशीं केलेल्या विरोधावरून दृष्टीस पडतें. हे दोघेही वादी आपापल्या मतांनां श्रुतीचें एकदेशीय[५] प्रमाणही देतात. परंतु त्या श्रुतीचें इतर तर्कानुगृहीत सर्वश्रुतिसमन्वयबलेंकरून[६] कारणब्रह्मपर[७] तात्पर्यानयन[८] घडतें. म्हणून त्रिमूर्तिविरहित[९] शैवांनीं कल्पिलेला शिव आणि वैष्णवांनीं कल्पिलेला वासुदेव याविषयीं प्रमाण चिंत्य[१०] (य३-४४) आहे. कारण श्रुतिभिन्न[११] तंत्रादिकांनां[१२] स्वतंत्र[१३] प्रामाण्य नाहीं; आणि युक्ति[१४] व अनुभव यांनांही तसें जुळत नाहीं. म्हणून एकच ईश्वर भक्तानुग्रहार्थ

*(१) ईश्वर एकच आहे (२) शुद्धसत्व म्हणजे त्रिगुणात्मक मायेचे नियमन करणारे सत्व ही उपाधी आहे ज्याला (३) जगदुत्पत्ति वगैरे करणारे पूर्ण ब्रह्म (४) सात्विक (५) एकांशाने, एकादी श्रुति (६) ज्या श्रुतींनी आपले म्हणणे बुद्धीस पटेल अशा रितीने तर्कास धरून मांडले आहे त्या सर्व श्रुतींची एकवाक्यता करून पाहता (७) जे सर्वाला कारण आहे व ज्याला दुसरे कारण नाही व जे स्वरूपाने नटले आहे (८) तात्पर्य दाखविणे (९) ब्रह्मा, विष्णु व शंकर या तिघांहून निराळा (१०) शंकास्पद (११) वेदाहून निराळे (१२) इतर कोणत्याहि आगमाला (१३) वेदाला सोडून (१४) तर्क*

विष्णुशिवरूप होतो हें सिद्ध आहे. तरी पुन्हा स्वमतीय[१] कोणी म्हणतात कीं, विष्णूपासना प्रत्यक्ष[२] मोक्षसाधन[३] आहे; आणि शिवोपासना तर किंचित्कालेंकरून[४] मोक्षसाधन आहे.

**॥ श्लोक ॥**

**''आरोग्यं भास्करादिच्छेत् छ्रेयमिच्छेद् हुताशनात् । ज्ञानं महेश्वरादिच्छेत् मोक्षमिच्छेज्जनार्दनात्'' ॥**

'सूर्यापासून आरोग्य मिळण्याची इच्छा करावी, कल्याणाची अग्नीपासून करावी, ज्ञानाची शिवापासून व मोक्ष मिळण्याची विष्णूपासून करावी. ज्ञान हें मोक्षाचें साधन व मोक्ष ज्ञानाचें फळ आहे. म्हणून फल लौकर देणाऱ्या विष्णूचीच उपासना श्रेष्ठ आहे.' - ही स्मृति ते आपल्या म्हणण्याला प्रमाण देत असतात. परंतु या म्हणण्यांतही रुची[५] वाटत नाहीं. कारण -

**'रुद्रो नारायणश्चैवेत्येकं सत्वं द्विधा कृतम्'**
**'उमासहायं त्रिपुरान्तकं विभुम्'**
**'नारायणाख्यम्'**
**'यो ब्रह्माणं विदधाति पूर्वम्'**
**'एको नारायणो देवो'**

इत्यादि श्रुतिस्मृतिवरून वरील स्वमतीयाचेंही म्हणणें बाधित होतें[६]; आणि प्रमाण घेतलेल्या स्मृतींचें अर्थांतर[७] होणें शक्य आहे, किंवा श्रुतिविरुद्ध असल्यास तिचा बाधही[८] होणें शक्य आहे. म्हणून शिवविष्णूची उपासना समान फलदात्री[९] आहे. तथापि, या विषयांत[१०] वाद करण्यांत अर्थ नाहीं. दुसऱ्याचा द्वेष न करितां मुमुक्षूला आवडेल त्याची उपासना ग्रहण करावी; आणि तिच्यावर विश्वास ठेवावा. उपासनेची मीमांसा[११] करण्यांत कांहीं तिच्या फलाची[१२] प्राप्ती नाहीं, केवळ मनोरंजन[१] मात्र आहे;

*(१) अद्वैत वेदान्तीच (२) साक्षात्, तात्काल (३) मोक्ष देणारी (४) कांही कालाने (५) स्वारस्य (६) खंडीत (७) दुसरा अर्थ (८) खंडन (९) फल देणारी (१०) बाबतीत (११) श्रेष्ठ कोणती कनिष्ठ कोणती इत्यादि विचार (१२) तेवढ्याने फळ मिळत नाही*

केवळ मनोरंजन[१] मात्र आहे; आणि ज्ञानाची मीमांसा[२] करण्यांत त्याची प्राप्ति आहे म्हणून ज्ञानाचा विचार करावा, व उपासना निष्ठेनें[३] करावी. **'एको देवः केशवो वा शिवो वा'** असें अपर[४] वचनही आहे. तथापि, **आपण जी उपासना करितों, तीच शिष्यादिकांनीं करावी असा कोणत्याच गुरु म्हणवून घेणाऱ्या पुरुषानें आग्रह करूं नये.** म्हणून उपासनेची मीमांसा करणें हितावह[५] आहे, आणि ती (य३-४५) येथें संक्षेपानें केलीही आहे. विशेष विस्तार 'आगमरहस्य[६]पर्याप्ति' ग्रंथांत करीन. असो. हें विष्णुशिवात्मक[७] शुद्धसत्त्व[८] कारणब्रह्म[९] ध्येयलिंगत्वेंकरून[१०] पौरुषेयरूप[११] असल्यामुळें, तळ्यापासून निघणाऱ्या लहान लहान प्रवाहाप्रमाणें[१२] सर्व अंशकलावतार[१३] येथूनच होतात.

श्री गर्गसंहिता गोलोक खंड अध्याय १ श्लोक १३, १४, व १६ ते २६–.

**श्रीनारदउवाच :-**

**[१४]'गोसाधुदेवताविप्रवेदानां रक्षणाय वै । तनुं धत्ते हरिः साक्षाद्भगवान् आत्मलीलया ।।१३।।**

*(१) करमणूक (२) चिकित्सा (३) दृढ श्रद्धेने (४) दुसरे (५) फायदेशीर (६) ग्रंथ करण्याचे योजिले पण तो तयार झाला नाही (७) विष्णु-शिव स्वरूप (८) मायागुणरहित (९) सर्वज्ञ व सर्वशक्ति व सर्वरूप होणारे (१०) ध्यान करण्याला योग्य असे चिन्ह किंवा रूप ज्याचे ठिकाणी सांगितले आहे (११) पुरुषाचे ठिकाणी जसे अवयव असतात त्याप्रमाणे त्याचे ठिकाणीहि निरनिराळ्या अवयवांची कल्पना करून ते सांगितले असल्यामुळे (१२) झऱ्याप्रमाणे (१३) स्पष्टीकरण पुढे आहे (१४) १३ ते २६ **श्लोकांचा अर्थ** - गाय, साधु, देवता, ब्राह्मण व वेद यांचे रक्षण करण्याकरिता भगवान् श्रीहरी आपल्या इच्छेने शरीर ग्रहण करतो. ।।१३।।*

**यथा नटः स्वलीलायां मोहितो न परस्तथा । अन्ये दृष्ट्वा च तन्मायां मुमुहुस्ते न संशयः ।।१४।।**
**अंशांशोंऽशस्तथावेशः कलापूर्णः प्रकथ्यते । व्यासाद्यैश्च स्मृतः षष्ठः परिपूर्णतमः स्वयम् ।।१५।।**
**अंशांशस्तु मरीच्यादिरंशा ब्रह्मादयस्तथा । कलाकपिलकूर्माद्या आवेशा भार्गवादयः।।१७।।**
**पूर्णो नृसिंहो रामश्च श्वेतद्वीपाधिपो हरिः। वैकुंठोऽपि तथा यज्ञ-नर-नारायणाः स्मृताः ।।१८।।**
**परिपूर्णतमः साक्षाच्छ्रीकृष्णो भगवान्स्वयम् । असंख्यब्रह्मांडपतिर्गोलोके धाम्नि राजते ।।१९।।**
**काव्याधिकारं कुर्वन्तः सदंशास्ते प्रकीर्तिताः । तत्कार्यभारं कुर्वन्तस्तेंऽशांशा विदिताः प्रभोः ।।२०।।**

***श्लोकार्थ :-*** *ज्याप्रमाणे एखाद्या नाटकातील नट आपल्या लीलेने स्वतः मोह पावत नाही पण दुसरे प्रेक्षक मात्र त्याला पाहून मोह पावतात, त्याप्रमाणे भगवान् आपल्या लीलेच्या योगाने स्वतः मोह पावत नाही पण इतर मात्र मोह पावतात ।।१४।। त्या भगवंताचे **(१)** अंशावतार, **(२)** अंशांशावतार, **(३)** आवेशावतार, **(४)** कलावतार, **(५)** पूर्णावतार असे पांच अवतार असून व्यासादिकांनी **(६)** परिपूर्णतम असा सहावाहि अवतार सांगितला आहे ।।१६।। मरीच्यादिक ऋषि हे अंशांशावतार असून ब्रह्मदेवादिक त्या भगवंतचे अंशावतार आहेत. कपिलाचार्य कूर्मादिक हे कलावतार होत आणि भार्गव म्हणजे परशुरामादिक हे आवेशावतार समजावे ।।१७।। नृसिंह, रामचंद्र व श्वेतद्वीपात असणारे भगवद्रूप, वैकुंठस्वरूप, यज्ञ, नरनारायण ही सर्व*

*रूपे पूर्णावतार आहेत ॥१८॥ व भगवान् श्रीकृष्ण फक्त परिपूर्णतम अवतार आहे. असंख्य ब्रह्मांडे ज्यापासून निर्माण होतात तो भगवान् श्रीकृष्ण गोलोकात राहत असून वेदादि ग्रंथ निर्माण करण्याचा अधिकार चालविणारे अंशावतार म्हटले जातात. वेदादि ग्रंथांचे प्रसारकार्य किंवा स्पष्टीकरणकार्य करण्याचा भार आपल्या शिरावर घेऊन तो पार पाडणारे अंशांशावतार होत ॥१९-२०॥*

**एषामंतर्गतो विष्णुः कार्यं कृत्वाविनिर्गतः। तानावेशावतारांश्च विद्धि राजन् महामते ॥२१॥**
**धर्मं विज्ञाय कृत्वा यः पुनरन्तरधीयत । युगे युगे वर्तमानः सोऽवतारः कला हरेः ॥२२॥** (य३-४६)
**चतुर्व्यूहो[१] भवेद्यत्र दृश्यन्ते च रसा नव । अतः परं च वीर्याणि स तु पूर्णः प्रकथ्यते ॥२३॥**
**यस्मिन् सर्वाणि तेजांसि विलीयंते स्वतेजसि । तं वदन्ति परं साक्षात्परिपूर्णतमं स्वयम् ॥२४॥**
**पूर्णस्य लक्षणं यत्र यं पश्यन्ति पृथक् पृथक् । भावेनापि जनाः सोयं परिपूर्णतमः स्वयम् ॥२५॥**
**परिपूर्णतमः साक्षाच्छ्रीकृष्णो नाऽन्य एवहि । एक-कार्यार्थमागत्य कोटिकार्यं चकार ह ॥२६॥**

*ज्यांच्या अंतर्यामी विष्णु राहून म्हणजे त्याचा आवेश होऊन व विशिष्ट कार्य करून परत निघून जातो ते आवेशावतार होत असे समज ॥२१॥ युगायुगाचे ठिकाणी प्रगट होऊन, धर्म जाणून जे धर्माचे स्थापन करितात व पुनःअंतर्धान पावतात ते हरीचे कलावतार आहेत ॥२२॥ ज्या अवतारात भगवंतांनी आपली चार स्वरूपे प्रगट केली आहेत, ज्याचे ठिकाणी नव रस उत्पन्न होतात व ज्याचे ठिकाणी लोकोत्तर पराक्रम दिसून येतात त्याला पूर्णावतार म्हणतात. ॥२३॥ ज्याच्या स्वरूपभूत तेजामध्ये सर्व तेजे लीन होतात त्याला परिपूर्णतमावतार म्हणतात ॥२४॥ हे पूर्णत्वाचे लक्षण असून ज्याचे ठिकाणी उपासक लोक निरनिराळ्या भावना ठेवू शकतात, तोहि परिपूर्णतम अवतार समजावा, परिपूर्णतम अवतार तर एक श्रीकृष्णच आहे दुसरा कोणी नाही कारण एका कार्याकरिता अवतार घेतला असता त्याने अनंत कार्ये त्या अवतारात केली. ॥२५-२६॥*

याप्रमाणें गर्गसंहितेंतील अवतारांची प्रक्रिया असून या ग्रंथांत ती संक्षेपानें सांगितली असल्यामुळें, सूत्रप्रायत्वास्तव[१] विरोध शंकनीय नाहीं. या ग्रंथांतील प्रक्रिया अशी :-

ईश्वराचें काहीं अंशावतार आहेत व कांहीं कलावतार आहेत. अंशावतार म्हणजे सर्वशक्तिमत्ता[२] गुप्त असून उपयोगापुरतीच शक्ति प्रकट होणें; आणि कलावतार[३] म्हणजे सर्वशक्तिमत्ता गुप्त नसून उपयोगापुरत्याच शक्तींचा आवेश मात्र होणें. त्यांत मत्स्यादि अंशावतार आहेत. आणि नारदवसिष्ठादि महर्षी, स्वायंभुवादि मनु, ब्रह्मादि देव, विवस्वत्प्रियव्रतादि महातेजस्वी मनूंचे पुत्र आणि कश्यपादि प्रजापति हे सर्व परब्रह्मपुरुषरूप[४] हरीचेच कलावतार होत. म्हणून-

*(१) गर्ग संहितेत सविस्तर अवतारांची मीमांसा केली असून ती भागवतात संक्षेपाने सूत्रप्राय केली असल्यामुळे, भागवतकाराना गर्ग संहितेतील मीमांसा मान्य नाही असे म्हणता येत नाही, उलट भागवतातील सूत्ररूप अवतारमीमांसेचा गर्गसंहितेत विस्तार असल्यामुळे दोन ग्रंथात विरोध नाही (२) सर्वज्ञता व सर्वशक्तित्व म्हणजे अंशावतार सर्वज्ञ व सर्वशक्ति असे पूर्णच असतात, पण ती पूर्ण सर्वज्ञता व सर्वशक्तिमत्ता प्रगट न करता आवश्यक तेवढीच प्रगट करितात (३) कलावतार सर्वज्ञ व सर्वशक्ति नसतात तर त्यांचे ठिकाणी त्या शक्तींचा जरूर असेल तितका आवेश म्हणजे संचार होतो (४) ज्या परब्रह्माचे ठिकाणी, ब्रह्मांडातील पदार्थ, अवयवरूपाने कल्पून त्याला शरीरधारी बनविले त्याचा*

यांचें ठिकाणीं उपयोगापुरताच शक्तीचा आवेश आहे. जसें, सनत्कुमार-कपिलादिकांचे ठायी उपयोगी ज्ञानशक्तीचा आणि पृथ्व्यादिकांचें ठायीं[१] बलशक्तीचा आवेश आहे. परंतु श्रीकृष्णावताराची गोष्ट तशी नाहीं. उपयोगी आणि अनुपयोगी[२] सर्व शक्तींचा विकास[३] तारितावरून[४] दिसत असल्यामुळें अमृताच्या बिंदूंतही[५] अमर करण्याची शक्ति जशी अमृतसिंधूसारखीच असते, तशा श्रीकृष्णरूप लहानशा मूर्तीतही सर्व शक्ती सारख्याच दिसतात. आणखी **'विवक्षितगुणोपपत्तेश्च**[६]**'** हें सूत्र याला प्रमाण आहे. या सूत्राचा अभिप्राय असा. ... ... 'विवक्षिताः' याचा अर्थ 'वक्तुमिष्टाः' म्हणजे बोलण्याला योग्य असे; ... ... आणि जी गोष्ट मनुष्याच्या मनास आवडणारी असेल तीच तो बोलत असतो. (य३-४७)

**'मानस ओळखिजे बोले'** हें तातांचें[७] वचन तुला माहितच आहे. पण मनास आवडणाऱ्या सर्वच गोष्टी बोलण्याला योग्य नसतात. जसें, मैथुन हें मनास आवडतें पण बोलण्याला योग्य नाहीं. म्हणून मनास आवडणारे व बोलण्याला योग्य जे गुण असतील ते एका परमात्म्याच्याच ठिकाणीं कल्पून[८] त्याचें ध्यान करणें जीवाला शक्य आहे. म्हणून त्याची उपासना श्रुती सांगतात. ... ... ...

शिष्य :- महाराज, मनाला आवडणारे व बोलण्याला योग्य असे परमात्म्याचे कोणते गुण वेदांत सांगितले आहे ?

श्रीगुरु :- ते गुण म्हटले म्हणजे **'सत्यसंकल्पादयो गुणाः'** हे होत. म्हणजे, उत्पत्ति, पालन, व संहार करण्याची अप्रतिहत[९] अशी शक्ती. ... .... अशा रीतीनें आपल्याला आवडणारे गुण श्रीकृष्ण परमात्म्याचें ठिकाणीं संभवतात. ... ... म्हणूनच परमात्म्याची उपासना श्रुतींत सांगितली आहे. ... ...

*(१) ठिकाणी (२) अवतारकाली जरूर असलेल्या व जरूर नसलेल्या (३) प्रगटभाव (४) त्याच्या चरित्रावरून (५) एका थेंबात (६) ब्रह्म सूत्र अ. १ पा. २ सू. २. (७) श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे (८) मानून (९) जिला कधी अडथळा उत्पन्न होणार नाही अशी.*

आतां, तुला येथें **एक रहस्य** सांगावयाचें राहिलें आहे. तें हेंच कीं विभुतीची[१] उपासना जशीच्या तशीच उपयोगी पडते, म्हणजे परमात्म्याचें ठिकाणीं आपल्या आवडीच्या गुणाचा आरोप[२] केला असतां चालतो; पण विभूतींच्या ठिकाणीं तसें चालत नाहीं. * मारुतीचें ध्यान करावयाचें आहे, तर ते त्याच्या ठरलेल्या गुणांप्रमाणेंच म्हणजे इतिहासांत[३] वर्णन केल्याप्रमाणेंच केलें पाहिजे. तसें न करतां त्याच्या डाव्या हाताकडे बायकोचें ध्यान केलें तर नाश होईल. म्हणून त्याला आपल्याला आवडतील ते गुण देतां येत नाहींत. *तसेंच सूर्यनारायणाची मूर्ति काढावयाची आहे तर पाय नाहींत अशीच काढली पाहिजे. तिला पाय काढले कीं त्याचा नाश झालाच. ह्याप्रमाणेंच इतर सर्व देवतांचेही गुण ठरलेले आहेत. त्यांच्या ठिकाणीं 'विवक्षित' म्हणजे आपल्याला आवडतील त्या गुणांचा आरोप करतां येत नाहीं. ... ... पण श्रीकृष्णाचें ध्यान आवडेल तसें करावें. म्हणजे दोन्ही प्रकारानें त्यांचें ध्यान करतां येते. निर्गुणाचें ठिकाणीं विवक्षितगुणोपपत्ति[४] संभवत नाहीं. म्हणून 'विवक्षितगुणोपपत्तेश्च' हें सूत्र सगुण ईश्वरपरच व त्यांतही श्रीकृष्णपरच आहे असें जोरानें[५]म्हणतां येईल.(य३-४८)

*(१) परिपूर्ण परमात्म्याच्या एखाद्या शक्तीचा कांही अंशाने जेथे आविर्भाव झाला आहे. अशा ठिकाणी (२) कल्पना (३) ब्रह्मचारी रूपाने (४) आपल्याला आवडणाऱ्या गुणाची योग्यता (५) प्रमाणपुरःसर आग्रहाने.*

श्रीकृष्णानें अर्जुनाला गुरु ह्या नात्यानें गीता सांगितली. म्हणून गुरुरूपानेंही त्यांची उपासना चालते; पतिरूपानें[१] तर ते आहेतच. जरी अगस्तिसंहितेंत रामाची उपासना पतिरूपानें सांगितली आहे, तरी ती शांत[२] मधुररूपानेंच होते, तीव्र[३] माधुर्यरूप होऊं शकत नाहीं. कारण त्यांचें कडकडीत एकपत्नीव्रत[४] आहे.

*षड्गुणैश्वर्य / सर्वगुणैश्वर्य*

यावरून[५] आपल्याला जे जे आवडते गुण आहेत त्याला आधार श्रीकृष्णमूर्तीच ठरते. ... ... कारण श्रीकृष्णाच्या बहुतेक लीला सर्वमयच[६] आहेत;

जसें श्रीकृष्णाच्या मुरलीनादानें देवांगना[७] मोहित झाल्या, यावरून त्यांचें ठिकाणीं (१) **श्री** म्हणजे मनोहर[८] शोभा सिद्ध होते.

हनुमंतानें आणलेल्या द्रोणागिरीचा पडलेला एक लहान तुकडा श्रीकृष्णानें उचलून धरिला असतांनां त्यांना गिरिधर[९] नांव पडलें, यावरून त्यांचें ठिकाणीं (२) **यश** म्हणजे थोड्या कर्मानें[१०] अत्यंत कीर्ती व श्रेय मिळणें हें सिद्ध होतें.

तसेंच सुदामाचें पोहे भक्षण करून त्याला सुवर्णनगरी प्रदान[११] केल्यानें **(३) सामान्य[१२] औदार्य**;

'परित्राणाय साधूनाम्' 'संभवामि युगे युगे' इत्यादि वचनांवरून **(४) अभयदान**[१३] औदार्य,

दैत्य व ऋषी यांनां समान[१४] मोक्षफल दिल्यामुळें (५) **अभेदौदार्य**[१५],

*(१) पतिरूपाने तर त्यांची उपासना चालतेच, कारण प्रत्यक्ष गोपिकांनी ती केलीच आहे (२) जसे एखाद्या कुमारिकेच्या अंतःकरणात, पसंत पडलेल्या मुलाविषयी गुप्त पतिप्रेम असते त्याप्रमाणे (३) उघड पतीचे नाते ठेवून विवाहित स्त्रीप्रमाणे, उघड पति प्रेमाने (४) सीतेवांचून दुसरी पत्नी नाही (५) ज्या ज्या आवडत्या गुणांचा किंवा भावनांचा आरोप करावासा वाटेल तो श्रीकृष्णाचे ठिकाणीच करता येतो (६) सर्व भावनांचा आधारभूत (७) देवांच्या स्त्रिया (८) अत्यंत सौंदर्य (९) पण हनुमंताला गिरिधर हा किताब मिळाला नाही (१०) कर्तृत्वाने (११) सोन्याची नगरी देणे (१२) निरनिराळ्या विशेष प्रकारच्या औदार्यास कारण असणारे सर्वसामान्य औदार्य (१३) अभय देणे हे औदार्य (१४) एक सारखे (१५) दुष्ट असो की चांगला असो दोघांनाहि सारखे पाहणे हा मोठेपणा.*

गुरु व माता यांच्या इच्छानुसार पुत्रप्रदान[१] केल्यामुळें (६) **दातृत्वौदार्य**[२], असें चतुर्विध[३] औदार्य[४] त्यांचें ठायीं सिद्ध होतें.

'चातुर्वर्ण्यं मया सृष्टं' या वचनावरून (७) **व्यवस्थाकारी[५] ज्ञान** सिद्ध होतें.

'न मे द्वेष्योऽस्ति न प्रियः' यावरून (८) **बंधनिवर्तक[६] ज्ञान** सिद्ध होतें.

आणखी द्रौपदीच्या हाकेबरोबर भोजन सोडून धांवत जाणें, गोपिकांच्या अभिमानास्तव रासांत गुप्त होणें, इ. (९) **विषयत्यागरूप[७] वैराग्य,**

यादवपुरीला आपल्या इच्छेनें सोडणें हें (१०) **संगत्यागरूप[८] वैराग्य,**

विदुराच्या घरीं जाऊन कदान्न[९] भक्षण करणें हे (११) **यदृच्छालाभ[१०] वैराग्य,**

आपण राज्यावर न बसतां उग्रसेनाला बसविणें हें (१२) **इहफलभोगवैराग्य**[११],

सत्यभामेच्या वचनावरून स्वतः[१२] दान जाणें, रुक्मिणीवचनावरून[१३] तप करणें हें **(१३) प्रारब्धावधारण[१४] वैराग्य,**

स्यमंतकमणि सत्राजितकन्येलाच देणें, पारिजातकवृक्षाशिवाय स्वर्गीय[१५] कांहींच न घेणें, हें **(१४) अमुत्रफलभोग[१६]वैराग्य,**

गोपिकांना निष्काम करणे, नारदाला माया[१७] दाखविणें, आनंदाचें क्रीडास्थान[१८] गोलोक करणें,मुखांत अनंत ब्रह्मांड दाखविणें (य३-४९) आपले रूप व्यापक[१] करून अर्जुनाला विश्वरूप दाखविणें, हें (१५) **पूर्णता[२] ऐश्वर्य[३]**,

*(१) मेलेले पुत्र परत आणून भेटविले (२) इच्छेनुसार देण्याचा मोठेपणा (३) चार प्रकारचे (४) मनाचे मोठेपण (५) जगांत सुव्यवस्था कशी नांदेल याच्या कर्तृत्वाचे ज्ञान (६) संसाररूपी बेडी नाहिसे करणारे ब्रह्मज्ञान (७) विषयसुखावर लाथ मारणे (८) आसक्ति सोडणे (९) रुक्ष व ज्वारी वगैरे दरिद्री लोक खातात ते अन्न (१०) प्रारब्धाने जसे मिळेल तसे आनंदाने भोगणे (११) मृत्युलोकांतील विषयाचे सुखाचा त्याग करणे (१२) स्वतःला दान देऊ देणे (१३) रुक्मिणीच्या म्हणण्याकरिता (१४) प्रारब्धावर सर्व सोपविणे (१५) स्वर्गातील (१६) परलोकांतील विषयसुखाचा तिटकारा (१७) सोळा हजार एकशे आठ ज्या भगवंताच्या स्त्रिया त्या सर्वांच्या घरी एकाच वेळी आपण असल्याचा व सर्व प्रकारचा संसार करीत असल्याचा देखावा (१८) आनंदाने किंवा आनंदोत्पादक क्रीडा करण्याचे ठिकाण.*

आपले रूप व्यापक[१] करून अर्जुनाला विश्वरूप दाखविणें, हें **(१६) पूर्णता[२] ऐश्वर्य[३]**,

धर्माघरीं[४] उच्छिष्ट[५] काढणें, कालयवनाचे भीतीनें पळून जाणें, गांधारीच्या शापाचा अंगिकार करणें, पांडवाचें स्थळीं[६] स्थळीं आपल्या प्राणाहूनही रक्षण करणें, हें **(१७) ब्रिदावधारण[७] ऐश्वर्य**,

भोग भोगून ब्रह्मचारी म्हणून प्रेत उठविणें, इत्यादि अवशिष्ट[८] लीलावरून **(१८) कर्तुमकर्तुमन्यथा[९] कर्तुं शक्तिऐश्वर्य**, हीं भगवान गोपालकृष्णाचें ठायीं[१०] सिद्ध होतात.

तसेंच 'कृष्णाय देवकीपुत्राय' ह्या सामवेदीय[११] श्रुतीवरून, द्वापारांत झालेल्या 'ब्रह्मरात्रे उपावृत्ते' अशा रासलीलेवरून व कलियुगांत नरसिंमेहता व अस्मादिकांनीं पाहिलेल्या पाहत असलेल्या, व पुढें पाहणाऱ्या रासलीलेवरून, त्रिकालाबाध्यता[१२] सिद्ध होत असल्यामुळें, अस्मत्प्रभूच्या ठिकाणीं **(१९) सत्यतास्वरूपलक्षण**[१३] सिद्ध होतें;

व ' पालिता गोपसुंदर्यः स कृष्णः॒ापि नो गतः' या पद्मपुराणांतर्गत[१४] वाक्यावरून व 'दिव्य दृष्टिबिन दृष्टि न आवे' या चरणदासजीच्या वचनावरून वृंदावनविहारी श्रीकृष्णलीला वाटेल तेव्हां पाहणें प्रेमळ भक्तांनां शक्य असल्यावरूनही त्यांचें ठिकाणीं (**२०**) **सत्यतास्वरूपलक्षण**[१३] सिद्ध होतें.

गीतादिवचनांनीं अविद्या[१५] दूर[१६] केल्यामुळें **(२१) ज्ञानस्वरूपलक्षण**[१७] सिद्ध होतें.

यशोदेला भिंतीं, खांब, आकाश, पृथ्वी, हे सगळे आपलेच स्वरूप आहे असें दाखविल्यामुळें, सर्व गोपींच्या समक्ष रासांत अनंतरूपें झाल्यामुळें, सोळाहजार स्त्रियांशीं एकाच वेळीं लग्न केल्यामुळें, व नारदांनां प्रत्येक घरांत आपले स्वरूप दाखविल्यामुळें, **(२२) अनंततारूपलक्षण**[१८] सिद्ध होतें.

*(१) ब्रह्मांडभर (२) पूर्णपरब्रह्मता (३) ईश्वरी सामर्थ्य (४) धर्म राजाच्या घरी (५) उष्टे (६) प्रत्येक प्रसंगी, संकटात (७) आपले भक्तवात्सल्यरूप ब्रीद पाळणे (८) इतर बाकीच्या (९) वाटेल ते करण्याचे (१०) ठिकाणी (११) सामवेदातील (१२) केव्हांहि नाश न होणे, अविनाशित्व (१३) सदिानंद हे जे परब्रह्माचे स्वरूपलक्षण त्यापैकी सत् स्वरूप (१४) पद्मपुराणांतील*

*(१५) अर्जुनाचे अज्ञान (१६) नाहिसे (१७) चित्स्वरूप (१८) सर्वव्यापक, अमर्याद.*

अखंड रास करीत असल्यामुळें, व गोलोक, व्रज, व भक्तांचें हृदय, या ठिकाणीं उल्हासयुक्त[१] राहत असल्यामुळें **(२३) आनंदतारूपलक्षण**[२] सिद्ध होतें.

वत्सहरणसमयीं नूतन[३] गायीगोपाळ उत्पन्न केल्यामुळें, नंदाला वैकुंठ दाखविण्याचें वेळीं सर्व लोकांचें[४] पालन केल्यामुळें, व विश्वरूपांत अर्जुनाला सर्वांचा लय दाखविल्यामुळें, श्रीकृष्णाचें ठिकाणीं तटस्थलक्षण[५] सिद्ध होतें. याप्रमाणें श्रीकृष्णाचें ठिकाणीं वेदोक्त **(२५) तटस्थलक्षण**[६] **व (२६) स्वरूपलक्षण**[७] सिद्ध होत असून त्यांच्या लीला सर्वमय[८] ठरतात, तसें इतरांचें[९] नाहीं.

*(हा विषय स्वमंतव्यांश सिद्धांततुषार यष्टि ६ ग्रंथांत सविस्तर अवलोकन करावा.)*

जसें, दत्तात्रयाचें ठिकाणीं पतिभाव चालणार नाहीं. (य३-५०) कारण ते ब्रह्मचारी आहेत. इतकेंही करून पतिभाव ठेविल्यास आपली भक्ती चुलींत[१०] जाईल व आपण मरून जाऊं. म्हणून हें सूत्र दत्तात्रयपरही लागत नाहीं. तसेंच शंकरपरही तें कष्टानें[११] लागेल. पण श्रीकृष्णपर मात्र 'विवक्षितगुणोपपत्तेश्च' हें सूत्र अगदीं तंतोतंत्र लागतें. व ह्या सूत्रप्रमाणावरूनही तें नारायणरूप कारण ब्रह्मच[१२] कृष्णरूपानें आविर्भाव[१३] पावलें असें सिद्ध होतें. म्हणजे श्रीकृष्ण हा स्वयं भगवानच आहे.

तात[१४] म्हणतात - 'पैं व्यक्त[१५] आणि अव्यक्त[१६] । हें तूंचि एक निर्भ्रांत[१७]। भक्तीं[१८] पाविजे व्यक्त । अव्यक्त योगें[१९] ॥' या ओवींतील 'अव्यक्त' शब्दाचा अर्थ, विश्वरूपाला पाहून अर्जुनाला प्रश्न उद्भूत झाला असें दाखविल्यामुळें विश्वरूपच करावा. तेंच रूप हें, हें वर सांगितलेंच आहे.

*(१) अत्यंत आनंदाने (२) आनंदस्वरूप (३) नवीन (४) सर्व व्रजवासी जनांना वैकुंठाचे दर्शन करवून सर्वांचे सारख्या भावाने पालन केल्यामुळे (५) जगताची उत्पत्ति, पालन व संहार करणे हे ब्रह्मलक्षण (६) परब्रह्माचेच ठिकाणी राहणारे पण कदाचित् राहणारे (७) परब्रह्माचे ठिकाणी राहणारे, वस्तुभूत असाणारे, सृदिानंद हे लक्षण (८) सर्व प्रकारच्या भासास आधार होणाऱ्या (९) बाकीच्या अवतारांचे (१०) व्यर्थ (११) ओढून ताणून (१२) सृष्टीचे उत्पत्यादि (१३) प्रगट करणारे व सृदिानंदस्वरूप (१४) श्रीज्ञानेश्वर महाराज (१५) श्रीकृष्णस्वरूप (१६) विश्वरूप (१७) निःसंशय (१८) भक्तीने (१९) योगाने*

हें रूप ध्येय[१] असूनही देवादिकांनां दृष्टिगोचर[२] नसल्यामुळें अव्यक्त होय; आणि यापासून निरुपाधिक[३] चैतन्याचा बोध होतो, म्हणून त्याला अव्यक्त म्हणावें असें कोणी म्हणेल, तर निरुपाधिक चैतन्याचा बोध श्रीकृष्णाच्या व्यक्त[४] उपासनेपासूनही होतो. निरुपाधिक चैतन्याचा बोध श्रीष्णोपासनेपासून न मानला तर ती तुच्छ आणि त्याज्य होईल. तसा तातांचा आशय[५] दिसत नाहीं. म्हणून या ओवींतील 'अव्यक्त' शब्दाचा अर्थ विश्वरूप करणेंच इष्ट आहे. अन्यथा[६] श्रीकृष्णाचें रूपाचीही योगानेंच प्राप्ति होऊं लागेल, व मग 'भक्ती पाविजे व्यक्त' हें वाक्य व्यर्थ होईल. म्हणून उपर्युक्त[७] अर्थच सम्यक् आहे. पुन्हा तात म्हणतातः-

**॥ ओव्या ॥**

**'पै जे वानी[८] श्यातुका[९] । तेचि वेगळिये वाला एका । तैसा एकदेशिया[१०] व्यापका । सरिसा[११] पाडू[१२] ॥**
**अमृताचिया सागरीं । जे लाभे[१३] सामर्थ्याची थोरी[१४] । तेचि दे अमृतलहरी । चुळी घेतलिया ॥ ज्ञाने.**

या एकंदर प्रतिपादनावरून श्रीकृष्ण हे पूर्णावतार आहेत हें सिद्ध झालें. हें निरूपण दशमविलासादि[१५] स्थळीं[१६] स्थळीं पुढेंही स्पष्ट होईल. कारण

*(१) ध्यान करण्याला योग्य (२) डोळ्याला दिसण्याजोगे (३) उपाधिरहित, शुद्ध (४) व्यक्तरूपाच्या (५) म्हणण्याचा अर्थ (६) नाहीतर (७) वरील (८) कसोटी (९) सोन्याच्या फांसीला (१०) अव्यापक (११) सारखा (१२) योग्यता (१३) मिळे (१४) मोठेपण (१५) श्रीमहाराजांनी भागवतातील स्कंधांना विलास हे नांव दिल्यामुळे, दशमविलास म्हणजे दहावा स्कंध असा अर्थ आहे (१६) जागोजागी*

श्रीकृष्णभक्त्युद्बोधनार्थच[१] या ग्रंथाचा प्रादुर्भाव[२] आहे. यद्यपि इंद्रादिदेवशत्रुरूप[३] असुरांचें मर्दन[४] करून लोक सुखी करणेंच सर्व अवतारांचं प्रयोजन मुळांत[५] सांगितलें आहे तथापि येथें हा विशेष[६] आहे. (य३-५१) मुख्यतया[७] प्रयोजन[८] आहे हें[९] कलावताराचें[१०] आणि अंशावताराचें[११] हें सामान्य[१२] प्रयोजन आहे व सज्जनरक्षण[१३] हें मुख्य प्रयोजन आहे. म्हणूनच नृसिंहानें देवांना भयक्लेशापन्न[१४] केलें आणि प्रल्हादाला भयरहित करून त्याचें रक्षण केलें. आतां पूर्णावतार जो

श्रीकृष्ण त्याचें तर केवळ प्रेमवर्धनच[१५] प्रयोजन आहे, आणि इतर प्रयोजनें आनुषंगिक[१६] आहेत. म्हणून सूर्याचें जसें प्रकाश देणें मुख्य प्रयोजन आहे आणि अंधार दूर करणें आपेक्षिक[१७] प्रयोजन आहे आणि पृथिव्यादि तापविणें हें आनुषंगिक म्हणजे गौण प्रयोजन आहे, तद्वत अद्वैतप्रेमवर्धन[१८] कृष्णावताराचें मुख्य प्रयोजन आहे.

*(१) श्रीकृष्णभक्तीचे समर्थनाकरिता (२) प्रारंभ (३) इंद्रादिदेवांचे जे शत्रु आहेत अशा (४) नाश (५) मुख्य (६) फरक (७) मुख्य, प्रधान (८) उद्देश (९) दुष्टांना मारून देवांचे संरक्षण करणे (१०) तेवढ्याच कार्यापुरता ज्यांच्यामध्ये परमेश्वराच्या शक्तीचा आविर्भाव झाला आहे त्यांचे (११) सर्व शक्तिमान् परमेश्वर, जेव्हा आपली शक्ति झांकून ठेवून कार्यापुरती शक्ति, ज्या अवतारात दाखवितो,त्या अवताराचे (१२) मुख्य उद्देशाबरोबरच सहज सिद्ध होणारे, कोणत्याहि अवतारात असणारे (१३) भक्तांचे संरक्षण (१४) भय उत्पन्न केले (१५) भक्ति प्रेम वाढविणे (१६) गौण, मुख्य प्रयोजनाबरोबरच सहज घडून येणारे (१७) दुसऱ्याच्या दृष्टीने ज्याला अंधार भासतो, तोंच सूर्याने अंधार दूर केला असे म्हणतो, पण सूर्याला स्वतः अंधाराची कल्पना नसल्यामुळे अंधार दूर करण्याकरिता तो काही उगवत नाही (१८) अद्वैत भक्तीचे प्रेम वाढविणे*

'मी संयोगीं[१] वियोगीं प्रेमच वाढवीत असतो' असे गोपिकांनां उत्तर देतांना श्रीकृष्णानें म्हटलें[२] आहे. सज्ञनब्राह्मणादिरक्षण कृष्णावताराचें आपेक्षिक प्रयोजन आहे. तें मुख्य प्रयोजन असतें तर नारदांची नारदी[३] केली नसती. स्त्री देऊन देखील त्यांना संतुष्टच केलें असतें. म्हणून प्रेमवर्धनच मुख्य प्रयोजन आहे. कोणी म्हणेल कीं नारदांनां मोह[४] होऊं नये म्हणून स्त्री दिली नाहीं, तर त्याला आम्ही असें विचारितों कीं गुरूनें आपला पुत्र व देवकीनें आपली सहा बाळें मोहानेंच मागितलीं असतां ती कां आणून दिलीं? या प्रश्नाचें तूं काय उत्तर देतोस? म्हणून आमचाच पक्ष[५] यथार्थ आहे. अर्जुनादिकांचें रक्षण केलें म्हणून सज्ञनब्राह्मणादिरक्षण[६] आपेक्षिक प्रयोजनही सिद्ध होतें; आणि शिशुपाळादि असुरांचा नाश करणें हें मुख्य प्रयोजन समजत नव्हतेसें दिसतें. नाश करणें प्राप्तच आल्यास तो[७] कसा तरी होऊन यावा एवढ्यापुरतेंच त्यांत त्यांचें अंग असें. कांहीं असुरांचा नाश आपण स्वतः जरी केला, तरी पण कालयवनाचा नाश मुचकुंदाच्या हातून, जरासंधाचा भीमाचे हातून व शेवटीं तर शस्त्र टाकून सर्व भूभार आपण सारथी होऊन अर्जुनाच्याच हातानें उतरविला, म्हणून असुरनाश हें आनुषंगिक प्रयोजन सिद्ध होतें. स्वतः भगवंतांनींच तीन प्रकारचें आपलें प्रयोजन सांगितलें आहे. तें असें :-

*(१) माझा संयोग असताना. किंवा वियोग असताना. या ठिकाणी भगवंताच्या सगुण स्वरूपाचाच संयोग म्हणजे सान्निध्य असणे व वियोग म्हणजे सान्निध्य नसणे हे संयोग वियोग घ्यावयाचे (२) दशमस्कंधातील बत्तिसाव्या अध्यायांत '**'नाहं तु सख्यो भजतोऽपि जंतून्''** - या श्लोकाने म्हटले आहे. (३) नारद स्त्रीची इच्छा करीत असता स्वतः नारदच स्त्री होऊन त्यांना संतती वगैरे झाली इत्यादि भगवंताचे मायावैभव दाखविले (४) संसाराची आसक्ति (५) प्रेम वाढविणे हे श्रीकृष्णावताराचे मुख्य प्रयोजन आहे हा पक्ष (६) साधु, ब्राह्मण ह्यांचे रक्षण करणे (७) नाश.*

**॥ गीता श्लोक ॥**

**'परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम् । धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगेयुगे'॥ (य३-५२)**

यांत धर्मसंस्थापन[१] म्हणजे भक्तिवर्धन ('ये तु धर्म्यामृतमिदं' इ. भक्तियोगाध्यायनिष्ठवचनांवरून) हें मुख्य प्रयोजन, साधुपरित्राण[२] आपेक्षिक[३] प्रयोजन, आणि असुरनाश हें आनुषंगिक[४] प्रयोजन. तथापि या श्लोकांत आणखी एक विशेष आहे तो :- 'परित्राणाय साधूनां' म्हणजे सज्ञनांच्या पुण्य कर्मानेंच मी त्यांचें पालन करितो; व 'विनाशायच दुष्कृतां' म्हणजे दुष्टांच्या पाप कर्मानेंच मी त्यांचा नाश करितो, स्वतः करित नाहीं. म्हणून माझें ठिकाणीं नैर्घृण्यवैषम्य[५] नाहीं. परंतु **मी दाखविल्यावांचून माझी भक्ति स्थापन करण्याला दुसरा कोणी जीव समर्थ नसल्यामुळें ती मात्र मी स्वतः स्थापन करितो.** म्हणून मी अहेतुक[६] अनुग्राहक[७] आहे असें समज.' हें 'धर्म संस्थापनार्थाय' या वचनानें सांगितलें. 'युगे युगे' म्हणजे भक्त इच्छा करतील तेव्हां तेव्हां. 'तस्याहं सुलभः पार्थ' या वचनावरून हा अर्थ निघतो. सनातनाचार्यांनीही आपल्या बृहद्भागवतामृताच्या स्वकृत 'दिग्दर्शिनी' नामक टिकेंत कंसवधादिक प्रयोजनें उगीच असून प्रेमप्रदानच श्रीकृष्णावताराचें मुख्य प्रयोजन आहे असें स्पष्ट म्हटलें आहे. सनातनाचार्य जरी आमच्या मताचें[९] नाहींत, तरी या पक्षांत मी त्यांच्या मताचा आहे. एवं या मुख्य प्रयोजनावरूनही श्रीकृष्णाची पूर्णताच[१०] सिद्ध होते. पुनः 'गोप्यः कामात् भयात्कंसः' या वचनावरून

*(१) भक्ति प्रेम वाढविणे (२) साधूंचा सांभाळ करणे (३) साधु लोकांच्या दृष्टीने (४) अनायासे साधणारे, गौण (५) निर्दयपणाने व विषमपणाने वागण्याचा दोष (६) निष्काम, निःस्वार्थी (७) कृपा करणारा (८) आपल्या विषयी प्रेम देणे (९) राधावल्लभमताचे*

*आहेत (१०) पूर्ण परब्रह्मत्व*

कामक्रोधादिक पुरुषार्थाचें[१] साधन नसूनही ज्याच्या कृपेनें पुरुषार्थद[२] झाले. यद्यपि अंशावतारही उद्धार करितात, तथापि पुरुषार्थसाधन[३] जे धर्मादिक, त्यांच्या अपेक्षेनें[४] करितात, आणि परमात्मा श्रीकृष्ण तर विपरीत[५] साधनांनी देखील तदेकनिष्ठापूर्वक[६] असतां उद्धार करितो. 'तदेकनिष्ठापूर्वक' पद घालण्याचें कारण असें आहे कीं, विकार असोत, पण इतर विषयांकरितां[७] नसोत म्हणजे झालें.

**'तदर्पिताऽखिलाचारः[८] सन्कामक्रोधाभिमानादिकं तस्मिन्नेव करणीयम्'॥ (नारदभक्तिसूत्र ६५)**

या नारदसूत्रावरूनही[८] हें समजून घे. आतां सूर्योदय झाला असतांनां दिव्याच्या उजेडापुरतें कार्य सहजच होतें, त्याप्रमाणें पूर्ण[९] श्रीकृष्णोदयामुळें[१०] अंशावताराचेंही कार्य सहजच होतें. तें कार्य[११] पाहूनच श्रीकृष्ण अंशावतार आहे, अशी ब्रह्मादिकांनांही जर भ्रांती[१२] झाली, तर मग मूर्खांना (य३-५३) झाली, यांत नवल काय ? हें आवरणभंगकारांचें म्हणणें मला प्रमाणतम[१३] वाटल्यामुळें, अस्मन्मतीयांचें[१४] नाहीं तथापि तुझ्या अथवा मी आपल्या समाधानार्थ घेतलें आहे; आणि असें एतद्ग्रंथरूपबिंदुमूलभूत[१५] श्रीमद्भागवतरूपसिंधूंत[१६] वचनरत्न[१७] आहे.

*(१) मोक्षाचे (२) मोक्ष देणारे झाले (३) मोक्षाचे साधन (४) ते ज्यांचे ठिकाणी असतील त्यांचा (५) मोक्षाचे साधन म्हणून न मानिले गेलेल्या साधनाने (६) श्रीकृष्णाचे ठिकाणीच पूर्ण निष्ठा ठेवून वागल्यास (७) विषयसुखाच्या प्राप्तीकरिता (८) संपूर्ण आचरण श्रीकृष्णाप्रीत्यर्थच ठेवून कामक्रोधादिक देखील त्याचे ठिकाणीच करावेत (९) पूर्णावतार (१०) श्रीकृष्ण प्रगट झाले असता (११) अंशावताराचे (१२) गैरसमजूत (१३) अत्यंत मान्य (१४) आमच्या अद्वैतवाद्यांचे (१५) आवरणभंग नांवाच्या ग्रंथातील वरील वचन हाच कोणी प्रमाणरूप बिंदु, त्याला आधारभूत किंवा प्रामाण्य आणणारे (१६) श्रीमद्भागवत हाच कोणी सिंधु - समुद्र (१७) रत्नाप्रमाणे अमोल असणारे वचन, अत्यंत प्रमाणभूत.*

**॥ भाग. श्लोक ॥**

**'तमेव परमात्मानं जारबुद्ध्यापि संगताः । जहुर्गुणमयं देहं सद्यः प्रक्षीणबंधनाः ॥ स्कंध १.अ.२९**

अर्थ :- गोपिका जारबुद्धीनेंही त्या परमात्म्याशीं समागम पावल्यामुळें त्यांची सर्व बंधनें तत्काल क्षीण होऊन या गौण[१] देहाचा त्याग करित्या झाल्या. तात्पर्य, श्रीकृष्ण पूर्ण आहेतच आहेत.

दुसरें, हें श्रीकृष्णस्वरूप विष्णुशिवात्मक[२] आहे. कारण आईला जेव्हां मुखांत विश्वरूप दाखविलें, तेव्हां ते सर्व ब्रह्मांडपालनात्मक[३] होतें, म्हणून श्रीकृष्णरूप विष्ण्वात्मक[४] झालें; आणि अर्जुनाला जेव्हां विश्वरूप दाखविलें तेव्हां तें संहाररूप[५] भयंकर कालरुद्रात्मक[६] होतें, म्हणून हें श्रीकृष्णरूप शिवात्मकही आहे. अर्जुन जसा विश्वरूपाला पाहून भ्याला, तसी यशोदा भ्याली नाहीं म्हणून यशोदेला दाखविलेलें पालनरूप व अर्जुनाला दाखविलेलें संहाररूप सिद्ध झालें. आणि विष्णुशिवाचें मूल जें एकत्व म्हणजे मूलसत्त्व[७], जें **'एकं सत्त्वं द्विधाकृतं'** या वचनामध्यें सांगितलें, तें कारणब्रह्मच[८] होय. म्हणून श्रीकृष्ण हा कारणब्रह्मरूप पूर्ण अवतार आहे हें सिद्ध झालें, आणि 'संभवाम्यात्ममायया' ही जाग्रच्छ्रुतीही[९] असेंच म्हणते.

*(१) त्रिगुणाचा बनलेला (२) जगाचे पालन करणारे व जगाचा संहार करणारे (३) ब्रह्मांडाचे पालन करणारे(४) जगताचे पालन करणाऱ्या रूपाला विष्णु हे नांव असल्यामुळे (५) नाश करणारे (६) प्रलयकालच्या रुद्राच्या रूपाप्रमाणे (७) शुद्ध सत्त्व (८) सर्वज्ञ, सर्वशक्ति असे जे शुद्ध ब्रह्म ते (९) गीतेचे वचन.*

**॥ ओव्या ॥**

**एवं भगवदवतारचरित[१] । जें अतिगुह्य[२] श्रुतिख्यात[३] । जो पठन चिंतन सायंप्रात[४] । यत्नें करी तो ब्रह्म होय । ।८०॥**
**सायंकाळीं चिंतन पठन । तेणें मध्यसवेगें[५] मन । रात्रौ भगवदाकार[६] स्वप्न । सहज होय ॥८१॥**
**प्रातःकाळीं पठन मनन । तेणें दिवसभर होय स्मरण[७]। एवं दिवारात्र[८] मिळोन । जागृतीं स्वप्नीं श्रीरंगू ॥८२॥**
**(य३.५४) अथवा प्रातःकालीं शिवदर्शन । तेणें यामिनीपाप[९] जाय जळून ।**
**माध्यान्हकाहीं शिवदर्शन । तेणें आजन्मींचें[१०] दोष जळती ॥८३॥**
**सायंकाळी शिव पाहती । तरी सप्तजन्म[११]पापोपहती[१२]। आणि सप्तत्वोपलक्षणकृती[१३]। पापें नाशिती अनंत जन्मीचीं ॥८४॥**
**माधव[१४] आणि उमाधव[१५] । येथ सर्वथा नोहे भिन्न[१६] भाव ।**

*(१) भगवंताच्या अवताराचे चरित्र (२) अत्यंत गुप्त (३) वेदाने सांगितलेले (४) सकाळ संध्याकाळ (५) मृदु, मध्य व*

*तीव्र असे मनाचे तीन संवेग आहेत. मनांत एकादा पदार्थ येऊन त्यावर विशेष मन न जडता तो मनांतून निघून गेला म्हणजे त्याला मृदु संवेग म्हणतात. या संवेगात मन पदार्थावर विशेष आसक्त होऊन त्या पदार्थाचे चिंतन करीत रहात नाही. त्याच पदार्थावर मनाला तो आवडल्यामुळे किंवा अभ्यासाने, जेव्हा चित्त सारखे धावते व त्याचे चिंतन करिते, ते इतके की त्या चिंतनामुळे किंवा ध्यासामुळे स्वप्नामध्ये तो पदार्थ दिसू लागतो, तेव्हा त्या मनाच्या ध्यासाला मध्यसंवेग म्हणतात. हेच चिंतन किंवा ध्यास वाढून, जेव्हा जागृतीत तो पदार्थ प्रत्यक्ष होतो तेव्हा त्या ध्यासाला तीव्रसंवेग म्हणतात (६) भगवंताच्या आकाराचे (७) चिंतन (८) रात्रंदिवस (९) रात्रीचे पाप (१०) वर्तमान जन्मांत केलेले, वर्तमान जन्मापर्यंतचे (११) सातजन्मापर्यंत (१२) पापाचा नाश (१३) सातजन्म हे उपलक्षण असून त्यावरून अनंत जन्मीची पापे असा बोध घ्यावा (१४) विष्णु (१५) शंकर (१६) भेद.*

**यास्तव शिवदर्शनें जो फलसंभव[१] । तो नारायणचरितें[२] मिळे ॥८५॥**
**म्हणूनि सायंप्रातःकाळ[३] । हें चरित्र वर्णितां केवळ । तरि ब्रह्मचि[४] फळ । हातां चढे ॥८६॥**
**येथ कोणी बोलती । कीं जीवब्रह्मऐक्य[५] म्हणजे मुक्ति । जीवाची स्वभावबद्धस्थिती[६] । म्हणूनी ती[७] घडेना ॥८७॥**
**तरी हें बोलणें सकळ । मिथ्या[८] जाणावें केवळ । कोणत्याही पुरुषाचा प्रबळ[९] । स्वप्न[१०] स्वभाव[११] कदा नोहे ॥८८॥**
**जीवाचा स्वभाव जरी बंधन[१२]। तरी दुःख निवृत्तिइच्छा[१३]नसावी दारुण[१४]।**
**ती तंव होत असे म्हणोन । बंधन[१५] स्वभाव नाहीं जीवा ॥८९॥**
**आणि स्वभावनाशें[१६] वस्तुनाशू[१७] । म्हणौनि न संभवे उपदेशू[१८] ।**
**यालागीं जीवाचा बंधनविलासू[१९] । औपाधिक[२०] ॥९०॥**
**तरी मग कैसें जीवा बंधन । तेंही ऐका श्रोते सज्जन । जीव स्वतः ब्रह्म असोन । बंधन होय देहद्वयें[२१] ॥९१॥**
**परी ती दोन्ही देहें । अविद्याकल्पित[२२] पाहे । आणि अविद्या[२३] तंव लवलाहे[२४] । भगवदाश्रित[२५] ॥९२॥**

*(१) फलाची प्राप्ति (२) विष्णूच्या चरित्रापासून (३) सकाळ संध्याकाळ (४) ब्रह्मप्राप्ति (५) जीव व ब्रह्म एक होणे (६) स्वभावतःच बद्ध आहे, बद्ध असणे हा त्याचा धर्मच आहे किंवा स्वरूपच आहे (७) ऐक्य (८) खोटे (९) अत्यंत (१०) स्वप्न पाहणे, भ्रम पाहणे (११) धर्मस्वरूप (१२) दुःखी होणे (१३) दुःख नाहिसे व्हावे अशी इच्छा (१४) अत्यंत (१५) बद्ध होणे दुःखी होणे (१६) स्वरूप नाहिसे झाल्यास (१७) वस्तुचाच नाश होतो (१८) मुक्त होण्याचा, ज्ञान संपादन करण्याविषयी उपदेश (१९) बद्धतेचा भास (२०) उपाधीमुळे, अज्ञानामुळे (२१) स्थूल व सूक्ष्म या दोन देहांनी (२२) अज्ञानाने भासलेली (२३) अज्ञान (२४) पाहता (२५) भगवंताच्या आश्रयाने राहते.*

**॥ गद्य ॥**

प्रश्न :- भगवन्, परमेश्वराचेठायीं[१] कालत्रयींही[२] अविद्याक्लेशाचा[३] संबंध[४] नाहीं असें लिंगपुराणांत सांगितलें आहे, आणि आपण तर अविद्या परमेश्वराधीन आहे असें म्हणतां, हें कसें ?

उत्तर :- तुला माझ्या म्हणण्याचा अर्थ समजला नाहीं, आणि प्रमाण देऊन भलतीच बडबड चालविली आहेस. अरे! लिंगपुराणांत जो परमेश्वराचे ठायीं कालत्रयीं असंबंध सांगितला, तो परमेश्वरदृष्टीनें[५] बरोबर आहे. परंतु आम्हीं जी परमेश्वराच्या आश्रित अविद्या म्हटली ती जीवाच्या भेददृष्टीमुळें[६], दुसरें कांहीं नाहीं. रज्जुवर जो भ्रांतीनें[७] सर्प दिसतो, तो रज्जूच्या ठिकाणीं तिन्ही[८] कालीं नसतो. परंतु सर्प पाहणाऱ्याला तरी त्याची भेददृष्टी[९] असल्यामुळें तो रज्जूवरच[१०] दिसतो (य३-५५) कीं नाहीं ? तद्वत् जीवाच्या भेददृष्टीमुळें[११] अविद्याही[१२] परमेश्वराचे ठायींच -

*(१) ठिकाणी (२) भूत, वर्तमान, भविष्य यापैकी कोणत्याही काळी, केव्हाहि (३) अज्ञानामुळे उत्पन्न होणाऱ्या दुःखाचा, योगसूत्रांत अविद्या, अस्मिता, राग, द्वेष, अभिनिवेश असे पांच क्लेश मानले आहेत. अनित्याला नित्य समजणे, अनात्म्यास म्हणजे जडास आत्मा म्हणजे चैतन्य समजणे, अशुद्ध, अपवित्रास पवित्र समजणे, हे अविद्येचे स्वरूप आहे. या विपरीत समजुतीने दुःख होते (४) स्पर्श (५) परमेश्वराला अविद्येचे ज्ञान नाही किंवा तो बद्ध नाही म्हणजे परमेश्वर कांही विपरीत समजुतीने युक्त नाही किंवा यथार्थ दृष्टीने (६) जीव आपल्याहून परमेश्वराला निराळा मानून आपल्या अविद्येचा आश्रय परमेश्वर आहे असे म्हणतो, जीवाच्या विपरीत समजुतीप्रमाणे (७) भ्रमाने (८) केव्हाच (९) विपरीत समजूत असल्यामुळे, आपल्याहून निराळेपणाने पाहत असल्यामुळे (१०) दोरीवर. (११) अज्ञानाने जीवाला जो भेद भासतो (१२) अज्ञान, विपरीत समजूत.*

प्रतीत[१] होते. अतः, हिला[२] भगवन्माया[३] म्हटलें आहे. हिच्याच योगानें बुद्धि व अहंकारानें युक्त अशीं स्थूल व सूक्ष्म शरीरें उत्पन्न होतात.

प्रश्न :- भगवन्, हें मला चांगलें समजलें; तथापि एखादा दृष्टांत देऊन पुन्हा चांगलें स्पष्ट केलें असतां दृढ[४] होईलसें वाटतें.

उत्तर :- ऐक तर. ज्याप्रमाणें वायुच्या आश्रयानें असणारा मेघाचा ओघ[५] आकाशाचें ठिकाणीं आहे असें मूढ लोक समजतात, किंवा पृथ्वीचे कण वायूचें ठिकाणीं आहेत असें समजतात, तसेंच तूं सिद्धांताविषयीं[६] समज.

प्रश्न :- महाराज, हें माझ्या ध्यानांत नीट आलें नाहीं.

उत्तर :- अरे! मेघाचा ओघ हा आकाशाच्या आश्रित असता तर तो इकडून तिकडे गेला नसता. कारण आकाश कांहीं गतिमत्[७] नाहीं, आणि त्याला दुसऱ्या पदार्थाला गती देण्याची शक्तीही नाहीं. म्हणून तो[८] वाय्वाश्रितच[९] आहे. परंतु आकाशाच्या एका भागांत[१०] उभा राहिलेला मनुष्य पुरोवर्त्यावच्छिन्नाकाशाचे ठायीं[११] मेघौघाच[१२] आरोप[१३] करतो, तद्वत्[१४] (दुसरें उदाहरण (पृथ्वीकण) स्पष्ट आहे.) द्रष्ट्याचें[१५] ठिकाणीं विश्व[१६] सत्त्वरूपानें[१७] झालें असतें,

*(१) भासते (२) अविद्येला (३) भगवंताची माया (४) पक्के (५) रांग (६) अविद्येविषयी, सिद्धान्तात (७) चलन वलन करणारे (८) मेघाचा ओघ (९) वायुचे आश्रयाने (१०) कोठेहि एके ठिकाणी (११) समोर दिसणाऱ्या आकाशाचे भागाचे ठिकाणी (१२) मेघसमुदायाचा (१३) आकाशाचे ठिकाणी मेघ आले असे तो म्हणतो (१४) त्याप्रमाणे (१५) जीवाचे (१६) जगत् (१७) सत्तारूपाने, सत्यरूपाने.*

तर सुषुप्ति-मूर्च्छा-समाधि आदिस्थानीं[१] त्यांचा बाध झाला नसता, व ज्ञानानेंही[२] बाध[३] झाला नसता.

**'अविद्याबंधन साच असतें । तरी ज्ञानाचे बापेही न तुटतें ॥'**

असें सत्पुरुषवचनही आहे. तो बाध तर होतो, असा तत्त्वज्ञानियांचा[४] अनुभव आहे. म्हणून[५] चैतन्यावर अनादि अविद्येनें कल्पित एकदेशी मूढ होत्सात्या जीवांनीं परमेश्वराला आपल्याहून भिन्न मानून, पुरोवर्ती चेतनाचे ठायीं स्वभ्रमज दृश्य, आरोपित केलें आहे.

प्रश्न :- भगवन्, हें स्थूल विश्व ब्रह्माचे ठायीं मूढांनीं[६] आरोपित[७] केलें आहे हें मला कळलें.

उत्तर :- बरें मग, पुढें लिंगशरीराविषयीं म्हणतोस कीं काय? पण तेंही आरोपितच आहे. (य३-५६)

*(१) निद्रेत मूर्च्छेत, समाधीतहि ते जगत् दिसले असते (२) ब्रह्मज्ञानाने (३) नाश, सत्तारहित, अस्तित्वरहित (४) ब्रह्मज्ञान ज्यांना झाले आहे त्यांचा (५) ''म्हणून चैतन्यावर .... केले आहे'' या वाक्याचा अर्थ - अनादि अशा अविद्येने, व्यापक अशा चैतन्याचे ठिकाणी, एकदेशाची म्हणजे भागाची किंवा अंशाची कल्पना भासवून, त्या अंशावर अविद्येने भ्रमिष्ठ झालेला जीव भासविला. त्या भ्रमिष्ठ जीवाने आपण ज्या अंशावर भासतो, त्या अंशास सोडून बाकीच्या अंशाचे ठिकाणी आपल्याहून निराळ्या ईश्वराची कल्पना केली व आपल्याला पुरोवर्ति असलेल्या म्हणजे ज्ञेय होणाऱ्या त्याच ईश्वररूपी चेतन अशा अंशाचे आश्रयाने, आपल्या भ्रमाने किंवा गैरसमजुतीने भासणाऱ्या दृश्य जगताचीहि कल्पना केली. अविद्या ही अनादि आहे. तिच्यामुळे शुद्ध चैतन्याचे ठिकाणी जीवभाव भासतो. पुढे त्या जीवाला त्याच अविद्येमुळे, आपल्या समोरच्या चैतन्य प्रदेशावर ईश्वर भासतो व त्याच्याच आश्रयाने, स्वतः ज्या अविद्येने तो मूढ अविचारी झाला आहे, ती अविद्या व त्या अविद्येमुळे भासणारे जगतहि भासते (६) अज्ञान्यांनी (७) कल्पिलेले आहे.*

**प्रश्न :-** महाराज, तें लिंगशरीर कसें आहे ?

**उत्तर :-** अरे, तें हातपायादि अवयव[१] ज्या गुणांच्या[२] पंचीकृत[३] भूतांचा[४] परिणाम[५] आहेत, त्या गुणांनीच अपंचीकृत[६] अशा भूतांकडून[७] रचले गेलेलें आहे. म्हणूनच हातपायादि विशेष आकाररहित[८] असें तें लिंग शरीर आहे. हें स्थूलशरीरादिकांसारखें दृश्य नाहीं, व इंद्रादिकांसारखें आनुश्रविकही[९] नाहीं. म्हणून याला अव्यक्त[१०] म्हणतात.

**प्रश्न :-** तर, याविषयीं कांहीं प्रमाण[११] नसल्यामुळें नाहींच म्हणवयाचें काय?

**उत्तर :-** हीं दोन प्रमाणें नसल्यामुळें आणखी कोणतींच प्रमाणें ह्याविषयीं नाहींत असें म्हणणें चांगलें नव्हे. ह्याविषयीं अर्थापत्ति[१२] प्रमाण प्रसिद्ध आहे. जीवाला कोणी तरी उपाधि पाहिजे. तें लिंगशरीर[१३] होय.

*(१) भाग (२) त्रिगुणांचे (३) पंचभूताचे परस्परात मिश्रण होऊन झालेली पंचमहाभूते (४) पृथ्वी, आप इत्यादि भूतांचा (५) कार्य (६) परस्परात न मिसळलेली (७) सूक्ष्म तन्मात्ररूप भूतापासून (८) हातपायादिक विशेष आकार जेथे नाहीत (९)*

*केवळ वेदशास्त्रांनी सांगितलेले (१०) अदृश्य (११) जाणण्याचे साधन (१२) **अर्थापपत्ति** == संगति लावण्याकरिता एखाद्या गोष्टीची कल्पना करणे. उदा- एखादा मनुष्य दिवसा जेवतांना दिसत नाही पण लठ्ठ दिसतो असे कोणी म्हटल्यास, जेवणाची कल्पना केल्यावाचून त्याच्या लठ्ठपणाची संगति लागत नाही म्हणून दिवसा जेवत नसला तरी रात्री जेवीत असावा अशी आपण कल्पना करितो ही 'अर्थापत्ति' होय. या ठिकाणी श्रुति तर एक ब्रह्मच आहे असे म्हणत असतांना आपल्याला ब्रह्मदशेच्या विपरीत अशी जीवदशा भासते तेव्हा ती कांही तरी उपाधीवाचून भासणे शक्य नाही. अशा रितीने शुद्धब्रह्मभावाचे ठिकाणी मलीन जीवभाव जो भासतो त्याची संगति उपाधीवांचून लागत नाही. (१३) पंचप्राण, दहा इंद्रिये, मन व बुद्धि या सतरा तत्त्वांच्या समुदायास लिंग शरीर म्हणतात.*

प्रश्न :- महाराज ! जीवाची उपाधि[१] नुसतें स्थूलशरीर होऊं शकणार नाहीं काय ?

उत्तर :- कां ? होऊं शकेल. *पण प्रत्येक मनुष्य मरण पावला म्हणजे मुक्त होतो असें मानावें लागेल, किंवा *आत्मा नाही असा नास्तिकवाद तरी स्वीकारावा लागेल. कारण स्थूल शरीराचा पुनर्जन्म होत नाहीं हें आपल्यास स्पष्ट दिसतें, आणि कारणावांचून[२] जन्मादिक मानले तर अकृताभ्यागम-कृतप्रणाशादि[३] दोष येतात. म्हणून पुनः शरीर[४] धारण करणें, इत्यादिक कार्यांवरून लिंगशरीररूप उपाधीचें अनुमान[५] होतें.

प्रश्न :- पण,[६] लिंगशरीराच्या पूर्वी जीवाची सिद्धी नसल्यामुळें तें आरोपित कोणीं परमेश्वरानें केलें आहे काय ?

*(१) जवळ राहून आपले धर्म दुसऱ्या वस्तूवर भासविणाऱ्यास **उपाधि** म्हणतात. (२) पूर्व जन्मांतले आपले कर्म कारण न मानता (३) पूर्व कर्म नसतांना विनाकारणच जन्मादिक दुःखभोग मिळणे व या जन्मात घडणाऱ्या बऱ्या वाईट कर्मांचा पुढे मरणानंतर कांही एक सुखदुःखादिक भोग न मिळता त्याचा नाश होणे (४) मागील जन्मांत केलेल्या कर्मांचे फळ भोगण्याकरिता या जन्मांतला देह धारण केला त्याप्रमाणे या जन्मांत केलेल्या कर्मांचें फळ भोगण्याकरिता पुढील जन्म घ्यावा लागणार (५) बिनचूक तर्क (६) शुद्ध ब्रह्मभावाचे ठिकाणी जीवपणा भासावयाला लिंगशरीर जर निमित्त आहे व लिंगशरीररूपी निमित्त उत्पन्न होण्यापूर्वी अर्थात् जीव जर ब्रह्मरूपच होता तर ब्रह्माचे ठिकाणी जीवभाव भासण्यापूर्वी लिंगशरीररूपी उपाधी उत्पन्न व्हावयाला पाहिजे तेव्हा त्या लिंगशरीराची कल्पना प्रथम परमेश्वराने केली काय ?*

उत्तर :- अरे ! तूं भलतेंच विचारतोस. जीव, ईश्वर, ब्रह्म, जीवेश्वरांचा[१] भेद, अविद्या व तिचा जीवेश्वरांशीं संबंध, हे सहा पदार्थ आमचे अनादि[२] आहेत.

प्रश्न :- मग आपल्या आरोपित म्हणण्याचा अर्थ तरी काय ?

उत्तर :- आमच्या आरोपित म्हणण्याा अर्थ अपवादानें[३] शुद्ध चैतन्यावांचून पांच पदार्थांचाच बाध[४] होणें असा आहे. जसा रज्जूच्या[५] **(य३-५७)** ज्ञानानें सर्पाचा बाध झाला म्हणजे तो खोटा आहे असें समजते, त्याप्रमाणें तत्त्वज्ञानानें[६] हें स्थूल[७] सूक्ष्म खोटें आहे असें कळते; म्हणून तें अज्ञानीयाचे[८] दृष्टीनेंच[९] मात्र खरें आहे. परंतु तेथें हा विशेष[१०] आहे:- जसें स्वप्नांतील[११] स्थूलशरीरांतील[१२] पदार्थ रोज निरनिराळे होतात, परन्तु तदुत्पादक[१३] मन एकच असतें, तद्वत्[१४], मनःकल्पित[१५] व्यक्त[१६] स्थूलशरीरादि[१७] विश्व[१८] नित्य वासनानुसार[१९] निरनिराळें होत असतें; म्हणून–

*(१) जीव व ईश्वर यांचा भेद (२) आरंभ नाही, पूर्वी हे सारे शुद्ध ब्रह्म असतांना पुढे मलीन जीवभावादिरूपाने उत्पन्न झाले असे नाही. (३) शुद्ध ब्रह्माच्या विचाराने किंवा ज्या ब्रह्मापासून जीवादि प्रपंच उत्पन्न झाला त्या कारणरूप ब्रह्माशी, त्यांच्या कार्यरूप प्रपंचाचा, कार्यकारणाचे ठिकाणी अभिन्न राहते या सिद्धान्तानुसार ऐक्य केल्यास (४) खोटे, मिथ्या; स्वतंत्र अस्तित्व किंवा वस्तुत्व नसणे (५) दोरीच्या (६) ब्रह्मज्ञानाने (७) स्थूल व सूक्ष्म जगत् (८) अज्ञान्याचे (९) अज्ञान्यालाच खरे वाटते (१०) फरक (११) स्वप्नात असतांना ज्या शरीराने आपण तेथे व्यवहार करितो ते स्वप्नातले स्थूल शरीरच होय. (१२) शरीरातील रसादि धातु वगैरे (१३) त्यांना उत्पन्न करणारे म्हणजे त्यांची कल्पना करणारे (१४) त्याप्रमाणेच (१५) मनाने कल्पिलेले (१६) जागृतीतले नामरूपाने स्पष्ट दिसणारे (१७) पांचभौतिक (१८) जगत् (१९) वासनेप्रमाणे.*

ह्याला असत्[१] म्हणतात. परंतु मरणानंतरही राहणारें पुनर्जन्मादि कार्यानुमेय[२] अव्यक्त[३] लिंगशरीर यावदविद्या[४] तिष्ठत[५] असल्यामुळें स्थूल विश्वापेक्षां तें सत्य[६] आहे. तरी पण ब्रह्मासारखें त्रिकालाबाध्य[७] नाहीं म्हणून त्याची सत्यता गौण[८] समजावी. हीं दोन्ही स्थूल-सूक्ष्म रूपें अविद्येनेंच[९] ब्रह्माधिष्ठानावर[१०] भासत असल्यामुळें श्रवण[११] मनन[१२] निदिध्यास[१३]जन्य[१४] ज्ञानानें यांचा बाध[१५] झाल्यावर स्वसंवेद्य[१६] असा ब्रह्मसाक्षात्कार[१७] होतो.

प्रश्न :- पण ब्रह्माचाही बाध होतो कीं नाहीं ?

उत्तर :- गड्या ! भलतीच बडबड करूं नकोस. तुला असें बोलावयाचें असेल तर आपल्या घरीं चालता हो. अरे ! अधिष्ठानानें[१८] भ्रमाचा[१९] बाध जसा होतो, तसा अधिष्ठानाचा[२०] बाध होतो, हें तुला तरी ठाऊक आहे काय?

*(१) खोटे, विनाशी, (२) पुनर्जन्मादिरूप कार्यावरून ज्याच्या अस्तित्वाची कल्पना करिता येते. स्थूल देह तर या जन्मांतच मेल्यानंतर अग्नीने भस्म होणारा असतो शुद्ध आत्म्यास तर जाणे येणे नाही; तेव्हा मेल्यावर कोणत्या तरी स्थूलाव्यतिरिक्त देहाने हा जीव अस्तित्वात राहून पुनर्जन्मांतच जात असला पाहिजे हे पुनर्जन्मावरून होणारे लिंगदेहाच्या अस्तित्वाविषयी अनुमान आहे. (३) इंद्रियाला न दिसणारे (४) अविद्या असेपर्यंत ब्रह्मज्ञान होत नाही तोपर्यंत, अविद्या राहते म्हणून ब्रह्मज्ञान होईपर्यंत असा अर्थ (५) राहत (६) अविनाशी (७) केव्हाच नष्ट होणारे (८) आपेक्षिक (९) अज्ञानानेच (१०) ब्रह्माच्या आधाराने ब्रह्मावर; ज्या ब्रह्माच्या ज्ञानाने त्यांचा नाश किंवा बाध होतो, त्याच ब्रह्मावर (११) ब्रह्मस्वरूपाचा परिचय करून देणारे श्रवण (१२) श्रवणाने ब्रह्मरूपाचा जो निश्चिय झाला तोच नाना प्रकारच्या युक्तीनी दृढ करणे (१३) निर्धाररूप वृत्ति बाणणे (१४) या पासून उत्पन्न झालेल्या (१५) नाश (१६) अनुभवगम्य; स्वतःस कळणारा (१७) ब्रह्माचा अनुभव (१८) भ्रमाच्या भासाला आधार असलेल्या खऱ्या वस्तूच्या ज्ञानाने (१९) खोट्या भासाचा (२०) खऱ्या वस्तूचा.*

शिष्य :- महाराज! नाहीं.

गुरु :- अधिष्ठानाचा बाध मानला तर त्या अधिष्ठानाला भ्रम मानावा लागेल, आणि मग त्याचा दुसऱ्या अधिष्ठानानें बाध करावा लागेल. अशी अधिष्ठानाची परंपरा[१] मानल्यास अनवस्था[२] येते. म्हणून एक ब्रह्मच अधिष्ठान मानणें बरें. ह्या युक्तीनें जसें तुला पटलें तसें अनुभवानेंही पटण्यासारखें आहे. जागृत्स्वप्नप्रपंचाचा[३] परस्पर[४] बाध व सुषुप्तीमध्यें दोन्हीं प्रपंचाचा बाध, आणि पुनः जागृत्स्वप्नामध्यें सुषुप्तीचा बाध, हे अवस्थात्रयप्रहरण[५] ज्या ज्ञानानें[६] कळतें त्याचा कोणत्याच अवस्थेंत बाध होत नाहीं. म्हणून तें ज्ञानच आत्मा आहे. शास्त्रामध्यें सत्यज्ञानानंतानंद[७] हें ब्रह्माचें स्वरूप[८] सांगितलें असल्यामुळें तिन्ही अवस्थेंत बाध न होणारा असा सत्यज्ञानरूप आत्मा ब्रह्मरूपच आहे. आणि परमप्रेमास्पदत्वारत्तव[९] त्याची आनंदरूपता[१०]सिद्ध आहे. (य३-५८)

प्रश्न :- भगवन् ! ब्रह्माचें ठिकाणीं वृत्तिव्याप्तिस्वीकार[११] आहे. आणि वृत्ति[१२] तर अविद्याजन्य[१३] आहे. असें असतां ब्रह्मसाक्षात्कार[१४] कसा होतो?

*(१) श्रेणी, रांग, साखळी (२) मानण्याला शेवट, समाप्ति नसणे (४) एकमेकानी एकमेकांचा (३) जागृतींतील प्रपंच व स्वप्नातील प्रपंच यांचा (५) जागृति, स्वप्न व सुषुप्ति या तीन अवस्थांतील प्रपंचाचा परस्पर नाश (६) साक्षी ज्ञानाने (७) अविनाशी, ज्ञानस्वरूप, आनंदस्वरूप व अमर्याद (८) लक्षण (९) परम प्रेमाचे स्थान असल्यामुळे, आत्म्याकरिता सर्व प्रिय असते पण आत्मा कांही कोणाकरिता म्हणून प्रिय वाटत नसतो (१०) सुखरूपता (११) वृत्तीने ब्रह्म जाणले जाते असे मानले आहे (१२) शुद्ध बुद्धी (१३) अज्ञानापासून उत्पन्न झालेली (१४) ब्रह्म जाणणे.*

उत्तर :- अरे ! ज्याप्रमाणें विष हें वैद्याचें हातीं गेल्यावर मारक न होतां उलटें साधकच[१] होतें, त्याप्रमाणें ईश्वरानुग्रह[२] व गुरुशास्त्रें[३] यांच्या योगानें ही सत्त्वनिष्ठ[४] भगवन्माया[५] संसारीचिदाभासरूप-फलचैतन्यावश्यकतारहित[६] ब्रह्माकारवृत्तिरूप विद्यात्वानें[७] परिणाम[८] पावली असतां, सकार्य[९] अविद्येचा[१०] नाश करून ब्रह्मसाक्षात्कार[११] करून दिल्यावर काष्ठें[१२] जाळून अग्नी जसा शमतो[१३], तद्वत् ही विद्या शांतीतें[१४] पावते. ह्या दशेला जीवन्मुक्ति म्हणतात; आणि ही बाधितानुवृत्तिही[१५] जेव्हां प्रारब्ध क्षीण[१६] झाल्यावर नाश पावते, तेव्हां ह्याच दशेला विदेहमुक्ति म्हणतात. पण हे बंधमोक्ष अध्यारोपाप[१७]वादानें[१८] सिद्ध असल्यामुळें रज्जुस्थ[१९]

*(१) प्राण वाचविणारे (२) ईश्वराची कृपा (३) गुरु आणि शास्त्र (४) ब्रह्माच्या सदंशावर भासणारी (५) भगवंताची माया शक्ति (६) संसारी जो चिदाभास, तेच फलचैतन्य, त्याची गरज न लागता - संसारी म्हणजे कर्ता भोक्ता- चिदाभास म्हणजे बुद्धीत प्रतिबिंबित झालेला चैतन्याचा आभास. बाह्य पदार्थाला जाणणारा - वृत्तीने मर्यादित झालेल्या त्याच चिदाभासाला फलचैतन्यहि म्हणतात. ब्रह्मसाक्षात्काराकरिता फलरूप चिदाभासाची आवश्यकता नाही. (७) ब्रह्माकारवृत्ति म्हणजे विद्या तिच्या रूपाने (८) स्फुरली असता (९) प्रपंचरूपी कार्यासह (१०) अज्ञानाचा (११) ब्रह्मज्ञान (१२) लाकूड (१३) विझून जातो (१४) बाधित होतो (१५) आभास - ज्ञानाने अज्ञानाचा नाश झाला तरी पूर्व संस्काराने मरणापर्यंत देहादि प्रपंचाचा भास भासत राहतो ह्यालाच बाधितानुवृत्ति म्हणतात. बाधित झालेल्या देहादि प्रपंचाची अनुवृत्ति म्हणजे पूर्व संस्काराने आभासमात्र स्थिति असणे (१६) संपल्यावर (१७) शुद्ध ब्रह्मस्वरूपाचे ठिकाणी अज्ञानाने जगत् भासणे (१८) शुद्ध ब्रह्माच्या ज्ञानाने त्याचा नाश*

*होणे. (१९) दोरीचे ठिकाणी राहणारा.*

त्रिकालसर्पाभाववत्[१] ब्रह्माचे ठायीं कालत्रयींही[२] नाहींत. एवं ब्रह्मरूप असूनही विवर्तरूपानें[३] जसें जीवाचें जन्मादिक[४] होतात, तसेंच अकर्ता[५] अजन्मा[६] अशा परमेश्वराचेंही प्रतिबिंबापेक्षिकबिंबत्ववत्[७] अनध्यस्त विवर्तरूपानें[८] जन्मादिक होतात; परंतु यथा प्रतिबिंबाचें चांचल्यादिक[९] धर्म आपेक्षिक असलेल्या बिंबावर घडत नाहींत, तद्वत्[१०] अनध्यस्तत्वामुळें[११] जीवाप्रमाणें सुखदुःखादि आपेक्षिकविवर्त अशा परमेश्वरावरही घडत नसून त्याचें अंतर्यामित्वही भंगत नाहीं. म्हणून 'जन्मकर्म[१२] च मे दिव्यं' या भगवद्वाक्याप्रमाणें परमेश्वराचीं जन्मकर्मे वेदगुह्य[१३] असल्यामुळें, म्हणजे -

**'त्वं जातो भवसि विश्वतो मुखः' ॥**

**श्रुत्यर्थ :- 'त्वं विश्वतो मुखः सन् जातो भवसि जातः अजोऽपि जात इव भासीत्यर्थः'।**

*(१) कोणत्याहि काळी जसा सर्प नसतो. दोरीवर भ्रमाने जो सर्प भासतो, तो खरा नसून नुसता भास असल्यामुळे, जसा तो भासण्यापूर्वी नसतो, दोरीचे ज्ञान झाल्यावर नसतो व मध्ये भासतो तरी वस्तुतः नसतो त्याप्रमाणे (२) वर्तमान, भूत, व भविष्य कोणत्याहि काली (३) भ्रमाने ब्रह्माचे ठिकाणी भास होतो (४) उत्पत्तिनाश (५) कर्तृत्वरहित (६) जन्मरहित (७) प्रतिबिंबांच्या अपेक्षेने भासणाऱ्या बिंबाप्रमाणे पाण्यात सूर्याचे प्रतिबिंब पडले असता, त्या प्रतिबिंबामुळे सूर्याला आपण बिंब म्हणतो. म्हणजे सूर्याला सूर्य हा शब्द पहिले लाविला असता प्रतिबिंबामुळे जसा बिंबशब्दहि अपेक्षेने लावला त्याप्रमाणे (८) ब्रह्मज्ञान असून ब्रह्मावर भासणारा (९) पाण्यात जे प्रतिबिंब पडते ते पाण्याच्या हालण्याने हालल्यासारखे दिसते पण त्या प्रतिबिंबाचे बिंब जो सूर्य तो मात्र हालत नाही (१०) त्याप्रमाणे (११) जीवहि. उपाधीत पडलेले परब्रह्माचे प्रतिबिंब असून त्याच्या अपेक्षेने परब्रह्माला बिंब अशी संज्ञा प्राप्त झाल्यामुळे, उपाधीचे सुखदुःखादि धर्म जीवाचे ठिकाणी दिसतात पण त्याच्या योगाने बिंबरूप परब्रह्म (म्हणजे ईश्वर) सुखदुःखयुक्त होत नाही (१२) जन्म व चरित्र (१३) वेदातील गुप्त भाग.*

या श्रुतींत गूढ[१] रूपानें सांगितलेलीं परमेश्वराचीं जन्मकर्मे सर्वज्ञ सत्पुरुष स्पष्ट रीतिनें जीवन्मुक्तिरक्षणार्थ[२] जगत्कल्याणार्थ[३] वर्णन करित असतात.

प्रश्न :- भगवन् ! अशा स्थितींत ईश्वराचें स्वातंत्र्य[४] कसें राहतें ?

उत्तर :- तात म्हणतात -

**'ऐका यश श्री औदार्य । ज्ञान वैराग्य ऐश्वर्य' । हे साही गुणवर्य । वसती जेथ' ॥**

असा हा परमात्मा षड्गुणांचा[५] अधिपती[६] असल्यामुळें त्याची लीलाही व्यर्थ न जाणारी अशी (य३-५९) आहे. म्हणजे बाळांचा[७] खेळ जसा व्यर्थ जात असतो, तशी परमात्म्याची लीला व्यर्थ जात नसून, सद्गुणी राजाची क्रीडा जशी प्रजेच्या हिताला कारण होते, तशी ह्या प्रभूची लीलाही जगत्कल्याणालाच हेतु[८] होते. याला जगावर अनुग्रह करण्याला कष्ट पडत नाहींत, म्हणून अमोघलील[९] म्हणतात.

प्रश्न :- तर मग सृष्ट्यादिकांनीं[१०] हा बद्ध होतो कीं नाहीं ?

उत्तर :- नाहीं. ते सृष्ट्यादिक जीवकल्पित[११] असल्यामुळें त्यांनां परमेश्वराचा आधार असला म्हणजे पुरे. त्याच्या योगानें परमात्मा संगी[१२] होण्याची अवश्यकता नाहीं.

प्रश्न :- असें आहे तर अनध्यस्तविवर्त[१३] तरी कसा होतो ?

*(१) गुप्त (२) जीवन्मुक्तीचे रक्षण करण्याकरिता (३) जगताच्या हिताकरिता (४) मायेच्या परतंत्र न होणे (५) सहा गुणांचा (६) स्वामी (७) लहान मुलांचा (८) कारण (९) ज्याची लीला निरर्थक नसते असा (१०) जगाच्या उत्पत्ति वगैरे व्यापारांनी (११) जीवाने ज्याची कल्पना केली आहे असे (१२) बद्ध, आसक्त, कर्तृत्वबुद्धीने युक्त (१३) वस्तूचे ज्ञान असून त्या वस्तूचे ठिकाणी आवडीप्रमाणे भासणारे त्या वस्तूचेच विशेष रूप.*

उत्तर :- सुवर्णालंकाराप्रमाणें तेथें भक्तांची आवडीच निमित्त[१] आहे. तथापि भगवच्छरीरोपादान[२] ब्रह्म अनुपसंहारी[३] असल्यामुळें ब्रह्मज्ञानानें भगवच्छरीर निवृत्ति[४] अपेक्षित[५] नाहीं. ह्या प्रभूला कर्ता, हर्ता, पाळिता हीं विशेषणें जीव विकल्पित[६] आहेत. तात म्हणतात -

**'तो सृजी पाळी संहारी । ऐसें बोलती जे चराचरीं । तें अज्ञान गा अवधारीं । पंडुकुमरा ॥**
**आणखी 'कर्ता ऐसें म्हणिपे । तरी कवणें कर्मी न शिंपे । जे हातपावो न लिंपे । उदास वृत्तीच्या ॥**
**योग निद्रा तरी न मोडे । अकर्तेपणा सळु न घडे । परी महाभूतांचें दळवाडे । उभारी भले' ॥ ज्ञाने.**

हा परमात्मा सर्वांच्या अंतर्यामीं असल्यामुळें त्याला पहावयाला दूर जावें लागत नाही. केवळ प्रेमभक्ति असली म्हणजे प्राप्त होतो. जसा अज्ञानी पुरुष बहुरूप्याची कृती जाणत नाहीं, तसा परमेश्वराची भक्ति न करणारा कुत्सित बुद्धीचा कोणीही प्राणी आपल्या इच्छेनें, चतुर्भुजादिरूपें व वेदवचनांनीं[७] प्रणववासुदेवादि[८] नामें विस्तृत[९] करणाऱ्या प्रभूच्या सृष्ट्यादि[१०] लीला, तर्कानें[११] जाणत नाही. परंतु भगवद्भक्त ह्याच्या[१२] सृष्ट्यादि लीला बहुरूप्याप्रमाणें आहेत, असें जाणून सृष्ट्यादींचे ठायीं कामना[१३] न ठेवितां अनुपसंहारी जें या प्रभूचें रूप तें सत्य आणि अमोघलील[१४] असल्यामुळें तेथेंच प्रेम ठेवितात.

*(१) कारण (२) भगवंताच्या शरीराचे ठिकाणी उपादानकारणस्वरूपाने असणारे, कार्याचे जे उपादान कारण असते ते कार्यांत भरून असते व कार्य त्या कारणाशी एकरूप असते (३) नाश न पावणारे (४) भगवंताचे शरीराचा नाश (५) आवश्यक नाही, इष्ट नाही (६) जीवाने कल्पिलेली (७) वेदातील वाक्याच्या द्वारे (८) ॐकार, वासुदेव इत्यादि (९) प्रगट (१०) सृष्टीची उत्पत्ति वगैरे करणे (११) तर्काच्या साह्याने (१२) भगवंताच्या (१३) भोगाची वासना (१४) ज्याचा उपसंहार म्हणजे नाश केला जात नाही.*

प्रश्न :- महाराज ! भक्ताला तरी हें कसें समजतें ?

उत्तर :- ऐक. जागृतींत जसें मनांत किती शक्ति आहे हें (य३-६०) समजत नाहीं, परंतु स्वप्नांत पदार्थ प्रगट झाले म्हणजे मनाची निर्माण शक्ति[१] समजते कीं नाहीं ? श्रुती म्हणते, ह्या स्वप्नांत आत्मा स्वयंजोती[२] असतो; आणि त्याचीच स्वप्नांत निर्माण शक्ति आहे. ह्याप्रमाणें मिश्र सत्त्ववृत्ति[३] असूनही जीवाला मध्यसंवेगानेंच[४] जर आपली अचाट[५] शक्ति प्रगटकरितां येते, तर जीवाचें मूल स्वरूप जो परमात्मा त्याचेठायीं शुद्धसत्त्वात्मकवृत्तीचा[६] तीव्रसंवेग[७] केल्यानें भगवद्भक्तांना त्याच्या लीला कांहींच समजूं नयेत हें म्हणणे कसें शोभतें? म्हणून निष्काम[८] आणि निष्कपट[९] होऊन प्रेमानें तें रमारमणचरणमधुपान[१०] करणेंच आत्यंतिक[११] श्रेयस्कर[१२] आहे.

**॥ ओवी ॥**

**'एथ एकचि लीला[१३] तरले । जे सर्वभावें मज भजले । तया ऐलीच[१४] थडी सरलें । मायाजळ[१५], ॥ (तात.)**

*(१) पदार्थ उत्पन्न करण्याची शक्ति (२) स्वयंप्रकाशरूप (३) ज्या सत्त्वगुणात रजोगुण व तमोगुण मिसळलेले आहेत. जीव हा अशा मिश्रसत्व गुणाचा असतो. (४) स्वप्नात. मनाला एखाद्या गोष्टीचा ध्यास लागून,ती स्वप्नात दिसू लागल्यास तो मध्यसंवेग म्हणावा (५) अलौकिक (६) ज्या सत्वगुणात रजोगुण व तमोगुणाचे मुळीच मिश्रण नाही त्या सत्वगुणाच्या वृत्तीचा (७) तीव्र ध्यास (८) विषयसुखाची व मोक्षसुखाची इच्छा सोडून देऊन (९) मनात वाकडेपणा न ठेवता (१०) लक्ष्मीपतीच्या चरणाची गोडी चाखणे (११) निःसीम (१२) कल्याणाचे (१३) सहज (१४) अलिकडल्या काठीच (१५) मायारूपी पाणी.*

**॥ दोहा ॥**

**इतिविध[१] तातसुवचन[२] सदा वाजत वेणु समान[३] ।**
**श्रवण[४] करुनि मति गोपिका[५] धावति गत मदमान[६] ॥**

**॥ पद ॥**

**जन्मूनी तो धन्य धन्य धन्य जाहला । वासुदेवचरणतीर्थ सलिलीं[७] नाहला[८] ॥धृ०॥**
**धन्य कूल तदीय[९] धन्य जनकमाउली[१०] । वृत्ति[११] ज्याचि अविकल[१२] रत[१३] कृष्णपाउलीं[१४] । जन्मुनी ॥१॥**
**पाउनि[१५] जे चरण पुन्हा संसृती[१६] नये । अभजकजन[१७] नेणति जे साधुनिही[१८] नये[१९]। जन्मुनी. ॥२॥**
**लोकिं[२०] लोकनाथ[२१] पाहीं भेद सांडुनी । लोक लावीं भगवत्पथीं[२२] भजन[२३] मांडुनी[२४] । जन्मुनी० ॥३॥**
**तोचि देव त्या सुृदिनंत[२५] फावलें[२६] । यद्हृदयीं[२७] अलकावतीकांतपाउलें[२८] ॥ जन्मुनी० ॥४॥९३॥**

*(१) याप्रमाणे (२) श्री ज्ञानेश्वरमहाराजांचे वचन, सुंदर उपदेश (३) वेणूसारखा मधूर (४) ऐकून (५) मति ह्याच कोणी गोपिका (६) गर्व व मान सोडून, ताठा व गर्वरहित होऊन (७) भगवान् वासुदेवाच्या चरणतीर्थरूपी पाण्यात (गंगेत) (८) स्नान केले (९) त्याची (१०) आईबाप (११) मन (१२) निश्चल (१३) रमली (१४) कृष्ण चरणाचे ठिकाणी (१५) प्राप्त होऊन (१६) संसारात (१७) भजन न करणारे लोक (१८) पारंगत होऊनहि (१९) तर्कशास्त्र (२०) जगात (२१) भगवान् (२२) भगवंताच्या मार्गास (२३) भजनमार्ग (२४) प्रवृत्त करून (२५) ब्रह्म (२६) प्राप्त झाले (२७) ज्याच्या हृदयात (२८) आळंदीचे स्वामी श्रीज्ञानेश्वरमहाराज यांचे चरण.*

॥ अभंग ॥

त्याची श्रीहरीचें चरित्र ज्या स्थानीं(१) । वरिष्ठ(२) पुराणीं गणिलें(३) जें ॥१॥
वेदतुल्य(४) ज्याचे प्रामाण्य प्रबळ(५) । वरी घननीळ(६) गाईलासे(७) ॥२॥
किंबहुना वेद भारतादिकांचें । सारमय(८)साचें(९) अमृत हें ॥३॥
सत्यवतीसूतें(१०) शुका निजसूता(११) । जगत्कल्याणार्था(१२) पढविलें ॥४॥
त्यांनीं गंगातीरीं(१३) ही निगम माळा(१४) । परीक्षिन्नृपाला(१५) लेवविली(१६) ॥५॥ (य३-६१)
सौरभाच्या(१७) लोभें(१८) मीही गेलो तेथें । ऐकिलें विख्यात(१९) शुकमुखें(२०)॥६॥
तेचि तुह्मीं सुज्ञ(२१) ऐका सविस्तर । हेंचि शाङ्‍र्गधर(२२) कलीमाजीं ॥७॥
ज्ञानेश्वरकृपें तें झाले मऱ्हाटें(२३) । वृत्ति(२४)भक्तिवाटे(२५) लावावया ॥८॥९४॥

॥ ओवी ॥

तें तृतीय(२६) सखीप्रेषण(२७) । आलंदीवल्लभचरणीं(२८) अर्पुन । चतुरक्षरी(२९) मंत्र जपून । भवनिर्दलन(३०) सहज करूं ॥९५॥

*(१) ठिकाणी (२) सर्व पुराणात श्रेष्ठ (३) गणले गेलेले (४) वेदांच्या बरोबरीने (५) अत्यंत मान्यता (६) भगवान् (७) वर्णन केला आहे. (८) सारभूत (९) खरोखर (१०) भगवान् व्यासांनी (११) आपल्या मुलाला (१२) जगताच्या कल्याणाकरिता (१३) गंगेच्या काठी (१४) वैदिक माळ (१५) परिक्षितीराजाला (१६) गळ्यात घातली. (१७) सुगंधाच्या (१८) मोहित होऊन (१९) त्रैलोक्यात प्रसिद्ध असलेले (२०) शुकाचार्यांच्या मुखाने (२१) शहाणे, विवेकी (२२) प्रत्यक्ष कृष्णस्वरूप (२३) महाराष्ट्र भाषेत (२४) मनाला (२५) भक्तिमार्गाने (२६) तिसरे (२७) सखीला पाठविणे (२८) आळंदीचे राजे श्रीज्ञानेश्वरमहाराज यांचे पायी (२९) ज्ञानेश्वर (३०) संसाराचा नाश.*

**हरिःॐ तत्सत् श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरकृपाप्रसादे प्रियलीलामहोत्सवे आमंत्रणविलासे सूतदत्तोत्तरं नाम तृतीयसखीप्रेषणम् ।**
**॥ श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ॥**

०००

## सखीप्रेषण ४ थें. विषयानुक्रम

*भागवतारंभाचें कारणवर्णन.(पृष्ठ ६२-६७),मंगलाचरण व*

***शौनक मुनीचे सूतास प्रश्नः-***

*(१) भगवान् व्यासांची भागवत वर्णन करण्याकडे प्रवृत्ति कां झाली? पृष्ठ ६२. (२) शुकाचार्य परम वैराग्यशील व समबुद्धि असून जडमूकवत् हास्तिनपुरांत संचार करीत असतां लोकांनीं त्यांनां कसे ओळखलें ? शुकसमबुद्धिवर्णन ६३. श्रीमद्भागवताचें अपौरुषेयत्व ६३. शुकांची पावनता व निस्पृहतावर्णन ६३. (३) गृहस्थांचें घरीं गोदोहनमात्रकाल राहणारे शुक संपूर्ण भागवत सांगतपावेतों कसे राहिलें ? ६३. (४) महाराज परीक्षितीचे जन्मकर्म विवरून सांगण्याविषयीं ६४. परीक्षितीच्या सद्गुण, शौर्य, व प्रजावात्सल्यादि गुणांचें वर्णन ६४. (५) अशा पराश्रय तनूचा परीक्षितीनें कां त्याग केला? ६४. सूताला वेदाधिकार नसूनही पुराणद्वारा सकल वेदार्थ जाणत असल्यामुळें त्याचें वैदिकत्व व ब्रह्मासनाला पात्रताकथनपूर्वक प्रश्नांचीं उत्तरें देण्याविषयीं ऋषींची विनंती ६४. सूताचें उत्तर :- व्यासावतारकथन ६४. व्यासांनीं केलेले वेदाचे विभाग, त्यांचें शिष्यांकरवीं अध्यापन व महाभारताख्यान रचण्याचें कारण ६५. महाभारतादि इतिहासपुराणांचें शूद्रांनीं पठन करावें अथवा करूं नये याविषयीं दोन पक्षांचें म्हणणें. ६५. भगवान् व्यासांची जगद्धिताविषयीं उपायचिंतनार्थ खिद्यमानता व तत्र (सरस्वतीतटीं) नारदस्वामींचें आगमन ६७.*

*०००*

# सखीप्रेषण ४ थें.

## भागवतारंभ कारण वर्णन

॥ श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरमाउली समर्थ ॥

॥ दोहा ॥

अलकावतिपतिचरणरज[१] आणि गोपिपतिपाय[२] ॥
वंदुनि प्रेमें सचिन्हकें[३] वाहु[४] वचन[५] मन काय[६] ॥१॥ वृंदपति ०॥

॥ चौपाई ॥

वासविसूनु[७] वदती या परिचे[८] । सौतिवचन[९] जे सुजनास[१०] रुचे[११] ॥
ते परिसुनि[१२] मुनिमाजि[१३] पुढारी[१४]। बहुह्वच[१५] शौनक वचन उ्चारी॥२॥

*(१) आळंदीचे राजे श्री ज्ञानेश्वर महाराज यांच्या पायाची धूळ (२) गोपीकांत श्रीकृष्णाचे पाय (३) ध्वजवज्रांकुशादि चिन्हाने युक्त असलेले (४) समर्पण करू (५) वाणी (६) शरीर (७) वासवी म्हणजेच सत्यवती तिचा पुत्र व्यास (८) अशाप्रकारे (९) सूताचे वाक्य (१०) शौनकादि सज्ञनांना (११) आवडले (१२) ऐकून (१३) मुनिगणांमध्ये (१४) मुख्य (१५) ऋग्वेदी.*

॥ ओवी ॥

भो भो सूत भाग्यवंता । भो भो पंडित चतुर वक्ता । आम्हां सांगे भगवद्वार्ता[१] । जे शुकें[२] परीक्षिता बोलिली ॥३॥

॥ चौपाई ॥

भारत रचक[३] व्यासचिद्वृत्ति[४] । इकडे[५] किंकृत[६] तदीय[७] प्रवृत्ती ।
तत्सुत[८] शुकहि परम विरागी[९] । विगतमाय[१०] जो ब्रह्म विभागी[११] ॥४॥ (य३-६२)
ज्यास कधींहि विकल्प[१२]न लागे । पूर्ण[१३]परि जनीं अबुधसम[१४] वागे ॥४॥

॥ ओव्या ॥

ज्याची समबुद्धी[१५] केवढी । जो पळत असतां लवडसवडी[१६] । पाठीं भेटीचे गोडी[१७] । धांवला व्यासू ॥५॥

॥ चूर्णिका ॥

तो धांवत असतां शुकमुनी । जळीं नग्न होत्या देवकामिनी[१८] ।
त्या वस्त्र न घेवोनी । प्रेमें शुकातें वंदिती मनीं[१९] ।
तंव व्यास आलें मागुनी । तंव वस्त्र घेती[२०] कामिनी ।
व्यास पुसें तिया लागुनी । कां वस्त्र घेतले मज निरखुनी ।[२१]

*(१) भगवंताची कथा (२) शुकाचार्याने (३) भारत इतिहासकर्ते (४) चैतन्यस्वरूपाचे ठिकाणी ज्यांची अंतःकरणवृत्ति आहे, ज्ञानी (५) भागवताकडे (६) कशामुळे (७) त्यांची (८) व्यासांचा मुलगा (९) वैराग्यशील (१०) मायारहित (११) ब्रह्मस्वरूप झालेला. (१२) जगबुद्धि (१३) ब्रह्मरूप, पूर्णज्ञानी, (१४) अज्ञान्यासारखा (१५) सर्वत्र आत्मरूपाने मी व्यापक आहे अशी बुद्धि (१६) लगबगीने (१७) आवडीने (१८) देवांच्या स्त्रिया (१९) मनाने (२०) परिधान करू लागल्या (२१) पाहुनी*

तंव त्या उत्तर देती भामिनी[१] । तुम्हासी दिसे स्त्रीपुरुष[२] अझुनी ।
तुमचा सुत परमहंस[३] मुनी । जयातें मनीं भेद न दिसे म्हणोनी ।
तदा आम्हीं निःशंक कामिनी । आतां तुम्हातें पाहुनी सवस्त्रा[४] जाहलो ॥६॥

गद्य

याप्रमाणें तो भगवान् शुकाचार्य कुरु-जांगल-देश फिरत फिरत तसाच जडमूकवत्[५] हस्तिनापुरांत संचार करीत असतांना लोकांनीं त्यांना कसें ओळखलें?

॥ अभंग ॥

याहिवरी पुनः शुक[६] परीक्षिता । समागम[७] सूता झाला कैसा ॥
कैसा तो संवाद[८] झाला अघटीत[९] । जेथ ही *सात्वत[१०] श्रुती स्पष्ट[११]॥२॥

श्रुति म्हटल्यानें वेद भागवत । पुरुषरचित[१२] न म्हणावे ॥३॥
आणि सांगावया[१३] लागे बहुकाळ । राहिला तोंवेळ शुक केवी ॥४॥
गोदोहनमात्र[१४] गृहस्थांचें घरीं । जाऊनिया करी पवित्रता[१५] ॥५॥
नाहीं भिक्षाचाड[१६] आवडी काह्यांची[१७] । तीर्थरूप[१८] साची[१९] करी स्थानें[२०] ॥६॥

*(१) स्त्रिया (२) हा पुरुष ही स्त्री असा भेद (३) सर्वसंगत्यागी, व पूर्णब्रह्माचे ठिकाणी निश्चल झालेले (४) वस्त्र नेसल्या (५) अत्यंत मूढाप्रमाणे व मुक्याप्रमाणे (६) शुकाचार्यांचा व परीक्षिती राजाचा (७) सहवास (८) बोलणे (९) कधी घडून येण्याला अशक्य (१०) * भागवत - 'यत्रैषा सात्वती श्रुतिः' असे मूळात वचन आहे त्याच्या स्पष्टीकरणार्थ हे वाक्य आहे (११) प्रगट, व्यक्त (१२) जीवाने रचलेले (१३) भागवत सांगण्याकरिता (१४) गाईला दोहण्याकरिता जेवढा वेळ लागतो तितका वेळपर्यंत (१५) गृहस्थाचे घरांची शुद्धि (१६) भिक्षेची आवड (१७) कशाची (१८) पवित्र, तीर्थाप्रमाणे (१९) खरोखर (२०) ठिकाणे*

घर गंगेसम पडतांचि धूळ[१] । पवित्र तात्काळ होती सर्व ॥७॥
संतचि देताती तीर्थां[२] तीर्थपण । याविषीं[३] प्रमाण भक्तिसूत्र[४] ॥८॥
ऐसे असूनिया भागवत कैसे । सांगितलें असे प्रश्न हा कीं ॥९॥
कृपा करूनी दे यथार्थ उत्तर । जेणें ज्ञानेश्वर मिळतील ॥१०॥ (य३-६३)

॥ ओव्या ॥

आणि तो अभिमन्यूचा सुतू । महाराज परीक्षितू । सुजन[५] महाभागवतू । म्हणती जया ॥८॥
त्या परात्म्याचिया[६] जन्मकर्मा[७]। सूता विवरुनी[८] सांग आह्मां । जो पंडुवंशकीर्ति[९] परमा[१०] । वाढविता ॥९॥
तो महाराज प्रतापदिनकरू[११] । जयातें धनकोश[१२] अर्पुनी शत्रू । तयाच्या आसना नमस्कारू । करिती प्रेमें ॥१०॥
वरी वयानें अतितरुण । धर्मात्मा आणि राज्यसंपन्न । जयाच्या योगें प्रजाजन । संतुष्ट सदा ॥११॥
आणि सज्जनांचें जीवित । आपल्यासाठीं[१३] नसते किंचित् । केवळ लोक कल्याणार्थ । वाचती ते ॥१२॥
ऐसे असोनी सलक्ष्मी[१४] सप्राण । त्यागावयाची इच्छा धरुन । गंगेवरी बैसला येऊन । काय कारण निरूपी[१५] ॥१३॥
सज्जनांचे जें जें धन[१६] । ते ते पराचेचि[१७] जीवन[१८] । यास्तव जरी विरक्त अर्जुनजनन[१९]।

*(१) चरण धूळ (२) तीर्थांना (३) याविषयी (४) नारदभक्तिसूत्र (५) सज्जन (६) परब्रह्माच्या (७) अवतार चरित्राला (८) फोड करून (९) पंडूच्या वंशाची कीर्ति (१०) अत्यंत (११) अखंड प्रकाशरूप; सूर्याप्रमाणे अखंड पराक्रमी (१२) द्रव्यसंचय (१३) स्वतःच्या सुखभोगाकरिता (१४) राज्यलक्ष्मी व प्राण यांसह (१५) सांगा (१६) मिळकत (१७) दुसऱ्याचे (१८) जीवनाकरिता, (१९) अर्जुनापासून जन्मलेल्या अभिमन्युपासून*

तरी पराश्रय[१] तनु[२] कां त्यागिली ॥१४॥
ज्यानें सहज परोपकार होत । ते त्यजणे सुजना अनुचित[३] । एवं हे प्रश्न समस्त । उत्तरे देऊनी परिहरी[४] ॥१५॥
तूं विप्र नृप वा वैश्य न होसी । म्हणोनि वेदाधिकार[५] नसो तुजसी ।
परी पुराणद्वारा[६] वेदार्थासी[७] । जाणसी सकळा ॥१६॥
पुराणेतिहासें[८] वेदोपबृंहण[९] । ते न होय अवेदेकरून[१०] ।
एवं तत्त्वसंदर्भी[११] वचन । सनातन नंदन बोलिला ॥१७॥
इतिहास[१२] पुराण पंचम वेद । येथ छांदोग्यश्रुति प्रमाण प्रसिद्ध । पुराण भारत पंचम वेद । स्मृतिहि म्हणे ॥१८॥
या दृष्टी[१३] तूं वैदिक पवित्र । आम्हां सांगावयास पात्र ।
म्हणूनि ब्रह्मासन[१४] दिधलें पवित्र । वरी वर संकर्षणाचा ॥१९॥

॥ गद्य ॥

सूत म्हणाला , हे शौनका ब्रह्मदेवाच्या दिवसांत कृत त्रेत द्वापार आणि कलि ही चार युगें फिरतां फिरतां तिसऱ्या[१५] वेळीं द्वापार युग प्राप्त झालें तेव्हां नारायणाच्या अंशानें पाराशर ऋषीपासून वासवीच्या म्हणजे सत्यवतीच्या ठिकाणीं तपस्वी ज्ञानसंपन्न व योगी व्यास भगवंताचा अवतार झाला .

*(१) दुसऱ्याला आश्रय देणारी (२) देह (३) अयोग्य (४) सोडवा (५) वेदाचा अधिकार (६) पुराणावरून (७) वेदातील*

*प्रतिपाद्य विषयाला (८) पुराणे व इतिहास यांच्या योगाने (९) स्पष्टीकरणाच्या द्वारे अर्थविस्तार करणे (१०) वेदाहून भिन्न असलेल्या ग्रंथाने (११) नांवाचा (१२) भारतादि इतिहास व पुराणे मिळून पांचवा वेद आहे (१३) या दृष्टीने (१४) वेदपुराणेतिहास सांगण्याचा अधिकार ब्राह्मणाचा असून तो सूताला दिला गेला होता. (१५) तिसऱ्या फेरीच्या वेळी.*

**॥ चूर्णिका ॥**

**तो अतीतानागतज्ञाता[१] । सरस्वतीजळीं[२]स्नानादिक्रिया समस्ता । (य३-६४)**
**सारुनी[३] बदरिकाश्रमी चित्तैकाग्रता[४] । करावया बैसला असतां ।**
**अगोचर[५] वेगवान[६] जनकृतिप्रेरित[७] कालेंकरून[८] ।**
**जन[९] बुद्धिशक्तिविपन्न[१०] । धर्मश्रद्धादिकेंकरूनी[११] हीन ।**
**हे अमोघ[१२]दीव्य दृष्टीनें[१३] पाहून ।[१४]चातुर्होत्रयज्ञादिक चालावे[१५] म्हणून ।**
**एकाचि वेदातें ऋग्यजु साम अथर्व या नामें चतुर्धा[१६] विभागून[१७] ।**
**आणि पांचवा वेद इतिहास पुराण । स्वशिष्यातें पढविता झाला ।**
**त्यांत पैलानें ऋग्वेद संपूर्ण । जैमिनीनें सामगायन ।**
**यजुर्वेदीं निष्णात वैशंपायन । अथर्व शिकला सुमंतू दारुण[१८] ।**
**आणि माझा पिता रोमहर्षण । तो शिकला इतिहास पुराण ।**
**पुढें या शिष्यांनीं वेदातें अनेकधा विभागून ।**
**परंपरागत शाखीपण[१९] चालविले ॥२०॥**

**॥ गद्य ॥**

पूर्वी[२०] बुद्धिमंत ज्याप्रमाणें वेदधारण करित होते, तथा श्रीव्यासे वेद विभागिला.

*(१) भूत भविष्य वर्तमान या तिन्ही कालातील सर्व जाणणारे (२) सरस्वती नदीच्या पाण्यांत (३) आटोपून (४) चित्ताची एकाग्रता (५) डोळ्याने न दिसणारा (६) सपाट्याने धांवणारा (७) लोकांच्या बऱ्या वाईट कर्माने प्रवृत्त झालेला (८) अशा कालाच्या योगाने (९) लोक (१०) मंद बुद्धीचे (११) धर्मादिकांची श्रद्धा नसलेले (१२) अचूक (१३) ज्ञानदृष्टीने (१४) श्रौतयज्ञ (१५) लोकांनी त्याचे अनुष्ठान करीत राहावे म्हणून (१६) चार प्रकारांनी (१७) भाग करून (१८) त्यात जारणमारणादिक आभिचारिक कर्म सांगितल्यामुळे (१९) आपआपल्या शाखेस चिकटून राहणे (२०) व्यासांनी जे वेदाचे विभाग केले ते स्वतंत्र मनाने केले नसून पूर्वीच्या अध्ययनपरंपरेला पाहूनच केले.*

**॥ चूर्णिका ॥**

**स्त्रिया शूद्र आणि पतित[१] त्रिवर्ण । यांनीं वेद न करावे श्रवण ।**
**ऐसिया निषेधास्तव[२] तोचि[३] अर्थ संपूर्ण । अत्यंत कृपावंत होऊन ।**
**स्त्रीशूद्रादि स्वस्वधर्म[४] जाणून । येथचि[५] साधोत[६] मोक्षादिकल्याण ।**
**ऐसा कृपाआशिर्वाद देऊन । महाभारताख्यान[७] रचियेलें[८] ॥२१॥**

**॥गद्य ॥**

*(पहिला पक्ष)* या भारतादि इतिहासपुराणाचें शूद्रांनीं श्रवणच करावें, पठन[९] करूं नये. कारण **'श्रोतव्यमेवशूद्रेण नाध्येतव्यं कदाचन'** शूद्रांनीं पुराणादिक ऐकावेत, पठन करूं नयेत, असा भविष्यपुराणांत कंठरवानें[१०] निषेध[११] दाखविला आहे. श्रीमच्छंकराचार्यांनीं विष्णुसहस्त्रनामभाष्यांत पठनाच्या[१२] अधिकाराचा निषेध केला आहे, **''न जपयज्ञेन''** या वाक्यानें पुराणोक्त[१३] मंत्रपाठ[१४] शूद्राला विहीत[१५] नाहीं असें सांगितलें आहे. हा एक पक्ष झाला;

दुसरा पक्ष असा आहे कीं, स्कंधपुराणांतील ब्रह्मोत्तरखंडांत मुमुक्षु स्त्री व शूद्र यांनीं शिवपंचाक्षरीमंत्र जपावा, असें कंठरवानें सांगितलें असल्यामुळें पुराणोक्त मंत्रजपाचा शुद्रांना आधिकार आहे हें सिद्ध होते. **''नियतं सर्ववर्णानाम्''** या महाभारताच्या श्लोकांत **(य३-६५)**-

*(१) पापाचरणाने ब्राह्मणादि जातीतून भ्रष्ट झालेले (२) मनाईमुळे (३) वेदांतीलच (४) आपापला (५) इतिहासपुराणाच्या द्वारा (६) प्राप्त करून घेवोत (७) महाभारतेतिहास (८) प्रगट केले (९) स्वतः वाचन (१०) स्पष्ट शब्दाने (११) मनाई (१२) वाचण्याच्या (१३) पुराणात सांगितलेल्या (१४) मंत्रांचे वाचन (१५) सांगितले.*

सर्व वर्णांला जें जप्य[१] तें गायत्री शब्दानें बोलिलें जातें असें म्हटलें आहे. या श्लोकाची टीका करताना चतुर्धरांनीं सर्व वर्ण म्हणजे ब्राह्मणादि म्लेच्छान्त[२] असा अर्थ केला आहे. यावरून सर्वांना आपापल्या जपाचें गायत्रीतुल्य फळ होत असल्यामुळें दैवी[३] संपदा उत्पन्न झाली असतां पुगणादिजन्य[४] ब्रह्मज्ञानाविषयीं स्त्रीशूद्रांनां अधिकार सिद्ध होतो.

अपशूद्राधिकरणाच्या[५] उपसंहारभाष्यांत **'इतिहासपुराणाधिगमे[६] चातुर्वर्ण्याधिकारस्मरणात्'** असें श्रीमदाचार्यांनींहि[७] अनुमोदन[८] दिलें आहे.

याच अधिकरणाच्या उपसंहारभाष्यांत पुराणांचें अध्ययन[९] करून शूद्रानें ब्रह्मज्ञान करून घ्यावें असें स्वीकारतां[१०] येणें शक्य आहे, असें विज्ञानभिक्षूनें म्हटलें आहे.

आणि **'शूद्रःसुखमवाप्नुयात्'** ह्या विष्णुसहस्त्रनामांतील वाक्याच्या टीकेंत शूद्राला विष्णुसहस्त्रनामाच्या जपाचा अधिकार चतुर्धरांनीं[११] सांगितला आहे.

न्यायरक्षामणींत पौराणिक[१२] शिवविष्णूपासनेचा शूद्रांनां अधिकार आहे असें अपय्यादीक्षित म्हणतात.

तद्वत् सर्व वर्णांना गोपालमंत्र इच्छितफलदाता आहे, याप्रमाणें[१३] पंचरात्रांत नारदाचार्यांनीं सांगितलें असून,

सर्व तांत्रिक मंत्रांचा शूद्राला अधिकार 'ब्रह्मविद्याभरणांत' अद्वैतानंदानें सांगितला आहे. शिवाय पौराणिक मंत्र श्राद्धादिकालीं शूद्रांनीं म्हणावेत अशीं अनेक वचनें शूद्रकमलाकरांत घेतलीं आहेत. तेथेंच शूद्रांनां कांहीं संस्कारहि–

*(१) जे जपावयाला सांगितले असेल ते (२) ब्राह्मणापासून म्लेंच्छापर्यंत (३) सात्विक गुणांची संपत्ति (४) पुराणादिकाने उत्पन्न होणाऱ्या (५) ब्रह्मसूत्र शारीरभाष्यांतील ज्या सूत्रांनी, वेदाच्या द्वारा शूद्रांना ब्रह्मज्ञान मिळविण्याचा अधिकार नाही असे सिद्ध केले आहे त्या सूत्रांवरील भाष्याचे शेवटी (६) सर्व वर्णांना इतिहासपुराणाच्या ज्ञानाचा अधिकार आहे (७) शंकराचार्यांनी (८) संमति (९) वाचन करून (१०) म्हणता, मान्य करता (११) भारताच्या टीकाकारांनी (१२) पुराणात सांगितलेल्या (१३) असे*

सांगितलें असून धर्मसिंधूंत अमंत्रपूर्वक[१] उपनयनही[२] सांगितलें आहे. आणखी **'येरां[३] स्तोत्र का नाममंत्र'** । असें तातानीं[४] म्हटलें असून **'हरिःॐ तत्सदिति'** या अभंगांत तुकारामांनी प्रणवाचा उच्चारही केला आहे.

सारांश, या एकंदर विवेचनावरून शूद्राला पुराणभारतादी पठन[५] करण्याचा अधिकार आहे. **'शूद्रमपि कुलगुणसंपन्नं मंत्रवर्ज्यमनुपवीतं ध्यापयेत'** असें सुश्रुत संहितेच्या दुसऱ्या अध्यायांत आर्षवचनहि[६] आहे, असें या दुसऱ्या पक्षाचें म्हणणें आहे.

भविष्यपुराणादिस्थानीयनिषेध[७] सर्वथा[८] पुराणपठनाविषयींचा[९] किंवा पौराणिकमंत्रभिन्नपुराणपठनाविषयींचा[१०] आहे असें प्रथमपक्षी[११] म्हणतात; आणि तो निषेध असच्छूद्रपर[१२] आहे, असें द्वितीयपक्षी[१३] म्हणतात.

याप्रमाणें हा विषय मूळ[१४] व्यासांचा नसून मी येथें आनुषंगिक[१५] निरूपिला[१६] आहे, म्हणून ह्यांतील प्रमाद[१७] असल्यास ते माझेच समजावेत. **(य३-६६)**

**॥ ओव्या ॥**

**एवं जगत्कल्याणासाठीं[१८] । सर्वदां तनुमनें[१९] झटोनि शेवटीं । चित्तीं न पावोनि तुष्टी[१] । सरस्वतीतटीं बैसलें ॥२२॥**

*(१) वेदातील मंत्र न म्हणता (२) मौंजीबंधन (३) इतरांना (४) श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी (५) वाचन (६) ऋषीचे वचन, जुने (७) भविष्यपुराणादिकात केलेली पुराणवाचनाची मनाई (८) सर्वस्वी (९) पुराणवाचनाविषयी (१०) पुराणांतून रामकृष्णादिकांचे नाममंत्र सोडून बाकीच्या पुराणवाचनाविषयी (११) पहिल्या मताचे लोक (१२) ब्राह्मणादि तीन वर्णांची सेवा न करणारा व शूद्रालाहि ज्या आचरणाने पातित्य येत असेल तशा आचरणाचा शूद्र, त्याला अधिकार नाही असे सांगणारा (१३) दुसऱ्या मताचे लोक म्हणतात (१४) मूळ भागवतामध्ये व्यासांनी सांगितला नसून (१५) वर्तमानकाली चाललेल्या शूद्राधिकारविषयक चर्चेवरून व मूळातील पदावरून आपल्या मनाला सुचलेला (१६) सांगितला आहे (१७) चुक्या, चुकीचे विचार (१८) सर्व लोकांच्या हिताकरिता (१९) शरीर व मनाने. (१) सुख, आनंद*

**बदरिकाश्रमीं एकान्ती । निजमनीं विचारिती । कीं मी रत[२] भूतहितीं । तरी तोष[३] चित्तीं कां न वाटे ॥२३॥**

**मी ब्रह्मचर्यादि पाळिले व्रत । वरिष्ठांची आशा पाळिली यथार्थ । महाभारतमिषें[४] वेदार्थ[५] । दर्शविला सकळ ॥२४॥**

**ज्या महाभारतातूनि । शूद्रादिजन आणि कामिनी । स्वस्वधर्म[६] समजोनि । घेवों शकती ॥२५॥**

**तथापि खेद वाटे मना । मी ब्रह्मज्ञानी जीवन्मुक्तराणा[७] । असतांहि असंतुष्टपणा । मजप्रती कां ॥२६॥**

किंवा जें भगवंतातें प्रिय । जें परमहंसाचे बापमाय[९] ।
तें पूर्ण भागवतधर्म[१०] स्वयें । न वर्णिलें म्हणोनि काय अतुष्टी ॥२७॥
ऐसा अंतरीं[११] ब्रह्मपूर्ण[१२]। वरी सकृप[१३]आणि जगद्धितास्तव[१४] खिद्यमान।
उपाय चिंतित असतां द्वैपायन[१५] । तंव आश्रमी ब्रह्मनंदन[१६] पातले[१७]॥२८॥
श्रीनारदस्वामी आले जाणूनि । सत्कारें[१८] पूजा करोनी । साष्टांग प्रणाम चरणीं । सद्भावें केला ॥२९॥
॥ दोहा ॥
नारदव्याससमागमीं[१९] पुढें परम[२०] संवाद[२१] ।
श्रोते श्रवण करोत जो ऐकतांचि भवबाध[२२] ॥३०॥ (य३-६७)
॥ हरिःॐ तत्सत् श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरकृपाप्रसादे प्रियलीलामहोत्सवे आमंत्रणविलासे
भागवतारंभकारणवर्णनं नाम चतुर्थसखीप्रेषणम् ॥
॥ श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ॥

*(२) लोकांच्या कल्याणाकरिता झटत असतांना (३) समाधान (४) महाभारताच्या उद्देशाने (५) वेदातील ज्ञान (६) आपापला (७) जीवन्मुक्तामध्ये श्रेष्ठ (९) मायबापाप्रमाणे अत्यंत कल्याण करणारे म्हणून अत्यंत पूज्य, आदरणीय (१०) साक्षात् भगवंताची प्राप्ति करून देणारे (११) अंतःकरणामध्ये (१२) ब्रह्मस्वरूप झालेले (१३) अत्यंत कृपाळु (१४) लोकांच्या कल्याणाची तळमळ वाहणारे (१५) व्यास (१६) भगवान् नारदऋषी (१७) आले (१८) मोठ्या आदराने (१९) भगवान् नारद व भगवान् व्यास यांच्या भेटीत (२०) श्रेष्ठ (२१) संभाषण (२२) संसाराचा नाश.*

ooo

## सखीप्रेषण ५ वें. विषयानुक्रम

### व्यासचित्तप्रसादनार्थ नारदांचें हरिकीर्तनगौरववर्णन.(पृष्ठ ६८-८०)

*श्रीगुरुनमन, व्यासांच्या खेदाविषयीं नारदांचा प्रश्न व व्यासांचें उत्तर ६८. व्यासांच्या असंतोषाचें नारदांनी सांगितलेलें कारण व (य३-६) व्यासकृतींतील न्यूनता ६९. हरिगुणवर्णनावांचून कवितेचें वैय्यर्थ्य ६९. भक्तिवांचून ब्रह्मज्ञानही अभिमान उत्पन्न करते व कृष्णार्पणावांचून निष्काम कर्मही अधर्म होतो. ७०. उपायांतरें टाकून कृष्णलीला वर्णन करण्याविषयीं व्यासांना नारदांचें स्नेहपूर्वक सांगणें. ७०. महाभारतांतील धर्मादिकांच्या निरूपणांतील दोष व कर्मत्यागपर निवृत्तिधर्माची कठीणता. ७०. भगवल्लीलायशगानरूपी परमधर्माची सुलभता ७१. स्वधर्मनिष्ठतेहून धर्मादिरहित भगवद्भक्तीचें श्रेष्ठत्वनिरूपणः- स्वधर्माला भगवद्भक्तीची अपेक्षा आहे तद्वत् भगवद्भक्तीला स्वधर्माची अपेक्षा नाहीं. ७२. स्वकर्मावांचून शरण आलेल्या दीनांचें रक्षण केलें असतां परमेश्वर वैषम्यादि दोषास पात्र होत नाहीं. ७२. भक्तीला अडथळा येत नसला तर भगवदर्पणबुद्धीनें निष्काम कर्मे करावीं पण पूर्णता भक्तीनेंच होतें. ७२. अष्टकादिकांच्या कर्मप्रदानानें भक्तिअपेक्षेवांचूनच ययातिराजा स्वर्गास गेला व 'कर्माचीं पितृलोकादि फळें मिळतातच' या शंकेचें समाधान ७२. **सर्व संसार प्रारब्धावर टाकून परमार्थाविषयींच यत्न करावा** याविषयीं महाभारताचें प्रमाण व अशा व्यवस्थेनें प्रयत्नवादी व प्रारब्धवादी यांचा विरोधपरिहार ७२. भगवद्भक्त कोणत्याही योनींत गेला तरी कर्मनिष्ठा-सारखा खालीं पडत नाहीं याविषयीं सप्रमाण निरूपण ७३. भगवद्भक्ताला जशी जातीची अपेक्षा नाहीं तसें पातित्यशास्त्रही त्याचेविषयी लागूं नाहीं, मात्र पतिताचा दुराचार भक्ति करतांनां सुटत गेला पाहिजे ७४. अन्वय-व्यतिरेकानें परमात्मस्वरूपाचें अनुवादपूर्वक कथन करून व व्यासांनां त्यांच्या आधिकारिकत्वाचें स्मरण देऊन प्रभूच्या लीला व पराक्रम वर्णन करण्याविषयीं नारदांचें स्नेहानें सांगणें ७६. तपःशास्त्रश्रवणाध्ययनादिकांचे फल उत्तमश्लोकगुण वर्णन करणें हेंच आहे. ७६. भगवत्कथा सत्संगानें कळते याविषयीं नारदांचें स्वानुभवपूर्वक प्राग्जन्मवृत्तकथन ७६. संतांच्या उच्छिष्टसेवनानें व सभक्तिक श्रवण-विवेकानें नाारदांनां शुद्ध त्वंपदार्थ ज्ञात होऊन निष्काम भक्ति प्राप्त झाली तो क्रमनिरूपण ७७. कार्योपाधि व कारणोपाधि निरसनार्थ उपाय, (या कार्यकारणोपाधींचें स्पष्टीकरण १४२ व्या पृष्ठावर दृष्टांत- (य३-७) पूर्वक केलें आहे) गमनसमयीं मुनींनीं नारदाला अधिकारी जाणून केलेला ब्रह्मात्मैक्यबोध व त्याचा प्रभाव ७७. भगवंताला कर्मे सकर्तृक अर्पण केलीं असतां तीं बंधननिवर्तक होऊन त्रिविधदुःखनिवृत्ती व अखंडपरमानंदप्राप्तीला कारण कशीं होतात याविषयीं वैद्यशास्त्रीय दृष्टांतपूर्वक निरूपण ७७. मागें (पृष्ठ ७१ ते ७४) भगवद्भक्तीला कर्माची अपेक्षा नाहीं असें सांगून आतां कर्मसापेक्षी भक्ति कां सांगतात या शंकेचें समाधान ७८. कर्मेही करावयाचीं नाहींत व भगवद्भक्तीही नाहीं अशा उभयभ्रष्टांची चांडालसमता व*

*ईश्वरार्पणकर्मांनीं चित्ताची शुद्धता ७८. चित्ताला जतूची उपमा, संस्कारांनां स्थायी म्हणण्याचें कारण व मन विषयांत कठीण करून भगद्वारणीं द्रुत केलें असतां परमानंदप्राप्ति ७८. सभक्तिक ज्ञान प्राप्त होण्याकरितां शास्त्रोक्त साधनक्रमनिरूपण ७८. भक्तांनां भगवत्कृपेनें सर्वज्ञत्वादि गुणांची अनायास प्राप्ति ७९. भक्तिरहित ज्ञानियाहून सभक्तिक ज्ञानियाची श्रेष्ठता व अनिर्वचनीय भगवत्प्रेमानें त्याची स्थिती ७९. कर्मानें कर्माचें निर्हरण कसें होतें ? ७९. भगवदाज्ञानुसार ब्रह्मार्पणत्वानें क्रियानिरूपण व त्यापासून भगवदनुग्रहसहित भक्तीची प्राप्ति ७९. भक्ति उत्पन्न झाली असतां चतुर्व्यूहोपासनाद्वारा अनध्यस्त भगवंताचें दर्शन व ब्रह्मबोधानें परमानंदप्राप्ति ८०. याप्रमाणें सज्जनमुखांतून ऐकलेल्या ज्ञानाचें अनुष्ठान केलें असतां नारदांनां झालेला भगवत्प्रसाद व लोकोद्धारार्थ भक्तिसहित हरियश निरूपण करण्या-विषयीं व्यासांनां त्याचें सांगणें ८०.*

०००

# सखीप्रेषण ५ वें.

## व्यासचित्त प्रसादार्थ हरिकिर्तन गौरव वर्णन.

**॥ श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरमाउली समर्थ॥**

**॥ दोहा ॥**

**चारु[१] श्रीगुरुचरणनख[२] प्रणमुनि मतिअनुसार[३] । श्री पंचमसखिप्रेषणें[४] आणवु जगदुद्धार[५] ॥१॥**

**॥ चौपाई ॥**

**सूत म्हणे शौनकादि मुनिना । जो हरिभजनार्स्तव[६] धरि वीणा[७] ॥**
**तो विधिनंदन[८] चंदनवचनें[९] । पुसत कुशल[१०] व्यासा मृदु रचने[११] ॥२॥**

**॥ दोहा ॥**

**भो ! भो ! पाराशर्यमुने संतुष्ट कीं मन काय[१२] । दिससि विचारीं[१३] मग्न[१४] तूं शोचिसि[१५] कवण उपाय ॥३॥**

**॥ ओवी ॥**

**तूं धर्मादिवेदवेत्ता[१६] । तैसा सम्यगनुष्ठाता[१७] । [१८]यतस्त्वां[१९] परिपूर्णधर्मार्था[२०] । महाभारता निर्मिलें ॥४॥**

*(१) सुंदर (२) श्रीगुरूच्या चरणाचे नख (३) बुद्धीप्रमाणे (४) पांचव्या सखीला पाठवून (५) जगाचा उद्धार करणारा (६) श्रीहरीचे भजन करण्याकरिताच (७) तंबुरी (८) श्रीनारदमुनि (९) चंदनाप्रमाणे शीतल अशा वचनाने (१०) क्षेम, समाचार (११) कोमल शब्दाने (वचने) (१२) शरीर (१३) विचारात (१४) गुंग (१५) शोधतोस (१६) संपूर्ण वेदाला व धर्माला जाणणारा (१७) धर्माचे योग्य अनुष्ठान करणारा (१८) ज्याअर्थी (१९) तू (२०) संपूर्ण धर्म व अर्थ या पुरुषार्थाचे विवेचन ज्यात आहे असा.*

**॥ दोहा ॥**

**आणि सनातन[१] ब्रह्म जें तें तुज महदुपलब्ध[२] । तरि पण शोकीं मग्न कां दिससि जसा निर्बुद्ध[३] ॥५॥**
**नारदासि तैं वदे मुनी सकल तव दयाऽशेष[४] । परि पुसतो मी अतुष्ट[५] कां वद जाणसि अविशेष[६] ॥६॥**

**॥ चौपाई ॥**

**अजजज[७] जाणसि प्रभु सकलातें[८] । कवण हेतु[९] मम मतिविकलातें[१०] ।**
**वरि त्वां भजनीं[११] अजित[१२] जिंकिला। कोणि नाहिं रडका[१३] त्वदंकिला[१४]।**

**॥ दोहा ॥**

**जो करि निजसंकल्पगुणें[१५] गुणमय[१६] जनविस्तार[१७] ।**
**तूंहि तन्मय[१८] होउनी कृत मृति जनि निस्तार[१९] ॥८॥ (य३-६८)**

*(१) अविनाशी (२) पूर्ण प्राप्त आहे (३) अज्ञानी (४) पूर्ण दया (५) समाधानरहित (६) संपूर्ण (७) श्रीनारदा, अज परमात्म्यापासून झालेला ब्रह्मदेव व त्यापासून झालेला (८) सर्वकांही (९) कारण (१०) असमाधानाला (११) भजनाने (१२) परमात्मा (१३) शोक करणारा (१४) तुझा अंकित झालेला, दास (१५) आपल्या नुसत्या संकल्पाच्या योगाने (१६) त्रिगुणात्मक (१७) सृष्टीची रचना (१८) तद्रूप (१९) जन्ममरणरूपी संसाराचा नाश केलेला आहे ज्यांनी असा.*

॥ ओव्या ॥

आणि सकल बुद्धीचा जाणता[१] । चुकलिया[२] जननीसम[३] स्तनपानता । देउनी मार्गी[४] आणिता । तूंचि एक ॥९॥
भवान्[५] भगवजपंचानन[६] । दीनजनतमा[७] दिनकरण ।
यास्तव योगादि करूनी न्यून[८] । माझें काय तें सांग आधीं ॥१०॥

॥ पद ॥

ऐकुनि मुनिवचन[९] तदा ब्रह्मनंदनू[१०]। जो भवदवतप्तजनां[११] परम[१२] चंदनू ॥धृ०॥
वदत कृष्णप्रीतिविना[१३] सकल निष्फल[१४] । तूंचि पाहि तप्त[१५] कसा विदित निष्कळ[१६] ॥१॥
धर्म अर्थ काम मोक्ष सकल कल्पना[१७] । यांचि आस[१८] व्यासमुने प्रभुस अल्प ना[१९] ॥२॥
एक प्रेमळासचि[२०] तो अर्पि जीविता[२१] । त्यजुनि देवपणहि गोपपात्रि[२२] जेविता ॥३॥
धर्म अर्थ काम मोक्ष वर्णिले त्वया । जनि-मृतिहर[२३] विष्णुगुणा[२४] वर्णिलें न या ॥४॥
आनुषंगिकत्व[२५] दिलें श्रीरमाधवा[२६] । केलें त्वां अकथितसम[१] विष्णुवैभवा[२] ॥५॥

*(१) सर्वांच्या बुद्धीचा साक्षी (२) भलत्याच मार्गाने जाणाऱ्याला (३) आईप्रमाणे (४) सन्मार्गाला (५) तुम्ही (६) संसाररूपी हत्तीला सिंहाप्रमाणे (७) संसारदुःखाने दीन झालेल्यांच्या अज्ञानाचा सूर्याप्रमाणे नाश करणारा (८) गौण (९) व्यासमुनीचे वाक्य (१०) नारद (११) संसार वणव्याने संतप्त झालेल्या लोकांस (१२) अत्यंत श्रेष्ठ चंदनाप्रमाणे (१३) श्रीकृष्णप्रेमावाचून (१४) व्यर्थ (१५) दुःखी (१६) निष्कल परब्रह्म जाणलेला असून (१७) कल्पित (१८) आशा (१९) इतकीदेखील नाही (२०) प्रेमल भक्तांस (२१) प्राण (२२) गवळ्यांच्या ताटात (२३) जन्ममरणदुःख निवारण करणाऱ्या (२४) विष्णूच्या गुणांना (२५) गौणत्व (२६) विष्णूला.(१) न वर्णिल्यासारखे (२) भगवान् विष्णूच्या सामर्थ्याला*

हीच न्यूनता[३] म्हणोनि तोष[४] होइना । ज्ञानेश्वरकरुणेविण[५] शांति येइना ॥६॥ ऐकुनि मुनि वचन० ॥११॥

॥पद ॥

नवल नवल[६] हरिचे गुण वाटती जना । तन्मय[७] करितातचि जे नित्य सज्जना ॥धृ०॥
सुमन सुमन[८] चरणनखीं[९] जरि न वाहिलें । धर्म्यहि[१०] तरि घेति न जे ब्रह्मिं[११] राहिले ॥१॥
हरिगुणविन[१२] मधुर काव्य न रुचतें कदा । परमहंस इच्छिति ना काकसंपदा[१३] ॥२॥
ज्ञानेश्वरभजनीं जरि वृत्ति रंगती । सहज मिळे तोषद[१४] व्रजकांतसंगती[१५] ॥३॥
नवल नवल हरिचे गुण० ॥१२॥

॥ आर्या ॥

यत्पदपद[१६] हरिगुणमय[१७] पवित्र तरि ती अशुद्ध[१८] ही कविता ।
तमनेता[१९] काय मळे[२०] मृगतोयानें[२१] प्रकाशमय सविता[२२] ॥१३॥

*(३) कमीपण (४) समाधान (५) श्रीज्ञानेश्वराच्या कृपेवाचून (६) अद्‌भुतरम्य (७) भगवद्रूप (८) शुद्ध मन हेच कोणी सुंदर पुष्प (९) पायाचे नखावर (१०) धर्माला अनुसरून असलेले (११) परब्रह्माचे ठिकाणी ज्यांची बुद्धि स्थिर झाली (१२) ज्यांत भगवंताचे गुण वर्णिले नाहीत असे मधुर काव्यहि त्यांना आवडत नाही (१३) पुण्यपापरूपी कावळ्याची भोगसंपत्ति (१४) समाधानाला देणारी (१५) व्रजाचे स्वामी श्रीकृष्ण यांचा सहवास (१६) ज्या कवितेतील शब्द अन् शब्द (१७) भगवंताच्या गुणाचे वर्णन करणारे (१८) साहित्य व छंदःशास्त्राच्या दृष्टीने अशुद्ध (१९) अंधःकाराचा नाश करणारा (२०) दूषित होतो, लिप्त होतो (२१) मृगजलाच्या छायेने (२२) सूर्य.*

यास्तव ज्या गीतीं[१] हरिनामें[२] ते साधु गाति ऐकविती ।
जे हरिगुण भवश्रांता[३] सृप्तिसुखघन अखंड दाखविती ॥१४॥
ब्रह्मज्ञान तथापि भक्तिविणा उपजवीच अभिमाना ।
मग कर्म केंवि उचली[४] लाजेनें घातल्याच आधि[५] माना ॥१५॥ (य३-६९)

॥ ओवी ॥

जरी निष्काम असेल कर्म । तेथ ही कृष्णार्पणता[६] वर्म[७] ॥
हें नेणें[८] जरी गर्विष्ट अधम । तरी धर्म तो अधर्म सहजचि ॥१६॥

**॥ अभंग ॥**

**यास्तव तूं करी एकचित्त आतां । आळवि अनंता प्रेमभावें ॥१॥**
**तुझी बुद्धी शुद्ध यथार्थदर्शनी[९] । पापविमर्शनी[१०] कृष्णलीला[११] ॥२॥**
**समाधीनें सर्व जाणूनीयां वर्णी[१२]। अक्षयचि[१३] पर्णी[१४] चित्सुखता[१५] ॥३॥**
**गोविंद गुणांची सज्ञना आवडी । विकारवावडी[१६] होय जेणें ॥४॥**
**ज्ञानेश्वरकृपें वर्णितां सद्गुण । चित्त समाधान होईल कीं ॥५॥**

**॥ ओवी ॥**

**कां आवर्ती[१७] सांपडतां नाव[१८] । तरी बुडणियाचाचि संभव । वरी वायूचा चल[१९] स्वभाव । साह्य जाहला ॥१८॥**

*(१) गाण्यात, काव्यांत (२) हरीची नांवे (३) संसारांत दमलेल्यांना (४) वर करी (५) खाली (६) कृष्णास अर्पण करणे (७) गुह्य, रहस्य (८) ओळखून वागणार नाही तर (९) सत्य सांगण्याकरिता (१०) पापाचा नाश करणारी (११) श्रीकृष्णाचे चरित्र (१२) वर्णन कर (१३) अखंड (१४) प्राप्त करून घे (१५) चैतन्यानंद (१६) विकारांची वावडी, पतंगाप्रमाणे विकार उडून जातात (१७) भोवऱ्यांत (१८) होडी (१९) गतिमान्*

**॥ दोहा ॥**

**तेंवि उपायांतरें[१] करी न करुनि हरिगुणगान[२] । तरि चित्त न घे स्थैर्यता वाहुनि स्वजननीआण[३] ॥१९॥**

**॥ गद्य ॥**

याप्रमाणें भगवद्यशावांचून[४] भारताचें ठिकाणीं प्रतिपादन केलेलें धर्मादि आकिंचित्कर[५] आहेत, असेंच नाहीं तर विरुद्धही[६] आहेत. कारण अति तुच्छ[७] अशा काम्य[८] कर्माला तूं धर्म म्हणून वर्णन केलें आहेस. त्यामुळें हें काम्यकर्मच धर्मरूप आहे, असा प्राकृत[९] जनांचा समज होऊन श्रुतिसंतादि[१०] निवारण[११] करीत असतांही तुझ्या वाक्यावर विश्वास असल्यामुळें लोकांनां तोच धर्म वाटतो, म्हणून हा तूं अन्यायच[१२] केलास.

''मी जसा भारताचें ठिकाणीं प्रवृत्तिरूप[१३] धर्म सांगितला आहे, तसा मोक्षधर्म सनत्सुजातपर्व व ब्रह्मसूत्रादिकांचें ठिकाणीं कर्मत्याग रूप निवृत्तिपर[१४] धर्मही सांगितला आहे. त्याच्या योगानेंच मुमुक्षूला पूर्णता[१५] होते'' असें तूं म्हणशील तर सम्यक् नाहीं.

*(१) नाना प्रकारच्या उपायाने (२) श्रीहरीच्या गुणांचे कीर्तन (३) आईची शपथ घेऊन सांगतो (४) भगवंताचे गुणवर्णन न करता (५) व्यर्थ, तुच्छ (६) शास्त्रहेतूंच्या विरूद्ध. (सर्व शास्त्रांनी मोक्षप्राप्ती हाच मुख्य पुरुषार्थ ठरवून, त्याची प्राप्ती व्हावी म्हणूनच त्यांचा जन्म; त्या हेतूचाच नाश झाला असल्यामुळे) (७) नाशिवंत, क्षणभर सुख देणाऱ्या म्हणून तुच्छ, टाकाऊ (८) विषयसुखाच्या प्राप्तिकरिता करावे लागणारे किंवा सांगितलेले (९) अज्ञानी (१०) श्रुति व संत (११) खंडन (१२) खरा मार्ग दाखविण्याची सावधगिरी न घेण्याचा अन्याय (१३) काम्यकर्मरूप (१४) संसाराचा नाश करणारा (१५) पूर्ण ब्रह्माची प्राप्ति.*

कारण या निवृत्तिमार्गानें[१] देशकालवस्तुपरिच्छेद[२] ज्याला नाहींत अशा अनंत[३] परमेश्वराचे सुख जाणण्याला एखादाच समर्थ होतो. कारण **'क्लेशोऽधिकतरस्तेषां'** इत्यादि श्लोकानें भगवंतानेंच तुझ्या त्या निर्गुणपर धर्मांत कठिनता[४] (य३-७०) सांगितली आहे. आणि **'मनुष्याणां सहस्त्रेषु कश्चिद्यतति सिद्धये । यततामपि सिद्धानां कश्चिन्मां वेत्ति तत्त्वता ॥** (गीता.अ.७.श्लो.३) याप्रमाणें साधनचतुष्टयसंपन्न[५] आणि श्रुति युक्ति अनुभवाचें ठायीं अति निपुण[६] एखादा पुरुषच मला जाणूं शकतो, असेंही भगवंतानेंच सांगितलें आहे; आणि

**''मां हि पार्थ व्यपाश्रित्य येऽपि स्युः पापयोनयः । स्त्रिया वैश्यास्तथा शूद्रास्तेऽपि यान्ति परां गतिम्'' ॥**
**''किं पुनर्ब्राह्मणाः पुण्या भक्ता राजर्षयस्तथा'' ।**
**''भक्तास्तेऽतीव मे प्रियाः''**

इत्यादि श्लोकांत बहुवचनानें माझें यश कीर्तन करणारे प्रेमळ भक्त मला सुलभ रीतीनें मिळतात, असें नवम-द्वादशाध्यायांत भगवंतानेंच सांगितलें आहे. म्हणून पोहून जाणाऱ्या एखाद्या कष्टवानापेक्षां[७] नौका जशी सर्वांना बसण्याला उपयोगी पडते, त्याप्रमाणें देहादिकांचें ठिकाणीं ज्यांचा अभिमान आहे अशांना व विरक्तांना पावन करणारे विमल[८] भगवद्यश[९] व त्याची लीला वर्णन करून सर्वांना मार्ग दाखीव.

*(१) संन्यासादि ज्ञान मार्गाने (२) देशाची मर्यादा, कालाची मर्यादा व वस्तूची मर्यादा. ब्रह्मवस्तु देशकालवस्तुमर्यादारहित आहे म्हणजे ती सर्वव्यापक असल्यामुळे विवक्षित काळी, विवक्षित स्थळी, किंवा विवक्षित वस्तूंत किंवा वस्तूरूपाने आहे; असे म्हणता येत नाही. (३) व्यापक, नाशरहित (४) अत्यंत श्रम (५) आत्मानात्मविवेक, इहपर विषयवैराग्य, शमादि साधनसंपत्ति, मुमुक्षुता या चार साधनांनी युक्त (६) प्रविण (७) कष्ट करणाऱ्यापेक्षा (८) शुद्ध (९) भगवंताची कीर्ति*

किंबहुना काम्यकर्मत्याग[*] करून जसें परमेश्वराचें भजनच विहीत आहे, तसें नित्यनैमित्तिकादि[१] सर्व कर्म त्यागूनही परमेश्वरभजनच करावें. परमेश्वराच्या भक्तीनें पूर्ण झाला असतां[२] तर कांहीं चिंताच नाहीं. परंतु **कर्मत्याग करून भजन करणारा पुरुष अप्र[३]दशेंतच मरण पावला तरी त्या कर्मत्यागदोषामुळें[४] त्याला पतन[५] होत नाहीं.** – हें म्हणणें कर्मवाद्यांनां चांगलें वाटणार नाहीं हें खरें, परंतु त्यांनां तरी भगवद्भक्तीचा त्याग करून स्वधर्मनिष्ठेनें[६] काय मिळते?

दैत्य योनींत असलेला प्रऱ्हाद धर्मादिरहित[७] अशा भगवद्भक्तीनें पूर्ण झाल्याचें उदाहरण प्रसिद्ध आहे. व तसेंच भगवद्भक्तीवांचून स्वधर्मादियुक्त[८] नहुष, नृग, ययाति, ह्यांचें पतनही[९] प्रसिद्ध आहे. ते ब्राह्मणशापामुळें झालें असें मात्र कोणी म्हणू नये. कारण ब्राह्मणशापापासूनही भक्तिनिष्ठ अंबरीषाचें रक्षण प्रभूंनीं केलें. आणि यद्यपि सनकादिकांच्या शापानें काम्य[१०] अप्र[११] जय विजय भक्तांना राक्षसयोनी प्राप्त झाली, तथापि स्वधर्मादिकांची अपेक्षा न करून प्रभूंनी त्यांना आपलेंच पद दिलें. आणि पार्वतीच्या शापाने दैत्ययोनींत गेलेल्या चित्रकेतूलाही स्वपदच दिलें. यावरून देवांच्याही शापापासून परमात्मा आपल्या भक्तांचे रक्षण करितो असें दिसतें. स्वधर्मनिष्ठ[१२] (य३-७१) नृगाचाही श्रीकृष्णाच्याच हस्तानें उद्धार झाला. एवं **स्वधर्माला भगवद्भक्तीची अपेक्षा आहे, तद्वत् भगवद्भक्तीला स्वधर्माची अपेक्षा नाहीं.**

*(*) विषयसुखाच्या प्राप्तिकरिता करावे लागणारे कर्म सोडून देऊन.(१) रोज करावे लागणारे ते नित्य व देवपितरांच्या उद्देशाने करावे लागणारे ते नैमित्तिक (२) झाल्यास (३) भक्तिपूर्ण होण्यापूर्वी (४) कर्म सोडल्याने त्याला पाप लागून (५) नरक, दुर्गती (६) नुसता धर्म पाळल्याने (७) धर्म न पाळता (८) निष्ठेने धर्म पाळणाऱ्या (९) अधोगति (१०) विष्णु लोकांतले भोग भोगण्याची इच्छा असलेले (११) निष्कामभक्तियोग पूर्ण न झालेले, भोगवासना असलेले (१२) आपल्याला विहित असलेल्या धर्माचे योग्य आचरण करणाऱ्या*

आतां स्वकर्मावांचून भक्तांचें पालन करितो म्हणून परमेश्वरावर वैषम्यादि[१] दोष आणणारे मूढ आहेत, कारण उदार राजाकडे एखादा याचक गेला असतांना त्या याचकाचें रक्षण करण्याला राजाला चाकरी आदिकांची अपेक्षा[२] पाहिली पाहिजे काय? तितकें याचनच[३] उदारापुढें, त्याचें पुरें होतें. ही सामान्य[४] उदाराविषयीं जर गोष्ट आहे, तर सर्वथा उदार परमेश्वराकडे दीन होऊन शरण आलेल्यांचें रक्षण वैषम्यादि दोषास कसें प्राप्त होईल?

तथापि भक्तीला कर्मानें अडथळा[५] येत नसला तर परमेश्वराची वेदांत आज्ञा आहे असें समजून निष्काम व भगवदर्पण बुद्धीनें तीं कर्मे करावयाला प्रत्यवाय नाहीं. परंतु पूर्णता[६] तर भगवद्भक्तीनेंच होते. याविषयीं नारदभक्तिसूत्रांत प्रमाण आहे. **"त्रिसत्यस्य भक्तिरेव गरीयसी भक्तिरेव गरीयसी"** (सूत्र ८१) आणि तातही म्हणतात, **'आणि मजचिमाजीं असतां । जेणें मी दुऱ्हावें पांडुसुता। तें पुण्य ऐसें म्हणतां । जीभ न तुटे काई?'** (ज्ञाने० अ० ९ ओवी ३१७)

ननु, 'अष्टकादिकांच्या (राजर्षीच्या) कर्मप्रदानानें[७] भक्तिअपेक्षेवांचूनच[८] ययाती राजा स्वर्गास गेला, आणि कर्माची पितृलोकादिक फळें मिळतातच' अशी कोणी शंका करील तर पुनरावृत्ति[९] न होणाऱ्या अखंडसुखाविषयींच जाणत्यानें[१०] यत्न केला पाहिजे, कारण विषयसुख तर देव व पशू या योनींतही सारखेंच आहे.

*(१) सर्वांशी सारखे वर्तन न ठेवणे, कांही कारण नसता एकाचा उद्धार करणे व एकाचा उद्धार न करणे. (२) त्या याचकाने चाकरी केली तर राजा त्याचे रक्षण करील असे नाही. (३) माझे रक्षण करा अशी मागणी (४) लौकिक (५) हरकत (६) परमेश्वरप्राप्ति (७) कर्म दिल्याने (८) भक्तीचे साह्य नसता (९) पुनः जन्ममरणाच्या फेऱ्यात पडणे (१०) शहाण्याने.*

म्हणून जशीं **दुःखें आपोआपच[१] इच्छा न करितां येतात, तशीं सुखेंही यत्न न[२] करितांच येतात. ह्या विचार करून सर्व संसार प्रारब्धावर[३] टाकून, यत्न परमार्थाविषयींच मात्र करावा.** भारतांतही असेंच सांगितलें आहे.

**'अप्रयत्नाऽऽगताः सेव्या गृहस्थैर्विषयाः सदा । प्रयत्नेनोपगम्यश्च स्वधर्मः इति मे मतिः ॥१॥** (य३-७२)

*(शांतिपर्वांतर्गत मोक्षधर्म अ०१२.श्लो०३६)*

अशी व्यवस्था केली म्हणजे प्रयत्नवादी व प्रारब्धवादी यांचा विरोध येत नाहीं. **यद्यपि प्रयत्नानें संसार मिळविला तितका मिळतो, तरी परमार्थावांचून अशा अनित्य सुखार्थ यत्न करण्यांत अर्थ कोणता?**

दुसरे, भगवद्भक्त नीच योनींत[४] जरी गेला तरी त्याचा भक्तीविषयीं अधिकार[५] नष्ट होत नाहीं. परंतु कर्मनिष्ठांची गोष्ट तशी नाहीं, ते तर याच जन्मांत कांहीं दोषामुळें[६] पतित[७] झाले असतां कर्माधिकारी[८] रहात नाहींत; तर मग पुनर्जन्म, मुळींच अधिकार नसणाऱ्या[९] चांडालादि योनींत झाला असतां त्यांना वर मान करण्याला सवड नाहीं, हें काय सांगावें लागतें?

*(१) पूर्वजन्मीच्या कर्माने, या जन्मात कांही प्रयत्न न करता (२) या जन्मात यत्न न करिता, पूर्वजन्मांतील प्रयत्नाने (३) पूर्व कर्मानुसार जसा व्हावयाचा असेल तसा होईल असे समजून त्याविषयी प्रयत्न न करता (४) जन्मांत (५) कोणत्याही योनीत जन्मला तरी त्यानी पूर्वी केलेली भक्ती नाहींशी होत नाही. त्याही जन्मात त्याचा भक्तिकडे ओढा असतोच व त्याला भक्ति करता येते (६) पापाचरणाने (७) जातीतून भ्रष्ट झाल्यास (८) कर्म करण्याचा अधिकार राहत नाही. (९) जन्मतः ज्या योनीत धर्मानुष्ठानाचा अधिकार नसतो.*

सारांश, **भक्तीचा अधिकार नष्ट होत नसल्यामुळें कोणत्याही योनींत गेलेला भक्त पुनः भक्तीविषयींच यत्न करून पूर्ण होतो,** असें भगवंतांनींही सांगितलें आहे.

**'यतते च ततो भूयः संसिद्धौ कुरुनंदन । पूर्वाभ्यासेन तेनैव ह्रियते ह्यवशोऽपि सः ॥१॥'**

अर्थ :- हे अर्जुना, आणि पुनः मागला योग पूर्ण होण्याकरितां तो यत्न करितो. व निराळ्या परिस्थितींत असतांहीं पूर्वकृत अभ्यासानुसारच तो तिकडे ओढला जातो.

विष्णुपुराणांत प्रऱ्हादाचें असें वचन आहे :-

**'नाथ योनिसहस्त्रेषु येषु येषु व्रजाम्यहम् । तेषु तेष्वचलाभक्तिरच्युतास्तु सदा त्वयि ॥१॥'**

अर्थ :- हे नाथ, ज्या ज्या अनेक सहस्त्रावधि योनींचें ठिकाणीं माझा जन्म होईल त्या त्या ठिकाणीं तुझी कधींही न ढळणारी अशी अखंड भक्ति मात्र मला असो.

**'मां हि पार्थ व्यपाश्रित्य येऽपिस्युः पापयोनयः। स्त्रियो वैश्यास्तथाशूद्रास्तेऽपि यांति परां गतिम्' ॥१॥** (य३-७३)

*(गी० अ० ९ श्लोक ३२)*

असें भगवंतांनींही सांगितलें आहे. या श्लोकावरील भाष्याच्या टीकेंत आनंदगिरींनींही **'भक्तिसाम्राज्ये[१]जातिनियमो नास्ति' ।** असें म्हटलें आहे. तात म्हणतात :-

**'म्हणोनि कुळ उत्तम नोहावें । जाति अंत्यजही व्हावें । वरी देहाचेंनि[२] नांवें । पशूचेही लाभो ॥**

**... अगा ! नांवें घेतां ओखटी[३] । जे आघवेया अधमाचिये[४] शेवटीं । तिये पापयोनींही किरीटी जन्मलें जे ॥**

**ते पापयोनी मूढ । मूर्ख जैसे कां दगड । परी माझ्याठायीं दृढ । सर्वभावें ॥**

**ते पापयोनीही होतु कां । ते श्रुताधीत[५] ही न होतु कां । परी मजसी तुकितां[६] तुका । तुटी[७] नाहीं ॥**

**एऱ्हवीं दैत्यकुळ साचोकारें[८] । इंद्रही सरी[९] न लाहे उपरे । म्हणोनी भक्ती गा येथ सरे[१०] । जाती अप्रमाण ॥**

**म्हणोनी कुळ जाति वर्ण । हे आघवेंचि गा अकारण[११] । येथ अर्जुना माझेपण[१२] । सार्थक[१३] एक ॥'**

*(१) या भक्तीच्या राज्यांत अमुक जातीनेच भक्ती करावी असा निर्बंध नाही. (२) देहाच्या दृष्टीने पाहता (३) वाईट (४) सर्व पतितांचे खाली (५) पढलेले, बहुश्रुत (६) बरोबरी करण्यास (७) उणेपणा (८) खरोखर पाहता (९) बरोबरी (१०) उपयोगी पडते. भगवत्प्राप्ति करून देते. (११) निष्कारण (१२) माझ्याशी भक्तीचा संबंध जोडणे (१३) उपयोगाचे.*

**॥ गद्य ॥**

तात्पर्य कोणत्याही योनींत असला तरी भगवद्भक्त कर्मनिष्ठासारखा खालीं[१] पडत नाहीं. **''नास्ति तेषु जातिविद्यारूपकुलधनक्रियादि भेदः''** त्या भक्तजनांमध्यें जाति, कुल, विद्या, सौंदर्य, वंश, द्रव्य आणि क्रिया यांचा कोणत्याही तऱ्हेचा भेद[२] नाहीं. याप्रमाणें भगवद्भक्ताला जशी जातीची अपेक्षा नाहीं; तसें पातित्यशास्त्रही[३] त्याचे विषयीं लागूं नाहीं. हें-

**'अपि चेत्सुदुराचारो भजते मामनन्यभाक् । साधुरेव स मन्तव्यः सम्यग्व्यवसितोहि सः' ॥**

या श्लोकांत भगवंतांनींही सांगितलें आहे. परंतु त्यांत हा विशेष आहे - पतितांचा दुराचार भक्ति करितांना सुटत गेला पाहिजे. परंतु जाती कोणतीही असो, ती सुटण्याची आवश्यकता नाहीं. भगवान् भक्तीनें त्याच जातींत पावन करतो ''

**भक्तिः पुनाति मन्निष्ठान् श्वपाकानपि संभवात्''**

असें भागवत स्कंध ११ अ० १४ श्लोक २१ यांत म्हटलें आहे; व,

**॥ अभंग ॥**

**उंच[४] नीच[५] कांहीं नेणें भगवंत । तिष्ठे भावभक्ती देखोनीयां ॥१॥**
**दासीपुत्र कण्या विदुराच्या भक्षी । दैत्याघरीं रक्षी प्रल्हादासी ॥२॥**

*(१) भगवंताचे भक्तीला आंचवेल असा (२) म्हणजे भक्ती करावयाला विवक्षित एखादी जात पाहिजे किंवा विवक्षित कुल, विद्या, इत्यादि पाहिजे असे नाही. (३) म्हणजे पापाचरणाने पतित झाल्यामुळे, भक्तीचा त्याला अधिकार राहत नाही. असा निर्बंध भक्तीला लागू नाही. (४) श्रेष्ठ जाति (५) अधम जाति.* ***(य३-७४)***

**[१]चर्म रंगू लागे रोहिदासा संगें । कबिराचे मागीं[२] विणी शेले ॥३॥**
**सजन कसाया विकुं लागे मांस । माळी सावत्यास खुरपूं लागे ॥४॥**
**नरहरी सोनारा घडों[३] फुंकू लागे । चोखामेळ्यासंगें ढोरें ओढी ॥५॥**
**नामयाची जनीसवें वेचि शेणी । धर्माघरीं[४] पाणी वाहे हरी ॥६॥**
**नाम्यासवें जेवी[५] नव्हे संकोचित । ज्ञानियाची[६] भिंत आंगें ओढी ॥७॥**
**अर्जुनाची घोडी हाकी हा सारथी । भक्षी पोहे प्रीति सुदाम्याचें ॥८॥**
**गौळीयांचें घरीं गाई अंगें वळी । द्वारपाळ बळीद्वारीं झाला ॥९॥**
**यंकोबाचें ऋण फेडी हृषीकेशी । अंबऋषीचे सोशी गर्भवास ॥१०॥**
**मिराबाईसाठीं घेतो विषप्याला । दामाजीचा झाला पाडेवार[७] ॥११॥**
**घडी माती वाहे गोऱ्या कुंभाराची । हुंडी मेहत्याची अंगें भरी ॥१२॥**
**पुंडलीकासाठीं अझूनी तिष्ठत । तुका म्हणे मात धन्य त्याची ॥१३॥**

**॥ गद्य ॥**

असें तुकाराम महाराज म्हणतात. म्हणून[८] तूं प्रभूच्या लीला आणि त्याचें स्वरूप वर्णन कर. (टीप :- हा ग्रंथ केवळ बोधाकरितां लिहिला आहे. ऐतिहासिक प्रीतीनें लिहिला नाहीं. आतां पूर्व कल्पांतील तुकारामांचें स्मरण करून नारदांनीं सांगितलें असें कोणी जुळवून घेईल तर त्याविषयीं मी उदासीन आहे.) (हें वरील व्याख्यान मी श्रीधरांच्या टिकेनुसार केलें आहे, तथापि प्रमाद असल्यास सत्पुरुषांनीं क्षमा करून योग्य तेवढेंच घ्यावें.) तो परमात्मा जसा अन्वयानें[९] सर्वजगद्रूप आहे, आणि व्यतिरेकानें[१०] त्याहून निराळा आहे,

*(१) कातडे (२) मागावर (३) दागिने घडवू लागणे (४) धर्मराजांचे घरी (५) जेवतो (६) श्रीज्ञानेश्वर महाराजांचे (७) कोतवाल (८) ग्रंथकाराची (श्री गुलाबराव महाराजांची) टीप - हा ग्रंथ केवळ बोधाकरिता लिहिला आहे, ऐतिहासिक प्रीतीने लिहिला नाही. आता पूर्वकल्पांतील तुकारामाचे स्मरण करून नारदानी सांगितले असे कोणी जुळवून घेईल तर त्याविषयी मी उदासीन आहे. (९) जेथे जेथे जगत आहे तेथे तेथे परमात्मा आहेच अशा व्याप्तीने सर्व जगद्रुप कार्यांत परमात्माच कारणरूपाने भरला असल्यामुळे, (१०) निराळा पाहता.*

- तसाच जगज्जन्मस्थितिलयाला[१] निमित्त[२] आणि उपादानही[३] तो परमात्माच आहे. ही गोष्ट तुला जरी ठाऊक आहे तरी मी थोडक्यांत तुला सुचविलें आहे. तूं ईश्वरावतार[४] असल्यामुळें तुला आचार्यापेक्षां[५] नाहीं. म्हणून हे अमोघज्ञानसागरा[६]! त्या प्रभूचें पराक्रम आणि लीला तूं विस्तारपूर्वक वर्णन कर, असें मी तुला स्नेहानें[७] म्हणतों. ( य ३ - ७५)

जगत्कल्याणासाठीं मी परमात्मा अवतीर्ण झालों आहे असें जाणून जगच्छ्रेयस्कर[८] त्या प्रभूच्या लीला व पराक्रम तूं विस्तारपूर्वक वर्णन कर, असें मी स्नेहानें म्हणतो. कारण तपःशास्त्रश्रवणाध्ययनादिकांचे[९] फल उत्तमश्लोक-परमात्मगुणवर्णन[१०] करणें हेंच आहे, असें ब्रह्मादि कवी[११] म्हणतात.

**एवं ही भगवत्कथा । सत्संगें कळे सर्वथा । येविषयीं यथार्थता[१२] । मदनुभवचि[१३] प्रमाण ॥२०॥**

*(१) जगताची उत्पत्ति, स्थिति व नाश याला (२) जगताहून निराळा राहून जगताच्या उत्पत्त्यादि घडामोडी करणारा (३) जगद्रूप कार्यात भरून असलेला (४) ईश्वराचा अवतार (५) गुरुची जरूरी (६) बिनचूक अशा ज्ञानाचा समुद्र (७) प्रेमाने (८) जगाचे कल्याण करणाऱ्या (९) तप करणे, शास्त्र श्रवण करणे व त्याचे अध्ययन करणे इत्यादिकाचे फल (१०) उत्तम*

*किर्ति ज्याची आहे अशा भगवंताचे गुण गाणे (११) ज्ञाते, विद्वान् (१२) खरोखर (१३) माझा अनुभव*

**॥ चूर्णिका ॥**

**मी पूर्वजन्मीं सत्यवतीनंदना[१] । दासीपुत्र[२] होतो जाणा । वेदविद् ब्राह्मणाच्या[३] दासीउदरीं[४] ।**
**माझा जन्म जाहला ही स्मृति[५] माते पुरी[६] । मग वर्षाशरदृतूभीतरीं[७] । एकत्र[८] वास द्विजेश्वरीं[९] ।**
**कर्तुमिच्छिला[१०] तत्सेवाकारी[११] । नियोजिलें[१२] मातें ।**
**परी मी बाळपणा पासुनी । एकनिष्ठ[१३] सेवागुणीं[१४] । चांचल्यरहित अल्पभाषणीं[१५] । ऐसिया माते पाहुनी ।**
**जरी ते समदर्शी[१६] होते मुनी । तरी दीनदयालुत्वस्वभावे करूनी[१७] । अवचित[१८] कृपा उपजलि मनी ।**
**म्हणूनि मातें अनुग्रहोनी[१९] । कृपालोचनीं[२०] अवलोकिलें[२१] । मग त्या मुनींच्या आज्ञेवरूनी ।**
**तदुच्छिष्ट[२२] प्रसाद भक्षुनी । मी एकभुक्त[२३] प्रतिदिनीं । राहता झालो ॥२१॥**
**तेणें माझी सकळें । पापें निरसिलीं[२४] किडाळें[२५] । झालों पुनीत[२६] गंगाजळें[२७] । धुतलों जैसा ॥२२॥**
**आणि तिया पुण्यवशें[२८] सहजगती । सद्धर्मी[२९] रती[३०] उपजली पुरती ।**
**ऐकूनि श्रीभगवत्कीर्ती । श्रीकृष्णीं प्रीति उपजली ॥२३॥**

*(१) व्यासा (२) दासीचा पुत्र (३) वेद जाणणाऱ्या (४) दासीच्या पोटी (५) आठवण (६) पूर्णपणे (७) वर्षाऋतु व शरदऋतु या दोन ऋतूमध्यें म्हणजे ४ महिने (८) एके ठिकाणी (९) श्रेष्ठ द्विजानी (१०) करण्याची इच्छा केली (११) त्यांची सेवा करण्याकरितां (१२) नेमले (१३) एकाग्रतेने (१४) सेवा करणे हा गुण ज्याचे ठिकाणी आहे असा, सेवापरायण (१५) थोडे बोलणारा (१६) ब्रह्मदृष्टि करणारे, सर्वांशी सारखे वागणारे (१७) दीन जनावर दया करणे हा त्यांचा स्वभावच असल्यामुळे (१८) अकस्मात् (१९) कृपा करून (२०) कृपा दृष्टीने (२१) पाहून (२२) त्यांचा उच्छिष्ट प्रसाद (२३) एकदाच जेवून (२४) नाहीशी झाली (२५) मलरूप, भगवत्प्राप्तीस अडथळा करणारी (२६) पवित्र, शुद्ध (२७) गंगेच्या पाण्याने (२८) पुण्याने (२९) उत्तम धर्माचे ठिकाणी (३०) आवड.*

**एवं श्रीकृष्णकथागायन[१] । जंव जंव करीत होतें मुनिजन । तंव तंव मी श्रद्धासंपन्न[२] । आवडी श्रवण पैं केलें ॥२४॥**
**तदा जयाचे गुण । भूषित[३] करिती ब्रह्मवित्करण[४] । या श्रीकृष्णीं संपूर्ण । उपजली रती ॥२५॥**
**एवं क्षणोक्षणीं मति[५] । स्थीर होतां भगवंतीं । वृत्ति[६] पुनरावृत्ति[७] । विसरली साची ॥२६॥**
**तदा हें आपातरमणीय[८] सकळ । चिद्गगनीं[९] अविद्याजलदजाळ[१०] ।**
**ऐसें सभक्तिश्रवणविवेकें[११] केवळ । जाणिलें मियां ॥२७॥**
**एवं वर्षाशरत्काळीं[१२] । हरियश[१३] ऐकोनि त्रिकाळीं[१४] । (य३-७६)**
**अंतरीं साठविला वनमाळी । प्रेमळ कळवळी[१५] कृपाळू ॥२८॥**
**जाणोनि शुद्ध[१६] 'त्वंपदार्थ'[१७] । कार्योपाधि[१८] होय निवृत्त[१९] ।**
**कारणोपाधि[२०] निरसावया[२१] यथार्थ[२२]। भगवद्भक्ति[२३] पाहिजे ॥२९॥**
**मग मिश्रसत्त्वगुणातें[२४] निवटी[२५] । आणि शुद्धसत्त्वातें[२६] अधिष्ठीं । ऐसी भगवद्भक्ति गोमटी[२७] । उपजली माते ॥३०॥**

*(१) श्रीकृष्णाचे चरित्राचे वर्णन (२) अत्यंत श्रद्धेने (३) सुशोभित (४) ब्रह्मज्ञानी पुरुषाचेहि कान (५) चित्त (६) अंतःकरण (७) संसार, जन्ममृत्यु संसाराचा विसर पडू लागला (८) दृष्टीने पाहण्यातच सुंदर वाटणारे, क्षणिक सुखदायी, (९) चैतन्याकाशांत, चैतन्याच्या ठिकाणी (१०) अविद्यारूपी मेघांचे जाळे (११) भक्तिपूर्वक भगवंताचे गुण ऐकून उत्पन्न झालेल्या विवेकाने (१२) वर्षा व शरद ऋतुमध्यें (१३) श्रीहरीची कीर्ति (१४) सकाळी, दुपारी व संध्याकाळी (१५) ज्याच्या मनांत भक्ताविषयी कळवळा असतो (१६) उपाधिरहित (१७)जीव चैतन्य (१८) अंतःकरणोपाधि (१९) नाहिशी (२०) मूळमाया, (२१) नाहीशी करण्याकरिता (२२) खरोखर (२३) सगुण परमेश्वराचा प्रेम (२४) रजोगुण व तमोगुणाने युक्त जो सत्वगुण (२५) नाश करित (२६) रजोगुण व तमोगुणरहित सत्व (२७) सुंदर.*

**'त्वंपदार्थ' जाणल्यावीण । स्वव्यतिरेक[१] नोहे जाण । स्वव्यतिरेक झालियावीण । निष्कामभजन[२] कदा नव्हे ॥३१॥**
**कार्योपाधि जीवाप्रति । तंव कामना[३] अवश्य उठती ।**
**सकामभजनें भगवत्प्राप्ती । दुर्लभ[४] निश्चिती श्रुति सांगे ॥३२॥**

'त्वंपद' जाणतां अध्यास[५] नाशे । मग भगवद्भक्तीनें आनंद विलसे[६] ।
स्वामी श्रीधरमत ऐसें । तेंचि विशेषें[७] बोलिलें ॥३३॥
परी या भक्तीचा विस्तरू । भक्तिपदतीर्थामृतादौ परिकरू[८] । भाविक[९] जनीं तो प्रकारू । जाणूनि घेइजे ॥३४॥
एवं 'त्वंपदार्थ' ज्ञात[१०] । आणि भगवद्भक्तिं दृढचित्त । वरी लेंकरूं मी अनाथ । सेवकैसें[११] ॥३५॥
हें पाहुनी तदा सज्जनीं । गमनसमयीं[१२] कृपा करोनी । निजज्ञान[१३] मजलागुनी । उपदेशिते मुनि झालें ॥३६॥
मग तें परमात्मज्ञान[१४] । जें हृदयींचें 'तत्पद[१५]शोधन' ।
जेथ निरसे[१६] माया[१७] कारण । ब्रह्मात्म्यैक्यपण[१८] प्रत्यया[१९] ये ॥३७॥
जें पावोनि महामुनि । पाय न देतां भवजीवनीं[२०] । पावती सृदिानंदसंस्थानीं[२१]। सद्भावें नमुनी श्रीगुरूतें ॥३८॥

*(१) उपाधीहून आपले निराळेपण (२) शुद्धप्रेमाने (३) वासना (४) होत नाही (५) देहादिक प्रपंचाविषयी सत्यबुद्धि (६) प्रगट होती (७) मुख्यतः (८) खरा विशेष. (९) प्रेमळ (१०) कळला (११) सेवकाप्रमाणे (१२) तेथून दुसरे ठिकाणी जावयाला निघतेवेळी (१३) आपल्या अंतःकरणांत आत्मज्ञान, किंवा निज म्हणजे आत्मा त्याचे ज्ञान (१४) परमात्म्याची खरी ओळख (१५) ज्याला, हृदयामध्ये करावा लागणारा तत्पदाचा विचार म्हणतात (१६) नाश पावते (१७) कारण माया, मूळमाया (१८) जीव व ब्रह्म याचे ऐक्य (१९) अनुभवाला (२०) संसाररूपी समुद्रांत (२१) मूळच्या सृदिानंद स्वरूपाला.*

॥ दोहा ॥

त्या ज्ञानें मी जाणिली माया हरिचि अगाध[१] । परि ते माते बांधिना[२] पाहुनि हरिप्रसाद[३] ॥३९॥
(ओव्या)- तेंचि यथार्थ[४] गुप्तज्ञान[५] । सरहस्य[६] ससाधन[७] । सुचविलें संक्षेपेंकरोन । तुजला पराशरसूनो[८]! ॥४०॥
कारणब्रह्माचिया ठायीं[९] । उपासनाद्वारा[१०] लवलाही । कर्म समर्पूनि पाही । ब्रह्मबोधें[११] नाहीं समर्पकू[१२] ॥४१॥
एवं सकर्तृक[१३] भगवंतीं । कर्म अर्पितां यथारीती । मग बंधनाचिया[१४] नामें निश्चिती । कालत्रयीं तिलांजुली ॥४२॥
आणि त्रिविधदुःखविनिवृत्ति[१५] । अखंडपरमानंदप्राप्ती[१६] । ते येणेंचि सहजगती[१७] । होतु आहे ॥४३॥

*(१) महासमर्थ (२) बद्ध करूं शकली नाही (३) हरीची कृपा झालेली (४) खरोखर (५) गुरूपासूनच प्राप्त होणारे (६) त्यातील मर्मासहित (७) त्याच्या साधनासहित (८) व्यासा (९) अविनाशी, चैतन्य व आनंदरूप, शुद्ध, सर्वज्ञ, सर्वशक्ति अशा ब्रह्माला कारण ब्रह्म अशी संज्ञा आहे त्याचे ठिकाणी (१०) त्या परब्रह्माचे प्रीत्यर्थ कर्मानुष्ठान करणे व त्याला सर्व कर्म समर्पण करून त्याच्या द्वारा त्या परब्रह्माचे ठिकाणी चित्त स्थिर करणे याला उपासना म्हणतात - तशी उपासना करून (११) ब्रह्मज्ञानाने (१२) समर्पक भाव, मी कर्म समर्पण करणारा ही वृत्तिहि नाहिशी होते (१३) कर्तृत्वबुद्धिसहित (१४) कर्तृत्वादिक बंधन केव्हाही भासत नाही (१५) आधिभौतिक, आधिदैविक, आध्यात्मिक या तीन प्रकारच्या दुःखांचा नाश (१६) सदासर्वकाळ ब्रह्मानंदाचा लाभ (१७) आपोआप.*

कीं जड पदार्थ घृतादिक । ते केव्हां होती रोगजनक[१] । परी रोगनिवर्तक[२] । न होती कदा ॥४४॥ (य३-७७)
तेचि औषधादिकीं मिळवितां[३] । रोगनिवर्तक होती तत्वतां । कीं विख[४] भिषग्वर्यहातां[५] । गेलिया होय भेषजची[६] ॥४५॥
तेंवी कर्मे संसारमूलक[७] । न होती भवनिवर्तक[८] । तींचि कृष्णार्पणें[९] सकळीक । संसारकलंक[१०] वारिती ॥४६॥
मागां कर्मानपेक्षा[११] भगवद्भक्तिप्रती[१२] । निरूपिली असे रीती ।
येथ कर्मसापेक्षी[१३] भक्ति । एवमाशंकती[१५] सच्छ्रोते ॥४७॥
तरी आक्षेपीं[१६] समाधान[१७] । भक्ति दृढ व्हावया पूर्ण । कर्म करीत असेल विघ्न[१८] । त्यजावें तैं तें ॥४८॥
नातरी कर्मत्याग[१९] आणि नव्हे भक्ति । मिष्ट[२०] भक्षी[२१] आणि वाणी[२२] मुक्ति[२३] ।
तरी त्या जाणोनी श्वपचोक्ती[२४] । त्यागिजे सज्जनीं ॥४९॥
कर्म त्यजी आणि न मिळें ब्रह्म । ऐसिया त्यागिजे श्वपचसम[२५] । ऐसें ब्रह्मविदुत्तम[२६] । वदले वसिष्ठ ॥५०॥
यालागीं सकल कर्म करून । कीजे ईश्वरीं समर्पण । तेणें मळ[२७] जाती निघोन । शुद्ध मन सहज होय ॥५१॥

*स्थयि भाव*

मन तों स्वभावता[२८] कठीण[२९] । परी जाणावें लाक्षासमान[३०] ।

*(१) रोग उत्पन्न करणारे (२) रोगांना घालविणारे (३) औषधाबरोबर दिल्यास (४) विष (५) श्रेष्ठ वैद्याच्या हाती (६) औषधच (७) संसाराला कारणीभूत (८) संसाराचा नाश करणारी (९) श्रीकृष्णार्पण केली असता (१०) संसाररूपी मळ,*

*अशुद्धि (११) कर्माची जरूरी नाही (१२) भगवद्भक्ति करिता (१३) भक्तीला कर्माची जरूर आहे (१४) अशी कोणी शंका घेतील (१५) बुद्धिमान् श्रोते (१६) शंकेवर (१७) उत्तर (१८) अडथळा (१९) कर्म सोडले (२०) गोडगोड (२१) खावयाला पाहिजे (२२) तोंडाने (२३) मुक्ति बोलावयाची (२४) चांडाळाचे शब्द (२५) चांडाळाप्रमाणे (२६) ब्रह्मज्ञान्यांत श्रेष्ठ (२७) वाईट आचरणाची प्रवृत्ति (२८) मूळचे (२९) आत कोणता पदार्थ सहज शिरेल व शिरलेला सहज बाहेर निघून जाईल असे नसणे (३०) लाखेप्रमाणे.*

**तेंचि विषयतापकयोगेंकरून[१] । द्रवत्व[२] पावे ॥५२॥**

**दया स्नेह[३] हर्ष शोक । काम क्रोध भयादिक । विकार चित्तजतूचे[४] तापक । ते[५] शमलिया[६] कठिनात्मक होय मन ॥५३॥**

**द्रवीभूतसमयीं[७] चित्तीं । जे जे विषयाकार[८] जाती[९] । चित्त कठीण होतां पुढती । ते संस्कार[१०] बैसती रुजूनी ॥५४॥**

**तेंचि आत्मप्रतिबिम्ब[११] घेऊन । उठती[१२] रसरूप[१३] होऊन ।**

**यालागीं संस्कारांकारण[१४]। स्थायीं[१५] म्हणती जाणते[१६]॥५५॥**

**एवं जयाच्या प्रतीकें[१७] विषयानंद[१८] । तोचि हृदयीं येतां ब्रह्मानंद[१९] ।**

**तरी त्याहोनि कृतकृत्यता[२०] सिद्ध । उरली कोणती ? ॥५६॥**

**यालागीं आपुलें मन । विषयीं तों करावें कठीण । आणि प्रेमपाझरसंपन्न[२१] । भगवद्वारणीं द्रुत[२२] कीजे ॥५७॥**

**शास्त्री जें उपाय[२३] बोलिले । क्रमें[२४] क्षणक्षणीं साधूनि तेतुले ।**

**सज्ञानपणें[२५] भगवत्पाउलें । भगवंत[२६] होउनी सेवावीं ॥५८॥**

**प्रथम उपाय संतसेवा* । नंतर *साधुकृपापात्र[२७] व्हावा । मग संत आचरती त्या धर्मी जडावा । *विश्वास दृढ ॥५९॥**

*(१) विषय हेच तापक म्हणजे चित्तरूपी लाखेला ऊन करून पातळ करणारे त्यामुळे (२) नरम, पातळ, वितळते (३) प्रेम (४) चित्तरूपी लाखेला वितळविणारे (५) विकार (६) शांत झाल्यावर (७) वितळलेल्या स्थितीत असतांना (८) विषयांचे आकार (९) शिरतात (१०) ठसे लीन होऊन राहतात (११) चैतन्याचा आभास (१२) वाढतात (१३) विकारांची अत्यंत वाढ (१४) संस्कारांना अंतःकरणांत लीन असलेल्या विषयांच्या ठशांना (१५) रुजून बसलेला भाव (१६) ज्ञाते (१७) आभासाने, प्रतिबिंबमात्र त्याने (१८) विषयांतील आनंद (१९) भगवान् (२०) पूर्णता (२१) प्रेमाच्या पाझराने युक्त (२२) मऊ, नरम, वितळलेले, पातळ (२३) प्रेमळ चित्त करण्याकरिता (२४) धीरे धीरे (२५) आत्मज्ञानासह (२६) भगवत्स्वरूपी होऊन (२७) साधूंच्या कृपेला अधिकारी*

**मग श्रीहरीचे गुणश्रवण[१] । तेणें कृष्णीं रती[२] उत्पन्न । तदा विषयविरक्त्यादिकरून[३] । देहद्वयविवेचन[४] घडे ॥६०॥**

**तेणें कळे 'त्वमर्थ'[५] शुद्ध । कार्योपाधि[६] निवटे अशुद्ध[७] । मग कारणाविद्यानिवर्तक[८] प्रसिद्ध । उपजे भक्ति ॥६१॥**

**एवं भगवत्प्रीतिवर्धन[९] । तदा परमानंदसंपन्न[१०] । आणि अन्वयें[११] भगवत्तत्त्वज्ञान । सृत्तिसुखघन[१२] प्रकाशे ॥६२॥**

**(य३-७८) एवमखंड ब्रह्मज्ञान । आणि भगवन्मय[१३] अंतःकरण ।**

**म्हणोनि सर्वज्ञत्वादि[१४] गुण । आविर्भवन्ति[१५] भगवत्कृपें[१६] ॥६३॥**

**जे भगवद्भक्तीवीण ज्ञानी होती । त्यांना नोहे सर्वज्ञत्वाद्याविर्भूती[१७] ।**

**ते न मागतां सज्ञनाप्रती । अनायास प्राप्ती होतसे ॥६४॥**

**परी तेथही न गुंतती[१८] सुजन । मग अनिर्वचनीय[१९] प्रेमचि पूर्ण ।**

**जेथ परमप्रेमास्पदात्मदर्शन[२०] । आणि भगवंतीं प्रेमकाष्ठा[२१] ॥६५॥**

**या सुखापुढें । समाधिसुखही बापुडे[२२]। तेथ कवण गणी[२३] कोरडे । शब्दानुमान[२४] ॥६६॥**

*(१) गुण ऐकणे (२) प्रेम (३) विषयाचे ठिकाणी कंटाळा उत्पन्न होऊन (४) स्थूल देह व सूक्ष्म देह या दोन देहाहून निराळा होतो (५) त्वंपदलक्ष्य (६) अंतःकरणाची उपाधी, अंतःकरणाशी झालेले ऐक्य (७) रजोगुण तमोगुण यांनी युक्त असलेली (८) सर्व संसाराला कारणीभूत असणारी जी मूळ अविद्या तिचा नाश करणारी (९) अशा रितीने उत्तरोत्तर भगवंताचा प्रेम वाढत जातो (१०) अत्यंत आनंदाला प्राप्त होतो (११) भगवान्, सर्व ब्रह्मांडांत भरून उरलेला आहे असे व्यापक ज्ञान झाल्यावर (१२) जिकडे तिकडे सृदिानंदच भासते (१३) भगवत्स्वरूप (१४) सर्वज्ञता सर्वशक्तिमत्ता इत्यादि (१५) प्रगट होतात (१६) भगवंताच्या कृपेने (१७) सर्वज्ञता सर्वशक्तिमत्ता हे गुण त्यांचे ठिकाणी प्रगट होत नाहीत (१८) आसक्त होत नाहीत (१९) अवर्णनीय (२०) परम सुखस्वरूप जो आत्मा त्याचा साक्षात्कार (२१) प्रेमाची परमसीमा, निःसीम प्रेम, अमर्याद प्रेम (२२)*

*दरिद्री, दुर्बल (२३) मानतो (२४) अनुभवावांचून शुष्क शब्दज्ञान*

*संस्कृत-चूर्णिका : मराठी मिश्रा*

**सात्वस्मिन् परप्रेमरूपा[१] ।**
**यल्लब्ध्वा पुमान् सिद्धो[२] भवत्यमृतो भवति तृप्तो भवति ।**
**यज्ज्ञात्वा[३] मत्तो भवति स्तब्धो भवत्यात्मारामो भवति ।**
**अनिर्वचनीयप्रेमस्वरूपं, इत्यादि नारदीयसूत्रसंपत्ति[४] ।**
**आणि ब्रह्मभूतः प्रसन्नात्मा न शोचति न कांक्षति ।**
**समः सर्वेषु भूतेषु मद्भक्तिं लभते परामित्यादि भगवदुक्तीही[५] । प्रमाण येथ ॥६७॥**

ओवी -

एवं भक्त्यधीन[६] ज्ञान । परी भक्त भगवत्कृपेंकरून[७] । ती कृपा[८] कृष्णार्पणकर्माधीन । एवं कर्में[९] निर्हरण[१०] कर्माचें ॥६८॥

गीता श्लोक :-

'यत्करोषि यदश्नासि यज्जुहोसि ददासि यत् । यत्तपस्यसि कौन्तेय तत्कुरुष्व मदर्पणम् ॥१॥'९-२७

*(१) ती भक्ति म्हणजे हृदयस्थ सगुण परमेश्वराचे ठिकाणी निस्सीम प्रेमस्वरूप आहे (२) ही भक्ति प्राप्त झाली असता पुरुष सिद्ध होतो म्हणजे सर्वसमर्थ पूर्ण होतो, अविनाशी ब्रह्मस्वरूप होतो, वासनारहित होतो (३) जी प्राप्त झाली असता देहभाव विसरतो, निष्क्रिय होतो, व्यवहारकाळीहि समाधिस्थ असतो व परमेश्वराला आपल्याहून निराळा पहात नाही (४) भगवान नारदानी केलेली भक्तिसूत्रे ही येथे प्रमाण आहेत (५) गीतेतील भगवंताचे वाक्य (६) भक्तीच्या स्वाधीन (७) ती भक्ति भगवंताच्या दयेने उत्पन्न होते (८) श्रीकृष्णाला अर्पण केलेल्या कर्माने भगवान् दया करतो (९) कर्माचे योगाने (१०) नाश.*

भावार्थ :-

क्रिया भोजन यज्ञ दान । तप इत्यादि मदर्पण । करी मग तूं भक्तिसम्पन्न । होशील हें वचन श्रीहरीचें ॥६९॥
एवं भगवदाज्ञानुसारें[१] । कर्मे आचरितां हरितें स्मरे । आधीं केशवादि नांवें सुंदरें । अंतीं अच्युतवंदन[२] ॥७०॥
देवस्वरूप[३] नारायण । पितृस्वरूप[४] जनार्दन । ब्रह्मार्पणमित्यादि[५] श्रुतिवचन[६] । कीं ब्रह्मार्पण[७] कर्म तें ॥७१॥
यालागीं भगवदनुग्रहसहित[८] । ऐसिया कर्मे भक्ति मिळत । हें ससाधन[९]ज्ञान यथार्थ । दाविलें स्नेहें[१०] ॥७२॥
एवं कर्में करितां कृष्णार्पण । तदा उपजे कीर्तन स्मरण[११] । पुढें चतुर्व्यूहोपासन[१२] । करूनि अभेद[१३] नमन करावें ॥७३॥

(य३-७९) वासुदेव संकर्षण । प्रद्युम्न आणि अनिरुद्ध जाण ।
या चहूं नामें नारायण । प्रगटे मूर्तिमान् अनध्यस्तविवर्ती[१४] ॥७४॥
तयातें नमितां सद्भावें[१५] । चित्त उल्लसें[१६] ब्रह्मभावें[१७] । मग परमानंदें सुखावें[१८] । ब्रह्मबोधी ॥७५॥

*(१) भगवंताच्या आज्ञेप्रमाणे (२) अच्युताला नमस्कार (३) इंद्रादि देवही तोच आहे (४) पितृस्वरूपी तोच (५) ब्रह्माला ते कर्म अर्पण करावे (६) वेदाचे वचन (७) अशा रितीने कर्म ब्रह्मार्पण होते (८) भगवंताच्या कृपेसह वर्तमान (९) भगवंताचा साक्षात्कार व त्याचे उपाय यासहित (१०) प्रेमाने (११) कीर्तनभक्ति व स्मरणभक्ति (१२) भगवंताच्या चार मूर्तींची उपासना (१३) चार मूर्ती एकरूप मानून (१४) ज्ञानाने ज्याचे स्वरूप मिथ्या ठरत नाही अशा साकार ब्रह्मस्वरूपाने (१५) अत्यंत श्रद्धेने (१६) स्फुरू लागते (१७) ब्रह्मस्वरूपाने (१८) परमानंदाच्या प्राप्तीमुळे बह्मस्वरूपातच बुडून जाते.*

॥ श्लोक ॥

''नमो भगवते तुभ्यं वासुदेवाय धीमहि । प्रद्युम्नायानिरुद्धाय नमः संकर्षणाय च'' ॥१॥

॥ ओव्या ॥

यालागीं हा उत्तम श्लोक । वेदरूप[१] जपावा सम्यक । यांत 'धीमहि' पद म्हणोनि देख । गायत्रीरूपही[२] असे हा ॥७६॥
एवं सज्जनमुखांतून[३] । हें भगवदुक्त[४] नित्यज्ञान[५] । ऐकोनि तदनुष्ठान[६] । यथार्थ केलें ॥७७॥
तें जाणोनि भगवंत । होऊनियां कृपावंत । निजज्ञानादि[७] भक्तिसहित । दिधलें समस्त मजप्रती ॥७८॥

॥दोहा ॥

यास्तव तूंही व्यासमुने बहुश्रुत[८] हरियश[९] जाण । ज्याविण दुःखत्रिविधवशा[१०] दुसरें न परित्राण[११] ॥७९॥

**तेंचि निरुपण शुद्ध[१२] करी भक्तिसहित निःशेष । जें जाणुनि जन प्रेमवशें ब्रह्मणि करिति प्रवेश ॥८०॥ (य३-८०)**

**॥ हरिःॐ तत्सत् श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरकृपाप्रसादे प्रियलीलामहोत्सवे आमंत्रणविलासे नारदेन व्यासचित्तप्रसादाय हरिकीर्तनगौरववर्णनं नाम पंचमसखीप्रेषणम् ॥**

**॥ श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ॥**

*(१) वैदिक (२) गायत्री मंत्रस्वरूप (३) त्या सत्पुरुषांच्या मुखाने (४) भगवंताने सांगितलेले (५) अविनाशी ज्ञान (६) ते साधण्याचा प्रयत्न (७) भक्तिसहित सर्व ज्ञान, ऐश्वर्यादि सामर्थ्य (८) पुष्कळ श्रवण अध्ययन केले आहे असा (९) श्रीहरीची किर्ति (१०) आध्यात्मिक, आधिदैविक आधिभौतिक या तीन प्रकारच्या दुःखात सापडलेल्यांना (११) संरक्षण करणारे, सोडविणारे (१२) अशा शुद्ध भक्तीचे निरूपण कर.*

०००

# सखीप्रेषण ६ वें. विषयानुक्रम

***नारदांचा व्यासांनां आपला पूर्वजन्म व स्वभाग्य कथन. (पृष्ठ ८१-८९)***

*आत्मचरित पुढें सांगण्याविषयीं व पूर्वकल्पाच्या स्मृतीचें कारण सांगण्याविषयीं व्यासांचा नारदांस प्रश्न ८१. नारदांचें उत्तर :- चातुर्मास्य (य३-८) संपवून विप्रवर्य गेले असतां (नारदांचें) भगवृतिनांत कालक्रमण. त्यांची परिस्थिती, मातृस्नेहबंध व भगवद्दर्शनाविषयीं तळमळ ८१. मातेचें निधन झालें असतां भगवदनुग्रह मानणें. तुकारामवचनाचें प्रामाण्य. विरोधीश्रुतिसमन्वयपूर्वक शंकासमाधान. (नारदांचें) उत्तरदिशेप्रत गमन ८२. मार्गांतील नाना समृद्ध देश व वनोपवनादिकांचे ठिकाणीं समदृष्टि ठेवून संतुष्ट मनानें पुढें जात असतां निर्जन महारण्यांत (नारदांचा) प्रवेश. महारण्याचें वर्णन ८२. जीवनऱ्हदांत स्नानपानादिकानें श्रमपरिहार झाला असतां अश्वत्थ वृक्षातळीं बसून भगवद्ध्यानांत (नारदांचें) निमग्न होणें. ८३. ध्यानांत प्रगट झालेल्या मूर्तीचें वर्णन व योगाहून भक्तीची सुलभता. हळु हळु नारायण ह्रदयांत प्रगटला असतां अंतःकरणाची स्थिती ८३. <u>समाधींत मग्न असूनही आनंदेदंतारूप भगवंताचें रूप प्रगट होणे. ८४</u>. येथे योजलेल्या <u>समाधी शब्दाचें स्पष्टीकरण</u> व भगवद्रूप तिरोधान पावलें असतां विकल होण्याचें कारण. नारदाला उद्देशून भगवंताचें भाषणः- अनिष्पन्न योग्यांनां माझें दर्शन कठीण आहे. यद्यपि महावाक्येंकरून ज्ञान झालें तथापि <u>माझें रूप दिसण्याला माझा अनुग्रहच हेतु आहे</u>. माझे ठिकाणीं लब्धानुराग झालें असतां ह्रदयांतील कामादि मल दग्ध होतात. ८४. तुला अल्प सत्संगती व यथाशक्ति सत्सेवा घडल्यामुळें तूं मद्भक्त झालास व हें अमंगळ भौतिकशरीर टाकल्यानंतर ब्रह्मज्ञ व शुद्ध असा दिव्यदेही संत होशील. ८५. <u>अंतकाळीं माझी स्मृती कशी राहील अशी भीति बाळगूं नकोस कारण माझ्या भक्तांची स्मृती माझ्या कृपेनें प्रलयकालींही नष्ट होत नाहीं.</u> एक माझेंपण असलें म्हणजे भवकटक निश्चयानें निर्दलन होतें.८५. भगवद्रूप अंतर्हित झाल्या-नंतर (नारदांचा) पुढील क्रम व प्रारब्धसंपल्यानंतर हरिजनशरीरीं गती. <u>हरिजनशरीर कर्मारब्ध नसून शुद्ध व नित्य आहे.</u> (श्रीधरमत) ८५. कल्पांतसमयीं श्वासद्वारा ब्रह्मदेवाच्या ह्रदयांत प्रवेशून सृष्टिकालीं त्याच्या प्राणांपासून मरीच्यादि प्रजापतींसह (नारदांचें) उत्पन्न होणें . ८६. कर्मी आणि उपासकांची अनुक्रमेंकरून ब्रह्माण्डावरणाच्या आंत व बाहेर गती व नारदांची आवरणांतर्बाह्य गती व स्वातंत्र्य. भगवदाज्ञेचें पालन व (य३-९) ब्रह्मवीण्याची उपपत्ती. <u>गायनानें भगवत्प्राप्ति होते याविषयीं सप्रमाण निरूपण</u> ८६. सर्व वर्णांचा गायनाविषयीं अधिकार (ग्रंथ कर्त्याचें मत) ८७. प्रेमपूर्वक भगवद्गान केलें असतां नारायण आनंदानें नाचतो याविषयीं (नारदांचा) स्वानुभवकथन, व तृष्णा डाकिनीनें ज्यांनां झडपलें आहे त्यांच्याकरितां दयापूर्वक कृष्णगुण वर्णन करण्याविषयीं व्यासांनां सांगणें. ८७. <u>श्रीहरीचें गुण वर्णन करणें हीच सर्वांची शाश्वती नौका होय</u> याविषयीं श्रुतिसंतांची वचनें. स्वानुभव व युक्तिपूर्वक निरूपण ८७-८८. नारदचरिताचा उपसंहार, <u>आपल्या अनुभवानें दुसरा भक्तिसंपन्न होत असेल तर स्वचरितही वर्णन केले असतां अभिमान बाधत नाहीं</u>. ८८. इतकें सांगून नारदांचें जगत्कल्याणार्थ गमन. <u>संतांच्या हातानें जगत्कल्याणही वासनारहित होत असते.</u> ८८. उपसंहार :- नारदांची व त्यांच्या भक्तिभाग्याची धन्यता ८९.*

*०००*

# सखीप्रेषण ६ वें.

## श्री नारदांचे प्राग्जन्म तथा स्वभाग्य कथन

॥ श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरमाउली समर्थ ॥

॥ दोहा ॥

श्रवण[१] करुनि मुनिवाक्य[२] तें सस्मय[३] होउनि कृष्ण[३ क] ।
कर जोडुनि अति आदरें[४] करित सुचरितप्रश्न[५] ॥१॥
काल सकलकलनाशकू[६] तत्कृत[७] हा कल्पांत[८] ।
गेला असतां काय म्हणुनी निश्चल[९] स्मृतिसिद्धान्त[१०] ॥२॥

॥ दिंडी ॥

ऐकुनीया व्यासोक्ति[११] मुनी बोले । दूर देशीं जैं विप्रवर्य गेले ।
तदा ऐसा म्यां कंठियला काळ । चिंतुनीयां अंतरीं मेघनीळ[१३] ॥३॥

॥ साकी ॥

श्रीहरिचरणीं ठेवुनि स्वमना करित मुखें गुणगाना[१४] ।
अच्युत नृहरि गोविंद ऐसें त्यजुनी मद[१५] अभिमाना[१६] ॥

*(१) ऐकून (२) (नारद) मुनीचे वचन (३) आश्चर्ययुक्त (३ क) व्यास (४) प्रेमाने, पूज्यभावाने (५) नारदांच्या उत्तम चरित्राविषयी प्रश्न (६) सर्वांचा नाश करणारा (७) कालाने केलेला , किंवा होणारा (८) प्रलय (९) अबाधित, कायम (१०) मागील कल्पांतील आठवण (११) व्यासाचे म्हणणे (१२) ब्राह्मणमेळा (१३) मेघाप्रमाणे नीलवर्ण असलेला भगवान (१४) गुणांचे वर्णन (१५) गर्व (१६) अहंकार*

॥ अभंग ॥

एकलाचि होतो आपुल्या मायेचा । म्हणुनियां तीचा स्नेह[१] भारी[२] ॥१॥
युवतींची[३] जाती मंदमती आधीं । नाशियली बुद्धि[४] मोहवशें[५] ॥२॥
माझेठायीं तीचा अनन्यची[६] प्रेमू । माझा योगक्षेमू[७] सदा इच्छी ॥३॥
परतंत्रा[८] दासी वरी ईशाधीन[९] । काष्ठमयी[१०] जाण स्त्री कां जैसी ॥४॥
तैसी दोहीपरी[११] परतंत्र माता । जलान्नाची[१२] चिंता माझ्या नित्य ॥५॥
पांच वरुषांचा लहान मी बाळ । माताही प्रेमळ दृढतर[१३] ॥६॥
नेणें दिशा[१४] काळ म्हणोनियां तेथ । राहिलों निश्चिंत ब्रह्मकूळीं[१५] ॥७॥
मातृस्नेहबंध[१६] सुटेल पैं जेव्हां । पाहीन मी तेव्हां नारायणा ॥८॥
आवडी अंतरीं राहिली लागून । दृढ तन मन नारायणीं ॥९॥
ज्ञानेश्वरनाथू करी मनाजोगें । रक्षी पुढें मागें निजदासा ॥१०॥५॥

॥ ओव्या ॥

असो माता एकें दिनीं । बाहेर गेली गोदोहनीं[१७] ।
तंव पाय लागला म्हणोनी । कालप्रेरित[१८] फणी[१९] चावला ॥६॥

(य३-८१)

*(१) मोह (२) फार (३) स्त्रियांची (४) विवेक (५) मोहाला वश होऊन (६) एकनिष्ठ (७) मला नाना भोग मिळविण्याची व त्यांचे संरक्षण करण्याची (८) परस्वाधीन (९) ईश्वराचे स्वाधीन (१०) लाकडाच्या बाहुलीप्रमाणे (११) दोन्ही रितीने (१२) अन्नपाण्याची (१३) अतिशय (१४) देशकालपरिस्थितीचे ज्ञान नसलेला (१५) ब्राह्मणाचे घरी (१६) मातेचा प्रेम हाच पाश (१७) गाईचे दूध काढण्याकरिता (१८) कालाच्या प्रेरणेने चावण्याची बुद्धी झाल्यामुळे (१९) सर्प*

तेणें ती स्नेहवशें कृपणा[१] । मिळोनि गेली पंचपणा[२] । मियां पाहोनि जननीमरणा । भगवदनुग्रह[३] मानिला ॥७॥

॥ अभंग तुकाराममहाराज ॥

'नारायणीं घडे जेणें अंतराय[८] । हो कां बाप माय त्यजावी ते ॥१॥
येरां प्रिय पुत्रां करी कोण लेखा[५] । करिती ते दुःखा हितशत्रु[६] ॥२॥
प्रऱ्हादें जनक बिभीषणें बंधू । तैसी माता निंदू भरतें केली ॥३॥
तुका म्हणें सर्व धर्म देवपाय[७] । आणिक उपाय दुःखमूळ ॥४॥

*(१) दीन (२) पंचभूतास, मेली (३) भगवंताची कृपा (४) अडथळा (५) गणना, त्याची काय कथा (६) आपल्या हिताचे शत्रु (७) देवाचे पाय जेणेकरून प्राप्त होतील तो धर्म किंवा देवाचे पाय हेच एक सर्व धर्मरूप आहे (८) दुःखाला कारण होणारे*

॥संस्कृत गद्य॥

**ननु[*] मातृदेवो भव । पितृदेवो भव ।**
**आचार्यदेवो भव । अतिथीदेवो भव । इति शिक्षायाम् ।**
**तस्माच्छ्रुत्युल्लंघनेन पतनं स्यादिति चेन्माशंक्यताम् ।**
**मातृदेवो भवेत्यादि श्रुतयस्तु नहि साधनचतुष्टय-संपन्नाधिकारिदशायां**
**किंतु ब्रह्मचारिदशायामेव ।**
**नारायणैकनिष्ठ :- सर्वधर्मान् परित्यज्य मामेकं शरणं व्रज -**
**ज्ञानसंपन्नः सन् भगवद्दर्शनेच्छयैवावातिष्ठत् ।**
**तथापि यावन्नजननी पंचत्वमापन्ना तावत्तत्रैवासीत् ।**
**तद्देहपतनानंतरं तदा सोऽपि दिशामुत्तरां जगाम ।**
**इति श्रोतृणामाशंकापरिहृता ऽधुना च नारदचेष्टितमेव विचिनुमहे ।**
याप्रकारें मी जननीप्रत पाहून उत्तर दिशेप्रत जाता झालो.

॥ ओव्या ॥

तदा समृद्ध[१] नाना देश । वने उपवने निःशेष । पर्वत नद्या आरामविशेष[२] । वापीकूपतडागादि[३] ॥८॥
सर्वत्र ठेवुनि समदृष्टि[४] । मी पुढें चालिलों धरुनी तुष्टी[५] । तंव देखिलें तिये सृष्टीं । महारण्य[६] ॥९॥
त्या वनांतूनीं । मी एकटा चालत असतां चरणीं । उलूकांचे[७] शब्द कर्णी । भयंकर पडलेती ॥१०॥
नाना सर्प नाना व्याघ्र । कस्तुरीमृग[८] मत्त[९] कुंजर[१०] । जेथ न दिसे दिवाकर[११] । आच्छादिला तरुवरीं[१२] ॥११॥
कीं सख्या[१३] न जावें राती[१४] युवती[१५] । म्हणूनि कुमुदिनी[१६] दूती[१७]। अडकविला गभस्ती[१८]। निजाग्रेकरूनी[१९] ॥१२॥
ऐसिया वनीं एकटा बाळू[२०] । मी धुंडत असतां अळुमाळु[२१] । जाहलों पैं व्याकुळू । क्षुधेतृषेनें ॥१३॥ (य३-८२)

*(*) **संस्कृतचा अर्थ** - अहो ! आईला देव समजून तिची सेवा कर, बापाला देव समजून त्याची सेवा कर, गुरूला देव समजून त्याची सेवा कर, अतिथिला देव समजून त्याची सेवा कर असे तैत्तिरियोपनिषदातील शिक्षाध्यायांत सांगितले आहे. म्हणून भगवंताच्या प्राप्तिमध्ये विघ्नभूत झालेल्या आईबापांचा त्याग करण्याने, श्रुतीच्या आज्ञेचे उल्लंघन होत असल्यामुळे, त्यांचा त्याग करण्याने पतनच होईल; पण ही शंका बरोबर नाही. कारण आईबापांची देव समजून सेवा कर इत्यादि श्रुतीच्या आज्ञा ब्रह्मचारी दशेतच लागू आहेत, मुमुक्षु दशेत त्या लागू नाहीत. 'सर्वधर्माचा त्याग करून मलाच तू शरण ये' या गीतावाक्यानुसार मुमुक्षूने सर्वतोपरी भगवत्परायणच असावयाला पाहिजे; म्हणून श्रीनारद देखील आत्मज्ञान प्राप्त करून घेऊन भगवंताच्या दर्शनाची इच्छा करित राहिले. तरीपण माता जोपर्यंत जिवंत होती तोपर्यंत ते तेथेच राहिले. ती मेल्यानंतर ते उत्तर दिशेकडे निघून गेले. याप्रमाणे श्रोत्यांची शंका निरसन केली. आता पुढे श्रीनारदमुनींनी काय केले हे पाहू.*

*(१) संपन्न (२) बगीचे वगैरे (३) विहिरीतलाव इत्यादि (४) ब्रह्मभावना (५) संतोष (६) मोठे जंगल (७) घुबडांचे (८) ज्या हरिणाच्या पोटी कस्तुरी असते ते (९) मदोन्मत (१०) हत्तीं (११) सूर्य (१२) झाडांनी (१३) प्रिया (१४) रात्र (१५) स्त्री (१६) चंद्रविकासिनी कमल (१७) सखी, दासी (१८) सूर्य (१९) कमळाच्या फुलांच्या टोकांनी (२०) मुलगा (२१) वाटेल तिकडे, सहज.*

तदा तरंगिणीऱ्हदजीवन[१] । पाहोनि केलें स्नान[२] पान[३] । सकलश्रमनिराकरण[४] । होवोनियां बैसलों ॥१४॥

जेथ मनुष्य नाहीं कोणी । ऐसिया तिया महारण्यीं । पिंपळातळीं बैसोनी । आणिलें मनीं पूर्वश्रुत[५] ॥१५॥
हृदयस्थ[६] परमात्मा चिंतिला मनीं । बुद्धि दृढ लाविली ध्यानीं । सकळ इंद्रियें आकर्षुनी[७] । प्राणासहित ॥१६॥

॥ पद ॥

चरण चारु[८] चिंतितांचि प्रेमें अंतरीं । यन्नखजा[९] पापियांहि[१०] देत शिवपुरी[११] ॥धृ०॥
रमणविरह[१२] साहिना म्हणोनि कुमुदिनी[१३] । राहिली प्रभुपदनखीं[१४] बघुनि दिनमणी[१५] ॥१॥
इंद्रनीलगुल्फद्वय[१६] शोभती कसें । जेथ मिठी[१७] घातलिसे सुजनमानसें[१८] ॥२॥
एवमादियुक्त[१९] मूर्ति प्रगटली हृदयी[२०] । नित्य रासमंडळीं जे गोपिसंसदी[२१] ॥३॥
चतुर्बाहु रूप सुजन चित्तचोरटें[२२] । पाहतांचि वृत्ति समाधीसही विटे[२३] ॥४॥
अलकावतीपतिचरणध्यान[२४] ज्या घडे । कठिणहि[२५] हें रूप होय त्याचि[२६] सांगडें[२७] ॥५॥१७॥

*(१) नदीच्या डोहातील पाणी (२) आंघोळ (३) पिणे (४) सर्व प्रवासाचे कष्ट नाहीसे झाल्यावर (५) पूर्वी ऐकलेले (६) हृदयात असलेला (७) रोधून (८) सुंदर (९) ज्याच्या नखापासून निघालेली गंगा (१०) महापातक्यासहि (११) कैलासाची प्राप्ति (१२) प्रियाचा (चंद्राचा) वियोग (१३) कमल (१४) हरीच्या पायाच्या नखाचे ठिकाणी (१५) सूर्य (१६) इंद्रनीलमण्याप्रमाणे दोन्ही घोटे (१७) आलिंगन (१८) भक्तांच्या मनाने (१९) अशा सर्व लक्षणांनी युक्त, (२०) हृदयांत (२१) गोपींच्या समुदायात (२२) सज्जनांचे चित्त हरण करणारे (२३) कंटाळते (२४) ज्ञानेश्वर महाराजांच्या पायांचे ध्यान-चिंतन (२५) दुर्बलहि (२६) त्याच्या त्याला (२७) सारखे, सुलभ.*

॥ अभंग १ ॥

प्रेमाधीन[१] चित्त नयनीं[२] जीवन[३] । रोममूळें[४] जाण स्वेदांकीत[५] ॥१॥
रोमांचित[६] गात्रें मुखीं नामघोष[७] । तेणें हृषीकेश प्रगटला ॥२॥
योगी जिंकिताती जेधवां[८] हें मन । मृदुवेगाहून[९] आरंभीती ॥३॥
भक्तिमध्यें होय चित्त[१०] आकर्षण । म्हणुनीयां जाण मध्य[११] वेगू ॥४॥
योगाचा आरंभ मृदुसंवेगांत । मध्यसंवेगांत भक्त्यारंभू[१२] ॥५॥
तीव्रवेग[१३] होतां योगाची समाप्ति । भक्तीची तों स्थिती जैसी[१४] तैसी ॥६॥
नव्हे ही कल्पना नव्हे अर्थवाद[१५] । अनुभव सिद्ध[१६] सज्ञनांचा ॥७॥
सप्रेमें चिंतीता ज्ञानेशचरण । कळेल ही खूण । जीवेंभावें ॥८॥१८॥

॥ अभंग २ ॥

ऐसा हळु हळु नारायण मनीं । प्रगटला मुनि-दृढभावें ॥१॥
तदा प्रेमभरें[१७] पुलकांकितांग[१८] । आनंद अभंग[१९] प्रगटला ॥२॥

*(१) प्रेमाने युक्त, प्रेमाच्या स्वाधीन (२) डोळ्यांत (३) पाणी (४) रोमरंध्रे (५) घामाने युक्त (६) अंगावर आनंदाने रोमांच उभे झालेले (७) नामाचा गजर (८) जेव्हा (९) योग्यांना मृदुवेगापासून म्हणजे मनात कल्पना करून चित्तलावण्यापासून सुरुवात करावी लागते (१०) चित्त आपोआप ओढले जाणे (११) चित्ताचा मध्यम वेग म्हणजे चित्त लावण्याचा प्रयत्न करावा न लागता ते आपोआप लागणे (१२) भक्तीची सुरवात (१३) चित्त स्थिर होणे (१४) भक्ति कायमच राहते (१५) स्तुति (१६) प्रत्यक्ष (१७) प्रेमातिशयाने (१८) रोमांचयुक्त देह (१९) अखंड*

विषयवासना निमाली[१] उपाधि । मग्न[२] परमानंदीं जाहलो कीं ॥३॥
भुललों आपणा विसरलों पर[३] । ध्यातृध्येयाकार[४] भिन्न नाहीं ॥४॥
विसरला भक्त विसरला देव । विसरला भाव[५] वृत्तिरूप ॥५॥
विसरले गूण भूललें निर्गूण । जें जें प्रेमावीण दूजें होतें ॥६॥ (य३-८३)
प्रेमचि तो मग अंतरबाहेरीं । सचेतन हरि जाहलासे ॥७॥
आळंदीचा राणा उपदेशदाता[७] । तेणें भय चिंता सर्व गेली ॥८॥१९॥

**॥गद्य ॥**

हे मुने ! ह्याप्रमाणें समाधीचेठायीं मग्न जाहलों असूनही त्या प्रेमाचेठायीं[९] आनंदेदंतारूप[१०] भगवंताचें रूप प्रगट झालें आणि, अत्र[११]

*(१) नाहीशी झाली (२) तल्लीन (३) दुसरा (४) ध्यानकरणारा व ज्याचे ध्यान करावयाचे तो (५) स्थिति (६) निराळे (७) उपदेश देणारा (८) तल्लीन (९) प्रेमाचे ठिकाणी (१०) आनंदच किंवा प्रेमच इदंता-भावास म्हणजे दृश्य भावास प्राप्त झाल्यासारखे (११) या ठिकाणी अशा प्रकारची समाधी समजावयाची. आपले देहाचे आत जीवांचे जे शुद्ध स्वरूप आहे, ज्याला 'त्वंपदलक्ष्य' म्हणतात, त्या* ***त्वंपदलक्ष्याचे ठिकाणी स्थिर होणे ही व्यतिरेक समाधि होय आणि ब्रह्मांडाचे अधिष्टान जो सगुण आनंदमूर्ति परमात्मा, त्याचे ठिकाणी चित्त स्थिर करणे ही अन्वय समाधि होय.*** *तरीपण प्रारब्ध दोषाने ज्याप्रमाणे इच्छा उत्पन्न होतात व समाधि व्युत्थित होते, त्याप्रमाणे सगुण परमात्मा अंतर्धान पावला व माझे समाधीतून उत्थान झाले. मी ब्रह्मज्ञानी असूनहि त्या भगवंताच्या सगुण स्वरूपाने चित्त ओढले असल्यामुळे, तेच स्वरूप पुनः पाहावे अशी इच्छा होऊन मी पुनः समाधि साधली; परंतु ब्रह्मांडाधिकृत परमेश्वराचे ठिकाणी चित्त स्थिर करून पाहू लागलो असता सगुण भगवंताचे दर्शन न झाल्यामुळे, मी अत्यंत खिन्न झालो व दर्शनाची तळमळ तशीच कायम राहिली.*

*दोन समाधि*

**अत्र समाधिरित्थं बोध्यः ।**<br>
**त्वंपदार्थनिष्ठतयाऽऽत्मरूपे समाधिः ।**<br>
**तत्पदार्थनिष्ठतया प्रेममये भगवति समाधिः ।**<br>
**तयोरक्षणं तु महावाक्यार्थनिष्ठतया कृतम् ।**<br>
**अथापि इच्छाप्रारब्धदोषत इत्यादिवत् सगुणरूपतिरोधानम् अपश्यन्सन् व्युत्थितोऽस्मि ।**<br>
**तदा तदेवरूपं दिदृक्षुरहं पुनर्ब्रह्मज्ञानवानपि तेनैवरूपेणाकृष्टचेताः पुनरपि समाधिनिष्ठोऽभवम् ।**<br>
**किंतु तत्पदार्थनिष्ठतया वीक्ष्यमाणोऽप्यहं रूपदर्शनाभावेन निर्गताशया वैक्लव्यं प्राप्तवान् ॥**

एवं त्या निर्जन[१] वनाचेठायीं मी प्रभुदर्शनार्थ प्रयत्न करीत असतां, प्रेमळजनरक्षणार्थ[२] मातें[३] गंभीर वचनानें प्रशंसा करून बोलता जाहला, कीं हे तपस्विन् ! कृपापात्र[४]! या जन्माचेठायीं तूं मला पाहण्याला योग्य नाहींस. कारण, ज्याचे कामादिक मल[५] दग्ध[६] झाले नाहींत, किंवा ज्याचे लय म्हणजे निद्रा, कषाय म्हणजे स्तब्धता, रसास्वाद म्हणे धन्यताभिमान[७], निवृत्त झाले नाहींत, असे जे अनिष्पन्न[८] योगी आहेत, म्हणजे योगाचेविषयीं यत्न करीत असतांही ज्यांचा तेथें पूर्ण अधिकार झाला नाहीं, अशा पुरुषांनां माझें दर्शन कठिण आहे. तथापि, हे मुने ! हे कृपापात्र ! हे तपस्विन् ! असें जरी आहे तरी माझा अनुग्राहक[९] स्वभाव असल्यामुळें माझेठायीं तुझा अनुराग[१०] उत्पन्न व्हावा म्हणून मी आपलें रूप तुला एकवेळ दाखविलें आहे. **यद्यपि[११] महावाक्येंकरून ज्ञान झालें, तथापि माझें रूप दिसण्याला माझा अनुग्रहच[१२] हेतु आहे,** असे जाण. याप्रमाणे ज्याअर्थी माझे ठिकाणी अनुरागयुक्त योगी हृदयांतील कामादि मलांनां जाळून टाकतात, त्याअर्थी माझे ठिकाणीं लब्धानुराग[१३] होत्साता हृदयांतील कामादिमलांनां जाळून टाक.

*(१) मनुष्यरहित (२) भक्तजनांचा धीर सुटू नये म्हणून (३) मला (४) कृपा करण्यास योग्य (५) दोष (६) नष्ट (७) मी धन्य आहे, कृतार्थ झालो असे वाटणे (८) अपूर्ण, क्ो (९) कृपा करण्याचा (१०) प्रेम (११) जरी (१२) कृपाच. (१३) ज्याला प्रेम उत्पन्न झाला आहे.*

**तुज अल्प[२] सत्संगती[३] । सत्सेवाही[४] यथाशक्ती । जाहली म्हणवोनी दृढ भक्ति । मजविषयीं तुझी ॥२०॥**<br>
**म्हणवूनि हें अमंगळ[५] । (य३-८४) भौतिक[६] टाकोनि केवळ । दिव्य[७] देहीं प्रबळ । मद्भक्त होशील ममानुग्रहें[८] ॥२१॥**<br>
**आतांही तूं मद्भक्त सिद्ध[९] । परी पुढें मद्भक्त आणि मदीय पार्षद[१०] । वरी ब्रह्मज्ञ[११] आणि शुद्ध । होशील संत ॥२२॥**<br>
**'इंद्रियां अनघड[१२] पडलिया । जीविताचें सुख बुडालिया । आंतबाहेरीं उमटलिया । मृत्युचिन्हें' ॥ज्ञाने.॥**<br>
**तेथ केंवी प्रेमसंचयु[१३] । केंवी तव[१४] परिचयू[१५] । स्मृति[१६] राहावया उपायू । कवणू असे ॥२३॥**<br>
**'तरी ऐसियाहो ध्वनी[१७] । झणी[१८] थारा[१९] देशील मनीं । परी नित्य सेविला मी निदानीं[२०] । सेवकू होय ॥ज्ञाने.॥**<br>
**हें मरण काय बापुडें[२१] । परी प्रलयान्तही[२२] जरी घडे । तरी मदनुग्रहें न बुडे । स्मृति मज्जनांची[२३]' ॥ज्ञाने.॥**

*(२) थोडा काळ (३) संतांचा सहवास (४) सज्जनांची सेवा (५) अपवित्र (६) पंचभूताचा बनलेला देह (७) शुद्ध सात्विक देहाने*

*(८) माझ्या कृपेने (९) आहेसच (१०) माझ्या सगुण मूर्तीच्या संन्निध राहणारा सेवक (११) ब्रह्मज्ञानी (१२) कठीण, अवघड (१३) प्रेमाचा सांठा (१४) तुझा, सगुण भगवंताचा (१५) ओळख, (१६) स्मरण (१७) शंकेला (१८) कदाचित (१९) आश्रय (२०) शेवटी (२१) यःकश्चित् (२२) प्रलयकाळचा नाश (२३) माझ्या भक्तांची*

**म्हणोन येथ एक । माझेपण**[**] **असावें सम्यक**[१] । मग भरंवसेनी भवकटक[२] । निर्दळिलें जाणें ॥२४॥
सर्वव्यापक महदद्भुत[४] । जवळी असोनी अदृष्टवत[५] । **मी प्रणाम केलिया अनुकंपित**[६] **।अखंड**[७] **जें भगवद्रूपीं**[८] **॥२५॥**
तें रूप एवं वदोनी मातें । अंतर्हित[९] जाहलें जेथिचें तेथें । मीही त्यजोनि लज्जेतें । श्रीहरिनामीं रत[११] झालों ॥२६॥
राम कृष्ण हरि गोविंद । या नामांचे निखिल[१२] प्रबंध[१३] । नेणोनि दिवसनिशाबोध[१४] । गात असतां ॥२७॥
तैसीं अति गौप्य[१५] आणि कल्याणरूप[१६] । चरित्रें हरीचीं अनुपम[१७] अमूप[१८] ।
चिंतितसातां[१९] निःसंकल्प[२०] धुंडिली मही[२१] ॥२८॥
करितां पृथ्वीपर्यटण । मदमत्सरीं[२२] न लिंपे[२३] मन । निरीच्छ[२४] संतुष्ट होउन । कालप्रतीक्षण[२५] करीतसातां ॥२९॥
एवं <u>मज कृष्णभक्ताचा शार्ङ्गधरू । मज निस्पृहाचा</u>[२६] <u>संतोषतरू</u>[२७] <u>।</u>
मज शुद्धात्मयाचा[२८] आनंदसागरू[२९] । जो जगद्गुरू प्रगटला ॥३०॥
जननीगर्भी[३०] रक्षिलें जेणें । भगवत्पार्षदतनु[३१] यावया तेणें । परमेश्वरें कृपाजीवनें[३२]। सौदामिनीसम[३३]येणें केलें ॥३१॥

*(**) माझ्याशी प्रेमाचा संबंध,माझा होऊन राहणे. (१) दृढ (२) संसारसैन्य (३) नाश पावले (४) अत्यंत आश्चर्यकारक (५) न दिसणारे (६) सर्व शरीर द्रवीभूत झालेले असा दयार्द्र (७) नित्य (८) सगुणरूपाने (९) गुप्त (११) मग्न (१२) सर्वस्वी (१३) कविता (१४) दिवसरात्रीचे ज्ञान (१५) गुह्य, संतास कळणारी (१६) मंगलकारक (१७) अति उत्तम, ज्याला उपमा देता येत नाही (१८) पुष्कळशी, अगाध (१९) चिंतन करित (२०) सांसारिक पदार्थाचा संकल्प किंवा विचार न करिता (२१) पृथ्वी (२२) मदमत्सर इत्यादि विकाराने (२३) स्पर्शले (२४) इच्छारहित (२५) देह पडण्याचा काल केव्हा येतो हे पाहत (२६) विरक्ताचा (२७) संतोषरूप वृक्ष (२८) वासना रहितांचा (२९) ब्रह्मानंद (३०) आईच्या पोटात असतांना (३१) ज्या शरीराने सगुण भगवंतांच्या सांनिध्यात नित्य सेवक होऊन राहता येते असे शुद्ध सत्त्वात्मक शरीर (३२) कृपारूपी पाण्याचा बनलेला, (३३) वीजेप्रमाणे.*

प्रारब्धकर्म संपल्यावरी । पांचभौतिक देह महीवरी । पडलिया मज सत्वरीं । हरिजनशरीरीं[१] योजिले ॥३२॥
कर्मारब्ध[२] नाहीं हरिजनशरीर । तें शुद्ध आणि नित्य ऐसें म्हणती श्रीधर[३]।
असो ऐसा ब्रह्मकुमर[४] । एवं मद्वृती[५] जाण मुने ॥३३॥
मग कल्पांतसमयीं[६] । निजाश्रयजळीं[७] सुप्त[८] फणिशायी[९] । तेथ समाधिइच्छा[१०] करतां ब्रह्माही ।
मी श्वासद्वारा[११] तद्हृदयीं[१२] प्रवेशलो ॥३४॥ (य३-८५)
एवं सहस्त्र[१३] युग लोटलिया[१४] काळ । तदा जागा होवोनि हंसपाळ[१५]।
मी आणि मरीच्यादि ऋषी सकळ । प्राणापासोनि उपजविले ॥३५ ॥
तेथ मरीच्यादि प्रजापती[१६] । सृष्टिकार्यालागीं[१७] झटती । मी होवोनी ब्रह्मचारी व्रती । लोकत्रयीं[१८] हिंडतो ॥३६॥
जे कर्मे[१९] घेती स्वर्गादिफळें[२०] । तया ब्रह्मांडावरणबाह्य[२१] मार्ग न मिळे ।
आणि जे तपाद्युपासनीं[२२] निजबळें[२३] । ब्रह्मलोकीं जाती पैं ॥३७॥
ते ब्रह्मांडावरणबाह्य तंव जाती । परी न पुनर्ब्रह्माण्डान्तर्गती[२४] ।
मी भगवदनुग्रहे[२५] निश्चिती । बाह्यान्तर्वर्ती[२६] पर्यटतो[२७]॥३८॥

*(१) पार्षद शरीरामध्ये (२) कर्मजन्य, कर्माने उत्पन्न होणारा (३) श्रीधराचार्य, भागवत टीकाकार (४) ब्रह्मदेवाचा मानसपुत्र (५) माझा इतिहास (६) प्रलयाचे वेळी (७) आपल्या आश्रयाने किंवा आपण ज्या जलाचा आश्रय केला आहे अशा जलावर (८) निजले (९) भगवान् (१०) त्या जलशायी भगवानाचे ठिकाणी समाधि साधण्याची इच्छा (११) प्राणाच्या मार्गाने (१२) भगवंताच्या हृदयात (१३) हजार युगे (१४) गेल्यावर (१५) ब्रह्मदेव (१६) प्रजेचे स्वामी (१७) सृष्टि उत्पन्न करण्याकरिता गृहस्थाश्रमी झाले (१८) तिन्ही लोकांत (१९) यज्ञादि कर्माचे योगाने (२०) स्वर्गादिक लोक प्राप्त करून घेतात (२१) ब्रह्मांडाला जी आवरणे आहेत त्याच्या पलिकडे त्यांना जाता येत नाही (२२) तपादिकांच्या द्वारा ब्रह्माची उपासना करणारे (२३) स्वसामर्थ्याने (२४) पुनःब्रह्मांडात येऊ शकत नाहीत (२५) भगवंताच्या कृपेने (२६) ब्रह्मांडाच्या बाहेर व*

*ब्रह्मांडाचे आंत.(२७) गमन करितो, फिरतो*

माझें ब्रह्मचर्यादिकर्मेंकरून[२]। ब्रह्मांडांतरीं[३] होय गमन[४]। भगवदुपासनादिकें करून[५] । ब्रह्मांडाबाहेर गति माझी ॥३९॥
आणि ब्रह्मज्ञान परिपूर्ण । यालागीं कर्माकर्म[६]न करी बंधन । वरी[७]भगवत्प्रेमसंपन्न । म्हणोनी जाण स्वतंत्र मी ॥४०॥
तरी प्रेमें भगवद्वचना । पाळोनि हिंडतो जगत्कल्याणा । ही माझी उत्तम महती[८] वीणा । मज परेशें[९] दीधली ॥४१॥
षड्जर्षभ गांधार मध्यम । पंचम धैवत निषाद सप्तम । हे स्वर ब्रह्माभिव्यंजक परम । म्हणोनी ब्रह्म बोलिजे या ॥४२॥
ऐसी ब्रह्मविभूषित[११] वीणा । मी राग ताल मूर्छना[१२] । साधोनि भगवद्गुणा । गात गात हिंडतो ॥४३॥

गायनाने मोक्ष

गानीं[१३] होय भगवत्प्राप्ति । येथ उद्गातृकर्मी[१४] प्रमाण श्रुती । आणि याज्ञवल्क्यस्मृति । ऐसीचि आहे ॥४४॥

॥ श्लोक ॥

'वीणावादनतत्त्वज्ञः श्रुतिजातिविशारदः ॥ तालज्ञश्च अप्रयासेन मोक्षमार्गं नियच्छति' ॥१॥

॥ ओवी ॥

जो वीणावादनतत्त्व[१५] जाणें । श्रुतिजाति[१६] ओळखे ज्ञाने ।
आणि तालज्ञ[१७] असोनि हरिगुण गाणें । तो मोक्षसाधनें अभियुक्त[१८] ॥४५॥

*(२) ब्रह्मचर्य इत्यादि व्रतामुळे (३) ब्रह्माडांच्या आत (४) जाणे (५) भगवंताच्या भक्तीने (६) पापपुण्य (७) शिवाय, आणखी (८) नावाची (९) भगवंताने (१०) एकाग्रतेच्या द्वारा ब्रह्मस्वरूप प्रगट करणारे (११) ब्रह्म प्रगट करणाऱ्या स्वराने मंडित (१२) गाण्यांतील एक प्रकार (१३) गाण्याने (१४) यज्ञांतील उद्गात्याचे कर्मामध्ये (गायन करावे म्हणून श्रुतीने सांगितले आहे.) (१५) वीणा कशी वाजवावी हे जाणणारा (१६) स्वरांतील अंश व जाति कोमलतीव्रादि (१७) ताल जाणणारा (१८) सज्ज, सहित.*

यथा नयति कैलासं नगं गानसरस्वती[१] । तथा नयति कैलासं न गंगा न सरस्वती[१] ॥१॥

॥ ओव्या ॥

ऐसें रागार्णवकाराचें वचन । गायन करिती सर्व वर्ण । चांडालही करिती गायन । हें वासिष्ठीं बोलिलें ॥४६॥
यालागीं वेदवर्ज्यभाषया[२] । शूद्रादिकां अधिकार गावया । (य३-८६)
आणि वेदपुराणवर्ज्यभाषया[३] । चांडालादिकां गावया अधिकारू ॥४७॥

(सर्वांनां गानाधिकार आहे असें वचन मूळांत नसून मी आपल्या मतिप्रमाणेंच लिहलें आहे. म्हणून यांत प्रमाद असल्यास मूळावर लोटूं नये. )

एवं प्रेमें करितां भगवद्गान[४] । आनंदें नाचें नारायण । येविषयीं प्रमाण । अनुभव माझा ॥४८॥
माझें पाहूनि गुणगान । प्रभू हृदि येतो बोलाविल्यासमान । गंगादितीर्थमूळ[५] ग्र्यारण[६] । तो प्रेमें दर्शन मज देतो ॥४९॥
जयाचें आवडतें[७] गुण । ऐकतां सर्वांग[८] होती श्रवण । तो हृदयनिवास[९] परमकरूण । नित्य दर्शन मज देतो ॥५०॥
एवं माझें प्रयोजन[१०] । गुणगानें प्रेमवर्धन[११] । निष्काम पाहोनि जगज्जीवन । नित्य दर्शन मज देतो ॥५१॥

*(१) गायनसरस्वतीच्या साह्याने मनुष्य जसा कैलासात जातो तशी गंगा किंवा विद्या सरस्वतीहि मनुष्याला कैलासात नेऊ शकत नाही (२) वैदिक वाङमय सोडून लौकिक पौराणिक भाषेने (३) वेदपुराणांची वाणी सोडून केवल लौकिक भाषेत (४) भगवंताचे गुणवर्णन (५) गंगादि तिर्थाचे उगमस्थान (६) ज्याचे चरण (७) प्रिय (८) सर्व इंद्रिय श्रवणाचे ठिकाणी येऊन श्रवणेंद्रियाप्रमाणे तृप्त होतात. अत्यंत एकाग्र चित्त होते (९) हृदयात राहणारा (१०) उद्देश (११) प्रेम वाढविणे*

पांचभौतिकभाव त्यजून । समाधिनाविष्ट[१] होय मन । अनध्यस्तविवर्त[२] आनंदघन[३] । नित्य दर्शन मज देतो ॥५२॥
जैसें हें हरिगुणगान[४] । मज करी ब्रह्मसंपन्न[५] । तैसेंचि सकलांस म्हणोन । तूंही वर्णन करी मुने ॥५३॥
विषयभोगें जयाच्या मना । झडपूनि घेत डाकिणी तृष्णा । तयास्तव तूं वर्णी कृष्णा । परम घृणा करोनी ॥५४॥
श्रीहरीचें गुणवर्णन । हीचि शाश्वती[७] नौका जाण । भवसिंधूमाजीं[८] तरण[९] । सहज सकल जनांचें ॥५५॥
येविषयीं प्रमाण श्रुत । आणि ऐसेंचि वदती तात । श्रीतुकारामादिही संत । एवं वदती ॥५६॥
'तयापाशीं पांडवा । मी हारपला गिंबसावा । जेथ नामघोष बरवा । करिती माझा' ॥५७॥

*(ज्ञानेश्वरी अ० ९ ओ० २०८)*

**॥ अभंग तुकाराममहाराज ॥**

'निजल्यानें गातां उभा नारायण । बैसल्या कीर्तन करितां डोले ॥१॥
उभा राहोनियां मुखीं नाम वदे । नाचे नाना छंदे पांडुरंग ॥२॥
मार्गानें चालतां नाम वदे वाणी । उभा चक्रपाणी मागें पूढें ॥३॥
तुका म्हणे याला कीर्तनाची गोडी । भावें[१०] घाली उडी नामासाठीं' ॥४॥

**॥ तुलसीदासांचे दोहे ॥**

'रामनामको[११] अंक है सब साधन है सून । अंक गये कछु हात नहीं अंक रहे दसगूण ॥१॥ (य३-८७)

*(१) समाधिस्थ (२) पूर्ण ब्रह्मस्वरूप सगुण (३) केवल आनंदरूप (४) श्रीहरीचे गुणवर्णन करणें (५) ब्रह्मसमाधिस्थ (७) नाश न पावणारी (८) संसार समुद्रांतून (९) उद्धरून जाणे (१०) प्रेमें (११) अर्थ - श्रीरामाचे नांव आकड्याप्रमाणें आहे व सर्व साधने शून्याप्रमाणे आहेत नामरूपी आंकडा कायम ठेवून जर साधनरूपी शून्य त्याच्यावर चढविलें तर फल दसपट वाढतें व नामरूपी आंकडा सोडून नुसतें साधन केल्यास शून्यच हाती राहील म्हणजे कांहीं फल होणार नाही*

रामनाम[१] कहबूं करो जबलग घटमो प्राण । कबहूं दीनदयालके भनक परेगी कान ॥२॥
रामनाम नरकेसरी कनककशिपुकलिकाल । जापकजन प्रल्हाद जिमी पालहि दलिसुरसाल ॥३॥ तुलसीदास

**॥ दोहा ॥**

इतिविध[२] निजरामायणीं[३] वदले तुलसीदास । जितेंद्रिय[४] आणि नाम वदे तरि करि हरि ह्रदि वास[५] ॥५७॥

**॥ ओव्या ॥**

एवं प्रमाणेंकरून[६] । सिद्ध[७] सकलां भवतरण । परी अन्वयव्यतिरेकेंही[८] जाण । ऐसेंचि दिसें ॥५८॥
भक्ति नसतां योगादिकीं । चित्तवृत्ति न शमे[९]निकी[१०]। आणि मुकुंदसेवा[११]घडतां नेटकी[१२]। मनोवृत्ति सहज शमे ॥५९॥

*(१) अर्थ :- जोपर्यंत देहांत प्राण आहे तोपर्यंत अहोरात्र श्रीरामाचे नांव स्मरत राहा. केव्हांतरी दीनदयाल भगवंताच्या कानावर हांक पोहचेलच. रामनाम हें नृसिंह असून कलिकाल हा हिरण्यकश्यपु आहे. नामस्मरण करणारे प्रल्हादासारखे आहेत म्हणून नामरूपी नरसिंह कलिदोषरूपी हिरण्यकश्यपु इत्यादि दैत्यांचा नाश करून आपल्या नामधारकरूपी प्रल्हादाचें संरक्षण करितो. (२) याप्रमाणे (३) आपल्या रामायणग्रंथांत (४) इंद्रियाचा जय करून (५) राहतो (६) वरील प्रमाणावरून (७) नामस्मरणानें सर्व तरतात (८) नामस्मरणानें तरतोच व नामस्मरणावांचून तरत नाहीं किंवा कोणत्याहि साधनाला तारण्याकरितां नामस्मरणाची आवश्यकता आहे व नामस्मरण कोणत्याहि साधनाच्या सहाय्यावाचून तारू शकते (९) स्थिर होत नाही (१०) उत्तम प्रकारे (११) श्रीहरीची सेवा (१२) योग्य प्रकारे, प्रेमभावानें.*

**॥ अभंग ॥**

अजपा[१] जपणें उलट प्राणाचा । तेथही नामाचा[२] निर्धार[३] असे ॥१॥
ऐसी तातवाणी[४] हरिपाठग्रंथीं । योगासी निश्चिती नामापेक्षा[५] ॥२॥
आणि माझा ऐसा अनुभव आहे । भक्तीवीण नोहे शांति चित्ता ॥३॥
प्रतिमादौ[६] किंचिन्मुकुंदाची सेवा । करितांही गोवा[७] सोडी मन ॥४॥
मग दृष्ट[८] जे कां श्रीहरीचे गुण । तेणें कैसे मन शांत नोहे ॥५॥
आळंदीचा राणा जरी करी कृपा । भक्तिमार्ग सोपा तरी कळे ॥६॥६०॥

**॥ ओव्या ॥**

जें जें त्वां पुसिलें कांहीं । तें तें मियां सांगितलें सर्वही । हें होवो तुज संतोषदायीं[९] । मम[१०] जन्मकर्मरहस्य[११] ॥६१॥
व्यासा तूंही लीन[१२] हरिगुणीं । यालागीं हें तुज आवडतें मनीं । मीही यथार्थ[१३] म्हणोनी । वदलों सकळ ॥६२॥
आपुलिया अनुभवेंकरून । दुसरा होतो भक्तिसंपन्न । तरी स्वचरितही[१४] करावें वर्णन । तेथ अभिमान बाधीना ॥६३॥
एवं वदोनी ब्रह्मनंदन[१५] । करीत करीत हरिगायन ।
स्वप्रयोजनशून्य[१६] परी जगत्कल्याण[१७]। कराया चालिला सूत म्हणे ॥६४॥

*(१) अजपा जप :- प्राणापानाच्या गति उलट करून जो नाद ऐकूं येतो तेथें सोहंची भावना करणे (२) भगवंताच्या नामाचा (३) निश्चय (४) श्रीज्ञानेश्वर महाराजांचे वचन (५) भगवन्नामाची जरूर (६) मूर्ति वगैरेचे ठिकाणीं (७) आसक्ति (८)*

*अनुभवलेले (९) आनंद देणारे (१०) माझें (११) जन्मचरित्राचें मर्म (१२) मग्न (१३) खरें (१४) आपले चरित्र (१५) नारदमुनि (१६) स्वतःचें कांहीं हित साधावयाचें नसतांना देखील (१७) लोकांचे हित*

**परी जगत्कल्याणही वासनारहित[१] । जैसा येतां मलयमारुत[२] ।**
**तदा सहज तोषे घ्राणदैवत[३] । तद्वल्लोककल्याण[४] होत संतकरवीं[५] ॥६५॥ (य३-८८)**

**॥ अभंग ॥**

**धन्य धन्य धन्य श्रीनारदमूनी । मग्न हरिगुणीं[७] कालत्रयीं[८] ॥१॥**
**धन्य भाग्यनिष्ठ[९] श्रीब्रह्मनंदन । चित्तीं नारायण सर्वकाळ ॥२॥**
**धन्य भाग्य हातीं हरिदत्त[१०] वीणा । गाये हरिगुणा निजानंदें ॥३॥**
**तोचि ज्ञानेश्वर आळंदीचा राणा । धन्य करी जना अनुग्रहें ॥४॥६६॥**

**॥ दोहा ॥**

**हरिगुण गातां हर्ष अती तो धन्य विधिकुमार[११] । आणि धन्य ते त्याचिपरी हरिरत[१२] त्यजुनि कुमार[१३] ॥६७॥**
**अलकावतिपतिपाउलें[१४] वंदुनि अतिसुखसार[१५] । रामकृष्णहरि गाउनी तोडु सकल संसार ॥६८॥**

**हरिःॐतत्सत् श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरकृपाप्रसादे गद्यपद्यान्विते नानाभाषाप्रबंधे प्रियलीलामहोत्सवे आमंत्रणविलासे व्यासंप्रति नारदेन प्राग्जन्म तथा स्वभाग्यकथनं नाम षष्ठसखीप्रेषणम् ॥**

**॥ श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ॥**

*(१) आसक्ति न ठेवतां (२) मलय पर्वतावरील चंदनाचे सुवासानें युक्त वायु (३) घ्राणेंद्रिय (४) त्याप्रमाणें लोकांचे कल्याण (५) सत्पुरुषाकडून (६) तल्लीन (७) श्रीहरीचे गुणवर्णन करण्यांत (८) अखंड (९) भाग्यशाली (१०) श्रीहरीनें दिलेली (११) श्रीनारदमुनि (१२) हरिभक्तिपरायण (१३) दुष्ट काम (१४) श्रीज्ञानेश्वर महाराजांचे चरण (१५) अत्यंत सुखस्वरूप*

०००

## सखीप्रेषण ७ वें. विषयानुक्रम

## परीक्षित जन्मकथेचा उपक्रम व द्रौणीनिग्रहवर्णन.(पृष्ठ ८९-१००)

*श्रीगुरुनमन. भगवान् नारदांच्या गमनानंतर व्यासांनीं पुढें काय केलें तें सांगण्याविषयीं शौनकांचा प्रश्न व सूताचें उत्तर :- आपल्या शम्याप्रास आश्रमांत स्वस्थचित्त बसून नारदांनीं सांगितलेल्या गोष्टीकडे भक्तिपूर्वक मन लावून समाधिनिष्ठ प्रज्ञेनें व्यासांचें सर्व कांहीं जाणणें. ८९. सांख्याचें 'सत्कार्य' वेदांतांत मिथ्या असून ज्ञानियाला कसें कळतें ? ९० व्यासांनीं समाधींत पाहिलेल्या गोष्टी. सात्वत शब्दब्रह्माचा संक्षेपतः विषय कथन. त्याचाच विस्तर सात्वतश्रुति होय व हिलाच भागवत किंवा समाधिभाषा ही अपर नांवें आहेत. भागवतसंहितेच्या प्रेमपूर्वक श्रवणाचें फळ. ९० भागवती संहिता शुद्ध करून व्यासांचें शुकाला पढविणें. ९० परमात्म वस्तू जाणली असतां शास्त्रीय द्वैताचा निःशेष त्याग करावा असें श्रुतिस्मृति सांगत असतां व (य३-१०) महाराज शुक स्वयं आत्माराम असतां भागवत कां पढले? या शौनक प्रश्नाचें सूतानें दिलेलें उत्तर ९१. भगवद्भजन हा मुक्तांचा स्वभाव व भूषण असून भगवंताचे गुण मुक्तीहून गोड आहेत याविषयीं नाना प्रमाणपूर्वक निरूपण ९१. ऋषींनी मागें (पृष्ठ ६४) परीक्षिज्जन्मकर्माविषयीं विचारलेल्या प्रश्नाचें उत्तर :- परीक्षिताचें जनन, पांडवांचें महाप्रस्थान व परीक्षिताचें मोचन हीं हरिकथासंगतित्वास्तव सांगण्याचा सूताचा उपक्रम ९३. भीमगदेंकरून दुर्योधन रणीं पडला असतां त्याच्या संतोषार्थ अश्वत्थाम्यानें द्रौपदीपुत्रांची शिरें तोडून नेऊन त्याला दाखविलीं असतां दुर्योधनानें त्याचा केलेला धिःकार. अश्वत्थाम्याचें कर्म पाहून दुर्योधनाला संतोष वाटला या महाभारतकथेचा समन्वय ९३. याज्ञसेनीचें सांत्वन करण्याकरितां अर्जुनानें केलेली प्रतिज्ञा, अश्वत्थाम्याच्या वधार्थ रथारूढ होऊन त्याचा केलेला पाठलाग व त्यानें (अश्वत्थाम्यानें) ब्रह्मास्त्र सोडलें असतां त्या भयंकर तेजानें भयचकित होऊन श्रीकृष्णाचें केलेलें स्तवन ९४. (७१ व्या ओवीवर शंका) मायारहित परमात्मा मायेला वश न होऊन मूढ जीवांना जशीं कर्मफळें देतो तशीं मुक्तांना देता येतात किंवा नाहीं व परमेमश्वराच्या चिच्छक्तीनेंच जर मायेचा अभिभव होतो तर तिची निवृत्ती होऊन फलदातृत्व परमात्म्यावर वास्तविकच आलें पाहिजे ह्या शंकेचें रज्जुसर्प व लवणकणदृष्टांतानें समाधान व मायामोहित जीवांनां स्वपराक्रमानेंच कर्मफलें देत असल्यामुळें ईश्वराचें श्रेष्ठत्व ९५. कर्माप्रमाणेंच फळ होतें अथवा ईश्वर देतो तर ईश्वराकडे श्रेष्ठत्व कोणतें? असा प्रश्न व त्याच्या उत्तरार्थ थोड्या कर्माचें अनंत फल देण्यामध्यें ईश्वरी पराक्रमाची योजना व जीवकर्माची अपेक्षा याविषयीं निरूपण ९६. अर्जुनाची स्तुती व हें भयंकर तेज कशाचें आहे हा प्रश्न ऐकून श्रीकृष्णानें दिलेलें उत्तर व आपल्या ब्रह्मास्त्रानें अश्वत्थाम्याच्या ब्रह्मास्त्राचें निवारण करण्याविषयीं आज्ञा. अर्जुनानें ब्रह्मास्त्र सोडलें असतां दोन्ही अस्त्रांच्या तेजकल्लोळांत प्रजानाशसमय ओढवलेला पाहून अर्जुनानेंच भगवंताची इच्छा जाणून दोन्ही अस्त्रांचा केलेला उपसंहार व कोपून अश्वत्थाम्याला बांधून शिबिरांत नेण्याकरितां उद्युक्त होणें ९६. (य३-११) त्याला मारण्याविषयीं श्रीकृष्णाचा अर्जुनाला उपदेश - मद्यपान केलेला, असावध इत्यादि दोषयुक्त शत्रूला यद्यपि धर्मवेत्ते मारीत नाहींत तथापि* **दुसऱ्याचे प्राण घेऊन जो आपले प्राण पुष्ट करितो त्याला मारणेंच उचित आहे** *याविषयीं स्मृतिप्रामाण्यपूर्वक निरूपण ९७. राजानें अपराधांची क्षमा करावी किंवा नाहीं या प्रश्नाचें नृपनीतिविवेचनपूर्वक उत्तर ९७. निद्रेंत बाळांचा घात करणें हे अश्वत्थाम्याचें अत्यंत गर्ह्यकर्म व द्रौपदीजवळ अर्जुनाची प्रतिज्ञा ह्या दोन्हीं कारणांस्तव अश्वत्थाम्याला मारून टाकण्याविषयीं (अर्जुनाच्या परीक्षेकरितां) भगवान् बोलिले असतांही त्याला मारणें अर्जुनाला योग्य वाटलें नाहीं याचीं कारणे व शिबिरास आल्यावर द्रौपदीपुढें आणलें असतां शोक करीत असतांही त्या साध्वीनें अश्वत्थाम्याला सोडून देण्याविषयीं केलेलें न्यायाला व धर्माला अनुरूप असें भाषण व भीमाचें त्याला मारण्याविषयीं भाषण ९८. याप्रमाणें भीमानें अश्वत्थाम्याच्या वधाविषयीं अर्जुनाला प्रवर्तविणें व दौपदीचें निवारण करणें पाहून 'वपनं द्रविणादानं' इत्यादि ब्राह्मणाला न मारण्याविषयीं धर्मशास्त्रवचनरूप आज्ञा व 'आततायिनमायांतं' इत्यादि ब्राह्मणाला मारण्याविषयीं स्मृतिवचनरूप आज्ञा ह्या आपल्या दोन्ही आज्ञांचें, द्रौपदीजवळ केलेल्या प्रतिज्ञेचें व भीमादिकांच्या व आपल्या इच्छेचें अर्जुनानें पालन करण्याविषयीं श्रीकृष्णाचें भाषण व त्याप्रमाणें अश्वत्थाम्याला अर्जुनानें केलेली शिक्षा ९९. उपसंहार. १००.*

॥ श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरमाउली समर्थ॥

# सखीप्रेषण ७ वें.

## परीक्षितजन्मकथेचा उपक्रम व अश्वत्थामानिग्रह

॥ श्लोक ॥

श्रीज्ञानेश्वरपदश्रियं नत्वा परमतमाम्* । प्रेषयामि सप्तमीं सखीं मृदुभाषिणीमिमाम् ॥१॥[१]

अस्मिन्नध्याये[२] भगवद्भक्तस्य जन्मकथनार्थं द्रौणिना कृतमुच्यते ।

॥ दोहा ॥

शौनक सूता प्रश्न करी कीं गेल्या विधिसूत[३] । व्यास तत्कथित चिंतुनी आचरिला कीं पूत[४] ॥२॥

॥ ओवी ॥

सूत म्हणे शौनकाप्रती । सरस्वतीचे पश्चिमतटक्षिती[५] । शम्याप्रास स्वाश्रमाप्रती[६] । व्यास निश्चिती बैसले ॥३॥ (य३-८९)

*(१) श्रीज्ञानेश्वर महाराजांच्या अत्यंत मनोहर अशा चरणसौंदर्याला नमस्कार करून अत्यंत*मृदुभाषण करणाऱ्या अशा सातव्या सखीला (भगवंताकडे) पाठवितें (२) या अध्यायांत भगवद्भक्त अशा परिक्षिती राजाचें जन्मरहस्य सांगण्याकरितां तत्पूर्वी अश्वत्थाम्यानें काय केलें हें सांगतात (३) श्रीनारदमुनि (४) पवित्र (५) पश्चिमेकडील कांठावर (६) आपल्या आश्रमाचे ठिकाणी.*

मग जें बोलिलें ब्रह्मनंदनें[१] । तेथ मन ठेविलें प्रणिधानें[२] । समाधिनिष्ठ[३] प्रज्ञेनें[४] । सर्व कांहीं जाणलें ॥४॥

जें अतीत[५] अद्य[६] अनागत[७] । तें मायावृत्तिकारणीं[८] वसत[९] ।

तें समाधीनें कळे समस्त । म्हणोनी सांख्य वदत सत्कार्य[१०] ॥५॥

आणि जरी तें मिथ्या वेदांतमतें[११] । तरी यावदविद्या[१२] उपपद्यतें[१३] ।

हणोनी बाधितानुवृत्त्या[१४] प्रातिभासिकत्वें[१५] तें । ज्ञानियांहि कळते समाधिमत्या[१६] ॥६॥

एवं भक्त्या[१७] निर्मल[१८] मनीं । पुराणपुरुष[१९] कैवल्यदानी[२०] ।

पाहता जाहला व्यासमुनी । आणि तदाश्रित[२१] माया जननी[२२] देखिली ॥७॥

जिनें ब्रह्म असोनि जीव । निजकृती[२३] मोहिला[२४] स्वयमेव[२५] । तो जीवांचा महाभव[२६] । पाहिला व्यासें ॥८॥

निर्गुण ब्रह्म पाहिलें साक्षीपणें[२७] । आणि पौरुषरूपीं[२८] अनध्यस्तविवर्ती[२९] ब्रह्म पाहिलें परमप्रेमगुणें[३०] ।

माया देखिली वृत्तीपणें[३१] । आणि जीवसंसृती[३२] जगत्संयमानें[३३] देखिली ॥९॥

जेंवी गभस्ति[३४] दिसे निर्मळ । मिथ्यात्वें दिसे मरीचिजळ[३५] । पाहोनि कुरंग तळमळ[३६] । तद्भ्रमही[३७] कळे ॥१०॥

*(१) नारदमुनींनीं (२) भक्तीने (३) समाधिस्थ (४) अत्यंत शुद्ध बुद्धीने, ऋतंभराप्रज्ञेनें (५) भूत (६) वर्तमान (७) भविष्य (८) संपूर्ण जगाचें कारण जी मायावृत्ति तीत (९) राहते (१०) कार्यरूप जगत खरें आहे (११) वेदान्ताच्या मताने (१२) अविद्या नाश पावत नाहीं तोपर्यंत (१३) राहते (१४) मिथ्या दृष्टीनें (१५) भासमात्र (१६) समाधिस्थ बुद्धीनें (१७) भक्तीच्या योगानें (१८) अत्यंत शुद्ध झालेल्या अंतःकरणांत (१९) सनातन परमात्मा (२०) मोक्ष देणारा (२१) त्या भगवंताचे आश्रयानें (२२) जगाची आई (२३) आपल्या कर्मानें (२४) आसक्त झालेला (२५) आपणच (२६) अनादि संसार (२७) साक्षीस्वरूपानें (२८) सर्व ब्रह्मांडाचा भास ज्याचे ठिकाणीं आहे असा साकार परमात्मा (२९) भ्रमरहित साकार स्वरूपी, विद्यावृत्तीनें साकार भासणारा (३०) अत्यंत प्रेमामुळे (३१) वृत्तिरूपानें (३२) जीवाचा संसार (३३) जगतावर संयम करून (३४) सूर्य (३५) मृगजल (३६) हरिणाची तळमळ (३७) हरिणाचे ठिकाणचा भ्रम.*

एवं जाणोनि सकळ । जाणला भक्तियोग निर्मळ ।

आणि हें सात्वत[१] शब्दब्रह्म[२] निखळ[३] । जाणोनि प्रकट केलें विश्वहिता[४] ॥११॥

ब्रह्माश्रय[५] ब्रह्म विषय[६] । ऐसिया मायेचे ठायीं स्वयें ।

ब्रह्मचि आभासत्वें[७] जीव होय । आणि साहे बंधदुःख[८] ॥१२॥

तेंचि भक्तिज्ञानेंकरून । स्वरूपानंद[९]प्रचुर[१०] जाणून । मुक्त होय एवं निरूपण । संक्षेपेंकरून[११] दर्शविलें ॥१३॥

एतद्विस्तरचि[१२] सात्वतश्रुती[१३] । जया श्रीमद्भागवत म्हणती ।
आणि समाधिभाषाही[१४] अपरमती[१५] । योग्य बोलती मज वाटे ॥१४॥
ती ही भागवसंहिता[१६] । जी प्रेमें ऐकिली असतां । जन्मजरामरणादिहंता[१७] । भगवद्भक्तियोग तत्वतां मिळे ॥१५॥
॥ दोहा ॥
त्या व्यासें ही भागवती करुनि संहिता शुद्ध । निजपुत्राप्रति[१८] पढविली जो आधिंच चिद्बुद्ध[१९] ॥१६॥
॥ ओव्या ॥
तदा शौनक म्हणे सूता । तया निवृत्तिनिरता[२०]। एवढी भागवतसंहिता । पढावया कवण हेतू? ॥१७॥
जाणलीया परमात्मवस्तू[२२] । सकल शास्त्रें पावती अस्तू[२३] ।

*(१) भगवद्भक्तांचे (२) शब्दरूपी ब्रह्म (३) संपूर्ण (४) जगाच्या कल्याणाकरितां (५) ब्रह्माचे आश्रयाने असणारीं (६) ब्रह्म जिचा विषय आहे (७) आभासरूपानें (८) संसार दुःख, अविद्येमुळे भासणारे दुःख (९) आपल्या आत्मस्वरूपाचा आनंद (१०) अत्यंत, अखंड, अपरिमित (११) थोडक्यांत (१२) याचाच विस्तार (१३) भगवद्भक्तांचा वेद भागवत (१४) समाधीच्या अनुभवानें कळणारी भाषा, सगुण भगवंताच्या ठिकाणीं समाधी साधून लिहिलेली भाषा (१५) दुसरे, कित्येक, कोणी वैष्णव (१६) भागवतरूपी वेद (१७) जन्म जरा मृत्यु यांचा नाश करणारा (१८) श्रीशुकाचार्यांना (१९) ब्रह्मज्ञानी (२०) मोक्ष धर्मांत प्रविण (२१) कारण (२२) ब्रह्मज्ञान झाल्यावर (२३) त्याज्य होतात, मिथ्या होतात*

आणि प्रयोजनाऽभावें[२] प्रवृत्तू । मंदही[३] नोहे ॥१८॥ (य३-९०)
ज्ञान जाहलियावरी अखंडित[४]। निःशेष त्यागिजें शास्त्रीय[५]द्वैत । वेद शास्त्रेंपुराणें समस्त । पदपांसुवत[६]त्यजावे ॥१९॥
इत्यादि नाना श्रुतिस्मृति । कंठरवेंकरूनि[७] वदती । कीं मुक्तांची नोहे प्रवृत्ती । ब्रह्मबोधक[८] शास्त्रीं ॥२०॥
आणि शुक तंव महाराज परम । निजरूपें जाहला ब्रह्म । एवं तो श्री आत्माराम[९] । असोनि भागवत कां पढला ॥२१॥
सूत म्हणे शौनक मुने ! हरिभक्तीची प्रयोजनें[१०] । मुक्ताचें ठायीं निःशेष क्षीणें । जाहलीं असती ॥२२॥
देखे, सूर्य दे प्रकाशू । तो कवण प्रयोजना[११] विशेषू । परी होत असे समुल्लासू[१२] । जगत्प्रयोजना[१३] ॥२३॥
तेंवी मुक्तांचें हरिभजन[१४] । तो तंव त्यांचा स्वभाव पूर्ण । परी उद्धरती दीन जन । पामर[१५] विषयी मुमुक्षू ॥२४॥
कां नदि जैं होय अब्धिगामिनी[१७] । तैं नदींत काय नसे पाणी ।
परी स्वभावेंचि प्रवाहकरणी[१८] । आर्ता[१९] जीवनपानीं[२०] तृप्त करी ॥२५॥
तेंवी मुक्तांचिया ठायीं[२१] । भक्तीवीण[२२]ब्रह्मपण[२३] न्यून[२४]नाहीं । परी हरिचरणगामिनी[२५] लवलाही । प्रीति होय ॥२६॥

*(२) उद्देशावांचून (३) मूर्खहि (४) सर्वदा (५) शास्त्रांतून प्रगट झालेले, शास्त्रमूलक (६) पायाच्या धुळीप्रमाणें (७) स्पष्ट (८) ब्रह्मज्ञान करून देणाऱ्या (९) निर्गुण आत्मस्वरूपाचे ठिकाणीं रममाण होणारा (१०) उद्देश, फळें, मुक्त पुरुष कोणत्याहि उद्देशानें श्रीहरीची भक्ति करीत नाहींत (११) कोणत्या उद्देशाने - म्हणजे सूर्य ज्याप्रमाणें कोणत्याहि उद्देशानें प्रकाश देत नाहीं तर प्रकाश देणें हा त्याचा स्वभावच आहे व तो स्वभावानुसार प्रकाशित झाला असतां जगाचे व्यवहार अनायासे चालतात (१२) त्याचे प्रकाशणें (१३) जगाच्या उद्देशाकरितां (१४) ईश्वरभक्ति (१५) मूढ (१६) विषयासक्त (१७) समुद्रास मिळण्याकरिता जाते (१८) प्रवाहाचा उपयोग (१९) तृषितांना (२०) पाणी पिण्यानें (२१) मुक्त पुरुषाचे ठिकाणीं (२२) भक्ति न केल्यास (२३) ब्रह्मप्राप्ति (२४) कमी (२५) श्रीहरीच्या चरणाकडे वाहणारी.*

तेणें उद्धरती नाना जीव । हा तो सज्जनस्वभाव । येथ तर्क करणें मूढगौरव[२] । जाण मुने ! ॥२७॥
कां गंगा सप्रवाह[३] सागरीं झोके[४] । तैं समुद्राचें क्षारत्व[५] न देखे ।
तेंवी सुजनही सर्व कर्तृत्वादि[६] कलंके[७] । न देखती हरीची ॥२८॥
मुमुक्षुदशेंत अभ्यस्त[८]भक्ति । ते मुक्तदशेंत ये स्वभावस्थिति[९]। आणि भगवद्भक्त श्रम न गणती[१०]। भगवत्सेवादौ[११] ॥२९॥
सकलमोहविनाश[१२] जाहला । आत्मानात्मविवेकू[१३] केला । तेणें हृदयग्रंथीचयो[१४] निमाला[१५] । सकल जयांचा ॥३०॥
आणि मार्तंडातें[१६] कहीं[१७] । आंधाराची सेचि[१८] नाहीं । तेंवी जया कालीं[१९] तिहीं । अज्ञान न स्मरे ॥३१॥
दुःखध्वंसें[२०] आनंदप्राप्ति । ऐसी नोहे जयांची स्थिति । जे अखंड ब्रह्मानंदें डुल्लती । जगद्भ्रांतिविरहित ॥३२॥
ऐसे आत्माराम[२२] समर्थ । श्रीहरिचरणीं होती रत[२३] । एवं गुणवान् भगवंत । अन्य हेत[२४] न वदवे ॥३३॥

*(२) अत्यंत मूर्खपणा (३) प्रवाहासहित (४) जाऊन पडते (५) खारटपणा (६) जगत् निर्माण करण्याचे आरोपित कर्तृत्व*

*(७) दोष (८) प्रयत्नपूर्वक होणारी (९) अकृत्रिम, प्रयत्नावांचून (१०) जुमानित नाहींत (११) भगवंताच्यासेवा वगैरेमध्ये (१२) संपूर्ण अविद्या मोहाचा नाश (१३) जडचैतन्याचा वेगळेपणा (१४) हृदयांतील जडचैतन्याच्या ऐक्यतेला कारणीभूत होणाऱ्या समजुती (१५) नाश पावल्या (१६) सूर्याला (१७) केव्हांहि (१८) ओळख (१९) तिन्ही काळीं, भूत, भविष्य, वर्तमानकाळीं (२०) त्रिविध दुःखाच्या नाशाने (२१) जगताचा भ्रम केव्हांहि ज्यांना होत नाही (२२) अखंड आत्मस्वरूपी रममाण होणारे (२३) प्रेम करितात (२४) कारण.*

कीं सुपुत्रा पितृत्वही येतां । तरी काय विसरे पूर्वील पिता । तेंवी सुजनां भगवद्गुणवार्ता[१] । होय सर्वथा भूषणावह ॥३४॥

आणि गेलियाही ब्रह्मपेठे[२] । येती प्रारब्धाचे चपेटे[३] । ते भोगावे तरी मग नेटें[४] । भजन कां न कीजे? ॥३५॥

प्रारब्धाचा अभिभव[५] । भक्ति करी स्वयमेव । परी वस्तुतस्तव[६] । मुक्तां भक्तिभाव[७] प्रयोजन ॥३६॥ (य३-९१)

॥ श्लोक : वामनपंडित ॥

'आत्माराम[८] असे शुकादिक मुनी ज्यांचें अविद्यामय[९]। ग्रंथी[१०] सर्वहि सूटले जितचि[११] जे मुक्त स्वयें अद्वय[१२] ॥

भक्ति श्रीहरिची उगीच करिती तीही निमित्ताविण[१३] । कीं मुक्तीहुनि गोड फार असती श्रीमाधवाचे गुण ॥१॥'

॥ ओव्या ॥

एवं श्रीवामनोक्ति[१४] । 'भक्तिभाग्य प्रेमा साधीन' इति । श्रीतुकाराम समर्थी । बोलिलें ऐसें ॥३७॥

'आम्हां भोग[१५] मोक्षाचियेठायीं[१६] ।

*(१) हरीभजन (२) ब्रह्मस्थितीस (३) आघात (४) आग्रहानें (५) दडपले जाणे (६) खरोखर पाहतां (७) त्यांची हरिभक्ति कोणत्याहि उद्देशाने नसून भक्तिसाठींच त्यांची भक्ति असते, भक्ति हेंच भक्तीचे प्रयोजन (८) ब्रह्मस्वरूपी रममाण होणारे (९) अविद्याजन्य (१०) अविवेकरूपी गाठी (११) जिवंतपणीच (१२) अद्वैतस्वरूप झालेले (१३) कांही उद्देश न धरतां (१४) वामनाचें वचन (१५) दृष्ट परमानंदाकरितां म्हणजे प्रारब्धकालीं भोगल्या जाणाऱ्या विषयांचे ठिकाणीं विषयसुखाचा अनुभव न घेता ब्रह्मानंदाचा अनुभव येण्याकरितां (१६) साक्षीचा निर्गुण आनंद भोगण्याकरितां*

इये श्रीमूर्तिवांचोनि[१] नाहीं' । ही तातोक्ति[२] लवलाही । आणि ज्ञानी मद्भक्ति पावे ही कांतोक्ति[३] ॥३८॥

'यं सर्वे देवा नमन्ति मुमुक्षवो ब्रह्मवादिनश्च' ही श्रुति । 'मुक्ताऽपि[५]लीलया विग्रहं कृत्वा भजन्ति' ।

एवं नृसिंहतापनीयभाष्यांत वदती । श्रीमदाचार्य[६] ॥३९॥

एवं नाना प्रमाणेंकरून । मुक्तांचा स्वभाव भगवद्भजन । अन्य ना(कां)हीं प्रयोजन[७] । हें मधुसूदन बोलिलें ॥४०॥

॥ श्लोक ॥

'जीवन्मुक्तिदशायां[७]तु न भक्तेः फलकल्पना । अद्वेष्टृत्वादिवत्तेषां स्वभावो भजनं हरेः ॥१॥'

ओव्या - 'स्वयंफलरूपतेति[८]ब्रह्मकुमारः' इति निजसूत्रीं[९] नारदोक्ति[१०]।

एवं मुक्तांप्रति अवश्य भगवद्भक्ति । विशेष विस्तरें 'भक्तिपदतीर्थामृतीं' ।

श्रीमत्भगवद्गीतासंगति' 'निदिध्यासनप्रकाशादि' ग्रंथीं देखिजे ॥४१॥

*(१) श्रीकृष्णाच्या सगुण मूर्तीवांचून (२) श्रीज्ञानेश्वर महाराजांचें वचन (३) श्रीकृष्णाचे वचन (४) ज्याला सर्व देव, मुमुक्षु व ब्रह्मज्ञानी नमस्कार करितात (५) मुक्त पुरुष देखील लीलेने विद्याजन्य शुद्ध सत्वात्मक शरीर धारण करून श्रीहरीचे भजन करितात (६) श्रीमच्छंकराचार्य (७) जीवन्मुक्त दशेमध्ये कोणतेहि प्रयोजन किंवा फल शिल्लक राहत नाही म्हणून जीवन्मुक्त पुरुष जे सगुण परमेश्वराचे भजन करितात ते तें त्यांचें कोणत्याहि उद्देशाने नसते तर कोणाचाहि द्वेष वगैरे न करणे इत्यादि त्यांचा जसा स्वभाव बनून जातो, ते गुण कोणत्या उद्देशाने म्हणून त्यांचे ठिकाणीं राहत नाहींत त्याप्रमाणे श्रीहरीचें भजन करणे हा देखील ज्ञान्याचा स्वभावच असतो (८) आपणच आपले फल - म्हणजे भक्ति हेंच, भक्तीचे फल होय (९) आपण केलेल्या भक्ति सूत्रांत (१०) श्रीनारदाचे वचन.*

यालागीं श्रीहरिचरणीं । प्रीति वाहे श्रीशुकमुनी । हरिवांचोनि अंतःकरणीं । दुसरें नोहे ॥४२॥

'ब्रह्म हें भरलेंचि आहे । आदिमध्यावसानीं पाहे । हें होतां नवल काय । परि भक्ति साधिजे' ही रत्नाकरोक्ति[१] ॥४३॥

एवं श्रीभगवद्भजन । शुक जाहलियाही ब्रह्मसंपन्न । स्वभावेंचि श्रीहरीचे गुण । आवडती तया ॥४४॥

म्हणोनि श्रीमद्भागवत । पढला प्रेमें समस्त । ब्रह्मानंदें हरिगुण गात । नारदवत प्रेमभरें ॥४५॥

इतुकेनि आशंका संपूर्ण । निवर्तली आतां पूर्वानुसंधान[२] । (य३-९२)

जो तुम्हीं पुसिला होता प्रश्न । कीं परीक्षिज्जन्मकर्म[३] सांग पां ॥४६॥
तरी परिक्षिताचें जनन[४] । आणि पांडवांचें महाप्रस्थान[५] ।
तैसें परिक्षिताचें मोचन[६] । हें हरिकथासंगतिहेतु[७] म्हणोनि सांगतों ॥४७॥
कौरवपांडवांच्या संग्रामीं[८] । भीमगदेंकरोनि[९] कौरवस्वामी । दुर्योधन रणीं । पडलिया ॥४८॥
तदा पाहोनि बंधुदुःख[१०]। अश्वत्थामा धांवोनि नावेक[११]। द्रौपदीपुत्रादिकांची[१२]सकळिक । निद्रेमार्जीं तोडिलीं शिरें ॥४९॥
तीं नेवोनि दुर्योधनातें । दाखविलीं जेव्हां समस्तें । परी तें कृत्य तयातें । नावडते झालें ॥५०॥
तदा बोले दुर्योधन । या मुलांतें संहारून । हें अतिनिंद्य कर्म दारुण । दाविलें मातें ॥५१॥
माझें पांडवांचें वैर । परी आम्हां दोघांसही रक्षणीय कुमर । तुवां शिरें तोडोंनि परिकर । काय पुरुषार्थ पैं केला? ॥५२॥

*(१) रत्नाकराचे वचन (२) मागील कथेचा संदर्भ (३) परीक्षितीच्या जन्माची हकीकत (४) जन्म (५) स्वर्गाला जाणे (६) संरक्षण (७) श्रीहरीच्या कथेला असल्यामुळें, श्रीहरीचें गुणवर्णन होणार असल्यामुळे (८) युद्धांत (९) भीमाच्या गदाप्रहारानें (१०) भावाचे दुःख (११) लगेच (१२) द्रौपदीच्या सर्व मुलांची*

दुर्योधनाच्या व भीष्मद्रोणादिक यांच्या अंतःकरणांच्या ठायीं राक्षसांनी प्रवेश करून पांडवांशीं विरोध[१] केला होता. या प्रकारची भारताचे ठायीं कथा वर्णिली आहे. ते समस्त वीर रणामध्यें मरण पावल्यावर राक्षस आपल्या ठायीं निघूनं गेले. त्यानंतर ज्यांच्या त्यांच्या निर्वैर वृत्ति झाल्या. तद्वत् दुर्योधनाचाही राक्षसावेश निवर्तल्यावर[२] निर्वैर वृत्तीनें त्याचें अश्वत्थाम्याविषयीं असे उद्गार निघाले. यद्यपि हें अश्वत्थाम्याचें कर्म पाहून दुर्योधनाला आनंद वाटला, असें महाभारतांत सांगितलें आहे, तथापि तें दुर्योधननिरीक्षणकालानवच्छिन्न[३] राक्षसावेशनिविष्टकालींचें समजावें.

तूं जन्मलासी ब्राह्मणवंशीं । परी कैसा विलक्षण साहसी ।
मूलें मारोनि आणिल्या निशी । काय पुरुषार्थ पैं केला ॥५३॥
जो मूर्तिमंत कारुण्यखाणी[४] । तदीयत्वास्तव[५] तुजला द्रौणी ।
म्हणती, परी त्वां मुलें मारोनी । काय पुरुषार्थ पैं केला? ॥५४॥
वरी वैरी पांचही जण । ते सुखी आहेत सप्राण । आणि हीं परतंत्र[६] बाळें मारून । काय पुरुषार्थ पैं केला? ॥५५॥

*(१) वैर (२) नाहिंसा झाल्यावर (३) जेव्हां दुर्योधनानें द्रौपदीच्या मुलांची शिरें पाहिली नव्हती व जेव्हां दुर्योधनाच्या अंतःकरणांत प्रवेश केलेले राक्षस त्याच्या अंतःकरणांतून निघून गेले नव्हते त्या वेळचें ते वचन आहे (४) करुणेची खाण (५) त्याचा मुलगा म्हणून (६) ज्यांना स्वसंरक्षण करण्याचें सामर्थ्य नाहीं अशी.*

समोर नसतां धनंजय । आणि तो श्री यादवराय । नसतां त्वां हा रचोनि उपाय । पुरुषार्थ काय साधिला ॥५६॥
(य३-९३) ोरी आपुलिया सदनीं । करावी दुजियानें येउनी । ऐसी इच्छा चोराचियाही मनीं । नुपजे कदा ॥५७॥
तेंवी सुष्ट वा दुष्ट जनासी । गर्ह्य[१] कर्म न रुचे कवणासी । यालागीं नितिधर्मासी । अनुसरिजे ॥५८॥
निजमुलांचें ऐकोनि मरण । याज्ञसेनी तापसंपन्न[२] । तियेचें करावया सांत्वन[३] । बोले अर्जुन प्रतिज्ञा ॥५९॥
अहो हा असोनि ब्राह्मण । गर्ह्य कर्म करी दारुण[४] । जैं तयाचें शिर तोडीन । डोळे पुसीन तैं तुझे ॥६०॥
आततायी[५] घोरकर्मी[६] । याचें शिर छेदेन मी । बाण मारोनिया मर्मी । डोळे पुसीन तैं तुझे ॥६१॥
गांडीव धनुष्य चढवोन । तिखट[७] शरें[८] शिर छेदेन । त्यावरी तूं करिशील स्नान । डोळे पुसीन तैं तुझे ॥६२॥
तुझे पुत्र जाळिले जेणें । त्या मी जैं तिखट बाणें । जाळीन तैं निजकराने । पुसीन नयनें तव प्रिये ॥६३॥
एवं वदोनि पृथानंदन[९] । कृष्णासहित रथीं बैसोन । लक्षोनि द्रोणनंदन । कपिध्वज त्यावरी धांवला ॥६४॥
आला पाहोनि गांडीवपाणी[१०] । प्राणाची आशा धरोनी । तदा पळों लागला द्रौणी । कीर्ति त्यजोनी सकळही ॥६५॥
एवं अश्वत्थामा धांवतां । पाठी अर्जुनही धांवे तत्वतां । तदा आपणा कोणी नाहीं रक्षिता । ऐसें जाणिलें द्रोणसुतें ॥६६॥
मग सकळ अस्त्रांत शिरोमणी[११] । तें ब्रह्मास्त्र निजरक्षणीं[१२] ।
उफराटी[१३] गायत्री जपोनी । उपसंहार[१४] नेणोनी योजिलें ॥६७॥

*(१) निंद्य (२) दुःखी (३) समाधान (४) अत्यंत भयंकर (५) बेफाम झालेला, अत्यंत अविचारी (६) अत्यंत भयंकर कर्म करणारा (७) तीक्ष्ण (८) बाणाने (९) कुंतीचा मुलगा (१०) अर्जुन (११) श्रेष्ठ (१२) आपल्या बचावाकरितां (१३) उलट (१४) परत कसे घ्यावे हे ज्ञात नसतांना.*

**तयाचें तेज भयंकर । पाहोनिया गांडीवकर[१५] । होवोनि भयचकित[१] अंतर । श्रीकृष्णातें बोलत ॥६८॥**
**श्रीकृष्णा ! तूं महाभाग । भक्तांचा तूं अभयमार्ग[२] । संसारबद्धां[३] तूं अपवर्ग[४] । कैवल्यरूप ॥६९॥**
**तूं परमात्मा परमेश्वर । तूं निर्गुण प्रकृतिपर[५] । तूं आदिकारण[६] आणि निर्विकार । नवल असे ॥७०॥**
**तूं आपल्या चिच्छक्तीनीं[७] । मायेतें अभिभवोनी[८] । कर्मफळें मूढ जीवां लागोनी । देसी परी तूं अकर्ता ॥७१॥**

शिष्य :- भगवन् ! मायारहित परमात्मा मायेला वश[९] न होऊन मूढ जीवांस जशीं कर्मफळें[१०] देतो, तद्वत् मुक्तांनां देतां येतात किंवा नाहीं ? दुसरें असें कीं, परमेश्वराच्या[११] चिच्छक्तीनेंच जर मायेचा अभिभव होतो, तर तिची निवृत्तिच झाली पाहिजे. मग त्या परमात्म्यावर फलदातृत्व वास्तविकच[१२] आलें पाहिजें. (य३-९४)

श्रीगुरु :- अरे ! याचें उत्तर श्रवण कर. रज्जूचें[१३] ठिकाणीं सर्प तिन्ही[१४] काली जसा नसतो; तथापि भ्रांतीनें[१५] रज्जूवरच भासतो; परंतु आरोपित[१६]

*(१५) अर्जुन (१) भीतीनें स्तंभित (२) निर्भय वाट, भक्ताचे भय नाहिसे करणारा (३) संसारांत पडलेल्यांना (४) बंधन नाशक , मोक्ष दायक (५) प्रकृतीच्या पलीकडे (६) सर्व जगाचे मूळ कारण (७) चैतन्य शक्तीनें (८) नाश करून (९) मायेच्या परतंत्र (१०) कर्माची फळे (११) भगवंताचे ठिकाणी माया राहणे शक्यच नाहीं (१२) मायेवांचून शुद्ध परमात्माच कर्मांचे फळ देतो असे म्हणावे लागेल; फलदातृत्व मायिक ठरणार नाही तर शुद्ध स्वरूपाचा धर्म ठरेल (१३) दोरीचे दृष्टीनें पाहतां व भ्रमजन्य (१४) केव्हांहि भासतो तेव्हांहि, भासाच्यापूर्वी, भास नाहिंसा झाल्यावर (१५) भ्रमामुळे (१६) कल्पना केलेल्या.*

केलेल्या सर्पाचा रज्जूवर अभाव[१] असूनही रज्जू अज्ञात[२] असतां, सर्पाला साधक[३] होतो, बाधक[४] होत नाही; तद्वत् ब्रह्माचे ठायीं कालत्रयीं जरी जगत् नाहीं, तरी जीवाच्या भ्रांतीनें तें ब्रह्माचे ठायींच सिद्ध[५] आहे. आणि जोपर्यंत जीवांनां ब्रह्मज्ञान होत नाहीं, तोपर्यंत स्वतः नित्यमुक्तरूप[६] व आरोपित जगद्अभावरूप[७] असूनही ब्रह्म स्वाज्ञात[८] असतां सत्तारूप[९] सामान्यचेतनत्वानें जगताचें साधकच[१०] होते, बाधक[११] होत नाहीं. म्हणूनच स्वतः[१२] मुक्त[१३] राहूनही जीवदृष्टीनें[१४] कर्मफलदातृत्व त्यावर आरोपित होते. त्या ब्रह्मालाच दृष्टिसृष्टिवादांत[१५] ईश्वर म्हणतात, असें सिद्धांतबिंदूंत सांगितलें आहे. पण मुक्तांची गोष्ट तशी नाहीं. मुक्तांनां बंधकालीं[१६] बंध भासतो. आणि रज्जूच्या विशेष[१७] ज्ञानानें जशीं सर्पाची निवृत्ति[१८] होते, तद्वत् शुद्ध, बुद्ध, मुक्त इत्यादि ब्रह्माच्याही विशेष ज्ञानानें संसारनिवृत्ति होते. म्हणून जीव अज्ञानी[२०] असतां ते बद्ध आहेत, आणि ज्ञानी असतानां ते ब्रह्मरूप आहेत.

*(१) नसणेपणा, सर्प नसूनहि (२) दोरी आहे हे न कळल्यास (३) सर्प भासविण्यास कारण (४) सर्प न भासूं देणारी (५) भासते (६) अविद्याबंधरहित (७) शून्यरूप (८) आपण जाणले नसल्यास (९) केवळ अस्तित्वमात्र असणे हें जें ब्रह्माचें सामान्य चेतनस्वरूप, त्याच्या योगाने (१०) जगताचा भ्रम भासविण्यास कारण (११) जगत् न भासूं देण्यास कारण होत नाहीं (१२) ईश्वर स्वतः (१३) मायारहित (१४) ईश्वर जीवाच्या कर्माचे फळ देतो असा आरोप, जीव परमेश्वराच्या सत्तामात्र सामान्य चैतन्यावर करीत असतो (१५) ज्या वादांत पारमार्थिक (अविनाशी) व प्रातिभासिक (भासमात्र) असें दोन प्रकारचे अस्तित्व मानले आहे त्या वादांत (१६) जेव्हां ते बद्ध होते तेव्हां, ब्रह्मज्ञान होण्यापूर्वी (१७) फक्त दोरीच्याच ठिकाणीं राहणाऱ्या धर्मांसह दोरीच्या ज्ञानानें (१८) नाश (१९) संसार नाहिसा होतो (२०) म्हणजे जीव पहिले बद्ध असतो व नंतर मुक्त होतो, ईश्वररूप होतो.*

तथापि सर्व सृष्टीला मुक्तांचें सन्निहितत्व[१] कल्पणें शक्य नाहीं. कारण या कल्पांत ज्ञान ज्याला झालें आहे तो मुक्त झाला, परंतु पूर्व कल्पांत मुक्त नव्हता, हें सिद्ध आहे. परंतु ब्रह्म सर्वदांच नित्यमुक्त असून सामान्यचेतनत्वानें जगत्साधक असल्यानें सर्वदाच सन्निहित[२] आहे. म्हणून तेंच जगताचें निमित्तोपादान[३] होऊन कर्मफल देण्याला समर्थ आहे. आणि असन्निहितत्वामुळेंच[४] जरी ब्रह्म होतात, तरी मुक्तांनां सृष्टिकर्तृत्व[५] येत नाहीं. यथा, लवणकण[६] समुद्रांत टाकला असतां तो जलरूप होतो, तथापि तरंगाचें[७] कर्तृत्व त्या जलरूप झालेल्या लवणकणाकडे येत नाहीं, किंतु प्राक्सिद्ध[८] समुद्राकडेच येते. तद्वत् मुक्तही ब्रह्मांत मिळाले असतां, जगत्कर्तृत्वादिक नित्यसिद्ध[९] अशा ईश्वराकडेच राहतात. अशा प्रकारचा ईश्वर तूं आहेस, म्हणून मायामोहित[१०] अशा जीवांनां कर्मफलें तूं स्वपराक्रमानेंच देतोस. यावरून ईश्वरच फलदाता व श्रेष्ठ आहे, हें सिद्ध होतें.

शिष्य :- महाराज ! कर्माप्रमाणेंच फल होत असल्यानें किंवा ईश्वर देत असल्यानें ईश्वराच्या ठिकाणीं श्रेष्ठत्व कोणतें आहे? (य३-९५)

श्रीगुरु :- ऐक. कर्मे स्वतः फळें देऊं शकत नाहींत. कारण, तीं जड आहेत. दुसरें, एक वर्षी यज्ञ करून हजारों वर्षेपर्यंत स्वर्गामध्यें फळ मिळणें,

*(१) आश्रयत्व, मुक्त पुरुष सर्व जगाला आश्रय होऊं शकत नाही किंवा तो अंतर्यामी होऊं शकत नाहीं (२) आश्रयभूत (३) निमित्तकारण व उपादानकारण (४) सर्व जगताला आश्रयभूत नसल्यामुळे (५) सृष्टि करण्याचे स्वतंत्र सामर्थ्य (६) मिठाचा खडा (७) तरंग किंवा लहरी उत्पन्न करण्याचे सामर्थ्य (८) मूळच्या (९) मूळच्या (१०) मायेने मोह पावलेल्या.*

यांत ईश्वराच्या पराक्रमाशिवाय कर्माकडून स्वतः झालेली योजना दिसत नाहीं. म्हणून ईश्वरच सर्व कांहीं दाता आहे. किंतु नैर्घृण्यवैषम्यदोष[१] येऊं नयेत, म्हणून मात्र जीवकर्माची अपेक्षा[२] ठेविली आहे, तथापि आपण कधींही कर्मपरतंत्र[३] होत नाहीं.

**आणि तेंवी तुझा हा अवतार । साधुरक्षणार्थ परिकर । म्हणोनी तुझे ठायीं साचार । विप्रलिप्सादि[४] दोष नसती ॥७२॥**

**एऱ्हवीं साधूंचें रक्षण । हें तों आपेक्षिक[५] प्रयोजन । कारण तें तंव इच्छामात्रेंकरून[६] । होवों शके ॥७३॥**

**जो तूं जन्माआधीं[७]दुग्धनिर्मिता[८]। त्या तुज साधुरक्षणें भगवंता । अवतार घेणेंलागे म्हणतां । हास्य चित्ता येतसें ॥७४॥**

**यालागीं तुझ्या अवताराचें । मुख्य प्रयोजन एक साचें । कीं अनन्य एकांतभक्तांचें[९] । वाढवावें प्रेम ॥७५॥**

**तथापि सहजचि येणें । होय दीनांचें उद्धरणें । मीही भयचकित[१०] मनें । दीनचि आहे ॥७६॥**

**यालागीं पुसतों तुज । हें येतसें भयंकर तेज । वाटे कीं जें सहज जाळील ब्रह्मांड ॥७७॥**

*(१) निर्दय व विषम वागणुकीचा (२) जरूरी (३) कर्माच्या स्वाधीन (४) फसवणूक इत्यादि (५) गौण, आनुषंगिक, मुख्य प्रयोजनाबरोबर सिद्ध होणारे (६) नुसत्या संकल्पानेहि , त्याच्या करिता अवतारच घेतला पाहिजे असे नाही (७) जन्मण्यापूर्वी (८) आईच्या स्तनांत दूध निर्माण करणारा (९) एकनिष्ठ (१०) अश्वत्थाम्याचे ब्रह्मास्त्रामुळे भयभीत झालो म्हणून*

**तें काय इंद्राचें वज्र । किंवा उतरला सहस्रकर[१] । किंवा कवणाचें आहे अस्त्र । येवढें उत्तर सांग प्रभो ! ॥७८॥**

**तदा बोलिले कमलकर[२] । पार्था ! हें अश्वत्थाम्याचें ब्रह्मास्त्र ।**
**याचें निवारण नव्हे अन्यत्र[३] । यालागीं ब्रह्मास्त्र तूंहि योजी ॥७९॥**

**ऐसें ऐकूनि अर्जुन । तत्काळ करोनी आचमन । प्रतिलोम[४] वेदजननी[५] जपोन । ब्रह्मास्त्र सोडिलें तेंधवा ॥८०॥**

**ती दोन्हीं अस्त्रें मिळालीं प्रबळ । तेणें निघाला तेजकल्लोळ[६] ।**
**जळों पाहे ब्रह्मांडमंडळ । जणूं प्रलयकाळ वर्तला[७] ॥८१॥**

**तदा प्रजानाशसमय[८] । पाहोनिया धनंजय । आणि श्रीकृष्णाचें ही जाणोनि हृदय । अस्त्रद्वय[९] उपसंहरी[१०] ॥८२॥**

**मग कोपोनि पार्थवीरू । तत्काळ बांधिला द्रोणकुमरू । शिबिरा न्यावा तंव शार्ङ्गधरू । अर्जुनातें बोलिला ॥८३॥**

**अरे ! येणें निद्रेंत वधिलें सुत । म्हणोनि तूंही करी याचा घात ।**
**मारतियालागीं[११] जो मारत । पुण्य न होत, ना पाप त्यातें ॥८४॥**

(य३-९६) यद्यपि मद्यपान[१२] केलेला, असावध, उद्योगरहित, ग्रहपीडादिकांनी[१३] बुद्धिभ्रष्ट आणि शरण आलेला व विरथ[१४] अशा शत्रूला धर्मवेत्ते[१५] मारीत नाहींत, तथापि दुसऱ्याचे प्राण घेऊन जो आपले प्राण पुष्ट करितो, त्याला मारणें हें उचित आहे. कारण त्याला मारलें असतांच त्याच्या पापांचें प्रायाश्चित होऊन तो स्वर्गाला जातो. आणि त्याला दंड झाला नाहीं तर तो नरकांत पडतो, अशी स्मृतीही आहे.

*(१) सूर्य (२) श्रीकृष्ण (३) दुसऱ्या अस्त्रानें (४) उलटी (५) गायत्री (६) तेजाचा डोंबाळा (७) पातला (८) सर्व प्रजेचा संहार होणार अशी स्थिति (९) दोन्ही अस्त्रें (१०) परत घेतली (११) मारणाऱ्याला (१२) दारु प्यालेला (१३) नवग्रहापैकीं एकाद्या ग्रहाची पीडा होऊन ज्याची बुद्धि चळली आहे (१४) रथ नाहिसा झालेला (१५) धर्मयुद्ध जाणणारे.*

**'राजभिर्धृतदंडास्तु कृत्वा पापानि मानवाः । विधूतकल्मषा यान्ति स्वर्गं सुकृतिनो यथा ॥१॥'**

स्मृत्यर्थ :- मानवांनीं[१] पाप केलें असतांही राजाकडून दंड धारण[२] केला असतां पुण्यवंताप्रमाणें ते मनुष्य स्वर्गाला जातात.

शिष्य :- महाराज ! माझी येथें एक शंका आहे. राजानें अपराधाची क्षमा करावी कीं नाही; कारण, अपराधांची क्षमा केली असतां सर्व पातकांचें क्षालन होणार नाहीं.

श्रीगुरु :- ह्या शंकेचें उत्तर देतों, तें ऐक. निवृत्तिनिष्ठांचें[३] ठिकाणीं जशी क्षमा विधीनें[४] सांगितली आहे, तशी

राजाचें ठिकाणीं सांगितलीं नाहीं. राजाचें ठिकाणीं जी क्षमा सांगितली आहे, ती मनुष्याचें ठिकाणीं चूक होण्याचा संभव असल्यामुळें कदाचित् डोळा चुकून न्याय यथार्थ[५] न झाला तर निरपराधीं पुरुषाला शिक्षा होऊं नयें, म्हणून सांगितली आहे. न्यून[६] पाप केल्यानें अधिक पाप होण्याचें जर टळत असेल, तर न्यून पापच करावें, पण अधिक पाप होऊं देऊ नयें, असें आत्मपुरापणांत सांगितलें आहे. म्हणून अपराधी सुटणें जरी पाप आहे, तरी निरपराधी मरणें त्याहून अधिक पाप आहे. अतः[७], राजानें क्षमेचें अवलंबन[८] करावें. तथापि त्यांत हा विशेष आहे. सर्वज्ञमुनींनीं[९] सांगून

*(१) मनुष्यानीं (२) भोगला (३) मोक्ष प्राप्तीकरितां प्रयत्न करणाऱ्यांचे (४) क्षमा धारण करावी अशी आज्ञा (५) खरा (६) कमी (७) म्हणून (८) क्षमा धरावी (९) मनु इत्यादि सर्वज्ञ अशा स्मृतिकारानीं.*

ठेविलेल्या स्मृतीप्रमाणेंच[१] न्याय करावा. आपल्या स्वतःचे नियम (कायदे) करून न्याय करूं नये. परंतु आपत्कालीं दंड[२] वर्ज्य करून बाकीच्या राजव्यवस्थेत स्वतःचे नियम करण्यास प्रत्यवाय नाहीं. दंड नियम मात्र सर्वथाच श्रुतीवर अवलंबून ठेवावेत. कारण, यमदंड[३] प्रत्यक्ष पाहून आपल्या दयाळूपणानें उपयोगी पडतील तेवढे यमपुरींतील (य३-९७) नियमच स्मृतींत प्रायश्चित्तार्थ[४] घेतले आहेत. म्हणून स्मृतीप्रमाणें बरोबर प्रायश्चित्त[५] झालें असतां यमाकडे न जाऊन तो बरोबर स्वर्गास जातो. यद्यपि एकाच पापाचीं निरनिराळ्या स्मृतींत निरनिराळीं प्रायश्चित्तें आहेत, व तसेच निरनिराळे दंडही आहेत खरें; परंतु तेथें पश्चात्तापाचें[६] व वृत्तीचें[७] बलाबल पाहून श्रुत्यनुकूल स्मृत्युक्त[८] दंड करावा. (हें नृपनीतिविवेचन किंचित् मी आपल्या बुद्धीनें केलें असल्यामुळें प्रमाद असल्यास ते माझेच समजावेत.) म्हणून निद्रेंत बाळांचा घात करणाऱ्या अश्वत्थाम्याला तूं मारून टाक. हें ह्यानें फारच गर्ह्य कर्म केलें आहे. आतां तें स्वामीसंतोषासाठीं[९] केलें म्हणावें, तर ह्याचें निंद्य कर्म त्या दुर्योधनालाही शेवटी आवडलें नाहीं; आणि त्वां द्रौपदीजवळ प्रतिज्ञाही केली आहे.''

यात्रमाणें अर्जुनाच्या परीक्षेकरितां[१०] भगवान बोलिले असतांही अश्वत्थामा गुरुपुत्र व ब्राह्मण असल्यामुळें, त्याला अर्जुनानें मारलें नाहीं. यद्यपि, गीतेवरून आततायींनां मारणें हा धर्म आहे, असें त्याला समजलें होतें, तथापि त्यानें असा विचार केला कीं,

*(१) स्मृतीत सांगितलेल्या पद्धतीने व शिक्षेने (२) शिक्षा नियम सोडून (३) यमलोकांत जे शासन केले जाते ते (४) केलेल्या पापाच्या नाशाकरिता (५) पापाबद्दल दंड, शासन (६) पाप करणाऱ्याला ज्या मानाने पापाबद्दल पश्चाताप होईल त्या मानाने (७) पाप करतांना पाप करणाऱ्यांची मनोवृत्ति ज्या मानाने दोषी असेल त्यामानाने (८) श्रुतीला विरोधी नाही असा स्मृतीत सांगितलेला (९) आपल्या धन्याच्या - दुर्योधनाच्या समाधानाकरिता (१०) धर्मनिष्ठेची परीक्षा पाहण्याकरता*

**'सुखदुःखे समे कृत्वा लाभालाभौ जयाऽजयौ । ततो युद्धाय युज्यस्व नैवं पापम् अवाप्स्यसि' ॥१॥ गीता.२.३८**

याप्रमाणें मला देवानें सांगितले होतें. परंतु येथें तद्वत् स्थिति नाहीं. कारण, याला स्वतःला कोणी त्राता नसून, येथें आमचाच खात्रीनें जय होणार आहे. अशा दुर्बलावर शस्त्र धरल्यानें सुखदुःखसमबुद्धि राहत नाहीं. पुनः, मी याचा शोकापन्न[१] होऊन जर वध केला, तर तो मोहानेंच होईल; धर्मानें होणार नाहीं. म्हणून ह्याला मारणें योग्य नाहीं. – याप्रमाणें विचार करून त्याला घेऊन शिबिरास आल्यावर द्रौपदीपुढें आणलें तेव्हां ती शोक करीत होत्सातीही साध्वी म्हणाली, 'अहो! याला सोडा. हा गुरुपुत्र आहे. ज्या द्रोणाचार्यापासून तुह्मीं अस्त्रसमूह[२] धारण केला, तेच हे द्रोणाचार्य अश्वत्थामा झाले आहेत. कारण, **'आत्मा वै पुत्रनामासि'** अशी श्रुतिही आहे. शिवाय, त्या द्रोणाचार्याची स्त्री कृपीही जिवंत आहे. (य३-९८) म्हणून मी ज्याप्रमाणें पुत्रशोकविव्हल[३] आहे, तशी ती न होवो. शिवाय गुरूचें कुळ सर्वदां तुह्मांस रक्षणीय आहे. अजितेंद्रिय[४] राजानें ब्राह्मणाचें कुळास धक्का पोचविला असतां, तें शोकाकुल ब्रह्मकुल राजकुलास,

*(१) मारले गेलेल्या पुत्रांच्या शोकाने संतप्त होऊन (२) नानाप्रकारची अस्त्रविद्या (३) पुत्राच्या शोकाने व्याकुळ (४) ज्याने इंद्रिये जिंकिली नाही, इंद्रियलोलुप.*

अनल[१] ज्याप्रमाणें क्षणांत तृण[२] दहन करतो, तद्वत् दहन करितें. म्हणून त्याला सोडा.' असें बोलून द्रौपदीनें अश्वत्थाम्याला नमस्कार केला.

सूत म्हणाले, याप्रमाणें तिचें तें धर्माला व न्यायाला अनुसरलेलें भाषण ऐकून श्रीकृष्णादिकांनीं तिची प्रशंसा केली.

तेव्हां भीम म्हणाला, 'अहो ! हें काय ? ह्या ब्रह्मणाधमानें निद्रेंत बाळांचा वध केला असल्यामुळें याचा वध करणेंच उचित आहे'.

एवं भीमानें वधाविषयीं अर्जुनाला प्रवर्तविणें[३] व द्रौपदीचें निवारण करणें पाहून, भगवान म्हणाले 'अर्जुना,

**'वपनं द्रविणादानं स्थानान्निर्यापणं तथा । एषहि ब्रह्मबंधूनां वधो नान्योऽस्ति दैहिकः ॥५७-७-१॥**

अर्थ :- केश काढणें, द्रव्य घेणें आणि स्वस्थानांतून काढून देणें, हाच ब्राह्मणाधमाचा वध होय. त्याचा प्राण घेणें सांगितलें नाहीं.

याप्रमाणें सर्वशास्त्र करणाऱ्या माझीच आज्ञा आहे. व,

**'आततायिनमायान्तमपिवेदान्तपारगम् । जिघांसन्तं जिघांसीयात्र तेन ब्रह्महा भवेत् ॥१॥**

अर्थ :- हातांत शस्त्र घेऊन मारावयास आलेला वेदांतपारंगत जरी असला, तरी त्याला मारलें असतां ब्रह्महत्येचें पातक लागत नाहीं, अशी ही

*(१) अग्नि (२) गवत (३) तयार करणे*

स्मृतिरूपानें माझीच आज्ञा आहे. एवं दोन्ही माझ्याच आज्ञा असल्यामुळें दोन्ही तूं पालन कर. सारांश, तूं आपली द्रौपदीजवळ केलेली प्रतिज्ञा ज्या रीतीनें सत्य होईल, व तसेंच भीमादिकांचें आणि माझें प्रिय[१] होईल, असें कर'.

याप्रमाणें श्रीकृष्णाचें भाषण ऐकून अर्जुनानें अश्वत्थाम्याचें केश व शिरावरील मणी काढून घेऊन, तेजोहीन अशा त्याला घरांतून निष्कासिलें[२]; व नंतर ते सर्व पांडव शोकार्त द्रौपदीसह मृतबालांचें और्ध्वदैहिक[३] करिते झाले.(य३-९९)

**॥ दोहा ॥**

**भाव[४] धरुनि अत्यंत मनीं अलकावतिपतिपाय[५] । चिंतुनि श्रोतीं ऐकिजे भगवद्भक्तिउपाय[६] ॥८५॥**

**हरिः ॐ तत्सत् श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरकृपाप्रसादे गद्यपद्यान्विते नानाछंदबद्धे प्रियलीलामहोत्सवे आमंत्रणविलासे द्रौणीनिग्रहो नाम सप्तमसखीप्रेषणम् ।**

**॥ श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ॥**

*(१) माझ्या मनाजोगे (२) काढून दिले (३) उत्तरक्रिया (४) श्रद्धा, आदर, प्रेम (५) श्रीज्ञानेश्वर महाराजांचे चरण (६) भगवंताचे प्रेम उत्पन्न होण्याचे साधन*

*०००*

## सखीप्रेषण ८ वें. विषयानुक्रम

***कुंतीकृत स्तुती व युधिष्ठिराचा अनुताप वर्णन. (पृष्ठ १००-११८)***

*मंगलाचरण. अष्टम प्रेषणांतील विषयांचें संक्षेपेंकरून कथन १००. धृतराष्ट्र व गांधारी आदिकरून स्त्रियांसह श्रीकृष्णाला बरोबर घेऊन (य३-१२) पांडवांचें गंगातीरीं गमन व मृतांस जल देऊन शोकाकुलित होणें. ऋषींसहवर्तमान श्रीकृष्णांनीं त्यांचें केलेलें सांत्वन. असत् नृपांचा घात, युधिष्ठिराचें राज्य परत देवविणें आदिकरून कृत्यें संपादून द्वारकेला जाण्याकरितां श्रीकृष्णाचें रथारूढ होणें १०१. श्रीकृष्णानें उत्तरा भयाभीत होऊन धांवत आलेली पाहून आपल्या सुदर्शनानें तिचें, तिच्या गर्भाचें व पांडवांचें अश्वत्थाम्याच्या ब्रह्मास्त्रापासून रक्षण करणें १०२. श्रीकृष्णाला राहविण्याकरितां स्तवार्थ कुंतीचें उद्युक्त होणें. सूतानें शौनकादिकांनां सांगितलेलें ज्ञान करून घेण्याचे दोन प्रकार, त्यांतील दुसऱ्या प्रकारचें वैशेष्य व त्याचें कुंतीनें केलेलें अवलंबन. मूर्त्यूपहित श्रीकृष्णाची स्तुती करणें कनिष्ठ असून तिजपासून कुंतीला ज्ञातर ज्ञान कसें झालें? या शिष्यप्रश्नाचें ईश्वराचीं पांचरूपें निरूपणपूर्वक उत्तर. (याविषयीं विशेष निरूपण २५-२६ पृष्ठावर पहावें) १०२. पांचवे रूप (हरिहरत्व) शुद्धाचे ठिकाणीं प्रीतियोगानें होतें असें म्हणण्याचें चारी मूर्तींचे ठिकाणीं जरी भूमिरूप बह्माचाच आनंद आहे तथापि त्याची परम व्यक्तता या फलोपम हरिहर पुरुषांत आहे - हें कारण १०३. शुद्धाचें ठिकाणीं तिन्ही कालीं सर्वांचाच अभाव असल्यामुळें शबलादि चारी रूपें जीवकल्पितच असलीं पाहिजेत अशी शंका व त्या रूपांचें विवर्तत्वनिरूपणपूर्वक उत्तर १०२. श्रीकृष्णशरीराची सप्रमाण नित्यता व प्रतिबिंबवाद आणि आभासवाद यांतील भेदकथनपूर्वक दृष्टिसृष्टिवादानुसार शबलादि तीन रूपांचें जीवमय अध्यस्तविवर्तत्व व हरिहररूपाचें अनध्यस्तविवर्तत्वनिरूपण १०४ 'नारायण कल्पांतरीं नाश पावतो' या महाभारतांतील वचनावर शंका व तिचें समाधान १०४. 'अशा प्रकारचें जें शुद्ध ब्रह्म त्याला जाणून तेंच हें अनध्यस्तविवर्त कृष्णरूप आहे म्हणून त्याची स्तुती करून कुंतीनें ज्ञान करून घेतलें' या वाक्याचा अर्थ सुवर्णालंकारदृष्टांतानें व श्रीतात,नाथ वचनप्रामाण्यानें सम्यक शिष्यबुद्धिस्थ करून देणें १०५. कुंतीस्तुती :- 'तूं आदि पुरुष शुद्ध साचार । तूं ईश्वर प्रकृतिपर । सर्वभूतां सबाह्यांतर । व्यापूनि असती ॥' या ओवीच्या अर्थाचें दृष्टिसृष्ट्यन्वयें विवेचन १०६. (य३-१३)*

*भगवंताच्या अनध्यस्तस्वरूपाचें व अचिंत्य गुणांचें स्तवन. कृष्ण व वासुदेव नामांची व्युत्पत्ति व त्यांचें सगुणनिर्गुणत्व १०६-१०७ श्रीकृष्णाच्या नाना उपकारांचे वर्णन १०७. स्वतःचें अनन्यगतिकत्व वर्णन १०८. भक्तिहीन उत्तमजन्म व ब्राह्मण शरीराचें वैय्यर्थ्य कथन. धनदुर्मदांधवर्णन १०८. धनत्यागप्रसंशा १०९. निर्धन पुरुषाची भक्तीला पात्रता ११०. भगवंताची नित्यतृप्तता, प्रेमवशता, भक्तवात्सल्य, व त्याचे काल, ईशान, व अनादि अनंत स्वरूप ११०. भगवंताचें समत्व १११ कुंतीवचनावरून निघणारें कृष्णावताराचें मुख्य प्रयोजन व श्रीकृष्णाचें अकर्तृत्वकथन. भगवच्चारित्राचा अगाधपणा १११ श्रीकृष्णावतारप्रयोजनाविषयीं मतांतरें ११२. ब्रह्मनिष्ठांच्या मतानुसार श्रीकृष्णवताराचें प्रयोजन न नित्य वर्तमानता ११३ इतर मतांहून ब्रह्मनिष्ठांच्या मताचें परमप्रामाण्य. श्रीकृष्णगुणगायनवर्णनचिंतनानें भगवत्पदाची प्राप्ती. श्रीकृष्णाला राहण्याविषयीं कुंतीची सकारण विनंती ११३ सृष्टीची श्रीकृष्णैकोपजीविता ११४ श्रीकृष्णगमनानें पांडवांचें अकल्याण व राहण्यानें यादवांनां उद्वेग होणार हें पाहून अति व्याकुल चित्त झालेल्या कुंतीनें श्रीकृष्णाच्या निर्गुणस्वरूपाचें व हरिहरात्मक सगुणस्वरूपाचें केलेलें स्तवन व अन्यन्यभक्तीचें याचन ११४-११५ याप्रमाणें कुंतीनें स्तुती केली असतां भगवंतानें मंदस्मित करून दिलेला प्रसाद व गजपुरांत प्रवेश ११६. तेथें कांहीं दिवस राहून सुभद्रादि स्त्रियांस पुसून पुन्हा द्वारकेस जाण्याकरितां निघाले असतां पांडवांचा आकांत व त्यांच्या विनंतीवरून देवांचें तेथें आणखी कांहीं दिवस राहणें. व्यासादि मुनी व श्रीकृष्ण यांनीं अनेक प्रकारें बोध केला असतांही धर्माचा शोक निवृत्त कां झाला नाहीं या शंकेचें समाधान ११६. श्रीकृष्णाचा अभिप्राय व्यासादिकांनां समजला नाहीं या श्रीधराचार्यांच्या म्हणण्याचा भारतवचनाशीं विरोध ११७. कौरवादि गोत्रजांच्या वधाविषयीं युधिष्ठिराचा शोकवर्णन. उपसंहार ११७ (य३-१४)*

०००

॥श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरमाउली समर्थ ॥

# सखीप्रेषण ८ वें

## कुंतिकृत श्रीकृष्णस्तुति व युधिष्ठिराचे अनुतापकथन

॥ श्लोक ॥

गाढानुरागिणौ[१]सिद्धौ साक्षाद् ब्रह्मस्वरूपिणौ । उमेशौ पितरौ वन्दे भक्त्या परमया मुदा ॥१॥

॥ दोहा ॥

झालियाहि चितिनिष्ठ[२] घडो गुरुचरणांची प्रीत[३] । ऐशी भक्ति अखंड ही सत्पुरुषांची रीत[४] ॥२॥

॥ ओव्या ॥

आतां अष्टम प्रेषणीं[५]। कुपित[६]जाहला असतां द्रौणीं[७]।
परीक्षिद्रक्षण[८] तदस्त्रापासुनी[९] । श्रीकृष्णें केलें पराक्रमें[१०]॥३॥

तदा कुंतीनें स्तविला देव । आणि युधिष्ठिराचा शोकभाव[११]। र्णिला असे स्वयमेव । येथ अवधान द्याहो चतुरश्रोते ॥४॥

*(१) अनादि सिद्ध, परस्परांना परस्परांचे अत्यंत प्रेम असलेले साक्षात् पूर्णपरब्रह्मस्वरूप, अशा उमा व सदाशिव या आईबापांना अत्यंत प्रेमाने नमस्कार करितो (२) ब्रह्मनिष्ठ, ज्ञानी (३) भक्ति (४) वर्तणूक, मार्ग (५) आठव्या सखीला पाठविण्यांत (६) क्रुद्ध (७) अश्वत्थामा (८) परीक्षितीचे संरक्षण (९) अश्वत्थाम्याच्या ब्रह्मास्त्रापासून (१०) आपल्या सामर्थ्याने (११) दुःख*

॥ गीति ॥

ते पांडव वनितासह[१] श्रीरंगालाहि[२] घेउनी संगें[३] । द्याया उदक[४] मृतांना सकलहि तैं पातले महागंगें[५] ॥५॥
देउनि पाणि मृतांना नयनीं संप्राप्तपाणि[६]लापानें[७]। करिती स्नान त्या जळीं चिंतनेंचि[८]जे प्रताप[९]पापा[१०] नें[११] ॥६॥

॥ संस्कृत गद्य ॥

तत्र[१२] धृतराष्ट्रं गांधारीं द्रौपदीं पृथां भीमादिसहितं युधिष्ठिरं च ऋषिभिःसह कृष्णः 'अहो भूतेषु कालस्य विचित्रा गतिः कालोहि दुरतिक्रमः' इति वदन् सान्त्वयामास । (य३-१००)

ततो ऽसतो[१३] नृपान् घातयित्वा युधिष्ठिरस्य राज्यं संसाध्य त्रिभिरश्वमेधैर्धर्मराजं याजयित्वा यशः शतक्रतुरिव दिक्षुविस्तार्य

पांडवानां मंत्र्योद्धव-सात्यकियुतो द्वैपायनादिभिः पूजितश्च भगवान् श्रीकृष्णो द्वारकां (स्वीयां पुरीं ) गन्तुं रथमारुरोह ॥

॥ श्लोक ॥

तदा उत्तरा[१४] धांवुनी देवराया[१५] । करी प्रार्थना वाहुनी शीर पाया ॥
म्हणे त्राहि[१६] धांवे सख्या पूतनारी । तुझ्यावांचुनी कोण दुःखें निवारी ॥७॥

*(१) स्त्रियांसह (२) श्रीकृष्णाला (३) बरोबर (४) तिलांजलि (५) भागीरथीचे कांठी (६) डोळ्यांत अश्रु आलेले (७) शोकाने (८) स्मरण केल्याने (९) ताप, त्रिविध दुःख (१०) पातके (११) नाहिसे करिते (१२) नंतर तेथे ऋषि सहवर्तमान श्रीकृष्णाने, प्राणीमात्राचे ठिकाणी काळाची विचित्र गति आहे, कालाचे उल्लंघन कोणी करूं शकत नाही, असा धृतराष्ट्र, गांधारी, द्रौपदी, कुंती व भीमादिक भावासह युधिष्ठिराला उपदेश करून त्या सर्वांचे सांत्वन केले (१३) नंतर (१४) अभिमन्यूची स्त्री (१५) श्रीकृष्णाला (१६) रक्षण कर.*

लोकीं जे जे पदार्थ । ते परस्पर मृत्युमंत[१] । यालागीं निर्भय[२] तूं भगवंत । ऐसा सिद्धांत मम मतें ॥८॥
देवा ! माझिया अंगावर । तप्त[३] लोहासम[४] शर[५] । येतसे तो माझें शरीर । जाळो कां सुखें ॥९॥
परी आंधळियाची काठी । तेंवी मज एकुलता गर्भ पोटीं । तयाचें पतन[६] जगजेठी । न होय ऐसें करी कां ॥१०॥

॥ अभंग ॥

उत्तरेचें ऐसें करुणावचन[७] । ऐकिलें संपूर्ण देवरायें ॥१॥
जाणिलें कीं द्रोणसुताचें[८] हें कर्म । नाशार्थ[९] परम पांडवांच्या ॥२॥
पांडवही तदा दिव्य पांच शर । पाहती समोर येतसाते[१०] ॥३॥
निवारावया तें संप्राप्त[११] संकष्ट[१२] । निजअस्त्रें[१३] स्पष्ट प्रयोजीलीं ॥४॥
परी ब्रह्मास्त्राचें अन्यास्त्रेंकरून[१५] । नोहे निवारण कदाकाळीं ॥५॥
ऐसें जाणोनियां तदा नारायणें । जो स्वभक्तउणें[१६] पडो नेदी ॥६॥
सुदर्शनें केलें ब्रह्मास्त्रवारण । सर्व नारायण व्यापक जो ॥७॥

*(१) एकमेकापासून नाश पावणारे (२) अविनाशी (३) तापलेल्या (४) लोखंडाप्रमाणे (५) बाण (६) गर्भपात (७) दीनतेचे बोलणे (८) अश्वत्थाम्याचे (९) संहार करण्याकरिता (१०) येत असलेले (११) येऊन पडलेले (१२) विघ्न, अरिष्ट (१३) आपल्याला माहित असलेली अस्त्रें (१४) धनुष्याचे ठिकाणी लाविली (१५) कोणत्याहि दुसऱ्या अस्त्राने (१६) आपल्या भक्ताचे कमी.*

मायागुणें तेणें आवरिला गर्भ । वंशही सुप्रभ[१] वाढवीला ॥८॥
जरी तें ब्रह्मास्त्र अमोघ[२] अनंत । विष्णुतेजें[३] शांत परी झालें ॥९॥
नव्हें हें आश्चर्य कदा नारायणीं । सर्वाश्चर्य[४] मुनी म्हणती ज्या ॥१०॥
सकळां[५]अंतरी सकळांनिराळा[६] । तेथ काय कळा[७] आश्चर्याची ॥११॥
मायेनें जो जग करी पाळी नाशी । तया कासयासी नवलावो[८] ॥१२॥
ज्ञानेश्वरप्रभु होतां कृपावंत । तैं ये भगवंत हृदयींच ॥१३॥११॥

॥ ओव्या ॥

द्रौपदीसहित निजनंदन[९] । मुक्त[१०] ब्रह्मास्त्रापासोन । जयाचिया कृपें करून । सहज झालें ॥१२॥ (य३१०१)
तया श्रीकृष्णातें प्रयाणसमयीं[११] । कर जोडोनि लवलाही । सप्रेमें पांडवआई[१२]। स्तविती झाली ॥१३॥

॥ गद्य ॥

सूत म्हणतात, हे शौनकादिकहो ! ज्ञान करून घेण्याचे दोन प्रकार[१३] आहेत. (१) एक तर 'त्वंपदविवेक'[१४] करून देहादिकांहून[१५] आपल्याला भिन्न[१६] मानून घेणें, हा पहिला प्रकार;

*(१) उत्तमप्रकारे, प्रभावशाली (२) व्यर्थ न जाणारे (३) सुदर्शनाचे तेजाने (४) ज्या भगवंताची कोणतीहि करणी आश्चर्यकारक असते (५) सर्वांच्या अंतर्यामी (६) सर्वांहून वेगळा (७) गोष्ट (८) आश्चर्य (९) धर्मराजादिक आपली मुलें (१०) वाचले (११) द्वारकेस जाण्याकरिता निघतेवेळी (१२) कुंती (१३) मार्ग (१४) जीवाचा निराळेपणा (१५) देह, इंद्रिये, मन, प्राण, बुद्धि, अहंकार ह्याहून (१६) निराळे.*

किंवा (२) 'तत्पदविवेक'[१] करून परमेश्वराचे गुण वर्णन करितां करितां भावना[२] एकत्रीभूत होत्साता अतिशय

निरभिमानी होऊन, जीव व परमेश्वर एकच आहे, या स्थितीला प्राप्त होणें, हा दुसरा प्रकार. यथा –

॥ श्लोक ॥

**'देहबुद्ध्या तु दासोऽहं जीवबुद्ध्या त्वदंशकः । आत्मबुद्ध्या त्वमेवाहमिति मे निश्चला मतिः ॥१॥'**

अर्थ :- हे देवा ! देह बुद्धीनें मी तुझा दास, जीवबुद्धीनें अंश, आणि आत्मबुद्धीनें तूं व मी एकच आहोंत, असा माझा पूर्ण विश्वास आहे.

परंतु त्यांतही हा विशेष[३] आहे. विहिरींतील पाणी शुद्ध ठेवावयाचें असलें तर सौंदणींतील[४] पाणी किंवा आणखी कांहीं, त्या विहिरींत जाऊं न दिलें पाहिजे. परंतु गंगेची गोष्ट तशी नाहीं. गंगेत ओढे, नाले, मोऱ्या, ज्या जाऊन मिळतात, त्या गंगारूपच होतात. तद्वत् महावाक्यास शुद्ध ठेवावयाचें असलें तर त्याच्याकरितां प्राज्ञ[५] ब्रह्मणवर्गही शुद्ध[६] ठेवावा लागतो. म्हणूनच तदनधिकारी[७] स्त्रीशूद्रास त्या वेदरूप महावाक्याच अधिकार[८] नाहीं.

*(१) ईश्वर, ब्रह्मांडाचा आधार जो परमात्मा त्याला ब्रह्मांडाहून निराळा पाहणे (२) भावनेशी एकरूप होऊन (३) अधिकपणा, आधिक्य (४) धोब्याच्या भांड्यांतील सांडपाणी (५) बुद्धिमान् (६) सदाचारसंपन्न (७) अधिकार नसलेला, सदाचारास अधिकारी किंवा योग्य नसलेला (८) योग्यता*

- परंतु परमेश्वराचें ठिकाणीं मन स्थापन[१] करून निरभिमान समाधिनिष्ठ झाल्यावर ब्रह्मज्ञान करून घेण्याचा सर्वांनां अधिकार आहे. अतः, कुंती स्त्री असल्यामुळें दुसऱ्या प्रकारानें[२] म्हणजे स्तुति करून तिनें ज्ञान संपादिलें.

शिष्य :- भगवन् ! तिनें मूर्त्युपहित[३] श्रीकृष्णाची स्तुति केली असल्यामुळें ती कनिष्ठ[४] आहे. तस्मात् तिजपासून उत्तर[५] ज्ञान कसें झालें?

*परमेश्वराचीं पांच रूपें*

श्रीगुरु :- हें तुला दृष्टांतसहित[६] सांगतो, तें श्रवण कर. तदर्थ[७] परमेश्वराचीं भूमि, बीज, अंकुर, तरु, आणि फलोपम[८] अशीं पांच रूपें आहेत. (य३-१०२) त्यांत पहिलें[९] शुद्ध[१०], दुसरें[११] मायावी[१२], तिसरें[१३] सूत्र[१४], चवथें[१५] विराट्[१६] आणि पांचवें[१७] हरिहर[१८]. शुद्धावांचून[१९] ही सर्व रूपें विवर्त[२०] आहेत. म्हणजे शुद्धाचें ठिकाणीं मायायोगानें ईशत्व म्हणजे शबलत्व, आणि शबलाचें ठिकाणींच समष्टिअंतःकरणउपाधीनें[२१] हिरण्यगर्भत्व म्हणजे सूत्रत्व आणि सूत्राचें ठिकाणीं समष्टिस्थूलोपाधीनेंच[२२] विराट्त्व, आणि भक्तप्रीतियोगानें शुद्धाचें ठिकाणीं हरिहरत्व.

*(१) लावून (२) मार्गाने (३) साकार, देहधारी (४) गौण, खालच्या दर्जाची (५) श्रेष्ठ (६) दृष्टान्ताने, दृष्टान्त देऊन (७) साकार मूर्तीपासून ज्ञान कसे होते हे सांगण्याकरितां (८) फळाप्रमाणे, फलरूप (९) भूमिस्थानीय, भूमीप्रमाणे (१०) निरुपाधिक (११) बीजस्थानीय, बीजाप्रमाणे मानलेले (१२) मायोपाधिक (१३) अंकुरस्थानीय, अंकुराप्रमाणे मानलेले (१४) हिरण्यगर्भ (१५) वृक्षस्थानीय, वृक्षाप्रमाणे स्पष्ट विस्तारलेले (१६) ब्रह्मांडरूप (१७) फलोपम, फलरूप (१८) साकार शिव विष्णु मूर्तिरूप (१९) निरुपाधिकावाचून (२०) एकाच सत्तेवर भिन्न इव भासणारे (२१) संपूर्ण अंतःकरणे एक करून त्याच्या उपाधीने (२२) स्थूल ब्रह्मांडाची उपाधी घेऊन.*

शिष्य :- भगवान्! बाकीची दोन[१] रूपे उत्तरोत्तर एकएकाचे ठिकाणी सांगून शेवटले हे पांचवे रूप शुद्धाचे ठिकाणी प्रीतियोगानें[२] होते, असे कां म्हणता?

श्रीगुरु :- तुझी शंका समीचीन[३] आहे. परंतु माझ्या ह्मणण्याचा उद्देश[४] न समजल्यामुळें ती उत्पन्न झाली आहे. सर्व झाडांत भूमींतलाच रस येत असतो. 'जलांतला रस येतो, भूमींतला येत नाहीं' असें तूं म्हणशील तर शुद्धाला जलस्थानीय समज. **'पृथिव्या[५] ओषधयः। ओषधीभ्योऽन्नम् । अन्नात्पुरुषः। स वा एष पुरुषोऽन्नरसमयः ।'** या श्रुतीवरून आम्ही पृथ्वीपासून रस येतो असें म्हटलें कारण औषधीमध्यें रसच श्रेष्ठ आहे असें वैद्यशास्त्राचें मत आहे. परंतु तो फलाचेंच ठिकाणीं व्यक्त[६] होत असतो ; तद्वत्[७] या चारी[८] मूर्तीचें ठिकाणीं जरी भूमिरूप[९] ब्रह्माचाच आनंद आहे, तथापि त्याची परमव्यक्तता[१०] या फलोपम हरिहरपुरुषांत आहे. म्हणून आम्हीं हरिहरपुरुष प्रीतियोगानें शुद्धाचें ठिकाणीं होतो[११], असें म्हटलें.

शिष्य :- महाराज ! शुद्धाचें[१२] ठिकाणीं तिन्ही कालीं सर्वांचाच अभाव असल्यामुळें शबलादि हीं चारी रूपें जीवकल्पितच[१३] असलीं पाहिजेत ?

*(१) सूत्र व विराट (२) भक्तांच्या प्रेमळवृत्तीमुळे (३) योग्य (४) कारण (५) श्रुत्यर्थ :- पृथ्वीपासून वनस्पति होतात,*

*वनस्पतीपासून अन्न होते, अन्नापासून पुरुष देह निर्माण होतो. तो हा पुरुष याप्रमाणे अन्नरसाचा बनलेला आहे (६) प्रगट (७) त्याप्रमाणे (८) साकार स्वरूपाचे ठिकाणीं (९) भूमिस्थानीय (१०) अत्यंत स्पष्टता, पूर्णपणे प्रगट (११) अनुभवाला येतो (१२) शुद्ध स्वरूप सदा निराकारच असल्यामुळे, त्याचे ठिकाणी मुळांत केव्हांहि साकारपणा नाही (१३) जीवाने ज्याची कल्पना केली आहे.*

श्रीगुरु :- हं ! तुझ्या म्हणण्याचा अर्थ मी समजलों. पण जीवकल्पित जरी ती असलीं, तरी तीं जीवांनीं केलेलीं नाहींत; म्हणजे जीवांच्या भेददृष्टीनें[१] भासतात, म्हणून तीं विवर्त आहेत. त्यापैकीं फलोपम हरिहररूप अनध्यस्तविवर्त[२] असून, बाकीचीं शबलादि तीन अध्यस्तविवर्त[३] आहेत. कारण, व्यतिरेकामध्यें[४] शबलादि तिहींचा निरास[५] करण्यास सांगितलें आहे, तसें हरिहरमूर्तीचा निरास करून व्यतिरेक करावा, असें कोठें सांगितलें नाहीं. ज्याचा निरास[६] करतां येतो, त्याचाच नाश (य३-१०३) होतो. हरिहररूपाचा निरास[७] करण्याची आवश्यकता नसल्यामुळें त्याचा ज्ञानानें नाश होत नाहीं. म्हणून तें रूप अनध्यस्तविवर्त[८] आहे. आणि श्रीकृष्णरूप हरिहरात्मक[९] आहे. हें पूर्वी सांगितलें आहे, म्हणून तेंही तसेंच[१०] आहे.

**न[११]कार्यत्वादनित्योऽयं नंदनंदनविग्रहः॥**
**उपचाराद्धि कार्यत्वं तत्र पौराणिका जगुः॥१॥**
*(महाभारत नीलकंठी )*

*(१) जीवाच्या भेदज्ञानास अनुसरून त्या मानाव्या लागतात (२) ब्रह्मज्ञानाने नाहिसे न होणारे (३) ब्रह्मज्ञानाने नाहिसे होऊन पुनः न भासणारे (४) देहादिकाहून आत्म्याला निराळे करितांना (५) मिथ्या म्हणून सोडून देण्यास (६) त्याग (७) व्यतिरेक, त्याग (८) ज्ञानवृत्तीने भासणारे, (९) ज्यांत शिव विष्णु या दोन्ही रूपांचा समावेश आहे असे (१०) अनध्यस्तविवर्तरूप (११) अर्थः- श्रीकृष्णाचे साकार स्वरूप कार्यरूप व अनित्य म्हणजे नाशिवंत नाही. पुराणादिकांतून त्याचे शरीर कार्यरूप आहे म्हणजे उत्पन्न होते असे जे सांगितले आहे ते औपचारिक रितीने सांगितले आहे.*

भावार्थ :- हें श्रीकृष्णशरीर नित्य आहे. आणि हें रूप नित्य राहावें, अशी परमेश्वराची इच्छाही आहे. मी आपल्या मायेचा व या श्रीकृष्णशरीराचा उपसंहार करीत नाहीं, असें नीलकंठाचार्यांनीं गीतेच्या टीकेंत भगवंताचें म्हणणें स्पष्टही केलें आहे. तेथें आणखीही एक रहस्य आहे. '**ब्रह्मैवाविद्ययासंसरति**[१]' या वचनावरून दृष्टिसृष्टिवादी अविद्याआभासरूप[२] शबलाला[३] जीव म्हणत असतात. आभास म्हणजे मिथ्या प्रतिबिम्ब.

शिष्य :- महाराज ! ह्या वाक्याचा नीट अर्थ समजला नाहीं.

श्रीगुरु :- अरे ! वेदांतांत प्रतिबिम्बवाद आणि आभासवाद इत्यादि जीवाविषयीं[४] आहेत त्यांत प्रतिबिम्बवादी प्रतिबिम्ब सत्य आहे, असें म्हणतात, आणि आभासवादी प्रतिबिम्ब मिथ्या आहे असें म्हणतात. एवढाच त्या दोन वादांतील भेद आहे. म्हणून मी तुला आभास म्हणजे मिथ्या प्रतिबिम्ब असें सांगितलें. या सर्व वादांचा विस्तार[५] सप्रमाण 'वेदांतप्रक्रियासमुाय' ग्रंथावरून[६] कळेल. याप्रमाणें अविद्याउपाधिगत[७] मिथ्या ब्रह्मप्रतिबिम्बालाच दृष्टिसृष्टिवादी जीव म्हणतात.

*(१) ब्रह्मच अविद्येमुळे जीवभावाला प्राप्त होते (२) ब्रह्म सत्य व बाकीचे आभासरूप आहे असे म्हणणारे (३) अविद्येमध्यें पडलेल्या प्रतिबिंबाला. सृष्टिदृष्टिवादी किंवा सत्तात्रयवादी यांच्या मतांतील ईश्वराला, मायोपहित चैतन्याला; म्हणजे सत्तात्रयवाद्याचा ईश्वर हा सत्ताद्वयवाद्याचा जीव होय असा अर्थ व सत्ताद्वयवाद्यांच्या मतांत, ह्या जीवाच्या अपेक्षेने शुद्ध चैतन्यच ईश्वर होते. (४) जीवदशेची उपपत्ति लावण्याकरितां (५) यथासांग माहिती (६) ग्रंथ पूर्ण व्हावयाचा राहिला (७) अविद्या उपाधीमध्ये सांपडलेल्या, अविद्या उपाधीचा आश्रय.*

प्रतिबिम्बानें[१] ब्रह्माचें ठिकाणीं जें आपेक्षिक बिम्बत्व त्याला ते ईश्वर म्हणतात.

सारांश, शबलादि[२] तीन रूपें जीवमय अध्यस्तविवर्तरूप[३] असल्यामुळें त्यांचा व्यतिरेकानें[४] नाश करावा लागतो. आणि हरिहर आपेक्षिकबिम्बोपम[५] ईश्वराचें अनध्यस्तविवर्त[६] रूप असल्यामुळे ब्रह्मज्ञानानें त्याचा नाश करण्याची आवश्यकता नाहीं, आणि तो होतही नाहीं.

शिष्य :- महाराज ! हा नारायण कल्पांतरीं[७] नाश पावतो, असें भारतांत सांगितलें आहे, त्याचा अर्थ काय?

श्रीगुरु :- ह्याचा अर्थ, तो परमात्मा, कोणी पाहणाराच नसल्यामुळें कोणालाच दृष्टिगोचर[८] होत नाहीं, असा आहे.

अन्यथा[९] कल्पांतरीं जी या पुरुषाची योगनिद्रा[१०] सांगितली आहे. तिच्याशीं विरोध येतो. (य३-१०४)

*(१) **ईश्वर :-** या अविद्योपाधिक प्रतिबिम्बरूप जीवाच्या अपेक्षेने निरुपाधिक शुद्ध चैतन्याचे ठिकाणी जी बिम्ब संज्ञा येते म्हणजे अविद्येमध्ये पडलेले प्रतिबिम्ब हे कोणत्या बिंबाचे होय असे कोणी विचारल्यास निरुपाधिक चैतन्याचे ते प्रतिबिंब होय असें उत्तर द्यावे लागते, म्हणजे अशा रीतीने अविद्योपाधिक जीव प्रतिबिम्बरूप होतो त्याच्या अपेक्षेने शुद्ध चैतन्य बिंबरूप होते व हे बिंबरूप संज्ञेला आलेले शुद्ध चैतन्यच सत्ताद्वयवाद्याचा ईश्वर होय (२) शबल, हिरण्यगर्भ व विराट (३) भ्रमाने (अविद्या) भासणारी (४) व्यतिरेक ज्ञानाने शुद्ध आत्मस्वरूप जाणताना, ईश्वरादि तीन रूपांपासून आत्म्याला निराळे केले पाहिजे (५) प्रतिबिंबाच्या अपेक्षेने असलेले बिंब जसे शुद्ध असते त्याप्रमाणे (६) शुद्धच, नाममात्र भिन्न असलेले (ज्याप्रमाणे पंचदशीकारांच्या मते **'कूटस्थब्रह्मणोर्भेदः नाममात्राद्दते न हि'** कूटस्थ व ब्रह्म यांचा भेद नाममात्र आहे म्हणून ब्रह्म जाणण्याकरितां कूटस्थाचा व्यतिरेक करावा लागत नाही, त्याप्रमाणें श्रीकृष्ण मूर्ति किंवा हरिहर मूर्ति यांचा व ब्रह्माचा नाममात्र भेद आहे) म्हणून ब्रह्मज्ञानाकरिता श्रीकृष्णादि मूर्तीचा नाश करावा लागत नाही (७) महाकल्पांत (८) दृष्टीस पडत नाही (९) नाहींतर (१०) सर्व सृष्टीचा उपसंहार करून राहणे.*

कारण, त्या निद्रेंत[१] भगवच्छरीर[२] हें एकार्णवांत[३] असत्तें अशीं वचनें आहेत.

शिष्य :- महाराज ! हें मला आतां चांगलें समजलें.

श्रीगुरु :- बरें, ठीक झालें. अशा प्रकारचें जें शुद्ध ब्रह्म त्याला जाणून, तेंच हें अनध्यस्तविवर्त कृष्णरूप आहे. म्हणून त्याची स्तुति करून कुंतीनें ज्ञान करून घेतलें.

शिष्य :- भगवन् ! हें मला चांगलें समजलेंच नाहीं.

श्रीगुरु :- अरे ! जसें सुवर्ण[४] अशा अशा प्रकारचें असतें, असें लक्षणानें[५] तें समजून, नंतर अलंकारांचें ठिकाणीं त्याचा प्रत्यय[६] घ्यावा, तद्वत् पूर्वी श्रवणानें परोक्ष[७] शुद्ध ब्रह्म जाणून, अनध्यस्तविवर्तरूप[८] श्रीकृष्णाचें ठिकाणीं स्तुति करून कुंतीनें तें अपरोक्ष[९] करून घेतलें. याविषयीं श्रीएकनाथ महाराजांचें स्वात्मसुखांतील दृष्टांतवचन प्रमाण आहे.

**'म्हणे म्यां सोनें पहावें दृष्टी । तरी पुढें ठेविजेल खोटी[१०] ।**
**परी खोटी[११] वेगळी भेटी । काय सुवर्ण निढळे?[१२] '॥**

*(१) सर्व सृष्टीचा उपसंहार झाला असता (२) भगवंताचा साकार देह (३) सर्व जलमय स्थिती असतांना (४) सोने (५) सोन्याची परीक्षा ज्या लक्षणाने होते त्या लक्षणावरून (६) प्रत्यक्ष अनुभव (७) अनुमानाने (८) शुद्ध ब्रह्मरूप (९) श्रीकृष्णरूपाचे ठिकाणी प्रत्यक्ष ब्रह्मलक्षणाचा अनुभव घेतला (१०) सोन्याची फांस, लगडी (११) लगडी किंवा फासेवांचून (१२) सोने पाहतां येईल काय?*

या दृष्टांताला सिद्धांतवचन तातांचें आहे.–

**[१]सोनें सोनेपणा उणें । न येतां झालें लेणें । तैसे न वेचतां जग होणें । अंगें जया ॥**

*(चांगदेवपासष्टी ओवी ४ )*

**पैं जे वाणी[२] श्यातुका[३] । तेचि वेगळिये[४] वाला[५] एका । तैसा एकदेशिया व्यापका[६] । सरिसा[७] पाडू ॥**

*(ज्ञाने.अ१२ओ२५)*

शिष्य :- भगवन् ! माझे सर्व संशय निवृत्त झाले. आतां कुंतीनें कशी स्तुति केली, ती ऐकण्याची इच्छा आहे.

**श्रीगुरु :- ठीक आहे; ऐक. कुंती म्हणते :-**

**तूं आदिपुरुष[८] शुद्ध साचार । तूं ईश्वर प्रकृतिपर[९] । सर्वभूतां सबाह्यांतर[१०] । व्यापूनि अससी ॥१४॥ (य३-१०५)**

*(१) **(चांगदेव ओवी अर्थ) सो**नेपणांत काही एक हिणकसपणा न येतां जसे ते सोने अलंकाररूप होते, त्याप्रमाणे ब्रह्महि कांही एक हिणकस न होताच जगद्रूप झाले आहे. म्हणजे ब्रह्म जसेच्या तसेच आहे, तेथे उगीच आपण केवळ जगच आहे अशी कल्पना करितो (२) कसोटी (३) फासभर सोन्याला (४) निराळ्या, अलग असलेल्या (५) वालभर सोन्याला (६) व्यापक, निर्गुणस्वरूप (७) सारखी योग्यता (८) सृष्टीच्या आरंभी असणारा (९) प्रकृतीच्या पलीकडे, मायातीत (१०) आंत बाहेर.*

श्रीगुरु :- वत्स ! या ओवीचा अर्थ तूं असा समज कीं, आदिपुरुष हें विशेषण शुद्धाकडे[१] लावलें असून, प्रकृतिपर हें विशेषण ईश्वराकडे[२] लावलें आहे. म्हणून येथें अविद्यारूप प्रकृतींत पडलेल्या प्रतिबिम्बाला दृष्टिसृष्ट्यन्वयें[३] जीवत्व असल्यामुळें, जीवप्रतिबिम्बापेक्षिक[४] बिम्बत्वच ईश्वर आहे. आणि तें प्रकृतीहून पलिकडचें आहे. त्यांत[५] आणि शुद्धांत भेद[६] नाहीं. **बिम्बत्व** केवळ नाममात्र आहे. तरी **बिम्ब** नाममात्र नसल्यामुळें स्तुत्य[७] आहे. ह्या अर्थाला[८] पुनः विसरूं नको.

हे भगवन् ! तूं सर्वांच्या अंतरबाहेर असूनही तुजप्रत[९] हीं भूतें[१०] जाणत नाहींत. कारण, ज्याप्रमाणें भूषणाद्याच्छादनामुळें[११] नटाचें[१२] खरें स्वरूप समजत नाहीं, त्याप्रमाणें मायेमध्यें प्रतिबिम्बित जे जीव, त्यांच्या आणि तुझ्यामध्यें मायेचा पडदा असल्यामुळें तुझें रूप त्यांच्या लक्ष्यात येत नाहीं. आणि त्या प्रकृतिपर ईश्वराचेंच हें अनध्यस्त[१३] रूप असल्यामुळें हेंही[१४] त्यांच्या लक्ष्यांत[१५] येत नाहीं. परंतु तुझी कृपा ज्यावर झाली त्याला तें कळतें. म्हणूनच माझ्यावरही तुझी कृपा आहे असें मी मानते.

*(१) निरुपाधिकत्वाला धरून (२) बिंबत्वाला धरून (३) दृष्टिसृष्टिवादास अनुसरून (४) जीवरूपी प्रतिबिंबाच्या अपेक्षेने असलेले (५) ईश्वरांत (६) हे दोन पदार्थ नाहीत नुसती नांवे दोन आहेत पण पदार्थ शुद्ध चैतन्यच हा एक आहे (७) स्तुति करण्यास योग्य आहे (८) सिद्धान्ताला (९) तुला (१०) जीव (११) अलंकारादिकाने झाकल्यामुळे (१२) रंगभूमीवरील पात्राचे (१३) भ्रमरहित (१४) हेहि रूप (१५) शुद्ध निरुपाधिक आहे हे कळत नाही.*

**॥ चूर्णिका ॥**

**जेंवी जलांतुनी पयो[१] निवडी हंस । तेंवी आत्माऽनात्मविवेचनीं[२] जे परमहंस ।**
**आणि मननिदिध्यासनीं[३] । स्थित[४] म्हणोनी । महामुनी ।**
**रामद्वेष गेला म्हणोनी । तिष्ठताती[५] निर्मलपणीं[६] । परी त्यांनांही आपुल्या अचिंत्य[७] गुणीं[८] ।**
**तूं रमविसी आकर्षुनी[९] । यालागीं[१०] हें अनध्यस्तविवर्त[११] रूप धरोनी[१२] । पावलासी[१३] शाङ्‌र्गपाणी ।**
**ऐसिया तुज आम्हीं मोक्षदानी[१४] । जाणण्या समर्थ केंवी कामिनी[१५] । यालागीं आपुल्या कृपेंकरूनी ।**
**आम्हां दीनांही[१६] भक्तियोग देउनी । उद्धरी स्वकरांनीं[१७] कृपाळा ! ॥१५॥**

**॥ ओव्या ॥**

**म्हणोनि मी अबळा[१८] । तुझा भरंवसा घननीळा । धरोनि नमिते केवळा[१९] । दीनबंधो ! ॥१६॥**

कृष्ण शब्दाचा अर्थ

**तूं निजभक्तांचें कर्षिसी[२०] मन । यालागीं तुज बोलिजे कृष्ण ।**
**किंवा कृषि शब्दाचा अर्थ 'पूर्ण' । आणि न शब्दाचा अर्थ 'तृप्ति' ॥१७॥**
**एवं पूर्णता आणि तृप्ती । यांची एक[२१] करोनि स्थिति । कृष्ण ऐसेंही निश्चितीं । नाम घडे ॥१८॥**

*(१) दूध (२) जडचैतन्याला अलग करण्यांत प्रवीण (३) आत्मस्वरूपाचे चिंतन व आत्माकार वृत्ति ठेवण्याचा अभ्यास यांत (४) गढलेले (५) असतात (६) शुद्धचित्त होऊन (७) अनिर्वचनीय, कल्पनातीत (८) गुणाने, चरित्राने (९) चित्त मोहित करितोस (१०) म्हणून (११) मायारहित (१२) घेऊन (१३) आलास (१४) हे मोक्ष देणाऱ्या (१५) स्त्रिया, स्त्रीजाति (१६) दीनजनांना (१७) आपल्या हातानी (१८) स्त्रीजाति (१९) एकटी अनाथ (२०) आपल्याकडे ओढून घेतोस (२१) ऐक्य.*

**ऐसा तूं कृष्ण सगुण निर्गुण । तैसें जन्मनामही[१] सगुण[२] निर्गुण ।**
**(य३.१०६) तूं वसुदेवाचा नंदन । हें जन्मनाम सगुण त्या तुज नमो ॥१९॥**
**आणि सकल भूतें[३] तुझ्याठायीं । वास[४] करिती लवलाही । म्हणोनी तुजला पाही । म्हणती वासु ॥२०॥**
**तोचि तूं देव । यालागीं नाम वासुदेव । एवं तूं अचिंत्यप्रभाव[५] । त्या तुज नमो परेशा[६] ॥२१॥**
**तूं देवकीचा नंदन । त्या तुझें नमितें चरण । परी वार्धक्य तारुण्य सांडोन । तूं बाळ नंदगवळ्याचा ॥२२॥**
**म्हणोनि अखंड बाल्यरूप[८] । त्या तुज नमितें अमूप[९] ।**
**आणि गायी चारोनि रमविले गोप । ऐसिया तुज नमितसे ॥२३॥**
**नाभीं ज्याच्या ब्रह्मांडकमळ । भक्तार्पित[१०] कमळांची गळां माळ ।**
**संसार पाहुनीहि दृष्टिस नाहीं मळ[११] । यालागीं कमलनेत्र तुझे ॥२४॥**
**भक्तवृत्ति[१२] होऊनि भ्रमरी[१३] । सौरभ[१४] सेविती साचारी । यालागीं तव पादांघ्री[१५] । कमळरूप ॥२५॥**
**एवंरूप[१६] दिनानाथा । ठेविते तव पदीं माथा । वरी तुझ्या उपकारा गणिता[१७] । मिती[१८] सर्वथा नाहीं हरे ! ॥२६॥**
**माते देवकीहूनि मजवरी । प्रीति तुझी पूतनारी । मायेस रडविलें बंधांतरीं[१९] । मज शोकापासोनि मुक्त केलें ॥२७॥**

*(१) वासुदेव (२) सगुणवाचक व निर्गुणवाचक (३) सर्व जीव (४) राहतात (५) अगाध, सामर्थ्यवान् (६) सर्वांचा स्वामी (७) वार्धक्य व तारुण्य याविरहित (८) नेहमी, सदासर्वदा बालच राहणारा (९) अनंत वेळा (१०) भक्तांनी समर्पिलेली (११)*

*स्पर्श, दोष - म्हणजे भगवान् सृष्टीचा शास्ता आहे तरी ती त्याला सत्यत्वाने भासत नाही (१२) भक्तांची वृत्ति, मन (१३) भ्रमर (१४) सुगंध मकरंद (१५) पाय आणि घोटे (१६) अशाप्रमाणे (१७) मोजूं गेल्यास (१८) माप, मर्यादा (१९) बंधनांत ठेवून, कैदेत ठेवून.*

मायेस बहुकाळ बंधन[१] । आम्हां लाक्षागृहांतून[२] । झडकरी त्वां पावोन । मुक्त केलें दयाळा ! ॥२८॥

मायेचें नाहीं रक्षिलें बाळ । माझीं लेंकुरें दिलीं मजजवळ ।
मायेसी दुसरा नाथ[३] केवळ । मजसी नाथ तूंचि एक ॥२९॥

मायेसी दोनचि विपत्ति[४]।त्यांतील एकीची केलीमुक्ति[५]। विपत्तिसमुदायांतूनी[६]आम्हांप्रती । त्वां श्रीपति सोडविलें ॥३०॥

मायेसी मुक्त केलें एकवेळ । आम्हांसाठीं धांवला वेळोवेळ ।
यालागीं त्यजोनी मोक्षादि फळ । जन्म जन्म पदकमळ[७] सेवीन तुझे ॥३१॥

तुझे एक एक उपकार । स्मरूं तरी कोठवर । विषापासोनि वृकोदर[८] । सोडविला ॥३२॥

वाचविलें लाक्षादि गृहांतून । आणि मनुष्यभक्षक[९] राक्षसांपासून । तैसें वनवास संकटांतून । रक्षिलें ॥३३॥

भीष्मादि महायोद्ध्यांचें अस्त्र । तूं वारिता शार्ङ्गधर । आतां वारिलें द्रोणपुत्रास्त्र[१०] । हें म्यां नेत्रीं पाहिलें ॥३३-क॥

यालागीं तुझे उपकार । स्मरतां होतील अपार[११] । ते फेडावया साचार । प्रत्युपकार[१२] कदा नोहे ॥३४॥

एवं मी सर्वथा तुझी । आतांऽहंकृति[१३]गेली माझी । परी लाचावली[१४]मति सहजी । रूपीं इया ॥३५॥ (य३.१०७)

तुज भक्तीनें बोलावून । प्रत्युपकारें[१५] करावें पूर्ण । हें तंव सामर्थ्य नाहींचि जाण । माझिया आंगीं ॥३६॥

यालागीं श्रीगोपिकापति । आम्हां सर्वदा येवोत विपत्ती[१६] ।
म्हणजे तूंचि देवोनि भेटी निश्चिती । मुक्त करित जासील आम्हां दीना ॥३७॥

*(१) तुरुंगवास (२) जळत्या लाखेच्या घरांतून (३) स्वामी (४) संकट (५) निवारण (६) अनंत संकटातून (७) चरण (८) भीम (९) मनुष्य खाणाऱ्या (१०) अश्वत्थाम्याने सोडलेले ब्रह्मास्त्र (११) अमर्याद, असंख्य (१२) उलट उपकार (१३) अभिमान (१४) वेधली, जडली (१५) उलट उपकार करून (१६) संकटे.*

प्रत्युपकार कोणत्याही जन्मीं । करावया असमर्थचि मी । यालागीं सर्वदा आम्हीं । विपत्तींत पडो पां ॥३८॥

तेथ तेथ जगद्गुरो ! । तुझिया प्रेमें हृदय भरो । मग तुझें दर्शन संहरो[१] । बंधन आमुचें ॥३९॥

जें कां तुझें सुखदर्शन । तेंचि भवाचें[२] सुदर्शन[३] । तेंचि आमुचें कैवल्य पूर्ण । जें आत्मदर्शन[४] मुनींचें ॥४०॥

भगवन् ! उत्तम कुळीं जनन[५]। हेंचि परमार्था साधन । परी तेथचि वाढतां अभिमान । संग[६]दारुण[७]उपजवी ॥४१॥

जें ब्रह्मविद्ये[८] मातृमंदिर । स्वर्ग जयांचें अग्रहार[९] । ऐसें धन्य ब्राह्मणशरीर । परी वाढतां अहंकार मृच्छुल्क[१०] ॥४२॥

बहुभाग्येंकरोनि जाणा । सत्कुळीं जन्म जनार्दना । परी तुज न भजतां जगन्मोहना । उपयोग जाणा मग नसे ॥४३॥

देखे मलयचंदनतरू[११] । परी सभोवता द्विजिव्हभारू[१२] । तदुपयोग कोणी करूं । न शके जेंवी ॥४४॥

तेंवी उत्तमकुळीं जनन । तें वाया दवडी मदअभिमान । वरी ऐश्वर्य[१३] असतां जाण । तोचि अभिमान दृढावे ॥४५॥

त्याहीवरी जवळी धन । तेणें होय अलर्कसमान[१४] । जें जें देखें भूत संपन्न[१५] । तेथ भुंकोन आव[१६] घाली ॥४६॥

सत्कुलादिकांचा अभिमान । तेणें न मानी विष्णुजन[१७] । विद्यागर्वेकरूनि जाण । वडिलादिक[१८] अवमानी[१९] ।४७॥

*(१) नाहिसे करो (२) संसाराचे (३) सुदर्शन चक्र (४) आत्म्याचा अपरोक्षानुभव (५) जन्म (६) आसक्ति (७) अत्यंत (८) वेदविद्येचे जन्मस्थान (९) देणगी (१०) मातीमोल (११) मलय पर्वतावरील चंदनाचे झाड (१२) सर्पाचा समुदाय (१३) सामर्थ्य (१४) कावरलेल्या कुत्र्याप्रमाणे (१५) कोणत्याहि गुणांने श्रेष्ठ (१६) आपले मोठेपण (१७) भगवद्भक्त (१८) वडिल पुरुषांचा (१९) अपमान करितो.*

जे आपणापरीस निष्किंचन[१] । त्यावरी आज्ञा घाली दारुण[२]। तयांतें चाकरीस ठेवोन । कष्ट निर्वाण देतसे ॥४८॥

किंचित्धनाचेनि[३]योगें । जग चाकर म्हणे अवघें । अन्य बोलतां करी उगें । म्हणे मजसमोर वाउगें वटवटसी[४] ॥४९॥

चाकरीस ठेविले जे कां दीन । त्यांसी नियोजी कार्य गहन[५] ।
न पाहे तयांची भूक तहान । शीत उष्ण त्यांची नेणे ॥५०॥

वेळीच्यावेळीं न दे पैका । चाकरें मागतां म्हणे ऐका[६]।
परी माझें काम सांडूं नका । ही आज्ञा देखा अनिवारू[७] ॥५१॥

गृहीं जाहलें पितृमरण[८] । अथवा वनिता[९] ऋतुसंपन्न[१०] ।
तरी आज्ञा न दे चाकराकारण[११] । विक्षेप[१२] होईल म्हणोनि कामीं[१३] ॥५२॥ (य३.१०८)
सुशील[१४] धर्माची पातल्या[१५] पंक्ती । आज्ञा न दे गृहीं जावयाप्रती ।
आणि मग सांगे भूपतिनीति[१६] । म्हणे मजचि निश्चितीं सेवावें ॥५३॥
एवं जयाच्या हातातळीं । दीनदयेसी तिलांजुळी[१७]।
धनवंत पाहतां स्वसम मेळी[१८]। तरी आरंभी टवाळी[१९]कांहीं तरी ॥५४॥
जे जे धनवंत महीवर । ते ते म्हणे दावेदार[२०] । तयातें जिंकोनि मी निर्धार । एकटा महीवर शोभेन ॥५५॥
आपणापरीस[२१] जे धनवंत । तेथ युद्ध[२२] अथवा चौर्य[२३] आरंभित ।

*(१) दरिद्री (२) भयंकर (३) थोडक्या पैशाने (४) बडबडतोस (५) भारी काम (६) थांबा (७) कडक (८) बाप मेला तरी (९) बायको (१०) ऋतुस्नात (११) चाकराला (१२) घोटाळा, खंड (१३) कामामध्यें (१४) सात्विक (१५) क्रमाने, एकामागून एक अशी अनेक धर्मकार्ये प्राप्त झाल्यास (१६) राजा आपल्या नोकरांना उपदेश करितो तसा उपदेश (१७) फाटा (१८) आपल्या समान लोकांच्या कंपूत (१९) थट्टा, कुचेष्टा (२०) शत्रु (२१) आपल्यापेक्षा (२२) भांडण (२३) चोरी.*

गृहा आलिया साधुसंत । न दे उसंत[१] त्यांसि प्रेमें ॥५६॥
आपण न करीच सर्वथा दान । आणि पुत्रांदिकीं करितां जाण ।
त्यांसीहि दे ऐसी शिकवण । कीं येणें सदन बुडविसी तूं ॥५७॥
एवं जन्मादि[२]मदरीती । हें तंव आंगीं दिवसरातीं[३]। मग एखादे वेळीं कामवृत्ति । उठतां निश्चितीं चवताळे[४] ।५८॥
मग ही माय ही भगिनी । ही सासू ही वहिनी । ही आपुली ही परावी[५] कामिनी । स्वस्त्रीपरी[६] देखत[७] ॥५९॥
परस्त्री तंव बळें[८] भोगी । जनलज्जें[९] मातादिक जरी न भोगी । तरी मानसमैथुनयोगी[१०] । तेथही होय ॥६०॥
अथवा भेटतां एकांत । तो तेंही करावया न लाजत । अथवा कामें जैं चरफडत । तैं माताही भोगित निजस्वप्नीं ॥६१॥
जया दानाचेंनि नांवें । तेथूनि निकें अंग[११] घ्यावें । परी दान किंचित् करी स्वभावें । तरी तेणें गौरवें[१२] दंभवशें[१३] ॥६२॥
एक चिंधी करोनि दान । त्रिभुवनपतित्व[१४] कामी[१५] मन । एवं रजस्तमःसंपन्न[१६] । घूर्णीत[१७] लोचन काममदें[१८] ॥६३॥
ऐसा सर्वदा मायावश[१९] । मग मुखीं नये हृषीकेश । यालागीं तूं जगन्निवास । वळसी[२०] निर्धनास दीनबंधो ॥६४॥
रज्जूचा[२१] आश्रय करोनियां । सर्प लोकां दावी भया ।
तेवीं तुझा आश्रय करोनिया । लक्ष्मी तव माया जन बुडवी ॥६५॥

*(१) विश्रांति (२) उत्तम कुळांत वगैरे झालेल्या जन्मांच्यामुळें जो अभिमान होतो, त्या अभिमानाची वागणूक (३) सदासर्वदा (४) कावराबावरा होतो (५) दुसऱ्याची (६) स्वतःच्या स्त्रियेसारखी (७) समजतो (८) जबरदस्तीने (९) लोकलज्जेमुळें (१०) त्यांच्याशी मानसिक संभोग करणारा (११) अंग चोरतो, दान करीत नाहीं (१२) आपल्याला धन्य मानून घेतो (१३) दांभिकपणाने (१४) त्रिभुवनींचे राज्य (१५) इच्छी (१६) रजोगुणी किंवा तमोगुणी (१७) लाल झालेले, चढलेले (१८) कामविकाराच्या कैफाने (१९) अविद्येत सांपडलेला (२०) कृपा करितोस (२१) दोरीचा*

तूं निःसंग निर्भय । लक्ष्मीवंता चौरभय । तूं चिदानंद[१]यादवराय । दुःखी दूरान्वय[२] धनवंत ॥६६॥
लक्ष्मी तुझे चुरी चरण । आणि सेवा घे धनिकांकडून ।
तूं न इच्छितां तुझे धरी चरण । इच्छितां धनवान चपल[३] राहे ॥६७॥
म्हणोनी यशोदागर्भरत्ना[४] । जे वमनासम[५] मानिती धना । तयांच्या किंचिन्मात्र[६] यत्ना । तूंचि फळसी[७] ॥६८॥
कामसंपन्न होतां तरुण । परी मूत्रपात्रें[८] फळे[९] कामिन । (य३-१०९)
आणि बाल दीनभावें करितां रूदन । तरी दुग्धपानें फळे जननी ॥६९॥
तेंवी जन्मादिमदें[१०] यादवराया । नरकचि दे तुझी माया ।
निर्धन किंचित् ध्यातां तव पाया । तरी फळसी तया तूं सृप्तिसुख ॥७०॥
निर्धन भजकां तूंचि धन । तूं आत्माराम जगज्जीवन । यालागीं पुरुषार्थकांक्षा[११]जाण । तुझेठायीं न सांपडे ॥७१॥
तूं सकल धर्मा आदिकारण[१२] । तुजचि पावती धर्मसंपन्न[१३] ।
यालागीं तुज धर्माचरण-। विना दीनोद्धरण[१४] अप्रयोजक[१५] ॥७२॥

**लक्ष्मी तुझे सेवी पाय । म्हणोनि नलगे तुज अर्थउपाय[१६]। तूं नित्यतृप्तयादवराय । म्हणोनि नोहे काम[१७]तुजा।७३॥**

*(१) चैतन्यानंदस्वरूप (२) संबंध जोडण्यास कठिण (३) चंचल, अस्थिर (४) यशोदेच्या गर्भात उत्पन्न झालेले रत्न, श्रीकृष्ण, (५) ओकारीप्रमाणे (६) थोडक्याशा (७) तूच फलरूपाने प्राप्त होतोस, म्हणजे थोडक्या यत्नाने तुझी त्यांना प्राप्ति होते (८) मूत्राचे स्थान जी योनी तिच्या द्वारे (९) प्रसन्न होते (१०) माझा जन्म उत्तम कुळांत झाला इत्यादि अभिमानाने (११) मोक्षाची इच्छा (१२) मूळ (१३) धार्मिक (१४) दीनांचा उद्धार करणे या हेतूखेरीज (१५) निरर्थक म्हणजे केवल दीनांचा उद्धार करण्याकरिता तू धर्माचरण करतोस (१६) अर्थसाधन, धनप्राप्तीचा प्रयत्न (१७) इच्छा.*

**तिन्ही कालीं तुझेठायीं । जगज्जन्मादि[१] सर्वथा नाहीं । यालागीं तुज फणिशायी । मोक्ष लवलाही न गुंतवी[२] ॥७४॥**

**तो तूं भक्तवत्सल आत्माराम । रागद्वेषवर्जित[३] परम । तुज वश करी एक प्रेम । पुरुषोत्तम अजित[४] तूं ॥७५॥**

**एवं दीनमनोरथपूर्ते[५] । हे माउली चिद्घनमूर्ते[६] । जे तूं परब्रह्म निरुतें[७] । त्या तुज नमितें सद्भावें ॥७६॥**

**एवं तूं नित्यतृप्त । परी मोक्षादिक पुरुषार्थ । तुझे पायीं समस्त । लोळती प्रभो ! ॥७७॥**

**मोक्षाऐसें धन । तूं वैरियाही देसी पूर्ण । मग भक्त रक्षिसी हें वचन । केतुलें स्तवन साजेल? ॥७८॥**

**तुझा भक्तांचियेठायीं । प्रेम न वर्णवे शेषशायी । मोक्षा देवोन लवलाही । शेखी आंगेही करीसी सेवा ॥७९॥**

**ऐसिया तुज नारायणा । लोटांगणीं आलें चरणा । दीनानाथा जगन्मोहना[८] । यशोदानंदना जगत्पते[९]! ॥८०॥**

**भगवन् ! तूं नव्हेसी देवकीसुत । म्हणजे मानुषधर्मे[१०] अलिंपित[११] ।**
**त्वत्तो[१२]जगज्जन्मादि[१३] समस्त । यालागीं निश्चित कालरूप तूं ॥८१॥**

**परी काळ जैसा अचेतन[१४] । तैसा तूं नव्हसी ईशान[१५] । तूं जगज्जन्मादावुपादान[१६] । यालागीं काळ म्हणती तुज ॥८२॥**

**आणि तूंचि आपण निमित्त[१७] हेतु । यालागीं ईशानशब्द प्रवृत्तू[१८]। सर्वनियामक[१९]भगवंतू । आदि अंतू तुज नाहीं ॥८३॥**

*(१) जगदुत्पत्तिस्थितिलयाचा व्यापार (२) आसक्त करीत नाही (३) रागद्वेषरहित (४) भक्तांवाचून कोणालाहि न जिंकला जाणारा (५) दीनजनांचे मनोरथ पूर्ण करणारा (६) साकारचैतन्यघन (७) शुद्ध (८) जगाला मोह पाडणाऱ्या (९) जगताचा स्वामी (१०) मनुष्यशरीरादिकांचे ठिकाणी असलेले भौक्तिक धर्म (११) अस्पृष्ट - तुझें ठिकाणी नाहींत (१२) तुझ्यापासून (१३) जगदुत्पत्तिस्थितिलय (१४) जड (१५) कालाचा प्रेरक, शास्ता (१६) जगाच्या उत्पत्त्यादिकांचे उपादानकारण (१७) निमित्त कारण (१८) तुझे ठिकाणीं लागतो (१९) सर्वांचे नियमन, शासन करणारा.*

**सांगावया ब्रह्मसंपन्न । काल ऐसें कुंतीवचन । करावया वैशेषिककालव्यावर्तन[१] । म्हणे ईशान देवासी ॥८४॥**

**शैववैष्णवादि द्वैतीमत[२] । म्हणती ईश्वर केवल निमित्त[३] ।**
**तें निरसावया[४] अनादि अनंत । कुंती बोलत भगवंता ॥८५॥**

**तूं पर्जन्यवत्साधारण[५] हेतू । परी स्वसंकल्प[६] बीजभूतू[७] ।**
**घेउनी भूतगण[८] समस्तू । त्वद्वशें[९] प्रवृत्तू स्वस्वकर्मीं[१०] ॥८६॥**

**(य३-११०) तूं भूतांच्या[११] कर्मेकरून । तया वर्तविसी[१२] आपण ।**
**म्हणोनी न होसी विषम वा निर्घृण[१३] । समसमान सर्वत्र ॥८७॥**

**सकल विश्वचित्रें[१४] गोमटीं[१५] । राहती तव रूपीं आद्यपटीं[१६] ।**
**तो तूं मानुषरूपें[१७] जगजेठी । लीला कोटी[१८] दाविसी ॥८८॥**

**परी हें मानुषरूपही तुवां । किमर्थे[१९] धरिलें देवाधिदेवा । हें जाणावयाही वासुदेवा । समर्थभावा[२०] नये कोणी ॥८९॥**

**तूं साधूवरी अनुग्रह[२१] करिसी । दुर्जनांतें संहारिसी । ऐसें विषमत्व वदती तुजसी । ते मूढ निःशेषीं मायिके[२२] ॥९०॥**

*(१) वैशेषिक शास्त्रांतील काल येथे घ्यावयाचा नाही हे सांगण्याकरितां (२) शैव, वैष्णव इत्यादिक जे द्वैतवादी आहेत ते (३) कुंभाराप्रमाणे, कुंभार घट उत्पन्न करितो पण स्वतःघटरूप होत नाही (४) हे मत खोडून काढण्याकरिता (५) पाण्याप्रमाणे सर्वसाधारण कारण असणारा, सर्व झाडांना पाणी पाहिजे म्हणून ते सर्वसाधारण कारण असून प्रत्येक झाडाचें बीज त्याला मुख्य कारण असते, त्याप्रमाणे जगताचे ठिकाणीं भगवान् साधारण कारण आहें (६) जीवाची वासना (७) वृक्षाच्या बीजाप्रमाणे असाधारण कारण आहे (८) सर्व जीव (९) तुझ्या स्वाधीन राहून (१०) आपल्या आपल्या कर्मांत प्रवृत्त होतात. (११) जीवांच्या (१२) संसार भोगवितोस (१३) निर्दय (१४) संसाररूपी चित्रें (१५) सुंदर (१६) प्रथम वस्त्र, तुझे रूप हे संसारचित्र भासविणारे वस्त्र आहे (१७) मनुष्यरूपाने (१८) अनंत (१९) कशाकरितां (२०) समर्थपणा (२१) कृपा (२२) अज्ञानी.*

सद्गुरु म्हणे हे तात । या कुंतीवचनावरूनि अर्थ । निघो पाहे पूर्वोक्त । तें तुज स्मरण आहे कीं?॥९१॥
एवं प्रेमविवर्धन(१) । हें कृष्णावतारमुख्यप्रयोजन(२) । आपेक्षिक कार्य(३) संतरक्षण । दुर्जनहरण(४) गौणकार्य(५) ॥९२॥
कुंती म्हणे भगवंता । दुष्टां मारोनि रक्षिसी संता । हें म्हणणें अज्ञान अनंता । असें सर्वथा मी जाणे ॥९३॥
मेघांचें पाणी गोड उसीं । आणि तेंचि मारक होय विषीं । परी येथे कायी पर्जन्यासी(६) । कर्तृता आहे ? ॥९४॥
तेंवी सत्कर्मे(७) तारिसी सज्जनां । दुष्कर्मे(८) मारिसी दुर्जनां । परी तुजला नारायणा । कर्तृता(९) नाहीं ॥९५॥
ईश्वर सृजी पाळी संहारी । ऐसें बोलणें चराचरीं । तें अज्ञान(१०) आरोपकारी(११) । तूं निर्विकारी(१२) पूर्णब्रह्म ॥९६॥
तुज अजन्मातें(१३) जन्म । तुज अकर्मातें(१४) कर्म । तुज अनामातें(१५) नाम । आश्चर्य परम हें वाटे ॥९७॥
ज्या तुज म्हणती श्रुति वाहवा ! । तो तूं तिर्यग्योनींत(१६) वराहा ।
ज्या तुझे एकदेशीं(१७) विराट्(१८) हा । तो तूं वामन ऋषिवंशी ॥९८॥
जो तूं जगाचें जीवन(१९) । तो तूं जीवनीं(२०) मत्स्य कूर्म आपण ।
जो तूं आत्माराम नारायण । तो तूं रघुनंदन मानुषजन्मीं(२१) ॥९९॥
एवमादिकरूनि(२२) अनंता । तुझीं चरित्रें कमलाकांता(२३) ।

*(१) भक्तांचा प्रेम वाढविणे (२) श्रीकृष्णाच्या अवताराचे मुख्य कारण (३) भक्तांचे संरक्षण केल्यावाचून प्रेम वाढवितां येत नाही असे सिद्ध होणारे (४) दुष्टांचा नाश (५) आनुषंगिक, अवतार न घेतांहि होणारे (६) पावसाला (७) सत्कर्माच्या द्वारे (८) दुष्कर्माच्या द्वारे (९) कर्तृत्व, व्यापार (१०) नेणतेपण (११) भगवंतावर आरोप करणे (१२) ज्यांत कोणताहि फरक होत नाही, एकरूपी (१३) जन्मरहितास (१४) कर्मरहितास (१५) नामरहितास (१६) पशु योनींत (१७) एका अंशावर (१८) ब्रह्मांडाभिमानी ब्रह्मदेव (१९) प्राण, आत्मा (२०) पाण्यांत (२१) मनुष्यदेहधारी (२२) इत्यादिकरून (२३) लक्ष्मीपति*

मोह करिती अज्ञचित्ता(१) । सूज्ञ भक्तां(२) तूं ज्ञेय(३) होसी ॥१०० ॥
एवं ऋष्यादौ(४)जरी तुझ्या व्यक्ती(५)। तरी तुज नाहीं अविद्याख्याती(६)। हें न जाणोनि तुज पाहती । तत्तदादिरूप(७)॥१॥
आणि तुझी ही लीला(८) परेशा । अगाधचि(९) असे हृषीकेशा । तें आश्चर्य करवी रमेशा । सज्जनांसी ॥२॥

॥अभंग ॥

दूधदधिभांडे(१०) फोडिलें म्हणोनि । यशोदा बांधोनी ठेवी तूज ॥१॥
नव लक्ष दावें लाविलें उदरीं(११) । रडसी पुरारिमित्र(१२) तूं तैं ॥२॥
मायभेणें(१३) आंग(१४)कांपे थरथरा । उभा शार्ङ्गधरा अधोवक्त्र(१५)॥३॥(य३-१११)
ऐसी दशा(१६)दृष्टीं पाहोनियां देवा । आश्चर्यही जीवा फार वाटे ॥४॥
तुझी माया मज न करो आवृति(१७) । हाचि राधापति वर देई ॥५॥
ज्ञानेश्वरमित्र(१८) तूंचि कृपासिंधू । मुनी दीनबंधू तुज ध्याती ॥६॥१०३॥

॥ गीति ॥

भयही भीत जयातें तो तूं मायेस भीसि गोपाळा ।
पाहुनि चकितचित्त(१९) मुनि केंवी मी तेथ जाणती बाळा(२०) ॥१०४॥

*(१) मूर्खाच्या बुद्धीला (२) ज्ञानी भक्ताला (३) जाणला जातोस (४) ऋषिवंशांत (५) अवतार (६) अविद्या, भ्रांति, तुझ्या देहाची उपपत्ति अविद्येने लागत नाही म्हणजे तुझा देह अविद्याजन्य नाही (७) त्या त्या रूपाने युक्त. म्हणजे रामकृष्णादि मानुष अवतार मनुष्यरूपच आहेत असे मूर्ख समजतात (८) नाटक, विहार (९) अचिंतनीय (१०) दुधादह्याची मडकी (११) कमरे सभोंवती (१२) शंकराचा सखा (१३) आईच्या भीतीने (१४) शरीर (१५) खाली तोंड करून (१६) स्थिति (१७) आवरण, मोह न पाडो (१८) श्रीज्ञानेश्वरांचा प्राणसखा (१९) आश्चर्याने युक्तचित्त होऊन (२०) यःकश्चित स्त्री.*

तूं जगन्मोहन(१) आणि जगज्जीवन(२) । म्हणोनि तव(३) चरित्रें वर्णिती सज्जन ।
जैसें सूर्यतेज नव्हे सहन । परी तमनिवारणा(४) नयन अपेक्षिती(५) ॥५॥
तैसें तुझें न कळे चरित । परी आपुली व्हावया शुद्धी(६) यथार्थ ।
जैसा भाविती(७) तैशा तुजप्रत । वर्णिती समस्त लीलात्मका(८) ॥६॥

॥गीति ॥
कोणी बोलति अज[९] हरि यदुपांडवकीर्तिसाठिं[१०] अवतरला ।
चंदनपादपगंधें[११] मलयगिरी[१२] ज्यापरी यशें[१३] वरिला[१४] ॥७॥
॥ ओव्या ॥
पूर्वी सुतपा[१५] प्रजापती । तपें[१६] पुत्र मागतां तुजप्रती । तूं बोलिलासी ॐ[१७] इति । तोचि सुतपा संप्रति[१८] वसुदेव ॥८॥
आणि तयाची भार्या[१९] पृष्णी । ते ये जन्मीं देवकी जननी ।
वरसिद्धि[२०] करावया लागुनी । तूं बाळ झालासि त्यांचा ॥९॥
तूं अजन्मा भगवंत । परी तव जन्म विश्वक्षेमार्थ[२१] । आणि दुर्जनांचा घात[२२] । करोनि संत रक्षिसी ॥१०॥
॥अभंग ॥
कोणी म्हणताती कुंभिनी[२३] सागरीं । बुडतां साचारी नौकेसम[२४] ॥१॥
तदा अरविंदजन्में[२५]प्रार्थिलें तुजला । म्हणोनि जन्मला अजही तूं ॥२॥
उतरावयासी पृथवीचा भार । तुझा अवतार विश्वनाथा ॥३॥
बोलताती ऐसेंही कोणी सज्जन । ज्ञानेश्वरीं लीन चित्त ज्यांचें ॥४॥ ११॥

*(१) विश्वाचे चित्त आकर्षण करणारा (२) जगताचा प्राण (३) तुझी (४) अंधःकार नाहिसा करण्याकरितां (५) आवश्यक असते (६) चित्तशुद्धि (७) तुझ्याविषयी ज्याची जशी भावना (८) लीलास्वरूपी तुला (९) जन्मरहित (१०) यादव व पांडव कुलांची कीर्ति करण्यासाठीं (११) चंदनाच्या झाडाच्या सुगंध धर्मामुळे (१२) मलय पर्वत (१३) कीर्तीने (१४) युक्त झाला (१५) सुतपा नांवाचा (१६) तप करून (१७) हो म्हणून (१८) सध्या (१९) स्त्री (२०) दिलेल्या वरदानाची सफलता, पूर्ति (२१) जगाच्या कल्याणाकरितां (२२) नाश (२३) पृथ्वी, भूमि (२४) नावेसारखी (२५) ब्रह्मदेवाने*

॥ ओव्या ॥
एवमापेक्षिक[१] आनुषंगिक[२] । तुझीं प्रयोजनें[३] वदती अनेक ।
आतां जे ब्रह्मनिष्ठ त्वदात्मक । ते तव मुख्य प्रयोजन वदती ॥१२॥
स्वरूपाचा[४] विसर[५] । तोचि अज्ञान अडदर[६] । तेणें मी देह हा अहंकार । वृद्धि पावे ॥१३॥ (य३-११२)
तया अहंकारें कामबुद्धि[७] । कामेंकरोनि कर्मवृद्धि[८] । नाना[९] निषेध नाना विधी । तेणें क्लेशाभिसंधि[१०] प्राणिया ॥१४॥
एवं जे दुःखित दीन । तिहीं करावें श्रवण कीर्तन । म्हणोनी अजन्माही[११] तूं भगवान । चरित्रें नाना करितोसी ॥१५॥
कृष्णावतार मुख्यप्रयोजन[१२] । तुझें हें कीं प्रेमवर्धन[१३]। तो तूं नंदयशोदात्मजनन[१४]। गोपीकुचमर्दन[१५] गोविंदू ॥१६॥
मुळीं[१६] 'करिष्यन्' ऐसें वचन । तेथ एवमर्थद्योतन[१७] ।
कीं जें हें मुख्य[१८] प्रयोजन । तें भूत भविष्य वर्जोन वर्तमान[१९] सदा ॥१७॥
मागील[२०] अन्य मतांतर[२१] । तें भूतकालिक[२२] समग्र ।
आणि हें ब्रह्मनिष्ठ मत[२३]साचार । कीं वर्तमान[२४]अवतार सर्वदा हा ॥१८॥
श्रवण[२५] कीर्तनायोग्य चरित्रें । करीत होत्सातां अतिविचित्रें । जन करिसी प्रेमपात्रें[२६] । भक्तिरात्रें करोनी [२७] ॥१९॥

*(१) अपेक्षेमुळे सिद्ध होणारे (२) गौण, अनायासे सिद्ध होणारे (३) हेतु, कारणे (४) भगवत्स्वरूप झालेले, आपल्या आत्म्याचा (५) आठवण नसणे (६) अंधःकार, गाढ (७) वासना (८) कर्मप्रवृत्तीची वाढ (९) नाना प्रकारच्या, असे कर असे करु नको अशा शास्त्राच्या आज्ञा (१०) क्लेशप्राप्ति, दुःखप्राप्ति (११) जन्मरहित असूनहि (१२) विशेषतः श्रीकृष्णावताराचे मुख्य कारण (१३) भक्तिप्रेम वाढविणे (१४) नंद यशोदेचा मुलगा (१५) गोपीचे स्तन धरणारा (१६) मूळ ग्रंथांत (१७) असा अर्थ सुचविला (१८) मुख्य कारण अवताराचे (१९) नेहमी असणारे (२०) पूर्वीचे (२१) दुसऱ्याचे मत —अवतार प्रयोजनाविषयीचे (२२) गतकालासंबंधी (२३) ज्ञानी भक्तांचे (२४) सदा राहणारा (२५) ऐकण्याला गाण्याला योग्य (२६) प्रेमाला निवासस्थान (२७) भक्ति व ज्ञान यांच्या योगाने - रात्र हा शब्द पंचरात्रागमांत ज्ञानवाची आहे.*

जेधवां जेधवां स्मरतील भक्त । तेधवां तेधवां प्रगट तूं अनंत ।
म्हणोनि 'करिष्यन्' हें वचन यथार्थ । पराशरसूत बोलिले ॥१२०॥

म्हणोनि मागील मतांहून । हेंचि मत परम प्रमाण । कारण जे वर्णिती तव गुण । आणि करिती श्रवण आवडी ॥२१॥
तव गुणचि धरिती मनीं । त्यातचि रमती दिवसरजनीं[२] । तेचि क्षण न लगत क्षणीं । तुझिये चरणीं मिसळती ॥२२॥
ज्या पदीं तिही कालीं भव[३] । न धरी [४]भाव ना अभाव[५] । ते तुझे पद स्वयमेव । तव चरित्र गावोनि पावती ॥२३॥
मुळीं 'अंबुज' ऐसें पद । येणें ह्या अर्थबोध । कीं या संसारीं असोनि प्रसिद्ध । कमलसम[६] भवजळीं[७] नातुडती[८] ॥२४॥

एवं चरण नातुळती[९] भवजळा[१०] । तरी तूं केंवी आतुळशील घननीळा ।
म्हणोनी तुझीही तनू[११] केवळा । अनध्यस्तविवर्ती[१२] ॥२५॥

॥ पद ॥

जय जय जय दीनबंधु भुवनसुंदरा[१३] । अनुचित[१४] तव गमन आज इंदिरावरा । जय जय जय० ॥धृ०॥
आह्मि तुझें श्वान[१५]सर्व जाण पोसणें[१६]। विकत घेतलेंचि तुवां देउनी पणें[१७]॥१॥
मारुनिया गोत्र अकीं[१८] पडिलें नृपा । यास्तव ते द्वेषिताति तूं करी कृपा ॥२॥ (य३-११३)
तप्त जनां[१९] तूंचि एक अमृतप्रपा[२०] । म्हणोनि प्रभू शरण तुला मी अपत्रपा[२१] ॥३॥
अलकावतिकांतमित्र[२२] तूं कृपाघना । सकलहृदयिं[२३] नांदतोसि[२४] स्वामि चिद्धना[२५] ॥४॥२६॥

*(२) दिवस रात्र (३) संसार (४) भाव म्हणजे अस्तित्व (५) नाहिपणा तुझ्या पायी संसाराचा भावहि नाही व अभावहि नाही असा अर्थ म्हणजे अत्यंत निर्विकल्प आहेत. (६) कमलाप्रमाणे (७) संसारसमुद्रात (८) सापडत नाहीत, अलिप्त राहतात (९) आतळत नाहीत, स्पर्श होत नाही (१०) संसार जलाला (११) शरीर (१२) ज्ञानाने मिथ्या न ठरणारा, विद्यावृत्तीने ब्रह्माचे ठिकाणी भासणारा (१३) सर्व ब्रह्मांडात अत्यंत सुंदर असणारा किंवा देहात अत्यंत प्रेमास्पद असणारा (१४) अयोग्य (१५) कुत्रे (१६) पोसलेले (१७) पैसा (१८) दुःखात (१९) दुःखी जनांना (२०) अमृताची पाणपोई (२१) निर्लज्ज होऊन, लज्जा सोडून (२२) श्रीज्ञानेश्वरमहाराजांचा सखा, गडी (२३) सर्वाच्या हृदयात (२४) राहतोस (२५) चैतन्यघन*

॥ ओव्या ॥

तुजवीण यादव आणि पांडव । न पवती[१] कीर्तिशोभातांडव[२] ।
जैसा नियामक[३] नसतां जीव । कलेवर[४] सावेव[५] अमंगळ[६] ॥२७॥
प्रभों ! आह्मीं तुजवांचुनी । अति तुच्छ कीं वाचुनी[७] । गृहस्वामी[८] नसतां शुनी[९] । केंवी जनीं वानिजे[१०] ॥२८॥

॥ करुणास्यवृत्तम् ॥

(वृजभाषांतर्गत गीतिकाधारेण.)

तव पादचिन्हित[११]ही नसे जरि (यदि) कुंभिनी[१२] यदुरक्षका[१३] ।
मणिशैलवृक्षयुताहि[१४] किंतु न शोभते भवभक्षका[१५] ॥
महि जिंकिली ममजें[१६] असें जन बोलती परि त्वद्विना[१७] ।
किमपी[१८] न विष्णु[१९] समर्थता[२०] तव दारुयंत्रनियुग्जना[२१] ॥२९॥

॥ ओव्या ॥

हे उत्तम देश ह्या नदी । हे पर्वत ह्या औषधी[२२] । तुझिया दृष्टीं कृपानिधी । पावती वृद्धि[१] स्वानंदें ॥१३०॥

*(१) पावत नाहीत, प्राप्त होत नाहीत (२) कीर्तीच्या शोभेच्या तांडवाला म्हणजे दिगंत कीर्तीला, अखंड निर्मल कीर्तीला (३) चालविणारा (४) शरीर (५) निश्चित (६) त्याज्य, अशुभ (७) जीवंत राहून (८) घरमालक (९) कुत्री (१०) प्रशंसा करावी (११) तुझ्या पायाचा ठसा, त्याने युक्त (१२) पृथ्वी (१३) यादवांचे संरक्षण करणारा (१४) मणि (रत्न) पर्वत, वृक्ष या सर्वांनी भरलेली असली तरी (१५) संसारनाशका (१६) माझ्या पुत्रांनी, अर्जुनादिकांनी (१७) तुझ्यावाचून (१८) कांहींही (१९) हे विष्णो (२०) सामर्थ्य (२१) दारुयंत्राप्रमाणे नियुक्त केल्या जाणाऱ्या लोकांना. लाकडाची बाहुली जशी हालविणाऱ्याच्या तंत्राने हालते त्याप्रमाणे सर्व लोक बाहुलीप्रमाणे तुझ्या तंत्राने वागतात. त्यांना स्वतंत्र सामर्थ्य कांही नाही (२२) वनस्पति.*

तुझिया दृष्टीं कृपानिधी । पावती वृद्धि[१] स्वानंदें ॥१३०॥

तुझें वज्रांकुश[२] साजिरें[३] । जें ध्यातां भजकमोह[४] जिरे[५] । तें[६] न दिसतां पूतनारे ! सौंदर्य सारें हरपतें[७] ॥३१॥

॥ श्लोक ॥ जातां हरी कुशल तैं नच पांडवांते । राही तरी सुख नव्हे मग यादवांते ॥
एवं बघोनि अति व्याकुल चित्तसत्त्वा[८] । प्रार्थि स्वयें सुत म्हणे परमार्थतत्त्वा[९] ॥३२॥

॥ ओव्या ॥

तूं विश्वात्मा[१०] सर्वेश्वर[११] । निर्गुण[१२] ब्रह्म निर्विकार[१३] ।
ज्ञानप्राप्या[१४] नंदसार[१५] । मुनिनिर्धार[१६] निजनिष्ठ[१७] ॥३३॥
तूं विश्वेश[१८] कर्पूरगौर[१९] । करिसी प्रलयीं प्रत्याहार[२०]। उपादान[२१] म्हणोनि साचार । तूंचि एक ॥३४॥ (य३.११४)
तूं विश्वरूप[२२] महाविष्णू । स्वभक्तापराधसहिष्णू[२३] । जैसा तुवां बोधिला[२४] जिष्णू[२५] । निजज्ञान[२६] देउनी ॥३५॥
तेंवी माझे पांडव यादव । परी हा केवळ अहंभाव[२७] । येथ स्नेह[२८] जो स्वयमेव । तो हे माधव ! निवारी ॥३६॥

*(१) वाढीला (२) वज्रांकुशध्वज चिन्हांनी युक्त पाय (३) सुंदर (४) भजन करणाऱ्याचे अज्ञान (५) नाहिसे होते (६) पाय (७) लोपते (८) अतिशय व्याकुळ चित्ताने युक्त असलेली (९) परमात्मज्ञान झालेली, परमार्थ तत्त्वाचा जिला लाभ झाला अशीं (१०) सर्वाचा आत्मभूत (११) सर्वाचा नियंता (१२) मायागुणरहित (१३) अविकारी, ज्यात कधी बदल होत नाही (१४) ज्ञानाने प्राप्त होणारा (१५) आनंदभूत, सारभूत (१६) मुनी ज्यांचा निश्चय करितात (१७) स्वस्वरूपभूत (१८) विश्वाचा पालनकर्ता (१९) शिव (२०) उपसंहार (२१) सर्व विश्वरूप कार्यात व्यापून राहणारे कारण (२२) जगत्स्वरूप (२३) आपल्या भक्तांचा अपराध सहन करणारा (२४) उपदेशिला (२५) अर्जुन (२६) आत्मज्ञान (२७) अहंकार (२८) प्रेम.*

तूं समान सर्वांभूती । मज देवोनि स्वानुभूती[१] । नित्य हृदयीं करी वस्ती । कारुण्यमूर्ति परेशा ॥३७॥
स्नेहपाश हा अतिदृढ[२] । जीवां बांधी अवघड[३] । तूं आम्हां भेटलासी उघड[४] । तरी हा तोड भवरोग ॥३८॥

॥अभंग ॥

तुझे ठायीं चित्त अनन्य हो लीन । वृद्धि क्षणक्षण प्रीति पावो ॥१॥
घडीघडी वाढो पायांची आवडी । प्रेमाची कावडी उचंबळो ॥२॥
देह जावो राहो तेथें नको जीव[५] । तुझे ठायीं भाव दृढ लागो ॥३॥
अविच्छिन्न[६] चाले जैसी तैलधारा[७] । तैसी सर्वेश्वरा त्वयि[८] भक्ति ॥४॥
मिळतां सागरा बहुविध ओघा । न गणीच गंगा जयापरी ॥५॥
तैसें माझें मन न गणोचि[९] विघ्न । तव पादध्यान ठसावो या ॥६॥
आळंदीचा राणा कृपावंत होय । साधेल हें कार्य झडकरी ॥७॥ ३९॥

॥ गीति ॥

श्रीकृष्णाऽर्जुनमित्रा[१०] यदुपति महिपतिकुकामकुलदमन[११]।
नित्य पराक्रमशीला[१२] तव[१३] पद गगनजजजोद्भवा[१४] नमन* ॥१४०॥
(*पाठभेद- तव चरण नभजजजातजा नमन ॥१४०॥)

॥अभंग ॥

पूर्णकाम[१५] नित्य तृप्त तूं गोविंद । स्मरतो अनिंद[१६] मुनीगण ॥१॥

*(१) आत्मानुभव (२) बळकट (३) कठीण (४) स्पष्ट (५) प्रीति (६) सारखी, अखंड, (७) तेलाची धार (८) तुझे ठिकाणी (९) जुमानीत नाही (१०) अर्जुनाच्या सख्या (११) राजांच्या दुष्ट कुलांचा नाश करणारा म्हणजे स्वैरवर्तनी, प्रजापीडक व विषयांध राजकुलांचा नाशक (१२) सदाविजयशाली, नित्यसमर्थ (१३) तुझ्या (१४) पदकमलाला. (१५) ज्याच्या सर्व वासना पूर्ण आहेत म्हणजे ज्याला वासनाच नाही (१६) निंदारहित, दोषरहित, शुद्धचित्त.*

गायीब्राह्मणांचें करावें रक्षण । आणीक भक्षण[१] भूद्रूहांचें[२] ॥२॥
सुरकार्य[३] तेंही सहजचि व्हावें । दीन उद्धरावे लीलागानें[४] ॥३॥
म्हणोनियां जन्म सगुण सुंदर । प्रेमळमंदीर[५] नारायणा ॥४॥
योगी तुज ध्याती म्हणोनी निर्गुण । तोचि तूं सगुण भक्तांसाठीं ॥५॥
ब्रह्मादिक गुरु त्यांचाही तूं गुरू । भावें नमस्कारू पायीं तुझ्या ॥६॥
ज्ञानेश्वर स्वामी करी कृपादृष्टी । सदा तूंचि सृष्टि भासतोसी ॥७॥४१॥

॥ ओव्या ॥

एवं अखिलोदय[६] गोविंद । कुंतीनें स्तवितां परमानंद । मुख करोनी स्मित मंद । चित्त भक्तांचें कर्षिलें[७] ॥४२॥

अथवा तें हास्यचि[८] माया । (य३-११५) तिनेंचि मोह[९] पाडोनिया ।
सांत्वन करोनी कुंत्यादि प्रायः । गंतुमिच्छि[१०] द्वारवती ॥४३॥
आपलें ठिकाणीं अनन्य भक्ति । कुंतीनें मागितली होती । ते तथास्तु[११]म्हणोनी श्रीपती । गजपुराप्रति[१२] प्रवेशले ॥४४॥
तेथ राहोनि कांहीं दिवस । पुसोनि सुभद्रादि स्त्रियांस । स्वपुरा जातां जगन्निवास । वर्तला पांडवांस आकांतू[१३] ॥४५॥
मग युधिष्ठिरादि सकळ । सप्रेमें वंदिती चरणकमळ । म्हणती यदुपते कांहीं वेळ । आणखी राही दयाळा ॥४६॥
त्यजुनी धन सदन[१४]कामिनी[१५]। योगी तुज न विसंबिती मनीं ।
आम्ही सप्रेमनाहीं म्हणोनी । जातोसि काय गोविंदा ॥१४७॥

*(१) नाश (२) भूमीचा किंवा भूमीवरील जीवांचा आपल्या सुखाकरिता द्रोह करणारे (३) देवाचे कार्य (४) चरित्रवर्णनाने (५) प्रेमळभक्तांचें हृदय ज्याला राहण्याला मंदिराप्रमाणे आहे; किंवा भगवंताचा सगुण विग्रह म्हणजे शुद्ध प्रेमाचे मंदिरच होय (६) सर्व मंगलरूप (७) ओढून घेतले (८) मंद स्मित, हासणे (९) आपल्याविषयी असलेली ईश्वर भावनेची वृत्ति लोपवून (१०) जाण्याची इच्छा करू लागला (११) ठीक आहे, तशी असो (१२) हस्तिनापुरास (१३) अत्यंत शोक (१४) घर (१५) स्त्रिया.*

परी अनुग्रह करोनि देवा । आपला अधिक वास[१] व्हावा ।
ऐसिया पाहोनि भक्तिभावा । आलें माधवा अवश्य राहणें ॥४८॥
युधिष्ठिर शोकसंपन्न । पाहोनि व्यासादि सांगती ज्ञान । आणि तैसाचि बोधी श्रीकृष्ण । कथाप्रगायन[२] करोनी ॥४९॥
परी न सुटे धर्मशोक[३] । येथ श्रोते होतील साशंक ।
कीं व्यासादिकीं बोधूनि देख । धर्म निःशोक[४] कां न झाला? ॥१५०॥
तरी ऐका समाधान । भीष्मयशविवर्द्धन[५] । व्हावें म्हणोनि धर्मे [६] ज्ञान । त्यापासोन शिकावें ॥५१॥
हा ईश्वराचा अभिप्राय[७]। तो अद्भुतकर्मा[८]यादवराव । स्वयें[९]जरी बोधिता होय । तरी अबोधवदुपाय दृढ करी ॥५२॥
जेंवी कौरवांसि संधी[१०] करावयासि गेला । परी युद्धचि दृढ करोनि आला ।
तेंवी भीष्मापासोनि ज्ञान मिळावें युधिष्ठिराला । म्हणोनि लौकिकत्वें[११] बोधिला परी शोकयुक्त ॥५३॥
व्यासांनीं ऐसें जाणोन । वरिवरी करिती सांत्वन । भीष्माकडे धर्मालागून । जावें घेऊन हरि इच्छी ॥५४॥
श्रीकृष्णाचा अभिप्राय । व्यासादिकीं जाणला होय । म्हणोनी शोक करी धर्मराय । तें निमुटपणें पाहती ॥५५॥

॥ संस्कृत गद्य ॥

व्यासाद्यैः[१२] प्रबोधितोऽपि शुचाव्याप्तः सन्नाबुध्यत विवेकं न प्राप ।
कुतः? ईश्वरेहाया अज्ञैः स्वभक्तभीष्मनिर्याणमहोत्सवाय राज्ञासह कुरुक्षेत्रं गन्तव्यम् ।
तत्र तन्मुखेनैव अयं प्रबोधनीय इतीश्वराभिप्रायः कार्यद्वयं विधायकस्तम्- अजानद्भिरिति । (य३-११६)

*(१) राहणे (२) नाना कथा सांगून (३) युधिष्ठिराचा शोक (४) शोकरहित (५) भीष्माची कीर्ति वाढावी (६) धर्मराजाने (७) हेतु (८) कर्तमकर्तुंमन्यथाकर्तु समर्थ, अद्‌भुत कर्म करणारा (९) आपण स्वतः (१०) तह (११) वरवर, लोकांना दिसावयाला (१२) **गद्याचा अर्थ** – भगवान् व्यासादिकांनी धर्माचा शोक घालविण्याकरिता पुष्कळ उपदेश केला, पण त्याचा शोक नाहिसा झाला नाही व त्याला कांही विवेक उत्पन्न झाला नाही. असे कां तर भगवंताच्या मनांतच, आपल्या किंवा व्यासादिकांच्या उपदेशाने धर्माच्या ठिकाणी विवेक उत्पन्न होऊन शोक नाहिसा व्हावा असे नव्हते, आपला परमभक्त भीष्माचार्य यांच्या निर्याणाचे वेळी धर्मराजासह कुरुक्षेत्रांत जाऊन भीष्माचार्यांच्या मुखानेच धर्माला उपदेश करवावा व त्याच्या उपदेशाने धर्माचा शोक नाहिसा करावा (व तेणेकरून आपल्या भक्ताची अगाध ज्ञानी म्हणून कीर्ति करावी) अशा प्रकारचे उभयविध कार्य साधण्याचा भगवंताचा त्यात हेतु होता, पण ईश्वराच्या अगाध लीलेविषयी अज्ञानी असलेल्या व्यासादिकांना तो भगवंताचा गूढ अभिप्राय समजला नाही म्हणून त्याच्या उपदेशाने धर्मराजाचा शोक नाहिंसा झाला नाही*

याठिकाणीं श्रीधराचार्य म्हणतात :- श्रीकृष्णाचा अभिप्राय व्यासादिकांनां समजला नाही; तें त्यांचें म्हणणें खरेंही असेल, पण तूं व्यास होऊन संसाररहित[१] सर्वज्ञ होशील; भूत, भविष्य, वर्तमान, तुझ्या जाणण्याच्या पलीकडे कांहींच राहणार नाहीं, असा अपांतरतममुनीला विष्णूंनीं वर दिला; या महाभारतवचनासी विरोधी वाटते.

॥ ओव्या ॥

सूत म्हणे शौनकादि मुनी । युधिष्ठिर संतप्त[२] मनीं । म्हणे पहा मी किती अज्ञानी । मारिल्या अक्षौहिणी वृथा ॥५६॥

देह तों कीटकादींचें खाजें[३] । तें म्यां म्हणोनिया माझें । कौरवादि मानोनि दुजे[४] । वधिले समाजे मिळोनी ॥५७॥
मारिले गुरु मारिलें बाळ । ऐसा मी हिंसक महाखळ[५] । नरकीं राहतां अनंत काळ । सुटका नव्हेल पैं माझी ॥५८॥
*(१) संसारभ्रमरहित (२) शोकयुक्त (३) भक्ष्य (४) परके (५) महादुष्ट*

हा ! हा ! कटकटा[१] म्हणोनी । निकें[२] अंग घाली धरणीं । पुढतीं म्हणे अक्षौहिणी । म्यां निर्याणीं[३] पाठविल्या ॥५९॥
युद्धीं मारतां वैरी । पाप नाहीं निर्धारी । हें बोलिलें आहे शास्त्रीं । परी ममांतरीं[४] न ठसावें ॥१६०॥
केवळ प्रजा पाळावया । युद्धी मारतां वैरिया । पाप नाहीं या अभिप्राया[५] । वदे शास्त्र ॥१६१॥
म्यां तंव राज्यलोभेंकरून । मारिले बाळ गुरुजन । यालागीं पापसंपन्न । अत्यंत जाण मी असे ॥६२॥
आणि माझिया हातीं । ज्या साध्वींचे[६] मेले पती । उद्देश नसतांही मजप्रती । घडला द्रोहो[७] स्त्रियांचा ॥६३॥
त्या पापांचा निर्गम[८] । करूं न शके गृहस्थकर्म[९] । नानायज्ञगणसंभ्रम[१०] । माझें पाप न निवर्ती ॥६४॥
किंचित्पंकेंकरूनि[११]जाण । पंकाब्धीचें[१२]नव्हे क्षालन[१३]। कीं किंचित् केलें मद्यपान । तेंचि बहु करून काय पुण्य ॥६५॥
प्रमादें[१४] केली भूतहिंसा । आणि तें पापनिवारणा[१५] बहु हिंसा । कां ऐसें करी तयाचा धिंवसा[१६] । मात्र उरे ॥६६॥
जिवंत न पोसितां गुरुजन[१७] । मेलिया करणें गयावर्जन[१८] ।
तेंवी पशुहिंसायुत[१९] याग[२०] करून । मम मोचन[२१] कदा नोहे ॥६७॥
अश्वमेधें पापनिवृत्ति[२२] । ऐसी जरी सांगे श्रुति । तें प्रमाण तथापि निश्चिती । चित्ता शांति येईना ॥६८॥(य३-११७)
एवं धर्म शोकसंपन्न । तयासी आतां जगज्जीवन । भीष्माकरवीं वदवील ज्ञान । रसाळ[२३] निरूपण हें पुढें ॥६९॥

*(१) देवा ही दुष्टबुद्धि कोठून आठवली (२) अत्यंत (३) मृत्युलोकी (४) माझ्या चित्तात (५) हेतूने (६) सच्छील स्त्रियांचे (७) द्वेष (८) नाश (९) गृहस्थाश्रमांतील कर्मे. (१०) नाना प्रकारच्या यज्ञसमूहांच्या खटपटी (११) थोड्याशा चिखलाने (१२) चिखलाच्या समुद्राचे (१३) धुणें (१४) जाणून बुजून (१५) त्या पापाच्या नाशाकरिता (१६) धैर्य (१७) वडील माणसे (१८) गयाश्राद्ध (१९) पशुहिंसा ज्यात घडते असे (२०) यज्ञ (२१) पापापासून सुटका (२२) पापनाश (२३) गा*

॥ दोहा ॥

अलकावतिपतिपादुका[१] संसृतिकुवनकुठार[२] ।
हृदयिं धरुनि मुनि पावती स्वपद[३] करुनि रिपु[४] ठार ॥१७०॥

॥ हरिःॐ तत्सत् श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरकृपाप्रसादे नानाछंदबद्धे गद्यपद्यान्विते प्रियलीलामहोत्सवे आमंत्रणविलासे कुंतिस्तुति-युधिष्ठिरानुताप-निरूपणन्नाम अष्टमसखीप्रेषणम् ॥
॥ श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ॥

०००

## सखीप्रेषण ९ वें. विषयानुक्रम

***भीष्मांचा युधिष्ठिरास उपदेश, भीष्मस्तुती, भीष्ममुक्ति व युधिष्ठिराला राज्यप्राप्ति वर्णन. (पृष्ठ ११८-१३६)***

*मंगलाचरण. शोक निवृत्त्यर्थ भीष्ममुखानें ज्ञान श्रवण करण्याकरितां कुरुक्षेत्री जाण्याचा धर्मराजाचा विचार, त्याला श्रीकृष्णाचें अनुमोदन, सर्वांचें (श्रीकृष्णासह) भीष्मशरशय्येपाशीं समागमन ११८. भीष्मांचा समागम व श्रीकृष्णाचें अनायासदर्शन या दोन्ही लाभांच्या आशेनें समस्त देवर्षि आदिकरून ऋषीमुनींचें शिष्यासह तेथें आगमन व श्रीकृष्णासहवर्तमान सर्वांचें पूजन केल्यानंतर युधिष्ठिरादिकांनां उद्देशून स्नेहसजल नेत्रानें भीष्मांनी केलेलें भाषण :- धर्म, विप्र व भगवान् श्रीकृष्ण यांचा आश्रय असतां पांडवांनीं शोकग्रस्त असावें याविषयी सखेदाश्चर्य व सर्व प्रकारचें पाठबळ असतांनां ज्याअर्थी दुःखें प्राप्त होतात त्याअर्थी हें सर्व कालकृत असून कालगतीच अनिवार आहे. अशा शब्दांनीं पांडवांचें सांत्वन ११९. सर्वाला काल कारण आहे तर प्रयत्न कां करावा? अशी शंका व तिच्या समाधानार्थ कालादिकांची (काल, दैव, परेशेच्छा) साधारण अपेक्षा सर्वांनां असून विशेष अपेक्षा प्रयत्नाचीच आहे. याविषयीं भीष्माच्या म्हणण्यांतील अभिप्राय सयुक्तिक निरूपण १२०. परमात्म्याची भक्तिवशता व तो (परमात्मा) कर्मफलदाता असूनही कोणाच्या कालदैवादिकांचें निवारण न करण्याचे कारण १२०. बीजवृक्षाचा व गवळ्यांचा दृष्टांत, कर्म तत्फलदाता ईश्वर व जीव यांचा अनादि संबंध, गुरु, शास्त्र आणि विचार यांच्या साह्यानें प्रयत्नाची*

शक्यता व ईश्वराचीं पर्जन्यवत् साधारणकारणता १२१. दैवालाही प्रयत्नानें वळवितां येतें असें वसिष्ठमत, ब्रह्मसूत्र व शारीरभाष्यानुसार परमात्म्याचें कृतप्रयत्नापेक्षित्व, श्रीकृष्णपरमात्म्याच्या गूढकर्तव्याची अगम्यता व पूर्वी झालेलें दुःख दैवादिकांवर टाकून श्रीकृष्णाचा अनुचर होऊन प्रयत्नानें स्वधर्म साधण्याविषयी आज्ञा १२१. दैव शब्दाचें यथार्थलक्षण व प्रयत्नाची योग्य दिशा १२२. परमात्म्याचें शरीर मायेनें झालें आहे व सृदिानंदरूपच परमेश्वरशरीर (य३-१५) आहे असें मधुसूदन स्वामींनीं गूढार्थदीपिकेंत दाखविलेले दोन पक्ष व पतिव्रतेच्या दृष्टांतानें त्यांचा समन्वय १२२. भगवच्छरीरापासून सुख, दुःख, व मोह हे तिन्ही होत असल्यामुळें तें त्रिगुणात्मक म्हणजे प्रकृतिजन्यच असलें पाहिजे याविषयीं भक्तिरसायन, पंचदशी व सांख्य भाष्याचें प्रमाण देऊन शिष्याची शंका व तिच्या निरसनार्थ श्रीकृष्णाचें ब्रह्मानध्यस्तविवर्तरूप, त्यापासून मूढांनां त्यांच्या त्यांच्या गुणारोपा प्रमाणें सुखादिकांची प्राप्ती व संतप्रत्ययभिन्न मूढांच्या सुखाचा अर्थ या विषयीं सदृष्टांत निरूपण १२३. आपल्या भक्तांच्या ठिकाणीं परमात्म्याचें ब्रह्मत्वच प्रगट आहे याविषयीं भगवद्गीतेंतील वचनांचे भावार्थनिरूपण १२४. याचा प्रभाव जाणणारे याचें अपरस्वरूप असे महात्मे याचें अनन्य भजन कसें करतात ती रीति १२५. पांडवांनीं श्रीकृष्णाच्या ठिकाणीं सोयरेपणाचें नातें ठेवून अनेक प्रकारचीं कामें करवून घेतलीं याविषयीं निषेध व त्यानें केलेल्या उपदेशांतील वर्म न कळण्याचें कारण. असा हा परमात्मा असून आमचा सारथी कसा झाला अशी शंका आल्यास तिच्या निरसनार्थ श्रीकृष्णाची सर्वात्मक अद्वैतस्थिति निरूपण १२५।१२६. देवानें अर्जुनाला विश्वरूप दाखविलें त्यावेळीं ''या कौरवांनां मी मारलें आहे तूं निमित्त मात्र हो'' असें म्हटलें व अर्जुनाला आपला भक्त म्हटलें यावरून श्रीकृष्णाचे ठायीं विषमत्व येतें अशी कोणी शंका केल्यास तिच्या निरसनार्थ हा परमात्मा कर्माप्रमाणें फल देतो, एकाला वैर व दुसऱ्याला भक्ति असें वैषम्य त्याचे ठिकाणीं नाहीं, याविषयीं म्लेच्छांपासून अर्जुन आपलें रक्षण करूं शकला नाहीं ही महाभारतकथानिरूपणपूर्वक विवेचन १२६. या प्रभूला लोकांत भक्तिवश कां म्हणतात यांतील वैशेष्य पतिव्रतेच्या दृष्टांतानें निरूपण व वंद्यासंसक्तीचा आश्रय करून परमात्मा भक्ताधीन कसा असतो याविषयीं दृष्टांत १२६. ईश्वराच्या वंद्यासंसक्तिविषयीं शिष्याची शंका व तिच्या निरसनार्थ वंध्यासंसक्तीची बंधनरूपता, भक्तीवांचून इतर जीवन्मुक्तांनां तिचा सोसावा लागणारा त्रास, भक्तीसहित जीवन्मुक्तांच्या ठिकाणी वंध्यासंसक्तीचा अभिभव व यावदधिकार वंद्यासंसक्तीची संप्राप्ती. परमेश्वराचा (य३-१६) अनध्यस्तविवर्तरूप देह नित्य असल्यामुळें त्याच्या प्रेमवर्धकत्वादि वंद्यासंसक्तीची नित्यता, अनध्यस्तविवर्तत्वामुळें त्यांची नित्यमुक्ति व परमार्थाचें यथार्थ लक्षण याविषयीं सप्रमाण निरूपण १२७. हा परमात्मा विषमरहित असूनही एकान्त भक्तावर अनुग्रह करणारा आहे याविषयीं भीष्मांनीं स्वतः आपलेच दिलेलें उदाहरण १२८. याप्रमाणें भाषण करून भीष्मांची झालेली स्थिती व भक्तिगंगेंत देह ठेवण्याचें महत्वनिरूपण १२८. जडशरीराचा स्वेच्छेनें त्याग करीपर्यंत तो प्रेमळ सखा आपल्या समोर उभा राहो अशी भीष्माची याचना व भगवन्मूर्तीचें ध्यानवर्णन १२९. ह्या भीष्माच्या स्थितीविषयीं मयूरपंतवचन व ''गीतामृतनिधी'' या शब्दाचा भावकथन. पितामहाला याप्रमाणें कृपासंपन्न पाहून युधिष्ठिरानें विचारलेले नाना धर्म व ते समस्त सांगत असतांनां उत्तरायणाची संप्राप्ती १२९. नंतर वाणीचा उपसंहार करून भगवंताच्या ठिकाणीं विशुद्ध धारणा केली असतां भीष्माच्या सकल श्रमांचा परिहार व त्यांनीं श्रीकृष्णाचा केलेला प्रेमळ स्तवः- तटस्थ व स्वरूप लक्षणें करून भगवंताचें स्तवन व साहित्यशास्त्रदृष्ट्या 'रति' शब्दाचें लक्षण. श्रीकृष्णाचें सगुणध्यानवर्णन १३०. युद्धसमयीं श्रीकृष्णाच्या सारथ्यस्वरूपाचें वर्णन १३१. अर्जुनाचें ठिकाणीं श्रीकृष्णाचें सख्यप्रेम व शिष्यप्रेमवर्णन. गीतोपदेशामुळें श्रीकृष्णाचें जगद्गुरुत्व व गीतेचें औदार्य १३१.स्वतःची प्रतिज्ञा मोडून स्वभक्ताच्या (भीष्माच्या) प्रतिज्ञेचें रक्षण करण्याकरितां हातीं चक्र घेऊन (भीष्मवधार्थ) श्रीकृष्ण धांवले असतां त्या प्रसंगीचें श्रीकृष्णध्यान व स्वतःचा आततायीपणा यांचें हृदयद्रावक वर्णन १३२. भगवन्मुखश्री अवलोकन करीत युद्धांत मेलेल्या वीरांची उत्तम गती व श्रीकृष्णाचा अहेतुक अनुग्राहक स्वभाववर्णन १३२. धर्मरहित भगवद्भक्तीनेंही हा परमात्मा उद्धार करितो याविषयीं गोपीभक्ति वर्णन १३३. गोपिकांचें जारत्वीं पतिव्रतापण व सत्कार्यदृष्टीनें हरीस्त्रीत्वाची नित्यता १३३. इतरांचें अंतःकरणही तत्समान असून अभिभूत होण्याचें कारण १३४. मिश्र सत्त्वगुणामुळें अभक्त ज्ञानियांची विदेहमुक्ति व श्रीकृष्णप्रेमानें शुद्धसत्त्वगुणामुळें गोपिकांची नित्यमुक्तिवर्णन. आचार्य (य३-१७) व तातवचनप्रामाण्यानें गोपिकांची अभेदभक्तिनिरूपण १३४. हरिहरत्वेंकरून जगत्पूज्य अशा श्रीकृष्णाचें स्तवन व भीष्मांचे स्वानुभूतिविषयीं उद्गार १३५. भीष्माला प्राप्त झालेल्या पूर्ण ब्रह्मात्मैक्य स्थितीचें सूतानें केलेलें वर्णन १३६. भीष्ममुक्तिदर्शनानें तिन्ही लोकांत आनंद व मंगलोत्सव. उपसंहारः- श्रीकृष्णास घेऊन युधिष्ठिराचें गजपुरास आगमन व प्रजेचा उत्कर्ष. श्रीज्ञानेश्वर चरणीं प्रणाम करून भगवन्नामस्मरण.

ooo

# सखीप्रेषण ९ वें.

## भीष्माचार्यांचा युधिष्ठिरास उपदेश

**॥ श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरमाउली समर्थ ॥**

**॥ पद ॥**

**नूतनजलदतनू[५] । वंदू ॥धृ०॥**
**ज्याचा आश्रय करुनी वदती भजक[६] विभव[७] न गणू[८] ॥१॥**
**यद्वाणीच्या दृढ विश्वासें । हरत कुतर्कि ननू[९] ॥२॥**
**अलकावतिपतिनंदिनिप्रियकर[१०] । जो सच्चित्कघनू[११] ॥३॥१॥**

**॥ दिंडी ॥**

**सूत बोले तेधवां[१२] विप्रराया । प्रजाद्रोहें[१३] तापली धर्मकाया[१४]॥**
**धर्म[१५] जाणाया कुरुक्षेत्रिं जावे । भीष्मभेटी होईल प्रेमभावें ॥२॥**

*(१) श्रीज्ञानेश्वर महाराजांचे चरण (२) संसाररूपी अत्यंत कंटकयुक्त वनाचे कुऱ्हाडीप्रमाणे छेदन करणारे (३) आत्मपद, आत्मस्थिति (४) षड्रिपु (५) नवीन मेघाप्रमाणे ज्याची अंगकांति आहे (६) भजन करणारे (७) अविद्याप्रपंच (८) जुमानीत नाही (९) कुतर्कीयांच्या शंका (१०) श्रीज्ञानेश्वर महाराजांच्या कन्येचे पति श्रीकृष्ण (११) सच्चिदानंदघन (१२) तेव्हां (१३) युद्धांत मारविलेल्या आप्तेष्टांच्या हिंसेने (१४) धर्मराजाचे शरीर (१५) क्षात्रधर्माचे ज्ञान करून घेण्याकरिता.*

**॥ अभंग ॥**

**धर्माचे मनींचा सर्व अभिप्राय[१] । स्वामी यदुराय जाणता तो ॥१॥**
**तेच क्षणीं दिले अनुमोदनातें[२] । म्हणे हेंचि सत्य जाण धर्मा ॥२॥**
**सकळ धर्मांचा जाणता तो एक । समर्थ सम्यक देवव्रत ॥३॥**
**चला तेथें आतां सर्वजण जाऊं । ऐकोनियां घेऊं शुद्ध ज्ञान ॥४॥**
**ऐसें बोलोनीयां कृष्ण व्यास धौम्य । आणिकही सौम्य सर्वजण ॥५॥**
**चारी बंधूसह युधिष्ठिर रावो । झाले स्वयमेवो[३] रथारूढ ॥६॥**
**आले तदा भीष्मशरशय्येपाशीं । नमिती पायांसी सहाष्टांगें[४] ॥७॥**
**ज्ञानेश्वरप्रभू जीविंचा जिव्हाळा[५] । पुढें ज्ञानकळा[६] उपदेशी ॥८॥-३॥ (य३-११८)**

**॥ संस्कृत गद्य ॥**

**एवं[७]युधिष्ठिरो देवव्रतवक्त्रात् ज्ञानं गृहीतुमागत इति ज्ञात्वा प्रेम्णा श्रीकृष्णदर्शनं च भवतीति विचार्य, देवर्षयोर् ब्रह्मर्षयोः राजर्षयश्च तथा पर्वतो नारदो धौम्यो व्यासो बृहदश्वो भरद्वाजः परशुरामो वसिष्ठ इंद्र प्रमदस्त्रितो गृत्समदः कक्षीवान् गौतमोऽत्रिः कौशिकः कश्यपः शुकाऽन्ये च ऋषयः शिष्यैः सह भीष्म-समागमं कर्तुं समागताः ।**
**तानेतान्दृष्ट्वा स भगवान् गांगेयः प्रेम्णापूजयामास ।**
**श्रीकृष्णश्च तनुवाङ्मनोभिर् अर्चितवान् अग्रे युधिष्ठिरादीन् पण्डुजान् दृष्ट्वेदमाह ॥**

*(१) हेतु, विचार (२) होकार (३) आपण (४) साष्टांग, अष्टांगासह (५) प्रेम (६) ज्ञानाचा अंश, शोक जाण्यापुरते ज्ञान (७) संस्कृत गद्याचा अर्थ याप्रमाणे ''भीष्माच्या मुखाने ज्ञानोपदेश ऐकण्याकरिता धर्मराज आला आहे असे जाणून व या प्रसंगी श्रीकृष्ण भगवंताचेहि दर्शन होण्याचा सुयोग आहे असे वाटून देवर्षि, ब्रह्मर्षि आणि राजर्षि त्याचप्रमाणे पर्वत, नारद, धौम्य, व्यास, बृहदश्वा, भरद्वाज, परशुराम, वसिष्ठ, इंद्रप्रमद, त्रित, गृत्समद, कक्षीवान्, गौतम, अत्रि, कौशिक, कश्यप, शुक.''इत्यादि ऋषि व इतरहि दुसरे ऋषि आपल्या शिष्यांसह भीष्माचार्यांचा समागम करण्याकरिता मोठ्या प्रेमाने आले. त्या सर्वांना आलेले पाहून भगवान् भीष्माचार्यांनी त्या सर्वांचे प्रेमानेच पूजन केले. श्रीकृष्णाचेहि मनवाणी कायेने अर्चन करून समोर युधिष्ठिरादि पांडवांना पाहून भीष्म म्हणाले.*

स्नेहें[१] जलभरीलोचन[२] । वदे भागीरथीनंदन[३] । तुह्मी सर्वही धर्मसंपन्न[४] । काय म्हणून शोकग्रस्त ॥४॥
तूं युधिष्ठिर तूं भीम तूं अर्जुन । तुह्मी दोघे माद्रीनंदन । शोक करितां काय म्हणोन । जीवीं[५] अज्ञान धरोनी ॥५॥
येथ तुमचे पाठिराखे[६] । हे व्यासादि विप्र निके[७] । जयांच्या आश्रयें नेटके[८] । भूमिपालनीं[९] समर्थ ॥६॥
पाळावया गायी ब्राह्मण । तुम्हां झालें तनुधारण[१०]। ते तुम्ही शोक करितां दारुण[११]। तरी अन्याय[१२] पूर्ण मज वाटे ॥७॥

परलोकीं[१३] तुमचा पाठिराखा । आणि इहलोकींही परमसखा ।
सत्य धर्म असतां देखा । किमर्थ शोका आतुळले[१४] ॥८॥
पुनः स्नेहातुरवाणी[१५] । म्हणे विप्र[१६] धर्म[१७] शार्ङ्गपाणी[१८] ।
आधार असतां तुम्हालागुनी । क्लेश[१९] जीवनीं होताती ॥९॥

जेथ विप्र धर्म कृष्ण । तेथ दुःखनिकृंतन[२०] । परी तुमचें दुःखीं जीवन[२१] । आश्चर्यपूर्ण मज वाटे ॥१०॥

*(१) प्रेमाने (२) डोळ्यांत अश्रु आणून (३) भीष्माचार्य (४) धर्माने वागणारे (५) आपले ठिकाणी (६) रक्षण करणारे (७) अति योग्य, समर्थ (८) उत्तम रितीने (९) राज्यसंरक्षण करण्यास (१०) शरीर घेणे (११) भयंकर (१२) अयोग्य (१३) मेल्यावर (१४) स्पर्शले, युक्त झाले (१५) प्रेमाने, सद्‌गदित वाणीने (१६) ब्राह्मण (१७) क्षात्रधर्म (१८) श्रीहरी (१९) कष्टमय आयुष्य, कष्टात, दुःखात काळ घालविणारे (२०) दुःखाचा समूळ नाश (२१) आयुष्य*

॥ गीति ॥

अतिरथि[१] पंडु दिवंगत[२] जेव्हां आणी तुम्हीहि अतिलहान ।
तैं तुमच्या मातेनें कष्टहि किति सांगु सोशिले गहन[३] ॥११॥

॥ ओव्या ॥

एवं तुमचियावर । दुःख कोसळें[४] वारंवार । येथ काळगतीच[५] अनिवार[६] । ऐसें मी म्हणे ॥१२॥
कृष्णाऐसा पाठिराखा । आणि गांडीव धनुष्य देखा । ध्वजस्तंभीं[७] रघुपतिसखा[८]। रथ तरी निका[९]अक्षय[१०] ।१३॥
राजा तंव[११] धर्मसंपन्न[१२]। गदाधारी[१३] पवनजनन[१४]। अस्त्रवेत्ता[१५] शक्रनंदन[१६]। विपत्ती[१७] दारुण परि होती ॥१४॥
यास्तव मज ऐसें वाटे । हें सर्व कालकृत[१८] ओखटें[१९] । जगचि हें नेटपाटे[२०] । काळचपेटे[२१] साहत ॥१५॥
(य३-११९)दोन्ही कर जोडून । शिष्य सादर करी प्रश्न । कीं सकळातें[२२]जें काल कारण । तरी प्रयत्न कां कीजे[२३] ॥१६॥
समर्थ श्रीगुरुरावो । फेडिती शिष्यसंदेहभावो[२४] । वक्ता म्हणे तें ऐका हो । श्रोते निर्मोह[२५] चतुर तुम्ही ॥१७॥

*(१) महान् योद्धा, (२) मेल्यावर (३) भयंकर (४) येऊन पडले (५) कालाची गति, काळाचा प्रभाव (६) कोणालाहि टाळता न येणारा (७) रथाचे ध्वजावर (८) मारुती (९) अगदी (१०) नाश न पावणारा (११) आणखी त्यातहि (१२) धर्मपरायण (१३) हातात गदा घेतलेला (१४) भीम (१५) संपूर्ण अस्त्रविद्या जाणणारा (१६) अर्जुन (१७) संकटे (१८) कालाने घडून आलेले (१९) अगदी, निःसंशय (२०) सारखे (२१) काळाचे तडाखे (२२) सर्व गोष्टीला (२३) करावा (२४) शिष्याची शंका (२५) मोहरहित, विरक्त.*

**श्रीगुरुरुवाच :-**

दुःखं स्वभावतो द्वेष्यं तन्निवृत्तिरपेक्ष्यते । तथापि भुक्तं नष्टं स्याद् वर्तमानं विनश्यति ॥१८॥
तस्मात्सर्वप्रयत्नेन हेयं दुःखमनागतम् । योगसूत्रसांख्यभाष्याभ्याम् एतदुपपादितम् ॥१९॥
कालो दैवं परेशेच्छा भूतशोकनिवृत्तये । भाविहानौ प्रयत्नस्स्याद् अतो मोहन्नतु व्रज ॥२०॥

याप्रमाणें हें सर्व कालाच्या योगानें झालें आहे, अथवा दैवानें झालें आहे, अथवा परमेश्वरानें केलें आहे, इत्यादि समाधान झालेल्या[१] सर्व दुःखाविषयीं शोक करणाऱ्याकरितां समजावें. अनागत[२] दुःखांची निवृत्तिही[३] कालादिकांनेंच[४] होईल असें मात्र समजूं नये. कारण अतीत[५] दुःख भुक्त असल्यामुळें त्याविषयीं शोक करणें व्यर्थ आहे. परंतु अनागत दुःख निवृत्त करण्याला योग्य आहे. असें योगसूत्रांत व सांख्यभाष्यांत सांगितलें असल्यामुळें, तेथें[६] प्रयत्नच अपेक्षित[७] आहे. अन्यथा[८] पुढील[९] जरामृत्युआदिक[१०] दोष जाणून[११] जें वैराग्य होतें तें व्यर्थच होऊ लागेल. शिवाय काल, दैव, आणि ईश्वर यांची जरी सर्वांनां साधारण अपेक्षा[१२] आहे, तरी विशेष अपेक्षा प्रयत्नाची आहे.

*(१) प्राप्त झालेल्या दुःखाविषयी शोक करणारे जे असतात त्याचे समाधान करण्याकरिता (२) पुढे येणाऱ्या, वर्तमानकाळी*

*प्राप्त नसलेल्या (३) नाश (४) प्रयत्नावाचून (५) पूर्वी भोगलेले, भुक्त (६) पुढे येणाऱ्या दुःखाविषयी (७) अवश्य (८) नाहीतर (९) पुढे येणारे (१०) म्हातारपण, मरण, इत्यादि (११) त्यांचे ठिकाणी दोष-दृष्टि करून. (१२) आवश्यकता.*

म्हणून अतीत[१] दुःखाविषयीं शोक करीत होत्साता धैर्य सांडून[२] प्रयत्नशून्य[३] होणें विबुधांस[४] योग्य नाहीं. अशा अभिप्रायानें[५] हें सर्व अतीत दुःख कालदैवाच्या योगानें झालें आहे असें मी मानतो, असें भीष्म बोलले. पुनः भीष्म म्हणाले, हे युधिष्ठिर ! तूं या श्रीकृष्णाच्या अनुवर्ती[६] होऊन प्रजांचें रक्षण कर. हा परमात्मा धर्मानें व तुझ्या भक्तीनेंच तुला वश होणारा आहे. हा परमात्मा मायेच्या योगानें कर्ता भासत असला तरी वस्तुतः[७] अकर्ता[८] असल्यामुळें मायायोगें[९] कर्मफलदाता[१०] होत्साताही[११] कोणाच्या (य३-१२०) कालदैवादिकांचें निवारण[१२] करीत नाहीं. हा परमात्मा मायारहित आकाशाप्रमाणें असंग[१३] असून आपेक्षिकबिम्बत्वारोपानें[१४] हा पर्जन्यासारखा[१५] सर्वांच्या[१६] कर्मबीजाला[१७] फलरूपपुष्टिदाता[१८] आहे. म्हणून याजकडे नैर्घृण्य[१९] किंवा वैषम्यदोष[२०] येत नाहींत. बीजवृक्षाचा[२१] जन्यजनकप्रवाह[२२] जरी अनादि[२३] आहे, तरी आपल्या

आंगणांत झाड लावणें हें कोठें बीजापासून, तर कोठें वृक्षाच्या शाखेपासून, मनुष्यप्रयत्नानें उत्पन्न करून घेतां येते.

*(१) निघून गेलेल्या, मागील (२) सोडून (३) प्रयत्नरहित (४) शहाण्यास (५) मागील दुःखाचे सांत्वन करण्याकरिता (६) आज्ञापरायण (७) यथार्थ दृष्टीने, ज्ञानदृष्टीने (८) कांही करीत नाही (९) मायेमुळे (१०) कर्माचे फळ देणारा (११) असूनही (१२) नाश (१३) कशाशीहि संबंध न ठेवणारा (१४) जीवरूपी प्रतिबिंबामुळे ब्रह्माचे ठिकाणी बिंबत्वाचा म्हणजे ईश्वरत्वाचा आरोप झाला या आरोपाने (१५) पावसाप्रमाणे (१६) सर्व जीवांच्या (१७) कर्मरूपी बीजाला (१८) फलरूपाने साह्य करणारा म्हणजे जमिनीत पेरलेल्या बीजाला पाण्याच्या योगाने ज्याप्रमाणे फळ येते त्याप्रमाणे जीवाच्या कर्माला परमेश्वराच्या साह्याने फळ येते (१९) निर्दयपणा (२०) सर्वांशी सारखे न वागणे (२१) झाडाचा व त्याच्या बीजाचा (२२) बीजापासून झाड व झाडापासून पुनः बीज उत्पन्न होणे, एकमेकापासून एकमेक उत्पन्न होणे व एकमेकाला एकमेकाने उत्पन्न करणे हा ओघ (२३) प्रथम, प्रारंभाविरहित.*

अथवा ज्या वर्णाची किंवा ज्या आकाराची गाय उत्पन्न करावयाची असली, तशी ती गौळ्यांनां सामुग्रींचा[१] आश्रय घेऊन प्रयत्नानें करितां येते. तद्वत्, कर्म आणि तत्फलदातृ[२] ईश्वर व जीव यांचा संबंध जरी अनादि असला तरी आपल्याला योग्य[३] कोणतें, हें गुरु, शास्त्र व विचाराचा आश्रय घेऊन प्रयत्नानें आचरितां येते, आणि ईश्वर पर्जन्यवत् साधारण[४] कारण मात्र राहतो. झालेलें अजीर्ण ज्याप्रमाणें दुसऱ्यादिवशीं औषधीनें नाहींसें करितां येते, तद्वत् दैवालाही प्रयत्नानें वळतां येते असें वसिष्ठ म्हणतात. जसें जसें बीज वाढूं लागेल, तशी तशीच त्याला पुष्टि जल देत असते. तद्वत्, ज्याचा जसा प्रयत्न असेल तसें त्याला फल परमात्मा देत असतो. प्रयत्नावांचून दारुयंत्रासारख्या[५] जीवांनां अनादिदैवानें परमात्मा फल देतो असें मानलें, किंवा परमात्माच स्वतः प्रयत्नावांचून करवितो असें मानलें, तर दोहीपक्षीं विधिनिषेधशास्त्र[६] लागू[७] होणार नाहीं. आणि कदाचित् साधनचतुष्टयसंपन्न[८] तपस्वी नरकांत जाऊन ब्रह्महत्यारी[९]

*(१) पाश्चात्यांच्या जननशास्त्राप्रमाणे आपल्याकडेहि बृहत्तंत्रसारादिकांतून ह्याचे उपाय सांगितले आहेत. संयोगकाळी पुरुषांच्या किंवा पशूंच्या समोर आपल्याला जशी संतती उत्पन्न करावयाची असेल, तशा वस्तूंची चित्रे सभोवार लाविल्याने तशी संतती उत्पन्न होते (२) कर्माचे फल देणारा (३) हितावह, कल्याणकारक (४) नुस्ते साह्य करणारा (५) लाकडाच्या बाहुल्याप्रमाणे (६) अमुक करा व अमुक करू नका हे वेदाचे सांगणे (७) सार्थक ठरणार नाही (८) विवेक, वैराग्य, शमदमादि षट् संपत्ति व मुमुक्षा साधनांनी युक्त (९) ब्रह्महत्या करणारा.*

परमपदाला[१] जाईल. आणि असें गृहीत[२] केलें म्हणजे वेदप्रामाण्य अस्ताला[३] गेलेंच म्हणावयाचें. म्हणून हा परमात्मा कृतप्रयत्नापेक्षी[४] आहे, असें बादरायणाचार्यांनीं ब्रह्मसूत्रांत व श्रीमच्छंकराचार्यांनीं त्याच्या भाष्यांत सत्य सांगितलें आहे. म्हणून तूं श्रीकृष्णभक्ति आणि प्रजापालनधर्म[५] करीत ऐस. शिवाय, ह्या कृष्णाचें गूढ[६] कर्तव्य मोठ्या मोठ्यांनां देखील समजणें शक्य नाहीं. कारण हा कालातीत[७] असल्यामुळें पूर्वगुरूंचाही[८] गुरु आहे. म्हणून जें जें कांहीं तुला पूर्वी दुःख झालें असेल तें दैवादिकांवर[९] टाकून श्रीकृष्णाचा अनुचर होऊन प्रयत्नानें स्वधर्म साध. (य३-१२१)

**दैव म्हणजे परेशु[१०] । जो परमात्मा सर्वेषु[११] । तदधीन[१२] हा जगद्विलासू[१३] । जाण सकळ ॥२१॥**
**यालागीं करोनि यत्न । शोधोनि काढी हृदयींचें रत्न[१४] । सृद्दिानंद जगज्जीवन[१५] । जो श्रीकृष्णस्वरूपची ॥२२॥**
**तदनुचर[१६] होऊनी तात[१७] । सकळ प्रजांचा तूं नाथ[१८] । यालागीं या अनाथ[१९] । रक्षी प्रजा ॥२३॥**

॥ गद्य ॥

हे धर्मज्ञा ! हा परमात्मा[२०] जीवरूपप्रतिबिम्बापेक्षिकबिम्बत्वनामआरोपित[२१] ब्रह्मच होत्साता[१]

*(१) मोक्षाला (२) मानले (३) लयाला (४) जीवाने जसा प्रयत्न केला असेल तदनुसार फळ देणारा (५) आपल्या प्रजेचे पालन करणे हा जो राजाचा धर्म, त्याचे आचरण (६) ईश्वरसंकल्प, अगाध लीला (७) कालाच्या पलीकडे, कालाचा प्रभाव ज्याच्यावर चालत नाही, उत्पत्तिनाशरहित (८) सर्वाचा आदिगुरु (९) दैवाने किंवा काळाने किंवा भगवदिच्छेने झाले असे समजून (१०) ईश्वर (११) सर्व पदार्थामध्यें (१२) त्याच्या स्वाधीन (१३) जग्ग़ापार (१४) अमूल्य वस्तु (१५) जगाचा प्राण (१६) त्याचा आज्ञाधारक (१७) बापा (१८) स्वामी (१९) दीन, राजावाचून असलेल्या (२०) श्रीकृष्ण (२१) प्रतिबिम्बरूप जो जीव त्याच्या अपेक्षेने ज्या शुद्ध ब्रह्माचे ठिकाणी बिम्बसंज्ञेचा आरोप झाला ते शुद्ध ब्रह्मच.*

ब्रह्मच होत्साता[१] अनध्यस्तविवर्तत्वेंकरून[२] पौरुषेयरूपधारी[३] सर्वजीवांनां ज्ञान देणारा आहे. आणि ज्याप्रमाणें मृगजळाला पाहून मृग मोह[४] पावतात, किंवा सुवर्णाचा[५] न जाणणारा सुवर्णालंकार[६] पाहून ठाऊक असलेल्या पित्तलधातूचे[७] आहेत असें म्हणतो, तद्वत् ह्याचें[८] स्वरूपाला न जाणणारे मूढ, मनुष्यासारखे ह्या परमेश्वराचें स्वरूप पाहून, याच्या मायेनें मोह पावतात. या स्थानीं हें रहस्य आहे. परमेश्वराचें शरीर मायेनें झालें आहे असा एक वाद आहे. आणि स्रादिानंदरूपच परमेश्वराचें शरीर आहे, असा दुसरा पक्ष आहे. हे दोन्ही पक्ष मधुसूदनस्वामींनीं आपल्या गुढार्थदीपिकेंत[९] दाखविले आहेत. हे तादृश[१०] विरोधी दिसतात, तथापि ह्यांचा समन्वय[११] असा होतो. ज्याप्रमाणें एखादी सुंदर पतिव्रता व साध्वी स्त्री पाहून एखाद्या कामिकाला[१२] मोह होतो, परंतु तो मोह त्या स्त्रीचें ठिकाणीं मुळींच नसतो, तरी ह्या स्त्रीच्या योगानें मला मोह पडला, असा कामिकाचा व्यवहार दिसतो. तद्वत्, परमेश्वराचें मनुष्यादिसदृश[१३] विचेष्टित[१४] पाहून स्वरूपाला[१५] न जाणणाऱ्या लोकांनां हा मनुष्य आहे अशा प्रकारचा मोह पडतो. म्हणून हा परमात्मा आपल्या मायेनें त्यांना मोहवितो असा आरोपानें व्यवहार[१६] झाला आहे. याप्रमाणें प्रथम पक्षाचें म्हणणें परमेश्वराचें ठिकाणीं सिद्ध होत असून, ज्ञानानें ह्याच्या शरीराची

*(१) असून (२) भ्रमरूप अविद्येने भासणारा नसल्यामुळे त्याचा देह हा पांचभौतिक किंवा अविद्याकल्पित नसल्यामुळे (३) पुरुषरूप धारण करणारा, मनुष्यासारखा देह धारण करणारा (४) भ्रमिष्ट (५) सोन्याचा (६) सोन्याचे अलंकार (७) पितळेचे (८) श्रीकृष्णाचे (९) गीतेवरील टीकेत (१०) वरवर पाहता (११) एकवाक्यता (१२) विषयी पुरुषाला (१३) मनुष्यासारखे (१४) लीला, चरित्र, वागणूक (१५) ब्रह्मस्वरूपाला, त्याच्या यथार्थ स्थितीला. (१६) बोलणे.*

निवृत्ति[१] होण्याची अपेक्षा[२] नाहीं; म्हणून हा अनध्यस्तविवर्त[३] असल्यामुळें दुसरा पक्षही सम्यक् आहे.

शिष्य :- भगवन् ! मला येथें एक शंका आहे. तिचा आपण कृपेनें परिहार[४] कराल अशी आशा धरून मी ती आपणाला विचारण्याचें धैर्य करितों. (य३-१२२) परमात्म्याचें मानुष शरीर पाहून असुर मोह[५] पावतात. ते तमोगुणानेंच पावत असले पाहिजेत. आपण जो पतिव्रतेचा दृष्टांत दिला तत्सदृशच[६] दृष्टांत भक्तिरसायनांत आणि पंचदशींत एकच[७] वस्तु त्रिगुणात्मक असतें, हें दाखविण्याकरितां घेतला आहे.

**'कामिन्याः[८]सुखता भर्ता सपत्न्यादुःखरूपता । तादृङ्मानात्तथाऽन्ये न मोहत्वमनुभूयते ।।१।।'**

*(भक्तिरसायन उल्हास १/१७)*

याप्रमाणें भगवच्छरीरापासून ज्यांना सुख होतें ते सत्त्वगुणानें, आणि दुष्टादिकांना दुःख होतें तें रजोगुणानें, व मूढांनां मोह होतो हा तमोगुणाने. म्हणून परमेश्वराचें शरीर त्रिगुणात्मकच[९] आहे, आणि

*(१) नाश (२) कारण, आवश्यकता (३) ज्ञानजन्य (४) समाधान (५) खरोखरच आपल्यासारखा भगवंताचा अवतारदेहहि भौतिक व उत्पत्तिनाशवान् आहे अशी भ्रामक समजूत, अविवेकयुक्त होतात (६) त्याच्या सारखाच (७) जगतांतील प्रत्येक वस्तु (८) **श्लोकार्थ** - पतीला पत्नीपासून सुखाचा अनुभव येतो, सवतीला तिच्यापासून दुःखाचा अनुभव येतो व ज्या पुरुषाला त्या स्त्रीची प्राप्ति होत नाही त्याला विषाद उत्पन्न होतो. (९) सत्त्वरजतम या तीन गुणापासून झालेले.*

त्रिगुणात्मक म्हणजे प्रकृतिजन्यच[१] असलें पाहिजे. एकच वस्तु त्रिगुणात्मक असूं शकते, ही गोष्ट सांख्यभाष्यांतही सिद्ध केली आहे.

श्रीगुरु :- तुझी शंका मार्मिक असल्यामुळें मलाही फार आनंद झाला आहे. तस्मात् आतां उत्तर श्रवण कर. प्रथम तुला एक दृष्टांत सांगतों.

सूर्याचें ठिकाणीं घुबड आंधार पाहतात, असें आत्मपुराणांत सांगितलें आहे, आणि मृग[२] नदी[३] पाहतात, आणि कामली[४] सुवर्ण[५] पाहतात. परंतु त्यांतील कोणताही भाव[६] सूर्याचेठायीं असत नाहीं. तद्वत्, लोक आपआपल्या गुणांनीं युक्त होत्साते परमेश्वराचेठायीं त्याच गुणांचा आरोप करून सूर्यावर थुंकलें असतांनां आपल्या तोंडावर घेण्यासारखें, किंवां उत्तम ध्यान केलें असतांनां आपलेंच अंतःकरण ध्यान रूपानें निराळें पाहिल्यासारखें, मोहादिक[७] करून घेतात; आणि हा परमात्मा मायेनें मोह करितो असा आरोप मात्र याजवर ठेवितात, पुनः सत्त्वगुणादिक जसे विषयरूप[८] होऊन सुखादिक उत्तन्न करितात, तसा हा परमात्मा सत्पुरुषांनां विषयरूप होऊन सुख उत्पन्न करित नाहीं; किंतु आत्मरूप[९] आनंदच दाखवितो; आणि आपणही आत्मरूप[१०] आनंदांतून केव्हांच प्रच्युत[११] होत नाहीं. म्हणून हा श्रीकृष्ण प्रेमवर्धनाकरितां[१२] व संताकरितां ब्रह्मानध्यस्तविवर्तरूप[१३] असून मूढांनां मात्र त्यांच्या त्यांच्या गुणारोपानें[१४] सुखादिक उत्पन्न करून देतो. (य३-१२३)

*(१) अविद्येपासून झालेले (२) हरिण (३) मृगजल (४) ज्याला कावीळ रोग झाला आहे तो (५) पिवळेपण (६) स्थिति (७) सत्वरजतम या तीन गुणापैकी ज्याच्या ठिकाणी जो गुण असेल त्या गुणानुसार (८) विषयरूपाला येऊन, ज्ञेयरूप होऊन (९) भोग्यरूप होऊन म्हणजे, परमात्मा भोग्य व भक्त भोक्ता अशा भेदास प्राप्त होऊन (१०) त्रिपुटीरहित आनंद, (११) भ्रष्ट (१२) भक्तांचा प्रेम वाढविण्याकरिता (१३) शुद्ध ब्रह्मस्वरूप राहूनच प्रेमवृत्तीला गोचर होतो (१४) ज्या ज्या गुणाचा आरोप करतील त्याप्रमाणे*

धर्मपूर्वक[१] राज्य झालें असतां स्वर्गादिक कर्में व व्यवहार निश्चिंत करतां येणें, इत्यादि संतप्रत्ययभिन्न[२] मूढांच्या सुखाचा अर्थ समजावा. याप्रमाणें तुझ्या शंकेचें उत्तर आहे.

शिष्य :- महाराज ! हें मला कळलें. आतां भीष्म काय म्हणालें तें जाणण्याची इच्छा आहे.

श्रीगुरु :- याप्रमाणें हा परमात्मा जरी मूढांनां मोहोत्पादक[३] असला, तरी यादव व गोपाळ व तुजसारखे भक्त त्यांचें ठिकाणीं याचें गूढ रूप म्हणजे ब्रह्मत्व प्रगट आहे. ह्या माझ्या म्हणण्याला परमेश्वरानें आपल्या वाणीनेंच संमती दिली आहे.

**'अवजानन्ति मां मूढा मानुषीं तनुमाश्रितम् ॥ परं भावमजानन्तो मम भूतमहेश्वरम् ॥१॥**
**मोघाशा मोघकर्माणो मोक्षज्ञानाविचेतसः ॥ राक्षसीमासुरीं चैव प्रकृतिं मोहिनीं श्रिताः ॥२॥**
**महात्मानस्तु मां पार्थ दैवीं प्रकृतिमाश्रिताः ॥ भजन्त्यनन्यमनसो ज्ञात्वा भूतादिमव्ययम् ॥३॥'**

*(श्रीमद्भगवद्गीता अ.९श्लो.११ते१३)*

अर्थ :- मूढ जे आहेत ते मला मनुष्यशरीरधारी समजतात. कारण ते माझा परब्रह्मभाव जाणत नाहींत. पुनः, ज्यांची वासना मिथ्या अशा जगाकडेच[४] धांवत असते, आणि ज्यांची कर्में अश्रद्धादिकांमुळें[५] निष्फळच होत असतात,व

*(१) क्षात्रधर्मानुसार (२) संतांना ज्या सुखाचा अनुभव असतो त्या सुखानुभवाहून निराळे सुख (३) मोह उत्पन्न करणारा (४) जगांतील विषयसुखाकडे (५) परमेश्वरावर श्रद्धा नसल्यामुळे*

ज्यांचें ज्ञान वेड्याच्या चिंध्या फाडण्याच्या ज्ञानासारखें किंवा वैद्यशास्त्रांतील मिथ्यायोगाच्या दृष्टांतासारखें कांहींच उपयोगी नसतें, तशीच ज्यांनां बुद्धिही नसते, जे रजोगुणामुळें आसुरी वा राक्षसी वृत्तीचे असून तमोगुणामुळें मोहिनी[१] वृत्तीच्या स्वाधीन असतात, त्यांना माझें ब्रह्मज्ञान समजणेंच शक्य नसल्यामुळें ते मला मनुष्यासारखे पाहतात. — पण महापुरुषांची गोष्ट तशी नाही. महात्मे 'अव्ययं मां ज्ञात्वा' म्हणजे अनाद्यनंत अशा मज ब्रह्मस्वरूपाला स्वरूपलक्षणानें[२] जाणून 'दैवींप्रकृतिमाश्रिताः' म्हणजे शरीर व मनानें सत्त्वनिष्ठ[३] असून (य३-१२४) 'भूतादीन्' म्हणजे तटस्थलक्षणसिद्ध[४] जीवप्रतिबिम्बापेक्षित बिम्बत्वरूप[५] अनध्यस्तविवर्तरूप[६] अशा माझें म्हणजे ईश्वराचें सर्वत्यागपूर्वक[७] एकप्रवाही[८] चित्तानें भजन करितात, म्हणजे ब्रह्म जाणून माझी सगुण भक्ति करितात, असा भाव. एवं हें या श्रीकृष्णप्रभूचेंच वचन असल्यामुळें तूं आपल्या भावांसह ह्याच्या आज्ञेप्रमाणें वाग, म्हणजे तुझें कल्याणच आहे.

**याचा संपूर्ण प्रभावो[९] । जाणे स्वामी सदाशिवो । कीं तो आणि हा स्वयमेवो । एकचि म्हणुनि ॥२४॥**
**कीं जिभेचें रसज्ञपण[१०] । जेंवी जीभ जाणें आपण । तेंवी याचें महिमान । गिरिजारमण[११] जाणतो ॥२५॥**
**तैसा याचाचि अवतारू । श्रीनारदमुनीश्वरू । तो भक्तिबळें साचारू । जाणें प्रभाव हरीचा ॥२६॥**

*(१) आवरण उत्पन्न करणाऱ्या, भ्रम उत्पन्न करणाऱ्या (२) सद्दिानंद लक्षणाने (३) सत्वगुणी (४) जगताचे उत्पत्त्यादि व्यापार करणारा म्हणून ओळखला जाणारा (५) प्रतिबिम्बरूप जो जीव, त्याच्या अपेक्षेने बिम्ब संज्ञाधारण करणारा (६)*

*ब्रह्मज्ञानाने नाश न पावणारा असा देह धारण करणारा (७) सर्व विषय सोडून (८) एकसारखी भगवंताकडे चित्तवृत्ति लावून (९) सामर्थ्य (१०) रस जाणणे (११) शंकर.*

साक्षात् भगवान् कपिलमुनी । याच्या असंगतेचा[१] तो ज्ञानी ।
हे श्रेष्ठ याचेंच रूप असोनी । याच्याचि भजनीं लागले ।।२७।।
पूर्ण भजन आत्मपणें[२] । या सकळा निकें होणें । यालागीं भेद सांडोनि भजणें । अनन्य त्वांही ।।२८।।
जो परमात्मा जगद्बंधू । तयातें म्हणसी मामे बंधू । जो मायारहित परमानन्दू । तयातें प्रिय बोलसी ।।२९।।
हा प्रियाची परमसीमा[३] । परी प्रियत्वें नये पार्थक्यधर्मा[४] ।
जो अरिमित्रहृदयीं[५] समात्मा[६] । त्यातें मित्र तूं म्हणसी ।।३०।।
हा आप्तकाम[७] म्हणुनी कहीं । यातें कवणाचें कर्तव्य नाहीं ।
त्या तूं सुहृत्तम मानोनि गेहीं[८] । अज्ञानठायीं[९] गिंवसलासी[१०] ।।३१।।
जो अनुमंता[११] सर्व जनां । त्यातें त्वां मंत्री मानोनि जाणा ।
आणि अज्ञानत्वें[१२] जो सुहृत्पणा[१३] । तेणें भलतेंचि केलें ।।३२।।
अरे ! ब्रह्मेंद्रादि सुरांच्या पंक्ति[१४]। चालती होवोनि यद्वशवर्ती[१५]। त्वां दूत करोनी तयाप्रती । धुरें[१६] रथीं बैसविला ।।३३।।
येणें येणें अज्ञान[१७]धर्में । कवळिलाती[१८] मोहें परमें । यालागीं सांवळेंनि ब्रह्में । कळवितां वर्में[१९] न कळाली ।।३४।।
आतां हा जरी परमात्मा । तरी सारथी केंवी जाहला आम्हां । काय कहीं[२०] सूर्य तमा[२१] । होईल वश ।।३५।।
तरी ऐसा झणीं[२२] । संशयो धराल मनीं । यातें नीचाच्या[१] कर्मांची[२] कहाणी । आम्ही कानीं नायको ।।३६।।

*(१) अलिप्ततेचा (२) ऐक्य भावाने (३) परम प्रेमस्वरूप, परम प्रेमास्पद (४) भेदभावास, द्वैतभावास (५) शत्रुमित्राचे ठिकाणी (६) सारखा आत्मरूप (७) वासनारहित. (८) घरी (९) अज्ञानामध्ये (१०) पडलास (११) अनुमोदन देणारा (१२) अज्ञानमूलक (१३) आप्त संबंध (१४) रांगा, समूह (१५) ज्याच्या स्वाधीन (१६) धुरेवर सारथी (१७) अज्ञानाने (१८) अविवेकाने ग्रासला गेलास (१९) गुप्त, रहस्य (२०) कधी (२१) अंधःकाराला (२२) कदाचित्.*

यातें नीचाच्या[१] कर्मांची[२] कहाणी । आम्ही कानीं नायको ।।३६।।
हा रागद्वेषविवर्जितू । नेणें (य३-१२५) मानापमानमातू[३] । जैसा जाणलिया वशीभूतू[४] । निजात्मा ब्रह्म ।।३७।।
तेंवीचि हा पूतनारी । सारथ्यादौ[५] वर्तला[६] तरी । कदापि नोहे अहंकारी । निर्विकारी चिदात्मा ।।३८।।
हा सर्वथाचि अद्वय[७] । यातें न दिसे द्वितीय । यालागीं मीपणा[८] न होय । कवणें काळीं ।।३९।।
हा समसमान सर्वांभूतीं । यालागीं याचीअद्वैतस्थिती । हा सर्वात्मा गोपिकापति । यालागीं निश्चिती विषम[९]नोहे ।।४०।।
विश्वरूप दाविलें जेव्हां । हा अर्जुनातें म्हणे तेव्हां । मियां मारिलिया कौरवा । होवावें तुवां निमित्त ।।४१।।
तूं भक्त माझा अर्जुना । ऐसें बोलिला यादवराणा । येणें विषमत्व नारायणा । झणीं श्रोते मना आणाल ।।४२।।
तरी तैसें सर्वथा नाहीं । तो दुष्टांचे कर्मे तयां काळदेही[१०] ।
आणि संतांचे सद्धर्मे लवलाही । नाना[११] उपायीं रक्षिता ।।४३।।
जितुकें जयाचें कर्म । त्याचा न करी अतिक्रम[१२] । लुब्धकें[१३] पीडितां परम । तो अर्जुन समर्थ ।।४४।।
तेचि गांडीव तोचि अर्जुन । तोचि रथ तेचि बाण । परी म्लेच्छापासूनी रक्षण । समर्थ जाण न जाहला ।।४५।।
ऐसी कथा महाभारतीं । यालागीं हा जगत्पती । एका[१४] वैर एका भक्ति । न देखे कदा ।।४६।।
आतां यातें म्हणती भक्तिवश । तयाचा हाचि विशेष[१५]। आनंद दे निजभक्तास । परी व्यवहार वैषम्यास[१६] येईना ।।४७।।

*(१) नीच लोकाप्रमाणे कर्माचा (२) संबंध (३) मानापमानाचा संबंध किंवा गोष्ट (४) स्वाधीन (५) सारथ्यादिकांचे कर्म करण्यामध्ये (६) राहिला (७) याच्यावाचून दुसरी वस्तुच नाही (८) अहंकार (९) भेदभावाने वागणारा (१०) काळरूप, संहारात्मक विश्वरूप धरणारा (११) उपायाने, रितीने (१२) उल्लंघन (१३) व्याधाने (१४) एकाचे वैर व एकाचा प्रेम (१५) रहस्य, तात्पर्य (१६) विषमतेच्या वागणुकीस*

कीं पतिव्रता भजे आपुला पति । परी कदा न द्वेषी परपती[१] । अथवा धर्मवशें[२] तिजप्रति । रागही[३] नव्हे ।।४८।।
तेंवी अनन्य भक्तांचा । हा योगक्षेम[४] करी साचा । परी आंगा विषमतेचा । न लवीचि वारा[५] ।।४९।।
भक्तांचेनि किंचिद्वैते[६] । हा गुरूत्वें[७] जरी वर्ते । तरी कर्मादौ[८] वैषम्यातें । न पावेची ।।५०।।

**कीं आत्मा जाणोनि जीवन्मुक्त । जे का जाहले अखंडित ।**
**तयांचा देह पडतां[९] काय यथार्थ । आत्मा रक्षीत सांगां पा ॥५१॥**
**तेंवी जयासी निजभक्ति[११]। तयांसी करी हा दुःखनिवृत्ती[१२]। परी विषयसुखसंपत्ती[१३]। देवोनि विषम न होय ॥५२॥**
**भक्तीनें प्रारब्धाभिभवो[१४] । करी तथापि न वाढवी भवो[१५] ।**
**आणि सकामकर्मी[१६] जो फळसंभवो[१७] । तो कर्मेंचि स्वयमेवो[१८] परी आधार[१९] हरी ॥५३॥ (य३-१२६)**
**अथवा पाण्याचें गोडपण । तें जनाची हरी ताहान । तेंवी वंद्यासंसक्ति[२०] समाश्रवून । भक्ताधीन हा असे ॥५४॥**
**॥ गद्य ॥**

शिष्य :- भगवन् ! सप्तमभूमिकारूढ[२१] मुक्ताला देखील कोणतीच संसक्ति संभवणें शक्य नाहीं, तर मग वन्द्यासंसक्ति[२२] ईश्वराला आहे असें कसें म्हणतां?

*(१) दुसऱ्याचा पति (२) धर्मामुळे (३) प्रेम (४) प्राप्त नसलेली वस्तु प्राप्त करून देणे व प्राप्त झालेल्याचे संरक्षण करणे (५) स्पर्श (६) अल्पशा द्वैतभावामुळे (७) मोटेपणाने, पूज्यतेने (८) कर्मानुसार फळ देतांना (९) मरतेवेळी, देहसंबंध सुटताना (१०) आत्मा त्याचे रक्षण करितो काय? (११) ईश्वरभक्ति (१२) दुःखाचा नाश (१३) विषयसुखसंपन्न करून (१४) प्रारब्धभोग दबणे, प्रारब्ध भोगाचा भास न होणे (१५) संसार (१६) काम्यकर्मापासूनच (१७) फलाची प्राप्ति (१८) स्वतः कर्मापासूनच (१९) आश्रय, श्रीहरीमुळे (२०) स्तुत्य आसक्ति (खोट्या प्रपंचाला खरा समजून त्यांत क्रिडा करणे (२१) ज्ञानाच्या ज्या सात भूमिका सांगितल्या आहेत त्यापैकी शेवटली जी सातवी तूर्यग् भूमिका तेथे पोहचलेला. (२२) निष्प्रयोजन लीलारूप, आभासरूप आसक्ति, खोट्या जगाला खरे समजून असलेली आसक्ति*

श्रीगुरु :- बाबा ! हें म्हणणें आमच्या पदरीचें नव्हे. असें वसिष्ठाचार्यांनींच योगवासिष्ठांत म्हटलें आहे. पाहिजे असेल तर तूं त्यांना विचार .

शिष्य :- महाराज ! आपण वसिष्ठांकडे लोटण्याचें कारण मी समजलों. वंध्यासंसक्ति बंधनरूप[२] असल्यामुळें पांचव्या[३] भूमिकेत तिचेंच निराकरण[४] होतें. परंतु वंद्यासंसक्ति यावदधिकार[५] तशीच राहते.

श्रीगुरु :- हें तुलाच समजले ठीक झालें. परंतु हा विशेष[६] आहे असें जाण. भक्तीवांचून इतर जीवन्मुक्तांनां यावत्प्रारब्ध[७] वंध्यासंसक्तीचाही निमुटपणें त्रास सोसावा लागतो. आणि भक्तिसहित जीवन्मुक्तांनां वंध्यासंसक्तीचा त्रास सोसावा लागत नाहीं. किंतु यावदधिकार वंद्यासंसक्ति राहते. आधिकारिकत्व ज्ञानी उपासकांनांच असते, असें गूढार्थदीपिकेंत सांगितलें आहे. – पण परमेश्वराचा अनध्यस्तविवर्तरूप[८] देह नित्य असल्यामुळें त्याची प्रेमवर्धकत्वादि वंद्यासंसक्ति कधींही नष्ट होत नाहीं. आणि देह अध्यस्तविवर्त[९] नसल्यामुळें त्याच्या जीवन्मुक्तींत व विदेहमुक्तींत भेदही नसतो. किंबहुना तो **जीवन्मुक्त** किंवा **विदेहमुक्त** अशा शब्दाला पात्र होत नसून **नित्यमुक्तीचें स्वरूपच** आहे. समर्थांनींही असेंच म्हटले आहे.

*(२) बद्ध करणारी, संसारांत पाडणारी (३) असंसक्ति भूमिका (४) राहत नाही, मानता येत नाही (५) ईश्वराने जगाचे नियमन करण्याचा दिलेला अधिकार आहे तोपर्यंत (६) रहस्य (७) प्रारब्ध आहे तोपर्यंत (८) ज्ञानाने नाश न पावणारा (९) ज्ञानाने नाश पावणारा.*

**'सचेतन[१] ते जीवन्मुक्त । अचेतन[२] ते विदेहमुक्त ॥ दोहीवेगळे नित्यमुक्त । योगेश्वर ॥१॥' समर्थ रामदास.**

यांत 'योगेश्वर' जें पद आहे तें 'यत्र योगेश्वरः कृष्णो' 'योगमायांसमाश्रितः' इत्यादि प्रमाणावरून ईश्वर आणि त्याच्या अवतारांकडेच लावावें. अथवा या वचनाची आणखी कोणाला कांहीं विवक्षा[३] असली तरी आमचा सिद्धांत भंगत नाहीं. अनध्यस्तविवर्तत्वामुळें (य३-१२७) ह्याला बंधनाचीच[४] कल्पना झाली नसल्यामुळें मुक्तताही कल्पणें व्यर्थच आहे. नाथ म्हणतात :-

**'पुण्यभ्रमें[५] स्वर्गप्राप्ती । पापभ्रमें[६] अधोगती ॥ देहभ्रमें[७] बद्ध म्हणती । मुक्त म्हणती तो अतिभ्रमू ॥१॥**

*(एकनाथमहाराज)*

बद्ध, साधक, मुमुक्षु, मुक्त इत्यादि नाहींत तोच परमार्थ; असा प्रमाणशिरोमणी[८] भगवान् वेदही म्हणतो.

शिष्य :- महाराज ! याप्रमाणें माझ्या शंकेचा परिहार झाला. आतां, भगवान् भीष्म काय म्हणालें हें ऐकण्याची उत्कंठा वर्तते.

श्रीगुरु :- श्रवण कर. भीष्म म्हणतात :- असा जरी हा परमात्मा आहे, तथापि ज्याप्रमाणें सूर्याच्याठायीं[९] तम नसूनही दुसऱ्याच्या तमाला[१०]

*(१) देहसहित (२) देह पडल्यावर (३) हे वचन दुसऱ्या रितीने लावण्याची इच्छा (४) मी बद्ध आहे अशी समजूत (५) पुण्य सत्य आहे अशा समजुतीने (६) पाप सत्य आहे अशा समजुतीने (७) देह सत्य आहे अशा समजुतीने (८) सर्व प्रमाणात श्रेष्ठ (९) सूर्याला तमाचे दर्शन किंवा ओळख नसून (१०) अंधःकाराला.*

निवर्तक[१] मात्र होतो; त्याप्रमाणें विषमरहित[२] हा परमात्मा असूनही भक्तांचें अज्ञान अनुग्रहानें[३] दूर करतो. ह्याला उदाहरण माझेंच आहे. मी शरशय्येवर मरणोन्मुख पडलों असतां ह्या परमात्म्यानें आपण होऊन मला दर्शन दिलें आहे. म्हणून हा एकांत[४] भक्तांवर अनुग्रह करणारा आहे, असेंही माझ्यानें म्हटल्यावांचून राहवत नाहीं.

**अहो ! मेघाचिया ठायीं । वैषम्य[५] तंव कहींचि नाहीं । परी चातकार्तिहर[६] हें कायीं । न म्हणवे सांगा ॥५५॥**

**तेंवीचि हा भगवंतू । भक्तां परम कृपावंतू । ऐसें वदोनि देवव्रतू । रोमांचितू जाहला ॥५६॥**

**जयाचिया ठायीं मन । जाहलें असतां भक्तिसंपन्न । जयाचें नामकीर्तन । वाचेनें दृढ ॥५७॥**

**एवंविधि[७] त्यजितां शरीर । तो तोडूनि कामकर्मादि[८] समग्र । मुक्तरूप होय साचार । ब्रह्मपणें[९] ॥५८॥**

**वाराणसींत[१०] मरतां । तरी शिवानुग्रह[११] न चुके सर्वथा । तैसे भक्तिगंगेंत देह ठेवितां । हरिहरानुग्रह[१२] चुकेना ॥५९॥**

**यालागीं हें अनात्मशरीर[१३] । तें मी स्वेच्छे[१४] त्यागीन साचार ।<br>परी हा प्रेमळ सखा तोंवर । तिष्ठो निर्धार ये स्थळीं[१५] ॥६०॥**

*(१) नाशक (२) भेदबुद्धी धारण करणारा नसून, आपपरभाव न ठेवणारा (३) कृपेने (४) एकनिष्ठ (५) आपपरभाव (६) चातक पक्ष्याची पीडा हरण करणारा (७) याप्रमाणे (८) वासनाकर्म इत्यादिकांचा संबंध (९) ब्रह्मरूप होऊन (१०) काशींत (११) शिवाची कृपा, शिवाचा मंत्र (१२) शिवविष्णूंची कृपा (१३) जड शरीर (१४) आपल्याला वाटेल तेव्हां (१५) या ठिकाणी.*

**हा चतुर्बाहु[१] हास्यवदन[२] । पीतांबरधारी[३] मनमोहन[४] ।<br>राधिकापति जगज्जीवन[५] । नारदादि भजन करिती ज्याचें ॥६१॥**

**ऐसीचि पाहूनियां मूर्ती । (य३-१२८) मी वसुशरीरीं[६] करीन भक्ति ।<br>किंबहुना भोगमोक्षाचे ठायीं निश्चिती । या श्रीपतीस सोडूं नेच्छी ॥६२॥**

**अथवा जाणोनि माझें निधन[७] । युधिष्ठिर दुःखी होईल आपण ।<br>हें मनीं आणोनि गंगानंदन[८] । दुसरें वचन बोलत ॥६३॥**

**देह त्यजणें न त्यजणें । हें माझ्या इच्छेचें करणें । परी प्रेमवर्धनार्थ[९] हरीनें हृदि[१०] येणें । यदर्थ[११] बोलणें हें माझें ॥६४॥**

**येथ मयूरपंतवचन[१२] । तेंही मज वाटे प्रमाण । यालागीं पुष्ट्यर्थ[१३] जाण । समाश्रयीतो[१४] ॥६५॥**

**॥ गीति ॥**

**'जेव्हां मानेल[१५] मना तेव्हां त्यागीन या शरीरा हो ।<br>तोंवरि मदग्रभागीं[१६] हा गीतामृतनिधी[१७] उभा राहो ॥' (मोरोपंत.)**

**॥ ओव्या ॥**

**'गीतामृतनिधी' या वचनेंवरून । हा जवळीं असतां नारायण ।<br>मग ब्रह्मविस्मृती[१८] पडेल हेहिं दारुण[१९] । चिंता मजकारण नव्हे कदा ॥६६॥**

*(१) चार बाहु ज्याला आहेत (२) हंसत मुख असलेला (३) पितांबर नेसलेला (४) मनाला हरण करणारा (५) जगाचा प्राण (६) भीष्माचार्य मूळचे वसु होते म्हणून मृत्युलोकांतील हे शरीर सुटल्यानंतर ते आपल्या आधिकारिक वसु शरीरांत जाणार होते (७) मृत्यु (८) भीष्म (९) भक्तिप्रेम वाढविण्याकरिता (१०) हृदयात (११) याकरिता (१२) मोरोपंताचा आधार (१३) पाठिंबा देण्याकरिता (१४) उद्‌धृत करितो (१५) वाटेल (१६) माझ्या दृष्टीच्या समोर (१७) गीतेत सांगितलेल्या ब्रह्मज्ञानाचा सागर, साक्षात् ब्रह्मरूप (१८) ब्रह्मस्वरूपाचा विसर (१९) फारसीं.*

**एवं पितामह[१] कृपासंपन्न । पाहोनि युधिष्ठिर आपण । नानाधर्मार्थ[२] करी प्रश्न । ऐकतां[३] ऋषिजन सूत म्हणे ॥६७॥**

**तरी सकळ मनुष्यांचे सामान्यधर्म[४]। आणि जेणें वर्तती वर्णाश्रम[५]। प्रवृत्तिनिवृत्तिरूप[६] परम । जें वेदब्रह्म[७] बोलिला ॥६८॥**

**प्रजापालनार्थ[८] राजधर्म[९]। चित्तशुद्ध्यर्थ[१०] दानधर्म । परममुक्त्यर्थ[११] मोक्षधर्म । पूसिला तैसा ॥६९॥**

**आणि तेंवी स्त्रीयांचे धर्म । जेणें इहपर[१२] साधे उत्तम । आणि पुसिले भागवद्धर्म[१३] । जेथ पुरुषोत्तम संतोषे ॥७०॥**

निग्रहादिक[१४] राजधर्म । भूतदयादि[१५] दानधर्म । शमदमादि[१६] मोक्षधर्म । स्त्रीधर्म पातिव्रत्यादि ॥७१॥
आणि एक परमात्मा भगवंत । जेथ[१७] संतोषे अखंडित[१८] ।
ते भागवद्धर्म सनातन[१९] निश्चित । द्वादश्यादि[२०] विश्रुत[२१] नियम[२२] जेथें ॥७२॥
ससाधन[२३] चारी पुरुषार्थ[२४] । ज्या अधिकारिया[२५] जें जें विहित ।
नाना आख्यानोपाख्यानीं[२६] संश्रित । तें भीष्में समस्त सांगीतलें ॥७३॥
तो महाराज इच्छामरणी[२७] । धर्म सांगत असतां प्रेमेंकरोनी । तंव उत्तरायण तियेक्षणीं । प्राप्त झालें ॥७४॥

*(१) भीष्माचार्य (२) नाना धर्म समजून घेण्याकरिता (३) ऐकत असता (४) मनुष्यमात्रास लागू होणारे (५) ब्राह्मणादि वर्ण व ब्रह्मचर्यादि आश्रम (६) संसाराला कारण व मोक्षाला कारण असणारे धर्म (७) वेदरूपी ब्रह्म (८) ज्या धर्मानुसार प्रजेचे पालन करावयाचे तो (९) राजाकरिता सांगितलेला धर्म (१०) चित्ताची शुद्धी म्हणजे सात्विक गुणाची (वृद्धि) बुद्धि (११) संसार बंधनापासून सुटण्याकरिता (१२) इहलोकांत कीर्ति व परलोकांत सद्‌गति देणारा (१३) भगवंताच्या प्राप्तीचे उपाय (१४) दंड, शासन करून दुष्टांना सुधारण्याचा प्रयत्न करणे (१५) सर्व जीवांची कीव करणे (१६) मनाचा जय, इंद्रियाचा जय इत्यादि (१७) ज्याच्या योगाने (१८) सदा सर्वदा (१९) अनादि, अविनाशी (२०) द्वादशीं व्रताचे पालन वगैरे (२१) प्रसिद्ध (२२) निर्बंध (२३) त्यांच्या त्यांच्या प्राप्तीच्या उपायासह (२४) धर्म, अर्थ, काम, मोक्ष (२५) ज्याला जे धर्म पाळावयाला सांगितले आहेत (२६) कथा, उपकथा यांच्या द्वारा (२७) इच्छेला वाटेल तेव्हां मरणारा.*

जो युद्धीं सहस्त्ररथी[१] । रक्षी आपुलिया महाशक्ती[२] । यद्वाणी[३] सहस्त्रार्थवती । उपसंहरी[४] ती तेधवां ॥७५॥
मग सकळसंगविनिर्मुक्त[५] । आदिपुरुषीं[६] ठेविलें चित्त । जो श्रीकृष्ण जगन्नाथ[७] । पीतांबर धृत[८] चतुर्भुज[९] ॥७६॥
(य३.१२९) तेथ दृष्टि ठेवोनि समान[१०] । पुरतस्तिष्ठत[११] आपण । धन्य भाग्यसंपन्न । देवव्रत[१२] तो ॥७७॥
ऐसें करितां विशुद्ध[१३] धारण[१४] । सर्व अशुभ[१५] जाहलें क्षीण ।
श्रीकृष्णकृपादृष्टीकरून[१६] । आयुध[१७]श्रम[१८] निवर्तले[१९] ॥७८॥
जयाच्या कृपादृष्टिवशें[२०] । प्रलयींही[२१] भक्त सुखसे[२२] । तो पाहतांच आपैसे[२३] । भीष्मश्रम[२४] निवर्तले ॥७९॥
आंगीं रूपले[२५] होते शर । ते श्रम गेले समग्र । मग प्रेमें जोडोनि कर । स्तवी साचार श्रीकृष्णा ॥८०॥
जो श्रीकृष्ण कृपामूर्ति[२६]। सृष्टिकारण[२७]प्रकृति[२८]। लीलेसाठीं[२९] श्रयितां[३०] निश्चिती । तद्वशवर्ती[३१] कदा नव्हे ॥८१॥
कीं वैद्याश्रयिती[३२] मारक[३३] विष । परी तेणें जगत्कल्याण निःशेष ।

*(१) हजार रथी ज्याच्या हुकमतीखाली असावयाचे (२) महान् समर्थ (३) ज्याच्या उपदेशाचे हजारो अर्थ होतील (४) बंद केली (५) सर्व संबंध किंवा आसक्ति सोडून (६) भगवंताचे स्वरूपी (७) जगाचा स्वामी (८) पीतांबर नेसलेला (९) चार हात असलेला (१०) सारखी, एकाग्र (११) समोर राहिला (१२) भीष्माचार्य (१३) अत्यं शुद्ध, निश्चल (१४) धारणा, चित्ताचा प्रवाह (१५) पाप, दुःख (१६) श्रीकृष्णाने कृपेने पाहिल्याबरोबर (१७) युद्धांत लागलेल्या शस्त्रास्त्रांचें (१८) कष्ट, वेदना (१९) नाहिसे झाले (२०) ज्या कृष्णाने प्रेमाने पाहिले असता (२१) सृष्टिसंहाराचे वेळी (२२) सुखरूप (२३) आपोआप, सहज (२४) भीष्माचे क्लेश (२५) शिरले, बोचले होते (२६) कृपेची बनलेली मूर्ति (२७) जगताचे कारण (२८) माया (२९) क्रीडा करण्याकरिता (३०) आश्रय केला असता (३१) तिच्या स्वाधीन (३२) वैद्य आश्रय करितात (३३) प्राणघातक,*

तेवी बंधनहेतु[१] माया जगन्निवास[२] । आश्रयिता विशेष जगत्तरण[३] ॥८२॥
परी तेही माया हरीच्या ठायीं । वैभव[४]दाखवावया पाही ।
तटस्थलक्षणरूपचि[५]लवलाही । कदाचित् राही सदा नसे ॥८३॥
परी अज्ञ[६] जीवाहून । करावया व्यावर्तन[७] । जगदुत्पत्तिस्थितिलयकारण[८] । हें तटस्थलक्षण मायिक ॥८४॥
एऱ्हवीं हा परमामृत[९] । जयाहोनी[१०] इतर[११] नाशिवंत ।
जो पूर्ण म्हणोनी भूमाशब्दार्थ[१२] । सनत्कुमारादि संत ध्याती जया ॥८५॥
तो हा श्रीपति मजसमोर । तेथ विषयतृष्णारहित अंतर । होवोनि सदा चरणावर । वाहिलें हरीच्या ॥८६॥
जो परमानंद यादवराणा । जो भगवंत अनंत करुणा । तेथ विगतविषयतृष्णा[१३] । आर्पिली मती[१४] ॥८७॥
नाना धर्मांचें फळ । ही श्रीकृष्णधारणा[१५] केवळ । चरणीं समर्पिली सोज्वळ[१६] । घननीळ जाश्वनीळनामें[१७] ॥८८॥
वासुदेवीं भगवंतीं । जी अक्षय[१८] परमप्रीति[१९] ।

*(१) दुःखाला कारण (२) जगाला आधार असलेला (३) जगाचा उद्धार (४) ऐश्वर्य, सामर्थ्य (५) पुढेच अर्थ दिला आहे - केव्हां राहते व केव्हां राहत नाही (६) अज्ञानी जीवाहून (७) निराळे, अलग, भिन्न (८) सृष्टीची उत्पत्ति, स्थिति व नाश करणारा तो ईश्वर, हे जे ईश्वराचे लक्षण किंवा ओळख शास्त्रात सांगितली आहे, ती मायेच्या साह्याने (९) अत्यंत अविनाशी (१०) ज्याच्या वाचून (११) बाकीचे (१२) भूमा शब्दाचा अर्थ म्हणजे भूमा म्हणजे व्यापक, पूर्ण असा जो शब्द उपनिषदातून ब्रह्माला लाविला आहे तो शब्द, श्रीकृष्ण पूर्ण असल्यामुळे श्रीकृष्णालाहि लागतो. भूमा शब्दाचा अर्थ श्रीकृष्ण होय. (१३) विषयाची वासना नाही असे निर्वासन (१४) मन (१५) श्रीकृष्णाचे ठिकाणी चित्त एकाग्र होणे हेच अनेक प्रकारचे धर्म आचरण्याचे फळ आहे, ती एकाग्र चित्ताची स्थिति (१६) शुद्ध (१७) घननीळ इत्यादि नामस्मरण करीत (१८) अखंड (१९) आत्मप्रेमाप्रमाणे.*

वासुदेवीं भगवंतीं । जी अक्षय[१८] परमप्रीति[१९] । तियेलागीं म्हणती रति[१] । साहित्यवेत्ते[२] ॥८९॥
ती आहे तैसीच राहावी । पूर्ण प्रवाहें वाढावी । म्हणोनी प्रार्थना आघवी । श्रीकेशवीं समर्पी ॥९०॥

॥ अभंग १ ॥

लोकत्रयीं[३] ज्याची सुंदर प्रतिमा[४] । तेथ माझा प्रेमा नित्य राहो ॥१॥
निर्मळ पीवळें वस्त्र ज्याच्या कटीं । तेथ हो गोमटी[५] प्रीति माझी ॥२॥
वस्त्र ज्याचें जैसा प्रभातगभस्ति[६] । तेथ माझी प्रीति नित्य राहो ॥३॥
तमालद्रुमाच्यासम[७] देह नीळा । तेथ प्रीतिमाळा[८] समर्पिली ॥४॥
सुंदर साजिरें वदनकमळ । उपरी[९] कुरळ केशपंक्ति ॥५॥ (य३-१३०)
तया नारायणीं फळविरहीत[१०]। प्रीति अखंडीत असो माझी ॥६॥
ज्ञानेश्वरमित्र[११] अर्जुनाचा सखा । तेथें असो निका[१२] प्रेम माझा ॥७॥९१॥

॥अभंग २॥

अगाध[१३] आवडी अर्जुनाची जया । रथ प्रेरावया[१४] सिद्ध झाला ॥१॥
अश्वपादरजशुभ्रवर्ण[१५] अंग । वदन सुरंग स्वेदयुक्त ॥२॥
भक्तवात्सल्याचें अत्यंत दर्शक । दिसें युक्त मूख श्रमस्वेदें[१६] ॥३॥
अलकावलीनें[१७] झाकिलें साजिरें । परब्रह्म धुरें अर्जुनाच्या[१८] ॥४॥
माझ्या तीक्ष्ण बाणें त्वचा[१९] किंचिच्छिन्न[२०]। वितृटित[२१]जाण कवचही[२२] ॥५॥

*(१) आवडी, प्रेम (२) साहित्यशास्त्रज्ञ (३) तिन्ही लोकांत (४) मूर्ति (५) सुंदर (६) सकाळी उगवणाऱ्या सूर्याच्या कान्तीप्रमाणे (७) तमाल वृक्षासारख्या (८) प्रेमरूपी माला, अखंड प्रेमप्रवाह (९) वर (१०) निष्काम (११) श्रीज्ञानेश्वरमहाराजाचा मित्र - श्रीकृष्ण (१२) सत्य, खरा (१३) अवर्णनीय (१४) हाकण्याला (१५) घोड्याच्या पायांनी उडालेल्या धुळीने पांढुरके झालेले (१६) श्रमामुळे घामाने थबथबलेले (१७) कुरळ केशांच्या पंक्तीने (१८) धुरेवर, हाकण्याच्या ठिकाणी (१९) अंगावरील चामडे (२०) थोडीशी फाटलेली, चिरलेली. (२१) तुटलेले (२२) शरीराच्या बचावाचे साधन*

तया नारायणीं कृष्णीं माझें चित्त । रमो अविश्रांत[३] सर्वकाळ ॥६॥
गोविंद गोपाळ जपतांचि नांवें । ज्ञानेश स्वभावें[४] कृपा करी ॥७॥९२॥

॥ ओवी ॥

निजप्रेमळमित्रभाषण[५] । ऐकतांचि रथ फिरवोन । दोही सैन्यामाजीं आणोन । दाखवी संपूर्ण पार्थातें[६] ॥९३॥
हा कृप हा द्रोण । इत्यादि कालदृष्टिकरून[७] । पर[८] सैन्याचें संपूर्ण । आयुराकर्षण[९] करी ॥९४॥
स्वभक्तरक्षणीं परम चतुर । एवं पार्थसखा करुणाकर । तेथ माझी प्रीति निरंतर । राहो निर्धार[१०] करोनी ॥९५॥
एवं सख्यभावें[११] सारथ्य[१२] करी । सदा रक्षी पार्था कूसरी[१३] । आणि गुरु होवोनि अंतरीं । रक्षिताचि होय ॥९६॥
आम्ही सकळ असतां समोर । मी मारता हा अहंकार । उठोनि विकळ धनुर्धर[१४] । जाहला असतां ॥९७॥
शरचापविनिर्मुक्त[१५] । पाहोनि निजात्माविद्यास्थित[१६] । उपदेशूनि निवारित । कुमती[१७] पार्थाची ॥९८॥
जयाच्या अंगेंकरून[१८] । पीतवस्त्रांदिका[१९] निर्मळपण । तो हा महाराज श्रीकृष्ण । गीतोपदेशें[२०] पूर्ण जगद्गुरू ॥९९॥

*(३) न कंटाळता, श्रमता (४) आपोआप (५) आपल्या प्रेमळ भक्ताचे बोलणे (६) अर्जुनाला (७) काळरूपी दृष्टीच्या योगाने*

*(८) दुसऱ्याच्या म्हणजे शत्रु सैन्याचे (९) आयुष्याचे हरण (१०) निश्चय (११) मित्रत्वाच्या प्रेमाने (१२) रथ हाकण्याचे काम (१३) चातुर्याने (१४) अर्जुन (१५) धनुष्य बाण खाली ठेवून (१६) आपल्या आत्मस्वरूपाची जाणीव नाही असे पाहून (१७) अविवेक, विपरीत समजूत (१८) देहाच्या निर्मळपणाने (१९) पितांबरादिक (२०) गीतेतील उपदेशाने.*

**वेद अत्यंत कृपण । तयास मान्य तीन वर्ण । स्त्रीशूद्रादि जे कां दीन । तेथ दयार्द्र[१] मन नव्हे त्याचें ॥१००॥**

**तें वेदाचें कार्पण्य[२] निरसावया । गीता निर्मिली चैतन्यकाया[३] ।**

**निश्वासीं[४] जन्म वेदा यया । आणि गीता तंव बोलिली प्रत्यक्ष ॥१॥**

**''बाप बाप ग्रंथ गीता । जो वेदीं प्रतिपाद्य देवता । तो श्रीकृष्ण स्वयें वक्ता । जिये ग्रंथीं'' ॥१॥ ज्ञानेश्वरी**

**तयाच्या चरणीं अखंड । माझी रती[५] असो प्रचंड[६] । यन्नामस्मरणें[७] पापी उदंड[८] । तोडोनि यमदंड[९] मुक्त होती ॥२॥**

**(य३-१३१) आतां मी न धरी शस्त्र । ऐसी स्वप्रतिज्ञा विचित्र । सोडोनि रथाचें चक्र । घेतलें करी ॥३॥**

**आपुली प्रतिज्ञा मोडोनियां । माझी सत्य करावया । रथाखालीं उतरूनियां । चक्र करीं घेतलें ॥४॥**

**मग धाविन्नला सिंहासमान । परी मनुष्यत्वाचें जाहलें विस्मरण । तेणें प्रकाशलें देवपण । एकाएकी ॥५॥**

**अनंत ब्रह्मांडगोळ उदरीं । भार साहो न शके धरित्री[१०] । यास्तव प्रतिपदीं[११] थरारी[१२] । ऐसें दिसे ॥६॥**

**उत्तरीय[१३] लोळे तळीं[१४] । ऐसा किरीटी[१५] कुंडली[१६] वनमाळी । मदनुग्राहक[१७] पूतळी[१८] । चैतन्याची ॥७॥**

**एवं धांवत असतां श्रीहरी । माझिया बाणघायें[१९] निर्धारी । कवच फुटोनी किंचिच्छरीरी । छिन्नइव[१] जाहला ॥८॥**

*(१) करुणायुक्त (२) कृपणता (३) सृदिानंदरूप देहाने (४) श्वासांत, 'अस्य महतो भूतस्य निश्वसितम्' या श्रुतीप्रमाणे (५) प्रेम (६) अत्यंत (७) ज्याच्या नामस्मरणाने (८) अनंत, कितितरी (९) यमधर्माचे शासन (१०) पृथ्वी (११) प्रत्येक पाऊल टाकिते वेळी (१२) कंपित होई (१३) आंगावरील वस्त्र (१४) जमीनीवर (१५) किरिट घातलेला (१६) कुंडल घातलेला (१७) मजवर कृपा करणारी (१८) मूर्ति (१९) बाणांच्या आघाताने*

**कवच फुटोनी किंचिच्छरीरी । छिन्नइव[१] जाहला ॥८॥**

**रुधिराचे[२] वाहती लोट । मी परमआततायी[३] स्पष्ट । येत असतां अमृतघट[४] । बाणें फोडूं इच्छिला ॥९॥**

**तैं धावूनिया अर्जुन । करीत असतां निवारण[५] । तयाचें न मानोनि वचन । आला धावोन मद्वधार्थ[६] ॥११०॥**

**तैं अर्जुनपक्षी[७] जगजेठी । ऐशी सहज लोकदृष्टि[८] । परी माझियाच अनुग्रहासाठीं । शस्त्रा शेवटीं करीं धरिता ॥११॥**

**अहो ! जो ब्रह्मांड रची मोडी । तया प्रतिज्ञा तोडावयाची काय खोडी[९] ।**

**ममानुग्रहाची आवडी । म्हणोनी तोडी प्रतिज्ञा ॥१२॥**

**माझिया भक्तांचें वचन । सर्वथा मिथ्या न हो म्हणोन ।**

**आपुली वैखरीही[१०] अनृत[११] करोन । ममानुग्रहाकारण[१२] धांवला ॥१३॥**

**माझें आततायीत्व[१३] न स्मरला । आपुलीही प्रतिज्ञा विसरला । केवळ ममानुग्रहें[१४] भरला । ऐसा देखिला प्रभू मियां ।१४॥**

**तोचि माझी परम गती । तोचि माझी परम मुक्ती । अनुभव[१५] श्रुति आणि युक्ति । याचीच प्राप्ती इच्छितो ॥१५॥**

**तो हा मुकुंद गोविंद । हा जगदानंदकंद[१६] । तो हा शामसुंदर तत्पदारविंद[१७]। स्मरणें मंदही[१८]परी पावेन[१९] मी ॥१६॥**

**जेंवी अकार्येंहीं[२०]करून । सांसारीक[२१] करिती कुटुंबभरण[२२]। तेंवी स्वप्रतिज्ञाही मोडोन । भृत्यरक्षण[२३] करी जो ॥१७॥**

**हा सृदिानंद भगवंत । परी अर्जुनसारथ्य[२४] करित । वेत्र[२५] घेवोनि तुरग[१] वळत[२] ।**

*(१) घायाळ (२) रक्ताचे (३) अत्यंत अविचारी (४) अमृताचा कुंभ (५) नको म्हणून म्हणत असता (६) मला मारण्याकरिता (७) अर्जुनाचा पक्ष घेणारा (८) लोकांना वाटत होते (९) व्यसन, लांछन (१०) बोलणे, प्रतिज्ञा (११) खोटे (१२) माझ्यावर दया करण्यारिता (१३) अविचारीपणा (१४) कृपा केली पाहिजे अशा प्रेमवृत्तीने व्याप्त (१५) अनुभव, श्रुति व युक्ति यांच्या साह्याने (१६) विश्वाच्या आनंदाचा गाभा (१७) त्याचे चरणकमल (१८) मंदबुद्धि, मंदाधिकारी (१९) श्रीकृष्णाची प्राप्ति होईल (२०) पाप (२१) संसारी लोक (२२) कुटुंबाचे पोषण (२३) दासाचे पालन (२४) अर्जुनाचा रथ हाकण्याचे काम (२५) चाबुक*

**वेत्र घेवोनि तुरग[१] वळत[२] । रम्य[३] दिसत अति तेणें ॥१८॥**

**अश्वदोरे[४] धरिले करीं । युद्धीं मेले जे स्वीय[५] वैरी ।**

**ते सर्वही पाहूनि यन्मुखश्री[६] । सरूपता[७] निर्धारी पावले ॥१९॥**

हें मियां पाहिलें दिव्यदृष्टी[८] । म्हणोनी माझी प्रतीति[९] गोमटी[१०] ।
कीं इच्छा न करितांही जगजेठी । दर्शनमात्रें[११] तारितो ॥१२०॥ (य३-१३२)
मी मुमुर्षु[१२] शरपंजरी[१३] । आणि अनुग्रह करोनी मजवरी । दर्शन द्यावया पूतनारी[१४] । आपणची पातला ॥२१॥
तो हा माझी परमगती[१५] । येथ मी जन्मापासोनि ठेविली मति[१६] ।
यास्तव आतां ही रति[१७] । अस्य[१८] पदकामाप्रति[१९] वरो[२०] ॥२२॥
क्षत्रधर्मयुक्त[२१]भक्ति । करोनी पावले भगवंतीं । येथ आश्चर्य नाहीं निश्चिती । परी धर्मरहितभक्तींही[२२] उद्धरिले ॥२३॥

॥ पद ॥

मदनविगतनयन[२३]गोपि गोकुळीं किती । त्यजुनि पती भजती त्यां दिधलि सद्गती ॥ धृ०॥
ललित[२४] गमन[२५] हसित[२६] मंद वदन[२७] साजिरें । पाहुनियां शब्दवेत्रहंकृती[२८] जिरे ॥१॥

*(१) घोडे (२) इकडे तिकडे फिरवतो (३) सुंदर (४) घोड्याचे लगाम (५) आपुले (६) ज्याच्या मुखाची कान्ती, सौंदर्य (७) सरूपता मुक्ति (भगवंताच्या सारखे चतुर्भुजरूप प्राप्त होणे) (८) ज्ञानदृष्टीने (९) अनुभव (१०) सुंदर (११) नुसत्या दर्शनाने (१२) देह सोडण्याची इच्छा करणारा (१३) बाणाच्या आंथरुणावर (१४) पूतना राक्षसीला मारणारा (१५) मोक्ष, शेवटी प्राप्त होण्याचे स्थान (१६) चित्त (१७) प्रेम (१८) याच्या (१९) चरणाच्या इच्छेला (२०) धरो (२१) क्षात्रधर्मानुसार वागून, त्या कर्माने भगवंताची सेवा करणे (२२) धर्मानुसार न वागून केलेल्या भक्तिप्रेमाने (२३) कामाने गेले आहेत डोळे ज्यांचे, कामांध, (२४) सुकुमार (२५) चालणे (२६) स्मित हास्य युक्त (२७) मुख*
*(२८) शब्द जाणणाऱ्यांचा अहंकार, व्युत्पत्तीचा अभिमान (वेतृ अहंकृति)*

पाहुनियां अलकावतिकान्तकन्यका[२] । पावल्याचि ब्रह्मचिती[३] परम धन्यका[४] ॥२॥ २४॥

॥ ओव्या ॥

अतिसुंदर गमन । तेंची ज्यांचें मार्गदर्शन[५] । मंदहास्यें रम्य[६] वदन । प्रसादचिन्ह[७] तेंचि ज्यांचें ॥२५॥
प्रेमेंकरोनि पाहे गोविंद । तोचि ज्यांचा ब्रह्मानंद । घडीघडी ये गृहा मुकुंद । आदर[८] तोची कल्पिती ॥२६॥
परम मदांध[९] असूनी । भक्तिनिष्ठत्वें[१०] शार्ङ्गपाणी । सुंदर मंद हासादि करोनी । अत्यंत मानी[११] जियातें ॥२७॥
एवं संयोगीं[१२] आनंदभरिता[१३] । वियोगीं[१४] लीलाविष्टचित्ता[१५] ।
ज्ञानें ब्रह्माहमस्मि[१६] प्रत्यय येतां । तरी कृष्णादि[१७] स्वतः पैं होती ॥२८॥
स्वतः कल्पित[१८] लीला करोन । करिती अहंग्रहोपासन[१९] ।
परी जयांचा उपकार गहन[२०] । 'न पारयेहम्' आपण[२१] हरि म्हणे ॥२९॥

*(२) श्रीज्ञानेश्वरमहाराजांची कन्या (३) ब्रह्मचैतन्य (४) अत्यंत भाग्यशाली (५) मार्ग दाखविणे (६) मनोहर (७) कृपा केली याचे लक्षण (८) भगवंतानी आपला मान केला (९) कामाने विव्हल (१०) अत्यंत प्रेमसंपन्न असल्यामुळे (११) सत्कार करी (१२) भगवंत दृष्टिसमोर असतांना (१३) अत्यंत आनंदाने युक्त (१४) भगवंत दृष्टिसमोर नसता (१५) भगवंतांनी केलेल्या लीलांचे ठिकाणी ज्याचे चित्त आसक्त झाले आहे (१६) मी ब्रह्मस्वरूप आहे अशी अनुभव वृत्ति स्फुरली असता (१७) कृष्ण व कृष्णानी केलेल्या लीला (१८) भगवंतानी केलेल्या लीलांची कल्पना करून (१९) मी कृष्ण आहे अशी वृत्ति (२०) अत्यंत. (२१) मी त्या उपकाराची फेड करू शकत नाही असे स्वतः भगवान् म्हणतात*

त्या पर्णित[२२] सकळ गोपनारी । हा तंव धर्मार्थ[१] अवतारी ।
परी जारबुद्ध्या[२] भजोनियां पूतनारी । ब्रह्म सुंदरी पावल्या ॥१३०॥
एवं जीवब्रह्मैक्यपण[३] । पावल्या निश्चयेंकरोन । आणि अंतःकरणादिकें पूर्ण । कृष्णस्त्रीपण[४] पावल्या ॥३१॥
मुळीं[५] वचन 'प्रकृती' । तयाची एवमर्थक्लृप्ती[६] ।
जैसी अनादि[७]पुरुषा प्रकृति । तैशा गोपिका नित्य[८] युवती[९] श्रीकृष्णाच्या ॥३२॥
प्रेमळ आणि ब्रह्मज्ञानी । अधिकारिकत्वें[१०]कृष्णकामिनी । ऐशा जाहल्या तनुमनधनी[११]। ज्याच्या भजनीं लागतां ॥३३॥
जारत्वीं[१२] पतिव्रतापण[१३] । साधिलें जिहीं संपूर्ण । नित्यचि भ्रतार श्रीकृष्ण । वरिला जिहीं[१४] ॥३४॥
सत्कार्यदृष्ट्या[१५] सदंतःकरण[१६] । तें प्रेमवशचि[१७] म्हणोन ।
ईश्वरसामर्थ्यें[१८] आधिकारिकपण । आलें म्हणोन नित्यता हरिस्त्रीत्वा[१९] ॥३५॥

**(य३-१३३) इतरांचेंही अंतःकरण । आहेचि पैं तत्समान । परी नानावृत्ति(२०) म्हणोन । अभिभवन(२१) पावलें ॥३६॥**
**तैशा न होती व्रजबाळा(२२) । ज्या ज्ञानें ब्रह्म केवळा(२३) । हरिऐक्यें(२४)**

*(२२) लग्न झालेल्या. (१) धर्माचा उद्धार करण्याकरिता (२) आपले पति सोडून भगवंताशी समागम करण्याची इच्छा करूनहि (३) जीव व ब्रह्म यांची ऐक्य स्थिति (४) श्रीकृष्णाच्या स्त्रिया होणे (५) मूळ ग्रंथात (६) असा अर्थ करावयाचा (७) पुरुषाची प्रकृति जशी अनादि आहे (८) शाश्वत (९) स्त्रिया (१०) नित्य प्रत्येक द्वापर युगाचे ठिकाणी प्रगट गोपिकांचा अवतार धरून श्रीकृष्णाच्या स्त्रिया होण्याचा अधिकार मिळालेला (११) शरीर, मन आणि द्रव्याने (१२) व्यभिचार करण्यातच (१३) एका पतीवाचून दुसऱ्याशी समागम न करणे (१४) ज्यांनी (१५) ब्रह्मज्ञान होईपर्यंत जगत् नित्य आहे या विचाराने पाहता (१६) अंतःकरणहि नित्य आहे (१७) भगवंताच्या प्रेमाला वाहिलेले (१८) भगवंताच्या सामर्थ्याने (१९) भगवंताच्या पत्नीत्त्वाचा (२०) नाना प्रकारच्या अंतःकरणात वृत्ति उठत असतात (२१) दडपले गेले, झाकले गेले (२२) गोपिका (२३) शुद्ध (२४) श्रीहरीशी ऐक्य पावून.*

**त्यागोनि अविद्याकळा(१) । अंतःकरणें(२) वेल्हाळा(३) शुद्धसात्त्विका(४) ॥३७॥**
**रजस्तममिश्र(५) सत्त्वगुण । तेंचि अविद्येचें लक्षण(६) । <u>अविद्याकृत(७) शरीरा प्रारब्धबंधन(८) ।</u>**
**<u>यास्तव विदेहमुक्ति(९) प्रमाण(१०) अभक्त ज्ञानियां(११) ॥३८॥</u>**
**परी श्रीकृष्णप्रेमेंकरून । अत्यंत निरसले(१२) रजस्तमोगुण ।**
**यालागीं शुद्धसत्त्वांतःकरण(१३) । ईशोपाधिलक्षण(१४) जाहलें ॥३९॥**
**दृष्टिसृष्टिवादीं(१५) पाहतां । प्रतिबिम्बापेक्षिकबिम्बत्वीं(१६) प्रेमैक्यता ।**
**तेणें आनन्देदन्तेवेदन्ता(१७) । अंतःकरणेवान्तःकरणवृत्तिता(१) संग्राह्या(२) ॥१४०॥**

*(१) अज्ञानाचा अंश (२) अंतःकरणाने (३) सुंदरी (४) रजतमोगुणावाचून शुद्ध सत्व गुणाने युक्त (५) तमोगुण रजोगुण यानी युक्त (६) चिन्ह (७) अज्ञानापासून उत्पन्न झालेल्या देहाला (८) प्रारब्धाचे नियमन (९) मरणानंतरची मुक्ति (१०) मान्य (११) ज्या ज्ञान्यांना भक्ति नाही अशा ज्ञान्यांना (१२) क्षीण झाले (१३) शुद्ध सत्त्वाने युक्त असे जे अंतःकरण (१४) ईश्वराच्या उपाधीचे लक्षण. ईश्वराची उपाधिहि शुद्ध सत्त्वात्मक मानिली आहे हा विचार सृष्टिदृष्टिवादी म्हणजे सत्तात्रयवादी यांच्या दृष्टीने झाला (१५) सत्ताद्वयवादी - ब्रह्माची नित्य सत्ता व त्याखेरीज सर्वांची भासमान सत्ता मानणारे - यांच्या मताने (१६) जीवरूपी प्रतिबिंबामुळे जे शुद्ध परब्रह्मच बिंब संज्ञेस प्राप्त झाले, त्या बिंबरूप शुद्ध ब्रह्म ईश्वराचे ठिकाणीच भक्तिप्रेमाने ऐक्य होते (१७)*

*सच्चिदानंद : द्वैत इव*

***<u>आनंदाला इंदतेसारखी इंदता.</u>*** *याचा स्पष्टार्थ असा - इंदता म्हणजे विषयता, दृश्यता, गोचरता. ब्रह्म सदिानंदस्वरूप आहे असे सर्व श्रुतीत सांगितले आहे. वास्तविक पाहता ब्रह्म कांही सत् चित् आनंद असे तीन प्रकारचे नाही. ते एकस्वरूप आहे. पण* ***मोक्षावस्थेत जो ब्रह्मसाक्षात्कार होतो तो वृत्तीच्या योगानेच येत असल्यामुळे, त्या वृत्तीच्या उपाधीने एकरूप ब्रह्मस्वरूपांत सत् चित् आनंद असा त्रिविध***

***भेद उत्पन्न होतो, व मग त्या ब्रह्माचा वृत्तीच्या साह्याने त्रिविध अनुभव येतो;*** *पण हा त्रिविध भेद, वस्तुतः भेद नाही. प्रत्येक अंश जर स्वतंत्र परस्परावाचून अनुभवाला आला असता तर त्यांचा वस्तुतः भेद झाला असता, पण येथे सच्चिदानंद हे अंश परस्परांना सोडून राहत नाहीत व एक अंश प्रधान व एक सामान्य असा त्यांचा अनुभव येतो म्हणून हा भेद नुस्ता 'भेद इव भेद' होय. पाणीच पाण्याचे ठिकाणी निराळे झाल्यासारखे होऊन जसे तरंगरूपाला येते, तसे एकरूप ब्रह्मच सत् चित् आनंद अंशाने भेद पावल्यासारखे होऊन विषय-विषयी भावाला म्हणजे <u>चित् अंशाने ब्रह्मच 'जाणणारे' (ज्ञाता) व सत् अंशाने ब्रह्मच ''जाणले जाणणारे' (ज्ञेय) असा ब्रह्मसाक्षात्कारांत प्रकार होतो व जो अंश जाणला जातो, त्या अंशाला अर्थातच जाणणाऱ्या अंशाच्या दृष्टीने गोचरता, विषयता किंवा इदंता प्राप्त होते;</u> पण ही विषयता किंवा इदंता वस्तुतः नाही म्हणजे अत्यंत परस्परापासून ते अंश भिन्न झालेले नाहीत म्हणून त्याला इदंता इव इदंता किंवा विषयता इव विषयता म्हणावयाची; हीच अद्वैत दशा होय. हा जसा निर्गुण साक्षात्कारांतला प्रकार तसाच तो भक्तीतहि आहे. <u>निर्गुण ज्ञान्याचे ब्रह्म जसे सदंशाचे ठिकाणी प्रत्ययाला येते तसा भक्तांचा सगुण परमात्मा आनंदांशाचे ठिकाणी भासतो.</u> ज्ञान्याच्या वृत्तीने सद्ब्रह्माला इदंता म्हणजे विषयतावृत्तिगोचरता येते तशी भक्ताच्या प्रेमवृत्तीने आनंदांशाला इदंता म्हणजे प्रेमवृत्तिगोचरता येते. हेच ईश्वराचे सगुण रूप होय.*

अंतःकरणेवांतःकरणवृत्तिता[१] संग्राह्या[२] ॥१४०॥
ऐसी जियांची स्थिती । म्हणोनी तियां नित्यमुक्ति । जीवन्मुक्ति आणि विदेहमुक्ति । नाममात्र[३] तेथ ॥४१॥
जीवन्मुक्ति विदेहमुक्ति भिन्न । योगियां नित्यमुक्ति पूर्ण । ऐसें समर्थांचें[४] वचन । पूर्वी प्रमाण बोलिलें ॥४२॥
म्हणोनि ब्रह्मत्वें[५] अभेदमंता[६] । प्रेमें[७] नित्य श्रीकृष्णकांता ।
भेद[८] गेलियाही प्रेमपूर्णता । भिन्नेवभिन्नता[९] आचार्य म्हणती ॥४३॥

॥ श्रीशंकराचार्य-श्लोक ॥

'सत्यपि भेदापगमे नाथ तवाहं न मामकीनस्त्वम् ॥ सामुद्रोहि तरंगः क्वचन समुद्रो न तारंगः ॥१॥'

*(१) अंतः करणासारखी अंतःकरणाची वृत्ति (२) घ्यावी, मानावी (३) भक्तांच्या जीवन्मुक्तीत व विदेहमुक्तीत फरक नसतो (४) रामदासांचे (५) ब्रह्मस्वरूपाने (६) अद्वैतरूप (७) प्रेमामुळे (८) द्वैत (९) भेद नसतो पण भेद इव स्थिति असते.*

॥ ओव्या ॥

भेद गेलियाही देवा । आम्ही तुझें रमाधवा । परी तूं आमुचा उमाधवा । केव्हांचि न होसी ॥४४॥
पाणियाचेनि अभेदपणें । परी तरंगा[१] समुद्रजत्वा[२] येणें । समुद्रा तरंगाचें[३] होणें । केव्हांचि नव्हे ॥४५॥

॥ गीति ॥

ज्ञानें द्वैत निरसलें परि हरि तुमचे आम्ही दयासिंधू ।
सिंधुवरी लहरी जरि परि लहरीचा कधी नसे सिंधू ॥१॥
*(टीप :- सिंधुज लहरिस म्हणती परि लहरीचा नव्हे जसा सिंधू ॥१॥ पाठांतर)*

॥ ओवी ॥

एवं अभेद जाहलिया । प्रेमें ईश्वराचें व्हावया । स्वयें असोनी दुसरिया । तातही[४] बोधिती ॥४६॥ (य३-१३४)

॥ ओव्या ॥

''तैसी क्रिया[५] कीर[६] न साहे[७] । तऱ्हीं अद्वैतीं[८] भक्ति आहे । हें अनुभवाचि जोगे नोहे । बोलाऐसें '' ॥१॥
*(ज्ञानेश्वरी अ. १८ ओ. ११५१)*
''देवदेऊळपरिवारू[९] । कीजे कोरूनि डोंगरू । तैसा भक्तीचा वेव्हारू[१०] । कां न व्हावा '' ॥१॥
*(अमृता. प्रक. ९ ओ. ४१)*

॥ ओव्या ॥

एवं गोपी नित्य हरियुवती[११] । यालागीं शंका न कीजे श्रोतीं ।
भीष्म म्हणे मदीय रति । त्या श्रीपतिचरणीं असो ॥४७॥

*(१) लहरीला (२) समुद्राच्या संबंधीपणाला (३) तरंगसंबंधीचे (४) श्रीज्ञानेश्वरमहाराज (५) कर्म (६) निश्चयाने (७) सहन होत नाही (८) अद्वैत दशेत (९) देवाच्या पूजासामुग्रीचा परिवार, पूजक वगैरे (१०) संबंध (११) श्रीकृष्णाच्या स्त्रिया.*

निश्चयेंकरोनी गोपकन्या । ब्रह्मत्वें[१] होवोनि परम धन्या ।
कांतात्वें[२] जाहल्या कृष्णमान्या[३] । मत्प्रीतिधान्या[४] मांदुस तें[५] ॥४८॥
जो अनादि[६] जगदांकुरकंद[७] । जो भक्तवत्सल श्री गोविंद ।
माझी रती[८] सह मतिवृंद[९] । प्रद्युम्न[१०] तत्पद मानूनि वरो ॥४९॥
जय जय श्रीकृष्ण करुणार्णवा[११] । जय जय नंदसूनो[१२] वासुदेवा ।
तुझिया चरणीं माधवोमाधवा[१३] । वाहिलें जीवा प्रेमभरें ॥१५०॥
युधिष्ठिराच्या राजसूयमखीं[१४] । मुनिगणामाजीं[१५] मंगल[१६] लोकीं[१७] ।
जेथ शशि[१८] रवी न लविती[१९] नखी । पाहोनि निकी[२०] तिची प्रभा[२१] ॥५१॥
आश्चर्ये तटस्थ देखते । वर्णिती रूप आणि महिमेतें[२२] । ऐसिया जगत्पूज्य[२३] श्रीहरीतें । मी दृष्टीपुढें पाहतों ॥५२॥
जो सर्वात्मा[२४] सर्वजीवन[२५] । जो भक्तवत्सल आनंदघन । तो माझे निववावया[२६] नयन । आविर्भवन[२७] पावला ॥५३॥
एवं श्रीकृष्णीं परमभक्ती । आणि येणेंचि पावती जीवन्मुक्ती ।
जे परमात्मस्वरूपीं ऐक्यस्थिति । श्रुति युक्ति अनुभूति[२८] पावलों ॥५४॥

*(१) ब्रह्मरूपाने (२) पत्नीभावाने (३) कृष्णाला आवडत्या (४) माझ्या श्रीकृष्णप्रेमरूपी धान्याला (५) पेव, सांठवण, कणगी (६) उत्पत्तिरहित (७) जगद्रूपी अंकुराला कंदाप्रमाणे, मूळाप्रमाणे असणारा (८) प्रेम (९) वृत्तीसमुदायासह (१०) कामाचा अवतार, अत्यंत सुंदर (११) दयासमुद्रा (१२) नंदपुत्र (१३) हरिहरा (१४) राजसूययज्ञाचे वेळी (१५) मुनींच्या समुदायामध्ये (१६) शुभकारक (१७) लोकांनी (१८) चंद्र सूर्य (१९) फिके पडतात (२०) सुंदर (२१) कान्ति (२२) ऐश्वर्यास, सामर्थ्यास (२३) सर्व विश्वाला वंद्य (२४) सर्वाच्या अंतर्यामी राहणारा (२५) सर्वांचा प्राण (२६) तृप्त करावयाला (२७) प्रगट झाला (२८) अनुभव.*

**मार्तंड[१] एक परि पाहति भिन्नदृष्टी[२] । तेंवी समस्त रचिती प्रतिचित्त[३]सृष्टी[४] ॥**
**स्मृतिसुखें न गणि हा परि त्या कशाया[४क] । सूर्याप्रति श्रम नसे जनता कशाया[४ख] ॥५५॥ (य३-१३५)**
**चैतन्य भेद पावे प्रतिजनबुद्धींत[५] बोध[६] ना[७] म्हणुनी ।**
**गतभेदमोह[८] होउनि मी झालों रूप[९] हें न भव[१०] गणुनी[११] ॥५६॥**

**॥ ओव्या ॥**

**एवं आधींच परमप्रेमा[१२] । वरी[१३] ऐक्यत्वें[१४] जाहला ममात्मा[१५] । आत्मा तो प्रियाची[१६] परम सीमा । यालागीं प्रेमा अनिर्वाच्य[१७] वाढे ॥५७॥ एवं देवव्रत स्तुती[१८] । करूनि साधिली पूर्ण भक्ती ।**
**ब्रह्मरूपीं समाधिस्थिती[१९] । जीवन्मुक्ती पावला ॥५८॥**
**सूत म्हणे शौनक मुने । एवं[२०] परमेश्वरीं तेणें । निजैक्य[२१] करोनि ब्रह्मज्ञानें[२२] । सगुणध्यानें[२३] सुखभरित[२४] ॥५९॥**

*(१) सूर्य (२) आपापल्या निराळ्या दृष्टीने (३) आपल्या आपल्या चित्ताप्रमाणे (४) जगत् (५) प्रत्येक जीवाच्या बुद्धीत (६) यथार्थ ज्ञान (७) नाही (८) ज्यांचा भेदभाव व आसक्ति गेली आहे असे (९) भगवंताचे रूप (१०) संसार (११) तुच्छ मानून (१२) अत्यंत प्रेम, आवडी (१३) शिवाय (१४) ऐक्यामुळे (१५) माझे स्वरूप, अंतर्यामी (१६) अत्यंत प्रेमाचे स्थान (१७) अवर्णनीय (१८) भीष्म (१९) अखंड ऐक्य (२०) याप्रमाणे (२१) आपले ऐक्य (२२) ब्रह्मज्ञानाने (२३) सगुण परमेश्वराच्या ध्यानाने (२४) अखंड सुखरूप. (४ क) चाबूक (४ ख) प्रकाशण्याला.*

**''सर्गेऽपि नोपजायन्त'' इति । तेंवीचि 'प्रलये न व्यथन्ति' ।**
**''न मे भक्तः प्रणश्यति'' । या भगवदुक्तस्थिती[१] प्राप्त भीष्म ॥६०॥**
**ब्रह्मत्वें[२] नाहीं जननमरण[३] । भक्त्या[४] तनू[५] चित्सुखघन[६] ।**
**यालागीं देवव्रत आपण । जिता[७] देवपण[८] पावला ॥६१॥**
**तेथ परम मुक्तीचिया[९]दर्शणी । सकलही जाहले तूष्णी[१०]।**
**आनंदें भरले लोक तीन्ही । दुंदुभी सुरगणीं[११] वाजविल्या ॥६२॥**
**जयाची पूर्ण ब्रह्मदृष्टी । तों सत्पुरुष करिती प्रशंसागोष्टी[१२] । देव करिती पुष्पवृष्टी । मानवसृष्टी[१३] आनंदू ॥६३॥**
**एवं ज्योतिनिमग्न[१४] देवव्रतू । ज्योतिरूपें[१५] बाह्यस्थितू[१६] । परमानंदभरितचित्तू[१७] । भक्तिज्ञानयुक्तू[१८] महंत तो ॥६४॥**
**येणेंचि बोधें[१९] सकल जन । श्रीकृष्णीं ठेवोनि मन । युधिष्ठिर सवें घेऊनि कृष्ण । गजपुरा[२०] आपण पावला ॥६५॥**
**चहोंकडे जाहली शांती । निमाली[२१] दुःखशोकापक्रांती[२२] ।**
**धर्मयुक्त[२३] युधिष्ठिर धर्मस्थिती[२४] । राजसंपत्ती[२५] चालविली ॥६६॥**

**॥ दोहा ॥**

**श्रीज्ञानेश्वरचरणरजीं[२६] शतशः[२७]करुनि प्रणाम । कृष्ण विष्णु गोविंद हरी नित्य जपू प्रभुनाम[२८]॥१६७॥(य३.१३६)**

*(१) या श्लोकांत, ज्या अवस्थेस पूर्ण झालेला पुरुष प्राप्त होतो म्हणून श्रीकृष्णाने सांगितले आहे त्या स्थितीस भीष्म प्राप्त झाले (२) ब्रह्मरूप झाल्यामुळे (३) जन्ममृत्युरूप संसार (४) भक्तीने (५) देह (६) सद्दिानंदरूप (७) जिवंतपणीच (८) कृष्णरूप (९) परममुक्ति म्हणजे विदेह मुक्ति झाली असे पाहताच (१०) स्तब्ध, मौन धारण करून राहिले (११) देवानी (१२) स्तुतिपर बोलणी (१३) मृत्युलोकांतील जीवांमध्ये (१४) भगवंताच्या तेजांत मिळालेले (१५) चैतन्यरूपाने (१६) बाहेर राहिलेला देह (१७) चित्त परिपूर्ण आनंदाने भरलेला असा (१८) भक्ति व ज्ञान या दोहीनीहि युक्त असलेला (१९) ज्ञानाने, स्थितीने (२०) हस्तिनापुराला (२१) नाहीसी झाली (२२) दुःखशोकाने व्याकुळ होणे (२३) क्षात्र धर्मानुसार वागणारा (२४) धर्माच्या संरक्षणांकरिता (२५) राजवैभव-राज्य करू लागला (२६) श्रीज्ञानेश्वर महाराजांच्या चरणाच्या धुळीला (२७) अनंत (२८) हरीचे नांव.*

**हरिः ॐ तत्सत् श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरकृपाप्रसादे नानाछंदबद्धे गद्यपद्यान्विते प्रियलीलामहोत्सवे आमंत्रणविलासे भीष्मब्रह्मप्राप्ति-युधिष्ठिरराज्यप्रलंभो नाम नवम सखीप्रेषणम् ।**

**॥ श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरमहाराजापर्णमस्तु ॥**

....

---

## सखीप्रेषण १० वें. विषयानुक्रम

***श्रीकृष्णाच्या द्वारकागमनसमयीं पुरस्त्रियांनीं केलेलें श्रुतिमनोहर स्तवन व श्रीकृष्णाचें द्वारकेप्रत गमन. पृ.१३७-१६०***

*मंगलाचरण. दशम प्रेषणांतील विषयांचें संक्षेपेंकरून कथन. आपल्या पुरीप्रत येऊन युधिष्ठिर राजा काय करिता झाला या विषयीं शौनकांचा प्रश्न व सूताचें उत्तर :- परीक्षिद्रक्षणाच्या योगानें पांडवांचा वंश अंकुरित करून व युधिष्ठिराला राज्य देऊन परमात्मा श्रीकृष्णाचें प्रसन्न होणें व भीष्माच्या व भगवंताच्या बोधानें धर्मनिष्ठ झालेल्या युधिष्ठिरानें समुद्र वलयांकित पृथ्वीचें पालन करूं लागणें. युधिष्ठिराचा सत्त्वप्रभाव व त्यामुळें कृतयुगसंज्ञक कालप्रादुर्भाव वर्णन १३७. हस्तिनापुरांत कांहीं दिवस राहिल्यावर पांडवांची अनुज्ञा घेऊन द्वारकेस जाण्याकरितां श्रीकृष्ण परमात्मा रथारूढ झाले असतां समस्त स्त्रीपुरूष मंडळीला विरह सहन न होणें. भगवद्यश महिमा, पांडवांनां श्रीकृष्णाची अपरोक्ष संगती, सख्यभक्ति व महात्म्यज्ञानवर्णन १३८. श्रीकृष्णाचा वियोग होणार या विचारानें पांडवांच्या व बांधवस्त्रियांच्या अंतःकरणाची स्थिती. १३८. गमनसमयींच्या महोत्सवाचें वर्णन. श्रीकृष्णाच्या तेज सौंदर्यादिकांमुळें कांहीं स्त्रिया विस्मित झाल्या असतां दुसऱ्या स्त्रियांनीं त्यांनां श्रीकृष्णस्तुतिमिषानें केलेलें (य३-१८) परमार्थ कथनः- श्रीकृष्णमाहात्म्य वर्णन. परमात्म्याचें सत्यस्वरूप वर्णन. १३९. 'सृष्टीच्या आदिअंतीं जीव परमात्म्यांत लीन होतो' यावर जीव ब्रह्म असून लीन कसा होतो? अशी शंका व तिच्या समाधानार्थ अविद्या- आभासें करून ब्रह्माला जीवत्व, अविद्येचें कार्यानुमेयत्व, जीवाचें एकत्व, प्रमातृसंज्ञक जीवाभासाचें अनेकत्व, बंधमोक्ष जीवाभासालाच आहेत व प्रलयकालीं जीवाची स्थिती, या विषयांचें निरूपण. १४०. **शंकाः**- (१) जीवाभासासच जर बंधमोक्ष आहेत तर अंतःकरणामध्येंच ब्रह्माचा आभास मानून अनेक जीववाद कां स्वीकारूं नये. (२) बंधमोक्षार्थ जर अंतःकरणस्थ जीवाभासाचा स्वीकार केला तर अविद्यागत आभासरूपी एकजीव सांगण्याचें प्रयोजन काय? (३) जीवाभासालाच जर बंधमोक्ष आहेत तर अविद्येमध्यें असलेला ब्रह्माभासरूपी एकजीव केव्हांच मुक्त होणार नाहीं, शुकवामदेवादि मुक्तिबोधक शास्त्राला वैय्यर्थ्य येईल व एक 'ब्रह्म' नित्य व दुसरी 'अविद्या' नित्य अशी द्वैतापत्ती येईल. १४१. **समाधानः-** शंकेस्तव अभिनंदन ज्या ज्या प्रक्रियेनें जीवाला ब्रह्मबोध होतो त्या त्या प्रक्रियेचें उत्तमत्व व अनेकत्व सप्रमाण निरूपण. १४१. अनेकजीववाद व एकजीववाद या दोन्ही प्रक्रियांविषयीं जाग्रच्छ्रुतीचें वचन प्रामाण्य. १४२. पहिल्या शंकेचें उत्तर :- कारणरूप आणि कार्यरूप दोन प्रकारचा उपाधी. पहिल्या उपाधिगत आभास बंधाला पावत नाहींत व दुसऱ्या उपाधिगत आभास बंधाला पावतात व द्वितीय उपाधीचे ठिकाणीं येणारे आभास जीवाचेच आहेत ब्रह्माचे नाहींत याविषयीं दृष्टांतपूर्वक विवेचन. अथवा साक्षी आणि आनंदमय असा उभयात्मक प्रमाता भोक्ता आत्म्याला ठरवून **दृष्टिसृष्टिवादांत उत्तर,** १४२-१४३. दुसऱ्या शंकेचें उत्तर :- अंतःकरण कार्यरूप असल्यामुळें कारणाविद्येचा स्वीकार व तिचेठायीं ब्रह्माभास जीव न मानल्यास जडाचें स्वातंत्र्य व ब्रह्माला कर्तृत्व या दोन अतिप्रसंग दोषांचीं प्राप्ती. मायेचे ठिकाणीं आभास ईश्वर मानून व तिचें कार्य अंतःकरण त्याचे ठिकाणीं ब्रह्माचे आभास जीव मानून अंतःकरणाच्या नाशानेंच जीवाची मुक्ति संभवनीय मानल्यास येणारे खडतर दोष व तन्निवारणार्थ (य३-१९) अविद्येचेठायीं मिथ्याप्रतिबिम्बरूपी ब्रह्माभासजीवाची, तदपेक्षी बिम्बत्वारोपावच्छिन्न अनध्यस्त ईश्वराची व तदुपदिष्टवेदजन्य महावाक्यानें उद्भूत होणाऱ्या विशेष चैतन्यज्ञानाची आवश्यकता. १४३-१४४. तिसऱ्या शंकेचें उत्तर :- बंधमोक्ष जीवाभासरूपी प्रमात्याला वास्तविक वाटत असून जीवाचे ठिकाणीं कल्पित आहेत याविषयीं जलाकाशाचा व घटाकाशाचा दृष्टांत, स्वामी विद्यारण्यांचें मत व तातवचनप्रामाण्य. तातवचनाचा भावार्थनिरूपण. १४५. ''मी ब्रह्म मी ब्रह्म'' अशा वृत्तिवाचाळपणाचें वैय्यर्थ्य. १४६. मुख्य जीवाचे ठिकाणीं बंधमोक्ष कल्पित असूनही आपेक्षिक बिम्बत्वारोपावच्छिन्न ब्रह्मरूपी गुरुस्थानीय परमेश्वराच्या भक्तीची तातवचनप्रामाण्यानें आवश्यकता व ह्या ईश्वर लक्षणाला अर्थदीप्तिकार दिवाकर महाराजांची संमति. अद्वैतभक्तिविषयीं तातवचनप्रामाण्य. १४६. उपर्युक्त एकजीव व अनेकजीव प्रतिपादक गीतावचनांचें दृष्टिसृष्टिवादपर आनयन व शुकवामदेवादिकांच्या मुक्तिबोधक वचनांची व्यवस्था व त्यांच्या मुक्तीचें भिन्न भिन्न दृष्टीनें निरीक्षण. १४७. शुकादिकांच्या कृष्णार्पणतारूप भक्तिविषयीं*

*श्रीमद्भागवताचें व तातवचनाचें प्रामाण्य. अद्वैतानंतर भक्त्य.र्थ भासणारा द्वैतपणा बाधक नाहीं याविषयीं श्रुतिसंताभिप्राय निरूपण व अशा भक्तीची श्रेष्ठताकथन. १४७. 'हा परमात्मा श्रीकृष्णब्रह्मस्वरूपी होता' या वचनावरून सत्तात्रयवादाची जीवाभास दृष्टीनें सिद्धि. १४८. त्या स्त्रियांनां महावाक्यावांचून एवढें ज्ञान कसें झालें या प्रश्नाचें उत्तर. परमेश्वराचें ठिकाणीं कोणत्याच प्रकारचा विस्मय न करितां केवळ ब्रह्मरूप होऊन राहणेंच इष्ट आहे या विषयीं आपल्या सखियांनां स्त्रियांचें सांगणें व विस्मय हा रसास्वाद विघ्नाला उत्पन्न करतो याविषयीं सप्रमाण निरूपण. ब्रह्मबोध झाल्यानंतर परमात्म्याच्या स्तुतिरूप भाषण, जीवाभासाच्या दृष्टीनें पुन्हा झालें तरी महात्म्यज्ञानरक्षकत्वास्तव त्याचें अबाधकत्व. १४८. परमात्मा अखंड निष्प्रपंच असून अध्यारोपापवादानें प्रपंचयुक्त भासतो याविषयीं निरूपणः- आरोपापवादाचें लक्षण. आरोप सांगण्याकरितां परमात्म्याला कारणावस्थानिरूपण. आरोप कोण करतो? या प्रश्नाचें (य३-२०) उत्तर. १४८. 'जन्माद्यस्य यतः' या सूत्रांत सांगितलेलें ईश्वरकर्तृत्व अविद्येविषयीं नाहीं. १४९. भ्रमाला अधिष्ठानाची अपेक्षा, सत्तात्रय वादियांच्या ईश्वराचें आरोपजन्यत्व, व सत्ताद्वय वादांत ब्रह्माधिष्ठानावर आरोपित जीवाला कर्तृत्वसिद्धि १४९. भ्रमोत्पत्तीचा असंभव निरूपण व आधीं भ्रमाभाव पाहून भ्रम निवर्तल्यावर भ्रमाचा आदि कळणें शक्य आहे या शंकेचें उत्तर १४९. मूलाविद्येचें अनादिसान्तत्व, आरोपदृष्टीनें ब्रह्माला जीवत्व, व जीवाची कारणावस्थानिरूपण १५०. अविद्येचा फळभाव व ब्रह्माचें उपादान व निमित्तकारणत्व निरूपण १५०. सत्तात्रयवादाचें प्रयोजन निरूपणः- कारणावस्थेंत जीवाला मुक्तीचा असंभव व त्याच्या मुक्त्यर्थ ईश्वरानें त्याला नामरूपें देऊन ब्रह्मबोधार्थ वेदनिर्माण करणें १५१. मीमांसक, सांख्य व वैय्याकरण यांच्या निरीश्वरमताचें खंडन व वेदाचें ईश्वरप्रणितत्व १५१. दृष्टिसृष्टिवादानें कारणारोपनिरूपणः- अज्ञानानें ब्रह्माला जीवैकपण, आपेक्षिक बिम्बारोपावच्छिन्न अनध्यस्तविवर्तब्रह्माला ईश्वरत्व व त्याच्या आश्रयानें जीवसंकल्पाचा खटाटोप १५१. महास्वप्नस्थ जीवकल्पित कर्तृत्वगुणामुळें ईश्वराच्या अथवा गुरूच्या वेदवचनानें जीवाची मुक्ति १५१-१५२ वेदवचनाचें अबाधित्व १५२ गीतेच्या स्तुत्यर्थ वेदाचें सौषुप्त श्रुतित्व, व गीतेचें जाग्रच्छ्रुतित्व कथन व वेदाहून गीतेची अत्यंत सेव्यमानता १५२ गीतेच्या वेदसम प्रामाण्याची सिद्धि १५३ मुकुंदकथागायनाशिवाय योगादि साधनें चित्त शुद्ध करूं शकत नाहींत. योगियांनां मिळणारी गती भक्तांना सहज मिळते. भगवंताच्या प्रेमळ भजनानें बुद्धि शुद्ध व सूक्ष्म झाली असतां आत्मदर्शन होतें. १५३. आत्मा मनोवागगोचर आहे व आत्मा बुद्धिगोचर आहे या विरोधिवचनांसबंधीं शंका व तिचा परिहार १५३-१५४ वृत्तिव्याप्ति व फलव्याप्ति सदृष्टांत निरूपणपूर्वक वरील शंकेचें उत्तर व सगुण निर्गुण भेदानें प्रश्नांतील अर्थद्वयाची व्यवस्था १५४ ईश्वराचें एकत्वनिरूपणः– नानेश्वरापत्तिबोधक (नानाईश्वर आपत्तिबोधक) वाचस्पतिमताचा अंशतःसमन्वय १५४ वाचस्पतिमताचें सयुक्तिक खंडन १५५ साधारणासाधारण (य३-२१) प्रपंचनिरूपण व अनेकजीववाद-दृष्टीनें एकेश्वरसिद्धि. दृष्टिसृष्टिमतानें एकेश्वरसिद्धि व ईश्वराकडे जीवकल्पित कर्तृत्व. ज्ञानीदृष्ट्या परमेश्वराचें अकर्तृत्व व प्रेमदानार्थ श्रीकृष्णाचें अनध्यस्तविवर्तत्व निरूपण. श्रीकृष्णमहिमा वर्णन. १५५ अधर्म प्रादुर्भवनकालीं सत्त्वगुणानें भगवंताचें अवतीर्ण होणें १५६. शंका - अवतारमूर्ती शुद्धसत्त्वमय आहे किंवा मिश्रसत्त्वमय आहे ? समाधान- श्रीकृष्णपरमात्मा शुद्धसत्त्वावतार असून मिश्रसत्त्वासारखा भासतो. मिश्रसत्त्व असता तर मारलेले असुर मुक्त न होते. सूर्यदृष्टांतानें प्रभूचा सत्त्वप्रभाव व अनध्यस्तविवर्तत्व निरूपण १५६ परमात्म्याचें षड्गुणैश्वर्यकथन परमात्मा कर्माप्रमाणें फळ देतो तथापि सर्वांवर त्याची सारखी कृपा कशी आहे याविषयीं निरूपण १५६ भक्त जेव्हां जेव्हां आठवण करतात तेव्हां तेव्हां परमात्मा प्रगट होतो १५७ नामाग्नीनें ज्यांचें अघतणार जळालें तें ईश्वराच्या कृपामृतानें भिजून भवपार होतात. कृष्णावताराची विशेष रीति व यदुकुलाची, मधुवनाची व रुक्मिण्यादि स्त्रियांची धन्यतावर्णन १५७ व्रजस्त्रियांचें परमगुरुत्व, त्यांच्या सेवनानें रुक्मिण्यादि स्त्रियांची धन्यता व प्रभूचें अधरामृत मिळण्याकरितां त्यांचें गुरुत्वेंकरून सेवन करण्याविषयीं सर्व स्त्रियांनां उपदेश १५८ व्रजवनितांचा त्याग व श्रीकृष्णाविषयीं आवडी पाहून रुक्मिण्यादि स्त्रियांनीं श्रीकृष्ण प्राप्तीविषयीं केलेल्या उपायांचें व्यक्तिशः वर्णन. श्रीकृष्णाची एकपत्नित्व स्थिति व सामर्थ्यवर्णन १५८ स्त्रियांची अशुचिस्थिति व भगवत्प्रेमामुळें तिला आलेली विचित्र शोभा. सदेहब्रह्मनिष्टदृष्टांतानें वर्णन १५० श्रीकृष्णधनानें महाधनिका झालेल्या रुक्मिण्यादि स्त्रियांचें भाग्यवर्णन व त्यांनां वंदन. ह्या स्त्रीस्तवाच्या श्रवणपठनाची फलश्रुती, युधिष्ठिरादि पांडवांची ''ममैवासौ'' भक्ति व विरहातुरतावर्णन. पांडवांचें सांत्वन करून परत पाठविल्यावर श्रीकृष्णाचें स्वनगरीं निघणें व कुरु जांगलादि देश ओलांडून आनर्त समीप आल्यावर रथाखालीं उतरून सांयसंध्योपासन करणे १५९ उपसंहार १६०. (य३-२२)*

# सखीप्रेषण १० वें.

## स्त्रियांनी केलेले श्रीकृष्णस्तवन

**॥ श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरमाउली समर्थ ॥**

**॥ दोहा ॥**

**अलकावतिपतिपाउलें[१] चिंतुनि वारंवार । उमामहेश्वर वंदुनी करु संसृतिसंहार[२] ॥१॥**

**॥ ओव्या ॥**

**या दशमाध्यायीं प्रस्तुत[३] । स्वपुरीं[४] जाता वैकुंठनाथ[५] । स्त्रियांनीं स्तविला[६] कृपावंत । वर्णन यथार्थ हें केलें ॥२॥**

**तैसेंचि द्वारकेकडे गमन । हेंहि केलें निरूपण । [७]कथासंदर्भी शौनक प्रश्न । केंवी करी तें ऐका ॥३॥**

शौनक म्हणाले :- हे सूत ! समस्त वैरीयांचा विनाश करून तो युधिष्ठिर राजा आपल्या पुरीप्रत येऊन काय करिता झाला ? याप्रमाणें प्रश्न ऐकून सूत म्हणाले :- मुने ! नष्ट[८] जो पांडवांचा वंश तो परीक्षिद्रक्षणाच्या[९] योगानें

*(१) श्रीज्ञानेश्वर महाराजांचे चरण (२) संसाराचा नाश (३) आता (४) आपल्या राजधानीस (५) श्रीकृष्ण (६) प्रार्थिला (७) कथेला धरून (८) नाहीसा होऊ पहात असलेला (९) परिक्षितीचे रक्षण करून*

अंकुरित[१] करून आणि युधिष्ठिराला राज्य देऊन परमात्मा श्रीकृष्ण प्रसन्न होते झाले. तेव्हां हें सर्व जगत् परमेश्वराच्या आधीन आहे अशा बोधानें[२] भ्रमनिवृत्त[३] झालेला आणि भीष्माच्या व भगवंताच्या मुखांतून ऐकिलेल्या धर्माच्या योगानें धर्मनिष्ठ झालेला युधिष्ठिर इंद्राप्रमाणें समुद्रवलयांकित[४] पृथ्वीचें पालन करूं लागला. याप्रमाणें युधिष्ठिर राज्य करीत असतां त्याच्या यज्ञाच्या योगानें तृप्त झालेल्या देवतांपासून यथाकाम[५] पर्जन्य पडत असे. पृथ्वी कामधेनूप्रमाणें धान्य आणि सर्व रत्नें उत्पन्न करूं लागली. हें त्याचें सत्याचें[६] फळ. त्याचप्रमाणें गायी पुष्कळ दूध देऊं लागल्या. नदी, समुद्र, पर्वत, वनस्पति, इत्यादिक धर्मराजाच्या इच्छेनेंच वेळच्यावेळीं उपयुक्त[७] होत असत. हें त्याच्या तपाचें फळ समजावें. त्याचप्रमाणें सदा फलित[८] अशा औषधी यथाकालीं त्याच्या इच्छेनेंच सर्व पदार्थ पुरवीत असत. हें त्याच्या धर्माचें[९] फळ समजावें. त्याच्या योगप्रभावामुळें[१०] राज्यांतून मानसिक दुःखें नाहींशीं झालीं. अहिंसेमुळें शारीरिक दुःखें निवर्तलीं. त्याच्या भूतदयेनें आधिदैविक[११], आधिभौतिक[१२], आध्यात्मिक[१३] हे तिन्ही ताप[१४] दूर पळाले. (य३-१३७) आणि त्याच्या न्याय्यत्वामुळें[१५] पापकारक[१६] रागद्वेषादिक[१७] क्लेश[१८] कोणाचा अभिभव[१९] करीत नसत. त्याचप्रमाणें त्याच्या पूर्ण ज्ञानामुळें त्याला कोणी शत्रूच उत्पन्न झाला नसून,

*(१) वाढीला लावून (२) यथार्थ समजुतीने (३) भ्रमरहित (४) समुद्राचा वेढा जेवढ्या पृथ्वीला आहे तेवढ्या पृथ्वीचा (५) पाहिजे तेवढाच (६) सत्य पालनाचे (७) उपयोगी (८) नेहमी फळांनी युक्त असलेल्या (९) धर्माचरणाचे (१०) योगसामर्थ्याने (११) देवतांच्या क्षोभामुळे होणारे (१२) भूतांच्यामुळे होणारे (१३) आपल्या वासनेमुळे होणारे (१४) दुःख (१५) न्यायाने वागल्यामुळे (१६) पाप उत्पन्न करणारे (१७) पाप घडून येण्यास अनुकूल वृत्ति (१८) दुःख देणाऱ्या वृत्ति (१९) पछाडित नसत, विचार नाहिसा करित नसत.*

इह[१], पर[२], आणि मोक्ष[३] या सर्वांचा विभागी[४] असा तो जीवन्मुक्तिस्थित[५] 'राजा कालस्य कारणं'[६] या वाक्यांत सांगितल्याप्रमाणें कृतयुगसंज्ञक-कालप्रवर्तक[७] लोककल्याणार्थ महाराज युधिष्ठिर राज्य करता झाला.

**॥ संस्कृत गद्य ॥**

**ततः[८] श्रीकृष्णो हस्तिनपुरे कतिचिन्मासान् सुहृदां शोकनिवृत्तये सुभद्रा-द्रौपद्योर्भगिन्योः प्रियचिकीर्षया च स्थित्वा, धर्मादीन् पृष्ट्वा तैरनुज्ञातः सन् द्वारकां गन्तुं रथमारुरोह । तदा सुभद्रा-द्रौपदी-उत्तरा-कुंती-गांधारी-अर्जुनः कृपो-नकुलः सहदेवो भीमो धौम्यश्च सत्यवत्यादयः स्त्रियश्च भगवतो विरहं न सेहिरे ॥**

**॥ करुणास्यवृत्त ॥**

**यश[९] एक वेळ यदैकुनी[१०] जन सत्पदा[११] न च सोडिती । सुतदारवित्तविभूतिसंसृतिपाश[१२] तो चट[१३] तोडिती ॥**

*(१) मृत्युलोकातील सुख (२) परलोकातील सुख (३) मोक्षसुख, ब्रह्मसुख (४) भोगणारा (५) जीवन्मुक्त स्थितीस पोहोचलेला (६) काळाचे कारण राजा आहे (७) कृतयुग नांवाचा काळ प्रवृत्त करणारा, कृतयुगांतील धार्मिक स्थिति उत्पन्न*

*करणारा **(८) गद्याचा अर्थ –** नंतर भगवान् श्रीकृष्ण धर्मराजादि आप्तांचा आपल्या जाण्याने होणारा शोक नाहिसा करण्याकरिता व सुभद्रा, द्रौपदी या दोघी बहिणीचे प्रिय करण्याकरिता कांही दिवस हस्तिनापुरीत राहिले व नंतर धर्म राजांना विचारून, त्यांनी द्वारकेस जाण्याकरिता संमति दिल्यावर, द्वारकेला जाण्याकरिता रथारूढ झाले. भगवान् द्वारकेला जातात असे पाहून सुभद्रा, द्रौपदी, उत्तरा, कुंती, गांधारी, अर्जुन, कृप, नकुल, सहदेव, भीम, धौम्य व सत्यवती इत्यादींना फार दुःख झाले (९) कीर्ति (१०) ज्याचे ऐकिले असता (११) अविनाशी अशा चरणाला (१२) पुत्र, स्त्री, धन, ऐश्वर्य अशा संसाराची आसक्ति (१३) झट्दिशी.*

**अपरोक्षसंगति[१] साधुनी मग सोडितीलच केंवि ते । जननीविणे[२] शिशु[३] दीन शोकित पंडुनंदन तेंवि ते ॥४॥**

**॥ ओव्या ॥**

**दर्शन[४] स्पर्शन[५] आसनाशन[६] । तैसें एकेसंमति[७] शयन[८] ।**
**एवं[९] सख्यभक्त्या कृष्णस्थित[१०] मन । वरी माहात्म्यज्ञान[११] व्यासादिमुखें ॥५॥**
**नाना उपकारांची[१२] मांदी । एवं उघड[१३]प्रेमसमाधी[१४] । विसरतील कवणेविधी । ते विचारी सुबुद्धी[१५] शौनका ॥६॥**

**॥ संस्कृत-गद्य ॥**

**अत [१६]एव अनिमिषैर्नेत्रैस्तमेव परमात्मानं वीक्षमाणास्तत्र तत्रार्हणानयनाद्यर्थं चलन्ति स्म ।**

पुष्कळ दिवसाच्या सहवासामुळें हा परमात्मा येथेंच राहो असे वाटून एक एक दिवस राहवून घेण्याकरितां ते प्रयत्न करूं लागले. याप्रमाणें परमेश्वराचें गमनसमयीं वियोग सहन न होऊन अतिउत्कंठेनें पडत असलेल्या अश्रूंचें,

*(१) साक्षात् सहवास झाल्यावर (२) आईवाचून (३) लहान मुले (४) नित्य भगवंताचे रूप डोळ्यासमोर दिसणे (५) भगवंताच्या देहाचा सुखस्पर्श होणे (६) एके ठिकाणी बसणे व भगवंताबरोबर जेवणे (७) मिळून (८) निजणे (९) याप्रमाणे सख्य भक्तीच्या योगाने (१०) कृष्णाचे ठिकाणी जडलेले (११) परमेश्वरज्ञान, भगवान् श्रीकृष्ण साक्षात् परमात्मा आहे असे ज्ञान (१२) अनंत उपकार झालेलें (१३) स्पष्ट (१४) प्रेमामुळे अखंड भगवदाकार चित्र झालेले. (१५) सूज्ञ (१६) **गद्याचा अर्थ –** म्हणून डोळ्याची पापणी न लावता सारखे भगवंताकडे पहात, भगवंताच्या सत्काराला योग्य अशा साहित्याची जुळवाजुळव करण्याकरिता त्यांची धांवपळ सुरू झाली*

आप्तगमनकालीं[१] शोक[२] कल्याणकारक[३] नाहीं असें जाणून, बांधवस्त्रिया डोळ्यांच्या डोळ्यांत स्तंभन[४] करीत होत्सात्या प्रेमानें परमेश्वराकडेच पाहूं लागल्या. (य३-१३८)

**॥ संस्कृत गद्य ॥**

**तदा[५]मृदंगभेर्यादयो नेदुः ।**
**तथा प्रासादारूढाः कुरुस्त्रियः श्रीकृष्णं कुसुमैर्ववृषुः ।**
**तदार्जुनश्छत्रं जग्राह ।**
**उद्धवसात्यकी चामरे जगृहतुः ।**
**निर्गुणत्वादननुरूपा मानुषनाट्यत्वाानुरूपा विप्रा आशिषो ददुः ।**
**तदा श्रीकृष्णचरणाविष्टचेतसां गजपुरस्त्रीणाम् उपनिषन्मूर्तिरुचिराः परस्परमालापा बभूवुः॥**

**॥ ओवी ॥**

**तेथ तेज सौंदर्यादिकीं[६] विस्मित[७] । कांहीं स्त्रिया आश्चर्यभरित ॥**
**तयातें अन्य[८] सखि यथार्थ । हरिस्तुत्या[९] परमार्थ[१०] बोलिती ॥७॥**

*(१) आपल्या प्रिय बांधवाच्या जाण्याचे वेळी (२) दुःख करणे (३) मंगलकारक (४) अश्रू दाबून (५) गद्यार्थ - भगवंताच्या निघण्याचे वेळी मृदंग भेरी इत्यादि वाद्यें वाजू लागली. सर्व कुरुस्त्रिया आपापल्या महालातील सज्जावरून भगवंतावर पुष्पवर्षाव करू लागल्या. अर्जुनाने भगवंतावर छत्र धरिले होते. उद्धव-सात्यकी या दोघांनी भगवंतावर चामरे धरिली. भगवंताच्या निर्गुण स्वरूपाच्या दृष्टीने पाहता भगवंताला आशिर्वाद देणे संभवत नाही, तरीपण मानुष अवताराचे भगवंताने जे नाटक केले, त्या दृष्टीने आशिर्वाद योग्य वाटून ब्राह्मणांनी भगवंताला आशिर्वाद दिले. अशावेळी भगवान् श्रीकृष्णाचे चरणाचे ठिकाणी ज्यांचे चित्त अत्यंत आसक्त झाले आहे अशा हस्तिनापुरातील स्त्रिया आपसात, वेदाने प्रतिपादिलेल्या ब्रह्ममूर्तीला शोभणारा असा संवाद करित्या झाल्या (६) सौंदर्यादिगुणामुळे (७) आश्चर्यचकित (८) दुसरी (९) श्रीकृष्णाच्या*

*स्तुतिद्वारा (१०) श्रीकृष्णाचे यथार्थ स्वरूप.*

**॥ पद १ ॥**

**बाइनों ! नवल काय मना ॥ ध्रु० ॥**
**योगी म्हणती परमेश्वर या । देवकीनंदना ॥१॥**
**जगदुत्पत्तिस्थितिलय(१) दाविती । यदीय(२)तटस्थपणा(३) ॥२॥**
**निजभजकां(४) करि परमसुखी हा । दे कैवल्यधना(५) ॥३॥**
**ज्ञानेश्वर करुणेविण याच्या । न कळति आत्मखुणा(६) ॥४॥८॥**

**॥ पद २ ॥**

**बाई ! हा यदुपति तोचि सये(७) ॥ ध्रु० ॥ गडे ! हा०॥**
**महावाक्याविण इतर श्रुती यत्(८)-। ज्ञान परोक्ष(९) सुये(१०) ॥१॥**
**महावाक्यें अपरोक्षें(११) कळतां । फळतो(१२) बंधलयें(१३) ॥२॥**
**श्रुतियुक्तिगुरुवचनानुभवीं(१४) । ज्या(१५) हृदि(१६) भजति स्वयें ॥३॥**
**सांडुनि चितिवैभव(१७) तो चालवी । विजयरथाचि(१८) हये(१९) ॥४॥**
**अलकावतिपतिकरुणेवांचुनी(२०) । न कळेऽनंत नये(२१) ॥५॥९॥**

**॥ पद ३ ॥**

**आणखि नाहीं जुना ॥ ध्रु०॥ याहुनी ॥**
**कापिल जी नर सोडुनि वर्ते । हा चोवीस गणा(२२) ॥१॥**
**सृष्टिपूर्वी हा एकचि होता । वैदिक(२३) सत्यपणा(२४) ॥२॥**
**हा माती घटीं तेंवि सदाश्रय(२५) । जगवागारभणा(२६) ॥३॥**

*(१) जगाची उत्पत्ति, स्थिति आणि संहार (२) ज्याचा (३) अकर्तेपणा (४) आपले भजन करणाऱ्या भक्ताला (५) मोक्षरूप संपत्तीला (६) स्वरूपाची ओळख (७) सखे (८) ज्याचे (९) शब्दमात्र, आनुमानिक (१०) उत्पन्न करितात (११) अनुभवाने, तदाकार वृत्तिभावाने (१२) लाभतो, प्राप्त होतो (१३) संसार बंधनाचा नाश होऊन (१४) वेदवाक्य, तर्क, गुरूचे वचन आणि आपला अनुभव यांच्या साह्याने (१५) ज्याला (१६) हृदयात (१७) ब्रह्मसामर्थ्य, आपले परमेश्वर ऐश्वर्य, (१८) अर्जुनाच्या रथाचे (१९) घोडे (२०) श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या कृपेवाचून (२१) अनंत तर्कांनी (२२) चोवीस तत्त्वांवर (२३) वेदांत सांगितलेले (२४) सत्स्वरूप (२५) सत् स्वरूप व आधार (२६) शब्दाने आरंभिलेल्या जगाला, शब्दमात्र असलेल्या जगतास. (जग वाक् आरंभणा)*

**याच्या सत्सामान्यचेतनीं(१) । भेदा(२) अनृतपणा(३) ॥४॥**
**यद्विशेषचित्(४) कळुनि महात्मे । तोडिति(५) जनिमरणा(६) ॥५॥**
**सत्य रूप याचें समजाया श्री ज्ञानेश म्हणा ॥६॥१०॥**

**॥ करुणास्यवृत्त ॥**

**गुणसाम्यभंग(७) न तैंचि हा प्रभु एक(८) अद्वय(९) अक्षय(१०) । प्रलयांत(११) यापरि ज्याप्रती पुढती कदापिहि न क्षय(१२) ॥**
**म्हणुनी तथाविध(१३)एधवाहि(१४)असेंच मानसि ओळखा । मग मारुनी भवबंध(१५)हा रिपु(१६)चित्सुधाघृतगोळ खा(१७)॥११॥**

**॥ ओव्या ॥ (य३.१३९)**

**असतां सर्गाचा(१८) आदिअंत(१९) । जीव लीन होय यांत(२०) ।**
**येथ श्रोते होतील आशंकित । कीं ब्रह्म असोनी जीवलय होत कैसा ॥१२॥**
**तरी ऐकावें समाधान । जीव हा ब्रह्म पूर्ण । तथापि अविद्याआभासेंकरून(२१) । जीवपण(२२) ब्रह्मातें ॥१३॥**

*(१) सद्रूप सामान्य चेतनाचे ठिकाणी (२) जगतास दिसणाऱ्या भेदाला (३) खोटेपणा (४) ज्याचा विशेष चैतन्य अंश (५) नाहिसे करितात (६) जन्ममृत्यूला (७) त्रिगुणाची साम्यावस्था भंग पावली नसते म्हणजे सृष्टिपूर्वी (८) एकमेव (९) दुसऱ्यावाचून (१०) अविनाशी (११) सृष्टीचा संहार होतो तेव्हां (१२) नाश (१३) तसाच नाशरहित (१४) वर्तमानकाळी, सृष्टिकाळी देखील (१५) संसार पाश (१६) शत्रु (१७) चैतन्य हेच कोणी अमृत व तेच घृताप्रमाणे गोड, त्या चित्सुधाघृताचा*

*गोळा. या ठिकाणी ऊन तुपापेक्षां थिजलेले तूप जास्त गोड असते म्हणून घृतगोळ म्हणजे थिजलेल्या तुपाचा गोळा असा शब्दप्रयोग केला आहे. म्हणून चित्सुधाघृतगोळ याचा अर्थ सगुण ब्रह्माचा आनंद असा होतो. (१८) सृष्टीचा (१९) उत्पत्ति व संहार (२०) परमेश्वरांत (२१) अविद्येमध्ये पडलेले चैतन्याचे प्रतिबिंब तो जीव असे असल्यामुळे (२२) ब्रह्माचे ठिकाणी जीवपणाचा भास होतो.*

**ती अविद्या सत्त्वादिगुणी[१] बहुविधा[२] । यालागीं जीव तोही बहुधा[३] ।**
**जेव्हां प्रगट[४] नव्हती भोगसंपदा[५] । तेव्हां शुद्धसत्त्वोपहितपदा[६] हा[७] होता ॥१४॥**
**परी असो हें बोलणें । अज्ञानासी घेतां प्रमाणें[८] । तरी लौकिकवैदिकपणें[९] । न सांपडे[१०] तें ॥१५॥**
**'तंव[११] प्रमाणाचिया मापा[१२]। न संपडेचि[१३]जे बापा । तया आणि खपुष्पा[१४] । विशेषु[१५] काई'(अमृ.प्र.७ ओ.५३)**
**ऐसी तातचरणोक्ति[१६] साची । परी अज्ञानाघरीं[१७] त्राये[१८] वाउगी[१९]यांची ।**
**येणें मी नेणें या शिष्यप्रतीतीची[२०] । अविद्याशब्दवाची[२१]शक्तिग्रहण ॥१६॥**
**'अविद्येचे आडवे[२२] । भुंजीत[२३] जीवपणाचे[२४] भवे[२५] । तया चैतन्याचा धांवे[२६] । धावेकारू[२७] जो' ॥ अमृ.प्र.२ओ.२**
**येणें येणें गुरुस्तवनें[२८]। शिष्यदृष्ट्याऽविद्या[२९]पाल्हाणें । लागे कार्यदृष्ट्या[३०]कल्पणें । परी अनेक म्हणणें गौरवूं[३१]॥१७॥**

*(१) सत्वादि गुणाच्या योगाने (२) पुष्कळ प्रकारची (३) बहु, पुष्कळ (४) उत्पन्न (५) सृष्टींतील पदार्थ (६) शुद्धसत्वोपाधिक जो ईश्वर त्याचे ठिकाणी लीन (७) जीव (८) अज्ञानाला प्रमाणाने सिद्ध करू पाहता (९) प्रत्यक्षादिक लौकिक प्रमाणाने किंवा श्रुतिप्रमाणाने (१०) सिद्ध होत नाही (११) तरी (१२) मापांत, आटोक्यांत (१३) सापडत (१४) आकाशाच्या फुलांत (१५) फरक (१६) श्रीज्ञानेश्वर महाराजांचे वचन (१७) अज्ञान्याचे ठिकाणी (१८) प्रतिष्ठा (१९) उगीच (२०) मी ब्रह्म जाणत नाही असे शिष्य म्हणतो, त्या त्याच्या म्हणण्यावरून तो आपल्या ठिकाणी ब्रह्माविषयी अज्ञान मानतो असे दिसून येते (२१) हा जो शिष्याच्या ठिकाणचा ब्रह्माच्या अज्ञानाविषयी अनुभव, त्या अनुभवावरून जिला अज्ञान म्हणतात, अशा एका शक्तीचे ग्रहण होते (२२) आडरानांत (२३) भोगतो (२४) जीवभावाचे (२५) फेरे (२६) धाव्यामुळे, धांवा ऐकून (२७) धावणारा (२८) अशा रितीने केलेल्या श्रीगुरूच्या स्तुतीने (२९) शिष्याच्या (अज्ञानाच्या) दृष्टीनेच अविद्येचा स्वीकार किंवा विचार (३०) कार्याकरिता.(३१) हा दोष आहे. पाल्हाळ करणे, बोजड निरूपण, व्यर्थच जास्त लांबविणे*

**यद्यप्यज्ञान कार्यानुमेयता[२] । सप्तमाध्यायीं[३] अग्राह्य[४] ताता[५] ।**
**तथापि ब्रह्मान्वयें[६] जग पाहतां । तदर्थी[७] खंडनता[८] जाणिजे ते ॥१८॥**
**कार्यानुमेय[९] अज्ञान यास्तव[१०] । परी एक म्हणतां होय लाघव[११] ।**
**यालागीं[१२] एकाऽज्ञानीं[१३] आभास[१४] जीव । एकचि असे ॥१९॥**
**परी घटें[१५] न लिंपे[१६] घटनभ[१७] । तेंवि उपाधौ[१८] न लिंपे जीव सप्रभ[१९] ।**
**तथापि अंतःकरण मिश्रसत्वप्रभ[२०] । बहुविध[२१] असे[२२] ॥२०॥**
**त्या अंतःकरणीं जीवाभास[२३] । प्रमाता[२४] ऐसे म्हणती जयास । अंतःकरणें[२५] बहुत्वें त्यास । बहुविधता असे ॥२१॥**
**तो प्रमाताचि अहंकारू । त्यासीचि[२६]बंधमोक्ष प्रकारू । स्वप्रकल्पित[२७]शिष्य गुरू । बंध[२८]मोक्ष साचारू स्वप्रवत ॥२२॥**

*(२) जगद्रूप कार्यावरून कारणरूप अज्ञानाचे अनुमान करणे व यावरून अज्ञानाची सिद्धि करणे (३) अमृतानुभवाच्या सातव्या अध्यायांत (४) स्वीकृत किंवा मान्य नाही (५) श्रीज्ञानेश्वर महाराजांना (६) ज्ञानानंतर सर्व ब्रह्म आहे या दृष्टीने जगाचा विचार केला असता (७) या अन्वय दृष्टीने (८) अज्ञानाचे खंडन त्यांनी केले आहे (९) कार्यावरून सिद्ध होणारे (१०) म्हणून (११) लाघव हा निरूपणातील गुण आहे. सुटसुटीत थोडक्यात सांगणे (१२) म्हणून (१३) एका अज्ञानामध्ये (१४) प्रतिबिंबित (१५) मडक्याने (१६) कोणत्याहि रितीने सुबद्ध किंवा स्पष्ट (१७) घटांतील पोकळी (१८) उपाधीमध्ये, अज्ञानामध्ये (१९) आभासरूप (२०) रजोगुण व तमोगुण ह्यांनी मिश्रित असा सत्वगुण त्यांनी युक्त जे अंतःकरण (२१) पुष्कळ प्रकारचे (२२) आहे (२३) जीवाचे प्रतिबिंब (२४) प्रमाणाने जाणणारा (२५) अंतःकरणे अनेक आहेत म्हणून जीवाभासादि अनेक आहेत (२६) तोच बद्ध होतो व तोच मुक्त होतो (२७) गुरुशिष्य संबंधाची आपणच कल्पना केली आहे (२८) बद्ध व मोक्ष हे दोन्ही भावहि स्वप्नाप्रमाणे कल्पिलेले आहेत*

**त्या अंतःकरणवृत्ति[२९] जेव्हा । नव्हत्या अज्ञान अगोचर[१] तेव्हां ।**
**यालागीं स्पष्टपणें आपुलिया भावा[२] । प्रतिबिंबापेक्षीबिंबप्रभावा[३] ईश्वर जाणें ॥२३॥**

शिष्य : - भगवन् ! ब्रह्माचा अविद्येचेठायीं(४) आभास(५) तो जीव, आणि तदपेक्षेनें(६) आलेल्या बिंबत्वारोपावच्छिन्न(७) ब्रह्म तो ईश्वर, असा आपला अभिप्राय आहे.(य३-१४०) तो जीव एकच आहे, म्हणजे पर्यायानें आपणास अनेकजीववाद(८) संमत(९) नाहीं. असें आहे तर अंतःकरणाचें बहुविधत्व(१०) मानून त्यांचे ठिकाणीं जीवाभास(११) प्रमाते(१२) पुष्कळ मानले, ही अनेकजीववादापत्ति(१३) आहेसें मला वाटतें. दुसरें, जीवाभासासच(११) जर बंधमोक्ष आहेत तर एक आभास(१४) मुक्त झाला असतांनां सर्वमुक्तत्वापत्ति(१५) येत नाहीं हे खरें, परंतु मग अंतःकरणामध्येंच(१६) ब्रह्माचा आभास मानून अनेकजीववाद स्वीकारल्यास कोणता प्रत्यवाय(१७) आहे? बंधमोक्षार्थ(१८) जर अंतःकरणस्थ(१९) जीवाभासाचा

*(२९) अंतःकरणाच्या वृत्ति (१) अज्ञान भासत नव्हते (२) स्थितीला (३) प्रतिबिंब जो जीव (अज्ञानप्रतिबिंबित) त्याच्या अपेक्षेने बिंब संज्ञेला प्राप्त झालेले परब्रह्मच ईश्वर होय. तो ईश्वर आपल्या सामर्थ्याला जाणतो (४) अज्ञानामध्ये (५) प्रतिबिंबित चैतन्य (६) जीवाच्या अपेक्षेने (७) बिंबपणाच्या आरोपाने युक्त किंवा आरोपाचा विषय होणारे. (८) जीव अनेक आहेत असे मत (९) मान्य (१०) अनेकत्व, अनेक अंतःकरणे मानून (११) जीवाचे प्रतिबिंबरूप (१२) अहंकार, प्रमाणवृत्तीने पदार्थ जाणणारे (१३) जीव अनेक आहेत, असे मानणे, अनेक जीववादाची कल्पना (१४) अंतःकरणांत पडलेल्या जीवाच्या प्रतिबिंबाला एका अंतःकरणातील जीवाचे प्रतिबिंब (१५) सर्व जीवाभास मुक्त झाले असे मानणे (१६) अनेक अंतःकरणात ब्रह्माचे अनेक प्रतिबिंब पडून अनेक जीव होतात असे मानल्यास (१७) हरकत, अडचण (१८) बंध मोक्षाची व्यवस्था लावण्याकरिता (१९) अंतःकरणामधील.*

स्वीकार(१) केला तर अविद्यागत(२) आभासरूपी(३) एकजीव सांगण्याचें प्रयोजन(४) काय ? पुनः, जीवाभासालाच(५) जसे बंधमोक्ष(६) आहेत, तर अविद्येमध्यें असलेला ब्रह्माभासरूपी(७) एकजीव केव्हांच मुक्त होणार नाहीं. असें मानलें म्हणजे शुकवामदेवादिमुक्तिबोधक(८) शास्त्राला वैय्यर्थ्य(९) येऊन ब्रह्म व अविद्या हे पदार्थ नित्य(१०) स्वीकारणें गळीं येत असल्यामुळें द्वैतापत्ति(११) येते.

श्रीगुरु :- शंकेस्तव(१२) तुझें मी अभिनंदन करतों. कारण फुकट भिन्न(१३) शास्त्रांचा पूर्वपक्ष न घेऊन अद्वैतहानि न होणाऱ्या(१४) वेदांताच्याच एका सिद्धांताचा(१५) आश्रय करून दुसऱ्या प्रक्रियेविषयीं विचारलें आहे, हें तुझें बुद्धिवैभव(१६) अत्यंत शंसनीय(१७) आहे. इतक्यानेंच(१८) तुला जर ब्रह्मबोध(१९) झाला असेल तर हीच(२०) प्रक्रिया घेतली पाहिजे असा आमचा आग्रह नाहीं; कारण सुरेश्वराचार्य म्हणतात :-

**॥ श्लोक ॥**

**'ययाययाभवेत्पुंसांव्युत्पत्तिःप्रत्यगात्मनि । सासैवप्रक्रियेहस्यात्साध्वीसाचाऽनवस्थितिः ॥'**

*(१) मान्य (२) अज्ञानामध्ये (३) प्रतिबिंबरुपी (४) उद्देश (५) अंतःकरणातील जीवाच्या प्रतिबिंबाला (६) संसार व मुक्ति (७) ब्रह्माचा प्रतिबिंबरूपी भास (८) शुकवामदेवादिक मुक्त झाले असे सांगणाऱ्या (९) व्यर्थपणा, खोटेपणा (१०) दोन्ही खरे, सत्य (११) द्वैताची प्राप्ति, द्वैत सत्य ठरते (१२) अशी शंका काढल्याबद्दल (१३) अद्वैतमंडन करणाऱ्या शास्त्राहून निराळ्या म्हणजे द्वैत मानणाऱ्या (१४) होऊ देणाऱ्या, करणाऱ्या (१५) सिद्धांतप्रक्रियेचा अनेक जीववादाची प्रक्रिया सिद्धांतरूप मानून एक जीववादाच्या प्रक्रियेतहि अनेक जीववादांच्या प्राप्तीच्या शंका दाखवून प्रश्न विचारला असल्यामुळे (१६) बुद्धिमत्ता (१७) प्रशंसेला पात्र (१८) अनेक जीव मानून (१९) ब्रह्मज्ञान (२०) एकजीववादाची.*

**॥ गद्य ॥**

ज्या ज्या प्रक्रियेनें(१) बाह्यदृष्टीचा(२) आश्रय न घेऊन आंतल्या आंतच(३) मुमुक्षूंनां आत्मविद्या प्राप्त होते, ती ती प्रक्रियाच उत्तम गणली जाते; आणि ती पुष्कळ प्रकारची आहे. तातही म्हणतात :-

**'अगा मी एक लाणीचे(४) खागे । मज येवो ये भलतेनि मार्गे । भक्ति कां विषयविरागें(५) । अथवा वैरें ॥१॥**

**म्हणोनि पार्था पाही । प्रवेशावया माझ्याठायीं । उपायांची नाहीं । वाणी(६) येथ ॥२॥' (ज्ञाने. अ. ९ ओ. ४७०-७१)**

परंतु (य३-१४१) ब्रह्मबोध(७) न होऊन उत्कंठेनें ही प्रक्रियाच जाणून घेण्याची इच्छा असेल आणि हिनेंच ब्रह्मबोध होतो असा विश्वास असेल तर उत्तर श्रवण कर. अनेकजीववाद आणि एकजीववाद या दोन्ही प्रक्रियाविषयीं जाग्रच्छ्रुति प्रमाण आहे.

**'जीवभूतां महाबाहो ययेदं धार्यते जगत्' ॥**

**'ममैवांशो जीवलोके जीवभूतः सनातनः' । (गीता अ. ७ श्लो.५,/गीता अ१५श्लो.७)**

इत्यादि श्रुति एकजीववादबोधक[८] असून

**'अज्ञानेनावृतं ज्ञानं तेन मुह्यन्ति जंतवः' ।**

**'ज्ञानेन तु तदज्ञानं येषां नाशितमात्मनः' ।**

इत्यादि श्रुति अनेकजीववादबोधकही[९] आहेत. असो.

प्रस्तुत तूं आपल्या प्रश्नाचें उत्तर ऐक. उपाधि दोन प्रकारचा आहे. कारणरूप[१०] आणि कार्यरूप[११]. त्यालाच[१२] अविद्या म्हणतात. पहिल्या[१३] उपाधिगत आभास

*(१) विचार मार्गाने (२) बहिर्मुख किंवा विषयोन्मुख दृष्टीचा (३) विषयरहित बुद्धिवृत्तीने (४) निर्वाणीचे स्थान (५) विषय वैराग्याने (६) उणीव. (७) ब्रह्मज्ञान (८) जीव एक आहे असे सांगणाऱ्या (९) जीव अनेक आहेत असे सांगणाऱ्या (१०) अविद्यारूप (११) अंतःकरणरूप (१२) कारणरूप उपाधीलाच (१३) पहिल्या म्हणजे कारणरूप जो अविद्या उपाधी त्यात पडलेल्या चैतन्याचा आभास.*

बंधाला[१] पावत नाहीं; आणि दुसऱ्या[२] उपाधींतले आभास बंधाला[३] पावतात. याला एक दृष्टांत देतों. घट हा प्रथम[४] उपाधिस्थानीं समज. त्यांत आलेलें[५] आकाश जसें कोणत्याही रीतीनें महाकाशाहून[६] भिन्नधर्मी[७] दिसत नाहीं, परंतु घटाकाशमहाकाश हा शाब्दभेद[८] मात्र होतो, तद्वत्[९] जीव, ब्रह्म हा शाब्दभेद मात्र झाला आहे. परंतु त्या घटांत जल[१०] टाकलें म्हणजे त्यांतील आकाश[११] ज्याप्रमाणें चांचल्यादि[१२] धर्मानें युक्त दिसतें, तद्वत् अंतःकरणरूपी जो द्वितीय[१३] उपाधि त्याचेठायीं प्राप्त झालेले प्रमातृसंज्ञक[१४] जीवाभास[१५] गमनागमन[१६] सुखदुःखादि धर्मांनीं युक्त दिसतात; म्हणून त्यानांच बंधमोक्ष[१७] वास्तविक[१८] आहेत. कारण ज्याला दुःख सत्य वाटतें त्यालाच दुःखाची निवृत्तिही सत्य वाटते.

*(१) बद्ध होत नाही म्हणजे उपाधीच्या धर्माने युक्त होत नाही. तो आपल्याला मी अल्पज्ञ, अल्पशक्ति, सुखीदुःखी वगैरे समजत नाही (२) अंतःकरणांतील चैतन्याचे आभास (३) मी अल्पज्ञ, अल्पशक्ति इत्यादि भावना करितात (४) कारणरूप अविद्येच्या ठिकाणी (५) भरलेले (६) घटाबाहेरच्या आकाशाहून (७) निराळ्या लक्षणांनी युक्त, घटातले आकाश व घटाबाहेरचे आकाश अगदी तंतोतंत एकरूप सारखे असते (८) नुस्ते शब्दच मात्र निराळे लाविले जातात (९) त्याप्रमाणे (१०) पाणी (११) पाण्यांत प्रतिबिंबित झालेले (१२) हालणे इत्यादि धर्माने (१३) दुसरा (१४) प्रमाता हे ज्याला नांव आहे, प्रमाता म्हणजे प्रमाणांने जाणणारा (१५) अविद्येत भासणाऱ्या जीवाचे आभास (१६) येणे जाणे, जन्ममृत्यु (१७) संसार व मुक्ति (१८) आम्ही बद्ध आहो किंवा आम्ही मुक्त आहो हे दोन्ही भाव त्यांनाच खरे वाटतात, अज्ञानकाली आम्ही खरोखर संसारी आहो व ज्ञानानंतर आम्ही आता खरोखर मुक्त झालो असे जीवाभासास वाटते.*

यद्यपि[१] घटस्थ[२] जलांत विस्तृत[३] प्रदेश[४] दिसल्यामुळें जलाकाश[५] महाकाशाचेंच[६] प्रतिबिंब आहे घटाकाशाचें[७] नाहीं; तद्वत् अंतःकरणरूपी द्वितीय उपाधींत आलेले आभास ब्रह्माचेच आहेत जीवाचे नाहीत अशी शंका येते. तथापि घटाकाश आणि महाकाश हे सर्वथाच[८] अभिन्न[९] असल्यामुळें तत्साध्य सिद्धांताचेठायीं[१०] विरोध येत नाहीं.

तरी दुसऱ्या रीतीनेंही उत्तर देतां येते. असा प्रश्न करणाऱ्याला आम्हीं असें विचारतो कीं घटाचेठायीं घातलेलें जल एकदेशी[११] आहे कीं सर्वदेशी[१२] आहे? ह्यांतून द्वितीय पक्ष मानण्याइतका तूं मुर्ख नसलास तर प्रथम पक्ष तुला मान्य आहे असें आम्हीं गृहीत[१३] करतो. या एकदेशी जलांत सर्व (य३-१४२) महाकाशाचें प्रतिबिम्ब पडणें शक्य आहे, असें जर तूं मानीत असलास तर एकदेशीघटोपाधींत[१४] सर्व महाकाश[१५] घटाकाशत्वाला प्राप्त झालें आहे असें तुला मानण्याला कोणता प्रतिबंध[१६] येतो? आणि कदाचित् आमच्या म्हणण्याचा त्वां स्वीकार केलाच तर मग - घटाकाशाचेंच प्रतिबिम्ब विस्तृत[१७] जलांत देशरूप दिसणें संभवनीय नाहीं काय? तद्वत् -

*(१) जरी (२) घटांतील (३) मोठा पसरलेला (४) जागा, पोकळी (५) पाण्यांत दिसणारे आकाश (६) घटाच्या बाहेरील मोठ्या आकाशाचे (७) घटाने मर्यादित केलेल्या, घटांत सापडलेल्या आकाशाचे (८) अगदी (९) एकरूप (१०) त्यावरून निघू पाहणाऱ्या सिद्धांतात म्हणजे घटांतील आकाश व घटाबाहेरील आकाश यांचे अत्यंत साम्य असते. यावरून ब्रह्म जसे बंधमुक्तरहित आहे तसा अविद्योपाधिक जीवही बंधमुक्तिरहित आहे (११) मर्यादित (१२) अमर्याद (१३) धरून चालतो (१४) मर्यादित अशा घटांत (१५) बाहेरील संपूर्ण आकाश (१६) हरकत आहे (१७) जलांत विस्तृत देशरूप असा अन्वय, पाण्यामध्ये अपार पोकळीच्या रूपाने*

रज्जुपृष्ठैकदेशीसंभूतसर्पस्य[१८] सर्वरज्जुस्थ सर्पभ्रमसम[१] ब्रह्मैकदेशीय अविद्यागत[२] सर्वब्रह्मस्थ-भ्रमसंभाव्यमानत्वास्तव[३]

अंतःकरणरूपी द्वितीय उपाधीचें ठिकाणीं येणारे आभास जीवाचेच आहेत ब्रह्माचें नाहींत.

अथवा महाकाशाचें[४] प्रतिबिम्ब मानलें तरीही त्याला[५] घटाकाशाश्रितत्व[६] असल्यामुळें महाकाशप्रतिबिम्बरूप[७] जलाकाशावच्छिन्न[८] घटाकाशोपजीवितया[९] उपयोगिता[१०] कल्पिता येते; म्हणून साक्षी आणि आनंदमय असा उभयात्मक[११] भोक्ता विद्यारण्यस्वामींनीं ठरविला आहे; तद्वत्[१२] ब्रह्म व प्रतिबिम्बावच्छिन्न[१३] अविद्यान्तर्वर्ती[१४] एकजीवोपजीवितया[१५] उभयात्मक प्रमाता[१६] भोक्ता[१७] आत्म्यालाहीं ठरवितां येत असून दृष्टिसृष्टिवादांत[१८] उत्तर देतां येते.

*(१८) त्याप्रमाणे दोरींचा पृष्ठभाग हा जो दोरीचा एकदेश त्यावर असणाऱ्या सर्पाचा. (१) सर्व दोरीवर भासणाऱ्या सर्पाच्या भ्रमाप्रमाणे (२) ब्रह्माच्या एकदेशावर भासणारी जी अविद्या तिच्यामध्ये (३) संपूर्ण ब्रह्मावरच भ्रम भासणे संभवनीय असल्यामुळे भ्रम हा नेहमी आपल्या अधिष्ठानाच्या एका अंशावर असतो पण सर्व भागावर भासल्यासारखा दिसतो. दोरीवर भासणारा सर्प दोरीच्या वरच्या पृष्ठ भागावर असतो पण त्या भ्रमाने दोरी दिसत नसल्यामुळे सर्व दोरीच सर्परूप वाटू लागते त्याप्रमाणे अविद्या ब्रह्माचे एका भागावर असली तरी सर्वच ब्रह्म तिच्या योगाने झाकल्यासारखे होऊन सर्वच ब्रह्म अविद्येत सापडल्यासारखे होते. म्हणून अविद्येचे जे कार्य अंतःकरण त्यांत अविद्येगत ब्रह्माचे म्हणजे जीवाचे आभास पडतात असे म्हणता येते (४) घराबाहेर असणाऱ्या आकाशाचेच घटांतील जलात प्रतिबिंब पडते असे मानले तरी (५) प्रतिबिंबाला (६) घटाकाशाच्या आश्रयाने भासणे (७) महाकाशाचे प्रतिबिंब (८) जलाकाशाचे ठिकाणी येणारी (९) घटाकाशावर अवलंबून राहणारी (१०) व्यवहार्यता (११) दोन्हीं प्रकारचा (१२) त्याप्रमाणे (१३) प्रतिबिंबरूप (१४) अविद्येमध्ये सापडलेला (१५) एक जीवावर अवलंबून असा (१६) प्रमाणाने जाणणारा (१७) सुखाचा भोग घेणारा (१८) एकजीववादांत.*

आतां, तूं म्हटलें होतें कीं अंतःकरणाचेच ठायीं आभास मानल्यानें कार्य[१] होतें तर अविद्या पाहिजे[२] कशाला? हें म्हणणें सत्य असेल, परंतु अंतःकरण कार्यरूप असल्यामुळें कारणरूप अविद्येवांचून त्याची सिद्धी[३] होत नाहीं, आणि ब्रह्माभासावांचून[४] अविद्येचा स्वीकार केला असतां जडाचें स्वातंत्र्य[५] किंवा ब्रह्माला[६] कर्तृत्व हे दोन अतिप्रसंगदोष[७] येतात; म्हणून तिचेठायीं[८] ब्रह्माभास[९] जीव अवश्य मानला पाहिजे.

मायेचें ठिकाणीं आभास[१०] ईश्वर मानून तिचें कार्य अंतःकरण, त्याचें ठिकाणीं ब्रह्माचे आभास जीव मानणें शक्य असले तरी, आणि जल-क्षपणें[११] जलाकाशमुक्तिकल्पनावत्[१२] अंतःकरणाच्या नाशानेंच जीवाची मुक्ति संभवनीय म्हणणेंहि शक्य असलें, तथापि यावदविद्या[१३] तिच्या कार्याचा आत्यंतिक[१४] नाश स्वीकारणें विरुद्ध आणि असंभवनीय[१५] असल्यामुळें ज्ञानानें त्या अविद्येचाच नाश झाला पाहिजे. आणि त्वदुक्त[१६] पक्षाचेठायीं[१७] तर तो नाश ईश्वरोपाधीचा[१८] होईल; म्हणजे एकाच्या ज्ञानानें दुसऱ्याच्या उपाधीचा नाश होऊन अन्यज्ञानानें[१९] अन्यमुक्तिप्रसक्ति[२०] दोष येतो. किंवा ईश्वर नित्य स्वीकृत[२१] असल्यामुळें त्याची ती उपाधि नित्यस्वीकृत आहे, असा (य३-१४३)

*(१) भागते (२) मध्ये अविद्या मानण्याचे कारण काय? (३) त्याचे कारण अविद्या मानल्यावाचून ते मानता येणार नाही (४) अविद्येमध्ये ब्रह्माचा आभास न मानता नुसती अविद्याच मानली तर (५) जड पदार्थ स्वतः कार्य करणारा समर्थ आहे (६) ब्रह्म मायेवाचून क्रिया करू शकते (७) शास्त्राचे उल्लंघन करून शास्त्रात न मानलेले सिद्धांत मानणे व वेदान्त मर्यादेचे अतिक्रमण (८) अविद्येचे ठिकाणी (९) ब्रह्माचा आभासरूपी (१०) ब्रह्माचा आभास (११) घटातील पाणी फेकून दिल्याने (१२) जलात भासत असलेले जलाकाश नाहीसे होते किंवा मुक्त होते अशी कल्पना करिता येते त्याप्रमाणे (१३) अविद्या आहे तोपर्यंत (१४) सपशेल सर्वस्वी पुनः उत्पन्न होणार नाही असा (१५) शक्य नसल्यामुळे (१६) तू सांगितलेल्या (१७) मनात (१८) ईश्वराच्या उपाधीचा (१९) दुसऱ्याच्या ज्ञानाने (२०) दुसऱ्याची मुक्ति मानण्याचा (२१) मान्य.*

स्वीकार[१] गळीं[२] येत असल्यानें निवृत्त[३] उपाधीपासून अंतःकरणादिकार्य उत्पन्न होणें शक्य नाहीं. जसें सर्पनिवृत्तीपासून रज्जूवर सर्प होणें शक्य नाहीं. हा दोष निवृत्त[४] करण्यारितां यावत्[५] सृष्टि तावत्[६] ईश्वरप्रारब्ध म्हणशील तर घटत[७] नाहीं. कारण ईश्वर विदेहमुक्त[८] झाला असतां सृष्टि[९] पुनः उत्पन्न होणारच नाहीं. तसें झालें म्हणजे इतर बिचाऱ्या जीवांनां ज्ञानावांचूनच मुक्ति होईल. मग ज्ञानापासूनच कैवल्य[१०] आहे हें श्रुतिप्रामाण्य[११], व जोंपर्यंत ज्ञान झालें नाहीं तोंपर्यंत ही सृष्टि अनाद्यनंत[१२] आहे हें आचार्यवचनप्रामाण्य[१३], आणि मला पहिले पासूनच ब्रह्म समजलें नाहीं, मी सृष्टि पाहतों, या प्रकारचा सर्व जगाचा अनुभव, हे तिन्हीहि अस्ताला[१४] गेलेच म्हणावयाचे.

अतः, ब्रह्मबोध[१५] होत असेल तर कांहीं आग्रह[१६] नाहीं; पण मीमांसा[१७] करावयाची असेल, व राजमार्ग[१८] स्थापावयाचा असेल, तर असें खडतर[१९] दोष येऊं देणें उचित नाहीं. म्हणून अविद्येचेठायीं प्रतिबिम्ब मिथ्यारूपी ब्रह्माभास

जीव ग्रहण करून, तदपेक्षी[२०] बिम्बत्वारोपावच्छिन्न[२१] ब्रह्माला ईश्वर मानून, घट फोडला असतां जल नष्ट झाल्यावर जलकाश जसें महाकाशांत मिळतें, तद्वत्[२२] अनध्यस्तविवर्ततया[२३] ईश्वरोपदिष्ट[२४] वेद, वा[२५] स्वाप्नवत्[२६] गुरुकल्पिततया, अथवा स्वप्नीं ओसणत

*(१) मानणे (२) भाग पडत असल्यामुळे (३) नाश पावलेल्या (४) नाहिसा (५) जोपर्यंत (६) तोपर्यंत (७) जुळत नाही, योग्य नाही. (८) प्रारब्ध संपल्यानंतर मिळणारी मुक्ति (९) जगत् (१०) मुक्ति (११) वेदाच्या वचनाचे सत्यत्व (१२) उत्पन्न होणे व लीन होणे हा सारखा प्रवाह चालू राहणे (१३) आचार्याच्या वचनाचे सत्यत्व (१४) नाहिसे झाले, मावळले (१५) ब्रह्मज्ञान (१६) अमुकच माना असे म्हणत नाही (१७) प्रमाणपूर्वक विचार (१८) सर्वांना जाण्याजोगा (१९) भयंकर (२०) त्याच्या अपेक्षेने (२१) बिंबपणाच्या आरोपाला पात्र होणाऱ्या (२२) त्याप्रमाणे (२३) शुद्ध ब्रह्मावर ज्ञानाने भासणारे जे रूप त्या रूपाने (२४) ईश्वराने सांगितलेले (२५) किंवा (२६) स्वप्नात कल्पिलेल्या गुरूच्या उपदेशाप्रमाणे.*

असतां जागृतपुरुषकृत[१] आव्हानसमान जे वेद ते प्रमाण मानून तज्जन्य[२] महावाक्यानें[३] मननसहकारीकारणासह[४], किंवा मननानें[५] महावाक्यसहकारीकारणासह[६] उद्भूत[७] झालेल्या नित्य शुद्ध, बुद्ध, मुक्त, इत्यादि विशेषचैतन्यज्ञानानें[८] सामान्यचेतनसत्ताप्राप्त[९] मिथ्याकारणअविद्येची[१०] निवृत्ति[११] झाल्यानें अंतःकरणादि[१२] कार्यअविद्येची निवृत्ति होऊन रज्जूज्ञानकृत[१३] तत्स्थसर्पनिवृत्तिवत्[१४] बंध[१५] सत्य[१६] मानून त्याची सत्य निवृत्ति अपेक्षणारा[१७] मुमुक्षरूपी जीवाभास[१८] प्रमाता मुक्त होतो म्हणजे ब्रह्मस्वरूपीं मिळतो. हे बंधमोक्ष जीवाभासाला वास्तविक[१९] वाटत असून जीवाचें ठिकाणीं कल्पित आहेत. जसें जलाकाशाचें ठिकाणीं जलांत असणें[२०] आणि आकाशांत[२१] मिळणें हें वास्तविकासारखें[२२] भासत असून

*(१) जागृतीतील पुरुषाला हाका मारून जागेकरण्याप्रमाणे (२) त्यात प्रगट झालेल्या (३) तत्वमसि या वाक्याने (४) मननरूपी सहकरी कारणासह (५) चिंतनाने (६) महावाक्यरूपी सहकारी कारणासहः- वेदान्तात महावाक्याने आत्मज्ञान होते व त्या महावाक्याला ब्रह्मज्ञान उत्पन्न करण्याकरिता मननाचे साह्य असते असे एका पक्षाचे म्हणणे असून मननाने ब्रह्मज्ञान होते व महावाक्य त्या मननाला साह्य करिते असे दुसरा पक्ष मानतो (७) उत्पन्न (८) विशेष असा जो चैतन्यांश त्याच्या ज्ञानाने (९) सामान्य चेतनरूप जी सत्ता, तिच्यावर भासणारी म्हणजे ब्रह्माच्या सामान्य अंशावर म्हणजे सत्तेवर अविद्या भासते व ब्रह्म सत्तेने सत्तावान् होऊन ती मिथ्या जगत् भासविण्यास कारण होते (१०) मिथ्या, खोट्या भासाला सत्ताकारण असणारी अविद्या (११) नाश (१२) अंतःकरणरूपी अविद्येच्या कार्याची (१३) दोरीच्या ज्ञानाने होणाऱ्या (१४) दोरीवर भासणाऱ्या सर्पाच्या नाशाप्रमाणे (१५) संसार (१६) खरा (१७) इच्छिणारा (१८) अंतःकरणातील आभास (१९) खरे (२०) भासणे (२१) जल फेकून दिल्यावर त्या जलात भासत असलेल्या आकाशाने बाहेरच्या मोठ्या आकाशात (२२) खऱ्यासारखे.*

घटाकाशाचें[१] ठिकाणीं त्याचा[२] कोणत्याही रीतीनें भेद[३] कल्पितां येत नसल्यामुळें पूर्वोक्त[४] शाब्दिकभेदवत्[५] घट[६] असल्यानें आणि फुटल्यानें[७] भासत असतात, तद्वत्[८] मी बद्ध होतो, (य३-१४४) मी मुक्त आहे, इत्यादि विक्षेप[९], आवरण[१०], आणि परोक्ष[११]अपरोक्षज्ञान[१२] आभासालाच[१३] होतें, असें स्वामीविद्यारण्योक्त[१४] प्रमाणावरून जीवाभासांचें ठिकाणीं बंध वास्तविकइव[१५] भासत असून अविद्यानिवृत्तिमात्रानें[१६] मुख्य जीवाचेठायीं[१७] ते वाचारंभणमात्र[१८] भासतात. म्हणूनच तातानें[१९] असें म्हटलें आहे कीं

**'हा घटाकार[२०] जैसा । निमालिया[२१] तया[२२] अवकाशा । नलगे मिळों जाणे आकाशा[२३] । आनाठाया[२४] ॥८३॥**
**तैसा देहाहंकार[२५] नाथिला[२६]। हा समूळ[२७] जयाचा नाशिला । तोचि परमात्मा संचला[२८] । आधींचि आहे.'॥८४॥ज्ञा.अ.६**

*(१) घटाच्या आतील व पाण्याच्या वरील पोकळीचे ठिकाणी (२) बाहेरील महाकाशाचा (३) भिन्नपणा (४) पूर्वी सांगितलेला किंवा मानलेला (५) घटाकाश व महाकाश या शब्दमात्र भेद युक्त (६) घट असल्यास घटाकाश (७) घट फुटल्यास महाकाश (८) त्याप्रमाणे (९) संसार सत्य वाटणे (१०) ब्रह्मस्वरूप न जाणणे (११) शब्दमात्रज्ञान, ब्रह्म आहे असे जाणणे (१२) मी ब्रह्मस्वरूप आहे असा अबाधित निश्चय होणे (१३) अंतःकरणातील प्रतिबिंबाला (१४) स्वामी विद्यारण्यांनी दिलेल्या प्रमाणावरून (१५) खऱ्याप्रमाणें (१६) अविद्येचा नाश होतो एवढ्यांमुळे (१७) अविद्येला आधार चैतन्याचे ठिकाणी (१८) शब्दमात्र (१९) श्रीज्ञानेश्वरमहाराजांनी (२०) घटाचा आकार (२१) नाहिसा झाल्यावर (२२) घटांतील (२३) आकाशाला (२४) दुसऱ्या ठिकाणी (२५) देहाचा अभिमान, मी देह आहे अशी भावना (२६) खोटा (२७) अविद्येसह (२८) भरलेला, झालेला.*

या दोन ओव्यांत प्रथम[१] दृष्टांत घटाकाशाचा घेऊन सिद्धांत मात्र देहाहंकार धरणाऱ्या अंतःकरणस्थ[२] जीवाभासरूपी प्रमात्याविषयीं[३] केला आहे. दृष्टांत सिद्धान्तैकदेशोपजीव्य[४] असल्यामुळें दृष्टान्ताश्रित[५] वादीकृत[६] शंका घटत[७] नाहीं. मुख्य जीवाचें ठिकाणीं बंधमोक्ष कल्पितता[८] याच दृष्टान्ताचे आश्रयानें[९] पूर्वी सांगितली आहे. याविषयीं आणखी तातवचन[१०] प्रमाण आहे.

**'परी जितीना[११] मेली । अविद्या हे जाकली[१२] । बंधमोक्षीं घाली । बांधोनियां ॥११॥**
**मोक्षुचि बंधु[१३] होय । तरी मोक्षशब्द[१४] कां साहे । परी अज्ञानाघरीं[१५] त्राये[१६] ॥ वावुगीयांची[१७] ॥१२॥**
**बागुलाचेंनि मरणें । तोषावें कीं बाळपणें[१८] । येरां तो[१९] नाहीं, मा[२०] कोणें । मृत्यु मानावा ॥१३॥**
**तैसा ज्ञानरूप आत्मा । ज्ञानेंचि आपुली प्रमा[२१] । करीतसे सोहं मा[२२] । ऐसा बंधु' ॥२३॥ (अमृ. प्र. ३)**

या ओवींत अज्ञान शब्द बालवाचक[२३] आहे. उपर्युक्त सर्व ओवींचा सारांश असा आहे कीं बाल व तरुण आईबाप एकाच द्रव्याचे बनलेले असतात. त्याप्रमाणें प्रमाते[२४] व जीव[२५] एका प्रतिभासाचे जरी आहेत, तरी जसें बागुलाचें मरणें[२६] बागुलाच्या सत्यत्वामुळें[२७] बाळाला आनंददायक होतें तसें आईबापाला

*(१) आधी (२) अंतःकरणातील (३) इंद्रियाने बाहेरील पदार्थ जाणणारा (४) सिद्धान्ताच्या एका अंशाला लागू पडणारा (५) दृष्टान्तावरून (६) वादीने केलेली शंका (७) योग्य होत नाही, होऊ शकत नाही (८) संसार व मुक्ति हे दोन्ही खोटे आहेत असे (९) आधारे (१०) श्रीज्ञानेश्वर महाराजांचे वाक्य (११) जिवंत (१२) वेढते (१३) बंधनरूप (१४) मोक्ष शब्द कसा सहन होईल (१५) अज्ञानकाळी (१६) प्रतिष्ठा (१७) उगीच (१८) नेणतेपण (१९) बागुल (२०) मग (२१) ज्ञान (२२) तो मी आहे (२३) बाल म्हणजे अज्ञानी याचा वाचक (२४) जीवाचे आभास - अंतःकरणातील (२५) मुख्य जीव - अविद्येतील आभास (२६) मरणाने (२७) बाळाला सत्य वाटत असल्यामुळे*

होत नाहीं, परंतु बाळाकरितां कल्पित त्याचें असणें[१] नसणें[२] बोलावें लागतें. तद्वत्[३] बालस्थानीय[४] जीवाभासरूपी प्रमात्यालाच वास्तविकइव[५] बंधमोक्ष भासत असून वरील दृष्टांतवत्[६] जीवाभासापेक्षेनें मुख्यजीवाचेठायीं कल्पित वाचारंभणमात्र भासतात. म्हणून जिभेनें जिभेचें नांव घेतल्यानें जिभेला जशी फलनिष्पत्ति[७] नाही. तद्वत् ब्रह्मरूप असून, मी ब्रह्म, मी ब्रह्म, असा वृत्तिवाचाळपणा[८] केल्यानें (य३-१४५) फलनिष्पत्ति[९] कांहींच नसून फुकट वटवट[१०] मात्र होते. म्हणून तें ज्ञान बंधनच आहे. याप्रमाणें मुख्यजीवाचें ठिकाणीं जरी बंधमोक्ष कल्पित आहेत, तरी

**'तें ऋणशेष[११] वाचा[१२] इया । न फेडवेचि मरोनियां[१३] । तें पायां पडोनि मियां । सोडविलें ॥१॥'**

या ओवींत ब्रह्माभासरूपी[१४] मुख्यजीवापेक्षिक[१५] बिम्बत्वारोपाऽवच्छिन्न[१६] ब्रह्मरूपी[१७] गुरुस्थानीय[१८] परमेश्वराची भक्ति दर्शविली आहे. आह्मी केलेल्या ह्या ईश्वरलक्षणाला[१९] 'अर्थदिप्तिकार दिवाकर महाराजांचीही संमति आहे. तसेंच नवव्या प्रकरणांत -

**'आम्ही निखळ[२०] मा[२१] तुझे । वरी लोभें[२२] म्हणसी माझें । हें पुनरुक्त साजे[२३] । तूंचि म्हणोनि'॥ अमृ.प्र.९ ओ६५**

या रीतीची भक्ति प्रतिपादन करून, द्वैत येऊं नये म्हणून,

**'देव देऊळ परिवारू[२४] । कीजे कोरोनि डोंगरू । तैसा भक्तीचा वेव्हारू । कां न व्हावा?' ॥ अमृ.प्र.९ ओ.४१**

असें पुनः सांगितलें आहे. तरी भक्ति राहतेच असें -

*(१) आला म्हणणे (२) मेला म्हणणे (३) त्याप्रमाणे (४) बाळाच्या ठिकाणी मानलेला (५) खऱ्याप्रमाणे (६) दृष्टान्ताप्रमाणे (७) फलप्राप्ति, फललाभ (८) वृत्तीचा वाचाळपणा, अभ्यास (९) फलप्राप्ति (१०) बडबड (११) उपकाररूपी कर्जाचा अंश; श्रीगुरुने कृपाकरून व शिष्याला ज्ञान देऊन मुक्त केले असते, तो उपकार (१२) वाणीने (१३) विदेहमुक्तीत गेल्यानेहि (१४) ब्रह्माचा आभासरूप (१५) जो मुख्य जीव, त्याच्या अपेक्षेने (१६) बिंबपणाचा आरोप धारण करणारा (१७) शुद्धब्रह्मस्वरूप (१८) सर्वाना गुरुस्थानी असलेला (१९) ईश्वराच्या स्वरूपाविषयी (२०) सर्वस्वी (२१) तरी मग (२२) प्रेमाने (२४) शोभते (२५) देवाचा परिवार.*

**'अखताचि[१] देवता । अखतीचि असे न पूजिता । मा अखतीं काय आतां । पुजों जावी ॥**
**झाला देवोचि भक्तु । ठावोचि[२] झाला पंथु[३] । होऊनि ठेला एकांतु[४] । विश्वचि[५] हें ॥**
**घालितां[६] अव्हासव्हा[७] पाये । शिवयात्रा[८] होत जाये । शिवा गेलियाही नोहे । केंही[९] जाणें ॥**
**चालणें आणि बैसक[१०] । दोन्ही मिळोनि एक । नोहे ऐसें कवतुक[११]। इये ठायीं ॥**

**येऱ्हवीं आडोळलिया[१२] डोळा[१३] । शिवायात्रेचा सोहळा[१४] । भोगिजे भलतेवेळा[१५] । भलतेणें[१६] ॥**
**ना समोर दिसे शिवुही । परि देखिलें कांहीं नाहीं । देवभक्ता दोही । एकुचि[१७] पाडु ॥**
**आपणचि[१८] चेंडू सुटे । मग आपणया उपटे । तेणें उदळिला दाटे । आपणपांचि ॥**
**ऐसी जरी हे चेंडुफळी । देखिजे कां केव्हेंळीं[१९] । तरी बोलिजे हे सरळी[२०] । प्रबुद्धांची ॥**
**ऐसाही स्वामीभृत्यसंबंधा[२१]- । लागीं उठती श्रद्धा[२२]। तैं देवोचि नुसुधा[२३] । कामविजे[२४] ॥**

*(१) तांदुळाची अक्षता, तांदुळाची देवता केली तर तांदुळाने तिला पूजण्यापूर्वीच तांदुळ रूपाने आहे; आता तिला तांदुळाने पूजण्याची काय आवश्यकता आहे (२) जेथे पोहचावयाचे आहे ते ठिकाण (३) वाट, मार्ग (४) आपणावाचून दुसरे नाही अशी स्थिति (५) संपूर्ण ब्रह्मांड (६) टाकिता (७) वाकडातिकडा (८) शिवाचे भेटीस जाणे (९) कोठेहि (१०) बसणे (११) आश्चर्य (१२) अकस्मात् दृष्टीस पडेल तेथे (१३) डोळ्याला (१४) शंकराच्या भेटीचा उत्सव (१५) केव्हाहि (१६) कोणीहि (१७) सारखेपणा, एकरूपता (१८) हातातून सुटलेला चेंडु आपणच जमिनीवर आदळतो व पुनः जमीनीवरून आपणच उधळतो व हातात घेतो (१९) केव्हां तरी (२०) मुक्तावस्थेतील वागणूक (२१) धनी व सेवक या संबंधाने (२२) आवड (२३) नुसता, केवळ (२४) आळवावा, लाहो करावा.*

**कर्माचा हातू[१] नलगे । ज्ञानाचेही कांहीं न रिघे[२] । ऐसीचि होतसे आंगे[३] । उपास्ति[४] हे ॥५७॥**
**कोण्ही एक अकृत्रिम[५] । भक्तीचें हें वर्म[६] । योगज्ञानादि विश्राम[७] । भूमिका हे ॥५९॥**
**(अमृ. प्रक. ९ ओवी ४३,४४,५१ ते ५६,३८,५७,५९)**

इत्यादि ओव्यांनीं सांगितलें आहे. आतां शुकवामदेवाची जी मुक्ति शास्त्रांत सांगितली आहे ती देखील जीवाभासाचीच[८] सांगितली असली पाहिजे. कारण मी शुक, मी वामदेव, इत्याद्यहंकार प्रमातारूपी[९] (य३-१४६) जीवाभासालाच असणें संभवनीय आहे; मुख्य[१०] जीवाला नाहीं. वर जी जाग्रच्छ्रुतींतील[११] वचनें दाखविलीं, त्यांतील

**'जीवभूतां महाबाहो ययेदं धार्यते जगत्' ।**

इत्यादि एकजीवपर[१२] जाग्रछ्रुतीचा[१३] अर्थ मुख्यजीवपर करून

**'अज्ञानेनावृतं ज्ञानं तेन मुह्यन्ति जन्तवः'**

इत्यादि अनेकजीववादपर[१४] पूर्वी लाविलेल्या जाग्रच्छ्रुतीचा अर्थ अनेकजीवाभासपर[१५] करावा म्हणजे भगवद्वाक्याचें[१६] दृष्टिसृष्टिवादपर[१७] आनयन[१८] होतें. म्हणून शुकवामदेवादिकांची मुक्ति मुख्य जीवाच्या दृष्टीनें कल्पित असून जीवाभासाच्या दृष्टीनें वास्तविक[१९]इव आहे. ब्रह्मदृष्टीनें नाहींच. किंवा 'नाहीं' ही अभावगोचरताही[२०] सहन होत नाहीं. याप्रमाणें -

*(१) स्पर्श (२) शिरत नाहीं (३) स्वभावतः (४) भक्ति (५) स्वाभाविक (६) रहस्य (७) ज्ञानदशा व योगदशा यांचे विश्रांतीचे स्थान (८) अंतःकरण प्रतिबिंबित जीवाभासाची (९) इंद्रियादि प्रमाणाने जाणणारा (१०) अंतःकरणरूप कार्याला कारण असणारी जी अविद्या तिच्यात पडलेल्या प्रतिबिंबाला (११) गीतेतील (१२) जीव एक आहे असे प्रतिपादन करणाऱ्या (१३) गीतावचनाचा (१४) जीव अनेक आहेत असे सांगणाऱ्या (१५) अनेक अंतःकरणात पडलेल्या अनेक आभासपर (१६) गीतेतील भगवंताच्या वचनाची (१७) दृष्टिसृष्टिवादाला धरून (१८) अर्थसंगति, अर्थ लावून दाखविणे (१९) खऱ्यासारखी (२०) आभासरूपाने अनुभवास येणे किंवा कळणे.*

शब्द पुढें चालत[१] नसल्यामुळें कृष्णार्पणतारूपी भक्ति शुकादिकही करितात.

**'आत्मारामाश्च[२]मुनयोर्निर्ग्रंथा-अप्युरुक्रमे । कुर्वन्ति-अहैतुकीं भक्तिमित्थंभूतगुणो हरिः ॥'**

असें भागवतांत सांगितलें असून

**'येरवीं[३] विषय जिणोनि[४] जन्मले । जे शुकादिक दादुले[५] । ते विषयचि वानितां[६] जहाले । भाट[७] ययाचे ॥**
**(ज्ञाने. अध्या. ११ ओवी १७३)**

असें तातांनी म्हटलें आहे. आणखी अद्वैतानंतर[८] भक्तीसाठीं **'एकाकी न रमते'** या श्रुतिप्रमाण्यावरून द्वैतमिव[९] अद्वैतप्रतीति कांहीं विरोधी[१०] नाहीं. तात[११] म्हणतात :-

**अहो ऐक्याचें मुद्दल[१२]न ढळे[१३]। आणि साजिरेपणाचा[१४]लाभु[१५]मिळे ।**
**तरी स्वतरंगाचीं[१६]मुकुळें । तुरंबु[१७]कां पाणी ॥ (अमृ.१।५९)**

*(१) पुढे शब्दाने वर्णन करता येत नाही (२) आत्मस्वरूपाचे ठिकाणी रमणारे, ज्याचे अज्ञानग्रंथी सर्व तुटले आहेत असे*

*पूर्ण ब्रह्मनिष्ठपुरुषहि भगवंताची निष्काम भक्ति करितात व त्याचे गुणगायन करितात असा तो भगवान् आहे (३) नाही तरी (४) जिंकून (५) समर्थ (६) वर्णन करिता (७) स्तुतिपाठक ओवी अर्थ - अत्यंत वैराग्यामुळे जन्मापासूनच ज्यांनी विषयाचा त्याग केला असे समर्थ शुकाचार्यादि ब्रह्मवेत्ते देखील भगवंताचा विषयविलास मोठ्या प्रेमाने वर्णन करू लागले (८) ब्रह्मज्ञानाने अद्वैत अनुभव आल्यावर (९) द्वैतरूप नाही पण द्वैतासारखी (१०) अद्वैताला विरुद्ध (११) श्रीज्ञानेश्वर महाराज (१२) ऐक्यरूपी किंवा अद्वैतरूपी मुद्दल, ऐन (१३) नाहिसे होत नाही, बिघडत नाही (१४) मनाला वेध लावणाऱ्या सौंदर्याचा (१५) प्राप्ति (१६) आपल्या तरंगरूपी फुलांना (१७) आपल्या शिरावर खोवो. अर्थ - ज्याप्रमाणे पाण्यावर लहरी उठली असता लहरी व पाणी दोन्ही पाणीरूपच या एकरूप अनुभवात कांही बिघाड तर होत नाहीच, पण पाण्यावर लहरी उठतांना पाहून मनाला आनंद होतो म्हणजे पाण्याच्या गंभीर शांत अवस्थेपेक्षा पाण्यावर लहरी उठण्याचा देखावा पाहणाऱ्याला ज्यास्त सुंदर वाटतो त्याप्रमाणे ब्रह्मज्ञानाने अद्वैत झाल्यावर त्या अद्वैत गंभीर स्थितिपेक्षा अद्वैताचा यत्किंचित् बिघाड न करता मनाला मुग्ध करून सोडणारी सगुणभगवद्भक्तीची अवस्था ब्रह्मज्ञान्यालाहि आवडते*

आणि ''बोधसार''कार नरहरी महाराजांनींही असेंच म्हटलें आहे :-

**'द्वैतं[१]मोहाय बोधात्प्राक् प्राप्तबोधे मनीषया । भक्त्यर्थं कल्पितं द्वैतम् अद्वैतादपि सुंदरम् ॥४२॥**

**(बोधसार-भक्तिरसायनप्रकरण)**

अशा भक्तीची श्रेष्ठताही तेथेंच सांगितली आहे.

**'परमार्थिकमद्वैतं द्वैतं[२] भजनहेतवे । तादृशी यदि भक्तिश्चेत् सा तु मुक्तिशताधिका' ॥४६॥**

**(बोधसार-भक्तिरसायनप्रकरण)**

सुवर्ण कळल्यावर अलंकाराचा जसा विरोध राहत नसून उलटा त्यापासून आनंदच होतो, तद्वत् अद्वैत असून भक्त्यर्थ भासणारा हा द्वैतपणा बाधक नाहीं, असा या श्लोकांचा भाव समजावा. म्हणूनच शुकादिकांच्या वृत्ती तल्लीन झाल्या. तो विष्णुशिवात्मक[३] अनध्यस्तविवर्तरूप[४] परमात्मा ब्रह्मस्वरूपी हा श्रीकृष्ण आहे. आणि ब्रह्मस्वरूपी[५] होता[६] असें जे भूतकालिक[७] वचन पूर्वी सांगितलें तें दृष्टिसृष्टिसिद्ध[८] जीवाभासाच्या[९] सृष्टिदृष्टीनें[१०] समजावें. (य३-१४७)

*(१) ब्रह्मज्ञान होण्यापूर्वीच काय ते द्वैत बाधक होते पण ब्रह्मज्ञानानंतर सगुण भक्तीकरिता कल्पिलेले द्वैत, अद्वैतापेक्षाहि गोड आहे (२) अद्वैत सत्य मानून भजनाकरिता म्हणून भक्त द्वैताचा काल्पनिक स्वीकार करितात अशी जर भक्तीची स्थिति असेल तर ती भक्ती, मुक्तीपेक्षा शतपट श्रेष्ठ आहे (३) विष्णुस्वरूप व शिवस्वरूप (४) ब्रह्मज्ञानानेहि ज्याचा साकारपणा नाहिसा होत नाही असा (५) शुद्ध ब्रह्मस्वरूपाचे ठिकाणी, ज्ञानानंतरहि भासणारा म्हणून ब्रह्मस्वरूपी (६) 'य एक आसीदविशेष आत्मनि' असे मुळात पद आहे (७) भूतकालदर्शक (८) दृष्टिसृष्टिवादात मानलेला (९) अंतःकरणप्रतिबिंबित प्रमाता (१०) परमेश्वरनिर्मित जगत् आहे अशा दृष्टीने.*

***स्पष्टार्थ*** *- दृष्टिसृष्टिवादात सर्व जगत् जीव कल्पित आहे पण सृष्टिदृष्टिवादात ते ईश्वराने निर्माण केले असे समजले जाते. म्हणून* ***दृष्टिसृष्टिवादात एका वर्तमानकालावाचून अन्यकाली जगताचे अस्तित्व नसते*** *म्हणजे जीव जेव्हा जगताची कल्पना करितो किंवा त्याला जगताचे ज्ञान होते तेव्हांच जगताचे अस्तित्व या वादात मानले जाते. सृष्टिदृष्टिवादात ईश्वराने पूर्वी निर्माण केलेल्या जगताचे आपण ज्ञान करून घेतो असे मानले आहे म्हणून या वादात वर्तमान, भूत, भविष्य या तिन्ही काळांचे ज्ञान स्वीकारले जाते. हा जीव आपल्या कल्पनेने कल्पनेबरोबरच जगत् निर्माण करित असून पुढे ईश्वराने जगत् निर्माण केले असे भ्रमाने म्हणतो तेव्हा तोहि सृष्टिदृष्टिवाद्याप्रमाणे भूतकाळ मानतो म्हणजे वर्तमानकाळाचा भूतकाळाप्रमाणे उल्लेख करितो.* ***उदाहरणार्थ*** *- स्वप्नांत आपण आपला बाप आपल्या कल्पनेने आपल्याबरोबरच उत्पन्न करितो पण संस्कारभ्रमाने - म्हणजे बापाचा जन्म मुलाच्या पूर्वी होतो. भ्रमाने- वर्तमानकाळीच उत्पन्न झालेल्या बापाला भूतकाळी उत्पन्न झाला असे समजतो. सारांश सृष्टि म्हणजे जीवाची कल्पना आहे हे विचार करून पाहता खरे असले तरी जीव जेव्हां अंतःकरणाचा अभिमान धरून अंतःकरणापुरताच आपल्याला मर्यादित करून घेतो व सृष्टि सत्य समजतो तेव्हां तो सृष्टिदृष्टिवादास अनुसरून वर सांगितल्याप्रमाणे भूत वगैरे काळाचा निर्देश करून बोलू शकतो*

यावरून सत्तात्रयवाद[१] हा जीवाभासदृष्टीनेंच सिद्ध आहे असा भाव तूं समज. आतां त्या स्त्रियांनां महावाक्यावांचून[२] हें एवढें ज्ञान कसें झालें? अशी तुला शंका येईल तर, या पुरस्त्रियांचे[३] शब्द श्रुतीनें अभिनंदन[४] करण्याजोगे आहेत हें पूर्वी सांगितलेंले व्यासश्लोकार्थबोधक[५] वाक्यच उत्तर समज. याप्रमाणें त्या स्त्रिया म्हणाल्या :-

हे सख्यानों ! या परमेश्वराचें ठिकाणीं कोणत्याच प्रकारचें आश्चर्य न करून[६] **केवळ ब्रह्मस्वरूप होऊन समाधिकालीं[७] व व्युत्थानकालीं[८] एकदशारूप[९] होऊन राहणेंच आपणा सर्वांनां इष्ट आहे.**

*(१) सृष्टिदृष्टिवाद (२) गुरूने तत्वमसि वाक्याचा बोध करून दिल्यावाचून (३) नगरात, शहरात राहणाऱ्या स्त्रिया (४) वाखाणण्याजोगे (५) व्यासांच्या श्लोकाचा अर्थ सांगणारे (६) न करिता (७) देहादि प्रपंचाहून मन काढून त्याच ठिकाणी स्थिर केले असता (८) प्रारब्धामुळे समाधीतून देहावर येऊन व्यवहार करीत असता (९) एकरूप.*

कारण विस्मय[१] हा रसास्वाद[२] विघ्नाला उत्पन्न करून समाधि स्थिर होऊं देत नाहीं. श्रीसद्गुरू एकनाथ महाराज म्हणतातः-

**'प्रथम स्वरूप[३] पाहतां दृष्टी । न सांवरता[४] विस्मय उठी । तोही जीरवोनिया पोटीं । दशा जे उठी ते समाधि' ॥१॥**

परंतु शब्दाश्रय[५] आणि शब्द कल्पित असल्यामुळें ब्रह्मबोध झाल्यावर प्रेमानेंच परमानंद प्राप्त होत असल्यानें तद्‌बोधक[६] माहात्म्यज्ञाननिष्ठ[७] स्तुतिरूप भाषण जीवाभासाच्या दृष्टीनें पुनः झालें, तरी माहात्म्यज्ञान रक्षकत्वास्तव[८] आपणाला बाधक[९] होत नाहीं.

**एवं निष्प्रपंच[१०] भगवंत । आदिअंतीं अखंडित[११] । तोचि अध्यारोपापवादगृहीत[१२] । प्रपंचयुक्त भासतो ॥२४॥**

**'अध्यारोपापवादाभ्यां निष्प्रपंचं प्रपंच्यते' । ऐसी स्मृतीही साक्ष देते ।**

**भ्रम[१३] तो आरोप[१४] श्रुति म्हणते । आणि बोलती बाध[१५] ते अपवाद ॥२५॥**

**तेथ आरोप आधीं सांगावया । कारण अवस्था[१६] बोलिजे यया ।**

**जिच्यायोगें परमात्मया । आलें उपादान[१७] निमित्त[१८] होणें ॥२६॥**

*(१) आश्चर्य (२) सुखाचा भोग झाल्यामुळे, भोक्त्याला सुखस्वरूप न होऊ देता, सुखाहून निराळे ठेवणे, अत्यंत एकरूपतेत हे विघ्न होय (३) आत्मरूप (४) सावरता न येणारा (५) शब्दाचा आश्रय, अर्थ (६) आनंदाला उत्पन्न करणारी (७) परमेश्वराच्या माहात्म्यज्ञानाच्या म्हणजे सर्वज्ञत्त्व, सर्वशक्तिमत्व, सृदिानंदत्व इत्यादि सामर्थ्याच्या जाणिवेला अनुसरून (८) परमेश्वराच्या सृदिानंदादि अगाध सामर्थ्याचे विस्मरण न होऊ देणारे असल्यामुळे (९) विघातक (१०) प्रपंचरहित (११) आदि अंती राहणारा, ज्याला उत्पत्ति नाश नाही (१२) अध्यारोप व अपवाद यांच्या द्वारे त्याचे ग्रहण करिताना (१३) प्रपंचाचे भ्रमाने भासणे (१४) अध्यारोप (१५) नाश (१६) कार्यरूप जगताची कारण अवस्था (१७) जगद्रूपाने भासणारे, कार्यरूपाने असणारे (१८) कार्य उत्पन्न करण्याचे ज्ञान असणारे.*

**नन्वारोप कवण करी । ऐसी शंका होईल जरी । तरी आरोप पाहती अविचारी[१] । तो कवण करी हा प्रश्नचि नये ॥२७॥**

**'अविचारकृतारोपो[२] विचारेण निवर्तते'। 'अनुभूतिप्रकाशीं'त्थं विद्यारण्यहि बोलिले ॥२८॥**

**अविचाराद्यदुत्पत्तिर्न कर्ता तदपेक्ष्यते । रज्जुसर्पः शुक्तिरौप्यंकः करोतीहबुद्धिमान् ॥२९ ॥** (य३-१४८)

'जन्माद्यस्ययतः' इत्यादि सूत्रांत जें ईश्वरकर्तृत्व[३] सांगितलें तें जगताविषयीं असून अविद्येविषयी नाहीं. अथवा तटस्थलक्षणानें[४] अधिष्ठानपर[५] त्याचा अर्थ समजावा.

**अप्यकर्तुर्विवक्षायाम् अधिष्ठानमपेक्ष्यते[६] । निरधिष्ठानविभ्रान्तेर्नास्माकं बौद्धवत्स्पृहा ॥३०॥**

*(१) अज्ञानी (२) अज्ञानाने केलेला आरोप विचाराने नाहिसा होतो असे अनुभूतिप्रकाशात विद्यारण्यांनी सांगितले आहे. अविचाराने जे उत्पन्न होते त्याला कर्त्याची आवश्यकता नाही. दोरीवरील सर्पाचा भास किंवा शिंपेवरील रुप्याचा भास कोण बुद्धिमान उत्पन्न करतो? (३) ईश्वराचे कर्तृत्व, ईश्वर कसा आहे असे (४) ते तटस्थ लक्षण म्हणून सांगितल्यामुळे (५) ईश्वर जगताला आधार आहे, ईश्वरावर जगत् भासते असा (६) भ्रमजन्य कार्याचे ठिकाणी कर्त्याची आवश्यकता नसलीतरी अधिष्ठानाची जरूरी आहे. कारण बौद्धाप्रमाणे अधिष्ठानावाचून भ्रांति भासते असे मानण्याची आमची इच्छा नाही. सत्तात्रयवादात ईश्वर जगाचा कर्ता मानला आहे असे म्हणशील तर तो देखील शुद्ध सत्वात्मक मायेच्या योगाने आरोपित आहे असेच त्या वादात मानले आहे. देश, काल, कर्म, कर्ता हे सर्व मायेनेच आरोपित असून सृष्टीच्या उत्पत्तीमध्ये जी कार्यकारण व्यवस्था पाहिजे असते तीहि आरोपानेच भासू शकते. सत्ताद्वयवादात शुद्ध ब्रह्मच ईश्वर असून, त्याच्या ठिकाणी आभासरूप जीव आहे आणि तोच सर्व सृष्टीचा आरोप करित असतो.*

**अस्तिचेद् ईश्वरः कश्चित् सत्त्वत्रयमतः स्थितः । आरोपेण कृतः सो ऽपि शुद्धसत्त्वेन मायया ॥३१॥**

**देशः कालः कृतिः कर्ता सर्वमारोपितं यतः । व्यवस्थापि क्रमादीनां ततः स्यात्सृष्टिसंभवे ॥३२॥**

सत्ताद्वयविवादे तु परेशो ब्रह्मरूपकः । आभासो जीव आरोपात्स च सर्वं करोत्यहो ॥३३॥

॥ ओव्या ॥

परी हा आरोप झाला कहीं । हें विचार्य सेचि[१] नाहीं । जे भ्रम जाहला कहीं । हें हाताचि[२] नये ॥३४॥

कहीं जाहलें स्वप्न । याचा स्वप्नीं शोध अघटमान[३] । जागे होतां नाहीं स्वप्न । यालागीं शोध न संभवे ॥३५॥

वरी भ्रम उत्पन्न करावया । झटला कोणी एक उपाया । तरी हातां येईल काह्या । सांगिजें कवणीं ॥३६॥

कीं तमाचा विसंवरा[४] । मागावया दिनकरा । जाणे आलें राती घरा । तव केंवि मिळे ? ॥३७॥

नाना जावया वाराणशी[५] । स्वस्कंधवाहनाभिलाषी[६] । पावेल कवणिये दिवशीं । गति तैशी भ्रमोत्पादका[७] ॥३८॥

आतां उत्पत्ति जंव न सांगवे । तैं कैं[८] जाहलें हें कवणे म्हणावें । येथ आक्षेपू[९] संभवे । ऐसा जरी ॥३९॥

*(१) विचार करण्याजोगे, विचार करण्याची सोय (२) भ्रमाचा आदि (प्रारंभ) आपल्यास दिसत नाही (३) अशक्य (४) शोध (५) काशीस (६) आपल्या खांद्यावर बसून जाण्याची इच्छा करणारा (७) भ्रम उत्पन्न करू इच्छिणाऱ्याची (८) केव्हां (९) शंका (४ क) अथवा, किंवा*

कीं आधीं भ्रमाभाव[१] देखे । भ्रम निवर्तलीया[२] स्मरणें विशेखे । म्हणे म्यां एतुला काळ निके[३] ।
भ्रमातें मोटके[४] भोगिलें ॥४०॥

परी येणें कळे भ्रमाचा आदी । ही शंका[५] न घडे त्रिशुद्धी[६] । जो अग्रीं[७] उभा असेल वादी ।
पुसिजे समाधी[८] तयाते ॥४१॥ *(समाधी :- समाधान)* **(य३-१४९)**

दृष्टांतीभूत[९] भ्रमाच्याठायीं । ही शंका संभवे पाही । परी मूलाविद्येचियाठायीं[१०] । ऐसें सर्वथा न बोलवे ॥४२॥

आणि दृष्टांतीभूत[११] जरी भ्रमू । तरी भ्रमदशेंत[१२] नव्हे भ्रमावगमू[१३] । भ्रम निवर्तलीया संभ्रमु[१४] । जरी कां घडे ॥४३॥

तरी अनुभवें पाहतां । कीं तुज ऐसें विचारिता । कीं तूं ब्रह्माचा नेणता[१५] । सांग कै पासुनि असशी? ॥४४॥

तरी तूं ऐसे देशील उत्तर । कीं ब्रह्मज्ञान मज नाहीं आजवर । आणि मागे असेल ऐसी निर्धार । स्मृतीही नव्हे ॥४५॥

यालागी मूला विद्या अनादि । हें स्वीकारणे आलें बुद्धि । आग्रहचि जरी मधीं[१६] । धरील कोणी ॥४६॥

तरी 'तुष्यतु[१७]दुर्जन' या युक्ति । चित् चित् बहू[१८] महंति । ब्रह्मरूपीं[१९] मायोत्पत्ती[२०] । उपेक्ष्यरीती[२१] बोलिली ॥४७॥

आदिअंतीं जें नाहीं । ते मध्यही नसे कांहीं । हें बोलणें तंव लवलाही । ब्रह्मदृष्टी शोभते ॥४८॥

*(१) भ्रम नसणे (२) नाहिसा झाल्यावर (३) खरोखर (४) अगदी, केवळ (५) प्रारंभ (६) त्रिवार सत्य (७) समोर (८) समाधान (९) दृष्टांताकरिता घेतलेले व्यवहारातील भ्रमाचे उदाहरण (१०) आत्मस्वरूपाचे विस्मरण ही मूलाविद्या आहे (११) दृष्टान्ताकरता घेतलेला भ्रम (१२) जेव्हा भ्रम राहतो तेव्हा (१३) भ्रमाच्या सुरवातीचे ज्ञान (१४) प्रयत्न (१५) अज्ञानी (१६) यात (१७) विनाकारण दुष्टाशी वाद घालीत न बसता, त्याच्या समाधानाकरिता म्हणून (१८) पुष्कळ वेदान्त्यांनी (१९) ब्रह्माचे ठिकाणी (२०) मायेची उत्पत्ति (२१) उपेक्ष्य वृत्तीने.*

एवं भ्रमाचा न कळे आदी । परी ज्ञाने कळतो अवधी । यालागीं 'मी ब्रह्म' ही बुद्धि । महावाक्यशब्दीं[१] उपजे ॥४९॥

म्हणोनि आरोपदृष्टि[२] । स्वरूपाची[३] विस्मृती मोठी । तीचि अविद्या गोमटी । प्रकृति नेहटी[४] नाम जीचें ॥५०॥

आणि सृष्टि करावयाची वासना । तीचि जियेतें गर्भधारणा । जन्माआदी कुमारीपणा । घेवोनियां जे ॥५१॥

ऐशी प्रकृति अधिष्ठून[५] । निजसत्त्वें[६] तीतें व्यवस्थापोन[७] । जिच्यायोगें पावोनि मोहन[८] । स्वयें आपण जीव झाला ॥५२॥

कीं बिम्ब तेंचि प्रतिबिम्ब । परी जैसें तैसें नभीं नभ । तेंवी ब्रह्मीं ब्रह्मता स्वयंभ[९] । अभी[१०] जीवप्रतिभ[११] जाहला ॥५३॥

जो पहिला[१२] कां प्रवेश[१३] । तो सृष्टि जाहलिया अनुप्रवेश[१४] । ऐसा प्रभुनिश्वास[१५] । आनंदविलास[१६] पावला ॥५४॥

ही सुषुप्तिअवस्था[१७]जीवाची । समष्ट्या[१८]प्रलयावस्था[१९]साची । येथ रूपनामतेची । जीवातें सेचि[२०] कांहीं नसे ॥५५॥

तयातें[२१] व्हावें नामरूप । ऐसा भगवदीक्षणसंकल्प[२२] । यालागीं कारणारोप[२३] । हें साटोप[२४] बोलिजे ॥५६॥

येथुनी सृष्टिस्वप्नांची[२५]धुमाळि[२६]। जिया परंपरा[२७]वेदांत कुळी[२८]। भाव[२९]येतो हा फळी[१]। आली वाग्रळी[२] चालतू ॥५७॥

*(१) तत्वमसि महावाक्यातील शब्दावरून (२) ब्रह्मस्वरूपाचे ठिकाणी जगताचा आरोप करणारी दृष्टि, त्यामुळे (३) आत्मस्वरूपाची (४) अगदी, थेट (५) आधार होऊन (६) आपल्या सामर्थ्याने (७) व्यवस्थितपणे कार्यरूपाला आणून, तिचे नियमन करून (८) भ्रांति, तिचा स्वाधीनपणा (९) मूळची (१०) प्रकाशात (११) जीवाचा आभास (१२) सृष्टीच्या पूर्वी (१३) आश्रयरूपाने असणे (१४) मागाहून शिरणे (१५) वेदरूपी शब्द (१६) आनंदरूप क्रीडा (१७) ज्या अवस्थेत प्रत्येक जीवाचे*

*इंद्रियादि व्यापार लीन होतात (१८) ब्रह्मांडाच्या दृष्टीने, हिरण्यगर्भाचे दृष्टीने (१९) संपूर्ण ब्रह्मांडाचा संहार ज्या अवस्थेत होतो (२०) सोय, ओळख (२१) जीवाला (२२) भगवंताचा ईक्षणरूपी संकल्प (२३) कारणत्वाचा आरोप, सृष्टीचा कर्ता किंवा कारण ईश्वर आहे असा आरोप (२४) अहंकाराने (२५) सृष्टिरूपी स्वप्नाचा (२६) उत्पत्ति प्रवाह, अवडंबर उठावणी (२७) वंशावळ (२८) वेदान्ताच्या कुळामध्ये, ब्रह्माच्या वंशावळीतील आद्य पुरुष*

**भाव[२९] येतो हा फळी[१] । आली वाग्रळी[२] चालतू ॥५७॥**

**त्रिगुणात्मक अज्ञान । तेथ तामसी[३] माया करोनि ग्रहण । ब्रह्म जगदुपादान[४] । जाहलें असे ॥५८॥**

**आणि शुद्धसत्त्वांश[५] अज्ञान । निके करोनिया ग्रहण । ब्रह्मचि पैं आपण । निमित्तकारण[६] जगा झालें ॥५९॥**

**(य३-१५०) एवं सत्वत्रयवादमत[७] । हें बोलिलें पैं निश्चित । प्रयोजन[८] याचें यथार्थ । ऐसें आहे ॥६०॥**

**सुषुप्तिमाजी[९] कोणी । मुक्त न होय अज्ञानी । ऐसीचि दशा[१०] पाषाणीं । बोलिले वसिष्ठमुनी रघुनंदना ॥६१॥**

**म्हणोनि तेथ मुक्ति होणें । जेंवी दुःसंभवे[११] येणें । तेंवी कारणस्थितींत[१२] जीव मुंचणे[१३] । असंभव जाणे सर्वथा ॥६२॥**

**कीं काष्ठाचियाठायीं । गुप्त वन्ही[१४] असे पाही । परी मंथिलियावीण[१५] लवलाही । काष्ठ जाळों तों न शके ॥६३॥**

**तथा सामान्यचिदाश्रिताऽविद्यावर्ती[१६] । जीवत्वाची असे बुंथी[१७] ।**

**ते सृष्टित्वा[१८] आलियावीण[१९] निश्चिती । ब्रह्मत्वस्थिति[२०] येवों न शके ॥६४॥**

*(२९) अस्तित्व.(१) परिणामी (२) वैखरी वाणीची प्रवृत्ति, शब्दप्रवृत्ति (३) तमोगुण प्रधान (४) जगताचे उपादान कारण (५) रजोगुण तमोगुण रहित असे शुद्धसत्व (६) जगत् उत्पन्न करणारे (७) ज्या वादात पारमार्थिक म्हणजे अत्यंत अविनाशी व्यवहारिक म्हणजे ब्रह्मज्ञान होईपर्यंत सत्य असणारी व प्रातिभासिक म्हणजे क्षणभर कल्पनेपुरती भासणारी, अशा तीन सत्ता म्हणजे अस्तित्व मानले आहे. या वादात ब्रह्म पारमार्थिक सत्तावान् आहे, जगत् जीव ईश्वर व्यावहारिक सत्तावान् आहेत व दोरीवर सर्पादिकांचे भ्रम हे प्रातिभासिक सत्तावान् आहेत. (८) उद्देश (९) झोपेत (१०) स्थिति, अवस्था (११) अशक्य (१२) जगत्‌रूपी कार्य अवस्थेत येण्यापूर्वीच्या अवस्थेत, अव्यक्त स्थितीत (१३) मुक्त होणे (१४) अग्नि (१५) घर्षणावाचून (१६) सामान्य चैतन्य म्हणजे ब्रह्माचा सदंश त्याच्या आश्रयाने भासणारी जी अविद्या, तिच्या स्वाधीन, (१७) गाठोडे (१८) कार्यरूप सृष्टित्वाने (१९) प्रगट, व्यक्त झाल्यावाचून (२०) मूळची परब्रह्म स्थिति.*

**ऐसें जाणोनि देवाधिदेवें । नामरूपें निवेशिली जीवें[१] । म्हणोनि नैर्घृण्य[२] वैषम्य स्वभावें । निमाले[३] दोष ॥६५॥**

**आणि जाणावया ब्रह्म । वेद निर्मिले परम । 'वेदान्तकृत्[४]' इत्यादि वर्म[५] । जाग्रच्छ्रुतीचें यास्तव ॥६६॥**

**मीमांसक म्हणती नाहीं देव । वेद अनादि अनपेक्षो प रव[७] । सांख्य आणि व्याकरणभाव[८] । ऐसाचि आहे ॥६७॥**

**परी तें सर्वथा अनृत[९] । जो वेदीं निःशेष[१०] अर्थ । तो कवण कल्पी बुद्धिमंत । अज्ञ[११] कीं सज्ञ[१२] ॥६८॥**

**सज्ञ म्हणूं तरी कवण संस्कारे[१३] । संस्कार मानू तरी कवण्या प्रकारे ।**

**प्रकार म्हणूं तरी कवणे विद्यासागरे[१४] । विद्या सागर म्हणूं तरी जाहलीरे अनवस्था[१५] ॥६९॥**

**अनवस्थारहित[१६] एक । अज्ञ जीवा अर्थोपदेशक[१७] ।**

**तरी तोचि ईश तो वेदबोधक[१८] । हें किमर्थ लेक (मूर्ख) न कल्पिती ॥७०॥**

**म्हणोनि वेद ईशप्रणीत[१९] । हाही जाहला सिद्धान्त । एवं सत्त्वत्रयवादस्थित[२०] । निरूपण ॥७१॥**

**आतां दृष्टिसृष्टिवादें[२१] । येणें आरोपें[२२] प्रसिद्धे ।**

*(१) जीवाचे ठायी (२) निर्दयपणा व विषमपणा (३) नाहिसे झाले (४) उपनिषदादि वेद निर्माण करणारा (५) रहस्य वचन (६) गीतेचे (७) उच्चारणाऱ्या कर्त्यांची ज्याला अपेक्षा नाही असा शब्द (८) मत (९) खोटे (१०) संपूर्ण (११) मूर्ख (१२) शहाणा, ज्ञानी (१३) संस्कारामुळे (१४) ज्ञाननिधी (१५) जेथे एकाला एक कारण मानत असता आपण कोठे थांबू शकत नाही तेथे अनवस्था दोष येतो, विश्रांति नसणे (१६) जेथे अनवस्था न राहता, हेतु परंपरेची समाप्ति होते तसा मानल्यास (१७) ज्ञान सांगणारा (१८) वेद प्रगट करणारा (१९) ईश्वराने केलेले (२०) सत्तात्रयवादातील (२१) ज्या वादात परब्रह्माची परमार्थ म्हणजे अत्यंत अविनाशी सत्ता व ब्रह्मावाचून बाकी सर्व पदार्थाची प्रातिभासिक म्हणजे कल्पनेपुरती किंवा त्यांचे ज्ञान होते तोपर्यंत सत्ता मानली आहे त्या सत्ताद्वयवादात (२२) माया जगत् इत्यादि पदार्थाच्या आरोपाने*

**ब्रह्मातें अविबोधें[**] । आलें विनोदें[१] जीवैकपण[२] ॥७२॥**

**आणि आपेक्षिकबिम्बारोपाऽवच्छिन्न[३] । तेंचि ब्रह्म ईश्वर जाण । अनध्यस्तविवर्तपण[४] । निजभक्ता नारायण जें ॥७३॥**

**तयाचा घेऊनि आधार । जीव कल्पी समग्र । जेंवी क्षिप्त[५] एक प्रस्तर[६] ।**
**तो भित्याधार[७] घेवोनि प्रतिक्रिया[८] करी ॥७४॥**
**तेवी परमेश्वरी संकल्प । कामेकरोनि[९] साक्षेप[१०] । एवढा खटाटोप[११] । रचिला जीवें ॥७५॥**
**तेथ ओसणता महास्वप्नीं । जीवकल्पित[१२] सत्कर्तृत्वादिगुणी[१३] ।**
**ब्रह्मप्रतिष्ठा[१४] अनध्यस्तविवर्तपणी[१५] । (य३-१५१) वेदवचनीं[१६] मारी हाका ॥७६॥**
**तैं[१७] तेणें[१८] पावोनि ज्ञान । ब्रह्मत्वें[१९] भोगी मुक्तपण । यालागीं वेदान्तकृत् हें वचन । भगवंतींचि घटे[२०] ॥७७॥**
**अथवा स्वप्नीं स्वप्नमिथ्यावाक्यबोध[२१]। तेंवी महास्वप्नीं[२२] कल्पोनि गुरु,वेद[२३]। ज्ञान पावोनि प्रसिद्ध[२४]। पावे फळ ॥७८॥**
**स्वप्नरायें[२५] स्वप्नजगन्नियमन[२६] । तेंवी ईशा जीवकल्पित[२७] कर्तृपण । ईश्वरभजनें स्वप्नसमान[२८] । फळही होय ॥७९॥**

*(**) कोणताहि विशेष बोध नसल्यामुळे.(१) सहज, उगीच खोटे (२) एकजीवत्व ब्रह्मावरच आरोप केला गेल्यामुळे, आरोपाला आधार ब्रह्मच एकजीव या संज्ञेला प्राप्त होते (३) या जीवाच्या अपेक्षेने शुद्ध ब्रह्मालाच ईश्वर नाव प्राप्त झाले (४) ज्ञानाने नाश पावणारा साकारपणा (५) फेकलेला (६) दगड (७) भिंतीचा आधार (८) उलटून येतो (९) कामनेने, वासनेने (१०) आक्षिप्त (११) ब्रह्मांडाएवढा पसारा (१२) जीवानी आरोपित केलेल्या (१३) जगताच्या कर्तृत्वादि गुणाला आधार होऊन (१४) जगतादिकांचे आधार ब्रह्म (१५) ज्ञानाने नष्ट होणार नाही अशा साकारपणाने प्रगट भासून (१६) वेदरूपी शब्दाने (१७) तेव्हा (१८) वेद वचनाने (१९) ब्रह्म स्वरूपाशी ऐक्य पावून (२०) लागू पडते (२१) स्वप्नातील मिथ्या वाक्यानेहि बोध होतो (२२) या जगद्रूपी स्वप्नामध्ये (२३) गुरु आणि वेद (२४) आत्मज्ञानरूपी शास्त्रात प्रसिद्ध असलेले (२५) स्वप्नातील राजाने (२६) स्वप्नातील सृष्टीचे शासन. (२७) जीवाने कल्पिलेले (२८) स्वप्नातील बोधरूपी फळाप्रमाणे.*

**जैसी कां स्वप्नवाक्य-मीमांसा[१] । तेंवी न वेदवाक्यमीमांसा[२] । बाधाऽबाधे[३] फळभेदठसा[४] । सांपडे म्हणुनी ॥८०॥**
**किंवा वेद भगवन्निश्वास[५] । यालागीं तें स्वाप्निक विशेष[६] ।**
**आणि गीता स्वमुखें जगन्निवास । बोलिला म्हणोनी ती जागृतपुरुषहाका[७]॥८१॥**
**'वेद संपन्न[८] होय ठायीं[९] । परी कृपण ऐसा आन नाहीं । जे कानी[१०] लागला तिहीं । वर्णांच्याची ॥१४॥**
**येरां भवव्यथा[११] ठेलिया[१२] । स्त्रीशूद्रादिकां प्राणिया । अनवसर[१३] मांडूनियां । राहिला आहे ॥५७॥**
**तरी मज पाहतां तें मागील उणें[१४] । फेडावया गीतापणें । वेद वेठला[१५] भलतेणें[१६] । सेव्य होआवया'॥५९॥**
**(ज्ञाने.अ.१८) 'वेद माझे स्वप्नीं चेइला[१७] । आम्ही काय मानू त्याचे बाला[१८] ।**
**वेद आम्हावरी रुसोनी गेला । आम्ही त्याचे 'बा'ला धरिलें कंठीं ॥'**
**एवं श्री तात, नाथ, तुकाराम । बोलिले प्रमाण परम[१९] ।**
**आणि गीता हे स्वमुखें परब्रह्म । बोलिले यास्तव वरिष्ठ[२०] श्रुति ॥८२॥**

*(१) स्वप्नातील वाक्यांचा साधक बाधक विचार (२) वेद वाक्यांचा विचार (३) खोटे ठरणे व खोटे न ठरणे (४) फळाचे भिन्नत्वाचा प्रत्यय (५) भगवंताचे श्वासरूप (६) स्वप्नातील शब्दापेक्षा विशेष आहेत (७) जागृतीतल्या पुरुषाच्या हाकेप्रमाणे (८) अगाध ज्ञानाने भरलेला (९) स्वतःचे ठिकाणी (१०) कानाशी - ब्राह्मण, क्षत्रिय व वैश्य या तीन वर्णांनाच वेदाचा अधिकार आहे म्हणून वेदपूर्वक श्रवण तिघांनीच करावे (११) संसाराची दुःखरूपता (१२) नाहिशी करावीशी वाटल्यास (१३) अवकाश ठेवित नाही आपल्या द्वारा स्त्री शूद्रानी आपले संसार दुःख नाहिसे करावे असा वेदांनी त्यांच्या करिता अवसर, परवानगी, किंवा मोकळा मार्ग ठेविला नाही (१४) वेदाचा कृपणपणा, न्यूनपणा (१५) रूपास आला (१६) कोणालाहि त्याचे सेवन करता यावे म्हणून (१७)जागा झाला, उत्पन्न झाला (१८)बापाला (१९)अत्यंत (२०)वेदाहून श्रेष्ठ.*

**'तरी जयाच्या निश्वासीं[१] । जन्म झाले वेदराशी[२] । तो सत्यप्रतिज्ञ[३] पैजेसी[४] । बोलिला स्वमुखें ॥ज्ञाने.**
**'म्हणोनि वेदां मूळभूत'[५] । गीता म्हणों हें होय उचित । ऐसें पुनः तात । बोलिले आहाती ॥८३॥**
**'बाप बाप ग्रंथ गीता । जो वेदीं प्रतिपाद्य[६] देवता । तो श्रीकृष्ण वक्ता । जिये ग्रंथीं ॥'ज्ञाने.**

म्हणून गीतेला जाग्रच्छ्रुति[७] आणि वेदाला सौषुप्तश्रुति[८] मी म्हटलें. परंतु हें सर्व गीतेच्या स्तुतीसाठीं समज. कारण परमेश्वराला अज्ञानरूप निद्रा संभवत नसल्यामुळें अमूक जाग्रच्छ्रुति व अमूक सौषुप्तश्रुति असें परमेश्वराच्या वाक्याविषयीं म्हणणें अश्लाघ्य[९] आहे. तथापि वेदसम[१०] गीतेचें प्रामाण्य मला सम्मत[११] आहे. वेदापेक्षां कमी नाहीं. आणि वेद निश्वासरूप म्हणजे अस्पष्टार्थबोधक आहेत. आणि गीता ही स्पष्टार्थबोधक आहे. (य३.१५२) म्हणून तीच अत्यंत सेव्य[१२]

आहे. याप्रमाणेंच तातांचाही आशय आहे. वेद हा आपल्या ठिकाणीं पूर्ण आहे; वेदच आपलें कृपणपण काढण्याकरितां गीतारूप झाला; इत्यादि तातांची वचनें वेदसमान गीताप्रामाण्यार्थ[१३] आहेत. आणि संपूर्ण वेद बीजरूपानें पण स्पष्ट, गीतेंत समाविष्ट आहेत, ह्मणून तातांनीं हिला वेदांचें मूळ म्हटलें. पण हेतु देऊन सिद्ध केले असल्यामुळें -

*(१) श्वासोच्छ्वासांत (२) वेदरूपी ग्रंथ भांडार (३) ज्याची प्रतिज्ञा सत्य आहे असा (४) होड बांधून, पैज मारून (५) आधार (६) वेदांनी ज्याचे प्रतिपादन केले आहे (७) जागे असलेल्या पुरुषाच्या बोलण्याप्रमाणे स्पष्टार्थ बोधक. भगवंताचा शब्द (८) निद्रिस्थ पुरुषाच्या बोलण्याप्रमाणे अस्पष्टार्थ बोधक भगवंताचा शब्द (९) निंद्य (१०) वेदतुल्य (११) मान्य (१२) अर्थबोधाकरिता प्रमाण (१३) वेदाच्या बरोबरीने गीतेचे प्रामाण्य मानण्याकरिता.*

ह्या तातवचनाला अर्थवाद[१] मात्र म्हणतां येत नाहीं. पुनः गीतेंत कोणताही अंश वेदविरुद्ध नाहीं. आणि पांचरात्रांतील वेदनिंदावचनाचा[२] जसा आचार्यांनीं प्रतिक्षेप[३] केला आहे, तसा 'त्रैगुण्यविषया वेदा' / 'वेदवादरताः पार्थ ' इत्यादि गीतेंतील वेदनिंदाभासवचनांचा[४] प्रतिक्षेप केला नाही. अतः, गीतेचें वेदसम प्रामाण्य सिद्ध आहे.

**एवं कवणेही[५]मतें । ब्रह्मबोधचि[६]अपेक्षित[७] येथें ॥ अनध्यस्तविवर्तत्वें[८]आपणाते । एतद्दर्शन[९]होतें भक्तिभाग्यार्थ[१०]॥८४॥**

**॥ नरकूटकवृत्त ॥**

**मुनिजन[११] जिंकुनि पवन[१२] मानस इंद्रिय जे । हरिभजनें[१३] गुणत्रयीं[१४] न लिंपुन[१५] पूर्ण अजें ॥**
**भवभय[१६] सांडुनि रमति चित्त[१७] निरिच्छ[१८] यथा । नयन[१९] भरोनियां बघुनि गाति मुकुंदकथा ॥८५॥**

*(१) स्तुतिमात्र (२) ज्या वचनात वेदाची निंदा केली आहे त्या वचनाचा (३) निषेध, धिक्कार (४) वेदाची निंदा केल्याचा आभास ज्या वचनात दिसतो त्या (५) दृष्टिसृष्टि किंवा सृष्टिदृष्टी या कोणत्याहि वादाने (६) ब्रह्मज्ञानच (७) उद्देश, प्राप्तव्य (८) अनध्यस्तसाकाररूपाने (९) हे भगवंताचे दर्शन (१०) भक्तीप्रेमाचे भाग्य प्राप्त व्हावे म्हणून, अत्यंत भक्ति प्रेम आपणाला मिळावा म्हणून (११) ऋषि लोक (१२) प्राण (१३) श्रीहरीच्या भजनाने (१४) सत्वरजतम या तीन गुणात (१५) बद्ध न होता (१६) संसारभय (१७) चित्त यथा - स्वैर , स्वच्छंदाने (१८) वासनारहित (१९) डोळेभरून.*

**तोचि हा प्रभु अंतःकरण । शुद्ध करूं शके सकरुण[१] ।**
**यावांचोनि योगादिसाधनधन[२] । बंधन आणि न शुद्ध चित्त करी ॥८६॥**
**या प्रभूचें दर्शन । आपणा झालें हें धन्य पुण्य । यालागीं ह्यांचें दूरगमन[३] । होतां अप्रत्यक्षभवन[४] योग्य नव्हें ॥८७॥**
**म्हणोनी त्यागोनि सकल संसृति[५] । जाऊं याचिये संगती ।**
**जे योगी पावले गती । ते[६] याचे पद चिंतिती त्या सहज मिळे ॥८८॥**
**याचें करोनि प्रेमळ भजन । यातें पाहती शुचिमति[७] होऊन ।**
**शुद्ध सूक्ष्म[८] बुद्धीनें आत्मदर्शन । भगवन्निश्वासन[९] प्रमाणही ॥८९॥**
**ननु आत्मा मनोवागगोचर[१०] । आणि तैसाचि बुद्धिगोचर[११] । येथ वचनविरोधप्रकार[१२] । आशंकेचा[१३] ॥९०॥**
**(य३-१५४) तरी येथ समाधान । आत्मया न जाणें अशुद्ध[१४] मन ।**
**शुद्ध[१५] बुद्धि जाणे म्हणोन । शंका निष्पन्न[१६] होईना ॥९१॥**

**॥ चूर्णिका ॥**

**अथवा घटातें जाणतां । तैं बुद्धि विषयचेतनावच्छिन्नावृति[१७] भंगूनि[१८] तत्त्वतां ।**
**आभास[१९] दे प्रकाशता[२०] । एवं बुद्धि आणि तद्गताभासयुगुलव्याप्यता[२१] । घटादिकां ॥९२॥**

*(१) दयाळु असल्यामुळे (२) योगादिक साधने हेच धन (३) आपल्यापासून दूर द्वारकेला जाणे (४) डोळ्यासमोर न दिसणे (५) संसार (६) ती गति (७) शुद्धचित्त (८) शुद्ध झालेल्या अशा सूक्ष्म वृत्तीने आत्मसाक्षात्कार होतो याविषयी वेद प्रमाण आहे (९) वेद (१०) मन वाणीला न समजणारा (११) बुद्धीला कळणारा (१२) दोन श्रुतिवचनांचा विरोध हा प्रकार (१३) शंकेला कारण (१४) विषयाच्या वासनेने युक्त असलेले (१५) वासनारहित (१६) उत्पन्न (१७) विषयरूपाने भासणारे जे चैतन्य त्या चेतनाचे ठिकाणी असणारे अज्ञान आवरण (१८) नाश करून (१९) अंतःकरणाशी तादात्म्य पावलेला चैतन्याचा आभास (२०) पदार्थाचे ज्ञान (२१) बुद्धीमध्ये पडलेला आभास या दोघांचीहि व्याप्ति म्हणजे बाहेरचे पदार्थ कळण्याकरिता बुद्धि व तिच्यातील आभास या दोघांचीहि आवश्यकता आहे*

॥ ओवी ॥

जेंवी पहावया अन्यपदार्थ(१)। नेत्र आणि दीप अपेक्षित । परी सूर्यातें पाहतां निश्चित ।
नेत्र अपेक्षित(२)परी दीप(३)नलगे ॥९३॥
तेंवी साक्षी स्वयंप्रकाश(४) । परी आवरण(५) भंगावयास(६) । शुद्धवृत्त्यपेक्षा(७) विशेष ।
परी आभासप्रकाश(८) तेथ नलगे ॥९४॥
एवं अप्रमेय(९) अनादि(१०) वाङ्मनोऽगोचर(११) । हीं वचनें आभासभा-निषेधपर(१२)।
आणि बुद्धिग्राह्य(१३)इत्यादि शब्द(१४) सुंदर । साक्षिस्थवृत्त्या(१५) आवृतिभंगपर(१६) बोलिजती ॥९५॥
बुद्धिवृत्ति तत्फल(१७) चिदाभास(१८) । विषयीं(१९) युगुलव्याप्ति(२०) विशेष । परी वृत्तिव्याप्तिअपेक्षा(२१) साक्षीज्ञानास(२२) ।
फलव्याप्ति(२३) निःशेष तेथ नसे ॥९६॥
ब्रह्माभासे(२४) जीवाभासे(२५) । आभाससाम्यता(२६) सहज दिसे ।

*(१) दुसरा पदार्थ (२) डोळ्याची जरूरी (३) दिवा (४) प्रकाशरूप, ज्ञानरूप (५) त्याचे ठिकाणचे अज्ञान (६) नाहिसे करण्याकरिता (७) वासनारहित वृत्तीची जरूरी (८) बुद्धि प्रतिबिंबित चैतन्याचा प्रकाश (९) प्रमाणाने न कळणारा (१०) उत्पत्तिरहित (११) वाणी व मनाला न कळणारा (१२) बुद्धीत प्रतिबिंबित झालेल्या चैतन्याच्या प्रकाशाची जरूरी नाही असे सांगणारी (१३) आत्म्याचे बुद्धीने ग्रहण होते, ज्ञान होते (१४) वचने (१५) साक्षीच्या ठिकाणी स्फुरणाऱ्या वृत्तीने (१६) अज्ञान नाश होतो असे सांगणारी (१७) त्यातील प्रतिबिंबरूप चैतन्य (१८) चैतन्याचा आभास (१९) विषयाचे ठिकाणी (२०) बुद्धि आणि चिदाभास या दोघांचीहि जरूरी (२१) बुद्धि वृत्तीची जरूरी (२२) साक्षीचे ज्ञान होण्याकरिता (२३) चिदाभासाची आवश्यकता नाही (२४) ब्रह्माचा आभास जीव मानला तरी (२५) किंवा जीवाचे आभास, जीवाभास म्हटला तरी (२६) दोन्हीवादात जीवाला आभासपणा सारखाच मानलेला आहे.*

यालागीं द्वित्रीसत्त्ववादवशें(१) । विरोध नसे सर्वथा ॥९७॥
एवं अर्थद्वयामाझारीं(२) । प्रथमार्थ(३) दावी सगुण(४) हरी । द्वितीयार्थ(५) तो निराकारी(६) । ज्ञानप्रकारीं(६) योजिजे ॥९८॥
वेदीं शास्त्री परम निपुण । आणि अनुभवें(७) संपूर्ण । ते श्रोत्रीय ब्रह्मनिष्ठ सुजन । गाती गुण प्रभूचे या ॥९९॥
एक परमात्मा परमेश्वरु । जो अज(८) अव्यय(९) निर्विकारू(१०) ।
जगत्सर्जनपालनसंहारू(११) । तटस्थलक्षण(१२) जयाचें ॥१००॥
जीव एक अथवा अनेक । ऐसे वेदांतीवाद सम्यक । परी नानाईश्वरवाद(१३) देख । नसे निष्टंक कोठही ॥१॥
यद्यपि वाचस्पतिमतें(१४) । प्रतिजीवाप्रति(१५) सृष्टिर्भिद्यते(१६) । म्हणोनि ईश्वरही प्रतिजीवातें(१७) । एकैक मिळे ॥२॥
एवं नानेश्वरप्राप्ति(१७क)। सहज होय परी हे विरुद्धोक्ति(१८)। आतां तुष्यतु(१९)इया युक्ति । तात्पर्य(२०)निश्चिती घटों(२१)शके ॥३
एक सृष्टींत नाना ईश्वर । तेथचि होऊं पाहे लयोत्पत्तिसंकर(२२) ।
परी वाचस्पती प्रतिजीवसृष्टींत(२३) ईश्वर । एक एक साचार बोलती ॥४॥
म्हणोनी एक(२४) सृष्टिनियमन । एकचि ईश्वर करी आपण ।

*(१) सत्ताद्वय दृष्टिसृष्टिवादानुसार व सत्तात्रय सृष्टिदृष्टिवादानुसार (२) दोन्हीवादांचा विचार पाहता (३) दृष्टिसृष्टि हा पहिला अर्थ (४) परमेश्वराला सगुणपणा आणतो (५) दुसरा सृष्टिदृष्टिवाद (६) निर्गुण ब्रह्माचे ज्ञानाकरिता (७) पूर्णानुभवी (८) जन्मरहित (९) अविनाशी (१०) विकाररहित, कार्यरूपाला न येणारा (११) सृष्टीचे उत्पत्ति स्थितिलय (१२) परमेश्वराचेच ठिकाणी राहणारे पण सर्वदा न राहणारे लक्षण (१३) ईश्वर अनेक आहेत असा वाद (१४) वाचस्पति मिश्राच्या मताप्रमाणे (१५) प्रत्येक जीवाची (१६) सृष्टि भिन्न भिन्न असे मानले जाते (१७) प्रत्येक जीवाला (१८) वेदाच्या विरुद्ध म्हणणे (१९) दुष्टाच्या समाधानाकरिता म्हणून (२०) संगति (२१) होऊ शकते (२२) उत्पत्तिलयाचे मिश्रण (२३) प्रत्येक जीवाच्या सृष्टीत एकच ईश्वर (२४) एका सृष्टीचे शासन (१७क) नाना + ईश्वरप्राप्ति*

भिन्न सृष्टि ईश्वरासी(१) जाण । (य३-१५४) संबंध न घडे ॥५॥
आणि स्वप्नीं पंडिता जेंवी विद्या । तेंवी प्रतिजीवसृष्टि ईश्वरा(२) नव्हे अविद्या ।
हें तात्पर्य किंचिद्बोद्ध्या(३) । आलें तरी उपेक्ष्य(४) ॥६॥
यापक्षीं ईश्वरातें । ज्ञान स्वीकारिलें पुरतें(५) । तरी सर्वजीवावरी तयातें । स्वतंत्रतें(६) ठाव नव्हे ॥७॥

स्वस्वसृष्टींत[७] सर्वज्ञता । स्वस्वसृष्टींत स्वतंत्रता । येणें आली महज्जीवता[८] । गळीं तत्वतां सहजची ॥८॥
मग कोठें ब्रह्मज्ञानें मुक्ति । एखादा ईश्वर करील भलती स्थिती ।
किंवा सर्वेश्वर सृष्टिगत ईशा[९] नियती[१०] । एक तरी नियामकस्थिती[११] कवणाते ॥९॥
आणि तो एक मानिजे नियामकू । तरी तोचि ईश्वर होईल एकू । अन्यथाऽ[१२]नवस्थाभाकू[१३] । न चुके कदा ॥११०॥
म्हणोनि अनेकजीववादांतही । ईश्वर तो एकचि पाही ।
आणि प्रपंच तो तंव लवलाही । स्ववासनया[१४] भिन्न भिन्न ॥११॥
अथवा तत्कृत[१५]प्रपंच साधारण[१६]। सर्वजीववासनया[१७]समान[१८]।आसक्ति मात्र भिन्न । ते[१९]जननमरण[२०]भोगवी ॥१२॥
किंवा साधारण[२१] प्रपंचवृत्ति[२२] । साधारणऽसाधारणाऽ[२३]नासक्ती ।
तथा सुखदुःखप्रतीति । परी त्यजोनि आवृती[२४] हरी एकू ॥१३॥
एवं सत्तात्रयान्वयें[२५] । आतां दृष्टिसृष्टिअन्वयें[२६] । पाहतां तरी हें होय । उचितचि कीं ॥१४॥

*(१) दुसऱ्या सृष्टीचे नियमन करणाऱ्या ईश्वराशी (२) प्रत्येक जीवाच्या सृष्टीतील ईश्वराला (३) थोडेसे घेण्याजोगे (४) त्याज्य (५) पूर्ण (६) स्वतंत्रपणे नियम करणारा (७) आपआपल्या सृष्टीत (८) श्रेष्ठ जीवपणा (९) सर्व ईश्वराच्या सृष्टीतील ईश्वरांना (१०) नियमन शक्ति (११) ती नियमन शक्ति कोणाची मानावयाची (१२) नाहीतर (१३) अनवस्था दोषाची प्राप्ति (१४) प्रत्येक जीवाच्या वासनेनुसार (१५) परमेश्वराने केलेला (१६) एकच सर्वांचा (१७) सर्व जीवांच्या वासनेमुळे (१८) सारखा, एक (१९) आसक्ति (२०) जन्ममृत्यु (२१) सर्व सामान्य (२२) संसारस्थिति (२३) विशेष (ज्याची त्याची) (२४) आवरण, अज्ञान (२५) सत्तात्रय वादानुसार.(२६) दृष्टिसृष्टिवादानुसार*

प्रतिबिम्बापेक्षिक बिम्बारोपावच्छिन्न[२] । ब्रह्मातेंचि सहज ईश्वरपण ।
तो सर्वज्ञ सर्वशक्तिमान । परी जीवकल्पित[३] जाण कर्तृता[४] ॥१५॥
सैन्य घाई[५] राया[६]जय । तेंवी जीवरचनी[७] ईशाश्रय[८]। यालागीं कर्तृतादात्म्यप्रत्यय[९] । ईश्वरीं होय कर्तृत्वाचा[१०] ॥१६॥
यालागीं सर्गस्थित्यंतकर्ता[११] । हे जीवापेक्षीं[१२] परी उपासका भ्रांता[१३] ।
भासे आणि ज्ञानीदृष्ट्या[१४] पाहतां । हा अकर्ता अद्वयू ॥१७॥
अनध्यस्तविवर्तत्वें[१५] आम्हां । पातला देयावया प्रेमा । म्हणोनि श्रीकृष्णचरणगरिमा[१६]। नित्य नमावें सखियांनो ॥१८॥
हाचि कारण नाना अवतारा । देव स्तविती ज्या दिनोद्धारा[१७] ।
तो पाळावया विश्वविस्तारा[१८] । निर्विकारा[१९] आकृति ॥११९॥

*(२) जीवरूप प्रतिबिंबाच्या अपेक्षेने बिंब संज्ञेला प्राप्त झालेल्या (३) जीवाने कल्पिलेलीं (४) जगताच्या उत्पत्यादिकांचे कर्तेपण (५) सैन्यातील शिपायांनी प्रहार केले असता (६) राजाला (७) जीवाच्या उत्पत्ति करण्याला (८) ईश्वराचा आश्रय, सैन्यांतील योद्धे लढतात व तेच लढाई जिंकतात पण राजाने लढाई जिंकली असा राजावर जयाचा आरोप होतो त्याप्रमाणे जीव ब्रह्मांड उत्पन्न करितो पण ईश्वराने ब्रह्मांड निर्माण केले असा ईश्वरावर ब्रह्मांडाच्या कर्तेपणाचा आरोप होतो (९) कर्ता या शब्दातील अर्थाचे ऐक्य ईश्वराशी दिसून येते (१०) कर्तेपणाचा (११) जगताचे उत्पत्यादि करणारा (१२) जीवाच्या अपेक्षेने (१३) अज्ञानी उपासकाला (१४) ज्ञानाच्या दृष्टीने (१५) ब्रह्मज्ञानाने नाश न पावणारे शरीर धारण करून (१६) श्रीकृष्णाच्या चरणाच्या थोरपणास, श्रीकृष्ण चरण पूर्ण ब्रह्मरूप आहेत म्हणून (१७) दीनांचा उद्धार करणाऱ्याला (१८) या अफाट जगास (१९) शुद्ध ब्रह्मरूप*

॥ पद ॥

हा हा यदुकुलराय ॥ ध्रु.॥
ब्रह्म असूनि नवल वाटतें । याची यशुमति[०] माय ॥१॥
राजे जेव्हां करिति अधर्मू । तैं यज्ञनि[१] क्षेमाय[२] ॥२॥ (य३-१५५)
यातें पावावया स्मरिजे । अलकावतिपतिपाय[३] ॥३॥ ॥१२०॥
जेव्हा राजें अधर्मेंकरोनी । असु[४] पोषिती जनां मारुनी । तेव्हां परमात्मा कैवल्यदानी । सत्त्व[५] घेवोनि अवतरतो ॥२१॥
ननु याची[६] सत्त्वमूर्ति[७]। सर्वथा किंवा मिश्ररीती[८] । सर्वथा[९] म्हणावी तों आसुरांप्रती[१०] । कां हा श्रीपती मारितो ॥२२॥
जरी म्हणावें मिश्रसत्व । तरी पातलें[११] जीवत्व[१२] । महाराज! याचें तत्त्व । काय ते सत्वर कळवा जी ॥२३॥

तुझा प्रश्न आहे निका[१३] । परी हा पांडवपाठिराखा[१४] । शुद्धसत्त्वरूपें असोनि देखा । मिश्रसत्त्वसारिखा भासतो ॥२४॥
जरी असतें सत्त्व मिश्र । तरी मुक्त न होते मारिले असुर । यालागीं हा करुणाकर । शुद्धसत्त्वावतार बोलिजे ॥२५॥
परी आसुरांचा दुर्घट[१५]तमू[१६]। यालागीं तो निवटे[१७]हा सत्त्वधर्मू । परी या प्रभूतें रजतमू[१८]। कदा विभ्रमू[१९]असेना ॥२६॥
नाना सूर्य निवटी तमा[२०]। तेणें तमारिपणाची[२१]गरिमा[२२]।
परी केव्हांतरी किंचित्तमा[२३]। सूर्यप्रतिमा[२४]कायी मिळे[२५] ॥२७॥

*(०) यशोदा (१) ज्याचा जन्म (२) कल्याणाकरिता (३) श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे चरण (४) आपले प्राण (५) शुद्ध सत्वाचा आश्रय करून (६) परमेश्वराची (७) शुद्ध सत्व गुणाची मूर्ति (८) रजोगुण व तमोगुण यांचे मिश्रण ज्यात आहे अशा मिश्रसत्व गुणाची (९) अगदी शुद्ध सत्वाची मूर्ति भगवंताचा अवतार असतो असे म्हणावे तर (१०) राक्षसांना (११) येऊ पाहते (१२) जीवपणा, परमेश्वर जीव होऊ पाहतो (१३) योग्य (१४) पांडवाच्या पाठीशी राहून त्यांचे रक्षण करणारा (१५) दुर्धर (१६) तमोगुण (१७) नाहिसा करितो (१८) रजोगुण तमोगुणाचे बंधन (१९) भ्रम, संसाराविषयी सत्यबुद्धि (२०) अंधःकाराला (२१) अंधाराचा नाश करणारा अशी (२२) प्रौढी, मोठेपण (२३) थोड्या तरी अंधःकाराला (२४) सूर्य बिंब (२५) भेटे.*

आतां तम निवर्तवी म्हणून । सूर्या जरी आलें तमारिपण । तरी तें नाममात्रावीण[१] । स्वरूपें[२] प्रमाण असेना ॥२८॥
तेंवी निवटोनि निःशेष[३] अधर्मू । स्थापन होय परमधर्मू[४] । यालागीं हा पुरुषोत्तमू । सत्त्वसंभ्रमू[५] लोक म्हणती ॥२९॥
येऱ्हवीं हें सर्व नाममात्र[६] । परी हा परमात्मा स्वतंत्र । अनध्यस्तविवर्त[७] चिन्मात्र[८] । सुकुमारगात्र[९] केशवू ॥१३०॥
असो ऐसी जेव्हां जनीं । वाढे अधर्मराज्ञारजनी[१०] । तैं हा सज्जनमनदिनमणी[११] । अंधःकरणी[१२] निवारी ॥३१॥
'आयका यश श्री औदार्य । ज्ञान वैराग्य ऐश्वर्य । हे साही[१३] गुणवर्य[१४] । वसती जेथ' ॥ ज्ञाने.
तो यशें[१५] जन करी पुण्योत्तम[१६] । श्रीनें[१७] चालवी भक्तक्षेम[१८] । औदार्यानें सत्वपरम[१९] । दे मोक्षधाम[२०] ज्ञानानें ॥३२॥
वैराग्यें करोनि न कर्ता । ऐश्वर्यें[२१] योग[२२] चालविता । कवणेपरी जेथ न्यूनता[२३] । नाहीं सर्वथा समयत्रयीं[२४] ॥३३॥
तैं जग पाळी साच पैजे[२५] । उपदेशी ज्ञप्ति[२६] ब्रह्ममयी[२७] जे । अद्भुतकर्म[२८] गाती पै जे । दया सहजे त्यांजवरी ॥३४॥
निज निज कर्मांचीं फळें । जरी हा देतो सकळे । तरी वेदें[२९] सदुपदेशपीयूषगुरळें[३०] । येणें कळवळे दीधले ॥३५॥

*(१) शब्दमात्रावाचून (२) वस्तुतः, यथार्थतः (३) संपूर्ण (४) भक्तिमार्गरूपी (५) शुद्धसत्वाश्रय, सत्वाविर्भाव (६) शब्दमात्र (७) ब्रह्मस्वरूपाचे ठिकाणी अविरोधी व ब्रह्मज्ञानाने खोटा न ठरणारा व भिन्नासारखा पण अभिन्न भासणारा (८) केवल चैतन्यरूप (९) कोमलांग (१०) अधार्मिक राजाची रात्र (११) सत्पुरुषांच्या मनाला सूर्याप्रमाणे प्रकाश देणारा (१२) अंधःकार (१३) सहा (१४) श्रेष्ठ गुण (१५) कीर्तीने (१६) अत्यंत पुण्यवान् (१७) सौंदर्याने (१८) भक्तांचा क्षेम, प्राप्तीचे संरक्षण (१९) श्रेष्ठ शुद्धसत्व (२०) मोक्षरूपी ब्रह्मपद (२१) सामर्थ्याने (२२) जे अप्राप्त ते प्राप्त करून देणे (२३) कमीपणा (२४) तिन्ही काळी, भूत, भविष्य, वर्तमानकाळी (२५) पैज लावून (२६) ज्ञान (२७) ब्रह्मस्वरूपी (२८) ही अगाध लीला. (२९) वेदाच्या द्वारा (३०) कल्याणकारक उपदेशरूपी अमृताचे गुळणे.*

सर्वां सकृप[१] चक्रपाणी । परी जे बैसती कुहकसदनीं[२]।
ते आपणचि याचिया कृपाजीवनीं[३]। दैवें करोनी भिजतीना ॥१३६॥
'कैसे प्राप्तीचिये वेळे । निदैवा[४] आंधळेपणाचे डोहळे[५]' ।
तैसे जनांचे विषयकवळें[६] । हृद्‌ज्ञानडोळे[७] (य३-१५६) लोपती ॥३७॥
ऐसी युगीं युगीं मूर्ती । कृपेनें धरी हा जगत्पती । जैं जैं भक्त आठवती । तेव्हां श्रीपती प्रगटतो ॥३८॥
नामाग्नीनें[८] ज्यांचे समग्र । जळालें पैं अघतणार[९] । तो एतत्कृपामृतें[१०] सत्वर । भिजोनि भवपार[११] पावतो ॥३९॥
एवं सर्वावताररस्थिती[१२]। परी नवल कृष्णावताररीती[१३]। येथ मुख्यप्रयोजनप्राप्ती[१४]। वाढविणें प्रीति स्वीयांची[१५] ॥१४०॥
तें धन्य धन्य यदुकुल । जेथें जन्मला घननीळ । मज जन्मायोग्य[१६] हें स्थळ । ऐसें स्वयेंचि केवळ सत्कारी[१७] ॥१४१॥
धन्य पूर्ण तें मधुवन[१८]। जेथें क्रीडा करी जगन्मोहन ।
जो सृदिानंदारविंदलोचन[१९]। संसारमोचन[२०]म्हणती मुनी ॥१४२॥

*(१) दयाळु (२) कपटाच्या घरात (३) कृपारूपी पाण्यात (४) दुर्भाग्याला (५) इच्छा (६) विषयसुखाचे घास घेतल्याने,*

*विषयरूपी घासाने (७) हृदयातील स्वयंसिद्ध साक्षीज्ञानदृष्टि (८) नामरूपी अग्नीचे (९) पापाची झोपडी (१०) याच्या कृपारूपी अमृताने (११) संसारदुःखाच्या पलीकडे (१२) सर्व अवतारांची स्थिति (१३) कृष्णावताराचा प्रकार (१४) मुख्य उद्देशाची प्राप्ति (१५) भक्तांची. अवताराचे प्रयोजन दोन प्रकारचे आहे एक भक्तिप्रेम वाढविणे हे मुख्य व दुष्टांचा नाश करून सज्जनाचे संरक्षण करणे हे दुसरे गौण, श्रीकृष्णअवतारावाचून बाकीचे अवतार विशेषतः गौण प्रयोजनार्थ असतात पण श्रीकृष्ण अवतार मात्र विशेषतः मुख्य प्रयोजनार्थच आहे. (१६) जन्म घेण्याला योग्य (१७) गौरव करितो (१८) वृंदावन (१९) जो सृदिानंदरूप असून कमलासारखे ज्याचे डोळे आहेत (२०) संसारातून मुक्त करणारा.*

**॥ प्रियांगविक्षेपवृत्त ॥**

**नवल बरें का हे सखियांनो । स्वरयश[१] जेथें तुच्छचि मानो ।**
**महीवरि शोभे द्वारवती[२] ही । सुरवर[३] जेथें राबति देही[४] ॥१४३॥**
**हरिकरुणेनें आपण धन्य । इति मनीं भावें[५] भाविति[६] मान्य[७] ।**
**सकळही लोकां आवडि साची । गणति[८] न सेवे[९] रातदिसाची[१०] ॥१४४॥**

**॥ ओव्या ॥**

**जो स्वयें आत्मयाचाचि[११] पालक । नव्हे इतर पित्रादिसम[१२] दैहिक[१३] । तयाचें प्रजा तल्ललित सस्मित मुख[१४]।**
**जाणोनि अनुग्राहक[१५] लक्षिती[१६]॥४५॥**
**त्या धन्य रुक्मिण्यादि वनिता[१७] । ज्या कृष्णसमुद्रीं[१८] परमसरिता[१९] । श्रीकृष्णघनवर्षणीं[२०] सर्वथा ।**
**ज्या अवनिता[२१] पावल्या ॥१४६॥**
**बहुजन्में अर्चिला[२२] देवो । तयाचें फळ हें पहा हो । जो जगदात्मा आदिदेवो । तो वासुदेवो कांत[२३] जया ॥४७॥**
**जयाची पाहूनियां कांती[२४]। कोटि रतिकान्ताही[२५]खंती[२६]। तयाचे पावतां संक्रांती[२७]। पद क्षाळिती[२८] स्नेहवशें[२९] ॥४८॥**
**जो पाय नसोनि करी गमन[३०] । त्याचें करिती पदक्षालन[३१] ।**
**जो हात नसोनि करी ग्रहण[३२] । तो पाणिग्रहण[३३] करी ज्यांचें ॥१४९॥**

*(१) स्वर्गाची कीर्ति (२) द्वारका (३) इंद्रादि देव (४) देहधारण करून (५) प्रेमाने (६) मानिती (७) श्रेष्ठ पुरुष (८) संख्या (मोजणी) (९) सेवेमध्ये (१०) रात्र व दिवस यांची (११) जीवांचा (१२) पित्यादिकाप्रमाणे (१३) देहासंबंधी (१४) त्याचे सुंदर व सुहास्य वदन (१५) कृपा करणारे (१६) डोळे भरून पाहती (१७) स्त्रिया (१८) श्रीकृष्ण हाच कोणी समुद्र त्यात (१९) श्रेष्ठ नद्या (२०) श्रीकृष्णरूपी मेघाचा वर्षाव झाल्यामुळे (२१) पृथ्वीवर प्राप्त झाल्या (२२) पूजिल्या (२३) पति (२४) सौंदर्य (२५) मदनाला (२६) विषाद, दुःख (२७) समागम (२८) धुतात (२९) प्रेमाने (३०) जाणे (३१) पाय धुणे (३२) घेणे (३३) हातात हात धरणे, वरणे*

**जया न वस्तुस्थानवेला[१]। न पवति जया क्रिया बहुला[२]। तो ज्यांचियासह[३]बहुला[४]। लीलया[५]वहिला आरोही[६]॥१५०**
**जयाचा कोणी नव्हे धर[७] । यालागीं बोलिजे अधर[८] । अंतर्यामि[९] सर्वेश्वर[१०] । अमृत[११] निर्धार श्रुति म्हणे ॥५१॥**
**जो अधर तोचि अमृत । यालागीं बोलिजे अधरामृत । परी अधरीं मिळवावया निश्चित । पावला अमृतऽधरसदृशीं[१२] ॥ ५२॥**
**तें अधरामृत[१३]सेवुनी । ज्या अमृतचि[१४]जाहल्या मनीं । (य३-१५७)**
**तुह्मी सकळही कामिनी[१५]। त्यांसी जाउनी सख्य करा ॥५३॥**
**जरी प्रभूचें अधरामृत । तुह्मा असेल अपेक्षित[१६]। तरी रुक्मिण्यादि भगिनी समस्त । गुरुत्वें[१७] निश्चित भजा वो ॥५४॥**
**पूर्वी अधरामृत सेवुनी । अधरामाजीं[१८] राहुनी । पतिपुत्रांचे चपेटे[१९] साहुनी । व्रजकामिनी लुब्धल्या[२०] ॥१५५॥**
**त्या व्रजस्त्रियांचें चरणपाणी[२१] । पिऊनि हरिकरीं[२२] दिधलें पाणी[२३] ।**
**यालागीं धन्य त्या कृष्णकामिनी[२४] । ज्या हें चिंतिती मनीं त्याहि धन्य ॥५६॥**
**श्रीकृष्ण एक कुमुदिनी[२५] । तेथ आदौ[२६] भृंगी[२६] व्रजकामिनी[२७] ।**
**तदुच्छिष्टसेवका[२९] कृष्णपत्नी[३०] । तत्प्रसादधारिणी[३१] होऊं चला ॥५७॥**

*(१) वस्तुपरिच्छेद, देशपरिच्छेद व कालपरिच्छेद (२) पुष्कळशा (३) ज्यांच्याबरोबर (४) बोहल्यावर (५) प्रेमाने (६) चढतो (७) आधार (८) निराश्रय, आश्रयरहित (९) सर्वांच्या आंत राहणारा (१०) सर्वाचा नियंता (११) अविनाशी (१२) अधराच्या रूपाला, ओठाच्या स्वरूपाला (१३) चुंबनाचा आनंद (१४) ब्रह्मरूप (१५) स्त्रिया (१६) इच्छित (१७) गुरुरूपाने*

*(१८) अधर म्हणजे ज्याला दुसऱ्याचा आधार नाही अशा परमेश्वराचे ठिकाणी राहून किंवा अत्यंत दीन होऊन (१९) आरोप, छळ (२०) आसक्त झाल्या (२१) चरणतीर्थ (२२) श्रीहरीच्या हातात (२३) हात (२४) श्रीकृष्ण स्त्रिया (२५) चंद्रविकासी कमल (२६) प्रथम (२७) भ्रमरी (२८) व्रजस्त्रिया (२९) त्या व्रजस्त्रियांचे उच्छिष्ट सेवन करणाऱ्या (३०) रुक्मिण्यादि कृष्णस्त्रिया. (३१) त्यांचा कृपाप्रसाद धारण करणाऱ्या*

कीं मिळोनि गंगेचिया ओघा[२] । सागरीं गमन ओहळ[३] क्षुल्लगा[४] ।
तेंवी वृंदावनीं कामिनी पिंगा[५] । चिंतोनि हरिअंगसंगा[६] पाविजे ॥५८॥
एवं व्रजयुवतींचा त्यागू[७] । आणि तयां आवडता श्रीरंगू । हे पावोनि स्त्रीकलाप[८] अभंगू[९] । करी संगू श्रीहरीचा ॥५९॥
एकीनें जावोनि अंबालयीं[१०]। वरिली मूर्ति गोपीप्रसादमयी[११]। सोडुनी बंधू बाप आई । आली आलयीं[१२]आनंदें ॥६०॥
एकीनें सोडोनि तीर्यग्योनी[१३]। जीवेंभावें लागली चरणीं । तो तियेचा भाव जाणुनी । जीस स्त्रीत्वा[१४]आणि श्रीकृष्णू ॥६१॥
आंदण घेवोनि स्यमंतका । तंव अकस्मात पातली एका ।
जियेचिया बापें उपकार निका । स्मरोनि निष्कलंका समर्पिली ॥६२॥
एक पाहोनि अनुष्ठानी[१५] । निकें वरी चक्रपाणी । एक चौघे बंधू अव्हेरुनी[१६] । लागली चरणीं आनंदें ॥६३॥
एकीसाठीं भेदोनि[१७]पण[१८]। आवडी करी हरि करग्रहण[१९]। तैसा दुसरीचाही पण । भेदोनि[२०] अर्धासन[२१] दीधलें ॥६४॥
असो ऐसी नानारीती । सोळासहस्त्रही युवती । एक्याचि लग्नें वरी श्रीपती । परी एकपत्नित्वस्थिति[२२]भंगेना[२३] ॥६५॥
नाना रूपें घेवोनि हरी । भोगोनि राहिला ब्रह्मचारी । हें असो परी तितुकी निर्धारी । सृष्टी निर्मिली सामर्थ्ये ॥६६॥

*(२) प्रवाहाला (३) ओढा (४) अत्यंत लहानसा, क्षुल्लक (५) नाच, क्रीडा (६) श्रीकृष्णाच्या समागम सुखाला (७) विषयविरक्ति (८) स्त्रीसमुदाय (९) अखंड (१०) देवीच्या देवळात (११) गोपीवर कृपा करणारी (१२) घरी (१३) पशुयोनी (१४) आपल्या स्त्रीपणास, आपली स्त्री केली (१५) तप करीत असलेली (१६) सोडून, त्यांचा त्याग करून (१७) वेधून, बाणाचां वेध करून (१८) अट, मर्यादा (१९) विवाह (२०) पाळून (२१) लग्न लावले (२२) एकच पत्नीशी संबंध असणे (२३) मोडली नाही.*

एवं वधोनि चैद्य[१] अनंत । ज्याचे प्रद्युम्न सांबादि सुत । आणि नरकासुर मारोनि निश्चित । ज्या समस्त आणिल्या ॥६७॥
या सकळही जयाच्या स्त्रिया । चुंबन देती म्हणोनि प्रिया । ज्यांची श्रीकृष्णैकचर्या[२] । परम आर्या[३] ज्या झाल्या ॥६८॥
येऱ्हवीं तरी स्त्रियांचें जिणें । अस्वतंत्र[४] लाजिरवाणें[५] । अशौचाचें[६] (य३-१५८) ओळखणें । भांडारचीं[७] ॥६९॥
परी समुद्राचें क्षारपण[८]शोभेचि जेंवी रत्न[९]म्हणून ।
तेवी श्रीकृष्णकांत[१०] हृदयीं[११]पूर्ण । यालागीं ऐसेंही स्त्रीपण शोभे ॥१७०॥
नातरी देहीं पाहतां स्पष्टा[१२] । दिसे पूयशोणिन्मांसविष्ठा[१३] । परी शोभवी ब्रह्मनिष्ठा[१४] । जेंवी उत्कृष्टा गुरुत्वें[१५] ॥७१॥
तेंवी अशुची[१६] अस्वतंत्र[१७] । ऐसिया[१८]स्त्रीत्व जरी पात्र ।
परी हृदयीं धरितां कोमलगात्र[१९]। शोभा विचित्र आली तया ॥७२॥
आणि ओहोळ[२०] गंगेसी मिळे । तैं अशुचित्व[२१] गळे[२२] सगळें । परी पाणीपण तों केवळें । जैसें तैसें ॥७३॥
तेंवी मिळतां भगवंतीं । गळोनि स्त्रियांची अशुचिस्थिति[२३] ।
राहिल्या होवोनि केवळ भक्ति[२४] । जेंवी व्रजयुवती[२५] गोकुळीं ॥७४॥
वेचोनि[२६] पराक्रम[२७] धन । जिया आणिलिया जिंकोन ।
त्याहींच पुढतीं प्रेमेंकरून । केला आधीन[२८] निजकांतू[२९] ॥७५॥
प्रेम मांदूस[३०] करून । आंत ठेविलें कृष्णधन । तें उघडें राजपथीं[३१] भोगितां जाण । न नेती चोरोन तस्कर ॥७६॥

*(१) शिशुपाल (२) ज्याचे संपूर्ण व्यवहार श्रीकृष्णपरायणच होते (३) साध्वी, पतिव्रता (४) पराधीन (५) हीन, लाज उत्पन्न करणारे (६) अमंगलपणाचे (७) माहेरघर (८) खारटपणा (९) नाना प्रकारची रत्ने त्यात असतात म्हणून (१०) श्रीकृष्ण पति (११) अंतःकरणात (१२) उघड (१३) पू, रक्त, मांस, मल (१४) ज्ञानीपण, मुक्तिस्थिति (१५) गुरुपणाने (१६) अशुद्ध, अमंगल (१७) पराधीन (१८) अशा गोष्टीला, स्थितीला, लक्षणाला (१९) कोमल शरीर आहे ज्याचे असा श्रीहरी (२०) ओढा (२१) अशुद्धपणा (२२) नाहिसे होते (२३) अमंगलपणा (२४) भक्तिरूप (२५) व्रजातील गोपी (२६) खर्च करून*

*(२७) शौर्यरूपी धन (२८) आपल्या स्वाधीन (२९) आपला पति श्रीकृष्ण (३०) मूस, पेटी (३१) रहदारीच्या भर रस्त्यावर.*

**तें उघडें राजपथीं[३१] भोगितां जाण । न नेती चोरोन तस्कर[१] ॥७६॥**

**ऐशा उघड महाधनिका[२]। अष्टसिद्धि जियांचिया पायिका[३]। त्या रुक्मिण्यादि सकळिका । जेंवी गोपिका तेंवी नमो ॥७७॥**

**॥ दोहा ॥**

**हें वनितांचें[४] स्तवन[५] जें श्रवण[६] पठन[७] अविकार[८] । करिती होउनि सूत म्हणे ते पावति भवपार[९]॥७८॥**

**॥ ओव्या ॥**

**एवं वदत स्त्रिया । अवलोकिती[१०] यादवराया । प्रभूही कृपादृष्टी पाहोनियां । पातला लवलाह्या स्नेहवशें[११] ॥७९॥**

**परी ममैवांसौ[१२] इया भक्ती । नेणो कृष्णा होईल भीति[१३]। म्हणोनि चतुरंग[१४]सैन्य देती । युधिष्ठिरादि स्नेहवशें ॥१८०॥**

**जें जातो शार्ङ्गधर । म्हणोनि परम विरहातुर[१५] । कीं वियोगें प्रेम राहील निरंतर । विरहातुर म्हणोनि वा ॥८१॥**

**ऐसें चालतां चालतां दूरी । प्रेमें पांडव आले हें हरी । जाणोनि तयां सांतवोनि[१६] घरीं । परतवोनि स्वनगरीं निघाला ॥८२॥**

**॥ संस्कृत गद्य ॥**

**ततः[१७]कुरु-जांग-पांचाल-शूरसेन-ब्रह्मावर्त-कुरुक्षेत्र-मत्स्य -सारस्वत-मरु-सौवीर-आभीरान् देशान् अतीत्य आनर्तसमीपे प्राप्तस्तत्रत्यैर्ज नैस्तत्र तत्र पूजितः सन् रथाद् अवतीर्य सायं संध्यामुपासितवान् ।** (य३-१५९)

**॥ श्लोक ॥**

**एवंविधानि[१८] कर्माणि मत्प्रियस्य महात्मनः । श्रुतानि श्रूयतामग्रे ज्ञानेश्वरकृपालवात् ॥१८३॥**

*(१) चोर (२) अतिश्रीमंत (३) दासी (४) स्त्रियांनी केलेली (५) स्तुति (६) ऐकतील (७) स्वतःवाचतील (८) निर्मळ अंतःकरणाने (९) संसार तरून जातात (१०) पाहिली (११) प्रेमामुळे (१२) ज्या भक्तीत परमेश्वराला मुलगा समजून प्रेम केला जातो त्या वात्सल्य भक्तीने (१३) मध्येच एकादे संकट येईल अशा समजुतीने (१४) चार प्रकारचे (१५) अत्यंत वियोग, दुःखाने व्याकुळ (१६) समाधान करून (१७) गद्याचा अर्थ - नंतर कुरु, जांगल, पांचाल, शूरसेन, ब्रह्मावर्त, कुरुक्षेत्र, मत्स्य, सारस्वत, मरु, सौवीर, आभीर इत्यादि नानादेश ओलांडून भगवान् आनर्त देशाजवळ आले. प्रत्येक ठिकाणच्या लोकांनी भगवंताची पूजा केली, नंतर भगवान् रथाखाली उतरून सायंसंध्या करावयास बसले (१८)*

*श्लोकार्थ - अशाप्रमाणे समर्थ व थोर अशा माझ्या प्राणपतीची नाना प्रकारची लीला तुम्ही ऐकलीच आहे व पुढेहि आणखी श्रीज्ञानेश्वरप्रभूच्या कृपेने ऐका.*

**हरिः ॐतत्सत् श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरकृपाप्रसादे नानाछंदबद्धे**

**गद्यपद्यान्विते प्रियलीलामहोत्सवे आमंत्रणविलासे श्रुतिमनोहरस्त्रीस्तवादिनिरूपणं[१] नाम दशमसखीप्रेषणम् ।**

**॥ श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ॥**

०००

# सखीप्रेषण ११ वें. विषयानुक्रम

*(श्रीकृष्णाचा स्वपुरप्रवेश, द्वारकस्थ प्रजाजनांनीं केलेलें स्तवन, श्रीकृष्णस्त्रियांचा भगवद्विषयक प्रेम, व भूतकार्यरहित स्वलीलामय मायाशरीरधारी भगवद्वारणसेवेचा नित्यनूतनप्रकार वर्णन.१६०-२०३)*

*मंगलाचरण :- हरिहरस्तवन व हरिभजन उपदेश. १६०. एकादश प्रेषणांतील विषय संक्षेपतः कथन. १६१. द्वारका प्रदेशांत आल्यावर श्रीकृष्णानें केलेला शंखनाद व शंखाचें वर्णन. शंखनाद ऐकून प्रजाजनांचें सामोरे येणें व भेट अर्पण करून त्यांनीं प्रसन्न मुखानें केलेलें भाषण. १६१. गुरु, माता, प्रिय आदिकरून भावना श्रीकृष्णाचे ठिकाणीं स्वानुभवानें पूर्ण करून प्रजाजनांनीं देह, जीव व आत्मबुद्धीनें त्याचें केलेलें स्तवन. १६२ प्रजाजनांचें देव व भाग्याहून स्वभाग्याधिक्य वर्णन. १६३ सुखरूप परमेश्वराला नमन. प्रभूच्या वियोगामुळें प्रजाजनांस एक एक पळ कोटी वर्षासमान गेला. **शंका :-** दृष्टिसृष्टिसिद्धांतानें, बाहेर गेला असतांनां वा दृष्टि आड झाला असतानां मृत समजावा आणि भक्तींत तर भगवंताचा नाश इष्ट नाहीं. मग प्रजाजनांना जो पळ पळ कोटी वर्षासमान भासला तो भगवंताच्या मरण प्रत्ययामुळें कीं काय? १६३. **समाधानः-** मूळांतील 'यर्हि' पदाचा अभिप्रायकथनपूर्वक दृष्टिसृष्टिवादाला धरून केलेल्या शंकेचें दोन रीतीनें उत्तर :- (१) **अनध्यस्तविवर्त परमेश्वराचे ठिकाणीं दृष्टिसृष्टि स्वीकृत नाहीं** म्हणून श्रीकृष्णगमन द्वारकावासी जनांना मरणप्रत्ययबोधक झालें नाहीं व त्यांच्या भक्तीचा छेदही घडला नाहीं. (२) अथवा दृष्टिसृष्टिस्वीकृत स्वगोचर विद्यामय भगवच्छरीराचा किंवा श्रीमधुसूदनमताप्रमाणें प्रेम्णैकत्वेऽपि पृथगिवानंदभानरूपी भगवच्छरीराचा व्ययप्रत्यय संभवनीय नसल्यामुळे अत्युत्कट भक्तीनें साक्षात् संयोगी वा वृत्तिमात्र संयोगी वियोगोपलालन प्रेमास्तव पल कोटिवर्षसम वाटण्याची शक्यता १६४ श्रीकृष्णाचा द्वारकेंत प्रवेश. द्वारकानगरीचें वर्णन १६४-१६५ नगरींत श्रीकृष्णाचें आगमन ऐकून (य३-२३) वसुदेव अक्रुर उग्रसेनादिकांचें समारंभानें सामोरें जाणें. श्रीकृष्णानें सर्वांचा केलेला सम्मान. गुरुविप्रवृद्धादिकांचा आशीर्वाद ग्रहण करीत राजमार्गानें गमन करीत असतांना श्रीकृष्णाचें मंदिरारूढ पुरस्त्रियांनां दर्शन. द्वारकावासी स्त्रीपुरुषांची धन्यता व नित्य अच्युतदर्शन घेत असूनही त्यांच्या नयनाची अतृप्ति. शंका :- विषय आपात रमणीय असून व साकार श्रीकृष्ण स्वतःविषयच असून त्याच्या दर्शनानें द्वारकावासी जन तृप्त कां झाले नाहींत ? १६५ समाधानः- भगवंताला विषय म्हणण्याचा निषेध. विषयांची तुच्छता व विषयांहून आपल्या आवडीची श्रेष्ठता. भगवच्छरीराची अनध्यस्त विवर्तता व वैराग्यपूर्वक श्रीगुरुभजनाचा उपदेश १६५-१६६ भगवन्माहात्म्यवर्णन व त्याच्या हृदयालिंगनानें कामपूर्ति होऊन जीवपणाचा नाश १६६ आतपत्रव्यजनादिकांनीं व मार्गातील पुष्पवृष्टीनें दिसणारी श्रीकृष्णाची शोभा व त्याचें पितृगृहीं जाऊन देवकीप्रमुख मातांनां वंदन १६६ वंदनाभिप्रायकथन १६७. देवक्यादि मातृवर्गांचे पातिव्रत्य ओज व शुद्धबुद्धि निरूपण. ''स्नेहस्नुतपयोधराः'' पदाचा भाव निरूपण. भगवंताचें स्वगृहाप्रत गमन . श्रीकृष्ण देशांतरास गेले असतां त्यांच्या स्त्रियांनी आचरलेलें द्वादशमासिक व्रत निरूपण १६७ श्रीकृष्णाला दुरून येतांनां पाहून त्यांच्या स्त्रियांची झालेली स्थिती १६८ पति ग्रामीं नसतां स्त्रियांनीं कसें वागावें याविषयीं याज्ञवल्क्यवचन व तदनुसार श्रीकृष्णपत्न्यांचें आचरण. कृष्णदर्शना पूर्वी त्यांची भगवदाकारवृत्ति व अन्वयव्यतिरेक ज्ञान १६८. **शंका :-** अन्वयानें जग ब्रह्मरूप पाहणाऱ्या श्रीकृष्णपत्न्यांस हाच एक श्रीकृष्ण आपला पती असें वाटून ''पतिव्रता नेणें आणिकांची स्तुती' या तुकाराम वचनाप्रमाणें पतिव्रता धर्म कसा रक्षण करतां आला? १६९ **समाधान :-** शंकेस्तव शिष्याचा सरोष निषेध. श्रुतिस्मृति प्रमाणानें श्रीकृष्णालाच पतित्व व इतर जगाला स्त्रीत्व. अन्वयानें जग परमेश्वरच आहे तथापि वर्तन यथायोग्यच संभवते याविषयीं नाना दृष्टांतपूर्वक निरूपण १६९- ७०. अनंत जन्मीच्या धर्माचरणामुळें संभवणारें ब्रह्मज्ञानीयाचें धर्मयुक्तच वर्तन व निषिद्धाचरणाची निंदा १७० श्रीकृष्णपत्न्यांचें सगुण (य३-२४) प्रेम व भगद्वारणाची नित्यनूतन स्थिती निरूपण १७०-७१ कुतर्काबद्दल शिष्याचा पुनर्निषेध कैमुतिकन्यायानें भगद्वारणाचा सुंदरपणा वर्णन १७१ श्रीकृष्णाच्या भूमिभारउतारण प्रयोजनाचें आनुषंगिकत्व व **शस्त्र हातीं न घेतां परस्पर द्वेष उत्पन्न करून असतांचा संहार. शंका-** संतांच्या ठायीं द्वेषवृत्ति सर्वथा नसतां श्रीकृष्ण ती कशी उत्पन्न करूं शकेल? **समाधान :-** वस्तुतः द्वेषवृत्तीची दुर्जनांचें ठायीं उत्पत्ति व तीमुळें त्यांचाच नाश. सज्जनांस ईश्वराचें सहाय्य असल्यामुळें दुर्जनद्वेषानें त्यांचा अनभिभव १७१-१७२ भक्तियोषित्कदंबीं रमण हें भगवंताचें मुख्य प्रयोजन १७२ श्रीकृष्णाचें शरीर भूतकार्य असून धर्माधर्मजन्य आहे म्हणून श्रीकृष्ण हे जीव आहेत व रज्जुकृत बंधनाभावशक्ति त्यांचें ठिकाणीं योगानें आल्या आहेत ह्याच्या सिद्ध्यर्थ प्रति पक्षाचे चार आक्षेपः- (१) अनुगीतापर्वांत श्रीकृष्णानें आपल्याच मुखानें मला ज्ञान व ऐश्वर्य योगानें आलें होतें असें कबूल केलें आहे. (२) मोक्षधर्मांत ''या नारायणाच्या शरीराची ईश्वराच्या आठव्या अंशापासून उत्पत्ति*

*असून तें कल्पांतीं परिवर्तते असें भीष्माचार्यांनीं म्हटलें आहे व 'परिवर्तते' म्हणजे नाश पावतें असा चतुर्धराचार्यांनीं अर्थ केला आहे. (३) योग वार्तिकांत विज्ञान भिक्षूंनीं वामनादि अवतार शरीरांचा प्रकृत्यापूरणानें विश्वरूपादि परिणाम त्यांच्यायोगैश्वर्यास्तव सांगितला आहे व तें प्रकृत्यापूरण धर्माधर्मादि सापेक्ष बोलिलें आहे. (४) 'तान्यहंवेदसर्वाणि' या श्लोकांत श्रीकृष्णांनीं सांगितलेली सर्वज्ञता मधुसूदन स्वामींनीं समष्टि जीवांविषयीं सांगितली आहे व दृष्टिसृष्टिवादांत ह्यावांचून निर्वाहही लागत नाहीं. आनंदगिरीनेंही मांडुक्यभाष्यटीकेंत असेंच म्हटले आहे १७२ ते १७३ समाधान :- १ ल्या आक्षेपाचें उत्तर - अर्जुन पूर्ण होता असें आपले मत असूनही पुढें आलेल्या वाक्यानुसार विचार करण्याची आवश्यकता १७३ 'माझें शरीर मायामय असून माझें जन्मकर्मही दिव्य आहे' असें भगवंताचें गीतेंतील वाक्य व भगवच्छरीर भूतमय नाहीं असा भाष्यकारांनीं त्याचा केलेला अर्थ. ह्या वचनांच्या अनुसार अनुगीतावचनाचा विचार १७३-१७४ योगियांच्या शरीराचें (य३-२५) शुक्लकर्मजन्यत्व. योग मोक्षेच्छा साध्य असल्यामुळें योगियांनां जीवत्वापत्ति व मोक्षेच्छा परमेश्वराचे ठिकाणीं संभवत नसल्यामुळें त्याचें शरीर योगजन्य नाहीं अतएव तें भूतकार्य नाहीं. १७४ भगवद्गीता वचनाचा अनुगीतेंतील वचनानें अभिभव होण्याची अशक्यता १७४-१७५ भगवद्गीतावचनानें अनुगीतावचनाचा अभिभव निरूपण :- १७५ भगवद्गीतेंतील वचनाची मुख्यता व अनुगीतेंतील वचनाची गौणता. स्वमताप्रमाणें अनुगीतावचनाचा अभिप्राय, ''तूं आतां लवकरच द्वारकेंत जाणार'' या अनुगीतावचना वरून अर्जून श्रीकृष्णाचें ईश्वरत्व विसरला होता असें ग्रहण व यावरून* ***ज्ञान सांगणाऱ्या सद्गुरूचे ठिकाणीं मूर्ख शिष्यांनां अतिपरीचयास्तव होणारी जीवबुद्धी व त्याला श्रमात्मक उपदेश करण्याची आवश्यकता.*** *मूळ अनुगीता वचनावरून परमात्म्याचें सर्वदा युक्त योगित्व. युंजानयोगी व युक्तयोगी यांचीं लक्षणें ''तस्मात्सर्वेषु कालेषु योगयुक्तो भवार्जुन'' या भगवदाज्ञेचा अर्जुनानें केलेला अवमान १७५ जो वेदाज्ञा पालन करीत नाहीं त्याला त्याच्या आज्ञाभंगरूप कर्माचें मिळणारें फळ १७६ भगवदाज्ञाभंगाचा अर्जुनावर परिणाम व आपले ठिकाणीं अर्जुनाची जीवत्वबुद्धि पाहून अनुगीतेंतील वाक्य श्रीहरीनें उ्च्चारलें असा अभिप्राय १७६ तातांनीं अर्जुनाची प्रशंसा केली असल्यामुळे अर्जुनाला विस्मृति संभवनीय नाहीं असें मानल्यास अनुगीतेंतील वाक्याची विसरलेल्या शिष्याकरितां योजना, भगवद्गीतेंतील वाक्याचें परमार्थ प्रसंगोचितत्व आणि अनुगीतेंतील वाक्याचें व्यवहार प्रसंगोचितत्व व भगवद्गीतेंतील वाक्यानुसार अनुगीतेंतील वाक्याचा समन्वय.*

*२ ऱ्या आक्षेपाचें उत्तर :- इतिहासपुराणांचा सारखेपणा असल्यामुळें महाभारतवचनाबरोबर* ***''स कृष्णः क्वा ापि नो गतः''*** *या पद्मपुराणांतील वाक्याचा समन्वय करण्याची आवश्यकता. भगवंताचें शरीर मायामय असून नित्य आहे असें चतुर्धराचार्यांचें मत व प्रलय कालीं भगवच्छरीराच्या नाशाचा असंभव १७६ भगवन्मायेचा प्रलयकाली लय मानल्यास येणारी अनर्थपरंपरा निरूपण व भगवच्छरीराची नित्यता सिद्धि १७७ नराच्या दृष्टांतानें भगवंताच्या शुद्धमायामय शरीराची (य३-२६) भगवद्भक्तांनां व सृष्टिकार्यार्थ देवांनां भिन्न भिन्न होणारी प्रतीति १७७-१७८ देवकार्यप्रतिबंध निवृत्त झाल्यावर सृष्टैतीह दृष्टीनें भगवच्छरीर तिरोभूत होत असल्यानें त्या शरीराचा नाश झाला अशी कर्मी पुरुषाला होणारी बुद्धि व तदनुसार मोक्षधर्मवचनाची व भारत भागवतांतील श्रीकृष्ण निजधामगमन कथेची व्यवस्था व भगवद्भक्तांच्या दृष्टीनें पद्मपुराणांतील वचनाची व्यवस्था १७८ आक्षेपांतील मोक्षधर्मवचन श्रीकृष्णाला लागू न होण्याचें कारण व श्रीकृष्ण परमात्मा भक्तांनां अझूनही प्रतीत होतो याविषयीं नामदेवाचें वचन व स्मृतीचें प्रामाण्य. श्रीकृष्णाच्या लघुमूर्तीला चतुर्धराचार्यांनीं दिलेला फलाचा दृष्टांत व त्याला तातवचनाची सम्मती १७८ ही भगवन्मूर्ती नित्य आहे असें तातांचें वचन १७९ तिसऱ्या आक्षेपाचें उत्तर :- पंडितांनीं (निश्चलदास) लिहिलेल्या हिंदी टिकेवरून आक्षेपांतील विधानाचें अनुमान असावें असें ग्रंथकाराचें मत. पंडित उदासी मताचें असल्यामुळें विज्ञानभिक्षूच्या म्हणण्याचा त्यांनीं केलेला विपर्यास. विज्ञानभिक्षूच्या म्हणण्याचा समन्वय. विज्ञानभिक्षूहून भाष्यकारांचें अधिक प्रमाण्य. परमेश्वर संकल्पानें प्रकृत्यापूरण होतें म्हणण्यापेक्षां भगवत्संकल्पमयच भगवच्छरीर आहे या म्हणण्यांत परमेश्वराचें अधिक स्वातंत्र्यद्योतन व भाष्यकारादिकांच्या वचनाची अधिक ग्राह्यता १७९ चवथ्या आक्षेपाचें उत्तर :- १८० मधुसूदन स्वामींच्या विद्येची प्रशंसा व त्यांच्या ग्रंथांतील वचनांचें परस्पर विरोध वैचित्र्य. १८० मधुसूदन स्वामींनीं स्मृतिपुराणोक्त भक्तीचा श्रुतीनें केलेला बाध. १८१ 'यं सर्वे देवा नमन्ति' या श्रुतीची व* ***'मुक्ता अपि लीलया विग्रहं कृत्वा भजंते'*** *या भाष्यकार वचनाची वाट वरील प्रतिपादनांत न लागल्यामुळें स्वामींच्या मुक्तिप्रतिपादक निरूपणाचें वैय्यर्थ्य. ही भक्ति खंडन करण्याची लहर स्वामीला नेहमींच नव्हती या विषयीं गूढार्थ दीपिकेतील ''ध्यानाभ्यासवशीकृतेन मनसा'' या श्लोकाचें प्रमाण व मुक्तीच्छा स्वामीला एखादे वेळींच असते असा निष्कर्ष. १८१. श्रुतिस्मृतींवरून व स्वामींच्या कांही वचनांवरून दृष्टिसृष्टिवादांतही परमेश्वर शरीराची व परमेश्वर भक्तीची व्यवस्था (य३-२७) लागते यावरून अद्वैतसिद्धींतील स्वामींच्या वचनाचे निरूपयोगित्व.*

१८२ अवताराविषयीं प्रमाण असलेल्या श्रुतींचा निर्देश व केन श्रुतीवरील शांकर भाष्य. १८२ शंका - ''स एकधा भवति त्रिधा भवति'' इ. छांदोग्य श्रुतीचा अर्थ आचार्यांनीं शारीरक भाष्यांत ईश्वरपर लाविलेला असून छांदोग्य भाष्यांत याचा श्रुतीचा अर्थ उपासकपर लाविला आहे म्हणून मधुसूदनांच्या म्हणण्याप्रमाणें समष्टिजीवच ईश्वर होऊं शकतो. १८२-१८३ समाधानः- सर्व कल्पांत सृष्टि करण्याला समष्टिजीव नित्य सन्निहित राहूं शकत नाहीं. शारीरक भाष्यांचें न्यायानुगृहीततत्व व बृहदारण्यक भाष्याचें विद्यास्तुतिपरत्व. न्यायानुगृहीत भाष्याचें अधिक प्रामाण्य. दोन्ही भाष्यांचा समन्वय, ईश्वराची बिंबभूतता व अवतार शरीराचे मायामयत्व. १८३ शंका- उक्त प्रयोजनांच्या सिद्धिकरितां शारीरावश्यकता. शरीर पुण्यपापें करून उत्पन्न होत असल्यामुळें त्याचें भूतकार्यत्व. तसें शरीर भगवंताला मानलें असतां जीवत्वप्राप्ति व निषिद्ध कर्माचा भोग. अथवा बह्मज्ञानी जीव असल्यामुळें भोग होणार नाहीं तथापि ज्ञानी पुरुषाला यथेष्टाचरणाचा निषेध व तो निषेध मानला नसतां बद्धापुढें गुणगान करण्याला त्याची अपात्रता. समाधानः- परमेश्वराचें शरीर भूतकार्य नसून मायामय आहे कारण :- (१) भगवद्गीतेंत व तिच्या भाष्यांत तसें म्हटलें आहे. (२) रज्जुकृतबंधनाभावादिक भूतकार्य शरीराचे ठिकाणीं संभवत नाहींत (३) यद्यपि योगियाचे ठिकाणीं संभवतात तथापि सिद्धिभोगानें व निषिद्ध कर्मानें त्याचें सामर्थ्य क्षीण होतें. १८३. (४) देवजन्मवत् क्षीणपुण्य जनितही भगवच्छरीर नाहीं. १८४. दिगंबरमताप्रमाणें श्रीकृष्णाला निषिद्धाचरणाचा भोग होतो म्हटल्यास त्यांच्या अनेकान्त प्रतिज्ञेची हानी व कलियुगांतील संतांना झालेल्या श्रीकृष्णाच्या प्रतीतीची असिद्धि. इतिहासाविषयीं संशय असल्यास भक्तियुक्त लक्षणानें भक्ति करून पाहण्याविषयीं उपदेश. स्वमतांत परमेश्वरावतारत्वास्तव श्रीकृष्णाला भोगाची अशक्यता. गीतेंतील 'इमं विवस्वते योगं' इत्यादि श्लोकावरून मागील सर्व जन्मांत दिसून येणारें श्रीकृष्णाचें गुरुत्व व (य३-२८) साधक दशेचा अभाव. १८४ यावरून रज्जुकृत बंधनाभावादिकांची सिद्धि श्रीकृष्णाला योगानें आलेली नाहीं असा निष्कर्ष व परमेश्वर शरीर भूतकार्य नाहीं ह्याचीं सिद्धि. १८४-१८५. श्वासोच्छवासादिकें करून वायव्यादि भूतकार्य परमेश्वर शरीराचे ठिकाणीं आहेत अशी शंका घटत नाहीं, कारण त्यांना **भूतनियति लागू नसून भानमात्र** आहेत.तथापि स्वप्नवत् भानमात्र तें शरीर नाहीं तर अघटित घटनापटु मायेनें भासविलेलें असें आहे. १८५.आनंदगिरीनें जें भगवच्छरीर, भूतकार्य म्हटलें त्याचा भगवत्पूज्यपादवचनांनीं, गीतावचनांनीं, व स्वतःत्यांच्याच वचनानें बाध. श्रीकृष्णाचं शरीर भूतकार्य नसल्यामुळेंच धर्माधर्मजन्यही नाहीं.योगवासिष्ठ व भावार्थ रामायण या दोन्ही ग्रंथांतील विष्णुशिवाला व रामाला प्रारब्ध सांगणाऱ्या वचनांची व्यवस्था. शंका :- भागवत टीकेंत श्रीधरांनीं भक्तांच्या इच्छेनें व निश्चलदासांनी आपल्या ग्रंथांत साधूंच्या पुण्यानें व दुर्जनांच्या पापानें भगवच्छरीरोत्पत्ति सांगितली आहे यावरून परमेश्वर शरीर धर्माधर्मजन्य ठरूं पाहते. १८५-१८६. समाधानः- भगवंताचें मायाजन्य शरीर अज अव्यय आहे असा चतुर्धराचार्यांचा श्रीधर स्वामीचा व निश्चलदासांचा अभिप्राय. अन्यथा परकर्मानें परशरीर जीवाचेंही होत नाहीं तर ईश्वराचें कसें होईल असा प्रश्न. १८६. शंका - पुत्राच्या उत्तम कर्मानें पित्याला परलोकांत उत्तम शरीर मिळतें म्हणून तें परकर्मजनित आहे॰ समाधानः- श्राद्धकर्मफल मीमांसाः- पुत्राचे कर्म ग्रहण करण्याचा पित्याला स्वकीय अधिकार, योग्यता व पुण्यलेश. आईबापांचा अधिकार (ऋणदातृत्व) निरूपण, श्राद्धादिक कर्मफल मिळण्याला स्वतःचा अधिकार, योग्यता व पुण्यलेश या तिहींची आवश्यकता १८६ ''अनाथ प्रेतसंस्कारात् कोटियज्ञफलं लभेत्'' या वचनाची व्यवस्था व **संन्यासी आणि अतिपापी यांचें प्रेतसंस्कार करण्याविषयीं शास्त्रीय निषेध** १८७ पुत्राच्या कर्मानें पित्याच्या अंतःकरणांत अदृष्ट उत्पन्न होतें असें सांख्यसूत्रकाराचें व तद्भाष्यकाराचें म्हणणें, त्या अदृष्टाला संबंधाची अपेक्षा, संबंधाची क्रियासाध्यता, व अदृष्टाला संपादक पित्याचा अधिकार आहे असा (य३-२९) निष्कर्ष. ह्या म्हणण्याशीं सांख्यशास्त्राचा अविरोध. या सर्व विवेचनावरून परमेश्वराचें शरीर मायामय आहे अशी सिद्धि. दृष्टिसृष्टि वादानुसार परमेश्वराची नित्यमुक्ति व त्याचें शरीर त्याला ब्रह्मरूपच भासत असलें पाहिजे या विषयीं निरूपण. १८७-१८८ चिन्मय दृष्टीची यथार्थता व भगवच्छरीराची अनध्यस्तविवर्तता निरूपण. ''स एष नरलोके ऽस्मिन्नवतीर्णः स्वमायया'' या श्लोकाचें सान्वय व्याख्यान. 'स्वभगवान्' व 'प्राकृत' शब्दांचें स्पष्टीकरण. १८८. शंकाः- मायापरोक्षत्वात् परमेश्वराची सर्वदा परोक्षता असल्यामुळें श्लोकांतील 'स एष' शब्दानें ईश्वरविषयक प्रत्यभिज्ञा संभवत नाहीं म्हणून श्रीकृष्णाला जीवत्वप्राप्ति होते. समाधान :- श्रुतीवर तर्क काढण्याविषयीं निषेधपूर्वक उत्तर . १८९ माया परोक्ष असल्यामुळें परमेश्वर सर्वदा परोक्ष असतो या म्हणण्याची असंबद्धता. मायेचें प्रत्यक्षादि प्रमाणगोचर कार्यानुमेयत्व. १९०. मायेचा विक्षेपशक्त्यात्मक कार्यांश व आवरण शक्त्यात्मक कारणांश व दोहोंची प्रत्यक्षता. परमेश्वर विक्षेप शक्त्यात्मक मायावच्छिन्न आहे किंवा आवरण शक्त्यात्मक मायावच्छिन्न आहे असा प्रश्न. प्रथमपक्षीं परमेश्वराचा अपरोक्षानुभव येण्याची शक्यता. द्वितीय पक्ष स्वीकारल्यास वेदान्त मतांत येणारे दोष व ते टाळण्याकरितां ईश्वराला नित्य ज्ञानी मानण्याची

आवश्यकता. १९० ईश्वर शुद्धसत्वात्मक मायाप्रतिबिंबित असल्यामुळें मायापरोक्षत्वास्तव परोक्षच आहे या म्हणण्याचें खंडन. १९०-१९१. जीवापेक्षां ईश्वरच सत्त्वनिष्टांनां अपरोक्ष होण्याची अधिक शक्यता. १९१ **शुद्ध सत्त्वगुण साक्षिभास्य** असल्यामुळें त्याची व तदवच्छिन्न परमेश्वराची अनुभवगम्यापरोक्षता व परमेश्वराचा अनुभव येऊन स्मृति होण्याची शक्यता. अनुभवगम्य मायेचाही ज्ञानानें बाध व तीच सर्व समर्थ असल्यामुळें परमेश्वराची अपेक्षा नाहीं या म्हणण्याचा मायेच्या जडत्वास्तव बाध. ईश्वर व त्याचे अवतार वास्तविक नाहींत असें निश्चलदासांचें म्हणणें व ह्या चार पक्षांनीं त्याचें खंडन :- (१) परमेश्वर निद्रेंतून उठविणारा आहे हा सर्वांचा अनुभव . १९१-१९२ (२) परमेश्वराच्या सत्य संकल्पानेंच जीवन्मुक्तांचे प्रारब्ध नियत होतें ही युक्ति. १९२. (य३-३०) (३) अनेक श्रुती. १९२-९३. व (४) विचारसागरादि ग्रंथांत ईश्वराचें अस्तित्व स्वतः त्यांनींच कबूल केलें असल्यामुळें त्यांच्या ठिकाणीं येणारा अनिश्चयावच्छिन्नोन्मत्तप्रलाप हा दोष. १९३. ईश्वराचा अवतार होत नाहीं ह्या (निश्चलदासांच्या) म्हणण्याची संशयात्मकता. दृष्टिसृष्टि वादांतील जीवकल्पितेश्वर मताचें रहस्य निरूपण :- **परमेश्वराचा चैतन्य भाग जीवानें कल्पिलेला नसून ऐश्वर्यच मात्र जीवानें कल्पिलेलें आहे.** ईश्वरांतील चैतन्य भाग जीव कल्पित मानल्यास जीवाकडे ईश्वरत्व व ईश्वराकडे जीवत्व येऊन शब्दमात्र होणारा वाद १९३-१९४. अथवा ईश्वरांतील चैतन्य चैतन्यभास्य मानावें लागून दोन्ही चैतन्यांचें ऐक्य किंवा भास्यचैतन्याला जडत्वापत्ति. परमेश्वराचें चैतन्य जीवकल्पित नाहीं याची स्वप्नांतील राजाच्या दृष्टांतानें सिद्धि. घटाकाश दृष्टांतानें **जीवकल्पितेश्वर वादाचा यथार्थ अर्थ.** जीवाच्या वासनारूप कल्पनेवर परमेश्वराची स्थिती. व आपेक्षिक बिंबत्वारोपावच्छिन्न बिंबभूत परमात्म्याची दृष्टिसृष्टिवादांत सिद्धि. ह्या म्हणण्याला मधुसूदन स्वामीची सम्मति १९४ तो परमात्माच अनध्यस्त शरीररूप अवतार धारण करितो ह्या सिद्धांताचें श्रुतिस्मृतिवरून, युक्तीवरून व ऐतिहासिक अनुभवावरून कथन १९४-१९५ स्वतःअलिप्त परमात्म्याचे ऐश्वर्य तातवचनावरून कथन १९५ उपासक जीवही षड्‌गुणैश्वर्यवान् होऊं शकतो तथापि त्याचे ठायी जगत्कर्तृत्व येऊं शकत नाहीं. श्रीकृष्णाचें ब्रह्मदेवात्मकत्व, हिरण्यगर्भांतील जीवधर्माचा त्यांचें ठायी असंभव व ह्यामुळें षड्‌गुणश्वर्यवान् असूनही अलिप्तता. उपासक पुरुषांकडे षड्‌गुणैश्वर्यांचें भोक्तृत्व व परमेश्वराकडे साक्षित्व यद्यपि षड्गुणैश्वर्याचे साक्षी जीवन्मुक्त राहूं शकतात तथापि त्यांनां विदेहमुक्तीची अपेक्षा असते तशी परमेश्वराला नाहीं. ह्यावरून परमात्म्याकडे जगत्कर्तृत्वादि तटस्थ सत्यसंकल्पासहित षड्‌गुणैश्वर्याचें साक्षित्व व साक्षीचे ठायीं आरोपित संचोदकत्व. त्या संचोदकत्वावच्छिन्न बिंबभूत साक्षी ईश्वराचें षड्‌गुणैश्वर्याला आपल्या ताब्यांत ठेवून उत्तम स्त्रीसमुदायाचे ठिकाणीं रममाण होणें. या प्रमाणें अनुभवानें ईश्वरानुभवता सिद्ध होत असल्यामुळें 'स एष' शब्दानें ईश्वराची प्रत्यभिज्ञा सिद्धि व जीवाप्रमाणें (य३-३१) प्रकृतीच्या आधीन होऊन स्त्रियांचें ठायीं परमात्म्यानें रमण केलें नाहीं असा निश्चित अभिप्राय १९५ श्रीकृष्णाचें पूर्णब्रह्मत्व जनांला कळण्याकरितां बाह्य चिन्हांचें निरूपण व हरिमायेनें मूढ झालेल्या लोकांनां त्यांचा (बाह्यचिन्हांचा) उपयोग. ब्रह्मविज्ञान दृष्टीनें शमदमादि विराग विषयक शब्दांनां बाह्यचिन्हता व शरीरापेक्षेनें आंतर्‌चिन्हता. विषयरोध न करितां जीवन्मुक्तांनाहीं अघटमान अशा इंद्रियाची परमात्म्याच्या ठिकाणीं सहज अचल स्थिति. स्त्रीसंगाची सकळ विषयांहून दुस्तरता व स्त्रीसंग निंदा १९६-१९७ श्रीकृष्णस्त्रियांचे ठिकाणीं भगवद्विषयक प्रेम, पातिव्रत्य तेज, गांभीर्यादि गुण असून श्रीहरीचें मन वळविण्याविषयीं त्यांचें असामर्थ्य. शिष्याच्या दोन शंका :- (१) विश्वामित्र पराशरादिक जर स्त्रियांचे ठिकाणीं वशीभूत झाले तर रोज दहीं भात जेवणारे पुरुष इंद्रिय निग्रह काय करूं शकतील या म्हणण्याचा इंद्रियनिग्रह सर्वथाच कोणाकडून व्हावयाचा नाहीं असा अर्थ करावयाचा काय? (२) तृतीय सखीप्रेषणाचे ठायीं हरिहर उपासना समान वर्णन केली असून आतां (११४ व्या ओवींत्) शिवाची गौणता दाखवितां, यांत पूर्वापर विरोध येतो १९७ समाधानः- १ ल्या शंकेचें उत्तर :- अग्निचूर्ण करणाऱ्या मनुष्याचा दृष्टांत व शास्त्रांत जी ऋषींचीं उदाहरणें दिली आहेत. त्यांचा विषय निवृत्तिपर अर्थ १९७-१९८ दुसऱ्या शंकेचें उत्तर :- कारण ब्रह्माचें लक्षण व भिन्न भिन्न रूपानें सर्व श्रुतींत सांगितलेली कारण ब्रह्माची उपासना व सर्व पुराणांत अभिगमन रूपानें उपासना. त्या परमात्म्याचेंच स्वभक्तार्थ शुद्धसत्त्वरूपानें हरिहरत्व व सृष्टिकार्यार्थ त्रिगुणोपहितत्व. निष्काम व सकाम भक्तांनां व निष्काम उपासकांनां मिळणारीं स्थानें. उपासना व भक्तिमधील भेद १९८ कारणब्रह्मास हरिहरत्व सांगणारें महाभारत वचन १९८-१९९ महत्तत्वोपहित हिरण्यगर्भ संज्ञक कार्यब्रह्माला सृष्टिकार्यार्थ हरिहरत्व सांगणारीं अनुगीतेंतील व मात्स्यपुराणांतील वचनें १९९ हिरण्यगर्भाचे ठिकाणीं गमन करणाऱ्या निष्काम हरिहर उपासकांनां ब्रह्मलोकच हरिहरलोकांप्रमाणें भासतो व जे निष्काम हरिहरभक्त कारण ब्रह्माचे ठिकाणीं गमन करितात त्यांनां एकच परमेश्वरस्थान मिळतें १९९ या (य३-३२) विषयीं पुष्पदंत वचन २०० हैरण्यगर्भस्थ हरिहरांनां पुराणांत जीवधर्म सांगण्याचें कारण. पुराणांतील कार्यकारणब्रह्मपर निंदास्तुतिवाक्यांचें प्रयोजन व ह्या वचनांची कार्यकारणब्रह्मदृष्टि निरूपण. युक्ति व

*अनुभव दृष्टीनें शिवाचे व विष्णूचे समान कृपालुत्वादि धर्म २०A शिवभक्तांची शिवाचे ठिकाणीं व विष्णूभक्तांची विष्णूचे ठिकाणीं आईच्या दृष्टांतानें कारणब्रह्मदृष्टि व विष्णुपुराणांत शिवाची व शिवपुराणांत विष्णूची निंदा सांगण्यांत पुराणरूप श्रुतिमातेचें तात्पर्यनिरूपण २००-२०१ पुराणाचें खरें तात्पर्य न जाणतां आपापल्या मताचा अभिमान धरून शालशुनकन्यायानें परस्पर द्वेष करणाऱ्या शैववैष्णवांचा निषेध २०१ शालशुनकन्याय कथन. या पुराणांत कारणब्रह्मत्वेंकरून श्रीकृष्णाची विशेष स्तुती व कारणब्रह्मरूप विष्णूशिवात्मक श्रीकृष्ण रूपांचें तृतीय सखीप्रेषणाचे ठायीं निरूपण केल्याचें स्मरण. त्या परमात्म्याला माया सजातीय अशा स्त्रिया वश करूं शकल्या नाहींत या म्हणण्यांतील भाव निरूपण २०१ परमात्म्याच्या मनरूप सत्य संकल्पापर्यंत किंवा चैतन्यापर्यंत स्त्रियांची धाव जात नाहीं या विषयीं तातवचन प्रामाण्य २०१-२०२ यावरून भगवंताचें अवतार शरीर पुण्यापुण्यजन्य नाही असा निष्कर्ष. आपले दुर्गुण भगवंतावर आरोपित करून त्याला विषयी म्हणणाऱ्या मूढ जनांचा निषेध व परमेश्वराचें अवतारत्व कथन २०२ अवतार शरीराचें ठिकाणीं सांगितलेलें ऐश्वर्य. भक्तिदृढीकरणार्थ कारण ब्रह्माशीं ऐक्यभावानें निरूपण :- प्रकृतीतील गुणधर्मांच्या सुखादिकांनीं परमात्म्याचा अभिभव न होणें हेंच त्याचें खरें ऐश्वर्य २०२-२०३ अवतारकाळीं स्त्रियांनां वश न होणें व मूळस्थानीं प्रकृतीला वश न होणे हे दोन्ही धर्म श्रीकृष्णाचे ठिकाणीं समान असल्यामुळें त्यांचें कारणब्रह्मत्व. सत्ताद्वयवादाचें वैशेष्य. परमात्म्याचें परमानंदरसत्व. कृष्ण प्रभावानें कृष्णस्त्रियांच्या साक्षित्वाचा अभिभव व शेवटीं पृथगिवानंद भानरूपानें प्रेमसंपन्न अंतःकरणाचें समर्पण. प्रेमप्रभाववर्णन. श्रीज्ञानेश्वर नामस्मरणांत उपसंहार २०३ (य३-३३)*

०००

# सखीप्रेषण ११ वें

## श्रीकृष्णाचा स्वपुरप्रवेश

**॥ श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरमाउली समर्थ ॥**

**॥ पद ॥**

**नमिते मी पदकमला श्री कृपाघना । सत्वर घे करुनि प्रभू मज निजांगना[२] । नमिते मी ० ॥ ध्रु.॥**
**तप तपती मुनिजन तव चरणभेटिला । पोटिं प्रेम धरुनि त्यजिति बंधकोटिला । नमिते मी ० ॥१॥**
**चरणहाव जीवभाव सकल हारवी । यामिनितम[३] वारुनि हृदि प्रगट हा रवी ॥ नमिते ० ॥२॥**
**अलकावतिपतिचरणा[४] वंदुनी सदा । लंपट तव मंचकिं आह्मि प्रीति लासदा[५] ॥ नमिते ० ॥३॥१॥**

**॥ पद ॥**

**मंगल पदा ध्या । चिंतुनि वारा भव आपदा[६] ॥ध्रु. ॥**
**सुख सर्वदा हो । वाचे करोनी शंकर वदा ॥ मंगल ० ॥१॥**
**पिनाकधरा[७] ध्या । गाऊनि त्यागा वनिताधरा[८] ॥ मंगल ० ॥२॥**
**आळंदीपती ध्या । हरिसाठीं ज्या मुनी जपती ॥ मंगल ० ॥३॥२॥**

*(१) स्त्रियांनी केलेले, कानाला अत्यंत गोड लागणारे स्तवन किंवा उपनिषत् श्रुतींनाही मधुर वाटणारे. (२) आपली भार्या (३) रात्रीचा (येथे मायारूपी पटल) अंधःकार (४) श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या पाया (५) प्रेमाकरिता नाचणाऱ्या (६) संसारदुःखे (७) शंकराला. (८) स्त्रियांचे ओठ*

**॥ गीति ॥**

**रसने रसने रस ने हरिनामामृत अखंड तूं हृदयीं ॥**
**वसणें वसणें वसणें चित्ता त्वां कांत[२] जेथ भक्षि दही ॥३॥ (य३-१६०)**

**॥ हिंदी पद ॥**

**वाणि[३] करहुं मधुर मधुर गान नामकारे । लेहुं[४] मती[५] कबहुं[६] श्रयण[७] कुजन कामका[८]रे ॥ध्रु. ॥**
**गाल लाल कीन्ह[९] बाल[१०] काल-धामका[११]रे । लाल अदन[१२] चाल[१३] भरा[१४] देह चामका[१५]रे ॥ वाणि. ॥१॥**
**ज्ञानदेव हरत भेव[१६] शरण जाय वाको[१७] । भव वैभव[१८] तजि परिहरि[१९] जनम[२०] ए[२१] कव्वाको[२२]॥ वाणि.॥२॥४॥**

आनर्तैः[२३]स्तूयमानश्च पुरीं निर्विश्य बंधुभिः । एकादशे रतिः सम्यग्यादवेन्द्रस्य वर्ण्यते ॥१॥
उत्सवैरुद्गारत्पौरमुदं च ध्वजतोरणम् । उल्लसद्रत्नदीपालि स्वपुरं प्रभुराविशत् ॥२॥

॥ संस्कृत-गद्य ॥

सूतउवाच :-
ततः[२४]कृष्णो द्वारकाप्रदेशान्प्राप्य तत्रस्थानां विषादं शमयन् शंखं दध्मौ ।
सध्मायमानः शंखः कृष्णस्य हस्तकमलसंपुटे सशब्दो हंस इव शुशुभे ।
तच्छंखनादं श्रुत्वा भगवद्दर्शनलालसाः प्रजाः प्रत्युज्जग्मुः ।
ततः कृष्णाय प्राभृतानि दत्वा प्रीत्या प्रसन्नमुखाः सत्यस्तमात्मारामं वदन्ति स्म ॥

*(२) श्रीकृष्ण (३) जिव्हे (४) घेऊ (५) नको चित्ता, मना?(६) केव्हांहि (नको) (७) आश्रय (८) दुष्ट पुरुष व विषयवासना (९) केले (१०) मूर्खा (११) मृत्यूचे घर (१२) जेवण (१३) वाटेल तसे वागणे. (१४) भरलेला (१५) कातड्याचा (१६) भय (१७) त्याचे (१८) संसारातील वैभव (१९) नाहिसे करितात (२०) जन्म (२१) हा (२२) कावळ्याचा (२३) श्लोकार्थ - आनर्तवासी जन भगवंताची स्तुति करीत आहेत अशा थाटात भगवान् आपल्या बांधवासह नगरीत शिरले. तेव्हा भगवंताच्या आगमनाने अत्यंत आनंदित झालेल्या प्रजाजनांनी पताकातोरणांनी नगर श्रुंगारिले व जिकडे तिकडे शहरभर रत्नदीप उजळून संपूर्ण नगर प्रकाशमय केले अशा आपल्या नगरीत भगवान् प्रवेशले तेव्हां नगरवासी प्रजाजनांना जे भगवत्प्रेम उचंबळून आले त्याचे या अकराव्या अध्यायात वर्णन केले आहे. (२४) गद्यार्थ - त्यानंतर भगवान् द्वारकेला आले व भगवान् द्वारकेतून गेल्यापासून त्यांना जो भगवंताचा वियोग होता ते वियोगदुःख नाहिसे करण्याकरिता भगवंतानीं शंख वाजविला. तेव्हां तो शंख भगवंताच्या हस्तकमलाच्या संपुटीमध्ये शब्द करणाऱ्या हंसाप्रमाणे दिसत होता - तो शंखाचा नाद श्रवण केल्याबरोबर भगवान् श्रीकृष्ण द्वारकेला परत आले असे सर्व प्रजाजनांना वाटून, भगवंताच्या वियोगाने भगवंताच्या दर्शनाची अत्यंत उत्कंठा लागून राहिलेले सर्व प्रजाजन भगवंताचे दर्शन घेण्याकरिता निघाले. नंतर भगवंताचे दर्शन घेऊन व भगवंताला भेट समर्पण करून, त्या पूर्णब्रह्माची ते स्तुति करावयाला लागले*

॥ श्लोक ॥

तव चरणसरोजा[१] वंदितो देवराया । निजकर[२] शिरिं ठेवी सत्वरे[३] दे वरा[४] या ॥
श्रवणनयनचित्तीं[५] मूर्ति तूझी वसावी । जनिं[६] जनिमरणाची[७] भीति कांहीं नसावी ॥५॥

॥ घनाक्षरीं ॥

ब्रह्मा[८] पोटिचेंचि बाळ । तोहि पायिं ठेवि भाळ[९] ॥ तैसा वंदि चंद्रभाळ[१०] । घालि माळ इंदिरा[११] ॥६॥
देव इंद्र चंद्र सूर्य । तुज सेवुनियां आर्य[१२] ॥ साधिताति मुक्तिकार्य[१३] । मुनि शान्तिमंदिरा[१४] ॥७॥
जगत्रयमूषकाल[१५] । मानि भोज्य[१६] व्यालकाल[१७] ॥

*(१) चरणकमळाला (२) आपला वरदहस्त (३) लवकर (४) आशिर्वाद (५) कानांत, डोळ्यांत व मनात (६) संसारात (७) जन्ममृत्यूची (८) ब्रह्मदेव (९) शिर, डोके (१०) शंकर (११) लक्ष्मी (१२) मान्य, पूज्य (१३) मुक्तिरूपी साध्य, प्रयोजन (१४) मुनिजनांच्या मनाच्या शांतीचे म्हणजे वासनारहित स्थितीचे माहेरघर (१५) तिन्ही लोक हेच कोणी मूषक म्हणजे उंदीर याला (१६) खाद्य (१७) व्यालरूपी म्हणजे अजगररूपी काल.*

अनध्यस्त[१] तूं अकाल[२] । नंदबाल[३] सुंदरा ॥८॥
दीननाथ तुझे पाय । ब्रह्मीं मिळाया उपाय ॥ यास्तवाम्हि गोपराय । प्रेमें वाहु कंधरा[४] ॥९॥ (य३-१६१)

॥ ओवी ॥

पुढील श्लोकीं सकल प्रजा । स्वानुभवें[५] भावनाओजा[६] ॥ परिपूर्ण करोनि हृत्सरोजा[७] । नंदात्मजा[८] स्तविताती ॥१०॥

॥ करुणास्यवृत्त ॥

निजमायओळख[९] बाळकाप्रति[१०] पाजि दूध म्हणोनिया । जन पाहती हरिला तथाविध[११] विश्वपाळ[१२] गणोनिया[१३] ॥
जननीवरी[१४]निजभार[१५]बाळक[१६]सर्व अक्षय[१७]ठेविती । जन तेंवि नंदसुता गुरु प्रिय[१८] माय तातहि[१९] भाविती[२०] ॥११॥

॥ ओव्या ॥

आम्ही सर्वही भगवंता । तुझें अंश कृपावंता । परी देहसंगें[२१] अनंता । महती[२२] बद्धता[२३] पावलो ॥१२॥

यालागीं देहबुद्ध्या[२४] तव दास[२५] । जीव[२६]बुद्धीनें तुझे अंश ।
आत्मबुद्धीनें[२७] सर्व समरस[२८] । भक्ति उल्हास[२९] मधुरता[३०] ॥१३॥

*(१) मायाभ्रमरहित व ज्ञानानेहि नाश न पावणारा (२) जन्ममृत्यु बाल्यादि कालाच्या सत्तेचे परिणाम ज्याचे ठिकाणी नाहीत (३) नंदाचा मुलगा (४) मान, शिर. (५) स्वतः अनुभव घेऊन (६) भावनाशक्ति, भावनातेज (७) हृदयकमळाचे ठिकाणी (८) श्रीकृष्णाला (९) आपल्या आईची ओळख (१०) मुलाला (११) त्याप्रमाणे (१२) जगाचा पालन करणारा (१३) समजून (१४) आईवर (१५) आपला सर्व भार (१६) लेकरू (१७) अखंड (१८) पति (१९) बाप (२०) समजती (२१) देहाच्या आसक्तीमुळे (२२) फार (२३) बद्धस्थिति, अज्ञानस्थिति, आपले स्वरूप विसरून आपल्याला देहस्वरूप समजू लागलो (२४) मी देहस्वरूप आहे अशी बुद्धि उत्पन्न होईल तेव्हां (२५) सेवक (२६) मी देहाहून निराळा चैतन्यस्वरूप आहे अशी बुद्धि स्फुरली असता (२७) मी ब्रह्मस्वरूप आहे अशी बुद्धि स्फुरेल तेव्हां (२८) एकरूप (२९) भक्तीचे स्फुरण (३०) आनंदरूप.*

आम्ही[१] दास तूं परमदेव । आम्ही[२] बाळ तुज मातृपितृभाव ।
आम्ही[३] चित्प्रभा तूं कांत करुणार्णव । निवारायाऽस्मद्भव[४] तूं गुरु देव[५] आम्हा ॥१४॥
हे गुरो ! करोनि तव सेवा । आह्मी कृतकृत्य[६] जाहलों देवा । टाकोनियां जीवभावा[७] । ब्रह्मभावा[८] मिळालों ॥१५॥
अथवा जगीं न यावा कर्तृत्वाभिमान[९] । म्हणोनि तूं विश्वपाळण[१०] । आम्ही सर्व तवाधीन[११]। सांभाळ पूर्ण करिशी तूं ॥१६॥
ऐसा नित्य करिता सांभाळ । आमुचा होता अपराध प्रबळ[१२] ।
भक्षूं पाहे काळव्याळ[१३] । तेथ देव तूं व्रजपाळ सोडविशी ॥१७॥
साही वैरी[१४] धांवती देखा । तेथ तूं[१५] सुहृत्पाठिराखा[१६] ।
तव वीर्यें[१७] तवांश आह्मी वेणुमुखा[१८] । अतो निष्कलंका[१९] पिता तूं ॥१८॥
कोंडिता[२०] इंद्रियें, कष्ट होती । ते तव प्रेमें सकल हरिती । यालागीं माय तूं यदुपती । आम्हाप्रती दीनबंधो ! ॥१९॥
साधनचतुष्टयें[२१] ऋतुस्नाता । गुरुप्रेममदें[२२] उन्मत्ता । तेथ ब्रह्मानंदें[२३] काम पुरविता । पती अनंता तूंचि आम्हा ॥२०॥
कांतकांता[२४] अक्षयगांठी[२५]। एकत्वें[२६] घालावयासाठीं ।
महावाक्योपदेष्टा[२७] कर्णसंपुटीं[२८]। गुरु जगजेठी आम्हां तूं ॥२१॥

*(१) आम्ही सेवक होऊ तेव्हां तू आमचा परमस्वामी (२) आम्ही आपल्याला लेकरू समजू तेव्हां तू आमचा आईबाप (३) आम्ही ज्ञानाने चेतनवृत्तिरूप होऊ तेव्हां तू आमचा प्रेमसिंधु पति आहेस (४) आमचा संसारबंध (५) सद्गुरुनाथ (६) पूर्ण (७) बद्धपण, अज्ञानपण (८) पूर्ण ब्रह्मस्वरूपाला प्राप्त झालो (९) आमचे ठिकाणी कर्तृत्वाचा अहंकार उत्पन्न होऊ नये म्हणून (१०) सर्व जीवांचा पालन करणारा झालास (११) तुझ्या परतंत्र (१२) थोर (१३) काळ हाच कोणी अजगर (१४) कामक्रोधादि (१५) मित्र (१६) रक्षण करणारा (१७) पराक्रमाने (१८) वेणू आहे मुखी ज्याच्या असा (१९) दोषरहिता (२०) निरोध करताना (२१) शमादि साधनाने संपन्न होणे हीच उपवर दशा (२२) पुढे गुरुचे प्रेम चित्तात भरल्यामुळे उन्मत्ताप्रमाणे देहभावरहित झाल्यावर (२३) अखंड ब्रह्मानंदाची इच्छा हाच कोणी काम, तो अखंड ब्रह्मानंद देऊन इच्छा पूर्ण करणारा (२४) पतिपत्नि (२५) अखंड मिळणी (२६) एकरूपाने (२७) महावाक्याचा उपदेश करणारा (२८) दोन्ही कानांत.*

एवं तुझी करितां सेवा । मनचि सांडि मनोहावा[१] । तेथ कृतकृत्यतेचा ठेवा । सहज स्वभावा सांपडतो ॥२२॥
एवमंतरीं तव आलिंगनें कृतार्थ । आणि बाहेरीं परम सनाथ । तुझें रूप श्री यदुनाथ । (य३-१६२) पाहतसों यास्तव ॥२३॥
ज्ञानिया मुक्तीची परम गोडी । परंतु व्युत्थानीं दैवबेडी[२] । आम्ही तुझी धरितां गोडी । मुक्ती बापुडी वश झाली ॥२४॥
अंतरीं तुझा ब्रह्मानंद । बाहेरीं तव चरणामोद[३] । म्हणोनि समाधिव्युत्थानभेद[४] । निमाला[५] प्रसिद्ध सकलही ॥२५॥
वैभवीं[६] गुंतले सुरवर[७] । चालविती जनीं अधिकार । यासाठीं व्हावया तुझे चाकर । पडतो अंतर तव प्रेमें ॥२६॥
देव तुझे यद्यपि सेवक । तरी ते परम आज्ञाधारक । म्हणोनी तुझें प्रेमहास्य[८] सम्यक । तयालागीं दिसेना ॥२७॥
देवांस प्रळयीं[९] होय व्यथा[१०] । यालागीं तुझी करुणार्द्रता[११] । तयालागीं न दिसे ताता । तें भाग्यें आम्ही पाहतो ॥२८॥

॥ अभंग ॥

म्हणोनियां देवा सकळही आम्ही । सेवक तूं स्वामि दीनबंधो ॥१॥
तुझियानें आम्ही जाहलों सनाथ[१२] । मोक्षालाहि लाथ मारुं आतां ॥२॥
देवांलाही रूप न दिसे सांवळे । भरोनियां डोळे पाहताहो ॥३॥

**काय हें आश्चर्य कवण सुकृत । तुजसवें तात क्रीडताहो[१३] ॥४॥**
**आम्हा वाटे पूर्वी ज्ञानेश्वरसेवा । केलियाचा ठेवा[१४] मीळताहे ॥५॥२९॥**
**॥ श्लोक ॥**
**संयोगेन[१५] सुखं यस्य वियोगेऽपिसुखं भवेत् । पुनः संयोगसंप्राप्तौ सुखं तस्मै नमाम्यहम् ॥३०॥**

*(१) मनाच्या धावीला (२) प्रारब्धाचा खोडा, श्रृंखला (३) चरणामृताचा सुस्वाद (४) ही समाधि अवस्था व ही व्युत्थान अवस्था असा भेदप्रकार (५) नाहीसा झाला (६) ऐश्वर्यात (७) देव (८) प्रेमाने केलेले हास्य (९) संपूर्ण सृष्टीचा नाश होतो तेव्हां (१०) दुःख (११) दयाळुपणा - भक्तांना प्रलयातहि भगवान् दुःख होऊ देत नाही हा त्याचा दयाळुपणा (१२) स्वामीयुक्त (१३) खेळतो (१४) लाभ (१५) श्लोकार्थ - ज्याच्या संयोगात सुख आहे व वियोगातहि सुख आहे व पुनः संयोग प्राप्त होऊन सुख झाले, त्याला मी नमस्कार करितो*

**॥ दिंडी ॥**
**जेधवां तूं गेलासि कुरूदेशीं । सुहृत्प्रेमें[१] डोळिया[२] पहायासी ॥**
**तदा आम्हां पळ वर्षकोटि[३] होता । तवागमनीं[४] विश्वास जरी होता ॥३१॥**
**॥ गद्य ॥**

शिष्य :- भगवन् ! बाहेर गेला असतांनां वा दृष्टीआड आला असतानां मृत समजावा. कारण यावत्[५] दृष्टि तावत् सृष्टि आहे असा दृष्टिसृष्टिवादियांचा सिद्धांत असून तो आपणास सम्मत[६] आहे. आणि आपणास भगवद्भक्तिही सम्मतच[६] आहे; आणि भगवद्भक्तींत तर भगवंताचा नाश इष्ट नाहीं असें आहे; तेव्हां प्रजाजनांनां जो पळ पळ कोटिवर्षासमान भासला तो काय म्हणून? भगवंताच्या मरणप्रत्ययामुळें[७] कीं काय? (य३-१६३)

श्रीगुरु :- तूं पूर्वी जेव्हां शंका केलीस तेव्हां मी तुझ्या बुद्धिवैभवाची[८] प्रशंसा केली होती. त्याचें हें फळ असेल नाहीं ? अरे मूढबुद्धे ! मूळांत 'यर्हि' हें पद आहे; आणि 'यर्हि[९] तर्हि[१०]'चा नित्यसंबंध[११] आहे. ह्या पदांनीं संयुक्त[१२] अर्थ केला असतां 'यर्हि' पदाचा भाव कीं, जरी आपण सुहृद[१३] पाहण्याला गेलां होतां व पुन्हा येणार होतां अथवा हृदयांत होतां, तरी व्युत्थानीं[१४] प्रारब्धभोगभीतीमुळें[१५] आणि सुंदरतनुप्रेमामुळें[१६] पळ कोटि वर्षासमान भासत होता. या अभिप्रायानेंच 'आगमनीं विश्वास जरी होता' असें दिंडींत म्हटलें आहे.

*(१) बांधवांच्या प्रेमामुळे (२) डोळ्याने (३) कोटीवर्षाप्रमाणे एक पळ जात होता (४) तू परत येशील याविषयी (५) जोपर्यंत आपण पदार्थ पाहतो तोपर्यंत त्या पदार्थाचे अस्तित्व आहे (६) मान्य (७) भगवान् मेला असे वाटून की काय? (८) बुद्धिमत्तेची (९) जरी (१०) तरी (११) जरी हे पद आले की तरी हे पद पुढे येतेच (१२) मिळून (१३) बांधव (१४) प्रारब्धानुसार प्राप्त होणाऱ्या भोगाचे वेळी (१५) प्रारब्धाने प्राप्त होणारा सुखदुःख भोग, भगवंताकडील चित्तआपल्याकडे ओढील व देहबुद्धि उत्पन्न करील या भीतीने (१६) भगवंताची जी त्रैलोक्यात अत्यंत सुंदर असलेली सांवळी मूर्ति तिच्या ठिकाणी जडलेल्या प्रेमामुळे*

आतां, दृष्टिसृष्टिवादाला धरून तूं जी शंका केलीस ती घटत नाहीं; कारण सृष्टिरूप[१] अनाद्यतिरिक्त[२] प्रपंचाविषयीं दृष्टिसृष्टीचा स्वीकार अद्वैतसिद्धींत मधुसूदनाचार्यांनीं केला असल्यामुळें अर्थातच चतुर्धराचार्यांनीं भारतभावदीपांत[३] म्हटल्याप्रमाणें आणि अस्मदीय[४] भक्तिपदतीर्थामृत वचनाप्रमाणें अज[५], अव्यय[६], अनध्यस्तविवर्त[७] जें परमेश्वरशरीर[८] त्याचेठायीं दृष्टिसृष्टि स्वीकृत नाहीं. म्हणून परमेश्वराचें सुहृद्दिदृक्षया[९] हास्तिनपुरगमन[१०] द्वारकावासी बुध जनांनां[११] मरणप्रत्ययबोधक[१२] झालें नाहीं. तस्मात् त्यांच्या भक्तीचा छेदही[१३] घडला नाहीं; अथवा जीवरूपी[१४] प्रतिबिम्बापेक्षी आरोपित बिम्बत्वावच्छिन्न बिम्बरूपी चैतन्य परमात्मा वा शुद्धब्रह्म परमात्मा दृष्टिसृष्टिवादांत गृहीत[१५] असल्यामुळें, प्रथमपक्षीं[१६] जीवबोधनार्थ[१७] स्वगोचर[१८] विद्यामय[१९] भगवच्छरीराचा[२०] वा द्वितीयपक्षीं[२१] श्रीमन्मधुसूदन[२२]गूढार्थदीपिकोक्त[२२] 'प्रेम्णैकत्वेऽपि[२३] पृथगिवानंदभान' रूपी भगवच्छरीराचा स्वीकार करावा लागत असल्यामुळें

*(१) कार्यरूप (२) ईश्वरादि जे सहा पदार्थ वेदान्तात अनादि मानिले आहेत, त्याखेरीज (३) भारतावरील टीकेत (४) आमच्या (५) जन्मरहित (६) नाशरहित (७) ब्रह्मज्ञानानंतरहि नाश न पावणारा (८) परमेश्वराचा देह (९) बांधवांना पाहण्याकरिता (१०) हस्तिनापुराला जाणे (११) ज्ञात्या लोकांना (१२) भगवान् मेला अशी समजूत उत्पन्न करण्यास समर्थ (१३) खंड, भंग, उच्छेद (१४) जीवाला प्रतिबिम्बरूप मानल्यावर, प्रतिबिम्बाला बिम्ब पाहिजे असते म्हणजे बिम्बावाचून*

*प्रतिबिम्ब राहूच शकत नाही कारण बिम्बाचेच प्रतिबिम्ब पडत असते म्हणून जीवरूपी प्रतिबिम्बामुळे परब्रह्माचे ठिकाणी बिम्बसंज्ञा येते व या बिम्बसंज्ञेला प्राप्त झालेल्या ब्रह्मालाच ईश्वर म्हणतात (१५) मान्य (१६) पहिल्या मतानुसार (१७) जीवाला ब्रह्मज्ञान करून देण्याकरिता (१८) स्वतःला गोचर होणाऱ्या (१९) शुद्धसत्वमय, ज्या विद्योपाधीने ब्रह्मज्ञान होते, त्या विद्यावृत्तीने घेतलेले (२०) भगवंताच्या देहाचा (२१) दुसऱ्या मताप्रमाणे (२२) मधुसूदनानी आपल्या गीतेवरील टीकेत सांगितलेले (२३) प्रेम एकरूप असले तरी विद्यावृत्तीमुळे त्याला भिन्नपणासारखा भिन्नपणा जो अनुभविला जातो तेच भगवंताचे शरीर, व त्या शरीराचा*

बुधजनांना[१] भगवच्छरीरसंबंधी व्ययप्रत्यय[२] संभवनीय नाहीं. म्हणून दृष्टिसृष्टिवादी राहूनही अत्युत्कट भक्तीनें साक्षात्संयोगीं[३] वा वृत्तिमात्रसंयोगीं[४] वियोगोपलालनरूप[५] प्रेमास्तव कोटिवर्षसम पल वाटणें शक्य नाहीं काय ?

शिष्य :- भगवन् ! माझी शंका समूळ[६] विनिवृत्त[७] झालीं. अग्रवृत्तांत[८] ऐकण्याकरितां श्रवणमनाद्युत्सुक आहेत.

**श्रीगुरु :- इति[९]प्रजानां वचः श्रृण्वन् दृष्ट्वा तासामुपरि प्रसादं कुर्वन् कृष्णो द्वारकां विवेश ।**

**कथंभूतां ताम् ?**

**स्वतुल्यबलैर्मधु-भोज-दाशार्हादि यादवै रक्षिताम् ।**

**सर्वर्तुषु पुष्पादिसंपदायुक्त वृक्षलतामिश्रैरुद्यानादिभिः शोभिताम् ।(य३-१६४)**

**पुरद्वारगृहद्वारेषु कृततोरणां घ्वजपताकाग्रैः[१०] प्रतिहतातपाम् ।**

**सुगंधजलैः संसिक्तमार्गां फलपुष्पाक्षतांकुरैरवकीर्णाम् ।**

**द्वारिद्वारि पूर्णकुंभबलिदीपादिभिः समलंकृताम् ॥**

*(१) सूज्ञ लोकांना (२) नाशाचा अनुभव (३) प्रत्यक्ष बाहेर भगवंताचा समागम असताना (४) ध्यानवृत्तीने भगवंताशी व्यवहार होत असताना (५) वियोगाच्या भासाने होणारे प्रेम (६) निःशेष (७) नाहिशी (८) पुढील कथाभाग (९) गद्यार्थ - याप्रमाणे आपल्या प्रजेचे प्रेमळ भाषण ऐकून व त्यांच्याकडे कृपादृष्टीने पाहून भगवान् द्वारकेत प्रविष्ट झाले. ती द्वारका कशी होती म्हणाल तर आपल्या समान बलशाली असलेले मधुभोजदाशार्ह इत्यादि कुळातील यादव तिचे संरक्षण करीत आहेत. सर्व ऋतुमध्ये सर्व पुष्पादि संपत्तीने युक्त असलेले वृक्ष, त्य ा द्वारकेतील बागादिकातून शोभत होते. (१०) द्वारकेतील नगरद्वारांचे ठिकाणी व नगरांतील सर्व घरांचे ठिकाणी तोरणे, ध्वज, पताका लावल्या असल्याने (वायूच्या योगाने) ध्वजादिकांची टोके हालली जाऊन, त्यायोगे उन्हाचा ताप नाहिसा होत होता. जिकडे तिकडे रस्त्यावर सुगंधित पाण्याचे सडे टाकलेले होते व फलपुष्पअक्षदा इत्यादि द्रव्यें पसरलेली होती. प्रत्येक घराच्या दाराशी बलिदीपादिकांनी श्रृंगारलेले पाण्यानी भरलेले घट ठेवले होते. अशाप्रकारे श्रृंगारलेल्या आपल्या नगरीला भगवान् श्रीकृष्ण परत आले असे ऐकल्याबरोबर, त्यावेळी निजणे, बसणे, जेवणे वगैरे जो जो व्यवहार कोणी करीत होता, तो तो व्यवहार तसाच सोडून देऊन एका मोठ्या हत्तीला पुढे करून ब्राह्मणासह शंखादिवाद्यांच्या घोषांत मोठ्या आनंदाने आपापल्या रथात बसून वसुदेव, अक्रूर, उग्रसेन, बलीराम, प्रद्युम्न, चारुदेष्ण व सांबादि मंडळी भगवंताला आणण्याकरिता सामोरी गेली, त्यावेळी हजारो वेश्याहि वस्त्रालंकार घालून निरनिराळ्या वाहनात निघाल्या. नट, नर्तक, गंधर्वादि मंडळीहि निघाली. सूतमागधादि बंदिजन भगवंताची चरित्रे गाऊं लागले. भगवान् श्रीकृष्णाची भेट झाल्यावर, भगवंतानीहि वृद्धांना नमन करून बरोबरीच्याशी आलिंगन देऊन त्यापेक्षा लहान जे होते त्यांच्याशी हस्तांदोलन व अत्यंत लहानाकडे किंवा स्त्रियादिकांकडे प्रेमाने अवलोकन करून सर्वांचा यथायोग्य आदर केला; नंतर गुरु, विप्र व वृद्ध मंडळी यांनी भगवंताला आशिर्वाद दिल्यावर आपल्या मंदिरात जाण्याकरिता भगवान् राजमार्गाने आपल्या राजमंदिराकडे निघाले असता नगरवासी स्त्रियांनीहि आपआपल्या घराच्या गच्चीवर चढून भगवंताचे दर्शन घेतले.*

**एवंभूतां नगरीं प्राप्तं श्रीकृष्णं श्रुत्वा वसुदेवोऽक्रूरउग्रसेनो रामः प्रद्युम्नश्चारुदेष्णः सांबादयो हर्षेण त्यक्तशयनासनभोजनाः संतः हस्तिश्रेष्ठं पुरःकृत्वा ब्राह्मणैः शंखतूर्यादि वाद्यघोषेण च सहरथैः प्रत्युज्जग्मुः ।**

**तथा शतशो वेश्याः स्वलंकृतायानैर्जग्मुः । नटनर्तकगंधर्वाश्चजग्मुः ।**

**सूतमागधबंदिनो भगच्चारितानि गायन्ति स्म ।**

**श्रीकृष्णोऽपि नमनालिंगन-करस्पर्श-हास्यावलोकनैर्यथायोग्यं सुहृदां पौरजनानां सर्वेषां सम्मानं चक्रे ।**

**ततो गुरुविप्रवृद्धादिभिराशीर्भिर्युज्यमानं श्रीकृष्णं राजमार्गं गतं हर्म्यारूढाः पुरस्त्रियो ददृशुः ॥**

॥ पद ॥

धन्य धन्य तेचि पुरुष धन्य त्याचि नारी[१] । हृदयिं धरुनि पूजितातित नित्य पूतनारी[२] ॥ध्रु.॥

यम[३]नियमादिक[४] करिती त्यांस आकळेना[५] ।

*(१) स्त्रिया (२) श्रीकृष्णाला (३) अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य, अपरिग्रह इत्यादिकास यम म्हणतात. मुख्यतः मनाच्या निरोधाला साधकाने यम समजावे. (४) शौच, स्नानादि नियम होत. हे इंद्रियाच्या निरोधाला मदत करितात. (५) सांपडत नाही*

निगम[**] मान करिति सदा वृत्ति[१] त्या कळेना ॥ धन्य धन्य०॥१॥

अनक[२] विजड[३] सुऋत[४] सुतनु[५] शांत[६] निर्विकारी ।

युवति[७]चरण[८] स्मरुनि ह्मणति त्यास सदनचारी[९] ॥ धन्य धन्य० ॥२॥

निगमहृदय[१०] पूर्णब्रह्म सुजनसुमनोहारी[११]।

अलकावतिपतिकृपया[१२] आह्मि तदिय[१३] नारी[१४]। धन्य धन्य० ॥३॥३१॥

॥ ओव्या ॥

जरी द्वारकावासी जन । नित्य घेती अच्युतदर्शन । तरी तृप्त न होती नयन[१५] । श्रीधाम[१६] म्हणोन सहजची ॥३२॥

शिष्य म्हणे श्रीगुरुनाथा । विषयां आपातरमणीयता[१७] ।

आणि भगवान तंव विषय[१८] तत्त्वतां । यदर्थता[१९] साकारता जाहला ॥३३॥

तयाचेंचि होतां दरुशन । न कां तृप्त द्वारकावासी जन । ऐसा ऐकूनिया प्रश्न । सद्गुरु वचन बोलती ॥३४॥

॥ पद ॥

भगवंता म्हणसी विषय मूढतमबुद्धी[२०] । तुज नाहिं अझुनियां यशुमतिजभजनसिद्धी[२१] ॥धृ.॥

किति वटवट[२२] करिशी पढुनि शब्दगण[२३]अवधी[२४] । हरिभक्तिविणें वेदान्त बोलणें अविधी[२५] ॥१॥

कामादिक रिपुंना[२६] जो वैराग्यें न वधी[२७] ।

*(**) वेदप्रमाण मानून.(१) सदा पठण किंवा निगमनाने म्हणजे वेदातील तत्वमसि महावाक्याच्याविचाराने उत्पन्न होणारी वृत्ति ती जे सारखी लावतात किंवा तिच्या योगाने जे अनुसंधान करितात (२) अन् + अक दुःखरहित म्हणजे सुखरूप (३) जडरहित म्हणजे चेतन (४) अत्यंत अविनाशी (५) अनध्यस्त शरीरधारी (६) वृत्तिरहित (७) स्त्रिया (८) त्याचे पाय आठवून (९) गृहस्थाश्रमी (१०) वेदाचे सार, वेदगुह्य (११) सज्ञनांच्या सात्विक मनाला हरण करणारा (१२) श्रीज्ञानेश्वर महाराजांचे कृपेने (१३) त्याच्या (१४) स्त्रिया (१५) डोळे (१६) सौंदर्याचे माहेरघर (१७) क्षणभर तेवढ्यापुरते सुंदर वाटणे (१८) इंद्रियाने कळणारा, इंद्रियग्राह्य (१९) ज्याकरिता (२०) अत्यंत जड बुध्दीचा (२१) यशोदेच्या मुलाच्या म्हणजे श्रीकृष्णाच्या भजनाने मिळणारा लाभ (२२) बडबड (२३) शाब्दिक शास्त्र (२४) मर्यादित, अल्प, वरवर (२५) शास्त्रनिषिध्द (२६) शत्रुंना (२७) मारीत नाहीं*

परि होत पतन[२] जो तर्ककर्कशें[३] नवधी[४] ॥२॥

चाल ॥ बहु तुला बोलिलों वाणी[५] साजिरी[६] । परि तुझी विषें[७] भरली ही वाग्झरी[८] ॥

चाल पहिली ॥ करूं नको कुतर्कें व्यर्थ मती ही गद्धी[९] । तुज नाहिं अझुनियां०॥१॥

विषयांचा येतो वीट भोग निज म्हणुनी । (य३-१६५)

मन चंचल घडिघडि इच्छित नूतन[१०] गणुनी । विषयींहि राहत ब्रह्मसुखचि जरि भरुनी ।

स्थिरतेवांचुनि मन नेघे साक्षात्करुनी ॥

चाल ॥ आपणापरिस विषयांनां तुच्छता । म्हणोनियां वीट येतो कीं तत्वतां ॥

चाल पहिली ॥ आपली आवडी वरिष्ट म्हणती सद्धी[११] । तुज नाहिं अझुनियां ॥२॥

तो आत्मा श्रीहरि चेतनकंचनगाभा[१२] । ही कृष्णतनू[१३] भूषणसम[१४] ब्रह्मिक[१५] शोभा ।

असि परम प्रेमास्पद[१६] मन ही स्थिर कर भा[१७] । विसरेल कोण विज्ञात निगमसंदर्भा[१८] ॥

चाल ॥ हा विवर्त[१९] परि अध्यासा[२०] नावळे[२१] ॥ यद्यशुमति[२२] साजवि[२३] प्रेमें जांवळें ॥

चाल पहिली ॥ म्हणुनी अतृप्त द्वारकौकसांची[२४] सद्धी[२५] ॥ तुज नाहिं अझुनियां० ॥३॥

**श्री अलकावतिपति तात गुरू शिव भोळा । श्रिततनुजदैन्य[२६] अवलोकी सकरुणडोळा[२७] ।**
**तै सापडला समजुनि सृात्सुिखगोळा[२८] । अन्वये[२९] पहावा कांतगुरुभजनसोहळा[३०] ॥ चाल ॥**

*(२) भ्रष्ट (३) तर्काच्या कठोरपणामुळे, शुष्कपणामुळे (४) नवीन नवीन बुद्धितर्क लढविणारा (५) उपदेशामृत वचन (६) सुंदर (७) प्राणघातक कुविचाराने (८) वाणीचा प्रवाह (९) गधडी, मठ्ठ (१०) नवी (११) शहाणे, विवेकी (१२) चैतन्यरूपी सुवर्णाचा सारभाग (१३) कृष्णशरीर (१४) अलंकाराप्रमाणे (१५) ब्रह्माची, ब्रह्माचे ठिकाणी (१६) निःसीम प्रेमाचे स्थान (१७) ज्ञान, बुद्धि (१८) संपूर्ण वेदाचा समन्वय ज्याचे ठिकाणी आहे, वेदप्रतिपाद्य (१९) भिन्नपणे होणारा भास (२०) भ्रमापासून झालेला, भ्रमाला (२१) सापडत नाही (२२) ज्याचे यशोदा (२३) विंचरून वगैरे व्यवस्थित नीटनेटके करणे (२४) द्वारकेतील जनांची (२५) शुद्धबुद्धि (२६) शरण आलेल्या पुत्राची दीन स्थिति (२७) करुणादृष्टीने (२८) सृदिानंदघन (२९) सर्वव्यापक (३०) श्रीकृष्ण व गुरु यांच्या भक्तीचा आनंद*

**चाल ॥ हें भाग्य ज्यांस वैराग्य त्या प्रती । हें ओळखूनि मुनि आले सद्गती[१] ॥**
**चाल पहिली ॥ तूं भज गुरु हरि निज कळुनि समाधी[२]संधी । तुज नाहिं अज्ञुनियां० ॥४॥ भगवंता०॥ ३५॥**

**॥ गीति ॥**

**शिष्य म्हणे अकलंका[३] हरली शंका समस्त ही माझी ॥**
**आतां करुणेनें प्रभु कळवितील पुढिल वृत्त सुसमाजीं[४] ॥३६॥**

**॥ ओव्या ॥**

**सद्गुरू म्हणती ऐक वचन । जया हरीचें हृदयस्थान[५] । कमला शोभवी[६] आपण । शोभा पाऊन मुक्तित्वें[७] ॥ ३७॥**
**यास्तव मिसळतां हृदयालिंगनीं[८] । कामनापूर्ती[९] सहजेक्षणीं[१०] ।**
**सुंदर वदन पाहता नयनीं । रूपा[११] सन्यसुनी[१२] मन राहे ॥३८॥**
**बाहूं आश्रित लोकपाळ[१३] । म्हणोनि भक्तां सर्व दिग्मंगळ[१४] ।**
**आणि निर्गुण जाणोनि सगुण वेल्हाळ[१५] । अति उतावेळ[१६] जे गाती ॥३९॥**
**ऐसिया भक्तांचें अधिष्ठान[१७] । ज्या प्रभूचे चारु[१८] चरण । तयाचे होतां संघट्टण[१९] । सत्संगें जीवपण हारपे ॥४०॥**

*(१) सज्ज्नांच्या गतीला (२) समाधि व संधि किंवा संधिदशेतील समाधि अवस्था - संधि म्हणजे दोन वृत्ति किंवा दोन अवस्था यांच्या भासामधील निर्विकार दशा (३) कलंक किंवा दोषरहिता (४) सज्ज्नांच्या समाजात (५) वक्षस्थळ (६) शोभिवंत करिते (७) मुक्तपणाने (८) हृदयाने आलिंगन देऊन (९) इच्छा पूर्ण होणे (१०) सहज कृपादृष्टीने पाहिले असता (११) रूपविषयाला (१२) सोडून देऊन (१३) ज्याच्या आश्रयाने इंद्रादि लोकपाळ राहतात (१४) दिशा मंगलरूप निर्भय (१५) सुंदर (१६) उतावळीने, उत्कंठेने (१७) राहण्याचे ठिकाण (१८) सुंदर (१९) नेहमी सहवास*

**॥ संस्कृत- गद्य ॥**

**एवं हरौ[१] बद्धसौहृदैरातपत्रव्यजनैर् मंडिताऽर्क सनक्षत्र-चंद्र-इन्द्रचाप-वैद्युतैर्यथा मेघाश्छत्रचामरैः कुसुमवर्षैः पीतांबरेण वनमालया च पथि हरिर्बभौ ।**
**एवंभूतः कृष्णः पितृगृहं प्रविष्टो मातृभिरालिंगितःसन् देवकीप्रमुखा मातृर्ववन्दे । (य३-१६६)**
**ववंद इति[२] मातृसौंदर्यादरविशेषज्ञापनार्थम् उक्तम् ।**
**सौंदर्यं नाम पातिव्रत्यम् ओजः ।**
**आदरविशेषो नाम शुद्धबुद्धिः ।**
**शुद्धबुद्धिं विना गर्भे ब्रह्मण आवेशो भवितुम् अशक्यत्वात् ।**
**न च अनादरणीयायां शुक्तौ मौक्तिकं यथा भवति तथा हरिर्मातृगर्भ इति वाच्यम् ।**
**देवैर्मातुः कृतादरात् ।**
**'देवक्यां देवरूपिण्यां'' इति वचन्ाा ।**
**नापि यथा शुक्तावप्रयासं विना मौक्तिकं भवति तथा गर्भे हरेरागमनम् ।**
**निर्गुणतया ब्रह्मभावेन, सगुणतया पुत्रभावेन च चिंतनरूपेण प्रयतनात् ।**
**'युवां मां पुत्रभावेन ब्रह्मभावेन चासकृत् ।**

**चिन्तयन्तौ कृतस्नेहौ यास्येथे मद्गतिं पराम्' ॥**
**एतद्वक्ष्यमाणं भगवद्वचनमेव यतने प्रमाणम् ।**
**'जीवानामिव न धातुसंबंध' इति श्रीधरटीकोक्तेश्च शुद्धबुद्धावेव भगवदाविर्भाव इत्यादरणीयत्वं सिद्धम् ।**
**विशेषपदस्तु कर्मणा शुद्धबुद्धौ त्वनुभवेनात्मनो भक्त्या ऽनध्यस्तविवर्तरूपस्य भगवच्छरीरस्य चाविर्भाव इति विशेषः ।**
**ततः स्नेहस्नुतपयोधरास्ताः पुत्रमंकं समारोप्य नेत्रोदकैः सिषिचुः ।**
**सर्वासामेव शुद्धबुद्धित्वात् सापत्न्यभावरहिताः परमेश्वरं पुत्रं मन्यमानाः स्नेहस्नुतपयोधराः क्लेशरहितत्वादिति बोध्यम्।**
**अथ यत्र स्त्रीणाम् अष्टोत्तरशताधिकानां षोडशसहस्राणां प्रासादास्तत्स्वगृहं प्राविशत् ॥**

श्रीगुरू म्हणाले, याप्रमाणें परमेश्वराची लीला अगाध आहे.

*(१) गद्यार्थ – याप्रमाणे ज्यांचे भगवंताचे ठिकाणी अत्यंत प्रेम होते, त्यांनी भगवंतावर छत्रचामरे धारण केली असता, सूर्य, नक्षत्र, चंद्र, इंद्रधनुष्य व वीज चमकणे ह्या सर्व गोष्टीसह एका काली राहून यांच्या योगाने मेघ जसे शोभावे, त्याप्रमाणे, छत्रचामर, पुष्पवर्षाव, पीतांबराची शोभा व वनमाला यांच्यायोगाने भगवान् रस्त्यातून जात असताना शोभले. अशा प्रकारे भगवान् प्रथम वसुदेवाच्या मंदिरात प्रविष्ट झाले. देवकी इत्यादि मातांनी त्यांना आलिंगन दिले व भगवंतानीहि त्या सर्वांना नमस्कार केला. यात ववंद म्हणजे वंदन केले असे जे पद आहे (२) ते भगवंताच्या आईच्या सौंदर्य व आदरविशेषाला सुचविणारे आहे. येथे सौंदर्य म्हणजे पातिव्रत्यतेज व आदरविशेष म्हणजे शुद्धबुद्धि असे समजावयाचे कारण विशेष शुद्धबुद्धीवाचून गर्भामध्ये परमात्म्याचा आवेश होणे शक्य नाही. आता कोणी असे म्हणतील की, जिच्याविषयी आपल्याला आदर वाटत नाही अशा शिंपेच्या पोटी जसे मोती होतात; त्याप्रमाणे देवकीच्या पोटी भगवान् आले यात देवकीला आदरणीय मानण्याचे कारण नाही. पण हे म्हणणे बरोबर नाही. कारण देवांनी देखील देवकीचा स्तुतिरूप गौरव करून तिच्याबद्दल पूज्यभाव दाखविला व भगवान् गर्भात आले तेव्हा देवकी भगवद्रूप झाली होती असे भागवतात वचन आहे. ज्याप्रमाणे शिंपेच्या ठिकाणी काही एक श्रम न करता आपण मोती उत्पन्न होतांना पाहतो, त्याप्रमाणे कांही एक श्रम न करताच भगवान् देवकीच्या गर्भात आले असेहि नाही तुम्ही माझे पुत्रभावाने व ब्रह्मभावाने सतत चिंतन करून प्रेम केल्यामुळे माझ्या स्वरूपाला प्राप्त व्हाल हे भगवंताचे वचन पूर्वी वसुदेव देवकीनी ब्रह्मभावाने म्हणजे निर्गुण स्वरूपाने व पुत्रभावाने म्हणजे सगुणस्वरूपाचे ठिकाणी पुत्रभाव ठेवून चिंतनरूपी प्रयत्न केल्याचे सांगत आहे. 'भगवदवताराचे ठिकाणी जीवाप्रमाणे धातूचा संबंध नाही' असे श्रीधराचार्यानीहि आपल्या टीकेत म्हटले आहे म्हणून अत्यंत शुद्धबुद्धीतच परमेश्वर अवतीर्ण होतो व देवकीच्या ठिकाणी तशी बुद्धी होती म्हणूनच देवकीचे ठिकाणी पूज्यत्व, आदरणीयत्व सिद्ध आहे. गद्यात विशेष हे जे पद आहे त्याचा अर्थ असा आहे की, कर्माने बुद्धि शुद्ध होऊन त्याच्या योगाने आत्मानुभव आल्यावर भक्तीच्या योगाने ब्रह्मरूप अशा सगुण भगवंताचा अविर्भाव होतो. नंतर पुत्रप्रेमाने ज्यांच्या स्तनातून दुग्धधारा वाहू लागल्या अशा त्या देवकी आदि भगवंताच्या मातांनी, भगवंताला मांडीवर घेऊन नेत्राश्रूंनी अभिषेक केला. सर्वांचीच बुद्धि शुद्ध झाली असल्यामुळे सापत्नभाव कोणालाहि उत्पन्न झाला नाही. सर्वजण भगवंताला पुत्र मानू लागल्या, सर्वांच्याच स्तनातून दुग्धधारा वाहू लागल्या, व सर्वजण क्लेशरहित झाल्यानंतर भगवान् ज्या मंदिरात सोळा हजार एकशे आठ स्त्रियांची मंदिरे होती, त्या आपल्या मंदिरात प्रवेश करिते झाले.*

**॥ पद / बारामासी ॥**

**महिषीवचन[१] :-**

**पिया[२] परदेस[३] गयेरी[४] । आपसमें[५] सखि पगली[६] भयेरी[७] । पिया परदेस ॥ध्रु० ॥**
**मृगशिर[८] महिना शीत[९] सहन करी जल जमुना गहरीमा[१०] ।**
**न्हाय[११] प्रीति कात्यायनि पूजी कर[१२] हरि कब[१३] गहिरीमा[१४] । परदेस गयेरी ॥१॥**

*(१) मुख्य राण्यांचे वचन (२) प्रिय (३) परदेशास (४) गेले (५) आपआपणात (६) वेड्या (७) झाल्या (८) मार्गशीर्ष (९) थंडी (१०) अत्यंत खोल (११) स्नान करून (१२) हात (१३) केव्हां (१४) ग्रहण करतील.*

**पूसमासमों[१] थंड न जानहि सूरज[२] ध्यात रहीरी[३] ।**
**अबलों[४] आय[५] पियाकी[६] साजनी[७] बात[८] काउ[९] न कहेरी[१०] । परदेस गयेरी ॥२॥**
**लाग[११] माघ तब गइ[१२] प्रयागजू[१३] गंगास्नान करेरी[१४] ।**
**जतरा[१५] धूंडत मिलत न प्यारा सखि अब कांह[१६] करीरी[१७] । परदेस गयेरी ॥३॥**

फागन[१८] फाग[१९] खेल सब नारी निजपति बहियां[२०] गहेरी ।
मै बैठी अकेली घरमों बात कोउं न कहेरी । परदेस गयेरी ॥४॥
चैत[२१] बसंत बगीचे मांही पादप[२२] फूल गयेरी ।
रात देख चांदनी साजनी बिरहदुख न सहेरी । परदेस गयेरी ॥५॥
लागि मास बैसाख जुवति[२३]पति संगति मधुवा[२४] पिवैरी ।
मै अपने घरमांहि अकेरी[२५] बिनुपिय जल न पवेरी[२६]। परदेस गयेरी ॥६॥ (य३-१६७)
अव्वल[२७] विरहताप[२८] उर[२९] भारी नाहीं जात सहेरी ।
जेठ धूप[३०] सवतीसहायक[३१] सखि मोर असु[३२] न रहेरी । परदेस गयेरी ॥७॥
मास आसाड[३३] मेघ गडगड करी जीको[३४] परम डरावे[३५] ।
काहे सखी संदेसा[३६] पियको[३७] कोहु[३८] लेहिं[३९] नहि आवे । परदेस गयेरी ॥८॥
सावन[४०] जीवन[४१] बरखे[४२] अतितर तनक[४३]न आस धरीरी ।
औरनि[४४] सदन हिंडोरा[४५] पियको[४६] हम[४७] घर बिरह[४८]परीरी[४९] । परदेस गयेरी ॥९॥

*(१) पौषमासात (२) सूर्य (३) राहिली (४) आतापर्यंत (५) येऊन (६) प्रियाची (७) साजणी (८) वार्ता (९) कोणी (१०) सांगितली (११) लागला तेव्हां (१२) गेली (१३) प्रयागाला (१४) केले (१५) यात्रा (१६) काय (१७) करूं ग (१८) फाल्गुन (१९) रंगोत्सव (२०) आपल्या पतीच्या बाहुमध्ये जाऊन (२१) चैत्र (२२) वृक्ष (२३) स्त्रिया (२४) पतीच्या समागमात अधरामृत पान (२५) एकटी (२६) पीत नाही (२७) अत्यंत (२८) विरहदुःख (२९) हृदयांत (३०) ज्येष्ठ महिन्यातले ऊन (३१) सवतीचे ज्याला साह्य आहे किंवा सवतीप्रमाणे दुःखात साह्य करणारे (३२) प्राण (३३) आषाढ (३४) जीवाला (३५) भीति उत्पन्न करिते (३६) बातमी, निरोप (३७) प्रियाचा (३८) कोणी (३९) घेऊन येत नाही (४०) श्रावण (४१) पाणी, पाऊस (४२) वर्षाव देतो (४३) किंचितहि (४४) दुसऱ्याच्या घरी (४५) पाळणा (४६) प्रियाला (४७) आमच्या घरी (४८) वियोग.(४९) पडला आहे*

भादोंमास[२] आस[३] सखि कहलों[४] कौन उपाय रचूंरी[५] ।
शिवगल[६] नील साधन सहायले[७] अब किमपी[८] न बचूंरी । परदेस गयेरी ॥१०॥
लागि[९] कुंवार[१०] शकुन[११] की बाता[१२] आइ शकुंतहिं[१३] बोले ।
पियसंदेशा[१४] सखिमुखि[१५] सुनि[१६] सुनि पियारी[१७] मनमों[१८] डोले ॥ परदेस गयेरी ॥११॥
पियमिल[१९] कार्तिकमास रास[२०] रचि आस पूर्ण करदीनी ।
अलकावतिपतिनंदिनि[२१] ब्रतफल[२२] पाय[२३] ब्रह्मसुख[२४] चीनी । पिया[२] परदेस गयेरी ॥१२॥
आपसमें सखि पगली भयेरी । पिया परदेस ॥ध्रु० ॥ ॥४१॥

॥ ओव्या ॥

एवं अनुभवें[२५] श्रीकृष्ण पती । दुरूनि पाहतां सकल युवती । धृतव्रता[२४] महासती[२५] । महोत्सवमती[२८] ऊठल्या ॥४२॥
करितां प्रियाचें[२९] आलिंगन । मध्यें न साहे अंतःकरण ।
म्हणजे जीवब्रह्मैक्यपण[३०] । ही लिहिती खूण श्रीधर स्वामी ॥४३॥
न साहे मनोव्यवधान[३१] । तेथ कवण गणी[३२] वसन[३३] आसन[३४] ।

*(२) भाद्रपद महिना (३) आशा (४) कोठपर्यंत (५) करूं ग (६) शिवाचे गळ्याचे ठिकाणी निळेपणा आणणारे (हालाहल विष) (७) साह्याला घेते (८) आता घटकाभरहि वाचू शकत नाही (९) लागल्याबरोबर (१०) आश्विन महिना (११) शुभफल दर्शविणारे शकून (१२) गोष्टी (१३) शकूंत पक्षी (१४) प्रियाचा निरोप (१५) सखीच्या मुखाने (१६) ऐकून (१७) प्रिया (१८) मनात डोलू लागली (१९) प्रियाने भेट देऊन (२०) रास रचून आशा पूर्ण केली (२१) श्रीज्ञानेश्वर महाराजांची कन्या (२२) व्रताचे (कात्यायनी व्रताचे) फळ (२३) पावून (२४) परमानंद गोडी भोगली (२५) या अनुभवाप्रमाणे (२६) पति परगावी गेला असता स्त्रियांनी व्रतस्थ राहावे म्हणजे मंगलस्नानादि करू नये इत्यादि नियम पालन करून व्रतस्थ असलेल्या (२७) महापतिव्रता (२८) श्रीकृष्णाच्या आगमनाने ज्यांच्या मनाला अत्यंत थोर उत्सवाचा आनंद झाला आहे अशा (२९) श्रीकृष्णाला आलिंगन देताना अंतःकरणाचा पडदा देखील सहन होत नव्हता (३०) जीवभाव नाहिसा होऊन पूर्ण ब्रह्माशी अगदी मिळून*

*गेल्या (३१) मनाचे अंतर (३२) कोण पाहतो, तिकडे लक्ष देतो (३३) वस्त्र.(३४) बसण*

**क्षुत्पिपासा[२] जलपानाशन[३] । ऊठल्या विसरून सर्वही ॥४४॥**
**देशांतराहूनि[४] निजकांत[५] । गृहीं[६] येतांक्षणीं समस्त । विसरूनि लोकांत[७] एकांत । जीवें आलिंगित[८] धांवल्या ॥४५॥**
**निगममर्यादा[९] अधोवदना[१०] । पुष्टौ[११] शार्ङ्ग्यंगालिंगना[१२] ।**
**निवृत्तमदना[१३] मदनजनना[१४] । हृदयसदना[१५] सत्कारिती[१६] ॥४६॥**
**क्रीडा[१७]शरीरसंस्कृती[१८] । पहाणें समाजोत्सवस्थिती[१९] ।**
**हास्य[२०] आणि परगृहगती[२१] । हें सर्व त्यजावे पति ग्रामीं[२२] नसतां ॥४७॥**
**ऐसें याज्ञवल्क्यवचन । तैशाचि आचरित होत्या आपण ।**
**तैशा धृतव्रताचि[२३] उठोन । लज्जित[२४] अधोवदन उभ्या ॥४८॥**

*(१) बसणे (२) क्षुधा, तृषा (३) पाणी पिणे, जेवणे (४) परगावाहून (५) आपला पति श्रीकृष्ण (६) घरी येता बरोबर (७) जनसमुदाय (८) जीवाने आलिंगन देत (९) वेदशास्त्राची मर्यादा पाळणाऱ्या म्हणजे लोकान्तांत स्त्रियांनी आपल्या पतीशी ज्या लज्ज्ञायुक्त मर्यादेने वागावे म्हणून शास्त्राने सांगितले आहे तशाप्रमाणे वागणाऱ्या (१०) त्यामुळे लज्ज्ञेने खाली माना घातलेल्या (११) एकान्तांत प्रेमाचे दोन प्रकार आहेत. एक मर्यादाप्रेम व दुसरे पुष्टीप्रेम. ज्या प्रेमाला निर्बंध असतात ते वर सांगितलेले मर्यादाप्रेम होय. ज्या प्रेमाला निर्बंध राहत नाही असे एकान्तामधील प्रेम पुष्टिप्रेम म्हटले जाते. (१२) श्रीकृष्णाच्या देहाला आलिंगन देणाऱ्या (१३) ज्यांच्या किंवा ज्याचा विषय काम नाही अशा किंवा असा हे विशेषण कृष्ण व कृष्ण स्त्रिया या दोघाकडेहि लावता येते. (१४) मदनाला (प्रद्युम्नाला) जन्म देणाऱ्या भगवंताला (१५) आपल्या हृदयरूपी घरात किंवा आपले हृदय ज्यांनी भगवंताकरिता राहण्याचे घर बनविले आहे अशा त्या स्त्रिया (१६) आदर करत्या झाल्या (१७) जलक्रीडा इत्यादि क्रीडा (१८) मंगलस्नानादि शरीर शुद्धीचे प्रकार (१९) लोकसमाज पाहणे किंवा समाजातील नानाप्रकारचे उत्सव पाहणे (२०) हासणे (२१) दुसऱ्याचे घरी जाणे (२२) गावी नसता, परगावी गेला असता (२३) पति परगावी गेला असता स्त्रियांनी व्रतस्थ राहावे म्हणजे मंगलस्नानादि करू नये इत्यादि नियम पालन करून व्रतस्थ असलेल्या (२४) लज्ज्ञेने युक्त*

**सदनीं येतां परम प्रिय । ज्यांचा गंभीर[१] अभिप्राय । ऐशिया त्या आधी स्वयें । बुद्धीनें[२] मिळती श्रीहरीतें ॥४९॥**
**ब्रह्मणि[३] न चले फलव्याप्ती[४] । म्हणोनी साधिती[५] वृत्तिव्याप्ति[६] ।**
**ऐशा कृष्णदर्शनापूर्वी श्रीधर म्हणती । येणें भगवदाकारवृत्ति[७] द्योतिली ॥५०॥**
**आधींच मिळाल्या आत्मदर्शनें । ये व्यतिरेकाचे[८] खुणें । (य३-१६८)अन्वयें[९] जग ब्रह्मपणें । पाहती दृष्टीनें हरीतें ॥५१॥**
**तंव शंका करी शिष्य आपण । अन्वयें[१०] ब्रह्मत्वें जगदर्शन ।**
**तरी हा एक[११] पति श्रीकृष्ण । ऐसें त्यांचें मन राहिलें केंवी ॥५२॥**

**॥ अभंग ॥**

**'पतिव्रता नेणें आणिकांची स्तुती । सर्वभावें पति ध्यानीं मनीं' ॥१॥**
**तुकारामवाणी परम प्रमाण । अन्यथा[१२] ते जाण कदा नोहे ॥२॥**
**मुक्त झालियाही निषिद्धाचरण[१३] । युक्त[१४] नोहे जाण दीनबंधो ॥३॥**
**ज्ञानेश्वरसुत सशंकितबुद्धी[१५] । करितील शुद्धी[१६] गुरुदेव ॥४॥५३॥**

*(१) ज्यांच्या मनातील विचार अत्यंत गुप्त पण गर्भित दिसत होता (२) शुद्धबुद्धीने (३) ब्रह्मस्वरूप जाणण्याकरिता (४) इतर जगतातील पदार्थ जाणण्याकरिता उपयोगी पडणारी अंतःकरणाची ज्ञातृवृत्ति (५) घेतात, उपयोगात आणतात (६) प्रमातृत्वालासोडून नुसत्यावृत्तीनेजाणणे म्हणजे ज्याठिकाणी मी जाणले असे जाणतेपण उत्पन्न होत नाही (७) भगवत्स्वरूप झालेली वृत्तीची स्थिति (८) नुसत्या वृत्तीने जाणणे म्हणजे मी भगवंताला किंवा ब्रह्माला जाणले अशी जाणीव न स्फुरता जे जाणणे त्यालाच वृत्तिव्याप्ति म्हणतात. हेच आत्मदर्शन होय. यात जीव परमेश्वराशी ऐक्य पावतो. अशा वृत्तिव्याप्तीने ब्रह्माशी ऐक्य पावणे यालाच व्यतिरेकज्ञान म्हणतात. ही निर्गुण ब्रह्मस्थिति होय (९) व्यतिरेकाने आत्म्याचा अनुभव घेतल्यावर, तेच आत्मस्वरूप सर्व जगात म्हणजे नामरूपात भरले आहे, त्यावाचून नामरूपात दुसरे काही नाही असे पाहणे याला अन्वय म्हणतात. या अन्वयाने जगच ब्रह्मरूप भासू लागले व याच अन्वय दृष्टीने सगुणश्रीहरीला पाहतात (१०) अन्वयाने जग*

*ब्रह्मस्वरूप भासते (११) श्रीकृष्णच एक पति असा त्यांचा समज कसा राहू शकतो (१२) खोटी (१३) वेदविरुद्ध (१४) योग्य (१५) शंकायुक्त बुद्धीचा (१६) शंकानिरसन.*

॥ ओव्या ॥

ऐसी शंका करूनि श्रवण । तापलें[१]गुरूचें अंतःकरण । परी काम[२]प्रश्न वर दत्त म्हणून । शांत करून घेतलें ॥५४॥

मग बाळका यावी सद्बुद्धि । म्हणोनि ताडी[३] जनक[४] कृपानिधि ।

ताडणी[५] गुण बहुविधी[६] । लालनीं[७] दोष हें सिद्धि व्याकरणमहाभाष्यें[८] ॥५५॥

*(टीप :-५,६- 'लालने बहवो दोषास्ताडने बहवो गुणाः')*

असों श्रीगुरु म्हणती तुझी बुद्धि । आजि जाहली दोषनिधी[९] ।

किंवा पापकर्मे जो जाहला विधी[१०] । तो तव बुद्धिनिर्माता[११] ॥५६॥

पूर्वी जो कांहीं लाड केला ।तो आजि भला फळा आला ।कांहीं न भीसी बोलावयाला । इच्छिला तेंचि बोलिसी ॥५७॥

परि हे शंका न प्रहरितां[१२] । ऐसाचि गुरुसंप्रदाय निघेल तत्वतां । म्हणोनि उत्तर आतां । योग्य तेवढें देणें असे ॥५८॥

परी माझी एवढी विनवणी । पुढती ऐसी शंका येतां मनीं ।

तरी तूं जाय उठूनि सदनीं । कुतर्केंकरूनि[१३] अधमाधिकारी[१४] ॥५९॥

वेदें जो धर्म सांगितलाहे । तेथ जो कुतर्के[१५] दोष पाहे ।

तया न शुभलोक[१६] ना मुक्ति आहे । नरक लवलाहे नेमस्त[१७] ॥६०॥

तथापि ऐकें प्रत्युत्तर । अनध्स्तविवर्त[१८] शार्ङ्गधर ।

चित्प्रतिबिम्बावच्छिन्नारोपितबिम्बत्वशरीर[१९] । नोहे वरिष्ठ भर्तार अन्य त्याहुनी ॥६१॥

*(१) संतप्त झाले, क्षुब्ध झाले (२) वाटेल तो प्रश्न विचार म्हणून वर दिला असल्यामुळे (३) शिक्षा करी (४) बाप (५) शिक्षा करण्याने (६) पुष्कळ (७) प्रेम करण्यात (८) लालनेबहवो दोषा स्ताडने बहुवो गुणाः (९) दुर्गुणाचा सागर (१०) ब्रह्मदेव (११) बुद्धि उत्पन्न करणारा (१२) नाहिशी न केल्यास, तिचे समाधान न केल्यास (१३) कुतर्कामुळे (१४) अत्यंत कनिष्ठ अधिकारी, पूर्वीच्या पापकर्मामुळेच वेदविरुद्ध तर्क करण्याची प्रवृत्ति होते म्हणून असा कुतर्क करणारा अधमाधिकारी म्हटलेला आहे. तो वेदान्त श्रवण करण्यास योग्यनाही. (१५) भलत्याच रितीचा तर्क करून (१६) स्वर्गादि उत्तम लोक (१७) ठेवलेला, नेमलेला (१८) ब्रह्मस्वरूपाशी विरोधी नाही म्हणून ब्रह्मज्ञानाने मिथ्या न ठरणारा (१९) प्रतिबिंबरूप जीवचैतन्याच्या अपेक्षेने बिंबत्वरूप शरीर धारण करणारा.*

'न तस्य कश्चित्पतिरस्तिलोक'[१] इति । ऐसी श्वेताश्वतरश्रुती ।

''वासुदेवः[२]पुमानेकः स्त्रीरूपम् इतरज्जगदिति'' । श्रुत्यनुकूलस्मृतिप्रमाणता[३] ॥६२॥

भूषणें नथनी[४] बुगडी बाळी । ही एका सोनियाचीं सगळीं । परी कानीं नथनीं गळां बाळी । नाकीं बुगडी कोण घाली ॥६३॥

**(य३-१६९)** तेंवी जग हे स्वभावें । परमेश्वरचि आघवें । परी वर्तन[५] तें संभवे । यथायोग्यची ॥६४॥

देखे अन्न आणि विष्ठा साची । उपजे एकाचि धान्याची । परी रूढी अन्नभक्षणाची । विष्ठा कोणी न भक्षे ॥६५॥

कीं मीठ आणि नदीचें पाणी । होती एकाचि उदकांतुनी । परी शाखा[६] भरिजेति लवणीं[७]। नादेय[८] सर्वपरी वावरे ॥६६॥

तेंवी ब्रह्मपणें पाहतां । तरी जग ब्रह्मची तत्त्वतां । परी भोगप्रसंग[९] येतां । विहित[१०] सर्वथा सोडूं नये ॥६७॥

जरी ब्रह्मज्ञानीयाच्या ठायीं । धर्माधर्म[११] कांहींच नाहीं ।

तरी अनंत[१२] जन्म जो धर्म केला पाही । तो[१३] धर्मीच लवलाही वर्तवी ॥६८॥

नातरी माता वृद्ध झाली । तिची कामवृत्ती समूळ गेली । म्हणोनि काय तरुण मुली । कुमारीच ठेवाव्या ॥६९॥

तैसा आपण सिद्ध जाहला । आणि जग अधर्मी बुडवूं लागला । तरी तया सिद्धपणाला । देव न म्हणतां नरक म्हणणें ॥७०॥ आणि ब्रह्मज्ञान झालियावरी । अधर्माची हांव[१४] धरी । तरी त्याहोनि संसारी । दुसरा कोण? ॥७१॥

कुत्तरब्रह्मज्ञान[१५] जया म्हणती । ते हे योग्य नोहे स्थिती ।

यास्तव स्त्रिया पाहूनि कृष्ण पती । पातिव्रत्यवृत्ति[१६] अनुसरल्या ॥७२॥

*(१) त्याचा कोणी दुसरा स्वामी नाही (२) वासुदेव हा एकच पुरुष असून सर्व जगत् स्त्रीरूप आहे (३) श्रुतीला अनुकूल*

*असलेली स्मृति प्रमाण असते (४) नथ (५) वागणे (६) भाज्या (७) मिठाने (८) नदीचे पाणी (९) विषयसेवनाचा प्रसंग (१०) शास्त्रमर्यादा (११) धर्माधर्माचे बंधन (१२) ब्रह्मज्ञान होण्यापूर्वी जो धर्माचरणाचा त्याला अभ्यास झाला (१३) धर्माचरणाकडेच त्याची प्रवृत्ति ठेवतो (१४) इच्छा (१५) श्वानवत् विधिनिषेधरहित वागणे (१६) पातिव्रत्य धर्माने भगवंताशी लगटल्या.*

एवं आधींच मिळाल्या आत्मपणें[१] । पुढतीं सगुणप्रेमीं[२] अंतःकरणें ।
मग सगुणसंयोगानुभवीं[३] नयनें[४] । आलिंगिती प्रियकरा ॥७३॥
मग विश्वरूप बाळकाप्रती[५] । घालोनि हरीच्या पायांवरुती । आपणही तीचि रीती । स्वीकारिती आवडी ॥७४॥
तेव्हां लज्ञावतीही असोन । पतिप्रेमें विवश[६] होऊन ।
रोधिलेंही[७] नयनीचें जीवन[८] । हळुहळू निघोन अभिषेकूं पाहे देवा ॥७५॥
<u>जरी भगवान समीप[९] सर्वकाळ । एकांतींही सुखें घडे मेळ[१०] ।</u>
<u>तरी नित्यनूतन[११] चरणयुगुळ । कवण भजनशीळ[१२] सोडूं इच्छी ॥ ७६॥</u>
जयाचा एक पाद[१३] जग । त्या जगासही विचित्र रंग । मग पूर्ण पादद्वय[१४] सानुराग[१५] । नित्यनूतन[११] कां न होती ॥७७॥
जेथूनि निघाली पुण्यगंगा[१६] । नित्य जगाच्या पापभंगा[१७] । त्या पादकमला प्रेमपरागा[१८] । नित्यनूतन कवण न म्हणे ॥७८॥ नित्यनूतन बद्धांची[१९] भ्रांती । नित्यनूतन[२०] मुक्तांची मुक्ति । आणि भगव्चारणस्थिति[२१] । कां नूतन नव्हें ॥७९॥
अहो चकोरासी कहीं । चंद्राचा वीट[२२] येत नाहीं । कीं खादाडासी लवलाही । भोजनवीट कदा नव्हे ॥८०॥ (य३.१७०)
कीं कामुकासी[२३]कामिनी । मंचकीं[२४]पाहिजे दिनयामिनी[२५]।
मग भगवद्भक्तां चक्रपाणी । पुरातन[२६]मनीं केंवि वाटे ॥८१॥
कमळीं राहे भ्रमरू । परी न सोडी तेथील आधारू । तेंवी नित्यनूतन प्रकारू । भगव्चारणाचा ॥८२॥

*(१) निर्गुण स्वरूपाने (२) सगुण श्रीहरीच्या प्रेमात (३) सगुण श्रीहरीच्या संयोगाच्या अनुभवात (४) डोळ्याने (५) जगद्रूप मुलाला (६) प्रेमवश (७) स्तंभित झालेले (८) पाणी (९) जवळ (१०) समागम (११) नित्य नवीन वाटणारे, वीट न येणारे (१२) सेवन करणारा, ज्याला अशा चरणाचे सेवन करण्याची गोडी लागली आहे तो (१३) अंश (१४) दोन पाय, दोन चरण (१५) प्रेमयुक्त (१६) भागीरथी (१७) पापक्षालन करणारी (१८) प्रेमाच्या केसराला, प्रेमाच्या मकरंदाला (१९) बद्धांना आपल्या जगद्भ्रांतीचा वीट येत नाही (२०) मुक्तांना मुक्ति नित्य आवडते (२१) भगवंताचे चरणाचा सहवास (२२) कंटाळा (२३) स्त्रीच्या ठिकाणी आसक्त असणाऱ्यास (२४) पलंगावर (२५) दिवसरात्र (२६) जुना, शिळा.*

नित्यनूतन[१] हरिपदसुख । प्रेमळ भक्त जाणती एक । येर तुजसमान मूर्ख । करुनी कुतर्क नागवती[२] ॥८३॥
'स्वामी म्हणे शिष्यासी । यावरी जरी संशय घेसी । तरी श्रीमुखांतरीं खासी । निश्चयेसी' ॥
ऐसी समर्थांची उक्ती । तुजही पाहिजे तेचि रीती । लत्तापुष्पें[३] समजे ज्याची मती । तो देव वचनवृत्ति[४] नायके ॥८४॥

॥ पद ॥

अतितर[५] चंचल[६] रमा[७] । त्यागुनि परि निज मान[८] न विसरे घडिभर पुरुषोत्तमा ॥ध्रु० ॥
जीस्तव जनता[९] श्रमा[१०] । पिटुनि[११] पाय किति करिति उपाया हरवुनि[१२] जीवितजमा[१३] ।
यति[१४] येतां आश्रमा[१५] । मागल कांहीं म्हणुनि न करिती जीस्तव[१६] वचनश्रमा[१७] ।
परि त्यासहि पाजी[१८] वमा[१९] । त्यागुनि परि निज० ॥१॥
इतुका सुंदरपणा । हरिचरणा मग सोडूं इच्छिल कोण आणिक अंगना[२०] ॥
जो मोही मुनिमना[२१] । योग याग जप भुलुनि नाचती शार्ङ्गीमंदिरांगना[२२] ।
ज्ञानेश्वरगुरुपद[२३] नमा । त्यागुनि परि निज० ॥२॥ ८५॥

॥ ओव्या ॥

येणें येणें प्रकारें । लीला धरिली यादवेंद्रें । भूभारभूतनरपतिशिरें[२४]। उडविलीं गगनीं ॥८६॥
भूमिभारउतारण[२५] । हें नव्हें मुख्य प्रयोजन[२६] । ऐसें मागां निरूपण । केलेंचि आहे ॥८७॥

*(१) अविट (२) आंचवतात, मुकतात (३) लाथरूपी पुष्पाने (४) शब्दाने (५) अत्यंत (६) अस्थिर (७) संपत्ति, लक्ष्मी (८) मोठेपणाचाा अभिमान (९) लोक (१०) कष्टाला, मेहनतीला (११) पायाने खेटे घालणे (१२) नाहिसे करून , झिजवून (१३) जीवितरूपी, आयुष्याची जमा, मुद्दल (१४) संन्यासी (१५) घरास (१६) जिच्याकरिता (१७) बोलण्याचे श्रम (१८) पाजिते*

*(१९) ओकारी (२०) स्त्री (२१) ऋषीच्या मनाला (२२) देवाच्या मंदिराच्या अंगणात (२३) श्रीगुरुज्ञानेश्वर महाराजांच्या चरणाला (२४) पृथ्वीला भारभूत झालेल्या राजांची शिरे (२५) भूमीचा भार कमी करणे (२६) अवताराचे कारण.*

**म्हणोनि शस्त्र करीं न धरितां । तया आपसांतचि द्वेष सर्वथा । उत्पन्न करोनि असतां[१] । संहारिलें ॥८८॥**
**जैसा वायू आपण । वेळवातें[१क] परस्पर घांसोन । जाळी अग्नि उत्पन्न करून । परी अलिप्तपण[२] सोडिना ॥८९॥**
**तैसा परस्पर उपजवूनि द्वेष । केला कुंभिनीभारनाश[३] । परी आपण अलिप्त[४] जगदीश । रमानिवास श्रीहरी ॥९०॥**
**म्हणसी संताच्याठायीं । द्वेषवृत्ति सर्वथा नाहीं । तरी उत्पन्न फणीशायी । करील कैसा? ॥९१॥**
**ययाचें हें समाधान । कीं वस्तुतः द्वेष दुर्जनीं उत्पन्न ।**
**संतीं युद्ध केलें धर्मेंकरून[५] । साक्षी[६] भगवान जगद्गुरू ॥९२॥**
**जो सूर्याकडे पाहोनि थुंके । (य३-१७१) तेणें त्याचेंचि वदन माखे[७] ।**
**तेंवी दुर्जन सज्जनीं द्वेष झोके । तो माघारा सरके[८] दुर्जनाचिवरी ॥९३॥**
**कां परतंत्र[९] आपुलिया क्रोधेंकरून । आपणचि पावे मरण ।**
**तेंवी सज्जनद्वेष करून । पावती मरण दुराचारी ॥९४॥**
**परी सज्जना साह्य देवो । म्हणोनि दुर्जनद्वेषें नव्हे अभिभवो[१०] । मग आपणचि विनाशभावो । प्राप्त करिती ॥९५॥**
**एवमानुषंगिक[११]प्रयोजन । आणि भक्तियोषित्कदंबीं[१२]रमण[१३]।**
**हीं मुख्य प्रयोजन खूण । पूर्वनिरूपणावरून जाणिजे ॥९६॥**

**॥ गद्य ॥**

ननु, भगवंताचें शरीर भूतकार्य[१४] आहे, असें पुष्कळ प्रमाणावरून म्हणतां येते व त्याचें ठिकाणीं रज्जुकृतबंधनाभावशक्ति[१५] योगानें आल्या आहेत असेंही म्हणण्याला पुष्कळ आधार आहे. कारण अनुगीतापर्वात अशी कथा आहे कीं, एकेवेळी अर्जुन व श्रीकृष्ण सभेंत बसलें असतां अर्जुनानें श्रीकृष्णाला विचारिलें कीं तुझा विश्वरूपादि मोठेपणा मी जाणतों.

*(१) दुष्टांना (२) निराळेपण, अकर्तेपण (३) पृथ्वीवरील भार नाहिसा (४) अकर्ता (५) धर्मानुसार (६) तटस्थ (७) भरते, लिप्त होते (८) परततो (९) दुसऱ्याच्या स्वाधीन असणारा, पराधीन (१०) पराभव, नाश (११) गौण (१२) भक्तिरूपी स्त्रीसमुदायात (१३) श्रीकृष्णाचे रमण (१४) पंचभूतांचे बनलेले, पांचभौतिक (१५) दाव्याने बांधले न जाणे ही शक्ति (१ क) बांबूला.*

परंतु त्वां केलेला उपदेश मी मनाच्या दौर्बल्यामुळें विसरून गेलों, तो फिरून मला समजून घ्यावासा वाटतो. तेव्हां श्रीकृष्ण म्हणाले, तूं मला अश्रद्दधान[१] व मूर्ख दिसतोस. मला पुनः त्या उपदेशाची आठवण होईलसें वाटत नाहीं. कारण, मी योगयुक्त[२] होऊन तुला खऱ्या धर्माचें ज्ञान करून दिलें होते. (अश्वमेधपर्व अध्या० १३ श्लोक १३ पर्यत ) येथें श्रीकृष्णानें आपल्याच मुखानें मला ज्ञान व ऐश्वर्य योगानें आलें होतें असें कबूल केलें आहे. पुनः, मोक्षधर्मांत 'या नारायणाच्या शरीराची ईश्वराच्या आठव्या अंशापासून उत्पत्ति असून तें कल्पांतीं परिवर्तते', असें भीष्माचार्यांनीं म्हटलें आहे; व 'परिवर्तते' म्हणजे 'नाश पावते', असा अर्थ चतुर्धरांनी केला आहे. ह्यावरूनही परमेश्वराचें शरीर उत्पत्तिनाशवान् असल्यामुळें भूतकार्य आहे आणि तें धर्माऽधर्मजन्यही[३] आहे. कारण योगवार्तिकांत विज्ञानभिक्षूंनीं वामनादि शरीरांचा प्रकृत्यापूरणानें[४] क्षणांत गगनव्यापित्व[५] विश्वरूपादि[६] परिणाम त्याच्या ठिकाणीं असलेल्या योगैश्वर्यास्तव[७] बोलिला आहे. आणि ते प्रकृत्यापूरण धर्माऽधर्मादिसापेक्ष[८] बोलिलें आहे. यद्यपि जात्यंतरपरिणाम[९] केवळ प्रकृतीनेंच[१०] होतो, तथापि धर्म[११] हा प्रकृतीच्या प्रतिबंधाचा[१२] निवर्तक[१३] (य३-१७२) असून अधर्म हा प्रतिबंधक[१४] आहे, असें योगसूत्रांत[१५] व त्याच्या भाष्यांत म्हटलें आहे.

*(१) अश्रद्धावान् (२) योगाच्या सामर्थ्याने (३) पुण्यपापाने उत्पन्न झालेले (४) उत्पन्न झालेल्या शरीरात जी प्रकृति असते त्या प्रकृतीत दुसऱ्या प्रकृतीचा पुरवठा करून, पहिल्या शरीरात इच्छेप्रमाणे बदल करता येतो याला योगशास्त्रात प्रकृत्यापूरण म्हटले आहे. (५) सर्व आकाश व्यापून टाकणे (६) विश्वरूप धारण करणे (७) योगाने प्राप्त झालेल्या सामर्थ्याने (८) पापपुण्यानुसार (९) शरीराचा बदल (१०) प्रकृतीच्या बदलण्याने (११) धर्माचरण (१२) ज्याच्यामुळे प्रकृतीचा बदल करण्यास प्रतिबंध होतो एकदा निर्माण झालेली शरीरप्रकृति बदलू देत नाही (१३) दूर करणारा (१४) प्रतिबंध उत्पन्न करणारा (१५)*

*(१५.मूळ पुस्तकातीलातील टीप :-*
*'जात्यंतर परिणामः प्रकृत्यापूरात्' (योगसूत्र कैवल्यपाद सूत्र २)*
*''निमित्तमप्रयोजकं प्रकृतिनावरणभेदस्तु ततः क्षेत्रिकवत्''(सू.३)*
*भाष्य -*
*यथा च क्षेत्रिकः केदारादपांपूर्णात् केदारांतरम् पिप्लावयिषुः समं निम्नं निम्नतरं वा नापः पाणिनाऽपकर्षत्या-वरणंत्वासांभिनत्ति।*
*तस्मिन् भिन्ने स्वयमेवापः केदारांतरमाप्लावयंति ।*
*तथाऽधर्मःप्रकृतिनामावरणधर्मं भिनत्ति । .......*
*धर्मो निवृत्तिमात्रे कारणधर्मस्य शुद्धयशुद्धयोरत्यन्तविरोधात् ।)*

म्हणून अवताराचें शरीर धर्माऽधर्मजन्य[१] सिद्ध होत नाहीं. तथापि सर्व जीवांचेंच शरीर धर्माऽधर्मजन्य नसून प्रकृतीच्या[२] प्रवृत्तीमुळें झालें आहे, असा त्या सूत्रभाष्याचा अभिप्राय असल्यामुळें श्रीकृष्णशरीराला सर्वजीवशरीरतुल्यता[३] प्राप्त होतें. म्हणून श्रीकृष्णशरीरही भूतकार्य[४] आहे. आणि शरीराच्या भूतकार्यत्वास्तव श्रीकृष्ण हा जीव आहे. असेंच मधुसूदन स्वामींनीं 'अद्वैतसिद्धींत' म्हटलें आहे.

**'तान्यहं वेद सर्वाणि न त्वं वेत्थ परंतप' (भगवद्गीता)**

अर्थ :- तुझे व माझे सर्व जन्म मी जाणतो, तूं जाणत नाहींस.

ही सर्वज्ञता[५] मधुसूदनस्वामींनीं समष्टिजीवांविषयीं[६] सांगितलीं आहे. आणि दृष्टिसृष्टिवादांत ह्यांवाचून निर्वाहही[७] लागत नाहीं. हिरण्यगर्भशरीर[८] प्रतिकल्पभेदत्वास्तव[९] कर्मजन्य[१०] आहे. म्हणून भूतकार्य आहे. आणि आनंदगिरीनेंही मांडुक्यभाष्यटीकेत[११] असेंच म्हटलें आहे.

*(१) पापपुण्यापासून उत्पन्न झालेले (२) धर्माधर्मानुसार प्रकृति शरीर निर्माण करण्यास प्रवृत्त होते (३) सर्व जीवांच्या शरीराप्रमाणे शरीरस्थिति असणे (४) पांच भूतापासून बनलेले (५) आपले अनंत अवतार जाणणे (६) मूळ अविद्या ज्याच्या आधाराने किंवा आश्रयाने असते त्याला दृष्टिसृष्टिवादांत मुख्य जीव किंवा समष्टिजीव म्हणतात (७) भागतहि नाही (८) दृष्टिसृष्टिवादातील हाच मुख्य जीव होय (९) प्रत्येक कल्पात निरनिराळे असते म्हणून (१०) कर्मापासून किंवा पापपुण्यापासून उत्पन्न झालेले (११) मांडुक्यकारिकेवरील आचार्याच्या भाष्यावर टीका करताना.*

श्रीगुरु :- हे वादिन् ! श्रुतिमातेनें दुग्ध पाजून तृप्त केलेल्या ह्या माझ्या बुद्धीपुढें तुझ्या ह्या शुष्कतर्कजालाचा[१] मुळींच टिकाव लागणार नाहीं. तूं काढलेल्या आक्षेपांचीं उत्तरें क्रमानें श्रवण कर. अर्जुन पूर्ण[२] होता असें जरी आमचें मत आहे तरी वाक्य पुढें आल्यामुळें आम्हाला वाक्यानुसार विचार करणेंच आवश्यक आहे. अनुगीतावाक्य घेऊन शंका काढतांनां तुझ्या एक गोष्ट ध्यानांत यावयाला पाहिजे होती. ती ही कीं, परमेश्वरानें माझें शरीर मायामय असून माझें जन्मकर्मही दिव्य[३] आहे असें भगवद्गीतेंत सांगितलें आहे.

(य३-१७३) ह्या भगवंताच्या म्हणण्याचा भाष्यकारांनी 'भगवच्छरीर भूतमय[४] नाहीं' असा अर्थ केला आहे. आतां, तें शरीर खरोखर जर योगानें उत्पन्न झालें असतें तर भूतकार्यच असावयाला पाहिजे होते. कारण, योगियांचें शरीर देखील शुक्लकर्मजन्य[५] आहे. यद्यपि अशुक्ल अकृष्ण योगियांचें कर्म उत्पन्न होत असल्यामुळें शुक्लकर्मजन्य[५] तच्छरीर म्हणतां येत नाही; तथापि अकृष्ण[६] अशुक्ल[६] कर्मानें योगियांचें शरीर उत्पन्न होत नाहीं, तर त्या कर्मानें त्याचा पुनर्जन्माभाव[७] मात्र स्वीकारला आहे; अथवा त्या कर्मानें योगियांचें शरीर होतें; असें जरी म्हटलें तरी तें पूर्वी नव्हतें असें म्हणावें लागेल. आणि जें पूर्वी नव्हतें त्याची उत्पत्ति मानल्यास त्या उत्पत्तीला कारण योगियांचें कर्म मानावें लागेल. तें कर्म योगसाध्य[८] आहे आणि योग मोक्षेच्छासाध्य[९] आहे. मोक्षेच्छा[१०] जीवांचें ठिकाणीं संभवते, परमेश्वराचे ठायीं संभवत नाहीं.

*(१) निराधार म्हणजे ज्याला प्रमाणांचा आधार नाही अशा तर्कसमुहाचा (२) पूर्ण ब्रह्मज्ञानी, कृतकृत्य (३) अप्राकृत (४) पांच भौतिक नाही (५) केवळ वाणी व मन यांच्याकडून होणारे मंत्र जप अध्ययन यासारखे व ज्यापासून शुभ फळच होते अशा कर्मास शुक्लकर्म असे म्हणतात. त्या शुक्लकर्मापासून उत्पन्न होणारे (६) पापरूप व पुण्यरूप नाही असे म्हणजे ज्या कर्माने मनुष्य कोठेहि बद्ध होत नाही असे (७) पुनर्जन्म न येणे (८) योगाने उत्पन्न होणारे (९) मोक्षाची इच्छा असल्यास घडणारे*

*(१०) मोक्षाची इच्छा.*

म्हणून परमेश्वराचें शरीर भूतकार्य[१] असूं शकत नाहीं. आतां, भगवद्गीतेंतील म्हणणें[२] जर अनुगीतेंतील म्हणण्यानें[३] अभिभूत[४] करावयाचें असलें, तर पहिलें परमेश्वराचें शरीर मायाकार्य[५] असून पुनः तें भूतकार्य झालें असें म्हणावे लागेल. आणि तसें म्हणणें म्हणजे ईश्वरच पुढें जीव झाला असें म्हणण्यासारखें होईल. आणि तसेंही मानशील तर जीव ईश्वराचा परिणाम[६] होईल. परिणाम अनित्य असतो, म्हणून जीव अनित्य होईल. जीव अनित्य मानला असतांनां उत्पत्तिविनाश[७] मानावा लागेल. तो तर **'उत्पत्त्यसंभवात्'** या सूत्रांत सांगितल्याप्रमाणें श्रुतिविरुद्ध[८] आहे.

आतां, ब्रह्माचा परिणाम यद्यपि विरुद्ध[८] आहे, तथापि मायिक ईश्वराचा परिणाम[६] मायिक जीव म्हणण्यास कोणता प्रत्यवाय आहे ? असें म्हणूं नको. कारण मायिक ईश्वराचा परिणाम[६] जीव आहे, म्हणजे मायांशाचा[९] आहे कीं चैतन्यांशाचा[१०] आहे? प्रथमपक्षी, दगड, प्रेत, व जीव सर्व एकाच कोटीत जातात. मग देहापासून जीवात्म्याचा व्यतिरेक[११] करून मोक्ष कसा संभवतो ? आणि संभवत असेल तर मग प्रेताला किंवा दगडालाही महावाक्योपदेश[१२] कां करितां येऊं नये ? द्वितीयपक्षीं, येणाऱ्या[१३] दोषांची अनंत कल्प जरी गणना केली तरी थोडीच होते. कारण चैतन्याचा परिणाम[६] चैतन्याचेंच अनित्यत्व[१४] दाखविणारा आहे. — अतः, (य३-१७४) अनुगीतेंतील वचनानें भगवद्गीतेंतील वचनाचा अभिभव[१५] होऊं शकत नाहीं. उलटा, भगवद्गीतेंतील वचनानेंच अनुगीतेंतील वचनाचा अभिभव होऊं शकतो. कारण, तुझें म्हणणेंच जर क्षणभर खरें धरलें तर -

*(१) पांच भौतिक नाही (२) वचन (३) वचनाने (४) खोडावयाचे असल्यास, खंडण करावयाचे असल्यास (५) मायेने उत्पन्न केलेले (६) विकार, वस्त्वंतर (७) तो उत्पन्न होतो व नाश पावतो (८) असंभवनीय (९) मायारूपी अंशाचा (१०) चैतन्यरूपी अंशाचा (११) निराळेपणा (१२) तत्वमसि महावाक्याचा उपदेश (१३) अनंत दोष येतात (१४) विनाशित्व (१५) खंडण.*

भगवद्गीतेंतील श्रीकृष्णाचें म्हणणें योगसिद्धकालींचें[१] असून, अनुगीतेंतील म्हणणें व्यवहारकालीचें[२] सिद्ध होतें. आणि योगसिद्धकालींचें भाषणाची यथार्थता अधिक असते. म्हणून भगवद्गीतेंतील वचन मुख्य[३] व अनुगीतेंतील वचन गौण[४] म्हणावें लागते. आणि मुख्यवचनानुसारच गौण वचनाचा समन्वय[५] होतो. आमच्या मताप्रमाणें विचारशील तर, अनुगीतेंत जें अर्जुनानें विचारलें तें भगद्गीतेंतील विचारण्याप्रमाणें वैराग्यसंतप्त[६] होऊन विचारलें नाहीं. दुसरें, 'श्रीकृष्णा ! तूं आतां लौकरच द्वारकेंत जाणार' असेंही अनुगीतेंत अर्जुनानें म्हटलें आहे. यावरून अर्जुन श्रीकृष्णाचें ठिकाणीं गमनागमन स्वीकार[७] करीत होता; म्हणजे श्रीकृष्णाचें ईश्वरत्वच[८] तो विसरला होता, असें म्हटलें तरी चालेल. कारण ''**ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशेऽर्जुन तिष्ठति**'' हें गीतेंतील वाक्य जर त्याला स्मरलें असतें तर परमेश्वराचें द्वारकागमन[९] भासलें नसतें. आतां, ही गोष्ट अर्जुन जरी विसरला नसला तरी पण भारतकारांनीं अर्जुनाची विस्मृति ज्याअर्थी गृहीत[१०] केली आहे, त्याअर्थी ती अर्जुनाकरितां असो किंवा नसो, किंतु **ज्ञान सांगणाऱ्या सद्गुरूचें ठिकाणींही मूर्ख शिष्यांनां अतिपरिचयास्तव[११] जीवबुद्धी[१२] होत असते. आणि तसें झालें म्हणजे मग तितक्याच[१३] प्रेमानें त्याला ज्ञान सांगणें घातक[१४] होतें.**

*(१) ज्या काळी भगवान् योगारूढ होते त्या वेळचे (२) योगारूढ दशा नाहिशी झाल्यानंतरचे (३) ज्या वचनानुसार बाकीची वचने लावावी लागतात ते (४) जे वचन दुसऱ्या वचनानुसार लावावे लागते व स्वतंत्रपणे त्यातील अर्थ मान्य करता येत नाही (५) एकवाक्यता (६) अत्यंत वैराग्याने (७) जन्म मृत्यु (८) नित्यत्व, शुद्धत्व, मुक्तत्व इत्यादि परिपूर्णता (९) परमेश्वर आता येथून द्वारकेस जातो, येथे राहत नाही (१०) मानिली (११) अत्यंत सलगीमुळे (१२) सद्गुरुला जीवाप्रमाणे समजतो, परमेश्वर समजत नाही (१३) पूर्वी इतक्या प्रेमाने (१४) अहितकर.*

एवढ्याकरितां पुनः त्याला श्रमात्मक[१] उपदेश करावा लागतो. बृहदारण्यकांतील याज्ञवल्क्य-जनकसंवादांत व वासिष्ठांतील वसिष्ठरामसंवादांत अशीच कांही स्थळें आहेत. त्याप्रमाणेंच श्रीकृष्णाचें अनुगीतेंतील वचन समजावें. दुसरें मूळ अनुगीतावचनांत भगवंतानें आपल्याला योगयुक्त[२] म्हटलें आहे. आणि परमात्मा सर्वदा युक्तयोगी आहे, युंजानयोगी नाहीं. ज्याला ध्यान करून एखादी गोष्ट कळते त्याला युंजानयोगी म्हणतात. व अखंडैकरससर्वज्ञता[३] असणें, हें युक्तयोगीपणाचें लक्षण आहे. पुनः, **'तस्मात्सर्वेषु कालेषु योगयुक्तो भवाऽर्जुन'** ही भगवंताची आज्ञा अर्थातच अर्जुनानें मोडली होती. कारण योगयुक्त जर (य३-१७५) सर्वकालच अर्जुन राहिला असता तर उपदेश विसरला नसता. **आज्ञा मोडणाऱ्या**

**शिष्याला सद्गुरूनें अधिक प्रेमानें वागविणें म्हणजे अधिक आज्ञा मोडण्यालाच शिकविण्यासारखें आहे.** पुनः **जो वेदाज्ञा पाळीत नाहीं, त्याचेपुढें परमेश्वर आपलें स्वरूप प्रकट करीत नाहीं.** तसें[४] होणें त्याच्या आज्ञाभंगरूप[५] कर्माचेंच फल होय. आणि अर्जुनानें जी परमेश्वराची आज्ञा मोडली, त्यांत अर्थातच त्याचें माहात्म्यज्ञान[६] शिथिल[७] झालें असावें, त्यामुळें आपलें ठिकाणीं अर्जुनाला न समजून येणारी अशी त्याची जीवत्वबुद्धी पाहून अनुगीतेंतील वाक्य श्रीहरीनें उच्चारिलें आहे. व पुढें जो अनुगीतोपदेश केला तो त्याच्या सख्यभक्तीचें फल होय.

आतां, तातांनीं[८] अर्जुनाची प्रशंसा केली असल्यामुळें अर्जुनाला विस्मृति[९] संभवनीय नाहीं, असें म्हणशील तर मग अर्जुनाकरितां हें वाक्यही नाहीं. विसरलेल्या शिष्याकरतांच सद्गुरूचें हें वाक्य आहे. आणि

*(१) शिष्याच्या देहाला कष्ट देऊन (२) योगारूढ (३) ज्याची जाणण्याची शक्ति ध्यानादिकावर अवलंबून नसून जो सर्वदा सर्व जाणतो (४) परमेश्वराचे रूप प्रगट न होणे (५) आज्ञा मोडणे या (६) परमेश्वरबुद्धि (७) कमी (८) श्रीज्ञानेश्वरमहाराजांनीं (९) श्रीकृष्णाच्या पूर्ण ईश्वरत्वाचा विसर.*

वस्तुतः तर भगवद्गीतेंतील वाक्य परमार्थप्रसंगोचित[१] असून हें अनुगीतेंतील वाक्य व्यवहारप्रसंगोचित[२] आहे. म्हणून भगवद्गीतेंतील वाक्यानुसार या अनुगीतेंतील वाक्याचा असा समन्वय करावा. 'तेव्हा मी योगानें सांगितलें' म्हणजे तुझ्या योगामुळें[३] तुला दिव्य[४] चक्षु देऊन तुझ्या वैराग्यादिकामुळें तुझ्या हृदयाचा आश्रय करून तुझ्या योगवृत्तीसी[५] युक्त होत्साता मी ती गीता सांगितली होती; म्हणूनच युद्धांतील इतर पुरुषांनां ती कळली नाहीं. आतां तूं तसा योगयुक्त[६] होऊन विचारीत नाहींस, एवढ्याकरितां मलाही तसी आठवण होईलसे वाटत नाहीं. हें पहिल्या आक्षेपाचें उत्तर झालें.

आतां दुसऱ्या आक्षेपाचें उत्तर श्रवण कर. केशवशरीर[७] नाश पावते, एवढाच भारतांतील त्वां श्लोक घेतलास, परंतु **'येन पालिता गोपसुंदर्यः स कृष्णः क्वापि नो गतः'** या पद्मपुराणांतील वाक्याचा त्वां विचार केला नाहींस. **एक वाक्य सोडून देऊन एक वाक्य घेणें पांडित्याचें लक्षण नव्हे.** इतिहासपुराणांचा सारखेपणा[८] असल्यामुळें दोन्ही वाक्यांचा समन्वय श्रवण कर. - चतुर्धराचार्यांनीं[९] गीतेच्या टीकेंत म्हटल्याप्रमाणें भगवंताचें शरीर मायामय[१०] असून नित्य आहे. म्हणून त्याचा प्रलयकालीं नाश संभवत नाही. कारण प्रलयकालीं भगवंताच्या मायेचा (य३-१७६) प्रलय होत नाहीं. जीवाच्या कर्मलयास्तव[११] भूतलय[१२] मात्र होतो. भगवन्मायेचा प्रलयकालीं लय मानसील तर आह्मी असें विचारतों कीं, तो लय काय दुसऱ्या एका मायेंत होतो ? कीं परमेश्वरांत होतो ?

*(१) यथार्थ दृष्टीला अनुसरून (२) व्यावहारिक दृष्टीस अनुसरून (३) माझ्या ठिकाणी जी तुझी बुद्धि स्थिर झाली होती त्यामुळे (४) ज्ञानदृष्टि (५) एकाग्रवृत्तीशी (६) माझ्या ठिकाणी बुद्धि समाधिस्थ करून (७) केशवाचे शरीर (८) तुल्यप्रमाण (९) भारतावरील टीकाकार (१०) मूळमायात्मक, मूळमायात्मक - मूळमाया हेच भगवंताचे शरीर (११) जीवाचे कर्म अव्यक्तात लीन होत असल्यामुळे (१२) पंचभूतांचा लय.*

प्रथमपक्षीं अनवस्था[१] आहे. द्वितीयपक्षीं दोन दोष येतात. प्रलयकालीं मायेचा लय परमेश्वरांत झाला म्हणजे सर्व जीवांना[२] मुक्ति मानण्याचा प्रसंग येतो. आणि मग पुनः जगदुत्पत्ति होणार नाहीं. आणि ही मुक्ति ज्ञानावांचूनच होईल. ज्ञानावांचून मुक्ति मानल्यास श्रुत्युपदेशाची[३] आवश्यकता राहणार नाहीं. श्रुत्युपदेशाची आवश्यकता न राहिली म्हणजे धर्माधर्माची आवश्यकता राहणार नाहीं. तसें झालें म्हणजे कर्मफल देणाऱ्या परमेश्वराचीही आवश्यकता राहणार नाहीं. आणि परमेश्वराची आवश्यकता न राहिली म्हणजे विषयसुख व देहात्मवाद बळकावून[४] मुक्तीचीही आवश्यकता राहणार नाहीं. आणि असें मानलें असतां दुःखाची निवृत्ति जी अक्षय[५] जीवाला पाहिजे, या वासनेची वाट[६] न लागून, जगत्‌ही विनाकारणच मानण्याचा प्रसंग येईल. आणि विनाकारण जगत् मानलें म्हणजे अभावापासून[७] भावोत्पत्ति मानण्यासारखें आहे. आणि अभावापासून भावोत्पत्ति मानशील तर मोक्षादिकांच्या अभावामुळेंच तुला मोक्षभाव[८] आहे असें म्हणण्याला कोणता प्रत्यवाय[९] आहे ? असें चमत्कारिक अनर्थपरंपराचक्र[१०] मस्तकावर घेणें युक्त नाहीं.

दुसरें, प्रलयकालीं मायेचा परमेश्वरांत लय मानून पुनर्जगदुत्थान[११] मानलें तर मुक्तांनांहीं पुनर्जन्मापत्ति[१२] होईल. आणि तसें मानलें म्हणजे मग मुक्तीची अपेक्षा न राहिल्यामुळें वर सांगितलेलें सर्व दोष येतात. म्हणून परमेश्वराच्या मायेचा प्रलयकालीं विलय नाहीं.

*(१) एका मायेचा लय दुसऱ्या मायेत व दुसऱ्या मायेचा लय तिसऱ्या मायेत व तिसऱ्या मायेचा लय चवथ्या मायेत, याप्रमाणे या परंपरेची समाप्तिच न होणे (२) सर्व जीव ब्रह्मज्ञानावाचून अनायासे मुक्त झाले असे मानण्याचा (३) वेदाच्या*

*उपदेशाची (४) वाढून (५) अखंड (६) गति (७) शून्यापासून भावरूप जगाची उत्पत्ति (८) मुक्तीचे अस्तित्व (९) हरकत (१०) अनिष्ट गोष्टींची परंपरा (११) पुनः परमेश्वरातून जग उत्पन्न होते असे (१२) पुनः जन्माची प्राप्ति.*

अविलयत्वास्तव[१] मायारूप[२] भगवच्छरीराचाही विलय नाहीं. अतः, भगवच्छरीर नित्य आहे; परंतु त्यामध्यें हा भेद आहे. नटाचें[३] एक शरीर जें नित्य असतें तें त्याच्या स्त्रीपुत्रांनां सर्वदा प्रतीत असते. आणि इतर नाटक पाहणारांनां त्याच्या नटशरीराचीच[४] अपेक्षा[५] असल्यामुळें नाटक पाहणाऱ्याजवळ मूळ शरीरानें तो नट सर्वदा राहत नाहीं. त्याप्रमाणें भगवंताचे हें शुद्ध मायाशरीर[६] दोन लोकांनां पाहिजे असते. भगवद्भक्त हे परमेश्वराचे नित्यसंबंधी असल्यामुळें त्यांनां तें शरीर (य३-१७७) सर्वदाच प्रतीत[७] असतें. आणि सृष्टिकार्यार्थ[८] देवांच्या प्रार्थनारूप[९] पुण्यानें आविर्भूत[१०] भगवच्छरीर देवकार्यप्रतिबंध[११] निवृत्त[१२] झाल्यावर सृष्ट्यैतीह्यदृष्टीनें[१३] तिरोभूत[१४] होतें. म्हणूनच कर्मी[१५] पुरुषाला भगवच्छरीराचा नाश झाला अशी बुद्धी होते. ह्या बुद्धीचा आश्रय करूनच तूं दिलेल्या मोक्षधर्मवचनाची[१६] व भागवत भारतांतील श्रीकृष्णनिजधामगमनाची व्यवस्था घटते.

*(१) लय होत नसल्यामुळे (२) माया हेच भगवंताचे शरीर अशा (३) नाटकातील पात्राचे (४) नाटकाचे वेळी जे रूप घेतले त्याची (५) इच्छा (६) परमेश्वराचे ठिकाणी अखंड जडलेले (७) दिसत असते (८) सृष्टीतील कार्य जे दुष्टांचा नाश, सज्जनांचे रक्षण व धर्मस्थापन या कार्याकरिता (९) देवांनी केलेल्या प्रार्थनेमुळे उत्पन्न होणाऱ्या पुण्याने (१०) प्रकट झालेले (११) देवांचे कार्याचा प्रतिबंध म्हणजे देवांचे कार्य करावयाचे असते तोपर्यंत, त्या कार्याचा देवाच्या शरीराला तिरोभूत म्हणजे अदृश्य होण्यात प्रतिबंध होतो कारण तेवढ्या कार्याकरिताच ते देवादिकांना दृग्गोचर झालेले असते (१२) ते कार्य संपले म्हणजे (१३) सृष्टीत दिसून येणाऱ्या ऐतिह्य दृष्टीस अनुसरून म्हणजे सृष्टीतील वस्तु उत्पन्न होऊन कांही कालाने पुनः भूतकालात लुप्त होत जातात. (१४) अव्यक्त होणे, दृष्टिगोचर नसणे (१५) कर्माने बद्ध असणाऱ्या अज्ञानी पुरुषाला (२६) मोक्षधर्मातील (शांतिपर्वांतर्गत) वाक्याची म्हणजे अज्ञान्याच्या समजुतीला अनुसरूनच भारत, भागवत इत्यादि ग्रंथात भगवंताच्या देहाचा नाश होतो किंवा भगवान् निजधामास गेले असे म्हटले आहे, वस्तुदृष्ट्या तसे म्हटलेले नाही.*

आणि वास्तविक भगवद्भक्तदृष्टीनें पद्मपुराण-वचनाची[१] व्यवस्था घटतें. पुनः, तूं दिलेलें मोक्षधर्मवचन कल्पांतीं[२] नाश होणाऱ्या केशवाविषयींचें असेल. श्रीकृष्णाविषयीं तें होऊं शकत नाहीं; कारण तुझ्या सारख्यांनां कल्प[३] न होतांनां श्रीकृष्ण आतांच गोचर नाहीं. मग तूं त्याला आतांच कल्पांत झाला म्हणतोस ? तुझें कसेंही मत असो. परंतु परमात्मा श्रीकृष्ण भक्तांनां अझूनही प्रतीत होतो खरा. नामदेवानें म्हटलें आहे कीं,

**॥ अभंग ॥**

**भाविकांसी दृष्य अभाविकां बौद्ध । मोठा हा सावध नारायण ॥१॥**
**लक्ष असे ज्याचें देवाजीचे पायीं । येउनियां राही ह्रदयांत ॥२॥**
**त्याचा सर्व धंदा करी चक्रपाणी । बोलिले पुराणीं व्यासादिक ॥३॥**
**संशय चित्तांत नका धरूं आतां । सर्व हा जाणता पांडूरंग ॥४॥**
**नाम्यासंगें जेवी आवडी हा जाणा । तैसें तया म्हणा बौद्ध आतां ॥५॥**
**(नामदेवगाथा)**

**॥ श्लोक ॥**

**'न[४]कार्यत्वादनित्योऽयं नंदनंदनविग्रहः । उपचाराद्धि कार्यत्वं तत्र पौराणिका जगुः ॥१॥'' इति स्मृतिरपि ॥**

*(१) पद्मपुराणात जे भगवंताचा देह नाश पावत नाही, असे म्हटले आहे ते ज्ञानाच्या वस्तुदृष्टीने विचार करून म्हटले आहे. (२) प्रलयात (३) प्रलयाचा काळ नसताना देखील (४) भगवान् श्रीकृष्णाचे शरीर कार्यरूप आहे म्हणजे उत्पन्न झाले आहे म्हणून ते अनित्य आहे असे म्हणता येत नाही कारण पुराणांतून जी भगवच्छरीराची उत्पत्ति सांगितली आहे ती वास्तविक नाही. म्हणजे खरोखर परमात्म्याचे शरीर उत्पन्न होते असे पौराणिकांचें मत नसून आपल्या नित्य शरीराचे ठिकाणी भगवान् उत्पत्तीचा आभास दाखवितात असे त्यांच्या म्हणण्याचा अर्थ आहे.*

स्मृत्यर्थ :- 'उपचारात्' म्हणजे वास्तविक नसणें. अन्यत् स्पष्ट आहे. याला चतुर्धराचार्यांनीं फलाच्या[१] दृष्टांतानें अनंतबीजगर्भवत्[२] अनंतेश्वराचाच[३] जणूं काय समुदाय परब्रह्मरूप ही श्रीकृष्ण लघुमूर्ति[४] आहे असें म्हटले आहे. आणि तातांचीही याला संमती आहे.

**॥ ओव्या ॥**

**'हो कां जे कृष्णाकृतीचिये[५] मोडी । होती विश्वरूप[६]पटाची घडी । ते अर्जुनाचिये आवडी[७] । उकलूनि दाविली ॥१६१॥**
**तंव परमाणु वा रंग । तेणें देखिलें साविया[८]चांग । तेथ ग्राहकिये[९]नव्हेचि लाग[१०]। म्हणोनि घडी केली पुढती ॥१६२॥**
**(य३-१७८)**
**तैसें वाढीचेंनि बहुवसपणें[११]। रूपें विश्व[१२]जिंतिलें[१३] जेणें । तें सौम्य कोडिसवाणें[१४]। साकार जाहलें ॥(ज्ञाने.११-१६३)**

आणि ही भगवन्मूर्ति नित्य[१५] आहे असें तात म्हणतात.

**॥ ओवी ॥**

**आह्मां भोगमोक्षाचियाठायीं[१६] । श्रीमूर्तीवांचोनि[१७] नाहीं । म्हणोनि तैसाचि साकार होई । हें उपसंहरीं आतां '॥**
**ज्ञाने.११.६०८**

**॥ गद्य ॥**

आतां, तिसऱ्या आक्षेपाचें उत्तर ऐक. मला वाटतें, योगवार्तिक[१८] त्वां संस्कृतांत वाचलेंच नसावें. कारण तें पूर्ण वाचलें असतें तर त्वां असें म्हटलें नसते.

*(१) फळाचा दृष्टान्त देऊन (२) एका लहानशा फलामध्ये ज्याप्रमाणे अनेक वृक्ष उत्पन्न करणारी अनेक बीजे असतात (३) अनंत सृष्टीचे उत्पादक सामर्थ्य धारण करणारी (४) छोटीशी मूर्ति (५) श्रीकृष्णाच्या आकाराने केलेली, मोडलेली (६) विश्वरूप हेच वस्त्र (७) प्रेमाकरिता (८) नीट तपासून (९) गिऱ्हायिकाची (१०) आवड (११) अत्यंत वाढून (१२) संपूर्ण जगत् (१३) व्यापून टाकिले (१४) गोजिरवाणे (१५) अविनाशी (१६) समाधी व दृष्ट परमानंद या करिता (१७) सगुण स्वरूपावाचून (१८) योगसूत्रावरील विज्ञान भिक्षूची टीका.*

आतां योगवार्तिकांतलें उदाहरण तर त्वां दिलें आहे. यावरून असें वाटतें कीं तुला संस्कृत येत नसून पंडितांनीं[१] लिहिलेल्या हिंदी टिकेवरून तुझे हें अनुमान दिसतें. परंतु पंडित हे स्वतः उदासी आहेत असें त्यांनीं योगदर्शनांतच नानक गुरूनां केलेल्या नमस्कारावरून प्रतीत झाल्यासारखें वाटते. उदासीमतांत अवताराविषयीं फारशी पूज्य बुद्धी नाहीं. म्हणून त्यांनीं विज्ञानभिक्षूच्या म्हणण्याचा बलानें विपर्यास[२] केला हें चांगलें ध्यानांत असूं दे. आतां विज्ञानभिक्षूंनीं असें म्हटलें नाहीं असें मी म्हणत नाहीं. परंतु तेथेंच त्यांनीं असा अभिप्राय दाखविला आहे कीं, जीवशरीरांत परिणाम[३] धर्मादि सापेक्ष[४] प्रकृत्यापूरणास्तव[५] होत असून, ईश्वरशरीर परिणामी[६] प्रकृत्यापूरण ईश्वरसंकल्पानेंच[७] होतें. धर्माऽधर्माची[८] अपेक्षा[९] लागत नाहीं. पुनः, वर दिलेल्या भाष्यवचनापुढें विज्ञानभिक्षूंची प्रख्याति[१०] होऊं शकत नाहीं. शब्दप्रमाणावरच[११] चालशील तर विज्ञानभिक्षू भाष्यकाराइतका[१२] आम्हाला प्रमाण नाही; आणि युक्तीने विज्ञानभिक्षूच्या वचनाचा आतांच तुला समन्वय सांगितला. परमेश्वरसंकल्पानें प्रकृत्यापूरण होतें या म्हणण्यापेक्षांही **भगवत्संकल्पमयच भगवच्छरीर आहे** यांत परमेश्वराचें स्वातंत्र्य[१३] अधिक दिसतें. म्हणून भाष्यकारादिकांचेंच म्हणणें अधिक बरोबर आहे. (य३-१७९)

*(१) बाळाराम उदासी (२) विपरीतार्थ (३) प्रकृतीचा बदल (४) धर्मानुसार (५) दुसऱ्या प्रकृतीचा पुरवठा होऊन (६) ईश्वर शरीर हा ज्याचा परिणाम म्हणजे फळ किंवा बदल होईल असा प्रकृतीचा पुरवठा (७) नुसत्या ईश्वराच्या स्वतःच्या संकल्पाने (८) पापपुण्यरूप कर्माची (९) जरूरी (१०) महति (११) शब्द प्रमाणच मानावयाचे असल्यास (१२) आचार्याइतका (१३) प्रकृतीच्या स्वाधीन न होणे.*

मुला ! आतां चवथ्या आक्षेपाचें उत्तर श्रवण कर. या आक्षेपांत त्वां मधुसूदनस्वामींनां कशाला पुढें आणलें आहेस कोण जाणे ? हे स्वामी वेदान्ती असल्यामुळें त्यांची परीक्षा घेणें आम्हाला बरेंच जड जाते. कारण ह्यांची विद्याही आमच्यापेक्षां भक्कम आहे. ह्यांच्या विद्येची प्रशंसा अशी आहे कीं,

**'पारं[१] वेत्ति सरस्वत्या मधुसूदनभारती ।**
**मधुसूदनभारत्याः सारं वेत्ति सरस्वती' ॥१॥**

इतकी यांची विद्या असल्यामुळेंच ह्या विद्यासागरांत पद्धतवार[२] तरंगच मुळी उठत नाहींत. कारण पद्धतवार चालणें फार तर नदीओढ्यांचें; समुद्रांत काय? कसाही तरंग उठूं शकतो. म्हणूनच यांनीं अद्वैतसिद्धींत सर्वज्ञत्व समष्टिजीवाला[३] सांगितलें आहे. आणि यांनींच आपल्या केलेल्या गूढार्थदीपिकेंत[४] समष्टिहिरण्यगर्भाला[५] आकाशाद्युत्पत्तिरूप कारणसृष्टीचें[६] ज्ञान असूं शकत नाहीं, असें कंठरवानें सांगितलें आहे.

**'तान्यहं वेद सर्वाणि न त्वं वेत्थ परंतप'**

या श्लोकाचा अर्थ अद्वैतसिद्धींत समष्टिजीवपर लाविलेला असून, गूढार्थदीपिकेंत ईश्वरपर लावून समष्टिजीवभिन्न[७] श्रीकृष्णाला परमेश्वर ठरविलें आहे. पुनः गूढार्थदीपिकेंतच[४] परमेश्वराचें मायामय शरीर म्हणून[८], दुसरा पक्ष मायामय शरीर नाहीं; असें प्रतिपादन करितांनांही मायामयच म्हटलें आहे. वास्तवीकसाकारत्व[९] म्हणणारांचें खंडन केलें आहे. बरें, तेवढें चांगलें म्हटलें तरी भक्तिरसायनांत भगवंताचें शरीर ह्यांनीं परमानंदरसरूप आहे, असें म्हटलें आहे.

*(१) सरस्वतीचा पार मधुसूदन सरस्वती जाणतात पण सरस्वती मात्र मधुसूदन सरस्वतीचा सार म्हणजे अंशच जाणते (२) नियमास अनुसरून (३) ब्रह्मांडाभिमानी जीवाला (४) गीतेवरील टीकेत (५) समष्टिजीवाला (६) अपंचीकृत जी पंचभूते आहेत त्यांना कारणसृष्टि म्हणतात. त्यांच्या उत्पत्तीचे ज्ञान (७) हिरण्यगर्भाहून निराळा (८) आहे असे सांगून (९) मायेवाचून साकार मानणाऱ्यांचे.*

आतां, दृष्टिसृष्टिवादांत परमेश्वराची व्यवस्थाच[१] लागत नसल्यामुळें, अद्वैतसिद्धींत श्रीकृष्णाला समष्टिजीव म्हटलें म्हणावें, तर ह्याच महापुरुषानें सिद्धांतबिंदूंत दृष्टिसृष्टिवाद प्रतिपादन करितांनां परमेश्वर वेगळा[२] काढून सांगितलेला आहे. आणि तो परमेश्वर आमच्या प्रतिबिम्बापेक्षी बिम्बत्वारोपावच्छिन्न[३] बिम्बरूपाप्रमाणेंच आहे.

ह्या स्वामींची भक्तीवर आवडी फार. ह्यांनीं गूढार्थदीपिकेच्या उपोद्घातांत ज्ञानियांनां सहज परमेश्वराची भक्ति राहते **(य३-१८०)** असें म्हटलें आहे. परंतु एखाद्या वेळीं समाधितरंगांत[४] येऊन हे भक्तीचें खंडन करीत नाहींत असें नाहीं. उदाहरणार्थ, अद्वैतसिद्धीच्या शेवटील प्रकरणांत हे म्हणतात, ईश्वरप्रसादाची व भक्तीची अवधि[५] ज्ञान, तें एकवेळ प्राप्त झालें म्हणजे भक्तिरहित भोगानेंच प्रारब्धाची निवृत्ति होते. कारण **'तस्यतावदेवचिरम्'** ही श्रुति आहे. आणि श्रुतीमुळेंच स्मृतिपुराणांत भक्ति सांगितली असली तरीही तिचा बाध[६] होतो. –खरें आहे. भक्तीवांचून भोगानें[७] प्रारब्धाची निवृत्ति[८] ज्ञानानंतर होत नाहीं असें म्हणतो कोण? परंतु दृष्टपरमानंदप्राप्ति[९] मात्र कालत्रयीं[१०] होत नाहीं, आतां, ती नकोच असेल तर गोष्ट निराळी.

बरें, श्रुतिप्रमाण देऊन स्वामींनीं भक्ति सांगणाऱ्या स्मृतिपुराणांचा बाध[११] केला असेल, परंतु **'यं[१२]सर्वे देवा नमन्ति मुमुक्षवो ब्रह्मवादिनश्च'** या श्रुतीची वाट काय ? का श्रुतीनें श्रुतीचाही बाध करावयाचा ? आणि -

**'मुक्ता[१३]अपि लीयया विग्रहं कृत्वा भजन्ते'**

*(१) परमेश्वर मानता येत नाही (२) समष्टि जीवाहून निराळा. म्हणजे शुद्धब्रह्मच ईश्वर होय असे म्हटले आहे (३) प्रतिबिंब म्हटले की त्याला बिंबाची आवश्यकता असते म्हणून जीव हा प्रतिबिंबरूप आहे असे म्हटले की, ब्रह्माला बिंबरूपता येते व ब्रह्माची ही बिंबताच ईश्वरत्व होय. या आमच्या म्हणण्याप्रमाणे (४) समाधीच्या लहरीत (५) शेवट (६) निवृत्ति (७) सुखदुःखभोग भोगून (८) नाश (९) व्यवहारकाळी परमानंद मिळणे (१०) केव्हाहि (११) खंडण, गौणत्व दाखविणे (१२) ज्याला सर्व देव, मुमुक्षु, ब्रह्मनिष्ठ नमन करितात (१३) मुक्त पुरुषदेखील लीलेनेच देह धारण करून त्या परमेश्वराचे भजन करितात.*

या भाष्यकारवचनामृतापुढें[१] आपलें थिल्लरोदकवचनतुषार[२] सांभाळून[३] फेंकावयाला स्वामी विसरले. तरी पण ही भक्तिखंडन करण्याची लहर स्वामींनां नेहमीच नव्हती. ही त्यांची मुक्तिप्रतिपादनधुंदी एकवेळ उतरली, आणि गूढार्थदीपिकेसारखे ग्रंथ रचण्याला स्वामींनीं सुरुवात केली कीं,

**'ध्यानाभ्यासवशीकृतेन मनसा तन्निर्गुणं निष्क्रियम् । ज्योतिः किंचन योगिनो यदि परं पश्यन्ति पश्यन्तु ते ॥**
**अस्माकं तु तदेव लोचनचमत्काराय भूयाच्चिरम् । कालिंदीपुलिनेषु यत्किमपि तन्नीलं महो धावति ॥१॥' गूढार्थदीपिका**

श्लोकार्थ :- ध्यानाचा अभ्यास करून वळविलेल्या मनानें निष्क्रिय, निर्गुण, प्रकाशस्वरूप ब्रह्म योगी पहात असतील तर ते खुशाल पाहोत; परंतु तेंच ब्रह्म यमुनेच्या तीरावर नीलतेजोमय, इकडून तिकडे धांवणारे आमच्या डोळ्यांनां आनंद देण्याकरितां नित्य आम्हाला पाहिजे आहे.

स्वामीला घटकाभरही असें ब्रह्म नको. तर 'चिरं' म्हणजे नित्य पाहिजे आहे. यावरून म्हणावें लागते कीं, मुक्तीच्छा[४] स्वामीला एखादे (य३-१८१) वेळींच असते. श्रुति स्मृति घेऊन व स्वामींच्याच कांहीं वचनावरून दृष्टिसृष्टिवादांत देखील परमेश्वरशरीर व परमेश्वरभक्तीची जर व्यवस्था[५] लागते, तर अद्वैतसिद्धींतील एखादें वाक्य वाढलेल्या चटणीप्रमाणें न रुचलें तर त्यांत कांहीं स्वामीला राग येणार नाहीं.

*(१) भाष्यकार आचार्य यांचे वचन हेच कोणी अमृत (२) खळग्यातले पाणी त्याचा थेंब (३) जपून (४) मुक्तीची इच्छा (५) सिद्धि होते.*

आतां, अवताराविषयीं श्रुतिप्रमाण नाहीं, असें मात्र म्हणूं नको. कारण,

**॥ श्लोक ॥**

**[१]चिन्मयस्याद्वितीयस्य निष्कलस्याशरीरिणः। उपासकानां कार्यार्थं ब्रह्मणो रूपकल्पना ॥१॥**

अशी रामतापनीयोपनिषत् श्रुति असून -

**'त्वं जातो भवसि विश्वतोमुखः॥**[२]

अशी श्वेताश्वर श्रुति आहे. पुनः,

**'सहस्रशीर्षा पुरुषः॥** [३]

**'योऽसावादित्ये पुरुषः॥**[४]

**'य एषोन्तरादित्ये हिरण्मयः पुरुषो दृष्यते हिरण्यश्मश्रुर्हिरण्यकेशः ।**
**अरश्चण्यश्चार्णवौ तृतीयस्यामितो दिवीत्यादिप्रभुमितं वेश्म'॥ छांदोग्योपनिषत् १/६/६**

इत्यादि श्रुती कांहीं मंत्रद्रष्ट्यांनीं गिळंकृत केल्या नाहींत.

**नृसिंहतापनीयादि**कांमध्येंही अशा प्रकारच्या पुष्कळ श्रुती आहेत.

**केनश्रुति** तर ह्याविषयीं स्पष्टच आहे -

**'तद्धैषा[६] विजज्ञौ तेभ्यो ह प्रादुर्बभूव तन्न व्यजानत किमिदं यक्षमिति । (केनोपनिषद् १५-२)**

**॥ शांकरभाष्य ॥**

**तद्ध किलैषां मिथ्येक्षणं विजज्ञौ विज्ञातवद्ब्रह्म ।**
**सर्वेक्षितृ हि तत्सर्वभूतकरणप्रयोक्तृत्वाात् देवानां च मिथ्याज्ञानमुपलभ्यमैव असुरवद् देवा मिथ्याभिमानात् पराभवेयुरिति तदनुकंपया देवान् मिथ्याभिमान-अपनोदनेन अनुगृण्हीयाम् इति तेभ्यो देवेभ्यो ह किलार्थाय प्रादुर्बभूव ।**
**स्वयोगमाहात्म्यनिर्मितेन अत्यद्भुतेन विस्मापनीयेन रूपेण देवानामिंद्रियगोचरे प्रादुर्बभूव' ॥**

*(१) चिन्मय, अद्वितीय, निरवयव, व अशरीरी अशाही ब्रह्माचे ठिकाणी उपासकाकरिता रूपाची कल्पना केली आहे (२) ज्याला सर्वत्र मुखे आहे असा तू उत्पन्न झाल्यासारखा म्हणजे जन्मल्यासारखा भासतोस (३) ज्याला अनंत हातपाय आहेत, अनंत डोकी आहे इत्यादि (४)सूर्याचे ठिकाणी जो हा पुरुष आहे (५) सूर्याचे अंतर्यामी हा जो सुवर्णमय पुरुष दिसतो (६) बह्माने देवांचे मिथ्याज्ञान जाणले व ब्रह्मदेवाचे समोर प्रगट झाले. तेव्हां देवांनी ओळखले नाही की, हा पूजनीय असा महान प्राणी कोण आहे. भाष्यार्थ - ते ब्रह्म ज्ञानवान असल्यामुळे त्यांना (देवांना) झालेला मिथ्या अभिमान त्याने जाणला. हे सर्व पाहणारे व सर्व भूतांच्या इंद्रियांना प्रवृत्त करणारे असल्यामुळे, त्याने देवांना झालेला मिथ्या अभिमान पाहून व त्या मिथ्या अभिमानाने त्यांचा (देवांचा) असुरांप्रमाणे पराभव न व्हावा अशी त्यांच्याबद्दल करूणा येऊन, त्यांचा मिथ्या अभिमान घालविणे हाच अनुग्रह त्यांच्यावर करण्याकरता व त्यांच्याच (देवांच्याच) कल्याणाकरता ते त्यांच्यापुढे (देवांच्यापुढे) प्रगट झाले. आपल्या योगमहात्म्याने निर्माण केलेले, अत्यंत अद्भूत असलेले व विस्मय उत्पन्न करणाऱ्या रूपाने ते देवांना इंद्रियांनी दिसेल असे त्याच्या समारे प्रगट झाले.*

उपर्युक्त श्रुतींत आणि त्या श्रुतीच्या भाष्यांत देवावर कृपा करणारें व असुरांचा पराभव करणारें हें साकार ब्रह्म सांगितलें आहे. म्हणून तें अवताररूपच आहे. आतां, शारीरकभाष्यांत पांचरात्रोक्त चतुर्व्यूहोपासना आम्हाला अनुकूल आहे, हें सांगण्याकरितां, **'स एकधा भवति त्रिधा भवति'** इत्यादि छांदोग्यश्रुतीचा अर्थ आचार्यांनीं ईश्वरपर लाविलेला असून छांदोग्यभाष्यांत याच श्रुतीचा अर्थ उपासकपर[१] लाविला (य३-१८२) आहे. म्हणून मधुसूदनाच्या म्हणण्याप्रमाणें समष्टिजीवच[२] ईश्वर होऊं शकतो, अशी शंका करूं नको. समष्टिजीवाचें शरीर कर्मजन्य[३] असल्यामुळें व प्रतिकल्पांत[४] त्याचा निराळेपणा[५] असल्यामुळें, सर्व कल्पांत सृष्टि करण्याला नित्य[६] सन्निहित समष्टिजीव राहूं शकत नसून ईश्वरच राहूं शकतो. सर्व श्रुतींत ईश्वराचीच उपासना सांगितली आहे. असें आचार्यांनीं शारीरक सूत्राच्या चवथ्या अध्यायाच्या भाष्यांत म्हटलें आहे. हें भाष्य न्यायानुगृहीत[७] आहे; आणि छांदोग्यभाष्य विद्यास्तुतिपर[८] आहे. स्तुतिपरापेक्षां[९] न्यायानुगृहीत भाष्य अर्थातच अधिक प्रमाण आहे, हें सांगावयाला नको.

तथापि दोन्हीही भाष्यांचा समन्वय असा - शारीरक-भाष्यांतलें[१०] म्हणणें सर्वशक्तित्वाभिप्रायक[११] असून छांदोग्यभाष्यांतलें म्हणणें, 'त्याच्याच उपासनेमुळें उपासकांनां शक्ति येतें,' अशा अभिप्रायाचें आहे. उपास्यामध्यें नसलेले गुण उपासकांनां येणार कोठलें ? तात्पर्य, ईश्वर समष्टिजीवही नव्हे; व अवताराचें शरीर भूतकार्यही[१२] नाहीं. तर **ईश्वर म्हणजे बिम्बभूत[१३] व अवताराचें शरीर मायामय हें सिद्ध झालें.** आतां अवशिष्ट आक्षेपाचें उत्तर ऐक.

*(१) उपासकही अनेक रूपे धारण करू शकतो. (२) ब्रह्मांडाचा अभिमान धारण करणारा (३) त्याच्या पूर्वीच्या कर्माने मिळालेले (४) प्रत्येक कल्पात (५) प्रत्येक कल्पातील समष्टिजीव निरनिराळा (६) सर्व कल्पांतील सर्व सृष्टींना जवळ किंवा संबद्ध (७) तर्कास धरून, युक्तीस धरून (८) त्यांतील सगुण विद्येची म्हणजे उपासनेची प्रशंसा करणारे (९) नुस्ती प्रशंसा करणाऱ्या भाष्यापेक्षा (१०) ब्रह्मसूत्रातील भाष्य (११) परमेश्वर सर्वशक्ति आहे असे सांगणारे (१२) पंचभूतांचे बनलेले (१३) प्रतिबिंबरूप जो जीव त्याच्या अपेक्षेने (म्हणजे प्रतिबिंबाला बिंब पाहिजे असते म्हणून) परब्रह्मच, त्या जीवरूप प्रतिबिंबाचे बिंब होते व बिंबत्व हेच ईश्वरत्व होय*

शंका :- ननु, जीं प्रयोजनें[१] आपण सांगितलीं तीं सिद्ध[२] करण्याकरितां शरीरावश्यकता[३] आहे; आणि शरीर तर पुण्यपापेंकरून उत्पन्न असून भूतकार्य[४] असतें. तसें शरीर भगवंताला मानलें असतां जीवत्वप्राप्ति होते. म्हणून गोपीसंयोगादि निषिद्ध कर्माचा भोग[५] भगवंतालाही झाला पाहिजे. अथवा ब्रह्मज्ञानी जीव असल्यामुळें भोग होणार नाहीं, तथापि नैष्कर्मसिद्धींत सुरेश्वराचार्यांनीं ज्ञानानंतर यथेष्टाचरणाचा श्वानाप्रमाणें[६] निषेध केला आहे. तो निषेध मानला नसतां यद्यपि ज्ञानीयाला प्रत्यवाय[७] नाहीं, तथापि बद्धापुढें[८] गुणगान[९] करण्याला तो योग्य नाहीं.

समाधान :- ही शंका असमीचीन आहे. कारण, परमेश्वराचें शरीर भूतकार्य नाही; मायामय आहे. कारण भगवद्गीतेंत भगवंतांनीं व भाष्यकारांनी भगवच्छरीर मायामय सांगितलें आहे. दुसरें, रज्जुकृतबंधनाभावादिक[११] भूतकार्य शरीराचें ठिकाणीं संभवत नाहींत. योगियाचें ठिकाणीं यद्यपि संभवतात तथापि अतिसिद्धिभोगानें व निषिद्ध कर्मानें[१३] योगियांचें सामर्थ्य क्षीण होतें.

आतां, देववत्[१४] मर्त्यलोकीं[१५] (य३-१८३) प्रारब्धजन्य[१६] सिद्धिभोग[१७] होतो, असें म्हणशील तर क्षीणपुण्यावांचून[१८] देवांचा मर्त्यलोकीं जन्म घटत नाहीं. आणि क्षीणपुण्यानें[१९] निषिद्धाचरण केलें असतां अधिक अधिक पुण्य क्षीण होऊन नरकप्राप्ति होते.

*(१) अवतार धरण्याची कारणे किंवा उद्देश (२) घडण्याकरिता (३) शरीराची जरूरी (४) पंचभूतांचे बनलेले (५) फळ (६) श्वानाच्या निषेधाप्रमाणे निषेध (७) हरकत (८) अज्ञानी लोकांसमोर (९) प्रशंसा करण्यास (१०) अयोग्य (११) दोरीच्या योगाने बांधले न जाणे (१२) सिद्धीचा अतिशय भोग घेतल्याने (१३) निषिद्ध मार्गाने वागल्यास (१४) देवाप्रमाणे (१५) मृत्युलोकात (१६) प्रारब्धकर्माने (१७) सिद्धिप्राप्ति (१८) स्वर्गात ज्या पुण्याने मनुष्य राहतो ते पुण्य संपल्यावाचून (१९) ज्याचे पुण्य संपले आहे अशाने किंवा पुण्य संपलेल्या दशेत (२०) करू नये म्हणून सांगितलेले आचरण*

आतां, श्रीकृष्णाला पुढें मुक्ति होईल म्हणून यद्यपि तो अभव्य[१] नाहीं, तथापि निषिद्धकर्माचरणाचें फल सद्यः भोगीत आहे, असें दिगंबर म्हणतात. यावर त्यांनां आम्ही विचारितों कीं , हें तुमचें म्हणणें प्रमाण कसें मानावयाचें? तुम्ही म्हटलें म्हणून किंवा त्याला कोणी युक्ति आहे? किंवा कोणाचा अनुभव आहे? पहिल्यापक्षीं तुमचा जसा आग्रह आहे तसा दुसऱ्याचा कां नसावा? म्हणून तुमचें म्हणणें प्रमाण तो मानणार कसे? द्वितीये,[२] कर्माचें फळ मिळालेंच पाहिजे ही युक्ति दाखवाल तर घटत नाहीं[३]. कारण, ज्ञानीयांचें ठिकाणचें कर्तृत्व गेलें असल्यामुळें तेथें विधिनिषेधाभाव[४] आहे. तुमच्याच मताप्रमाणें पाहिलें तर विधिनिषेध सर्व व्यवहारनयानें[५] सिद्ध असून शुद्धनयानें[६] एक वस्तूच सिद्ध आहे. इथें तुमच्या अनेकान्त[७] प्रतिज्ञेची हानी होतें. परंतु अनेकान्तवाद सविस्तर खंडन करण्याचें हें स्थल नव्हे. पुनः, समयसारांत[८] किंवा त्याच्या आत्मख्याति नांवाच्या टिकेंत ज्ञानीयाला चारित्र्याची[९] आवश्यकता नाहीं असें म्हटलें आहे; आणि श्रीकृष्णाला तर तुम्ही भव्य[१०] व ज्ञानीही मानलें आहे. म्हणून त्याला निषिद्ध कर्माचा भोग होतो म्हणणें तुमच्याच मताप्रमाणें बरोबर नाहीं. आणि भोग झाला असता तर कलियुगांतील सर्व संतांनां जी स्वतंत्रपणें[११] श्रीकृष्णाची प्रतीति झाली ती झाली नसती. आतां, इतिहासाविषयीं[१२] संशय असेल तर भक्ति करून पाहिल्याविना दुसरा उपाय नाहीं. भक्तियुक्त लक्षणानें भक्ति करून पहावें व मग प्रत्यय येणार नाहीं तर आम्हाला कळवावें.

*(१) न जन्मणारा (२) दुसऱ्या पक्षी (३) सिद्ध होत नाही (४) असे कर व असे करू नको अशा दोन्ही प्रकारच्या आज्ञा नसणे*

*(५) व्यवहारदृष्टीने, व्यवहारमताने (नय म्हणजे मत) (६) तात्विक मताने (७) वस्तु अनेक स्वरूपाची आहे (८) जैनग्रंथाचे नाव (९) सदाचरणाची (१०) संभाव्य (जन्मणे शक्य आहे असा) (११) कर्मभोगरहित, शुद्ध रूपाने (१२) अशी शुद्ध रूपाने श्रीकृष्णाची प्रतीति कलियुगातील पुष्कळ संतांना झाली या इतिहासाविषयी.*

आमच्या मतांत तर श्रीकृष्ण परमेश्वरावतार असल्यामुळें भोग होणें शक्य नाहीं. म्हणून परमेश्वराचें शरीर देवजन्मवत्[१] क्षीणपुण्यजनित[२] नाहीं. गीतेंतील **'इमं विवस्वते योगं'** इत्यादि श्लोकावरून पाहतां कोणत्याच मागील जन्मांत श्रीकृष्णाचा साधकपणा[३] दिसत नाहीं; किंतु गुरुत्वच[४] दिसते. म्हणून अमुक एका जन्मात श्रीकृष्णाने योग[५] केला असेल असेंही संभवत नाहीं. अतः, रज्जुकृतबंधनाभावादिकांची[६] सिद्धि (य३-१८४) त्यांचें ठिकाणीं योगानें आलेली नव्हे. सारांश, परमेश्वराचें शरीर भूतकार्य[७] नाहीं.

आतां, श्वासोच्छ्वासादिकेंकरून वाय्वादिभूतकार्य म्हणशील तर म्हणूं नको. कारण ते श्वासोच्छ्वासादिक भानमात्र[८] आहेत. भूतनियति[९] त्यांनां लागू नाहीं. आणि भानमात्रही परंतु स्वप्नाप्रमाणें नाहीं. कारण स्वप्न निद्राजन्य[१०] असून जागृतींत पाहिलें असतां तें दिसत नाहीं; आणि अर्जुनादिकांची परमेश्वरासह क्रीडा तर ज्ञान झाल्यावरही बंद पडली नाहीं. यास्तव परमेश्वराचें शरीर स्वप्नवत् भानमात्र नाहीं, किंतु अघटितघटनापटु[११] मायेनें भासविलेलें असें आहे. आनंदगिरीनें जें भगवच्छरीर भूतकार्य आहे असें म्हटलें, तें भगवत्पूज्यपादवचनांनीं बाध्य[१२] असल्यामुळें व स्थूलदृष्टीला[१३] दिसणाराप्रमाणें मूढलोकानुवादात्मक[१४] असल्यामुळें व -

*(१) देवांच्या जन्माप्रमाणे (२) पुण्य संपल्यामुळे मिळालेले (३) मोक्षाकरिता खटपट केली असे (४) स्वतः सिद्धज्ञानी असल्यामुळे दुसऱ्यांना श्रीकृष्णानी उपदेश केलेला आढळतो पण श्रीकृष्णाला कोणी ज्ञानोपदेश केल्याचे दिसत नाही (५) पातंजलादियोगसाधन (६) दोरीच्या योगाने बांधले न जाणे (७) पंचभूतांचे बनलेले (८) भासमात्र (९) पंचभूतात्मकतेचा नियम, निर्बंध (१०) निद्रादोषाने उत्पन्न होणारे (११) असंभवनीय घडविणारी (१२) खंडित, खोडले गेलेले (१३) अज्ञानी लोकांना जसे दिसते तशा दिसणाऱ्या (१४) अज्ञानी लोकांच्या प्रतीतीचा पुनरुच्चार करणारे.*

**'अवजानन्ति[१] मां मूढा मानुषीं तनुमाश्रितम्' ॥**
**'संभवाम्यात्मायया[२]' ॥**

इत्यादि भगवद्वचनाला विरोध येत असल्यामुळें व स्वतःच आनंदगिरी महाराजांनीं तलवकारभाष्याच्या[३] टीकेंत साकार ब्रह्मशरीर मायामय आहे, असें म्हणून उन्मत्तप्रलापवत्[४] आपल्याच वचनानें आपलें खंडन केलें असल्यामुळें समीचीन[५] नाहीं.

एवं भूतकार्य नसल्यामुळेंच धर्माऽधर्मजन्यही[६] परमेश्वराचें शरीर नाहीं. आणि जे योगवासिष्ठांत विष्णुशिवाचे रमविलास[७] स्मशाननिवासादि[८] भोग प्रारब्धजन्य सांगितलें आहेत, तसेंच राम आपल्या एकपत्नीव्रतानें कृष्णावतारीं मी ब्रह्मचारी होईन अशी प्रतिज्ञा करता झाला, असें भावार्थरामायणांत शेवटीं म्हटलें आहे, हीं दोन्ही ग्रंथांतील वचनें जीवाची धर्माकडे प्रवृत्ति व्हावी म्हणून आहेत. अन्यथा, योगवासिष्ठांतील कोणी जीव नित्य-विद्यामय[९] व नित्यच[१०] मुक्त आहे, या ईश्वराभिप्रायबोधक[११] वचनासी व -

**तरी ऐकेगा रघुनाथा । तुम्हां अवतारांची सत्ता[१२]। नये जीवाचीया हाता[१३]। जरी यथार्थता[१४] मुक्त जाहला ॥'**
या भावार्थरामायणांतील वचनाशींच विरोध येतो.

*(१) मनुष्यासारखे शरीर धारण केलेले पाहून मूर्ख लोकांना मी खरोखरच मनुष्य झालो किंवा माझे शरीर खरोखरच मनुष्यशरीराप्रमाणे पांचभौतिक आहे वाटते व त्यामुळे माझेविषयी असे (माझे सगुण रूपविषयी) अनादर दाखवितात (२) आपल्या मायेने मी जन्मल्यासारखा भासतो (३) उपनिषदावरील भाष्यावर जी टीका आहे तीत (४) उन्मत्त माणूस जसे असंबद्ध बोलतो त्याप्रमाणे (५) योग्य (६) पापपुण्याने निर्माण झालेले (७) रमेशी विलास करणे (८) स्मशानात राहणे (९) ज्यांची विद्या म्हणजे ब्रह्मज्ञान नित्य आहे म्हणजे त्यांना पूर्वी ब्रह्मज्ञान नव्हते व पुढे कोणाच्या उपदेशाने ते ब्रह्मज्ञान उत्पन्न झाले असे नाही तर जे स्वतः सिद्धज्ञानी आहेत असा अर्थ (१०) नित्य स्वतः सिद्धज्ञानी असल्यामुळे जे नित्यमुक्त आहेत म्हणजे ज्यांना मी आतापर्यंत बद्ध होतो पण आता मुक्त झालो असा मागाहून मुक्तीचा प्रत्यय उत्पन्न झाला नाही (११) असा जीव शब्दाने येथे ईश्वराचाच बोध केला आहे कारण ईश्वर मानणारे लोक देखील जो नित्यज्ञानी व नित्यमुक्त तोच ईश्वर होय असे म्हणतात (१२) सामर्थ्य (१३) अंगी. (१४) पूर्णपणे*

शंका :- ननु, भागवतटीकेंत श्रीधरांनीं भक्तांच्या इच्छेनें भगवच्छरीरोत्पत्ति[२] बोलिली आहे, व निश्चलदासांनीं साधूंच्या पुण्यानें व (य३-१८५) दुर्जनांच्या पापानें भगवच्छरीरोत्पत्ति बोलिली आहे. मग परमेश्वराचें शरीर धर्माऽधर्मजन्य[३] नाहीं असें कसें म्हणतां ?

समाधान :- हे वादिन् ! तुला त्यांच्या भाषणाचा अभिप्राय समजला नाहीं. तथापि श्रवण कर. हें भगवंताचें मायाजन्य[४] शरीर अज[५] अव्यय[६] आहे. त्याचा उपसंहार परमात्मा आपण[७] होऊनच करीत नाहीं असें भारतभावदीपांत[८] चतुर्धराचार्यांनीं म्हटलें आहे. तें अज अव्यय शरीर भक्तांच्या प्रेमवासनेनें[९] हृदयांत[१०] प्रगट होतें असा श्रीधर स्वामींच्या म्हणण्याचा अभिप्राय आहे. आणि तेंच अज अव्यय भगवच्छरीर[११] समस्त[१२] सुर[१३] व भक्तसमष्टिप्रार्थना-निमित्तपूर्वक[१४] अवतारप्रयोजनावच्छिन्नत्वेंकरून[१५] समष्टिविराड्हृदयगोचर[१६] होतें. तेव्हां सत्[१७] आपल्या सुकृतानें[१८] व असत्[१९] आपल्या दुष्कृतानें[२०] त्याला सुखदुःख हेतु[२१] समजतात.

*(२) भगवंताच्या शरिराची उत्पत्ति (३) पापपुण्याने उत्पन्न झालेले (४) मायेने भासणारे (५) उत्पत्तिरहित (६) नाशरहित (७) करीतच नाही (८) भारताच्या टीकेत (९) त्या शरिराच्या आवडीमुळे (१०) प्रत्येक भक्ताच्या (११) भगवंताचे शरीर (१२) सर्व (१३) देव (१४) सर्व भक्तांच्या प्रार्थनेने, सर्व भक्तांनी ईश्वराची प्रार्थना केली असता (१५) अवताराचा जो उद्देश - दुष्टांचा नाश व सुष्टांचे पालन करून भक्तिधर्माची स्थापना करणे - त्या उद्देशाने (१६) सर्व जीवाची समष्टि जो हिरण्यगर्भ त्या हिरण्यगर्भाचे समष्टिहृदयात प्रगट होते (१७) सज्जन लोक (१८) पुण्याने (१९) दुष्ट (२०) पापाने (२१) आपल्या सुखदुःखाला कारण म्हणजे सज्जनांना त्यांच्या पुण्यामुळे भगवान् त्यांचा पालनकर्ता भासतो व दुर्जनांना त्यांच्या पापामुळे भगवान् त्यांचा नाशकर्ता दिसतो.*

हा निश्चलदासांचा अभिप्राय आहे. अन्यथा[१], परकर्मानें[२] परशरीर[३] जीवाचेंही होत नाहीं तर ईश्वराचें कसें होईल? पुत्राच्या उत्तम कर्मानें पित्याला परलोकांत उत्तम शरीर मिळतें. तें परकर्मजनित[४] आहे असें म्हणूं नको. कारण त्याचेठायीं अधिकार, योग्यता व पुण्यलेश हे स्वकीय[५] असल्यामुळें त्याला परकर्मजनितत्व येत नाहीं. अधिकार म्हणजे ऋणदातृत्व[६]. पित्यानें पुत्राला आपल्या वीर्यापासून उत्पन्न करून मातेनें त्याचे गर्भकष्ट सहन केले आहेत, व बाळपणीं दोघांनींही जोपासना[७] केली आहे, म्हणून आईबापांचें पुत्रावर ऋण आहे. **'मातृदेवोभव' 'पितृदेवोभव'** ही श्रुतीही याविषयीं प्रमाण आहे. म्हणून पित्याला पुत्राचें कर्म ग्रहण करण्याचा अधिकार आहे. संन्याशाचे श्राद्धादिक करू नयेत म्हणजे त्याला अधिकार जरी असला तरी योग्यता नाहीं. तर गृहस्थालाच पुत्रऋण स्वीकाराची योग्यता आहे. आणि **अतिपातकीयांचें[८] श्राद्धादिक करूं नयेत असें गरुडपुराणांत सांगितलें आहे**. यावरून श्राद्धादिककर्मफल मिळण्याला स्वतःचा पुण्यलेशही पाहिजे. म्हणजे घरीं द्रव्य थोडें असतां ऋणी[९] जनांपासून तें घेऊन भरून काढावें, तद्वत् स्वपुण्य[१०] न्यून[११] असतां पुत्रकृत[१२] श्राद्धादिकर्मांनीं पुरें करून घ्यावें म्हणजे उत्तम शरीर व भोग मिळतात. तें (य३-१८६) स्वीयकर्मफलच[१३] म्हटलें पाहिजे. यद्यपि, **'अनाथप्रेतसंस्कारात्कोटियज्ञ फलं[१४]लभेत्'** या वचनावरून अर्थातच परकर्माचें[१५] फळ पराला[१६] मिळते हें सिद्ध होऊं पहातें,

*(१) असे न मानल्यास (२) दुसऱ्याच्या कर्माने (३) दुसऱ्याचे शरीर (४) दुसऱ्याचे कर्माने मिळालेले (५) स्वतःचे (६) कर्ज फेडणे, कर्ज देणे (७) काळजीने वाढविणे (८) महापातकीयाचे (९) आपले ज्यांच्यावर ऋण आहे त्यांच्याकडून (१०) आपले पुण्य (११) कमी, अपुरे (१२) पुत्राने केलेल्या (१३) आपल्या स्वतःच्या कर्मांचे फळ (१४) ज्याच्या मरणानंतर त्याची उत्तरक्रिया करणारा कोणी नाही अशा अनाथ मनुष्याच्या प्रेताचा संस्कार केला असता कोटी यज्ञाचे फळ मिळते (१५) दुसऱ्याच्या कर्माचे (१६) दुसऱ्याला.*

तथापि संस्कारकर्त्याच्या[१] दयावृत्तीनें तें कर्म जनार्दनार्पण[२] होऊन ईश्वराच्या साह्यानें त्या अनाथाला दान म्हणून मिळतें व दत्तावर[३] देवता त्याचें सत्त्व[४] ठेवितात. त्यामुळें त्याला उत्तम शरीर मिळालें तर तेंही स्वीय कर्माचेंच फल आहे; कारण तेथें अधिकार मात्र यद्यपि न्यून[५] आहे तथापि योग्यता व पुण्यलेशाची अपेक्षा आहे. कारण कितीही अनाथ असला तरी सन्यासी व अतिपापी यांचे प्रेतसंस्कार शास्त्रीय[६] निषेधास्तव दयावंतालाही करतां येत नाहींत. पुत्राच्या कर्माने पित्याच्या अंतःकरणांत अदृष्ट[७] उत्पन्न होतें असें सांख्यसूत्रकार व तद्भाष्यकार म्हणतात. तें अदृष्ट संबंधावांचून उत्पन्न होत असेल तर कोणाच्याही अंतःकरणांत उत्पन्न झालें पाहिजे; व मग पुत्रकृत श्राद्धानें पित्याला जशी उत्तम गती होते तशी कुत्र्यालाही झाली पाहिजे. व संबंधानेंच जर पित्याच्या अंतःकरणांत अदृष्ट होत असेल तर संबंध क्रियासाध्य[८]

असतो म्हणून पितृकृत[९] वैधगर्भस्थापनानेंच[१०] सिद्ध झालेला अधिकार[११] पुत्रसमर्पित[१२] कर्माच्या अदृष्टाला संपादक[१३] होतो, व त्याचें ठिकाणीं पित्याचें स्वत्त्व राहतें. आतां, या पक्षांत सांख्यशास्त्राचा विरोधही नाहीं. सारांश, अन्यकर्मानें[१४] अन्यशरीरोत्पत्ति[१५] जीवालाही नाहीं तर ईश्वराला नाहीं हे काय सांगावें लागतें ? सारांश, या सर्व विवेचनावरून परमेश्वराचें शरीर भूतकार्य[१६] नसून मायामय आहे हें सिद्ध झालें.

*(१) प्रेताला संस्कार करणारा जो असतो त्याच्या (२) ईश्वरार्पण होऊन (३) दिलेल्यावर (४) मालकी, स्वामित्व, (५) कमी (६) शास्त्राने सांगितले नसल्यामुळे (७) पुण्यपाप (८) कर्माने उत्पन्न होणारा (९) पित्याने केलेल्या (१०) वेदविधीने केलेल्या गर्भाधान संस्कारपूर्वक गर्भाचे स्थापन केले असता (११) प्राणदातृत्व (१२) पुत्राने समर्पण केलेल्या (१३) उत्पादक (१४) दुसऱ्याचे कर्माने (१५) दुसऱ्याच्या देहाची उत्पत्ति (१६) पंचभूताचे बनलेले.*

पण दृष्टिसृष्टिवादानुसार आमच्या मतें ह्या शरीराचा अभिमान परमेश्वरास होत नसल्यामुळें त्याला स्वरूपच्युति[१] नाहीं. व म्हणूनच त्याला
गुरुशास्त्रादिजन्य[२] ज्ञानाची अपेक्षा नाहीं. यद्यपि शुद्धसत्त्व[३] मायामय[४] असल्यामुळे ''अहं ब्रह्मास्मि[५]'' ज्ञान विद्यावृत्तीनें[६] परमेश्वराचें ठिकाणीं संभूत[७] आहे, तरी त्याला त्याचा कांहीं उपयोग नाहीं. कारण अज्ञाननिवृत्ति[८] करितांच ज्ञानाचें महत्व आहे. म्हणूनच -

**''सचेतन[९] ते जीवन्मुक्त । अचेतन[१०] ते विदेहमुक्त । दोहीवेगळे[११] नित्यमुक्त । योगीश्वर[१२]'' ॥१॥**

ह्या समर्थांच्या म्हणण्याप्रमाणें परमात्मा नित्यमुक्त आहे. आणि त्याचें शरीर नित्यमुक्तप्रत्ययबलेंकरून[१३] त्याला **(य३..१८७)** ब्रह्मरूपच[१४] भासत असलें पाहिजें, मायरूप[१५] भासत नाहीं. करण, स्वरूपच्युति[१६] नसली तर सर्व जगच चिन्मय भासतें, मग स्वीयशरीर काय भिन्न आहे ? आणि हीच दृष्टि वास्तविक[१७] असल्यामुळें भगवच्छरीर मायामय[१८] म्हणणें देखील व्यतिरेकीयांकरितां[१९] असून वस्तुतः तें अनध्यस्तविवर्तरूप आहे. हें भगवदवतरण[२०] ''स्वमंतव्यांशसिद्धांततुषारादि'' ग्रंथाचेठायीं नाना प्रकारानें विस्तरशः केलें आहे; तें मनीषा असल्यास अवलोकावें.

*(१) परमेश्वर आपल्या सृदिानंद स्वरूपाला विसरत नाही (२) गुरु व शास्त्र यांच्यापासून मिळणाऱ्या (३) रजोगुण तमोगुणरहित सत्त्व (४) मायास्वरूप, मायात्मक (५) मी ब्रह्म आहे या ज्ञानवृत्तीचे स्फुरण (६) शुद्ध सत्त्व वृत्तीमुळे (७) भासते (८) अज्ञानाचे नाशाकरिता (९) देह असतांना जीवंतपणी (१०) मेल्यावर (११) जीवन्मुक्ति किंवा विदेहमुक्ति या दोन्ही मुक्तीहून निराळे (१२) श्रीकृष्णादि अवतार (१३) त्याला नित्य मुक्तपणाचाच अनुभव असल्यामुळे, बद्धपणाचा अज्ञानानुभव कधीच नसल्यामुळे (१४) सृदिानंदरूप (१५) मिथ्या (१६) आपल्या स्वरूपाचे ज्ञान नसणे (१७) खरी (१८) मायिक (१९) नुस्ते देहादि उपाधिहून आत्म्याला निराळे करून मी ब्रह्म आहे असा अनुभव घेणारे जे ज्ञानी आहेत त्यांच्याकरिता (२०) भगवंताचे अवतार धारण करणे*

शिष्य :- भगवन् ! माझी संपूर्ण शंका विनिवृत्त[**] झाली. आतां अग्रिम कथामृतपिपासा[१] आहे. कारण आपल्या मुखांतील वचनाचेठायीं अलंबुद्धि[२] कोणास होणार?

श्रीगुरु :- श्रवण कर.-

**'स[३] एष नरलोकेऽस्मिन्नवतीर्णः स्वमायया ।**

**रेमे स्त्रीरत्नकूटस्थो भगवान् प्राकृतो यथा ॥१॥'भाग.स्कंध १-११-३५**

**अन्वय :- स एषः नरलोकेऽवतीर्णः भगवान् यथा प्राकृतः स्यात्तथा स्त्रीरत्नकूटस्थो स्वमायया रेमे ॥**

**॥ ओव्या ॥**

**जो आनंदेदंतावच्छिन्न[४] । तोचि हा पुढें अन्वयें[५] सगुण ।**
**नरलोकीं नरसजातीय[६] असोन । नाहीं मनुष्यपण[७] ज्यालागीं ॥९७॥**
**आपुलें जें षड्गुणैश्वर्य[८]। आपणचि तयाचा आश्रय[९]। यालागीं 'स्वभगवान्' होय । विशेषण लाहे[१०] सार्थता[११] ॥९८॥**
**'प्राकृत' म्हणजे प्रकृतियुक्त[१२]। अविवेकें[१३]जो स्वविस्मृत[१४]। तो कामिनीयोनिसहोपस्थ[१५]। आनंद मानी ज्या परी ॥९९॥**

*(**) नाहिशी. (१) पुढील कथाभाग ऐकण्याची इच्छा (२) तृप्ति (३) तोच हा भगवान् मृत्युलोकाचे ठिकाणी आपल्या मायेच्या योगाने अवतार धारण करून स्त्रीसमुदायामध्ये प्राकृत अज्ञानी पुरुषासारखा रममाण झाला (४) आनंदाला जी इदंता*

*(म्हणजे प्रेमवृत्तीला अपरोक्ष होणे) प्राप्त होते त्या इदंतेच्या ठिकाणी भासणारा. भक्तीमध्ये भक्ताच्या प्रेमवृत्तीला आनंदच विषय होतो म्हणजे गोचर होतो व तेथेच परमेश्वराचे सगुणस्वरूप भासते (५) सर्व नामरुपामध्ये तोच भरला आहे असे पाहणे (६) मनुष्यासारखा (७) मर्त्यभाव, विनाशीपणा (८) यश, श्री, औदार्य, ज्ञान, वैराग्य, ऐश्वर्य हे ईश्वराचे सहा प्रकारचे ऐश्वर्य आहे (९) आधार (१०) प्राप्त होते (११) अर्थाला धरून (१२) अज्ञानी (१३) अविचाराने (१४) आपल्या स्वरूपाला विसरलेला (१५) स्त्रीसंभोग.*

**तेंवी अमायी[१] स्त्रियांत रमला । मायिका[२] मायावशें[३] गमला[४] ।**
**एऱ्हवीं जो वेदें नमिला[५] । यत्स्मरणें[६] विमला[७] योगीमति[८] ॥१००॥**

शिष्य :- भगवन् ! आपल्या ह्मणण्याचा नीट अर्थ मला समजला नाहीं. कारण, मूळांत जीं 'स एष' अशीं पदें आहेत त्या पैकीं प्रथम (य३-१८८) पदाचा पूर्वदेशकालविशेषणसंबंध[९] असून, द्वितीय पदाचा इदानींतनदेशकाल[१०] विशेषणसंबंध आहे; आणि दोहोंचा अन्वय[११] ईश्वराचें ठिकाणीं आहे, हें संभवत नाहीं. कारण ईश्वरशब्दानें शुद्धब्रह्म घेतलें तर श्लोकांत सांगितलेलें नरलोकीं[१२] शुद्धब्रह्माचें अवतरण[१३] संभवत नाहीं. आणि मायायुक्त ब्रह्म घेतलें तर तें नित्य परोक्ष[१४] आहे. कारण माया ही माया[१५]दशेंत किंवा मायानिवृत्तिदशेंत[१६] कळत नसल्यामुळें अनुमेयमात्र आहे. तसा तदवच्छिन्न[१७] परमात्माही अनुमेयमात्र[१८] व परोक्ष आहे. परोक्ष पदार्थाचा अनुभव[१९] संभवत नाहीं. आणि पूर्वी ज्याचा अनुभव झाला नाहीं, त्याची आठवण संभवत नाहीं. मूळांतील 'स' शब्द पूर्वदेशकाल[२०]विशेषणविषयिणी तत्ता[२१] दाखवीत असून, 'एष' शब्द इदानींतनदेश[२२]कालविशेषणविषयिणी एतत्ता[२३] दाखवितो. 'तदेतत्' पदांचा अन्वय[२४] करून देणारा तिसरा पाहिजे.

*(१) मायारहित (२) अज्ञानी लोकांना (३) मायेच्या अधीन (४) भासला (५) वंदिला गेला (६) ज्याच्या स्मरणाने (७) शुद्ध, रजोगुण तमोगुणरहित (८) योग्यांची बुद्धि (९) पूर्वीच्या देशाचा व कालाचा विशेषणत्वे संबंध (१०) वर्तमान देश व कालरूपी विशेषणांचा संबंध (११) एकार्थ संबंध (१२) मृत्युलोकी (१३) सगुणरूपाने गोचर होणे (१४) अगोचर, अदृश्य (१५) माया असतांना (१६) माया नाहीशी झाल्यावर (१७) अनुमानाने कळण्याजोगा (१८) मायावच्छिन्न, मायिक किंवा मायेसहित असणारा (१९) अपरोक्षत्व (२०) भूत देश व कालाविषयीची (२१) भूतपणा (२२) वर्तमानपणा देशकालाविषयीचा (२३) वर्तमानपणा (२४) संबंध, एकवाचकत्व, एकार्थत्व.*

आणि त्या तिसऱ्याला पूर्वदेशकालविशेषणविषयिणी तत्ता अनुभूत[१] असली तरच तिचा इदानींतन-देशकालविशेषणविषयिणी एतत्तेशीं तो अन्वय करितो. ह्या प्रत्ययाला[२] प्रत्यभिज्ञा म्हणतात. तशी प्रत्यभिज्ञा[३] ईश्वरविषयक संभवत नाहीं. म्हणूनच कोणत्याही व्यक्तींचें ठिकाणीं परमेश्वरावतारपणा संभवत नाहीं. आणि परमेश्वरावतारपणा न संभवत असल्यामुळें अखंड ऐश्वर्य संभवत नाहीं. अखंड ऐश्वर्य न संभवल्यामुळेंच जीवत्वप्राप्ति होते. आणि जीव जें कर्म करितो, त्याचा अवश्य भोग होतो. म्हणून श्रीकृष्णाला स्त्रीभोगादि निषिद्ध कर्मापासून नरकप्राप्त्यादि भोग झाला पाहिजे.

श्रीगुरु :- गड्या ! तुझें चावटच[४] अझून संपत नाहीं. मला वाटते कीं, तूं श्रुतीवरही तर्क काढण्याला काय पूर्वजन्मींचा जंबूक[५] आहेस? जो आपल्या आईविषयीं माझी आई जारिणीं असेल काय? असे तर्क काढतो, त्याच्यावर 'मी शुद्धकुलीन नाहीं काय? असा तर्क काढण्याचा जसा आरोप येतो. तद्वतच श्रुतिमातेविषयीं तर्क काढणाऱ्या पुरुषाची गोष्ट होते. तथापि काढलेल्या तर्काचें निराकरण करण्याची माझी प्रतिज्ञा असल्यामुळें उत्तर श्रवण कर.

(य३-१८९) तूं बोलिलास कीं, परमेश्वर, माया परोक्ष[६] असल्यामुळें सर्वदा परोक्ष असतो; तें असंबद्ध[७] आहे. कारण माया जर नित्य परोक्ष असेल, तर मग मायेचें कार्य[८] प्रत्यक्ष कां व्हावें? आणि मायेचें कार्य जर प्रत्यक्ष होत नाहीं असें मानशील तर संसार कोणालाच भासू नये. तो तर भासत आहे. म्हणून माया परोक्ष नसून प्रत्यक्षादिप्रमाणगोचर कार्यानुमेय[९] आहे.

आतां, कदाचित् असें म्हणशील कीं यद्यपि मायेचा विक्षेपशक्त्यात्मक[१०] कार्यांश प्रत्यक्ष आहे, -

*(१) ज्ञात (२) अनुभवज्ञानाला (३) ईश्वर सर्व देशात सर्वकाली राहतो म्हणून (४) चावटपणा (५) कोल्हा (६) अगोचर (७) युक्तीने असिद्ध (८) जगत् (९) प्रत्यक्षादि प्रमाणाने कळणाऱ्या जगद्रूपी कार्यावरून जिचे अनुमान होऊ शकते (१०) एकाद्या वस्तूवर भलत्याच निराळ्या वस्तूचा भास होणे याला विक्षेप म्हणतात. परब्रह्माचे ठिकाणी जगत् भासते म्हणून जगद्भास हा विक्षेप आहे. हा असा विक्षेप भासविणे ही मायेची एक शक्ति आहे. ही शक्ति कार्यरूप म्हटली जाते*

तथापि आवरणात्मक[१] कारणांश परोक्षच आहे, तर तेंही बरोबर नाहीं. कारण, ज्याप्रमाणें, 'मी संसारी[२] आहे' असा विक्षेपशक्त्यात्मक मायेचा अनुभव येतो, त्याप्रमाणे 'मी ब्रह्म जाणत नाही' असा आवरण-शक्त्यात्मक मायेचाहि अनुभव येतो.

आतां, परमेश्वर जो तूं मायावच्छिन्न[३] बोलिलास, तो काय विक्षेपशक्त्यात्मक मायावच्छिन्न? कीं आवरणशक्त्यात्मक मायावच्छिन्न? प्रथम पक्षीं, विक्षेपशक्त्यांशापरोक्षानुभववत्[४] परमेश्वराचाही अपरोक्षानुभव[५] येणें शक्य आहे. आणि द्वितीय पक्षीं, परमेश्वराला जीवत्वप्राप्ति[६] होते. कारण सर्व वेदांतसिद्धांतामध्यें यद्यपि पुष्कळ मतें आहेत तथापि त्या सर्व मतांत परमेमश्वराविषयीं आवरणस्वीकार केला[७] नाहीं. कारण, परमेश्वराविषयीं आवरण स्वीकारिल्यास परमेश्वराच्या आवरणनिवृत्तीकरितां[८] दुसऱ्या[९] परमेश्वरोपदेशाची[१०] आवश्यकता लागेल. तशीच दुसऱ्याकरितां तिसऱ्याची व तिसऱ्याकरितां चवथ्याची, याप्रमाणें अनवस्थादोष[११] येतो. बरें, अनवस्था निराकारण करण्याकरितां परमेश्वर नित्य अज्ञानी आहे असें म्हटलें, तर मग ज्ञान कोणासच न झालें पाहिजे.

*(१) मायेची दुसरी शक्ति आहे तिला आवरणशक्ति म्हणतात. ही कारणरूप आहे आणि ब्रह्माचे आच्छादान करून ब्रह्म भासू न देणे हे तिचे लक्षण आहे (२) देहस्वरूप, सुखीदुःखी, अज्ञानी, अल्पशक्ति इत्यादि धर्माने युक्त (३) मायेने मर्यादित (४) मायेच्या विक्षेपशक्तीरूप अंशाचा जसा अनुभव येतो तसा (५) प्रत्यक्षज्ञान (६) जीव मानल्यासारखे (७) परमेश्वराच्या ज्ञानाला मायेच्या आवरणशक्तीने झाकून टाकून परमेश्वराला आपल्या सृदिानंदस्वरूपाची विस्मृति झाली असे कोणी मानले नाही. (८) स्वरूपविस्मृतिरूपी अज्ञानाचा नाश करण्याकरिता (९) ज्याला असे अज्ञान नाही अशा (१०) परमेश्वराच्या वेदरूपी उपदेशाची (११) शेवट न लागणे.*

आणि महावाक्यावरून[१] ब्रह्मापरोक्षज्ञान[२] तर अनुभवसिद्ध[३] आहे. दृढाऽदृढतेचाच[४] मात्र ज्ञानी अज्ञानी यांत भेद आहे. ते महावाक्य वेदांतांतर्गत[५] असल्यामुळें वेद ज्ञानीप्रणीत[६] असले पाहिजेत. आणि सर्व जीवांनां तर महावाक्यावरूनच ज्ञान होतें. येवढ्याकरितां ईश्वराला नित्यज्ञानी[७] मानलें पाहिजे. नित्यज्ञानी परमेश्वराचें ठिकाणीं मायेच्या आवरणाचा[८] स्वीकार करणें, सूर्याचें ठिकाणीं आंधार आहे, असें म्हणण्यासारखें होय.

आतां, शुद्धसत्त्वात्मकमायाप्रतिबिम्बित[९] असल्यामुळें मिश्रसत्त्वात्मक[१०] अविद्यावरणाचा[११] परमेश्वराचेठायीं स्वीकार नसूनही मायापरोक्षत्वास्तव[१२] (य३-१९०) परमेश्वराला परोक्षत्वच[१३] आहे असें म्हणूं नको. कारण मिश्रसत्त्वात्मक[१४] आवरणरूप[१५] अविद्या ज्याप्रमाणें पदार्थ झांकून टाकण्याला हेतु[१६] आहे, तशी शुद्धसत्त्वात्मक[१७] विद्या पदार्थ झांकून टाकण्याला हेतु नाहीं. म्हणून जीवापेक्षां ईश्वरच सत्त्वनिष्ठांना[१८] अपरोक्ष होणें अधिक शक्य आहे.

दुसरें, जो तूं शुद्धसत्त्वगुण मानिलास, तो साक्षीभास्य[१९] आहे किंवा नाहीं? आणि साक्षीभास्य मानिलास तर अनुभवगम्यापरोक्षता[२०] त्याचेठायीं[२१] प्राप्त होत असल्यामुळें -

*(१) तत्वमसि वाक्यावरून (२) ब्रह्माचे अपरोक्ष ज्ञान (३) अनेकांनी अनुभव घेतला आहे (४) ज्याचे ज्ञान दृढ तो ज्ञानी व ज्याचे ज्ञान अदृढ तो अज्ञानी (५) वेदातील (६) ज्ञानसंपन्नाने केलेले (७) स्वतःसिद्ध ज्ञानी, अज्ञानी केव्हाच नव्हता असा (८) आच्छादनाचा (९) शुद्धसत्वात्मक म्हणजे जिच्यात रजतमगुण नाहीत अशा मायेमध्ये भासणारे चैतन्य तो ईश्वर असा सिद्धान्त असल्यामुळे (१०) ज्या सत्वगुणात रजोगुण तमोगुण यांचे मिश्रण आहे तिला अविद्या म्हणतात (११) त्या अविद्येने परमेश्वराचे ज्ञान झाकून टाकले व त्यामुळे त्याला स्वरूपविस्मृति झाली या गोष्टीचा (१२) माया इंद्रियांना गोचर होत नाही म्हणून (१३) अगोचरत्व, न दिसण्याजोगा (१४) रजतममिश्रित अशा सत्वाने युक्त (१५) स्वरूप ज्ञान झाकणारी (१६) कारण (१७) रजतमरहित अशा सत्वाने युक्त (१८) सात्विक पुरुषांना (१९) साक्षी चैतन्याने कळणारा (२०) अंतःकरणाने कळणे ही जी अपरोक्षता ती (२१) शुद्धसत्वाचे ठिकाणी.*

तदवच्छिन्न[१] परमेश्वराचेठायीं ती सहजच प्राप्त होते. म्हणून परमेश्वराचा अनुभव येऊन स्मृति[२] होणें शक्य आहे.

आतां, मायेचा[३] चैतन्याशीं संबंध नसल्यामुळें अनुभवगम्य[४] मायाही यावद्ज्ञान[५] आहे. आणि तीच सर्वसमर्थ[६] असल्यामुळें परमेश्वराची अपेक्षा[७] नाहीं, हें म्हणणें ब्रह्मस्वरूपीं मायेचा अनिर्वचनीय[८] संसर्गाध्यास[९] असल्यामुळें ब्रह्मस्वरूपाची[१०] हानी न होऊन चैतन्याचेठायीं आरोपित[११] मायावच्छेद[१२] प्राप्त होत असल्यामुळे, व तो न मानला तर जडत्वास्तव[१३] मायेच्या असामर्थ्यामुळें बाधित[१४] होतें.

यद्यपि स्वामी निश्चलदास आपल्या 'युक्तिप्रकाश' नामक ग्रंथांत मूर्खांच्या भयाकरितां ईश्वर कल्पिला आहे, वास्तविक

तो नाहीं, व त्याचे अवतारही नाहींत असें म्हणतात तथापि ही मौढ्याऽवच्छेदकावच्छिन्न[१५] आचार्यपद्धतीच[१६] म्हणावी लागते. कारण, स्वामी जे ईश्वर नाहीं म्हणतात, त्यांनां मी असें विचारितें कीं, आपण जो ईश्वर नाहीं म्हणतां, तो काय आपल्याला वाटते म्हणून? कीं श्रुतींत नाहीं म्हणून? कीं युक्ति नाहीं म्हणून? कीं अनुभव नाहीं म्हणून?

*(१) शुद्धसत्वयुक्त (२) आठवण (३) ईश्वर इत्यादि पदार्थ जे आहेत ते मायेचा व चैतन्याचा संबंध मानून वेदान्तात मानले गेले आहेत पण वस्तुतः मायेचा व चैतन्याचा काही संबंध होत नाही (४) अनुभवाने कळणारी (५) ब्रह्मज्ञान होईपर्यंत (६) काही करण्यास लायक (७) जरूरी (८) कसा तो सांगता न येण्याजोगा (९) मायेचा व ब्रह्माचा संबंध आहे असा भ्रम (१०) बिघाड (११) अपेक्षेने कल्पिलेला (१२) मायेचा संबंध किंवा मायेची मर्यादा (१३) माया जड आहे म्हणून व असमर्थ आहे म्हणून या म्हणण्याचा अर्थ असा की, माया जड आहे. जड वस्तु काही करू शकत नाही. तिच्या ठिकाणी क्रिया दिसावयाला तिचा चेतनाशी संबंध झाला पाहिजे. म्हणून मायेपासून सृष्टिपसारा निर्माण होण्याकरिता त्या मायेशी चैतन्याचा संबंध जोडला पाहिजे व ते मायासंबद्ध चेतनच ईश्वर म्हटले जाते. म्हणून सृष्टियादिकांची उपपत्ति लावण्याकरिता असा ईश्वर मानला पाहिजे (१४) खंडित होते (१५) मूर्खपणाची (१६) गीता, उपनिषदे, ब्रह्मसूत्रे यावर भाष्य करणाऱ्यांना आचार्य म्हणतात. हे मतप्रवर्तक असतात. आचार्यपणाची रीति अधिकारवाणीने सांगण्याची रीति.*

पैकी चवथा पक्ष संभवत नाहीं. कारण निद्रेमध्यें जीवाला कालगणनेची[१] स्मृति न राहूनही वेळेच्यावेळीं कोण जागें करितो ? - साक्षी करितो म्हणाल तर, साक्षीचें ठिकाणीं कर्तृत्व[२] आलें, म्हणजे[३] त्याचा साक्षीपणाच नाहींसा होतो. आतां, साक्षी कोणी नाहीं असे मानलें तर सर्वकर्ता ईश्वरच मानावा लागेल. व तसें मानलें म्हणजे नैय्यायिकाभिमतप्राप्तिरस्तव[४] वेदांतसिद्धांत रसातळास[५] गेलाच म्हणावयाचा. – नुसती वासनाच आपोआप जागृत होते असें म्हटलें तर वासना जड आहे. सांख्याच्या कारणरूप[६] जड प्रकृतीलाच जर वेदांत स्वतंत्र[७] कर्तृत्व देत नाहीं तर तिच्या कार्यरूप जड वासनेला तें कर्तृत्व कसें (य३-१९१) देईल ? सारांश, परमेश्वर निद्रेंतून उठविणारा आहे हा सर्वांचा अनुभव प्रमाण[८] घेतल्याशिवाय गत्यंतर नाहीं, – तिसरा पक्षही बरोबर नाहीं. कारण शुद्धब्रह्माचें ठिकाणीं कर्तृत्व[९] मानलें तर तें कर्तृत्व नित्य[१०] राहून ज्ञानानें त्या कर्तृत्वाचा नाश होणार नाहीं. आणि तें कर्तृत्व शुद्धब्रह्माचें ठिकाणीं असल्यामुळें मोठें[११] (महान) राहील. महत्कर्तृत्वावच्छिन्न[१२] ब्रह्माचें ठिकाणीं अल्पकर्तृत्वावच्छिन्न[१३] जीवाचें ऐक्य संभवणार नाहीं. निश्चलदास महाराज ! आपण कांहीं नास्तिक नाहीं; स्वयं वेदांती म्हणवितां. यास्तव अशी माथ्यावर अर्गला[१४] घालून घेणें आपणास उचित नाहीं. म्हणून

*(१) मला सकाळी चार वाजता उठावयाचे आहे असा विचार करून मनुष्य निजल्यावर चार वाजेपर्यंतचा वेळ मोजण्याकरिता तो जागा राहत नाही (२) जागे करण्याचे कर्तृत्व (३) असे मानल्यास (४) नैय्यायिकांना मान्य असलेले मत मानण्यासारखे होऊन (५) बुडाला (६) सृष्टीला कारण असणाऱ्या (७) चैतन्याच्या संबंधावाचून स्वतंत्रपणे जड प्रकृति काही करू शकत नाही. (८) मान्य केल्याशिवाय (९) जीवाला जागे करण्याचे कर्तृत्व (१०) त्रिकाली नष्ट न होणारे (११) अगाध (१२) अगाध कर्तृत्व ज्याचे ठिकाणी आहे (१३) किंचित् कर्तृत्वशक्ति ज्याचे ठिकाणी आहे (१४) लोहदंड.*

विक्षेपशक्तिवशकर्ता[१] मायाप्रतिबिम्बित किंवा शुद्धसत्त्वात्मकमायाबिम्बित[२], अथवा जीवरूपप्रतिबिम्बापेक्षिक-बिम्बत्वारोपावच्छिन्नबिम्बभूत[३] परमेश्वर मानणें इष्ट आहे.

पुनः, जीवन्मुक्त झाल्यावरही प्रारब्धाचा भोग भोगावा लागतो. तें प्रारब्धकर्म तर जडरूप असल्यामुळें त्याला नियमित[४] करणें कोणाच्या[५] संकल्पाशिवाय घटत नाहीं, आणि जीवसंकल्पानें[६] जर प्रारब्ध संकल्पित[७] झालें असतें तर जीवन्मुक्तींत वासनाक्षय[८] झाल्याबरोबर प्रारब्धाची निवृत्ति[९] व्हावयाला पाहिजे होती. तसें झालें असतें तर जीवन्मुक्तीच संभवली नसती. व जीवन्मुक्तावांचून गुरुपरंपरा संभवली नसती; व गुरुपरंपरेवांचून ज्ञान संभवलें नसते; आणि ज्ञानावांचून मुक्तीही संभवली नसती; आणि मुक्तच जर कोणी झाला नसता, तर पुढें ज्ञानानें मुक्ति होणार, ह्या शास्त्राची प्रवृत्तीच व्यर्थ झाली असती. हें सर्वच लोट्[१०] मानला तर नित्य संसारच भोगावा, असा उपदेश करणें श्रेयस्कर होतें. आणि संसार सर्वांनां अनुभूत असल्यामुळें त्याचा उपदेश संभवत नाहीं; म्हणून सर्वांनीं मौन होऊन राहावें हें बरें. येवढी भयंकर अनर्थपरंपरा शिरावर घेण्यापेक्षां परमेश्वरसत्यसंकल्पानेंच[११] जीवन्मुक्तदशेंतही प्रारब्ध नियत केलें आहे, असें मानणें सयुक्तिक आहे. आतां, दुसरा पक्षही संभवत नाहीं. कारण,

*(१) जगद्रूपी विपरीत देखावा भासविणाऱ्या अविद्येच्या शक्तीला वश न होता तिला आपल्या स्वाधीन ठेवणारा व मायेमध्ये प्रतिबिंबित (२) रजोगुण तमोगुणरहित अशी जी शुद्धसत्वात्मक माया तिच्यामध्ये प्रतिबिंबित झालेला (३) प्रतिबिंबरूप*

*जो जीव त्या जीवाच्या अपेक्षेने बिंबत्वाच्या आक्षेपाला धारण करणारा म्हणजे बिंबभूत झालेला (४) नियमन करणे (५) कोणी संकल्प केल्यावाचून (६) जीवाच्या संकल्पाने (७) नियत (८) वासना शांत झाल्याबरोबर (९) नाश (१०) होवो असे म्हटले तर (११) परमेश्वराच्या सत्यसंकल्पाने (१२) मायानियंता परमात्मा यातूनच हे सर्व विश्वनिर्माण करितो - तो सर्वज्ञ व विश्व उत्पन्न करणारा आहे - भोक्ता, भोग्य भोगविणारा तोच झाला -सर्व जगाचा तोच कर्ता असून पालनकर्ताहि तोच आहे - त्याच्या भीतीने वायू वाहण्याचे व सूर्य प्रकाश देण्याचे काम करितो - सर्व पदार्थमात्रात तोच अंतर्यामी रूपाने भरला असून सर्वांचे तोच शासन करितो - माझी प्रकृति सर्व विश्वाचे जन्मस्थान असून मी तिचे ठिकाणी गर्भधारण करितो*

**॥ श्रुतिस्मृतयः ॥**

**'अस्मान्मायी[१२] सृजते विश्वमेतत्' ॥**
**'स सर्वज्ञः स विश्वकृत्' ॥**
**'भोक्ता भोग्यं प्रेरितारं च मत्वा' ॥**
**'सहि विश्वस्य कर्ता भुवनस्य गोप्ता' ॥**
**'भीषास्माद् वातः पवते, भीषोदयति सूर्यः' ॥**
**'अंतःप्रविष्टाशास्ता' ॥**
**'मम योनिर्महद्ब्रह्म तस्मिन्गर्भं दधाम्यहम्' ॥ (य३-१९२)**
**'मयाध्यक्षेण[१] प्रकृतिः सूयते सचराचरम्' ॥**
**'ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशे ऽर्जुन तिष्ठति । भ्रामयन्सर्वभूतानि यंत्रारूढानि मायया' ॥**
**'स एव विश्वस्य भवान्विधत्ते गुणप्रवाहेण विभक्तवीर्यः ॥**
**सर्गाद्यनीहोवितथा अभिसंधिरात्मेश्वरो ऽतर्क्यसहस्त्रशक्तिः'॥**
**'अयं हि विश्वोद्भवसंयमानामेक स्वमायागुणबिम्बितो यः ।**
**विरिंचिविष्णवीश्वरनामभेदान्धत्ते स्वतंत्रः परिपूर्ण आत्मा' ॥**

इत्यादि शतशः[२] श्रुती स्मृती भगवंताविषयीं प्रमाण आहेत. एवं पहिलाही पक्ष संभवत नाहीं. कारण, पहिला पक्ष स्वीकारला असतां आपलें ठिकाणीं दोन दोष प्राप्त होतात.

वेदांताश्रित[३] नास्तिकता हा पहिला; व
अनिश्चयावच्छिन्नोन्मत्तप्रलाप[४] हा दुसरा.

*(१) मी मायेचा अधिष्ठाता झालो की, माया चराचर सृष्टि निर्माण करू लागते. अर्जुना! सर्व जीवांच्या हृदयामध्ये ईश्वर वास्तव्य करीत असून तो चक्रावर फिरणाऱ्या बाहुलीप्रमाणे जीवांना मायेने फिरवीत असतो - हे भगवंता! तू क्रियारहित आहेस तरी तूच मायेच्या सत्वादिगुणांचा आश्रय करून व त्या गुणानुसार आपली शक्ति विभागून या जगाचे उत्पत्तिस्थितिलय इत्यादि व्यापार करतोस. तू सत्यसंकल्प आहेस. तू स्वतंत्र आहेस. तू मायेला स्वाधीन ठेवतोस. तुझी अगाधशक्ति जीवाला अगम्य आहे - हाच परमेश्वर आपल्या मायेच्या गुणात प्रतिबिंबित होऊन, गुणानुसार ब्रह्मा विष्णु महेश्वर ही नांवे धारण करितो तो स्वतंत्र असून परिपूर्ण आत्मस्वरूप आहे (२) शेकडो (३) वेदान्ताचा आश्रय करून साकार परमेश्वर न मानणे (४) कोणताही एक निश्चय नसून उन्मत्ताप्रमाणे काहीतरी बडबडणे.*

पैकीं प्रथम दोष आपलें ठिकाणीं ठेवून आपणाला किंचित् निश्चयी[१] मूर्ति समजावें तर परमेश्वराचें नास्तित्व आपण सर्वच ठिकाणीं कबूल केलें नाहीं. युक्तिप्रकाशांत[२] जसें ईश्वर नाहीं म्हटलें आहे, तसेंच विचारसागराच्या[२] चवथ्या तरंगांत ईश्वरवर्णन व ईश्वर आहे, म्हणून म्हटलें आहे. पुनः, वृत्तिप्रभाकराच्या[२] पहिल्या प्रकाशांत ईश्वराच्या ज्ञानाला[३] उत्पत्तिनाश आपण कबूल केले असून, त्याच ग्रंथाच्या आठव्या प्रकाशांत ईश्वर अनादि व आवरणरहित[४] नित्यज्ञानी आहे, असें आपणच कबूल केले. सारांश, आपले ठिकाणी दुसरा मात्र दोष आम्हाला दुःखानें ठेवावा लागतो. वेड्याशीं आम्ही भाषण करूं इच्छित नसल्यामुळें निश्चलदासमताचा तूं असलास तर तुझ्याशींही आम्ही भाषण करूं इच्छित नाहीं. तसेंच ईश्वराचा अवतार होत नाहीं, हेंही पर्यायानें निश्चलदास युक्तिप्रकाशांत दाखवितात. आणि विचारसागराच्या चवथ्या तरंगांत भाष्यकारांचें प्रमाण देऊन रामकृष्णाचें शरीर भूतकार्य नसून मायाकार्य अवताररूप आहे असें सांगतात, म्हणून ह्यांचें म्हणणें संशयात्मकच[५] आहे. यद्यपि दृष्टिसृष्टिवादांत[६] ईश्वर जीवकल्पित[७] मानला आहे, तथापि परमेश्वराचें

ऐश्वर्यच[८] मात्र जीवानें कल्पिलेलें आहे, चैतन्य भाग जीवानें कल्पिलेला नाहीं; कारण चैतन्यभाग जर जीवानें कल्पिलेला असेल तर स्वसमानचैतन्यवत्ता[९] ईश्वराचें ठिकाणीं राहूं नये. कल्पित पदार्थ आपल्यापेक्षां न्यून[१०] असतो; आणि चैतन्यभास्यही[११] असतो. तेथे ईश्वरातील (य३-१९३) चैतन्यभाग जर जीवकल्पित मानिला तर -

*(१) सगुणसाकार परमेश्वर नाही असा निश्चय करणारे (२) नांवाचा ग्रंथ (३) म्हणजे ईश्वराचे ज्ञान सृष्टिकाली उत्पन्न होते व प्रलयकाळी नाश पावते (४) ज्याला आपली स्वरूपविस्मृति झालेली नाही, ज्याचे ठिकाणी अज्ञान नाही (५) निश्चयात्मक नाही असे (६) ज्या वादात ब्रह्माची त्रिकालाबाधित पारमार्थिक सत्ता व जगाची प्रातिभासिक सत्ता अशा दोनच सत्ता मानल्या आहेत त्या वादात (७) जीवाने ज्याची कल्पना केली आहे असा (८) सर्वज्ञता, सर्वशक्तिमत्ता इत्यादि सामर्थ्य (९) आपल्या समान चैतन्यपणा (१०) कमी (११) चैतन्याने जाणला जाणारा, जड.*

जीवकृत सृष्टीमध्यें ईश्वर संसारी[१] होऊन जीवकृत[२] वेदज्ञानानें[३] ईश्वरमुक्तिप्रसंग[४] प्राप्त होतो. आणि तसें मानिल्यास अस्मादिकांकडे[५] ईश्वरत्व येत असून संसारित्वास्तव[६] व मुक्तीच्या अपेक्षेस्तव[७] जबदस्तीनें नित्यज्ञानी[८] ईश्वराकडेच जीवत्व येत आहे. म्हणजे ईश्वराला जीव व जीवाला ईश्वर एवढा शब्दमात्र वाद होतो. नामभेदमात्र वादांत शहाणे पुरुष आग्रह करीत नाहींत. पुनः, ईश्वराचें चैतन्य जीवकल्पितच आहे, असें घेऊन चाललें तर तें चैतन्य चैतन्यभास्य[९] आहे असें मानावें लागेल. तसें मानलें म्हणजे भासकचैतन्याशीं[१०] भास्यचैतन्याची[११] चेतनत्वास्तव[१२] एकता[१३] होऊन कल्पितत्व[१४] नाहींसें होईल ; अथवा भास्यचैतन्य जड होईल. हें कबूल करणें म्हणजे प्रकाश आंधार होतो असें म्हणणें होय. आणि अनुभव पाहिला[१५] तर स्वप्नांतील राजाचें राज्य ज्याप्रमाणें स्वप्नद्रष्टृकल्पित[१६] असतें, त्याप्रमाणें त्या राजाच्या शरीरांतील साक्षी[१६] कांही स्वप्नद्रष्टृकल्पित[१७] नसतो. तात्पर्य, दृष्टिसृष्टिवादांत जरी परमेश्वराचे ऐश्वर्य[१८] जीवकल्पित आहे तरी परमेश्वरांतर्गत चैतन्यभाग जीवकल्पित नाहीं. आणि

जीवकल्पितेश्वरवादाचा[१९] यथार्थ अर्थ तर हा आहे की, घटाकाश[२०] जसें घटाचें कार्य नाहीं, किंतु घटाच्या स्थितीवर[२१] घटाकाशाची स्थिति[२२] अवलंबून आहे, तद्वत् ईश्वर जीवाच्या कल्पनेचें कार्य[२३] नसून जीवाला लागलेल्या अनादि वासनारूप कल्पनेवर परमेश्वराची स्थिती अवलंबून आहे.

*(१) जीव (२) जीवाने उत्पन्न केलेल्या (३) वेदातील ज्ञानाने (४) ईश्वर मुक्त होतो असे मानण्याचा प्रसंग (५) आमच्याकडे (६) संसारी बनल्यामुळे (७) मुक्त होण्याची आवश्यकता असल्यामुळे (८) नित्यज्ञान स्वरूप किंवा जो आपले स्वरूप विसरला नाही अशा (९) चैतन्याने कळणारे (१०) जाणणाऱ्या चैतन्याशी (११) जाणल्या जाणाऱ्या चैतन्याची (१२) दोन्ही चेतन म्हणून (१३) ऐक्य (१४) ते कल्पित ठरणार नाही (१५) कल्पित वस्तूविषयी आपला अनुभव काय आहे याचा विचार केला असता (१६) स्वप्नाला पाहणारा जो असतो त्याने कल्पिलेले (१७) चैतन्य (१८) सामर्थ्यादिगुण (१९) ईश्वरहि जीवानेच कल्पिलेला आहे या वादाचा (२०) घटातील पोकळी (२१) अस्तित्वावर (२२) अस्तित्व (२३) परिणाम.*

म्हणजे जीव अनादिवासनारूप कल्पनेनें स्वरूपप्रतिबिम्बापेक्षी[१] ब्रह्मावर बिम्बत्वारोप करितो. म्हणून प्रतिबिम्बापेक्षीबिम्बत्वारोपावच्छिन्नबिम्बभूत[२] ब्रह्म परमात्मा ईश्वर आहे, हें दृष्टिसृष्टिवादांत सिद्ध होते.

आणि माझ्या म्हणण्यालाच मधुसूदन स्वामी आपल्या सिद्धांतबिंदूंत संमति देतात. तो परमात्माच सुजनजीवभावनावच्छिन्न[३] कनककुंडलवत्[४] अनध्यस्तशरीररूप[५] अवतार धारण करितो. हेंही -

**'त्वं[६] जातो भवसि विश्वतोमुखः'॥**

**'उपासकानां कार्यार्थं ब्रह्मणो रूपकल्पना' ॥**

**'संभवाम्यात्ममायया' ॥**

**'तदा तदाऽवतीर्याम्यहम्.' ॥ (य३-१९४)**

इत्यादि श्रुतिस्मृतीवरून आणि सगुणध्यान करणाऱ्याला संकष्टनाशक[७] सगुण परमात्मा पाहिजे, या युक्तीवरून व पांडवसहकरणाद्यैतिहासिक[८] अनुभवावरून सिद्ध आहे. आणि ईश्वरावतारप्रक्रिया[९] अनेक स्थानीं मी निरूपण केली असून पुढेंही करीन. तात्पर्य, तो परमात्मा स्वतः अलिप्त होत्साता

**'ऐका यश श्री औदार्य । ज्ञान वैराग्य ऐश्वर्य । हें साही गुणवर्य । वसति जेथं' ॥१॥ (ज्ञाने.६- ओवी ३७)**

ह्या तातांच्या म्हणण्याप्रमाणें ऐश्वर्यवान् आहे. यद्यपि जीवही उपासनावशानें[१०] ऐश्वर्यवान् होऊं शकतो, तथापि जगत्कर्तृत्वादिक[११] धर्म त्याचेठायीं येऊं शकत नाहींत. आणि श्रीकृष्णानें वत्सहरणकालीं[१२] सर्व गोपवत्स उत्पन्न केले.

*(१) आपण स्वतः प्रतिबिंब बनल्यामुळे, त्या प्रतिबिंबाला बिंबाची जरूरी असते म्हणून ब्रह्मालाच बिंबत्व देतो (२) जीवरूप प्रतिबिंबाच्या अपेक्षेने बिंबरूप आरोपाला धारण करणारा (३) भगवद्भक्त जीवांच्या भावनेने (४) कनकाचे ठिकाणी कुंडलाप्रमाणे (५) ब्रह्मज्ञानाने नष्ट होणार नाही असे शरीर (६) हे परमेश्वरा ! तू अनंत मुखांचा असून जन्मला असा भासतोस - उपासकांच्या करीता ब्रह्माचे ठिकाणी रूपाची कल्पना आहे - मायेच्या योगाने मी जन्मल्यासारखा भासतो - तेव्हा तेव्हा अवतार घेऊन (७) संकट दूर करणाऱ्या (८) पांडवांना साह्य केले या मागे घडलेल्या (९) ईश्वर अवतार कसा घेतो हे सांगणे (१०) ईश्वराचे उपासनेने (११) जगत् उत्पन्न वगैरे करणे (१२) ब्रह्मदेवाने वत्स चोरून नेली तेव्हा.*

म्हणून शिवविष्णवात्मक कृष्णरूप जसें तृतीय सखीप्रेषणाचेठायीं सिद्ध केलें तसेंच तें ब्रह्मदेवात्मकही आहे असें सिद्ध होतें. तथापि  जग उत्पन्न कर्ता असूनही ब्रह्मदेवाचेठायीं जसा मोह पडला तसा श्रीकृष्णाचेठायीं पडला नाहीं; म्हणून श्रीकृष्णाचें रूप जरी ब्रह्मदेवात्मक ठरतें तरी हिरण्यगर्भांतील जीवधर्म[१] त्याचेठायीं संभवत नाहींत. ह्यामुळेंच परमात्मा षड्गुणैश्वर्यवान् असूनही अलिप्त असतो. उपासक पुरुष षड्गुणैश्वर्याचा भोक्ता असतो व परमेश्वर त्याचा साक्षी असतो. यद्यपि आधिकारिक[२] ज्ञानीत्वास्तव[३] षड्गुणैश्वर्याचे साक्षी जीवन्मुक्त राहूं शकतात तथापि षड्गुणैश्वर्य त्यांचें उपासनाजन्य प्रारब्ध असल्यामुळें तत्क्षयानंतर विदेहमुक्तीची त्यांनां जशी अपेक्षा आहे तशी परमेश्वराला नाहीं. म्हणून परमात्मा जगत्कर्तृत्वादितटस्थ-सत्यसंकल्पा[४]सहित षड्गुणैश्वर्याचा साक्षी आहे. आणि जीवभावनारोपक्षुब्ध शुद्धसत्त्वमय सत्यसंकल्पांत[५] साक्षीसन्निधानजन्य[६] संचोदना उत्पन्न होत असल्यामुळें संचोदकत्व[७] साक्षीचेठायीं आरोपित आहे. तो संचोदकत्वावच्छिन्न[८] बिम्बभूत साक्षी ईश्वर अलिप्तच रहात असल्यामुळें उत्तम स्त्रीसमुदायाचेठायीं षड्गुणैश्वर्याच्या आपण ताब्यांत न जातां त्याला आपल्या ताब्यांत ठेवून भूतकार्यरहित[९] स्त्रीलीलामय[१०] मायेनेंच रमण करिता झाला. आतांच अनुभवानें ईश्वरानुभवता[११] सिद्ध केली असल्यामुळें 'सएष' या शब्दानें ईश्वराची प्रत्यभिज्ञा[१२] होते. जीव जसा प्रकृतीच्या आधीन होऊन स्त्रियांचे ठायीं रमण करितो, तसें परमात्म्यानें रमण केलें नाहीं. (य३-१९५)

*(१) अज्ञान, भीति इत्यादि जीवाचे ठिकाणी राहणारे धर्म (२) ज्यांना सृष्टीमध्ये भगवंताने काही अधिकार दिला आहे (३) ब्रह्मज्ञानी असल्यामुळे (४) जगताच्या उत्पत्त्यादिकांचे ठिकाणी तटस्थ राहून त्याचे उत्पत्ति वगैरेचा जो सत्यसंकल्प परमेश्वर करितो त्या संकल्पासहित (५) जीवाच्या भावनेने केलेल्या आरोपामुळे स्फुरणाऱ्या शुद्ध सात्विक अशा सत्यसंकल्परूपी धर्मांत (६) साक्षीच्या सान्निध्यामुळे उत्पन्न होणारी प्रेरणा, प्रवृत्ति (७) प्रेरणा करणे (८) प्रेरकत्व धर्माला आधार (९) पंचभूतापासून बनलेला नाही (१०) लीला हीच माया (११) ईश्वराची अपरोक्षता, ईश्वराचे अस्तित्व अनुभवास येणे (१२) पूर्वी पाहिलेल्या वस्तूला पुनः पाहाणे.*

शिष्य :- भगवन् ! आपल्या व्यापक प्रदीप्त[१] वचनानलानें[२] माझें शंकाकंटकवन[३] समस्त जळून मी मुक्त झालों आहे. तथापि त्यांत ग्रहण[४] करितांनां झालेला जो बुद्धिश्रमरूपी दाह, त्याच्या शांत्यर्थ आपल्या वचनामृताची अपेक्षा करितो.

श्रीगुरु :- मुनिवर म्हणालें, हे राजा !

**॥ ओव्या ॥**

**तो हा परब्रह्ममूर्ती । जनां कळेल जियेरीती[५] । तीं बाह्य[६] चिन्हेंही निश्चिती । सांगू आतां ॥१॥**
**ब्रह्मनिष्ठ  ओळखावया । बाह्यचिन्हानपेक्षा[७] राया । तदपि जे मोहिले हरिमाया[८]। बाह्य चिन्हें तया उपयोगी ॥२॥**
**सर्वांमाजीं अंतरंग[९] । एक बह्मविज्ञान चांग । शम दम विवेक आणि विराग  । तो बहिरंग[१०] त्याहुनी ॥३॥**
**म्हणोनि विरागविषयक शब्दीं । बाह्यचिन्हता[११] प्रसिद्धी । शरीरापेक्षया[१२] पाहतां बुद्धि । तरी आंतर[१३] चिन्ह तें ॥४॥**
**विषय न रोधितां इंद्रियें न चळती[१४] । हे जीवन्मुक्ताही अघटप्राप्ति[१५] ।**
**तो परमात्मा ती जयाची सहजस्थिति । यालागीं भगवंतीं प्रत्यया ये ॥५॥**
**सकळ विषयामाजीं दुस्तर[१६] । जो सकळ दुःखाचें भांडार[१७] ।  जो नरकाचें माहेरघर । स्त्रीसंग साचार वर्णिला ॥६॥**
**स्त्रियांसी अबला म्हणती लोक ।परी ते विचारितां अतिमूर्ख ।दृष्टिमात्रें मोहिले ब्रह्मादिक ।त्या अबला कीं सबला॥७॥**
**अधरामृताची[१८] वाटी । बळें लावोनियां ओठीं । मोहुनी सोडिल्या वीरकोटी[१९] । तेथें काय गोष्टी इतरांच्या ॥८॥**

*(१) प्रखर (२) वचनरूपी अग्नीने (३) शंकारूपी काटे ज्यात आहेत असे वन (४) समजून घेताना (५) ज्या रितीने (६) बाहेरील लक्षणे (७) बाहेरील लक्षणांचा निरूपयोग (८) परमेश्वराच्या मायेने (९) अत्यंत जवळचे लक्षण (१०) त्यापेक्षा दूरचे*

*लक्षण, त्यापेक्षा दूरचे अंग (११) वैराग्यविषयीच्या शब्दांचे ठिकाणी बाह्य लक्षणत्व (१२) शरीराच्या दृष्टीने पाहता (१३) जवळचे (१४) चंचल होत नाहीत (१५) अशक्य (१६) कठीण (१७) कोटार (१८) तोंडातील लाळ. (१९) कोट्यावधी वीर*

**जियांचें सुंदर हास्यवदन । जियांचे प्रेमळ कटाक्षबाण[२] । पाहोनि योगीही साक्षीपण । जाती विसरोन क्षणमात्रें ॥९॥ बाळब्रह्मचारी हनुमंत । स्वेदद्वारा[३] वीर्य द्रवला सागरांत । मग मकरध्वज जन्मला तेथ । स्त्रीप्रभाव निश्चित येवढा ॥१९०॥ साठ सहस्र वरुषें अनुष्ठानीं । विश्वामित्र महामुनी । तो मेनिकेच्या पाठीं श्वान[४] होउनी । तप सांडोनि फिरला हो ॥११॥ चहूं[५] वेदांचा प्रतिपादिता[६] । सर्व जगाचा उत्पन्नकर्ता । तो ब्रह्मदेव जगत्पिता । धांवला तत्त्वतां कन्येपाठीं ॥१२॥**

**कल्पांत[७] बाळब्रह्मचारी । तो नारद मागे कृष्णनारी ।**

**मग नारदी होऊनि निर्धारी । साठ पोर आणि एक पोरी प्रसवला ॥१३॥** (य३-१९६)

**॥ श्लोक ॥**

**'विश्वामित्रपराशरादिमुनयो[८] वातांबुपर्णाशनाः । तेऽपि स्त्रीमुखपंकजं सुललितं दृष्ट्वैव मोहं गताः ॥**

**शाल्यन्नं सघृतं पयोदधियुतं भुंजंति ये मानवाः । तेषामिन्द्रियनिग्रहो यदि भवेद् विंध्यस्तरेत्सागरम् ॥१॥**

**॥ ओव्या ॥**

**पाहूनियां मोहिनी नारी । वीर्य द्रवला त्रिपुरारी[९] । तेथ इतरांची समाचारी[१०] । गती कवण? ॥१४॥**

*(२) कामयुक्त वाकड्या नजरेने पाहणें (३) घामाच्या द्वारा (४) कुत्रा (५) चार (६) सांगणारा (७) कल्पापर्यंत (८) विश्वामित्र पराशरासारखे मोठे मोठे, ऋषि, कोणी वायु भक्षण करून तर कोणी जल पिऊन तर कोणी झाडाची गळलेली पाने खाऊन तपश्चर्या करणारे पण तेहि स्त्रियांच्या मुखकमलाकडे पाहून मोहित झालेत. तेव्हा सुवासिक तांदुळाचा भात, दूध तूप इत्यादि पदार्थ खाणारे जे पुरुष आहेत, त्यांना इंद्रियांचा जय करणे विंध्य पर्वताने सागर तरून जाण्याप्रमाणे अशक्य आहे. (९) शंकर (१०) सारख्या आचरणात.*

**एवं सर्व स्त्रियांची स्थिति । आणि ह्या तव लंपटल्या भगवंतीं । वरी पातिव्रत्यतेज[१] निश्चिती । गंभीर स्थिति निर्मळता ॥१५॥ ऐसा असोनीही आपण । परी श्रीहरीचें मन । वळवावयाकारण । सामर्थ्यसंपन्न नच झाल्या ॥ १६॥**

शिष्य :- भगवन् ! आपल्या भाषणापासून मला दोन शंका उद्भूत झाल्या आहेत. त्यांचें कृपाकरून उत्तर द्याल अशी आशा करून मी त्या शंका विचारण्याचें धैर्य करितों. विश्वामित्र-पराशरादिक अतिशय तप करणारे जर स्त्रियांचें ठिकाणीं वशीभूत झाले, तर इतर जे रोज दहीं भात जेवणारे पुरुष ते इंद्रियनिग्रह काय करूं शकतील? या म्हणण्याचा अर्थ असा करावयाचा काय? कीं इंद्रियनिग्रह सर्वथाच कोणाकडून होत नाहीं. दुसरें, तृतीय सखीप्रेषणाचेठायीं आपण हरिहरांची उपासना समान[२] वर्णन केली आहे; आणि आतां शिवाची गौणता[३] दाखवितां, हा पूर्वापर[४] विरोध नाहीं काय ?

श्रीगुरु :- बाळा ! तूं आपल्या दोन्हीही शंकांचें उत्तर श्रवण कर. एखादी आई जर आपल्या मुलाला असें सांगत असली कीं, तूं अग्नीपासून दूर हो; काल तो अग्नि चूर्ण करणारा मनुष्य सहज जळाला; म्हणजे या वाक्याचा असा अर्थ घ्यावायाचा काय ? कीं तूं बळेंकरून अग्नींत उडी घाल म्हणून. त्याप्रमाणें शास्त्रांत जी ऋषींचीं उदाहरणें दिलीं आहेत त्यांचा अर्थ इतर मनुष्यांनीं इंद्रियनिग्रह करूं नये असा (य३-१९७) होत नाहीं; तर मोठ्या मोठ्या पुरुषांचीही विषयासक्तीनें अशी स्थिति झाली म्हणून आपण पहिलेपासूनच तिला भिऊन राहिलें पाहिजे, असा त्या वचनांचा अर्थ होतो; आणि असा अर्थ केला तरच त्या वचनांचें साफल्य आहे. नाहीं तर त्या वचनांचें साफल्य नाहीं. कारण जी गोष्ट अज्ञात[५] असते तिचाच उपदेश संभवतो. विषयसेवन तर सर्वांनांच ठाऊक आहे. त्याचा उपदेश काय करावयाचा असतो ? -

*(१) पतिव्रताधर्माचें पालन केल्यामुळे प्राप्त झालेले सामर्थ्य (२) एकरूप (३) कमीपणा (४) मागल्या पुढल्याचा (५) माहित नाही.*

म्हणून **'यद्यरस्यतात्पर्यं तत्तस्यार्थः[१]'** या वाक्यांत सांगितल्याप्रमाणें विषयासक्तीचा अत्यंत त्यागच त्या वचनांचा अर्थ होतो. आतां दुसरी जी तुझी शंका आहे, तिचें उत्तर श्रवण कर.

सर्व जगाचें कारण जो परमात्मा तो सत्तात्रयवादांत[२] मायावीरूप[३] आणि सत्ताद्वयवादांत[४] प्रतिबिम्बापेक्षिक[५] आरोपितबिम्बत्वावच्छिन्न ब्रह्मरूप[६], सर्वज्ञ कृपाळू असा जगज्जन्मादिमत्वतटस्थलक्षणलक्षित[७] आहे. त्यालाच कारणब्रह्म[८] म्हणतात. सर्व श्रुतींत हाच परमात्मा उपास्य[९] आहे.

या प्रभूचीच उपासना कोठें आनंदमयत्वानें[१०] सांगितली आहे, कोठें आकाशत्वानें[११], कोठें कालत्वानें[१२], कोठें

वैश्वानरत्वानें[१३] व कोठें प्रतीकरूपानें[१४] सांगितली आहे; व तशीच कोठे अभिगमनरूपानेंही[१५] सांगितली आहे. सर्व पुराणांतही अभिगमनरूपानेंच उपासना आहे. तो परमात्माच स्वभक्तार्थ[१६] शुद्धसत्त्वरूपानें हरिहरदेह धारण करून, रजोपहित ब्रह्मा, सत्त्वोपहित विष्णु, व तमोपहित शंकर असा सृष्टिकार्यार्थ होतो. म्हणजे -

*(१) वाक्याचे तात्पर्य हाच वाक्याचा अर्थ (२) ज्या वादात ब्रह्माची पारमार्थिक म्हणजे अविनाशी सत्ता, जगताची व्यावहारिक सत्ता म्हणजे व्यवहारापुरती सत्ता व दोरीवर भासणाऱ्या सर्पादिकांची प्रातिभासिक सत्ता अशा तीन सत्ता मानल्या आहेत, तो वाद (३) मायामय (४) ज्या वादात ब्रह्माची पारमार्थिक सत्ता व बाकी सर्वांची प्रातिभासिक म्हणजे भासमात्र सत्ता मानली आहे तो वाद (५) प्रतिबिंबरूपी जीवाच्या अपेक्षेने बिंब या आरोपाला धारण करणारा (६) शुद्ध ब्रह्मरूप (७) जगताचे उत्पत्तिस्थितिलय हे जे तटस्थ लक्षण त्या लक्षणाने जाणला जाणारा (८) परब्रह्म (९) भजन करण्यास योग्य (१०) आनंदमय कोशांत राहणारा म्हणून (११) आकाशरूपाने (१२) कालरूपाने (१३) वैश्वानररूपाने (१४) विकाररूपाने, नाम ब्रह्म आहे, सूर्य ब्रह्म आहे, इत्यादि प्रकाराने (१५) वैष्णवांच्या पंचरात्र ग्रंथात उपासनेचे अभिगमनादि प्रकार वर्णिले आहेत (१६) आपल्या भक्ताकरिता.*

निष्काम भगवद्भक्तांचें स्थान एक शुद्धसात्विक परमात्मा असून, भक्त सकाम असून जर अज्ञानी असले तर, त्यांना तो विदेहप्रकृतिलय[१] स्थान देतो; आणि ज्ञान झाल्यावर त्यांनां मुक्ति होते. आतां, निष्काम अज्ञानी उपासकांचें प्राप्य स्थान ब्रह्मलोक आहे. **उपासनेंत मानसक्रिया विशेष व भक्तींत प्रेम विशेष. हा उपासना व भक्ति या दोहोंतील भेद आहे.** निष्काम उपासक ज्या ब्रह्मलोकाला जातात, तें हिरण्यगर्भस्थान[२] महाभारतांत :-

**॥ श्लोक ॥**

**'रुद्रो[३] नारायणश्चैवेत्येकं सत्त्वं द्विधा कृतम् । लोके चरति कौन्तेय व्यक्तिस्थं सर्वकर्मसु' ॥१॥ (य३-१९८)**

याप्रमाणें हरिहरत्व[४] कारणब्रह्मास[५] सांगितलें असून, सृष्टिकार्यार्थ[६] कार्यब्रह्मासही[७] हरिहरत्व महाभारतांतील अनुगीता व मात्स्यपुराणांत सांगितलें आहे.

**'महान् आत्मा मतिर्विष्णुर्जिष्णुः[८]शंभुश्च वीर्यवान् । बुद्धिः प्रज्ञोपलब्धिश्च तथा ब्रह्मा धृतिः स्मृतिः ।**
**पर्यायवाचकैरेतैर्महानात्मानिगद्यते ॥१॥ अनुगीता**

*(१) विदेहलय आणि प्रकृतिलय, भूते किंवा इंद्रिये म्हणजे इंद्रियशक्ति यापैकी कशावरहि आत्मभावना म्हणजे मी तो पदार्थ आहे अशी भावना करून समाधि साधणाऱ्यांना विदेह म्हणजे नुस्त्या लिंगशरिराने भोग भोगणारे म्हणतात. असा समाधि साधणाऱ्यांचे त्या भूताशी किंवा इंद्रियाशी मेल्यानंतर ऐक्य होते व तेथे ते नुसत्या लिंगशरीराने भोग भोगतात. प्रकृति, बुद्धि, अहंकार, पंचतन्मात्रा यापैकी कोठेहि आत्मभावना करून समाधि साधणारे मेल्यानंतर प्रकृतीत लीन होतात म्हणून त्यांना प्रकृतिलय म्हणतात. अज्ञानी उपासकांना प्राप्त होणारी ही दोन उंच फळे आहेत. येथे दोघांनाहि मोक्षासारखे सुख मिळते पण कांही काळाने पुनः त्यांना जन्म प्राप्त होतो म्हणून हे मोक्षाच्या दृष्टीने त्याज्यच आहे (२) हिरण्यगर्भातील ब्रह्मलोक (३) श्लोकाचा भावार्थ :- शंकर व विष्णु हे दोघे म्हणजे एकाच शुद्धसत्वाची दोन रूपे आहेत, आणि या लोकात अशी रूपे धरून ते लीला करितात (४) शिव विष्णु ही दोन्ही रूपे (५) परब्रह्माची (६) सृष्टिरूप कार्यासाठी (७) हिरण्यगर्भाला (८) एकाचीच निराळी नांवे.*

अर्थ :- महत्तत्त्व, मति, विष्णु, जिष्णु, वीर्यवान् शंकर, बुद्धि प्रज्ञा, उपलब्धि, ब्रह्मा, धैर्य, आठवण, हे सर्व महत् तत्त्वाचेच पर्याय[१] आहेत. याप्रमाणें अनुगीतेंत सांगितलें असून,

**'सविकारात्प्रधानात्तु महत्तत्त्वमजायत । महानिति यतः ख्यातिर्लोकानां जायते सदा ॥१॥**
**गुणेभ्यः क्षोभ्यमाणेभ्यस्त्रयो देवा विजज्ञिरे । एका मूर्तिस्त्रयो देवा ब्रह्मविष्णुमहेश्वराः' ॥२॥**

अर्थ :- सविकार प्रकृतीपासून महत्तत्त्व उत्पन्न होतें, म्हणूनच लोकांनां तें मोठें आहे अशी[१अ] प्रतीति होते. साम्यावस्थेंतून[२] न्यूनाधिकत्व[३] पावलेल्या सत्त्वादिकांपासून तीन देव उत्पन्न होतात. एकच कारणब्रह्म[४] जें विष्णुशिवात्मक सांगितलें आहे, तेंच ब्रह्माविष्णुमहेश्वर अशा तीन देवांच्या रूपानें होतें. याप्रमाणें **'उपासकानां कार्यार्थं ब्रह्मणो रूपकल्पना' ॥** इत्यादि श्रुतीवरून कारणब्रह्माला हरिहरत्व व महत्तत्त्वोपहित[५] हिरण्यगर्भसंज्ञक कार्यब्रह्माला हरिहरत्व सांगितलें असल्यामुळें जे निष्काम उपासक कार्यब्रह्म हिरण्यगर्भाचें ठिकाणीं गमन करितात, ते जरी हरिहरोपासक असले तरी ब्रह्मलोकच त्यांनां हरिहरलोकाप्रमाणें भासतो. आणि जे निष्काम हरिहरभक्त कारणब्रह्माचें ठिकाणीं गमन करितात, ते

शैव असोत अथवा वैष्णव असोत, एकच परमेश्वरस्थान[६] त्यांनां मिळतें. याविषयीं पुष्पदंत म्हणतात :- (य३-१९९)

*(१अ) अनुभव (२) ज्या अवस्थेत सत्वरजतम हे तिन्ही गुण कमी अधिक न राहता समान असतात त्या अवस्थेतून (३) कमीअधिकपणा (४) परब्रह्म (५) समष्टिबुद्धीचा अभिमान धारण करणारे (६) सर्व कारण असे परब्रह्मच. (१) प्रतिशब्द, एका अर्थाचे शब्द.*

**'त्रयी सांख्यं योगः पशुपतिमतं वैष्णवमिति । प्रभिन्ने प्रस्थाने परमिदमदः पथ्यमिति च ॥**
**रुचीनां वैचित्र्याद् ऋजुकुटिलनानापथजुषाम् । नृणामेको गम्यस्त्वमसि पयसामर्णव इव' ॥७॥ शिवमहिम्न**

अर्थ :- हे भगवन् ! वेद, सांख्य, योग, शैव, वैष्णव, इत्यादि भिन्न, भिन्न मतांचीं शास्त्रें आपल्या रुचिवैचित्र्यामुळें[१] हें चांगलें आहे, हें चांगलें आहे, अशा विश्वासानें सरळ किंवा वाकड्या अशा कोणत्याही पंथानें जाणाऱ्या पुरुषांनां सर्व उदकाला समुद्राप्रमाणें तूंच एक प्राप्य[२] आहेस.

आतां, हिरण्यगर्भाला किंचित् जीवधर्म[३] असल्यामुळे ते जीवधर्म हैरण्यगर्भस्थ[४] हरिहरांनांही[५] उपासनादृढीकरणार्थ[६] पुराणामध्यें आनुषंगिक[७] निरूपण केले आहेत. कारणब्रह्माचें[८] हरिहरत्वेंकरून[९] भजन करीत असतांनां प्रथम उपासकांच्या स्थूलदर्शित्वास्तव[१०] चित्तामध्यें कार्यब्रह्मभाव[११] येतो. आणि तो अनाग्रही[१२] पुरुषांनां यद्यपि कारणब्रह्मभक्तींत[१३] विरोध[१४] आणीत नाहीं; तथापि आग्रही पुरुषांनां कार्यब्रह्मपर करून टाकण्याला समर्थ आहे. आणि त्या आग्रहाच्या योगानें अभिहत[१५] झालेले चंचलचित्त[१६] उपासक त्यापासून मोह पावण्याचा संभव आहे. हा अनर्थ जाणूनच पुराणांत कार्यकारणब्रह्मपर निंदास्तुतिवाक्यें आहेत. त्यांतून शिवपुराणांत शिवाची स्तुति शिवाला कारणब्रह्म म्हणून केली असून विष्णूची निंदा विष्णूच्या कार्यब्रह्मत्वास्तव केली आहे.

*(१) निरनिराळ्या आवडीनुसार (२) मिळणारा (३) जीवत्व (४) कार्यब्रह्माला, समष्टिलिंग, शरीराभिमानी जो हिरण्यगर्भ त्याचे ठिकाणीच्या (५) शिवविष्णूला (६) उपासना पूर्ण व्हावी म्हणून (७) त्याला धरून (८) परब्रह्माचे (९) शिवविष्णुरूपाने (१०) पंचभूतापासून बनलेल्या पदार्थांना स्थूल म्हणतात म्हणून पांचभौतिक पाहण्याची संवय असल्यामुळे (११) हे रूप कार्यब्रह्म म्हणजे गुणबद्ध आहे वाटते. (१२) ज्यांची आग्रही वृत्ति नाही अशांना (१३) परब्रह्म समजून भक्ति करीत असतांना (१४) अडथळा (१५) युक्त, आग्रहाला बळी पडलेले (१६) चंचल चित्ताचे.*

आणि विष्णुपुराणांत विष्णूची स्तुति विष्णूला कारणब्रह्म म्हणून केली असून शिवाची निंदा शिवाच्या कार्यब्रह्मत्वास्तव केली आहे. युक्ति व अनुभवदृष्टीने पाहता वैष्णव विष्णूला जितके कृपाळू, सर्वज्ञ व सात्त्विक समजतात, तितकेच शैवही शिवाला कृपाळू, सर्वज्ञ व सात्त्विक समजतात. तात्पर्य, ज्याप्रमाणें आईचे गुण आपल्या आपल्या आईचें ठिकाणीं सर्वच मुलें पाहतात, त्याप्रमाणें शिवभक्त शिवाचें ठिकाणीं व विष्णुभक्त विष्णूचें ठिकाणीं (य३-२००) कारणब्रह्मच पाहतात.

पुनः, एकाच आईचीं दोन मुलें असतां एका मुलाला आई, 'तूं शहाणा आहेस, अमूक मुर्ख आहे' व दुसरे वेळीं दुसऱ्या मुलाला, 'तूं शहाणा आहेस, अमूक मूर्ख आहे' असें म्हणते, तेव्हां तिच्या म्हणण्याचें तात्पर्य बालकाचें रडणें बंद व्हावें यांत असतें; परस्पर भावाभावांत भांडण लावण्यांत नसतें. – त्याप्रमाणें विष्णुपुराणांत शिवाची निंदा व शिवपुराणांत विष्णूची निंदा वैष्णवांनां व शैवांनां इष्टउपासनादृढीकरणार्थ[१] आहे, परस्परनिषेधार्थ[२] नाहीं. कारण परस्परांच्या निषेधानें सर्वपुराणउच्छेदप्रसंग[३] प्राप्त होतों. परंतु हें पुराणरूप श्रुतिमातेचें तात्पर्य न जाणून शैव व वैष्णव मूर्ख आपआपल्या मताचे अभिमानी होऊन शालशुनकन्यायानें परस्परद्वेष करितात.

**शालशुनकन्याय** म्हणजे जसा कोणी एक कौतुकी मनुष्य आपल्या घरच्या कुत्र्याला साळ्याचें[४] नांव ठेवून त्या साळ्याच्या नांवानें त्या कुत्र्याला आपल्या बायकोच्या समोर शिव्या देऊं लागला असतां त्याची स्त्री अशी समजली कीं, हा माझ्या भावाला शिव्या देतो, व त्यामुळें ती त्याचा द्वेष करूं लागली व दोघांमध्यें कलह सुरूं झाला. त्याप्रमाणेंच पुराणांचें खरें तात्पर्य न जाणून जसे मूढ पुरुष वाद करीत असतात, तसा तूं मोह पावूं नकोस.

*(१) आपली आवडीची उपासना वाढविण्याकरता (२) खरेच एकामेकाचे खंडण किंवा कमीपणा दाखविण्याकरिता (३) विष्णुपुराणात शिवाची निंदा केली आहे म्हणून ती खरी मानून शिवप्रशंसा करणारे शिवपुराण अप्रमाण मानल्यास शिवपुराणांतून विष्णुनिंदा (म्हणजे शिवापेक्षा विष्णूचा कमीपणा दाखविणे) पाहून विष्णूची स्तूती करणारी विष्णुपुराणे अप्रमाण मानण्याचा प्रसंग येतो व त्यामुळे सर्व पुराणे अप्रमाण ठरतात (४) पत्नीच्या भावाचे.*

या पुराणांत कारणब्रह्मत्वेंकरून[१] श्रीकृष्णाचें विशेषतः अवतारचरित् असल्यामुळें त्याची स्तुति आहे. आतां,

कारणब्रह्मरूप विष्णुशिवात्मक परमात्माच श्रीकृष्णरूप आहे, हें पूर्वी तृतीय सखीप्रेषणाचेठायीं निरूपण तूं ऐकिलें आहेस. म्हणूनच त्या परमेश्वराला मायासजातीय[२] अशा स्त्रिया आपल्या विलासांनीं[३] वश करण्याला समर्थ झाल्या नाहींत; म्हणजे परमात्म्यालाच माया वश आहे हा भाव. मूळांत तर असें म्हटलें आहे कीं, ज्याचीं इंद्रियें देखील त्या आपल्या विलासांनीं वश करूं शकल्या नाहींत. यावरून मनरूपसत्यसंकल्पापर्यंत[४] किंवा चैतन्यापर्यंत त्यांची धांव जात नाहीं, हें सांगणेंच नको. तातही म्हणतात :-

**'करितां तापसांची कडसणी[५]। कवणु जवळा ठेविजे शूळपाणी । तोही अभिमान सांडूनि पायवणी[६]। माथां वाहे ॥३७२॥**
**(य३-२०१)नातरी आथिलेंपणें[७] सरिशी[८]। कवणी आहे लक्ष्मियेऐशी । श्रियेसारिखिया दासी । घरीं जियेतें ॥३७३॥**
**तिया खेळतां करिती घरकुलीं[९]। तया नामें अमरपुरें[१०]जरी ठेविलीं ।तरी न होती काय बाहुलीं । इंद्रादिक तयांचीं॥३७४॥**
**तिया नावडोनि[११] जेव्हां मोडती । तेव्हां महेंद्राचे[१२] रंक[१३] होती । तिया जिया झाडाकडे पाहती । ते कल्पवृक्ष ॥३७५॥**
**ऐसिया जियेचिया जवळिका । सामर्थ्य घरीचिया पाइका[१४] । ते लक्ष्मी मुख्यनायका । न मनेची[१५] जेथ ॥३७६॥**
**मग सर्वस्वें करूनि सेवा । अभिमानू सांडोनि पांडवा । ते पाय धुवायाचिया दैवा[१६] ॥ पात्र जाहली' ॥३७७॥**
**ज्ञाने.अ.९**

*(१) शुद्धब्रह्मरूपाने (२) मायेच्या जातीच्या, मोह उत्पन्न करणाऱ्या (३) नाना प्रकारच्या हावभावांनी (४) ज्याचा सत्यसंकल्प हेच ज्यांचे मन आहे (५) परीक्षा, निवड (६) चरणतीर्थ (७) संपन्नपणे (८) पूर्ण, अधिक (९) छोटी खेळातली घरे (१०) स्वर्ग (११) न आवडल्यामुळे (१२) इंद्राचे (१३) दरिद्री (१४) दासींना (१५) आवडत नाही (१६) भाग्याला.*

**या तातवचनप्रमाणें । लक्ष्मियेचें ऐसें होणें । तेथ इतरां कवण जाणे । जीवदारिका[२] ॥१७॥**
**म्हणोनी हा परमेश्वरू । नोहे पुण्याऽपुण्यजन्मधरू[३] । जो दीनजनतारण[४] अवतारू । करुणामूर्ति ॥१८॥**
**तथापि विषयासक्त जन । आपणासमान म्हणती कृष्ण । कूपमंडुकन्यायेंकरून[५] । परम अज्ञान मूढमती ॥१९॥**
**अहो ! दिवाभीताचिया[६] दृष्टी । तम[७] दिसे सूर्याचें पोटीं[८] । कीं जन्मांधासी[९] सृष्टी[१०] । आंधळी जैसी ॥१२०॥**
**कीं जार[११] ऐकता संतगोष्टी[१२]। आपणासारिखा समजे पोटीं । तेंवी जनांतें जगजेठी । विषयदृष्टी[१३] मनुष्य दिसे ॥२१॥**
**व्यापक असोनी परिच्छिन्न[१४] । असंगी[१५] असोनी आसक्तिमान ।**
**सकळ पाहती आपणासमान । मायेनें ज्ञान अंध ज्यांचें ॥२२॥**
**अभ्रानें लोकांचें डोळे झाकिती । आणि सूर्यचि झाकला म्हणती । तैसे आपले दुर्गुण भगवंतीं । आरोपिती मूढ जन ॥२३॥**
**परी सावर्ण[१६] सघन[१७] जननयन[१८] । सविता[१९] अलिप्त प्रकाशून ।**
**तेंवी दिसोनि विषयीजनांसमान । परी अलिप्त म्हणून अवतार तो ॥१२४॥**

*(२) जीवस्त्रिया (३) पुण्यपापानुसार भौतिक शरीर धारण करणारा (४) दीनजनांचा उद्धार करणारा (५) कूपांतील मेंडकी ज्याप्रमाणे कूपाला सागर समजते म्हणजे आपण ज्या विहिरीत राहते त्या विहिरीप्रमाणे सागर असतो अशी कल्पना करिते (६) घुबडाच्या (७) अंधःकार (८) ठिकाणी (९) जन्मतः आंधळा असलेल्यास (१०) जग (११) व्यभिचारी पुरुष (१२) संताच्या कथा (१३) विषयाप्रमाणेच तो परमेश्वराला पाहत असल्यामुळे (१४) मर्यादित देहापुरता (१५) कशाशीही संबद्ध न होणारा (१६) आवरणाने युक्त (१७) अभ्राने युक्त (१८) लोकांचे डोळे (१९) सूर्य.*

शिष्य :- तात ! माझी संपूर्ण शंका निवृत्त झाली.

श्रीगुरु :- तथापि अवतारशरीरांचे ठिकाणीं सांगितलेलें ऐश्वर्य भक्तिदृढीकरणार्थ[१] कारणब्रह्माशीं[२] ऐक्यभावानें[३] सांगतों ऐक. ज्याप्रमाणें शरीरांत असलेलें अंतःकरण शरीरांतील विष्ठामूत्रादिकांनीं अभिभूत[४] होत नाहीं, किंवा डोळ्यांत असलेली पुत्तलिका[५] ज्याप्रमाणें रूपादिकाला पाहूनही रूपादिकांनीं अभिभूत होत नाहीं, (य३-२०२) तद्वत् सत्तात्रयवादांत[६] म्हटल्याप्रमाणें मायाप्रतिबिम्बित किंवा सत्ताद्वयवादांत[७] म्हटल्याप्रमाणें प्रतिबिम्बापेक्षिक[८] आरोपितबिम्बत्वावच्छिन्न असा हा परमात्मा असूनही प्रकृतींतील सत्त्वादिक गुणधर्मांच्या सुखादिकानें अभिभव[९] पावत नाहीं. हेंच त्याचें खरें ऐश्वर्य[१०] होय. अवतारकाळीं[११] स्त्रियांनां वश न होणें व मूळस्थानीं (मुळीं) प्रकृतीला वश न होणें हे दोन्ही धर्म श्रीकृष्णांत समान असल्यामुळें तो कारणब्रह्मच आहे असें तूं समज. परंतु सत्तात्रयवादांत वर ज्या शंकेचें उत्तर दिलें आहे, तिचा प्रवेश उत्तराकरितां तरी होतो, व सत्ताद्वयवादांत तोही होत नाहीं, हा विशेष[१२] आहे.

**कां बुद्धिमाजीं राहोनि जीव । बुद्धिधर्मी[१३] पावे अभिभव[१४] ।**

आणि ध्यानकालीं बुद्धींत राहे देव । परी शुद्धाशुद्धधिभावयुक्त[१५] न होय ॥२५॥
कीं साक्षी न लिंपे अनुभवें जैसा । प्रभू प्रकृतीस न लिंपे तैसा ।
एवं सभक्तिलक्ष्यांशज्ञानठसा[१६]। परमानंदरसा[१७] ओळखी ॥२६॥

*(१) भक्तिप्रेम परिपु करण्याकरिता (२) परब्रह्माचे ठिकाणी (३) एकरूपाने म्हणजे कारणरूप परब्रह्माचेच ठिकाणी असते, दुसऱ्या ठिकाणी राहू शकत नाही अशा अर्थाने (४) झाकले जात नाही (५) बाहुली (६) तीन सत्ता ज्या वादात मानल्या आहेत त्या वादात (७) दोनच सत्ता ज्यावादात मानल्या आहेत त्या वादात (८) प्रतिबिंबरूपी जीवाच्या अपेक्षेने बिंबरूप झालेले चैतन्य (९) झाकला जात नाही किंवा मलिन होत नाही (१०) सामर्थ्य (११) जगत् निर्माण करताना मायेचा आश्रय करतो तेव्हा (१२) फरक, अधिकपणा (१३) बुद्धीचे धर्मानी युक्त होऊन (१४) स्वसामर्थ्यहीन होतो (१५) शुद्ध किंवा अशुद्ध जे बुद्धीचे धर्म त्यांनी युक्त (१६) भक्तिसहीत शुद्ध ब्रह्मज्ञानाची स्थिति (१७) परमानंदस्वरूप.*

एवं परमात्मा ब्रह्म पूर्ण । त्यास विनोदें म्हणती स्त्रैण[१] । आपुलिया मतीकरून[२]। नेणूनि प्रमाण[३] प्रभूचें ॥२७॥
जैसी साक्षीभास्य[४] बुद्धि अनुभवें[५] । परी अज्ञानी म्हणती सफलवृत्तिज्ञेय[६] संभवे ।
तैशा पत्नित्वें[७] देहभावें[८] । जाणोनि प्रभावें[९] अभिभूत[१०] झाल्या ॥२८॥
शेवटीं धरूनियां मौन । साक्षित्वें[११] पाहोनि अज्ञान । साक्ष्यानंदेदंता ऽन्तःकरण[१२] । प्रेमसंपन्न[१३] समर्पिलें ॥२९॥
तो प्रेम ज्ञानीपियूषघुटका[१४] । हरोनि विषयविजया[१५] लटका[१६] ।
लावोनि शुद्धभावचुटका[१७] । बंधलयघटिका[१८] दाखवी ॥१३०॥
श्रीज्ञानेश्वर कृपामूर्ति । वारंवार वंदूनि प्रीतीं । पुढें अवधान द्यावें श्रोतीं । कान सर्वांगाप्रति करूनी ॥१३१॥

॥ दोहा ॥

अलकावतिपतिपाउलें[१९] हृदयिं धरुनि सुकुमार ॥
नाम स्मरुनी प्रेमवशें त्यजु माया[२०] मद[२१] मार[२२] ॥१३२॥ (य३-२०३)

हरिःॐ तत्सत् श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरकृपाप्रसादे नानाछंदबद्धे गद्यपद्यान्विते प्रियलीलामहोत्सवे आमंत्रणविलासे प्रियस्वपुरप्रवेशो नाम एकादशसखीप्रेषणम् ॥

॥ श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ॥

*(१) स्त्रियांचे स्वाधीन झालेला (२) बुद्धीप्रमाणे (३) सामर्थ्य (४) साक्षीने कळणारी बुद्धि (५) जाणते (६) चिदाभासासह अंतःकरणवृत्तीने कळते (७) पत्नि होऊन (८) देहभासाच्या दृष्टीने (९) भगवंताच्या सामर्थ्याने (१०) हरल्या, वश करू शकल्या नाही (११) साक्षीरूपाने (१२) साक्षीचा आनंद ज्या अंतःकरणात इदंतारूपाने म्हणजे भास्यरूपाने अंतःकरणाशी युक्त होऊन स्फुरतो ते अंतःकरण (१३) प्रेमाने युक्त (१४) ज्ञानामृताचा घुटका (१५) विषयांनी आपल्यावर मिळविलेला जय म्हणजे विषयपराधीनता, विषयासक्ति (१६) खोटा, विषयासक्त जीवहि वस्तुतः चैत्यन्यदृष्टिने विषयासक्त होत नाही. ते असंगच राहते (१७) शुद्ध भगवत्प्रेमाची तळमळ, आसक्ति (१८) ज्यावेळी संपूर्ण संसारबंध नाहीसा झाला असा अनुभव येतो ती वेळा (१९) श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे चरण (२०) अविद्या (२१) अभिमान (२२) काम.*

०००

# सखीप्रेषण १२ वें.

## अनुक्रमणिका

***परीक्षिज्जन्माद्युत्कर्ष वर्णन. पृष्ठ (२०४-२१०)***

*मंगलाचरण :- हरिगुरुवंदन. परीक्षिारित्राविषयीं शौनकांचा प्रश्न २०४ द्वादश प्रेषणांतील विषय कथन. सूताचें उत्तर :- हरिजनांस माया बाधत नाहीं. उक्तप्रकारें श्रीकृष्णाचे ठिकाणीं राजा धर्मराजाची अनन्यभक्ति व प्रजावात्सल्यवर्णन २०४-२०५ पांडवांच्या अनन्यगतिकत्वास्तव उत्तरागर्भाचें श्रीकृष्णानें केलेलें रक्षण २०५ 'छांदोग्य' कथित डोळ्यांत दिसणारा पुरुष तोच हृदयांतील अंगुष्ठ प्रमाण परमात्मा होय. शंका :- श्रुतींत साांगितलेला डोळ्यांतील पुरुष परमात्माच आहे कशावरून? समाधानः- श्रुतींत सांगितलेले अमृतत्वादिक गुण शब्दाच्या मुख्य वृत्तीनें परमात्म्याच्या ठिकाणींच संभवतात २०५ परमात्म्याचें स्मृतिप्रामाण्यानें अनध्यस्तविवर्तत्व, उपासकांच्या प्रीत्यनुसार चतुर्भुजाद्याकारवत्ता व सगुण असूनही षड्विकाररहितत्व २०६ गर्भगत भगवन्मूर्तीची सगुणशोभावर्णन, तिच्या गदाप्रहारानें अस्त्रतेजाचा लोप व दर्शनानें गर्भगत परीक्षितीला झालेला विस्मय २०६ शंका :- सामान्य जीवालाही जन्मसमयीं अनेक जन्मांचें ज्ञान होऊन तो परमात्म्याची स्तुती करतो असें श्रीमद्भागवतांत म्हटलें आहे, मग पुण्यवान् जो उत्तरागर्भ त्याला भगवंताविषयीं संशय कां वाटला? २०६ समाधान :- जन्मसमयीं स्वाभाविक प्रगट झालेल्या सत्त्वामुळें जीवाला अनंत जन्माचें ज्ञान होतें व मरणसमयीं गमनमार्गदर्शन होतें असें ''बृहदारण्यकाचें'' म्हणणें, गर्भामधें जीवाला होणारें परमात्म्याचें सामान्य निर्गुणात्मक आनुमानिक ज्ञान व उत्तरागर्भानें साकार परमात्मा पाहिल्यामुळें त्याचा वितर्क २०७ परमात्म्याचें तातवचनानुसार अप्रमेयत्व निरूपण, व अस्त्राचा उपसंहार करून अंतर्हित होणें २०७ परीक्षिताचा जन्म. धर्मराजानें विप्राकरवीं बालकाचें मंगलवाचन व जातक करवून दिलेलीं नाना दानें २०८ मंगल गीत. बालकाचें 'विष्णुरात' असें नामकरण व ब्राह्मणांचा आशीर्वाद. हें बाळ पूर्वजांप्रमाणें (य३-३४) पराक्रमी व गुणवान् होईल काय? असा युधिष्ठिराचा प्रश्न २०८ उत्तर :- परीक्षिज्ञातकवर्णन २०९ शंका :- हा कृष्णभक्त होईल असें जें ब्राह्मणांनीं सांगितलें त्यांत प्रयत्नहानी होत नाहीं काय? समाधान :- सत्प्रवृत्तीचा प्रयत्नानें रोध करूं नये असा विधी निरूपण. हा बालक निश्चयानें कृष्णप्रिय होईल याविषयीं अनुमान २०९ गर्भांतून बाहेर आल्यानंतर परीक्षितीचें अनुध्यानवर्णन २१० धर्माची अश्वमेधकरणइच्छा, द्रव्याची अडचण, व तीचें श्रीकृष्णानें निवारण करून यज्ञाची केलेली सिद्धि. तेथें कांहीं दिवस राहून हृषीकेशाचे स्वपुरगमन. श्रीज्ञानेश्वर वंदनांत उपसंहार २१०.*

## परिक्षित जन्म व उत्कर्ष कथन

**॥ श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरमाउली समर्थ ॥**

**॥ अनुष्टुप् श्लोक ॥**

**॥ शौनक उवाच ॥**

**द्रौणिप्रेरित(१) ब्रह्मास्त्रापासुनी रक्षिले जया । श्रीकृष्णें उत्तरागर्भी(२) सूता तज्जन्म(३) सांग तूं ॥१॥**
**त्यागोनिया स्वराज्यातें जाहला तो विरक्त कां । ब्रह्मज्ञान कुठें त्याला दिधलें व्यासनंदनें(४) ॥२॥**

**॥ पद ॥**

**कमललोचना(५) ! याहो ! वारुनि(६) मदमत्सरकोपादिक(७) शुद्ध करा हृदया हो ! ॥ध्रु. ॥**
**मंगलपद(८) सदया(९) हो ! । मधुर मनोहर(१०) भाषण करुनी न्या कलिमल(११) विलया(१२) हो ! ॥१॥**
**वंदे गुरु सुचिदुदया(१३) हो ! । अलकावतिपति(१४) जननि तात(१५) प्रभु येऊं द्या त्वरित दया हो ! ॥२॥३॥**

**॥ श्लोक - अनुष्टुप् ॥**

**पुरोक्तं(१६)यत्प्रसंगाय द्रौणीदंडादि विस्तरात् । तदेव द्वादशेऽध्याये परीक्षिज्जन्म वर्ण्यते ॥४॥**

*(१) अश्वत्थाम्याने सोडलेल्या (२) उत्तरेच्या गर्भात असताना (३) त्याचे जन्मवृत्त (४) श्रीशुकाचार्याने (५) कमलाप्रमाणे ज्याचे डोळे आहेत (६) नाहीसे करून (७) अभिमान, मत्सर, क्रोध इत्यादि विकार (८) कल्याणाचे स्थान (९) दयाळो (१०)*

*सुंदर (११) कलीयुगामुळे घडणारे दोष (१२) नाशाला (१३) शुद्धज्ञानरूप किंवा शुद्धज्ञानाचा ज्यामुळे उदय होतो (१४) श्रीज्ञानेश्वरमहाराज (१५) आई, बाप, स्वामी (१६) पूर्वी ज्याची कथा सांगण्याकरिता म्हणून अश्वत्थाम्याला झालेला देहदंड इत्यादिकांचे वर्णन केले, त्या परीक्षित् राजाचे जन्मवृत्त या बाराव्या अध्यायात सांगितले आहे,*

सूत उवाच

॥ गीति ॥

सूत म्हणे मुनिराया[१] माया वाया[२] न बाधि[३] हरिजानां[४] ।
वारुनि[५] भव[६]चिच्छाया[७] न्याया काया[८] परत्र[९] तरि[१०] ज्यांनां ॥

॥ पद ॥

जगदघहरणा[११] हरिलागीं । स्मरतां होति न भवभागी[१२] ॥ध्रु॥
गिरिजावल्लभ[१३] ज्यालागीं । त्यजुनि सकलही झाला योगी ॥१॥
मुनिजन कानन[१४] अनुसरले[१५] । जयाचे कारण[१६] ननु सरलें ॥२॥
ध्यातां ज्ञानेश्वर चरण । आवडी व्रजपति करि भरण[१७] ॥३॥६॥

॥ गीति ॥

हा कुंतीसुत[१८] तेंवी जीवीं[१९] वित्ता[२०] न मानुनी कांहीं ।
नंदनसम[२१] जन[२२] पाळी कृष्णचरणदत्तचित्त[२३] लवलाही ॥७॥
(य३-२०४) मी राजा हा मान[२४] न मानसिं कामा न देउनी थारा ।
दारादिकां न भुलुनी विसरेना पळहि त्या दिनोद्धारा[२५] ॥८॥ ***(२५ :- सदोदारा (पाठांतर)***

॥ ओवी ॥

यज्ञ तत्फळ[२६] आणि ब्राह्मण । वाजी[२७] गज[२८] दास रत्न । सलिल कन्या[२९] संपूर्ण । करसंपुटीं[३०] ॥९॥

*(१) शुकमुने (२) विनाकारण किंवा खोटी (३) भ्रम उत्पन्न करीत नाही (४) हरिभक्तांना (५) नाहीसे करून (६) संसार (७) चैतन्याचे ठिकाणी स्फुरणारी (८) शरीर (९) संसाराचे पार (१०) नाव, होडी (११) विश्वाचे पाप नाहीसे करणाऱ्या (१२) संसारात पडणारे (१३) शंकर (१४) अरण्य (१५) गेले (१६) संसार कारण माया (१७) पालन (१८) धर्मराज (१९) मनात (२०) धनास (२१) पुत्राप्रमाणे (२२) प्रजा (२३) श्रीकृष्णाचे चरणाचे ठिकाणी ज्याचे मन जडले आहे (२४) अभिमान (२५) सदोदारा (पाठांतर सदा उदारा) (२६) यज्ञाचे फळ (२७) घोडे (२८) हत्ती (२९) तरुण व उद्दाम मुली (३०) वश, स्वाधीन.*

॥ गीति ॥

यश गाती लोकत्रय[१] ज्या भोगाची[२] सुरांहि[३] अभिलाषा[४] ।
तें वमनासम[५] मानी ज्येष्ठ कुंतिसुत[६] भजोनि अविनाशा[७] ॥१०॥
जठरानल[८] तापलिया नावडती भोग पुष्पमालादी[९] ।
तेंवी संत युधिष्ठिर हरिचरणाविण न इच्छि बालादी[१०] ॥११॥

॥ संस्कृत- गद्य ॥

अनन्यभक्तस्य[११] योगक्षेमं वदतुमिच्छया भगवान् परीक्षितमरक्षयत् ।
तद्यथा । गर्भगतः परीक्षित् ब्रह्मास्त्रतेजसा दह्यमानः सन् कंचित्पुरुषं ददर्श ॥

॥ ओवी ॥

ज्योतिष्मतिसमनुप्राप्त[१२] । जो सूक्ष्महृदयोपहित[१३] । '
छांदोग्य' म्हणे जो डोळियां दिसत । तो अंगुष्टमात्रस्थित[१४] परमात्मा ॥१॥

॥ संस्कृत- गद्य ॥

अत्र श्रुति [१५] :-

य एषोऽक्षिणि पुरुषो दृश्यत एष आत्मेति होवाच एतदमृतमभयम् एतद् ब्रह्मेति तद्यद्यप्यस्मिन् सर्पिर्वोदकं वा सिंचति वर्त्मनी एव गच्छति ॥ (छांदोग्य.४.१५.१)

*(१) तिन्ही लोक (२) सुखाची (३) देवांनाहि (४) इच्छा (५) ओकारीप्रमाणे (६) धर्मराज (७) भगवंताला (८) पोटातील अग्नि (९) फुलांच्या माळा वगैरे (१०) पुत्रादि (११) गद्यार्थ - एकनिष्ट भक्ताचा योगक्षेम चालविण्याकरता भगवंताने परीक्षिताचे रक्षण केले, ते येणेप्रमाणे - गर्भात असलेल्या परीक्षिती राजाने, अश्वत्थाम्याच्या ब्रह्मास्त्राने जळून जाणार असतानां, गर्भातच दैदीप्यमान अशा कोणी पुरुषाला पाहिले (१२) बुद्धिसत्वाच्या साक्षात्काराने जसे रूप अनुभवाला येते त्याप्रमाणे, भगवंताचे ठिकाणीहि रूपाचा अनुभव येतो (१३) सूक्ष्म चित्तांत भासणारा (१४) जो अंगुष्ठा एवढा आहे (१५) श्रुतीचा अर्थ - हा जो आपल्या डोळ्याचे ठिकाणी पुरुष दिसतो, तोच आत्मा होय. हा मरणरहित व भयरहित आहे. हाच ब्रह्म होय, म्हणून ह्यावर घृत किंवा पाणी टाकिले असता त्याला त्याचा स्पर्श न होता ते बाजूनेच निघून जाते.*

शिष्य : - भगवन् ! ह्या श्रुतींत सांगितलेला डोळ्यांतील पुरुष जीव, छाया, किंवा देवता असू शकेल. तो परमात्माच आहे, हें कशावरून?

श्रीगुरुरुवाच :- श्रुणु वत्स ! अरे, ह्या श्रुतींत कंठरवानें[१] सांगितलेले अमृतत्वादिक[२] गुण जरी अन्यत्र संभवतात, तरी ते शब्दाच्या गौणीवृत्तीनें[३] संभवत असून, मुख्य[४] वृत्तीनें ते गुण परमेश्वराचें ठिकाणींच संभवतात. म्हणून, तो परमात्माच नेत्रांत दिसणारा पुरुष आहे. तोच हृदयांत सात्त्विकप्रकाशयुक्त अंगुष्टप्रमाण असा आहे.
(य३-२०५)

**'करारविंदेन[५]पदारविंदं मुखारविंदे विनिवेशयन्तम् । वटस्य पत्रस्य पुटे शयानं बालं मुकुंदं मनसा स्मरामि' ॥१॥**
**(श्रीकृष्णकर्णामृत)**

ह्या स्मृतीवरून तो अनध्यस्तविवर्त[६] असून, चैतन्यरूप[७] उपासकप्रीत्यनुसार[८] चतुर्भुजाद्याकारवान् आहे. तो आतां पूर्वपुण्यगोचर[९] भक्त्यनुसार येथें चतुर्भुजाद्याकारानें[१०] पाहिला.

**॥ ओव्या ॥**

**जायते[११] अस्ति[१२] वर्धते[१३] । विपरिणमते[१४] अपक्षीयते[१५] । विनश्यति[१६], हे षड्विकार[१७] जयातें । नसती कांहीं ॥१३॥**

*(१) स्पष्टपणे (२) अविनाशित्वादिक (३) शब्दाचे ठिकाणी अर्थ करीतांना ज्या मुख्या, गौणी, लक्षणा वृत्ति मानल्या आहेत, त्यापैकी गौणी वृत्तीने, म्हणजे शब्दाचा जो तंतोतंत अर्थ असेल तो जशाचा तसा न घेता थोड्या काही प्रमाणाने घेणे. हरि सिंह आहे या वाक्यात सिंहाचा अर्थ खरा सिंह न घेता सिंहासारखा असा गौण घ्यावा लागतो. (४) तंतोतंत खऱ्या अर्थाने (५) श्लोकार्थ - आपल्या करकमलाच्या योगे मुखकमलात चरणकमळ घालणाऱ्या व वटपत्रावर शयन करणाऱ्या बालमुकुंदाचे हृदयात चिंतन करितो (६) ब्रह्मज्ञानाने नाश किंवा मिथ्या न होणारा (७) सृदिानंदरूप (८) उपासक भक्ताच्या आवडीप्रमाणे (९) पूर्व जन्मातील पुण्याने प्राप्त झालेल्या प्रेमानुसार (१०) चतुर्भुज शंखचक्रधारी अशा रूपाने (११) उत्पन्न होतो (१२) आहे (१३) वाढतो (१४) बदलतो (१५) क्षीण होतो (१६) नाश पावतो. (१७) सहा प्रकारचा परिणाम*

**हे विकार पांचभौतिक[२] शरीरी । परमात्मा अनध्यस्तविवर्त स्वाकारानुपसंहारी[३] ।**
**यालागीं निर्विकारी[४] । सगुणही असुनी ॥१४॥**
**घनःश्याम वर्ण कांती गोमटी[५]। विद्युत्प्रभासम[६]वस्त्र कटीं[७]। चतुर्भुज श्रीजगजेठी । चामीकरकिरीटी[५] परमात्मा ॥१५॥**

**॥ श्लोक - वसंततिलका ॥**

**आरक्त[९] लोचन[१०] गदाधर[११] दिव्यमूर्ति[१२] । ज्याची अखंड वदनीं श्रुति गाति कीर्ती ।**
**तो व्यापुनी सकलदिक्[१३] फिरवी गदा ते । कौमोदकी[१४] करित जी सुजनां[१५]ऽगदा ते ॥१६॥**

**॥ ओव्या ॥**

**ज्या अस्त्रतेजें[१६] होता जळत । तें अस्त्रतेज समस्त । गदाप्रहारें[१७] झालें लुप्त[१८] । अकस्मात तेधवां ॥१७॥**
**ऐसें पाहोनि हा कवण । म्हणोनि गर्भीच करी चिंतन । सुंदर सावळें सगुण । अहो ! हा कवण डोळियापुढें ॥१८॥**

शिष्य उवाच :- तात ! श्रीमद्भागवताच्याठायीं ऐसें निरूपण केलें आहे की, जन्मसमयीं जीवाला अनेक जन्माचें ज्ञान होतें; आणि ते वेळीं तो परमात्म्याची स्तुति करितो. ही जर सामान्य जीवांची स्थिति आहे, तर मग जो पुण्यवान् उत्तरागर्भ[१९], त्याच्या जन्मसमयीं परमात्मा प्राप्त होऊनही, हा कवण अशा संशयाप्रत तो किमर्थ धारण करिता झाला?
(य३-२०६)

*(२) पांचभूतापासून बनलेल्या (३) आपल्या शरीराचा उपसंहार (म्हणजे आपल्यामध्ये पुनः त्याला लीन करून घेणे)*

*न करणारा (४) कोणताहि परिणाम किंवा बदल नसलेला (५) सुंदर (६) वीजेच्या प्रकाशाप्रमाणे दैदीप्यमान (७) कमरेला (८) सुवर्णमुकुट घातलेला (९) कमळाप्रमाणे लाल (१०) डोळे (११) गदा धारण करणारा (१२) चैतन्यस्वरूप (१३) सर्व दिशांचे ठिकाणी (१४) नांवाची गदा (१५) सज्ज्नांना सुखी, तापरहित (१६) बह्मास्त्राच्या तेजाने (१७) गदेच्या तडाख्याने (१८) नाहिसे (१९) उत्तरेचा मुलगा (गर्भात असलेला)*

श्रीगुरुरुवाच :- श्रवण कर. जन्मसमयीं जीवाला जें अनंत जन्मांचें ज्ञान होतें, तें योगबलानें[१] होत नसून, स्वाभाविक[२] प्रगट झालेल्या सत्त्वामुळें होत असतें. तसेंच या सत्त्वानें[३] मरणसमयीं गमनमार्गदर्शन[४] होतें, हें 'बृहदारण्यकीं[५]' बोलिलें आहे. तेव्हां बुद्धिसत्त्व[६] अभिव्यक्त[७] होऊन, परमात्मा जगत्कारण[८] कोणी तरी सर्वज्ञ आहे, या प्रकारचें अनुमान मात्र होत असतें. जसें वामनानें म्हटलें आहे कीं :-

**'नसे ठावा ब्रह्मा न शिव अथवा श्रीपति हरी । हरी[९] जो तापातें उचलुनि कृपासिंधुलहरी[१०] ॥**
**हरी[११] वाटे काळा करिस[१२] विपती[१३] मृत्युभुजगा[१४] । जगाचा जो आहे धनि कवण तो पाव मज गा' ॥१॥ वामन पंडित**

याप्रमाणें गर्भामध्यें अनुमानिक[१५] ज्ञान सामान्य निर्गुणात्मक होतें. परंतु हा परमात्मा साकार पाहिल्यामुळें, हा कवण? अशा प्रकारचा उत्तरागर्भ[१६] वितर्क करिता झाला.

**एवं वाक्यद्वयसमन्वय[१७] । बुद्ध्यानुसार[१८] बोलिला होय । तेथील न्यून पूर्ण ठाय । जाणे बापमाय परमात्मा ॥१९॥**

*(१) योगाच्या (योग=परमेश्वराशी ऐक्य पावणे ) सामर्थ्याने (२) जन्मकाली सर्व जीवांना जे अत्यंत दुःख होते त्यामुळे तो सहजच सात्विक व दीन होतो (३) मरणाचे वेळी होणाऱ्या दुःखानेहि सत्ववृद्धि होते (४) परलोकास जाण्याचा मार्ग दिसणे (५) नांवाचे उपनिषदात (६) बुद्धीतील सत्वगुण (७) प्रगट (८) जगताचा उत्पन्नकर्ता (९) नाहीसा करितो (१०) कारुण्यसमुद्रावरील लहरी (११) सिंह (१२) काळरूपी हत्तीस (१३) गरुड (१४) मृत्युमुखी सर्पास (१५) अनुमानाने झालेले (१६) परीक्षिती (१७) दोन विरुद्ध वाक्यांची संगति (१८) यथामति.*

**'प्रमेयपरिच्छेदें[१] । प्रमाणत्व[२] नांदे । तें कायी[३] स्वतःसिद्धे[४] । वस्तुच्या ठायीं'[४]॥ अमृ.५.ओ.१७**

एवं तातवचनावरून[५] ज्याला कोणतेंच प्रमाण जाणण्याला समर्थ नाहीं, कारण तीं प्रमाणें त्याच्याच प्रकाशानें[६] प्रकाशित[७] आहेत; किंवा प्रत्यक्ष पाकसदनीं[८] पाहिलेला जो वन्ही[९], त्या व्याप्तीवरून[१०] मला पर्वतावरील वन्हीचें अनुमान होतें. एवमादिप्रमाणें[११] जीव प्रकाशानें[१२] प्रकाशित[१३] असून, तो अहंकारही साक्षिप्रकाशानें[१४] प्रकाशित आहे. म्हणून त्याचें ठिकाणीं कोणत्याच प्रमाणांचा प्रवेश[१५] नाहीं. अशा प्रकारचा तो परमात्मा अनध्यस्तविवर्त[१६] असा, अस्त्राचा उपसंहार करून त्या दशममासप्राप्त[१७] गर्भासमोरं पाहतां पाहतांच अंतर्हित[१८] झाला. (य३-२०७)

**तदनंतर[१९] शुभग्रहानुकूलता[२०] । सकल सुयोग[२१] असतां । पांडुवंश वाढविता । पंडुसम तत्त्वतां जन्मला बाळ ॥२०॥**

**॥ संस्कृत गद्य ॥**

**तदा प्रीतमना[२२] राजा धौम्यकृपादिभिः एवं मंगलं वाचयित्वा तस्य जातकं कारयामास ।**
**सुवर्णं गां महीं ग्रामान् हस्तिनोऽश्वान् स्वन्नं च ब्राह्मणेभ्यो ददौ ।**

*(१) प्रमेयाच्या म्हणजे कळणाऱ्या वस्तूच्या मर्यादितपणाने (२) प्रमाणत्व अस्तित्वात आले किंवा शोभते (३) काय (४) उत्पन्न न होणाऱ्या, अशा आत्म्याचे ठिकाणी (५) श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या वाक्यावरून (६) ज्ञानाने (७) कळतात (८) स्वयंपाकघरात (९) अग्नि (१०) जेथे जेथे धूप असतो तेथे तेथे अग्नि असतो हे ज्ञान (११) अशाप्रमाणे (१२) जीवाच्या ज्ञानाने (१३) कळत (१४) साक्षीज्ञानाने (१५) उपयोग, कोणत्याच प्रमाणाने ज्याचे ज्ञान होत नाही (१६) ब्रह्मज्ञानानेहि अविनाशी (१७) दहावा महिना ज्याला लागला आहे (१८) गुप्त (१९) त्यानंतर (२०) सर्व शूभग्रहलाभी (२१) ग्रहयोग (२२) गद्यार्थ - तेव्हां राजा युधिष्ठिराला अत्यंत आनंद वाटला व त्याने धौम्यादि ऋषिकडून मुलाचे स्वस्तिवाचन व जातककर्म केले. ब्राह्मणांना सुवर्ण, गाई, गांव, हत्ती. घोडे व सुग्रास अन्न देऊन तृप्त केल*

**॥ अभंग ॥**

**केशव माधव गोविंद गोपाळ । नामें[१] हा मंगळ[२] पंडुवंश ॥१॥**
**विष्णु भगवान गरुडवाहन । कल्याणनिधान नारायणू ॥२॥**
**मंगल मंगल कमललोचन । कामनामोचन[३] कामतात[४] ॥३॥**

रामकृष्णहरी मंगळस्वरूप । गुरु माय बाप ज्ञानेश्वर ॥४॥ २१॥

॥ पद ॥

शिव देतो शिव[५] सकळाला । त्राता जो भवि[६] विकळांला[७] ॥ ध्रु.॥
कृत[८] मथन दनुजबल-काला[९] । श्रित मदांकिनि अलकाला ॥१॥
तव करुणाकर[१०] शशिभाला[११] । स्पर्शो गिरिशा[१२]! शिशुभाला[१३] ॥२॥
करि शमवुनि[१४] त्रिगुणउबाळा[१५] । सुखि अलकावतिपतिबाला[१६] ॥३॥

॥ शार्दूलविक्रीडित ॥

एवं कल्याणगीतें[१७] वदुनि निजमनीं तुष्ट होवोनि दानी[१८]।
सिद्ध ब्रह्मर्षि राया विनययुत अशा बोलती योग्य वाणी ।

*(१) श्रीहरीच्या नामस्मरणाने (२) कल्याणकारक किंवा ज्या पंडुवंशाचे नाम घेतले असता कल्याण होते (३) कामना नाहीसा करणारा (४) मदनाचा पिता (५) सुख (६) संसारात (७) विकल, दुःखी जनांना (८) दैत्य-सेनेचा नाश करणाऱ्या काळा (९) मस्तकावरील जटेच्या ठिकाणी मंदाकिनी धारण करणारा किंवा ज्या जटेत गंगा राहिली त्या जटा धारण करणारा (१०) करुणारूपी हात (११) हे भाळप्रदेशी चंद्र धारण करणाऱ्या (१२) कैलासपते (१३) मज लेकुराचे मस्तकास (१४) शांत करून (१५) त्रिगुणाचा ताप, दाह (१६) ज्ञानराजकन्या (१७) मंगलकारक शब्दाने (१८) दानाने.*

दैवें[१] त्वद्वंश[२] जातां[३] सुत यशुमतिजें[४] दत्त[५] ऐसें गणावें[६]।
यालागीं यास येथोनिच सकल जनीं विष्णुराता[७] म्हणावें ॥२३॥

॥ वसंततिलका ॥

होईल हा जगति थोर यशोनिविष्ट[८] । या मानितील नरपाल सदा वरिष्ठ ।
आणीक दास हरिचा गुरुमाउलीचा । होईल हा निजबळें शमिता[९] कलीचा[१०] ॥२४॥

॥ ओव्या ॥

युधिष्ठिर म्हणे हो विप्रवर्या ।आमुचिया वंशीची पूर्वचर्या[११]। सकल राजर्षि धैर्यौदार्या[१२]। साधुवादकार्या[१३]दक्ष[१४]होते ॥२५
तैसा होईल कीं हा बाळ । हें सांगा होवोनि कृपाळ । हा एकुलता म्हणोनी उतावेळ । पुसावयाची मजलागीं ॥२६॥
(य३-२०८)

॥ कटाव ॥

तैं द्विजवर म्हणती राया ! ऐके गुण निजपौत्राचे[१५] ॥ध्रु.॥
इक्ष्वाकूसम[१६] प्रजापालनीं । विप्र भक्त आणि सत्य लालनीं[१७] ।
दाशरथी रामासम मानी । शिबिनरपतिसम शरण्य[१८] दानी[१९] ।
भरतासम निजयशविस्तरणीं[२०] । युगुलार्जुनसमान[२१] धनुधरणीं[२२] ।
दुःसह[२३] जेंवि वन्हि वा तरणी[२४] । नदिपतिसम[२५]अति दुर्घट[२६]तरणीं[२७] ।

*(१) दुर्धर अशा पूर्वकर्माने (२) तुझा वंश (३) खंडित होऊ पाहत असता (४) श्रीकृष्णाने (५) दिला (६) समजावे (७) विष्णूने दिलेला (८) कीर्तिसंपन्न (९) निग्रह करणारा (१०) कलियुगाच्या (११) पूर्वजनांची राहाटी, आचार (१२) धैर्य औदार्य इत्यादि गुणांचे ठिकाणी (१३) सज्जनांना मान्य अशा अनिंद्य कार्याविषयी (१४) तत्पर (१५) आपल्या नातवाचे (१६) इक्ष्वाकू राजाप्रमाणे (१७) सत्य पालन करण्यात (१८) शरण आलेल्यास (१९) अभय देण्यात (२०) आपल्या यशाचा झेंडा फडकविण्यात (२१) पांडुपुत्र अर्जुन व सहस्त्रार्जुन यांच्याप्रमाणे (२२) धनुष्य धारण करण्यात (२३) ताप देणारा (२४) सूर्य (२५) समुद्रासारखा (२६) कटीण (२७) तरून जाण्यास, जिंकण्यास*

विक्रमिं[२] केवळ केसरि[३] जेंवी । सेवनि[४] योग्य हिमालय जेंवी ।
क्षमा यास कुंभिनिची[५] जैसी । सहनशीलता जननीऐसी ।
समदर्शी हा विधिसम[६] राया । शिवसम शक्त[७] प्रसाद[८] कराया ।
आश्रय सकलां भूतां द्याया । होईल सम हा लक्ष्मिवरा[९] या ।
कृष्णसमानचि सद्गुणिं महिम[१०] । रंतिदेवसम उदार परम[११] ।

ययातिसम आचरेल धर्म । धैर्यधारणा[१२] बलिसम कर्म ।
कृष्णभजन शिकवाया नेटें[१३] । कयाधुनंदनसमान[१४] वाटे ।
वृद्धसेवनीं[१५] अति मन याचें । करिल तीन वाजिमेध[१६] साचे ।
हा राजर्षीस जन्मदाता । कुमार्गगामीशासनकर्ता[१७] ।
करुनि कलिप्रमुखकु-जनरोधा[१८] । गंगातटिं[१९] शुकमुखगत[२०] बोधा ।
पावुनि मिळेल सुसुख चिदनंता[२१] । यास्तव सोड सकळ भय चिंता ।
॥ चाल ॥ उकलुनियां पल्लव[२२] आम्हीं । वदलों नृपविधिसूत्राचें[२३] ॥
तैं द्विजवरम्हणती राया । ऐके गुण निजपौत्राचे ॥२७॥

॥ ओवी ॥

एवं परिसूनि भूसुरवाणी[२४] । युधिष्ठिर आनंदला मनीं । उचित पूजा विप्र पावोनी । सुखें निजसदनीं पातले ॥२८॥

*(२) पराक्रमाने (३) सिंह (४) आश्रयास (५) पृथ्वीची (६) ब्रह्मदेवाप्रमाणे (७) समर्थ (८) कृपा (९) विष्णूप्रमाणे (१०) थोर (११) अति (१२) धैर्य धरण्यात (१३) चिकाटीने (१४) प्रल्हादासमान (१५) थोरांच्या सेवेत (१६) अश्वमेध (१७) वेदमार्गाला सोडून वागणाऱ्यांना दंड करणारा (१८) कलिप्रमुख जे अत्यंत दुष्ट लोक त्यांचा निग्रह करणारा (१९) गंगेच्या काठी (२०) श्रीशुकाचार्याच्या मुखाने ज्ञान (२१) उत्तम अशा अखंड चित्सुखाला (२२) पडदे (२३) परीक्षिती राजाचे प्रारब्धानुसार जे चरित्र होणार त्याचे (२४) ब्राह्मणांचे म्हणणे*

॥ संस्कृत गद्य ॥ [१]

नन्वयं कृष्णभक्तो भविष्यतीति यद् ब्राह्मणैः प्रोक्तं तत् किं ज्योतिषानुसारेण आहोस्वित् योगानुसारेण ।
द्वयोरपि भविष्यानुसारिणी बुद्धिः स्वीक्रियते ।
तथात्वे प्रयत्नोपदेशनाशापत्तिरिति चेन् न ।
'बहूनां जन्मनामन्ते ज्ञानवान् मां प्रपद्यते' इति प्रियोक्तेः।
इयं योजना ।
नहि सत्प्रवृत्तिरपि प्रयत्नेन हंतव्येति विधिरस्माकम् ।
अतः पूर्वकर्मानुसारेण बुद्धिनिबंधनं भवतिचेन्न तत्प्ररोधयेद् इति ब्राह्मण-भविष्य-वचनार्थः।
अन्यथा तु प्ररोधयेद् इति निष्कर्षः ॥
अत्रानुमानमपि ।
इतरे जीवा गर्भे परमेश्वरं स्तुत्वा बहिरागमनानन्तरं तं विस्मरन्ति ।
अयं तु गर्भे रक्षितारं परमेश्वरं परीक्षन्ननुध्यायत्यतो भविष्यत्ययं निश्चयेन कृष्णप्रियः ।
अनुध्यानमेवम् । (य३-२०९)

*(१) संस्कृत-गद्यार्थ ॥ शंका - अहो! परीक्षिती राजा मोठा कृष्णभक्त होईल असे जे ब्राह्मणांनी सांगितले, ते काय ज्योतिष शास्त्रानुसार त्यांनी सांगितले किंवा योगसामर्थ्याने त्याच्या प्रारब्धावर संयम करून व ते जाणून सांगितले! दोन्ही ठिकाणी (जसे होणार असेल तशीच बुद्धि होते असे मानणे भाग पडते व तसे) मानले म्हणजे प्रयत्नवादाचा नाशच झाला म्हणावयाचा! उत्तर- आपण असे म्हणत असाल तर मात्र तसे नाही. कारण पुष्कळ जन्मानंतर जीव हा ज्ञानी होऊन मला प्राप्त होतो असे भगवंताने म्हटले आहे (म्हणजे पूर्वीच्या जन्मात झालेले कर्म या जन्मात फलद्रूप झाले असता दैव संज्ञा पावते असे शास्त्रातून सांगितलेले दैव जर कांही पदार्थच नसता व प्रयत्नाने केले ते सिद्ध होते, त्याच्या आड कांही येत नाही असेच जर शास्त्राने प्रयत्नवादाचे मंडण करून म्हटले असते तर पुष्कळ जन्माने ज्ञानी मला पावतो असे भगवंताला म्हणण्याचे कारणच नव्हते. (भगवंताच्या म्हणण्यावरून प्रयत्नाला प्रतिबंध करणारा काही पदार्थ आहे असे सिद्ध होते ) प्रयत्नवादाची व दैववादाची अशी व्यवस्था आहे - शास्त्रास धरून असलेल्या प्रवृत्तीचाहि विरोध करावा असे काही आम्हा प्रयत्नवाद्यांचे म्हणणे नाही. म्हणून पूर्वपुण्याने जर आपली बुद्धि विवेकसंपन्न होऊन शास्त्रास अनुसरून वागत आहे तर तिचा प्रयत्नाने निग्रह करू नये असा ब्राह्मणांच्या म्हणण्याचा अर्थ आहे. अर्थात् विवेकभ्रष्टबुद्धीचा निग्रह करण्याचा प्रयत्न केला पाहिजे (हाच प्रयत्नवादाचा उपयोग) या ठिकाणी ब्राह्मणांचे अनुमानहि संभवते. सर्व अज्ञानी जीव गर्भामध्ये भगवंताची स्तुति करितात पण*

*जन्मानंतर त्याला विसरतात पण हा परीक्षिती राजा ज्याने गर्भात त्याचे संरक्षण केले त्या परमेश्वराला जन्मल्यावरहि विसरला नाही व त्याचे ध्यान कायम राहिले. यावरून हा परीक्षिती खात्रीने कृष्णभक्त होणार असे ब्राह्मणांनी अनुमान केले. जन्मल्यावर तो परीक्षिती याप्रमाणे ध्यान करू लागला.*

**॥ पद ॥**

**कोठें तो आहे ॥धृ.॥**
**जो या जगता व्यापुनि असतो । हरि अंतर्बाहे[१] ॥१॥**
**निर्गुण निगमीं[२] परि सगुणचि मी । जननिउदरिं[३] पाहे ॥२॥**
**येथिल नरजनभूतकठिणपण[४] । ज्याचि तनु[५] न साहे ॥३॥**
**श्रवण[६] नयन[७] मन पवन[८] उगे[९] परि । जीवचि उर[१०]लाहे ॥४॥**
**अलकावतिपति[११] जननी कळवी[१२] । हृदयिं जसा राहे ॥५॥**

**॥ ओव्या ॥**

**युधिष्ठिरादिकीं कृतपालन[१३] । बाळ वाढे शुक्लोडुपसमान[१४] ।**
**जातिद्रोहपापनाशाकारण[१५] । अश्वमेधकरण धर्म इच्छी ॥३०॥**
**परी [१६]दंडें वा करग्रहणें[१७] पुढतीं । द्रव्य घेतां वाढेल रजःसंपत्ती[१८] ।**
**पीडा देवोनी दूजियांप्रती[१९] । युक्त न वाटे यज्ञ करणें ॥३१॥**
**ऐसे युधिष्ठिराचे मनोरथ । जाणोनियां जगन्नाथ ।**
**उत्तर दिशेस पाठवीत । युधिष्ठिरातिरिक्त[२०] पांडवा ॥३२॥**
**मरुतरायाचें त्यक्त[२१] धन । तें सकळही आणोन ।**
**श्रीकृष्णातें बोलावोन । धर्मे यज्ञें करून पूजिलें ॥३३॥**
**तेथचि राहोनि कांहीं दिवस । आज्ञा घेवोनि हृषीकेश ।**
**हृदि[२२] स्थित वाढवीत प्रेमोल्हास[२३] । निजपुरास पावले हरी ॥३४॥**

**॥ दोहा ॥**

**श्रीज्ञानेश्वरमाउलीचरण मनोहर सार[२४] ।**
**पुढत पुढतिं अति वंदुनी तुच्छ करूं संसार ॥३५॥**

*(१) आत बाहेर (२) वेदांत (३) मातेच्या गर्भात असताना (४) मनुष्यलोकांतील पंचभूतांचा कठीणपणा, स्थूलपणा (५) शरीर म्हणजे ज्याचा देह पांचभौतिक नाही (६) श्रवणेंद्रिय (७) चक्षुरेंद्रिय (८) प्राण (९) स्तब्ध (१०) व्याकुळ होतो (११) आळंदीचे राजे, श्रीज्ञानेश्वरमहाराज (१२) सांगते (१३) पाळण केलेला (१४) शुक्लपक्षातील चंद्रासमान (१५) आपल्या बांधवांचा जो संहार झाला, त्यामुळे घडलेल्या पापाचे क्षालन करण्याकरिता (१६) प्रजेला दंड करून (१७) कर बसवून (१८) रजोगुणी लक्षणे (१९) दुसऱ्यास (२०) धर्मराजास सोडून बाकीच्या (२१)टाकलेले (२२)हृदयात असलेले (२३)प्रेमानंद (२४)तत्व.*

**हरिः ॐ तत्सत् श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरकृपाप्रसादे नानाछंदबद्धे गद्यपद्यान्विते प्रियलीलामहोत्सवे आमंत्रणविलासे परीक्षिज्जन्माद्युत्कर्षो नाम द्वादशसखीप्रेषणम् ।**

**॥ श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ॥**

(य३-२१०)

०००

# सखीप्रेषण १३ वें. विषयानुक्रम

*विदुरानें धृतराष्ट्राला व नारदानें धर्माला कथन केलेले परमार्थ विषयक प्रयत्नाचें महत्व व सौलभ्य. मोक्षविषयक प्रयत्नाचें जीवाला पूर्ण स्वातंत्र्य परमेश्वराचें दयालुत्व व न्यायित्व. मांसभक्षण निषेध, ससाधन हरिगुरुभजनप्रक्रिया. ज्ञानोत्तर देशकालप्रतीति खंडनार्थ व विदेहमुक्ती प्राप्त्यर्थ वृत्ति सगुणमयघनीकरण प्रक्रिया, प्राणसत्त्वमयकरण प्रक्रिया. गंगामाहात्म्यादि विषयवर्णन. (पृष्ठ २११-२४६)*

*मंगलाचरण :- गोविंदनाममाहात्म्य. भगवती अंबेचें स्तवन २११ कथानुसंधान. श्लोक 'विदुरस्तीर्थयात्रायाम्' । आंगीं साधनचतुष्टय संपत्ति असून सद्गुरूजवळ असल्यावर मुमुक्षूला महावाक्यगतीवांचून सृष्ट्युत्पत्यादिविषयक प्रश्न सुचत नाहींत याविषयीं दृष्टांतपूर्वक निरूपण व ह्याच नियमानुसार मैत्रेयापासून भगवद्भक्ति प्राप्त झाली असतां विदुरानें पुसणें सोडलें २११ विदुर आलेले पाहून धर्म-धृतराष्ट्रादिकांचें सहर्ष सामोरे जाणें व सत्कार पूजनादि झाल्यावर धर्मराजांचें त्यांनां उद्देशून भाषण २१२ विदुरकृत उपकारांचें स्मरण करून विदुरस्तवन पूर्वक स्वानुभवानें साधूंची दीनवत्सलतावर्णन व तीर्थाटनांत (य३-३५) पाहिलेलें आश्चर्य सांगण्याविषयीं विनंती २१२-२१३ सिद्धांस साधनांची अपेक्षा नसूनही ते तीर्थाटन करतात याचें प्रयोजन निरूपण २१३-२१४ युधिष्ठिराचा श्रीकृष्णविषयक कुशल प्रश्न. अंत्य प्रश्न गाळून युधिष्ठिराच्या इतर प्रश्नांची उत्तरें दिल्यानंतर धृतराष्ट्राला उपदेश करीत विदुरांचें कांहीं दिवस तेथें राहणें २१४ शंका :- विदुरांनीं 'शूद्रयोनावहंजातो' असें उद्योगपर्वांत म्हणून आपला उपदेशाविषयीं अनधिकार दाखविला आहे व प्रस्तुत त्यांनी धृतराष्ट्राला उपदेश केला आहे असा त्यांच्या दोन वाक्यांत विरोध येतो. समाधान :- या शंकेच्या अनुरोधानें **'वर्णानां ब्राह्मणो गुरुः'** व **'अंत्यादपि परंधर्मं'** या दोन स्मृतींचा समन्वय व अत्यंत तीव्र मुमुक्षूला देहाभिमानबोधक वर्णाश्रमविषयक वाक्य निषेध करूं शकत नाहीं असा सिद्धांत २१४. विदुराच्या दोन वाक्यांतील विरोधपरिहार:- विदुराच्या प्रथम वाक्यांतील अभिप्राय निरूपण २१४-१५ धृतराष्ट्राची आताची स्थिती व त्यामुळे तीव्र मुमुक्षा व उपदेशाला पात्रता २१५ ह्याशिवाय विदुर हे भगवान यमधर्मच असल्यामुळें याही दृष्टीनें त्यांचा उपदेशाधिकार. शिष्यवचन :- विदुरानें धृतराष्ट्राला बोध कसा केला तो ऐकण्याविषयीं उत्कंठा. श्रुतिप्रामाण्यानें नित्य वेदांतचिंतनाची व गुरुसमागमाची आवश्यकता. वेदांतश्रवणाचें ठायीं अलंबुद्धि मानल्यास रसास्वाद विघ्नाची प्राप्ती २१५. ब्रह्मानंदाचे ठिकाणीं नवी नवी रुची घेणें हेंच जीवन्मुक्तीचें रहस्य. अन्यथा विषयानंदाहून ब्रह्मानंदाला येणारी नीचता २१६ आचार्यांचें उत्तर :- विदुरांचा धृतराष्ट्राला उपदेशनिरूपण :- पुढें येणारा जन्मजरादुःखादि अनिष्ट काल जाणून वेळींच सावध होण्याविषयीं विदुरानें धृतराष्ट्राला सुचविलेला हरिभजनाचा उपाय. २१६ अमृतरायवचनप्रामाण्य, जीवदशावर्णन. २१६-२१७ शंका :- प्रयत्नानें जर सर्वांचेंच निराकरण होतें तर ''यत्न करुनि यन्निराकरण नच होये कवण्या मिषें'' या वचनांत काळाची कोणाकडूनच प्रतिक्रिया होत नाहीं असें कसें म्हटलें ? समाधान :- ब्रह्मज्ञानी असून ज्यांनीं रस किंवा योग यांच्या योगानें हरगौरीसृष्टींतील नूतन देह उत्पन्न करून घेतला आहे त्यांच्या काळाचें प्रयत्नानें हरण (य३-३६) होण्याची किंचित् शक्यता व विषयांधाचा काल प्रयत्नानें हरण होण्याची अगदींच अशक्यता. २१७-२१८ हरगौरीसृष्टींतील देहाची यावत्प्रारब्ध नित्यता. सर्वच ब्रह्म आहे अशी शंका केल्यास ग्रहण-क्रिया अनुकूल व त्याग-क्रिया प्रतिकूल मानणें ब्रह्मनिष्ठाच्या दृष्टीनें शोभत नाहीं असें उत्तर . व्यष्टिप्रयत्नानें काळाचें हनन होण्याची अशक्यता व ब्रह्मज्ञानाची शक्यता. व्यष्टि समष्टि दोहोंचेंही चैतन्याचे ठिकाणीं भ्रमरूपत्व व व्यष्ट्यधिष्ठानज्ञानानेंच ससमष्टिप्रपंचाची विनिवृत्ति. संसारविषयक प्रयत्नाहून परमार्थविषयक प्रयत्नाचें सौलभ्य. २१८ वैराग्य धारण करण्याविषयीं धृतराष्ट्राला उपदेश व त्याच्या श्वानवृत्तीचा निषेध. २१८-२१९ ज्ञान, वैराग्य, लाज, भीती, यांतून कोणत्याही रीतीनें आवडीपूर्वक भगवद्भजन केलें असतां निजसुखप्राप्ती. २१९. विषयांत दोष पाहून भगवद्दर्शनार्थ झटणाराची धन्यता वर्णन. १२९-२२० आत्महितार्थ न झटणाऱ्या मूढाविषयीं तुकारामवचनप्रामाण्य. २२० धृतराष्ट्राला त्याच्या व आपल्या पूर्वजन्मकथनानें सुहृत्पाप्ति सूचित करून ब्रह्मप्राप्तिकरितां उत्तर दिशेला जाण्याविषयीं विदुराचा निर्वाण उपदेश. २२०. विदुराच्या उपदेशानें भक्तिज्ञानवैराग्ययुक्त प्रज्ञाचक्षुयोग धारण करून धृतराष्ट्राचें गांधारीसह गमन. २२१ गांधारीचा अधिकार व तिनें धृतराष्ट्राबरोबर जाण्याचें कारण. धृतराष्ट्र, विदुर व गांधारी या तिघांच्या वंदनार्थ धर्म आला असतां त्या तिघांनांही न पाहून त्याचें शोकाकुलित होणें व त्यांचें उपकार आठवून संजयास त्यांचा शोध विचारणे. २२१ धर्मराजाच्या प्रश्नानें दुःखित झालेल्या संजयाचें उत्तर. २२२ तुंबुरूसह नारदमुनींचें आगमन व संतदर्शनमहिमावर्णन. नारदांस वंदनादि सत्कारपूर्वक युधिष्ठिराचा प्रश्न व सज्जन स्वतः अत्यंत निस्पृह असतांनां गमनागमन कां करतात याचें*

*प्रयोजन कथन. युधिष्ठिराचा प्रश्न ऐकून जगत ईश्वरवश आहे व भूतांचा संयोग वियोग ह्या प्रभूच्याच आधीन आहे असें जाणून शोक न करण्याविषयीं नारदांचा उपदेश. शंकाः- सर्व जगत् ईश्वरवश मानलें असतां प्रयत्नाची हानी होते व केलेल्या कर्माचें फळ ईश्वर देतो तर तो नैर्घृण्य वैषम्य दोषादियुक्त असला पाहिजे. २२२. समाधान :- या शंकेचें अनेक वेळां समाधान केलें असून पुनः शंका करीत असल्यामुळें शिष्याचा कनिष्ठाधिकारद्योतन. यत्न म्हणून जो तूं स्वीकार करितोस तो काय जड स्वीकार करितोस किंवा चैतन्यस्पंद स्वीकार करितोस असा प्रश्न व उभयपक्षीं येणाऱ्या अडचणी. आपण वादी या दृष्टीनें विचारीत नसून अशा अडविल्यानें जिज्ञासा शांत होत नाहीं अशी शिष्यानें विनंती केल्यावरून शंकेचे सयुक्तिक समाधान :- जगत् परमेश्वरवश सांगणाऱ्या व ईश्वर सहाय घेऊन जीवाला प्रयत्न करण्याचें स्वातंत्र्य सांगणाऱ्या श्रुतिवचनांचा निर्देश. २२३-२२४ ह्या श्रुतींचा परस्पर विरोध प्राप्त झाला असतां सत्तात्रय व सत्ताद्वय वादांच्या रीतीनें त्यांचा समन्वय. २२४. सत्तात्रय वादाच्या रीतीनें समन्वय :- फलभोगकालीं भूतांचा संयोग-वियोग परमेश्वराच्याच आधीन असून कर्मकर्तृकालींमात्र जीवाचा प्रयत्न चालत असतो. याविषयीं वास्तविक समाधान निरूपण :- **ईक्षणापासून प्रवेशापर्यंत ईश्वराची सृष्टी व जागृतीपासून मोक्षापर्यंत जीवकल्पित संसार. ईश्वरसृष्टींत जीवाची मनोमय सृष्टी**, तिला आधीन करण्याचा जीवाला अधिकार व **मनोमय प्रपंचच जीवाच्या सुखदुःखास कारण होतो,** याविषयीं सोदाहरण स्पष्टीकरण. **मनोमय सृष्टी जीवाला जशी करतां येते तशीच ती मोडण्याचाही अधिकार त्यालाच** असल्यामुळें वासना जिंकण्याविषयीं प्रयत्नाचाही त्यालाच अधिकार. २२४. सत्ताद्वयवादाच्या रीतीनें याहून विशेष समाधान - २२५ सर्व प्रपंच जीवकल्पितच असून त्याची प्रातिभासिक-सत्ता व ब्रह्माची पारमार्थिक सत्ता. रज्जुसर्पदृष्टांतानें ब्रह्माच्या सामान्य सत्तेचें प्रपंचसत्तेला साधकत्व व विशेषचैतन्यसाक्षात्कारानें प्रपंचविनिवृत्ति. रज्जुसर्पन्यायानें प्रपंचाध्यासास्तव जगत्सादृश्यादि दोष ब्रह्माचे ठिकाणीं स्वीकारावे लागतील अशी शंका आल्यास तिच्या निराकरणार्थ आकाशनीलताध्यासदृष्टांतानें ब्रह्मसत्तेचें प्रपंचानुमंतृत्व व विशेष स्वरूपचैतन्यज्ञानानें प्रपंचाची निवृत्ति कथन. जीवकल्पनातीव्रसंवेगजन्य कर्मफल विनिवृत्त करण्याला कालाची आवश्यकता व फलप्राप्त होण्यापूर्वी प्रयत्न केला असतां त्याचा फलसमयीं परिणाम होण्याचा संभव २२५ (य३-३८) भुक्तभोग व वर्तमानभोगनिवृत्तीविषयीं प्रयत्न करण्याचें वैय्यर्थ्य व भविष्यद्भोगविनिवृत्तीविषयींच यत्न करण्याचें महत्व सप्रमाण निरूपण २२५-२२६ असा प्रयत्न करण्यांत भुक्तदुःखाविषयीं शोक न करणें, वर्तमान दुःखाविषयीं सहनशीलता धरणें आदिकरून सद्गुणांच्या भूषणाची प्राप्ति व अशा गुणसंपन्न पुरुषालाच भगवदनुमोदनानें नित्य सुखाची सहज प्राप्ती. आपणच कल्पिलेला प्रपंच केव्हां तरी आपल्याच हातून सुटेल असें धैर्य धरून मोक्षार्थ सारखा प्रयत्न करण्याविषयीं युधिष्ठिराला नारदांचा उपदेश व ह्याविषयीं ब्रह्मसूत्राचें प्रामाण्य. व्यसनाच्या दृष्टांतानें प्रपंचाविषयीं यत्न करण्याची अयुक्तता. युधिष्ठिराला त्याच्या बापानें (धृतराष्ट्रानें) जें सोडले तें भगवद्वशतेनें झालें असल्यामुळें शोक न करितां पुढें उत्तम गती मिळण्याविषयीं यत्न करण्याचा उपदेश २२६ कर्तृकालीं जीव स्वतंत्र असला तरी फलभोगकालीं भगवदीक्षणानुसारच वागणें भाग पडतें याविषयीं दामबद्ध गाईच्या दृष्टांतानें निरूपण. फलभोग ईश्वरतंत्र असल्यामुळें भोगकाली लागणारी प्रवृत्तीही ईश्वरतंत्रच आहे म्हणून त्यावेळेंस प्रयत्न संभवत नाहीं या म्हणण्याची अंशतः सत्यता, त्या प्रवृत्तीला लागणाऱ्या अहंदेहात्मक अज्ञानाचें अनादित्व व ज्ञाननाश्यता, व मी या प्रवृत्तिनिवृत्तीहून वेगळा आहे अशा अज्ञाननिवर्तक ज्ञानाविषयीं प्रयत्नाचा संभव २२६ परमेश्वराकडून मोक्षप्रयत्नांत प्रतिबंध होणें शक्य नाहीं असें यांतील तात्पर्य कथन २२६-२२७ भोगाच्या दृष्टीनें भूतांचा संयोग वियोग परमेश्वरइच्छेवर अवलंबून असतो याविषयीं बाहुल्यांचा दृष्टांत २२७ मिथ्या जीवांनां सुखदुःखांत टाकातांनां परमेश्वराला दोष लागत नाहीं म्हणून जीवांनां परतंत्र मानावें या शंकेचें वैय्यर्थ्य व ''लोकवत्तु लीलाकैवल्यम्'' या सूत्रानें सार्थ कर्मे करून अलिप्त राहणें हें परमेश्वराचें लक्षण निरूपण. दुसऱ्या रीतीनें युधिष्ठिराचा शोक निराकरण करण्याकरितां किंचित् स्थूल दृष्टीनें निरूपण :- जग सत्य, मिथ्या किंवा अनिर्वचनीय मानलें असतां तिन्हीं दृष्टीनें शोक करण्याचें वैय्यर्थ्य २२७-२२८ अनन्यगतिकांचा योगक्षेम भगवान् चालवितो या विषयीं नाना दृष्टांत व भगवत्स्तवनपूर्वक भगवंताचें दयालुत्व निरूपण. (य३-३९) शंका :- अशक्तौ दुग्धनिर्मातृतेवरून भगवंताचे ठिकाणीं दयालुत्व अनुमित मानल्यास त्याच्याकडे नैर्घृण्यवैषम्य दोष येतात २२८ समाधान :- जीवसामान्यतापक्षीं परमात्मा दयाळू असून जीव जें कर्म करितो त्याचा उत्तम परिणामच व्हावा म्हणून श्रौतशासनान्वयें जीवाच्या कल्याणार्थ परमेश्वराला न्याय करावा लागतो याविषयीं आईच्या दृष्टांतानें निरूपण*

*२२८-२२९ आवश्यकारोप व कल्पनारोपनिरूपण पूर्वक याविषयाचें दृष्टिसृष्टिवादांत स्थापन २२९ आवश्यकारोपाचें व कल्पनारोपाचें लक्षण, कल्पनारोप अत्यंत तीव्र झाला असतां आवश्यकारोपतुल्य दृढता व जीव मुक्त झाल्यावरही भगवंताचें*

*दयालुत्व असतेंच याविषयीं निरूपण २२९ त्या दयालू परमेश्वरावर जिज्ञासुदशेंत किंवा ज्ञानीदशेंत अवलंबून राहून विदुरादिकांविषयींची विकल वृत्ति सोडून देण्याविषयीं नारदांचा उपदेश २२९-३० देहावरून अभिमान सोडणें जितकें सुलभ आहे तितकें त्याला चिरजीवी करणें सुलभ नाहीं याविषयीं विषमिश्रित अन्नाच्या दृष्टांतानें निरूपण व जडदेहाचें सार्थक्य करण्याकरतां ईश्वरभजनाचा उपदेश २३० ''अहस्तानि सहस्तानामपदानि चतुष्पदाम् । फल्गूनि तत्र महतां जीवो जीवस्य जीवनम् ।। १.१३.४६ याश्लोकांतील भाव निरूपण :- अहस्तानीत्यादि पदांवरून जीवहिंसा विहित आहे असें अनुमान काढूं पाहणारांच्या मताचें खंडन व ईश्वरविहित वृत्तीची सर्वत्र सुलभता २३०-३१ निवृत्तिकथनालाच विधित्व. सत्त्वादि गुणांच्या योगानें होणारे अन्नाचें तीन भाग कथनपूर्वक मांसभक्षणनिषेध व हिंसा ईश्वरविहित नाहीं असा सिद्धांत. तृणधान्यादिकांचें सेवनही केवल ईश्वरभजनार्थ प्राण वांचविण्याकरितांच करावें असा विधि २३१ 'अहस्तानीत्यादि' पदांचा श्रुत्यनुसार अभिप्राय व 'जीवो जीवस्य जीवनम्' या पदावरून दृष्टिसृष्टिवादानुसार जीवाकडे लयकारणत्व अथवा जीवाधिष्ठान बिंबरूप ब्रह्माकडे आरोपित लयकारणत्वकथन २३२ अविद्येनें भासविलेलें संपूर्ण जगत आपणासहित भगवन्मय पाहण्याकरितां ससाधन हरिगुरु भजनप्रक्रियानिरूपण २३२-२३३ सृदिानंद परमात्मा आपणाहून भिन्न नसून भोक्ताभोग्यभेद अविद्येनें भासविलेला आहे (य३-४०) याविषयीं स्वानुभवपूर्वक उपपत्ति कथन करण्याकरितां 'सोऽयमद्य महाराज भगवान्भूतभावनः । कालरूपोऽवतीर्णोऽस्यामभवाय सुरद्विषाम् ।।' १-१३-४८ या श्लोकार्थाचें निरूपण :- तातवचनप्रामाण्यानें व युक्तीनें सत्, चित् व आनंद या पदत्रयांचें ऐक्य २३३-२३४ जग साक्षीभास्य आहे हें सत्तात्रयवादियांचें मत खंडनपूर्वक भोक्ता व भोग्याची सृदिानंदरूपता २३४-२३५ अंधकारदृष्टांतानें अज्ञानाचें व सत्, चित् आणि आनंद याच्या भेदाचें मिथ्यावगमन २३५ सिद्धाला अज्ञानाची अप्रतीति व सत्, चित्, आनंद यांच्या अभेदकथनप्रक्रियेचा साधकाला निदिध्यासनार्थ उपयोग, त्यापासून अद्वैतभक्तीची प्राप्ति व मुक्तीची तुच्छता. ज्ञानप्राप्तौ देशकालप्रतीतिखंडनार्थ व विदेहमुक्तिप्राप्त्यर्थ भक्तीची आवश्यकता निरूपण :- ज्ञानोत्तर वृत्तीवर दृष्टि गेली असतां संधिगत ब्रह्माची विस्मृति होऊन विश्वसत्ता कशी उपजूं लागते याविषयीं सागरतरंगदृष्टांतानें विवेचन. २३५-२३६ ज्ञान झाल्यावर भक्तिपंथानें वृत्ति जाऊं लागली असतां देशप्रतीति होऊं नये म्हणून वृत्तीला सगुणमय घनरूप करण्याची प्रक्रिया व एकवटलेल्या वृत्तीला अवतारत्व . २३६ ज्ञानोत्तरवृत्तींच्या लयोत्पत्तिमध्यें होणारी कालप्रतीति व तिच्या खंडनार्थ वृत्ति सगुणमय घनरूप करण्याचा उपाय २३६-२३७ श्लोकांतील 'अद्य' पदाचा व 'भगवान्' पदाचा अर्थ. सगुण अखंड राहणें हेंच ज्ञानानंतर कालप्रत्ययखंडन, व कालद्वेष न व्हावा म्हणून भगवंताची कालरूपता. 'सोऽयम्' पदानें तत्पद अपरोक्षता व 'अस्याम्' पदानें अपरोक्ष हृदयभूमि बोधन. व्यष्टिहृदयांतील प्रेमवृत्तीलाच समष्टिहृदयांत कृष्णव्यक्तित्व व तिचें नित्यत्व. सुरद्विषांचा अभव कथन. २३७. भगवान् कालरूप म्हणण्याचें कारण. २३७-२३८ व्यष्टिसमष्टिहृदयांत श्रीकृष्ण मूर्तीची प्रेमवर्धकता सिद्ध करण्याकरितां ''निष्पादितं देवकृत्यमवशेषं प्रतीक्षते । तावद्यूयमवेक्षध्वं भवेद्यावदिहेश्वरः। (१.१३.४९) या श्लोकार्थाचें निरूपणः- दृष्टिसृष्टिवादानुसार व्यष्टि सदसन्मनोवृत्तीच्या तीव्रतेलाच देवदैत्यसमुदायादि समष्टिकार्यत्व, व प्रेमवृत्तीची तीव्रता तीच कृष्णतनु तीव्रप्रेमहरितनूपुढें तीव्रकामादिअसुरांचा (य३-४१) नाश. कामक्रोधादिक धर्मानुकूल झाले असतां तेच ज्ञानप्राप्तीला साधक होतात याविषयीं भगवद्गीतावचनाचें व मुक्तेश्वरवचनाचें प्रामाण्य व शुद्ध परमात्मभक्तीनें देव आणि असुर दोघांनांही मोक्षप्राप्ती. देवकार्यार्थ प्रभूचा अवतार होतो या मताचें सयुक्तिक खंडन व स्वानुभवानें श्रीकृष्णावताराची प्रेमवर्धनप्रयोजनसिद्धि. २३८ विरोधाभास अलंकारानें देवाचें भक्तिप्रेम हेंच प्रारब्ध व त्या प्रारब्धाची नित्यता. २३९ मूळ श्लोकांतील 'भवेद्यावदिहेश्वरः' या चतुर्थ पदाच्या अर्थाचें विवेचन, अवतारशरीराची नित्यता व निजधामगमनाची हृदयद्योतकता. 'यावत्' शब्दानें नित्यानुरागपूर्वक ईश्वरभजनबोधन. ब्रह्मनंदनोद्गाराची सप्रेम प्रणवता. प्रणवाचे कर्ममय प्रणव व प्रेममय प्रणव असे दोन भेद. कथानुसंधान :- धृतराष्ट्र विदुर व गांधारी यांच्या समवेत हिमालयाच्या दक्षिणेस सप्तश्रोत तीर्थांत राहत आहे असें नारदांचें सांगणें. सप्तश्रोत तीर्थाची उपपत्ति व मंदाकिनीस्तवन. २३९ सप्तश्रोत तीर्थांत राहिलेल्या धृतराष्ट्राच्या योगगतिवर्णनाचा उपक्रम :- २४०. ज्ञानानंतर ब्रह्मवेत्त्यांनां भक्तिमिश्र अष्टांगयोगाभ्यासाची अपेक्षा. जीवन्मुक्ति व विदेहमुक्ति यांमधील भेद व विदेहमुक्तींत भक्ति राहते याविषयीं श्रुतिवचनप्रामाण्य. प्राण स्थिर करण्याकरितां ज्ञानोत्तराभ्यसनाचें प्रयोजन. जीवन्मुक्ताला प्राण सत्त्वसंपन्न करण्याची आवश्यकता. विदेहमुक्तांची समाधी करण्याचा हेतु. २४०*

*आळंदी येथील ज्ञानेश्वर तातांच्या समाधीचें माहात्म्य, आळंदीची मुख्य तीर्थता व तातांचें जगद्गुरुत्व. २४१ तातांच्या हृदयाचें सिद्धसूर्यकांतत्व व इतर मुक्तांच्या हृदयाचें साध्यसूर्यकांतत्वकथन. प्राण सत्त्वसंपन्न केला असतां हृदय साध्यसूर्यकांत*

*होतें. प्राण सात्त्विकीकरणप्रक्रियानिरूपणः- कार्य सात्त्विक होण्याला कारण सात्त्विक होण्याची अपेक्षा. श्रुतिवचनावरून 'आप' हें प्राणाचें कारण व तीर्थांनां सात्त्विकता. विशेष सात्त्विक जीवन कोणतें याविषयीं श्रुतिप्रामाण्याची ग्राह्यता व गंगामहिमा सांगणाऱ्या ऋग्वेद श्रुतीचा निर्देष. २४१. श्रुत्यंतर्गत 'सिता' शब्दाचा अभिप्राय व गंगास्नानपानाचें व गंगेंत शरीर अर्पण करण्याचें फल, याविषयीं 'कुतो वीचिर्वीचिः' (य३-४२) या जगन्नाथ पंडिताच्या वचनाचें प्रामाण्य व तदर्थनिरूपण :- 'कुतो वीचिः' या वचनानें नरकशब्दार्थाला शशशृंगत्व. 'पीतांबरपुर' शब्दानें विष्णूचें ग्रहण २४२ 'शातक्रतवपद' शब्दानें विष्णुपदाचें ग्रहण व त्याचा 'इंद्रपद' असा अर्थ करणारांच्या म्हणण्याची अयुक्तता. २४३ याला अर्थवाद म्हणणारांनां उत्तर :- कृष्ण आणि गंगा यांचें ब्रह्मत्वेंकरून ऐक्य व हरिकीर्तन, हरिप्रसादभक्षण व गंगास्नान यांच्या योगानें शरीर, मन व प्राणाला सर्वत्र हरिरूपता २४३ गंगास्तवन - गंगापंचरत्न. २४३-४४ धृतराष्ट्राच्या भक्तिमिश्र अष्टांग योगाभ्यासाचा क्रम निरूपण व शेवटी (विद्यारण्यमताप्रमाणें ) समाधीनें सूर्यवदपरोक्षज्ञान प्राप्त होऊन त्याचें स्थाणुवत् अचल होऊन राहणें. २४४-२४५ धृतराष्ट्राच्या देहाचें लवकरच होणारें योगाग्नीनें दहन, गांधारीचा त्यांत प्रवेश व विदुराचें तेथून देशाटनास गमन याविषयीं धर्मराजाला नारदांचें सांगणे. २४५ यासंबंधी महाभारतांतील भिन्न कथेचा कल्पभेदानें समन्वय. शंकाः - ''धाता यथापूर्वमकल्पयत्'' या श्रुत्यर्थावरून प्रतिकल्पात कथाक्रम भिन्न असणें शक्य नाही. समाधान :- प्रतिकल्पांत कारणसृष्टींत साद्दश्य असून कार्यसृष्टींत भिन्न प्रकार भासतात तथापि कार्यत्वजाति नाशत नाही. भिन्न कल्पांत कथाक्रम भिन्न असूं शकतो परंतु कर्मफळांत मात्र भेद नसतो, याविषयीं धान्यमापन व वृक्षबीज द्दष्टांतानें विवेचन २४५ स्वप्नद्दष्टांतानें सृष्ट्यादिकांची मिथ्यता व अधिष्ठानज्ञानाची सत्यता. युधिष्ठिराचें सांत्वन करून तुंबुरुसह भगवान् नारदांचें हृदय स्वर्गांत अंतर्धान व अखंड सद्गुरुवचन हृदयांत धरल्यानें धर्मराजाला नित्यसुखप्राप्ती. श्री ज्ञानेश्वरप्रसादयाचनांत उपसंहार. २४६.*

*(य३-४३)*

# विदुर समागमादि वर्णन

**॥ श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरमाउली समर्थ ॥**

**॥ पद ॥**

**मानसा ! मंगल गोविंदनाम ॥ध्रु.॥**
**साठि[१] घड्यांतुनि[२] घडि तरि घ्यावें । सोडुनि संसृतिकाम[३] ॥१॥**
**अंतीं[४] राहिल जेथिल तेथचि । बांधव धन सुत ग्राम ॥२॥**
**अलकावतिपतिवचनें[५] मिळवी । रामीं[६] आत्माराम[७] ॥३॥१॥**

**॥ पद ॥**

(राग-भूप. ताल-झंपा.)

**जय भगवती सकल-दनुजगद-दलनी[८] ॥ध्रु.॥**
**अंब जगदंब[९] करुणाघने[१०] तारके[११] । तुहिन-तनु-नंदिनी[१२] शंभुरमणी[१३] ॥१॥**
**त्रिपुरसुंदरी शिवे[१४] विश्वसंमोहिनी[१५] । मद-नद-तितीर्षुणां[१६] पूर्ण तरणी[१७] ॥२॥**
**ज्ञानदेवात्मजा[१८] याचते[१९] मेऽय्युमे[२०] । नंदनंदनकरें[२१] देहि[२२] जननी ॥३॥२॥**

*(१) साठ (२) घटकेतून (३) संसाराची इच्छा (४) मरणाचे वेळी (५) श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे उपदेशानुसार (६) परमेश्वरात (७) जीव (८) संपूर्ण दैत्य कुळाचा नाश करणारी (९) जगन्माते (१०) अत्यंत कृपाळू (११) संसारातून तारणारी (१२) हिमालयाच्या कन्ये (१३) शंकरप्रिये (१४) देवी (१५) जगताला मोह उत्पन्न करणारी (१६) अभिमानरूपी थोर नदी तरून जाण्याची इच्छा करणाऱ्यांना (१७) पूर्णपणे तारणारी किंवा व्यापकनौका (१८) श्रीज्ञानेश्वरमहाराजांची कन्या (१९) प्रार्थना करिते, भिक्षा मागते (२०) (मे अयि उमे) हे उमे, मला (२१) नंदनंदन श्रीकृष्णाचे हाती (२२) दे म्हणजे श्रीकृष्ण पति प्राप्त करून दे.*

**सूत उवाच :- विदुरस्तीर्थयात्रायां मैत्रेयादात्मनो गतिम् [क] ॥ ज्ञात्वाऽगाद्धास्तिनपुरं तयाऽवाप्तविवित्सितः ॥१॥**

**॥ ओव्या ॥**

**सूत म्हणे मुनिवर्या । विदुरें प्रश्न करोनि मैत्रेया । भगवति भक्ति प्राप्त झालिया । पुसणें लवलाह्या सोडिलें ॥४॥**

तंववरीच प्रश्नोत्तर[१] । जंव हृदयीं न बैसे शार्ङ्गधर । प्रमाणयुक्तिदृष्टांतबिढार[२] । अवघें तोंवर जाणिजे ॥५॥
अगा अन्न आणि भूक । पाशीं[३] असलियाही देख ।
मग तृप्ति होईल कीं नाहीं हा निःशंक । प्रश्न करी कवण ऐसा॥६॥
तेंवी जवळी असतां सद्गुरुराय । आंगीं साधनचतुष्टय[४] । आणि हृदयीं यादवराय । मग काज[५] काय प्रश्नाचें ॥७॥
तांदूळ आणिले कोठून । ऐसे भुकेला न करी प्रश्न । पात्रीं वाढितां योग्य अन्न । करी भोजन आवडी[६] ॥८॥
तैसें सृष्टी झाली कवणेरीती[७] । हे प्रश्न न सुचती मुमुक्षूप्रती ।
गुरुमुखें महावाक्यगती । जाणोनि हरिभक्ती भगवंत होय ॥९॥
एवं विदुरें करोनि प्रश्न । हृदयीं धरोनि नारायण । मग श्रीगुरुचरणीं प्रेम ठेवून । पुसणें संपूर्ण सोडिलें ॥१०॥
(य३-२११)

॥ संस्कृत-गद्य ॥

ततस्तं[८] विदुरमागतं दृष्ट्वा बंधुभिः सह धर्मो धृतराष्ट्रो युयुत्सुः संजयः कृपः पृथा गांधारी द्रौपदी सुभद्रादयश्च हर्षेण सम्मुखं जग्मुः ।
तत आलिंगनादिभिरभिसंगम्य प्रेम्णाऽश्रूणि मुमुचुः ।
ततो धर्म आसने उपविष्टं भुक्तवंतं विदुरं पूजयित्वा प्राह ॥

*(क) श्लोकार्थ–विदुरतीर्थयात्रा करीत असता त्याला मैत्रेयापासून आत्मज्ञान झाले व आपल्याला इष्ट असलेले सर्व प्राप्त झाले आहे असा तो हस्तिनापुराला गेला.(१) प्रश्नउत्तराचा संवाद (२) प्रत्यक्षादि प्रमाण, नानाप्रकारचे तर्क व दृष्टान्त यांचा साठा (त्याचा विचार) (३) जवळ (४) शमादिसाधनसंपत्ति (५) कारण (६) प्रेमाने (७) कोणत्या प्रकाराने (८) गद्यार्थ - नंतर विदुरांना आलेले पाहून सर्व बांधवासह धर्मराज, धृतराष्ट्र, युयुत्सु, संजय, कृपाचार्य, कुंती, गांधारी, द्रौपदी, सुभद्रा, इत्यादि सर्वजण मोठ्या आनंदाने विदुरांना सामोरे गेले. नंतर आलिंगनादि भेटीचा प्रकार झाल्यावर परस्परांच्या भेटीमुळे सर्वांचे डोळ्यांत प्रेमाश्रु आलेत. विदुराचे पुढे जेवण वगैरे झाल्यावर विदुर आपल्या आसनावर स्वस्थ बसले असतांना धर्मराजाने विदुराशी बोलण्याला सुरुवात केली*

युधिष्ठिर म्हणे ताता[१]। आम्हां निजपक्षछायाऽऽश्रिता[२]। प्रभो करुणावशें[३] स्मरता[४]। कल्याण चिंतिता सर्वदा ॥११॥
दीनांचे करावया कल्याण । सृष्टीवरी समर्थ कवण? । आपणाऐसे साधुजन । वाटते संपन्न[५] मजलागी ॥१२॥
देव दीनांचे कल्याण करिती । ऐसे म्हणता नये चित्ती । देवचि दीनता[६] आणविती । फळे देती दुष्कृतांची[७] ॥१३॥
देव दुर्जनांचा द्वेष करिती । तैसी नोहे साधूंची गती । ते दुर्जनाते उपेक्षिती । इच्छा चित्ती कहीं[८] तरी तरो हा ॥१४॥
साधू द्वेषितील जरी दुर्जना । तरी कल्प कल्प नव्हे सुधारणा[९]। परी ही वृत्ती सज्जना । स्पर्शेची ना कधी ॥१५॥

॥ श्लोक ॥

'देवानामेव[१०] चरितं दुःखाय च सुखाय च । सुखायैव हि साधूनां त्वादृशामच्युतात्मनाम्' ॥ भागवत ॥

॥ गीति ॥

अल्प[११] अनुग्रह[१२] करिती देव परी केलिया सदा यजन[१३]।
नमिता एकचि वेळी दीना[१४] तारिति दर्यार्द्र साधुजन ॥१६॥

*(१) पित्याप्रमाणे आदर दाखविणारा शब्द (२) आपल्या कृपारूपी पंखाच्या छायेच्या आश्रयात राहणाऱ्यांना (३) प्रेमाने (४) आठवण ठेवता, चिंता ठेवता (५) समर्थ (६) दुःख (७) पापांची (८) कधीतरी (९) कल्याण, सन्मार्ग प्रवृत्ति (१०) देवांचे वागणेच आपल्या सुखदुःखाला कारणीभूत होते पण भगवंताचे पायी जडलेल्या साधूंचे आचरण सर्वदा लोकहिताचेच असते (११) थोडासा (१२) कृपा (१३) यज्ञादि कर्माच्या द्वारा त्यांचे सेवन (१४) दुःखी जनांना.*

॥ ओव्या ॥

नातरी सर्वस्वीं कल्याणकर्ता । म्हणिजे पिता किंवा माता । तरी हें ही न घडे सर्वथा । साक्षी[१]तत्वतां मदनुभव[२] ॥१७॥
जवळीं नसतां शेषशायी[३] । आम्ही सांपडलों लाक्षागृहीं[४] ।
आपण आधींच व्यवस्था करोनि पाही । मातेसहित[५] लवलाही सोडविलें ॥१८॥
आम्हांसाठीं आपणालागुनी । धृतराष्ट्रें दिधलें होतें काढुनी । परी तो सकलापमान साहुनी । रक्षिलें निर्वाणीं महाराजा ॥१९॥

विषादिक नाना अपघात[६] सुचवूनि[७] चुकविले समस्त ।
आपण एक नसतां येथ । (य३-२१२) तरी असतो स्वर्गात सकळ एव्हां ॥२०॥
अहो! सज्ञनांचा स्वभावचि ऐसा । दीनोद्धरणीं[८] वैष्णवी[९] ठसा । आपपरदृष्टिवळसा[१०] । नये सहसा निजमनीं ॥२१॥
वरी आपुलिया छायेतळीं । आम्हीं जाहलों अतुर्बळीं[११]। यालागीं कृपात्वें[१२]कृपा आगळी । आम्हां सरळी[१३]सांपडली ॥२२॥
इतुका वेळ आम्हां सोडुनी । गेला होतास तीर्थाटणीं । तरीं जें जें आश्चर्य देखिलें नयनीं । कृपा करोनी वद सर्व ॥२३॥
तीर्थी करोनि स्नानदान । फळ मिळविलें बहु जन्मेंकरून । तो हृदयीं नारायण । असलिया तीर्थप्रयोजन[१४]नसे ॥२४॥

॥ संमतिश्लोक ॥

'स्नातं[१५]तेन समस्ततीर्थसलिले दत्ताऽपि सर्वाऽवनी । यज्ञानां च कृतं सहस्रमखिला देवाश्च संपूजिताः ।
संसाऱ्या समुद्धृताः स्वपितरस्त्रैलोक्यपूज्योऽप्यसौ । यस्य ब्रह्मविचारणे क्षणमपि स्थैर्यं मनः प्राप्नुयात्' ॥१॥

*(१) प्रमाण (२) माझा अनुभव (३) भगवान् श्रीकृष्ण (४) लाखेच्या केलेल्या घरात (पांडवाना जाळून नाहिसे करण्यारिता कौरवांनी हे घर पांडवाकरिता तयार केले) (५) कुंतीसह (६) अरिष्टे (७) आगाऊ त्यांची सूचनादेऊन (८) दीन दुःखी लोकांना त्यांतून सोडविण्याविषयी (९) विष्णूसारखीच कृति (१०) माझा तुझा असा दृष्टीचा विषमपणा (११) अत्यंत बलवान् (१२) सर्वस्वी पूर्ण कृपा (१३) मोकळी, निःसीम (१४) तीर्थे भटकण्याचे कारण (१५) श्लोकार्थ - (ब्रह्म विचाराने) ज्यांचे परमेश्वराचे चरणाचे ठिकाणी क्षणभर कां होईना पण चित्त स्थिर झाले, त्याला सर्व तीर्थात स्नान केल्याचे पुण्य, सर्व पृथ्वीदानाचे पुण्य, हजारो यज्ञानुष्ठानांचे पुण्य व संपूर्ण देवतापूजनाचे पुण्य प्राप्त होते. त्याचें सर्व पितर उद्धरून जातात. तो त्रैलोक्यात पूज्य होतो.*

॥ ओव्या ॥

मग जे कां निखिल[३] साधुजन । तीर्था जावया काज कवण । परी होतसे सज्ञनांचें दर्शन । तेणें भगवान खेळत ॥२६॥
<u>व्यष्टिहृदयीं[४] प्रादेशमात्रमूर्ती[५]। तोचि झालिया सत्संगती ।</u>
<u>समष्टिहृदयीं[६]त्रैलोक्यकीर्ती[७]। घनश्याम मूर्ती पुढें ठाके[८] ॥२७॥</u>
अथवा ब्रह्म जें एक कळलें । आणि जीवन्मुक्तपणें प्रारब्ध उरलें ।
तेंही शब्दें[९] ब्रह्म केलें । जें मिळणें जाहले सत्समुदायीं ॥२८॥
आपुलिया प्रारब्धभोगेंकरून[१०] । जरी उद्धरतील[११] ममुक्षुजन ।
तरी उगेंचि धरोनि मौन । सेवूनि सदन[१२] कां राहावें? ॥२९॥
लोकांची तीर्थी श्रद्धा अत्यंत । मार्ग[१३]न मिळे म्हणोनि तेथ ।
मुमुक्षूही येती बहुत । ते उद्धरती संतउपदेशें ॥३०॥ (य३.२१३)

*(१) जरूरी (२) सत्पुरुषाच्या योगाने तीर्थांना तीर्थपणा, कर्मांना सत्कर्मपणा व शास्त्रांना सत्शास्त्रपणा येतो (३) पूर्ण (४) प्रत्येक जीवाच्या हृदयांत (५) अंगुष्ठा एवढा (६) हिरण्यगर्भाचे हृदयात (७) तिन्ही लोकात ज्याची कीर्ति आहे (८) प्रगट होतो (९) संताच्या उपदेशरूपी शब्दाने (१०) प्रारब्ध भोगीत असता (११) उद्धरू शकतात (१२) घरी बसून कां राहावे (१३) ईश्वरप्राप्तीचे साधन.*

यालागीं आपणा ऐसें सुजन । नित्य करिती तीर्थाटण । जो सर्वदा परोक्ष[१]भगवान । तो तीर्थी अपरोक्ष[२]तुह्मी जातां ॥३१॥
''संतीं[३] वसविला गांवो । तोचि पुण्य[४] पवित्र ठावो''
- असें एका प्राचीन संताचें वचन आहे.
तैसें आणखी एक आहे पुसणें । जें तुम्हांस अवश्य ज्ञात असणें[५]। जयाचिया प्रेमपाल्हाणें[६]। होत पाळणें[७] विश्वाचें ॥३२॥
तो जगन्मोहन[८] यदुपती । द्वारकाधीश[९] कृपामूर्ती । आपुलिया हृदयीं वस्ती । व्यक्ताऽव्यक्त[१०]स्थिति करी ॥३३॥
यालागीं द्वारकेंत तो श्रीहरी । नांदताहे कवणेपरी । संवेष्टित[११] यादववीरीं । देखिला काय सांगा हो ॥३४॥
एवं युधिष्ठिराचे प्रश्न । विदुरें समग्र ऐकोन । उत्तरें दिधलीं क्रमेंकरोन । अंत्य[१२] प्रश्न गाळोनी ॥३५॥
सकळांचें प्रिय करावया समग्र । कांही दिवस राहिले विदुर । धृतराष्ट्ररायाप्रति साचार । शुद्धोपदेश[१३] करितची ॥३६॥

॥ गद्य ॥

शिष्य :- **ननु 'शूद्रयोनावहं [१४] जातो नातोऽन्यद् वक्तुमुत्सहे'** (महाभारत उद्योगपर्व.) येथें विदुरानें उपदेश करण्याचा

अधिकार नाहीं म्हणून कबूल केलें असून प्रस्तुत उपदेश केला; या दोन्ही वाक्यांचा परस्पर विरोध आहे.

श्रीगुरु :- ऐक. तुझ्या म्हणण्याप्रमाणेंच -

**'वर्णानां ब्राह्मणो गुरुः'** [१५] **'अंत्यादपि[१६] परं धर्मं'**

*(१) अनुमानाने कळण्याजोगे, नुस्ता अस्तित्वमात्र (२) अंतःकरणात भरलेला (३) संत जेथे राहतात (४) तेच पुण्य क्षेत्र होय (५) समजलेले (६) प्रेमदृष्टीने अवलोकन केल्याने (७) पालन (८) जगाला मोह पाडणारा किंवा त्रैलोक्यसुंदर (९) द्वारकेचा राजा (१०) सगुणनिर्गुणरूपाने (ज्ञानामुळे निर्गुण व ध्यानाने सगुण) (११) सहवर्तमान (१२) शेवटला (१३) निर्मळ, यथार्थ उपदेश (१४) मी शूद्रजातीत उत्पन्न झालो असल्यामुळे मी उपदेश करू शकत नाही (१५) सर्व जातींचा ब्राह्मण हाच गुरु म्हणजे उपदेशक होय.(१६) चांडाळापासूनही परमधर्म शिकावा.*

या दोन स्मृतींचाही विरोध येतो. परंतु ह्याचा समन्वय असा आहे कीं, ज्याप्रमाणें अत्यंत तृषाक्रांत[२] झालेल्या पुरुषाला नादेय[३] किंवा वापेय[४] या जलाविषयीं[५] पूर्तकृतिवाक्य[६] निषेध[७] करूं शकत नाहीं, तद्वत् अत्यंत तीव्र मुमुक्षूला देहाभिमानीबोधक[८] वर्णाश्रमविषयक[९] वाक्य निषेध करूं शकत नाहीं.

आतां, विदुराच्या दोन वाक्यांत जो तूं विरोध दाखविलास, त्याचा वास्तविक परिहार तर असा आहे, जोपर्यंत वास्तविक मुमुक्षा[१०] उत्पन्न होत नाहीं, तोंपर्यंत जवळच्या मनुष्यांनीं (य३-२१४) केलेला बोध केव्हांही पटत नाहीं. त्यांत मी तर जाणूनबुजून ह्यांच्याहून लहान असून शूद्रयोनींत उत्पन्न झालों आहे, आणि हाही धर्मवेत्ता असून पुत्रमोहानें ग्रस्त झाला आहे; म्हणून या वेळीं हा माझें वाक्य ऐकणार नाहीं. बरें, ह्याला नाहीं सांगत म्हटलें तर पांडवांपेक्षां ह्याचा माझें ठिकाणीं प्रेम कमी आहे, असें वाटेल. म्हणून धर्मशास्त्रानुसारेंच आतां उत्तर देणें भाग आहे. अशा अभिप्रायानें प्रथम वाक्य विदुरानें उच्चारिलें; व नंतर सनत्कुमारांचें ध्यान करून त्यांच्याकडून त्याला बोध करविला. परंतु आतांची धृतराष्ट्राची स्थिती तशी नाहीं. सर्व पुत्र मृत्युमुखीं पडून, ज्यांच्यावर आपण विष व अग्नीसारखे भयंकर प्रयोग केले, त्यांच्याच हातून आपल्याला तुकडा खावा लागतो; व भीम वरच्यावर कुत्सित शब्दांनीं टोचीत असतो; यामुळें संसारांत जें दुःख असतें, त्याचा त्याला अनुभव आला आहे; व त्यामुळेंच आतां मला कोणी तरी ज्ञानोपदेशकर्ता मिळावा, ही मुमुक्षाही तीव्र होणें साहजीक आहे. म्हणूनच विदुरांनी उपदेश केला.

*(२) तहानेल्या (३) नदीच्या (४) विहिरीच्या (५) पाण्याविषयी (६) पूर्वकर्मविषयक वचन म्हणजे परोपकारार्थ विहीर बांधणाऱ्याच्या विहिरीचे पाणी पिऊं नये कारण पुण्य क्षीण होते (७) प्रतिबंध, निवारण (८) ज्याच्या ठिकाणी देहाचा अभिमान आहे त्याला उद्देशून असलेले (९) चार आश्रमाचा अभिमान बाळगणाऱ्याला उद्देशून असलेले (१०) संसारातून पार पाडण्याची खरी तळमळ.*

अतः, पूर्वोत्तरवाक्यांचा विरोध नाहीं. शिवाय, विदुर हा भगवान् यमधर्मच होता. तो मांडव्य ऋषीच्या शापानें शूद्रयोनींत उत्पन्न झाला असतां, पापी लोकांनां दंड देण्याचें काम अर्यमानामक पितर करीत होता. म्हणून त्या महापुरुष विदुराचें चित्त वर्णाश्रमादिसंस्कारनिमित्तक अल्पभावनाभिभूत[१] नव्हतें. याही दृष्टीनें त्याला उपदेशकाधिकार[२] आहे.

शिष्य :- तात ! मला आतां शंका राहिली नाहीं. परंतु धृतराष्ट्राला उपदेश कसा केला, तो ऐकण्याकरितां श्रवण उत्सुक आहेत. आपल्या कृपामृताचें[३] प्राशन[४] करीत होत्सातां तृप्ती मानणाराही मी अभाग्यवान[५] समजतों. कारण, **'आसुप्तेरामृतेः[६]कालं नयेद्वेदांतचिंतया'** या श्रुतीवरून सर्वदा वेदांतश्रवण[७] विहित आहे; आणि **'श्रवणं गुरुशास्त्राभ्याम्'** या वार्तिकावरून अर्थातच गुरुसमागमही[८] विहित[९] आहे. हे दोन्हीं सोडून देऊन एक वेळ वेदांत श्रवण करून ब्रह्मज्ञानानें तृप्ति मानली असतां रसास्वाद[१०] विघ्न उत्पन्न होते. कारण, एकवेळ झालेल्या ब्रह्मज्ञानानें जी तृप्ति होते, ते ब्रह्मज्ञानच पुनः नको, म्हणजे ब्रह्मानंदाचेंच ठिकाणीं अलंबुद्धि[११] झाली म्हणावयाची. वारंवार विषयसुख ग्रहण करूनही तेंच तें विषयी पुरुष (य३-२१५) पुनः ग्रहण करीत असतात. तद्वत् ब्रह्मानंदाचें ठिकाणीं नवी[१२] नवी रुचि घेणें हेंच जीवन्मुक्तीचें रहस्य[१३] आहे. अन्यथा, विषयानंदापेक्षांही[१४] ब्रह्मानंद नीच[१५] होऊं लागेल. तात म्हणतातः-

*(१) मी अमुक वर्णाचा किंवा अमुक माझा आश्रम असा जो संस्काराभिमान, त्यामुळे होणाऱ्या संकोचित भावनेने ग्रासलेले (२) उपदेश करण्याचा अधिकार (३) कृपारूपी अमृताचे (४) पान (५) दुर्भागी (६) उठल्यापासून निजेपर्यंत व जन्मल्यापासून मरेपर्यंत वेदान्ताचे चिंतनात काळ घालवावा (७) आत्मस्वरूपाचे जे श्रवण करावयाचे ते गुरु व शास्त्र यांच्या द्वारा करावे (८) गुरूचा सहवास (९) शास्त्राने करावयास सांगितला आहे (१०) प्राप्तीचा आनंद मानणे, आपल्या ठिकाणी धन्यता,*

*कृतकृत्यता मानणे (११) पुरे झाले असे वाटणे (१२) अवीट (१३) वर्म (१४) विषयातील सुखापेक्षाहि (१५) कनिष्ठ*

'पढियंते[१] सदा तेंचि । परी भोगीं नवी रुची । म्हणोनि हा उचितुचि[२] । अनुवादु[३] सिद्धु ॥१॥'(अमृ.१०.१०)

आचार्य उवाच :-

पुढें काळ बहु अनिष्ट । विदुर जाणोनिया स्पष्ट । एके समयीं प्रबोधगोष्ट[४] । उचित[५] वचनें[६] बोलतूं ॥३७॥

॥ पद ॥

विदुर म्हणे कुरुराया । आलें भय[७] हें नयनीं दिसे । अझुनि कां जडलें तुज भवपिसें[८]? ॥ ध्रु. ॥
गेले तव नंदन[९] दशदश[१०] जे तरुणपणीं कनकसे[११] । अझुनिया उमजे[१२] ना हें कसें? ॥
आठवुनी तव विगुण[१३] भीम तुज वाटे तें वदतसे । खासि तूं देति अन्न ते तसें ॥
यत्न करुनि यन्निराकरण[१४] नच होये कवण्या मिषें[१५] । अझुनि कां जडलें तुज भवपिसें । विदुर म्हणे० ॥१॥
जननि[१६] जनक बंधू ज्या काळें नेलें ओढुनि किती ॥ तोचि हा नेइल आपणांप्रती ।
एकांती हरिभजनावांचुनि न चुके याची[१७] गती[१८] । केलिया सुरवरजनसंगती[१९] ।
ज्ञानेश्वरप्रभुवचन मनोहर[२०] मेळवि[२१]चितिसुखरसें[२२] । अझुनि कां जडलें तुज भवपिसें ? ॥ विदुर म्हणे० ॥२॥

॥ संमतिश्लोक ॥

'जन्मदुःखं जरादुःखं नित्यदुःखं पुनःपुनः ।[२३] संसारसागरे दुःखं तस्माज्जागृहि जागृहि ॥१॥

*(१) आवडीचे (२) योग्य (३) तेच ते बोलणे (४) ज्ञानोपदेश (५) योग्य (६) शब्दाने (७) मृत्यु (८) संसाराचे वेड (९) पुत्र (१०) शंभर (११) सोन्यासारखे (१२) कळत (१३) द्वेषाने केलेले अपकार (१४) ज्याचे परिमार्जन (१५) निमित्ताने (१६) आईबाप (१७) काळाची (१८) आक्रमण (१९) स्वर्गातील श्रेष्ठ देवांची (२०) सुंदर (२१) प्राप्त करून देते (२२) चेतन्यानंदाला, ब्रह्मानंदाला (२३) श्लोकार्थ - जन्माचे दुःख वृद्धापकाळचे दुःख असे सारखे दुःखापाठी दुःख येत असते याप्रमाणे संसारसागरांत दुःखावाचून काही नाही हे जाणून अरे! जागा हो जागा हो*

येच विषयीं संतवाणी[१] । तीचि आणोनि प्रमाणीं[२] । कांही तरी बोध मनीं । श्रोते सज्जनीं ठसों द्यावा ॥३९॥

॥ कटाव - अमृतराय ॥

सज्ज्न हो ! निजगुण[३] आपुलें उमजाना[४] । हरिलागीं भजा ना ॥ध्रु. ॥
नऊ मास गर्भांत सांपडे, मूत्रमलादिक फार सांकडे[५],
तनुसि[६] तोडिती जंतू कीडे, बहु श्रमानें बाहेर पडे,
स्मरण मुळीचें सर्व विसरला, (य३-२१६) सोहं[७] कोहं रडूं लागला,
दिवसा मासा वृद्धि पावला, क्षणक्षणा अपघात[९] चूकला,
धनमदगर्वें[१०] फार दाटला[११] अहंपणाचा[१२] पूर[१३] लोटला,
पांचा विषयामाजि बाटला,[१४] पापाचरणें मनीं काटला,[१५] भला थाटला,
संसार अपार, थोर करितो कारभार, महाल मुलुख जाहागीर इजारा,
कमाविसदारी, भारि पसारा, सावकारी, हत्ती घोडे सैन्य शिबीका,
बा पोशाख कानिं चौकडा, सुंदर वनिता[१६] प्रिया नवोढा[१७],
शहाणपणाचा गर्व गाढा,[१८] मनसोब्याचा[१९] करी निवाडा,
वाडा रंगित रंगमाहाल, सोनेरि बैठका,
जरी भर्जरी तमाम ऐने, काम मुलायम,
फिरंगाणि बिल्लोरि फाणसें, मिनेगारि किनखापी पडदे, खणोखणीं रेशमी गालिचे, बागबगीचे,
रागरंगामधिं गुंग बेटा, निसंग मोठा, अभिमानाचा चढला ताठा,

*(१) सज्ज्नाची उक्ति (२) प्रमाण मानून (३) स्वस्वरूपाचे वर्म (४) जाणून घ्या (५) कष्ट (६) शरिरास (७) ब्रह्म मी आहे असे म्हणणारा किंवा ब्रह्मरूप असलेला (८) मी कोण आहे म्हणजे आपल्या स्वरूपाचा विसर पडून (९) मृत्यु (१०) संपत्तीचा व तारुण्याचा गर्व (११) भरला (१२) अभिमानाची (१३) भयंकर वृद्धि (१४) भ्रष्ट झाला (१५) मन खात असलेला (१६) स्त्री (१७) नवीन लग्न करून आणलेली (१८) अति (१९) मसलती, भांडणतंटे.*

**जार चोरटा उन्मत्त खोटा, धर्माविषयीं फार करंटा[१],**
**त्याच्या बंधुनि धरिल्या वाटा,[२] अग्नी तस्कर करिति चपेटा[३], आटापीटा,**
**राजदंड उदंड उदेले, भंड निघाले, लंडपणें प्रचंड भोगिले,**
**परोपरीची छीथू अवघी, मारामारी, जेरबंद, कडाकड सोटे मारी,**
**कमचा पाठीं उडती भारी, या या परिचे जाच शरीरीं, हृदयीं मस्तकिं शीळा भारी,**
**ओढितां जड खोडा बेडी, पायिं रोकडी प्राप्त देहुडी,**
**तरि येईना कबूल कवडी, अधिकारी घरदार सावडी,**
**सर्वहि नेलीं घोडीं पीडीं, उरली नाहीं एकहिं कवडी,**
**पहिली होती बिनी वांकडी, शालजोडिला शेला जोडी,**
**देव द्विज गुरु तडी[४] तापडी, त्यांसी क्रोधें फार झडाडी,**
**ईश्वर त्याची मस्ती मोडी, आतां कैची उप्पर माडी,**
**देशधडीवर[५] गुढी[६] लाविली, दुष्कर्मांचीं अभ्रें दाटलीं,**
**पहा! पहा रे! डोळे उघडुनि, पुढें यातना यमलोकीच्या,**
**नानापरिच्या जाणोनि येथेंचि कां सावध व्हाना ॥**
**हरिलागि भजाना ॥ सज्जनहो ! निजगुण ० ॥**

**॥ गद्य ॥**

धृतराष्ट्र :- भगवन् ! आपण प्रयत्नानें सर्वच निराकरण[७] होतें म्हणतां, आणि ह्या काळाची कोणाकडूनच प्रतिक्रिया[८] होत नाहीं असें म्हणतां, हें काय?

विदुर :- राजा ! ज्यांचे विषय संपूर्ण नाहींसे झाले आहेत, जे ब्रह्मज्ञानी असून रस[९] किंवा योग[१०] ह्याच्या योगानें ज्यांनीं हरगौरीसृष्टीतील[११]

*(१) कृपण (२) मार्ग, अलग झाले (३) थपडा देतात (४) अति संतापी (५) सर्व नाशावर (६) झेंडा लावला - सर्वस्वी सत्यानाश झाला असा अर्थ (७) बदलता येते, प्रतिबंध नाहीसे करिता येतात (८) विरोध जिंकण्याची क्रिया (९) आयुर्वेदातील पारदसंस्करणाने (१०) क्रियायोग (११) पारा हा शिवाचे वीर्य असून गौरीसमागमाचे वेळी तो स्खलन पावला. या पाऱ्यावर रसशास्त्रात सांगितल्याप्रमाणे संस्कार करून त्याचा चंचलपणा नष्ट करावयाचा व ध्यानाने त्यातील जीवतत्व जे आहे ते मात्र नष्ट होऊ द्यावयाचे नाही. अशा प्रकारे पारा तयार झाला व त्याचे सेवन केले असता पुरुष वज्रदेही बनतो. त्या देहावर मृत्यूचा अंमल चालत नाही. तो देह कल्पकल्पपर्यंत टिकतो.*

(य३-२१७) नूतन[१] देह उत्पन्न करून घेतला आहे, त्यांच्या काळाचें प्रयत्नानें हरण[२] होतें, असें कदाचित् मी म्हणेन; परंतु तुझ्यासारख्या 'वर बुक्की व खालीं ग्रास[३]' अशा परिस्थितींत पुत्रासाठीं झळफळत[४] असणाऱ्या विषयांधाचाही[५] काळ[६] हरण होईल, असें मात्र मी म्हणत नाहीं. पुनः, रसादिकप्रयोगानें[७] हरगौरीसृष्टींतील मिळालेला देहही येथील प्रारब्ध क्षीण झाल्यानें क्षीण[८] झालाच पाहिजे. अन्यथा[९], एक हरगौरीसृष्टींतील मिळालेला देह नित्य, आणि ब्रह्म नित्य, अशी द्वैतापत्ती[१०] होईल.

आतां, सर्वच ब्रह्म आहे अशी शंका करशील तर ग्रहणत्यागादिक[११] क्रियाही ब्रह्मच असल्यामुळें त्यागक्रिया[१२] प्रतिकूल[१३] आणि ग्रहणक्रिया[१४] अनुकूल[१५] असें मानणें तुला ब्रह्मनिष्ठाच्या दृष्टीनें शोभत नाहीं.

पुनः, प्रारब्ध ज्याप्रमाणें मनुष्य आपल्या व्यष्टिकर्मानें[१६] तयार करितो, तद्वत् काळ हा व्यष्टिस्थितीनें[१७] तयार झालेला नव्हे, तर तो समष्ट्याविर्भावासह[१८] भगवन्नियतिरूपच[१९] झाला असल्यामुळें व्यष्टिप्रयत्नानें[२०] त्याचें हनन[२१] होणें दुस्तर[२२] आहे. म्हणून ब्रह्मज्ञानही व्यष्टि प्रयत्नानें[२३] होणें नाहीं, असें मात्र म्हणूं नको. कारण, व्यष्टि[२४] समष्टि[२५] हे दोन्ही भ्रमरूप[२६] असून आपल्या व्यावहारिक[२७] किंवा प्रातिभासिक[२८] सत्तेंतच

*(१) नवीन (२) कालाच्या सत्तेचा नाश, मृत्यूचे निराकरण (३) घास (४) शोक करणाऱ्या (५) विषयात अत्यंत आसक्त असणाऱ्याचा (६) मृत्यू चुकेल (७) संस्कृत = (आयुर्वेदीय पारा शुद्धिकरणाचा संस्कार) अशा पारदाच्या सेवनाने (८) नाहीसे झाल्याने (९) नाहीतर (१०) द्वैत मानणे भाग पडेल (११) स्वीकारणे व सोडणे (१२) सोडणे (१३) नावडती (१४) स्वीकारणे*

*(१५) आवडणारी (१६) एका व्यक्तीच्या कर्माने (१७) एकाद्या जीवाच्या अपेक्षेने (१८) संपूर्ण सृष्टीच्या अभिव्यक्तिबरोबर (१९) ईश्वराच्या संकल्परूपाने (२०) एकाद्या जीवाच्या प्रयत्नाने (२१) नाश (२२) अत्यंत कठीण (२३) एकट्या जीवाच्या प्रयत्नाने (२४) एका देहाचा अभिमानी (२५) संपूर्ण ब्रह्मांडाचा अभिमानी (२६) खोटे, भ्रमाने भासणारे (२७) व्यवहार दशेतच संसार सत्य वाटतो तोपर्यंतच म्हणजे ब्रह्मज्ञान होईपर्यंत (२८) कोणी वेदान्ती सृष्टीची व्यावहारिक सत्ता मानतात म्हणजे ब्रह्मज्ञान होईपर्यंत सृष्टि सत्य आहे म्हणतात व कोणी वेदान्ती सृष्टीची प्रातिभासिक सत्ता मानतात म्हणजे सृष्टि जेव्हां भासते तेव्हां आहे व भासत नाही तेव्हां ती नाही*

ते निग्रहानुग्रह[१] करण्याला समर्थ आहेत. परंतु चैतन्य हें व्यष्टिसमष्टीचें समान[२] अधिष्ठान असून, रज्जुसर्पपुच्छाचें[३] ठिकाणीं जरी रज्जुज्ञान[४] झालें तरी जशी सर्व सर्पाची विनिवृत्ति[५] होते, तद्वत् व्यष्ट्यधिष्ठानज्ञानानेंच[६] ससमष्टिप्रपंच[७] विनिवृत्ति होते. येवढ्याकरितांच संसाराकरितां प्रयत्न करणें दुस्तर असून, परमार्थाकरितां प्रयत्न करणें सुलभ असल्यामुळें तूं वैराग्य धारण कर

**तरि झडझडोनि[८] वहिला[९] निघ । इये भक्तीचिये वाटे लाग । जिया पावसी अव्यंग[१०] । निजधाम हरीचें[११] ॥ ज्ञाने.**

*(ही ओवी ज्ञानेश्वर महाराजांची असून, संदर्भाकरितां 'हरीचे' हा शब्द घातला आहे)*

**असो, परमार्थी[१२] विरक्ती[१२] नाहीं तुज । परी संसारींही न दिसे लाज ।**
**श्वानवृत्ति[१३] धरोनि काज । पोटाचें पाहसी ॥४०॥** (य३-२१८)
**अरे ! जिया पांडवाप्रती । लाक्षागृहीं घातलें निश्चिती । विषाचे लड्डू भीमाप्रती । करूनी दीधलें ॥४१॥**
**धर्म द्यूतांत हरतां जाण । त्वांही पुसिलें काय जिंकिलें म्हणोन ।**
**त्यांचेंचि आवडी भक्षितां अन्न । न लाजे मन कांहीं तुझें ॥४२॥**
**ज्ञानें अथवा वैराग्यगुणीं[१४] । लाजेनें अथवा भयेंकरोनी । आवडी भजतां शार्ङ्गपाणी । पावसी निर्वाणीं[१] निजसुख[२] ॥४३॥**

*(१) प्रतिबंध व साह्य (प्रतिकूल व अनुकूल) (२) सारखे (३) दोरीवर भासणाऱ्या सर्पाच्या शेपटीचे ठिकाणी (४) दोरीचा प्रत्यय अनुभव (५) नाश (६) एका देहाचा अभिमान धारण करणारा जो जीव, त्याच्या अंतर्यामी असणाऱ्या ब्रह्मचैतन्याचे ज्ञान झाले असता (७) ब्रह्मांडाचा अभिमान धारण करणाऱ्या समष्टिजीवांसह संपूर्ण प्रपंचाचा नाश होतो (८) सर्व सोडून (९) अगदी (१०) अविनाशी पूर्ण (११) ही ओवी श्रीज्ञानेश्वरमहाराजांची असून तीत 'माझे' असे पद आहे पण संदर्भाकरिता म्हणून येथे 'हरीचे' हे पद घातले आहे (१२) परमार्थाच्या आवडीने विषयाचा द्वेष (१३) कुत्र्यासारखे पोट भरणे (१४) वैराग्य होऊन.*

**पावसी निर्वाणीं[१] निजसुख[२] ॥४३॥**
**ऐसेंही असोनि राया । तुज जरा[३] प्राप्त जाहालिया । जीविताची आशा वाया । न सुटे अझोनिया आश्चर्य ॥४४॥**
**मंडुक[४] गिळतां फणिवरें[५] । आशा तयाचिया अंतरें[६] ।**
**कीं मी सुटोनि जाईन कवण्याप्रकारें । स्थिति[७] निर्धारें[८] तैसी तुझी ॥४५॥**
**जो जन्मतांचि जाण । जिंकोनियां इंद्रियगण[९] । हृदयीं चिंती नारायण । तो एक धन्य महीवरी[१०] ॥४६॥**
**पुढें आपणा गिळेल काळ । यास्तव ज्ञानार्थ उतावेळ । अहर्निशीं गुरुसाठीं तळमळ । तो एक धन्य महीवरी ॥४७॥**
**विषयसर्पे[११] देतां मिठी[१२] । तडफडी सुटावयासाठीं । क्षणोक्षणीं बाहे जगजेठी । तो एक धन्य महीवरी ॥४७॥**
**तरुणपण गेलियापाठीं । जराग्रस्तां[१३] कैंचा जगजेठी । यालागीं आधींच सावध पोटीं । तो एक धन्य महीवरी ॥४९॥**
**बाळपणीं न लगतां संसार । तंव ही वासना अतिदुस्तर । मग लागलिया स्त्रीपुत्रादिसंसार । कदापि साचार सुटेना ॥५०॥**
**ऐसा विचार करोनि मनीं । तीव्र चिंता दिवसरजनी । कोण तारेल भवांतुनी । तो त्रिभुवनीं अति धन्य ॥५१॥**
**अनंत जन्मीं विषयप्राप्ती । झालियाही नाहीं तृप्ती । कंटाळला म्हणे भोगू किती । तो महीवरुती अति धन्य ॥५२॥**
**तनू[१४] रोड[१५] झाली स्त्र्यादिपोषणें[१६] । परी यमगृहीं मज एकले जाणें ।**
**यास्तव आधीच सावध होणें । ऐसें धरी मनें तो धन्य ॥५३॥**
**संसार करोनी आटलें रक्त । परी दुःख वाटोनी न घेती किंचित ।**
**यास्तव स्मरावा जगन्नाथ । ऐसा विरक्त तो धन्य ॥५४॥**
**मायाकल्प[१७] संसार कोटी[१८] । अवचितां झालिया संतभेटी ।**

मानी कंचनदिनी[१९] अमृतदृष्टी[२०] । ब्रह्मांड पोटीं धन्य तो ॥५५॥
स्त्री गणिका[२१] कीं पतिव्रता । येथ श्रद्धाचि ठेविती तत्त्वतां । मग ईश्वरावरी श्रद्धा ठेवितां । लाज चित्ता कां वाटे? ॥५६॥

*(१) शेवटी (२) आत्मसुख (३) म्हातारपण (४) बेडूक (५) सापाने (६) मनात (७) गति (८) निश्चित (९) इंद्रियसमूह (१०) भूमीवर (११) विषयरूपी सर्पाने (१२) आलिंगन (१३) म्हाताऱ्याला (१४) शरीर (१५) कृश (१६) स्त्रियादिकांचे पोषण करता करता (१७) मायिक, भ्रमजन्य (१८) संसारमध्ये (१९) सोन्याचा दिवस (२०) अमृतासारख्या प्रेमळ कृपादृष्टीने (२१) व्यभिचारी.*

चालणार नाहीं संसार । यास्तव श्रद्धेनेंचि पाळी निजदार[१] । तैसा श्रद्धेनें परमेश्वर । मी पाळीन हें अंतर धन्य ॥५७॥
(य३-२१९) जंव जंव आपुलें आयुष्य वाढे । तंव तंव काळ समीप जोडे ।
हें जाणोनि सोडी वैभव रोकडें । तो उत्तम तो अतिधन्य ॥५८॥
अनंत[२] जन्मीं फसविणार । ते लाथ मारोनी सारी दूर ।
नयनजळें[३] न्हाणी शार्ङ्गधर । देऊनि करीं[४] कर तो धन्य ॥५९॥
आपुलिया बुद्धि वैराग्यसंपन्न । आत्माकार वृत्ति करी होऊन । हृदयीं धरी नारायण । त्रिभुवनीं पूर्ण तो धन्य ॥६०॥

॥ पद - तुकाराम महाराज ॥

येथें कोणाचें काय बा गेलें । ज्याचें त्यानेंच अनहित[५] केलें ॥ध्रु०॥
संतीं सांगितलें ऐकेना । स्वतां बुद्धीही असेना ।
वृत्ति निबरली[६] पीकेना[७] । मूढ कोणाचें ऐकेना ॥ येथें कोणाचे० ॥१॥
अन्य यातिचे[८] संगतिं लागे । साधुजनांमध्यें न वागे ।
केल्यावीण पराक्रम सांगे । जेथें सांगे तेथेंचि भीक मागे । येथें० ॥२॥
नीत टाकुनि अनीत चाले । भडभड भलतेंच बोले ।
मंद होउनी उन्मत्त डोले । अखेर फार वाईट झालें ॥ येथें० ॥३॥
तुका म्हणे कांहीं नेम । चित्तीं न धरी अधम ।
सांग पडलासे भ्रम । अंतिं कुटील त्यासी यम । येथें कोणाचे० ॥४॥

॥ ओव्या ॥

तूं माझा सुहृत्[९] म्हणोनी । मी उपदेशितों कळवळोनी । तूं नायकसी जरी कानीं ।
तरी उपदेश निर्वाणीं[१०] करितसे ॥६४॥
आणि मी यमचि आहे म्हणोन । मज प्रत्यक्ष कळे दंड शासन । यालागीं तुझें कर्म गहन । भज नारायण झडकरी ॥६५॥

*(१) आपल्या स्त्रियेला (२) अनंत जन्मामध्ये फसविणारे स्त्रीपुत्रादिक (३) प्रेमाश्रुंनी (४) देवाच्या हाती आपला हात देऊन (५) अकल्याण (६) दृढ झाली; निर्ढावली (७) मृदू होत नाही (८) जातीचे (९) आप्त (१०) शेवटचा*

मी यमराज तूं गंधर्वपती । पूर्वजन्मसंबंध[१] नसतांही निश्चिती । अवचिता तुज सुहृत्प्राप्ती[२] । झाली यास्तव बोध ऐके ॥६६॥
गृहदार सोडोनि वीरेशा । जवळी घेवोनि हृषीकेशा । तत्काळ जाईं उत्तरदिशा । ब्रह्माभिलाषा[३] वागवुनी ॥६७॥
स्वार्थरूप[४] ही तनू सकळ । केव्हां गिळोनि टाकील काळ । यालागीं होईं उतावेळ । श्रीगोपाळ मिळावया ॥६८॥
तो अजमीढवंशीं राजशार्दूल । प्रज्ञाचक्षूचि[५] केवळ । दोन्ही पक्षीं पाहतां प्रबळ । सिद्धि[६] ज्याची ॥६९॥ (य३-२२०)
प्रगत ज्ञानवयसा[७] । पूर्वी प्रज्ञाचक्षू[८] सहसा । तोचि प्रकृष्टज्ञानचक्षू[९] ऐसा । विदुरोपदेशें सहसा जाहला ॥७०॥
डोळे कान दाबोनि पाहणें रंग । हा चर्मचक्षूंचा[१०] सोडोनि योग ।
भक्ति ज्ञान आणि विराग । प्रज्ञाचक्षुयोग[११] धरियला ॥७१॥
मग हा माझा बंधु लहान । न वागावें याच्या उपदेशाप्रमाणे । हा सर्व सांडोनि अभिमान । झाला गमन करिता तो ॥७२॥
मग ती गांधारी प्रतिव्रता । पति मोक्षमार्गी जातां । होवोनि संगपरित्यक्ता[१२] । बरोबरी तत्वतां निघाली ॥७३॥
यद्यपि धर्मार्थ आणि काम । स्त्रीपुरुष मिळोनि होती परम । मोक्षमार्गी तंव सुगम । आपआपला अधिकार ॥७४॥
तथापि वानप्रस्थाश्रम जोंवरी । मैथुनवर्ज्य[१३] वनितासहाधिकार[१४] तोंवरी ।
क्षत्रियां वानप्रस्थविधि निर्धारी । म्हणोन गांधारी सवें गेली ॥७५॥

**इकडे मित्रप्रिय[१५] करूनी । अग्निहोत्रादि सारोनी[१६] । ब्राह्मणांतें नमन करूनी । गुरुवंदनार्थ[१] सदनीं धर्म आला ॥७६॥**

*(१) पूर्वजन्मीचा कांही आप्तसंबंध (२) कांहीएक मोबदल्याची अपेक्षा न करिता अकारण आपल्या कल्याणाची चिंता करणारा सुहृद् म्हटला जातो. त्याची प्राप्ति (३) ब्रह्मप्राप्तीची इच्छा धरून (४) प्रेमाचा विषय त्याला अर्थ म्हणतात. सर्वस्वी प्रेमाचा विषय (५) ज्ञानदृष्टि आहे असा (६) थोरपणा (७) ज्ञान संपादन करण्यात ज्याचे एवढे मोठे आयुष्य गेले, त्यामुळे (८) विवेकसंपन्न (९) अत्यंत विवेकसंपन्न (१०) लौकिक डोळ्यांचा (११) ज्ञानदृष्टीचे साधन (१२) सर्वसंग सोडला आहे जिने (१३) स्त्रीसंगवर्जित (१४) स्त्रियेला बरोबर ठेवणे (१५) (स्नेह्यांचे हित) सूर्याला अर्घ्य देवून (१६) आटोपून.*

**गुरुवंदनार्थ[१] सदनीं धर्म आला ॥७६॥**

**तंव पितर[२] विदुर धृतराष्ट्र दोन्ही । आणि गांधारी पतिव्रता जननी । न पाहोनियां आपुलिये नयनीं ।**

**खिन्न मनीं अति झाला ॥७७॥**

**मग अति उद्विग्न अंतर । संजयास म्हणे नृपवर । कोठें गेले धृतराष्ट्र विदुर । कोठें गांधारी पतिव्रता ॥७८॥**

**तयाचे बंधू पुत्र पावले मरण । आणि अन्याय झाला कीं काय आम्हांकडून ।**

**म्हणून तिहीं गंगेत प्राण । दीधला काय तो सांगे ॥७९॥**

**आमुचा पंडु पिता पावला मरण । तैं तिहींच केलें आमुचें रक्षण ।**

**आणि आतां आम्हां सोडोन । सांगे कवण स्थान सेविलें ? ॥८०॥**

**ते चुलते परी मी बापचि म्हणे । नाना संकटीं रक्षिलें जेणें ।**

**तयांसचि माता पिता म्हणणें । जन्मदातियाहूनि[३] वरिष्ठ ते ॥८१॥**

**जन्मदाते करिती रक्षण । ते आपुला मोह म्हणून । परी सज्जन जें करिती रक्षण । तें केवळ कल्याण चिंतोनी ॥८२॥**

**यालागीं तो विदुर महाशय । जो नाना संकटीं आह्मां रक्षक होय । तयाचे येथ न दिसती पाय ।**

**सांग लवलाहे कुत्र[४] गतः? ॥८३॥**

**जयाचे आंधळे असूनि नयन । आम्ही मारिले शत नंदन । तो पतिव्रता मातेस घेऊन । कवण्या वनीं पैं गेला? ॥८४॥**

**युधिष्ठिराचा ऐकोनि प्रश्न । संजयही (य३-२२१) झाला अत्युद्विग्न[५] । निजस्वामीतें[६] न पाहून । साश्रुनयन[७] बोलत ॥८५॥**

**म्हणे महाराजा युधिष्ठिरा । मी नेणे गांधारी धृतराष्ट्र विदुरा । गमनकारणही[८] भूमीश्वरा[९] । कळलें नाहीं मजलागीं ॥८६॥**

**तेचिसमयीं नारद मुनी । जो अहेतुकदयाळू[१०] कैवल्यदानी[११] । सवे तुंबरू घेऊनी । धर्मसदनीं पातले ॥८७॥**

**तेंचि सकळ तपांचें फळ । तेचि अमृताची वेळ । जेव्हां सज्जन कृपाळ । पडती दृष्टीं ॥८८॥**

**सकळ सुखा अधिष्ठान[१२] । महापुरुषांचें[१३] चरणदर्शन । जयांचें हृदय नारायण । अर्धक्षण विसंबेना ॥८९॥**

*(१) धृतराष्ट्रादि वडिल पुरुषांना नमस्कार करण्याकरिता (२) धृतराष्ट्र व गांधारी (३) जन्म देणाऱ्या आईबापाहून (४) कोठे गेला (५) अतिशय खिन्न (६) आपल्या धन्याला (७) डोळ्यात पाणी आणून (८) जाण्याचे कारण (९) राजा (१०) कांही अपेक्षा न करता दया करणारे (११) मोक्ष देणारे (१२) आधार (१३) संतांचे.*

**जो देवर्षिमाजीं मुकुटमणी[१] । दीनदयाळू जेंवी जननी । तो विधिनंदन[२] आला ऐकोनी । लागला चरणीं युधिष्ठिरू ॥९०॥**

**मग देवोनि उचितासन[३] । उभा राहिला कर जोडून । पित्रव्यार्ति[४] मनीं धरोन । करी प्रश्न आवडी ॥९१॥**

**युधिष्ठिर म्हणे भगवंता । मी नेणे कोठे गेला पिता । आणि तपस्विनी गांधारी माता । कवण्या पथा[५] पैं गेली ? ॥९२॥**

**जियेचे शत पुत्र मृत । म्हणोनी अनाथ अत्यंत । तरी पाळोनि पातिव्रत्यव्रत । कवणपंथ अनुसरली ? ॥९३॥**

**आम्ही अज्ञान मंदमती । कळेना दुःख-परतीर-गती[६] । यास्तव आपणांऐसे यती । पार करिती दीन जनां ॥९४॥**

**जयांचें दिशा हेंचि वस्त्र । अंजलीच अन्नपात्र[७] । वासना नामें स्वतंत्र । मोक्षाचीही नसे जया ॥९५॥**

**ऐसे निस्पृह जे मुनी । आपणासमान कैवल्यदानी । त्या धुंडावया अवनीं । कारण मनीं तर्कवेना ॥९६॥**

**परी त्रिविधतापें[८] पोळले जन । तयां निववावें दृष्टीकरून[९] । याचिलागीं गमनागमन । नित्य सज्जन करिताती ॥९७॥**

**आमुचिया भाग्यवशें आज । दर्शन झालें महाराज । तरी दुःखपार जावया जहाज[१०] । कृपा करोनि दावावें ॥९८॥**

**एवं युधिष्ठिरप्रश्न ऐकोनी । बोलते झाले नारदमुनी । राया, चिंता न करी मनीं । जगत् जाणोनी ईश्वरवश[११] ॥९९॥**

**लोक आणि लोकपाळ । यदीक्षणें[१२] संजात[१३] सकळ । भूतसंयोगवियोग[१४] केवळ । आधीन तया प्रभूच्या ॥१००॥**

**॥ गद्य ॥**

शिष्य :- भगवन् ! आपण जें सर्व जगत् ईश्वरवश म्हणून सांगतां, त्यांत प्रयत्नाची[१५] हानी होतेसें दिसते; आणि केलेल्या कर्मांचें फळ जर परमात्मा देतो, तर तो नैर्घृण्यवैषम्यदोषादियुक्त[१६] असला पाहिजे. (य३-२२२)

*(१) श्रेष्ठ (२) नारद (३) योग्य आसन (४) चुलत्याच्या जाण्यामुळे झालेले दुःख (५) मार्गाने (६) दुःखातून पार होण्याचा मार्ग (७) जेवणाचें पात्र (८) अधिभौतिकादि दुःखाने (९) त्यांच्याकडे पाहिल्याबरोबर (१०) नौका (११) ईश्वराच्या स्वाधीन (१२) ज्याच्या संकल्पाने (१३) उत्पन्न (१४) जीवांचा समागम व पुनः फाटाफूट (१५) प्रयत्नवाद सिद्ध होत नाही. (१६) निर्दयपणाने व विषमतेने जीवांना वागविणे*

श्रीगुरु :- बाळा ! या शंकेचें समाधान मागें मी पुष्कळ वेळां केलें आहे; तथापि तुला पुनः पुनः शंका येतात. कुतर्केकरून[२] ज्याची बुद्धि दूषित[३] असते, तो कनिष्ठ अधिकारी शास्त्रांत म्हटला आहे. तथापि शंका रोधल्यानें[४] ती शांत होत नाहीं; म्हणून समाधान श्रवण कर.

यत्न म्हणून जो तूं स्वीकार करितोस, तो काय जड स्वीकार करितोस? कीं चैतन्यस्पंद[५] स्वीकार करितोस ? प्रथम पक्षीं ईश्वर चैतन्य असल्यामुळें तुझ्या यत्नाचा परिणाम त्यावर कांहींच चालणार नाहीं. आणि द्वितीय पक्षीं, व्यष्टिचैतन्यस्पंद[६] म्हणजे यत्न म्हणतोस ? किंवा, समष्टिचैतन्यस्पंद[७] म्हणजे यत्न म्हणतोस ? कारण, व्यष्टिसमष्टिभेद हे चैतन्यांत नसून, चैतन्याचें ठिकाणीं उपाधिना[८] आरोपित आहेत. तथापि अंत्यपक्ष[९] स्वीकार करशील तर सर्व प्रयत्न त्वां ईश्वराकडेच दिला. मग तुझा प्रयत्न पृथक् न राहिल्यामुळें त्याविषयीं शोक करणें तुला युक्त नाहीं; आणि आद्य[१०] पक्ष स्वीकारला तर व्यष्टिप्रयत्नाचा[११] समष्टिप्रयत्नावर[१२] परिणाम होत नसल्यामुळें तुझी शंका घटत नाहीं.

शिष्य :- तात ! मी आपणाला वादी या रीतीनें विचारीत नाहीं; किंतु अशा अडविण्यामुळें माझी जिज्ञासा[१३] शांत होत नसल्यामुळें पुनः आज्ञा मागून विचारण्याचें मी धैर्य करितों.

*(२) शास्त्रविरुद्ध तर्क करून (३) मलिन (४) दाबल्याने (५) चैतन्याचेच स्फुरण (६) एका जीवचैतन्याचे ठिकाणी होणारी हालचाल (७) सर्व ब्रह्मांडाचा मी म्हणुन अभिमान धारण करणारे जे चैतन्य त्याचे ठिकाणी होणारी हालचाल (८) उपाधीमुळे (९) शेवटला (१०) पहिला (११) एका देहाचा अभिमान धारण करणाऱ्या चैतन्याच्या हालचालीचा (१२) ब्रह्मांडाचा अभिमान धारण करणाऱ्या चैतन्याच्या हालचालीवर (१३) जाणण्याची इच्छा.*

श्रीगुरु :- श्रवण कर.

॥ संस्कृत ॥

'आत्मा[१] वा इदमेक एवाग्र आसीन्नान्यत्किंचनमिषत् स ईक्षत लोकान्नुसृजा इति ॥१॥
स इमाँ ल्लोकान् असृजत अंभो मरीचीर्मरमापोऽदोऽम्भः परेण दिवं द्यौः प्रतिष्ठा ऽन्तरिक्षं मरीचयः ।
पृथिवीमरोया अधस्तात्ता आपः ॥२॥
स ईक्षते मेनुलोकालोकपालान्नुसृजा इति' ॥ **(ऐतरेय, प्रथमखंड)**
तस्माद्वा एतस्मादात्मन आकाशः संभूतः ।
आकाशाद्वायुः । वायोरग्निः । अग्नेरापः । अद्भ्यः पृथिवी ।
पृथिव्या ओषधयः । ओषधीभ्यो ऽन्नम् । अन्नात्पुरुषः ।
स वा एष पुरुषो ऽन्नरसमयः ॥ **(तैत्तिरीय, ब्रह्मानंदवल्ली २)**

'यतो वा इमानि भूतानि जायन्ते ।
येन जातानि जीवन्ति ।
यत्प्रयन्त्यभिसंविशन्ति ।
तद्विजिज्ञासस्व ।
तद्ब्रह्मेति ॥ **(तैत्तिरीय, भृगुवल्ली ३)** (य३-२२३)
'तस्माद् यज्ञात् सर्वहुतऋचः[२] सामानि जज्ञिरे ।
छंदांसि जज्ञिरे तस्माद्यजुस्तस्मादजायत' ॥

इत्यादि श्रुति जगत् परमेश्वरवश[३] सांगत असून,

**'विश्वानि देव सवितर्दुरितानि परासुव[४] ।**

**यद्भद्रं तन्न आसुव ॥ (यजुर्वेदसंहिता, देवसविताध्याय.)**

*(१) श्रुतींचा अर्थ - हे जगत् जेव्हां उत्पन्न झाले नव्हते तेव्हा फक्त एक आत्माच होता. त्यावाचून दुसरे काहीहि व्यापारयुक्त नव्हते. त्याने लोक उत्पन्न करावे असा संकल्प केला. त्याने हे लोक उत्पन्न केले. **अंभ मरीची मर** आणि **आप. द्युलोक** ज्याचा आधार आहे असा द्यूलोकांचे वर असणारा **अंभलोक.** द्युलोकांचे खाली अंतरिक्ष हा **मरीची लोक**. पृथ्वी हा **मरलोक.** पृथ्वीच्या खाली तो **आप.** हे लोक व लोकपाळ उत्पन्न करितो. असा त्याने संकल्प केला - त्या ह्या आत्म्यापासून आकाश उत्पन्न झाले. आकाशापासून वायु, वायुपासून अग्नि, अग्निपासून आप, आपापासून पृथ्वी, पृथ्वीपासून औषधी व औषधीपासून अन्न उत्पन्न होऊन अन्नापासून पुरुष उत्पन्न झाला म्हणून हा पुरुष अन्नरसाकार झाला आहे - ज्यापासून ही भूते उत्पन्न होतात, उत्पन्न झाल्यावर ज्याचेमुळे जगतात व शेवटी ज्याचे ठिकाणी लय पावतात ते ब्रह्म होय. ते जाणण्याची इच्छा कर. (२) श्रुतीचा अर्थ - त्या परमेश्वरापासूनच सर्व ऋग्वेदादि वेद उत्पन्न झाले (३) ईश्वराच्या स्वाधीन (४) श्रुतीचा अर्थ - हे सवितृदेवा आमची सर्व पातके नाहीशी कर व आमचे कल्याण कर.*

ही श्रुति, व **'धियो[१]योनः प्रचोदयात्'** हें वेदमातेचें[२] तृतीयपद[३] यावरून ईश्वरसहाय घेऊन जीवाला प्रयत्न करण्याचें स्वातंत्र्य आहे. हा परस्परविरोध प्राप्त झाला असतां. त्याचें निराकरण[४] असें आहे कीं, लोक व लोकपाल ईश्वरेक्षणरूप[५] असल्यामुळें आणि सृष्ट्युत्पत्ति जीवांच्या कर्मफलार्थच[६] असल्यामुळें फलभोगकालीं[७] संयोग[८] आणि वियोग[९] परमेश्वराच्याच आधीन असतो. परंतु कर्मकर्तृकालीं[१०] मात्र जीवाचा प्रयत्न चालत असतो.

याविषयीं वास्तविक समाधान असें आहे कीं, ज्याप्रमाणें ईश्वरानें ही सृष्टि उत्पन्न केली आहे, त्याप्रमाणें जीवानेंही उत्पन्न केली आहे. * ईक्षणापासून[११] प्रवेशापर्यंत[१२] सृष्टि ईश्वरानें केली असून, * जागृतीपासून मोक्षापर्यंत संसार जीवानें कल्पित[१३] आहे; व त्याचप्रमाणें सृष्टीवर ममताही जीवानेंच कल्पित केली आहे. जशी ईश्वरनिर्मित[१४] स्त्री एकच असून, पुत्राच्या कल्पनेनें ती माता होते, व पतीच्या कल्पनेनें ती पत्नी होते, तद्वत् ईश्वरसृष्टींत[१५] मनोमय[१६] सृष्टि जीवाची असल्यामुळे मनोमय सृष्टीला आधीन[१७] करण्यास जीवाचा अधिकार[१८] आहे. आणि वास्तविक बाह्यप्रपंचापेक्षां[१९] मनोमय प्रपंचच जीवांच्या सुखदुःखाला कारण आहे.

उदाहरणः- एखादा पशु जोपर्यंत आपल्याजवळ नसतो तोपर्यंत त्याच्या मरणाविषयीं किंवा जिवंत राहण्याविषयी आपल्याला कांहींच वाटत नाहीं.परंतु कांही कारणानें त्या पशूवर मनोमय आपलेपणा स्थापन केला म्हणजे मग त्या पशूपासून आपल्याला सुखदुःखें उत्पन्न होतात. ही मनोमय सृष्टि जशी जीवाला करितां येते, तशीच त्याला ती मोडण्याचाही अधिकार आहे. म्हणूनच आपली वासना जिंकण्याविषयीं प्रयत्नाचा जीवाला अधिकार आहे. पण हें मत सत्तात्रयवादियांचें[१] आहे.

*(१) जो आमच्या बुद्धीला प्रेरणा करितो (२) गायत्रीचे (३) तिसरे चरण (४) परिहार (५) ईश्वराच्या संकल्पाचे कार्य (६) कर्माचे फळ भोगण्याकरिता (७) कर्माचे फळ भोगत असतांना (८) विषयाचा संयोग किंवा कर्मफलाची प्राप्ति (९) विषय नाहीसे होणे (१०) कर्म करितेवेळी, म्हणजे भोग भोगतांना जीव परतंत्र आहे; पण कर्म करितांना स्वतंत्र आहे (११) सृष्टीविषयक जो पहिला संकल्प तेथून (१२) ईश्वर या सृष्टीत जीव स्वरूपाने प्रगट होईपर्यंत (१३) कल्पिलेला (१४) ईश्वराने निर्माण केलेली (१५) ईश्वराने उत्पन्न केलेल्या सृष्टीत (१६) मानसिक भावनामय (१७) प्रयत्नाच्या आधीन, इच्छेनुसार (१८) सामर्थ्य (१९) देहाच्या बाहेर भासणारा प्रपंच, त्यापेक्षा.*

पण हें मत सत्तात्रयवादियांचें[१] आहे.

सत्ताद्वयवादांत[२] समाधान (य३-२२४) याहून विशेष आहे. तें असें कीं, सर्व प्रपंच जीवकल्पितच[३] असून, प्रातिभासिक[४] आहे. ब्रह्माची पारमार्थिक[५] सत्ता व प्रपंचाची प्रातिभासिक सत्ता आहे. व्यावहारिक[६] सत्ता म्हणून कांहीं नाहीं. तथापि अधिष्ठानानुमोदनावांचून[७] कल्पित[८] वस्तूला सत्ता नसते. ज्याप्रमाणें रज्जूचें[९] दीर्घत्वादिक[१०] धर्म नसतानां सर्पाचा अध्यास[११] आपल्या भ्रमानें होणें संभवनीय नाहीं. यद्यपि रज्जुज्ञानानें[१२] सर्पाची निवृत्ति[१३] होते, तथापि रज्जुसत्तेनें[१४] सर्पाची निवृत्ति होत नाही; कारण रज्जूच्या असण्यानेंच[१५] सर्पाची निवृत्ति मानली, तर जेव्हां सर्प भासतो, तेव्हांही रज्जूचें अस्तित्व आहे; परंतु तेवढ्यानें सर्पनिवृत्ति होत नाही; उलट सर्पाला भासण्याला सहाय होते;

*(१) परब्रह्माची नित्य सत्ता, प्रपंचाची व्यावहारिकसत्ता ब्रह्मज्ञानावाचून नाश न पावणारी व मृगजलाची म्हणजे भ्रमाची भासमात्र सत्ता अशा तीन सत्ता मानणारे जे वादी आहेत त्याचे (२) ब्रह्माची नित्य अविनाशी सत्ता व बाकी संपूर्ण प्रपंचाची मृगजलाप्रमाणे भासमात्र सत्ता अशा दोन सत्ता मानणाऱ्या मतात (३) जीवाच्या कल्पनेमुळे भासणारा (४) भासतो तेवढ्या वेळेपुरता (५) नित्य अविनाशी (६) कांही काळ व्यवहार आहे तोपर्यंत टिकणारी (७) प्रपंचाच्या भासाला आधार असलेल्या ब्रह्मचैतन्याला अधिष्ठान म्हणतात. त्या ब्रह्मचैतन्याच्या अनुमोदनाशिवाय किंवा त्याची सत्ता आधार असल्याशिवाय (८) कल्पिलेल्या (९) दोरीचे (१०) लांबपणा इत्यादि (११) भ्रम, भ्रम भासण्याकरिता त्या भ्रमाला आधार पाहिजे (१२) दोरी आहे असे कळण्याने (१३) नाश (१४) दोरीचा जो अस्तित्व अंश, आहेपणा (१५) सत्ताज्ञानाने (१६) अस्तित्वमात्र ब्रह्म.*

तद्वत् ब्रह्म सत्तामात्ररूप सामान्य[१] असल्यामुळें सत्तामात्रज्ञानानें[२] प्रपंचनिवृत्ति होत नाहीं; तर जशी रज्जूच्या विशेष ज्ञानानें[३] सर्पाची निवृत्ति होते, तद्वत् वेदांतश्रवण-मनन-निदिध्यासनपूर्वक[४] अन्वयव्यतिरेकांनीं[५] विशेषचैतन्यसाक्षात्कार[६] झाला असतां प्रपंचविनिवृत्ति होते.

आतां, असा प्रपंच ब्रह्मावर भासतो म्हणून रज्जुसर्पन्यायानें[७] जगत्सादृश्यादि[८] दोष[९] ब्रह्माचें ठिकाणीं प्रपंचाध्यासास्तव[१०] स्वीकारावे लागतील, अशी शंका योग्य नाहीं. कारण, कोणत्याच प्रकारानें सादृश्य नसतांही आकाशाचें ठिकाणीं जो नीलताध्यास[११] होतो, त्यांत यद्यपि द्रष्टृभ्रमदोष[१२] आहे, तदपि आकाशसत्ता[१३] अनुमंत्री[१४] असून अवकाशादि[१५] विशेषधर्मावच्छिन्न[१६] आकाशज्ञानानें त्याची निवृत्ति होते. तद्वत् ब्रह्मसत्ता[१७] प्रपंचानुमंत्री[१८] असून, नित्य, शुद्ध, मुक्त इत्यादि विशेषस्वरूपचैतन्यज्ञानानें[१९] त्याची निवृत्ति होते.

*(१) विशेष धर्मरहित (२) आहे एवढे कळण्याने (३) ज्या विशेष धर्मामुळे रज्जूचे बिनचूक ज्ञान होते त्या धर्माचे ज्ञानाने (४) वेदान्त सिद्धान्ताचे श्रवण, मनन, निदिध्यास करून (५) सर्वदेहादि वस्तुहून ब्रह्म निराळे पहाणे याला व्यतिरेक म्हणतात व सर्व वस्तु खोट्या असून त्यात ब्रह्मच भरले आहे असे पहाणे याला अन्वय म्हणतात. (६) ज्या सत्‌चित् आनंद या धर्माने देहादिक पदार्थ सोडून ब्रह्माचे ज्ञान होते त्या धर्माच्या द्वारा अनुभव आला असता (७) दोरीवर सर्पाचा भ्रम होण्याकरिता त्या दोन पदार्थात, जसा त्यांची लांबी इत्यादि कांही धर्माचा सारखेपणा कारण मानला जातो त्याप्रमाणे (८) जगताच्या ठिकाणी असणाऱ्या धर्मासारखे कांही धर्म (९) भ्रमाला निमित्त (१०) प्रपंचाचा भ्रम भासतो म्हणून (११) नीलरंगाचा भास (१२) पाहाणाऱ्याचे ठिकाणी विचार नसणे (१३) आकाशाचे अस्तित्व (१४) अनुमोदन देणारी, निवारण न करणारी (१५) पोकळी इत्यादि (१६) विशेष धर्माने म्हणजे ज्या धर्माने सर्व पदार्थाहून आकाश निराळे करून स्पष्ट आपण ते ओळखू शकतो अशा धर्माने युक्त असे जे आकाशाचे ज्ञान (१७) नुसते अस्तित्व (१८) प्रपंचाचे भासाला अडथळा न करणारी (१९) ज्या धर्माने दुसऱ्या कोणत्याहि पदार्थाचे ज्ञान न होता, केवळ आत्मचैतन्याचे ज्ञान होते त्या धर्मद्वारा झालेल्या चैतन्याचे ज्ञानाने.*

तथापि व्यसनामध्यें[१] अतिशय गढून गेलेली वासना निघण्याला जसा कांहीं काल लागतो, तद्वत् अधिष्ठानानुमोदनपूर्वक[२] जीवकल्पनातीव्रसंवेगजन्य[३] कर्मफल विनिवृत्त[४] करण्यालाही कालावश्यकता[५] आहे; आणि म्हणूनच फल प्राप्त होण्याच्या आधीं प्रयत्न केला असतां, फलसमयीं त्याचा परिणाम होण्याचा संभव आहे. परंतु फल प्राप्त झाल्यावर प्रयत्नारंभ केला असतां, तो भावी[६] उत्तम परिणामी होईल. परंतु सध्यां जो भोग मिळतो तो मिळतोच.

भुक्तभोगवि-निवृत्तिविषयीं[७] प्रयत्न करणें व्यर्थ आहे. वर्तमानभोग[८] तर भोगून राहिलों. आहोंत. येवढ्याकरितां भविष्यत्भोगविनिवृत्तीविषयींच[९] प्रयत्न (य३-२२५) केला पाहिजे. ह्याविषयीं **'हेयं दुःखमनागतम्'** हें योगसूत्र प्रमाण आहे; आणि असा प्रयत्न करण्यांत दुसऱ्या सद्गुणांचेंही भूषण प्राप्त होतें. तें असें की, भुक्तदुःखांविषयीं[१०] शोक करूं नये, वर्तमान[११]दुःखांविषयीं सहनशीलता मिळवावी, आणि अनागतदुःखनिवृत्तीविषयीं[१२] धैर्य धरून प्रयत्न करावा. असा गुणसंपन्न पुरुषच भगवदनुमोदनानें[१३] हातावर हात मारून पार जातो. म्हणून आपणच दृढ केलेल्या व्यसनाला[१४] आपणच केव्हां तरी सोडूं, तद्वत् आपणच कल्पिलेला प्रपंच केव्हां तरी आपल्याच हातून सुटेल, असें धैर्य धरून निराश न होतां मोक्षाविषयीं सारखा प्रयत्न कर. ह्याविषयीं -

**'कृतप्रयत्नापेक्षस्तु विहितप्रतिषिद्धावैय्यर्थ्यादिभ्यः'** **(ब्रह्मसूत्र. अ. २ पाद ३ सूत्र ४२)**

हें ब्रह्मसूत्र प्रमाण आहे. परंतु व्यसन सुटावें या इच्छेनें व्यसनच दृढ करणें जसें युक्त[१५] नाहीं, तद्वत् सुखाच्या इच्छेनें दुःख देणाऱ्या प्रपंचाविषयीं यत्न करणें युक्त नाहीं.

*(१) दुर्व्यसनात (२) ज्याला आधार जे ब्रह्म त्याच्या सत्तेचा आश्रय मिळाला आहे. (३) जीवाने केलेली कल्पना तीव्र (म्हणजे जिच्या विरुद्ध कल्पना उठत नाही) होऊन उत्पन्न झालेले (४) नाहीसे करण्याला (५) कांही काळाची जरूरी (६) पुढे (७) ज्या कर्माचे फळ मिळून चुकले त्या विषयी (८) आता वर्तमानकाळी जो भोग प्राप्त झाला तो (९) ज्या कर्माचा भोग अजून मिळावयाचा आहे त्याच्या नाशाविषयी (१०) भोगलेल्या दुःखाबद्दल (११) प्राप्त झालेल्या दुःखाविषयी (१२) पुढे येणाऱ्या दुःखाच्या नाशाकरिता (१३) भगवंताच्या साह्याने (१४) दुर्गुणाला (१५) योग्य.*

भगवान म्हणाले, युधिष्ठिरा, तुझ्या बापानें जें तुला सोडलें, तें अर्थातच तुझ्या पूर्व कर्माच्या फलकालीं[१] असल्यामुळें तुझ्या तीव्रसंवेगानेंच[२] अधिष्ठानानुमोदनांत[३] जाऊन भगवद्वशतेनें[४] झालें आहे. म्हणून त्याविषयीं तुला आतां शोक करणें उचित नाहीं. पुढें उत्तम गति मिळण्याविषयीं तूं यत्न कर.

राजा ! गायी जोंपर्यंत वनांत असतात, तोंपर्यंत आपल्या इच्छेनें तृण भक्षीत असून, दामबद्ध[५] झाल्या म्हणजे मात्र स्वामीच्या[६] इच्छेनेंच त्यांनां वागावें लागतें. तद्वत् जीव कर्तृकालीं[७] स्वतंत्र असला तरी फलभोगकाली[८] भगवदीक्षणानुसारच[९] वागणें भाग पडतें.

आतां, भोजनामध्यें जशी करक्रियेची[१०] अपेक्षा आहे, तद्वत् फलभोगकालीं प्रवृत्तीची[११] अपेक्षा आहे. आणि फलभोग[१२] तर ईश्वरतंत्र[१३] आहे. म्हणून फलभोगाला लागणारी प्रवृत्तिही ईश्वरतंत्र आहे. यास्तव तेव्हां प्रयत्न संभवत नाहीं, असें म्हणशील तर सत्य आहे. परंतु त्याही वेळीं फल भोगण्याविषयींच्या प्रवृत्तीला लागणारें जें अहंदेहात्मक[१४] अज्ञान, तें परमात्म्यानें दिलेलें नसून, अनादि[१५] व ज्ञाननाश्य[१६] आहे. म्हणून फलभोगकालिन्[१७] प्रवृत्तीच्या वेळींही मी ह्या प्रवृत्तिनिवृत्तीहून[१८] वेगळा आहे, अशा प्रकारच्या अज्ञाननिवर्तक ज्ञानाविषयीं प्रयत्न संभवतो.

तात्पर्य, फलकालीं कां होईना, परमेश्वराकडून भोगप्रयत्नांतच[१९] प्रतिबंध होणें (य३-२२६) शक्य आहे; मोक्षप्रयत्नांत[२०] प्रतिबंध होणें शक्य नाहीं.

*(१) तुझ्या पूर्वकर्माच्या फलाचा तू भोग भोगत असतांना (२) दृढ संकल्पाने (३) अधिष्ठान जे ब्रह्म त्याच्याहि संकल्पात (४) भगवदिच्छेने (५) दाव्याने खुंट्याशी बांधल्यावर (६) मालकाच्या (७) कर्म करतांना (८) भोग भोगतांना (९) भगवंताच्या इच्छेनुसार (१०) हाताच्या क्रियेची - तोंडात घास घालणेची (११) क्रिया करण्याची (१२) सुखदुःखाचा भोग (१३) ईश्वराच्या स्वाधीन (१४) मी देह आहे अशी अज्ञाची समजूत (१५) ज्याला केव्हांच प्रारंभ झाला नाही असे (१६) ज्ञानाने नाहिसे होणारे (१७) भोग भोगण्याच्या वेळच्या (१८) करणें व न करणे याहून (१९) विषयसुखाच्या भोगाकरिता किंवा दुःख नाहिसे करण्याकरिता जो प्रयत्न केला जातो त्यात (२०) मोक्षाकरिता जो प्रयत्न केला जातो त्यात.*

भोगाच्या दृष्टीनें पाहिलें तर फलकालीं बाहुल्यांचा संयोग व वियोग जसा खेळणारावर अवलंबून असतो, तद्वत् भूतांचा संयोगवियोग परमेश्वरइच्छेवर अवलंबून असतो. आतां, बाहुल्या मोडतांनां किंवा करितांनां जसा बाळांनां दोष लागत नाहीं, तद्वत् मिथ्या जीवांनां सुखदुःखांत टाकतांनां परमेश्वराला दोष लागत नाहीं. म्हणून जीवांनां अत्यंत[१] परतंत्र मानावें अशी शंका करणाऱ्यानें परमेश्वराला लहान लेकराच्याच कोटींत घातलें असल्यामुळें त्यांच्यांशी बोलणेंच व्यर्थ होईल. साधारण राजाचें करणें जर निरर्थक नसते, तर परमेश्वराचें करणें निरर्थक कसें स्वीकारावें ? मग -

**'लोकवत्तु लीलाकैवल्यम्' (ब्रह्मसूत्र प्रयोजनवत्वाधिकरण अ२.पाद१.सूत्र.३३)**

या सूत्राचा अर्थ काय ? असें म्हणशील तर ऐक. व्यर्थ कर्म करून अलिप्त[२] राहणें, हें बाळांचें लक्षण असून, सार्थ[३] कर्म करून अलिप्त राहणें, हें परमेश्वराचें लक्षण आहे. कल्पकभ्रमांत[४] अधिष्ठान[५] अनुमंतृ[६] असलें तरी जसें अलिप्त[७] असतें, तद्वत् जीवकल्पित प्रपंचांत परमात्म्याचें अनुमोदन[८] सार्थ[९] असून समानसत्ताक[१०] नसल्यामुळें तो अलिप्त आहे.

शिष्य :- भगवन् ! माझ्या शंका निवृत्त झाल्या. आतां पुढें युधिष्ठिराला भगवान ब्रह्मनंदन[११] काय म्हणाले, तें आपल्या मुखांतून ऐकण्याविषयीं श्रवण उत्सुक आहेत.

श्रीगुरु :- याप्रमाणें युधिष्ठिराचा शोक भगवंतानें निराकरण करून पुनः दुसऱ्या दृष्टीनें युधिष्ठिराचा शोक निराकरण करावा, म्हणून किंचित् स्थूल दृष्टीच स्वीकार करितात.

*(१) ईश्वराच्या सर्वस्वी स्वाधीन, अल्प देखील केव्हांहि स्वातंत्र्य नाही असा (२) त्या कर्मापासून निराळे (३) कल्याणकारक (४) कल्पिलेल्या (५) ज्यावर तो भ्रम भासतो तो पदार्थ (६) अनुकूल (७) निराळे (८) अनुकूलता (९) सफल (१०) ईश्वराची व प्रपंचाची एकसारखी सत्ता नाही, ईश्वर नित्य आहे तर प्रपंच खोटा आहे (११) नारद.*

**॥ ओव्या ॥**

**पाहतां कवण्याही दृष्टीं । तुज शोक करणें अनुचित गोष्टी । हें कैसें न जाणसी पोटी । शास्त्र[१] कोटी अभ्यसुनी ॥१॥**
**जग जरी सत्य मानसी पाही । तरी आलें गेलें कांहींच नाहीं । जें तें आहेचि लवलाही । मग शोक कासया करावा? ॥२॥**
**बरें, जग जरी मानिसी मिथ्या सकळ । तरी तें झालेंचि नाहीं केवळ ।**
**मग आलिया गेलियाचा प्रबळ । (य३-२२७) शोक व्यर्थ कासया? ॥३॥**
**अनिर्वचनीय[२] मानतां जग । तरी हें योग्य हें अयोग्य । ऐसें म्हणणें नव्हें श्लाघ्य[३] । यालागीं शोक करूं नको ॥४॥**
**यालागीं जे भगवत्पर[४] । तयांचा योगक्षेम चालवी यदुवीर ।**
**जो गर्भांतचि असतां करुणाकर । दुग्ध निर्मी जननीस्तनीं ॥५॥**
**वैद्यशास्त्रीं दोष तीन । परी षड्रस निर्मी नारायण । औषधी रोगांच्या द्विगुण[५] । हे दयालूपण हरीचें ॥६॥**
**याचकजनां[६] कवण पाळिते । यालागीं निर्मिले उदार दाते । खादाड गज[७] त्यासाठीं अनंतें । नृप जगन्नाथें निर्मिले ॥७॥**
**गर्भी जड मूढ होता जेव्हां । हरीवरी भरंवसा होता तेव्हां । आतां पावोनि शक्तिस्वभावा[८] । वासुदेवा विसरला ॥८॥**

**॥ पद ॥**

**तूं हरि आमुचा नाथ । यदुपते ! तूं हरि० ॥ध्रु०॥**
**अक्षय[९] पालक बहिण बंधु गुरु । गोत जननि आणि तात ॥१॥**
**सकल समर्था सोडुनि आतां । धरूं कवणाचा हात ॥२॥**
**दूध दिलें हरि करुणा करुनी । जेव्हां नव्हतें दांत ॥४॥**
**आतां देखिल केंवि न कुटका[१०] । देउनि वदनीं दांत ॥४॥**
**ज्ञानेश्वरकन्या अंकित ज्याची । दिनरजनी[११] त्या गात ॥५ ॥१०९॥**

*(१) अनेक शास्त्रे (२) खरे की खोटे हे काहीच ज्याविषयी सांगता येत नाही (३) प्रशंसनीय (४) भगवंताला शरण गेलेले (५) दुप्पट (६) भिकाऱ्यांना (७) हत्ती (८) सामर्थ्याला (९) सदा (१०) तुकडा (११) रात्रंदिवस.*

शिष्य :- हे भगवन् ! भगवंताचें ठिकाणीं अशक्तौ[१] दुग्धनिर्मातृतेवरून[२] जें आपण दयालुत्व सांगितलें, ती काय परमेश्वराची स्तुति केली, किंवा अनुमानप्रमाणगम्य[३] आहे ? पहिल्या पक्षीं, वादाची आवश्यकता नाहीं. परंतु दुसरा पक्ष आपल्याला अभिप्रेत[४] असल्यास परमेश्वराकडे नैर्घृण्य[५] वैषम्य प्राप्त होत नाहीं काय ?

श्रीगुरु :- वेदांत जो उपदेश केला आहे तो परमेश्वरानें दयाळुपणानेंच केला आहे. आतां परमेश्वराचें न्यायीत्व कसें ? अशी शंका करशील तर गर्भ[६] किंवा बाल्यकालाच्या[७] दृष्टीनें पाहिलें असतां, आई दयाळू असून, मुलगा जशा गुणांचा पुढें निघेल, त्याप्रमाणें त्याच्याच कल्याणार्थ शिक्षा किंवा प्रेम दाखवावा लागतो. तद्वत् जीवसामान्यतापक्षीं[८] परमात्मा दयाळू असून, जो जसें कर्म करितो, त्याचा उत्तम परिणामच व्हावा म्हणून त्याला न्याय[९] करावा लागतो. ज्याप्रमाणे (य३-२२८) आई क्रूर आहे, ही गोष्ट मुलगाच आपल्या गुणानें[१०] आपल्यावर ओढून घेतो, त्याप्रमाणें परमात्मा स्वभावतः दयालू असूनही जीवच आपल्या कर्माच्या योगानें त्याचें ठिकाणीं न्यायीत्व, यमत्व वगैरे स्थापन करितो. एखादें लहान लेकरूं विहिरीकडे जात असतांनां त्याला कळत नाहीं म्हणून कोणीही त्याला परावृत्त[११] करितो; परंतु जाणता मनुष्य विहिरीकडे जात असतां आत्महननापराधनिवर्तक[१२] शासनान्वयें राजदूतांच्या हातून त्याला शिक्षा करावी लागते.

*(१) जीव अत्यंत असमर्थ असतांना (२) आईच्या स्तनात दूध उत्पन्न केले त्यावरुन (३) अनुमानाने कळणारे (४) मान्य (५) निर्दय व विषम भावाने वागण्याचा दोष (६) गर्भ अवस्थेच्या (७) अत्यंत लहानपणातील कालाच्या (८) जीवमात्राचे दृष्टीने (९) दंड इत्यादि (१०) दुर्गुणाने - दयाळु आई मुलाच्या दुर्गुणामुळेच मुलाला क्रूर भासते (११) त्यापासून दूर करितो (१२) आत्महत्त्येचा दोष नाहीसा करणाऱ्या कायद्याप्रमाणे, पापकर्माचे फल दुःख आहे. हे पापकर्मापासून यमलोकात किंवा पुढील जन्मात मिळणारे दुःख प्रायश्चित्ताने टळू शकते किंवा राजाने कायद्यानुसार दंड दिल्याने पुढे भोगावे लागत नाही म्हणून राजदंड हाहि पापनिवर्तक आहे.*

तद्वत् गर्भकालीं सर्वस्वी परमात्मा रक्षण करीत असून, जाणता झाल्यावरही प्राणी पापकर्माचेठायीं प्रवृत्त होईल, तर श्रौतशासनान्वयें[१] यमदूतांकरवीं प्रेम आपआपसांतच ठेवून, कल्याणार्थ त्याला शिक्षा करणें भाग पडतें. दृष्टिसृष्टिवादांत हा विषय कसा स्थापित[२] करावा, ही शंका येण्याचें कारण नाहीं. कारण, ज्याप्रमाणें कल्पितसर्पाधिष्ठान[३] व

कल्पितसर्पत्वाधिष्ठान[४] रज्जूच[५] असतो, तद्वत् जीवकल्पितकर्मजन्यविशेषप्रपंचाधिष्ठान[६] व सामान्यसकार्याध्यासाधिष्ठान[७] ब्रह्मच असल्यामुळें सामान्य[८] दयालुत्वादिक त्याचें ठिकाणीं जीवकृत-आवश्यकारोपजन्य[९] असून, न्यायीत्वादिक कल्पनारोपजन्य आहेत. जसें, भ्रमाधार रज्जु आहे. आधारावांचून भ्रम घटत नाहीं. हा आवश्यकारोप असून, एकाला रज्जूचेठायीं सर्प, दुसऱ्याला जलधारा, व तिसऱ्याला दंड इत्यादि भासणें, कल्पनारोप आहे.

*(१) वेदात सांगितलेल्या दंडानुसार (२) मंडन करावा (३) कल्पिलेल्या सर्पाचा आधार (४) कल्पिलेल्या सर्पाचे ठिकाणी कल्पिलेल्या सर्पपणाला आधार (५) दोरी (६) जीवाने कल्पिलेल्या कर्मापासून उत्पन्न झालेल्या कार्यरूप प्रपंचाचा आधार (७) सामान्य कार्यरूप प्रपंचाला आधार. प्रपंच दोन प्रकारचा सामान्य व विशेष. प्रत्येकाचे कर्मानुसार ज्याचा त्याला भासणारा व भोगावा लागणारा तो **विशेष** प्रपंच व ईश्वरनिर्मित तो **सामान्य** (८) ग्रायावत् जीवांना अवश्य पाहिजे असलेले. (९) जीवाने केलेल्या आवश्यक आरोपामुळे भासणारे – परमेश्वराचे ठिकाणी जीवांनी जे निरनिराळे धर्म आरोपित केले आहेत, ते दोन प्रकारचे आहेत. एक आवश्यक आरोपजन्य व दुसरे कल्पनारोपजन्य. * एकादी गोष्ट सिद्ध करण्याकरिता जी गोष्ट सर्वांनाच मानावी लागते, ती मानणे हा आवश्यक आरोप होय. त्याचे उदाहरण मूळात दिले आहे. * जी गोष्ट प्रत्येकाला कल्पनेनुसार भासते तो कल्पनाआरोप होय. याचेहि उदाहरण मूळात दिले आहे.*

किंतु कल्पनारोपही अत्यंत तीव्र झाला असतां, आवश्यकारोपतुल्य दृढ होतो. यद्यपि * आवश्यकारोपाचें निवारण ज्ञानानें[१] व * कल्पनारोपाचें निवारण प्रारब्धभोगानें होत असून * भक्तीनें त्याचा अभिभव[२] होतो, तथापि परमेश्वराच्या दयालुत्वाविषयीं मात्र असें नाहीं; कारण तो आरोपच विद्यानिमित्तक[३] आहे व विद्येचा[४] आणि ज्ञानाचा विरोध नाहीं. यद्यपि प्रारब्धाचा आणि ज्ञानाचाही विरोध नाहीं, तथापि प्रारब्धाला अनुकूल[५] ज्ञान नाहीं; आणि विद्येचें तर तें स्वरूपच आहे म्हणून मुक्त झाल्यावरही भगवंताचें दयालुत्व असतेंच. याकरितां जिज्ञासुदशेंत किंवा ज्ञानीदशेंत तूं परमेश्वरावलंबी[६] राहून, तुझा व जे त्याचे भजन करण्याकरितां गेले, अशा विदुरादिकांचा (य३-२२९) तोच प्रभु मायबाप असल्यामुळें, ह्या वृद्ध अनाथांनां वनामध्यें कोण रक्षण करील, अशा प्रकारची विकळ[७] वृत्ति तूं सोडून दे. कारण, ती अज्ञानानेंच भासत आहे.

राजन्! विषमिश्रित अन्न पुढें आलें असतां, तें अन्न सोडून देण्याचा प्रयत्न करणें जसें सुलभ आहे, तद्वत् तें अन्न बलेंकरून भक्षण केलें असतां अमृत करण्याचा प्रयत्न करणें सुलभ नाहीं.– तद्वत् काल, कर्म आणि त्रिगुण ह्यांचा झालेला पंचभूतात्मक देह, त्यावरून अभिमान सोडणें जसा सुलभ आहे, तसा देहाचा लोभ धरून त्याला चिरजीवी करणें सुलभ नाहीं. तात! *नियमसाधनकाळ[८], *जन्मनिमित्त[९] कर्म आणि *उपादानभूत[१०] प्रकृतीचे सत्त्वादिगुण, त्यांच्यापासून निर्माण झालेला जड देह - ईश्वरभक्तीला लागल्यावांचून रक्षण[११] करून कोणताच उपयोग होत नाहीं.

*(१) ब्रह्मज्ञानाने (२) दबले जाते (३) ब्रह्मविद्या, शुद्धसत्वामुळे (४) ब्रह्मज्ञानाचे ठिकाणी विद्या उपाधी राहतो म्हणून (५) ज्ञान हे प्रारब्धाला तुच्छ, उपेक्ष्य समजते म्हणून (६) ईश्वराच्या परतंत्र, ईश्वरेच्छेच्या स्वाधीन (७) शोकाकुल (८) कर्म व कर्माचे फल याविषयी जे नियम म्हणजे परमेश्वर-संकल्प आहे, त्याला साधन काल आहे. कालानुसार परमेश्वर संकल्प प्रगट होतो व ती गोष्ट घडून येते (९) जन्म प्राप्त होण्याचे कारण (१०) मूळ कारण असलेल्या (११) पोषण करून.*

म्हणून परमार्थाचें साधन करणाऱ्या विदुरादिकांविषयीं अंगविक्लव[१] सोडून रमारमणचरणारविंदांचें[२] ठिकाणींच चित्त अक्षय स्थापन कर.

**॥ पद ॥**

**माधवी मन ठेवी । मनुजा ! माधवीं० ॥ध्रु० ॥**
**मानुनियां भव[३] विभव[४] यथार्थचि[५] । व्यर्थ भ्रमसि केंवीं ? ॥१॥**
**कधिं तरि जीवित नेइल रविसुत[६] । लुब्धक[७] मृग[८] जेंवी ॥२॥**
**अलकावतिवल्लभपददासा[९] । आशा नच गोवी[१०] ॥३॥ ११०॥**

**॥ओव्या ॥**

**जयातें नसती हात पाय । ऐसा तृणादिसमुदाय[११] । जे मनुष्य पश्वादि करचरणाश्रय[१२] । तयांचें भक्ष्य होय हा ॥१११॥**
**एवं जीवांची उपजीविका[१३] । जीवाचिवरी नृपनायका । याचा अर्थ हा अवलोका । कीं अंतकरी[१४] सर्वही ॥११२॥**
**'अहस्तानित्यादि' मूळ[१५] पदाहून । मूढ काढिती अनुमान ।**

कीं विहित केलें जीवहिंसन[१६] । परी तें मिथ्या जाण सर्वथा ॥११३॥

ईश्वरेण[१७] विहिता वृत्तिः । सर्वत्र सुलभैवेति । श्रीधरस्वामीची अवतरणोक्ती[१८] । पाहतां भ्रांती ही गळे ॥११४॥

ईश्वरें विहित[१९] केलियावीण । क्षुधेनें जाऊं नये प्राण । म्हणोनी जें विहित अन्न । तेंचि तेंचि पूर्ण ईश्वरीं ॥११५॥

क्षुधादिवृत्तीवांचूनि आणिक । चित्तीं जे रागादिक[२०] ।
तद्योगें[२१] अन्न मानिती मूर्ख । (य३-२३०) तें जगन्नायकविहित[२२] नोहे ॥११६॥

*(१) हातपाय गाळणे (२) लक्ष्मीपति श्रीहरीचे पायाचे (३) संसार (४) संपत्ति (५) सत्य, अविनाशी (६) यम (७) पारधी (८) हरिण (९) श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या पायाच्या दासाला (१०) बंधन करीत नाही (११) गवतादि पदार्थांचा समूह (१२) ज्यांना हातपाय आहेत (१३) जगणे, पोषण (१४) नाशिवंत (१५) मूळ ग्रंथातील पदांवरून (१६) जीव मारून खाणे (१७) ईश्वराने प्रत्येक प्राण्याच्या उपजीविकेचे जे साधन सांगून ठेवले आहे ते सुलभ आहे म्हणजे त्याकरति फार श्रम करावे लागत नाही (१८) श्लोकांतील भावार्थ दाखविणारी उक्ति (१९) स्वतः नेमून दिल्यावाचून (२०) इंद्रियाची आवडनावड (२१) त्याच्या स्वाधीन होऊन.(२२) भगवंताने सांगितलेली उपजीविका नव्हे*

क्षुधादिवृत्तीचियासाठीं । पुरे गोधूमादिधान्यकोटी[२] । परी निषिद्धराग कटकटी[३] । मूर्ख पोटीं मांस भरिती ॥११७॥

अहो ? ययांचें ऐसें मत । कीं मनुष्यभक्ष्य[४] पशु भगवद्विहित[५] ।
तरी मनुष्यही व्याघ्रभक्ष्य[६] हरिविहित । मग स्वरक्षण[७] व्यर्थ कां कीजे? ॥११८॥

॥ अभंग - तुकाराम महाराज ॥

वाघें उपदेशिला कोल्हा । सुखें खाऊं देरे मला ॥१॥
देह जाणार जाणार । परी घडो परोपकार ॥२॥
सिंह म्हणे भला भला । तुझ्याच तोंडी निवाडा झाला ॥३॥
गांठ पडली ठका ठका । त्याचें वर्म बोले तुका ॥४॥

॥ ओव्या ॥

ऐसीच मूढ जनांची स्थिती । पूर्वापर[८] ग्रंथ न पाहती । आसु[९] निवृत्तिरिष्टेत्यादि' मूलोक्ती[१०]। हिंसावृत्तिनिषेधक[११] ॥१९॥

प्रवृत्ति[१२] अनुरागमात्र[१३] आहे । म्हणोनी तें कथन विधि[१४] नोहे ।
निवृत्ति[१५] कर्तव्यताशेष[१६] होय । यालागीं तियें विधित्व ॥२०॥

आणि गुणत्रयेंकरून[१७] । अन्नाचें भाग होती तीन । सत्त्वगुणें निफजे मन । शुक्र जाण रजोगुणें ॥२१॥

*(२) गव्हादिक धान्ये (३) शास्त्रात जे पदार्थ खावू नये म्हणून सांगितले तेच पदार्थ खाण्याविषयी जी रसनेंद्रियाची आवड तिच्या टोचणीमुळे (४) मनुष्याला खाण्याजोगे (५) भगवंतानी खावयाला सांगितले (६) वाघाच्या उपजीविकेचे साधन (७) वाघादिक हिंस्त्रक पशूपासून आपला बचाव (८) मागला पुढला (९) यापासून परावृत्त होणेच इष्ट आहे (१०) मूळ स्मृति ग्रंथातील वचन (११) हिंसात्मक उपजीविकेचा निषेध करणारे (१२) विषय भोगण्याची स्वाभाविक प्रवृत्ति (१३) इंद्रियलालसारूप (१४) आज्ञा (१५) इंद्रियप्रवृत्ति आवरणे (१६) आज्ञेचे अंग (१७) आपण जे अन्न खातो तेहि त्रिगुणात्मक आहे म्हणून (२०) ओवीचा अर्थ - शास्त्रातून जे विषयसेवन सांगितले आहे तो धर्म होऊ शकत नाही. कारण धर्म ही भगवंताची आज्ञा किंवा उपदेश आहे व आज्ञा किंवा उपदेश, मनुष्य जी गोष्ट स्वाभाविकपणे आपण होऊन करितो त्याबद्दल संभवत नाही. मनुष्याला जी गोष्ट आपण होऊन स्वाभाविकपणे समजणार नाही किंवा जी गोष्ट स्वाभाविकपणे त्याने करणे शक्य नाही, त्या गोष्टीबद्दलच आज्ञा किंवा उपदेश संभवतो. विषयभोग सोडणे हे कांही मनुष्याच्या स्वाभाविक प्रवृत्तीचा भाग नव्हे; म्हणून* ***विषयप्रवृत्तीला आळा घालून विषयप्रवृत्ति सोडावयाला लावणाऱ्या जेवढ्या भगवंताच्या आज्ञा असतील त्याच खऱ्या धर्मरूप आज्ञा होत.***

तमोगुणें होय मांस । तेंवी जलाचेंही भाग विशेष । सत्त्वगुणें पुष्टि प्राणास । रजोगुणें रक्तपुष्टी ॥२२॥

तमोगुणें मूत्रोत्पत्ती । म्हणोनी मांस तामस निश्चिती । 'अमेध्यं[१] तदन्नं तामसप्रियमिति' । जाग्रच्छ्रुति बोलिली ॥२३॥

एवं मांस परिणाम तमाचा । तो भक्षिलिया मग तयाचा । निकृष्टतम[२] साचा । परिणाम होय ॥२४॥

म्हणोनी मांसभक्षणें कहीं । मानसपुष्टी[३] सर्वथा नाहीं । सर्वानुसंधान[४] जडे देहीं । मनःसोयी[५] विसरोनी ॥२५॥

दृढ देहाचें अनुसंधान । मनःशक्तीचें अभिभवन[६] । यालागीं पावलिया मरण । करिती गमन स्थावरादियोनी[७] ॥२६॥

**रजोगुणें अन्नरजभाग[८] मांस होय । एवं कोठें जरी पद समुदाय[९] । तथापि[१०] तोही इष्ट न होय । सत्त्वाविण ॥२७॥**
**एवं रजस्तमवृत्ति[११] । हिंसा[१२] विहित न करी श्रीपती । जो सकलकल्याणकरुणामूर्ति[१३] । अक्षय[१४] कीर्ती जयाची ॥२८॥**

*(१) अपवित्र (२) अत्यंत हीन (३) मनाला मिळणारी सात्विक पुष्टि (४) सर्व लक्ष (५) मन सात्विक करावे हा विचार (६) दबून जाणे (७) वृक्षादियोनीत (८) अन्नातील रजोगुणाचा जो भाग तो (९) कोठे मांस हा अन्नाचा तमोगुणी परिणाम होय असे सांगितले असून कोठे त्याला रजोगुणी परिणाम म्हटले आहे. (१०) पण मांस तमोगुणी परिणाम असो, वा रजोगुण परिणाम असो, अध्यात्म प्राप्तीला दोन्ही परिणाम योग्य नाहीत. त्याला सात्विक परिणामच पाहिजे (११) रजोगुणी किंवा तमोगुणी असणारी (१२) हिंसेचे विधान (१३) संपूर्ण कल्याण करणारा असा दयामूर्ति (१४) चिरंतन.*

**आणि तृणधान्यादि[१] भक्षण । तेंही क्षुन्निवृत्तिकारण[२] ।**
**(य३-२३१) तेथही अनुराग[३] सोडोन । केवळ हरिभजनार्थ[४] प्राण वाचवावा ॥२९॥**
**[५]'अतोऽहस्तानि'त्यादि पदें । नाहीं योजिलीं हिंसानुरोधें[६] ।**
**तयांचा अभिप्राय हाचि बोधें । कीं, सर्वविनोदें[७] काळग्रस्त[८] ॥१३०॥**
**अहो ! ब्रह्मक्षेत्र[९] ओदन[१०] । ऐसी श्रुति आहे म्हणोन । काय मनुष्यीं मनुष्यभक्षण[११] । स्वीकारावी ? ॥३१॥**
**श्रुत्यभिप्राय ऐसा । कीं सर्वलयकारण[१२] जगन्निवासा[१३] ।**
**येथही मूलाभिप्राय[१४] तैसा । श्रुत्यन्वयें[१५] सहसा ग्रहण कीजे ॥३२॥**
**'अत्ता[१६] चराचरग्रहणादिति' । सूत्रें परमेश्वराप्रती । लयत्वकारणत्वसंमती[१७] । उपादान विवक्षया ॥३३॥**
**तेंवी 'जीवो जीवस्य[१८] जीवनं' या पदावरून । सर्वचि जीवकल्पित[१९]म्हणोन ।**
**उपादानविवक्षया[२०] लयकारण । जीवचि दृष्टिसृष्टिवादें[२१] ॥३४॥**
**अथवा प्रतिबिम्बापेक्षी-बिम्बत्वावच्छिन्न । बिम्बरूप ब्रह्म[२२] जीवाधिष्ठान[२३] ।**
**तोचि आरोपें[२४] लयकारण[२५] । हें बोधिती पूर्ण लयपदें ॥३५॥**

*(१) गवत अन्न खाणे (२) क्षुधाशांतीकरिताच (३) आवड, आसक्ति (४) श्रीहरीचे नामसंकीर्तन करण्याचे आवडीने (५) म्हणून ज्याला हात नाहीत इत्यादि (६) हिंसानुकूल (७) सहज (८) नाशिवंत (९) ब्राह्मण व क्षत्रिय (१०) अन्न (११) मनुष्याने मनुष्य खावा याअर्थी (१२) सर्व सृष्टीच्या नाशाचे कारण (१३) भगवान् (१४) मूळ श्लोकातील भाव (१५) श्रुतीस अनुसरून (१६) सर्व स्थावर जंगम पदार्थांचा लय करणारा म्हणून तो खाणारा आहे (१७) सृष्टीचा संहार करणारा व सृष्टीची उत्पत्ति करणारा (१८) जीवाची उपजीविका जीवावरच आहे (१९) जीवानेच आपल्या कल्पनेने कल्पिलेले (२०) सृष्टीचे उपादान कारण जीव आहे हे सांगण्याकरिता जीवाच्याच ठिकाणी सृष्टि लय पावते म्हणजे जीवच सृष्टीचे लय कारण आहे (२१) दृष्टिसृष्टिवादानुसार (२२) प्रतिबिंबरूप जो जीव त्याच्या अपेक्षेने बिंबसंज्ञेस पात्र झालेले ब्रह्म (२३) ज्यावर जीवभावाचे स्फुरण होते (२४) जीवाच्या कल्पनेनुसार (२५) लयाचे स्थान*

**॥ पद ॥**

**यदुनंदन म्हणा । वदनीं यदुनंदन म्हणा ॥ध्रु०॥**
**नेणति शिव कमलासन तो व्रजीं । यशुमतिसुत[१] चिमणा[२] ॥१॥**
**मंजुळ वेणु[३] रवांकित, सुजनां । दाखवी आत्मखुणा[४] ॥२॥**
**अलकावतिपतिनंदिनिरमण[५]-। चरणनख चिंति मना ॥३॥१३६॥**

**॥ पद ॥**

**भजिये[६] श्रीभगवंत ॥ ध्रु० ॥**
**जिनकि प्रभा[७] जगरूप भई है । सत्यज्ञानमनंत ॥१॥**
**जाननहारे[८] पग-लपटानें[९] । अविकल[१०] श्रुति मुनि संत ॥२॥**
**अलकावतिपतिनंदिनिप्रियकर[५] । व्यापि रहे बहिरंत[११] ॥३॥३७॥**

**॥ अभंग ॥**

**सकल मोहासी[१२] कारण हा भेद । विस्तार अगाध अविद्येचा ॥१॥**
**यास्तव निगमवचनें[१३] अव्यंग[१४] । जग राधारंग[१५] देखावें कीं ॥२॥**

जें जें दृष्टि विश्व तें तें गोपीनाथ । टळती अनर्थ तेव्हां सारे ॥३॥
आळंदीचा राणा होतां कृपावंत । निर्भय हा पंथ[१६] होय तेव्हां ॥४॥३८॥

॥ पद ॥

फटक्याचे चालीवर

अंतरिं हरि परि समजायाला भावें सद्गुरुचरण धरी ।
म्हणुनि[१७] राम निष्काम भवांबुधिमाजिं[१८] चालवी नाव[१९] तरी ॥ध्रु० ॥
भाव धरुनि त्यज राव विनवणी[२०] हाव सोडुनी विषयांची ।
दृश्यजात[२१] अज्ञात-सत्य[२२] नच, यास्तव रोधी[२३] मति साची ।(य३-२३२)

*(१) यशोदेचा मुलगा (२) लाडका (३) सुस्वर मधूर अशा वेणूच्या नादाला लुब्ध झालेल्या सज्ञनांना (४) आत्मानुभव (५) आळंदीचे राजे (श्रीज्ञानेश्वरमहाराज) त्यांच्या कन्येच्या (ग्रंथकर्त्याच्या) पतीच्या (श्रीकृष्णाच्या) पायाचे नख (६) भजा (७) तेज, कांति (८) जाणणारे (९) पायाचे ठिकाणी आसक्त झाले (१०) स्थिर, अखंड (११) अंतर्बाह्य (१२) अविवेकाला (१३) वेदवाक्याने (१४) परिपूर्ण (१५) कृष्णस्वरूप (१६) मार्ग (१७) गावुनि (१८) संसारसागरात (१९) नौका (२०) श्रीमंताची खुशामत (२१) सर्व दिसणारे पदार्थ (२२) ज्ञात नसतांना असणारे. ज्ञातसत्व व अज्ञातसत्व अशा दोन वेदान्तांत परिभाषा आहेत. जेव्हा आपण अस्तित्व जाणतो तेव्हांच ज्यांचे अस्तित्व असते अशा पदार्थांना ज्ञातसत्व किंवा प्रातिभासिक म्हणतात. उदा. दोरीवर भासणारा सर्प. दोरीवर भासणाऱ्या सर्पाचे अस्तित्व, आपण कल्पनेने जे त्यांचे अस्तित्व मानले किंवा ग्रहण केले, त्या कल्पित अस्तित्वाच्या ज्ञानावर अवलंबून आहे असे वाटते तोपर्यंतच तो सर्प अस्तित्वात आहे. अस्तित्वाची कल्पना नाहीशी झाली की सर्पनिवृत्ति झाली. सृष्टीतील सर्व पदार्थ अशाप्रमाणे ज्ञातसत्व म्हणजे त्यांचे अस्तित्व भासते तोपर्यंत राहणारे आहे. म्हणून सृष्टीतील सर्व पदार्थांना नाशिवंत, क्षणिक म्हणतात. पण परब्रह्मवस्तूचे अस्तित्व सृष्टीतील पदार्थाच्या अस्तित्वाप्रमाणे आपल्या कल्पनेवर अवलंबून नाही. आपल्याला त्याच्या अस्तित्वाची कल्पना नसली तरी त्याचे अस्तित्व राहते, म्हणून परब्रह्माला अज्ञातसत्व म्हणजे अस्तित्वाची कल्पना असते तेव्हां व नसते तेव्हांहि अखंड राहणारे असे म्हणतात अर्थात् अज्ञातसत्व म्हणजे अविनाशी असा अर्थ झाला (२३) विषयापासून चित्ताचा रोध कर*

जाया-[२]माया, जाया-काया[३] शेवटिं होइ न कोणाची । गाई मुखीं गोविंद सोडुनी अंधवृत्ति[४] तनुज-धनाची[५] ।
न करुनि भवनदिसलिलीं[६] मज्जन[७] सज्जन पाही नयनभरी । म्हणुनि०॥१॥
अझुनि कसें उमजेना तुजला अंगीं[८] जडले रिपु[९] नाना । पैसे तोंवरि म्हणती ऐसे बाबा काका आणि नाना ।
यमदंडाला[१०] नेणुनि धुंडिसि मिळवाया अवनीं[११] माना[१२] । देह अमर मानुनी कापिसी कुटुंबभरणा जनमाना[१३] ।
पाप करुनि अनुताप[१४] नच कसा झाला तुजला आजवरी । म्हणूनि० ॥२॥
निगमगदित[१५] निजधर्माचरुनी[१६] आधिं करावें शुद्ध मना । चित्तवृत्ति दाबाया करणें शंकरकेशवउपासना ।
वाणि नाममय करुनि पवनमय[१७] मिळवुनि साधी सगुणपणा ।
संतवचन ऐकसील ना तरि काळभुजग[१८] मारील फणा ।
दीनविनवणी ऐकुनि बापा ज्ञानेश्वर प्रभु घे पदरीं ॥ म्हणूनि० ॥३॥३९॥

*(२) स्त्री हे मायेचेच रूप आहे (३) स्त्री व देह (४) आंधळ्याप्रमाणे सर्वस्वी परस्वाधीन होऊन वागणे, मोह (५) मुलगा व संपत्ति यांची (६) संसाररूपी नदीच्या पाण्यात (७) बुडणे, बुडी मारणे (८) शरीरी (९) शत्रु-कामादिक (१०) यमधर्माच्या शिक्षेस (११) पृथ्वीवर (१२) सन्मान (१३) लोकांचे गळे (१४) पश्चाताप (१५) वेदांनी सांगितलेला (१६) आपला धर्म आचरून (१७) प्राणमय (१८) काळरूपी सर्प.*

॥ पद ॥

दृश्य दिसे तें राम मनुजा ! दृश्य० ॥ ध्रु० ॥
भोक्ता भोग्य न भेद मिळे परी । माया वाढवि काम ॥१॥
अस्ति[१] भाति प्रिय त्रय[२] एकपणीं । जाणुनि त्यज रूप नाम ॥२॥
अलकावतिपतिनंदिनिपतिपदीं[३] । घे अक्षय विश्राम[४] ॥३॥१४०॥

॥ ओव्या ॥

मग मुनि म्हणे ऐक राया । नानात्व भासे हरीची माया । ब्रह्मादिकां नये आया[५] । बंधन वायां वाढवी ॥४१॥
सृदिदानंद नारायण । आपणपें[६] तो नव्हे भिन्न । परी भोक्तृभोग्यचिन्ह[७] । भासे ते जाण अविद्या ॥४२॥
जैसें शुक्तिकेवरी[८] रजत[९] । निरखोनि पाहतां[१०] न दिसे तेथ । तैसें वृत्त्यनाकलनीय[११]समस्त । विश्वजात ओळखे ॥४३॥
येचविषयीं उपपत्ती[१२] । अधिष्ठूनी निजानुभूती[१३] । तुज सांगेन यथामती । असों दे पुढतीं अवधान ॥४४॥
'सत्[१४] तेंचि चिद । चिद तेंचि आनंद । वस्तु नोहे त्रिविध । एकपद निजानंदें' ॥ (स्वात्मानुभव एकनाथ.)
'सत्ता[१५] प्रकाश सुख । या तिहीं तिहीं उणें लेख । जेंवी विषपणेंचि विख । विखा नाहीं' ॥१॥ अमृ.
'मवाळ[१६] कां उजाळ । कीं उजाळ तेंचि मवाळ । कीं दोन्ही ना परिमळ । मात्र जें ॥४॥ अमृ.
'ऐसें एके कापुरपणीं । तिन्ही इयें तिहीं उणीं । इयेपरी[१७] आटणी । सत्तादिकांची ॥५॥ अमृ. (य३-२३३)

*(१) सत्ता, चैतन्य व आनंद (२) तीन (३) श्रीज्ञानेश्वरमहाराजांच्या कन्येच्या पतीच्या चरणी (४) विश्रांति (५) आटोक्यांत (६) आपलेपणाने (७) सुख भोगणारा व सुखाचा विषय हे द्वैत लक्षण (८) शिंपेवर (९) चांदी (१०) नीट न्याहाळून (११) अस्तित्वरूपाने किंवा आहे असे ग्रहण करण्यास अयोग्य (१२) युक्ति (१३) स्वानुभवास धरून (१४) सृदिदानंद वस्तु तीन प्रकारची नाही तर एकरूप आहे (१५) सत्ता, चैतन्य आणि सुख या तिघांच्या ठिकाणी तीनपणा नाही ज्याप्रमाणे विष हे विषाला कांही विषपणाने भासत नाही (१६) नरमपणा, पांढरेपणा व सुगंध हे जसे कापराचे ठिकाणी एकरूप आहे (१७) सृदिदानंदाच्या त्रिविधपणाची ब्रह्माचे ठिकाणी आटणी आहे.*

एऱ्हवीं[१] सृदिदानंदभेदें । चालिलीं तिन्हीं पदें । परी तिन्हीं उणी आनंदें । केली येणें ॥६॥ अमृ.
सत्ताचि[२] कीं सुख प्रकाशू । प्रकाशूचि सत्ता उल्हासू । हें न निवडे मिठांशू । अमृतीं जेंवी ॥७॥ अमृ.
(अमृतानुभव प्र० ५ ओ.१ व ४ ते ७. )
ऐसीं मदीयजननीवचनें[३] । जीं ब्रह्मानंदगंधसुमनें[४] । युक्त्या[५] अभिप्राय येणें । पिकले आथी ॥४५॥
अहो आनंद आणि चेतन । सत्तेहून मानतां भिन्न । तरी तो अयथार्थ[६] म्हणोन । अग्राह्य[७] कीं ॥४६॥
तैसें चैतन्य आणि सत्ता । आनंदाहून जरी अन्यथा[८] । तरी तया दुःखरूपता । अग्राह्यता यास्तव ॥४७॥
यास्तव सत्ता आणि आनंद । जरी पावती चिद्भेद[९] । तरी जडता होईल सिद्ध । अग्राह्य अशुद्ध[१०] यास्तव ॥४८॥
एवं सृदिदानंद तिन्ही । एकरूप ही तातवाणी । आतां अनुभवा आणी । वृत्ती ऐसी ॥४९॥
प्रथम[११] अंश स्पष्ट[१२] ज्ञान[१३] । मग पूर्णपणीं[१४] संयोजन[१५] । शब्द तंव समाश्रयण[१६] । शब्दार्थभेदा[१७] ॥१५०॥
भोग्यामाजीं[१८] उमटे[१९] सत्ता । चिद्विशिष्ट[२०] भासे भोक्ता[२१] । सृदिदानंदैकसमता[२२] । साक्षी सर्वथा भासत ॥५१॥
तथापि सत्ता कळे । ऐसा जो अर्थ[२३] उजळे । ती सत्ता अज्ञात[२४] कळे । कीं ज्ञानरूपें ? ॥५२॥

*(१) एरवी पाहता सृदिदानंद ही पदें भेदाने भासतात पण आनंदाचे ठिकाणी ती एकरूप होतात (२) अमृतातील गोडपणा जसा वेगळा करिता येत नाही त्याप्रमाणे सत्ता, चैतन्य व सुख एकमेकांपासून वेगळे काढिता येत नाहीत (३) माझ्या आईचे म्हणणे (४) ब्रह्मानंदाच्या सुगंधाने युक्त असलेली फुले (५) हे श्रीज्ञानेश्वर महाराजांचे जे म्हणणे आहे ते त्यांनी पुढील युक्तीच्या बळाने दृढ करून अनुभवाच्या गोडीस आणले आहे (६) खोटा (७) वृत्तीने ग्रहण करण्यास अयोग्य (८) निराळे (९) चैतन्याहून निराळे (१०) मायागुणमिश्रित (११) सत् अंश (१२) उघड (१३) चैतन्यरूप (१४) अंशपणाविरहित (१५) लावणे, घटविणे (१६) शब्दाचा आश्रय करणे (१७) शब्दाचा व अर्थाचा भेद दाखविण्याकरिता (१८) आपण जे विषय भोगतो त्या विषयांना भोग म्हणतात, त्यामध्ये (१९) अनुभवास येते (२०) चैतन्ययुक्त (२१) भोक्ता जीव, विषय भोगणारा (२२) सृदिदानंदाचा समानपणा किंवा एकपणा (२३) असे जे ज्ञान होते (२४) कळली नाही अशी.*

अज्ञान रूपें कळेल सत्ता । तरी कळणें निःशेष होईल वृथा । कळणें एक सत्य होतां । तरी अज्ञातत्व[१] वृथा पैं होय ॥५३॥
अहो मिथ्या मानितां कळतेपण[२]। तरी मग सत्य होईल अज्ञान ।आणि सत्य आहे अज्ञान ।हें मिथ्या ज्ञान जाणें केंवी ॥५४॥
मिथ्या ज्ञान जाणे सत्य अज्ञान । येथ युक्ति वा अनुभव काय प्रमाण ।
आतां सत्यज्ञान जाणे अज्ञान । हेंही भाषण व्यर्थची ॥५५॥
बाधकवस्तुवरी[३] तत्त्वतां । अवलंबुनी बाध्य सत्ता[४] । तरी विरोध[५] झाला वृथा । पूर्वपक्षसिद्धांता[६] एकपण ॥५६॥
म्हणाल अद्वैतीं[७] विरोध नाहीं । तरी अज्ञानशब्दार्थ[८]वदिजे कायी । शब्दा अर्था लवलाही । भेद नाहीं ज्ञानपणें[९] ॥५७॥
शब्द श्रवणवृत्तिगोचर[१०] । अर्थ मनोवृत्तिगोचर[११] । साक्षीभास्य[१२] प्रकार । दोन्हीठायीं ॥५८॥

**शिकोनियांही वेदांत । उगेंचि आश्रयिती द्वैत । भगवत्प्रेम सांडोनि यथार्थ । हेंचि आश्चर्य वाटतें ॥५९॥**

**आतां दीपक[१३] भासक[१४] भास्य[१५] घटू । तैसा साक्षीभास्य[१६] जगत्पटू[१७] । हे सत्तात्रिविधवाक्पटु[१८]। बोलताती ॥१६०॥**

**(य३-२३४) तरी हा विषम[१९] दृष्टांत । कारण पूर्ण सिद्धांतानुस्यूत[२०] ।**

**जो असे सिद्धांतांशानुस्यूत[२१] । त्यास दृष्टांत म्हणताती ॥६१॥**

*(१) नाही कळली हे (२) ज्ञान (३) कल्पिताचा नाश करणारी (४) जो पदार्थ कल्पित म्हणून मिथ्या ठरतो, त्याचे अस्तित्व (५) सत्यज्ञान व मिथ्या अज्ञान यांची विषम (भिन्न) सत्ता मानल्यामुळे विरोध राहात नाही. विरोध समसत्तेत असतो (६) पूर्वपक्ष व सिद्धान्त् हे दोन्ही एक होतात (७) अद्वैतामध्ये (८) अज्ञान शब्दाचा अर्थ काय? (९) ज्ञानदृष्टीने किंवा दोन्ही ज्ञानस्वरूप असल्यामुळे (१०) श्रवणेंद्रिय वृत्तीने कळणारा (११) मनोवृत्तीस कळणारा (१२) साक्षीच्या दृष्टीने शब्द व अर्थ दोनही मिथ्या (१३) दिवा (१४) प्रकाशित करणारा (१५) प्रकाशित होणारा (१६) साक्षीप्रकाशाने कळणारा (१७) प्रपंचरूपी वस्त्र (१८) तीन सत्ता मानणारे शब्दपंडित (१९) गैरलागू (२०) पूर्ण सिद्धांताचे ठिकाणी राहणारा (२१) सिद्धान्ताचा जो अंश व्यापून राहतो*

**यद्यपि दृष्टांत आशंकनीय[०] । तथापि पाहिजे दृष्टांत जातीय[१] । जातिच्छेदें[२] सहज होय । व्यक्तिशून्य[३] ॥६२॥**

**दीपयोगें[४] घट भासे । येथ दीप[५] आणि घटज्ञान उमसे[६] । ज्ञानाविरोधी[७] अज्ञान कैसे । यास्तव जे भासे ते ज्ञान ॥६३॥**

**एवं भोग्यामाजी[८] सत्ता । तेथही उमटली[९] आहे चित्ता[१०] । म्हणोनि चैतन्यविशिष्ट[११] भोक्ता । तोचि पैं भोग्य ॥६४॥**

**आतां परमप्रेमास्पद[१२] भोक्ता । आनंदाविरोधी[१३] भोग्य सर्वथा ।**

**मग साक्षित्वें[१४] भोग्य भोक्ता । सृदिानंदैकता[१५] न पवती कां ? ॥६५॥**

**तथापि जैसा अंधकार । औष्ण्यविरोधी[१६] नव्हे साचार । तरी प्रकाश पडतां निर्धार । नाशोनि जाय ॥६६॥**

**तैसें अनादि[१७] भावरूप[१८] अज्ञान । तेंवी भेद[१९] चैतन्यविरोधी[२०] पूर्ण ।**

**तथापि सत्ताविरोधी[२१] नाहीं म्हणोन । मिथ्यावगमन[२२] होत असे ॥६७॥**

**<u>मग अपेक्षुनी</u>[२३] <u>अज्ञानवृत्ती । व्यतिरेकबाधाभावविशिष्ट</u>[२४] <u>सत् म्हणती ।</u>**

**<u>वृत्तिविशिष्ट</u>[२५] <u>चैतन्य गणती । आणि प्रीत्यादिवृत्त्यवच्छिन्न</u>[२६] <u>आनंदू ॥६८॥</u>**

*(०) शंका घेण्यास योग्य (१) दृष्टान्ताच्या जातीचा (२) जातीच नाही तिचाच उच्छेद झाला तर (३) व्यक्तीचाहि नाश, जाति नाही तर व्यक्ति कोठली आली (४) दिव्याने (५) दिव्याचे घटाचे दोघांचेहि ज्ञान (६) स्फुरते, होते (७) ज्ञानाच्या अविरुद्ध अज्ञान कसे राहू शकते (८) विषयांचे ठिकाणी (९) स्पष्ट दिसते (१०) चैतन्य (११) चैतन्ययुक्त (१२) अत्यंत प्रेमस्वरूप (१३) आनंदाच्या अविरोधी म्हणजे आनंदरूप (१४) साक्षीदृष्टीने (१५) सृदिानंदाचा एकपणा (१६) उष्णतेच्या विरोधी (१७) उत्पत्तिरहित (१८) अनिर्वचनीय भावरूप - अज्ञान आहे ते कसे आहे, सत आहे की असत् यापैकी कांही सांगता येत नाही असे आहे (१९) अज्ञान आणि भेद (२०) चैतन्याने नाहिसे होणारे (२१) सत्तेच्या विरुद्ध (२२) मिथ्या भास (२३) अपेक्षा घेऊन, अपेक्षेने - अज्ञानवृत्तीच्या अपेक्षेने (२४) व्यतिरेकाने होणाऱ्या बाधाचा अभाव जेथे असेल ते सत्. जगताचे ठिकाणी जे अस्तित्व आहे ते ब्रह्माचे अस्तित्व होय. म्हणून जगताचे ठिकाणचे हे अस्तित्व निराळे केले तर जगत् कांही राहत नाही जगताचा बाध होतो. असा बाध ज्याचा होत नाही ते सत् होय (२५) वृत्तियुक्त, वृत्तीने मर्यादित, वृत्तिरूप (२६) प्रीतिवृत्तिरूप*

**एवं सिद्धदृष्टीं अज्ञान नाहीं । साधक पुसेल जरी कांहीं । तरी ही रीति लवलाही । उपयोगी तया ॥६९॥**

**इया प्रक्रियया[१] निदिध्यासन । '<u>निदिध्यासनप्रकाशी</u>' पहावें पूर्ण ।**

**मग आनंदें[२] वारूनि[३] तीनपण[४] । सुखान्वयें[५] भजन करावें ॥१७०॥**

**<u>एवं अद्वैत भगवद्भक्ति</u> । इजपुढें तुच्छ वाटे मुक्ति । जे प्रतीत नाहीं बंधनोच्छित्ति[६] । म्हणोनियां ॥७१॥**

*सृष्टि-उत्पत्तीचा क्रम*

*ब्रह्मस्फुरण - स्वभावलीला - तीतून भक्ति विग्रह*

आतां अनुभवाचेनि योगें । चैतन्य(७) उमजे अवघें । परी तरंगानुकूल(८) तरंगें । भेद भासे ॥७२॥

अहो ! सागराचें पाणी । स्थूलदृष्टीं(९) घन(१०) स्वस्थानीं(११) ।

परी तरंगप्रत्यय(१२) होताचि क्षणी । तरंगसंधीत(१३) गगन(१४) उमटे(१५) ॥७३॥

एऱ्हवीं पाणी आणि तरंगांत । स्थूलदृष्टींचि भेद भासत । तैसेंचि उमटे येथ । विश्व विख्यात स्थूलदृष्टीं ॥७४॥

अहो ! ज्ञानाचे जे तरंग । त्याचेंचि नांव वृत्तिभाग(१६) । ज्ञानामाजीं पाहतां चांग । भेद नुमटे सर्वथा ॥७५॥

परी ज्ञानतरंग उठतां वृत्ती । वृत्तिसंधींत(१७) आकाशप्रतीती(१८) ।

'तस्माद्वा एतस्मादात्मन आकाशः संभूतः' ही श्रुति । हेंचि बोधी ॥७६॥

तरंगावरी(१९) दृष्टि जाय । तैं तरंगसंधींत आकाश होय । तैसी वृत्तीवरी दृष्टि जाय । तैं वृत्तिसंधींत होय गगन ॥७७॥

वृत्तिसंधि(२०) ब्रह्म केवळ । (य३-२३५) परी तेंचि भासें गगन प्रबळ । आणि वृत्तीचे जे तरंग सबळ । वायू तो ॥७८॥

आणि वृत्तिरूप गगन तोचि पवन । एवं शिष्यस्थित(२१) अज्ञानेंकरून(२२) ।

संधिगत(२३) ब्रह्म तेचि गगन । वृत्तिकल्लोळ(१) अनल(२) तो ॥७९॥

*(१) या प्रक्रियेने (२) आनंदाने, प्रेमाच्या योगाने (३) नाहिसे करून (४) सृदिानंदातील त्रिविधपणा (५) सुखाचे अनुसंधान करून, सर्वत्र सुखस्वरूप परमात्मा भरला आहे या बुद्धीने (६) बंधनाचा नाश (७) सर्वत्र चैतन्य व्याप्ति कळते (८) तरंगासारखें तरंग उठत गेल्यास (९) वरवर पाहणाऱ्याला (१०) अचल (११) आपल्याच ठिकाणी असलेले पण (१२) तरंगाचा अनुभव आल्यास (१३) दोन तरंगामध्ये (१४) पोकळी, अभाव, खंड (१५) भासते (१६) निरनिराळ्या वृत्ति (१७) दोन वृत्तीत (१८) पोकळी भासते (१९) तरंगाकडे लक्ष दिल्यास (२०) वास्तविक पहाता दोन वृत्तीमध्ये (२१) शिष्याचे ठिकाणी असलेल्या (२२) अज्ञानामुळे (२३) दोन वृत्तीमधील.*

वृत्तिकल्लोळ(१) अनल(२) तो ॥७९॥

मग वृत्तिकल्लोळाचेनि योगें । वृत्त्याघातप्रवाहसंगें(३) । तया नांव बोलिजे सवेगे । आप ऐसे ॥१८०॥

तया वृत्तीचे तीव्रपण(४) । वृत्ति जेथ संधिगत विसरे गगन । तेंचि गा पृथ्वीलक्षण । निश्चयें जाण कुरुराया ॥८१॥

अहो ! ब्रह्म जेव्हां विसरलें । म्हणोनि संधीचे(५) आकाश झाले ।

आणि आकाश जेव्हा विसरले । तेव्हां तीव्रपणें होऊं लागलें पवनभान(६) ॥८२॥

पवनामाजीं सुलभ संधी । तेथही जाहलिया विस्मृत्यवधी(७) । पृथ्वीपर्यंत प्रसिद्धी । विस्मृतीची ॥८३॥

एवं वृत्तीवरी दृष्टि जातां । तरी उपजों लागें विश्वसत्ता(८) ।

आतां ज्ञान जाहलियावरी तत्वतां । जरी वृत्ति भक्तिपंथा जाउं लागे ॥८४॥

तरी चैतन्याचेंनि दाटपणें(९) । योग्य नाहीं वृत्तिस्तंभणें(१०) । परी वृत्ति उठतां प्रमाणें(११) । उठेल गगन कां झणीं ? ॥८५॥

यालागीं वृत्ति ब्रह्म जरी । परंतु गगनप्रतीति होईल तरी । वृत्ति व्यापितां विश्वभरी(१२) । झणीं गगनप्रतीति होय ॥८६॥

ते गगनप्रतीति न होआवी म्हणून । वृत्ति उठतांही झालिया ज्ञान ।

तरी वृत्तीनें न द्यावें अवकाशपण(१३) । राहावें होऊन एकवट(१४) ॥८७॥

याचिलागीं ब्रह्मानंद । संध्यवकाश(१५) न देतां प्रसिद्ध । वृत्तिरूपें जे व्यक्ति सिद्ध । अवतार विषद या नांव ॥८८॥

तरंगाचे तुहिन(१६) करितां । तरी संधींत न भासेल अवकाशता ।

तैसें ज्ञानानंतर वृत्ति एकवटतां । तरी ब्रह्माची गगनता होईलना ॥ ८९ ॥

तैसें वृत्तितरंगाचें घन(१७) । भगवच्छरीर करितां जाण । ज्ञानानंतर ब्रह्म गगन । न भासे कदा ॥१९०॥

*(१) वृत्तीचे एकामागून एक उठणे व परस्परावर आदळणे (२) अग्नि (३) वृत्तीचा परस्परावर होणार आघात, त्याचा प्रवाह, किंवा वृत्तीवर वृत्तीचा एकसारखा आघात होणे, त्यामुळे (४) दृढ ध्यान (५) दोन वृत्तीमधील ब्रह्माचे (६) वायूचा भास (७) मर्यादा (८) प्रपंचाचा भास (९) घनदाट भरले असल्यामुळे (१०) दाबणे (११) सत्यपणाने (१२) संपूर्ण जगत्भर (१३) ब्रह्म विसरून पोकळीची कल्पना न यावी म्हणून (१४) एकरूप, ब्रह्मरूप (१५) संधीचे ठिकाणी अवकाशाचा भास (१६) बर्फ (१७) अवकाशरहित.*

जरी नाहीं गगनप्रतीति । तरी कैसी होईल सृष्टि-उत्पत्ती ।
यास्तव भक्तिवांचोनि विदेहमुक्ति । न होय निश्चिती ज्ञानप्राप्तौ[१] ॥९१॥
एवं ज्ञानानंतर देशप्रतीति[२]। न व्हावी म्हणून पाहिजे भक्ति ।
तैसी ज्ञानानंतर कालप्रतीति[३]। न व्हावीं यास्तव भक्ति इष्ट ॥९२॥

*लाजिरवाणा प्रसंग*

ब्रह्मरूप झालिया ज्ञान । तेव्हां ब्रह्मरूपचि अंतःकरण । मग एक वृत्ति उठोन । दुसरी वृत्ति उठावी ॥९३॥
एका वृत्तीचा लय[४] होवावा । म्हणजे तेवढा ब्रह्मांश लया जावा ।
दुसरा वृत्तिभाव यावा । (य३-२३६) तेव्हां उदया यावा ब्रह्मांशू ॥९४॥
अखंडैकरसचेतनीं[५] । अंशकल्पना[६] लाजिरवाणी । आणि वृत्ति तंव उठलियावांचोनी । न राहे हा अनुभवो ॥९५॥
वृत्ति उठो न देतां । तरी वृत्तिरोधनश्रम[७] तत्वतां । वृत्तिरोधश्रम करितां । तरी न येईल मुक्तता[८] आत्मप्रीति ॥९६॥
श्रम आणि प्रेम । हे दोन्ही विरुद्ध परम । ज्ञानानंतर वृत्तिरोधश्रम । तरी कुंठित[९] आत्मप्रेम होईल की ॥९७॥
एवं *ज्ञानानंतर वृत्ति रोधिता । तरी आत्मप्रेमोल्हास-संकोचता[१०] ।
आणि *ज्ञानानंतर वृत्ति न रोधितां । तरी ब्रह्मांशु-उत्पत्तिलयता[११] उगी भासे ॥९८॥
एक वृत्तिरूप ब्रह्मांश हारपावा । दुसरा वृत्तिरूप ब्रह्मांश निघावा । ऐसा प्रत्यय आघवा । सांपडे करीं ॥९९॥
एवं दोहीं पक्षीं निग्रहण[१२]। त्यास उपाय एकचि जाण ।
वृत्ति[१३]करितां सगुणमय घन । तें लया[१४]सगुण न जाय प्रेमें ॥२००॥
येणें ब्रह्मांश लया जाणे । या कालप्रत्यया[१५] निःशेष खाणें ।
आणि 'सगुण' प्रेमचि म्हणोनी न संकोचणें । आत्मप्रेमा कदापि ॥१॥

*(१) ज्ञान प्राप्त झाले तरी (२) देशाचा भास (३) कालाचा भास (४) नाश (५) सदासर्वदा एकरूप राहणाऱ्या चैतन्याचे ठिकाणी (६) अवयवकल्पना (७) वृत्तीचा रोध करण्याचे श्रम (८) आत्मप्रीतिरूप किंवा आत्मानंदरूप मुक्तीचा अनुभव, मोकळी आत्मप्रीति (९) मर्यादित, संकोचित (१०) मोकळ्या आत्मप्रेमाच्या उल्हासाला मर्यादा (११) ब्रह्माच्या वृत्तिरूप अंशाची उत्पत्ति व लय (१२) वादीची निरुत्तर स्थिति, कैचीत सापडणे (१३) वृत्तीला सगुण भगवन्मय करणे हेच तिला अवकाशरहित घन करणे आहे (१४) नाशाला (१५) काळाच्या भासाला.*

मूळामाजीं 'अद्य' पद । तयाचा अर्थ नित्य वर्तमानबोध । आणि जे कां असे 'भगवान्' पद । तें आत्मप्रेम न संकोची ॥२॥
म्हणोनी अखंड राहावें सगुण । हेंचि ज्ञानानंतर कालप्रत्ययखंडन[१] ।
आतां कालद्वेष[२] न व्हावा म्हणून । तोचि भगवान काळरूप ॥३॥
'सः' याचें मूळ तत्पद । तें अपरोक्षचि प्रसिद्ध । यालागीं 'अयं' पद । ठेविलें असे ॥४॥
तत्पद[३] अपरोक्ष परम प्रीति । तोचि या भूमीवरी अवतरला निश्चिती । येथ अपरोक्ष हृदयबुंथी[४] । बोधिली आहे ॥५॥
'अस्याम्' येणें पदेंकरून । अपरोक्ष हृदयभूमिबोधन[५] । 'सोऽयं' या पदेंकरून । बोधिली तत्पदअपरोक्षता[६] ॥६॥

*व्यष्टि-समष्टि*

*कामकोध-दैत्यअसुर*

अहो ! व्यष्टिहृदय[७] तनुसंस्थिती[८] । समष्टिहृदय[९] द्वारावती[१०] ।
व्यष्टिहृदयीं जी प्रेमवृत्ति । ती कृष्ण व्यक्ति समष्टिहृदयीं ॥७॥
यालागीं हे माझी वाणी । रूपक न म्हणावी सज्जनीं । सन्निवेशें[११] दिसे नयनी । चक्रपाणी अविनाशू ॥८॥
आत्मयाच्या विरुद्ध कहीं । विषमसत्ता[१२] उपजली नाहीं । हाचि अभव[१३] लवलाही । सुरद्विषांचा[१४] ॥९॥
जें सुरद्विषां नाहीं भव[१५] । यालागीं ऐसा अनुभव । आत्मप्रेम झालिया सावेव । मग जो हा भव तो अभवची ॥२१०॥
कालरूप भगवान । म्हणावया हेंचि कारण । (य३-२३७)
कीं नित्य काळापुढें जाण । तत्खाद्य[१६]भव नित्य[१७]नुमटे[१८]॥११॥

*(१) काळाच्या भासाला नाहिसे करण्याचे साधन (२) कालाच्या भासाविषयी द्वेषवृत्ति (३) ब्रह्म परमप्रेमास्पद आहे असा जो परमप्रीतीच्या रूपाने तत्पदाचा साक्षात् अनुभव येतो (४) साक्षात् अनुभवाला येणारा अंतःकरणवृत्तींचा कल्लोळ (५) आपल्याला अनुभूत असणारे हृदय हीच भूमि समजावी (६) तत्पदाचा अनुभव (७) जीवाचे अंतःकरण (८) अल्पदेश (९)*

*हिरण्यगर्भाचे अंतःकरण (१०) द्वारका देश (११) प्रेमपूर्वक चित्त लागल्याने (१२) भिन्न सत्ता (१३) मोक्ष (१४) असुरांचा (१५) संसार (१६) त्याच्याकडून गिळले जाणारे (१७) संसार (१८) अविनाशी ठरत नाही (१९) जीवांच्या अंतःकरणातील चांगल्या वृत्ति ज्या शांति वगैरे त्यांच्या विरोधी कामक्रोध वृत्ति आहेत.*

अहो ! व्यष्टिसद्वृत्तिविरोधी कामक्रोध । समष्टिसद्विरोधी[१] दैत्य प्रसिद्ध ।
जे तीव्र[२] जाहले कामक्रोध । तेंचि शरीर असुरांचें ॥१२॥
दृष्टिसृष्टिवादेंकरून[३] । मन तेंचि शरीर जाण । यालागीं कामक्रोधाचें तीव्रपण । असुर आपण जाहले ॥१३॥
आणि व्यष्टि-सद्वृत्तीची[४] तीव्रता । तोचि देवसमुदाय तत्वतां ।
आणि व्यष्टिहृदयीं प्रेमात्मसत्ता । तीचि तीव्रता कृष्णतनु[४] ॥१४॥
या तीव्रआत्मप्रेमहरितनुपुढें[५] । तीव्रकामादिअसुर बापडे । नाश पावताती फुडें । तद्रूपचि[६] होउनी ॥१५॥
कामक्रोधादिक पूर्ण । धर्मानुकूल[७] होतां जाण । तरी तेचि करोनि देती ज्ञान । मुक्तेश्वरवचन येविषयीं ॥१६॥
''काम असावा ईश्वरभजनीं । क्रोध असावा इंद्रियदमनीं ।'
ऐसी मुक्तेश्वरभारतवाणी । आणि ऐसेंचि चक्रपाणीही बोलिले ॥१७॥
'धर्माविरुद्धो भूतेषु कामोऽस्मि भरतर्षभ' (गी.अ.७.श्लो.११)
धर्माविरुद्ध[८] जो काम । तो मी स्वयें पुरुषोत्तम । तोचि मी विष्णु परम । बोलिजे ऐसा ॥१८॥
धर्माविरुद्ध जो काम निश्चिती । तेणेंचि चाले जगत्स्थिति । धर्माविरूद्ध जी क्रोध स्थिती । काळरूपे भगवंत मी ॥१९॥
यास्तव धर्माविरूद्ध ज्यांची प्रीति । ते देवरूपें मजमाजी मिळती ।
तीव्रक्रोधदैत्य जरी धर्मवश होती । तरी ते मिळती काळरूपीं माझ्या ॥२२०॥
एवं देवां असुरां दोहीं[९] मुक्ती । जयाचिया शुद्धभक्ती[१०] । ब्रह्मनंदन म्हणे कुरुपती । तीचि ही मूर्ति अविनाश ॥२१॥
एवं तीव्रसद्वृत्तिकार्य[११] सारिलें[१२] । तीव्राऽसद्वृत्ति[१३] संहारिलें । आतां अशेष[१४] राहिलें । प्रेमवर्धन[१५] ॥२२॥

*(१) हिरण्यगर्भाच्या अंतःकरणातील सज्ञनांच्या विरोधी (२) क्रोध इत्यादि दुष्ट वृत्ति तीव्र झाल्या म्हणजे त्याच असुरांचे शरीर बनतात (३) दृष्टिसृष्टिवादाच्या अनुरोधाने पाहता (४) जीवाच्या सद्वृत्ति तीव्र झाल्या त्याच देवता झाल्या व आत्मप्रेम तीव्र झालेलेच श्रीकृष्ण शरीर बनले (५) तीव्र आत्मप्रेम हे जे भगवंताचे शरीर त्यापुढे (६) भगवद्रूप (७) धर्मानुसार (८) धर्मशास्त्राच्या आज्ञेविरुद्ध नसणारा (९) दोघांनाहि (१०) शुद्ध भक्तीने (११) तीव्र सद्वृत्ति जे देव त्याचे (१२) केले (१३) दैत्य (१४) बाकी (१५) प्रेम वाढविणे.*

येथ कित्येकांचें मत । कीं देवकार्या अवतार होत । तयांसी पुसणें निश्चित । एक असें ॥२३॥
कीं देवकार्या अवतारधारण । तरी तें देवांच्या पुण्येंकरून ।
आणि असुरांच्या पापेंकरून । असुरसंहारण[१] सहज होय ॥२४॥
परी येथ एक दोष । देवांच्या पुण्यें अवतार विशेष । तरी अवताराचें प्रारब्ध निःशेष । देवपुण्य जाहलें ॥२५॥
तें देवकार्य संपादिता । तरी देवपुण्य संपेल तत्वतां । मग निवटोनि जाईल अवतारसत्ता[२] । प्रारब्ध क्षीण म्हणोनिया ॥२६॥
श्रीकृष्ण तंव दिसे अझुनी । यालागीं तो नव्हे कार्यदानी[३] । स्वयें अवतरला प्रेमवर्धनीं । निश्चयेंकरोनी ओळखे ॥२७॥
(य३-२३८) देवासी[४] तंव नाहीं कर्म । विरोधाभास अलंकारें परम ।
लावावयाचे असले धर्माऽधर्म । तरी भक्तप्रेमचि कर्म देवांचें ॥२८॥
आणि भक्तप्रेमीं प्रसिद्ध । आत्मप्रीतीचा अविरोध । आत्मप्रीति नित्य शुद्ध । यालागीं नित्य प्रेमप्रारब्ध देवांचें ॥२९॥
असो एवं कवणिये रीती । प्रेमवर्धक श्रीकृष्णमूर्ति । व्यष्टिसमष्टिहृदयीं[५] निश्चिती । तुम्ही कुरुपति हो ! अवलोका ॥२३०॥
'भवेद्यावदिहेश्वर' इति । मूळांतील चतुर्थपदोक्ति । तयाचा अर्थ निश्चिती । ऐसा आहे ॥३१॥
'ईश्वर' या वचनेंकरून । बोलिलें आहे नित्यपण । 'इह' या वचनेंकरून । अपरोक्ष समष्टिहृदयस्थान बोधिलें ॥३२॥
'भू' धातु सत्ताबोधक । यालागीं 'भवेत्' हें सत्तार्थक । हृदयीं नित्य ईश्वर निश्चित । तैसा नित्य पाहे समष्टिहृदयीं ॥३३॥
नित्य प्रेम व्यष्टिहृदयीं । नित्य कृष्ण समष्टिहृदयीं ।
यालागीं अवतारहनन[६] नाहीं । निजधामगमन[७] पाही हृदयद्योतक[८] ॥३४॥

*(१) दैत्यनाश (२) अवतार शरीराचे अस्तित्व (३) हा (देवांचें) कार्य (करून) देणारा (४) भगवंतास (५) आपल्या*

*चित्तात व ब्रह्मांडांत (६) अवतार शरीराचा नाश (७) आपल्या धामास गेले इत्यादि कथा (८) हृदय या अर्थी. हृदयात जो परमात्मा आहे तोच ब्रह्मांडांतहि प्रगट अवतार घेतो व पुढे निजधामास जातो म्हणजे हृदयातच राहतो*

**'यावत्'[१] हा तंव अलंकारू । नित्यानुरागें भजावा ईश्वरू । एवं ब्रह्मनंदनोद्गारू[२] । सप्रेमप्रणवाकारू[३] उमटला ।।३५।।**

**कर्ममय प्रणव ॐकार । भक्तिमय प्रणव साधु उद्गार[४] । यालागीं कृष्ण गोविंद हे उद्गार । सप्रेमप्रणव[५] बोलिजे ।।२३६।।**

**।। दिंडी ।।**

**बंधुसहित धृतराष्ट्र कुरूराया । सवें गांधारी घेउनिया जाया ।**
**हीमवंताच्या[६] दक्षिणेस पाहे । सन्मुनींच्या आश्रमीं सुखें राहे ।।३७।।**

**।। ओवी ।।**

**'शुचित्वें शुचि गंगा होय' । ऐसें बोलिले आलंदीराय । ती सप्तप्रवाहें[७] जेथ होय । सप्तऋषींच्या प्रीतिसाठीं ।।३८।।**

**।। पद ।।**

**जय जय मंदाकिनि जननी । माते ! जय जय ।। ध्रु० ।।**
**मलिन मंदमति जलकण[८] पिउनी । पडति न जनिमरणीं[९] ।।१।।**
**जडजलसम[१०] भाससि परि सेविती । चेतन सुजन मुनी ।।२।।**
**शूद्रजनक[११] परि हरिपदपावन । माय ! तुझेनि गुणीं ।।४।।**
**श्री ज्ञानेश्वरचरणामृत महीं[१२] । उदित[१३] दुरितशमनीं[१४] ।।४।। ।।३९।।**

**।। ओव्या ।।**

**तया सप्तश्रोततीर्थीं[१५] । राया ! तुझे आप्त वसती । आतां तयांची योगगती[१६] । (य३-२३९) ऐक निश्चिती सांगेन ।।४०।।**

**अहो ! ज्ञानानंतरही चांग । भक्तिमिश्राष्टांगयोग[१७] । प्रारब्धाभिभवार्थ[१८] अव्यंग[१९] । अभ्यासिती ब्रह्मवेत्ते ।।४१।।**

*(१) यावत् हे पद त्यातील अर्थाचे द्योतक नाही तर केवळ मात्र अलंकार आहे.(२) नारदांचे उद्गार (३) प्रेमयुक्त ॐकार (४) साधूंची वाणी (५) प्रेममय ॐकार आहेत (६) हिमालयाच्या (७) सात ओघाने (८) जलबिंदु (९) संसारात (१०) व्यवहारातील जड व खोट्या पाण्याप्रमाणे (११) 'पद्भ्यां शूद्रोअजायत' या श्रुतीप्रमाणे शुद्राला उत्पन्न करणारे (१२) पृथ्वीवर (१३) प्रगट झाले (१४) पापांचा नाश करण्याकरिता (१५) सात धारेच्या तीर्थावर (१६) परमात्मसिद्धि (१७) भक्तिसहित अष्टांग योगाचा अभ्यास (१८) प्रारब्ध भोग भासू नये म्हणून (१९) निर्दोष.*

**केवळ वासनालय[१] जीवन्मुक्ति । सप्राणवासनालय[२] विदेहमुक्ति ।**
**'न[३]तस्य प्राणा उत्क्रामन्ति । इहैव समविलीयन्ते' श्रुति ऐसी ।।४२।।**

**विदेहमुक्तींत राहे भक्ती । 'निदिध्यासनप्रकाशी' मद्वचनोक्ति । आणि श्रुत्यनुसारिण्यपरोक्ति[४] । प्रमाण आहे. ।।४३।।**

**।। श्लोक ।।**

**'सरूपनष्टचित्तासु[५] जीवन्मुक्त उदाहृतः। अरूपनष्टचित्तासु प्राप्तकैवल्यमुच्यते' ।।१।।**

**।। ओवी ।।**

**परी तो प्राण ब्रह्मीं लीन । व्हावया करावा क्रियाहीन[६]। याचिसाठीं ज्ञानोत्तराभ्यसन[७]। प्रारब्धाभिभवन अवांतर[८] ।।४४।।**

**परी तो प्राण क्रियाहीन[६] । झालिया हृदया प्रेतपण[९] । प्रेतीं तंव आहे तमोगुण । यालागीं सत्त्वसंपन्न प्राण कीजे ।।४५।।**

**म्हणाल ज्ञानोत्तर नाहीं गुणस्थिती । तरी मी विचारी येणेंरीती । ज्ञानोत्तर गुणद्वेष स्थिती[१०] । असावी कां ? ।।४६।।**

**गुण झालिया सद्गादिानंद । सहजचि होय अभेद । परी प्रतीत होय जरी प्रारब्ध । तरी सत्त्वशुद्धप्रत्यय न कां ? ।।४७।।**

**चंचळ एक रजोगुण । अवशिष्ट[११]स्थिर असती दोन । अप्रकाश स्थिर[१२]तमोगुण । सप्रकाश स्थिरपण[१३]तें सत्त्व ।।४८।।**

**विदेहमुक्तांचा प्राणलय । मग तमोमय व्हावें हृदय । हें नवल कीं स्वयें । आधीं असे ।।४९।।**

*(१) वासनेचा नाश करणे (२) प्राणासह वासनेचा नाश करणे (३) त्याचे प्राण कोठे जात नाहीत, देहातच लीन होतात (४) श्रूतीस अनुसरून दुसरेहि वचन आहे (५) ज्याचे देहादिरूप आहे पण चित्तभाव नष्ट झाला त्याला जीवन्मुक्त म्हणतात व ज्याचे देहादिभाव नाहीत व चित्त भावहि नाहीत त्याला विदेहमुक्त म्हणतात (६) त्याचे ठिकाणचे चांचल्य घालविले पाहिजे (७) ज्ञानानंतरहि समाधि वगैरेचा अभ्यास (८) प्राणाच्या क्रियाहीनतेमुळे सहजच होणारे कार्य, गौण (९) प्रेतदशा (१०) गुणांचा द्वेष तरी कां असावा (११) बाकीचे (१२) प्रकाशरहित स्थिरपण किंवा क्रियाहीन (१३) प्रकाशसहित क्रियाहीन.*

॥ चूर्णिका ॥

अहो ! जलस्थप्रतिबिम्बें[१] सूर्य व्हावें । परी सूर्यकांतीं[२] येवोनि तृण जाळावें ।
तैसें जीवन्मुक्तें विदेहमुक्त व्हावें । परी हृदयसूर्यकांतीं[३] येवोनि जाळावे जगदोष[४]॥२५०॥

॥ ओव्या ॥

आधीं सात्त्विक केलिया प्राण । तो सहजचि स्थिर होय आपण ।
परी हृदय सात्त्विक होय म्हणून । प्रकाशे चेतन त्यांतुनी ॥५१॥
मग तया चेतनाचेनि योगें । भजकजन[५] पूर्ण होवों लागे । यालागीं विदेहमुक्ताची सवेगें[६] । समाधि कीजे ॥५२॥
आलंदीवल्लभ[७] समाधिवासी[८] । ते स्वयें (य३-२४०) मुक्तचि निश्चयेसी ।
परी मुक्तिप्रभा[९] हृदयसूर्यकांतासी[१०] । मिळुनि उपदेशी दीन जनां ॥५३॥
समुद्रीं मिळालिया संपूर्ण । मेघ जरी नेईल त्यांतून । तरी प्रतिबंधीना[११] जीवन[१२] । तयापरी ॥५४॥
तैसे विदेहमुक्त जाहले । आणि हृदयसूर्यकांतीं ज्ञान प्रगटलें ।
तें इतरां उजळोनि[१३] मुक्तिद[१४] झालें । तरी आम्हीं ना न म्हणों ॥५५॥
अविरोधी[१५] म्हणोनि भेद नाहीं । इतरांचें कार्य[१६]करी सर्वदांही ।
यालागीं समाधिस्थ ज्ञानेश आई । गुरुरूपें अनादि अनंत ॥५६॥
नित्यचि चैतन्य विख्यात । आणि जो हृदयसूर्यकांत ।
तत्स्थप्रभा[१७]जनकार्य करीत । मग निवटाया[१८]समर्थ कवण असे ॥५७॥
यालागीं अनंत अनंत । आळंदी हें मुख्य तीर्थ । आणि उपदेशक तात । अखंडची ॥५८॥

*(१) पाण्याच्या ठिकाणी पडलेल्या प्रतिबिंबाने (२) सूर्यकांत मण्यांत (३) हृदयरूपी सूर्यकांत मण्यांत (४) संपूर्ण जगाचे पाप (५) भक्त (६) (शीघ्र, लगेच,) सरोबरी (७) श्रीज्ञानेश्वर महाराज (८) समाधिस्थ (९) मुक्तीतील अनुभव ज्ञान (१०) हृदयरूपी सूर्यकांत मण्याशी (११) हरकत घेत नाही (१२) पाणी (१३) स्वरूप प्रकाशित करून (१४) मुक्ति देणारे (१५) ब्रह्मस्वरूपाच्या विरोधी नाही (१६) इतर मुमुक्षूंचे मुक्ति कार्यहि साधते (१७) त्यांत पडलेली चैतन्यप्रभा (१८) नाश करावयाला*

परी ते[०]परमेश्वरचि म्हणोनी । सिद्ध सूर्यकांत सूर्यस्थानीं[१]।
इतर जे कां मुक्त कोणी । ते साध्यसूर्यकांतीं[२]सिद्ध सूर्य[३] ॥५९॥
सिद्ध सूर्यरूप चिद्घन[४] । प्राण[५] केलिया सत्त्वगुण । आपुलें जें हृदय पूर्ण । तें साध्य सूर्यकांत होय ॥६०॥
आतां प्राण करावा सात्त्विक । तयाची युक्ति आहे एक । कारण होतांचि सात्त्विक । कार्य सात्त्विक सहज होय ॥६१॥
झालियाही ज्ञानप्राप्ती । सत्त्वमयप्राणकरण-रीती[६] । तरी प्राणांचें कारण जें निश्चिती । तें सात्त्विक असावें ॥६२॥
'आपोमयः[७] प्राण' म्हणोनी । प्रेमें वदे श्रुति जननी । तें आप असलिया रजोगुणी । गमनागमनीं[८] प्राण उमटे ॥६३॥
तें सत्त्वगुणी आप[९] मिळतां । तरी प्राणासी येईल सात्त्विकता । आणि सत्त्वगुणीं आप तत्वतां । तीर्थें असती ॥६४॥

*(०) श्रीज्ञानेश्वरमहाराज.(१) स्वयंसिद्ध म्हणजे नित्य असलेल्या सूर्यकांत मण्यांतील स्वतःसिद्ध सूर्याच्या ठिकाणी किंवा सारखे. या ठिकाणी श्रीज्ञानेश्वरमहाराज व इतर मुक्त पुरुष यांच्यात तुलना केली आहे. मूळचा स्वतःसिद्ध असलेला आकाशस्थ सूर्य, सूर्यकांत मण्यात प्रगट होतो. येथे सूर्य हा उत्पन्न होत नाही, पण सूर्यकान्त मणि उत्पन्न होतो किंवा तयार होतो व त्यांत सूर्यतेज प्रगट होते. त्याप्रमाणे स्वतःसिद्ध चैतन्य हे सात्त्विक हृदयरूपी सूर्यकान्त मण्यात जेव्हां प्रगट होते तेव्हां त्याला गुरु म्हणतात; आणि ज्या सात्विक हृदयरूपी सूर्यकान्त मण्यात चैतन्यप्रभा प्रगट होऊन ती गुरुसंज्ञा धारण करते, तो हृदयरूपी सूर्यकान्तमणि सिद्ध व साध्य दोन प्रकारचा आहे म्हणून गुरुपदहि दोन प्रकारचे होते. परमेश्वर हा 'स पूर्वेषामपि गुरुः' या योगसूत्रानुसार जो सर्वाचा आद्यगुरु आहे तो, सिद्ध सूर्यकान्त मण्यात पडलेल्या सूर्यप्रभेप्रमाणे आहे व जीवन्मुक्त पुरुष साध्य सूर्यकान्त मण्यात पडलेल्या सूर्यप्रभेप्रमाणे आहेत. श्रीज्ञानेश्वरमहाराज ईश्वरच असल्यामुळे, ते परमेश्वराप्रमाणे अखंड गुरु आहेत. (२) बनवलेल्या सूर्यकान्त मण्याचे ठिकाणी (३) मूळचा असलेला आकाशस्थ सूर्य (४) चैतन्यघन वस्तु (५) साधनाच्यायोगाने सात्विक प्राण होऊन हृदय पूर्ण सात्विक झाले की ते साध्य सूर्यकान्त मण्याचे स्थानी होते (६) प्राण सात्विक करण्याचा प्रकार (७) प्राण जलाचे कार्य आहे (८) रजोगुणी पाण्यापासून बनलेला रजोगुणी प्राण गमनागमन (येणे जाणे ) भासवितो (९) पाणी.*

सामान्य[१] बोधी अनुमान । विशेष न कळे शब्दावीण । यालागीं पाहिजे सात्विक जीवन ।
हें अनुमानेंकरून सिद्ध झालें ॥६५॥
परी कोणतें सात्त्विक जीवन । येथ श्रुतिचि एक प्रमाण । आणि गंगामहिमा स्वयें आपण । श्रुति सांगे ॥६६॥

*गंगामहिमा*

॥ वैदिक ऋचा ॥

'सिताऽसिते[२] सरिते यत्र संगते यत्राऽऽप्लुतासो दिवमुत्पतन्ति । यत्र गंगा च यमुना च यत्र प्राचीसरस्वती' ॥ ऋग्वेद.
(य३-२४१)

॥ ओव्या ॥

सात्त्विकपणा सर्व तीर्था । परी गंगेसी विशेषता । तेथ सत्त्व असोनी सचेतनता[३] । यालागीं 'सिता' म्हणे श्रुति ॥६७॥
'सिता' म्हणजे अतिनिर्मळा । निर्मळास्तव चित्कळा[४] । चित्कळा म्हणोनी प्रेमळा[५] । निःसीमची ॥६८॥
त्या मातेचिया कृपें स्नान । झालिया याचि लोकीं पूर्ण । शरीर होय संपन्न । देवांहून सत्त्वमय ॥६९॥
एकाग्र भूमिकेंत देवांचें[६] चित्त । आणि जे कीं गंगास्नानयुक्त । त्यांचें सहजपणें चित्त । निरुद्धभूमिगत[७] होउं पाहे ॥७०॥

*(१) सामान्य ज्ञान अनुमानाने होते व विशेष ज्ञान शब्द प्रमाणाने होते. (२) श्वेत (गंगा) व काळी (यमुना) ह्या दोन नद्या जेथे मिळतात (प्रयागामध्ये) त्या ठिकाणी स्नान करणारे स्वर्गाला जातात. ज्या ठिकाणी गंगा, यमुना व सरस्वतीहि आहे (३) चेतनपणा (४) चैतन्यांश (५) प्रेमरूप, सुखमय (६) विशेषतः देवांचे चित्त एकाग्र भूमिकेवर असते (७) मूढ, क्षिप्त, विक्षिप्त, एकाग्र व निरुद्ध अशा चित्ताच्या पांच भूमिका आहेत. वृक्षादिकांच्या चित्ताची भूमिका मूढ आहे. पशुपक्ष्यांची चित्तभूमिका क्षिप्त आहे. मनुष्याचे चित्त पांचहि भूमिकेवर जाते पण सर्वसाधारणपणे मानव चित्ताची विक्षिप्त भूमिका असते. एकाग्र भूमीवरील चित्त देवांचे व निरुद्ध भूमिकेवर योगी असतात. मूढ भूमिकेत कशाचे ज्ञान होत नाही. क्षिप्त भूमिकेत देह व देहाच्या सुखाचा विषय यांचे ज्ञान असते व ते चित्त विषयाकडेच धाव घेते. विक्षिप्त चित्त नानाप्रकारच्या विषयसुखाकडे धावत असते. म्हणून अतिचंचल असते. एकाग्र चित्त कशाशीतरी एकतान झालेले असते; व निरुद्ध चित्त ब्रह्ममय होते.*

स्नान मात्र एक करितां । तरी देवदेह जल[१] देत तत्त्वतां ।
आणि जलांतर्वर्ती[२] जी सत्ता । ते व्यानद्वारां[३] चित्ता शुद्ध करी ॥७१॥
याहीवरी घडतां पान । तरी गंगामय पंचप्राण । मग तेथेंचि शरीर ठेवितां जाण । होय आपण गंगामय ॥७२॥
हें नव्हें मम पदरीचें वचन । बोलिले आचार्य भगवान । तोचि श्लोक प्रमाण । सावधान ऐकावा ॥७३॥

॥ श्लोक : शंकराचार्य ॥

कुतो[४]वीचिर्वीचिस्तव यदि गतालोचनपथम् । त्वमापीतापीताम्बरपुरनिवासं वितरसि ।
त्वदुत्संगे गंगे पतति यदि कायस्तनुभृताम् । तदा मातः शातक्रतवपदलाभोऽप्यतिलघुः ॥१॥

॥ ओव्या ॥

अहो ! पाप तें तंव अदृष्ट[५] । तुझें सात्त्विक जल दृष्ट । दृष्ट तीव्र[६] म्हणोनी अदृष्ट । राहिल कोठें ? ॥७४॥
यालागीं तुज पाहतां नयनीं । कोठें नरक नायके कानीं ।
माझा विश्वास एवढा जननी । तूं येथ म्हणूनी त्रिभुवनीं दुःख नसे ॥७५॥
याचिलागीं आचार्य आपण । 'कुतोवीचिर्' वदती वचन । म्हणजे नरक हा शब्दार्थ पूर्ण । शशशृंग[७] जाहला ॥७६॥
माये ! तुझें घडलिया पान । तरी पीताम्बरपुर करिसी दान । म्हणजे पीताम्बर जेथ राहे तेथ जाण । पीताम्बरपुर ॥७७॥

*(१) गंगाजल (२) जलाचे अंतर्यामी जी चेतनसत्ता (३) व्यानवायु सर्व शरीरात व त्वचेच्या ठिकाणी असल्यामुळे, स्नानाने गंगाजलाचे सत्तेचा, त्वचेशी व त्याच्या द्वारा व्यानवायूशी संबंध होऊन ते जल चित्ताला शुद्ध करिते (४) श्लोकार्थ - हे आई गंगे! तुझा असा प्रभाव आहे की ज्याच्या दृष्टीला तुझी लहरी पडली त्याच्या ठिकाणी अविचार किंवा नरक प्राप्त होत नाही तुझ्या जलाचे जे कोणी पान करतील त्यांना विष्णुपदाची प्राप्ति होते. तुझ्या काठी किंवा जलांत जे कोणी देह सोडतात, ते तर विष्णुपदाचा लाभहि तुच्छ समजतात (५) न दिसणारे (६) बलवान् (७) अत्यंत खोटा.*

तो पीताम्बर आहे विष्णुशरीरी । यालागीं तोचि येतो करी । एवढी जीवनकणपानथोरी[१] । तुझी जननी ! ॥७८॥
(य३-२४२) तुझे ओसंगीं[२] देह पडतां । तरी शातक्रतवपद तत्त्वतां । अतिलघु वाटे पाहतां । जननी माते ॥७९॥

शतक्रतूचा संबंधी म्हणून । शातक्रतव बोलिजे वचन । म्हणजे उपेंद्र म्हणती जयालागून । तो हा विष्णू ॥२८०॥
म्हणोनी विष्णुपद जें कांहीं । तें तुच्छ वाटे मज आई । येथ अर्थ करितील लवलाही । ऐसें कोणी ॥८१॥
कीं, शातक्रतव म्हणजे सहस्रनयन । परी हें योग्य नाहीं बोलण ।
विष्णुपद मिळे करितां पान । आणि ओसंगाग्रहणें(४) स्वर्गकल्पना(५) ॥८२॥
पानेंचि मिळे वैकुंठ जरी । उत्संगग्रहण(६) अधिक त्यावरी । म्हणोनी स्वर्गाची तंव कुसरी(७) । कल्पनाचि नये ॥८३॥
यालागीं तयाचा हाचि अर्थ । जें वैकुंठही तुच्छ वाटत । ऐसें म्हणतील कोणी येथ । कीं अर्थवाद(८) हा असे ॥८४॥
तरी तैसें सर्वथा नाहीं । कृष्ण आणि गंगा ब्रह्म पाही ।
परी कृष्ण व्यक्ति म्हणोनि राहे हृदयीं । आणि गंगा जलमयी म्हणोनि सर्वांगीं राहे ॥२८५॥
एवं शरीर आणि हृदय । आत्मा दोहींठायीं होय । तैसें गंगा आणि यादवराय । भिन्न विपायें(९) न होती ॥८६॥
कीर्तनें(१०) काया(११) हरिगुणमय(१२) । प्रसादामाजीं(१३)अन्न हरिमय(१४)। गंगास्नानीं जल हरिमय । हरिरूप होय सर्वत्र ॥८७॥

*(१) गंगाजलाचा बिंदु पोटात गेल्याचे महत्त्व (२) मांडीवर म्हणजे जलात (३) इंद्राचा (४) ओसंगी घेतल्याने (५) स्वर्गप्राप्तीची कल्पना (६) मांडीवर किंवा कडेवर घेणे (७) योग्य (८) नुस्ती स्तुति, प्रशंसा (९) केव्हांहि (१०) नामस्मरणाने (११) शरीर (१२) हरिगुण स्वरूप शुद्धसात्विक (१३) नैवेद्यातील (१४) शुद्ध सात्विक*

## ॥ गंगापंचरत्न स्तोत्र ॥

॥ श्लोक ॥

मीना(१५) यदीयसलिलप्रभवाः सजीवाः । भोगानलेन्धनसुरान्किमु नो हसन्ति ।
मुक्तः शिवोऽपि परगागवशो जटायां । यां स्थापयन्भवतु सैव पयःप्रदा मे ॥२८८॥१॥
भीतो दिवाकरसुतान्मतिमज्ज्ञनोऽयं । योगव्रतक्रतुगतिः श्रयते बताकं ।
पीयूषतोऽपि तनुजान्कृपया स्ववन्तीम् । भूमौ तवोदकमयीं प्रतिमामजानन् ॥२८९॥२॥
लालासुधाज्ञगुरुदत्तधियां स्वपुण्यैः । स्वर्गे वसंत विवशस्तरवः फलन्तु ।
जायेम तेऽकपरिलालनमीनयोनौ । यस्यां सदास्तु तव जीवनजीवनन्नः ॥२९०॥३॥ (य३-२४३)
पर्यंकतत्वविदुषामपि(१) नैव मातः । शौर्यं विभाति मम वाहनवाहकानाम् ।
पादैस्त्वदीय तटगा विधना हि धन्याः । ये लीलया तव लवांबुविमुक्तमोहाः ॥२९१॥४॥
तीव्रं पापफलं तनुं प्रदहति दृग्गोचरं सर्वदा । तत्तापं प्रवदंति वेदमतयः प्रारब्धभूतं महत् ।
त्वन्नीरं पिबतां न ताप इति चेद्दृष्टं मया जान्हवी । मातः पापविनाशके तव बले नो विस्मयो नो वृथा ॥२९२॥५॥
इदं गंगापंचरत्नं प्रातरुत्थाय यः पठेत् ।
हरिस्तद्हृदये भूयाद् ज्ञानेश्वरकृपालवात् ॥९३॥

*ooo*

*श्लोकार्थ - ज्या गंगेच्या पाण्यातील जीवंत मासे (भोगरूपी अग्नीच्या ठिकाणी इंधनाप्रमाणे बनलेले ) भोगासक्त अशा इंद्रादि देवांना पाहून हांसत नाहीत काय? साक्षात् शंकर नित्य मुक्त असूनहि (विषयाचे ठिकाणी अत्यंत विरक्त असले तरी) जिला जटेमध्ये धारण करून जिच्या ठिकाणी अत्यंत प्रेम करितात ती गंगामाता मला स्तनपान देवो.* ***॥८८॥*** *यमदंडाला भिणारा हा विचारी पुरुष (यमदंड चुकविण्याकरिता) यागयागव्रतादि साधनांचा आश्रय करितो. पण आपल्या मुलांचे अमृतापेक्षाहि अत्यंत प्रेमाने उत्तम पालन करणारी अशी जी या भूमीवर तुझी जलमय मूर्ति आहे तिच्याकडे मात्र पहात नाही. म्हणजे तुझ्या जलाने सर्व पुरुषार्थ मिळत असताना व्यर्थ योगादिकांचे श्रम करितात.* ***॥८९॥*** *(अप्सरांची) लाळ हिला अमृत समजणारे जे (गुरुमती) मीकांसक त्यांनी ज्यांना बुद्धि दिली आहे अशा लोकांनी (स्वर्गप्राप्तीकरिता) केलेल्या पुण्याच्या योगाने स्वर्गात वसंतऋतुच्या योगाने (नंदनवनातील) वृक्ष नित्य नूतन अशा कोमल पल्लवांनी नित्य सुशोभित होवोत. (या ठिकाणी असा संदर्भ आहे की, जे पुण्यवान् लोक स्वर्गातील नंदनवनात कामसुखाचा आनंद भोगतात. ते वन नित्य कोमल पल्लवांनी युक्त अशा वृक्षांनी भरलेले आहे व तेथे वसंतऋतु नित्य राहतो व त्यामुळे कामसुखाचा अत्यंत आनंद मिळतो. पण या नंदनवनात वसंतऋतु नित्य राहतो याचे कारण, स्वर्गसुखाकरिता पुण्यकर्म करणारे जे पुरुष आहेत, त्यांच्या पुण्याचे ते फळ होय. म्हणून*

*विषयसुखाचे अत्यंत श्रेष्ठस्थान स्वर्ग होय म्हणून स्वर्गाकरिता कर्म करावे असा उपदेश करणारे जे मीमांसक, त्यांचे म्हणणे ज्यांना पटले व स्वर्गाकरिताच जे कर्म करितात ते आपल्या पुण्याने वसंतऋतूचे नित्य वास्तव्य असलेल्या नंदनवनात खुशाल सुख भोगोत असा या चरणांचा अर्थ झाला) पण आई! तुझ्या अंकावर ज्यांचा लाड केला जातो अशा (तुझ्या जलांतील) मत्स्ययोनीतच आम्ही जन्म घेऊ; कारण तशा स्थितीत तुझे जलच आमचे जीवन होईल.* ***॥२९०॥****ब्रह्मलोकाची प्राप्ति श्रेष्ठ आहे किंवा हेच साध्य आहे. तेथे विमानात बसून वाटेल त्या ठिकाणी केवळ संकल्पाने जाता येते. (संकल्प मात्रे करून हेच पुरुष वाहनाचे वाहक असतात कारण ब्रह्मलोकात सर्व संकल्पमात्रे करून भोग मिळतात) असे समजून एवढे ऐश्वर्य प्राप्त करून घेणाऱ्यांचाहि हा पराक्रम मला मोठासा वाटत नाही. उलट आपल्या पायांनी तुझ्या काठावर फिरणारे व तुझ्या जलाचा बिंदु सेवन करून सहज समूळ प्रपंचाची आशा सोडणारे पुरुष निर्धन (ऐश्वर्यहीन) असले तरी माझ्या मते धन्य होत.* ***॥९१॥*** *पुरुषाने केलेले महत्पाप तीव्र होऊन त्याच्या शरीराला (शरीर भोगाचे अधिष्ठान असल्यामुळे) अत्यंत दुःख देते हे आपण सदा पहातो व यालाच वैदिक लोक प्रारब्ध भोग म्हणतात. पण आई! तुझ्या जलाचे जे पान करतात त्यांना मात्र प्रारब्ध ताप होत नाही. हे मी प्रत्यक्ष पाहिले आहे. हे सर्व पापनाशक आई! हे तुझे सामर्थ्य कांही खोटे नाही व त्याविषयी आश्चर्य करण्याचेहि कारण नाही.* ***॥९२॥*** *हे गंगापंचरत्न सकाळी उठून जो कोणी पठन करील, त्या हृदयांत, श्रीज्ञानेश्वर महाराजांचे कृपेने, साक्षात् हरि प्रगट होईल.* ***॥९३॥***

**॥ ओव्या ॥**

अथवा बुद्धि हरिमय[१] कीर्तनीं[२] । अन्नमय[३] मन म्हणोनी । प्रसादें[४] हरि[५]गुणमय निर्वाणीं[६] । मन होय ॥९४॥
आपोमय[७] प्राण म्हणून । गंगास्नानें हरिमय[८] प्राण । संत ब्रह्ममूर्ति[९] म्हणून । सत्संगें काया[१०] हरिमय ॥९५॥
यास्तव तुझा पिता आधीं । स्नानें करोनि महती[११] शुद्धी । अग्निनारायण यथा विधी । पूजोनि कर्म सोडिलें ॥९६॥
कर्म सोडिलियाहीवरी जाण । अक्षय शांत ऐसा होऊन । भक्षी गंगेचें जीवन । वासना सोडून सर्वही ॥९६॥
गंगास्नानें हरिसम काया । करोनि कर्में त्यजिलीं[१२] राया ।
मग गंगाजलपानें कैवल्य[१३] व्हाया । सात्त्विक[१४] प्राणें हृदया सूर्यकांत करी ॥९८॥
मग अहिंसादि यमा[१५] । आणि जपादि नियमा[१६]। साधन करोनी मनोधर्मा[१७] । जिंकिलें जेणें ॥९९॥
गंगास्नानें विदग्धकर्मा[१८] । आणि चित्त दत्त यमनियमा । यालागीं विघ्नगरिमा[१९] । कदा नव्हे ॥३००॥
मग निवटाया व्याधिअंतराय[२०] । तैसें आसन जिंकिलें होय । मग निःशेष करावया मनोलय[२१]। प्राणालागीं संयमी[२२] ॥१॥
मग सकल इंद्रियवृत्ति । मनासहित निरोधी निगुती । हरिचरणप्रेमसमाधिस्थिती[२३] । वाढवी बहु ॥२॥
तिया भगव्द्वारणधरणें[२४] । आलस्यरूप तमा[२५] मारणें । तैं तेथ ध्यानें । धरिलें मना ॥३॥

*(१) हरिस्वरूप (२) नामसंकीर्तन केल्याने (३) अन्नाचा विकार (४) भगवंताचा उच्छिष्ट नैवेद्य घेतल्याने (५) हरीच्या गुणात रंगून जाणारे (६) शेवटी (७) जलविकार (८) साकार ब्रह्मस्वरूप (९) शुद्ध सात्विक ब्रह्ममय (१०) शरीर (११) थोर (१२) त्याग केला (१३) भगवत्प्राप्ति (१४) प्राण सात्विक करून हृदयालाहि सूर्यकान्त मण्याप्रमाणे शुद्ध सात्विक केले (१५) मनाच्या निरोधाची साधने (१६) इंद्रियांच्या निरोधाची साधने (१७) मनाच्या संकल्पविकल्पादि धर्माला (१८) ज्याचे कर्म दग्ध झाले असा (१९) विघ्नांचे सामर्थ्य (२०) शरीरादिकात उत्पन्न होणारे व्याधिरूपी प्रतिबंध (२१) मनाचा नाश (२२) निग्रह केला (२३) भगवंताच्या चरणाचे ठिकाणी प्रेमसमाधीची अवस्था (२४) अशा रितीने हरिचरण घट्ट धरले असता (२५) तमोगुणाला.*

तया ध्यानैकाग्रसत्त्ववृत्ति[१] । गेली रजचांचल्यख्याती[२] । मग ध्यातृध्यान विसरोनि वृत्ति । ध्येयमात्र[३] राहिली ॥४॥
तया ध्येयमात्रयोगेंकरून । अवघाचि निमाला सत्त्वगुण । मन बुद्धीमाजीं लीन । बुद्धि साक्षींत लपविली ॥५॥
(य३-२४४) आणि दृश्यचि[४] जंव नाहीं । तरी द्रष्टृत्व[५] असावें कायी । जैसें घट फुटलिया सर्वही । महाकाशची ॥६॥
तैसें आघवेंचि परब्रह्म । सकार्यमायेचा[६] नाहीं उगम[७] । करामलकवत्[८] परम । अपरोक्ष जाहालिया ॥७॥
श्रवणादौ[९] जें परोक्षज्ञान[१०]। अथवा विद्युतवदपरोक्षयुतश्रवण[११]। तेंचि हा समाधि पावोन । सूर्यसम अपरोक्ष सुये[१२]॥८॥
ऐसी विद्यारण्यवाणी । तत्त्वविवेकी' शोभा आणी । तुझा पिता तेंवी होवोनी । अचल राहिला स्थाणु[१३] जैसा ॥९॥
आजपासोनि पांचवे दिवशीं । योगाग्नि[१४] जाळील तद्देहासी । त्वन्माता गांधारी निश्चयेसी ।
त्याचि अग्नींत प्रवेशेल ॥३१०॥

**तरी विदुरातें आणावया । जावें हें मनीं येईल तुझिया । परी तोही साश्चर्य(१५) हर्ष पावोनिया । तीर्थाटणा निघेल ॥११॥**
**महाभारतीं(१६) ऐसी कथा । कीं धर्मादि भेटले कुरुनाथा । परी कल्पभेदे व्यवस्था । समन्वयीजे ॥१२॥**

*(१) ध्यानरूपी एकाग्रता ही जी सत्ववृत्ति त्यामुळे (२) रजोगुणाचा चंचलपणा (३) भगवदाकार होऊन (४) ज्ञेय, जाणली जाणारी वस्तु (५) जाणणारा ज्ञाता (६) जगतासह जगत्कारण मायेचा (७) भास (८) हातातील आवळ्याप्रमाणे (९) श्रवणकाळी (१०) अनुमेय संदेश मात्र (११) विजेप्रमाणे क्षणभर साक्षात् अनुभवास आणून देणारे श्रवण (१२) प्रगट करिते श्रवणादिकांत आत्मानुभव विजेप्रमाणे क्षणिक असून समाधीच्या योगाने तो सूर्यासारखा स्थिर होतो. (१३) खांबाप्रमाणे (१४) योगाने प्रज्वलित केलेला जठराग्नि (१५) आश्चर्ययुक्त (१६) भारतात अशी कथा आहे की, धर्मराज धृतराष्ट्राला आणण्यासाठी गेले व त्यांची भेट झाली. भागवतांत असे म्हटले आह की, धर्मराजाला, धृतराष्ट्र विदुरादिकास भेटण्यास न जाण्याचा नारदांनी सल्ला दिला म्हणजे त्यांची भेट झाली नाही. या विरोधाचा परिहार कल्पभेदाने होतो. म्हणजे **बुद्धीपासून पंचमहाभूतापर्यंत जेवढी कारण सृष्टि आहे ती 'धाता यथापूर्वमकल्पयत्' या श्रुतीप्रमाणे सर्व कल्पात सारखीच उत्पन्न होते **पण त्यानंतरची पंचभूतापासून जीवांच्या कर्मानुसार उत्पन्न होणारी कार्यसृष्टि सर्व कल्पात सारखी नसते. वरील विरोध कार्यसृष्टीतला असल्यामुळे एका कल्पात भारताप्रमाणे धर्मराज व धृतराष्ट्र यांची भेट होणे शक्य आहे व एकाद्या कल्पात भागवताप्रमाणे त्यांची भेट न होणेहि शक्य आहे*

**नाना कल्पांचिया स्थिती(१) । द्रष्टे ऋषी प्रकट करिती । यालागीं विचित्र पाहोनि चित्तीं । शंको नये ॥१३॥**
**तंव शिष्य म्हणे भगवंता । 'धातायथापूर्वमकल्पयत्' या श्रुत्यर्था । पाहिलिया विचित्रता(२) । न सांपडे ॥१४॥**
**तरी ययाचें हें उत्तर । कारण(३) सदृशसमप्रकार(४) । कार्यसृष्टिप्रकार(५) । बहुविध(६) होय ॥१५॥**
**परी ज्या कर्मातें भोगस्थिति(७) । ती न नाशे कार्यत्वजाती(८) । विधातिया(९) कर्मस्मृति(१०) । सकल असे ॥३१६॥**
**परी तेथही अविद्यावशें(११) । एखादें(१२) कर्म मध्येचि विलसे । तरी क्रमही भासे । अन्यथाही ॥३१७॥**
**जैसें बीजकोठींत(१३) धान्य नवीन । टाकोनि मोजलिया जाण ।**
**तरी ते धान्याचें होय गणन(१४) । परी क्रमनिर्धार(१५) करवेना ॥३१८॥**
**पुनः पुनः धान्य मोजतां । तरी तेचि दाणे येती तत्वतां । परी क्रमाची वार्ता । भिन्न होय ॥३१९॥**

*(१) कार्यरूप सृष्टीची स्थिति (२) विरुद्ध प्रकार (३) कारण सृष्टी बुद्ध्यादि चोवीस तत्त्वे (४) सारखा उत्पत्तिप्रकार (५) जीवकर्मानुसार उत्पन्न होणारा प्रपंच (६) पुष्कळ प्रकारचा (७) कर्माचा भोग मिळालाच पाहिजे हा नियम (८) कर्मजाति म्हणजे कर्ममात्र (९) ब्रह्मदेवाला (१०) कोण्या जीवाने कोणते कर्म केले याची आठवण (११) अविद्येच्या प्रभावाने (१२) ज्या क्रमाने जीव कर्म करितो त्याच क्रमाने त्यांचे फळ मिळते असे नाही एकादे कर्म मध्येच फलद्रूप होते (१३) धान्याच्या कणगीत (१४) मोजमाप (१५) ज्या क्रमाने टाकले त्याच क्रमाने. कणगीत - धान्य टाकतेवेळी पहिल्या मापात जे व जितके दाणे भरले होते ते व तितकेच दाणे पुनः मोजतेवेळी येत नाहीत*

**तैसे नानाकल्पीं क्रम(०)नाना ।परी कर्मफळांच्या(१)समान खुणा ।जैसें वृक्षबीज(२)नियतिगुणा । शाखाकार वेगळाले ॥३२०॥**
**कीं सकल असोनी वृक्षपर्ण(३) । कोठें पातळ कोठें घन । तेंवी कर्मफळ असोनी समान । कथाक्रम(४) भिन्न भासे ॥२१॥**
**विदेहमुक्तही जे होती । परी तयांतें जे भजती । ते तत्समान उपजविती । पुढील कल्पीं ॥२२॥**
**रज्जु न पाहतां सर्प दिसे । रज्जु पाहतां तो न भासे । तेंवी ब्रह्मज्ञानें हें कांहीं नसे । एऱ्हवीं विलसे हरिमाया ॥२३॥**
**एवढा समन्वयही(५) ऐकोन । जरी तुझें नोहेल समाधान । तरी खोटें वाटेल निरूपण । कल्पादिकांचें ॥२४॥**
**(य३-२४५) तरी तैसेंचि पैं वाटो । ही सृष्टि मिथ्याचि घटो(६) । तुझें तुज झगटो(७) । शुद्ध ज्ञान ॥२५॥**
**जागृतीं स्वप्नीं आणि सुषुप्तीं । तुझी नाहीं तुज विस्मृती । एऱ्हवीं स्वप्रादि नाना स्थिती । होती जाती, त्या मिथ्या ॥२६॥**
**स्वप्नीं हें ऐसें जाहालें । तैसें काय म्हणोन न देखिलें । हे वासनेचे(८) प्रश्न वहिले । यांसी वासनेचें उत्तर ॥२७॥**
**एऱ्हवीं मिथ्या जी माया । तेथ क्रम(९) असावा कासया । अधिष्ठान पाहिजे यया । हा मात्र नियमू(१०) ॥२८॥**

**॥ चूर्णिका ॥**

**एवं शिष्यसंशय छेदोनी । युधिष्ठिराचें सांत्वन करोनी । तुंबरासह नारदमुनि । हृदयस्वर्गीं(११)चढोनि गौप्येव(१२)झाले ॥२९॥**
**मग अखंड सद्गुरुवचन । युधिष्ठिरराय हृदयीं धरून । भूत भविष्य वर्तमान । शोक त्यागोन सुखी झाला ॥३३०॥**
**मज ज्ञानेश्वर जनक जननी । स्वचरणाशोकातळीं (१३) घेवोनी । प्रेमपुष्टि भरोनी । पूर्णत्वें देवो ॥३१॥**

*(०) सृष्टीउत्पत्ति क्रम.(१) कर्मफळ सारखेच असते (२) एकाच बीजाचा कोठे मोठा तर कोठे लहान वृक्ष होतो (३) वृक्षाची पाने (४) इतिहासक्रम (५) एकवाक्यता, विरोधपरिहार (६) ठरो (७) मिळो (८) भ्रमामध्ये जे काही भासते ते पाहणाऱ्याचे वासनेनुसार भासते म्हणून भ्रमात असे कां भासले, असे कां भासले नाही असा जर कोणी प्रश्न केला तर पहाणाराची वासना हेच, उत्तर द्यावे लागेल. (९) अमुक गोष्टीनंतर अमुक गोष्ट असायला पाहिजे असा क्रम (१०) सिद्धान्त (११) हृदयरूपी स्वर्गात. ज्या आपल्या हृदयात आत्म्याचे वास्तव्य आहे त्याच आत्म्यावर स्वर्गादिक प्रकार हरिमायेने भासतात म्हणून स्वर्गहि हृदयातच आहे. संपूर्ण ब्रह्मांडच हृदयात आहे (१२) गुप्त झाल्यासारखे.(१३) आपल्या चरणरूपी अशोक वृक्षाखाली.*

**हरिःॐ तत्सत् श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरकृपाप्रसादे नानाछंदबद्धे गद्यपद्यान्विते प्रियलीलामहोत्सवे आमंत्रणविलासे विदुरसमागमादिवर्णनं नाम त्रयोदशसखीप्रेषणम् ।**

**॥ श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ॥**

०००

# सखीप्रेषण १४ वें.

## विषयानुक्रम

***भगवन्निजधामगमनबोधक वाक्याची स्वविषयाहून अन्यत्र गति. परीक्षितीचा दिग्विजय व धर्मपृथ्वीसंवादवर्णन.पृष्ठ (२४६-२६२)***

*मंगलाचरण :- भगवल्लीलावर्णन २४६. वाणी, पवन, मनाची भगवद्भजनार्थ प्रार्थना २४७ पूर्वकथानुसंधानः- भगवान् श्रीकृष्णानें भक्तहृदयांत व भागवतांत प्रवेश केल्यावर व पांडव भगद्वारणीं मिळाल्यावर परीक्षितीला राज्यप्राप्ति २४७ शंका :- 'श्रीकृष्णानें भक्तहृदयांत प्रवेश केला' ह्या वरील वचनांत भागवतानुराधानें भगवन्निजधामकथेचा विपर्यास होऊन इतिहासाचा लोप होतो २४७-२४८ समाधान :- मुख्यवाक्यगौणवाक्यलक्षण व उदाहरणानें स्पष्टीकरण २४८. परस्परविरोधी व्यासवचनांचा वाक्यमुख्यगौणव्यवस्थेनें व सत्कार्यवादानें समन्वय २४९-२५० पद्मपुराणांतील वचनांची ग्राह्यता. श्रीकृष्णनिजधामबोधक गौण वाक्यांची व कपिलांच्या सांख्यसूत्राची स्वविषयाहून अन्यत्र गति २५० सन्निधिमात्रेंकरून गौण वाक्यांचा उपसंहार मुख्य वाक्यांत होऊं शकत नाहीं. याविषयीं सप्रमाण विवेचन व भगवान् श्रीकृष्णाची नित्यसन्निहितत्वसिद्धि २५१ परीक्षितीचा इरावतीशी विवाह, जनमेजयादि चार अपत्यांची प्राप्ति, तीन अश्वमेधांचें यजन, व दिग्विजयकालीं गोवृषभांच्या मागें त्यांनां मारण्याकरितां धांवत असलेल्या कलीचा त्यानें केलेला निग्रह यांचें संक्षेपतः कथन. कलीनिग्रहाचें कारण व ते गायवृषभ कोण होते एतद्विषयक कथेमधून कांहींतरी हरिकथानुसंधान निघेल अशा रीतीचें निरूपण सांगण्याविषयीं ऋषींची सूतास विनंती २५१ लौकिक व दैविक विषयी जनांच्या कथांची निंदा व त्यांच्या चरित्रवर्णनाचा निषेध २५१-२५२ हा यज्ञप्रयत्न हरिकथाश्रवणार्थ असून येथें सूर्यनंदन आहे तोपर्यंत कोणी मरणार नाहीं असें ऋषींचें वचन. शंका :- प्रारब्ध संपल्याबरोबर देह पडावा असा नियम असून तो मोडणें यमराजांनां शक्य आहे काय? (य३-४४) समाधान :- प्रश्नाबद्दल शिष्याचें अभिनंदन २५२ मृत्यू नसूनही विषयीजन तो आपल्यावर ओढून घेतात याविषयीं विषयीजनांची रीति वर्णन २५२-२५३ हरिचरित्राचे ठिकाणीं ज्यांचें अनुसंधान आहे त्यांचें आयुष्य वाढविण्याकरतां यज्ञांत सूर्यनंदनाला आणलें असून मुनिवचनाचा अभिप्राय २५३ मुमुक्षूच्या तीव्र सात्त्विक प्रयत्नानें क्षणापुरती आधिकारिकत्वप्राप्ति व तितक्या क्षणांत लोकांनीं भगवत्चिंतन करावें याकरितां श्रीकृष्णकथा ज्यांत आहे असें चरित्र सांगण्याविषयीं ऋषींची सूतास विनंती. श्रीहरिप्राप्तिवांचून कर्मधर्मादिकांचें भ्रमरूपत्व २५३ हरिभजन न करितां संसारसुखार्थ झटणाऱ्या विषयीं जनांच्या रीतीची सदोषतावर्णन २५३-२५४ ऋषींच्या स्पृर्येचें अभिनंदन करून सूतानें दिलेलें उत्तर :- परीक्षितीच्या दिग्विजयाचें व भगद्वारणप्रीतीचें वर्णन २५४ दिग्विजयकालीं राजानें पाहिलेलें आश्चर्य २५५ अधिदैवसृष्टीतील धर्म व पृथ्वी यांची लक्षणें. धर्मपृथ्वीसंवाद निरूपणः- वृषभरूपधारी धर्मानें रूदन करित असलेल्या धेनुरूपधारी पृथ्वीला नाना आशंकापूर्वक विचारलेलें शोकाचें कारण २५५-२५७ श्रीकृष्णविरह आपल्या शोकाचें कारण आहे हें सांगण्याकरिता भगवंताची गुणपात्रता आठवीत पृथ्वीनें दिलेलें उत्तर :- भगवंताचें कारुण्य, शुचित्व, दयालुत्वादि गुणवर्णन २५७-२५८ भगवान् आपल्याला सोडून गेले एतदर्थ पृथ्वीचा शोक २५८ भगद्वारणरजसंपत्तीनें*

*आपल्याला (पृथ्वीला) आलेली शोभा, तीमुळें झालेला अभिमान व भगवद्विरहदंडकथन २५८-२५९ आपल्याला भार झाला असतां दुष्टांचा संहार करून धर्माला चतुष्पाद करण्याविषयीं भगवंताचा प्रयत्नकथन २५९ कालदैवादिवाद असिद्ध जाणून भगवत्सहायानें प्रबल यत्न केला असतां कालही पूर्ण वश होतो असा ह्या पृथ्वी वचनाचा अभिप्रायनिरूपण २४९-२६०* ***का वा सहेत विरहं पुरुषोत्तमस्य प्रेमावलोकरुचिरस्मितवल्गुजल्पैः। स्थैर्यं समानमहरन्मधुमानिनानां रोमोत्सवो मम यदंघ्रिविटङ्किताया:।। १-१६-३५*** *या श्लोकानुसार स्वानुभवानें भगवद्विरहासहिष्णुता-निरूपण :- भगवत्स्वरूपाची मोहकता व स्त्रीशूद्रांदिकांनां स्वचरणविषयक प्रेमदानतत्परतावर्णन (य३-४५) स्त्रियांनां मधुमानिनी म्हणण्याचें कारण व श्लोकांतील 'समान' पदाचा ध्वनितार्थकथन. कृष्णलीलेचें प्रयोजन २६० स्त्रियांनां पतिभक्तीनें कृष्णभक्तिप्राप्तीची प्रक्रियानिरूपण २६०-२६१ मन पूर्णपणें हरिमय होण्याला विरहभक्तीची आवश्यकता व शुद्धप्रेमलक्षणकथन. पृथ्वीवचनाचा भाव निरूपण. 'वासुदेवः पुमानेकः' या स्मृत्यनुसार समस्त विश्वाला कृष्णपत्नीत्व. भगवच्चारणसमागमानें पृथ्वीची दृष्ट भौतिक स्थिति, भगवद्विरहानें संतप्त स्थिति व दुःखमोचन होण्याला श्रीकृष्ण भेटीची अपेक्षा. धर्म-पृथ्वीचा संवाद श्रवण करीत राजा परीक्षितीचें पूर्ववाहिनी सरस्वतीचें तीरीं आगमन. उपसंहार २६१-२६२*

०००

# धर्म-पृथ्वी संवाद

**।। श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरमाउली समर्थ ।।**

**।। चूर्णिका ।।**

**मानसा त्या हरिला भज रे । ज्याच्या करुणें भेटुनि सद्गुरु । सहज कळे निज[२] रे ।। मानसा० ।। ध्रु० ।।**
**जयजय मुकुंद सच्चिदानंद जगदंकुरकंद[३] इंदिराहृदयारविंदमिलिंद[४] गोविंद नंदीवाहनध्येय[५] ब्रह्मानंद[६] ।।**
**(य३,२४६)**
**नारदादिमुनि[७] वृंदवंद्येंद्रादिवृंदारक[८] वंदिति ज्या वृंदावनविहारीपदा[९] तयांस बंदीहूनि[१०] सोडविता ।।**
**भववारणपंचानन[११] स्वजनापदानिवारणशील[१२] [१३] प्रमदापल्लव स्कंधीं वाहतो ।।**
**ज्याचें पूर्णपण जाणावया मांडुक्य सांगे प्रणवचतुश्चरण[१४] ।**

*(२) आपले स्वरूप (३) जगत्‌रूपी अंकुर ज्या कंदाचे ठिकाणी उत्पन्न झाला (४) लक्ष्मीच्या हृदयरूपी कमलाचे ठिकाणी भ्रमररूप (५) नंदी आहे वाहन ज्याचे, तो शंकर ज्याचे ध्यान करितो. (६) ब्रह्मानंदस्वरूप (७) नारदादि मुनीजनांचा समुदाय ज्याला वंदन करितो (८) इंद्रादि देव (९) वृंदावनात विहार करणाऱ्या पायाला (१०) कैदेतून (११) संसाररूपी हत्तीचा नाश करणारा सिंह (१२) आपल्या भक्तजनांचे दुःख नाहिसे करणे हेच ज्याचे शील आहे (१३) स्त्रियांची वस्त्रे (१४) प्रणवाचे चार भाग.*

**जो सर्वांतःकरण साक्षी[१] होऊनि पाहतो । आणि नंदराणीपाणिस्थित[२] पाणियानें[३] नाहतो[४]।**
**जया [५]चक्रपाणीचे चरणीं पितामह[६] तनुमन वाहतो ।।**
**तो वाणीनें 'दे लोणी अयि जननी! कहीं देशील दही' इत्यादिवचनीं बाहतो[७]।**
**करितांचि यत्स्मरण निवारी जनिमरण[८] सकरुण भगवंत अनंत दीनान्याय[९] साहतो ।**
**निजरूपीं कदापि नच बाधा[१०] परि राधाधरसुधालुब्ध स्तब्धता[११] लाहतो ।।**
**परब्रह्म परमात्मा ऐसा महात्मानुभवसाक्ष[१२] महावाक्यलक्ष्य[१३]।**
**यन्निगमा गरिमा[१४] न कळे, वर्षवातातपहिमा[१५] साहुनी मुनि वर्णिति महिमा ।**
**तो दासकामद[१६] चिद्विलास,[१७] रचुनि रास, पुरवि आस,गोपिकांची ।।**
**तेथ साची प्रीति ठेवुनी, अंतरीं बाहेरीं अलकावतिवल्लभकरुणें[१८] सहज सुलभ निर्गुण सगुण ब्रह्म उमज रे ।**
**मानसा त्या हरिला भज रे ० ।।१।।**

**।। गीति ।।**

**जय जय म्हणुनी वाणी[१९] अक्षय रतसिल अलंदिपतिनामीं[२०] ।**
**तरि माये तव करुणें पुढति कदापिहि पडे न भविं[२१] ना मी ।।२।।**

**विनवित मी तुज पवना[२२] श्वासोच्छ्‌वासांत गाइ गुरुनावें ।**
**न्याया भवपरतटिं[२३] मग अधिकारीगण[२४] समस्त भरुं नावें[२५] ॥३॥**

*(१) सर्वांच्या अंतःकरणांना जाणणारा (२) यशोदेच्या हातातील (३) जलाने (४) स्नान करितो (५) सुदर्शन चक्र ज्याच्या हातात आहे (६) भीष्माचार्य (७) हाका मारितो (८) जन्ममृत्यु (९) दीनजनांचे अपराध (१०) विस्मृति, न्यूनपणा (११) राधेचा खालचा ओठ हेच अमृत, त्याचे ठिकाणी आसक्त होऊन त्यातच तल्लीन होतो (१२) मोठमोठ्या महात्म्यांचा अनुभव ज्याला साक्ष आहे (१३) महावाक्याच्या लक्षणेने कळणारा (१४) थोरपण (१५) पाऊस, वारा, ऊन व थंडी (१६) दासांची मनकामना पूर्ण करणारा (१७) चैतन्यमय क्रीडा (१८) श्रीज्ञानेश्वर महाराजांच्या कृपेने (१९) वाचे, जिव्हे (२०) श्रीज्ञानेश्वर महाराजांचे नामाचे ठिकाणी (२१) संसारी (२२) वायो (वायु) ! (२३) संसाराच्या पार (२४) मोक्षाचा अधिकारी वर्ग (२५) नावेवर.*

**प्राणसख्या चित्ता त्वां हरिचरणाविण न अन्य कामावें[१] ।**
**अयि मति हृदि तव करुणें न सुजन निजपदवदान्य[२] कां मावें[३] ॥४॥**

**॥ ओव्या ॥**

**भक्तहृदयीं[४] भागवतीं[५] । कलिमल[६] हराया निश्चिती । प्रवेशलीया यदुपती । पांडव भगवंतीं मिळाले ॥५॥**
**कीं पंढरी[७]आलिया जगज्जीवन । पांडव लाधलिया[८]हरिचरण ।**
**प्रजापालक उत्तरानंदन[९]। जाहला ब्राह्मणानुग्रहें[१०]॥६॥**

शिष्य उवाच :- भगवन्, आपण हा प्रियलीलामहोत्सव भागवतानुरोधानें[११] मला सांगत असल्यामुळें ह्यांतील निजधामगमनकथेचा[१२] (य३-२४७) विपर्यास[१३] करण्याचें कांहीं प्रयोजन असेल असें मला वाटत नाहीं. आतां, उपासनेमुळें करावें लागतें असें म्हणाल तर भागवतदृष्ट्या[१४] व्यासांनांही कृष्णोपासना नव्हती असें नाहीं आणि इतिहासाचा उपासनेनें[१५] लोप करणेंही उचित नाहीं.

गुरुरुवाच :- योग्य विचारलेंस. उत्तर मात्र चित्तैकाग्र्यानें श्रवण कर म्हणजे झालें. भगवन्निजधामगमनकथेचा मी विपर्यास करीत नाहीं, परंतु भगवन्निजधामगमनकथेविषयीं तुला पक्ष[१६] घेण्यास तरी काय प्रमाण आहे ? केवळ व्यासवचन, असें म्हणशील तर बरोबर नाहीं. कारण वाक्य प्रमाण घेतांनां[१७] तें मुख्य आहे किंवा गौण आहे याचा अवश्य विचार करावा लागतो.

*(१) इच्छावे (२) सज्ञनांना आपले पद प्राप्त करून देणारा उदार (३) मावणार नाही (४) भक्तांच्या चित्तात (५) भागवतामध्ये (६) कलिदोष (७) श्रीकृष्णाचे निजधामगमनाविषयी दोन कथा आहेत एक भागवत महात्म्यात श्रीकृष्णाने भागवतात प्रवेश केला असे म्हटले असून दुसरी हरिविजयकार श्रीधरस्वामी यांनी श्रीकृष्ण पंढरीस आले असे विधान केले आहे (८) पांडव श्रीकृष्णस्वरूप झालेत (९) परीक्षिती (१०) ब्राह्मणांच्या कृपेने (११) श्रीमद्भागवतानुसार (१२) श्रीकृष्ण अवतार संपवून निजधामास गेले या कथेचा (१३) उलट सांगणे, विरुद्ध सांगणे (१४) भगवदुपासक या नात्याने पाहता (१५) उपासनेकरता. (१६) तसे मानण्यास (१७) मानतांना*

ज्या वाक्याची स्वविषयाहून[१] अन्यत्र[२] गति होत नाहीं त्याला मुख्य म्हणतात; आणि ज्याची स्वविषयाहून अन्यत्र गति होते त्याला गौण म्हणतात.

जसें, विष्णुदत्ताच्या घरीं समारंभांत देवदत्ताला तेथील एका मनुष्यानें सांगितलें कीं 'तुम्ही मंडळीला तांबूल वाटा', इतक्यांत दुसऱ्या एकानें सांगितलें कीं 'ब्राह्मण पात्रावर बसले आहेत आणि घृताची अडचण आहे, घृत आपल्या हातांत असल्यामुळें आमचा कांहीं इलाज चालत नाहीं'. या दोन वाक्यांमध्यें जेवणारे ब्राह्मण क्षणभर थांबू शकत असले तर दुसऱ्या वाक्याची अन्यत्र गति होते आणि थांबू शकत नसले तर पहिल्या वाक्याची अन्यत्र[३] गति होते;

किंवा अशी कल्पना कर कीं एका मालिनी नांवाच्या स्त्रीला तरलिका हांक मारून म्हणाली, 'बाई, आपलें मूल रडतें त्याला पाजा' आणि इतक्याच अवकाशांत सुरुचीनें हाक मारून सांगितलें कीं 'आपले पती उन्हांतून येत असतां घाबरे होऊन दारांत मूर्छित पडले आहेत, आपण त्यांच्या मुखांत पाणी घालून गोड शब्दांनीं त्यांनां सावध करावें'. — या दोन्ही वाक्यांचा विचार करतांनां असें दिसतें कीं मुलाला घडीभर खेळविलें असतांनां तें उगें राहूं शकेल परंतु घाबरून गेलेला प्राण परत येणार नाहीं. म्हणून पहिल्या वाक्याची उपेक्षा करून दुसऱ्या वाक्याकडे धांव घेणें उत्तम. कारण दुसऱ्या

वाक्याची स्वविषयाहून अन्यत्र गति नाहीं. तद्वत् व्यासवाक्यांतही मुख्य वाक्य कोणतें व गौण वाक्य कोणतें याचा तुला विचार केला पाहिजे होता. कारण (य३-२४८) दोन्ही प्रकारचीं परस्परविरोधी अशीं व्यासवाक्यें आहेत. त्यांत एक कृष्णनिधनबोधक[४] वाक्य तुला ठाऊकच आहे आणि त्याच्याच विरोधी दुसरें गर्भस्तुतींत एक वाक्य आहे -

**'स्वयं समुत्तीर्य सुदुस्तरं द्युमन् भयार्णवं भीममदभ्रसौहृदः ।**
**भवत्पदांभोरुह नावमत्र ते निधाय याताः सदनुग्रहो भवान्' ॥**

*(१) ज्या उद्देशाने ते वाक्य उच्चारले त्या उद्देशावाचून (२) दुसरे ठिकाणी (३) पहिल्या पक्षी (मुख्य) नंतरचे (गौण) काम (४) श्रीकृष्ण निजधामास गेले हे सांगणारे*

या श्लोकांत संसारांतून पार झालेले असे भगवज्जन त्वच्चारणकमलरूपी नाव[१] मागें ठेवून कैवल्यपदी प्राप्त होतात असें देवांनीं म्हटलें आहे. आतां, शरीरारहित[२] नुस्ते पाय कांहीं रहावयाचें नाहींत म्हणून तुझें अवतारशरीरच ते स्थापन करून जातात असें म्हटलें पाहिजे असें म्हणणें म्हणजे अवतार निजधामास पाठविणाऱ्या कथेचा विरोधच करणें होय. परंतु वाक्यमुख्यगौणव्यवस्थेनें[३] विरोधपरिहार[४] होतो.

पहा, श्रुति, शास्त्र व संत सर्वांनां भवपार होण्याकरितांच उपायदर्शक आहेत. त्यांचे ते उपाय मिथ्या झाले म्हणजे अर्थातच संसार परतीर पावणे अशक्य आहे. येथेंही अवतारशरीररूपी नाव सत्पुरुष ठेऊन जातात असें म्हटलें आहे. तें अवतारशरीर जर नाश पावेल तर सत्कथित उपाय मिथ्या झाल्यामुळें मुमुक्षु लोकांनां तरणोपायच राहणार नाहीं. म्हणून शब्दप्रमाण मानावयाचें असल्यास गर्भस्तुतींतील वाक्याची स्वविषयाहून अन्यत्र[५] गति होत नाहीं असें तुला मानलेंच पाहिजे. तसें मानलें म्हणजे अर्थातच तें वाक्य मुख्य[६] झालें. आतां, कृष्णकथेचेंही वाक्य मुख्य मानशील तर मुख्य वाक्यामध्यें परस्पर विरोध येणें याला उन्मत्तप्रलाप[७] म्हणतात. व्यासांनां उन्मत्त ठरविण्याइतकी कांहीं तुझी विद्या दिसत नाहीं. याला उदाहरण तूं मला शंका विचारतोस हेंच आहे. तस्माद्भगवन्निजधामगमनवाक्य गौण मानलें पाहिजे. आतां त्या वाक्यांचाच विचार करूं . भगवच्छरीर नित्य आहे म्हणून तुला वारंवार मागें सांगितलेंच आहे. आतां भावकार्याला[८] नित्यता नसल्यामुळें भगवच्छरीर नित्य नाहीं अशी खुळी शंका काढणें योग्य नाहीं. कारण भगवंताचें शरीर भूतकार्य[९] नसून

*(१) नौका (२) शरीर सोडून (३) एक वाक्य मुख्य व एक गौण अशा व्यवस्थेने (४) एकवाक्यता (५) गौण ठरत नाही (६) दोन विरोधी वाक्य सारख्या महत्वाची मानल्यास (७) वेड्यासारखे बोलणे (८) उत्पन्न होणारे कार्य (९) पंचभूताचे बनलेले.*

कारणरूप मायाकार्य[१] किंवा अनध्यस्तविवर्त[२] आहे, हेंही तुला मागें सांगितलें. पुन्हा, भावकार्य नित्य नसतें असें यद्यपि नैय्यायिक म्हणतात तथापि योगज प्रज्ञेनें[३] अनागत[४] ज्ञान कसें होतें याचें उत्तर देतां येत नाहीं. म्हणूनच सांख्यानें (य३-२४९) सत्कार्यवादाचा[५] स्वीकार करून सूक्ष्मावस्थेंत[६] असलेलें कार्यच त्यांनां दृग्गोचर होतें असें समाधान केलें आहे. – मी जो कार्यसत्यतेचा[७] निषेध केला आहे तो ब्रह्मसमसत्तेचा[८] केला असल्यामुळें त्यावरून शंका काढण्याला येथें अवसर नाहीं. – याप्रमाणें जीवसंयोगी[९] प्रकृतिकार्य[१०] जर सत्य[११] आहे, तर समस्तजगदनुग्राहक भगवत्संकल्परूपी[१२] शरीर सत्य नाहीं हें म्हणणें अप्रमाण[१३] व अयुक्तिक[१४] आहे. बरें, भगवन्निजधामगमनवाक्यें[१५] तरी भागवत भारतांतच प्रसिद्ध आहेत. पद्मपुराणांतर्गत भागवत महात्म्यांत परमेश्वरानी निजधामाला न जाता भागवतातच प्रवेश केला असे एक वाक्य आहे. आणि

**'द्रौपदी[१६]च परित्राता येन कौरवकश्मलात् । पालिता गोपसुंदर्यः स कृष्णः꣡ापि नो गतः' ।** पद्मपुराण.

असेंही तेथेंच म्हटलें आहे व त्याप्रमाणें वरील पुराणांतर्गतच वृंदावनमाहात्म्यांत श्रीकृष्णासहित रास वृंदावनांत अझून गुप्त होत असतो असें म्हटलें आहे.

*(१) कारणरूप जी माया तिचे कार्य (२) ब्रह्मज्ञानाने नाहिसे न होता सोन्याच्या अलंकाराप्रमाणे सच्चिदानंदरूपाने भासणारे (३) योगसमाधीने प्राप्त होणारी बुद्धि (४) भविष्य (५) उत्पत्तीपूर्वी कार्य अस्तित्वात असते व नाशानंतर कार्य कारणात पुनः लीनरूपाने राहते ह्मणून कोणतेहि सृष्टिकार्य ब्रह्मज्ञान होईपर्यंत सत्य आहे या वादाचा (६) कारणांत लीन असलेले (७) कार्य सत्य आहे या म्हणण्याचा (८) ब्रह्मासारखे ते सत्य नाही या दृष्टीने (९) जीवाशी ज्याचा संबंध येतो (१०) प्रकृतीचे कार्य (११) उत्पत्तीपूर्वी व नाशानंतर राहणारे (१२) संपूर्ण जगतावर कृपा करणाऱ्या केवल भगवत्संकल्पाने*

*भासणाऱ्या (१३) निराधार (१४) युक्तिरहित (१५) भगवान् निजधामास गेले असे प्रतिपादन करणारी वाक्ये. (१६) ज्याने कौरवांच्या पापबुद्धीपासून द्रौपदीची सुटका केली व गोपसुंदरीचे मनोरथ पुरविले, तो श्रीकृष्ण कोठेहि गेला नाही.*

ही सर्व पुराणें व्यासांनींच केलेलीं आहेत. अर्वाचीन क्षेपकवादी[१] यांनीं कदाचित् चार पांच व्यास काढले तर आमचा उपाय नाहीं, परंतु एकाच व्यासांचें हें वाक्य समजून जर आमच्याकडून व्यवस्था लागूं शकते तर उगीच क्षेपकवादाचा आम्ही स्वीकार कां करावा?

ती व्यवस्था अशी कीं पद्मपुराणांतील वाक्य मुख्यवाक्यानुसार[२] असल्यामुळें अधिक प्रमाण आहे. आतां गौण वाक्याची[३] व्यवस्था काय ? असें विचारशील तर सांगतों ऐक. – श्रीकृष्णनिजधामबोधक जीं गौण वाक्यें आहेत त्यांची अन्यत्र[४] गति अशी आहे कीं, श्रीकृष्णासारखे जरी वैभव प्राप्त झालें तरी त्याचा शेवटीं नाश झाला म्हणून ईश्वरासारखें जरी ऐश्वर्य प्राप्त झालें तरी त्यांत आसक्त होऊं नये असा दृढ वैराग्यबोध करणेंच त्या वाक्याचें तात्पर्य आहे, इतिहास[५] तात्पर्य नाहीं. कपिलांनींही सांख्यसूत्रांत ऐश्वर्यांत[६] वैराग्य उत्पन्न व्हावें म्हणून ईश्वराचें खंडन केलें असून भागवतांत देवहुतीला ज्ञान सांगतांना ईश्वराची भक्ति सांगितली आहे. म्हणून सूत्रांतील[७] वाक्य यथार्थ ईश्वरखंडनपर नसून जीववैराग्यबोधपर[८] आहे; अशी त्याची अन्यत्र गति असल्यामुळें -

*(१) आर्षग्रंथात मागाहून भर टाकिली गेली असे म्हणणारे, अमुक ग्रंथातील अमुक भाग खास ग्रंथकर्त्याचा नव्हे म्हणणारे (२) भगवंताला गमनागमन संभवत नाही हा जो वेदान्त सिद्धान्त त्याला धरून असलेले भागवतातील गर्भस्तुतिमधील 'स्वयं समुत्तीर्य सुदुस्तरं द्युमन्' हे वाक्य (३) निजधामगमन सांगणारे वाक्य (४) शब्दार्थ सोडून तात्पर्यार्थ (५) खरोखर श्रीकृष्ण निजधामास गेले हा इतिहास आहे असे त्याचे तात्पर्य नाही (६) परमेश्वराच्या सामर्थ्याचे ठिकाणी चित्त आसक्त होऊ नये म्हणून (७) सांख्यसूत्रातील, (८) जीवाला ईश्वराचे ऐश्वर्याविषयीहि वैराग्य व्हावे असा बोध करणारे.*

जसें तें भागवतवाक्यापेक्षां[१] गौण होतें तसें येथीलही भगवन्निजधामबोधक वाक्य अन्यत्रगतिमत्वास्तव[२] पद्मपुराण व गर्भस्तुतींतील वाक्यापेक्षया (य३-२५०) गौण होतें. आतां पद्मपुराण हा दुसरा ग्रंथ आहे, त्यांतील वाक्याचा गर्भस्तुतींतील वाक्याशीं समन्वय करण्यापेक्षां भागवतरूप एकाच ग्रंथांत असणाऱ्या निजधामवाक्याचा उपसंहार[३] करणें बरें असें म्हणणें योग्य नाहीं. कारण सन्निधिमात्रेंकरून[४] कांहीं गौण वाक्याचा उपसंहार मुख्य वाक्यांत होत नाहीं. जसें :- ब्रह्मविद्या[५] प्रतिपादन करणाऱ्या अथर्वण उपनिषदांतच **'भिंधि भिंधि छिंधि छिंधि'** इत्यादि अभिचारबोधक[६] मंत्र आहेत ते जरी एकाच ग्रंथांत आहेत तरी भिन्नविषय[७] असल्यामुळें केवळ सन्निधिमात्रेंकरूनच त्या ग्रथांतील ब्रह्मविद्येंत आभिचारिक मंत्रांचा उपसंहार भगवान् शारीरकसूत्रकार करीत नाहींत. तसेंच आम्हीही भगवन्निजधामबोधक वाक्यें जरी एकाच ग्रंथांतील आहेत तरी गर्भस्तुतींतील भगवच्छरीरनित्यत्वविद्येंत[८] त्यांचा उपसंहार करीत नाहीं. तस्मात् आमचे प्रियतम आम्हास सोडून केव्हांच जावयाचे नाहींत हें सिद्ध झालें.

शिष्य उवाच :- भगवन् ! माझ्या शंकेचा त्रैकालिक[९] बाध झाला आतां प्रभुवचनपीयूषपिपासा[१०] आहे.

*(१) देवहुतीला सांगितलेल्या भगवद्भक्तिबोधक वाक्यापेक्षा (२) त्याचे तात्पर्य दुसऱ्या ठिकाणी असल्यामुळे (३) समावेश, शेवट (४) नुसते जवळ आहे या सबबीवर (५) ब्रह्मज्ञान सांगणाऱ्या (६) जारणमारणादि प्रकार सांगणारे (७) स्वतंत्र निराळ्या विषयाला धरून (८) भगवंताचे शरीर नित्य आहे असे सांगणारी ज्ञानवाक्ये (९) कायमची शंका दूर झाली (१०) महाराजांचे वचन हेच कोणी अमृत ते प्राशन करण्याची इच्छा.*

श्रीगुरुरुवाच :- श्रवण कर -

**इरावती नामें आपुली तनया[१] । उत्तरें[२] अर्पिली परीक्षिद्राया ।**
**ती जनमेजयादि चार तनया[३] । जन्मवोनि झाली वीरमाता[४] ॥७॥**
**गुरु करोनी कृपाचार्य । तीन अश्वमेध करी राय । बहुत दक्षिणा वाटी स्वयें । गंगातीरीं धर्ममति[५] ॥८॥**
**नंतर दिग्विजयकाळीं[६] । नृपें निग्रहिला[७] कळी[८] । जो शूद्रशरीरें[९] विटाळी । राजचिन्हातें ॥९॥**
**गोवृषभाचिये[१०] मागें । मारावया धांवत वेगें । तंव ऋषी म्हणती सूता सांगे । कलीतें राय निग्रही कां ॥१०॥**
**कवण ती गाय वृषभ कवण । हें सर्वचि करी निरूपण । परी निघावें[११] येथून । हरिकथानुसंधान[१२] कांहीं तरी ॥११॥**
**श्रीकृष्णकथा जेथ नाहीं । असें सांगोनियां काई । वाळू घुसळोनि कहीं । तैल न निघे ॥१२॥**
**अति अज्ञान पशुजन[१३] । तयांच्या चरित्रीं काज कोण । विषयासक्त मनुष्यगण । तेंही वर्णन योग्य नोहे ॥१३॥**

म्हणशील वर्णूं स्वर्गलीला । तरी ते अयोग्य सूतबाळा । देवांचाही काळे[१४] गळा । विषयसाधनें[१५] आवळिला ॥१४॥
जैसें श्वान घरोघरीं । फिरे पहावया भाकरी । भुंके आल्यागेल्यावरी । विण्मूत्रमय[१६] धरित्री[१७] हुंगे ॥१५॥
(य३-२५१)
श्वानाचें नांवही जाण । भोजनकालीं न घेती जैन । ऐकलियाही जाती उठोन । भोजन सोडून तात्काळ ॥१६॥
तैशा विषयी[१८] जनांच्या कथा । मुमुक्षुमानसा[१९] देती व्यथा । मग दैविक[२०] लौकिक सर्वथा । कोणीही असो ॥१७॥

*(१) मुलगी (२) विराटराजाचा मुलगा (३) मुलांना (४) वीरांची माता (५) धर्माचे ठिकाणी ज्याची निष्ठा आहे (६) पृथ्वी जिंकावयाला निघाला असता. (७) बंधन केले (८) कलिपुरूष (९) शुद्राचे शरीर धरून. शूद्र जातीचा पण राजाची चिन्हे धारण करणारा असा कलीचा वेष होता (१०) गाय व बैल (११) उत्पन्न व्हावे (१२) भगवंताच्या कथेचा संदर्भ (१३) पश्वादिप्राणी (१४) मृत्यूने (१५) विषयसुखाच्या साधनामागे लावून (१६) मलमूत्रादिकांनी युक्त (१७) पृथ्वी (१८) विषयासक्त (१९) मुमुक्षूच्या मनाला (२०) देवादि विषयासक्तांच्या कथा असोत किंवा सामान्य लौकिक पुरुषांच्या कथा असोत.*

घडी घडी स्त्रियेचें मुख देखणें । अधरामृत म्हणोनि लाळ चोखणें । धनासाठीं टाकणें । धरिलें व्रत[१] ॥१८॥
नाना धर्माची आटाघाटी । सत्याची कांस ही[२] गोमटी । केवळ जगन्मानासाठीं[३] । धरिती जे ॥१९॥
करोनियां उत्तम सत्र[४] । स्वर्गीं रंभेचें मूत्रपात्र । तथापि ऐसियांचें चरित्र । वर्णुनी सार काय मिळे ॥२०॥
जिने नवमास वाहिलें पोटीं । रात्रंदिन स्तन लाविलें होटीं ।
ती मायही स्त्रियेच्या योनीसाठीं । टाकिती त्यांच्या गोष्टि नको ॥२१॥
आमुचा यज्ञप्रयत्न[५] सूता । ऐकावया हरिकथा । येथ यमराया भगवंता । आणिलें आम्ही ॥२२॥
जोंवरी यमराय या ठायीं । तोंवरी कोणी मरणार नाहीं । सकळ सृष्टि ऐको लवलाही । फणिशायीकथामृत[६] ॥२३॥
तंव शिष्य म्हणे श्रीगुरुराया । मज झडपूं पाहे आशंका[७] माया । ती ज्ञानखड्गें[८] मारोनियां । दीनरक्षण करा प्रभो ॥२४॥
जोंवरी यज्ञीं सूर्यनंदन[९] । तोंवरी कोणा नाहीं मरण । परी प्रारब्ध संपलिया जाण । देह पडे नियम हा ॥२५॥
प्रारब्धभोगावीण[१०] पाही । देहातें आश्रयो दुसरा नाहीं । मग मृत्यु यज्ञीं असोनि काई । नियम मोडूं शकेल ॥२६॥
श्रीगुरु म्हणती भला रे भला । श्रोता तुजऐसा जोडला । म्हणोनि माझा उल्हासला । बोधसिंधू ॥२७॥
तूं साधनचतुष्टयसंपन्न । यास्तव थोड्याचि बोधें पूर्ण । परी लोकोपकाराकारण । नाना प्रश्न करितोसी ॥२८॥
तरी ऐकें समाधान । ऋषीचें ऐसें आहे वचन । कीं कथा ऐकतां यावी म्हणोन । आणिला सूर्यनंदन येथ आम्ही ॥२९॥
येथ[११]पशूही[१२]ऐसेचि असती । ज्यांची सहज समीप अंतःस्थिति[१३]। ते यज्ञसन्निध[१४]निश्चिति, उत्तमगति जातील ॥३०॥

*(१) केलेला नियम (२) आश्रय (३) लोकापासून मान मिळावा म्हणून (४) यज्ञ (५) यज्ञ करणे (६) श्रीकृष्णाचे कथारूपी अमृत (७) शंका हीच माया (८) ज्ञानरूपी तलवारीने (९) यम (१०) प्रारब्धभोगच देह धरून ठेवतो व तो संपला की देह पडतो (११) त्या यज्ञात (१२) मारिले जाणारे पशु (१३) मरणकाल (१४) यज्ञात.*

त्वां केला जो प्रश्न । तरी ऐसें तत्समाधान । कीं मरणार नाहींत विषयीजन[१] । हा अभिप्राय नाहीं मुनिवचनीं[२] ॥३१॥
जे विषयालागीं लाळ घोटिती । वासनाडाकिणी[३] आलिंगिती । ते यमें न बोलावितांचि जाती । मृत्युसदनीं ॥३२॥
पतंगीं[४] यावें माझ्या भेटी । ऐसा डांगोरा दीप[५] न पिटी । परी जावोनि पडती शेवटीं । रूपविषयें[६] आपणची ॥३३॥
(य३-२५२) तैसा मृत्यूही नसतां । विषयीजन मरती तत्वतां ।
विषयप्रयत्नबलें[७] क्षणापुरता[८] । अभिभव[९] करिती दैवाचा ॥३४॥
किंवा पिशाचयोनींत पूर्ण । ते फळ भोगिती आपण । अथवा विषयवासना तीव्र करोन । टाकिती भोगोन प्रारब्ध ॥३५॥
एवं विषयी जनांची रीती । तयांचा मृत्यु टाळायाप्रति । परमेश्वरा नाहीं शक्ति । हें अलंकारोक्ति[१०] मी म्हणे ॥३६॥
परी सकळ विषय सोडोनि जाण । हरिचरित्रीं अनुसंधान । तयांचें वाढावया जीवन । यज्ञीं सूर्यनंदन[११] आणिला ॥३७॥
मुमुक्षूच्या सत्त्वप्रयत्नेंकरून[१२] । आणि साधूंची दया साह्य घेऊन ।
तीव्र[१३] झालिया मुमुक्षाप्रयत्न[१४] । मिळे अधिकारिकपण[१५] क्षणापुरतें ॥३८॥
तितुकिया क्षणामाझारीं । लोक अंतरीं जपोत मुरारी । यालागीं जेथ सांपडे[१६] हरी । ऐसें चरित्र वद सूता ॥३९॥
श्रीहरिप्राप्तीवीण कर्म । तोचि तयां पडला भ्रम । हरिप्राप्तीवीण धर्म । तोचि अधर्म मी म्हणे ॥४०॥
हरिप्राप्तीवीण विद्या । तरी अवघी म्हणावी अविद्या । हरिजन[१७] न जन्मता वंध्या । माय त्याची ॥४१॥

कृष्णप्राप्तीवीण तप । तो पूर्वजन्मीचें भोगी पाप । कृष्णप्राप्तीवीण योगसंकल्प[१८]। खटाटोप वाउगा ॥४२॥

*(१) विषयासक्त लोक (२) ऋषींच्या म्हणण्याचा (३) वासनारूपी डाकिणीला (४) नांवाचा किडा (५) दिवा (६) रूपविषयाला भुलून (७) विषयाचे सुखाकरिता ते जो प्रयत्न करितात त्या प्रयत्नाने (८) थोड्या वेळेपुरता (९) दैवाने प्राप्त होणाऱ्या प्रारब्ध भोगाचा भास न होणे (१०) अलंकारिक भाषेचे (११) यम (१२) सत्त्वगुणाची वाढ करणारा जो प्रयत्न, त्यामुळे (१३) जोरदार (१४) संसारातून सुटण्याचा प्रयत्न (१५) ईश्वर उपासनेने प्राप्त होणारे ऐच्छिक सामर्थ्य, किंवा परमेश्वराच्या सृष्टिनियमनामधील एकादा अधिकार प्राप्त होणे (१६) प्राप्त होतो (१७) भगवद्भक्त (१८) योगाभ्यासाचा निश्चय.*

नवल या जनांची रीती । असलें आयुष्य दवडिती । रोग चिंतेने आणिती । नसते घरां ॥४३॥
रोग आहे शेजारीं । हें जाणोनि स्मरावा पूतनारी । परी ते सोडोनि उलटे शरीरीं । रोग भाविती आपुल्या भयें ॥४४॥
रात्र जाये निद्राभरिता । दिवस जाये कष्ट करिता । दोही पक्षीं सुखाची वार्ता । नाहीं परि कथा नायकती ॥४५॥
न भजावया शेषशायी । अहो काय शक्ति आपुल्या देही । काय आजचि लोकीं तिहीं । निश्चितीं झाली ॥४६॥
काय संपलें जनांचें पाप । काय अग्नीनें सोडिला ताप । काय आघवे विंचु सर्प । मरोनि गेले ? ॥४७॥
थरारे नाहीं कापणार धरणी । ऐसा लेख दिधला कोणी । कीं बोलल्या वेळे वर्षतें पाणी । येते अनुमानी[१] पीक कई ॥४८॥
बाळ तारुण्य आणि जरा । यांचा काय मोडला थारा । माशा चिलटादिक घरां । नाहींत काय ? ॥४९॥
नाना यंत्रादिकें करिती । तेथ चुकीनें काय कोणी न मरती ।
काय बहुत भक्षितां निश्चिती । (य३-२५३) अजीर्ण न होय ? ॥५०॥
काय जाहलें वज्रशरीरी[२] । काय पडले अमृत वक्त्रीं । कोण्या सुखें पूतनारी । हृदयाभीतरीं येईना ? ॥५१॥
जो भक्तवत्सल जगन्मोहन । जो जगद्रक्षक करुणाघन । तो मायबाप सांडोन । कोणत्या आधारें[३] बैसती?॥५२॥
पूतना वैरही करोन । माराया आली विषस्तन भरोन । ती सुखी केली मातृगति देऊन । तो सांडोनि कवण भजावा?॥५३॥
यास्तव सूता तुजप्रती । विनवीतसो पुढतपुढती । जो श्रीकृष्ण वेधक[४] मूर्ती । त्याचीच कीर्ति वाखाणी ॥५४॥
सूत म्हणे मुनिवर्या । धन्य तुमची स्वार्या[५] । कृष्णकथेवीण आर्या । भूषण नाहीं दूसरें ॥५५॥
तरी कृष्णरक्षणें परीक्षिता । प्राप्त जाहली जी सत्ता । तीचेंही वर्णन पाहतां । कृष्णकथा पोषक ॥५६॥
असो तो राय परीक्षित । निजदेशीं कलीं वागत । ही वार्ता ऐकतां विस्मित । अत्यंत झाला ॥५७॥

*(१) अंदाजाप्रमाणे (२) अमर (३) कशावर भरवंसा ठेवून (४) मोहक (५) वंदनीय वागणूक.*

सकळपापमुकुटमौळी[१] । तो प्रविष्ट[२] मत्पालित भूमंडळीं[३] । ऐकोनियां तयेवेळीं । धनुष्य धरता जाहला ॥५८॥
मी कुरुवंशवनकेसरी[४] । कृष्णकृपामृतें[५] वाढलों वरी । तें नेणोनियां दुराचारी[६] । कली महीवरी पातला ॥५९॥
ऐसें मानोनि तेधवां । तया परगणइभसिंहा[७] । नीतिमय[८] क्रोध बरवा । नावरे कीरू ॥६०॥
मग श्यामतुरगसिंहध्वजयुत[९] । ऐसिया रथीं राव चढत । दिग्विजया सेनेसहित । स्मरोनि अनंत निघाला ॥६१॥
मग भद्राश्व केतुमाल भारत । किंपुरुषादि समस्त । वर्ष जिंकोनि सांभाळित । करभार सकळ ॥६२॥
तियें तियें वर्षी[१०] । पांडवयश[११] ऐके विशेषीं । जयांचा साह्य हृषीकेशी । जगदीश्वरू ॥६३॥
द्रौण्यास्त्रापासून[१२] । आपुलें गर्भी कृतरक्षण[१३] । कुंतीपांडवप्रेमपूर्ण । प्रजेवरील ॥६४॥
तैसी भगवंताच्याठायीं । पांडवभक्ति अगाध पाही । ऐकुनी हृदयीं । तुष्टला रावो ॥६५॥
मग तेथिलीया जनां । दिले उत्तम वस्त्र आणि धना । जैसा बापू भेटोनि नंदना । पुरवी कोड[१४]॥६६॥
एवं पांडवांचा सारथी । स्नेहें जाहला श्रीपती । हें अचाट ऐकूनि परीक्षिती । ठेवी प्रीती हरिचरणीं ॥६७॥
आधींच आवडता गोपाळ । आणि कुळदेवही[१५] केवळ । गर्भी माझें कष्ट प्रबळ । वारिलें जेणें ॥६८॥
तया भगवंतावांचुनी । आन नसावें माझे मनीं । ऐसें राव जीवीं धरोनि । श्रीकृष्णचरणीं प्रीति ठेवी ॥६९॥ (य३-२५४)
उचित पूर्वजनानुकूल[१६] । चालत असतां नृपाळ । शीघ्रचि आश्चर्य देखिलें प्रबळ । ऐकावें तें ॥७०॥

*(१) संपूर्ण पापांचा मुकुट ज्याच्या डोक्यावर आहे असा, किंवा संपूर्ण पापांत मुकुटमणी (२) शिरला (३) मी ज्या पृथ्वीचे पालन करीत आहे तिचे ठिकाणी (४) कौरववंश हेच कोणी अरण्य त्यांत राहणारा सिंह (५) श्रीकृष्णाची कृपा हेच कोणी अमृत त्याच्या योगाने (६) पापी (७) शत्रूंचा समूदाय हाच कोणी हत्ती त्याचा नाश करणारा सिंह (८) नैतिक (९) ज्याला*

*श्यामरंगाचे घोडे जोडले आहेत व ज्याच्यावर सिंहाचा ध्वज आहे अशा (१०) खंड (११) पांडवांची कीर्ति (१२) अश्वत्थाम्याच्या ब्रह्मास्त्रापासून (१३) केलेले संरक्षण (१४) लाड (१५) कुळीची देवता (१६) वाडवडिलांच्या पाऊलावर पाऊल टेवून.*

धर्म वृषभरूप[१] धरून । एक्या पायीं करी गमन । पृथ्वी धेनुरूप[२] धरून । करी रूदन विशेषें ॥७१॥

### धर्म आणि पृथ्वीची उत्पत्ति

॥ संस्कृत गद्य ॥

धर्मवासनायां [३] जगत्कल्याणरूप-भगवदनुग्रहांश-शुद्धसात्त्विक पुण्योपहित-चैतन्यम् अधिदैवसृष्टौ धर्मसंज्ञाम् अवाप ।
'धर्मोऽहं वृषरूपधृगिति'
प्रियोक्तेस्तदेव अनुग्राह्य जन-निमित्तं शोचति, न स्वनिमित्तम् ।
जने परमनुग्राह्यम् अनुसरति ।
तद्वद् धीसमष्ट्यन्तःकरणांशभूत जगत्पालनधारणारूप पृथ्व्यन्तःसत्त्वोपहितं चैतन्यम् अधिदैवसृष्टौ उर्वीसंज्ञाम् अवाप ।
सत्त्वसाम्याद्धर्मानुसारी जनपालक-धेनुवृषभचिन्हान्वित-शरीरं कृत्वा परमाश्चर्यं नृपं दर्शयामास ।
धर्मोऽपि तद्वदेव ॥

*(१) बैलाचे रूप (२) गाईचे रूप (३) संस्कृत गद्यभावार्थ :- (भगवंताची आज्ञा तो धर्म होय.) जगताचे आत्यंतिक कल्याण व्हावे अशा प्रकारची जी भगवंताची कृपावृत्ति, ती शुद्धसात्विक पुण्यरूप आहे म्हणजे जगाचे हिताकरिता भगवंताने कृपा करून शुद्ध सात्विक पुण्यकर्म निर्माण केले म्हणून खरे कल्याण शुद्ध सात्विक पुण्यानेच होते. अशा शुद्ध सात्विक पुण्यालाच धर्म म्हणतात. त्या धर्माची वासना ज्या चैतन्याच्या ठिकाणी आहे, अशा चैतन्याला देवतासृष्टीत धर्म म्हणतात. जरी क्रियारूप धर्म जड आहे तरी, शुद्ध सात्विक पुण्यरूप धर्माच्या वासनेने युक्त चैतन्य ही धर्माची अभिमानी देवता होय म्हणून या दृष्टीने धर्म चेतन ठरतो. बैलाचे रूप धारण करणारा धर्म मी आहे असे भगवंताने म्हटले आहे. म्हणून शुद्ध सात्विक पुण्यरूप धर्माभिमानी चैतन्य, कृपा करण्यास योग्य अशा लोकाविषयी शोक करू लागले व स्वतःला दुःख झाले म्हणून शोक करीत नव्हते. लोकांतहि असेच आपण पाहतो की, अत्यंत दयापात्र पुरुषांची आपण कीव करितो. त्याचप्रमाणे समष्टि अंतःकरण जो हिरण्य गर्भ, त्याचा अंशभूत व सर्व जगाचे पालनरूप व धारणरूप जी जड पृथ्वी तिच्या अंतर्यामी राहणारे जे सत्वगुणयुक्त चैतन्य, त्या चैतन्यालाच देवता सृष्टीत ऊर्वी अशी संज्ञा आहे. (म्हणूनच पृथ्वी अधिदैवदृष्टीने चेतन असल्यामुळे दुष्टांचा भार झाला असता, भगवंताला ती शरण जाते असे पुराणांतून सांगितले आहे) याप्रमाणे धर्म आणि ऊर्वी या दोन्ही पदार्थात सत्वगुणाचे साम्य असल्यामुळे व ते चेतन असल्यामुळे धर्मानुकूल वागणारे जे लोक आहेत त्यांचे पालन करणाऱ्या गाय व बैल यांची चिन्हे धारण करणारी शरीरे घेऊन राजाला त्यांनी मोठे आश्चर्य दाखविले त्याचप्रमाणे.*

ते आश्चर्य दाविती कैसे । परस्पर बोलोनि ऐसें । मृदुवचनें वृषभ पुसे । धेनुलागीं ॥७२॥
अयी जननी तव मुख म्लाना । पाहोनि वाटे तूं दुःखितमना । तरी दुःखाचिया कारणा । सांगे माते ॥७३॥
मी तीन पाय सोडोनी । चालताहे एक्या चरणीं । तें दुःख अंतरीं वाटोनी । दुःखी जाहलीस काय सांगे ॥७४॥
किंवा पुढें वृषलजन[१] । भोगितील म्हणोन । पीडा पावलीस दारुण । काय सांगे ॥७५॥
किंवा देवांचे यज्ञभाग । दैत्यीं हिरोनि नेले चांग । म्हणोनि तुझें अंतरंग । दुःखित झालें कीं जननी ? ॥७६॥
यज्ञ न केलिया देवरावो । वृष्टी न करी स्वयमेवो । म्हणोनि शोचिसी सावेव । काय सांगे ? ॥७७॥
कीं अपराध कांहीं नसतां । पती सोडिती वनिता । तिया दीन पाहोनि तत्वतां । रडसी काय ? ॥७८॥
कीं धनाचियासाठीं । म्हातारिया कन्या अर्पिती गोमटी । ऐसिया हिंसक बापासाठीं । शोचिसी पोटीं काय सांगे ? ॥७९॥
कीं साबरी मंत्र पढती ब्राह्मण । शूद्र करिती वेदपठन । हा निषिद्धाचार पाहोन । रडसी काय जननीये ? ॥८०॥
कीं वेदविद्ये निश्चिति । ब्राह्मण योजिती भलते अर्थी । एवं कुमार्गी[२]रत सरस्वती[३]। पाहुनी शोचिसी काय माते ? ॥८१॥
किंवा सोडोनि तपज्ञानानुभवा[४]। ब्राह्मण करिती नीचसेवा । हा आचार न वाटोनि बरवा । रडसी काय जननीये? ॥८२॥
(य३-२५५) किंवा कलिकालांधलोचन[५] । अधम झाले क्षत्रिय जन ।
द्रव्य काढिती प्रजा पिळोन । रडसी म्हणोन काय माते? ॥८३॥

*(१)धर्मलंड-धर्माची हेळसांड करणारा (२)वाईट,निषिद्ध मार्गात (३)विद्या (४)तप, ज्ञानाचा अनुभव (५)कलीच्या*

*प्रभावाने अंध किंवा उन्मत्ताप्रमाणे झाले आहेत डोळे ज्यांचे.*

जनहृदयां लागला धनघाय[१] । म्हणोनी सोडिती बापमाय । ऐसें पाहोनियां धाय । मोकलिसी काय जननी ? ॥८४॥

किंवा सांडोनी धर्मरती[२] । जनांची दृढ विषयासक्ति । हें दुःख पाहोनियां माय चित्तीं । दुःखावलीस काय सांगे ॥८५॥

कीं वेष घेवोनि बहुत । अनन्वित[३] कर्मे करिती गुप्त । जना भासविती आम्ही संत । तें पाहोनि दुःखित झालीस कीं ॥८६॥

कीं वरी वरी म्हणोनी जननी । अंतरीं इच्छिती होवावी कामिनी । ऐसें जाराचरण[४] पाहोनी । रडसी काय जननीये ॥८७॥

कीं वेदपुराणार्थ[५] अन्यथा[६] । पंडित म्हणवोनि करिती सर्वथा । हें पाहोनि तुझिया चित्ता । शोक झाला कीं सांगे ॥८८॥

हीं कारणें बहुत । यांतून तुझिया दुःखाचें निश्चित । कारण कोणतें यथार्थ । सांग माते ॥८९॥

कीं सकळ दुःखाचें कारण। परमात्मवियोग[७] दारूण । तो हृदयीं लागला बाण । म्हणोनी शोचिसी काय माते ॥९०॥

कीं ऐसें वाटे तुझ्या मनीं । प्रत्यक्ष चेतनही असोनी । प्रभु वियोगा[८]करूनी । जीवत्व आले ॥९१॥

तेथ माझी काय कथा । म्हणोनियां शोक चित्ता । जो प्रभू अवतार धरी तत्वतां । वारंवार तुजसाठीं ॥९२॥

तुझा हरावया भार । जो लपवोनि रूप निर्विकार । धरितो नाना अवतार । तद्विरह फार तुजलागीं ॥९३॥

जो भक्तवत्सल कैवल्यदानी । जो श्यामसुंदर रथांगपाणी । तो अदृश्य झाला म्हणोनी । शोचिसी जननी कीं सांगे ? ॥९४॥

जो गोचारण[९] गोकुलवासी[१०]। जो गोपीवल्लभ[११]गोपवेशी[१२]। तो पुढें न दिसे हृषीकेशी । हणोनि रडसी काय सांगे ॥९५॥

जो इंदिराहृदयजीवन[१३]। जो उमावल्लभाचें[१४]देवार्चन[१५] । तया हरीतें न देखिती नयन । रडसी म्हणोन काय माते ॥९६॥

*(१) धनरूपी घाव, अत्यंत द्रव्याशा (२) धर्माचे प्रेम (३) वाटेल तशी (४) व्यभिचारी आचरण (५) वेदपुराणाचा अर्थ (६) भलताच, विपरीत (७) भगवंताची ताटातूट (८) भगवंताचा विरह करून, भगवंतापासून विन्मुख झाल्याने (९) गाई चारणारा, गाईबरोबर फिरणारा (१०) गोकुळात राहणारा (११) गोपिकांचा पति (१२) गवळ्याचा वेश करणारा (१३) लक्ष्मीचा प्राण (१४) शंकराची (१५) पूज्य दैवत.*

जो अखंड सुरकार्य[१] करता । जो भक्तहृदयीं प्रेम भरिता । तो झाला वाटे दृष्टिपरता[२] । शोकपरता म्हणूनि तुज ॥९७॥

जो सनकादिकांची[३] ध्येयमूर्ती । जो निगमागमाची[४] गेयकीर्ती[५] ।
तो पुढें न देखोनि राधापती । रडसी काय जननीये ॥९८॥

जयालागीं तपादि यत्न । जो नंदयशोदाहृदयरत्न[६] । तो पुढें न पाहोनि श्रीकृष्ण । शोचिसी काय जननीये ॥९९॥

(य३-२५६)तो न दिसे भक्तालिंगनयोग्य[७] । म्हणोनि कालें दृत[८] तव भाग्य । ऐसें पाहोनि रडणें श्लाघ्य । वाटलें तुज ॥१००॥

कीं जयाचें लीलया संचरण[९] । सहज अधिक मुक्तीहून । तें वारंवार स्मरोन । रडसी काय विरहिणी ॥१॥

ज्ञानें मिळे मुक्ती । परी जयाची लाधतां भक्ति । ज्ञान आणि सुखी प्रारब्धस्थिती । स्मरोनि त्याप्रति रडसि काय? ॥२॥

तयाची गोपिकावरील प्रीती । दहींभातभक्षणरीती । रासरचना यथानिगुती । आठवोनि चित्तीं शोचिसि कां ॥३॥

हें धर्माचें भाषण । ऐकोनी मही[१०] वदे आपण । तें हें आतां सावधान । करा श्रवण चतुर हो ॥४॥

मग धरणी म्हणे धर्माप्रति । तुज विदित[११] ही अवघी रीती । तथापि पुससी मजप्रति । तरी सांगतें तें ऐके ॥५॥

जयाचिया करुणायोगें । तूं चतुष्पाद[१२] होसी अंगें । तेणें श्रीइंदिरारंगें[१३] । मज एकटे सोडिलें ॥६॥

जयाचिये सत्तेकरून । सत्यमिव[१४] भासे प्रधान[१५] । जयाच्या शुचित्वीं[१६] तन्वभिमान[१७] । अणुमात्र जाण राहिना ॥७॥

नातरी घोर कर्मे अत्यद्भुत । परी निजनामें[१८] निर्दाळित । ऐसा दयाळू जगन्नाथ । राधाकांत रमापति ॥८॥

भृगूनें हाणतां वक्षस्थळ[१९] । परी अचळ तो क्षमाशीळ । भक्तां आणि वैरियां दे पद सोज्वळ । ऐसा सरळ परमात्मा ॥१०९॥

*(१) देवांचे हित (२) डोळ्याच्या आड (३) ध्यान करावयाची मूर्ति (४) वेदशास्त्राची (५) वाखाणण्यास योग्य अशी मूर्तिमंत कीर्ति (६) नंद आणि यशोदा यांच्या हृदयांतील चिंतामणी (७) भक्तांनी प्रेमाने आलिंगन देण्यास योग्य (८) हरण केले, चोरून नेले (९) पृथ्वीवर फिरणे (१०) पृथ्वी (११) कळलेली (१२) चार पायांनी युक्त (१३) हरीने (१४) खऱ्याप्रमाणे (१५) प्रकृति व तिचे कार्य संसार (१६) शुद्धपणांत (१७) देहाचा अभिमान (१८) आपल्या नावाचे स्मरण केल्याने (१९) छाती.*

जयाच्या मनोनिग्रहाची[१] ख्याति । जगीं जीवकर्मापेक्षा दाविती ।
जो इंद्रियनिग्रही रघुपती । राहिला वनांतीं वर्ष चवदा ॥११०॥

होऊनी नरनारायण । जना तप उपदेशी करूनि आपण । नैर्घृण्यवैषम्यरहित[२] समान । सर्वांभूतीं जगदात्मा ॥११॥

भक्तरक्षणीं नाना कष्ट । ही तितिक्षा जयाची अचाट । पांडवसदनीं उच्छिष्ट । पात्रें काढी ॥१२॥

द्वादश गावें गिळिला अग्नि । कालीय मथिला यमुनाजीवनीं । गोवर्धन अंगुलीं धरूनी । रक्षिलें व्रज ॥१३॥
तधींही जयाच्या ठायीं । स्वार्थी[३] वासना जाहली नाहीं । जो वेदनिर्माता[४] शेषशायी । भक्तवत्सलू ॥१४॥
निज रूपाची विस्मृती । जया केव्हां नाहीं नव्हती । मायाधिष्ठान[५] परी जयाप्रति । माया आकळूं[६] शकेना ॥१५॥
एऱ्हवीं कैवल्यादि सकळ । जयाच्या करुणेचेंचि फळ । जो दुष्टविनाशनीं[७] परम चपळ । यस्य[८] भासात्सकल भासे ॥१६॥
चराचर जयाचें ओदन[९] । ऐसें निगमाख्येय[१०] बळ पूर्ण । (य३-२५७)
जीवकर्म[११] अंतर्यामित्वेंकरून[१२] । निज वर्तमान[१३] सर्व देखे ॥१७॥
जो गुणकर्मविभागेंकरून[१४] । निर्मी ब्राह्मणादि वर्ण । तथापि अकर्तृपण । न मोडे ज्याचें ॥१८॥

*(१) ज्याचा मनोनिग्रह इतका दांडगा आहे की तो स्वतःच्या मनाने काही करीत नाही तर त्याच्या कर्तृत्वांत जीवाच्या कर्माची अपेक्षा शास्त्राने लावून दिली. म्हणजे जीवाचे जसे कर्म असेल त्याप्रमाणे ईश्वराचे कर्तृत्व जीवाला भासते (२) विषमपणा व निर्दयपणा या दोषाविरहित (३) आपल्या सुखाकरिता (४) वेद उत्पन्न करणारा (५) मायेचा आधार (६) वश करूं (७) दुष्टांचा संहार करण्यात (८) ज्याच्या प्रकाशाने (९) अन्न (१०) वेदाने वर्णिलेले (११) जीवांचे कर्म (१२) अंतर्यामी असल्यामुळे (१३) वर्तमानकालीच ईश्वराचे ज्ञानात जीवाप्रमाणे भूत, भविष्य, वर्तमान असा काल भेद नाही. तो सर्वकालचे एकदमच जाणतो (१४) सात्विकादि गुण व कर्म यांच्या तारतम्यानुसार.*

पंचभूतें आपसांत । वैरी असोनि समस्त । देहीं वर्तती मैत्रीयुक्त । हें पाटव[१] अघटित जयाचें ॥१९॥
जयाच्या पोटां आला रतिपती[२] । तयाची कवणा वर्णवे कान्ती[३] । जयाच्या धैर्ये धर्मस्थिती । त्रिभुवना ॥१२०॥
जयाचें एवढें मृदुपण[४] । आपुलें सोडोनि निर्गुण । भक्तानुग्रहाकारण । झाला सगुण जगदात्मा ॥२१॥
प्रगल्भता[५] आणि शीळ[६] । विनय[७] ओज[८] आणि बळ[९] । हें ऐश्वर्य सकळ । असे विमळ[१०] यदाश्रयीं[११] ॥२२॥
तेंवी गंभीरता आणि स्थिरपण । आस्तिक्यें[१२] त्रिकालाबाध्य[१३] आपण ।
कीर्ति मान्यता आणि निरभिमान । हे आणि इतरही गुण अखंड पूर्ण जेथ वसती ॥२३॥
मूळ 'नित्य' पदावरून । न नाशे यदनध्यस्तविवर्तपण[१४] । तो गुणपात्र[१५] श्री भगवान । गेला टाकोन मजलागीं ॥२४॥
अतिचंचल सिंधुनंदिनी[१६] । तीस बैसला अंकीं[१७] घेउनी । मी जड म्हणोनी काय मोक्षदानी । गेला टाकोनि मजप्रति ॥२५॥
लोकांसहित कलीच्या हातीं । मज देवोनियां श्रीपती । कोणत्या पापें कैवल्यमूर्ती । सोडोनि मजप्रति गेला हो ॥२६॥
मज विरहदुःख अतिदारुण । तुझेंही कोणी न करी रक्षण । देवर्षि पितर आश्रम वर्ण । शोच्य[१८] संपूर्ण वाटती ॥२७॥

॥ पद ॥

तो मज टाकुनि गेला श्याम ॥धृ०॥
यत्पदकमला[१९] सेवी कमला[२०] । सोडुनि स्वकमलधाम[२१] ॥ तो मज० ॥१॥
ब्रह्मादिक बहुदिन तप तपती । मनिं यत्करुणाकाम[२२] । तो मज० ॥२॥
ती सागरनंदिनी[२३] जयाचा । चरण आठवी वाम[२४] ॥ तो मज० ॥३॥
मिळवाया पुढती मी जपते । ज्ञानेश्वरगुरुनाम ॥४॥ तो मज० ॥२८॥

*(१) चातुर्य (२) कामदेव (मदन) (३) सौंदर्य (४) कोमलपण (५) साहस, करारीपणा (६) सदाचाराची वागणूक (७) नम्रपणा, लीनपणा (८) इंद्रियसामर्थ्य (९) शरीरसामर्थ्य (१०) शुद्ध (११) ज्याच्या आधारामुळे (१२) सत्य असल्यामुळे (१३) अविनाशी (१४) बाह्य-साकारपण (१५) सर्व सद्‌गुणांचे स्थान (१६) लक्ष्मी (१७) मांडीवर (१८) यांच्याबद्दलहि फार वाईट वाटते (१९) ज्याच्या चरणकमलाचे (२०) लक्ष्मी (२१) आपले कमलरूपी घर, स्थान (२२) ज्याच्या मनात परमेश्वराने आपल्यावर कृपा करावी अशी इच्छा असते (२३) लक्ष्मी. (२४) सुंदर*

ध्वज अंकुश आणि पंकजनन[२] । इत्यादि जयाचें चरणभूषण । तत्पादनिक्षेपें[३] चिन्ह । हृदयीं माझ्या शोभती ॥२९॥
तया पादचिन्हालंकृती[४] । एवढी शोभा मजप्रति । मी मर्त्याश्रिता[५] अमृतवती[६] । जाहली स्वयें ॥१३०॥
मजवरी राहती जे जे जन । तया अवश्य आहे मरण ।
(य३-२५८) परी पाहोनि गोविंदचरण । पावती पूर्ण अमृतत्व[७] ॥३१॥
भगव्द्वारणरजसंपत्ती[८] । मज मिळालिया निरुती । शोभा त्रिलोकापरौती[९] । पावली माते ॥३२॥
स्वर्गातूनि पुण्य क्षीण । झालिया देव होती पतन । तें पाहोनि मम विस्मित मन । जगज्जीवनसंगतीं[१०] ॥३३॥

ऐसी गर्वान्विता[११] अखंड । भगव्द्वारणयोगिनी[१२] प्रचंड । परी शेवटीं पावलें दंड[१३] । अभिमानाचा ॥३४॥
ऐसें मी गर्वान्वित पोटीं । म्हणोनि परमात्मा जगजेठी । सोडोनि गेला शेवटीं । विरहकाठी[१४] हाणोनी[१५] ॥३५॥
तो अंतरतां मनमोहन । मी जाहलें हतप्राण[१६] । आतां कोणाचे पाहूं चरण । या शोकें मन दुःखित ॥३६॥

॥ शुद्धकामदा ॥

असुरवंश[१७] जे सर्जिती[१८] मला[१९] । बहुत भार तो साहिना मला ।
विनवितां तदा येउनी हरी । त्वरित जो बळें दुष्ट संहरी ॥३७॥

*(२) कमळ (३) पाय ठेवल्याने (४) भगवंताच्या पायाचे ठिकाणी असलेल्या ध्वजवज्रांकुशादि चिन्हांचे भूषण मी धारण केल्यामुळे (५) मरणधर्मी प्राण्यांना आधार असून (६) अविनाशी, मरणधर्मरहित (७) अमरत्व (८) भगवंताच्या चरणधूलीचे भाग्य (९) त्रैलोक्यांत कोठे दिसणार नाही अशी (१०) सर्व जगताचा प्राण असा जो भगवान् त्याच्या सहवासांत (११) गर्वाने युक्त (१२) भगव्द्वारणाचा लाभ असलेली (१३) शिक्षा (१४) वियोगाची कांठी (१५) मारून (१६) मेल्याप्रमाणे (१७) दैत्यकुल (१८) उत्पन्न करितात (१९) मळाला, दोषाला.*

अक्षौहिणीशतांचीं[१] शतें । वीर पाडोनि मृत्युगर्ते[२] । निजप्रयत्नें जेणें तूतें । चतुष्पाद पैं केले ॥३८॥
अभिप्रावो या वचनाचा । ऐसाचि असे साचा । कीं युगायुगीं धर्माचा । ऱ्हास होय ॥३९॥
तेव्हां निजप्रयत्नेंकरून । धर्म होऊं शके पूर्ण । हेंचि साभिप्राय वचन । बोलिलें मूळीं ॥१४०॥
धर्माचे चारी चरण । कृतयुगीं संपूर्ण । तो द्वापारीं हीन । द्विपाद झाला ॥४१॥
तेव्हां अवतरोनि जगन्निवास । पौरुष्यें[३] पूर्ण केलें धर्मास । यालागीं कालबळीविश्वास[४] । न करावा कोणीं ॥४२॥
भगवत्सहायें[५] प्रयत्नाधीन[६] । कालही वश[७] होय पूर्ण । यालागीं कलियुग आहे म्हणून । धर्मखंडन न कीजे ॥४३॥
'सामर्थ्य आहे चळवळीचें । जो जो करील तयाचें । परी तेथें भगवंताचें । अधिष्ठान पाहिजे' ॥४४॥ श्री रामदास.
या श्रीसमर्थवचनीं । विश्वास ठेवावा आवडीकरूनी । बळेंचि मन इंद्रियें रोधुनी । आणावा धरणीं[८] जगत्पती ॥४५॥
युगाचें पाहोनि बळ । सज्जनीं यत्न करावा प्रबळ । तेंणें अवश्य वैकुंठपाळ । प्रगटे हृदयीं ॥४६॥ (य३-२५९)
मग जो व्यष्टिहृदयीं[९] प्रगटे । तोचि समष्टिब्रह्मांडीं[१०] थाटे[११] । तेथ कालबल[१२] नेटे । कांहीं न करी ॥४७॥
म्हणोनी कालदैवादिवाद[१३] । स्वयें जाणोनि असिद्ध[१४] । भगवत्सहायें[१५] प्रयत्नवाद । नित्य[१६] सिद्ध आश्रयिती ॥४८॥
ऐसी जयाची ख्याती [१७] । तो परमात्मा जगत्पती । सोडोनि मज अबलेप्रती । अदृष्य निश्चिती जाहला ॥४९॥

*(१) हजारो अक्षौहिणी (२) मृत्यूच्या खाईत (३) सामर्थ्याने (४) काल बलवान् आहे असा विश्वास (५) भगवंताच्या आश्रयाने (६) प्रयत्न केला असता (७) स्वाधीन (८) पृथ्वीवर (९) एका व्यक्तीच्या हृदयात (१०) समष्टि हिरण्यगर्भाच्या हृदयात (११) प्रगट होतो (१२) कालाचा प्रभाव (१३) कालच बलवान् आहे, मनुष्याचा प्रयत्न कालानुरूप फलद्रूप होतो असे मानणे कालवाद होय. दैवच बलवान आहे व प्रयत्न यापुढे लंगडा ठरतो म्हणून दैवानुसार झालेला प्रयत्नच सफल होतो अस मानणे हा दैववाद होय. असे अनेक वाद (१४) सिद्ध होऊ शकत नाहीत (१५) भगवंताचे साह्य घेऊन (१६) केव्हाहि यशस्वी होणारा.(१७) कीर्ति*

॥ गीति ॥

कोण सहन तद्विरहा करिल स्त्री यत्स्वरूप पाहोनी ।
श्रुति मुनिवर कामान्वित[२] आलिंगिति गोपिजन्म लाहोनी[३] ॥१५०॥

॥ ओव्या ॥

जयाचें प्रेमें अवलोकन[४] । पाहोनी मोहे मुनींचें मन । आणि सुंदर हास्यवदन । पद निर्वाण[५] लाजवी ॥५१॥
तया हास्यवदनीं ऐसा भावो । की मद्भक्तितृप्ता[६] अपवर्ग[७] वावो[८] । यालागी धरी सावेव । प्रेमावलोकू[९] ॥५२॥
निद्रेंत निर्मिले वेद । जो श्वासोच्छ्‌वास प्रबंध[१०] । तेथ तीन वर्णातें शुद्ध । अधिकार कीरू ॥५३॥
यालागीं स्त्रीशूद्रा प्राणियां । मधुर मधुर बोलोनियां । उदित[११] निजपद[१२] द्याया । करुणान्वित[१३] ॥५४॥
मधु बोलिजे विषयरस । तेथ जियांचा मान[१४] विशेष । मधुमानिनी[१५] त्या स्त्रियांस । बोलिजे कीरू ॥५५॥
त्या मधुमानिनींची स्थिरता[१६] । विषयीं पाहोनि सर्वथा । जो मधुर भाषणेंचि तत्वतां । निष्काम करी ॥५६॥
स्त्रियांचें विषयस्थैर्य मोडुनी । चित्त स्थापी आपले चरणीं । मूळ 'समान' पदाचा ध्वनी । कीं काम निर्वाणी हरि नव्हे ॥५७॥ कामविकारा विषमता[१७] । तेथ न शोभेचि समता । आणि समान ऐसिया अर्था । मूळ द्योती ॥५८॥

**म्हणोनि स्त्रियांचें कामस्थैर्य । स्वयें मोडोनि यादवराय ।**
**ज्ञानीचता[१८] हरुनी अपाय । श्रश्रनिजभक्तिउपाय[१९] दाखविता ॥५९॥**

*(२) कामवासनेने युक्त (३) प्राप्त करून घेऊन (४) पाहणे (५) मोक्षसुखहि (६) माझ्या भक्तीच्या सुखाने तृप्त झालेले (७) मोक्ष (८) मिथ्या, तुच्छ (९) प्रेमाने पाहणे (१०) श्वासोच्छ्वासांतील ग्रंथरचना (११) तत्पर, तयार (१२) स्वरूपप्राप्ति (१३) करुणासंपन्न (१४) गौरव, सत्कार (१५) कामसुख दिल्याने आपला मान झाला असे समजणाऱ्या (१६) काम विषयाचे ठिकाणी दृढ आसक्ति (१७) चंचलपणा, कमीजास्तपणा (१८) श्रेष्ठकनिष्ठ भाव उत्पन्न होणे हा परमार्थात अडथळाच आहे तो नाहिसा करून.(१९) आपल्या प्रेमाचा मार्ग*

**परी येथ ऐसें करिती कोणी । धर्मासी म्हणे कुंभिनी ।**
**जो तुज स्थापी अवतरोनी । तो मोहुनी घेईल कामिनी हें कल्पांतीं घडेना ॥१६०॥**
**परी हा नेणोनि अभिप्रावो । मूढ[२] विषयी[३] म्हणती माधवो ।**
**परी स्त्रियांचा शुद्ध स्वभावो । करावया सावेव कृष्णलीला ॥६१॥**

*पातिव्रत्य प्रक्रिया*

**सकलशरीरसमर्पण । स्त्रियांनीं आधीं पतीस करून । प्रेम जिंकावा तेथून । जेणें सत्त्वगुण वाढता ॥६२॥ (य३-२६०)**
**पतिविरुद्ध विकारप्राप्ती । न उठावी ऐसी स्थिती । झालिया एकाग्रमती[४] । भूमिका सांपडे ॥६३॥**
**मग वाढलिया सत्त्वगुण । पतीचा मांसमय देह पूर्ण । तेथ प्रेममय भावना करून । जावें विसरून निजदेहा ॥६४॥**
**तो निजदेह विसरतां । न भासे पतीची मांसमयता । मग प्रेममूर्तीचि तत्वतां । प्रगट होय ॥६५॥**
**तया प्रेममूर्तीमाझारी । सत्वास्तव प्रगटे हरी । एवं पतिभक्ति करतां कूसरी । कृष्णभक्ति सांपडे ॥६६॥**
**मग लागलिया श्रीहरिभजनीं । विसरे नर आणि कामिनी[५]। परी अत्यंत चित्तावेश[६] चेतनीं । विरहावांचुनी[७] घडेना ॥६७॥**
**जरी झालें भगवद्दर्शन । तरी भगवदाकार नोहे मन । तेंचि विरहेंकरून । हरिमय पूर्ण होतसे ॥६८॥**
**संयोगीं वियोगोपलालन[८] । तें हें शुद्धप्रेमलक्षण । तयाचा विरह कवण । करील सहन सांग धर्मा ॥६९॥**
**पृथ्वीवचनीं भाव ऐसा । कीं मी स्त्री समष्टिठसा[९] ।**
**मज विरह साहिना सहसा । तरी व्यष्टि स्त्रिया केंवि साहती ॥१७०॥**
**मज आवडे जगज्जीवन । म्हणोनि मजवरी जितुके जन । तितुकियालागीं[१०] रमण । गोविंदचरण जाणपां ॥७१॥**
**'कोण' या प्रश्नस्थिती[११] । धर्मास ऐसें सांगे क्षिति । कीं मी विरहिणी तैशा युवती । सकलही असती हरिप्रिया ॥७२॥**

*(२) अज्ञानी लोक (३) विषयासक्त (४) एकाग्र चित्ताची (५) स्त्रीपुरुषभाव (६) चित्त आसक्त होणे (७) वियोगावाचून (८) संयोग म्हणजे हरिप्राप्ती असूनहि वियोगाचा अनुभव घेणे (९) सर्व स्त्री जातीची समष्टि स्थिति (१०) पति - वासुदेवः पुमान् एकः स्त्रीरूपमितरं जगत् (११) या प्रश्नाचे ठिकाणी.*

''वासुदेवपुमानेकः स्त्रीरूपम् इतरज्जगत्''

**ही अवलंबितां स्मृती । कृष्ण पुरुष विश्व युवती । जो कधींच न विसरे आपणाप्रती । पुरुष निश्चिती तोचि म्हणे ॥७३॥**
**पुरुष[१] असती बुद्धिवश[२] । यालागीं नारी म्हणिजे जनांस । पती परमात्मा जगन्निवास । पावोनि होणें तद्रूप ॥७४॥**
**तयाच्या सरळ आंगोळिका । चालतां मजवरी समुद्रिका[३] । उमटती सामुद्रिक[४] रेखा[५] । तेणें उत्सव[६] देखा मम मनीं ॥७५॥ 'सस्यादि[७]' मिषेंकरून । मी रोमांचित[८] पूर्ण । माझें आनंदाश्रुजीवन । प्रवाह जाण नदीचे ॥७६॥**
**एवं दृष्ट भौतिक[९] स्थिती । वस्तु अदृश्य अधिदैवतीं[१०] । पृथ्वी सांगे धर्माप्रति । मज ही स्थिती कोठवरी ॥७७॥**
**विरहें संतप्त जाहलें मन । शोकें आरक्त लोचन । भेटलीयावीण कृष्ण । दुःखमोचन कदा नव्हे ॥७८॥**
**ऐसा धर्मपृथ्वीचा । संवाद ऐकतचि साचा । पूर्ववाहिनी सरस्वतीचा । करी आश्रय कुरुक्षेत्रीं ॥७९॥ (य३-२६१)**
**सकळ सौख्या अधिष्ठान[११] । श्रीसद्गुरुज्ञानेश्वरचरण । तेथ चौदावें सखीप्रेषण । असो समर्पण सद्भावें ॥१८०॥**

*(१) इतर जीव (२) बुद्धिवृत्तीच्या स्वाधीन (३) बोटे (४) चिन्हा सहित (५) ज्योतिष शास्त्रांतील सामुद्रिकांत ज्या काही भाग्याचा किंवा वैभवाच्या रेषा सांगितल्या आहेत त्या (६) अत्याल्हाद, अत्यंत सोहळा (७) धान्यादिकांच्या स्वरूपाने (८) आनंदाच्या रोमांचांनी युक्त, भगवंताने आपला ध्वजादि चिन्हयुक्त पाय पृथ्वीवर टेवल्यामुळे पृथ्वीला आनंदाचे रोमांच उत्पन्न झाले ते ही सस्यादि धान्ये होत (९) जड पृथ्वीच्या ठिकाणी डोळ्याला दिसणारी स्थिति (१०) या जड पृथ्वीचा अभिमान धारण*

*करणारी जी चेतन देवता तिचे ठिकाणी (११) आश्रयस्थान.*

**हरिः ॐ तत्सत् श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरकृपाप्रसादे नानाछंदबद्धे गद्यपद्यान्विते प्रियलीलामहोत्सवे आमंत्रणविलासे धर्मपृथ्वीसंवादादिवर्णनं नाम चतुर्दशसखीप्रेषणम् ।**

**॥ श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ॥**

०००

# सखीप्रेषण १५ वें.

## विषयानुक्रम

*नानामतदिग्दर्शन व खंडन, कलिनिग्रह व प्रबल प्रयत्नापुढें कालबलाची क्षीणतावर्णन. (पृष्ठ २६२-२७०)*

*श्रीगुरुचरणमहिमावर्णन २६२. कथोपक्रमः- सरस्वतीतीरीं राजानें पाहिलेला प्रकार. गाय व वृषभ दुःखित पाहून राजा परीक्षितीचा स्वतःविषयीं धिःकार २६२ परीक्षितीनें आर्तरक्षणाविषयीं केलेली प्रतिज्ञा. गाई वृषभांनां राजाचे अभयदान व दंडधारी शूद्राला तर्जन. २६३-२६४ राजानें वृषभरूपी धर्माला आपल्या कुलाची रीति व दीनरक्षणाविषयीं स्वतःचें ब्रीद कथन करून तूं कोण व तुझ्या दुःखाचें कारण कोण म्हणून विचारलें असतां त्यानें पंडुवंशाची प्रशंसा करून आपल्या स्वरूपाच्या निर्धारासाठीं नाना वाद निर्माण करणाऱ्या नास्तिकमीमांसकादिमतांचें दिग्दर्शनपूर्वक दिलेलें उत्तर २६४ हीं सर्व मतें प्रतिषेधपर्यवसायी असल्यामुळें कोणतें खरें हा निश्चय होत नाहीं म्हणून वैणयिकादिमतांतून एखाद्या मताचा स्वीकार करणें बरें अशी शिष्याची शंका. ६४. श्रीगुरूचें उत्तर :- वैणयिकमत व त्यांतील दोषकथन. २६५ प्राचीन स्याद्वादाचें दिग्दर्शन व खंडन. २६५-२६७ स्याद्वादखंडनानेंच पंचास्तिकायवादाचें खंडन. अर्वाचीन संशयवादाचें (य३-४६) खंडन. अज्ञेय वादाचें खंडन. परमात्म्याचे सृदिानंद स्वरूप जे जाणतात त्यांचाच निश्चय खरा आहे असें धर्माच्या म्हणण्यांतील तात्पर्य कथन . २६७ राजाच्या द्वितीय प्रश्नाचें धर्मानें दिलेलें उत्तर. त्या उत्तरावरून तो धर्म आहे असें ओळखून व त्याचें अभिनंदन करून राजानें केलेलें भाषण :- धर्माचे चार पाद व त्रेतादि युगांत एक एक पाद क्षीण होण्याचें कारण. २६८ अवशेष राहिलेला 'सत्य' पाद क्षीण करूं पाहणाऱ्या कलीला व दीन झालेल्या पृथ्वीला ओळखून धर्म व पृथ्वी यांनां राजानें दिलेलें आश्वासन व कलीचा निग्रह. कली शरण आला असतां शरणागताला न मारण्याविषयीं राजाची प्रतिज्ञा. २६८-२६९ स्थानत्याग करण्याविषयीं कलीला राजाची आज्ञा व त्याला राहण्याकरितां दिलेलीं स्थानें. राज्यांत तपादिकाची प्रवृत्ति करून व धर्माला पूर्ववत् चतुष्पाद करून राजाचें यशवर्धन. कृतयुगादिकालप्रवर्तक राजाच असतो असा या कथेचा अभिप्राय व याविषयीं महाभारतांतील कुंतीवचनार्थनिरूपण. कृतयुगप्रवृत्ति व कृतयुगकालाचें वर्णन. प्रश्नः- कृतयुगांत वर्णव्यवस्था होती असें आपण म्हणतां (ओवी ७०) व कृतयुगांत एक हंसवर्णच होता असें भागवताच्या एकादशस्कंधांत सांगितलें आहे म्हणून विरोध प्राप्त होतो. १६९. उत्तर :- भारत-भागवतसमन्वयकथन. २७०. त्रेताद्वापरादियुगप्रवृत्तिवर्णन व तत्प्रवर्तक राजांनां मिळणारें फळ. कालबल प्रयत्नानें क्षीण होतें असें महाभारतवचनाचें तात्पर्य व याविषयीं परीक्षिदुदाहरण. परीक्षित्प्रभाववर्णन. आत्मयत्नवर्धकाला आशीर्वचन. श्रीज्ञानेशस्तवनांत उपसंहार. २७०.*

## कलिनिग्रह

**॥ श्रीज्ञानेश्वरमाउली समर्थ ॥**

**॥ ओव्या ॥**

**सकळ मंगळामाजीं[१] मंगळ । श्रीगुरूचें चरणकमळ । जे स्मरतांचि विमळ[२] । जाऊनि किडाळ[३] बुद्धि होय ॥१॥**
**तेंचि सुलग्न[४] सुदीन[५] । तारा शशि दैव बल[६] पूर्ण । जो आळंदीवल्लभचरण । प्रेमेंकरून आठवी ॥२॥**
**त्रासोनियां जीवपणा । यावया आपुलिया स्थाना[७] । ईश्वरही करूनि प्रार्थना । मुहूर्त[८] पुसे जयातें ॥३॥**
**योग सांख्य आणि वेदान्त । या महावनीं जो वसंत । जयाची कृपा अखंडित । ब्रह्मकरी जीवाचें ॥४॥**
**असतां नसतां जगत्सत्ता[९] । जयाच्या चरणां अखंडता[१०] । तेथ वाहोनि तनु मन वित्तां । नमन केलें साष्टांग ॥५॥**

*(१) हितकरामध्ये अत्यंत हितकर (२) शुद्ध (३) दोष, मळ (४) उत्तम लग्न (५) उत्तम दिवस (६) नक्षत्रादिकाचे बळ,*

*अनुकूलता (७) आपल्या मूळच्या निरूपाधिक स्थितीस (८) शुभ काळ (९) जगाचे अस्तित्व (१०) नित्यता.*

सूत म्हणे ऋषीप्रती । पुढें अवधान असावें प्रीतीं । ही भागवतकथा सरस्वती । ब्रह्ममय[१] मती[२] सकलां दे ॥६॥
तया सरस्वतीतीरीं । एक देखिला दंडधारी[३] । जो राजचिन्हित[४] शूद्रशरीरी[५] । पीडित[६] निर्धारी गोवृषभा[७] ॥७॥ एकपाद[८] वृषभ होय । रुदित[९] देखिली गाय । तें पाहोनि आश्चर्य । परीक्षिद्‌राय पावला ॥८॥
मग रथारूढ[१०] धनुर्धारी[११] । स्वयें पुसत निर्धारी । कोण तुम्ही रूपधारी । देव द्विज कीं मनुष्य ॥९॥
दूर[१२]गेलिया नारायण । मी करीत असतां गोरक्षण[१३] । तुम्हां हें दुःख दारुण । तरी धिक् धिक् जीवित[१४] पैं माझें ॥१०॥
(य३-२६२) पतिव्रता आणि गुणवती । ऐसी लाधोनियां[१५] युवती[१६] ।
जरी पोशीना मूढ[१७] पती । तरी धिगायुःस्थिती[१८] तयाची ॥११॥
गृहीं जागा असोनि अपार[१९] । जो पांथस्था न दे बिढार[२०] । तरी तयाचें श्मशान घर । हा निर्धार ओळखे ॥१२॥
जवळीं आहे अन्नपात्र । घरां अतिथी आलिया पवित्र । जो भरोनि राहे उदरमात्र[२१] । असो धिःकार तदायुषा[२२] ॥१३॥
जिणें नव मास पाळिलें पोटीं । पयःपाजोनि दिली पुष्टी । ते माय सोडी स्त्रियेसाठीं । धिक् धिक् शेवटीं जिणें त्याचें ॥१४॥
आयुष्य असतां क्षणभंगुर । अन्न खावोनि पोखी[२३] शरीर । घरांत रडती नारी पोर । असो धिःकार तदायुषा ॥१५॥
वेद न पढे असोनि विप्र । दीन न पाळी असोनि शूर । दान न करी चालोनि व्यापार । असो धिःकार तदायुषा ॥१६॥
शूद्रजन्म पावोनि बरवा । गर्वे[२४] न करी गोविप्रसेवा[२५] । धरी वेदबाह्यठेवा[२६] । धिःकार जीवा तयाच्या ॥१७॥

*(१) ब्रह्मस्वरूप झालेली (२) बुद्धि (३) दंड धारण करणारा (४) राजाची चिन्हे धारण केली आहेत असा (५) शूद्रजाति (६) मारीत (७) गाय व बैल यांना (८) एकच पाय आहे ज्याला (९) रडत असलेली (१०) रथावर बसलेला (११) धनुष्य घेतलेला (१२) पृथ्वी सोडून (१३) पृथ्वीचे पालन (१४) जिवंत राहणे (१५) प्राप्त होऊन (१६) स्त्री (१७) मूर्ख (१८) आयुष्याला धिक्कार असो (१९) पुष्कळ (२०) उतरण्यास जागा (२१) आपलेच पोट (२२) त्याच्या आयुष्याला (२३) पोशी (२४) अभिमानाने (२५) गाईब्राह्मणाची सेवा (२६) वेद विरुद्ध आचरण.*

*श्रीमंताचा धिःकार*

हा सकळ धिःकारसमुदाय[१] । तया एकाच्या शिरीं होय । जो कमलसौरभीं[२] गुंतूनि ठाय । न दे आश्रय परागा ॥१८॥
भोगासाठीं[३] श्रीमंत[४] । भोग पशुयोनींतही प्राप्त । यालागीं असो शक्त वा अशक्त । भावें भगवंत भजावा ॥१९॥
केवळ भक्षोनियां तृण । पशूचें चित्त समाधान । लक्ष्मीवंत भोगोनि वस्त्र धन । बंधुबंधूत वैर करी ॥२०॥
शीत ऊष्ण करितां सहन । दरिद्रियांचें समाधान । बाहेर निघतां लक्ष्मीवान । दीन दुःखित बहु होती ॥२१॥
इतरांच्या स्कंधावरुती । धनिक शिबिकेंत बैसूनि जाती ।
परदुःख नेणोनि विषयीं गुंतती । आणि दरिद्री असती सावध ॥२२॥
ऐसा श्रीमान आणि श्वान । मी स्वयें लेखे[५] समान । सनातनव्रीद[६] हें म्हणोन । करावें हनन[७] दीनदुःख ॥२३॥
रडतिया पाहोनि तान्हिया बाळा । मायेस न सांवरे कळवळा ।
तैसा दीन पाहोनि प्रेमउमाळा । तो भूमंडळा पुरुष धन्य ॥२४॥
यास्तव माझी जोंवरी सत्ता । तोंवरी वाहोनि तनुमनवित्ता । मी जीवेंभावें निववीन आर्ता[८] । जैसे सुता बापमाय ॥२५॥
यालागीं नरनारायण । जरी गेले पृथ्वी सोडोन । तरी अभय असो तुम्हाकारण । मी वधीन या वृषलातें[९] ॥२६॥
तुम्ही दुःखित अति आर्त[१०] । वरी दिसतां कृष्णभक्त । मीही हरिपदमुद्रांकित[११] । यास्तव त्वरित भय सोडा ॥२७॥
मग म्हणे वृषलाप्रति । कोण तूं (य३-२६३) असती दुर्मती[१२] । तुझेनि दीन दुखावती । माझेनि हातें मरशील ॥२८॥
मग वृषभा[१३] म्हणे पुढतीं । तव पादत्रयोच्छित्ती[१४] । करणार कोण क्षितीं[१५] । ते मजप्रति निरोपी ॥२९॥

*(१) वरील सर्व प्रकारचा धिक्कार (२) कमलाच्या ठिकाणी जो मकरंद असतो तेथे आसक्त असून, तो मकरंद ज्या परागाचे ठिकाणी असतो त्या परागाला मात्र सोडतो; म्हणजे ज्याच्यापासून सुख भोगतो, त्याच्या सुखाकडे तिळमात्र लक्ष न देणारा. दीनाविषयी, सेवकजनाविषयी ज्याच्या अंतःकरणांत कळवळा नाही असा (३) आपल्या सुखासाठी (४) धनसंचय करणारा (५) मानतो (६) अनादि कालापासून चालत आलेले थोरांचे व्रत (७) नाहिसे (८) दुःखितांना (९) धर्मलंडाला (१०) दीन (११) भगवंताची चरणमुद्रा धारण करणारा (१२) दुष्टबुद्धि (१३) बैलाला (१४) तीन पायांचे च्छेदन, पाय तोडणारा. (१५) पृथ्वीवर*

पांडवें करोनि महीरक्षण[२] । कृष्णकृपें[३] मज देऊन । श्रीकृष्णमय आपण । पुण्यसंपन्न ते झाले ॥३०॥

**तया राज्यांत तुमच्या नयनीं । अश्रुप्रवाह[४] निरखोनी । अत्यंत दुःख वाटे मनीं । दीनरक्षणीं[५] ब्रीद[६] माझें ॥३१॥**
**निरपराधी जन असतां । कोणीं बळें तया छळितां । तरी तो होकां सुरावरौता[७] । तया मी शास्ता शास्त्रशस्त्री[८] ॥३२॥**
**ऐसी परीक्षिद्रायवाणी[९] । ऐकोनि धर्म कल्याणदानी[१०] । म्हणे राया पंडुवंशालागुनी । उचित निर्वाणी वदसी तूं ॥३३॥**
**तो जीव एक भाग्याचा । जया जन्मग्रहणसमयीं[११] मायबापाचा ।**
**सत्संग मिळोनि साचा । अज्ञात[१२] परिणाम चित्तीं होय ॥३४॥**
**तो परिणाम ज्ञात[१३] होऊन । वंश उद्धरिती नंदन । धर्मनिष्ठ तुझे वरिष्ठ[१४] म्हणून । तद्वीर्यसंगेन[१५] तूं तैसा ॥३५॥**
**त्वां कोण म्हणोनि पुसिलें माते । तरी ऐके सावधचित्तें । मजसाठीं तत्त्ववेत्तें । वाद निर्मिती अनंत ॥३६॥**
**येथ पैं माझियासाठीं । विकल्पयुक्त[१६] होवोनि पोटीं । आपुलाल्या मतें गोष्टी । संशय[१७] गांठी आश्रयिती ॥३७॥**
**कोणी जे कीं नास्तिक । ते ईश्वर न मानोनि एक । आणि निषेधोनि कर्म सम्यक । कामहैतुक[१८] विश्व म्हणती ॥३८॥**
**कोणी पूर्वमीमांसक । ते कर्म मानिती जीवतंत्रक[१९] । निषेधिती जगन्नायक[२०] । वाचाबळें[२१] ॥३९॥**
**जोतिषी एक होती कोणी । ते ग्रह मानिती कर्म[२२]फळदानी । दैववाद[१] अधिष्ठुनी । सकाम मनीं सर्वदा ॥४०॥**

*(२) पृथ्वीचे संरक्षण (३) कृष्णाचे कृपेच्या स्वाधीन मला करून (४) डोळ्यांत पाणी (५) दीनांचे रक्षण करणे (६) व्रत (७) देवापेक्षा श्रेष्ठ (८) शास्त्रानुसार व शस्त्राने (९) परीक्षिती राजाचे शब्द (१०) कल्याण देणारा, करणारा (११) जन्माचे वेळी (१२) नकळत, अदृश्य, गुप्त (१३) प्रकट (१४) वडील (१५) त्यांच्या वीर्यापासून (१६) संशययुक्त (१७) संशयाची गाठ (१८) केवळ परस्पर स्त्री-पुरुषांच्या कामक्रीडेनेच उत्पन्न होणारे (१९) जीवाच्या स्वाधीन असलेले (२०) जगाचा स्वामी ईश्वर (२१) तोंडाने (२२) कर्मफळ देणारे.*

**दैववाद[१] अधिष्ठुनी । सकाम मनीं सर्वदा ॥४०॥**
**नैय्यायिक म्हणती ईश कर्ता । पौराणिक जगत्पिता । मनोवागगोचर[२] वेदान्ता । ज्ञान ब्रह्म ॥४१॥**
**सांख्य स्थापिती पुरुषप्रकृती । पाशुपत म्हणती पशुपती[३] । शाक्त स्थापिती भगवती । निज निज मतीअनुसार ॥४२॥**
**ऐसे नाना मतभेद । मज जाणावया सिद्ध । परी एखादाचि विशद । ओळखे माते ॥४३॥**

शिष्य उवाच :- भगवन् हीं सर्व मतें परस्परविरुद्ध असल्यामुळें प्रतिषेधपर्यवसायीं[४] आहेत. म्हणून कोणतें खरें हा निश्चय होत नसल्यामुळें मला वाटतें वैणयिकमताचा,[५] स्याद्वादाचा[६] किंवा अज्ञेयवादाचा[७]स्वीकार करणें बरें. (य३.६४)

श्रीगुरुरुवाच :- तुझ्या शंकेचें समाधान झालें नाहीं तर पुढें या तीन मतांतून एकाद्याचा स्वीकार कर. परंतु माझें उत्तर ऐकण्याकरितां अवधान असूं दे. वैणयिकांचें[८] मत असें आहे कीं विरुद्ध-विरुद्ध[९] भाषण करणारेही सर्वच आप्त[१०] आहेत. हें मत सृष्टींतच आतां नामशेष[११] झालें आहे. समंतभद्रांनीं[१२] (टीप :- समंतभद्र हे जैनांचे आचार्य होऊन गेले.) गंधहस्तीमहाभाष्याच्या आप्तमीमांसा ' नामक उपोद्धातांत खंडनार्थ[१३] त्याच्या मताचें दिग्दर्शन केलें आहे; आणि वसुनंदींनीं[१४] ( टीप :- वसुनंदी हे त्यांचे टीकाकार होते. ) आपल्या देवागमवृत्तींत स्पष्ट केलें आहे. या वैणयिक मतांत सिद्धांत[१५] स्थापन करतांच येत नाहीं. केवळ आपल्या कोत्या()[१६] बुद्धीमुळें सर्वांवरते पूज्य बुद्धि ठेवून यानें हें मत प्रसिद्ध केलें असावें.

*(१) दैव बलवान् आहे असा वाद (२) अशुद्ध वाणी व मनाला न कळणारा (३) शिव (४) निषेधांत ज्यांचे तात्पर्य आहे, सर्वच मते खंडित आहेत असे ज्यांच्या परस्परविरोधामुळे तात्पर्य निघते (५) बौद्धमताचा (६) जैनमताचा (७) पाश्चात्यांच्या मताचा, ईश्वर तत्त्व अज्ञेय आहे असे कित्येक पाश्चात्य मानतात. (८) बौद्धमत (९) कोणी बाह्य पदार्थास्तित्व मानणारे, कोणी न मानणारे, कोणी विज्ञान मानणारे व हे सर्व पुनः शून्य मानणारे आहेत असे विरुद्ध बोलणारे (१०) प्रमाण, यथार्थ सांगणारे, हितकर्ते (११) संपूर्ण नष्ट (१२) समंतभद्र हे जैनांचे आचार्य म्हणून होऊन गेले (१३) खंडण करण्याकरिता (१४) वसुनंदी हे एक टीकाकार आहेत (१५) त्रिकालाबाधित तत्त्व (१६) अल्प.*

*स्याद्वाद खंडन*

दुसरें, स्याद्वादी[१] लोकांचें म्हणणें तूं अंगिकारूं पाहतोस तेंही बरोबर नाहीं; कारण प्राचीन स्याद्वाद[२] स्ववचनविहत[३] आहे आणि अर्वाचीन स्याद्वाद ज्ञातृनिश्चयविहत[४] आहे. प्रथम प्राचीन[५] स्याद्वादी जैन आहेत. त्यांनीं आपल्या स्याद्वादाचें निरूपण तत्त्वार्थसूत्र, आप्तमीमांसा, व स्याद्वादमंजरी इत्यादि ग्रंथांचें ठिकाणीं केलें आहे. तेथें असें म्हटलें आहे कीं, वस्तूचें ठिकाणीं एक धर्म राहत नसून अनेक[६] धर्म राहतात; परंतु कांहीं स्याद्वादी सर्वथा अनेक धर्म राहतात असें म्हणतात.

एकाच ठिकाणीं परस्परविरुद्ध धर्म राहूं शकत नाहींत. प्रकाश व आंधार, जीवनमरण, आणि सुखदुःख एकाच ठिकाणीं राहूं शकत नाहींत. ही कोटी[७] प्रविष्ट होऊं नये म्हणून नवीन आर्हतवादियांनीं स्वकाल[८], स्वद्रव्य, स्वक्षेत्र, स्वभाव या अपेक्षेनीं जो धर्म राहतो त्याच्या विरुद्ध धर्म परकाल, परद्रव्य, परक्षेत्र, परभाव यांच्या अपेक्षेनीं राहतो अशी कोटी लढविली.

शिष्य :- महाराज ! मला याचा अर्थ समजला नाहीं.

श्रीगुरु :- ऐक तर. स्पष्ट करून सांगतों. सन्मुख हा घट आहे. हा जेव्हां आहे तेव्हां आहे; घट आहे म्हणून आहे; जेथें आहे तेथें आहे; जो आहे तो आहे.

*(१) जैनांचे (२) वस्तु आहे व वस्तु नाहीही असा संशयवाद (३) आपल्याच वचनाने खंडित होणारा (४) ज्ञात्याला निश्चय असतो म्हणून खंडित, ज्ञात्याच्या निश्चयामुळे खोडलेला (५) जुने (६) परस्परविरुद्ध देखील वस्तु आहे म्हणतात व वस्तु नाही म्हणतात - अशा असणे नसणे याविरुद्ध धर्माची वस्तु मानतात (७) असा कोणाचा आक्षेप येऊं नये म्हणून (८) एकच वस्तु असतांना तिच्याविषयी आहे-नाही असे विरोधी भाव कसे मानता? असे जर जैनांना विचारले तर ते असे म्हणतात -एक वस्तु आहे व नाही असे जे आम्ही विरुद्ध बोलतो ते कांही त्या एकाच वस्तूच्या दृष्टीने बोलत नाही तर त्या वस्तूचे त्या वस्तूच्या दृष्टीने व दुसऱ्या वस्तूच्या दृष्टीने अशा दोन दृष्टीने आम्ही वर्णन करितो. म्हणून स्वदृष्टीने एक पदार्थ आहे व दुसऱ्या पदार्थांच्या दृष्टीने तो नाही असा आमच्या म्हणण्याचा अर्थ झाला.*

परंतु मागच्या कालाच्या अपेक्षेनें किंवा (य३-२६५) ध्वंसावच्छिन्न[१] भविष्यत्कालाच्या अपेक्षेनें तो नाहीं, आणि पटाच्या अपेक्षेनेंही तो नाहीं, पटाच्या ठिकाणीं नाहीं, आणि पटत्वाच्या अपेक्षेनेंही नाहीं. समजलेंना तुला ?

शिष्य :- बरें, पुढें यापासून काय निष्कर्ष निघतो?

श्रीगुरु :- निष्कर्ष कांहींही निघो. तुझ्या ध्यानांत आलें याचेंच मोठें आश्चर्य वाटतें. मी तुला विचारितों- भूत किंवा भविष्यत् कालाच्या अपेक्षेनें घट नाहीं व वर्तमान कालाच्या अपेक्षेनें घट आहे, ह्या दोन्ही वृत्ती एकसमयावच्छेदेंकरून[२] तूं मनांत कशा आणतोस? किंवा वर्तमान कालांतही पटावच्छिन्न वर्तमान कालाच्या अपेक्षेनें घट नाहीं व घटावच्छिन्न वर्तमान कालाच्या अपेक्षेनें घट आहे, हें तरी तुझ्या मनांत कसें येऊं शकतें? कारण, वर्तमान कालाचा अवच्छेद्यभेदसाधक[३] घटपट संभवत नाहींत; कारण घटपट वर्तमानकालावच्छिन्न आहेत आणि वर्तमान काल घटपटावच्छिन्न आहे, असें मानलें म्हणजे अन्योन्याश्रय[४] होतो. द्रव्य, क्षेत्र, भाव हे एका वस्तूचें चित्तांत आले म्हणजे दुसऱ्या वस्तूचें चित्तांत येईपर्यंत तदाकारवृत्तीचा[५] स्वीकार करावा लागतो.

*(१) घटाच्या फुटण्याच्या कालाला अनुसरून म्हणजे उत्पन्न झालेला घट, जेव्हा उत्पन्न झाला नव्हता त्या कालाचे दृष्टीने किंवा जेव्हा हा घट पुढे नाहिसा होईल त्या काळास अनुसरून आम्ही घट नाही म्हणतो असे जैनांचे म्हणणे (२) एकाच काली, एकदम (३) वर म्हटल्याप्रमाणे घटाने मर्यादित जो वर्तमानकाळ त्याच्या दृष्टीने घट आहे व पटाने मर्यादित जो वर्तमान काल त्याच्या दृष्टीने घट नाही असे म्हणतांना, वर्तमानकालांतच आपण भेद केला व वर्तमानकाल दोन झाले. एक घटावच्छिन्न व पटावच्छिन्न. येथे ज्या घट व पट यांच्या योगाने जी वर्तमानकालाची मर्यादा केली गेली व दोन वर्तमानकाल मानिले गेले ते घट व पट आपल्यापुरती वर्तमानकालाची मर्यादा व भेद भासविण्यात कारण होऊं शकत नाहीत (४) एकमेक एकमेकांनी युक्त किंवा मर्यादित (५) त्या वस्तूच्या स्वरूपाची वृत्ति.*

म्हणून तदाकारवृत्तींत अन्याकार-वृत्तीची[१] अपेक्षा संभवत नाहीं, आणि सर्वच गोष्टींत सर्वापेक्षा[२] नाहीं. कारण तसें मानलें तर मनुष्याच्या पुत्रोत्पत्तीसाठीं कदाचित् मकरवीर्याचीही अपेक्षा लागावी; किंवा शस्त्र तयार करण्याला वंध्यापुत्राच्या अस्थीचीही अपेक्षा लागावी. आतां, वंध्यापुत्र नाहीं म्हणून त्याची अपेक्षाच नाहीं, असें कांहीं, जैनमत ध्यानांत आलेल्या तुला म्हणतां यावयाचें नाहीं; कारण वंध्यापुत्रखपुष्पादिक यद्यपि तुमच्या अपेक्षेनें नसतील तथापि ते स्वकालादिअपेक्षेनें आहेतच; आणि अपेक्षाही कदाचित् असेल नसेल. तर मग अनेकान्तच[३] कशाला पाहिजे ? असावा एकान्तही.[४]

तात्पर्य, संशयाप्रमाणें अप्रमाण[५] हा अनेकान्तवाद[६] संमत नाहीं. 'नैकस्मिन्नसंभवात्' या ब्रह्मसूत्रांत व त्याच्या भाष्यांत अनेकांतवादाचा निरास[७] केला आहे. अनेकांतवादाचा स्वीकार केला म्हणजे जैनमतांतील पदार्थसिद्धीही संभवत नाहीं. जैनमतांत संक्षेपतः जीव[८] आणि अजीव[९] असे दोनच मुख्यतः पदार्थ आहेत. तथापि बालबोधाकरितां विस्तारानें उमास्वामीकृत (य३-२६६) तत्त्वार्थसूत्रांत पदार्थ सातच बोलिले.

**'जीवाजीवास्त्रवबंधसंवरनिर्जरा मोक्षास्तु तत्त्वम्[१०]' । (तत्त्वार्थसूत्र अध्याय १ सूत्र ३)**

जीव म्हणजे मी मी म्हणणारें चेतन. अजीव म्हणजे ज्याला पुद्‌गल म्हणतात[११] असा जड समुदाय. आस्त्रव म्हणजे खाले पडणारे पदार्थ. बंध म्हणजे संसार. संवर[१२], निर्जरा[१३] स्पष्ट आहेत. मोक्ष म्हणजे ज्ञानावरणीयादि[१४] कर्माचा नाश होऊन आर्हतगतीला प्राप्त होणें.

आतां, अनेकांतवादाप्रमाणें[१५] कदाचित् मोक्षाला बंध व बंधाला मोक्ष म्हणण्याला कोणता प्रत्यवाय[१६] आहे ?

*(१) दुसऱ्या वस्तूच्या आकाराची वृत्ति (२) सर्वाची आवश्यकता (३) अनिश्चित, अनेक प्रकारचा (४) निश्चित, एकच स्वरूपाचा (५) सिद्ध न होणारा (६) वस्तूचे नाना विरोधी धर्मत्व मानणारा, वस्तूचा एक निश्चय न करणारा (७) खंडण (८) जैन मतांत जे पदार्थ मानले आहेत त्यांची सिद्धि (९) चेतन व जड (१०) जीव, अजीव, आस्त्रव, बंध, संवर, निर्जरा, मोक्ष (११) पिंड, शरीर (१२) आकुंचितपणा (१३) जरारहितत्व (१४) ज्ञानाचे आवरण करणाऱ्या (१५) वस्तु निश्चित एक रूपाची न मानता अनेक रूपाची मानणे. (१६) हरकत*

सारांश, हा प्राचीन स्याद्वाद संमत नाही. या स्याद्वादखंडनानेंच पंचास्तिकायवादाचें[२] खंडन झालें.

*संशयवाद*

आतां, अर्वाचीन जो संशयवाद त्यांत कांहींच अर्थ नाहीं. कारण हा संशय आहे अशा प्रकारची संशयाला जाणणारी वृत्तीही संशयच आहे काय? संशय असेल तर अनवस्था[३] येते, आणि अनवस्था[४] मानाल तर आंधारानें जसा आंधार दिसत नाहीं; तसा अनवस्थेनें अनवस्थेचा निर्धार होऊं शकत नाहीं; आणि निश्चय मानला तर संशयवादाची समाप्ती होते.

*अज्ञेयवाद*

याप्रमाणें तूं काढलेला अज्ञेयवादही[५] योग्य नाहीं; कारण अज्ञेयाचा ज्ञाता अज्ञेय आहे असें म्हणणें म्हणजे ज्ञात्याला अज्ञेयाच्या कोटींत आणून पाहण्यासारखें होतें. आणि ज्ञातृभिन्न[६] वस्तु अज्ञेय आहेत तर त्यांचें अज्ञेयत्वही अज्ञेय आहे काय ? अज्ञेयत्व अज्ञेय मानण्याइतका तूं मूर्ख नसलास तर अज्ञावच्छिन्न[७] ज्ञेय अशा त्या वस्तु आहेत असें म्हणणें भाग आहे. आणि असें एकवेळ म्हटलें म्हणजे – वेदान्ताचा मायावाद बळेंकरूनच गळीं आला. मायेला सामान्यचैतन्य[८] स्फूर्ति[९] देणारें आहे व चैतन्यादिकांवांचून सत्तेची प्रतीति[१०] नाहीं. म्हणून सृदिानंदस्वरूप असें जे जाणतात त्यांच्याच निश्चय खरा आहे. हें धर्माच्या म्हणण्यांतील तात्पर्य. समजलास?

शिष्य उवाच :- भगवन्, माझ्या सर्व आक्षेपाचें निराकरण झालें, तथापि वचनपीयूषपिपासामय[११] शुद्ध जिज्ञासा प्रभुवांचून कोण शांत करील ?

श्रीगुरुरुवाच :- सर्वांग श्रोत्रमय[१२] करून श्रवण कर. (य३-२६७)

*(२) जैनमतात जीवास्तिकाय इत्यादि पांच अस्तिकाय मानले आहेत (३) शेवट किंवा विश्रांति न सापडणे (४) आत्मतत्त्व केव्हाहि कळत नाही असे मानणे (५) कळत नाही हे जाणणारा किंवा अज्ञेय आहे म्हणणारा (६) ज्ञात्याहून म्हणजे जाणणाऱ्याहून निराळी (७) अज्ञेय आहे अशा रीतीने ज्ञेय आहे (८) सत्तामात्र चैतन्य (९) भासविणारे (१०) ज्ञान (११) वचनरूपी अमृत पिण्याची इच्छा अशी (१२) कर्णेद्रियमय.*

**॥ ओव्या ॥**

**धर्म म्हणे दुःखदाता[१] । कोण मी नेणें नृपनाथा । तूं विचारूनि आपुले चित्ता । उचित तत्वतां करावें ॥४४॥**
**अथवा सुखदुःख देयावया । अघटितघटनापटु[२] हरिमाया । अनिर्वचनीय म्हणोनि तिया । भूत[३] जाणावया असमर्थ ॥४५॥**

**॥ गीति ॥**

**ऐकुनि वचन तयाचें राय म्हणे तूंचि धर्म कळलासी[४] ।**
**नाशकाहि[५] सुखचिंतक[६] मौन धरुनि करुणजलद[७] वळलासी[८] ॥४६॥**
**तूं भगवत्सत्त्वतनू[९] विचरसि[१०] घेवोनि रूप वृषभाचें[११] ।**
**निजकरुणेच्या योगें कल्याणचि करिसि नित्य ऋषभाचें[१२] ॥४७॥**

**॥ ओव्या ॥**

**तपः शौच[१३] दया ऋत । हे पाय तुझे चार यथार्थ । कृतयुगीं समर्थ । परमार्थदाता तूं एक ॥४८॥**
**त्रेतायुगीं गर्वेंकरून[१४] । तुझा तपःपाद झाला क्षीण । द्वापरयुगीं आसक्ति[१५] वाढून । शौचचरण[१६] क्षीण झाला ॥४९॥**

पुढें दयापाद मदेंकरून[१७] । देखत देखत झाला क्षीण । एक सत्यपाद अवस्थान[१८] । राहिला असे ॥५०॥
या सत्याचेनि योगेंकरोनी । आत्मतृप्त होवोत प्राणी । किंवा धर्म साधोनी । घेवोत फळ यथातथा ॥५१॥
परी तोही अनृतेंकरून[१९] । पाद करावया क्षीण । हा शूद्र गृहीतराजचिन्ह[२०] । मियां कली आपण वळखिला ॥५२॥
ही माय ओळखिली धरणी[२१] । पुढें शूद्र[२२] मज भोगितील म्हणूनी । अश्रू आणूनियां नयनीं । दीनवाणीं रडतसे ॥५३॥

*(१) दुःख देणारा (२) न घडणारे घडवणारी (३) जीव (४) ओळखू आलास (५) आपला नाश करू इच्छिणाऱ्यालाहि (६) कल्याण इच्छिणारा (७) करुणारूपी मेघ (८) दाटून आलास (९) भगवंताचा सात्विक विग्रह (१०) फिरतोस (११) बैलाचे (१२) थोरांचे, सज्जनांचे (१३) तप, शुद्धि, दया, सत्य (१४) अभिमानाने, तपात अभिमान झाला की तप वाया जाते (१५) विषयासक्ति (१६) शुद्धिरूपी पाय (१७) उन्मत्तपणाने (१८) अस्तित्वात (१९) खोटेपणाने (२०) राजाची चिन्हे घेतली आहेत असा (२१) पृथ्वी (२२) शूद्र राजे.*

परी माझें हें हृदय । जंव वसवीत यादवराय । तंव तुह्मा मी सांगे स्वयें । असावें निर्भय सर्वदा ॥५४॥
एवं धर्म आणि पृथ्वीप्रती । आश्वासूनीयां भूपती । खड्ग घेउनियां हातीं । माराया कलीवरती धांवला ॥५५॥
पाहुनि रायाचा उद्यम[१] पूर्ण । कलीनें घातलें लोटांगण । तें पाहूनि राय आपण । म्हणे भय मजपासोन तुज नाहीं ॥५६॥
धरा[२] सोडील धरणीधर[३]। पश्चिमे उगवेल सहस्त्रकर[४]। परी सोमवंशीचे नरवीर । शरणागता व्याघ्र[५] न होती ॥५७॥
ऊष्ण होईल रोहिणीवर[६] । शीतल होईल वैश्वानर[७] । परंतु अर्जुनसुतकुमर[८] । शरणागतसंहार[९] न करिती ॥५८॥
(य३-२६८) परी एक आइके माझें वचन । तुवां एथ न करावें स्थान[१०] ।
या ब्रह्मावर्ती[११] सकळ जन । धर्मेकरून वर्तती ॥५९॥
यज्ञ दान हरिभजन । येथ अवघे करिती सुजन । तूं तंव अधर्माची खाण । यास्तव हें स्थान त्यजावें ॥६०॥
तैं कली म्हणे कुरुराया । मी सोडितों स्थाना यया । परी मज राहावया । स्थान कोणी दाखवी ॥६१॥
महाराज तव आज्ञेंकरून । मियां वसवावें कवण स्थान । मग स्त्री हिंसा द्यूत मद्यपान । दिधले दाखवून रायें तया ॥६२॥
स्वर्ण दिधलें तयाप्रति । दंभ मद मान वैरवृत्ति । त्याबरोबरी पुढतीं । दिधली तया ॥६३॥
यास्तव मद्यपान द्यूता । हिंसा आणि कनक कान्ता । कोणीं सेवूं नये सर्वथा । कल्याणआस्था[१२] धरूनी ॥६४॥
मग तपादिकांची[१३] प्रवृत्ति । भूपाळें करूनि पुढतीं । चतुष्पाद[१४] धर्माप्रति । देऊनि कीर्ति वाढविली ॥६५॥
या कथेचा अभिप्राय । कीं युगस्थापिता[१५] होय राय । ऐसी महाभारतीं सोय । कुंतिवचनाची ॥६६॥

*(१) प्रयत्न (२) पृथ्वी (३) शेष (४) सूर्य (५) प्राणघातक, निर्दय (६) चंद्र (७) अग्नि (८) अर्जुनाचा नातु परीक्षिती राजा (९) शरण आलेल्याचा नाश. (१०) राहणे (११) ब्रह्मावर्त देशात (१२) कल्याणाची इच्छा मनात धरून (१३) धर्माच्या तपादि पायांची पुनः स्थापना करून म्हणजे पुनः ते धर्म प्रवृत्त केले (१४) चार पाय (१५) युगाची स्थापना करणारा. राजा जसा धार्मिक किंवा अधार्मिक असेल त्याप्रमाणे कृतादि युग किंवा कलियुग तो प्रवृत्त करतो.*

॥ श्लोक ॥

'कालो वा कारणं राज्ञः राजा वा कालकारणम् । इति ते संशयो मा भूद् राजा कालस्य कारणम्' ॥१॥

॥ ओव्या ॥

कुंति म्हणे धर्मातें । राव कारण कालातें । कीं काल कारण रायातें । हा संशय चित्तें धरूं नको ॥६७॥
कृत त्रेत द्वापार । कलियुगादि करणार । रावचि एक निर्धार । चित्तीं धरी ॥६८॥
जेव्हां सद्धर्मी[१] नृप जाण । धर्मे करी प्रजापालन । तेव्हां कृतयुगनामे आपण । प्रवर्ते काळू ॥६९॥
आपुलाले धर्म आचरती वर्ण । परी द्वेषें न मळें[२] अंतःकरण । सुखी असती सर्व जन । सदा प्रसन्न अंतरीं ॥७०॥
सर्व ऋतु निरामय[३] । दीनां सर्वत्र बापमाय । किंबहुना दैन्यचि[४] होय । वाचारंभणमात्र[५] कीं ॥७१॥
तंव शिष्य करी प्रश्न । कृतयुगीं[६] आपण स्थापिले वर्ण । आणि एकादशस्कंधीं हंसवर्ण । एक होता हें निरूपिलें ॥७२॥
तैं सद्गुरु म्हणती शिष्यराया । धन्य तुझी प्रज्ञाचर्या[७] । तरी श्रोत्रमय[८] काया । करूनि ऐके ॥७३॥
दंडें[९] राव कृतयुग प्रवर्ती[१०] । (य३-२६९) तेव्हां वर्णचतुष्टयें[११] राहे कृतस्थिती ।
'दंडनीत्यां यदा' ही उक्ती । यासाठीं भारतीं बोलिली ॥७४॥
दंडाविण स्वयें जरी । लोकीं स्वत्व[१२] वाढे भारी । बाह्य व्यवस्था[१३] नलगे तरी । ऐसिया कृतीं निर्धारी हंसवर्ण ॥७५॥

**एवं भारतभागवत समन्वय(१४)। तुज यथामती सांगितला होय । असो ऐसाचि त्रेतायुगही राय । प्रवर्तवी निजचर्या(१५) ॥७६॥**

*(१) अत्यंत धर्माने वागणारा (२) दूषित होत नाही (३) निरोगी (४) दारिद्र्यादि दुःखे (५) नाममात्र, शब्दमात्र राहतात (६) कृतयुगातहि चार वर्ण राहतात असे आपले म्हणणे (७) बुद्धीची गति (८) कानमय (९) दंड करून, दंडाच्या भीतीने (१०) प्रवृत्त करितो (११) तेव्हां त्या कृतयुगात चार वर्ण असतात (१२) सत्वगुण (१३) दंडाच्या भीतीने लोकांना आपआपला धर्म पाळावयाला लावणे (१४) भारत व भागवत यातील वचनाची एकवाक्यता, विरोध परिहार. (१५) आपल्या वागण्याने*

**द्वापर आणि कलियुग । हेही रावचि प्रवर्तवी अंग । जैं सद्गुण चतुर्थांश(२) करी त्याग । तैं त्रेतायुग प्रवर्ते ॥७७॥**

**अर्ध सद्गुण सोडी जेव्हां । द्वापर प्रवर्ते तेव्हां । प्रजा पिळोनि द्रव्य काढी जेव्हां । कली तेव्हां प्रवर्ते ॥७८॥**

**कृतयुगातें प्रवर्तवितां । तरी अक्षय सौख्य नृपनाथा । त्रेतायुगातें प्रवर्तवितां । किंचित्न्यून सुख मिळे ॥७९॥**

**द्वापारातें प्रवर्तवितां । यथाभाग स्वर्गसत्ता । कलियुगातें वर्तवितां । नरक सर्वथा चुकेना ॥८०॥**

**एवं महाभारतप्रमाणार्थ(३) । तुज निरूपिला यथार्थ । याचा हाचि मुख्यार्थ । कीं कालबल(४) अनृत(५) होय यत्नें(६) ॥८१॥**

**येथ रावपरीक्षितउदाहरण । जयानें कलि निग्रहून(७) । धर्मपृथ्वीचें सांत्वन । केलें जो अजून गजपूरीं वसे ॥८२॥**

**जो श्रीकृष्णकृपें गर्भीं पाळिला । युधिष्ठिरें सिंहासनीं बैसविला । तो महात्मा सकरुण भला । हास्तिनापुरीं नांदतो ॥८३॥**

**तुम्ही दीक्षावंत(८) ब्राह्मण । सत्र करिता आवडीकरून । तें तयाचेंचि प्रभावें पूर्ण । चाले निर्विघ्न महर्षी हो ॥८४॥**

**ऐसिया कलिनिग्रहकाचें(९) । आणि कृतप्रवर्तकाचें(१०) । आत्मयत्नवर्धकाचें(११) । आयुष्य वाढो गुरुकृपें ॥८५॥**

*(२) मनुष्याचे ठिकाणी राहण्याजोगे जेवढे सद्गुण आहेत, तेवढेहि ज्या काली मनुष्याचे ठिकाणी राहतात तेव्हां त्या कालाला कृतयुग म्हणतात; पुढे एकचतुर्थांश सद्गुण कमी होऊन तीन चतुर्थांश सद्गुण जेव्हां मनुष्याचे ठिकाणी असतात तेव्हां तो त्रेतायुग होय व जेव्हां पूर्ण मानवी सद्गुणापैकी अर्धे सद्गुण नाहिसे होऊन अर्धेच सद्गुण राहतात तेव्हां तो द्वापाराचा काळ जाणावा (३) भारतांतील प्रमाण असलेल्या वचनांचा अर्थ (४) कालाचे बल (५) खोटे, लंगडे (६) प्रयत्नाने (७) बलक्षीण करून, त्याचे शासन करून (८) यज्ञदीक्षा घेतलेले (९) कलीला दंड करणाऱ्याचे (१०) कृतयुगाची प्रवृत्ति करणाऱ्याचे (११) जीवाच्या प्रयत्नवादाची वाढ करणाऱ्याचे किंवा आत्मप्राप्तीचा प्रयत्न वाढविणाऱ्याचे.*

**श्री ज्ञानेश्वर जगज्जननी । चिदानंदसुधाखाणी(१) । प्रेमसूत्रीं(२) कवितामणी(३) । गुंफोनि त्वारणीं वाहते ॥८६॥**

॥ गीति ॥

अलकावतिपतिराया ज्ञानेश्वर गुरु अखंड सुखदाता ।
दासी दीन विनवितें जन्म जन्म चरणिं ठेविजे ताता ॥८७॥

हरिः ॐ तत्सत् श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरकृपाप्रसादे नानाछंदबद्धे
प्रियलीलामहोत्सवे आमंत्रणविलासे कलिनिग्रहो नाम पंचदश सखीप्रेषणम् ॥
॥ श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ॥
(य३-२७०)
०००

# सखीप्रेषण १६ वें

## विषयानुक्रम

*स्वयत्नप्रभाव, परमार्थविषयक यत्नाची व्याप्ति, भगवत्स्मृतीचा सत्वप्रभाव, कर्मकाण्डाचें अहंकारमूलकत्व, भगवद्गुणांची पावनता तीव्र मुमुक्षूची मानसस्थिति, गंगावर्णन, परस्परविरोधी कथांचा (य३-४७) समन्वय, अंतरस्त्यागाची सर्व आश्रमांत समान आवश्यकता, सत्संगमहिमा व संतांचा अखंड परोपकाररतस्वभाव, पुण्यरूप व पापरूप कर्मांचें व प्रारब्धकर्माचें रहस्य, शुकांची मनोहर सगुण मूर्ति, शुकरंभासंवाद, नारायणतुष्टीचीं चिन्हें इत्याद्यनेक विषयांचें वर्णन व आमंत्रणविलासाचा उपसंहार (पृष्ठ २७१-३२४.)*

*मंगलाचरण :- श्रीगुरुकृपेचें महत्व व देहबुद्धि टाकून वैराग्यपूर्वक सद्गुरूचें सेवन करण्याविषयीं मनास उपदेश. देहबुद्धिनिंदा, सद्गुरूचे ठिकाणीं सर्वमय भावना ठेवण्याविषयीं उपदेश व स्वतःची उपासनाकथन. २७१ नित्यचरणप्रेमदानार्थ श्रीकृष्णस्तवन २७२ श्रीगुरुपाउलें न विसरण्याविषयीं चित्तास उपदेश व पंचायतनवंदन. २७३* ***कथानुसंधान*** *:- साध्वपराधामुळें परीक्षितीला आलेला मृत्यु व साध्वपराधरूपी पापाची तीव्रता. आपणाला तारक मारक स्वयत्न असून तेथें ईश्वरेच्छेचा उपाय चालत नाहीं असा या कथेचा अभिप्रायकथन. 'ईश्वर कर्ता करविता' या म्हणण्याचा यथार्थ अर्थ निरूपण. परीक्षितीच्या साध्वपराधाचें प्रारब्धरूपानें फलीभवन व त्याचा परिहार होऊं शकत नसल्यामुळें राजानें केलेला वैराग्ययत्नाचा आश्रय.* ***देहप्रारब्ध बुद्धिस्वातंत्र्याचें हरण करीत नाहीं म्हणून संसारसुख प्रारब्धानें दुर्मिळ असतांही परमार्थयत्न सोडूं नये*** *असा याचा अभिप्राय कथन. परीक्षितीनें साधूचा केलेला अपराध व त्याचें फल याविषयींची कथा भागवतांत पहावी असे वक्त्याचें सांगणें. २७३ संसार अनित्य आहे हे मरणकथेचें तात्पर्य आह्मांस कळलें म्हणून ते न सांगतां सर्वत्र गायन करण्यास योग्य अशा कल्याणनिधान श्रीकृष्णविषयक कथाच सांगण्याविषयीं श्रोत्यांची विनंती. २७३-२७४ वक्त्यानें त्यांचें केलेलें अभिनंदन व भगवद्यशमहिमा, परीक्षितीच्या अनुतापाचें फल, त्याच्यावर शुकांची कृपा, त्याच्या समस्त कर्मांचा क्षय व मोक्षप्राप्तिवर्णन. सर्पविषानें स्मृतिनाश होतो मग परीक्षिती मुक्त कसा झाला अशी शंका आली असतां तिच्या परिहारार्थ भगवत्स्मृती सत्त्वमय असल्यामुळें विषतमाचा बाध व <u>नित्य श्रीकृष्णयशगान करणारास मृत्यूची बाधा होत नाहीं</u> याविषयीं निरूपण. भगवद्यशकथानुसंधानपूर्वक (य३-४८) ऋषिप्रश्नाचा उपक्रम :- भगवत्प्रियपात्रांनां अनेकशुभफलचिंतन व हे समस्तगुण सूताच्या ठिकाणीं असल्यामुळें भगवद्यश वर्णन करण्याविषयीं विनंती. २७४. सूताची प्रशंसा, श्रीकृष्णयशानें यज्ञाला पवित्रता, एऱ्हवीं कर्माचे ठिकाणीं फळाचा अनिश्चितपणा, अंतर्बाह्य अभद्रता, कर्मप्रवृत्तीची भ्रमरूपता, शामित्र कर्माची गहनता व इतकेंही पारखेपण असून अहंकारामुळें वाटणारी त्याची सुफलता वर्णन. सूताला वैद्याची उपमा त्यानें मधुरिपुपदकमळमधुरासव पाजून केलेला उपकार॰ त्यामुळें स्वर्गाची उपेक्षा व सत्संगाविषयीं आवडी. आवडीं मुख्य लक्षण व शिवब्रह्मादि योगी ज्याचा अंत जाणत नाहींत त्या परमात्म्याचें प्रियत्वकथन. २७५ शिष्यप्रश्नः- योगेश्वर भगवद्गुणांचा अंत जाणत नाहींत हे आपल्याला चांगलें समजलें याविषयीं योगशास्त्राच्या रीतीने भाष्यवार्तिकसमन्वयपूर्वक विवेचन व शिव आणि ब्रह्मा हे ईश्वररूप असून त्यांनांहीं भगवद्गुणांचा पार कळत नाहीं हें वाक्य विरुद्ध आहे किंवा नाहीं असा प्रश्न २७६ श्रीगुरूचें उत्तर :- शिव आणि ब्रह्मा ज्या मतांचेठायीं कार्यब्रह्म आहेत त्या मतांत कारणब्रह्माचें गुण जाणण्याला त्याचें असामर्थ्य व ज्या मताचेठायीं ते कारणब्रह्म आहेत त्या मताचे दृष्टीनें आपल्या अनंत कल्याणगुणाला जाणण्याची त्यांनां अनपेक्षा ह्याविषयीं निरूपण २७६ ऋषीचें भगवन्माहात्म्यवर्णन व परीक्षितीचें पुण्यपावन बोधप्रद आख्यान सांगण्याविषयीं सूताला विनंती. सूताचें उत्तर :- स्वतःचें नीच कुलांत जनन, गुरुसेवामहिमेनें आपल्याला आलेली कृष्णगुणगायनयोग्यता व गोविंदगुणगायनानें दौष्कुल्यपरिहारकथन. २७६ सूताचा हरिभजनोपदेश व ऋषीस्तवनपूर्वक आपलें यथाबुद्धि निरूपण प्रेमानें ऐकण्याविषयीं विनंती. २७६-२७७ परीक्षितीची धन्यता, संतांचें सहिष्णुत्व, शापवरासंबंधानें साधकाचें व सिद्धाचे मत व तदनुसार शुकापूर्वी व शुकभेटीनंतर राजाच्या चित्ताची समाधानस्थितिकथन, व ह्यासंबंधीं कथा सावधान ऐकण्याविषयीं विनंती २७७ परीक्षितीची तीव्र मुमुक्षा व कृतकर्माविषयीं अनुतापवर्णन २७७-२७८ पुन्हां आपल्याला द्विजदेवछलक बुद्धि (य३-४९) होऊं नये व कृतापराधाचा दंड याच देहानें भोगावा अशा उद्देशानें ऋषिपुत्राकडून स्वतःला शाप मिळण्याविषयीं परीक्षितीचें चिंतन व शापवचन ऐकल्यानंतर त्याचा संतोष २७८ राजाचे वैराग्यविषयक विचार :- <u>शुद्ध चित्तालाही भोगप्राप्ति घातक होते</u> याविषयीं नाना दृष्टांत २७८-२७९ <u>ज्या कर्मांनीं</u>*

परमात्मा दुरावतो तीं सर्व कर्मे पापरूप आहेत याविषयीं तातवचनप्रामाण्य. या लोकाहून स्वर्गलोकाची बद्धता वर्णन. धननिंदा व दारिद्र्यप्रशंसा. धनानेंच अन्नपाणी मिळतें असें म्हणणारांचा निषेध. क्षुधेहून धनतृष्णेची दुस्तरता २७९ धनाविषयीं विरक्ति धारण करून भगवद्भजन करण्याचा चित्ताला उपदेश २८० मातृसेवन सोडून स्त्रीसेवन करणाराचा निषेध. धनवंताची कावळ्याहून नीचता. स्त्रीसंगनिंदा, पुत्रापासून मुक्ति होते या म्हणण्याचें वैय्यर्थ्य व स्त्रियांचें कपटपाटव-वर्णन २८० भगवत्प्राप्तिविषयक पुरुषार्थाची श्रेष्ठता, श्रीकृष्ण दृष्टीपुढें नाहीं, याविषयीं तळमळ व गंगागमननिश्चय २८०-२८१ गंगेचें स्तवन. सर्व राज्यभार सोडून राजाचें गंगातीरीं राहणें. गंगामाहात्म्यवर्णन :- गंगेचें सगुण व निर्गुण स्वरूप व गुरुतीर्थनिषेवणानें ज्याला निर्गुण स्वरूपाची प्राप्ति झाली त्याला कृष्णपादोदकानें गंगेची सगुणप्राप्तिकथन २८१. जगाला अंतर्बाह्य पावन करण्याची गंगेची शक्ति व मूळांतील 'मरिष्यमाण' (१-१९-६) शब्दाचा अभिप्रायकथन २८२ संसारासक्ति सोडून गंगातटी राहण्यावषयीं उपदेश व तत्र राहिलेल्या परीक्षितीची नित्यचर्या. शंकाः- परीक्षितीनें स्तंभमंदिरीं वास केला होता या महाभारतकथेंत व त्यानें गंगातीरीं वास केला या प्रस्तुत कथेंत विरोध प्राप्त होतो. समाधान :- कल्पभेदानें विरोधपरिहार. कल्पांतरीच्या कथा या कल्पांत सांगणें वृथा आहे असें म्हणणारांकरितां वेदपुराणेतिहासकथांचें प्रयोजननिरूपण २८२. व भारत-भागवतकथांचा समन्वय २८३. वेदपुराणेतिहासांची लोकत्रयाला वाटणी करितांनां भलत्या लोकाला भलता इतिहास जाण्याचा संभव. दृष्टिसृष्टिवादानें, सत्कार्यवादानें, बृहदारण्यक, योगवासिष्ठ ग्रंथांतील प्रामाण्यानें व योगांतील कायव्यूहसिद्धांतानें भारतभागवतकथांचा समन्वय निरूपण २८३-८४. (य३-५०) विषयांची आसक्ति सोडून व भगवृतिनतत्पर होऊन राजाचें प्रायोपवेषणास बसणें. २८४ विषयासक्ति हीच सकल दुःखांस कारण आहे याचें स्मृतिप्रामाण्यानें निरूपण. मनांत किंचितही विषयवासना राहिली असतां थोरथोर बद्ध होतात याविषयीं 'विश्वामित्रपराशरादिमुनयो' या स्मृतिवचनाचें प्रामाण्य, वस्तुतः श्रेष्ठांची विषयांहून अलिप्तता व इतर जन विषयांत फसूं नये असा त्यांच्या निंद्याचरणाचा अभिप्राय निरूपण २८४-८५ ***विषयांत आसक्त राहून वेदान्त बकूं नये,*** असा उपर्युक्त स्मृतीचा अर्थ व याच अभिप्रायानुसार एकनाथांचें वचन २८५ मोठ्यांचें निषिद्धाचरण पाहून तदनुसार वागूं पाहणारास पतन होतें म्हणून विषयांतून सर्वथा विरक्त होण्याविषयीं उपदेश २८६ 'प्रपंचांत परमार्थ करावा' या मताचें खंडन व त्या वचनाचा यथार्थ अभिप्राय निरूपण. आंगीं समता न येतां स्त्रीपुत्रादिकांत आसक्त राहून परमार्थाच्या गोष्टी सांगणारांचा स्मृतिसंताभिप्रायानें चांडालवत् निषेध २८६-८७ मनांत नुसती भक्तीची आवडी असून बाहेर लोकांच्या भीतीनें अथवा आळसानें उघड साधन न करणारांचा निषेध किंवा नामस्मरण करून संतांची निदा करणारांचा एकनाथ,तुकाराम-वचनाभिप्रायानुसार निषेध व नामाचे दशापराधनिरूपण २८७ गृहस्थ अथवा संन्यासी या दोघांनाही अंतस्त्यागाची समान आवश्यकता २८८ परीक्षितीनें गृहादिकांचा त्याग करून गंगाजलसेवन करीत राहण्याचें कारण. शिष्यसह मुनींचें गंगातीरीं आगमन व संत आणि गंगा या भावडांची पावनता वर्णन. शंका :- सर्व आपापल्या कर्मानुसार फळें भोगीत असल्यामुळें साधूंच्या दयेचा तेथें काय उपयोग होतो ? समाधान. भोगाचें स्वरूपकथन २८८. पुण्यभोगकाळीं बुद्धींत स्वातंत्र्य राहतें याविषयीं सोदाहरण स्पष्टीकरण २८८-८९ 'कर्म कितीही वर्षे राखून ठेविलें तरी भोगलेंच पाहिजे' व 'प्रयत्नानें प्रारब्ध जिंकितां येतें' या परस्पर विरोधी वचनांचा दृष्टांतपूर्वक समन्वय व महात्मे पुरुष आपल्या पुण्यजन्य स्वातंत्र्यामुळें दयेनें सदैव परोपकार करीत असतात ह्या तत्त्वाचें कथन. दुःखी जन हे पापकर्मफलास्तव परतंत्र असतात म्हणून त्यांनां साधुदयाकृत फल मिळूं शकत नाहीं ह्या वचनाचा समन्वय सांगण्याकरितां (य३-५१) पापी पुरुषाच्या हातून घडलेलें किंचित् सत्कर्म महात्म्यांच्या अनुग्रहानें तीव्र होऊन त्यास प्रयत्नयोग्य करें करितें ह्यांतील रहस्यकथन २८९ उपर्युक्त रहस्य माझी बुद्धि नीट ग्रहण करूं शकत नाहीं अशी शिष्याची विनंती व त्याच्या समाधानार्थ तेंच रहस्य वादपूर्वक विस्तारानें निरूपण :- २८९-९०. जन्म, आयुष्य व भोग या तीन्ही प्रकारच्या विपाकाला वासना व कर्म ह्या दोहोंची आवश्यकता. बृहद्वासिष्ठांतील लवणादिकांच्या कथेवरून व स्वप्नादिकांत मानसकर्मानेंच फळ होतें अशा अर्थाच्या महाभारतवचनावरून मानसकर्म म्हणजेच वासना असा अर्थ घेऊन केवळ वासनेनेंही फळ होऊं शकते अशी कोणी शंका केल्यास तिच्या निरसनार्थ शांकरभाष्य, महाभारत, योगवासिष्ठ व पातंजलयोगदर्शन यांतील वचनांचा समन्वयपूर्वक, युक्तीनें व अनुभवानें, वासना व मानसिक कर्म यांतील भेदनिरूपण २९०-२९१ वरप्रमाणें वासना व शारीरिक कर्म यांतही भेद आहे याविषयीं श्रुतीचें व तातवचनाचें प्रामाण्य २९१ व वासना आणि कर्म ह्या दोहोंच्या योगानेंच विपाक होतो असें तात्पर्य, कर्माच्या विपाकोत्पादनाविषयीं उत्पन्न होणाऱ्या चार विकल्पांचें कथन, त्यापैकी पहिल्या तीन विकल्पांचा संभव मानल्यास येणारे दोष व अवशिष्ट चतुर्थ विकल्प जो एकभविक कर्माशय त्याची ग्राह्यता २९१-२९२ एकभविक वादाचें स्पष्टीकरण व तो सर्वत्र लागू पडत नाहीं याविषयीं कर्मानुशयबोधक

छांदोग्यश्रुतीचें, जन्मकर्म व गुणकर्मदृष्टींनीं अर्थदर्शनपूर्वक विवरण २९२ या श्रुतीवरून ब्रह्मसूत्र व योगभाष्य यांतील व्यासवचनांत परस्पर प्राप्त होणारा विरोधाभास व एकभविक कर्माशय, चित् ठिकाणीं घेऊन दोन्ही वाक्यांचा समन्वय २९२-२९३ शंका :- ''तस्मिन्यावत्संपातमुषित्वा'' या छांदोग्यश्रुतीवरून निरनुशय पुनरागमन सिद्ध होत असल्यामुळें एकभविकवादाची सर्वत्र हानी होत नाहीं. समाधान :- 'यावत्संपातम्' या शब्दावरून सर्व कर्माचा क्षय घेतल्याबद्दल निषेध व अशा अर्थाचें वैपरीत्य. 'यावत्' शब्दाची यथार्थ योजना व 'रमणीयचरणा' या श्रुतीला मुख्यत्व. जाग्रच्छ्रुतीची व आपस्तंब स्मृतीची याला सम्मति व कोणत्याही प्राण्याला या लोकीं जन्मापासूनच (य३-५२) भोग असतात अशी सर्वांची अनुभूती २९३ 'यावत्संपातम्' या छांदोग्यश्रुतीवरून निरनुशय पुनरागमन सिद्ध करूं लागल्यास योगभाष्यकारांच्या व शंकराचार्यांच्या म्हणण्याला बाध येऊन देवांनां मनुष्यजन्मारंभक कर्म न राहतां ज्ञानावाचून मोक्षप्राप्तीही होणार नाहीं याविषयीं निरूपण :- स्वर्गभोगानें या लोकांतील कर्मांचा क्षय झाला आहे व स्वर्गलोकांत कर्म उत्पन्न होत नाहीं असे एकभविकवाद समर्थन करणाऱ्या योगभाष्यकारांचें म्हणणें व मनुष्यलोकांतच कर्म निष्पन्न होणारी वर्णव्यवस्था आहे असें गीताभाष्यांत शंकराचार्यांचें म्हणणें २९४ देवताकरणामध्यें देवांनां ज्ञानाधिकारी कर्मांचा अधिकार सांगणारें वचन. इंद्रतपबोधक छांदोग्यश्रुतिवचन, भगवत्स्तुत्यादि कर्माधिकार इंद्रदिकांनां सांगणारी व मनुष्यजन्माविषयीं देवांची इच्छा दर्शविणारी पुराणवचनें यांचा समन्वयकथनपूर्वक देवांनां कर्माधिकार नाहीं याविषयीं विवेचन, २९४ व क्षीणपुण्यपुरुषांनां प्राप्त होणारी अडचण २९४-९५ इंद्रांनां कारागार सांगणाऱ्या वचनांची व्यवस्था व एकभविकवाद, चितच लागू करावा अशी सिद्धि २९५. एकभविकवाद, चित् लागू करण्याचा प्रकार :- कर्माचे नियतविपाकी व अनियतविपाकी असे दोन प्रकार व त्यांपैकीं नियतविपाकी कर्मालाच एकभविकवाद लागू करण्याचा विधि. एकभविक कर्माशयाविषयीं नंदीश्वराचें व नहुषाचें उदाहरण. नियतविपाकी कर्माची क्रममुक्तिप्राप्तीविषयीं आत्यंतिक योजना, इतरांविषयीं अनुमापकरूपानें योजना व ह्याचें (नियतविपाकी कर्माशयाचें) बहुधा दृष्टजन्मवेदनीयत्व व, चित् अदृष्टजन्मवेदनीयत्वकथन. अनियतविपाकी कर्माची तीन प्रकारची गती, श्रुतिप्रामाण्य व श्रुत्यभिप्रायकथनपूर्वक निरूपण २९५-९६ तिसऱ्या प्रकारांत सांगितलेलें पुण्यकर्म एखाद्या बलवान नियत कर्माच्या योगानें दडपून राहिलें असतां काय करावें असा प्रश्न व तीव्र यत्नानें त्या पुण्याला नियतविपाकी करावें असें उत्तर व नियतविपाकी शब्दाचें स्पष्टीकरण. तीव्र यत्न कसा करावा असा प्रश्न व शक्य तेवढी शास्त्रीय शुभ कर्माच्या तीव्र यत्नाची रीती उत्तरार्थ निरूपण २९६. तीव्रयत्नाचे दोन प्रकार. पहिल्या प्रकाराची फार कठीणता व दुसऱ्या (य३-५३) प्रकाराची बरीच सुलभता. दुसऱ्या प्रकाराचीं उदाहरणें. गंगास्नानाची व भगवन्नामस्मरणाची शक्ति. अनियतविपाकी कर्में कोणतीं व नियतविपाकी कर्में कोणतीं याचा निर्णय, परमेश्वराला अर्पण केलेल्या कर्मांचा अत्यंत नियतविपाकीपणा व ह्याविषयीं तुकारामांचें म्हणणें २९६-९७ नियतविपाकी कर्माशयाच्या एकभविकत्वामधील सूक्ष्मभेदकथन. उपर्युक्त सर्व विवेचनाचें सार :- लोकांच्या अनियतविपाकी पुण्याशयाला नियतविपाकी पुण्याशयरूप करण्यामध्यें गंगास्नान व भगवन्नामस्मरणादिकांप्रमाणेंच सज्जनांच्या दयारूप अनुग्रहाची समानता व सज्जन महावाक्योपदेश करूं शकतात हा त्यांच्या माहात्म्यामधील विशेषभेदकथन. सर्वांवर निरपेक्ष प्रीति करणाऱ्या दयावान् पुरुषालाच सर्व त्याग सहज कसा साधतो, कर्मवाद हा दयेला घातक नसून उलटा साधक कसा आहे व एतदर्थच तीर्थांच्या ठिकाणीं महात्म्यांचें आगमन असतें याविषयीं विवेचन व महात्म्या परीक्षितीला वैराग्य झालें हें जाणून सर्व महात्म्यांचें गंगातीरीं आगमन झालें असें कथन २९७. तीर्थांसही तीर्थरूप करणारी सज्जनांची स्थिति व त्यांचें तीर्थांत नहाण्याचें कारणवर्णन २९८ तेथें प्राप्त झालेल्या मुनींचा नामनिर्देश, राजानें त्यांचें केलेलें पूजन व सर्व श्रेष्ठासनीं बसल्यानंतर आपल्या प्रायोपवेषणाला त्यांची अनुमती मिळण्याविषयीं राजाची विनंती. सर्वस्व सांडून संतचरणीं जो लीन झाला त्याचें भाग्यवर्णन २९८ संतदर्शनामुळें राजाचे धन्यतेचे उद्गार व शापाविषयीं अनुग्रह मानणें २९९ राजाची प्रशंसा व वैराग्यप्रभाववर्णन. सर्पविषाचें ठिकाणीं राजाची उत्कृष्ट भावना, त्यानें गंगेचें केलेलें स्तवन व संतांपाशीं मागितलेलें वरदान २९९-३०० राजाला उद्देशून मुनींची वरदवाणी व देवांनीं दिलेलें अनुमोदन ज्ञानांत विघ्न करण्याचा देवांचा स्वभाव व विष्णुभक्तीनें त्यांचें निवारण ३००. देवांच्या अनुमोदनानें अदृष्ट विघ्नांचा नाश व ऋषींच्या अनुमोदनानें दृष्ट विघ्नांचा नाश. दृढ वैराग्यामुळें राजास मुनींच्या आशीर्वादाची प्राप्ति व जशी ज्याची भावना असेल तशीच त्याला सामुग्रीं मिळते असा निष्कर्ष. चित्तांत विषयवैराग्य नसतांनां ''आम्हांस सद्गुरु भेटत नाहीं'' असें म्हणणारांचा निषेध व (य३-५४) पूर्ण वैराग्य झालें असतां सद्गुरुसमुदाय घरीं येतो ह्याविषयीं तातवचनाचें प्रामाण्य व अनेक ऐतीह्य दृष्टांत ३०० राजाच्या हरिपदानुसरणचर्येचें ऋषींनीं केलेलें वर्णन :- अंतःकरणांत श्रीहरिविषयक प्रेम वाढूं लागला असतां विषयवासना व तर्ककटकटी आटतात व संसारांत दोष पाहणाराच हरिचरणाला विनटतो याविषयीं सदृष्टांत निरूपण

*३०१. याकरितां धनकामिनीवर थुंकून नित्य चक्रपाणी आठवावा असा तातकबीरादि संतवचननिर्देशपूर्वक उपदेश ३०१-३०२ वैराग्यपूर्वक हरिभक्तिविषयीं परीक्षितीचें आनुवंशिक शील व भगवंताच्या प्रेमगोडीचा प्रभाववर्णन ३०२ 'हा हरिरूपीं मिळेपर्यंत आम्ही अवघे येथेंच राहू' असा आपसांत निश्चय करून राजाला ऋषींनीं दिलेलें आश्वासन व संतांच्या आश्चर्यकारक भूतदयेचें वर्णन ३०२-३०३ 'तुला नारायण भेटेल' असें साधूचें आश्वासन मिळणाराचें भाग्यवर्णन व सत्संगमहिमाबोधक संतांचीं वचनें ३०३ ऋषींचें पक्षपातरहित, सत्य व प्रसादभरित वचन ऐकून राजाला झालेलें समाधान व त्यांच्या चरणांवर दंडवत घालून भगव्चारित्रें ऐकविण्याविषयीं विनवणी ३०४ मुक्तीहूनही भगवद्गुणानुवाद गोड असतात याविषयीं राजाचे विचार ३०४ संतांचें मूर्तिमंत वेदत्व वर्णन ३०५ संतांची दीनवत्सलता व वचनामृतानें आपणांस निववण्याविषयीं राजाची त्यांच्या चरणीं लडिवाळपणाची विनंति. ऋषींनीं राजाला सांगितलेलें तपदानादिक उपाय व मुनिसभेंत भगवान् शुकांचें अकस्मात आगमन ३०५-३०६ शुकांचें वैराग्यब्रह्मचर्यादिगुणवर्णन ३०६ शंका :- भगवान् शुक बालब्रह्मचारी आहेत असें प्रस्तुत वर्णन असून देवीभागवतांत शुकांचा विवाह सांगितला आहे, असा दोन पुराणांचा परस्परविरोध येतो ३०६ समाधान :- अपय्य दिक्षितांचें मतखंडन ३०६-३०७ ज्ञानोत्तर प्रारब्ध भोगण्याची आवश्यकता. ज्ञानरहित योगियाकडून खरें प्रारब्ध भोगलें जाण्याची अशक्यता. ज्ञानी आणि योगी पुरुषांच्या संचित क्रियमाण कर्माचा ज्ञानानें नाश व प्रारब्धाचा कायव्यूहानें नाश. प्रारब्धभोगार्थ कायव्यूहानें निर्माण केलेल्या शरीरस्थ चित्तांनां गौणता व त्या चित्तांत ज्ञान निर्माण करण्याविषयीं योग्यांचें असामर्थ्य (य३-५५) योगाची कर्तृतंत्रता ३०७ आसुरी मायेनें उत्पन्न केलेल्या भीम, भास, व दृढ या दैत्यांनां निर्वासनिक स्थिति सांगणाऱ्या योगवासिष्ठांतील कथेचा विरोधपरिहार व योगज कायव्यूहव्यवस्थेनें शुकाचा विवाह व शुकाचें ब्रह्मचर्य सांगणाऱ्या कथांचा समन्वय ३०८ यावर पूर्वपक्ष :- उपासनेनें आधिकारिकत्व मिळणारांचें प्रारब्ध सुखरूपच असलें पाहिजे अशा अभिप्रायाचें मधुसूदनस्वामीचें म्हणणें व आधिकारिकांनां दुःखही होत असतें अशा अर्थाचीं निम्बार्कभाष्यांत घेतलेलीं पुराणवचनें व त्याला वसिष्ठांनी पुत्रार्थ शोक केला हें उदाहरण. या विरोधावरून उत्पन्न होणाऱ्या तीन शंका ३०८ व कायव्यूहसिद्धांतानें वरील शुकविषयक कथांचा विरोधपरिहार होण्याची अशक्यता ३०९ समाधान :- उपासनेनें समाधिस्थ झालेल्या पुरुषांचें ठिकाणीं रजःप्रवृत्तीचा असंभव, आधिकारिक व ईश्वराचे अवतार यांमधील भेद, एकजन्मारंभक व अनेकजन्मारंभक असें दोन प्रकारचें प्रारब्ध ३०९. अनेकजन्मारंभक कर्माचें दोन प्रकार ३१० सृष्टिनियमनसहकारी आधिकारिकांनां कायव्यूहानें एकदम प्रारब्ध भोगून टाकण्याची अशक्यता, आधिकारिकांचाही लोकानुग्रहसहायार्थ केव्हां केव्हां असणारा कायव्यूह याविषयीं विवेचनपूर्वक पूर्वपक्षाचें खंडन व कोणत्याही अनेकजन्मारंभक कर्माच्या योगज व्यवस्थेनुसर शुकाचे ब्रह्मचारी व विवाहित जन्म सांगणाऱ्या पुराणाचा विरोधपरिहार ३१० शिष्याची शुकमहिमा वर्णन करण्याविषयीं विनंती व सज्जनमहिमाप्रभाववर्णन पूर्वक श्रीगुरूचें उत्तर :- ३१० शुकांच्या देहावर वर्णाश्रमचिन्ह न दिसण्याचें कारण सांगण्याकरितां जगाची आत्मसदृशता व देहाची ब्रह्मरूपता निरूपण ३११ याविषयीं शुकांचा अभिप्राय निरूपण व त्यांच्या अवधूतवेषाचें वर्णन. शुकांच्या श्यामसुंदर मनोहर मूर्तीचें श्रीकृष्णाशीं सादृश्यानें वर्णन ३११-३१२ ती पुण्यपुंजमय आर्तजननी मुनिसभेंत प्राप्त झालेली पाहून सर्व मुनींनीं केलेला सादरसन्मान, पूजाद्युपचारांनीं राजानें केलेलें सप्रेमपूजन, देवब्रह्मर्ष्यादिकरून सर्व मुनींचा आनंद, व शुकांचें श्रेष्ठासनीं विराजमान होणें, राजानें त्यांनां लोटांगण घालून साभिप्राय अंतःकरणानें त्वारणीं ध्यान लावून हात (य३-५६) जोडून उभें राहणें व चरणदर्शनानें समाधान पावणें. शुकमहिमेचें अमृतपान करविण्याविषयीं शिष्याची विनंती व त्याची प्रशंसा करून वैराग्यभरित मनोहर शुकमहिमानिरूपणपूर्वक श्रीगुरूचें उत्तर :- जन्मतांच संसार मिथ्या मानून तपोवनांत भगवान शुकाचार्य जाऊं लागले असता व्यासांनीं विरहातुर होऊन त्यांच्या मागें धांवणें, तरुपाषाणांतून शुकांचें उत्तर देणें ३१३ शुकांच्या मागें नदीपार जातांनां नदींतील नग्न स्त्रियांनीं व्यासांनां पाहून वस्त्र नेसणें ३१४ त्यासंबंधीं स्त्रियांचा व व्यासांचा संवाद. लोकहितार्थ शुक तपाला बसून कांहीं दिवस लोटले असतां इंद्राला पडलेली भीति, सकाम लोकांची रीति, त्यांनीं निर्मिलेल्या नानादेवता, निरुपद्रवी जनांस पीडा करण्याचा त्यांचा स्वभाव, इंद्राच्या ह्या स्वभावामुळें स्वर्गाचा येणारा वीट ३१४ शुकनियमभंगाविषयीं इंद्रानें मदनाचा घेतलेला विचार, आपला प्रवेश तेथें अघटमान आहे असें त्याचें उत्तर, इंद्र चिंतातुर झाला असतां रंभेनें स्वतःच्या स्वरूपाची प्रशंसा करून केलेली प्रतिज्ञा, तिला गौरवून वसंत मदनासह शुकतपभंगार्थ पाठविलें असतां शुकांच्या*

*हृदयांत आपल्या तातांनां (श्रीकृष्णाला) पाहून मदनाची त्रेधा, रंभेचें गायन व नृत्य व त्याचा प्रभाव, तें सुरस गायन ऐकून शुकांची समष्टि अनाहतनादाविषयीं अथवा श्रीकृष्णवेणूगीताविषयीं कल्पना होऊन डोळे उघडणें व रंभारूपाला पाहून श्रीकृष्ण म्हणून नमस्कार करणें, तें पाहून रंभेचें चुकीचें अनुमान व ती चुकी मदनाच्या लक्षांत येणें, हृदयीं भगवंत लोपल्यावांचून विकाराचा अप्रवेश, शुकाचें ध्यान व रंभेचें चाळे पाहून मदनाचें आश्चर्य ३१५ रंभेनें शुकाचें केलेलें स्तवन व लोकशास्त्रसमन्वित नीतिचें कथन ३१६ शुकांनीं तिचा धिःकार करून वेदान्तशास्त्रसमन्वित दिलेलें उत्तर ३१६-१७ सुरतसमाधीचें महत्व व श्रीकृष्णाचें सोळाहजार स्त्रियांचें पतित्व वर्णन करून तपाचा निषेधपूर्वक रंभेचें प्रश्न, व स्त्रीसंगनिंदा, सुरतसमाधीचे दोष, विरक्ति न सोडण्याविषयीं निश्चय ३१७. स्त्रीकुचांची प्रेतशरीरमांसग्रंथींसी समता, सोळासहस्त्र स्त्रीयांची हरिमयता, श्रीकृष्णाची निष्कामता ३१८ श्रीकृष्णमाहात्म्य व अद्वैतभक्तीचें स्वरूपकथनपूर्वक (य३-५७) शुकाचें उत्तर. उत्तर ऐकून मिथ्या संसाराचा द्वेष करण्याविषयीं शुकाचा निषेधपूर्वक रंभेचें संतापयुक्त भाषण व क्रोधानें शस्त्र घेऊन उदर चिरलें असतां त्यांतून सौरभ निघणें ३१८ सुगंधाची किंचित् सत्त्वसंपन्नता ३१९ सत्त्वाच्या न्यूनाधिक्यामुळें ब्रह्मलोकादिस्थानीय शरीरांचें तारतम्य, रंभाउदरस्थ सौरभभांडाराचें कारण, त्या सौरभाचा प्रभाव, शुकाला तपगर्विष्ठ म्हणून रंभेचें त्याला वर देण्याला उद्युक्त होणें, शुकांनीं उठून तिची स्तुती करणें, शुकांचा भाव ओळखून मदनाचे विचार, श्रीज्ञानेशचरण आवरण नाहीं तोपर्यंत भक्तांचें मूळमायेलाही वश न होणें, मिथ्या संसाराचा द्वेष करूं नये परंतु त्याचा राग धरल्यानेंही अतिबंधन चुकत नाहीं याविषयीं विवेचनपूर्वक शुकाचें भाषण ३१९ रंभेच्या पोटी असलेलें पूर्ण मातृत्व न जाणतां व तिच्या सारख्या जगज्जननी असतां, कांहींच्या पोटांत विष्ठा पाहून लोकांत मातृभाव व्यर्थ मानल्याबद्दल शुकाचे सखेद भाषण ३१९-२० तिच्या स्तनाला मांसग्रंथी म्हटल्याबद्दल मागितलेली क्षमा, स्तनांतलें अमृताकार दुग्ध सत्वर पाजण्याविषयीं विनंती, शुकवचनानें गलिताभिमान होऊन व देवशरीर विसरून रंभेचें त्याला साष्टांग नमस्कार घालणें व शुक नांव चित्तांत असावें म्हणून पृथ्वीवर केळी होणें. रंभेचें पश्चात्तापयुक्त सविनय भाषण, स्वतःचा धिःकार व शुकांनां गुरुत्वभावनेनें शरण जाऊन वात्सल्ययोगानें तरी पावन करण्याविषयीं विनंती. स्त्रीपुरुषांनां पावन करून स्वतः नारायण होण्याची संतांची रीति. ३२१ शुकांचें तिला आश्वासन व भगवृतिन करण्याविषयीं आज्ञा. रंभा स्वर्गास परत गेल्यावर तिला गर्वरहित पाहून ऋषींनां झालेला हर्ष. मदनानें व रंभेनें इंद्राला शुकांचें माहात्म्य व निस्पृहता वर्णन करणें. तें ऐकून इंद्राचे हर्षभरित उद्गार व तपोवनांत जाऊन त्यानें शुकांचें केलेलें पूजन. याप्रमाणें शुकांचीं सुखदचर्या निरूपण करून त्यांच्या सर्वज्ञतेची व परीक्षितीच्या भगवद्भक्तीची श्रीगुरूंनीं केलेली प्रशंसा ३२१ शुकांच्या आगमनानें हर्षित झालेल्या परीक्षितीचे उद्गार निरूपणः- ३२२ संतदर्शनानें स्वतःचा भाग्योदय, सज्ज्नांच्या चिंतनाचें व त्यांच्या अवचित भेटीचें फळ, नारायण तुष्टल्याची चिन्हें. भगवंताचें (य३-५८) दीनरक्षणब्रीद, त्याचें आपल्याला वंशपरंपरा सहाय्य, व त्याच्या कृपेनें अत्यंत दुर्लभ असें शुक भगवंताचें अवचित् दर्शन. ३२२ भगवान् शुकांची अव्यक्तीं गती व जन्मदकर्मरहित स्थिती असून त्यांच्या व्यक्त दर्शनाविषयीं आश्चर्य व आपल्या शापदग्ध स्थितीत अशा दर्शनाचें महत्व. ३२३ ''स पूर्वेषामपि गुरुः'' या सूत्रानें शुकांचें परम गुरुत्व, व त्या सद्गुरु जननीला अनन्य शरण होऊन तिच्या दर्शमात्रानेंच आपण पावन झालों असा निश्चयकथनपूर्वक राजाचें परिप्रश्न. तिच्या (शुकांच्या) दर्शनाची दुर्लभता व उत्तरें ऐकण्याविषयीं उत्कंठा. ३२३ आमंत्रणविलासाचा उपसंहार :- 'सखीप्रेषणाची' उपपत्ति. ३२३-३२४ ग्रंथकर्तृत्वनिरूपण. आमंत्रणविलासाला 'विलास' म्हणण्याचें सकारणत्व व षोडश खणांच्या तुलसीवृंदावनाची त्याला उपमा. श्रीज्ञानेशचरणीं ग्रंथसमर्पण व आगमनविलासाचा उपक्रम. श्रीज्ञानेश्वरनामस्मरणांत उपसंहार. ३२४*

---

वाचकांच्या सोयीकरितां ह्या ग्रंथास जोडलेला ''परिचय'' व ''विषया-नुक्रमणिका''तयार करण्यांत रा. राजेश्वरराव त्रिपुरवार यांनीं बरेच परिश्रम घेतले ह्याबद्दल आम्ही त्यांचे फार आभारी आहोंत.

**– पहिल्या आवृत्तीचे प्रकाशक**

*सखीप्रेषण १६ वें*

# सद्‌गुरु शुक समागम

**॥ श्रीज्ञानेश्वरमाउली ॥**

**॥ ओव्या ॥**

**मना सुखाचें अधिष्ठान । एक श्रीगुरूचे चरण । गुरुकृपेवीण पूर्ण । साधक[४] जाण कदा नव्हे ॥१॥**
**भोगोनिया नाना कष्ट । शास्त्रें पढोनि अचाट[५] । वैराग्यावीण ज्ञानोत्कट[६] । नोहे हें स्पष्ट कां न कळे ॥२॥**
**तूं विसरोनि आपणआपणा । करिसी देहबुद्धि वल्गना । शेवटीं श्रीगुरुराणा । आठविसीना नवल हें ॥३॥**

**॥ छंद - हिंदी ॥**

**शिशु[७] था तब तैं मन खेल कियो निजमीतनसूं लरिके लरिके ।**
**धनकामिनिलोभ कियो अति यौवन मान हृदें भरिके भरिके ।**
**अब पाय जरा नित रोवत है रुजतानलमो जरिके जरिके ।**
**सठ ग्यान सुरेशकृपाबिन तूं कईबेर भयो मरिके मरिके ॥४॥**

*(१) चैतन्य व आनंद या अमृताचे कोठार (२) प्रेमदोऱ्यात (३) कवितारूपी मणी (४) मुमुक्षु (५) पुष्कळशी (६) प्रबळ अपरोक्ष ज्ञान (७) हे मना! जेव्हां तू अति लहान होतास तेव्हां ते लहानपण तू आपल्या बरोबरीच्या मुलाशी खेळण्यात, लढण्यांत गमाविलेस. पुढे तारुण्य प्राप्त झाले ते, द्रव्य व स्त्री यांच्या लोभात सापडून चित्तात मानाची वृत्ति ठेवता ठेवताच खोवलेस. आता मात्र वृद्धावस्था आली. आता नानाप्रकारच्या रोगरूपी अग्नीत भाजला जाऊन रडण्यापलिकडे तुझ्याच्याने कांही होत नाही. अरे मूर्खा! ज्ञानेश्वरमहाराजांची जोपर्यंत कृपा होत नाही तोपर्यंत तू असाच कितीतरी जन्म, मरत जाशील व जन्मत जाशील*

**॥ अभंग ॥**

**माता पिता बंधु सर्व गुरुराव । आणिक तो भाव[१] असूं नये ॥१॥**
**गुरु ब्रह्मदेव गुरु नारायण । पार्वतीरमण गुरु माझा ॥२॥**
**गुरु हरि दोन्ही मानुनी समान । करावें भजन परप्रेमें[२] ॥३॥**
**ज्ञानेश्वरकन्यें देवाहूनि गुरु । श्रेष्ठ हा विचारू मानवला ॥४॥ ५॥**

**॥ ओवी ॥**

**माझा आळंदीवल्लभू[३] । लीलावतारी[४] स्वयंभू[५] ॥ माहेरी सासरीं हृदयभू[६] । शोभवी पितृपतित्वें ॥६॥ (य३-२७१)**

**॥ पद ॥**

**सुधासम[७] हरि तव नामातें । जपुनि दुरित[८] कांहीं ना मातें ।**
**त्यजुनि धन नंदन वामातें[९] । कामितें[१०] तवपदकामातें[११] ॥ध्रु० ॥**

**॥ श्लोक ॥**

**भवाचें[१२] भयें जीव माझा जळाला[१३] । पढूनी श्रुती गर्व नाहीं गळाला ॥**
**सदा अंतरीं काम[१४] ना श्याम नाचे । अशा संकटीं तोंड पाहूं कुणाचें ॥**
**॥ चाल ॥ त्वरित मज ने, त्वरित मज ने । भवांबुधिपार[१५] दीननाथा । ठेवितें चरणांबुजि[१६] माथा ॥**

*(१) समज, भावना (२) अत्यंत निष्काम प्रेमाने (३) श्रीज्ञानेश्वरमहाराज (४) लीलेने अवतार धारण केलेला (५) नित्य उत्पत्तिरहित (६) हृदयदेश. पिता या दृष्टीने ते माहेर आहे व पति या दृष्टीने सासर आहे (७) अमृतासारखे गोड (८) पाप (९) स्त्रीयेस (१०) इच्छिते (११) तुझ्या पायाचे ठिकाणी चित्त लागावे (१२) संसाराचे (१३) होरपळला, तळतळतो (१४) विषयसुखाची इच्छा (१५) संसारसमुद्राच्या पार (१६) चरणकमळावर.*

**रमावल्लभा[१] कृपावंता । उमारमणप्रिय[२] भगवंता ॥ सुजनतारणा[३] दनुजहंता[४] । रमावल्लभा कृपावंता ॥१॥**
**त्रिविधतापांहिं[५]तप्त[६]पोटीं । सहाय न कोणी जगजेठी ॥ कसेंही करुनि द्यावी भेटी । निवारी षडरिघाव[७]कोटी[८] ॥२॥**

॥ श्लोक ॥

तुझीं पाउलें साजिरीं देवराया । वसो तीं सदा मन्मनीं दे वराया[९] ॥

जयासाठिं इंद्रादिकें देव कष्टी[१०] । मुनी पाहती अंतरीं ज्ञानदृष्टी ॥

॥ चाल ॥ परमसुखदा[११], परमसुखदा । धृतव्रजयुवतिमृदुलहाता[१२] ।

सुमखकन्यकाचुडेदाता[१३] ॥ रमावल्लभा कृपावंता । उमारमणप्रिय भगवंता ॥२॥

सख्या तनु विरहानल[१४]जाळी । भासते भुजग[१५] मुक्तजाळी[१६]। प्राण हा कंठीं वनमाळी । पाजुनी प्रेमामृत पाळी ॥

॥ श्लोक ॥

तुझ्या वांचुनी वृत्ति झाल्या पिशा रे । तुझ्यावांचुनी ओस[१७] दाही दिशा रे ॥

तुझ्यावांचुनी भोग ते रोग सारे । अझूनी दयाळा न येसी कसा रे ॥

॥ चाल ॥ विनविते मी, विनविते मी । प्रभो ज्ञानेश्वरा ताता । उशिर न करावा यदुनाथा ॥

रमावल्लभा कृपावंता । उमारमणप्रिय भगवंता ॥३॥ (य३-२७२)

*(१) लक्ष्मीपते (२) शंकराला प्रिय असणारा किंवा शंकर प्रिय आहे ज्याला (३) सज्ञनांना तारणारा (४) दैत्यांचा नाश करणारा (५) तीन प्रकारच्या दुःखाने (६) त्रस्त (७) कामक्रोधादि षड्रिपूचे आघात (८) अनंत (९) वर देण्याकरिता (१०) श्रम करणारे पण भेट होत नाही असे (११) अत्यंत सुख देणारा (१२) व्रजवासी गोपिकांचा अत्यंत मृदु हस्त ज्यांनी धरला आहे असा (१३) द्रौपदीला चुडेदान देणारा (१४) वियोगदुःखरूपी अग्नि (१५) सर्प (१६) मोत्यांचा हार (१७) शून्यमय.*

॥ पद ॥

विसरूं नको रे गुरुपाउलाला ॥ ध्रु०॥

भेटविती जे निमिष[१] न लगतां । आणुनि यशुमतितनुजा[२] लाला[३] ॥१॥

उसनी[४] तनु[५] ही पंचभुतांची । भंवती[६] पूयमय[७] लाला[८] ॥२॥

रात्रंदिन तुज शिकविते चित्ता । अलकावतिपतिबाला ॥३॥८॥

॥ दोहा ॥

गणपतिहरिहरदेविरवीसंज्ञक[९] निजसुखधाम[१०] । लक्षरूपकरि[११] जानिके पुनिपुनि करूं प्रणाम ॥९॥

॥ ओव्या ॥

सूत म्हणे ऋषिवर्या । जो कृष्णकृपेंकरोनियां । गर्भी वाचला तया राया । साधुअन्यायें[१२] मरण आलें ॥१०॥

अपराध कांहीं नव्हता म्हणून । ब्रह्मास्त्रापासून रक्षी कृष्ण ।

तोचि सतापराध[१३]गणतां जाण । आणी मरण तीव्र कर्मे ॥११॥

साधूंचा अपराध पाप तीव्र । तें येंचि जन्मीं फळ देणार । ऐसें महाराज सत्यवतीकुमर[१४] । योगभाष्यांत बोलिले ॥१२॥

या कथेचा अभिप्राय । आपणा तारक[१५] मारक स्वयत्न[१६] होय । ईश्वरेच्छेचा[१७] उपाय । न चले येथ ॥१३॥

जरी कर्ता करविता भगवंत । ऐसीं वचनें असती बहुत । तरी तयांचा यथार्थ अर्थ । ऐक तुजप्रती सांगतों ॥१४॥

ईश्वरेच्छा[१८] मानोनि पोटीं । पापें करी कोट्यान कोटी[१९] । आळशी[२०] होय धर्मासाठीं । तया जगजेठी नव्हे त्राता ॥१५॥

*(१) क्षण (२) यशोदेचा पुत्र जो श्रीकृष्ण त्याला (३) लाल नावाचे रत्न-त्याप्रमाणे असणारा (४) तात्पुरती घेतलेली, पुनः परत करावी लागणारी (५) शरीर (६) येते जाते (७) पू वगैरेनी भरलेली (८) लाळेने युक्त (९) गणेश, विष्णु, शंकर, देवी , सूर्य हे पंचक (१०) आत्मसुखाचे स्थान (११) लक्षणावृत्तीने (१२) साधूचा अन्याय केल्यामुळे (१३) साधूचा अपराध (१४) व्यास (१५) तारणारा, मारणारा (१६) आपलेच कर्म, प्रयत्न (१७) ईश्वर काही करीत नाही (१८) ईश्वराची इच्छा (१९) अनंत (२०) आळसाने धर्मानुष्ठान करीत नाही.*

सत्कर्मे करोनि तत्वतां । तीं समर्पावीं भगवंता । अहंकार न यावा सर्वथा । यास्तव कर्ता करविता हरि म्हणिजे ॥१६॥

म्हणोनि साधूंचा अपराध । तें परीक्षिद्राया झालें प्रारब्ध । परी त्या प्रारब्धांतही प्रयत्न विषद । राव आपण सांडिना ॥१७॥

हें अपराधफळ न चुके म्हणोन । राव आश्रयी वैराग्ययत्न ।

याचा अभिप्राय कीं दुर्लभ असतां संसार पूर्ण । तरी परमार्थयत्न न सोडिजे ॥१८॥

अपराधें देहप्रारब्ध झालें । तेणें बुद्धिस्वातंत्र्य नाहीं हरिले । यालागीं मरणसमयींही रायें मांडिलें । वैराग्ययत्नें हरिभजन१९

तो साधूंचा अपराध कवणेरीती । कैसी फळली तयाची स्थिति । ही कथा पाहावी भागवतीं । नाही ये ग्रंथीं वर्णिली ॥२०॥
श्रोता म्हणे बरवें झालें । जन्ममरण जीवा लागलें । (य३-२७३) तें वर्णितां नव्हे वहिलें । सार्थक कदा ॥२१॥
जयाचें करितां वर्णन । वाणी पावे श्रौतभूषण[१] । तैसा एक रमारमण[२] । कल्याण[३]निधान करुणाब्धि ॥२२॥
मरणकथेचें तात्पर्य थोर । कीं अनित्य आहे संसार । तें आम्हा कळलें समग्र । परी शार्ङ्गधरयश[४] सोडवेना ॥२३॥
जो नित्यमुक्त भक्तार्थ[५] संसारी[६]। जयावीण वैराग्य नरकदरी[७]। तो भक्तवत्सल पूतनारी । स्तोतुंयोग्य[८] सर्वत्र ॥२४॥
वक्ता म्हणे तुम्ही चतुर । जगत् जाणोनि असार । कृष्णयशावीण इतर । नेणता विषय ॥२५॥
जयाच्या यशेंकरून । व्यापिलें असतां मन । अंतकालीं गंगातीरीं देह ठेवून । मुक्त झाला परीक्षिती ॥२६॥
परीक्षितीतें अनुताप[९] झाला । म्हणोनि साध्वपराधदोष[१०] गेला । वरी श्रीशुकाचा लाधला । कृपाहस्त ॥२७॥
तेणें निःशेष संचित[११] निमालें । शुकमुखें जें ज्ञान जाहलें । तेणें कर्तृपण[१२] निमतां गेलें । क्रियमाणही ॥२८॥

*(१) वेदमान्यता (२) लक्ष्मीपति (३) सुखसागर (४) श्रीहरीचे गुण कीर्ति (५) भक्तासाठी (६) संसारात प्रकट होऊन सांसारिकाप्रमाणे वागणारा (७) नरकाची खाई (८) स्तवन करण्यास योग्य (९) पश्चाताप (१०) साधूच्या अपराधाचे पाप (११) कर्म (१२) कर्तृत्वबुद्धि नाहिसी होऊन.*

आतां विप्रशाप तक्षकदंशरूपप्रारब्ध[१] । तें भोगोनियां प्रसिद्ध । कृष्णस्मरणें होवोनि शुद्ध । विमुक्त झाला ॥२९॥
म्हणाल सर्पविषें विघटे[२] स्मृति । मग विमुक्त कैसा परीक्षिती । परी सत्त्वमय[३] भगवत्स्मृति[४] ।
तिणें विषतमःपरिणती[५] जिंकली ॥३०॥
'तरी ऐसिया हो ध्वनी । झणी थारा देशी मनीं । परी नित्य सेविला मी निदानी । सेवकू होय '॥३१॥ ज्ञाने.
हें श्रीमंतवचन प्रमाण । जो नित्य करी श्रीकृष्णयश[६]गान । तया बांधूं न शके मरण । सत्य सत्य त्रिवाचा ॥३२॥
म्हणोनि तुम्ही जें बोलिलें । तैसेंचि ऋषींनीं सूता पुसिलें । तें ऐकावें वहिलें[६ क] । सावधान ॥३३॥

॥ अभंग ॥

ऋषय ऊचुः – त्यावरी न येवो आघात[७] सर्वथा । माझ्या कृष्णनाथा आवडे जो ॥१॥
कल्पकल्प तोचि राहो चिरंजीव । जयास माधव आवडतो ॥२॥
सर्वकाळ तया असावें कल्याण । गोपिकारमण प्रिय ज्याचा ॥३॥
त्याची होवो सर्व त्रिभुवनीं कीर्ति । जो कां यशमूर्ति[८] कृष्ण गाय ॥४॥
इतुक्या गुणांचा तूंचि सूता एक । फळोत अनेक फळ तुला ॥५॥
ज्ञानेश्वरकन्याकांत गोपिराणा । आयकवि काना यश त्याचें ॥६॥ ३४॥ (य३-२७४)

॥ ओव्या ॥

आह्मां मर्त्यां[९] अमृतदाता[१०] । सूता तूंचि एक त्राता । या यज्ञास पवित्रता । श्रीकृष्णयशें ॥३५॥

*(१) ब्राह्मणाच्या शापाचे, तक्षकाने चावणे असे जे प्रारब्ध निर्माण झाले ते (२) नाहिशी होते (३) सात्विक (४) भगवंताचे स्मरण (५) विषापासून स्मृति नाहिसी होणे हा जो तमोगुणी परिणाम व्हावयाचा तो झाला नाही (६) श्रीकृष्णाची कीर्ति गातो (७) दुःखाचे प्रसंग (८) यशाची मूर्ति असा कृष्ण (९) मरणाऱ्यांना (१०) अमर करणारा. (६ क) पहिल्याने.*

येऱ्हवीं या कर्माचेठायीं । सर्वथा फळाचा निश्चय[१] नाहीं । जें आंतरबाहेरीं लवलाहीं । अभद्रची[२] ॥३६॥
आधीं लोपोनि आत्मशुद्धि[३] । जेव्हां होय कर्तृबुद्धि । तेव्हां या कर्माची सिद्धि । अगुण[४] प्रसिद्धि ठाउक ॥३७॥
देह तितुके पांचभौतिक । तयासी ब्राह्मण मानोनि देख । भ्रमें प्रवृत्त कर्म सकलंक[५] । होईल सम्यक कवणेरीती ॥३८॥
वरी शामित्रकर्म[६] तेंही गहन । जेथ अहिंसेचें संकोचन[७] । आणि देहसौंदर्यही धुमेंकरून । व्यापिले सकळ ॥३९॥
ऐसेंही असोनि अहंकारें । पारखें[८] वाटे सुफळ[९] सारे । येथ तुवां [९क]भिषग्वरें । नवल केलें अघटित ॥४०॥
मधुरिपुपदकमळमधुरासव[१०] । पाजोनि पुष्टि देशी हरुनि भवदव[११] ।
उपेक्षुनि यास्तव द्युरपुनर्भव[१२] । सत्संग सर्वस्व आवडे आम्हां ॥४१॥
आवडीचें मुख्य लक्षण । असंतुष्ट[१३] ऐकतां प्रियगुण[१४] । सकळ रसाचें[१५] अधिष्ठान[१६]। तो प्रिय आपण परमात्मा ॥४२॥
जो अगुण[१७] अविकार[१८] अखंडित । जो अनंतकल्याणगुण[१९] अनध्यस्तविवर्त[२०] ।

**शिवब्रह्मादि योगी समस्त । जियाचा अंत नेणती ॥४३॥**

*(१) इच्छिले फळ होईल किंवा नाही हे सांगता येत नाही (२) अमंगळ (३) आत्म्याची ओळख (४) सद्‌गुणविरहित, (५) सदोष (६) पशुवधकर्म (७) आळा घालावा लागतो, सोडावी लागते (८) विरुद्ध (९) चांगले कल्याण करणारे मार्ग, खऱ्या कल्याणाचे मार्ग (१०) मधुरिपु जो माधव त्याच्या चरणकमलाचे ठिकाणी असणारा मकरंद, हाच कोणी गोड व मादक आसव (११) संसारताप (१२) स्वर्गमोक्ष (१३) तृप्ति न होणे (१४) प्रिय जो असेल त्याचे गुण (१५) आनंदाचे, प्रेमाचे (१६) आश्रय (१७) तमोगुणादिरहित (१८) विकाररहित (१९) अनंत उत्तम गुण ज्याचे ठिकाणी आहेत (२०) ब्रह्मज्ञानाने मिथ्या न ठरणारा (९ क) वैद्यराज*

**॥ हिंदी - गद्य ॥**

शिष्य :- भगवन्, योगेश्वर[*] भगवद्गुणके अंतको जानते नही यह मैं समीचीन[१] समझा. काहेतें[२] चित्तकी क्षिप्त, मूढ और विक्षिप्त भूमिकाओमें चित्त सर्वथा ब्रह्मविषे अज्ञात[३] रहे है, और एकाग्र भूमिकामें यद्यपि चित्तको योगका[४] संस्पर्श[५] होवे है तोभी तहां चित्त अव्यापक[६] रहे हैं. काहेतें व्यापक वस्तूमें एकाग्रता होती नहीं. और चंचलताभी होती नहीं. यद्यपि सांख्यभाष्य और योगभाष्यमें विज्ञानभिक्षुनें चित्तको व्यापक कहा है तथापि भूतोंकी[७] अपेक्षा व्यापक, यह तिन भाष्यवार्तिकोंका अर्थ है, भगवदपेक्षया[८] चित्त व्यापक नहीं. अणे[९] निरुद्धभूमिका[१०] में यद्यपि योग संपूर्ण होवे है तथापि विवेकख्यातिबलतें[११] पुरुषविमुक्तिस्तव[१२] संस्कारावशिष्ट[१३] चित्तभी अपने धर्मनकूं[१४] त्यागे है, ताते भगवत्कल्याणगुणका[१५] पार[१६] जीवयोगिनकूं मिलता नहीं. परंतु शिव अरु[१७] ब्रह्मा तो ईश्वररूप हैं तातें[१८] तेभी[१९] जाणते नहीं, यह वाक्य विरुद्ध है या नहीं? (**य३-२७५**)

श्रीगुरुरुवाच :- इतर योगी जाणत नाहींत हें तुला चांगलें समजलें. आतां शिव आणि ब्रह्माही कसें जाणत नाहींत तें ऐक. शिव आणि ब्रह्मा ज्या मताचेठायीं कार्यब्रह्म[२०] आहेत, त्या मताचेठायीं कारणब्रह्माचे[२१] गुण ते जाणण्याला समर्थ नाहींत असें उत्तर आहे. त्यांत शिवविष्णु समान असल्यामुळे, शिव कार्यब्रह्म नाही हे भारत वचनावरून सिद्ध होतें; व हिरण्यगर्भालाही[२२] ईश्वरता[२३] अद्वैतकौस्तुभकारादिकांनीं प्रतिपादिली आहे;

*(*) मोठेमोठे योगी. (१) बरोबर (२) कारण (३) न जाणणारे (४) ब्रह्माशी ऐक्य पावण्याचा (५) स्पर्शमात्र (६) मर्यादित (७) पंचभूतांच्या दृष्टीने पाहता (८) भगवंताच्या दृष्टीने (९) आणि (१०) ज्या भूमिकेत चित्तवृत्तींचा निरोध होतो (११) प्रकृति व पुरुष भिन्न आहेत या विवेकाच्या बळाने (१२) पुरुष मुक्त होत असल्यामुळे (१३) संस्कारमात्र शेष राहिलेले (१४) जाणण्याच्या धर्माला (१५) भगवंताच्या ठिकाणच्या उत्तम सद्‌गुणांचा (१६) अंत (१७) आणि (१८) म्हणून (१९) ते देखील. (२०) सृष्टीची उत्पत्ति एवढेच एक कार्य करणारा तो ब्रह्मदेव व सृष्टीचा संहार एवढेच कार्य करणारा तो शिव असे मर्यादित शक्तिमान् चेतन (२१) सर्व शक्तिमान् अशा शुद्ध ब्रह्माचे (२२) ब्रह्मदेवालाहि (२३) सर्वशक्तिमत्ता, सर्वज्ञत्ता.*

परंतु त्या मतांतही ते शिवादिक कारणब्रह्माचें स्वरूपच असल्यामुळें स्वान्त[१] जाणणारा स्वतःच विनाशी होईल म्हणून आपल्या अनंत कल्याणाला जाणण्याची त्यांनां अपेक्षा नाहीं असा अभिप्राय समज. आतां तुझें समाधान झालें असेल तर मुनीचें बोलणें श्रवण कर.

शिष्य :- आज्ञा भगवन्.

**॥ पद ॥**

**सूता सांग तदीय यशा ॥ ध्रु० ॥**
**यद्भव[२] मानस भवभवसागरीं[३] । शोभवि सकल दिशा ॥१॥**
**यत्पद सेवुनि सुजन न गणती । कोठें दिवस निशा[४] ॥२॥**
**ज्ञानेश्वरबाला यत्करुणें । चुकविति कालकशा[५] ॥३॥ सूता सांग तदीय यशा ॥४४॥**

**॥ संस्कृत- गद्य ॥**

**त्वया[६] परीक्षिन्मरणं नोक्तं तदिष्टम् ।**
**किन्तु कथम् असावुत्तमोधिकारी शुकवचनं श्रुत्वैव अपवर्गमयं**
**योगनिष्ठः सन्गोविंदपदं गतवान् तत्पुण्यपावनमाख्यानं बोधप्रदं शंसनः ॥**

॥ गीति ॥

सूत म्हणे मुनिराया नीचवर्णजन्य[७] माझि ही काया[८] ।
परि गुरुसेवामहिमें[९] सिद्ध[१०] भवत्संगिं[११] कृष्णगुण गाया ॥४५॥

*(१) आपला पार, अंत (२) ज्याचे अवताररूपाने प्रगट होणे (३) मनापासून उत्पन्न झालेल्या संसारसमुद्रामध्ये (४) रात्र (५) कालाचे चाबुक, फटके (६) गद्यार्थ - आपण परीक्षितीचे मरणवृत्त सांगितले नाही ते उत्तम केले, पण भगवान् शुकाचार्याच्या मुखाने केवल भगवत्कथा ऐकून भगवंताचे ठिकाणी समाहित चित्त होत्साता जो भगव्द्वारण प्राप्तीरूप मोक्षाला गेला त्या एवढ्या थोर अधिकाऱ्याचे पुण्यपावन आख्यान फारच ज्ञानप्रद असल्यामुळे ते आम्हाला सांग (७) शूद्रासारख्या हीन कुळात उत्पन्न झालेले (८) शरीर (९) गुरूच्या सेवेच्या सामर्थ्याने (१०) योग्य (११) तुमच्या बरोबर.*

॥ संस्कृत - गद्य ॥

यन्महतां [१] लौकिकभाषणरूप संबंधोऽपि दौष्कुल्यनिमित्तं मनस्तापं परिहरति ।
किं पुनरनंतस्य नामगृणतः पुंसः दौष्कुल्यं अपनयतीति वक्तव्यम् ॥

॥ पद ॥

तो यदुनाथ भजा ॥ध्रु० ॥
त्यागुनि सकला कमला[२] ज्याची । करिते पादपुजा ॥१॥
यत्पादोदक[३] शिव धरि शिरिं तो । सर्वेश्वर उमजा ॥२॥ (य३.२७६)
त्या ज्ञानेश्वरचरणांवाचुनि । कहिं अन्यत्र न जा ॥४६॥

॥ साकी ॥

पावति निजपद[४] धीर जया पदिं प्रेमा ठेउनि भावें । तत्पदकमलीं रुंजि[५] घालुनी मनमधुपा[६] मधु[७] प्यावें ॥४७॥

॥ ओव्या ॥

आपण असोनि ज्ञानतरणी[८] । पुसता मजवरी कृपा करूनी । तरी यथाबुद्धि वदेन वाणी । प्रेमें श्रवणीं ऐकावे ॥४८॥
धन्य तो राव परीक्षित । अनुतापें परम तप्त । लोकीं[९] पीडितांही असती शान्त । अखंड संत महीवरी ॥४९॥
साधकाचें[१०] हेंचि लक्षण । देहाहून वेगळें मन । शाप वर देहासी जाण । मी वेगळा त्याहून हें राव भावी ॥५०॥
आणि सिद्धांचें तंव ऐसें मत । आत्मा नित्य सर्वांसी अलिप्त[११] ।
यद् ज्ञानें मिथ्या काल होत । तेथ शापाची मात कायसी ॥५१॥

*(१) गद्यार्थ :- महत्पुरुषाशी जर थोडा भाषण करण्याचा प्रसंग आला तर आम्हाला नीच कुळात उत्पन्न झाल्याचे जे दुःख वाटते ते नाहिसे होते, मग अनंतकल्याणगुणनिधान अशा भगवंताचे नाम घेत असतांना नीच कुलाचा दोष नाहिसा होतो हे काय सांगावयाचे (२) लक्ष्मी (३) ज्याचे चरणतीर्थ गंगा. (४) आत्मस्वरूपाची ओळख (५) झेप घालून (६) हे मनोभ्रमरा (७) मकरंद (८) ज्ञानसूर्या (९) लोकांनी त्रास दिला तरी (१०) मुमुक्षूचे (११) अतीत, वेगळा.*

एवं शुकापूर्वी आणि शुक भेटतां । समाधान रायाच्या चित्ता । सावधान होवोनि आतां । तेचि कथा ऐकावी ॥५२॥

॥ अमृतध्वनी ॥

पाही त्वरेंकरुनि राही सदा ह्रदयिं वाहीन मी शिर पदीं ।
नाहीं[१] असाहि भव[२] दाही[३] तुझ्याविण न कांहीं कळे श्रुतिपदीं[४] ।
बाही[५] धरोनि लवलाही[६] गणोनि मज मा[७], ही सुझाकि[८] पदरें ।
साही[९] निवारि रिपु साही[१०] समस्त कटुताही[११] दयाजलद[१२] रे ॥५३॥
गंगाधरा[१३] सुजनरंगानुगा[१४] कुभवभंगा[१५] तुझें पद करो ।
तंगा[१६] भया षडरि दंगा[१७] मिटाय करि चंगा[१८] ह्रदैं[१९] मम करो ।
अंगा तुझ्या रजतरंगान्विता[२०] बघुनि संगास[२१] वांछि मन मे ।
कंगालकी[२२] सुन[२३] कुरंगांगशेखर[२४] दुरंगार[२५] लागि तनमे[२६] ॥५४॥

॥ दोहा ॥

निजकृत करि[२७] नरपालको[२८] भया[२९] परम अनुताप । हा कष्टं ! मै अधमने क्या कीन्ह्यो यह पाप ॥५५॥

तेजोमय[३०] मुनिवर्यनें कछु[३१] न कीन्ह[३२] अपराध । मैं फनि[३३] डाऱ्यो[३४] तदपि गले[३५] नृपमति[३६] कियो प्रमाद[३७] ॥५६॥
(य३-२७७)

*(१) वस्तुतः नसलेला (२) संसार (३) जाळतो (४) श्रुतीत वेदमार्गाने (५) हात (६) नम्र झाला किंवा भाराखाली दबला (७) माया (८) उत्तम प्रकारे झाक, नाहिसी कर (९) कामक्रोधादि सहा शत्रु (१०) सहन कर, क्षमा कर (११) माझे अपराध, कटु बोलणे, वाईट वागणे (१२) दयामेघ (१३) शंकरा (१४) सज्जनांच्या इच्छेप्रमाणे वागणारा (१५) या दुष्ट संसाराचा नाश (१६) त्रस्त (१७) कामक्रोधादि षड्रिपूची धामधूम (१८) शुद्ध, उत्तम (१९) हृदय, चित्त (२०) रुप्याप्रमाणे पांढऱ्या रंगाने युक्त (२१) भेटी घेण्यास (२२) दरिद्र्याची, दीन दुःखिताची (२३) ऐक (२४) हरिणाचे चिन्ह आहे ज्याचे ठिकाणी त्या चंद्राला मस्तकावर धारण करणारा (२५) भयंकर आग (२६) शरीराचे ठिकाणी (२७) आपल्या कृत्याने (२८) राजाला (२९) झाला (३०) तपस्वी (३१) कांहीएक (३२) केला (३३) सर्प (३४) टाकला (३५) गळ्यात (३६) मी राजा आहे असे समजून (३७) गुन्हा, चूक.*

निरपराध[१] निष्काम[२] मुनितेज[३] हृदय[४] अनजानि[५] । पांवर[६] जो छल[७] कपट करे ताकि[८] नियत[९] अति हानि ॥५७॥

तनुज[१०] तदीय[११] कृपाल यदी देवैगो मोहि[१२] शाप । तबहि अनुग्रह मानुहूं छूटि[१३] जायगो पाप ॥५८॥

॥ गीति ॥

देवा कृतापराधा[१४] फळ होइल सर्व कांहिं नियमानें[१५] । परंतु विनवणि ही कीं भोगावें शीघ्र याचि देहानें ॥५९॥
करुणाकर हरि माझा रक्षक मज दुःख किमपि देइल ना । तरि मी दंडचि मागे ज्यायोगें कधिं कुकर्म होइल ना ॥६०॥

॥ अभंग ॥

राज्य बळ धन माझें हें सकळ । विप्रकोपानळ[१६] शीघ्र जाळो ॥१॥
जयायोगें पुढें न होय ही मती । द्विजदेवाप्रति छळक[१७] जी ॥२॥
यासी काल आतां नको नारायणा । पाहूं दे नयना समीपची ॥३॥
वळतां दयाळू ज्ञानेश्वरतात । आघात[१८] ते हितरूप होती ॥४॥ राज्य बळ धन माझें० ॥६१॥

॥ ओवी ॥

ऐसें चिंतित असतां मनीं । तंव शमिकप्रेषित[१९] शिष्य येउनी । सांगे राया सातवे दिनीं । तक्षकापासोनि मृत्यु तुज ॥६२॥

॥ अभंग ॥

ऐकुनियां ऐसी ब्राह्मणाची वाणी । संतोषला मनीं भूमिपाळ ॥१॥
म्हणे आजि भलें झालें नारायणा । आठवण मना राहील कीं ॥२॥

*(१) ज्यांनी माझा अपराध केला नव्हता (२) ज्याला कांही मागायचे नाही (३) अशा मुनीचा प्रभाव (४) मनांत (५) न जाणता (६) पामर, मूर्ख (७) छळणूक (८) त्याची (९) अचूक (निश्चित) (१०) पुत्र (११) त्यांचा (१२) मला (१३) नाहिसे होईल (१४) केलेल्या अपराधाचे (१५) अवश्य, कर्मफळ नियमास धरून (१६) ब्राह्मणाचा क्रोधरूपी अग्नि (१७) छळणूक करणारी (१८) दुःख (१९) शमिक ऋषीने पाठविलेला.*

तक्षकविषाग्नि[१] तो मज चंदनू । भोगदग्ध[२] तनु[३] निववाया ॥३॥
कृपावंत होतां ज्ञानेश्वरराव । दुःख तेंही सर्व सुख वाटे ॥४॥
ऐकुनियां ऐसी ब्राह्मणाची वाणी । संतोषला मनीं भूमिपाळ ॥६३॥

॥ ओव्या ॥

राव विचारी आपुलें मनीं । पाप जाईल शापेंकरूनी । परंतु पुण्यभोगेंचि मनीं । पुढतीं होईल मत्तता[४] ॥६४॥
नाना कटू औषधें देउनी । बाळव्याधी[५] जाती निघोनी । परी रसना[६] मोकळी करूनी । पुनः प्रमादें[७] होति ते ॥६५॥
(य३-२७८)
कीं खर[८] धुतला नानारीती । मोकळा होतांचि लोळे क्षितीं[९] । तैसें शुद्ध जाहलियाही चित्तीं । भोगप्राप्ती घातक ॥६६॥
म्हणोनि हा लोक स्वर्गलोक । दोहींठायीं परम दुःख । जेणें दुरावे लक्ष्मीनायक । सर्व तें पातक तात वदती ॥६७॥
'आणि मजचिमाजीं असतां । जेणें मी दुऱ्हावे पांडुसुता । तें पुण्य ऐसें म्हणतां । जीभ न तुटे काई' ॥६८॥ ज्ञाने.

एऱ्हवीं विचारें पाहतां । स्वर्गी या लोकाहूनि बद्धता[१०] । येथ स्त्री भेटे पतिव्रता । स्वर्गी भुक्ताप्सरा[११] भेटती ॥६९॥
यज्ञांत राहोनि अति[१२] पवित्र । फळ मिळे रंभामूत्रपात्र[१३] । धनराग[१४] तंव येथ परत्र[१५] । दुःखदायक सारिखा ॥७०॥
ऐसें वाटे माझ्या मतीं । धन्य दरिद्रियांची स्थिती । व्यवहारीं आणि परमार्थी । सारिखी शक्ती यदंगीं ॥७१॥
दरिद्र्यांच्या स्कंधीं आपण । देवोनियां सुखासन । राजे बैसोनि करिती गमन । दरिद्र्याधीन जिणें त्यांचें ॥७२॥
शीतऊष्णसहनशील[१६] । दरिद्र्याचा देह सकळ । धनवान[१७] सर्वदां चिंताशीळ । समाधानविरहित[१८] ॥७३॥
दरिद्रिया श्रमेंकरून[१९] । भूक लागतां रुचे अन्न । धनवंतासी सदा अजीर्ण । गोड अन्न भक्षुनी ॥७४॥
धनाचिया अभावेंकरूनी[२०] । दरिद्री न वांछी तनय कामिनी[२१]। भक्तीनें अथवा भयेंकरूनी । अंतःकरणीं हरी स्मरे ॥७५॥

*(१) तक्षकाचे विष हाच कोणी अग्नि (२) भोग भोगून भोगून होरपळलेली (३) शरीर (४) मस्तपणा (५) लहानपणातील (६) जिव्हा वाटेल ते खाल्ल्याने (७) अविवेकाने. (८) गाढव (९) जमिनीवर (१०) विषयासक्ति (११) दुसऱ्यांनी भोगलेल्या अप्सरा (१२) नियमांनी (१३) रंभेची योनि (१४) द्रव्याची आसक्ति (१५) परलोकांत (१६) थंडी ऊन सहन करणारे (१७) श्रीमंत (१८) असंतुष्ट (१९)कष्ट केल्याने (२०)नसल्यामुळे (२१)पुत्र स्त्री.*

म्हणोनि ऐसें माझें मत । कीं निर्धना अनुकूल दैव समस्त । आणि जो परमात्मा रमाकान्त । त्या नांव निष्किंचनप्रिय[१] ॥७६॥ नवल निर्जीव असोनि धन । सजीवा प्रमाद[२] करी उत्पन्न । हें हरिमायेचें विंदान[३] । भजनावीण तुटेना ॥७७॥
धनेंचि भेटे अन्नपाणी । ऐसें मूढ बोलती वाणी । पशुपक्षीही निर्धन असूनी । सुखी[४] वांचुनी विचरती ॥७८॥
जो परमात्मा करुणाघन । स्तनीं दुग्ध करी उत्पन्न । तो समर्थ करितां रक्षण । कां जड धन प्रार्थावें ॥७९॥
अथवा न भेटतां अन्न । क्षुधेनेंचि होईल मरण । तरी तेंही आवडीकरोन । श्रेष्ठ वाटे मजलागीं ॥८०॥
क्षुधा शमेल देह खाउनी । वासना न शमे प्राण जाउनी । ती कामादि सहांची[५] कामिनी[६] । जिता[७] मरणीं न सोडी ॥८१॥
धनाचिया आश्रयें करून । कामादि राहिले जीव धरून । (य३-२७९)
जड धन इच्छी असूनि चेतन । प्रमादलक्षण[८] हेंचि कीं ॥८२॥

॥ अमृतध्वनी ॥

वित्तावरी उगिच चित्ता अशी प्रबळ सत्ता गङ्या करिसि कां[९] ।
लत्ता[१०] पुढें रविजदत्ता[११] तिथें सहनवत्ता[१२] बरी धरिसि कां ।
पित्ता नको ज्वलवुं[१३] वृत्ता[१४]सता[१५] भजुनि[१६] मत्ता[१७] निजोनि भवनीं[१८] ।
चित्ता[१९] विवेचुनि[२०] विरक्तावपि[२१] प्रभु सुदत्ताप्रति स्मर वनीं ॥८३॥

॥ ओव्या ॥

माय पोशी दुग्ध पाजोन । नारी मारी वीर्य पिळून । स्त्रियेस भजे माता सोडोन । मुख्य अज्ञान तेंचि कीं ॥८४॥

*(१) दरिद्री आहे प्रिय ज्याला किंवा दरिद्र्याला जो प्रिय असतो (२) अविवेक (३) विचित्र करणी (४) जिवंत राहून (५) सहाजणांची (६) स्त्री (७) जिवंतपणी व मेल्यावरहि (८) अविचाराचे चिन्ह (९) कुत्सित, वाईट (१०) लाथ (११) यमाने मारलेली (१२) सहनशीलपणा (१३) उसळू देऊ (१४) आचाराला (१५) उत्तम, शास्त्रोक्त (१६) सेवन करून (१७) कशाची फिकीर न करता, मस्त होऊन (१८) घरी (१९) चैतन्यभाव (२०) विचाराने जडापासून निराळा करून (२१) वैराग्यातहि.*

कावळा जरी छिद्र पाहत । तया देहावरील दिसत । परमनोदोष[१] धनवंत । पाहे यास्तव अतिनीच ॥८५॥

॥ अमृतध्वनी ॥

त्रागा[२] मना अजुनि कागा नसे विषयिं हा गाढवा चुकशि कां ।
भोगांगनाभगकुरागामधें[३] षडरिनागासवें[४] तुकसि[५] कां ॥
योगानुगा[६] भज वियोगानुगा[७] त्यज विरागा गदाश्रय[८] सदा ।
वागादिका[९] जिणुनि[१०] बा ! गाइ तूं सुजनतागामि[११] माधवपदा[१२] ॥८६॥

॥ ओवी ॥

कामें[१३] जाहली पुत्रोत्पत्ति । त्या पुत्रापासोन होय मुक्ति ।
मल्ल[१४] पेरोन सुधाप्राप्ति[१५] । तैसी ही उक्ति मी म्हणे ॥८७॥

॥ अमृतध्वनी ॥

दारा[१६] नको तनु[१७] विदारावया[१८] अधिक मारा[१९]नियुक्त[२०] करिते ।
हाराप्रती[२१] बघुनि जारासवें[२२] मतिविकारास[२३] नित्य धरिते ॥
दारापुढें[२४] उगिच वारावया व्यजन[२५] वारांगनासमचि[२६] ये ।
तारावया मज निवारावया भव[२७] उदारा हरे त्वरित ये ॥८८॥

*(१) दुसऱ्याच्या मनांतील दोष (२) रुसवा, त्रास (३) भोग व स्त्रीचे इंद्रिय याचे ठिकाणच्या बीभत्स प्रेमामध्ये (४) कामादि सहा शत्रु हेच कोणी सर्प त्यांचेबरोबर (५) मान डोलावतोस (६) परमेश्वराशी ऐक्य करण्याला साधक जे असेल त्याचे सेवन कर (७) परमेश्वरापासून पराङ्मुख करणारे असेल ते (८) विरागरूपी औषधाचा आश्रय (९) वाणी इत्यादि इंद्रियांना (१०) जिंकून (११) सज्जनांचें ठिकाणी प्रकट होणाऱ्या (१२) श्रीहरीच्या पायाचे (१३) रतिसुखाने (१४) सोमल (१५) अमृतप्राप्ति (१६) स्त्री (१७) शरीर (१८) नाश करण्याकरिता (१९) मदनाला (२०) उद्युक्त, जागविते (२१) चंद्रहारादि दागिने (२२) उपपतिबरोबर (२३) मनांतील कामविकारास, चंचलपणास, व्यभिचारबुद्धीस (२४) दरवाज्यासमोर (२५) पंखा (२६) वेश्येप्रमाणे लटक्या प्रेमभावाने.(२७) संसार*

यास्तव चिंतोनि यादवराय । साक्षात्करावे[२] युगुलपाय[३] । आणिक पुरुषार्थ श्रेष्ठ काय । भेटतां माय सद्गुरु ॥८९॥
माझी तंव ऐसी गती । सातवे दिनीं पापनिष्कृती[४] । परी एकचि तळमळ वाटे चित्तीं । नाहीं यदुपति दृष्टिपुढें ॥९०॥
नेणो कवणिया पापेंकरून । (य३-२८०) निजधामा गेला मनमोहन । मज ठेविलें धर्मरक्षणाकारण ।
तों हा प्रमाद म्यां केला ॥९१॥
कीं माझिया वडीलीं बळेंकरून । सारथी केला रमारमण । त्या पापें मज येतांही मरण । नाहीं श्रीकृष्ण दृष्टिपुढें ॥९२॥
परी तो दयाळू जगत्पती । सहज ताराया दीनाप्रती । निजचरणतीर्थ भागीरथी । ठेवितो क्षिती[५] आवडी ॥९३॥
त्या माउलीचे तटीं । मी तक्षकासी घेईन भेटी । शत्रूवरीही मित्रदृष्टी । करीन तज्जलप्रभावें[६] ॥९४॥
ऐसें विचारसबीज[७] मन । सत्वांकोलिस्नेहेंकरून[८] । सुद्रुमरूप[९] होवोन तूर्ण । गंगा-गमनपणें[१०] फळलें[११] ॥९५॥

॥ गीति ॥

गंगे जगदघभंगे[१२] गिरिजाहृन्नीररुहमधुपरमणी[१३] ।
घे झडकरि मज पदरीं शिशुकृत[१४] अन्याय आणुनी न मनीं ॥९६॥

॥ ओव्या ॥

ऐसा सप्रेम अंतःकरण । गंगातीरीं नृपनंदन । राहिला राज्यभार सोडोन । शौनकालागोन सूत सांगे ॥९७॥
सूत म्हणे जी ब्रह्मवर्या[१५] । गंगा साक्षात् कृष्णकाया[१६] । पानाचमनें[१७] माया । निजभक्तांची नाशी जी ॥९८॥

*(२) साक्षात् पहावे (३) दोन्ही पाय (४) पापाचे परिमार्जन, क्षालन (५) पृथ्वीवर (६) तिच्या पुण्यतम जलाच्या सामर्थ्याने (७) विचारयुक्त (८) सत्वगुण हेच कोणी अंकोली वृक्षाचे तेल (९) उत्तम मोठा वृक्ष वाढावा त्याप्रमाणे तीव्र होऊन (१०) गंगेच्या काठी जाण्याच्या रूपाने (११) फळास आले (१२) जगाचे पाप नाहिसे करणारी (१३) पार्वतीचे हृदय हेच कोणी कमल, त्या कमलाचे ठिकाणचा मकरंद सेवन करणारा श्रीशंकर त्याची पत्नि (१४) मुलाने केलेला (१५) ब्राह्मणश्रेष्ठांनो (१६) श्रीकृष्णाचे स्वरूप (१७) पिण्याने किंवा नुसत्या आचमन केल्यानेहि.*

॥ श्लोक ॥

यस्यास्ति द्विविधं रूपं निर्गुणं सगुणं पुनः। निर्गुणेन जगव्द्याप्य सगुणेन पुनाति वै ॥९९॥
निर्गुणस्य[१] तरंगास्युः कोटिशश्चित्तवृत्तयः । सगुणस्य तंरगा स्युर्जलमारुतसंगमाः ॥१००॥
तरंगाकारयोगे ऽपि जहाति न यथा जलम् । तथा वृत्तिस्वरूपत्वे न जहाति परं पदम् ॥१०१॥
यस्यैतन्निर्गुणं लब्धं गुरोस्तीर्थनिषेवणात् । कृष्णपादोदकत्वेन सगुणं लभ्यते पुनः॥१०२॥

॥ ओवी ॥

तुलसीशोभा[२] कृष्णचरणीं । तेथील उत्कृष्ट घेऊनि पाणी । वाहवोनि लोक तीन्ही । करी पावन सर्वदा ।३(य३.२८१)

॥ श्लोक ॥

निर्गुणेन[३] स्वरूपेण गंगेयं जगदन्तरम् । पुनाति सगुणेनैव बहिर्भूतमयं वपुः ॥४॥

**अथवा स्नानमात्रेण देहं प्राणान् पुनातिहि । पानयोगेन वै साक्षादंतरं प्रपुनाति च ॥५॥**

*(१) श्लोकार्थ - निर्गुण व सगुण असे गंगेचे दोन प्रकारचे स्वरूप आहे. निर्गुण रूपाने ती सर्व जगाला व्यापून आहे व सगुण जलस्वरूपाने ती सर्व जगाला पावन करिते ॥९९॥ तिच्या निर्गुण स्वरूपाचे तरंग म्हणजे अनंत प्रकारच्या चित्तवृत्ति होत आणि तिच्या सगुण स्वरूपाचे ठिकाणी तरंग म्हणजे पाणी व वायु यांच्या साह्याने उठणाऱ्या उर्मी होत ॥१००॥ जलतरंग उठले तरी तिचा पाणीपणा जसा नष्ट होत नाही त्याचप्रमाणे वृत्तिरूप तरंग उठले तरी तिचे सृदिानंद रूप नाहिसे होत नाही ॥१०१॥ श्रीगुरुच्या चरणतीर्थाचा लाभ झाला असता तिच्या निर्गुण स्वरूपाचा लाभ होतो व श्रीकृष्णाच्या चरणाचे तीर्थ सेवन केल्यास तिच्या सगुण स्वरूपाची प्राप्ति होते ॥१०२॥ प्रेमळ भक्त श्रीकृष्णाचे चरणावर जी कोमल तुळशीची दळे वाहतात. त्या दळाच्या स्पर्शाने युक्त असे जे श्रीकृष्णाचे चरणापासून पाणी निघाले, ते तिन्ही लोकात वाहते व तिन्ही लोकांला पावन करिते ॥१०३॥ श्लोकार्थ - ही गंगा निर्गुण स्वरूपाने सूक्ष्म शरीराला शुद्ध करिते व जलरूपी सगुण स्वरूपाने आपले हे बाह्य भौतिक शरीर पावन करिते ॥१०४॥ किंवा गंगेच्या जलात नुसते स्नान केले तरी देहादिक प्राणादिक पावन होतात व तिच्या जलाचे प्राशन केले असता ते जल साक्षात् अंतरंग पावन करिते ॥५॥*

**॥ ओवी ॥**

**ऐसी सोडोनि सदय[१] जननी । कोण अभागी वसल भुवनीं[२] । 'मरिष्यमाण' या वचनेंकरूनि । हें निर्वाणी सूचित ॥६॥**

**॥ शार्दुलविक्रीडित ॥**

**संसारीं सुतकामिनीधनमदें[३] जाते घडी जेवढी । कालातें बहु तुष्टता[४] निजमनीं होते गड्या तेवढी ॥**
**यालागीं फिरुनी समस्त अवनी[५] सत्संगता लाहिजे । गोविंदेति मुदा जपोनि हृदयीं गंगातटीं राहिजे ॥७॥**

**॥ दोहा ॥**

**विश्वद्रोहकृत[६] पातकी जन्हुकुमरि[७] आधार ॥ पावुनि झाले सुकृतमय[८] करिति आन उद्धार[९] ॥८॥**

**॥ गीति ॥**

**खळखळशब्देंकरूनी[१०] दे जे लोकत्रयींहि[११] अभय जना । तेथें राहुनि नरपति भावें करि अंगकांतिनभ[१२] यजना ॥९॥**

**॥ ओव्या ॥**

**शिष्य म्हणे श्रीगुरुनाथा । संशय वाटतो एक चित्ता । स्तंभमंदिरीं[१३] वास परीक्षिता । केला ही कथा भारतीं ॥११०॥**

*(१) दयाळू (२) घरी (३) स्त्रीपुत्र द्रव्य इत्यादिकांच्या धुंदीत (४) संतोष (५) पृथ्वी (६) संपूर्ण जगातील प्राण्यांचा मत्सर करणारा असाहि पापी त्याला (७) गंगा (८) पुण्यशील (९) दुसऱ्यासहि तारतात (१०) गंगेच्या पाण्याच्या खळखळाटावर उत्प्रेक्षा केली (११) तिन्ही लोकातील जनात (१२) ज्याच्या अंगकांतिसारखे आकाश आहे. चंद्रानना या उपमेत चंद्र मुख्य असून मुख हे गौण आहे त्याप्रमाणे आकाशाची निळीमा प्रतिबिंबरूप किंवा गौण असून श्रीहरीच्या अंगाची कांति मुख्य आहे हे येथे दाखविले आहे (१३) खांबावर मंदिर बांधून त्या ठिकाणी परीक्षिती राहिला.*

**येथ तंव तें दिसे भिन्न । यांतील कोणती प्रमाण । सद्गुरु म्हणती सावधान । करी श्रवण कुमारा ॥११॥**
**कल्पभेदेंकरोनी[१] । इतिहास बोलिले पुराणीं । ऐसें जाणोनि सज्ञनांनीं । मोहजाल त्यजावें ॥१२॥**
**म्हणाल कल्पांतरींच्या कथा । या कल्पांत सांगणें वृथा । तरी तयाचें ऐक तत्वतां । प्रयोजन ॥१३॥**
**कथेचें जें निरूपण । तें नोहे उगेचि मनरंजन । जेणें बोधेल जीवाचें मन । तोचि प्रयत्न मुनींचा ॥१४॥**
**नानाकल्पीचें संशय । वासनेमाजीं असती स्वयें । या कल्पींचा उठेल संशय । त्या[२] तत्कल्पींचा संशय हरी ॥१५॥**
**मरण येतां प्रयत्न कार्य[३] । हा भारतकथाअभिप्राय । नियतायुर्वाद होय[४] । खंडिला येथ ॥१६॥ (य३-२८२)**
**घडिघडि मरण समीप जाणुनी । यत्नें सेवावा चक्रपाणी ।**
**हाचि अभिप्राय करुणालय[५] मुनी । वदले या स्थानीं शिष्यराया ॥१७॥**
**वेद पुराण इतिहास । वाटोनि दिले लोकत्रयास[६] । कोण्या कल्पीं कोण्या लोकास । इतिहास जाय भलताही ॥१८॥**
**अथवा यावदनादि[७]माया । तावत्दृष्टिसृष्टौ[८]शिष्यराया । एकाहंकारें[९] नानाकाया[१०] । चेष्टती[११] ते जाणती मुनी ॥१९॥**
**या अनंत विश्वामाजीं जाण । सदृश[१२] विसदृश लीला गहन । हे प्रातिभासिकसत्कार्यखूण[१३] । घेवो मन पैं तुझें ॥१२०॥**
**बृहदारण्यकीं आणि वासिष्ठीं । समानासमान[१२]बोलिली सृष्टी । एकाचे आकार नानाकोटी[१४]। सम[१२]विषम दाविले ॥२१॥**
**तैसे परीक्षिदाकार[१५] । दोन पाहोन साचार । इतिहासीं दोन प्रकार । सत्यवतीकुमार[१६] बोलिले ॥२२॥**

*(१) निरनिराळ्या कल्पानुसार (२) त्या कथा (३) मरण निवारणाचा प्रयत्न केला पाहिजे (४) आयुष्य ठरलेले आहे हा वाद (५) करुणासागर (६) तीन लोकांमध्ये (७) जोपर्यंत अनादि माया आहे तोपर्यंत (८) दृष्टिसृष्टिवादानुसार (९) एकाच अहंकाराचे योगाने (१०) अनेक शरीरे (११) व्यापार करितात (१२) एकसारखी किंवा निरनिराळी (१३) भासमात्रच अस्तित्व ज्या कार्याला आहे अशा कार्याचे लक्षण (१४) नाना प्रकारचे (१५) परीक्षिती राजाचे दोन आकार (१६) व्यास.*

**आणि कायव्यूह[१] होतां । चित्तासी येत द्विविधता[२] । एक मुख्य[३] चित्ता गौण चित्ता । अभिप्रायमात्रें चेष्टवी ॥२३॥**

**हें कैवल्यपादीं समग्र । योगसूत्रकृत् आणि तद्भाष्यकार । बोलिले तें प्रमाणतर । जाणोनि अंतर नीववी ॥२४॥**

**तद्यथा :- योगसूत्र :- 'प्रवृत्तिभेदे[४] प्रयोजकं चित्तमेकम् अनेकेषाम् ॥'**

**भाष्य [५] :- बहूनां चित्तानां कथमेकचित्ताभिप्रायपुरःसरा प्रवृत्तिरिति सर्वचित्तानां प्रयोजकं चित्तमेकं निर्मिमीते ततः प्रवृत्तिभेदः'॥**

**॥ ओव्या ॥**

**परीक्षिताच्या वासना दोन । जैं मुनि छळिला[६] सर्प घालून । तेव्हांचि ती वासना गौण । तीव्र होवून साकार जाहली ॥२५॥**

*(१) कर्मभोग भोगून टाकण्यासाठी, नाना कर्मामुळे निरनिराळ्या वेळी प्राप्त होणारी निरनिराळी शरीरे एकाच वेळी ग्रहण करणे. उदा. एकादे कर्म (कार्तिक स्वामीच्या दर्शनासारखे) सात जन्म देणारे असले तर योगी ही सात जन्मातली सात शरीरे एकदम घेऊन एकाच जन्मात सात जन्म भोगून घेऊ शकतो. याला कायव्यूह म्हणतात (२) दोन प्रकारचा भाव (३) वर्तमान कालच्या मुख्य देहातील चित्त मुख्य राहून पुढे मिळणाऱ्या सात जन्मातील देह जे योग्यानी निर्माण केले, त्या देहातील चित्ते गौण म्हणजे मुख्य चित्ताच्या स्वाधीन राहतात व त्याच्या अभिप्रायानुसार व्यापार करितात (४) योगी पुरुष आपले अनेक प्रकारचे प्रारब्ध भोगून टाकण्याकरिता आपल्या संकल्पाने कायव्यूह करितो तेव्हा त्यांनी निर्माण केलेल्या शरीरातील मनाची कर्मानुसार भिन्न भिन्न प्रवृत्ति असते पण मुख्य शरीरातील जे मन असते तेच बाकीच्या शरीरातील मनांना प्रवृत्त करणारे असते (५) भाष्यार्थ :- पुष्कळशा चित्तांची एका चित्ताचे अनुरोधाने कशी प्रवृत्ति असू शकते या प्रश्नाचे उत्तर असे की, एकच चित्त त्या अनेक चित्ताचे प्रयोजक असते म्हणून प्रवृत्ति भिन्न राहू शकते (६) छळ केला. परीक्षिती राजाच्या अंतःकरणात दोन वासना होत्या. एक अनुतापाची व दुसरी भीतिची. मुनीचा छळ केला तेव्हा त्या वासना तीव्र झाल्या. वासना तीव्र झाली की आकार घेते. म्हणून या वासनानुसार परीक्षितीचे दोन आकार झाले. एक भीतियुक्त आकार व दुसरा अनुतापयुक्त आकार. भीतियुक्त आकाराला धरून भारतातील कथा आहे व अनुतापयुक्त आकाराला धरून भागवतातील कथा आहे.*

**अर्ध[१] शुद्धचित्त असतां । वासना उठे ते पावे तीव्रता । ही निरूपिली वार्ता । शुक्रोपाख्यानीं वासिष्ठीं ॥२६॥**

**पुढें ययाची[२] अनुतापवासना[३] । तेही तीव्र होवोनि जाणा । परीक्षिदाकारें नंदना । परिणाम पावली ॥२७॥**

**त्यांतील अनुतप्ता[३] मुख्य जाण । छलक वासना सभय गौण । वासनारूप आकार दोन । मुनी पाहोन बोलिले ॥२८॥**

**गौणाकारासी शाप कळतां । तो भयें स्तंभीं गृह झाला बांधता । यास्तव महाभारतीं तत्वतां । बोलिली कथा तैसीच ॥२९॥**

**मुख्याकारा शाप कळतां । तेणें राज्य हें मानोनि वृथा । गंगातीरीं राहिला तत्वतां । ते व्यासोक्त कथा भागवतीं ॥१३०॥**

**(य३-२८३) ऐसें ऐकोन श्रीगुरुवचन । सच्छिष्य प्रेमें धरी चरण । म्हणे वाणीजीवनेंकरून[४] । मम संशयदहन[५] विझाला ॥३१॥**

**पुढें सूत बोलिला काय । हा वचनप्रसाद[६] करी गुरुमाय । श्रीगुरु म्हणती सावध होय । सूताभिप्राय सांगतों ॥३२॥**

**जया ध्यात एकांतीं फणिभूषण[७]। जो कमलोद्भवाचें[८]देवतार्चन[९]। तेथ ठेवोनी अंतःकरण । रायें राज्यधन सोडिलें ॥३३॥**

**जी सनकादिकांची ध्येय[१०] मूर्ती । जे नारदाची गेय[११] कीर्ती । तेथ अर्पोनि सकलवृत्ती[१२] । रायें आसक्ती सोडिली ॥३४॥**

**भक्तां वैरिया सारिखी गती । देत ऐसी यत्साम्यस्थिती[१३] । तो चिंतामणी धरोनि चित्तीं । वैभवासक्ति[१४] सोडि राय ॥३५॥**

**जो देह जाहला अपराधी । तेथ पुन्हा न व्हावी अहंबुद्धि । यालागीं राव वैराग्यनिधी । प्रायोपवेषणा[१५] बैसला ॥३६॥**

**रायें निश्चय केला मनीं । कीं सकल अपराधांची खाणी । धुंडिताही त्रिभुवनीं । आसक्तीवांचुनी मिळेना ॥३७॥**

**ऐसें स्मृतीचेंही वचन । संग[१६] सकलदुःखकारण[१७] । तेंचि घेवोनि प्रमाण । सावधान असावें ॥३८॥**

*(१) अर्धवट, पूर्ण नाही असे (२) राजाची (३) पश्चाताप वासना. (४) वाणीरूपी जलवर्षावाने (५) संशयरूपी अग्नि (६) निरूपणाची कृपा (७) शंकर (८) ब्रह्मदेवाचे (९) देवतापूजन (१०) ध्यान करण्याची (११) गायन करण्याची (१२) मनादि इंद्रिये (१३) ज्याचे समतेने वागणे आहे (१४) ऐश्वर्याचा लोभ (१५) अन्न व पाणी वर्ज्य करणे (१६) आसक्ति (१७) सर्व दुःखाचे कारण.*

॥ श्लोक ॥

स्मृति :- 'निःसंगता मुक्तिपदं यतीनां संगादशेषाः प्रभवन्ति दोषाः[१] ।
आरूढयोगोऽपि निपात्यतेऽधः संगेन योगी किमुताल्पसिद्धिः'॥

॥ ओव्या ॥

किती सांगावें पुढतपुढतीं । जरी जीवास पाहिजे मुक्ति । तरी शपथ वाहोनि विषयासक्ति । दूर निश्चिती करावी ॥३९॥
जैसा उत्तम घट केला । तो एकेस्थानीं जरी फुटला । तरी जलसंचय[१] आघवा गेला । एक्याच द्वारें सांडुनी ॥१४०॥
तैसें सकल इंद्रिय जरी जिंकिले । किंचित् मन विषयीं गुंतलें । तरी ज्ञानतप हारपलें । बद्ध जाहले थोर थोर ॥४१॥
थोरथोरांची ऐसी गती । पूर्णयोगी जे निश्चिती । तेही सांपडले मायावृत्ती[२] । विषयासक्तिसंयोगें ॥४२॥
येचविषयीं स्मृतिवचन । श्रोते परिसावें सावधान । श्रेष्ठ अलिप्तही[३] असून । परी सावधानार्थ[४] तन्निंद्यकथा[५] ॥४३॥
येथ मूर्ख जे कां होती । ते श्रेष्ठांचें दुराचरण घेती । आणि तयांची महती[६] शक्ती । ते न आणिती मनामाजीं ॥४४॥
(य३-२८४) श्रीशिवाचें विष भक्षणें । श्रीकृष्णाचें अग्नि गिळणें । हें न ओळखोनि मनें । श्रेष्ठदुराचरणें[७] मूर्ख फसती ॥४५॥
केव्हां केव्हां अलोकाचरण[८] । जें घडलें श्रेष्ठाकडून । तयाचा अभिप्राय हा पूर्ण । कीं न फसावे जन इतर विषयीं ॥४६॥

*(१) श्लोकार्थ - विषयाची आसक्ति सोडणे हे योग्यांच्या मुक्तीचे साधन आहे. आसक्तीने सर्व मुक्तीला प्रतिबंध करणारे दोष उद्‌भवतात ज्याचा योग पूर्ण झाला आहे असा आरूढ योगी देखील विषयासक्ति धरील तर पतन पावतो मग ज्याची योगमार्गात अल्प प्रगति झाली आहे अशा साधकाची काय कथा (१) पाण्याची केलेली साठवण (२) मायेच्या तडाक्यात (३) दोषरहित (४) दुसऱ्यांनी सावधान राहावे म्हणून (५) त्यांच्या निंद्य आचरणाचा निर्देश (६) थोर प्रभाव. (७) मोठ्या पुरुषांचे दुराचरण पाहून (८) लोकव्यवहाराच्या विरूद्ध किंवा निषिद्धाचरण.*

तथाचोक्तम् :-

श्लोक - 'विश्वामित्रपराशरप्रभृतयो[१] वातांबुपर्णाशनाः ।
तेऽपि स्त्रीमुखपंकजं सुललितं दृष्ट्वैव मोहंगताः ॥
शाल्यन्नं सघृतपयोदधियुतं भुंजन्ति ये मानवाः ।
तेषामिन्द्रियनिग्रहो यदि भवेद् विंध्यस्तरेत्सागरम्' ॥१॥

॥ ओवी ॥

या स्मृतीचा हाचि अर्थ । कीं विषयीं असोनि न बकावा[२] वेदान्त । याचि अभिप्रायें एकनाथ । बोलिलें आहाती ॥४७॥

॥ एकनाथांचे पद - हिंदी ॥

'अच्छा[३] भांड[४] बनो रे । माया[५] छांड चलो जी ॥धृ०॥
ब्रह्मदेव बेद पढा माया लागी मीठी[६] । सरस्वतीके पीछे लागा वाकी गांड फाटी । अच्छा० ॥१॥
श्रीविष्णूके गांडपिछे है मायाका धंदा । खेल खेला फिसल पडा मीठी लागी वृंदा । अच्छा भांड ० ॥२॥
महादेव बडा देव सब देवनका बाबा । भिल्लिणीके पिछे लागा करता तोबा[८] तोबा । अच्छा भांड० ॥३॥
अहिल्याके देखनकूं इंद्र भूल मदें । गौतमनें गांड मारी आंगपर हुवे फोदे[९] । अच्छा भांड० ॥४॥
सीताकी चोरी करी रावनकूं धक्का । हनूमाननें नंगी करके जला दियी लंका । अच्छा भांड० ॥५॥
हनूमान तो ब्रह्मचारी जपे रामनाम । स्त्रीराज्यमो बायका गाभन करताहै बेफाम[१०] ॥ अच्छा भांड० ॥६॥

*(१) श्लोकार्थ - विश्वामित्र पराशरादिकासारखे वायु, पाणी किंवा झाडाची पाने खाऊन राहणारे थोर तपस्वी देखील स्त्रियांचे मुखकमल पाहता क्षणी जर विवेकभ्रष्ट होऊन मोहित झालेत. तर जे पुरुष रोज दही, दूध, तूप, सुवासिक तांदुळ असे मिष्टान्न भोजन करितात, त्यांचा इंद्रियजय होणे म्हणजे विंध्य पर्वताने सागर तरून जाण्यासारखे अशक्य आहे (२) बडबडावा (३) फार उत्तम (४) बहुरुप्या, तमाशा करणारा, बडबडणारा (५) अरे आधी माया सोड (६) गोड (८) देवा देवा (९) क्षत, व्रण, भग (१०) अनावर.*

विश्वामित्र तप करे भये अनुष्ठानी । मेनकासे वश भये हुवी धुलधानी[१] ॥ अच्छा भांड० ॥७॥
नारदनें किसनसे एक औरत मांगी । नारदकी नारदी भई पोंगडे[२] जनन[३] लागी । अच्छा भांड० ॥८॥
सोला सहस्त्र नारी कान्हा गोकुलमें खेले । राधिकाकूं छोडके रीसनीकूं[४] भूले । अच्छा भांड०॥९॥

जनार्दन साई[५] मेरा सब खेल खेला । एकनाथ भांड होके उनके चरण मिला ॥ अच्छा भांड०॥१०॥(य३-२८५)

॥ ओव्या ॥

एवं विषयाचिया पथा[६] । वरिष्ठांची ही अवस्था । तेथ मूढांची काय कथा । यालागीं सर्वथा विरक्त व्हावें ॥४८॥
पाहोनि मोठ्यांचें निषिद्धाचरण । तैसेंचि करूं जाती आपण । ते दीपसंयोगीपतंगासमान[७]। पावती पतन[८] निश्चयें ॥४९॥
एऱ्हवीं महात्म्यांचियाठायीं । विश्वभाव[९]जन्मला नाहीं । परी बद्धासी सावध करावया पाही । ऐसें वर्णन तयांचें ॥१५०॥

*प्रपंची परमार्थ ?*

कित्येकांचें ऐसें मत । कीं प्रपंचीं करावा परमार्थ । तरी तयांच्या वचना दृष्टान्त । मद्यपानार्थ[१०] स्वर्ग वाटे ॥५१॥
कोकशास्त्रा[११] जाणोनि पोटीं । वेदान्तफळाच्या सांगे गोष्टी । कीं एरंड पेरोनि वृक्षवाटी[१२]। वाटींत[१३] मागे इक्षुरस[१४]॥५२॥
प्रपंचीं परमार्थकरण । त्याचा तव अभिप्राय भिन्न । सुख दुःख व्हावें समान । तेव्हां प्रपंचीं परमार्थ ॥५३॥
विष्ठा आणि मालतीगंध । पुरणपोळी आणि निंब प्रसिद्ध । येथ समता येईल शुद्ध । तेव्हां प्रपंचीं परमार्थ ॥५४॥
शेण आणि चामीकर[१५] । भिकारी आणि लक्ष्मीवर[१६] । जरी वाटतील बरोबर । तरी प्रपंचीं परमार्थ ॥५॥
'जैसी लेखणी करावी । तैसी अंगोळी चिरावी । ऐसी समता होआवी । तरी प्रपंचीं परमार्थ' ॥५६॥ समर्थ रामदास
वाम पाद मंचकावरीं । दक्षिण पाद खदिरांगारीं[१७] । इतुक्यांतही आनंद वाटेल उदरीं । तेव्हां प्रपंचीं परमार्थ ॥५७॥
हें न साधोनिया स्थिति । न सोडवे स्त्रीपुत्रासक्ती । सांगे परमार्थाच्या उक्ती । तो चांडाळ निश्चिति स्मृति म्हणे ॥५८॥

*(१) सत्यानाश (२) मुले (३) प्रसवू लागली (४) जांबुवतीशी (५) स्वामी (६) मार्गाने (७) दिव्याच्या ज्योतीवर झडप घालणाऱ्या पतंगाप्रमाणे (८) नाश (९) जगत आहे ही बुद्धि नसते (१०) मद्यपानाने स्वर्ग मिळविण्यासारखे (११) कामशास्त्र (१२) बगीच्यात, परसात (१३) नावाच्या पात्रात (१४) ऊसाचा रस (१५) सुवर्ण (१६) श्रीमंत (१७) अग्नीत.*

'गृहकर्मसमासक्तं[१] ब्रह्मज्ञोऽस्मीति वादिनम् । कर्मब्रह्मोभयोर्भ्रष्टं तं त्यजेदन्त्यजं यथा'॥१॥(स्मृति)

॥ ओव्या ॥

मुखीं सांगे अति वेदान्त । जिभेनें स्त्रियांची लाळ चाटत । तया ऐसा दुर्भाग्यवंत । नाहीं नाहीं त्रिभुवनीं ॥५९॥
श्रीरामनाम नाहीं वदनीं । ब्रह्म बोंबले तांबूल भक्षुनी । तयाची जिव्हां[२]महासर्पिणी । घात करी बहुतांचा ॥१६०॥ (य३.२८६)

॥ अभंग ॥

'विषयीं अद्वये[३] । त्यासी आम्हीं सिवों[४] नये ॥१॥ देव तेथूनी निराळा[५] । असे निष्काम वेगळा ॥२॥
वासनेची बुंथी[६] । तेथें कैची ब्रह्मस्थिति ॥३॥ तुका म्हणे असतां देही । तेथें नाहीं जमा[७]ती' ॥४॥

- इति तुकारामवचनप्रामाण्यात् ॥

॥ ओव्या ॥

कोणी ऐसेंही करिती । न पावोनि ब्रह्मस्थिति । लोकभयें[९]साधन[१०]उघड न करिती । तेंही अयोग्य,नाथोक्ति ऐसी ॥६१॥
श्रीरामनाम आवडे मानसीं । स्मरण न करीच अति आळसी । वांझ गाय कपिला जैसी । जाणा तैसी ते भक्ती ॥६२॥

*(१) श्लोकार्थ :- विषयांचे ठिकाणी आसक्त असून तोंडाने मी ब्रह्म आहे असे म्हणतो आणि कर्माचा त्याग करितो असा कर्म आणि ब्रह्मभाव या दोघांपासूनहि भ्रष्ट झालेला जो पुरुष त्याचा चांडालाप्रमाणे त्याग करावा (२) त्याचा उपदेश लोकांना नरकास नेण्यालाच उपयोगी पडतो (३) विषयभोगात अद्वैत पहाणारा म्हणजे सर्व ब्रह्म आहे असे समजून स्वैर वर्तन करणारा (४) स्पर्श करीत नाही (५) दूर (६) समुदाय (७) ठेवा (८) ह्या श्रीतुकाराम महाराजांच्या म्हणण्यावरून सिद्ध आहे (९) लोकांच्या भीतिने (१०) ईश्वरप्राप्तीचे साधन.*

श्रीनामनाम आवडे पोटीं । बाहेर नामेवीण टवाळ[१] गोष्टी । तेही आवडी समूळ खोटी । ओस[२] देठीं फूल जैसें' ॥६३॥
किंवा नाम वदनीं गाय । आवडी संतासी निंदिता होय । तयाचा वैरी यादवराय । निर्दाळील अवश्य ॥६४॥
दैत्यांनीं द्वेषिला हरी । तेही पावले मोक्षपुरी । परी संतद्वेषी बुडाले अघोरी[३] । कल्पांतवरी दुरात्मे ॥६५॥

॥ अभंग ॥

'झविली माहारें । त्याचीं व्यालीं असे पोरें ॥१॥
करिति संताचा मत्सर । कोपें उभारोनी कर' ॥२॥
ऐसी तुकारामवाणी । ज्ञानेश्वरकन्या मानी ॥६६॥

|| ओव्या ||

कीं नाम सांगोनि दुर्जनासी । हस्ते परहस्ते पीडी लोकांसी । तेंही नावडे भगवन्मानसीं[४] । निश्चयेसी ओळखा ||६७||
कीं उमावर आणि रमावर । यांत भेद पाहे जो नर । तोही पापी अति दुर्धर । ऐसें श्रीधर बोलिले ||६८||
'शिव थोर विष्णू लहान । हरी विशेष हर गौण । ऐसें म्हणती तयालागून । आणोनि नरकीं घालावें' ।
तैसेंचि नामबळें न मानी वेदा । नामबळें उल्लंघी शास्त्रमर्यादा । नामबळें सद्गुरुपदा । नमन न करी ||६९||
नामें पातकें समस्त जाती । या वचनासी म्हणणें स्तुती । नाम जपोनि निषिद्ध[५] प्रवृत्ति । विहित कृती सोडित ||१७०||
भूत प्रेत आणि यदुनाथ । समान मानी बकोनि वेदान्त । ऐसे नानाअपराधयुक्त । ते पट्टाभिषिक्त[६] कुंभिपाकीं ||७१||
म्हणोनि परमार्थ पाहिजे जरी । विषया लाथ मारोनि तरी । अनन्यभावें स्मरावा हरी । भवभय[७] दुरी तैं ठाके ||७२||
(य३-२८७)

*(१) रिकामटेकड्या (२) देठांवाचून जसे फूल (३) नरकात (४) श्रीहरीच्या मनास (५) धर्मशास्त्रांच्या आज्ञेविरुद्ध वागणे (६) कुंभिपाक नावाच्या नरकाच्या तक्तावर त्यांना अभिषेक केलेला असे (७) संसाराचे भय, दुःख.*

''जयासी वाटे परमार्थ करावे । तेणें उठोनि चालते होआवे ।'' हें समर्थ बोलिले बरवें । अन्यथा[१] नोहे सर्वथा ||७३||
अथवा गृहस्थही असून । परोपकारीं झिजावें तनमनधन । सकळ करोनि कृष्णार्पण । अलिप्तपण अंतरीं ||७४||
सकळ त्यागोनि वनीं जावें । तेणें एकांतीं हरीतें भजावें । अथवा गृहींच राहोनि परोपकार करावे । चित्तीं असावें अलिप्त ||७५||
गृहस्थ अथवा संन्यासी । अंतस्त्याग[२] सारिखा दोघांसी । परी राव विचारी मानसी । कीं अपराध गृहीं मज घडला ||७६||
यालागीं सोडोनि सर्वसंग । भक्तभवभंग[३] पांडुरंग । अनन्यचित्तीं धरोनि अव्यंग । सेवीत जल गांग[४] राहिला ||७७||
तेचि वेळीं तया स्थानीं । शिष्यासह पातले मुनी । ते कृतकृत्यही[५] असूनी । लोकानुग्रहार्थ[६] धुंडती ||७८||
त्यांच्या हृदयीं जगन्मोहन । त्यांचे पाय गंगामूळस्थान[७] । म्हणोनि जेथ जेथ जाती सज्जन । तें तें स्थान वाराणसी[८] ||७९||
किंवा विष्णुचरणाचें तीर्थ । मानोनि गंगा शिव शिरीं धरित । आपण शिवरूप व्हावया संत । गंगा तीर्थ सेविती ||१८०||
कीं संत धरिती भगव्द्वारण । तेथोनीच जान्हवीजनन[९] । यास्तव हें भावंड[१०] मिळून । तारीत जन उल्हासें ||८१||
तैं शिष्य म्हणे भगवंता । शंका उपजली कृपावंता । तीतें आपणावांचूनि ताता । अपनोदिता[११] अन्य नाहीं ||१८२||

|| गद्य ||

श्रीगुरुरुवाच :- मी तुझ्या मनांतील इंगित[१२] समजलों. सर्व आपआपल्या कर्मानुसार फळें भोगीत असल्यामुळें साधूंच्या दयेचें तेथें कांहीं चालत नाहीं हेंच ना? तर आतां उत्तर ऐक.

*(१) खोटे (२) अंतःकरणात कशाचीहि इच्छा किंवा आसक्ति नसणे (३) भक्ताच्या संसारदुःखाचा नाश करणारा (४) गंगेचे (५) पूर्ण ब्रह्मस्वरूप (६) लोकांना उद्धरण्याकरिता (७) गंगेला उगमस्थान असलेले (८) काशी (९) गंगेची उत्पत्ति (१०) संत आणि गंगा (११) निवारण करणारा (१२) तात्पर्य.*

बाळा ! भोग म्हणजे सुखदुःख. त्यांतील पुण्याचा भोग सुख व पापाचा भोग दुःख आहे. पुण्याच्या भोगामध्यें बुद्धींत[१] स्वातंत्र्य असलेंच पाहिजे. नाहीं तर उरावर बसून रंभालिंगन[२] करविणें म्हणजे लोखंडाची स्त्री तापवून भेटविण्यासारखीच आहे. अशा सुखाचें नांव जर पुण्यभोग असेल तर ब्राह्मणाचें जेवण झालें असतांही त्याच्या पोटांत लांकडानें ठोसून ठोसून लाडू नरड्यांतून घालून त्याचा प्राण घेतला असतांही पुण्याची (य३-२८८) उत्पत्ति व्हावी. म्हणून ज्याप्रमाणें सेवकानें ताट वाढून आणलें असतांही तें ताट श्रीमंतांनां भूक लागेपर्यंत थांबवून ठेवतां येतें, त्याप्रमाणें पुण्यभोग भोगणारांनांही इच्छा नसल्यास भोगांनां थांबवून ठेवितां येतें.

शिष्य :- तर मग कितीही वर्ष कर्म राखून ठेविलें तरी भोगलेंच पाहिजे याचा काय अर्थ ?

श्रीगुरु :- अरे पण प्रयत्नानें प्रारब्धाला जिंकतां येतें ह्या वचनाचा काय अर्थ?

शिष्य :- महाराज ! मला दोहोंचाही अर्थ समजत नाहीं.

श्रीगुरु :- त्या दोहोंचाही अर्थ ऐक. प्रयत्न न करणाऱ्याविषयीं पहिलें वचन लागू असून दुसरें वचन प्रयत्न करणाऱ्यांनां लागू आहे. याविषयीं तुला एक दृष्टांन्त देतों.

समज कीं विष्णुदत्ताचीं देवदत्त व यज्ञदत्त हीं दोन्ही मुलें फार सुखी आहेत. त्यांतील पहिला मुलगा आपल्याला कोणाचें काय करावयाचें म्हणून पलंगावर झोप घेतो; व दुसरा मुलगा आपल्याला ज्याअर्थी हें निरोगी शरीर प्राप्त झालें

आहे, त्याअर्थी दुसऱ्याचें कार्य करावें म्हणून सदोदित उद्योग[३] करितो.

या कल्पित ऐतिह्याप्रमाणें महात्मे आपल्या पुण्यजन्य स्वातंत्र्यास्तव दयेनें सदैव परोपकार करीत असतात. आतां, यद्यपि दुःखी जन हे पापकर्मफलास्तव परतंत्र असतात म्हणून त्यांनां साधुदयाकृत[४] फल मिळूं शकत नाहीं,

*(१) बुद्धि भोगपरवश होत नाही (२) रंभेशी आलिंगन (३) परोपकारार्थ झटतो (४) साधूच्या दयेचे.*

तथापि ह्यांत कांहीं रहस्य आहे, तें हें कीं कोणतेंही कर्म सर्वथा पुण्यरूप किंवा सर्वथा पापरूप नसतें; त्यामुळें पापी पुरुषाच्या हातून किंचित घडलेलें सत्कर्म महात्म्यांच्या अनुग्रहानें तीव्र होऊन अनुकंप्यांतःकरणसत्त्वप्रतिबंधापहनन[१] करून त्यास प्रयत्नयोग्य[२] करितें.

शिष्य :- भगवन् ! नेणो कोणत्या दोषामुळें आपण सांगितलेलें रहस्य माझी बुद्धि नीट ग्रहण करूं शकत नाही.

श्रीगुरु :- मला वाटलेंच होतें कीं तुझी छिद्रान्वेशी[३] बुद्धि अशा सुलभ सांगण्याला मानणार नाहीं म्हणून. तर आतां हे रहस्य वादपूर्वक (य३-२८९) विस्ताराने श्रवण कर. -

पूर्वकृत वासना[४] व कर्म यांच्या योगानेंच देव, मनुष्य, तिर्यक् इत्यादि जातींमध्यें जन्म, त्या जन्मांतील आयुष्य व त्यांतीलच सुखदुःखें मिळत असतात. नुसत्या वासनेनें किंवा नुसत्या कर्मानें जन्म, आयुष्य व भोग हा तिन्ही प्रकारचा विपाक[४क] होऊं शकत नाहीं. यद्यपि मानसकर्मानेंच[५] लवणादिकाला[६] फल मिळालें अशी कथा बृहद्वासिष्ठांत आहे, व स्वप्रादिकांत मानसकर्मानेंच फल होतें असें महाभारतांत सांगितलें आहे, व मानसकर्म म्हणजेच वासना, तथापि 'केवळ वासनेनेंही लवणाप्रमाणें जागृत[७] फल होऊं शकेल' ही शंका बरोबर होणार नाहीं. कारण वासनेंत व मानसकर्मांत किंचित् भेद आहे. यद्यपि तीव्र वासनाच कर्मरूप होते असा भागवतवचनावरून अभिप्राय निघतों, तथापि वासना व मानसकर्मांत किंचित् भेद दृष्ट आहेच. वासना ह्या संस्कारजन्यस्मृतिमूलक[८] असून मला अमुक वस्तु पाहिजे इतक्याच स्वरूपानें असतात; व त्यांना जेव्हां अहंकाराचें साह्य मिळून वृत्त्यनुसार यत्न होतो तेव्हां त्या यत्नाला मानसिक कर्म म्हणतात.

*(१) दयेला पात्र अशा पुरुषाच्या अंतःकरणातील सत्वाच्या वृद्धीला जो पापामुळे प्रतिबंध होतो, तो नाहीसा होऊन (२) परमार्थाकरिता जो प्रयत्न करावा लागणार, तो करता येण्याजोगा (३) छिद्रच पाहत राहणारी (४) पूर्वी केलेल्या वासनेनुसार व कर्मानुसार (५) नुसत्या मनाने केलेल्या कर्माने (६) लवणराजाला (७) जागृती अवस्थेतील (८) संस्कारामुळे उत्पन्न होणारी जी स्मृति त्या स्मृतीला धरून. (४ क) परिणाम, शेवट*

उदाहरणार्थ, परमेश्वर पाहिजे ही वासना व तदनुसार ध्यान करणें हे मानसकर्म. लवणानींही स्वर्ग पाहिजे अशा वासनेनें स्वर्ग न मिळवून मनाचेच ब्राह्मण वगैरे कल्पून मनानेंच यज्ञ केला; व त्या मानसकर्मामुळेंच त्याला फल प्राप्त झालें.

आतां, वासनेचें फल स्वप्नामध्यें होतें खरें, परंतु तेव्हांही थोडें चिंतनरूप कर्म उत्पन्न होत असतें, असा संध्यधिकरणावरील शांकरभाष्याचा आशय[१] आहे; परंतु मानस कर्माचें जागृतींतही फळ होतें असें शतश्लोकींत आचार्यमंत्र व ईशप्रसादाविषयीं श्रीमत् शंकराचार्यांनीच प्रतिपादिलें आहे. स्वाप्निक शुक्रपाताचा[२] अनुभव जागृतीत पुष्कळ कामी लोकांनां आहे. पुष्कळ तीर्थ पाहूं इच्छीणाऱ्यानें ज्या तीर्थाला जातां येत नाहीं अशा तीर्थाला मनानेंच जावें हें महाभारताचें वचन आहे. ह्या मानसिक तीर्थाटनाचे फळ जागृतींतच होत असलें पाहिजे. कारण स्वप्नाकरितां कांहीं कोणी विधि करून ठेवीत नाहीं. म्हणूनच योगवासिष्ठांत मानसिक कर्माचें फळ शारीरिक कर्मापेक्षां पुष्कळ पट अधिक लिहिलें आहे. यद्यपि समाधिपादांत स्वप्नज्ञानालंबनरूप वैकल्पिक[३] विधि पतंजलींनीं सांगितला (य३-२९०) आहे, तथापि तो कर्मरूप असून जागृत[४] किंवा तूर्यफलावसायी[५] आहे; स्वप्नफलावसायी[६] नाहीं. असो. याप्रमाणें वासनेंत व मानसकर्मांत जसा भेद आहे तसा तो वासनेंत व शारीरिक कर्मांतही आहे. ह्याविषयीं -

**''यन्मनसा[७] स्मरति तद्वाचा वदति ।**
**यद्वाचा वदति तत्क्रियया करोति ।**
**यत्क्रियया करोति तदभिसंपद्यते'' ॥**

ही श्रुति प्रमाण असून -

**''वृत्तीऐसें[८] मन धरिती । मनाऐसी क्रिया करिती । केलियाऐसी वरिती । मरोनि देहें'' (ज्ञाने.७.१७.५८)**

*(१) अभिप्राय (२) स्वप्नज्ञान किंवा निद्राज्ञान यातून कोणत्याहि ज्ञानाचे अवलंबन म्हणजे आश्रय केल्यास चित्त स्थिर होते (३) निराळा उपाय (४) जागृत्काळी (५) शुद्ध ब्रह्माचा अनुभव देणारा (६) स्वाप्निक फल देणारा (७) श्रुत्यर्थ :- जे*

*मनात येते तेच मनुष्य बोलून दाखवितो, जे बोलून दाखवितो तेच तो करितो आणि जसे करितो तसे फल प्राप्त होते (८) संकल्पाप्रमाणे.*

हें तातवचनही[१] प्रमाण आहे. तात्पर्य, वासना व कर्म ह्यांच्याच योगानें विपाक[२] होतो म्हणणें समीचीन[३] होते. अन्यथा पूर्वप्रज्ञा[४] व पूर्वकर्म सांगणाऱ्या श्रुतींशीं विरोध येतो. पण ह्या कर्मांच्या विपाकोत्पादनाविषयीं[५] चार विकल्प[६] उत्पन्न होतात. (१) काय एक कर्म एक जन्म देतें कीं अनेक जन्म देतें ? (२) दुसरें, अनेक कर्में अनेक जन्म देतात कीं एक जन्म देतात ? पैकीं पहिला पक्ष संभवत नाहीं. कारण एक कर्म जर एकच जन्म देतें तर पूर्वसंचितकर्म[७] अनंत असल्यामुळें प्रथम याच कर्माचें फळ होईल हा नियम दाखवितां येत नसल्यामुळें व एक वेळ आपण पापकर्मानें दिलेल्या पापजन्ममय[८] प्रवाहांत सांपडलों म्हणजे हातून अधिक अधिक पाप घडून आतां[९] केलेलें शुभकर्मही[१०] नहुषाप्रमाणें[११] नष्ट होणाऱ्या नहुषाच्या स्वर्गरूपप्रारब्धकर्माचा[१२] देखील अभिभव[१३] झाला तर संचिताची काय कथा? याप्रमाणें[१४] अविश्वासामुळें[१४] शुभकर्माचें ठिकाणीं कोणाची प्रवृत्ति होणार नाहीं. असें होणें अनिष्ट[१५] आहे. कारण यावज्जीव शुभकर्मे करावीं असें ईशावास्याच्या दुसऱ्या मंत्रांत सांगितलें आहे. हा दोष येऊं नये म्हणून दुसऱ्याही पक्षाचा अंगीकार आपल्याला करितां येणार नाहीं. कारण एकच कर्म जर अनंत जन्म देणारे होईल तर बाकीची कर्मे तशीच पडून राहतील व बाकीच्याच कर्माची जर काही गती नाही तर एखादे कर्म अनंत फळ जन्म देतें हें कशावरून? याप्रमाणें कर्मवादच निराधार[१६] ठरून सर्वथा अविश्वास उत्पन्न होईल. तोही इष्ट नाहींच.

*(१) श्रीज्ञानेश्वर महाराजांचे वचन (२) फलरूप कर्माचा परिपाक (३) योग्य (४) पूर्व जन्मांतील बुद्धि व पूर्व जन्मातील कर्म (५) परिपाकाविषयी (६) पक्ष (७) पूर्वीच्या अनंत जन्मात केलेले साठून असलेले (८) पापाने मिळणाऱ्या चांडालादि पापी जन्माच्या ओघांत (९) वर्तमान किंवा चालू जन्मात (१०) पुण्यकर्म (११) नहुषाच्या पुण्यकर्माप्रमाणे (१२) ज्या प्रारब्ध कर्माने त्याला स्वर्ग मिळाला त्याचा (१३) दडपले गेले, दबले गेले (१४) असे मानल्यास कर्मावर अविश्वास होऊन (१५) अयोग्य (१६) अप्रमाण.*

म्हणून (३) तिसरा पक्ष घेतलां तरी कोठें निर्वाह होतो? कारण अनेक कर्मे अनेक जन्म देतात ती काय युगपत्[१] कीं क्रमानें[२]? पैकीं युगपत् जन्म देणें तर संभवत नाहीं; कारण ब्राह्मणाचा व (य३-२९१) कुत्र्याचा एकदमच जर एखाद्या मनुष्याला जन्म झाला तर होम करणें व विष्ठा खाणें दोहोंचाही एकाच काळीं प्रसंग येईल; व तसा प्रसंग कोणीं पाहिला किंवा ऐकिला सुद्धां नाहीं, बरें, आतां क्रमानें[२] अनेक कर्मे अनेक जन्म देतात म्हटलें तर पहिल्या पक्षावर आलेले सर्व दोष येतात. म्हणून विचित्र[३] पुण्यपापरूप अनेक कर्में एके ठिकाणीं मिळून एकच जन्म देतात हाच पक्ष शेष राहतो. यालाच **एकभविक-कर्माशय**[४] म्हणतात.

### एकभविक कर्माशय

हा एकभविकवाद असा आहे कीं जोपर्यंत प्रारब्धकर्म[५] प्रतिबंधक असतें तोंपर्यंत संचित कर्मे दिसत नाहींत; व मरणकाळी[६] प्रारब्धरूप प्रतिबंधाचा नाश झाल्यामुळें सर्व संचित कर्मे एकदम पुढे येतात; व पुढील जन्माचा आरंभ करितात. हा कर्माशय[७] एकभविक[८] असून ह्याच्या वासना मात्र अनादि आहेत. हा एकभविकवाद यद्यपि योगभाष्यांत व्यासांनीं स्वीकारला आहे तथापि तो सर्वत्र लागूं पडत नाहीं. कारण -

**श्रुति -**

**''तद्य इह रमणीयचरणा अभ्याशो ह यत्ते रमणीयां योनिमापद्येरन्‌ब्राह्मणयोनिं वा क्षत्रिययोनिं वा वैश्ययोनिं वाऽथ य इह कपूयचरणा अभ्याशो ह यत्ते कपूयां योनिं योनिमापद्येरन् श्वयोनिं वा सूकरयोानिं वा चांडालयोनिं वा ॥''**

**(छांदोग्य ५/१०/७)**

**श्रुत्यभिप्रायः** - पुण्य करणारे फळ भोगून झाल्यानंतर ब्राह्मणादि पुण्ययोनींत व पाप करणारे फळ भोगून झाल्यानंतर श्वानादि पापयोनींत जन्म घेतात. हा जन्मानें वर्ण मानणाऱ्याप्रमाणे अर्थ असून, गुणकर्मानें वर्णव्यवस्था मानणारे या श्रुतीचा असा अर्थ करितात.-

*(१) एकदम एकाच वेळी (२) निरनिराळ्या वेळी (३) नानाप्रकारची (४) एक जन्म देणारा प्रारब्ध कर्मसमुदाय (५) प्रारब्धकर्म संचित कर्माला प्रतिबंध करिते व दिसू देत नाही (६) मरणाचे वेळी प्रारब्ध संपते, तेव्हा संचित कर्म न भासू देणारा प्रतिबंध अर्थातच नसतो म्हणून (७) प्रारब्ध कर्माचा साठा (८) एक जन्म देणारा.*

श्रुतीमध्यें जे श्वानसूकर शब्द आहेत त्याविषयीं तर विवाद नाहीं. परंतु ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र, चांडाल इत्यादि जे वर्णपर शब्द आहेत ते गुणकर्मपरच लाविले पाहिजेत. कारण ब्राह्मण जातींत जन्म घेऊनही जो चांडालाप्रमाणें वागतो अशाच्या पोटीं येऊन पुण्यवंताला रमणीय लाभ काय होणार? तात्पर्य, सद्गुणी पुरुषाच्याच पोटीं पुण्यवान जन्म घेतों; व म्हणूनच त्यांना पूर्वशिक्षण तसेंच मिळतें. असो.

या श्रुतीवरून **'कृतात्ययाधिकरणांत**[१]' स्वर्ग भोगल्यानंतर कर्माचा अनुशय म्हणजे अवशेष घेऊनच जीव या लोकीं जन्म घेतात असें व्यासांनींच सांगितलें आहे. म्हणून ब्रह्मसूत्रांत व योगभाष्यांत स्वतःच व्यास परस्परविरुद्ध बोलिले आहेत असा भास होतो. कारण **'कृतात्ययाधिकरण'** (य३-२९२) एकभविकवादाच्या[२] अगदीं विरुद्ध आहे. एवढ्याकरितां **एकभविक**[३] **कर्माशय**[४]'' चित् ठिकाणीं घेतला म्हणजे दोन्ही वाक्यांचा समन्वय होतो.

शिष्य :- कां ? स्वर्ग भोगून झाल्यानंतर कर्मशेष[५] राहतो या विषयीं जशी तुम्ही श्रुति सांगितली तशी कर्मशेष राहत नाहीं या विषयींही श्रुति आहे

**श्रुति -**

''**तस्मिन् यावत् संपातमुषित्वाथैतमेवाध्वानं पुनर्निवर्तन्ते**'' (छांदोग्य ५/१०/५)

**श्रुत्यभिप्राय :-** यावत् कर्माचा क्षय होईपर्यंत फळिया[६] स्वर्गलोकांत राहून नंतर खालीं येतो. ह्या श्रुतीवरून निरनुशयच[७] पुनरागमन[८] सिद्ध होत असल्यामुळें सर्वत्र एकभविकवादाची हानी[९] होत नाहीं.

*(१) इहलोकांत जी काही इष्ट अशी यज्ञादि कर्मे केली त्याचे स्वर्गादि लोकांत फळ भोगल्यानंतर पुनः इहलोकात कसा येतो याच विचार या अधिकरणात केला आहे (२) नानाप्रकारची अनेक कर्मे मिळून एक जन्म देतात या वादाच्या (३) एक जन्म देणारा (४) परिप्‍ कर्म (५) निःशेष काही कर्म भोगले जात नाही (६) कर्माचे फळ भोगणारा (७) निःशेष कर्म भोगूनच (८) पुनः जन्माला येणे (९) सर्वत्र लागू पडतो.*

श्रीगुरु :- काय रहस्य न जाणून **'विद्यां विवादाय'** या म्हणींचें सार्थक करण्याकरितांच वेदाध्ययन केलें आहेस? अरे! **'यावत्संपातम्'**[१] या श्रुतींतील वचनावरूनच सर्व कर्माचा क्षय काय म्हणून घ्यावा? 'यावत्' या शब्दाचा अर्थ सर्वच घ्यावयाचा असेल तर मग **'यावज्जीवमग्निहोत्रं जुहूयात्'** या सर्व जन्मभर होम सांगणाऱ्या श्रुतिवाक्यांनीं मलविसर्ग करितांनां देखील होम करण्याचें विधान केलें असलें पाहिजे.

शिष्य :- अहो ! तुमचें म्हणणें काय तें तरी सांगा ?

श्रीगुरु :- असा थोडा मार्गावर येऊन विचारशील तर **निर्णय करण्याचा आमचा बाणा आहेच.** आम्ही म्हणतो कीं 'यावत्' शब्द सर्व[२] कर्मांस लावावयाचा नसून जितकें कर्म स्वर्गलोकीं भोगलें जातें तितक्यासच तो लावणें चांगलें. म्हणूनच आम्ही 'रमणीयचरणा' ह्या श्रुतीला मुख्यत्व देतो. पुण्यलोक भोगून योगभ्रष्ट पुनः या लोकांत जन्म घेतो अशी जाग्रच्छ्रुतीही असून स्वर्ग भोगून शेषकर्मानेंच जन्म घेतो अशा स्पष्ट अर्थाची आपस्तंब स्मृतीही आहे. पुनः, कोणत्याही प्राण्याला या लोकीं जन्मापासूनच भोग असतात असें सर्वानुभूत[३] आहे. एकभविक (य३-२९३) वादाप्रमाणें तर या लोकांतील सर्व कर्मांनीं स्वर्गलोकांत भोग भोगून त्या सर्व कर्मांचा क्षय झाला आहे, व स्वर्गलोक केवळ भोगभूमी[४] असल्यामुळें तेथें कर्म उत्पन्न होत नाहीं, असें एकभविकवाद समर्थन करणाऱ्या योगभाष्यकारांनींच ही श्रुति प्रमाण देऊन मानलें आहे; **'इहैव**[५] **ते कर्मकवयो वेदयन्ते'** आणि मनुष्यलोकांतच कर्म निष्पन्न[६] होणारी ही वर्णव्यवस्था[७] आहे असें श्रीमत् शंकराचार्यांनीं गीताभाष्यांत स्पष्ट सांगितलें आहे.

*(१) परलोकामध्ये फल देणारे जेवढे कर्म आहे तेवढे संपेपर्यंत (२) संपूर्ण (३) सर्वांच्या अनुभवाने सिद्ध आहे (४) केवळ भोगच जेथे भोगले जातात (५) श्रुत्यर्थ :- मनुष्यलोकातच कर्म केले जाते असे ज्ञाते ऋषि म्हणतात (६) उत्पन्न (७) ब्राह्मणक्षत्रियादि वर्णाच्या विभागाची व्यवस्था.*

यद्यपि देवताधिकाराधिकरणामध्यें[१] ज्ञानाधिकारी[२] कर्मांचा देवांनां अधिकार सांगितला आहे, आणि ब्रह्मज्ञानार्थ ब्रह्मदेवाजवळ जाऊन इंद्रानें गुरुशुश्रुषा व ब्रह्मचर्यरूप तप केलें अशी छांदोग्यश्रुति आहे, तथापि तेथें देवांनां ब्रह्मविद्याधिकारच[३] सांगण्याची प्रतिज्ञा आहे. कर्माधिकार तर देवांनां नाहीं; कारण देवांनां दुसरे देव[४] नाहींत म्हणून. जसें ऐंद्रयागामध्यें दध्यादिक द्रव्यांचा इंद्रासाठीं त्याग करावा लागतो. त्याग म्हणजे स्वत्वाची निवृत्ति[५]. परंतु इंद्राला दुसरा कोण इंद्र आहे कीं ज्याच्याकरितां तो दध्यादिक द्रव्यांचा त्याग करील?

तात्पर्य, स्वर्गादिभोग देणाऱ्या कर्माचेठायीं देवांनां अधिकार नाहीं. यद्यपि स्वरक्षणार्थ[६] भगवत्स्तुत्यादिकर्माधिकार[७] पुराणांत इंद्रादिकांनां सांगितला आहे, तथापि तो दैत्यसामर्थ्याभिभूत मनुष्यवत्[८] दुर्बलमानस[९] झाल्यामुळें आहे. पुनः मनुष्यजन्माला येण्याचे कर्म तर देव योनीत संभवतच नाही. कारण मनुष्यजन्म देवापेक्षां नीच असल्यामुळें मनुष्यजन्माला येण्याला देवांनां पापकर्म करावें लागेल; व तसें कर्म सांगणारें एखादें शास्त्र जीवंत नाहीं. यद्यपि मनुष्यजन्म होण्याची देव इच्छा करितात अशीं कोठें कोठें वचनें आहेत तथापि तीं वासनापर[१०] समजावींत; कर्मपर[११] समजूं नयेत. देवलोकांतील भोगांचा क्षय होतांनां पुनः कर्मे करून हा भोग मिळवावा अशी त्यांनां वासना होणें साहजिक आहे.

*(१) देवतांना ब्रह्मज्ञानाचा अधिकार आहे किंवा याचा ज्या अधिकरणात विचार केला आहे ते (२) ब्रह्मज्ञानाचा अधिकार ज्या कर्मानी येतो त्या कर्माचा (३) ब्रह्मज्ञानाचा अधिकार आहे (४) कर्ममध्ये देवतांचे यजन असते. मनुष्यादिकांना इंद्रादि देवतांचे यजन करता येते पण इंद्रादि देवांनी कर्म करतेवेळी दुसऱ्या कोणत्या इंद्रादि देवांना हविर्भाग द्यावेत म्हणून मनुष्याला कर्माचा अधिकार आहे पण देवांना मात्र कर्माधिकार नाही (५) आपली मालकी सोडणे (६) आपले रक्षण करण्याकरिता. (७) भगवंताची स्तुति करणे हे जे कर्म, त्या कर्माचा अधिकार (८) दैत्याच्या पराक्रमामुळे ज्याचे सामर्थ्य नष्ट झाले आहे अशा मनुष्याप्रमाणे (९) ज्यांचे मन असमर्थ झाले आहे (१०) वासना करितात इतकाच त्याचा अर्थ (११) मनुष्ययोनीत येण्याजोगे कर्म करितात असा त्याचा अर्थ नाही.*

परंतु तेथें कर्म करण्याचा अवकाश[१] नाहीं. कर्म करण्याचा अवकाश मानला तर तो क्षीणपुण्य[२] मनुष्यलोकांत येण्याचें कर्म कशाला करील ? तेथल्या तेथेंच देवलोक मिळविण्याचें कर्म कां करणार नाहीं? व तसेंही मानलें तर देवांनीं यज्ञ करण्याला पुनः दुसरे देव आणावे कोठचे? अशा स्थितींत तुमच्या म्हणण्याप्रमाणें सर्व कर्म भोगून झाल्यामुळें मनुष्यजन्मारंभक[३] (य३-२९४) कर्मच राहत नाहीं व ज्ञानावांचून मोक्ष होत नाहीं. अशा स्थितींत काय क्षीणपुण्य पुरुषांनीं झोंप घ्यावी? चांगदेवाच्या जन्मनिमित्तानें जरी कांहीं ग्रंथांत इंद्रांना कारागार[४] सांगितला आहे तरी तें इंद्राच्या पूर्वजन्मांतील फळ समजावें. नाहींतर सर्व श्रुतींचा विरोध प्राप्त होईल. सारांश, कर्माचा अनुशय[५] शेष राहत असल्यामुळें सर्वत्र एकभविकवाद[६] लागू करणें योग्य नाहीं, तर तो,, चितच लागूं करावा. तो असा :-

कर्म दोन प्रकारचें आहे. एक नियतविपाकी[७] व दुसरें अनियतविपाकी[८]. पैकीं नियतविपाकी कर्मासच हा एकभविकवाद लागू होतो. जसें नंदीश्वराला एकभविक पुण्याशयानें देवशरीर मिळालें व नहुषाला एकभविक पापाशयानें तिर्यक्शरीर मिळालें. परंतु नियतविपाकी कर्मही क्रममुक्तिप्राप्ताविषयीं[९] अत्यंत लागू पडत असून इतरांविषयीं अनुमापकरूपानें[१०] अंगुलीनिर्देशमात्र[११] समजावें. हा नियतविपाकी कर्माशय बहुधा दृष्टजन्मवेदनीय[१२] असून,, चित् अदृष्टजन्मवेदनीयही[१३] असूं शकतो.

*(१) स्थिति (२) ज्याचे पुण्य क्षीण झाले आहे (३) मनुष्याचा जन्म देणारे (४) बंदीवास (५) थोडे कर्म (६) अनेक कर्मांनी एक जन्म प्राप्त होतो हा वाद (७) ज्याचे फळ अवश्य होतेच किंवा जे दबले जाऊ शकत नाही (८) ज्याच्या फलाचा काही नियम नाही (९) क्रमाने (म्हणजे मनुष्य लोकातून ब्रह्मलोकास जाऊन मग ब्रह्म लोकातून मुक्त होणे ) ज्याला मुक्ति झाली आहे (१०) अनुमानाला आधार होणारे (११) थोडेसे दाखवून देण्यापुरते (१२) या जन्मातच कळणारा (१३) पुढील जन्मात कळणारा.*

राहिलेल्या अनियतविपाकी कर्माची तीन प्रकारची गती आहे. प्र न होतां नाश होणें ही पहिली. या गतीविषयीं श्रुतिप्रमाण आहे.

**श्रुति :-**

**'द्वे द्वे ह वै कर्मणि वेदितव्ये पापकस्यैको राशिः पुण्यकृतोऽपहन्ति**
**तदिच्छस्वकर्माणि सुकृतानि कर्तुमिहैव ते कर्मकवयो वेदयन्ते'।।**

**श्रुत्यभिप्रायः-** पापपुण्य अशा दोन प्रकारचें कर्म असून पापाच्या मोठ्या समुदायाचा पुण्याचा मोठा समुदाय नाश करितो. म्हणून ईश्वर म्हणतो 'हे जीवा, तूं शुभकर्म करण्याची इच्छा कर. कारण या मनुष्यलोकांतच तुला कर्मे आहेत.' विश्वामित्रानें केलेला त्रिशंकूद्धाराचा[१] इतिहास येथें प्रमाण समजावा. अनियतविपाकी कर्माची दुसरी गती म्हणजे प्रधानकर्मण्यावापगमन. म्हणजे एखाद्या मुख्य कर्माच्या ठिकाणीं अंगभूत[२] होऊन अविरुद्ध[३] फल देणें किंवा दुःख दिलें तरी सहन करण्यासारखें देणें. 'माझें पुण्य पुष्कळ आहे म्हणून येथें मला थोडेंसे पाप घडलें तर तें माझी स्वर्गांत फारच

थोडी हानी करील' अशा अर्थाची श्रुति आहे ती ही –

**श्रुति :-**

**स्यात्स्वल्पः संकरःसपरिहारःसप्रत्यवमर्षः कुशलस्य नाऽपकर्षायाऽलम् ।**
**कस्मात् । कुशलं हि मे बव्हन्यदस्ति यत्रायमावापगतः स्वर्गेऽप्यपकर्षमल्पं करिष्यति ।**

यज्ञांत केलेली पशुहिंसा **(य३-२९५)** अशा प्रकारचें फल देतें अशा अर्थाचें पंचशिखाचार्यांचें[४] सूत्रही आहे.

आतां, अनियतविपाकी[५] कर्माची तिसरी गती म्हणजे एखाद्या बलवान नियत कर्माच्या योगानें पुण्यकर्म दडपून राहणें ही होय.

शिष्य :- भगवन्! असें एखाद्या बलवान पापाच्या योगानें पुण्यकर्म दडपून राहिलें म्हणजे कसें करावें ?

श्रीगुरु :- त्या पुण्याला नियतविपाकी[६] करावें.

शिष्य :- नियतविपाकी म्हणजे काय ?

श्रीगुरु :- त्याच्या फल देण्यामध्यें कोणतेंच विघ्न आड न येणें.

शिष्य :- हें कशानें होते ?

श्रीगुरु :- तीव्र यत्नानें.

शिष्य :- तीव्र यत्न कसा करावा ?

श्रीगुरु :- सर्व कर्मांचा तीव्र यत्न सांगण्याला तर अनंतकल्प पुरणार नाहींत परंतु शक्य तेवढी शास्त्रीय शुभकर्माच्या तीव्र यत्नाची रीति सांगतों :-

*(१) त्रिशंकूच्या उद्धाराचा (२) साह्यभूत (३) प्रधान म्हणजे मुख्य कर्म जे फळ देणार असेल तेच फळ देणारे किंवा त्यात साह्य करणारे (४) सांख्यमार्गातील आचार्य (५) ज्याच्या फलाचा नियम नाही (६) दडपले न जाता अवश्य फल देईल असे.*

हा तीव्र यत्न दोन प्रकारचा आहे. (१) एक स्वतःची भावना[१] तीव्र करून व (२) दुसरा शुभवस्तुशक्तीचें[२] सहाय घेऊन. पैकीं पहिल्याप्रकारचा फार कठिण असून भवप्रत्यय-योगियांनां[३] साध्य होण्यासारखा आहे; व दुसऱ्या प्रकारचा सर्वांकरितां असून बराच सुलभ आहे.

ह्याचीं आतां कांहीं उदाहरणें देतो, जसें :- घरी केलेलें दान अनियतविपाकी असलें तर तेंच रविग्रहणीं[४] कुरुक्षेत्रीं दान केलें असतां नियतविपाकी होते. किंवा गंगास्नानानें इतर सर्व क्षेत्रकर्मे नियतविपाकी होतात. घरीं केलेल्या अनियतविपाकी श्राद्धापेक्षां गयेंत केलेलें श्राद्ध नियतविपाकी होते. अथवा भगवन्नामस्मरणानें सर्व प्रायश्चित्त व सर्वकर्मे नियतविपाकी होतात.

सारांश, विषयाभिभूत[५] अशुद्ध चित्तानीं केलेलीं कर्मे बहुशः अनियतविपाकी असून विषयानभिभूत[६] शुद्ध चित्तानीं केलेली कर्मे बहुशः नियतविपाकी असतात. अभिप्राय हा कीं वामतंत्रानुसार[७] झालेली,

*(१) माझ्या कर्माचे फळ होणारच अशी विकल्परहित वृत्ति (२) पवित्र वस्तूच्या सामर्थ्याचे (३) केवळ संसारात जन्म घेऊन जे समाधि अनुभव घेतात असे योगी किंवा भव म्हणजे संसार त्याचा प्रत्ययकारण जे अज्ञान त्याच्यावर आत्मभावना करून समाधि अनुभव घेणारे (४) सूर्यग्रहणात (५) विषयासक्तीने युक्त (६) वैराग्ययुक्त (७) शक्तिमार्गानुसार.*

अथवा विगीतवृद्धव्यवहारानुसार[१] श्रद्धेनें झालेलीं अनियतविपाकी व निगमस्मृतिपुराणानुसार[२] झालेलीं कर्मे नियतविपाकी समजावीं. त्यांतही परमेश्वराला अर्पण केलेलीं कर्मे अत्यंत नियतविपाकी म्हणजे (य३-२९६) कैवल्यज्ञानयोग्यजन्मादिप्रद[३] समजावीं. म्हणूनच तुकाराम महाराजानी उपासनेविषयी - **'हा तो नोहे कांहीं निराशेचा ठाव ।'** असें म्हटलें आहे.

याप्रमाणें नियतविपाकी[४] कर्माशयच[५] एकभविक[६] आहे खरा; परंतु येथेंही थोडासा भेद आहेच. क्रममुक्तिप्राप्ताविषयीं[७] एकभविक कर्माशय तर उत्सर्गरूप[८] आहे; आणि इतरांच्या नियतविपाकी कर्मांचें ठिकाणीं,, चित् एकभविकाला अपवाद आहे. पवमानाचें पठन केलें असतां सात जन्म ब्राह्मणाचे होतात इत्यादि अपवाद समजावा. ह्या सर्व विवेचनाचें सार एवढेंच कीं गंगास्नान भगवन्नामस्मरणादिका प्रमाणें सज्जनांचा दयारूप अनुग्रह लोकांच्या अनियतविपाकी पुण्याशयास नियतविपाकी पुण्याशयरूप करितो. सत्संग जरी इतर योग्य सहायक वस्तुशक्तिसमान[९] आहे तथापि इतर वस्तुशक्ति महावाक्योपदेश

दृष्यरूपानें करूं शकत नाहीं; व सज्जन करूं शकतात. हाच महात्म्यांमधील विशेष आहे. भगवदाश्रयत्वास्तव[१०] सज्जन, गंगा व नाम हे एकच समजावे. परंतु त्यांतील सज्जनांचा उपदेश दृष्य व गंगा आणि नाम या दोहोंचा अदृष्य असून सर्वांच्या फलांत यत्किंचितही अंतर नाहीं.

*सर्वत्याग*

पुनः, दयावान् पुरुषाला सर्वत्याग सहजच साधतो. परक्यावर दया केली असतां ज्याप्रमाणें खरा त्याग होतो त्याप्रमाणें दुसऱ्या कोणत्याही उपायानें होत नाहीं.

*(१) वाडवडिलापासून चालत आलेल्या रूढीप्रमाणे (२) वेदशास्त्रानुसार (३) मोक्ष प्राप्त करून देणारे जे आत्मज्ञान, ते होईल असा उत्तम जन्म वगैरे साधनसामग्री प्राप्त करून देणारे (४) अवश्य फल देणारा (५) कर्मसमुदाय (६) एक जन्म देणारा (७) क्रमाने मुक्त होणाऱ्याविषयी (८) सर्व साधारण नियमरूप (९) ब्रह्मज्ञान प्राप्तीकरिता आवश्यक साह्य देणाऱ्या ज्या वस्तु त्यांच्यासारखेच (१०) भगवंताचा आश्रय केला असल्यामुळे.*

कारण विषयांचें ग्रहण[१] रागानें[२] होत असून त्यांचा परित्याग द्वेषानें होतो. ते दोन्हीही न व्हावेत म्हणून सर्वांवर निरपेक्ष प्रीति करणाऱ्या पुरुषालाच सर्वत्याग मिळतो; व त्यामुळें विश्वांत असूनही अलिप्त राहतां येते; व दुसरेही दयेनें आपल्यासारखे करितां येतात. म्हणून कर्मवाद[३] हा दयेला घातक नसून उलटा साधक आहे. एवढ्याचकरितां महात्मे तीर्थाचें ठिकाणीं नित्य आगमन करीत असतात. ते सर्व महात्म्या परीक्षितीला वैराग्य झालें हें जाणून तेथें प्राप्त झाले. एवढ्यानें तुझी शंका निवृत्त झाली असेल तर पुढें ग्रंथ श्रवण कर. (य३-२९७)

शिष्य :- आज्ञा भगवन् !

**श्रीगुरु :- तीर्थांचेंही पवित्रपण[४] । तो परमात्मा जगज्जीवन । तयाचेंही अधिष्ठान[५] । कोमल हृदय साधूंचें ॥८३॥**

**म्हणोनि तीर्थांस तीर्थरूप[६] करिती । ऐसी सज्जनांची स्थिती ।**

**लोकीं साधुत्वाभिमान[७] न धरावा चित्तीं । यालागीं न्हाती तीर्थीं स्वयें ॥१८४॥**

**ऐसें महाराज मुनिजन । तेथ आले कवण कवण । तेंही ऐके सावधान । पूर्णसमाधानचंद्रा[८] ॥८५॥**

**ज्यांच्या तपःसामर्थ्येंकरोनी । पोटीं जन्मलें देव तीन्ही । तो दत्तात्रेयतात अत्रिमुनी । अनुसूयाजानी[९] पातला ॥८६॥**

**ज्यानें आपुल्या ज्ञानेंकरून । शिष्यत्वा आणिला नारायण । तो ब्रह्मर्षिवर्य ब्रह्मनंदन । वसिष्ठ भगवान पातला ॥८७॥**

**अरिष्टनेमी अंगिरा च्यवन । शरद्वान पराशर गाधीनंदन[१०] । भृगु उतथ्य इध्मबाहू आपण ।**

**राम इंद्रप्रमद तेहि आले ॥८८॥**

*(१) सेवन (२) आसक्तीने (३) कर्मानुसार फल मिळते हा वाद (४) पवित्र करणारा (५) आश्रय स्थान (६) पवित्रत्व देतात (७) मी साधु आहे असा अभिमान (८) पूर्ण समाधानरूपी चंद्र (९) अनुसूया आहे जानि म्हणजे पत्नि ज्याची तो (१०) विश्वामित्र.*

**मेधातिथी देवल आर्ष्टिसेन । भारद्वाज गौतम पिप्पलाद सुजन । मैत्रेय और्वकवश कुंभजनन[१]। पातले दयाघन सर्वही ॥९८॥**

**तोडोनि कुमतांचे वाद । जेणें समन्वयीले[२] वेद । तो महाराज कृपासिद्ध । द्वैपायन पातला ॥९०॥**

**जेणें भक्तिसूत्र निर्मुनी । भगवद्भक्ति स्थापिली जनीं । तो भगवान देवर्षिमुकुटमणी । नारदमुनी पातला ॥९१॥**

**देवर्षि ब्रह्मर्षि राजर्षि । अवघे पातले कनकदिवशीं[३] । रायें पूजोनि अतिविशेषीं । भावें चरणासी लागला ॥९२॥**

**महात्मे बैसलीया श्रेष्ठासनीं । मग राय पुनः प्रणाम करोनी । उभा राहिला बद्धपाणी[४] । मंजुळ वाणी बोलत ॥९३॥**

**महाराज प्रायोपवेषण[५] । उचित किंवा अनुचितकरण । अपराधासी योग्य शासन । सर्वज्ञावीण न दावी ॥९४॥**

**॥ अभंग ॥**

**त्रिभुवनीं तोचि वाटत भाग्याचा । आवडी संताचा दास झाला ॥१॥**

**विसरला सारे कूळ घर दार । संतपायावर लोटांगणी ॥२॥**

**आणिक नाहींच सर्वथा उपाय । जीव ब्रह्ममय करावया ॥३॥**

**ज्ञानेश्वरप्रभू सज्ञनभूपाळ[६] । राहो माझें भाळ[७] नित्य पायीं ॥९५॥** (य३-२९८)

**॥ दिंडी ॥**

**म्हणे राजा सर्वत्र धन्य झालों । मूर्तिमंत पाहोनि संत धालों[८] ।**

सर्वलोकीं आधार हाचि मोठा । संतमहिमें भगवंत होय गोटा[९] ॥ ९६॥

*(टीप :- गोटा भगवंत होय असा अन्वय. म्हणजे पाषाणमूर्तीमध्येंही प्राणप्रतिष्ठापनादिकांच्या योगानें देवत्व येतें; किंवा प्रऱ्हादादिकृत स्तंभादि स्थावरांतील भगवत्प्रगटण उदाहरणार्थ घेईजे.)*

॥ ओवी ॥

कोणत्याही रूपेंकरून । दीना पदरीं धरिती सुजन । असो मज ब्रह्मशाप दारुण । परी अनुग्रह[१०] पूर्ण वाटतो ॥९७॥
आम्ही क्षत्रिय परम मत्त । आम्हा करावया विरक्त । शापदाता ऋषिवर्यसुत । सद्गुरुनाथ मज झाला ॥९८॥

*(१) अगस्ति (२) वेदाचा अविरोध झाला (३) सोन्याच्या दिवशी (४) हात जोडून (५) अन्न व पाणी सोडून मरणाची वाट पाहणे (६) संत राजा (७) शिर (८) तृप्त झालो (९) गोटा म्हणजे दगड भगवंत होय असा अन्वय करावा म्हणजे पाषाणमूर्तीतहि प्राणप्रतिष्ठादिकांच्या योगाने देवत्व येते किंवा प्रल्हादादिकांनी खांबादिकात देव प्रगट केला (१०) कृपा, आशिर्वाद.*

धन्य धन्य रायाची स्थिती । इष्टानिष्ट[१] नाहीं ज्या क्षिती[२] । एकवेळ वैराग्य झालिया चित्तीं ।
मग दुःख तेंही सुख वाटे ॥९९॥
वैद्य भेटतां कृपावंत । सर्पविषही औषध होत । कीं अग्निसंगें अमेध्यजात[३] । परि ते होत शुद्धची ॥१००॥
सुखदुःखांचें भार कोटी । राहती विषयसुखांच्या पोटीं[४] । त्या विषयांतूनि निघतां दृष्टी । सुधामय[५] सृष्टि भासत ॥१॥
असो सूत म्हणे मुनिराया । राव म्हणे विप्रवर्या । तक्षक येवोनि माझी काया । अवघी लवलाह्या गिळो का ॥२॥
माझ्या प्रभूचें शेषशयन । तत्कुलविषें[६] मज येतां मरण । थोर नाहीं अमृत याहुन । जें रंभावचनबेडिं[७] गोवी ॥३॥
ही माता भगव्चारणनंदिनी[८] । विमला[९] मलहा[१०] मंदाकिनी ।
ही मज उत्संगीं[११] घेवो जननी । मग जावोत निघोनि असु[१२] सुखें ॥४॥
मातेच्या अंकीं जातां प्राण । तरी माय प्रार्थी नारायण । मग जगन्माता[१३]अंकीं जातां प्राण । कळवळा तिचा न वर्णवे ॥५॥
पापी जे नरकपट्टाभिषिक्त[१४] । ते माते, तव जल पीतां त्वरित । होवोनियां वैकुंठनाथ[१५] । इतरां समर्थ ताराया ॥६॥
आणि मज शरणागता आपण । आपुलें म्हणा अवघे मुनिजन । रामकृष्णहरी म्हणतां प्राण । जावो निघोन आवडी ॥७॥
गंगापानें हरिरूप प्राण । सत्संगें काया नारायण । हरिनामें हरिरूप झालें मन । आत्मा भगवान तोचि तो ॥८॥
मातें[१६]नावडे मोक्ष मुक्ति । होईल ज्या योनीची प्राप्ति । त्या त्या योनींत गोपिकापती । सर्वदा चित्तीं वसावा ॥९॥ (य३.२९९)

*(१) आवडीचे अथवा नावडीचे (२) पृथ्वीत (३) अपवित्र वस्तु (४) ठिकाणी (५) अमृतमय (६) त्याच्या कुलात उत्पन्न झालेल्या तक्षकाच्या विषाने (७) रंभादिक अप्सरांच्या वचनरूपी श्रृंखलेत (८) भगवंताच्या चरणापासून निघालेली म्हणून चरणकन्या (९) शुद्ध (१०) पापे क्षालन करणारी (११) पोटाशी अंकावर (१२) प्राण (१३) सर्व विश्वाच्या आईच्या मांडीवर (१४) नरकाच्या सिंहासनावर बसलेले (१५) विष्णु स्वरूप (१६) मला.*

गंगास्नान भगवत्भजन । आणि आपुलें म्हणोत सुजन । ऐसें सर्व कृपाळुकृपेंकरून[१]। पावेन हें बोलून नमी चरणा ॥१०॥
ऐसा उत्तरमुख दर्भासनीं । राजा वदे बद्धपाणी[२] । तयाची प्रशंसा करोनि मुनी । वरमय[३] वाणी बोलिलें ॥११॥

॥ श्लोक ॥

सोडोनि बंधु जननी विषयप्रसक्ती[४] । झाला विरक्त नरपाळ[५] वरील[६] मुक्ती ।
द्याया तयास अनुमोदन देव सारे । वर्षोनियां सुमन[७] वाजविती नगारे ॥१२॥
ज्ञानांत विघ्न करिती सुर हे प्रसिद्ध । ती विष्णुभक्ति करितां पळती प्रविद्ध[८] ।
यालागिं राव करि माधवसाधनाला[९] । जाणोनि देति सुरही अनुमोदनाला ॥१३॥

॥ ओव्या ॥

देवांचिया अनुमोदनें । हारपलीं अदृष्ट[१०] विघ्नें । जीं होताति प्रतिबंधनें । चित्तशुद्धीस ॥१४॥
आतां ऋषींच्या अनुमोदनें । बांधू न शकती दृष्ट[११] विघ्नें । जीं समाधीविषयीं प्रतिबंधनें । कामक्रोधासंभावनादी[१२] ॥१५॥
रायास वैराग्य पाहोनि दृढ । मुनी आशीर्वाद देती उघड । अंतरीं जो भाव होय सुघड[१३] । तेचि सामुग्री होय तया ॥१६॥
मूर्खलोक ऐसें म्हणती । सद्गुरु न भेटे आह्मांप्रती । विषयवैराग्य नाहीं चित्तीं । बळें भक्षिती मिष्ठान्न ॥१७॥
पूर्ण वैराग्य होतां अंतरीं । सद्गुरुसमुदाय येतो घरीं । राव विरक्त होतांचि गंगातीरीं । ऋषिसमुदाय पातला ॥१८॥

*(१) तुम्हा दयावंताच्या दयेने (२) हात जोडून (३) वररूप (४) विषयांची आशा (५) राजा (६) मुक्तीस जाईल (७) फुले (८) घायाळ होऊन (९) ईश्वरप्राप्तीच्या साधनाला (१०) आपल्याला कळत नसलेली (११) कळत असलेली (१२) काम (विषयसुखेच्छा) क्रोध व असंभावना (ब्रह्म आहे की नाही व वेद ब्रह्माचे प्रतिपादन करितात की नाही) इत्यादि (१३) स्पष्ट.*

'वैराग्यवांचूनि कहीं । ज्ञानासी तगणेंचि नाहीं' । हें विचारोनि ठायीं । ठेविलें देवें ॥१९॥
वैराग्य होतां ध्रुवबाळास । नारदमुनीं भेटले त्यास । वैराग्य होतां परीक्षितीस । ऋषी तयास भेटले ॥२०॥
वैराग्य होतां श्रुतदेव ब्राह्मणा । भेटी जाहली जगजीवना । वैराग्य विदुरास होतां जाणा । मैत्रेय मुनी भेटले ॥२१॥
विरक्त होतां देवहुती । गर्भी कपिल जाहली विष्णुमूर्ति । वैराग्यबळें तुकारामाप्रति । स्वप्नीं सद्गुरु भेटले ॥२२॥
बैसोनि उ्गा मंचकावरी[१] । कामिनीस्तन आलिंगूनि उरी ।
(य३-३००) गुरु न भेटती हे वल्गना करी । दिवस रात्रीं दर्दुरसम[२] ॥२३॥
जेव्हां सुटेल विषयासक्ति । जेव्हां अंतरीं उपजेल भक्ति । तेव्हां येवोनि महंत भेटती । शपथ निश्चिती श्रीहरीची ॥२४॥
असो द्विज म्हणती कुरुराजवर्या । तुझी हरिपदानुसरणचर्या[३]। हरिभक्ताचें चित्त विषया । वश लवलाह्या कदा नसे ॥३५॥
जया लेंकुरा घेत माय । तया कडिये रहावयाची संवय । मग खेळणें देतां नाना उपाय । घेतल्यावीण शांत नव्हे ॥२६॥
तैसी अंतरीं श्रीहरिभक्ति । उचंबळलिया प्रेमस्थिती । विषय खेळणें लोटोनि लातीं । पाय देती मोक्षमाथां ॥२७॥
कीं क्षुधा वाढली जयाचें पोटीं । तो न पुसे तंडुळ[४] पेरणें गोष्टी । तैसा आवडो लागतां जगजेठी । तर्ककटकटी[५] आटती ॥२८॥
रोगें पीडिला मागे अमृत । सर्पसंदष्ट[६] मंत्री[७] शोधित । तैसा संसारीं दोष जो पाहत । तोचि विनटत हरिचरणा ॥२९॥

॥ पद ॥

जीवित खाइल काळ । कधि तरी ॥ध्रु०॥
वृद्धहि मरती तरुणहि मरती । मरति लहानसे बाळ ॥ जीवित० ॥१॥
मागें गेले जातिल पुढतीं । जाणुनि भज यदुपाळ ॥ जीवित० ॥२॥
अलकावतिवल्लभपदकमळा[८] । वाहि प्रेममय माळ ॥ जीवित० ॥३॥२३०॥

*(१) पलंगावर (२) मेंडकीप्रमाणे (३) श्रीहरीच्या चरणकमलास अनुसरणारी (प्राप्ति करून देणारी) वागणूक (४) तांदुळ कोठे पेरले होते इत्यादि (५) तर्काची किटकिट, शहानिशा (६) सर्प चावलेला (७) मंत्र घालून विष उतरविणारा (८) श्रीज्ञानेश्वर महाराजाचे चरणी.*

॥ हिंदी पद - कबीर ॥

'इस तनधनकी कवन बराई[१] । देखत[२] नैनोंमें मट्टि मिलाई ॥ध्रु० ॥
दहिदुध खाकर पिंड जमाया । वहि पिंड[३] लेकर महिमें लाया ॥इस०॥१॥
हाड जले जैसी लकडेकी मुलिया[४]। बाल जले जैसी घांसकी पुलिया[५]॥२॥
मट्टी खोद खोद महेल बनाया । आपहि जाकर जंगल सोया ॥ इस० ॥३॥
कहत कबीर सुनो मोरि मुनिया । आप मुये[६] पाछे[७] डूब गयी दुनिया । इस तनधनकी कवन० ॥४॥

॥ हिंदी पद - कबीर ॥

सीताराम भजो मनमें । जबलग सास रहे तनमें ॥ध्रु०॥
कोइ दिन खावे दूधमलीदा कोइ दिन सीरापूरी ।
कोइ दिन ऐसा आन पडेगा नहिं मिलनेकी ज्वारी ॥ सीताराम० ॥१॥
कोइ दिन बैठे गाडी घोडा कोइ दिन पालखि हत्ती । (य३-३०१)
कोइ दिन ऐसा आन गिरेगा नहि मिलनेकी जूती[८] ॥ सीताराम० ॥२॥
कोइ दिन ओढे[९] शालदुशाला कोइ दिन सफेद खादी ।
कोइ दिन ऐसा आन परेगा नहि मिलनेकी चिंधी ॥ सीताराम०॥३॥
कहत कबीरा सुनभइ साधू बार बार नहि आवे ।
ऐसी करनी करले यारो जनम मरन मिटि जावे ॥ सीताराम०॥४॥

॥ हिंदी पद - सुंदरदास ॥

राम हरि राम हरि बोल सूवा[१०] ॥ ध्रु०॥

तो[११] सही[१२] चतुर सूजान[१३] परबीन[१४] अति परे[१५] जनि पींजरे[१६] मोहकूवा[१७] ।

पाय[१८] उत्तम जनम लाय[१९] ले चपल मन गाय गोविंदगुन जीत[२०] जूवा[२१]।

आपही[२२] आप अग्याननलिनी बंध्यो बिना प्रभुबिमुख कैबेर मूवा ।

*(१) मोटेपण (२) पहात असताच (३) देह पुष्ट केला (४) मोळी (५) गवताची पेंडी (६) मेल्यावर (७) नंतर (८) जोडा (९) आंगावर घेतो (१०) पोपट, राघू (११) अशा प्रकारे (१२) शुद्ध, वस्तुतः पाहता (१३) शहाणा, समजूतदार, विवेकी (१४) प्रवीण (१५) पडला (१६) जन्मरूपी पिंजऱ्यात (१७) मोहरूपी विहीरीत (१८) प्राप्त करून (१९) स्वाधीन कर, आवरून धर (२०) जिंकून घे (२१) द्यूत (संसार हे एक जुगारच आहे) (२२) आपणच आपल्याला.*

आपही आप अग्याननलिनी[१] बंध्यो बिना[२] प्रभुबिमुख कैबेर मूवा ।

दास सुंदर कहे परम[३] पद तो लहे[४] राम हरि राम हरि बोल सूवा ॥ राम हरि०॥१॥

॥ ओव्या ॥

'अहा कटकटा[५] हें वोखटें[६] । इये मृत्युलोकींचें उफराटें[७] । एथ अर्जुना जरी अवचटें[८] । जन्मलासि तूं ॥५१५॥

तरी झडझडोनि[९] वहिला[१०] निघ । इये भक्तीचिये वाटे लाग । जिया[११] पावसी अव्यंग । निजधाम माझें'॥५१६॥ज्ञाने.९

एवं श्रीमंतादिवाणी[१२] । विचारोनि आपुल्या मनीं । धनकामिनीवरी थुंकोनी । चक्रपाणी आठवावा ॥३१॥

म्हणोनि राया तुझ्यासाठीं । वैराग्याचें आश्चर्य नाहीं । आनुवंशिक[१३] शील लवलाही । तुझेंचि हें ॥३२॥

इंद्र लागे जिच्या चरणीं । ती लक्ष्मी अभिमान सांडुनी । पाय धूत मृदु करेंकरोनि । तो हरि सांडोनि राज्य इच्छी कवण ॥३३॥

युधिष्ठिरादि तव पूर्वज समस्त । राज्यादि मानोनि तृणवत । हृदयीं धरोनि राधिकाकान्त । अनर्थनिवृत्त[१४]जाहले ॥३४॥

॥ अभंग ॥

जरी मना लागे गोविंदाची गोडी । हारपती खोडी[१५] इंद्रियाच्या ॥१॥

सांडावे वाटती प्राण ओवाळूनी । पाहतां लोचनीं श्याममूर्ती ॥२॥

स्फुरेना कदापि जीविं जीवपण । ईश्वराभिमान तोही नाहीं ॥३॥

ज्ञानेश्वर स्वामी माझा कृपावंत । प्रेम राहो तेथ जन्मजन्म ॥४॥ ३५॥

॥ ओव्या ॥

ऐसे महाराज मुनिदेव । जयांचा लोकानुग्रह[१६] स्वभाव । तिहीं आश्वासिला राव । मार्दवमनेंकरोनी[१७] ॥३६॥

*(१) अज्ञानरूपी कमलात अटकवून किंवा बंद करून घेतले (२) प्रभूच्या साह्यावाचून प्रभूपासून विन्मुख होऊन किती वेळ तरी मेला आहेस (३) मोक्ष (४) मिळेल (५) हायहाय (६) वाईट (७) उलटे (८) दैवाने (९) चटकन् (१०) अगदी निश्चयाने (११) जिच्या योगाने (१२) ज्ञानेश्वर महाराजादिकांचे वचन (१३) वाडवडिलापासून चालत आलेले (१४) दुःखमुक्त (१५) सवयी (१६) लोकावर उपकार करणे.(१७) स्नेहभरित मनाने*

मग आपसांत बोलती वाणी । आम्ही यद्यपि निष्काम मुनी । (य३-३०२)

तथापि जोंवरी हा न मिळेल हरिचरणीं । तोंवरी याचि स्थानिं राहूं ॥३७॥

अगाध संतांची भूतदया । जीवें विनटती दीनकार्या । निर्माय[२] असोनि दीनाची माया । आश्चर्य लवलाह्या हें वाटे ॥३८॥

बोधावया मुमुक्षूजन । वाट पाहती रात्रंदिन । आसन भोजन आणि शयन । दीनाकारणें[३] त्यागिती ॥३९॥

वास्तवीक ज्यांच्या दृष्टि । ब्रह्मावांचून नाहीं सृष्टी । तथापि दीनास्तव होती कष्टी । हेंचि आश्चर्य वाटते ॥४०॥

निजात्मानुभवेंकरून । झाले देहासहित[४] नारायण । तथापि प्रेमें करोनि भजन । तारिती दीन नवल हें ॥४१॥

हा हरिरूपीं मिळेपर्यंत । आम्ही अवघेचि राहूं येथ । ऐसें वचन ऐकोनि नृपनाथ । संतुष्टचित्त जाहला ॥४२॥

"तुज भेटेल नारायण" । ऐसें साधूंचें आश्वासन । मिळालिया आणीक त्याहून । भाग्य नाहीं चतुर्दश[५] भुवनीं ॥२४३॥

॥ गीति - मोरोपंत ॥

'तरला ययाति राजा दर्शन होतांचि संतरायाचें[६] ।

सद्दर्शनचि[७] सुदर्शन[८] पळवी चट कटक[९] अंतरायाचे[१०] ॥२४४॥'

॥ पद - सुंदरदास / मदिरावृत्त ॥

'प्रीति प्रचंड लगे परब्रह्महि[११] । और सबे कछु लागत फीको ॥
शुद्ध हृदे मन होई सुनिर्मल । द्वैतप्रभाव मिटे सब जीको ॥
गोष्टिरु ज्ञान अनंत चले जहं । सुंदर जैसो प्रवाह नदीको ॥
ताहिते[१२] जानि करो निशिबासर[१३] । साधुको संग सदा अति नीको[१४]॥

*(२) स्वतः मायाविरहित असून (३) दीनाचा उद्धार करण्याकरिता (४) सदेहसृदिानंद (५) चवदाहि लोकांमध्ये (६) संतशिरोमणीचे (७) संताचे दर्शन (८) सुदर्शन चक्र (९) सैन्य (१०) प्रतिबंधाचे, विघ्नाचे (११) परब्रह्माचे ठिकाणी (१२) म्हणून (१३) दिवसरात्र (१४) उत्तम.*

॥ पद ॥

जरि हरि परम उदार ॥ असशी०॥ धृ०॥
तरि देई बळ अवसर जेणें । झाडिन सज्ञनद्वार ॥ असशी०॥१॥
सत्पदजीवन पिउनी वाटो । तुच्छ धन सदन दार ॥ असशी०॥३॥
ज्ञानेश्वरी अनुराग देई नित । मग बुडवी वा तार ॥ असशी०॥२४५॥

॥ ओव्या ॥

ऐसिया सज्ञनांची वाणी । रायें ऐकोनियां श्रवणीं । पूर्ण निवाला अंतःकरणीं । चक्रपाणीचरणचित्त[१] ॥४६॥
जैसा वनांत पेटवोनि अग्नी । (य३-३०३) व्याधें रोधिली कुरंगिणी[२] । तंव कृपाळू जलद[३] वळोनि गगनीं । शीतल जीवनीं वर्षला ॥४७॥
कीं प्राण जातां मिळालें अमृत । कीं क्षुधिता भेटला अन्नपर्वत । कीं तान्हिया बाळा अकस्मात । प्रेमळ माता भेटली ॥४८॥
तैसे पक्षपातरहित । सत्य आणि प्रसादभरित[४] । वचन ऐकोन नृपनाथ । घाली दंडवत चरणावरी ॥४९॥
जो परमात्मा कैवल्यदानी । ग्रारणकन्या मंदाकिनी । तयाचें चरित्र ऐकाया कानीं । मधुरतर[५]वाणी विनवि रावो ॥२५०॥
राव विचारी आपुलें मनीं । संतीं आश्वासिलें मजलागुनी । यास्तव मम मुक्ततास्थानीं[६] । संशय नाहीं ॥५१॥
परंतु गोड मुक्तीहून । जया प्रभूचे असती गुण । जेथ मुनी मधुप[७] होवोन । रुंजी[८] घालती सदैव ॥५२॥
तयाची अमृतमय लीला । जो कदाही नाहीं प्याला । तरी अपवर्गी[९] तयाला । काय आहे कळेना ॥५३॥
अहो बंधन[१०] केव्हांच नाहीं । तन्मोक्षआशा करोनि कायी । जो आनंदमय शेषशायी । त्याचे पायीं लोळावें ॥५४॥

*(१) चक्रपाणि भगवंताचे चरणी ज्याचे चित्त जडले (२) हरिणी (३) मेघ (४) कृपायुक्त (५) अत्यंत प्रेमळ (६) भगवत्प्राप्तीविषयी (७) भ्रमर (८) झेप, झडप (९) मोक्षांत काय सुख आहे (१०) बद्धपणा, चैतन्य कधीच बद्ध नाही.*

॥ गीति ॥

मग बोले मुनिवर्या कंचनमय[*] आजिचा असे सुदिन ।
निश्चय तुटेल भव[१] मम द्विजवरवचनासि[२] काळिमा कधिं न ॥५५॥

॥ श्लोक ॥

प्रतापलों[३] मी परमानुतापें[४] । प्रशांत[५] झालों तुमच्या[६] प्रतापें ॥
तथापि वांछी मन हें स्वभावें । यदूत्तमाचे गुण आयकावे ॥५६॥
झालों जरी परम जाणुनि मुक्त आजी । ही एक आवडि असेचि तथापि माझी ।
सारथ्य जो करुनि रक्षि पितामहातें[७] । यत्पादजीवनिं[८] गिरीशजटा[९] नहाते[१०] ॥५७॥
त्याचेंच[११] वर्णन करा गुण सर्व संत । माझ्यास्तव प्रकटला श्रुति मूर्तिमंत ।
जाणोनि पूर्ण वदती जगदर्थ वाणी । ती वेद कोण न म्हणेल महाभिमानी ॥२५८॥

॥ ओव्या ॥

(य३-३०४) 'तयाचे बिसाट[१२] शब्द । सुखें म्हणो येती वेद । सदेह सृदिानंद । कां नोहावे ते ॥' (ज्ञा.१८/१६४६)
ऐसें आळंदीवल्लभवचन । मूर्तिमंत[१३] वेद संतजन । यास्तव तया श्रीहरीचे गुण । आवडी श्रवण करूं इच्छी ॥२५९॥

*(*) सोन्याचा. (१) संसार (२) ब्राह्मणांचे आशिर्वाद कधी खोटे व्हावयाचे नाहीत (३) अत्यंत संतप्त, व्याकूळ झालो (४)*

*अत्यंत पश्चात्तापाने (५) अत्यंत समाधानयुक्त (६) तुमच्या प्रभावाने (सत्संगाच्या प्रभावाने) (७) आमच्या आजोबास (८) ज्याच्या पायापासून निघालेल्या गंगाजलात (९) शंकराची जटा (१०) स्नान करते (११) श्लोकार्थः- अहो संतानो! आपण केवळ मूर्तिमंत साक्षात् वेदच आहात व माझ्यावर कृपा करण्याकरिता प्रगट झाले, म्हणून आपण पूर्णपणे वेदाचा अर्थ जाणता व जगाच्या कल्याणार्थ तो जगाला सांगता. असा कोण दुराग्रही आहे की जो तुमची वाणी वेद नव्हे असे म्हणेल! तेव्हा आपण सर्वजण त्या भगवंताचे गुणवर्णन करून मला सांगा (१२) पिशासारखे, असंबद्ध (१३) साक्षात् मूर्तिधारी.*

**॥ श्लोक ॥**

**छाया तरूस न मिळे परि देत आहे । पाणी नदीस न मिळेचि तथापि वाहे ॥**
**लोकीं तिहीं किमपि वांछिति ना महंत । तच्छील दीनजनतारण[१] हें अनुसंत[२] ॥६०॥**

**॥ गीति ॥**

**यास्तव विनवितसे मी हरिगुणमहिमा अखंड गावोनी ।**
**निववा भवदवतप्ता[३] मज निजवचनामृतासि[४] देऊनी ॥६१॥**

**॥ ओव्या ॥**

**निश्चयें प्राणियापाठीं मरण । म्हणोनि मज आवडे हरिस्मरण । आपण सर्वज्ञ कृपाघन । माझें कल्याण ठावें तुह्मां ॥६२॥**
**भूक दाखवावया रडणें । इतुकें बालकें मात्र करणें । मग कंचुकी[५] उघडोनि स्तन मुखीं घालणें । हें जननी जाणे सर्वही ॥६३॥**
**तेंवी संसारा देऊनि पाणी । येवोनि लोळावें संतांगणीं[६] । आतां हिताहिताची काहणी । आम्हा निर्वाणी कळेना ॥६४॥**
**ओहळें[७] गंगेमाजीं मिळतां । जावें गंगा नेईल त्या पथा । तेंवी समर्थें स्वीकारिलें आतां । मी नेणता सर्वस्व ॥६५॥**

**॥ अभंग ॥**

**दीनबंधू मायबापा । गोड बोला किंवा कोपा ॥१॥**
**दोहि पक्षीं माझें हित । जन्ममरण नाशत ॥२॥**
**पायीं गुंतलों नेणता । माझी असो तुह्मा चिंता ॥३॥**
**आळंदीशा ज्ञानेश्वरा । दिसे उचित तें करा ॥४॥६६॥**

**॥ ओवी ॥**

**ऐसें ऐकोनि नरेंद्रवचन । उपाय सांगती मुनिजन । कोणी तप कोणी दान । व्रतध्यानयोगादि ॥६७॥**

*(१) दुःखितांचे दुःख निवारण करणे (२) विश्रांति न घेता (३) संसाररूपी दावाग्नीने होरपळलेला (४) आपले वचनरूपी अमृत (५) चोळी (६) संतांचे आंगणात (७) ओढ्याने.*

**॥ गीति ॥**

**नवल परम हें वाटे न कळुनि नृपराज पुण्यतरू[१] फळला[२] ।**
**मूर्तिमंत प्रणवचि[३] तो ब्रह्मरूप शुक कृपानिधी वळला[४]॥६८॥ (य३-३०५)**

**॥ ओव्या ॥**

**नातरी गंगा समुद्रीं जाय । जनाची तृषा हरिती होय । परंतु अभिमानास[५] ठाय । नेदि चित्तीं ॥६९॥**
**तैसे परब्रह्मसंपन्न[६] । कांहीं नसोनी प्रयोजन[७] । सहज महीवरी[८] फिरतां सज्जन । तरती जन मुमुक्षू ॥७०॥**
**आपुल्या इच्छेनें मेघ वळत । परी जनांचें कल्याण होय बहुत ।**
**तैसे स्वेच्छे कुंभिनी[८] अटती[९] संत । पामर अनंत उद्धरती ॥७१॥**
**इतुक्या गुणीं मंडित पूर्ण । भगवान पराशरसुतनंदन[१०] । जयाचा वैराग्यदुंदुभी[११] ऐकोन । घाली मदन[१२] दंडवत ॥७२॥**
**जयास जन्मापासोनि कहीं । संसारवासना[१३] शिवलीच नाहीं । जयाचा सद्गुरू भुजंगशायी[१४] । जो भुलला नाहीं सर्वथा ॥७३॥**
**तो महाराज अवधूतवेषी[१५] । बालब्रह्मचारी[१६] ज्ञानराशी । तो अकस्मात अनभिलाषी[१७] । मुनिसभेसी पातला ॥७४॥**

**॥ गद्य ॥**

शिष्य :- भगवन् ! आपलें वचन श्रवण करूनही मला वारंवार शंकापंक[१८] मज्जन[१९] करूं पाहतो, ह्यांत आपला अपराध नाहीं; केवळ माझा कनिष्ठ अधिकारच ह्याला कारण आहे. परंतु मिळविणारीं[२०] व घरीं बसणारीं दोन्ही मुलें आईला जशीं समान असतात, तद्वत् उत्तम मध्यमाधमाधिकारी स्वामीला समान आहेत म्हणून मी विचारण्याचें धैर्य करितों.

*(१) राजाचा पुण्यरूपी वृक्ष (२) गोड फळाने युक्त झाला (३) ॐकार (४) प्राप्त झाला (५) मी लोकांची तहान भागविली अशा अभिमानास जागा देत नाही (६) पूर्ण ब्रह्म झालेले (७) हेतु, कारण (८) पृथ्वीवर (९) फिरतात (१०) शुकाचार्य (११) वैराग्यरूपी दुंदुभीचा ध्वनि, वैराग्याची कीर्ति (१२) कामदेव (१३) विषयसुख भोगण्याची वासना (१४) परमात्मा (१५) दिगंबरवेष धारण करणारा (१६) बाळपणापासून ब्रह्मचारी (१७) काही इच्छा न धरता. (१८) शंकारूपी चिखल (१९) बुडवू (२०) पैसा कमविणारी.*

आपण आतांच भगवान शुक बालब्रह्मचारी असें सांगितलें आणि देवीभागवतांत तर शुकाचा विवाह सांगितला आहे; या मुळें दोन पुराणांचा परस्परविरोध आहेसें मला वाटते.

श्रीगुरुः- अरे! तुझ्या म्हणण्यास एक देवी भागवतच प्रमाण असून आमच्या म्हणण्यास योगवासिष्ठ, महाभारत व श्रीमद्भागवत अशी तीन प्रमाणें आहेत.

शिष्य :- असले म्हणून काय झालें ? एका पुराणाला जर अप्रामाण्य प्राप्त होईल तर दुसऱ्या पुराणालाही तें प्राप्त होण्याला कांहीं प्रत्यवाय येणार नाहीं.

श्रीगुरु :- वत्सा ! आम्हीं जें सांगितलें तें अपय्यादीक्षिताप्रमाणें असल्यामुळें आमच्या पदरचें नव्हतें. अपय्यादीक्षितांनीं ब्रह्म[१] कारण न सांगणारी लेशमात्र[२] श्रुति सांपडते, तशी विष्णूचा महिमा सांगणारीही (य३-३०६) एखादी श्रुति असली तरी पुष्कळ श्रुतिवाक्यामुळें शिवच वरिष्ठ आहे असें शिवतत्त्वविवेकाच्या टीकेंत म्हटलें आहे. ह्यालाच अनुसरून आम्हींही सांगितलें. मला वाटलें होते कीं तूं दीक्षितासारखाच जडबुद्धि असशील, परंतु तूं आपलें बुद्धिवैभव प्रकट केलें असल्यामुळें आतां युक्तीनें श्रवण कर. -

पुष्कळ लोक कल्पभेद सांगून हा कथाविरोध दूर करीत असतात. परंतु खरें रहस्य हें आहे कीं ''तस्य[३]तावदेवचिरम्'' ह्या श्रुतीप्रमाणावरून ज्ञान झालें तरी प्रारब्ध भोगावें लागते. योगीपुरुष कायव्यूहाच्या[४] योगानें प्रारब्ध एकाच क्षणीं भोगून टाकतो खरा; परंतु ज्ञानावांचून मुक्ति नसल्यामुळें ज्ञानरहित योगियाकडून खरें प्रारब्ध भोगलें जात नसून अनंत जन्माचें संचितच मात्र भोगलें जाते; पण ज्ञानी आणि योगी पुरुषाची स्थिती तर अशी होते कीं:-

*(१) ब्रह्म जगताचे कारण नाही असे सांगणारी (२) अल्पशी, एखादीच (३) जोपर्यंत आत्यंतिक मोक्षास जात नाही तोपर्यंत प्रारब्ध राहते (४) निरनिराळ्या देहाने भोगण्याजोगे प्रारब्ध, संकल्पमात्राने तितके देह निर्माण करून भोगून टाकणे.*

**॥ श्लोक ॥**

**ज्ञानकृषानु[१] निज संचित सर्व दाही । कर्तृत्वगर्व[२] सुटतां क्रियमाण नाहीं ॥**
**प्रारब्ध भोगिति करोनिहि कायव्यूहा । श्रीकृष्णपायिं मिळती निवटोनि[३] मोहा ॥७५॥**

**॥ ओवी ॥**

**जेवढीं शरीरें योगी निर्मिती । तितुक्यासही चित्त देती । मुख्य चित्त आपुलें ठेविती । गौण घालिती कायव्यूहीं ॥७६॥**

तथापि ज्ञान मात्र निर्माण केलेल्या अनंत चित्तांत योगी निर्माण करूं शकत नाहींत. कारण ज्ञान निर्माण करणें हें कोणत्याही क्रियेच्या स्वाधीन नसून महावाक्यानेंच त्याचा प्रकाश पडतो. योगी इतर शरीरें व त्यांतील गौणचित्त या सर्वांना प्रारब्ध भोगण्यासाठीं यद्यपि उत्पन्न करूं शकतो, तथापि ज्ञान निर्माण करण्याचें त्याचें सामर्थ्य नाहीं. कारण ज्ञान हें वस्तुतंत्र असून योग चित्तवृत्तीच्या निरोधाची संज्ञा असल्यामुळें निरोध अर्थातच कर्तृतंत्र[४] आहे. त्या निरोधानें व्युत्थानदशेंत[५] येणाऱ्या शक्ती तिन्ही कालीं बाध[६] न होणाऱ्या अशा परब्रह्मरूपी ज्ञानास कशा निर्माण करूं शकतील ? (य३-३०७) यद्यपि दाम, व्याल[७], कट व भीम, भास, दृढ असे आसुरी मायेनें उत्पन्न केलेले दैत्य योगवासिष्ठांत सांगितले आहेत; व त्यांतील दाम, व्याल, कट यांनां यद्यपि वासना होती, तथापि भीम, भास, दृढ वासनारहित[८] होते व अर्थातच ते मुक्त असल्यामुळें विष्णूंनीं आपल्या रूपांत त्यांना मिळवून घेतलें.

*(१) ज्ञानाग्नि (२) कर्तृत्वाचा अभिमान (३) नाहिसा करून (४) कर्त्याच्या करण्यावर अवलंबून (५) देहावर असताना (६) नाश (७) नावाचे राक्षस (८) विषयाच्या वासनेवाचून*

मुक्त नसते तर त्यांनां मरणाची दाम, व्याल, कटाप्रमाणें प्रतीति झाली असती अशी शंका काढणें योग्य नाहीं; कारण निर्वासनिक[१] स्थिती सुषुप्तींतही असूं शकते व तशी त्यांची स्थिती दैत्यांनीं उत्पन्न केली असली तर किंवा त्यांत चैतन्य असल्यामुळें आपल्यांत मिळवून घेण्याच्या भगवदनुग्रहानें तत्काल ज्ञान प्राप्त होऊन ते भगवत्स्वरूपीं मिळाले असले तर

विरोधपरिहार सहज होतो. म्हणून शुकाचा विवाह व शुकाचें ब्रह्मचर्य ह्या दोन्ही कथांचा अर्थ असा आहे कीं, देवीभागवतांतील विवाहित शुकशरीर प्रारब्धभोगार्थ असून दुसरें हें श्रीमद्भागवतांतील ब्रह्मचारी शुकशरीर ज्ञानरूप आहे.

**'यावदधिकारं अवस्थितिः आधिकारिकाणाम् ।'** (**ब्रह्मसूत्र अध्या० ३ पाद ३ सूत्र ३२**)

अर्थ - जोपर्यंत अधिकार आहे तोंपर्यंत आधिकारिक[२] राहतात. हा न्याय प्रसिद्धच आहे. म्हणून देवी भागवत व श्रीमद्भागवत यांचा विरोध नाहीं.

यद्यपि गूढार्थदीपिकेंत मधुसूदनस्वामींनीं आधिकारिकत्व उपासकांनांच येऊं शकते असें म्हटलें आहे, तथापि त्यांचा अभिप्राय उपासना सात्त्विक असल्यामुळें प्रारब्धही सुखरूपच असलें पाहिजे असा निघतो; आणि ब्रह्मसूत्रावरील वेदांतसौरभ नामक निम्बार्कभाष्यांत जे पुराणांतून श्लोक घेतले आहेत, त्या श्लोकांवरून आधिकारिकांनां दुःखही होत असतें असें दिसतें. वसिष्ठांचें शतपुत्र मरण पावले असतां त्याविषयीं त्यांनीं शोक केला हें प्रसिद्धच आहे. या विरोधावरून अनुमानें निघतात तीं अशीं :- एकतर उपासना शुद्धसात्त्विक नसली पाहिजे; म्हणूनच रजोगुणात्मक दुःख वसिष्ठादिकांनांही प्राप्त झालें. दुसरें, वसिष्ठादिक ज्ञानी जरी होते तरी योगी नसले पाहिजेत कारण त्यांचें जन्मांतर[३] शांकरभाष्यादिकांत वर्णन केलें आहे. ते जर योगी असते तर कायव्यूहानें[४] सर्व प्रारब्ध भोगून टाकणें त्यांनां शक्य होतें (य३-३०८) अथवा कायव्यूह शक्य आहे

*(१) वासनारहित (२) भगवंताच्या कृपेने ज्यांना सृष्टिकार्यात अधिकार प्राप्त होतो ते (३) ज्ञान झाल्यावरहि त्यांचा जन्म झाला (४) प्रारब्ध भोगून टाकण्याकरिता पुढे प्रारब्धाने प्राप्त होणारे देह वर्तमान जन्मात घेऊन येणे.*

हें योगशास्त्राचें म्हणणें तरी खोटें असलें पाहिजे. म्हणून कायव्यूहसिद्धांतानें[१] विवाहितशुकजन्म[२] व ब्रह्मचारीशुकजन्माचा[३] विरोधपरिहार होणें शक्य नाहीं असें पूर्वपक्षी म्हणूं शकतो.

तथापि तें सम्यक् नाहीं. कारण उपासना ज्याची करावयाची तो परमात्मा असल्यामुळें त्याचें ठिकाणीं रजःप्रवृत्ति[४] संभवत नाहीं म्हणूनच उपासनेनें समाधिस्थ झालेल्या पुरुषांचें ठिकाणींही रजःप्रवृत्ति संभवत नाहीं. म्हणून उपासनेनें आधिकारिकत्व मिळणाऱ्यांचें प्रारब्ध सुखरूपच असतें.

आतां, त्यांच्या दुःखाविषयीं जीं कांही पुराणांत वचनें आहेत त्यांचा अभिप्राय असा आहे कीं आधिकारिक असून देखील ममतावश असल्यास वसिष्ठादिकांप्रमाणें दुःख पावतो. म्हणूनच त्यांनीं दुःखी लोकांप्रमाणें लीला करून दाखविली आहे. तर मग अवतारांत व यांच्यांत कांहीं भेदच राहिला नाहीं. कारण अवतारही तशीच लीला करून दाखवितात असें मात्र म्हणतां येत नाहीं. आधिकारिक दुःखभोगाविषयींच मात्र लीला करून दाखवितात. परंतु आपल्या सुख प्रारब्धाचे ते वृत्तिदृष्टीनें भोक्तेच असतात. परमेश्वरावतार तर सुख व दुःख या दोहोंनांही लीलेनेंच दाखवितो. कोणत्याही दृष्टीनें भोक्ता होत नाहीं. आपल्याच हातानें रावणापासून सोडवून आणलेल्या सीतेचा लोकांच्या म्हणण्यावरून त्याग, व काळयवनापासून रक्षण केलेल्या यादवांचा एकादश स्कंधांत सांगितल्याप्रमाणें स्वसंकल्पानेंच घात, या रामकृष्णांच्या कृत्यांवरून आमचें वरील म्हणणें सिद्ध होतें.

आतां, त्यांनीं कायव्यूह करून प्रारब्ध सगळें भोगून कां टाकलें नाहीं ? या शंकेचें उत्तर असे आहे कीं प्रारब्ध दोन प्रकारचें आहे. एकजन्मारंभक[५] व अनेकजन्मारंभक[६]. जें कर्म एकाच जन्मापुरतें फलोन्मुख होऊन पूर्वी सांगितलेल्या ाचित्क[७] -

*(१) योगी ज्ञानी अनेक देह धारण करू शकतो या सिद्धान्ताने (२) विवाह करणाऱ्या शुकाचार्यांचा जन्म (३) ब्रह्मचारी राहणाऱ्या शुकाचार्यांचा जन्म (४) रजोगुणाची स्थिती (५) एकच जन्मापुरते (६) अनेक जन्मापुरते (७), चित् ठिकाणी लागू पडणाऱ्या.*

एकभविक-कर्माशयाप्रमाणें[१] असतें तें पहिलें व दुसरें अनेकजन्मारंभक कर्मही दोन प्रकारचे आहे. जसें ''सप्तजन्म[२]भवेद्विप्रो धनाढ्यो वेदपारगः'' या वचनांत जें पवमानपठनाचें फल सांगितलें आहे त्यावरून पवमानपठनकर्म[३] फलोन्मुख[४] झाल्यास तें सातजन्म दिल्यावांचून रहात नाहीं. यासारखीं अनेकजन्मारंभक कर्मे पुष्कळ आहेत.

दुसरें अनेकजन्मारंभक कर्म असें कीं पूर्व कल्पांतील विशेष[५] तपांनीं वेदद्रष्टे[६] जे (य३-३०९) होतात त्यांचें तें कर्म परमेश्वरदत्ताधिकारामुळें[७] सृष्टिनियमनसहकारी[८] होतें, म्हणून सृष्टिकार्यास्तव त्यांनां अनेक जन्म घ्यावे लागतात; व तें कर्म भोगण्यांत त्यांनां दुःख होत नाहीं; आणि परमेश्वरानी हा अधिकार दिला असल्यामुळें कायव्यूह करून तें कर्म

एकदम भोगून टाकतां येत नाहीं. कारण योग परमेश्वराराधनाधेय[९] असतो व आराधना आराध्यावर[१०] चढू शकत नाहीं. पहिल्या प्रकारचें अनेकजन्मारंभक[११] कर्म मात्र कायव्यूह करून भोगून संपवितां येतें परंतु पूर्व कल्पांतील कांहीं विशेष कर्मामुळें लोकानुग्रहसहायार्थ[१२] आधिकारिकांचाही केव्हां केव्हां कायव्यूह असतो. बृहद्वासिष्ठाच्या मुमुक्षुप्रकरणांतील एका व्यासांच्या बत्तीस आकारांची कथा ह्याचें उदाहरण आहे. तें वाक्य असें-

**''इमं व्यासमुनिं तत्र[१३]द्वात्रिंशं संस्मराम्यहम् । यथासंभव विज्ञानदृशा संदृश्यमानया ।।'** (सर्ग ३-२१)

ह्या आमच्या उत्तरावरून पूर्वपक्षाचें अर्थातच सर्व म्हणणें निरर्थक झालें

*(१) एक जन्म देणाऱ्या कर्मसमुदायाप्रमाणे (२) सात जन्मपर्यंत श्रीमंत व वेदपारंगत असा ब्राह्मण जन्म येईल (३) पवमान पठन केल्याचे पुण्य (४) त्याचे फल मिळण्याचा काल आल्यास (५) तीव्र तपाने (६) ज्यांना वेदश्रुतीचा साक्षात्कार होतो (७) परमेश्वराने त्यांना जो सृष्टिकार्यात अधिकार दिला आहे (८) सृष्टीचा कारभार चालविण्यामध्ये मदत करणारे (९) परमेश्वराचे आराधनेवर आधारलेला (१०) ज्याची आराधना करावयाची त्याच्यावर (११) अनेक जन्म देणारे (१२) लोकावर कृपा करण्यास साह्य व्हावे म्हणून (१३) ह्या व्यासमुनींचाच हा बत्तिसावा अवतार मी पाहतो आहे. त्या अधिकारामध्ये जी ज्ञानदृष्टि असावयाची, त्या ज्ञानदृष्टीने युक्त सर्व होते.*

आणि कोणत्याही अनेकजन्मारंभक कर्माच्या योगज[१] व्यवस्थेनुसार शुकाचे ब्रह्मचारी व विवाहित जन्म सांगणाऱ्या पुराणांचा विरोधपरिहार होतो.

शिष्यउवाच :-

**।। गीति ।।**

**शंकाप्रताप[२] शमला[३] स्वामींनीं प्रेरितां[४] वचनपवन[५] ।परि विनवी शुकमहिमा ऐकाया अंग[६] जाहलें श्रवण ।।७७।।**

**श्रीगुरुरुवाच :-**

**वत्सा किति वर्णावें ज्या पापा नरक सातही दरती[७] । तीं आचरुनिहि अंतीं सज्जनमहिमाचि[८] ऐकुनी तरती[९] ।।७८।।**

**।। ओव्या ।।**

**जयाचिया ज्ञानेंकरून । देहासही[१०] आलें ब्रह्मपण[११] । म्हणोनि वर्णाश्रमचिन्ह । देहावरी दिसतीना ।।७९।।**

**आत्मयावांचोनि कांहीं । कल्पिता[१२] अधिष्ठान[१३] नाहीं । आणि कल्पितत्व तेही । आत्माचि दुसरा ।।२८०।।**

**उपाधीच्या[१४] निमित्तेंकरून । आकाशीं शशी[१५] दिसती दोन ।**
**तथापि भ्रमजन्य शशीकारण[१६] । तिमिरसादृश्य[१७] नसेची ।।८१।।**
**सूर्यबिम्ब[१८] सूर्यसदृश[१९] । तैसी उपाधी[२०] निर्मी जगास ।**

*(१) योगाने कायव्यूह करून योगीज्ञानी प्रारब्ध भोगतो तसे, शुकाचार्यांचे कायव्यूहाने दोन देह पावले म्हणजे विरोध राहत नाही ही व्यवस्था (२) शंकारूपी दाह (३) नाहिसा झाला (४) वाहविता (५) वचनरूपी शीतल वायु (६) श्रवण अंग झाले म्हणजे सर्वांगाचे ठिकाणी कान झाले. अत्यंत उत्कंठा लागली (७) भितात (८) सज्जनांची चरित्रे (९) उद्धरतात (१०) देहहि (११) ब्रह्मरूप झाला (१२) भ्रमाने भासणाऱ्या किंवा ज्याची कल्पना केली तो पदार्थ (१३) आधार (१४) डोळ्यात रातआंधळ असते ते (१५) चंद्र (१६) भ्रमाने भासणाऱ्या चंद्राचे ठिकाणी (१७) रातांधळ्याचे गुणधर्म, सारखेपणा (१८) सूर्याचे प्रतिबिंब (१९) सूर्यासारखे, सूर्याचे गुणधर्माने युक्त (२०) माया*

**तथापि अधिष्ठान[२] आत्मा म्हणोनि त्यास । आत्मसदृशता[३] येत असे ।।८२।।** (य३-३१०)

**ब्रह्मीं[४] नाहींत आश्रम वर्ण । ब्रह्मरूपचि देह म्हणून । तेथ नाहीं वर्णाश्रमचिन्ह । न दिसे पूर्ण शुकातें[५] ।।८३।।**

**ब्रह्माचा देह कर्मे निर्मिला । हा बोल बोलतां वायां गेला । वर्णाश्रमविभाग कर्मे केला । तो ब्रह्माचा देह होऊं न शके ।।८४।।**

**म्हणोनि वर्णाश्रमचिन्ह । शुकदेहीं न दृश्यमान[६] । किंवा शुकाचा अभिप्राय ऐसा पूर्ण । कीं आश्रमवर्ण भूतकार्या[७] ।।८५।।**

**मज[८] ईश्वरा नाहीं भेद । मग माझा देहही अवतार सिद्ध । तो भौतिक नाहीं हें कराया सिद्ध । वर्णाश्रमचिन्ह त्यागिलें ।।८६।।**

**अथवा मी जाहलिया उंचवर्ण । मज अवघे करितील नमन ।**
**मग स्त्रीपुरुष मातापितयासमान[९] । हें बाल्य[१०] जाण साधेल ना ।।८७।।**

**सर्वांच्या शेवटीं बाळ होत । ऐसा श्रुतिमातेचा सिद्धांत । तें बाल्यचि रहावें अखंडित । म्हणोनी वर्णाश्रमचिन्ह नको ।।८८।।**

**आंगीं येतां वरिष्ठपण । दिसतील दुसऱ्याचे दोषगुण । बालवृत्ति धरितां जाण । ही कटकट आपण सहज चुके ।।८९।।**

**जनाचा जया उद्वेग नाहीं । जन जयातें न भीती कहीं । तो मज प्रिय म्हणे शेषशायीं । हें बाल्यावीण नाहीं साधत ।।२९०।।**

अथवा साधूचियाठायी । ज्ञानीचत्वभाव नाहीं । हें दाखववावया लवलाहीं । आश्रम वर्ण त्यागिले ॥९१॥
अथवा मीचि नारायण । ब्रह्मा माझिया नाभीपासून । तयासह यज्ञोपवीत उत्पन्न । तें मी चिन्ह धरूं कां? ॥९२॥
असो ऐसा अवधूतवेष[११] । निर्विकार परिणतव्यास[१२] । स्त्रिया आणि बाल जयास । परम प्रेमें वेढिती ॥९३॥

*(२) आधार (३) आत्म्याचेच गुणधर्म (४) ब्रह्म काही कोणत्या आश्रमाचे किंवा वर्णाचे नाही (५) शुकाचार्यांचे ठिकाणी (६) दिसत नव्हते (७) पंचभूतापासून जो देह उत्पन्न झाला असेल त्याला (८) माझ्यात व ईश्वरात (९) आईबापासारखे पाहणे (१०) ज्ञानी पुरुषाने बाळाप्रमाणे वागावे अशी श्रुति आहे (११) दिगंबर वेष धारण करणारे (१२) व्यासच आपण उत्पन्न झाले.*

शुक तोचि श्रीकृष्ण । स्त्रिया पाहती पुत्रासमान । गर्भयातना न होऊन । यशोदापण पावल्या त्या ॥९४॥
सज्जन[१] बंधुस्नेहाचे उमाळ । ते भोंवते बाळचि गोपाळ । दुसरा अर्जुन[२] परीक्षित्भूपाळ । यास रक्षाया पातले ॥९५॥
जियांचिया स्पर्शेंकरोनी । विस्मया पावली फणिशिरमणिनी[३] ।
कीं जेव्हांपासूनि मी कृष्णविरहिणी[४] । ब्हा स्पर्श तैंपासुनी अपरिचित[५] ॥९६॥
कीं माझीच पाहूनि ग्लानी । परतोनियां आले कैवल्यदानी[६] । ऐसें अनुमानुनी[७] मनीं । आपणा धरणीं धन्य म्हणे ॥९७॥
अंगीं वैराग्यतेज लखलखीत । चरणस्पर्शे मी सकाम शांत ।
कीं तीव्रत्वा कंटाळूनि संज्ञाकांत[८] । तळवे आरक्त जाहला ॥९८॥
नखीं शशांककोरी[९] सुढाळ[१०] । जेथें स्नेहें खेळती आर्तभाळकमळ[११] । (य३-३११)
वरी अभय द्यावया स्नेहाळ । सुकुमार[१२] पाणी[१३] ॥९९॥
तया सुकुमारीची[१४] तीव्रता[१५] । पाहूनि बिहाली प्रलयव्यथा[१६] ।
मग आश्रय मागोनि पर्वता । दडाली आंत ज्वाळा होउनी ॥३००॥
जेथुनी बोधगंगेचे[१७] उमाळे[१८] । गोविंदनामाचिया कल्लोळे[१९] । उठती तें कोंवळें । वदनकमळ ॥१॥
तया दोहीं ओठांचिया[२०] तीरीं । दोहीं कपोलांचिया[२१] अनुकरी[२२] । कृपाकटाक्षें विलसणारी । पुतळिका[२३] दोन्ही ॥२॥
मुमुक्षुक्षुधेचा आवांका[२४] । पाहूनि द्रवली करुणांबिका[२५] । ते मागे पुढें रक्षावया देखा । द्विधा[२६] जाहली दोहि नयनी ॥३॥

*(१) तेथे जमलेले सर्व सज्जन हेच कोणी उचंबळून आलेले बंधुप्रेम, तेच शुकाचार्यरूपी कृष्णाचे खेळगडी (२) राजा परीक्षिती हाच अर्जुन (३) शेषाच्या डोक्यावर मण्याप्रमाणे असणारी पृथ्वी (४) श्रीकृष्णवियोग झाल्यापासून (५) अनोळखीचा (६) शोकाकूल स्थिति (७) तर्क करून (८) नावाचा पति (९) चंद्राच्या कोरी (१०) रेखीव (११) दीन दुःखितांचे शिरकमळ (१२) कोमल (१३) हात (१४) कोमलपणाची (१५) पराकाष्ठा (१६) प्रलयकालचे दुःख (१७) ज्ञानगंगेचे (१८) उच्छाल (१९) लहरी (२०) मुखावाटे ज्या ज्ञानगंगेचा प्रवाह निघतो त्या गंगेचे ओठ हे तीर होत (२१) गालांच्या (२२) अनुकरण करणारे (२३) बाहुल्या (२४) जोर, पीडा (२५) करुणारूपी पार्वती. (२६) दोन रूपे धारण करणारी.*

आर्ताचे[१] उद्गार[२] भगीरथ[३] । तया श्रोत्र[४] दाविती पथ[५] । तंव दोन्ही अंबिका समर्थ । धांवती रक्षावया ॥४॥
पुत्र घेईल एकटी अंबिका । हाचि मत्सर धरूनि निका । ओष्ठतीरांमधूनि[६] सुरेखा । बोधगंगा[७] निघे ॥५॥
एकें एका विसंबता[८] । झणी विलंब होईल आर्त निववितां ।
म्हणूनि नयनीं अंबिका मुखीं सिता[९] । एकवटल्या सोहंशिवीं[१०] ॥६॥
कधीं आर्ताचें वांकडें वचन । नाहींच ऐकिलें म्हणून । दोहींकडे दोन्ही कर्ण । सुंदर आपण शोभती ॥७॥
कीं समोरील आर्तासाठीं । कृपावंत आहे दृष्टी । परी आडिलिया[११] आर्तासाठीं । पाहिजे कोणी ॥८॥
म्हणोनि दोहोकडे दोघेजण । विचारी श्रोत्र बैसले आपण । भूतदयेचें भूषण । लेवूनि आंगीं ॥९॥
तया कर्णनेत्रांची मैत्री । साधावया मध्यतंत्री । भ्रुकूटिया पुरंध्री[१२] । दिसती दोन्ही ॥३१०॥
कां कृपादृष्टि चहूंकडे जाईल । मग आर्त केंवी हा निवेल । म्हणूनि प्रतिबंध होईल । तरीच बरें ॥११॥
मग दोन्ही कृपाकिरण[१३] सुरेख । आणि आर्तावरीच जातील देख ।
हा उपकार मनीं धरूनि सम्यक । नयनऊर्ध्वाश्रय[१४] घेति भ्रुकुटी ॥१२॥
आणि तिहींचें[१५] एकपण[१६] । म्हणूनि एकचि अधिष्ठान[१७] । हें सुरेखान्वित[१८] शोभन । कंठकमल ॥१३॥
जेथुनी करुणागंगानिर्झर[१९]। हृदयांबुनिधी[२०]अतिगंभीर[२१]। त्रिवलीललित[२२]शोभे उदर । अत्यंत साचार रम्य जें ॥१४॥

*(१) दीन दुःखिताचे (२) तोंडावाटे निघणारे दुःखाचे शब्द (३) भगीरथ राजा (४) कान (५) मार्ग (६) ओठ हेच कोणी*

*तीर (कांठ) त्यातून (७) ज्ञानगंगा (८) एकीने दुसरीवर ते काम सोपवून दिल्यास (९) गंगा (१०) ब्रह्मरूप प्रत्ययात (११) दृष्टिच्या आड असलेल्या (१२) वयस्क बुजरूक स्त्रिया (१३) कृपारूपी किरणे (१४) डोळ्याच्या वरच्या भागाचा आश्रय किंवा डोळे वर भ्रुकुटीच्या ठिकाणी आश्रय घेतात (१५) कान, डोळे आणि दृष्टि यांचे (१६) एकरूप, एकाकारता (१७) आश्रय (१८) सुंदर मिलाफ जेथे आहे असे (१९) करुणारूपी गंगेचे प्रवाह किंवा करुणारूपी गंगा व ज्ञानगंगा यांचे प्रवाह (२०) हृदयसमुद्र (२१) खोल, अगाध (२२) तीन वळ्यांनी शोभणारे.*

कीं आर्त येतां भलतीकडूनी । प्रतिबंध न व्हावा तन्नयनीं । यालागीं वस्त्राची गवसणी[१] । निःशेष टाकुनी दिली कृपें ॥१५॥

विरक्ताही या सुंदरवेषा । निर्भय आलिंगिती दिशा । शेखीं बाल्यभाव पाहतांसरिशा । वस्त्रचि होती ॥१६॥

तीं विकीर्ण[२] पाहूनि जांवळें[३] । अप्सरांचेंही चित्त सोंवळें[४] । (य३-३१२)

होऊनि मातृपणाचे डोहळे । उठती तया ॥१७॥

सकळ देवांमाजीं गोविंद । तैसाचि शुकवर्ण प्रसिद्ध । श्यामसुंदर भक्तमोद[५] । करुणावृंद[६] अवतरला ॥१८॥

तें तारुण्य परी स्त्रीमनास न कळे । सदानंदभरी हास्य मोकळें । कीं हें विश्वपुण्याचें[७] ओतलें । एकचि अंग ॥१९॥

जें तारुण्य पाहूनि निश्चिती । रंभा लांचावली होती । परी वैराग्यश्रियेनें[८] हाणूनि लाथीं । लाजूनि पुढतीं पाठविली ॥३२०॥

उमा दक्षगृहीं गेली म्हणून । गंगेनें मोहिला फणिभूषण[९] ।

तैसी शुका झणि मोहील अन्य कामिन । वैराग्यश्री म्हणून सोडिना ॥२१॥

तारुण्य पाहून युवतिवृत्ति[१०] । धांवूनि जातां मातृत्वें परिणमती ।

ही सोळाचि वरुषांची मूर्ती । परी जाहली बुंथी[११] विश्ववात्सल्या[१२] ॥२२॥

ते पुण्यपुंजमय[१३] आर्तजननी[१४] । निष्कंचन[१५] परी अभयदानी[१६] । पाहोनि उठले अवघे मुनी । आदर[१७] करिती सद्भावें ॥२३॥

रावही आतिथ्य प्रेमें करी । आत्मा वाहिला चरणांवरी । ऊ्रासनीं करुणालहरी[१८] । पूजाद्युपचारीं शोभला ॥२४॥

देव ब्रह्मर्षि आदिकरुनी । सर्व आनंदले मुनी । महाराज सर्वज्ञ शुकमुनी । श्रेष्ठासनीं बैसले ॥२५॥

मग रायें घालोनि लोटांगण । साभिप्राय[१९] अंतःकरण । उभा राहिला कर जोडून । लावोनि ध्यान मुनिचरणीं ॥२६॥

*(१) आच्छादन (२) फैललेले (३) कुरळ केश (४) कामरहित (५) भक्तांना आनंद देणारा (६) करुणावृत्तीचा पुंज (७) संपूर्ण पुण्याचे (८) वैराग्य संपत्तीने (९) शंकर (१०) स्त्रीभाव धारण करून जाणारी मनोवृत्ति मातृभाव धारण करून परत येई (११) पुंज (१२) संपूर्ण स्त्रियांच्या पुत्रप्रेमाला (१३) संपूर्ण पुण्याची बनलेली (१४) दीन जनांची माउली (१५) दरिद्री (१६) नाभीकर देण्यात (१७) सत्कार (१८) करुणेचा तरंग (१९) अंतःकरणात ज्याने काही हेतु धरला आहे असा.*

जया चरणतेजेंकरून । पराजय पावले रंभा मदन । तें पाहोनि समाधान । राय अत्यंत पावला ॥२७॥

तंव शिष्य म्हणे श्रीगुरुनाथा । जंव जंव ऐकावी संतकथा । तंव तंव आनंद देउनी अतृप्ति चित्ता । वाढली राहे ॥२८॥

नवल वाटे माझें चित्तीं । आनंद आणि अतृप्ति । विरोधी असोनि एके पांतीं[१] । कैंवी श्रवणार्थी तिष्ठत ॥२९॥

शुकमहिमेचें अमृतपान । स्वामी करवितील कृपा करून । तरी विश्वाचें मरणहनन[२] - । श्रेय संपूर्ण येईल पदा ॥३०॥

श्रीगुरु म्हणती तुझी मती । निर्मळ जाहली सर्वस्थिति । म्हणोनीच उपजली रती । संतमहिमा ऐकावया ॥३१॥

शुकमहिमा अतिसुंदर । वैराग्यभरित मनोहर । तुज सांगतों समग्र । सावधअंतर ऐक पां ॥३२॥

जन्मतांचि मिथ्या संसार । मानोनि घेतलें वनांतर । तव व्यास होउनी विरहातुर[३] । हे पुत्र म्हणोनि पाठिं लागे ॥३३॥

तेव्हां तरुपाषाणांतून । प्रत्युत्तर दे कृपानिधान । तो महाराज व्यासनंदन । भावेंकरून नमस्कारू ॥३४॥ (य३-३१३)

नदीपार निघोनि जातां । नदींत नग्नस्त्रीसमुदाय होता । पुढें व्यासही तेथ येतां । वस्त्र नेसल्या स्त्रिया सकळ ॥३५॥

तेव्हां व्यास पुसे स्त्रियांलागुनी । माझा पुत्र यौवनखाणी[४] । येथोनि जातां तुह्मी कामिनी । निर्भय नग्न राहिल्या ॥३६॥

मी म्हातारा विकारहीन । वस्त्रें कां नेसलां मज देखून । तैं स्त्रिया बोलिल्या प्रतिवचन । तुमचा नंदन निर्विकारी ॥३७॥

वस्तू वस्तुत्वें[५] समसमान[६] । भूत भूतत्वें समान जाण । तेथ कोठिला नर कोठिली कामिन । अनर्थ पूर्ण आघवा ॥३८॥

ज्ञानदृष्टीं आत्मा एक । त्यासी नाहीं द्वैतओळख । आणि स्त्री जरी पाहिली आहे एक । तरी ती माता ॥३९॥

म्हणोनि अंतर्दृष्टि तयापाशीं । विकार नाहीं अंश त्यासी । बाह्यदृष्टिं पाहतां निःशेषी । तरी मातृप्रेमावीण अन्य नाहीं ॥४०॥

*(१) बरोबरीने (२) जगाचे मरण चुकविण्याचे पुण्य (३) शोकाकुल (४) अत्यंत तरुण (५) वस्तुदृष्टीने (६) सारख्या.*

म्हणोनि पाहोनि तुमच्या बाळा । आम्हीही जाहलों मतिनिर्मळा ।
नग्न कीं विवस्त्रा[१] सवस्त्रा सकळा । ही आठवण विसरलों ॥४१॥
तुह्मी वेदांचें गुह्य जाणोन । सुतापाठीं धांवता ममता धरून ।
आम्ही वस्त्रें नेसलों म्हणून । कीं ओळख आहे तुह्मांतें ॥४२॥
ऐसी ऐकोनि स्त्रियांची वाणी । चित्तीं आश्चर्य करी मुनी । पुढें जन तारावयालागुनी । तपीं शुकमुनी बैसला ॥४३॥
तपा लोटले कांहीं दिवस । इंद्रियनिग्रहें ध्यानमानस । आत्मा ब्रह्मरूपीं समरस । पूर्वीचाची ॥४४॥
गर्भी प्रभूचा उपदेशिला । लोकहिता जो तपा बैसला । पाहोनि इंद्र भांबावला । कीं पद घेईल आपुलें ॥४५॥
नवल रजोगुणाची करणी । इंद्र सात्त्विक देवयोनी । तथापि त्रिगुणातीत मुनि । त्या तत्करणी कळेना ॥४६॥
या सकाम लोकांची रीती । कामनेसाठीं साधूस वंदिती । फळ न मिळतां पुनः द्वेषिती । म्हणोनि यती उदास ॥४७॥
जयाचा सुगरवा[२] देखे । तयाचाचि गुरुमंत्र शिके । विष्णूवांचोनि दैवते जितुके । ते सकाम लोकें माजविले ॥४८॥
जाखाई जोखाई जखिणी । आसरा मेसको मलिनी । भूतिनी लटिनी पद्मिणी । निर्मिल्या यक्षिणी सकामें ॥४९॥
खंडोबा मुंजोबा भैरव । म्हसोबा पिरोबा जुलादेव । वेताळ सटवी खुटाव । सकामलोकीं निर्मिले ॥५०॥
आपुल्या[३] वस्तूच्या भयेंकरून । निरुपद्रवा[४] पीडिती सकामजन ।
इंद्राचा हा पाहोनि गुण । स्वर्गास कोण विटेलना ॥५१॥ (य३-३१४)
असो कराया शुकनियमभंग[५] । उपाय धुंडाळी शचिरंग[६] । जवळीं बोलावूनि रतिरंग[७] । विचार पुसे आवडी ॥५२॥
मदन म्हणे सहस्रनेत्रा[८] । मज ठाऊक आहे शिवाचा दरारा[९] । हा त्याहूनि विरक्त खरा । निज अंतरा कळोंदे हें ॥५३॥
शिवासी उमा बायको असून । तेणें मज जाळिलें क्रोध करून ।
हा तंव ब्रह्मचारी जन्मापासून । येथ अघटमान[१०] प्रवेश माझा ॥५४॥

*(१) वस्त्ररहित की वस्त्रसहित (२) महंती (३) आपल्याजवळ असलेली आपली आवडती वस्तु कोणी घेईल या भीतिने (४) गरीब, कोणाला पीडा न करणारे (५) शुकाचार्यांच्या तपाचा नाश (६) इंद्र (७) कामदेव (८) इंद्रा (९) प्रभाव (१०) अशक्य.*

इंद्र चिंताग्रस्त मनीं । तंव रंभा बोले पुढें येउनी । मजसारिखी दिव्य कामिनी । असतां मनीं कां चिंता ॥५५॥
वन श्रृंगारावें वसंतीं । सवें असावें मन्मथीं । मी ठकवोनि आणीन सभेप्रति । निश्चय चित्ती असों द्या ॥५६॥
साठीसहस्र वरुषें तपला । तो विश्वामित्र म्यां येथ आणिला । हा थोडिया दिवसांचा गणिला । आहे कवणी ॥५७॥
जरी सत्य न करीन आपुलें वचन । तरी काळें होवो हे वदन । इंद्र हर्षला ऐकोनि वचन । मग गौरवोनि पाठविली ॥५८॥
वसंतें श्रृंगारिलें वन । जवळीं भीत भीत उभा मदन । कीं आपुल्या ताता[१] हृदयीं पाहोन । पुढें पाऊल घालिना ॥५९॥
तात विराजे शुकाचें हृदयीं । तेथ माझा निर्लज्ज रिघाव नाहीं ।
म्हणोनि मागें मागें सरोनि पाही । राहे लवलाही उभा तेथ ॥३६०॥
इकडे रंभा कामभरित । सुस्वर गाणें गावोनि नाचत । गाणें ऐकोनि जड पदार्थ । सकाम जीवंत जाहले ॥६१॥
गाणें अतिसुरस ऐकुनी । शुक विचारी अंतःकरणीं । कीं व्यष्टि अनाहत[२] नाद ये क्षणीं । पाहिला होता ॥६२॥
हा समष्टि अनाहत[३] नाद प्रगटला । तो अंतर्बाह्यें वाटे भरला ।
कीं हृदयींचा श्रीकृष्ण व्यापक[४] झाला । तो वाजवूं लागला चहूंकडे वेणू ॥६३॥
यास्तव उघडोनि पाहि डोळे । तंव पुढें रंभारूप देखिलें । तें श्रीकृष्ण म्हणोनि नमस्कारिले । तटस्थ ध्यान संवरित ॥६४॥
रंभेस वाटलें आपुल्या मनीं । कीं कार्य साधेल सहज क्षणीं । म्हणवूनि परम कोमल वाणी । वयें विनवणी आरंभी ॥६५॥
मदन पाहे विलोकून । म्हणे जरी यानें उघडिले नयन । तरी तात हृदयीं दिसती अझून । रंभाअनुमान समूळ मिथ्या ॥६६॥
हृदयीं लोपल्यावीण भगवंत । विकारप्रवेश[६] नाहीं तेथ । बाह्यभाव धरुनी तेथ । रंभा व्यर्थ अनुमानी ॥६७॥
असो शुकाचें ध्यान रंभेचे चाळे[७]। आश्चर्ये पाहती मदनाचे डोळे । (य३.३१५)
मग रंभेनें स्तवन आरंभिलें । जय जय मुनीश्वर म्हणोनी ॥३६८॥

*(१) शुकाचार्यांच्या हृदयात श्रीकृष्णाला (२) आपल्या शरीरात ऐकू येणारा दहा नादानी युक्त असलेला (३) ब्रह्मांडातील (४) ब्रह्मांडात भरला (५) युक्त (६) कामादिकांची उत्पत्ति (७) हावभाव.*

॥ पद ॥

जय जय जय मुनिश्वर वर[१] पाहि मजकडे । तप करुनी जाळिसि[२] कां तरुण रूपडें ॥ध्रु०॥
पाहोनियां सोंग तुझें तात[३] तव रडे । दिधल्याविण सौख्य त्यास धर्म ना घडे ॥ जय०॥१॥
उगिच अशी सुंदर तनु करुं नको मढें[४] । पिउनि गोड अधरसुधा[५] अमर हो पुढें ॥ जय०॥२॥
कुलिन परि मी पायिं तुझ्या लागलें गडे । ज्ञानेश्वर तीहि स्नुषा[६] पाहतिल पुढें ॥ जय जय जय० ॥६९॥

॥ ओवी ॥

गार्हस्थ[७] संपादिल्यावीण । कोण्या शास्त्रीं संन्यास घेण । फेडल्यावीण पितृऋण[८] । मुक्त कैसा होशील तूं ॥७०॥

॥ गीति ॥

बोले मुनिवर तेव्हां कवण इथें पातलीस तूं सटवी[९] ।
नाहिं तुझ्या वदनावर भगवत्प्रेमाचि किमपिहि टवटवी[१०] ॥७१॥

॥ पद ॥

कासयासि व्यर्थचि मी पाहुं तुजकडे । अज[११] अजीत[१२] मुळिंहुनि[१३] मज मागे ना पुढें[१३क]॥ कासयासि०॥ध्रु०॥
तात[१४] मात माझ्यास्तव कोणि ना रडे । द्याया सुखचि जगा करि सुतप[१५] रोकडें ॥ कासयासि० ॥१॥
सुंदरता नाहीं तनुत अवघि लांकडें । आज उद्यां जड तनु ही निश्चयें मढें ॥ कासयासि०॥२॥
मर्त्य तसा स्वर्ग तुच्छ नीघ माकडे[१६] । चरण[१७] धरुनि मरण देशि जाणलें फुडें ॥ कासयासि० ॥३॥
शपथ काळिं तिहिं मी तुझ्या मोहि ना पडे । वश तुज जे यमपुर त्या सहज सांपडे ॥ कासयासि० ॥४॥
ज्ञानेश्वर तात मला नित्य सवंगडे[१८] । तुजसमान चावट सुन त्यास नावडे ॥ कासयासि० ॥५॥७२॥

*(१) वर दृष्टि करून (२) शुष्क करितोस (३) श्रीव्यास (४) प्रेतमय (५) चुंबनाचा आनंद (६) सून (७) गृहस्थाश्रम केल्यावाचून (८) पित्याचे कर्ज (९) दुर्दशा (१०) तेज, प्रसन्नता (११) जन्मरहित (१२) अजिंक्य (१३) प्रथमपासून (१३ क) कार्य व कारण काही नाही. (१४) बाप (१५) उत्तम तप (१६) माकडाची स्त्रीजात (१७) गोडगोड बोलून शेवटी माझा घात करशील.(१८) सोबती*

॥ ओव्या ॥

ज्या दिवशीं येईल विरक्ती । त्या दिवशीं सोडावें गृहाप्रति । ऐसी निश्चयें आहे श्रुती । अन्यथा उक्ति असे तुझी ॥७३॥
एक आत्मा सर्वाठायीं । मातापिता बाळक देही । शत्रुमित्र भिन्न नाहीं । आत्मयाहूनि निश्चयें ॥७४॥ (य३-३१६)
तो आत्मा माझिया हृदयीं । तोचि आत्मा पितयाच्या ठायीं । आत्मऋण[३] फिटतां लवलाहीं । पितृऋणही फेडिलें म्यां ॥७५॥
तिन्ही काळीं माझ्याठायीं । बंधनाची वार्ता नाहीं । तेथ मुक्तीची आशा लवलाही । स्पर्श किमपिही करों न शके ॥७६॥

॥ अभंग ॥

रंभा म्हणे तूज जरि नको मुक्ति । तरी गृहासक्ति[४] सोडिशी कां ॥१॥
एकवेळ घेई सुंदर चुंबन । करी समाधान अधराचें[५] ॥२॥
हातामाजि हात हृदया हृदय । योग साधि स्वयें आलिंगनीं ॥३॥
सुरतसमाधि[६] सुखाचिया गोडी । चढे घडिघडि कामपंथें[७] ॥४॥
अनिर्वाच्य तृप्ति पावोनि साजिरी । सोडोनि दे पूरी विरक्तता ॥५॥
ज्ञानेश्वरबाळ कैसा निश्चयाचा । जया विषयाचा वारा नाहीं ॥७७॥

॥ गीति ॥

सोडुनि मृदुकुचमर्दन[८] तप करिता व्यर्थ कां मरायाला । मद्वचनें[९] आचरितां तृप्ती होईल कामरायाला[१०] ॥७८॥
सोळासहस्त्र[११] उरिंचे ग्रंथी बळकट जया करें खचलें[१२] । तदपि ब्रह्मचारिता तच्छिष्या केंवि तें न एक[१] चले ॥७९॥

*(२) निर्लज्ज (३) आपल्या आत्म्याचे कर्ज (४) घरादाराचा मोह (५) खालच्या ओठाचे (६) मैथुनसुख (७) काममार्गाने (८) सुकुमार स्तनाचे रगडणे (९) माझ्या म्हणण्याप्रमाणे वागल्यास (१०) मदनाला (११) सोळा हजार स्त्रियांच्या चोळीच्या गाठी (१२) सुटल्या. (१) एक गाठहि सोडणे खपत नाही*

|| अभंग ||

मुक्ति नको तैसा नलगे संसार । ब्रह्मीं हे साचार दोन्ही मिथ्या ||१||
लाळेनें माखलें वदन समस्त । म्हणतां अमृत नष्टा[२] तुम्ही ||२||
तुम्ही कवटाळीणी[३] कवी भुलवून । आपुलें वर्णन करविता ||३||
तुम्हा हातीं हात सांपडला ज्याचा । नैवेद्य मृत्यूचा[४] तोचि एक ||४||
मिळतां तुमच्या हृदयालिंगनीं । वासनाडाकिणीं चित्तीं शिरे ||५||
सुरतसमाधी निश्चयें समाधि[५] । कामपंथें[६] व्याधि जन्मजन्म ||६||
अनिर्वाच्य माया सदा सौख्यहीन । भोगितां आंदण[७] नरक दे ||७||
प्राप्त परी नेघे मिथ्या भवगोडी[८] । म्हणोनी न सोडी विरक्ती मी ||८||
ज्ञानेश्वर मायबाप पाठिंपोटीं[९] । निवारीत कोटी जाळें[१०] तुझी ||८०|| **(य३-३१७)**

|| गीति ||

कृमिभरित पलग्रंथीं कुच[११] पाहुनि घाण[१२] वांति येईल का ।
तृप्तिस्तव[१३] प्रेतालिंगनी कार्ष्णी[१४] काम[१५] धांव घेइल कां ||८१||
सोळासहस्र वृत्ती ज्या हृदयीं[१६] हरिमय[१७] स्वयं झाल्या ।
समष्टिहृदयीं[१८] त्याची तीव्र युवति लोक तारण्या[१९] आल्या ||८२||

*(२) आपला व दुसऱ्याचा घात करणाऱ्या (३) मांत्रिक, चकव्या (४) मृत्यूच्या घशांत गेला (५) मरण (६) काममार्गाने (७) देणगी (८) संसारसुख (९) पुढेमागे (१०) पाश (११) किड्यांनी भरलेले मासाचे पिंड असे जे स्तन (१२) अत्यंत कुत्सित, घाणेरडी (१३) सुखाकरिता (१४) कृष्णाचा पुत्र (१५) मदन (१६) आपल्या अंतःकरणात (१७) श्रीहरिस्वरूप (१८) ब्रह्मांडात त्या तीव्र होऊन स्त्रीरूप झाल्या (१९) लोकांचा उद्धार करण्याकरिता*

|| श्लोक ||

श्रीकृष्णनाथ पति तो निजभावनेनें । तो देव[१] कामिनि सुतादिक नांव नेणे ||
आम्हीच कृष्णरमणी[२] म्हणुनी कदाही[३] । त्याची कथा[४] भवव्यथा[५] गणणार[६] नाहीं ||८३||

|| गीति ||

आत्मत्वें एक तरी वृत्तिदृष्टि[७] थोर[८] कांत सुखकारी । यास्तव तत्कृत कर्णी[९] नाहीं व्युत्थीत[१०] कोणि अधिकारी ||८४||

|| ओव्या ||

ऐसी ऐकोनि शुकाची वाणी । रंभा संतापली मनीं । म्हणे जाळ न वाळतां मुखावरुनी । धिःकारिशी कोण तूं ||८५||
मिथ्या म्हणसी संसार । तरी त[illegible]षें[११] कां भरलें अंतर । लालापूरित[१२] माझें वक्त्र[१३] । न जाणोनि बोलसी ||८६||
प्रेतशरीर[१४] मांसग्रंथी[१५] । न जाणोनि म्हणसी माझी बुंथी[१६] । तपस्वी असूनि तुजप्रति । खोटें बोलणें योग्य नव्हे ||८७||
तुझिया तपाची सिद्धी मोठी । परंतु जाणिलें नाहीं काय मम पोटीं ।
सुखा न पाहोनियां दृष्टि । व्यर्थ गोरटी[१७] धिःकारिसी ||८८||
श्रृंगऋषी तुजऐसाचि होता । तोही आह्मी केला जाणता[१८] ।
तूं चार दिवसांचा बैसलासी आतां । न जाणोनि तत्वता धिःकारिसी ||८९||
ऐसें म्हणोन क्षुब्धान्तर[१९] । क्रोधें कांपे अति थरथर । मग करीं घेवोनियां शस्त्र । चिरिलें उदर[२०] निजहातें ||९०|| (य३-३१८)

*(१) भगवंताला कोणी स्त्री नाही व पुत्र नाही. याचे नावहि तो जाणत नाही (२) श्रीकृष्णाच्या स्त्रिया (३) सुख देणारी (४) भगवंताचे लीलाचरित्र (५) संसारदुःख (६) जुमानणार नाही (७) वृत्तीच्या दृष्टीने (८) परमपति (९) त्याचे चरित्र श्रवण करणारा (१०) ज्याला संसार भासतो असा (११) संसाराच्या द्वेषाने (१२) लाळेने भरलेले (१३) मुख (१४) प्रेतासारखे (१५) मासपिंड (१६) देह (१७) सुंदरी (१८) शहाणा, रस्त्यावर आणला, समजूत घातली (१९) जिचे चित्त संतप्त झाले आहे अशी (२०) पोट*

तंव आंतोनि उठला सौरभ[२१] थोर । जणुं अंतरीं होता कर्पूरगौर[१] । कीं रंभापोटींचा[२] कर्पूर । भरी अंबर[३] सुगंधें ||९१||

सुख देणें सत्त्वलक्षण[४] । सुगंधें सौख्य होय जाण । म्हणोनि विषय तरी किंचित् सत्त्वसंपन्न । सुगंध म्हणिपे ॥९२॥
पूर्ण[५] सत्त्वाचें शरीर । ते तंव ब्रह्मलोकादिस्थानीं[६] परिकर ।
त्याहोन न्यून सत्त्वशरीर[७] । ते दिव्यविषयरूप[८] मानवातें ॥९३॥
म्हणोनि रंभेचिया पोटी । सौरभभांडाराचिया[९] कोटी । देव मधुकर[१०] होवोनि वासासाठीं[११] । पाठोपाठीं धांवती ॥९४॥
अनंत वर्षे तप करून । ज्यांनीं घेतलें अप्सराचुंबन । तेही आंतील नेणतेचि होते जाण । सुवास पाहोन धांवले ॥९५॥
की रंभेच्या उदरांतून कर्पूर निघाला । तया सुवासें शिव मोहिला ।
तो जावोन रंभापोटीं[१२] राहिला । तंव गौर[१३] झाला सर्वांगें ॥९६॥
यालागीं नांव कर्पूरगौर । भूतें जाहली कर्पूराकार । सौरभें[१४] कोंदाटलें अंबर[१५] । पृथ्वी जाहली गंधवती[१६] ॥९७॥
मग म्हणे तपगर्विष्ठा[१७] । न जाणोनि वरिष्ठप्रतिष्ठा[१८] । आमुच्या उदरीं भरली विष्ठा । म्हणत होतासि अभिमानें ॥९८॥
तरी फेडुनी आपुली भ्रांती । न पडोनि संशयध्वांती[१९] । सत्वर चढे सौख्यप्रांतीं । मी वर निश्चिती तुज देतें ॥९९॥
ऐसें ऐकोनि वचन । शुक उभा ठाकला कर जोडून । म्हणे अहा हें त्रैलोक्यरत्न[२०] । आजचि निधान[२१] देखिलें ॥४००॥
ऐसी ऐकोनि स्तुती । हर्ष वाटला रंभेप्रती । परी मदन म्हणे तिजप्रती । तात दिसती हृदयीं यांच्या ॥१॥
जोंवरी ज्ञानेश्वरचरण[२२] आवरण । नाहीं तोंवरी शपथ घेऊन ।
मूळमायाही[२३] करितां यत्न । भक्त जाण वश न होती ॥२॥

*(२१) सुगंध.(१) शंकर (२) रंभेच्या पोटचा कापूर, अर्थांतराने केळीच्या पोटचा कापूर (३) आकाश (४) सत्वगुणाचा धर्म (५) शुद्धसत्वाचे (६) ब्रह्मलोकाचे ठिकाणी (७) कमी सत्वात्मक (८) अलौकिक विषयस्वरूप (९) सुगंधाची खाण (१०) भ्रमर (११) सुगंध घेण्याकरिता (१२) रंभेच्या उदरात (१३) पांढरा, गोरा (१४) सुवासाने (१५) आकाश (१६) गंधयुक्त (१७) तपाने गर्विष्ठ झालेला (१८) आमच्यासारख्या श्रेष्ठ स्त्रियाची योग्यता (१९) संशयरूपी अंधःकारात (२०) त्रैलोक्यातील अमोलिक वस्तु (२१) रत्न (२२) श्रीज्ञानेश्वरमहाराजांचे चरण विसरले नाहीत (२३) जीवाला आत्मविस्मृति करणारे अज्ञान.*

शुक म्हणे मिथ्या म्हणोन । द्वेष न करावा हें साच बोलण । परी रागही धरितां जाण । अतिबंधन चुकेना ॥३॥
बारावर्षे गर्भी राहिलों । विष्ठामूत्राच्या दाथरीं कढलों । मग जन्मतांची पळोन आलों । पुढतीं संसार नको हा ॥४॥
मिथ्या असोनि तयाचा द्वेष । हेंचि कारण जन्म घेण्यास । अनंत जन्म गर्भवास । पावोनि आतां विटलों ॥५॥
ठाऊक असतें ऐसें जरी । कीं मातें सुगंध तुझे उदरीं । तरी येथें बैसोनि निर्धारी । तप करितों अनंत ॥६॥
जिणें नवमास पाळिलें उदरीं । तीस सोडुनि आलो वनांतरीं । गर्भवासाचे कष्ट भारी । सत्यसम[१] अंतरीं मानोनी ॥७॥
माते तुझ्या उदरीं असतों । (य३-३१९) तरी तुझ्या गर्भवासा न विटतों । आणि कृतघ्नही न होतो । मातेलागीं ॥८॥
गर्भवासदुःख कळलें फार । म्हणोनि झुगारिला मातेचा उपकार ।
तुझ्या उदरीं असतों साचार । तरी तुझा उपकार न विसरतों ॥९॥
पूर्ण मातृत्व तुझ्या पोटीं । जे तपस्वी लोलुप होतें तुजसाठीं ।
जे बाहेरचि राहिले शेवटीं । फाडिलें मजसाठीं उदर त्वां ॥४१०॥
मी सत्यचि अल्पज्ञ मुनी । कांहींच्या उदरीं विष्ठा पाहुनी । मातृभाव व्यर्थ जनीं । ऐसा मनीं म्हणत होतों ॥११॥
सर्व सुख सुगंधाची खाणी । तुज ऐशा आहेत जगज्जननी । हें मुख्यतत्व विसरोनी । गर्भी कष्ट पावलों ॥१२॥
माते मी तव स्तनांप्रति । म्हणत होतो मांसग्रंथी[२] । त्याची क्षमा असो दे चित्तीं । कळलें मजप्रति निश्चयें ॥१३॥
उदरी सुगंध येवढा थोर । तरी स्तनीं दुग्ध असेल अमृताकार[३] । तें मज पाजी धांवोनि सत्वर । क्षुधा थोर लागली ॥१४॥
ऐसें ऐकतां शुकाचें वचन । रंभा जाहली अभिमानहीन । साष्टांग घाली लोटांगण । गेली विसरोन देहभावा ॥१५॥
संतसंगाचा महिमा थोर । रंभा विसरली देवशरीर । कीं उदरींचा जो सुगंध थोर । तेणें व्यासकुमर[४] पूजी ॥१६॥
कीं संतसंगें स्वर्गास विटली । म्हणोनि भूमीवर केळी जाहली । वृक्षरूपें विलसों लागली । सुख देवोनी सकळातें ॥१७॥

(१) खरे (२) मासाचा पिंड (३) अमृताप्रमाणे (४) शुकाचार्याला.

कीं शुकपक्षी[१] हिंडती वनांत । आपण केळी जाहली तेथ । शुकनांव असावें चित्तांत । हाचि हेत धरूनी ॥१८॥
मग जोडोनी दोन्ही पाणी । म्हणे भक्तवत्सल शांतिपाणी[२] । त्राहे त्राहे कृपा करोनी । स्नेहजीवनीं[३] सिंची मातें ॥१९॥
आम्ही सत्त्वयोनी[४] म्हणवितो अप्सरा । परी कल्पकल्प काम नव्हे पुरा ।

तुह्मांऐसिया तपस्वी विप्रा । छळोनि निर्धारा भुलवितो ॥४२०॥
भय कलह आणि चिंता । नित्य आहे आमुच्या माथां । तूं माय माउली आम्हां अनाथा । रक्षी श्रांता दीनबंधो ॥२१॥
महाराज तुझें करिता छळण । समूळ विराला अभिमान । हारपलें माझें रंभापण । धरितें चरण आवडी ॥२२॥
जळो माझी सुंदर काया । क्षणभंगुर देह पावोनिया । भोगिलें नानापरी विषया । नाहीं हरिपाया विनटलें ॥२३॥
महाराज गुरू तूं कृपावंत । बोलिलासि कीं माझा सुत । तरी वात्सल्ययोगें[५]होकां निश्चित । मज पावन करी दीनबंधो ॥२४॥
(य३.३२०)तुम्हाऐसे संतजन । स्त्रियांस पावन करिती वात्सल्य[६] सांगोन ।
पुरुषांस पावन करिती उपदेशून । आपण नारायण स्वयें होती ॥२५॥
मग रंभेस बोले भगवंत । तूं भय सांडूनि देई समस्त । स्वर्गी जाई आनंदभरित । चित्तीं यदुनाथ आठवीं ॥२६॥
तुमचें प्रारब्ध अतिदुस्तर[७] । आयुष्य आहे कल्पभर । तें भोगिलियावीण साचार । सुटका नाहीं सर्वथा ॥२७॥
परी अंतरीं आठवावा व्रजपाळ । 'मी-माझें' सांडोनि द्यावें सकळ ।
मग वचन ऐकोन चरणकमळ । नमोनि रंभा निघाली ॥२८॥
उगीच स्वर्गी येऊनी । निश्चिंत बैसली आपुल्या सदनीं ।
तंव देव सांगती इंद्रालागुनी । कीं गर्वरहित होवोनि आली रंभा ॥२९॥
टाळ्या पिटती ऋषी समस्त । अभिमान वाहत होती बहुत । आम्हां विप्रांसी भुलवाया निश्चित । बरी गर्वरहित झाली ॥४३०॥
मन्मथ[८] इंद्रासी बोले वचन । त्याच्या हृदयीं करुणाघन । माझा तात कल्याणनिधान । एकही क्षण न विसंबे ॥३१॥

*(१) राघू, पोपट (२) शांति आहे हातात ज्यांच्या (३) स्नेहरूपी जलाने (४) सत्वगुणी अशा देवयोनीत जन्मलेल्या (५) आपल्या ठिकाणी पुत्रप्रेम देऊन (६) पुत्राप्रमाणे प्रेम करावयास सांगून (७) भयंकर (८) मदन.*

तुजसहित स्वर्गभोगखाणी[१] । तया मुनीच्या नखावरूनी । एकचि वेळ कुरवंडी[२] करूनी । द्यावी सांडोनि मज वाटे ॥३२॥
मग इंद्रें रंभेस पाचारून । सहज पुसलें वर्तमान । तंव ते बोले कर जोडून । भय संपूर्ण सांडा जी ॥३३॥
तयांची पाउलें पडतील जेथ । चारी मुक्ती लोळती तेथ । तुच्छ स्वर्गभोगाची मात । अंगणींही निश्चित उभी न ठाके ॥३४॥
ऐसें ऐकोनि रंभेचें वचन । हर्षे दाटला सहस्त्रनयन । म्हणे सर्व संपत्ति घेवोन । तें कैवल्यनिधान पूजूं चला ॥३५॥
करुनी तयाचें चरणपूजन । अवघा स्वर्ग निर्माल्य करून ।
सज्ञननिर्माल्याचें[३] करितां अवघ्राण । मग तुष्टेल रमारमण आपणां ॥३६॥
असो योग्य तें घेवोनी । तयास्थानीं जाउनी । प्रेमभावें शुका पुजोनी । चरणा नमोनी गृहीं आले ॥३७॥
सद्गुरु म्हणती शिष्यराया । जयाची एवढी सुखद चर्या[४]।
तो उपदेशावया परीक्षिद्राया । पातला लवलाह्या निजभाग्यें ॥३८॥
तो पूजित होवोनि सिंहासनीं । राव भावें लागला चरणीं । उभा ठाकला बद्धपाणी[५] । नम्रवाणी बोलत ॥३९॥
जीवनातें[६] शीतळपण । जयाच्या शांतीचें महिमान । बुद्धीसही बोद्धव्य[७] जाण । जयाचें चैतन्य चेतवी[८] ॥४०॥
तो महाराज सर्वज्ञ मुनी । रावही भागवत धर्मखाणी[९] । सप्रेमें उभा बद्धपाणी । आवडीकरोनी बोलत ॥४१॥
(य३.३२१)

॥ पद ॥

आजि मम भाग्योदय झाला ॥ ध्रु०॥
क्षत्रियकुळिं कृति[१०] अधम[११] करोनिहि । पाहत सुजनाला[१२]॥ आजि० ॥१

*(१) संपूर्ण भोगाचे स्थान (२) ओवाळून (३) संताला अर्पण केलेल्या वस्तूचे (४) आचार, वागणूक (५) हात जोडून (६) पाण्याला (७) जाणले जाणारे (८) स्फुरवी (९) धर्ममूर्ति (१०) आचरण (११) नीच (१२) संतदर्शन झाले.*

निजकरुणेनें केलें पावन । वारुनि कुभयाला[१] ॥ आजि०॥२॥
ज्ञानेश्वरप्रभु अतिथी[२] करिती । तीर्थमय[३] जनाला ॥ आजि०॥३॥४४२॥

॥ ओवी ॥

घडतां सज्ञनांचें चिंतन । बारा वाटां पळती विघ्न । वाराणसी[४] होय सदन । उमारमण[५] जीव होय ॥४३॥

॥ अभंग ॥
अवचीता[६] त्यांची भेटी । पुण्यकोटी[७] अगण्य ॥१॥
पादस्नान[८] पादपूजा । नये ओजा[९] बोलता ॥२॥
आज सान्निध्य जोडलें । लया गेले पातक ॥३॥
विष्णु पाहोनी दानव[१०] । देती[११] जीव ज्यापरी ॥४॥
तैसें भवत्सन्निधान[१२] । त्रिभुवन प्रकाशी ॥५॥
व्यासकल्पतरुफळ[१३] । दृष्टमूळ[१४] कैवल्या[१५] ॥६॥
प्रभु ज्ञानेश्वरनाथा । पायीं माथा वाहतें ॥७॥ ४४॥
॥ ओव्या ॥
मी क्षत्रियांमाजीं अधम पूर्ण । उगेंच छळिलें तपोनिधान[१६] । तथापि भेटले संतसज्जन । तरी नारायण तुष्टला ॥४५॥
अग्नीनें पोळतां मेघपर्वत । दरिद्र येतां कल्पद्रुम[१७] प्राप्त । मरणसमयीं जोडेल अमृत । तरी भगवंत तुष्टला ॥४६॥
पतिव्रता पत्नी स्वेच्छाधन[१८] । आज्ञाधारक स्नुषा[१९] नंदन[२०] । इतुक्याहीवरी साधुसेवन । तरी नारायण तुष्टला ॥४७॥
शरीरारोग्य मिष्टान्नप्राप्ती । विश्वासू मित्र मान्यता जगतीं । इतुक्यांतही भेटती संतमूर्ती । तरी श्रीपति तुष्टला ॥४८॥
थू थू केलें सकळ जनीं । पुण्यें गेलीं डावलोनी[२१] । आणि अवचिता अंगिकारिलें सज्जनीं । तरी चक्रपाणी तुष्टला ॥४९॥

*(१) वाईट अशा संसारभीतिला (२) अकस्मात् (३) पवित्र (४) घरच काशी होते (५) जीव ब्रह्म होतो (६) अकस्मात् (७) अनंत पुण्य (८) चरणाला स्नान घालणे (९) सामर्थ्याला (१०) दैत्य (११) प्राण सोडतात (१२) आपला समागम (१३) व्यासरुपी कल्पतरूचे फळ भगवान् शुकाचार्य (१४) प्रत्यक्ष साधन (१५) मोक्षाला (१६) तपस्वी ऋषीला (१७) कल्पतरु (१८) इच्छेप्रमाणे द्रव्य (१९) सून (२०) मुलगा (२१) सोडून.*

तया म्हणती पांडवपाळण[१] । त्यांच्या कुळींच मी उत्पन्न । आपुलें ब्रीद पाळावयाकारण । मज जगन्मोहन तुष्टला ॥४५०॥
वंशपरंपरा आमुचा । पाठिराखा तोचि साचा । कळवळा पाहोनि मज दीनाचा । सहाकारी धांवला तो ॥५१॥
तो तुष्टलियां करुणाघन । मग मरण तेंही परम कल्याण ।
मी अवचिता पाहतों तुमचे चरण । यास्तव रमारमण तुष्टला ॥५२॥
उभा न राहे एक मुहूर्त । जो मोक्षाचे स्वरूप विख्यात ।
तो अवचिता पातला शुक भगवंत । तरी वैकुंठनाथ तुष्टला मज ॥५३॥ (य३-३२२)
एऱ्हवीं आपुली अव्यक्तीं[२] गती । जन्मदकर्मरहित[३] स्थिति ।
प्रारब्ध नाहीं ज्ञानियाप्रति । ऐसें आचार्य बोलती 'विवेकचूडामणौ' ॥५४॥
तथापि तुमचें व्यक्तदर्शन[४] । हेंचि आश्चर्य अतिगहन । कीं तुह्मी प्रत्यक्ष ब्रह्म पूर्ण । आणि नारायणकृपा तनु[५] तुमची ॥५५॥
तीचि होवोनियां व्यक्त । मजपुढें माउली उभी तिष्ठत । मज मरण आलिया अमृत । हें अवचित सांपडलें ॥५६॥
पळपळ मृत्यूचिया हातीं । ऐसिया आम्हा जनांप्रति । आपुली भेटी पीयूषप्राप्ती[६] । म्हणोनि वाटे श्रीपती तुष्टला ॥५७॥
आम्ही भिकारी याचक थोर । आपण करुणासागर उदार ।
मी शापदग्ध[७] असतां पामर । कोणतें सुकृत असेल नकळे ॥५८॥
सुकृत असेल असो कोणीकडे । माझें मन सांगे रोकडें । तुमचीं पाउलें पाहतां फुडे । तरी वळला मजकडे भगवंत ॥५९॥
योगियांमाजीं परमगुरु । म्हणजे तुह्मीच शार्ङ्गधरू । 'सपूर्वेषामपि[८]गुरुः । कालेनानवच्छेदात्' या सूत्रें ॥४६०॥
यास्तव तूंचि आम्हां जनकजननी । म्हणोनि आतां भीड सांडोनि । विचारावें वाटतें मनीं । तें कृपा करोनि सांग माते ॥६१॥
तुमचिया दर्शनेंकरून । मी तंव निःशेष जाहलों पावन । येथ संशय असेल जरी मजकारण । तरी आण श्रीहरीची ॥६२॥

*(१) पांडवांचा पालनकर्ता (२) ब्रह्माचे ठिकाणी किंवा अज्ञात (३) जन्म देणारे कर्म त्या विरहित (४) स्पष्ट मूर्तिमंत (५) नारायणाची कृपा हेच तुमचे शरीर (६) अमृतप्राप्ति (७) शापाने ग्रस्त (८) कालमर्यादा त्याचे ठिकाणी नसल्यामुळे भगवान् सर्वांचा आद्य गुरु होय.*

परंतु मृत्यु येतां जीवा । तेणें कवणाची करावी सेवा । कोण्या कर्मे संसारगोवा[१] । तुटेल सहज ॥६३॥
कोणतिया कर्मेकरून । जीवासी राहील हितस्मरण[२] । कां कोणाचें करावें आवडी भजन । जवळीं मरण ठाकतां ॥६४॥

कोण जप करावें काय । आणिक काय करूं नये । हें अवघें सांग सद्गुरुमाय । कृपा करोनी दयाळे ॥६५॥
तूं बाळासी सर्वदा कृपावंत । तथापि मोहें न मळे चित्त । यालागीं दुर्लभ दर्शन यथार्थ । अमोघही[३] निश्चित असोनी ॥६६॥
गोदोहनमात्रही[४] काळ । गृहस्था दुर्लभ तुझा मेळ[५] । यास्तव मी फार उतावेळ । वचनमौक्तिक[६] सुढाळ[७] ल्याया ॥६७॥
सूत म्हणे शौनकाप्रति । ऐसी अंतःकरणीं धरोनि प्रीती । रायें पुसिलें शुकाप्रति । तो देत महामती उत्तर ॥६८॥
सखी परीक्षितीप्रश्नोक्ती[८] । ती आजवरी प्रेषिली होती ।
आतां उत्तरें प्रगटतील[९] यादवपती । तो पुढतीं 'आगमनविलासू'[१०] ॥६९॥ (य३-३२३)
संतहृदयीं वसत रमण[११]। सखी पाठविली हेंचि जाणोन । आतां उत्तररूपें हृदयीं येवोन । करो अधिष्ठान नाथ तो ॥४७०॥
साक्षीरूपें सर्वदां हृदयीं । तथापि अनध्यस्तविवर्त[१२] पाही । तो संतकरुणें लवलाहीं । यावा हृदयीं ही आशा ॥७१॥
ग्रंथकर्त्री ज्ञानेशकन्या । विरहिणी[१३] आणि संयोगी मान्या[१४] ।
आले नारायण या हर्षवाण्या[१५] । मानीत धन्या आपणा ॥७२॥
आतां हा एवढा सुंदर । ऐसा कासया देऊं परिहार । आदिमध्यांतीं ज्ञानेश्वर । ग्रंथही साचार तोचि तो ॥७३॥

*(१) संसाराचा पाश (२) हिताची आठवण (३) व्यर्थ न जाणारे (४) गाईला दोहण्यास जितका वेळ लागतो तितक्या वेळेपर्यंत (५) संगति (६) वचनरूपी मोती (७) सुंदर, ढबदार (८) परीक्षिती राजाने केलेली प्रश्नोक्ति हीच सखी (९) भगवान् शुकाचार्यांचे उत्तर हेच भगवंताचे प्रगट होणे (१०) प्रगट होण्याची क्रीडा (११) प्रियपति श्रीकृष्ण (१२) ब्रह्मज्ञानाने नष्ट न होणाऱ्या साकाररूपाने (१३) सगुण भगवंताचा वियोग झालेली व निर्गुण भगवंताचा संयोग असलेली किंवा सगुण भगवंताचा संयोग असूनहि अत्यंत प्रेमामुळे संयोगाची जाणीव नसल्यामुळे विरह करणारी (१४) अंगिकारलेली (१५) आनंदाच्या वाणीने.*

तदाकार[१] मन झालियावीण । उत्कंठेसी विषय कोण । उत्कंठेनें आमंत्रण । यालागीं आहे श्रीकृष्ण हृदयीं ॥७॥
आमंत्रण तेंचि आगमनादिक । ही सगुणलीला सकळिक । यालागीं हाही विलास निष्कलंक । येथंही पूर्ण सुख असे ॥७५॥
हें षोडश खणांचें वृंदावन । येथ तुळसी सप्रेमअंतःकरण । तळीं बैसला मनमोहन । भाविकजनपूजक ॥७६॥
तया भाविकांची रजधूळ । मस्तकीं धरोनी केवळ । बोबडिया वचनांची करूनी माळ । घननीळचरणीं वाहूं ॥७७॥
ही स्वल्प सेवा सर्वथा । प्रीति पावो आळंदीनाथा । श्रीज्ञानेश्वर नाम जपोनी आतां । आगमनलीला आरंभू ॥७८॥
सर्वांगाचे करोनी कान । श्रोतीं होआवें सावधान । 'आगमनविलास' प्रेमेंकरून । करोनी श्रवण अनुभवावा ॥७९॥

॥ दोहा ॥

परब्रह्मअनुभवसुखीं[२] पावत वचनविराम[३] । तदपि प्रेमव्यक्तसुखीं[४] मुखिं ज्ञानेश्वरनाम ॥४८०॥

हरिः ॐ तत्सत् श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरकृपाप्रसादे नानाछंदबद्धे गद्यपद्यान्विते प्रियलीलामहोत्सवे आमंत्रणविलासे सद्गुरुशुकसमागमो नाम षोडशसखीप्रेषणम् ।

॥ श्रीमत्सद्गुरुज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ॥

*टीपा :- (१) भगवत्स्वरूप (२) परब्रह्माच्या अनुभवसुखांत (३) वाणीची विश्रांति (४) प्रेमाने प्रगट सुखांत.*

॥ तृतीय यष्टीतील आमंत्रणविलास समाप्त ॥

(य३-३२४)

०००

*येथे प्रियलीलामहोत्सवाचा पूर्वार्ध संपला.*

*उत्तरार्ध ''आगमनविलास'' १४ व्या यष्टीत समाविष्ट आहे, याची कृपया नोंद घ्यावी.*

# सूचना प्रकरण

॥ श्रीज्ञानेश्वरमाउली समर्थ ॥

जयजय सद्‌गुरो भक्तभूषणा[१] । जयजय सद्‌गुरो विश्वजीवना[२] । जयजय सद्‌गुरो करुणाघना । ज्ञानेश्वरजननी ॥१॥
या प्रियलीलामहोत्सवग्रंथी[३] । कथा मात्र भागवती[४] ।
येरव्ही विवेचन केले निजमती । श्रुतिस्मृतिशांकरमती न विरोध ज्याचा॥२॥
शांकरमता विरोध न येता । आणि भक्तिउपयोगी तत्वता । ऐसियाही परमतोक्ता[५] । प्रमाण घेतले ॥३॥
व्यर्थ धर्मी धर्मी[६] द्वेष । वाढविण्याचा हव्यास । न राहो कवणास । म्हणोनिया ॥४॥
पुढे श्रीधरोच्छिष्टपुष्टि । मज करणे आहे गोमटी । आणि भक्तिभाष्याची पेटी । उघडणे आहे ॥५॥
परी ते श्रेय संपूर्ण । मज काव्य कौमुदी शिकवून । श्रीनिवास[७] घेतील बरवेपण । माझे संस्कृत न्यून म्हणोनिया ॥६॥
अझोनिया विषयशांती[८] । जाहली असे न वाटे चित्ती । भासती स्वप्नजागृती । म्हणोनिया ॥७॥
तथापि अभिलाषा चित्ती । समन्वयो वेदान्तभक्ति । घडावा आपुलिये हाती । वाढली ऐसी ॥८॥
यास्तव आपुलिया ऊहा[९] । यथामति शोधूनिया हा । मांडिला वेदान्तभक्तीचा महा । समन्वयोद्यमू[१०] ॥९॥
जो नेवोनिया सिद्धी । हरवोनि द्वैतअद्वैतबुद्धि । जन ठेवावया आपुले पदी । समर्थ कृपानिधी ज्ञानेश्वर ॥१०॥

॥ इति श्रीसूचनाप्रकरणं संपूर्णम् ॥

॥ श्रीज्ञानेश्वरमहाराजार्पणमस्तु ॥

.......

---

*टीपा :- (१) भक्ताचे भूषण (२) जगताचा प्राण (३) हे प्रथमावृत्तीचे या ग्रंथाचे नाव होय (४) भागवतातील (५) दुसऱ्याच्या मतातील गोष्टीला (६) धर्माधर्मात (७) श्रीनिवास शास्त्री हरदास (८) विषयवासना क्षीण (९) अचुक तर्कयुक्ति (१०) समन्वयाचा प्रयत्न.*

---

प्रियलीलामहोत्सवाचा द्वितीय खंड

‘आागमनविलास’

१४ व्या यष्टीत अंतर्भूत आहे.